ऋग्वेद

प्रथम मंडल

ऋग्वेद

- प्रथम मण्डल -

मूळ निर्मिती : सत्संगधारा

ई पुस्तक वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान

ऋग्वेद (मंडल १)

सत्संगधारा :

www.satsangdhara.net

ई पुस्तक वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com

www.esahity.com

महायज्ञ

ई साहित्य प्रतिष्ठानने काही वर्षांपुर्वी श्री. रत्नाकर महाजन लिखित धर्मग्रंथ नावाचा सुमारे तिनशे पानांचा एक परिचयग्रंथ प्रकाशित केला होता. त्यात भारतिय तत्त्वज्ञानाला आकार देणाऱ्या वेद, श्रुती, स्मृती, पुराणे, उपनिषदे आदी ग्रंथांची केवळ तोंडओळख करून दिली होती. त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हटले होते...

"आम्ही भले वेद, उपनिषदं, श्रुती, स्मृती, पुराणॆ, आदिंच्या गमजा सांगतो, मिरवतो. पण कधी वाचतो का? त्यात काय आहे हे तरी आपल्याला माहित असतं का? ज्या काळी युरोपातल्या लोकांना लेखी भाषा नव्हती, कपडेही घालता येत नव्हते आणि अन्न शिजवायची माहिती नव्हती, तेव्हा आम्ही, आमचे पूर्वज, असे भारी भारी ग्रंथ लिहायचो. पण आता त्यांचा

अभ्यास युरोपीय लोक करतात. त्यांच्या वाचनालयांत ती पुस्तकं असतात. त्यांच्या विद्यापीठांत ती अभ्यासली जातात. आणि आम्हाला धड त्यांची नांवंही माहिती नसतात. हे विदारक सत्य आहे. वेद, पुराणं, श्रुती, स्मृती, यांत जे लिहिलंय ते चूक की बरोबर आणि योग्य की अयोग्य हा वेगळा विषय आहेच. पण आम्हाला निदान ते माहित तरी हवं. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीचं दहन केलं. पण त्या आधी वाचून त्यात काय चुकीचं आहे ते जाणून घेतलं. आपल्याला तर एक मनुस्मृती सोडली तर इतर स्मृतींची नांवं सुद्धा माहिती नाहीत. आणि म्हणे गर्व आहे. कसला? आपल्या अज्ञानाचा?”

या मूळ ग्रंथांना एकत्र केले तर सुमारे काही लक्ष पानं भरतील एवढं लिखाण त्यात आहे. छापखाने, कागद, पेन, काहीच नसण्याचा तो हजारो वर्षांपुर्वीचा काळ. हे आज उपलब्ध असलेले साहित्य हजारो वर्षांच्या मौखिक पाठांतराच्या पद्धतीने आपल्यापर्यंत चालत आले आहे. त्याकाळी एका गुरूकडून शिकावे म्हटले तर शिष्याला तऱ्हेतऱ्हेच्या अग्नीपरिक्षांना

तोंड द्यावे लागत असे. अत्यंत खडतर विद्यार्जन करून ते विद्यार्थी आपल्या पुढल्या विद्यार्थ्याला ते देत असत. गुरुशिष्यांच्या शेकडो पिढ्यांतून हस्तांतरित होत ते ज्ञान आज आपल्यापर्यंत आले आहे. ते एखाद्या अमूल्य खजिन्याप्रमाणे आहे. आणि आज आपल्याला अत्यंत सहजपणे मिळते आहे.

आमची अशी इच्छा आहे की आपण हे वाचावे. व आपल्या भोवतालच्या निदान एकाला तरी ते द्यावे. आणि त्याला ते पुढे देण्यास सांगावे. फ़ारसे कष्ट न करता आपण ही ज्ञानज्योती तेवती ठेवू सकत असलो तर का करू नये एवढे?

ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर सुमारे ५०० अशा प्रकारची पुस्तके प्रसरित केली आहेत. आणि आमचं ध्येय आहे की आमच्या हातून किमान दहासहस्त्र पुस्तकं बनावीत आणि ती किमान बारा लाख मराठी वाचकांपर्यंत पोहोचावीत. हे ध्येय आहे. स्वप्न नाही. आणि हे होण्यासाठी आपण आपला वाटा उचलू शकता. कृपया आपल्या ओळखीच्या किमान दहा

लोकांच्या ई मेल आम्हाला कळवा. आज आपले सुमारे अडीच लाख वाचक आहेत. सर्वांनी ठरवले तर बारा लाख व्हायला कितीसा वेळ लागेल. आधुनिक तंत्रज्ञानाने काही गोष्टी सुलभ केल्या आहेत. त्यांचा वापर करून आपण आपल्या प्राचीन तत्त्वज्ञानाचा प्रकाश जगापुढे नेऊ या! या भव्य महायात्रेत सामिल व्हा.

संपर्क साधा

esahity@gmail.com

धन्यवाद

सुनिल सामंत

टीम ई साहित्य प्रतिष्ठान

दोन शब्द

आजच्या आपला हिंदु धर्माचा आधार म्हणजे चार वेद. वेद अपौरुषेय आणि अनंत आहेत. वेदांच्या संहिता यज्ञार्थ रचण्यात आल्यात. चार वेदांपैकी ऋग्वेद ही प्रथम संहिता, ह्याची निर्मिती द्वापरयुगाच्या अंती व्यास ऋषींनी केली. यात एकूण १०मंडले असून १०२८सुक्ते आणि १०५५२ ऋचा आहेत.

यात वर्णिलेला धर्म प्रवृत्तिपर आहे, देह रोगरहित व शक्तिशाली व्हावा, शूरवीर पुत्र-पौत्र व्हावेत, पशुधन वृद्धिंगत व्हावे, युद्धात विजय प्राप्त व्हावा, सुख-समृद्धी नांदावी यासाठी वैदिक ऋषीनी देवांची आळवणी केली आहे. मानव आणि अतींद्रिय दिव्य शक्ती ज्याला आपण ईश्वर म्हणतो यांच्यातील संबध जाणण्यासाठी ऋग्वेद अत्यंत महत्वाचा ठरतो.

आज आपल्या समाजात शतकांपासून जी कुटुंबव्यवस्था समर्थपणे नांदते आहे त्याचे मुळ ऋग्वेदात सापडते. ईश्वर निर्मित ऐहिक जगाचे सत्य काय आणि भोग व ईच्छा यांचे संतुलन कसे साधवयाचे हे या सुक्तात वर्णिलेले आहे. ईश्वर निर्मित या विश्वाचे संचालन अनेक सामर्थ्यवान देवता करत असतात. या देवतांची योग्य मार्गाने आराधना केली असता अनिष्टांचे निवारण होऊन ते आपली ईच्छा पूर्ण करतात. हव्यवाहन अग्नी, सोमपा इंद्र, ऋतुंचे नियमन करणारा वरुण, भयभीत करणारा रुद्र, दिव्य वैद्य अश्विनी, सूर्याची गती नियमन करणारा मित्र, हिरण्यतेजा सविता, प्राणिमात्रांचा आत्मा सूर्य, प्राण्यांचे रक्षण करणारा पूषन, रणसहायक मरुत, दुष्टशक्तींच नाश करणारा बृहस्पति, मातृदेवता, आरोग्य दायिनी आप, प्रकाशदायिनी उषस, कुशल कारागिर ऋभु, उत्साहवर्धक अमृततुल्य सोम या ऋग्वेदातील प्रधान आराध्य देवता आहेत. प्रत्येक देवता निसर्गातील एका शक्तीचे प्रतिकात्मक रुप आहे. ऋग्वेदसूक्तातून या सर्व देवतास्वरुप निसर्गशक्तींची उपासना केली आहे.

धर्म अर्थ काम मोक्ष हे चार पुरुषार्थ आपल्या भारतीय संस्कृतीचे आणि परंपरेचे आधार आणि विशेष ऋग्वेदातून प्रचितीस येतात.

आपल्या धर्माचा आधार असलेले या ऋग्वेद सुक्तांबद्दल अनेकांना कुतुहल असते, ते जाणुन घेण्याची उत्कंठा असते. मराठीतील या अनुवादातून आपल्या धर्माचे स्वरुप आणि शक्तीचा प्रत्यय सर्वांनाच घेता येईल.

विनीता श्रीकांत देशपांडे
(इंडॉलॉजीच्या विद्यार्थिनी)

आपले वेद - ऋग्वेद प्रस्तावना

’विद्’ या अनेकार्थी धातूपासून ’वेद’ शब्द बनला आहे. २ ऱ्या गणातील विद् = वेत्ति, वेद - जाणणे (to know) ; ४ थ्या गणातील विद् = विद्यते, असणे (to be); ६ व्या गणातील विद् = विन्दति, विन्दते - लाभ होणे (to gain); ७ व्या गणातील विद् = विन्ते, विचार करणे (to think); १० व्या गणातील विद् = वेदयते - इतरांस ज्ञान करून देणे. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष वस्तूविषयी ज्ञान प्राप्त करून घेणे, ते अनुभविणे, तो अनुभव दुसऱ्यांना प्राप्त होण्यासाठी विषद करणे हा मनुष्याचा स्थायी स्वभाव. आणि असा अनुभव जेव्हां पराकाष्ठेच्या उच्च प्रतीचा असतो, निर्भेळ असतो, अवर्णनीय असतो त्याला ’आनंद’ म्हटले आहे. आनंद ही एक स्थिती आहे. या आनंदालाच ब्रह्मप्राप्ती, आत्मविद्या, आत्मज्ञान, साक्षात्कार, दर्शन, ज्ञान इत्यादि उपाधी आहेत. स्वाध्याय, कर्म, प्रार्थना, भक्ति, तपाचरण इत्यादि मार्गे ’पूर्ण ज्ञान’

अनुभविणे व अशा अनुभवाची इतरांनाही प्रचिती यावी यासाठी झटणे हेही मानवी स्वभावास अनुसरून आहे. पण असे ज्ञान कोणी कोणाला ’देऊ’ शकत नाही अथवा कोण्या विशिष्ट ’कृति’ने ते प्राप्त होईलच असेही म्हणता येत नाही. कारण ’ते’ फक्त अनुभवता येते, पण काय अनुभवले हे सांगता येत नाही. त्याचे कारण एकच आहे. मानवाला उपलब्ध असलेल्या मन, बुद्धि, इंद्रिये या सर्वांच्या ते पलिकडचे आहे. ते केवळ ईश्वरी कृपेनेच मिळण्यासारखे आहे. अशी ईश्वरी कृपा होते तीही फक्त मानवास उपलब्ध असलेली मन, बुद्धि, इंद्रिये जेव्हां शुद्ध व पावन होतात तेव्हांच. मन बुद्धि यांच्या अती शुद्धावस्थेत ’ज्ञाना’चे दर्शन होते. अव्यक्त ज्ञान बुद्धिद्वारे व्यक्त होते. आणि बुद्धित व्यक्त व्हावयाचे एक साधन आहे त्याला म्हणतात शब्द - वाक् - वाणी. व्यवहार दशेत जाणणे, उमजणे होतच असते. पण शाश्वत, नित्य तत्त्वांचे दिव्य स्फुरण होऊन जे वाक्द्वारा बाहेर पडते त्याला दर्शनशास्त्र म्हणण्याचा प्रघात आहे. ज्यांना नित्य तत्त्वांचे दिव्य दर्शन घडते त्यांना द्रष्टा वा ऋषि म्हणतात. असे दर्शन मनाच्या उत्थान दशेत, समाधीदशेतच होऊ शकते. ऋ. (१३२४.३) या ऋचेत म्हटले आहे की ऋषिंना

आपल्या अंतःकरणात ज्या वाक् (वेदवाणी) ची प्राप्ती झाली ती त्यांनी सर्व मनुष्य जातीला शिकविली. अशी वेदवाणी ज्यांना ज्या स्वरूपात प्राप्त झाली त्याला "मंत्र" म्हटले गेले आहे. मंत्र ऋषिगणांना वाक्‌रूपे 'दिसले'. ऋग्वेदाच्या ब्राह्मण ग्रंथापैकी कौषितकी ब्राह्मण (१०.३०) व ऐतरेय ब्राह्मण (३.९) यानुसार 'ऋषिंना वेदमंत्र दिसले' असाच अभिप्राय आहे. म्हणून वैदिक संहितेच्या सूक्त, ऋचा यासंबंधी ज्या ऋषिंच्या नावाचा उल्लेख केला जातो त्यांना त्या मंत्राचे प्रणेते न मानता त्या त्या मंत्रांचे त्यांना मंत्रद्रष्टे मानले जाते. निरुक्तकार यास्काचार्य एके ठिकाणी म्हणतात 'ऋषिर्दर्शनात् स्तोमान ददर्श' - त्यांनी मंत्र पाहिले म्हणून त्यांचे नाव 'ऋषि' पडले. आणखी एके ठिकाणी उल्लेख सपडतो की - 'द्रष्टारः ऋषयः स्मर्तारः' - स्रष्टारः वा कर्तारः नव्हेत. ऋषि मंत्राचा द्रष्टा आहे, त्यांचा 'कर्त्ता' नव्हे. अशा श्रृति कवनांचा संग्रह म्हणजे आपले वेद. मंत्रांचे असे दर्शन कोणा विशिष्ट काल-मर्यादेतच होणे संभवनीय नाही. फार मोठ्या कालगणनेत, अनेक अनेक जणांना अशा मंत्रांचे स्फुरण झालेले आहे. स्फुरण झाले म्हणजे जे आधीच आहे ते अवतरले, व्यक्त झाले. कारण आदिचैतन्य ब्रह्मदेवाची निर्मितीच

वेदांपासून असल्याने ते मुळात ’आहेत’. आकाशात व्याप्त असलेले अव्यक्त स्वरूपातील नित्य शब्द जसे कण्ठ, तालु, जिव्हा याद्वारे अभिव्यक्त केले जातात, अगदी त्याच प्रमाणे शब्दमय नित्य वेद ऋषींच्या माध्यमातून सामाधी अवस्थेत अभिव्यक्त वा प्रकट झाले. आचार्य शंकराचार्यांनी आपल्या शारीरक भाष्य २.३.१ मध्ये याचे जोरदार समर्थन केले आहे. बृहद्अरण्यक उपनिषदात वेदांना परमेश्वराचा ’श्वास’ मानले आहे. नित्य परमेश्वराचा श्वासही नित्यच असणार, तर वेद देखील नित्यच आहेत. या ’श्वासा’चा अर्थ ’ज्ञान’ असाही केला जातो म्हणून ’ज्ञान’ही नित्य आहे. असे हे नित्य ज्ञान पुरुषाला तपाचरणाच्या अत्युच्च अवस्थेत ईश्वरीय प्रेरणेने त्याच्या अंतःकरणात अवतरीत होते.

महाप्रलयकाळी ’वेद’ अव्यक्त अवस्थेत असतो. सर्गाच्या, उत्पत्तीच्या आरंभी परमेश्वर सर्वप्रथम ब्रह्मदेवाला उत्पन्न करतो आणि त्याला वेद देतो. या वेदांच्या साहाय्याने

ब्रह्मदेव सृष्टीची (सृष्टींची) उत्पत्ती करतो. अशा प्रकारचे वर्णन पुरातन ग्रंथांतून पाहायला मिळते (श्वेतावतार उप., वंशब्राह्मण, पुराणे, भगवद् गीता इ.). आणखी काही ठिकाणी वेगवेगळे उल्लेख सापडतात - अजपृश्नि नामक ऋषि आपल्या तपोबळाने वेदांना प्रसाद रूपाने प्राप्त करता झाला. अशाच रीतीने अंगिरा नामक ऋषिसही वेद प्राप्त झाला. कुठे म्हटले आहे, भगवंताने मत्स्य अवतारी वेदांचे प्रतिपादन केले. सांख्य व योग दर्शनकारांच्या मते वेद-कर्त्याचा पत्ताच लागत नाही म्हणून ते अपौरुषेय आहेत. तसेच वैशेषिक दर्शनकार व वैय्याकरण मतवादी अर्थरूप व ज्ञानरूप वेदांना अपौरुषेय मानतात. मीमांसा शास्त्रानुसार वर्णमालेची कधी उत्पत्ती होत नसते. ते कण्ठ, तालु इ. अभिव्यंजक उपकरणांनी अभिव्यक्त होतात. मूलतः वर्ण (अर्थात् वाक्) नित्यच आहे. जैमिनी मीमांसकार तर शब्दासहित शब्दार्थही नित्य आहेत असेच म्हणतात.

आर्य समाजचे स्वामी दयानंद सरस्वती वेदांचे शब्द, अर्थ, शब्दार्थ-संबंध तथा क्रम यांनाही नित्य मानतात. त्यांच्या मते वेदात अनित्य व्यक्तिंबद्दल वर्णन नाही. वेदात दिसणाऱ्या शब्दांचा ते ऐतिहासिक वा भौगोलिक नावे न करता त्या शब्दांचा ते यौगिक अर्थ लावतात. जसे 'वसिष्ठ' हे ऋषिचे नाव नसून त्याचा अर्थ 'प्राण' करतात. तसेच भारद्वाज = मन, विश्वामित्र = कान, असा अर्थ करतात. अशा प्रकारे शब्दवाचक अर्थोत्पत्तीस मनुस्मृतिमध्ये एक प्रमाण आहे - 'सर्वेषां स तु नामानि कर्माणि च पृथक् पृथक् । वेदशब्देभ्य एवादौ पृथक् संस्थाश्च निर्ममे ॥' (१.२१) - हिरण्यगर्भरूपाने असलेला तो परमात्मा सर्व प्राण्यांची भिन्न नावे व कर्मे, पूर्वकल्पामध्ये जशी होती तशीच सृष्टीच्या आरंभी वेदशब्दांवरून समजून घेऊन निर्माण करता झाला. उदा. - कुंभाराने घट करावे, कोष्ट्याने वस्त्र विणावे. अतएव वेदांसंबंधी असा एक विचार प्रवाह आहे जो मानतो की उर्वशी - पुरुरवा (ऋ. सूक्त १०.९५), नहुष ययाति, यम, सुदास इत्यादि नामांनी ज्या कर्मांचा निर्देष आढळतो तो नित्य

इतिहास आहे. पौराणिक (मर्त्यस्वरूपाचा) इतिहास नव्हे. पुराणकारांनी या नावांच्या नाम-कर्म संबंधानुसार पौराणिक इतिहासाची रचना केली. म्हणून लोकोत्तर विषय वेदांत नाहीतच.

वेदांतर्गत मंत्रांना श्रृति म्हणतात हे मागे आले आहेच. ऋषिगणांनी समाधी अवस्थेत, परमेश्वराने उच्चारलेल्या वेदांचे आपल्या अंतःकरणात 'श्रवण' केले आणि त्या अंतर्नादाला संसाराच्या कल्याणासाठी विश्वात त्यांचा प्रसार केला. वैदिक साहित्यापसून तंत्रसाहित्यासहित आपली सर्व पुरातन शास्त्रे जसा ईश्वर नित्य आहे तसा वेद नित्य आहे असा प्रचंड उद्घोष करतात. तसेच तो शाश्वत आहे, अपौरुषेय आहे. ऋषिगणांना तपाचरणाने अक्षर, शब्द, वाक्य छंदरूपे अंतःकरणार जो वेद प्राप्त झाला, तोच वेद सद्यस्थितीत आपल्यास उपलब्ध आहे. जवळपास सर्व आस्तिक मतवादी शास्त्रे वेदाला हिरण्यगर्भ - cosmic egg - संभूत मानतात. वेद भाष्यकर सायणाचार्य एके ठिकाणी म्हणतात - 'प्रत्यक्षेण अनुमित्या वा

यस्तूपायो न बुध्यते । एनं विदंति तस्माद् वदस्य वेदता ॥’ - प्रत्यक्ष किंवा अनुमानद्वारा जे जे उपाय अगम्य आहेत, ’त्याचे’ (परमेश्वराचे) ज्ञान संबोधन करविण्यात वेदांचे वेदत्व आहे. ’भूतं भव्यं भविष्यं च, सर्वं वेदात् प्रसिध्यति’ - भूत, भविष्य व वर्तमानातील सर्वकाही वेदांपासूनच ज्ञात होत असते. ज्ञानी पुरुष वर्तमान व भविष्यातील सर्व घटना ’पाहतो’. (मनुस्मृति). म्हणजेच वेद त्रिकाल सूत्रधारी आहे आणि ज्ञानी ऋषीही त्रिकालदर्शी व मंत्रद्रष्टे आहेत.

ॐ

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त १ ते १०

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त १ (अग्नि सूक्त)

ऋषी - मधुछंदस् वैश्वामित्र : देवता - अग्नि : छंद - गायत्री

अ॒ग्निमी॑ळे पु॒रोहि॑तं य॒ज्ञस्य॑ दे॒वमृ॒त्विज॑म् । होता॑रं रत्न॒धात॑मम् ॥ १ ॥

अग्निं ईळे पुरःऽहितं यज्ञस्य देवं ऋत्विजं । होतारं रत्नऽधातमम्॥ १ ॥

अग्नी हा यज्ञाचा अग्रणी आहे. यज्ञाचा प्रमुख देव तोच. यज्ञाचे हविर्भाग त्या त्या देवतांप्रत पोहोंचविणारा सन्मानमीय आचार्यही तोच. रत्नांचा अनुपम निधि ह्याचे जवळ आहे. तेव्हां अशा अग्निदेवाचें मी भक्तिपुरःसर स्तवन करतो. ॥ १ ॥

अ॒ग्निः पूर्वे॑भि॒र्ऋषि॑भि॒रीड्यो॒ नूत॑नैरु॒त । स दे॒वाँ एह व॑क्षति ॥ २ ॥

अग्निः पूर्वेभिः ऋषिभिः ईड्यः नूतनैः उत । सः देवान् आ इह वक्षति ॥ २ ॥

पूर्वकालीन ऋषींना या अग्नीची स्तुति करण्यांत प्रेम वाटले, व अर्वाचीन ऋषींनाही तो स्तवनास सर्वथैव योग्य वाटतो. आमच्या यज्ञांत हाच अखिल देवांना घेऊन येतो. ॥ २ ॥

अ॒ग्निना॑ र॒यिम॑श्नव॒त्पोष॑मे॒व दि॒वेदि॑वे । य॒शसं᳚ वी॒रव॑त्तमम् ॥ ३ ॥

अग्निना रयिं अश्नवत् पोषं एव दिवेऽदिवे । यशसं वीरवत्ऽतमम् ॥ ३ ॥

ह्या अग्नीमुळेच भक्ताला वैभव प्राप्त होते आणि ते वैभवही असें की जे दिवसानुदिवस वृद्धिंगत होत जाते. वीरश्रेष्ठ पुरुषांनाच जी जयश्री माळ घालते तीदेखील या अग्नीच्या कृपेने पूजकास प्राप्त होते. ॥ ३ ॥

अग्ने॒ यं य॒ज्ञम॑ध्व॒रं वि॒श्वतः॑ परि॒भूरसि॑ । स इद्दे॒वेषु॑ गच्छति ॥ ४ ॥

अग्ने यं यज्ञं अध्वरं विश्वतः परिऽभूः असि । सः इत् देवेषु गच्छति ॥ ४ ॥

हे अग्निदेव, ज्या पवित्र यज्ञावर चोहोंकडून तुझी दृष्टी असते, तोच यज्ञ देवांना ग्रहण करण्यास योग्य वाटतो. ॥ ४ ॥

अ॒ग्निर्होता॑ क॒विक्र॑तुः स॒त्यश्चि॒त्रश्र॑वस्तमः । दे॒वो दे॒वेभि॒राऽग॑मत् ॥ ५ ॥

अग्निः होता कविऽक्रतुः सत्यः चित्रश्रवःऽतमः । देवः देवेभिः आ गमत् ॥ ५ ॥

अग्निद्वारेंच सर्व देवांना त्यांचे हविर्भाग प्राप्त होतात. बुद्धिशाली पंडितांना ह्याचे पासून ज्ञानसामर्थ्य प्राप्त होते. ह्याने दिलेले वर निःसंशय सफल व्हावयाचेच व कोणी भक्त कितीही ठिकाणी यास पाचारण करोत, त्यांची प्रार्थना ह्याचे कानावर गेली नाही असें कधी व्हावयाचेंच नाही. असा अग्नि देवसमुदायासह येथें प्राप्त झालेला आहे. ॥ ५ ॥

यद॒ङ्ग दा॒शु॒षे॒ त्वम् अग्ने॑ भ॒द्रं क॑रि॒ष्यसि॑ । तवेत्तत्स॒त्यम॑ङ्गिरः ॥ ६ ॥

यत् अङ्ग दाशुषे त्वं अग्ने भद्रं करिष्यसि । तव इत् तत् सत्यं अङ्गिरः ॥ ६ ॥

हे अग्निदेवा, हे अंगिरसा, उपासकांना तू जे कांही मंगल आशीर्वचन देशील तें सत्य झालंच पाहिजे याबद्दल शंका नाहीं. ॥ ६ ॥

उप॑ त्वाग्ने दि॒वेदि॑वे॒ दोषा॑वस्तर्धि॒या व॒यम् । नमो॒ भर॑न्त॒ एम॑सि ॥ ७ ॥

उप त्वा अग्ने दिवेऽदिवे दोषावस्तः धिया वयं । नमः भरन्तः आ इमसि ॥ ७ ॥

हे अग्ने, प्रत्यही, रात्री व दिवसा, अंतःकरणपूर्वक तुला वंदन करीत तुझ्या चरणाचा आश्रय करतो. ॥ ७ ॥

राज॑न्तमध्व॒राणां॑ गो॒पामृ॒तस्य॒ दीदि॑विम् । वर्ध॑मान॒ं स्वे दमे॑ ॥ ८ ॥

राजन्तं अध्वराणां गोपां ऋतस्य दीदिविं वर्धमानं स्वे दमे ॥ ८ ॥

कारण प्रत्येक पुण्ययज्ञांत तूंच विराजमान होतोस, सर्व विधींचा रक्षणकर्ता तूंच आहेस, तुझें तेज अत्यंत देदीप्यमान आहे, यज्ञांत स्थित असतांना तुझ्या आनंदाला भरती येते. ॥ ८ ॥

स नः॑ पि॒तेव॑ सू॒नवेऽ॑ग्ने सूपाय॒नो भ॑व । सच॑स्वा नः स्व॒स्तये॑ ॥ ९ ॥

सः नः पिताऽइव सूनवे अग्ने सुऽउपायनः भव । सचस्व नः स्वस्तये ॥ ९ ॥

हे अग्निदेव, आम्ही तुझी लेंकरें आहोंत. मायाळु पित्याप्रमाणे आमचे लाड तूं उत्तम तऱ्हेने पुरव. आमच्यापासून दूर जाऊं नको. त्यांतच आमचे क्षेम आहे. ॥ ९ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त २ (वायु, इंद्र, मित्रावरुण सूक्त)

ऋषी - मधुछंदस् वैश्वामित्र : देवता - १ ते ३ वायु; ४ ते ६ इंद्रवायु; ७ ते ९ मित्रावरुण : छंद - गायत्री

वाय॒वा या॑हि दर्शते॒मे सोमा॒ अरं॑कृताः । तेषां॑ पाहि श्रु॒धी हव॑म् ॥ १ ॥

वायो इति आ याहि दर्शत इमे सोमाः अरंऽकृताः । तेषां पाहि श्रुधी हवम् ॥ १ ॥

जनांस आल्हाद देणाऱ्या हे वायुदेवा, तुझें आगमन होऊं दे, तुझ्याकरतां या सोमरसांची उत्तम सिद्धता करून ठेविली आहे. त्यांचे सेवन कर. आमची प्रार्थना ऐक. ॥ १ ॥

वाय॑ उ॒क्थेभि॑र्जरन्ते॒ त्वामच्छा॑ जरि॒तारः॑ । सु॒तसो॑मा अह॒र्विदः॑ ॥ २ ॥

वायो इति उक्थेभिः जरन्ते त्वां अच्छ जरितारः । सुतऽसोमाः अहःऽविदः ॥ २ ॥

हे वायुदेवा, यागकालांचे उत्तम ज्ञान असलेले विद्‌वान स्तोत्र प्रबंधकर्ते, सोमरस सिद्ध करून, सुंदर सुंदर स्तोत्रांनी तुझी महती गात आहेत. ॥ २ ॥

वायो तव प्रपृञ्चती धेना जिगाति दाशुषे । उरूची सोमपीतये ॥ ३ ॥

वायो इति तव प्रऽपृञ्चती धेना जिगाति दाशुषे । उरूची सोमऽपीतये ॥ ३ ॥

हे वायुदेवा, तुझा शब्द विश्वसंचारी आहे. त्याचें श्रवण म्हणजे सर्व कामना परिपूर्ण होण्याची तयारीच होय. तुला सोमपानाची इच्छा झाली म्हणजे तुझी मनीषा व्यक्त करण्याकरतां, हा तुझा शब्द तुझ्या भक्तांकडे गमन करतो. ॥ ३ ॥

इन्द्रवायू इमे सुता उप प्रयोभिरा गतम् । इन्दवो वामुशन्ति हि ॥ ४ ॥

इन्द्रवायू इति इमे सुताः उप प्रयःऽभिः आ गतं । इन्दवः वां उशंति हि ॥ ४ ॥

अहो इंद्रवायु, हे येथें सोमरस सिद्ध करून ठेविले आहेत. आपण आम्हांवर प्रसाद करण्याकरितां या. या सोमरसांची अशीच इच्छा आहे कीं आपण त्यांचे सेवन करावें. ॥ ४ ॥

वायुविन्द्रश्च चेतथः सुतानां वाजिनीवसू । तावा यातमुप द्रवत् ॥ ५ ॥

वायो इति इन्द्रः च चेतथः सुतानां वाजिनीवसू । तौ आ यातं उप द्रवत् ॥ ५ ॥

हे वायुदेवा, वेगसामर्थ्य हे तुझे आणि इंद्राचे वैभव आहे. तर त्वरा करून तुम्ही दोघेही या. कारण सोमरसांची रुचि काय आहे हें तुम्हांस माहितच आहे. ॥ ५ ॥

वायुविन्द्रश्च सुन्वत आ यातमुप निष्कृतम् । मक्ष्वैत्था धिया नरा ॥ ६ ॥

वायो इति इन्द्रः च सुन्वतः आ यातं उप निःऽकृतम् । मक्षु इत्था धिया नरा ॥ ६ ॥

हे वायुदेवा, तुझे व इंद्राचे बल अनुपम आहे, तुम्ही दोघेही सोमरसाची आवड धरून, मी भक्तीने केलेला हा सुंदर सोमरस प्राशन करण्याकरितां सत्वर या. ॥ ६ ॥

मित्रं हुवे पूतदक्षं वरुणं च रिशादसम् । धियं घृताचीं साधन्ता ॥ ७ ॥

मित्रं हुवे पूतऽदक्षं वरुणं च रिशादसं । धियं घृताचीं साधंता ॥ ७ ॥

पवित्र कार्यास ज्याचे सामर्थ्याचा आधार आहे, अशा मित्रास मी निमंत्रण करतो. दुष्टांचा निःपात करणारा जो वरुण त्यासही मी भक्तीने बोलावतो. या दोघांच्या इच्छेनें पृथ्वीवर पर्जन्यवृष्टि होत असते. ॥ ७ ॥

ऋतेन मित्रावरुणावृतावृधावृतस्पृशा । क्रतुं बृहन्तमाशाथे ॥ ८ ॥

ऋतेन मित्रावरुणौ ऋतऽवृधौ ऋतऽस्पृशा । क्रतुं बृहंतं आशाथे इति ॥ ८ ॥

मित्रावरुणामुळेच विश्वांतील नियमांचा मान राहतो आणि ते स्वतःही धर्मनियमांचे परिपालन करण्यांत भूषण मानतात, व आपले सामर्थ्यही धर्मनीतीनें विभूषित करीत असतात. ॥ ८ ॥

कवी नो मित्रावरुणा तुविजाता उरुक्षया । दक्षं दधाते अपसम् ॥ ९ ॥

कवी इति नः मित्रावरुणा तुविजाता उरुक्षया । दक्षं दधाते अपसम् ॥ ९ ॥

सर्वोपकारी व सर्वव्यापी अशा आमच्या मित्रावरुणांची बुद्धिसंपन्नता अपूर्व आहे, व त्यांचे बल कृतिरूपाने व्यक्त होणारे आहे. ॥ ९ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त ३ (सरस्वती सूक्त)

ऋषी - मधुछंदस् वैश्वामित्र : देवता - १ ते ३ अश्विनीकुमार; ४ ते ६ इंद्र; ७ ते ९ विश्वेदेव; १० ते १२ सरस्वती : छंद - गायत्री

अश्वि॑ना॒ यज्व॑री॒रिषो॒ द्रव॑त्पाणी॒ शुभ॑स्पती । पुरु॑भुजा चन॒स्यत॑म् ॥ १ ॥

अश्विना यज्वरीः इषः द्रवत्पाणी इति द्रवत्ऽपाणी शुभः पती इति । पुरुऽभुजा चनस्यतम् ॥ १ ॥

अहो अश्वीहो, दानकर्माने आपले हस्त आर्द्र झालेले आहेत. जगतांत जें शुभ म्हणून आहे, त्याचे स्वामी आपणच आहात. असंख्य भक्तांना आपलाच आधार आहे. आमचे हवी आपण गोड मानून घ्या. ॥ १ ॥

अश्वि॑ना॒ पुरु॑दंससा॒ नरा॒ शवी॑रया धि॒या । धिष्ण्या॒ वन॑तं॒ गिरः॑ ॥ २ ॥

अश्विना पुरुऽदंससा नरा शवीरया धिया । धिष्ण्या वनतं गिरः ॥ २ ॥

अश्वीहो, आपली अनेक अद्‌भुत कृत्यें आम्हांस माहित आहेत. आपले शौर्यही सर्वत्र प्रसिद्धच आहे, व आपले धैर्य अप्रतिम आहे. आमच्या स्तुतीचा आपण कनवाळूपणाने स्वीकार करा. ॥ २ ॥

दस्रा॑ यु॒वाक॑वः सु॒ता नास॑त्या वृ॒क्तब॑र्हिषः । आ या॑तं रुद्रवर्तनी ॥ ३ ॥

दस्रा युवाकवः सुताः नासत्या वृक्तऽबर्हिषः । आ यातं रुद्रवतनि इति रुद्रऽवर्तनी ॥ ३ ॥

हे सत्यस्वरूप अश्वीदेवतांनो, क्लेशपरिहारक म्हणून आपली ख्याति आहे. आपण भीषण पराक्रम करणारे आहांत. आपले आगमन इकडे होऊं द्या. कारण असें पहा, आम्ही सोमरसांत पडलेली दर्भाची अग्रें काढून टाकून व त्यांत स्वादिष्ट पदार्थ मिश्र करून तो तयार करून ठेविला आहे. ॥ ३ ॥

इन्द्रा या॑हि चित्रभानो सु॒ता इ॒मे त्वा॒यवः॑ । अण्वी॑भि॒स्तना॑ पू॒तासः॑ ॥ ४ ॥

इन्द्र आ याहि चित्रभानो इति चित्रऽभानो सुताः इमे त्वाऽयवः । अण्वीभिः तना पूतासः ॥ ४ ॥

हे इंद्रा, तुझी कांति अलौकिक आहे. इकडे ये. हे सोमरस तुझ्याकरतां आम्ही आपल्या करांगुळींनी पिळून ठेवले आहेत. हे नेहमींच शुद्ध आहेत. ॥ ४ ॥

इन्द्रा या॑हि धि॒येषि॒तो विप्र॑जूतः सु॒ताव॑तः । उप॒ ब्रह्मा॑णि वा॒घतः॑ ॥ ५ ॥

इन्द्र आ याहि धिया इषितः विप्रऽजूतः सुतऽवतः । उप ब्रह्माणि वाघतः ॥ ५ ॥

हे इंद्रा, मोठमोठ्या विद्वानांनी तुझे स्तवन केलेले आहे व मीही तुला भक्तीने आळविलें आहे. तर माझ्या प्रार्थनेचा स्वीकार करण्याकरतां तूं आपण होऊन इकडे ये. हा सोमरस सिद्ध करून ठेविला आहे. ॥ ५ ॥

इन्द्रा या॑हि॒ तूतु॑जान॒ उप॒ ब्रह्मा॑णि हरिवः । सु॒ते द॑धिष्व न॒श्चनः॑ ॥ ६ ॥

इन्द्र आ याहि तूतुजानः उप ब्रह्माणि हरिऽवः । सुते दधिष्व नः चनः ॥ ६ ॥

पीतवर्ण अश्वावर आरूढ होणाऱ्या हे इंद्रदेवा, आमच्या स्तवनांचा अंगिकार करण्याकरितां तूं त्वरेने इकडे ये आणि आमच्या या सोमरसाविषयीं आपले मनांत आवड ठेव. ॥ ६ ॥

ओमा॑सश्चर्षणीधृतो॒ विश्वे॑ देवास॒ आ ग॑त । दा॒श्वांसो॑ दा॒शुषः॑ सु॒तम् ॥ ७ ॥

ओमासः चर्षणीऽधृतः विश्वे देवासः आ गत । दाश्वांसः दाशुषः सुतम् ॥ ७ ॥

हे विश्वदेवहो, आपण जगताचे रक्षणकर्ते आणि अखिल प्राणिमात्रांचे पोषण करणारे आहांत. आपणांस मी हविर्भाग अर्पण करीत आहे. तर आपण इकडे या. आपली औदार्यबुद्धि सर्वप्रसिद्ध आहे. ॥ ७ ॥

विश्वे॑ दे॒वासो॑ अ॒प्तुरः॑ सु॒तमा ग॑न्त॒ तूर्ण॑यः । उ॒स्रा इ॑व॒ स्वस॑राणि ॥ ८ ॥

विश्वे देवासः अप्ऽतुरः सुतं आ गन्त तूर्णयः । उस्राःऽइव स्वसराणि ॥ ८ ॥

हे विश्वदेवहो, आपण जगताचे रक्षण करीत असतां. जितक्या उत्सुकतेने धेनु सायंकाळीं घराकडे धांवत सुटतात तितक्या उत्सुकतेनें आमचे सोम ग्रहण करण्याकरितां तुम्ही इकडे या. ॥ ८ ॥

विश्वे॑ दे॒वासो॑ अ॒स्रिध॒ एहि॑मायासो अ॒द्रुहः॑ । मेधं॑ जुषन्त॒ वह्न॑यः ॥ ९ ॥

विश्वे देवासः अस्रिधः एहिऽमायासः अद्रुहः । मेधं जुषन्त वह्नयः ॥ ९ ॥

सर्वांची चिंता वाहणाऱ्या विश्वदेवांनी आमच्या हवींचा स्वीकार केलेला आहे. त्यांची माया अतर्क्य आहे. ते कोणाचा द्‌वेष करीत नाहींत, व त्यांचीही अहित करण्यास कोणी समर्थ नाहीत. ॥ ९ ॥

पा॒व॒का नः॒ सर॑स्वती॒ वाजे॑भिर्वा॒जिनी॑वती । य॒ज्ञं व॑ष्टु धि॒याव॑सुः ॥ १० ॥

पावका नः सरस्वती वाजेभिः वाजिनीऽवती । यज्ञं वष्टु धियाऽवसुः ॥ १० ॥

जगतास पावन करणारी सरस्वती, आमच्या यज्ञांतील हविर्भागांची प्रेमानें इच्छा करो. हिचें बुद्धिसामर्थ्य अपार आहे. ॥ १० ॥

म॒हो अर्णः॒ सर॑स्वती॒ प्र चे॑तयति के॒तुना॑ । धियो॒ विश्वा॒ वि रा॑जति ॥ १२ ॥

महः अर्णः सरस्वती प्र चेतयति केतुना । धियः विश्वा वि राजति ॥ १२ ॥

स्वप्रकाशाने ज्ञानाच्या महासागराची ती आम्हांस स्पष्ट कल्पना करून देते. या विश्वांत बुद्धि म्हणून जेथें जेथें आढळते तेथें तेथें साम्राज्य करणारी अधिदेवता हीच होय. ॥ १२ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त ४ (इंद्र सूक्त)

ऋषी - मधुछंदस् वैश्वामित्र : देवता - इंद्र : छंद - गायत्री

सुरूपकृत्नुमूतये सुदुघामिव गोदुहे । जुहूमसि द्यविद्यवि ॥ १ ॥

सुरूपऽकृत्नुं ऊतये सुदुघांऽइव गोऽदुहे । जुहूमसि द्यविऽद्यवि ॥ १ ॥

उत्तम प्रकार्चे अन्न अर्पण केले असतां ज्याप्रमणे गाय सुप्रसन्न होऊन भरपूर पान्हा देते, त्याप्रमाणे तूं प्रसन्न व्हावेस म्हणून, आम्ही तुला प्रत्यही हवि अर्पण करतो. हे सुंदर विश्व तूंच उत्पन्न केले आहेस. ॥ १ ॥

उप नः सवना गहि सोमस्य सोमपाः पिब । गोदा इद्रेवतो मदः ॥ २ ॥

उप नः सवना गहि सोमस्य सोमऽपाः पिब । गोऽदा इत् रेवतः मदः ॥ २ ॥

तुला सोमाची अत्यंत आवड आहे तेव्हां हे आमचे सोमाचे हवि ग्रहण करण्याकरितां तूं इकडे ये आणि आमचा हा सोमरस प्राशन कर. तुझें वैभव अपार आहे. तूं प्रसन्न झालास म्हणजे गोधनादि ऐश्वर्य सहजच प्राप्त होते. ॥ २ ॥

अथा॑ ते॒ अन्त॑मानां वि॒द्याम॑ सुमती॒नाम् । मा नो॒ अति॑ ख्य॒ आ ग॑हि ॥ ३ ॥

अथ ते अंतमानां विद्याम सुऽमतीनां । मा नः अति ख्य आ गहि ॥ ३ ॥

तुहें अंतःकरण दयाशील तर खरेंच, पण त्या अंतःकरणाच्याही अंतर्भागाची आम्हांस ओळख होऊं दे. आमचा अव्हेर करूं नकोस. तुझे इकडे आगमन होऊं दे. ॥ ३ ॥

परे॑हि॒ विग्र॒मस्तृ॑त॒मिन्द्रं॑ पृच्छा विप॒श्चित॑म् । यस्ते॒ सखि॑भ्य॒ आ वर॑म् ॥ ४ ॥

परा इहि विग्रं अस्तृतं इन्द्रं पृच्छा विपःऽचितं । यः ते सखिऽभ्य आ वरम् ॥ ४ ॥

बुद्धिशाली, अजिंक्य, प्रज्ञावान् असा जो इंद्र - जो तुझ्या अत्यंत जिवलग मित्रांपेक्षांही जो सर्वतोपरी श्रेष्ठ आहे - त्याच्याजवळ जाऊन जें मागणे असेल तें माग; जा. ॥ ४ ॥

उत ब्रुवन्तु नो निदो निरन्यतश्चिदारत । दधाना इन्द्र इद्दुवः ॥ ५ ॥

उत ब्रुवन्तु नः निदः निः अन्यतः चित् आरत । दधानाः इन्द्र इत् दुवः ॥ ५ ॥

इंद्राचीच जर तुम्ही उपासना केली तर कल्याणाच्या इतर मार्गांस मुकाल असें आम्हांस निंदकलोक खुशाल म्हणोत; ॥ ५ ॥

उत नः सुभगाँ अरिर्वोचेयुर्दस्म कृष्टयः । स्यामेदिन्द्रस्य शर्मणि ॥ ६ ॥

उत नः सुऽभगान् अरिः वोचेयुः दस्म कृष्टयः । स्याम इत् इन्द्रस्य शर्मणि ॥ ६ ॥

अथवा ह्याच कारणामुळें, "आम्ही मोठे भाग्यवान्" असेंही तुझ्या भक्तांनी आम्हांविषयी उद्गार काढलेले असोत, परंतु आमचा एकच निश्चय कीं हें अघटित कृत्य करणाऱ्या इंद्रा, आम्ही तुझ्या सौख्यमय आश्रयाखालीच राहणार. ॥ ६ ॥

एमाशुमाशवे भर यज्ञश्रियं नृमादनम् । पतयन्मन्दयत्सखम् ॥ ७ ॥

आ ईं आशुं आशवे भर यज्ञऽश्रियं नृऽमादनं पतयत् मन्दयत्ऽसखम् ॥ ७ ॥

सर्वव्यापी इंद्रास सोमरस अर्पण करा, हें सोमरसपान सर्व गात्रांच्या ठिकाणी नवा जोम उत्पन्न करणारें आहेत. सोमरसामुळेंच यज्ञाला शोभा आहे. शूरांचा खरा संतोष यांतच आहे. यामुळेंच शरीरांत चैतन्य उत्पन्न होतें, आणि आमच्या परमप्रिय इंद्रास आनंदाचें स्फुरण हाच चढवितो. ॥ ७ ॥

अ॒स्य पी॒त्वा श॑तक्रतो घ॒नो वृ॒त्राणा॑मभवः । प्राव॒ो वाजे॑षु वा॒जिन॑म् ॥ ८ ॥

अस्य पीत्वा शतक्रतो इति शतऽक्रतो घनः वृत्राणां अभवः । प्र आवः वाजेषु वाजिनम् ॥ ८ ॥

याच सोमरसांचे पान करून, हे पराक्रमी इंद्रा, तूं शत्रूंचा उच्छेदक झालास आणि शूरत्वाच्या कृत्यांत तूं शूरांचे रक्षण केलेंस. ॥ ८ ॥

तं त्वा॒ वाजे॑षु वा॒जिनं॑ वा॒जया॑मः शतक्रतो । धना॑नामिन्द्रसा॒तये॑ ॥ ९ ॥

तं त्वा वाजेषु वाजिनं वाजयामः शतक्रतो इति शतऽक्रतो । धनानां इन्द्र सातये ॥ ९ ॥

हे परक्रमी इंद्रा, शौर्याच्या कृत्यांत तूं आपला पराक्रम गाजवतोस. वैभवप्राप्तीच्या इच्छेनें आम्ही तुझ्या यशाचे वर्णन करीत आहोंत. ॥ ९ ॥

यो रा॒योऽ॒वनि॑र्म॒हान्सु॑पा॒रः सु॑न्व॒तः सखा॑ । तस्मा॒ इन्द्रा॑य गायत ॥ १० ॥

यः रायः अवनिः महान् सुऽपारः सुन्वतः सखा । तस्मै इन्द्राय गायत ॥ १० ॥

जो संपत्तीचा स्वामी आहे, ज्याचे महत्त्व अपार आहे, जो सर्वांस सुलभरीतीनें संकटांतून पार नेतो आणि सोमरस अर्पण करणाऱ्या याजकास जो परम सखा आहे त्या इंद्राचें यशोगायन करा. ॥ १० ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त ५ (इंद्र सूक्त)

ऋषी - मधुछंदस् वैश्वामित्र : देवता - इंद्र : छंद - गायत्री

आ त्वेता॒ नि षी॑द॒तेन्द्र॑म॒भि प्र गा॑यत । सखा॑य॒ स्तोम॑वाहसः ॥ १ ॥

आ तु आ इत नि षीदत इंद्रं अभि प्र गायत । सखायः स्तोमऽवाहसः ॥ १ ॥

अहो स्तोत्रें गाण्यांत कुशल असणाऱ्या मित्रांनो, या, बसा, आणि इंद्राला उद्देशून गायन करा. ॥ १ ॥

पु॒रू॒तमं॑ पु॒रू॒णामीशा॑नं॒ वार्या॑णाम् । इन्द्रं॒ सोमे॒ सचा॑ सु॒ते ॥ २ ॥

पुरूऽतमं पुरूणां ईशानं वार्याणां । इन्द्रं सोमे सचा सुते ॥ २ ॥

सोमरस पिळून तयार केल्यानंतर तुम्हीं इंद्रास पाचारण करा. हा इंद्र श्रेष्ठांचा शिरोमणी व स्पृहणीय संपत्तीचा स्वामी आहे. ॥ २ ॥

स घा॑ नो॒ योग॒ आ भु॑व॒त्स रा॒ये स पुर॑ंध्याम् । गम॒द्वाजे॑भि॒रा स नः॑ ॥ ३ ॥

सः घ नः योगे आ भुवत् सः राये सः पुरंध्यां । गमत् वाजेभिः आ सः नः ॥ ३ ॥

हा आम्हांस वैभव प्राप्त करवून देवो. आमच्या उत्कृष्टा लाभांचे आणि सद्भावनांचे ठिकाणीं हाच वास करो. हा आपल्या सर्व सामर्थ्यासह आमचेकडे येवो. ॥ ३ ॥

यस्य॑ सं॒स्थे न वृ॒ण्वते॒ हरी॑ स॒मत्सु॒ शत्र॑वः । तस्मा॒ इन्द्रा॑य गायत ॥ ४ ॥

यस्य संऽस्थे न वृण्वते हरी इति समत्ऽसु शत्रवः । तस्मै इन्द्राय गायत ॥ ४ ॥

ज्याचे अश्व सज्ज होऊन उभे राहिले असतां त्यांचेपुढें सुद्धां शत्रूंना युद्धांत तोंड देववत नाहीं, त्या इंद्राचा महिमा तुम्ही गा. ॥ ४ ॥

सु॒त॒पाव्ने॑ सु॒ता इ॒मे शुच॑यो यन्ति वी॒तये॑ । सोमा॑सो॒ दध्या॑शिरः ॥ ५ ॥

सुतऽपाव्ने सुताः इमे शुचयः यन्ति वीतये । सोमासः दधिऽआशिरः ॥ ५ ॥

नुकतेंच पिळून ठेविलेले, पवित्र व दहीं मिश्रित केलेले हे सोमरस, इन्द्रानें आपली रुचि घ्यावी या इच्छेने सोमप्रिय इंद्राकडे निघाले आहेत. ॥ ५ ॥

त्वं सु॒तस्य॑ पी॒तये॑ स॒द्यो वृ॒द्धो अ॑जायथाः । इन्द्र॒ ज्यैष्ठ्या॑य सुक्रतो ॥ ६ ॥

त्वं सुतस्य पीतये सद्यः वृद्धः अजायथाः । इन्द्र ज्यैष्ठ्याय सुक्रतो इति सुऽक्रतो ॥ ६ ॥

पराक्रमाने शोभणाऱ्या इंद्रा, जगतावर वर्चस्व चालवावें ह्या इच्छेनें तूं सोमपान करण्यासाठीं एकदम प्रगल्भ रूपानेंच प्रकट झालास. ॥ ६ ॥

आ त्वा॑ विशन्त्वा॒शवः॒ सोमा॑स इन्द्र गिर्वणः । शं ते॑ सन्तु॒ प्रचे॑तसे ॥ ७ ॥

आ त्वा विशन्तु आशवः सोमासः इन्द्र गिर्वणः । शं ते सन्तु प्रऽचेतसे ॥ ७ ॥

स्तुतीनें उल्हास पावणाऱ्या हे इंद्रा, सर्व गात्रांस प्रमोद देणारे सोमरस तुझ्या मुखांत प्रवेश करोत आणि तुला आनंद देवोत. तूं ज्ञानमंडित आहेस. ॥ ७ ॥

त्वां स्तोमा॑ अवीवृध॒न्त्वामु॒क्था श॑तक्रतो । त्वां व॑र्धन्तु नो॒ गिर॑ः ॥ ८ ॥

त्वां स्तोमाः अवीवृधन् त्वां उक्था शतक्रतो इति शतऽक्रतो । त्वां वर्धन्तु नः गिरः ॥ ८ ॥

हे प्रज्ञाशालि इंद्रा, स्तुतींनीं तुझें महत्त्व वृद्धिंगत झालें स्तवनांनी तुझा महिमा सर्वत्र विदित झाला. आमचीं स्तोत्रेंही तुझी महती वाढवोत. ॥ ८ ॥

अक्षि॑तोतिः सनेदि॒मं वाज॒मिन्द्र॑ः सह॒स्रिण॑म् । यस्मि॒न्विश्वा॑नि॒ पौंस्या॑ ॥ ९ ॥

अक्षितऽऊतिः सनेत् इमं वाजं इन्द्रः सहस्रिणम् । यस्मिन् विश्वानि पौंस्या ॥ ९ ॥

इंद्रानें रक्षण करण्याचे मनांत आणले म्हणजे त्यात खंड पडणें अशक्य आहे. ह्यासाठीं तो आम्हांस असें एकच सामर्थ्य देवो कीं ज्याची बरोबरी दुसऱ्या हजारों सामर्थ्यांनाही न येता त्यायोगें यच्चावत् पराक्रमांची कृत्यें सहज होऊं शकतील. ॥ ९ ॥

मा नो॒ मर्ता॑ अ॒भि द्रु॑हन्त॒नूना॑मिन्द्र गिर्वणः । ईशा॑नो यवया व॒धम् ॥ १० ॥

मा नः मर्ताः अभि द्रुहन् तनूनां इन्द्र गिर्वणः । ईशानः यवय वधम् ॥ १० ॥

हे सर्वस्तुत इंद्रा, कोणीही मर्त्यजन आमच्या देहांस उपद्रव देण्यास समर्थ न होवो. तुझी सत्ता सर्वत्र असल्यामुळें आमचा कोणाकडूनही अकस्मात् रीतीनें वध न होईल असें कर. ॥ १० ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त ६ (इंद्र सूक्त)

ऋषी - मधुछंदस् वैश्वामित्र : देवता - १ ते ३ इंद्र; ४ ते ६, ८, ९ मरुत; ५ ते ७ इंद्रमरुत; १० - इंद्र : छंद - गायत्री

यु॒ञ्जन्ति॑ ब्र॒ध्नम॑रु॒षं चर॑न्तं॒ परि॑ त॒स्थुषः॑ । रोच॑न्ते रोच॒ना दि॒वि ॥ १ ॥

युञ्जन्ति ब्रध्नं अरुषं चरन्तं परि तस्थुषः । रोचन्ते रोचना दिवि ॥ १ ॥

हे तेजोगोल आकाशामध्यें चमकत आहेत आणि अनुचरांप्रमाणें ते ह्या मध्यवर्ती देवतेची निघण्याची तयारी करीत आहेत. हें मध्यवर्ती तेज सामर्थ्यवान्, उज्ज्वल आणि सर्वसंचारी आहे. ॥ १ ॥

यु॒ञ्जन्त्य॑स्य॒ काम्या॒ हरी॒ विप॑क्षसा॒ रथे॑ । शोणा॑ धृ॒ष्णू नृ॒वाह॑सा ॥ २ ॥

युञ्जन्ति अस्य काम्या हरी इति विऽपक्षसा रथे । शोणा धृष्णू इति नृऽवाहसा ॥ २ ॥

ते परिचारक त्याच्या रथाच्या दोहो बाजूंस अश्व जोडीत आहेत. हे अश्व इतके सुंदर आहेत कीं कोणाच्याही मनामध्यें त्यांचे विषयीं अभिलाषा उत्पन्न होईल. त्यांचा वर्ण किंचित् तांबूस असून ह्या पराक्रमी देवास वाहून नेत असतांना त्यांच्या अंगांतील तेजस्वीपणा दृग्गोचर होतो. ॥ २ ॥

के॒तुं कृ॒ण्वन्न॑के॒तवे॒ पेशो॑ मर्या अपे॒शसे॑ । समु॒षद्भि॑रजायथाः ॥ ३ ॥

केतुं कृण्वन् अकेतवे पेशः मर्या अपेशसे । सं उषद्ऽभिः अजायथाः ॥ ३ ॥

अहाहा ! अचेतनास चैतन्य देऊन आणि जें आकारहीन होते त्याला साकार करून तूं उषेसहवर्तमान जन्म घेतलास. ॥ ३ ॥

आदह॑ स्व॒धामनु॒ पुन॑र्गर्भ॒त्वमे॑रि॒रे । दधा॑ना॒ नाम॑ य॒ज्ञिय॑म् ॥ ४ ॥

आत् अह स्वधां अनु पुनः गर्भऽत्वं आऽईरिरे । दधानाः नाम यज्ञियम् ॥ ४ ॥

यज्ञकर्मांत परिचित असलेले नांव धारण करून ते सृष्ट्यनुक्रमानें पुनः गर्भवास पावले. ॥ ४ ॥

वी॒ळु चि॑दारु॒ज॒त्नुभि॒र्गुहा॑ चिदिन्द्र॒ वह्नि॑भिः । अवि॑न्द उ॒स्रिया॒ अनु॑ ॥ ५ ॥

वीळु चित् आरुजत्नुऽभिः गुहा चित् इन्द्र वह्निऽभिः । अविन्दः उस्रियाः अनु ॥ ५ ॥

हे इंद्रा, दुर्भेद्य पर्वत भेदणाऱ्या अशनीच्या योगाने गुहा फोडून टाकून प्रभारूपी अशा धेनूंचा तूं तपास लावलास. ॥ ५ ॥

दे॒व॒यन्तो॒ यथा॑ म॒तिमच्छा॑ वि॒दद्व॑सुं॒ गिरः॑ । म॒हाम॑नूषत श्रु॒तम् ॥ ६ ॥

देवऽयन्तः यथा मतिं अच्छ विदत्ऽवसुं गिरः । महां अनूषत श्रुतम् ॥ ६ ॥

अभीष्ट वैभव देणाऱ्या या इंद्रास उद्देशून भक्तांनी स्तोत्रें केली. त्याचे महत्त्व व यश हीं दोन्ही विश्रुत आहेत. ॥ ६ ॥

इन्द्रे॑ण॒ सं हि दृक्ष॑से सञ्जग्मा॒नो अबि॑भ्युषा । म॒न्दू स॑मा॒नव॑र्चसा ॥ ७ ॥

इन्द्रेण सं हि दृक्षसे संऽजग्मानः अबिभ्युषा । मन्दू इति समानऽवर्चसा ॥ ७ ॥

ज्याचे हृदयास भितीने कधींही स्पर्श केला नाही अशा इंद्राबरोबर तूं संचार करतांना दिसतोस, त्यावेळीं दोघांचेही तेज समान दिसतें व तुम्ही दोघेही आनंदित दिसतां. ॥ ७ ॥

अ॒न॒व॒द्यैर॒भिद्यु॑भिर्म॒खः सह॑स्वदर्चति । ग॒णैरिन्द्र॑स्य॒ काम्यैः॑ ॥ ८ ॥

अनवद्यैः अभिद्युऽभिः मखः सहस्वत् अर्चति । गणैः इन्द्रस्य काम्यैः ॥ ८ ॥

इंद्राचे अनुचर सर्वांना प्रिय आणि अतिशय तेजस्वी असून त्यांचे ठिकाणी कोणत्याही प्रकारचा अवगुण मुद्दाम पाहूं गेल्यासही सांपडणार नाहीं. त्यांनी विभूषित असलेल्या ह्या देवाप्रित्यर्थ आम्च्या यज्ञांत उच्च घोषाने अर्चन चाललेले आहे. ॥ ८ ॥

अतः॑ परि॒ज्मन्ना ग॑हि दि॒वो वा॑ रोच॒नादधि॑ । सम॑स्मिन्नृञ्जते॒ गिरः॑ ॥ ९ ॥

अतः परिऽज्मन् आ गहि दिवः वा रोचनात् अधि । सं अस्मिन् ऋञ्जते गिरः ॥ ९ ॥

यासाठीं हे सर्वव्यापि देवा, द्युलोकामधून अथवा प्रकाशमान् अंतरिक्षांतून तूं इकडे ये. या यज्ञांत हा मी तुझा दास तुझीं स्तोत्रें गात गात आपली वाणी अलंकृत करीत आहे. ॥ ९ ॥

इ॒तो वा॑ सा॒तिमीम॑हे दि॒वो वा॒ पार्थि॑वा॒दधि॑ । इन्द्रं॑ म॒हो वा॒ रज॑सः ॥ १० ॥

इतः वा सातिं ईमहे दिवः वा पार्थिवात् अधि । इंद्रं महः वा रजसः ॥ १० ॥

आम्हास इंद्र दर्शन हेंच अभीष्ट आहे. तें दिव्यलोकांतून अथवा भूलोकांतून किंवा महान् अंतरिक्षांतून, कोठून तरी आम्हांस प्राप्त होवो. ॥ १० ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त ७ (इंद्र सूक्त)

ऋषी - मधुछंदस् वैश्वामित्र : देवता - इंद्र : छंद - गायत्री

इन्द्रमिद्गाथिनो बृहदिन्द्रमर्केभिरर्किणः । इन्द्रं वाणीरनूषत ॥ १ ॥

इंद्रं इत् गाथिनः बृहत् इंद्रं अर्केभिः अर्किणः । इंद्रं वाणीः अनूषत ॥ १ ॥

गाथा गाणाऱ्या ऋषींनी अनेक गाथांनी इंद्राचीच स्तुती केली. अर्कपाठक विद्वानांनीही इंद्राचें अर्चन केले. अशा रीतीने अनेक स्तोत्रांच्या द्वारें इंद्राचे स्तवन झालेले आहे. ॥ १ ॥

इन्द्र इद्धर्योः सचा सम्मिश्ल आ वचोयुजा । इन्द्रो वज्री हिरण्ययः ॥ २ ॥

इंद्रः इत् हर्योः सचा सऽमिश्लः आ वचःऽयुजा । इंद्रः वज्री हिरण्ययः ॥ २ ॥

पीतवर्ण अश्वांचा स्वामी फक्त इंद्रच आहे. हाच सर्वांस आज्ञा करतो. हा वज्रधारी इंद्र सर्व अविनाशी संपत्तीचा प्रभु आहे. ॥ २ ॥

इन्द्रो॑ दी॒र्घाय॒ चक्ष॑स॒ आसूर्यं॑ रोहयद्दि॒वि । वि गोभि॒रद्रि॒मैरयत् ॥ ३ ॥

इंद्रः दीर्घाय चक्षसे आ सूर्यं रोहयत् दिवि । वि गोभिः अद्रिं ऐरयत् ॥ ३ ॥

सर्वांना पूर्णपणे दृष्टीस पडेल अशा रीतीनें इंद्रानें सूर्याची आकाशांत स्थापना केली. आपल्या अशनीच्या योगानें पर्वतप्राय मेघांस त्यानें हलवून सोडलें. ॥ ३ ॥

इन्द्र॒ वाजे॑षु नोऽव स॒हस्र॑प्रधनेषु च । उ॒ग्र उ॒ग्राभि॑रू॒तिभिः॑ ॥ ४ ॥

इंद्र वाजेषु नः अव सहस्रऽप्रधनेषु च । उग्रः उग्राभिः ऊतिऽभिः ॥ ४ ॥

हे इंद्रा, तूं उग्रस्वरूप आहेस तेव्हां आपल्या उग्र साधनांनी जेथें साहसांची कृत्यें चालली आहेत आणि हजारों वीर जेथे झुंजत आहेत अशा ठिकाणीं आमचे संरक्षण कर. ॥ ४ ॥

इन्द्रं वयं महाधन इन्द्रमर्भे हवामहे । युजं वृत्रेषु वज्रिणम् ॥ ५ ॥

इंद्रं वयं महाऽधने इंद्रं अर्भे हवामहे । युजं वृत्रेषु वज्रिणम् ॥ ५ ॥

शत्रु प्राप्त झाले असतां आम्ही इंद्रास हांक मरतो. मोठमोठ्या युद्धांत व लहानसहान लढायांतही आम्ही इंद्राचा धांवा करतो. कारण तोच वज्रधारी व आमचा खरा साह्यकर्ता आहे. ॥ ५ ॥

स नो वृषन्नमुं चरुं सत्रादावन्नपा वृधि । अस्मभ्यमप्रतिष्कुतः ॥ ६ ॥

सः नः वृषन् अमुं चरुं सत्राऽदावन् अप वृधि । अस्मभ्यं अप्रतिऽस्कुतः ॥ ६ ॥

वृष्टीच्या रूपाने सदोदित औदार्य प्रकट करणाऱ्या हे इंद्रदेवा, तूं यत्किंचित् सुद्धां अनमान न करतां मेघपटल दूर कर. ॥ ६ ॥

तुञ्जेतुञ्जे य उत्तरे स्तोमा इन्द्रस्य वज्रिणः । न विंधे अस्य सुष्टुतिम् ॥ ७ ॥

तुंजेतुंजे य उत्ऽतरे स्तोमाः इंद्रस्य वज्रिणः । न विंधे अस्य सुऽस्तुतिम् ॥ ७ ॥

इंद्राचे पराक्रम वर्णन करणाऱ्या ज्या उत्तम उत्तम प्रार्थना आहेत, त्यांतसुद्धां हे इंद्रा तुझ्या योग्यतेस साजेल अशी स्तुति मला सांपडत नाहीं. ॥ ७ ॥

वृषा॑ यू॒थेव॒ वंस॑गः कृ॒ष्टीरि॑य॒र्त्योज॑सा । ईशा॑नो॒ अप्र॑तिष्कुतः ॥ ८ ॥

वृषा यूथाऽइव वंसगः कृष्टीः इयर्ति ओजसा । ईशानः अप्रतिऽस्कुतः ॥ ८ ॥

ज्याची गति डौलदार आहे, असा एखादा महावृषभ ज्याप्रमाणें वृषभ समुदायास मार्गदर्शक होतो त्याप्रमाणें हा जगताचा स्वामी इंद्र सर्व मानवांचा संतोष ठेवून त्यांस आपल्या सामर्थ्यानें पुढें जावयास प्रवृत्त करतो. ॥ ८ ॥

य एक॑श्चर्षणी॒नां वसू॑नामिर॒ज्यति॑ । इन्द्रः॒ पञ्च॑ क्षिती॒नाम् ॥ ९ ॥

यः एकः चर्षणीनां वसूनां इरज्यति । इंद्रः पञ्च क्षितीनाम् ॥ ९ ॥

सर्व जगत्, सर्व संपत्ती आणि पांचही लोक, ह्यांवर इंद्राचें एकट्याचेंच स्वामित्व आहे. ॥ ९ ॥

इन्द्रं॑ वो वि॒श्वत॒स्परि॒ हवा॑महे॒ जने॑भ्यः । अ॒स्माक॑मस्तु॒ केव॑लः ॥ १० ॥

इंद्रं वः विश्वतः परि हवामहे जनेभ्यः । अस्माकं अस्तु केवलः ॥ १० ॥

जनतेच्या हिताकरितां आम्ही प्रत्येक ठिकाणाहून तुमचा जो प्रिय इंद्र त्या पाचारण करतो. तो इंद्र केवळ आमचाच पक्षपाती असो. ॥ १० ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त ८ (इंद्र सूक्त)

ऋषी - मधुछंदस् वैश्वामित्र : देवता - इंद्र : छंद - गायत्री

एन्द्र॑ सान॒सिं र॒यिं स॒जित्वा॑नं सदा॒सहं॑ । वर्षि॑ष्ठमू॒तये॑ भर ॥ १ ॥

आ इंद्र सानसिं रयिं सऽजित्वानं सदाऽसहं । वर्षिष्ठं ऊतये भर ॥ १ ॥

हे इंद्रा, आमच्या रक्षणाकरितां आम्हांस असें वैभव दे की ज्यायोगें मनास समाधान वाटेल, ज्याच्यायोगाने आम्हांस वर्चस्व प्राप्त होईल, ज्याचा कधीही नाश होणार नाही, व जें सर्व लोकांत उत्कृष्ट ठरेल. ॥ १ ॥

नि येन॑ मु॒ष्टिह॒त्यया॒ नि वृ॒त्रा रु॒णधा॑महै । त्वोता॑सो न्यर्व॑ता ॥ २ ॥

नि येन मुष्टिऽहत्यया नि वृत्रा रुणधामहै । त्वाऽऊतासः निऽअर्वता ॥ २ ॥

ते वैभव असे असावे कीं, तूं अश्वारूढ आमचे संरक्षण करूं लागलास की नुसत्या मुष्टिप्रहारानें आम्हांस पातकी शत्रूंचा नाश करता यावा. ॥ २ ॥

इन्द्र॒ त्वोता॑स॒ आ व॒यं वज्रं॑ घ॒ना द॑दीमहि । जये॑म॒ सं यु॒धि स्पृधः॑ ॥ ३ ॥

इंद्र त्वाऽऊतासः आ वयं वज्रं घना ददीमहि । जयेम सं युधि स्पृधः ॥ ३ ॥

तू रक्षण करीत असतां आम्हीं हातांत घण घेतला तरी त्याचें वज्र बनेल, आणि आम्हांस समरांगणामध्यें शत्रूस जिंकता येईल. ॥ ३ ॥

व॒यं शूरे॑भि॒रस्तृ॑भि॒रिन्द्र॒ त्वया॑ यु॒जा व॒यं । सा॒स॒ह्याम॑ पृतन्य॒तः ॥ ४ ॥

वयं शूरेभिः अस्तृभिः इंद्र त्वया युजा वयं । ससह्याम पृतन्यतः ॥ ४ ॥

तुझे साह्य असल्यावर शत्रू कितीही संग्रामनिपुण असले तथापि शूर अस्त्रवेत्त्यांच्या मदतीने आम्ही त्यांना जेरीस आणूं. ॥ ४ ॥

म॒हाँ इन्द्रः᳚ प॒रश्च॒ नु म॑हि॒त्वम् अ॑स्तु व॒ज्रिणे॑ । द्यौर्न प्र॑थि॒ना शवः᳚ ॥ ५ ॥

महान् इंद्रः परः च नु मऽहित्वं अस्तु वज्रिणे । द्यौः न प्रथिना शवः ॥ ५ ॥

हा वज्रधारी इंद्र श्रेष्ठ आहे. किंबहुना त्याहूनही अधिक आहे. याचे महत्त्व असेच चिरकालिक असो. त्याचे बल आकाशासारखे अनंत आहे. ॥ ५ ॥

स॒मो॒हे वा॒ य आश॑त॒ नर॑स्तो॒कस्य॒ सनि॑तौ । विप्रा॑सो वा धिया॒यवः᳚ ॥ ६ ॥

संऽओहे वा ये आशत नरः तोकस्य सनितौ । विप्रासः वा धियाऽयवः ॥ ६ ॥

शूर पुरुष रणांगणांत जे यश मिळवितात, अपत्यलाभाने मनुष्यांस जे सुख प्राप्त होते, अथवा एकाग्रबुद्धीने स्तवन करणारे विद्वान लोक जे कांही संपादन करतात, ॥ ६ ॥

यः कु॒क्षिः सो॑म॒पात॑मः समु॒द्र इ॑व॒ पिन्व॑ते । उ॒र्वीरापो॒ न का॒कुदः᳚ ॥ ७ ॥

यः कुक्षिः सोमऽपातमः समुद्रःऽइव पिन्वते । उर्वीः आपः न काकुदः ॥ ७ ॥

किंवा सोमरसाचे प्रेमाने पान करून भक्तांचे जे उदर सागराप्रमाणे तुडुंब भरलेले दिसतें, अथवा ज्या कंठामधून एखाद्या नदीप्रमाणे सोमरसाचा प्रवाह चाललेला असतो, ॥ ७ ॥

एवा ह्य् अस्य सूनृता विरप्शी गोमती मही । पक्वा शाखा न दाशुषे ॥ ८ ॥

एव आ हि अस्य सूनृता विऽरप्शी गोऽमती मही । पक्वा शाखा न दाशुषे ॥ ८ ॥

हा सर्व त्या इंद्राच्या आशीर्वचनांचाच प्रभाव होय. ती तुझी उत्तम आशीर्वचने पक्वफलयुक्त अशा वृक्ष शाखेप्रमाणे तुझ्या दासास फलद्रूप होतात व त्यास गोधनादि संपत्ति व इतर अनेक सुखें प्राप्त करून देतात. ॥ ८ ॥

एवा हि ते विभूतय ऊतय इन्द्र मावते । सद्यश्चित् सन्ति दाशुषे ॥ ९ ॥

एव हि ते विऽभूतयः ऊतय इंद्र माऽवते । सद्यः चित् संति दाशुषे ॥ ९ ॥

हे इंद्रा, ती तुझी सामर्थ्यें व भक्तांचे रक्षण करण्याचे मार्ग माझ्यासारख्या दासाला नेहमीच अनुकुल आहेत. ॥ ९ ॥

ए॒वा ह्य् अस्य॒ काम्या॒ स्तोम॑ उ॒क्थं च॒ शंस्या॑ । इन्द्रा॑य॒ सोम॑पीतये ॥ १० ॥

एव हि अस्य काम्या स्तोमः उक्थं च शंस्या । इंद्राय सोमऽपीतये ॥ १० ॥

अशी ही इंद्राची स्पृहणीय व प्रशंसनीय स्तुतिस्तोत्रें सोमपानाला इंद्रास प्रवृत्त करोत. ॥ १० ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त ९ (इंद्र सूक्त)

ऋषी - मधुछंदस् वैश्वामित्र : देवता - इंद्र : छंद - गायत्री

इन्द्रेहि॒ मत्स्यन्ध॑सो॒ विश्वे॑भिः सोम॒पर्व॑भिः । म॒हाँ अ॑भि॒ष्टिरोज॑सा ॥ १ ॥

इंद्र आ इहि मत्सि अंधसः विश्वेभिः सोमपर्वऽभिः । महान् अभिष्टिः ओजसा ॥ १ ॥

हे इंद्रा ये, आणि जेव्हां जेव्हां आमचे हातून सोमयाग होतील तेव्हां तेव्हां आमचे हवि गोड मानून घे. आपल्या सामर्थ्याने तूंच आमचा संरक्षणकर्ता झाला आहेस. ॥ १ ॥

एमे॑नं सृजता सु॒ते म॒न्दिमिन्द्रा॑य म॒न्दिने॑ । चक्रिं॒ विश्वा॑नि॒ चक्र॑ये ॥ २ ॥

आ ईं एनं सृजत सुते मंदिं इंद्राय मंदिने । चक्रिं विश्वानि चक्रये ॥ २ ॥

या आनंदी इंद्राला हा आनंददायक सोमरस तयार होतांच अर्पण करा; ह्या विश्वकर्त्याला हा आनंदकारक सोमरस द्या. ॥ २ ॥

मत्स्वा॑ सुशिप्र म॒न्दिभि॒ स्तोमे॑भिर्विश्वचर्षणे । सचै॒षु सव॑ने॒ष्वा ॥ ३ ॥

मत्स्व सुऽशिप्र मंदिऽभि स्तोमेभिः विश्वऽचर्षणे । सचा एषु सवनेषु आ ॥ ३ ॥

हे दिव्यमुकुट धारण करणाऱ्या इंद्रा, हे सर्वद्रष्ट्या देवा, या प्रमोददायक स्तवनांनी तूं आनंदित हो, आणि आम्ही हवि अर्पण करीत असतांना तेथे तुझे वास्तव्य असूं दे. ॥ ३ ॥

अस॑सृग्रमिन्द्र ते॒ गिर॒ः प्रति॒ त्वामु॒द॑हासत । अजो॑षा वृष॒भं पति॑म् ॥ ४ ॥

असृग्रं इंद्र ते गिरः प्रति त्वां उत् अहासत । अजोषाः वृषभं पतिम् ॥ ४ ॥

हे इंद्रा, तुला उद्देशून मी स्तवनोक्तींचा उच्चार केला, परंतु तत्पूर्वीच त्या अधीर मनाने तुजकडे चालत्या झाल्या. तूं त्यांचा नाथ व त्यांच्या कामना परिपूर्ण करणारा स्वामी आहेस. ॥ ४ ॥

सं चौदय चित्रमर्वाग्राध इन्द्र वरेण्यं । असदित्ते विभु प्रभु ॥ ५ ॥

सं चोदय चित्रं अर्वाक् राधः इंद्र वरेण्यं । असत् इत् ते विऽभु प्रऽभु ॥ ५ ॥

हे इंद्रा, अप्रतिम आणि स्पृहणीय असे धन आम्हांला पाठवून दे. खरोखर तुझे जवळ अत्यंत उत्कृष्ट आणि विपुल धन आहे. ॥ ५ ॥

अस्मान्सु तत्र चोदयेन्द्र राये रभस्वतः । तुविद्युम्न यशस्वतः ॥ ६ ॥

अस्मान् सु तत्र चोदय इन्द्र राये रभस्वतः । तुविऽद्युम्न यशस्वतः ॥ ६ ॥

हे सहस्रकांति इंद्रा, आम्हांस वैभव प्राप्त व्हावे म्हणून धनार्जनाकरितां आम्हांस प्रवृत्त कर; त्याबद्दल आम्हांकडून मनःपूर्वक प्रयत्न होऊं दे, व त्यांत आम्हांस यश येईल असे कर. ॥ ६ ॥

सं गोमदिन्द्र वाजवदस्मे पृथु श्रवो बृहत् । विश्वायुर्धेह्यक्षितम् ॥ ७ ॥

सं गोमत् इंद्र वाजऽवत् अस्मे पृथु श्रवः बृहत् । विश्वऽआयुः धेहि अक्षितम् ॥ ७ ॥

हे इंद्रा, गोधनादि वैभव आमचेजवळ पुष्कळच आहे, आमचे सामर्थ्य मोठे आहे; आम्ही दीर्घायुषी आहोंत अशी आमची कीर्ति सर्वत्र प्रसार पावो व तींत कधीही खंड न पडो. ॥ ७ ॥

अ॒स्मे धे॑हि॒ श्रवो॑ बृ॒हद्द्यु॒म्नं स॑हस्र॒सात॑मं । इंद्र॒ ता र॒थिनी॒रिषः॑ ॥ ८ ॥

अस्मे धेहि श्रवः बृहत् द्युम्नं सहस्रऽसातमं । इंद्र ताः रथिनीः इषः ॥ ८ ॥

हे इंद्रा आमची कीर्ति पुष्कळ वाढीव. आम्हांस अपार वैभव दे आणि आम्हांस रथ प्राप्त होतील अशी कृपा आम्हांवर कर. ॥ ८ ॥

वसो॒रिन्द्रं॒ वसु॑पतिं गी॒र्भिर्गृ॒णन्त॑ ऋ॒ग्मियं॑ । होम॒ गन्ता॑रमू॒तये॑ ॥ ९ ॥

वसोः इंद्रं वसुऽपतिं गीःऽभिः गृणन्तः ऋग्मियं । होम गंतारं ऊतये ॥ ९ ॥

अनेक प्रकारच्या स्तुतींनी आळवून आपण आपल्या संरक्षणार्थ इंद्रास पाचारण करूं या. हा वैभवाचा राजा आहे. हा छंदोबद्ध कवितांनी वर्णन करण्यासारखा आहे. त्यास कोठेंही हांक मारण्याचा अवकाश, कीं तो तेथे उभा आहेच. ॥ ९ ॥

सु॒तेसु॑ते॒ न्योकसे बृ॒हद्बृ॑ह॒त एदु॒रिः । इन्द्रा॑य शू॒षम॑र्चति ॥ १० ॥

सुतेऽसुते निऽओकसे बृहत् बृहत आ इत् अरिः । इंद्राय शूषं अर्चति ॥ १० ॥

प्रत्येक सोमयागाच्या ठिकाणीं वास्तव्य करणाऱ्या या श्रेष्ठ इंद्राप्रित्यर्थ हा त्याचा भक्त, उच्चस्वराने व मनाची तृप्ति होईपर्यंत स्तोत्रें अर्पण करीत आहे. ॥ १० ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त १० (इंद्र सूक्त)

ऋषी - मधुछंदस् वैश्वामित्र : देवता - इंद्र : छंद - अनुष्टुप्

गाय॑न्ति त्वा गाय॒त्रिणोऽ॑र्चन्त्य॒र्कम॒र्किण॑ः ।

ब्र॒ह्माण॑स्त्वा शतक्रत॒ उद्व॒ंशमि॑व येमिरे ॥ १ ॥

गायन्ति त्वा गायत्रिणः अर्चन्ति अर्कं अर्किणः ।

ब्रह्माणः त्वा शतक्रतो इति शतऽक्रतो उत् वंशंऽइव येमिरे ॥ १ ॥

गायत्रीवृत्त म्हणणारे उपासक तुझे यश गातात. आणि अर्कनामक स्तोत्रें रचणारे तुझी अर्कांनी अर्चना करतात. हे बलशाली इंद्रा, ज्याप्रमाण ध्वजाची यष्टि उंच उभी करावी त्याप्रमाणे विद्वान लोकांनी तुला अतिशय उच्चत्व दिलेले आहे. ॥ १ ॥

यत्सानोः॒ सानु॒मारु॑ह॒द्भूर्यस्प॑ष्ट॒ कर्त्व॑म् ।

तदिन्द्रो॒ अर्थं॑ चेतति यू॒थेन॑ वृ॒ष्णिरे॑जति ॥ २ ॥

यत् सानोः सानुं आ अरुहत् भूरि अस्पष्ट कर्त्वं ।

तत् इंद्रः अर्थं चेतति यूथेन वृष्णिः एजति ॥ २ ॥

जेव्हां इंद्राच्या भक्ताने एका पर्वत शिखरावरून दुसऱ्या पर्वत शिखरावर याप्रमाणे आरोहण करून इंद्राचे अगाध कर्तृत्व अवलोकन केलें, तेव्हां पर्जन्याधिपति इंद्रही त्याचे मनांतील भाव समजला, आणि आपला सर्व लवाजमा घेऊन येण्यास तो सिद्ध झाला. ॥ २ ॥

यु॒क्ष्वा हि के॒शिना॒ हरी॒ वृष॑णा कक्ष्य॒प्रा ।

अथा न इन्द्र सोमपा गिरामुपश्रुतिं चर ॥ ३ ॥

युक्ष्व हि केशिना हरी वृषणा कक्ष्यऽप्रा ।

अथ नः इंद्र सोमऽपाः गिरां उपऽश्रुतिं चर ॥ ३ ॥

हे इंद्रा, तुझे अश्व वृष्टि उत्पन्न करणारे आहेत. त्यांची आयाळ दीर्घ आहे. आणि त्यांच्या पुष्ट देहामुळे त्यांच्या बंधनरज्जु तंग झालेल्या आहेत. हे सोमप्रिय देवा, त्यांस आपल्या रथास जोड आणि आमची प्रार्थना तुला ऐकूं येईल इतका आमच्या सन्निध ये. ॥ ३ ॥

एहि स्तोमाँ अभि स्वराभि गृणीह्या रुव ।

ब्रह्म च नो वसो सचेन्द्र यज्ञं च वर्धय ॥ ४ ॥

आ इहि स्तोमान् अभि स्वर अभि गृणीहि आ रुव ।

ब्रह्म च नः वसो इति सचा इंद्र यज्ञं च वर्धय ॥ ४ ॥

हे संपत्तिरूप इंद्रा, इकडे ये, आमच्या प्रार्थनांची वाखाणणी कर, त्यांस चांगले म्हण, त्यांच्याबद्दल प्रशंसापर उद्‍गार काढ. आमच्या प्रार्थनेचा स्वीकार कर, आणि आमचे यज्ञ कामप्रद होतील असे कर. ॥ ४ ॥

उ॒क्थमिन्द्रा॑य॒ शंस्यं॒ वर्ध॑नं पुरुनि॒ष्षिधे॑ ।

श॒क्रो यथा॑ सु॒तेषु॑ णो रा॒रण॑त्स॒ख्येषु॑ च ॥ ५ ॥

उक्थं इंद्राय शंस्यं वर्धनं पुरुनिःऽसिधे ।

शक्रः यथा सुतेषु नः ररणत् सख्येषु च ॥ ५ ॥

सर्वार्थपरिपूरक इंद्रास उद्देशून उत्कृष्ट असे स्तोत्र गाइले पाहिजे. असे केले असतां आमच्या पुत्रपौत्रांवर व आमच्या इष्टमित्रांवर इंद्र आपली कृपादृष्टी ठेवील. ॥ ५ ॥

तमित्स॑खि॒त्व ईमहे॒ तं रा॒ये तं सु॒वीर्ये॑ ।

स श॒क्र उ॒त नः॑ शक॒दिन्द्रो॒ वसु॒ दय॑मानः ॥ ६ ॥

तं इत् सखिऽत्वे ईमहे तं राये तं सुऽवीर्ये ।

सः शक्र उत नः शकत् इंद्रः वसु दयमानः ॥ ६ ॥

त्याच्याच प्रेमाची वाञ्छा धरून आम्ही त्याच्याजवळ जातो, संपत्तीसाठींही आम्ही त्यासच शरण जातो. आणि आम्हांस शौर्य प्राप्ति होण्याकरितां आम्ही त्याचाच आश्रय करतो. तेव्हां तोच इंद्र आम्हांस वैभव देऊन आमचे अंगी कर्तृत्वशक्ति उत्पन्न करो. ॥ ६ ॥

सु॒वि॒वृतं᳚ सु॒नि॒रज॒मिन्द्र॒ त्वादा॑त॒मिद्यशः᳚ ।

गवा॒मप॑ व्र॒जं वृ॑धि कृणु॒ष्व राधो॑ अद्रिवः ॥ ७ ॥

सुऽविवृतं सुनिःअजं इंद्र त्वाऽदातं इत् यशः ।

गवां अप व्रजं वृधि कृणुष्व राधः अद्रिऽवः ॥ ७ ॥

हे इंद्रा, तुझा कृपेमुळें प्राप्त झालेली कीर्तिच सर्वत्र पसरते. तीस फार प्रयासही पडत नाहींत. हे वज्रधर देवा, धेनूंचा समुदाय बंधनांतून मुक्त कर आणि आम्हांवर प्रसाद कर. ॥ ७ ॥

नहि त्वा रोदसी उभे ऋघायमाणमिन्वतः ।

जेषः स्वर्वतीरपः सं गा अस्मभ्यं धूनुहि ॥ ८ ॥

नहि त्वा रोदसी इति उभे इति ऋघायमाणं इन्वतः ।

जेषः स्वःऽर्वतीः अपः सं गाः अस्मभ्यं धूनुहि ॥ ८ ॥

तुला कोप आला असतां भूलोक व द्युलोक हे दोन्हीही तुला शांत करण्यास धजणार नाहींत. स्वर्गांतील उदकावर स्वामित्व स्थापन करून धेनूंना आमचेकडे पाठवून दे. ॥ ८ ॥

आश्रुत्कर्ण श्रुधी हवं नू चिद्दधिष्व मे गिरः ।

इन्द्र स्तोममिमम् मम कृष्वा युजश्चिदन्तरम् ॥ ९ ॥

आश्रुत्ऽकर्ण श्रुधी हवं नू चित् दधिष्व मे गिरः ।

इंद्र स्तोमं इमं मम कृष्व युजः चित् अन्तरम् ॥ ९ ॥

हे इंद्रा तुझा कान चहूंकडे आहे. माझी प्रार्थना ऐक आणि माझ्या स्तुतींचा सत्वर स्वीकार कर. तूं माझा मित्र आहेस. तुझ्या अंतःकरणांत हे माझे स्तवन सांठवून ठेव. ॥ ९ ॥

वि॒द्मा हि त्वा॒ वृष॑न्तमं॒ वाजे॑षु हव॒नश्रु॑तम् ।

वृष॑न्तमस्य हूमह ऊ॒तिं स॑हस्र॒सात॑माम् ॥ १० ॥

विद्मा हि त्वा वृषन्ऽतमं वाजेषु हवनऽश्रुतं ।

वृषन्ऽतमस्य हूमहे ऊतिं सहस्रऽसातमाम् ॥ १० ॥

कामना परिपूर्ण करणाऱ्या देवतांमध्यें तूं श्रेष्ठ आहेस हें आम्हांस माहीत आहे. तूंच प्रार्थना लवकर ऐकतोस हेंही आम्ही जाणतो. पर्जन्यवृष्टीवर तुझा अधिकार चालत असल्याकारणाने तुझ्या कृपेची आम्ही याचना करतो. त्या कृपेची योग्यता इतरांपेक्षां सहस्रपटीने अधिक आहे. ॥ १० ॥

आ तू न॑ इन्द्र कौशिक मन्दसा॒नः सु॒तं पि॑ब ।

नव्य॒माय॒ुः प्र सू ति॑र कृ॒धी स॑हस्र॒सामृषि॑म् ॥ ११ ॥

आ तू नः इंद्र कौशिक मंदसानः सुतं पिब ।

नव्यं आयुः प्र सु तिर कृधी सहस्रसां ऋषिम् ॥ ११ ॥

हे इंद्रा, हे कौशिका, सुप्रसन्न होऊन आमच्या सोमरसाचा सत्वर स्वीकार कर. आमच्या आयुर्मर्यादेंत नवीन भर घाल, आणि मला इतरांहून सहस्रपटीने श्रेष्ठ असें ऋषित्व अर्पण कर. ॥ ११ ॥

परि॑त्वा गिर्वणो॒ गिर॑ इ॒मा भ॑वन्तु वि॒श्वतः॑ ।

वृ॒द्धायु॒मनु॒ वृद्ध॑यो॒ जुष्टा॑ भवन्तु॒ जुष्ट॑यः ॥ १२ ॥

परि त्वा गिर्वणः गिरः इमाः भवंतु विश्वतः ।

वृद्धऽआयुं अनु वृद्धयः जुष्टा भवंतु जुष्टयः ॥ १२ ॥

हे सर्वस्तुत इंद्रा, ही माझी स्तोत्रें सर्वस्वी तुझेंच स्तवन करोत. ही स्वीकार करण्यास योग्य आहेत. तुझ्या हांतून त्यांचा योग्य आदर होवो व तुझ्या अनंत आयुष्याप्रमाणें हीं स्तोत्रेंही चिरकाल टिकोत. ॥ १२ ॥

इन्द्रं॒ विश्वा॑ अवीवृधन्त्समु॒द्रव्य॑चसं॒ गिरः॑ । र॒थीत॑मं र॒थीनां॒ वाजा॑नां॒ सत्प॑तिं॒ पति॑म् ॥ १ ॥

इंद्रं विश्वाः अवीवृधन् समुद्रऽव्यचसं गिरः । रथीऽतमं रथीनां वाजानां सत्ऽपतिं पतिम् ॥ १ ॥

समुद्रासही व्याप्त करून टाकणाऱ्या इंद्राचे यश विश्वांतील अखिल स्तुतिवचनांनी वृद्धिंगत केले आहे. इंद्र हा सर्वांचा राजा आहे; सर्व सामर्थ्यांचा हा अधिपति आहे; सर्व महारथी वीरांतही हा अत्यंत श्रेष्ठ आहे. ॥ १ ॥

स॒ख्ये त॑ इन्द्र वा॒जिनो॒ मा भे॑म शवसस्पते । त्वाम॒भि प्र णो॑नु॒मो॒ जेता॑र॒मप॑राजितम् ॥ २

सख्ये ते इंद्र वाजिनः मा भेम शवसः पते । त्वां अभि प्र नोनु॒मः जेतारं अपराजितम् ॥ २ ॥

हे सामर्थ्याधिपति इंद्रा, तूं आमचा रक्षणकर्ता असतांना आम्हांस आपल्या सामर्थ्याबद्दल भरंवसा वाटून भितीचे नांवही उरणार नाही. तूंच शत्रूंचा जेता. तुझा पराजय करण्यास कोण समर्थ आहे ? तुला आमचे पुनः पुनः नमस्कार असोत. ॥ २ ॥

पू॒र्वीरिन्द्र॑स्य रा॒तयो॒ न वि द॑स्यन्त्यू॒तयः॑ । यदी॒ वाज॑स्य॒ गोम॑तः स्तो॒तृभ्यो॒ मंह॑ते म॒घम् ३

पूर्वीः इंद्रस्य रातयः न वि दस्यंति ऊतयः । यदी वाजस्य गोऽमत स्तोतृऽभ्यः मंहते मघम् ॥ ३ ॥

इंद्राजवळ गोधनादि संपत्ति अपार असल्यामुळे, आपल्या भक्तांना, पराक्रमी इंद्राचे औदार्य जरी एकसारखे वैभव अर्पण करीत असतें, तथापि त्याच्या भरपूर दातृत्वाला अथव संरक्षणशक्तीला कधीही खंड पडत नाही. ॥ ३ ॥

पु॒रां भि॒न्दुर्युवा॑ क॒विरमि॑तौजा अजायत । इन्द्रो॒ विश्व॑स्य॒ कर्म॑णो ध॒र्ता व॒ज्री पु॑रुष्टु॒तः ॥ ४॥

पुरां भिंदुः युवा कविः अमितऽओजाः अजायत । इंद्रः विश्वस्य कर्मणः धर्ता वज्री पुरुऽस्तुतः ॥ ४ ॥

शत्रूंच्या पुरांचा उच्छेदक इंद्र हाच होय. त्याचे तारुण्य सदोदित टिकणारे अहे. हा बुद्धिवंतांमध्यें श्रेष्ठ आहे. हा एकदम पराक्रमी असाच अवतीर्ण झाला. सर्व कर्मांस याचा आधार अहे. वज्र हे याचे आयुध आहे. इंद्राची स्तुति अनेकांनी केली आहे. ॥ ४ ॥

त्वं व॒लस्य॒ गोम॒तोऽ॑पावरद्रिवो॒ बिल॑म् । त्वां दे॒वा अबि॑भ्युषस्तु॒ज्यमा॑नास आविषुः ॥ ५

त्वं वलस्य गोऽमतः अप अवः अद्रिवः बिलं । त्वां देवा अबिभ्युषः तुज्यमानासः आविषुः ॥ ५ ॥

हे वज्रधर इंद्रा, गाईंचा समुदाय बलाने हस्तगत केला होता, म्हणून तूं त्याचा कोट फोडून टाकलास. ज्यावेळी देवांना अतिशय पीडा झाली त्यावेळी ते न डगमगतां तुझ्या आश्रयास आले. ॥ ५ ॥

तवा॒हं शू॑र रा॒तिभिः॒ प्रत्या॑यं॒ सिन्धु॑मा॒वद॑न् । उपा॑तिष्ठन्त गिर्वणो वि॒दुष्टे॒ तस्य॑ का॒रवः॑ ॥ ६

तव अहं शूर रातिऽभिः प्रति आयं सिंधुं आऽवदन् । उप अतिष्ठंत गिर्वणः विदुः ते तस्य कारवः ॥ ६ ॥

हे शूर इंद्रा, ह्या तुझ्या उदारपणाच्या कृत्यांस भुलून तुझी स्तुती गात गात मी तुझ्याकडे आलो. कारण तूं कृपेचा सिंधु आहेस. स्तोत्रकर्तेही जवळच उभे होते. त्यांनीही तो तुझा पराक्रम अवलोकन केला. ॥ ६ ॥

मा॒याभि॑रिन्द्र मा॒यिनं॒ त्वं शुष्ण॒मवा॑तिरः । वि॒दुष्टे॒ तस्य॒ मेधि॑रा॒स्तेषां॒ श्रवां॒स्युत्ति॑र ॥ ७ ॥

मायाभिः इंद्र मायिनं त्वं शुष्णं अव अतिरः । विदुः ते तस्य मेधिराः तेषां श्रवांसि उत् तिर ॥ ७ ॥

शुष्ण इतका हिकमती, परंतु आपल्या युद्धचमत्करानें तूं त्याचा पराभव केलास. बुद्धिमान् पुरुषांनी तेंही अवलोकन केले, म्हणून त्यांच्याही श्रवणार्ह स्तुतींचा तूं आदर कर. ॥ ७ ॥

इन्द्र॒मीशा॑न॒मोज॑सा॒भि स्तोमा॑ अनूषत । स॒हस्रं॒ यस्य॑ रा॒तय॑ उ॒त वा॒ सन्ति॒ भूय॑सीः ॥ ८ ॥

इंद्रं ईशानं ओजसा अभि स्तोमाः अनूषत । सहस्रं यस्य रातयः उत वा संति भूयसीः ॥ ८ ॥

आपल्या समर्थ्यानें जगतावर सत्ता चालविणाऱ्या ह्या इंद्राची अनेक स्तुतींच्या योगाने आराधना झाली. इंद्राची उपकारकृत्यें हजारों आहेत, किंबहुना त्यांपेक्षांही त्यांची संख्या अधिक आहे. ॥ ८ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त १२ (अग्नि सूक्त)

ऋषी - मेधातिथि काण्व : देवता - अग्नि : छंद - गायत्री

अ॒ग्निं दू॒तं वृ॑णीमहे॒ होता॑रं वि॒श्ववे॑दसम् । अ॒स्य य॒ज्ञस्य॑ सु॒क्रतु॑म् ॥ १ ॥

अग्निं दूतं वृणीमहे होतारं विश्वऽवेदसं । अस्य यज्ञस्य सुक्रतुम् ॥ १ ॥

अग्नि हा देवांचा दूत आहे. अग्नीच्या हातून सर्व देवतांस त्यांचे हवि पोहोंचतात. अग्नि सर्वज्ञ आहे. अग्नि हेंच आमच्या ह्या यज्ञांतील खरे ज्ञानसामर्थ्य आहे. यास्तव आम्ही त्याच्या आगमनाची इच्छा करतो. ॥ १ ॥

अ॒ग्निम॑ग्निं॒ हवी॑मभिः॒ सदा॑ हवन्त वि॒श्पति॑म् । ह॒व्य॒वाहं॑ पुरुप्रि॒यम् ॥ २ ॥

अग्निंऽअग्निं हवीमऽभिः सदा हवंत विश्पतिं । हव्यऽवाहं पुरुऽप्रियम् ॥ २ ॥

सर्व लोकांत जर कोणा देवतेस पुनः पुनः बोलवणे जरूर वाटत असेल तर तें अग्नीसच होय. करण हा अखिल मानवांचा राजा आहे. हा सर्व देवतांस हवि पोहोंचवितो. हा सर्वांना प्रिय आहे. ॥ २ ॥

अग्ने॑ दे॒वाँ इ॒हा व॑ह जज्ञा॒नो वृ॒क्तब॑र्हिषे । असि॒ होता॑ न॒ ईड्यः॑ ॥ ३ ॥

अग्ने देवान् इह आ वह जज्ञानः वृक्तऽबर्हिषे । असि होता नः ईड्यः ॥ ३ ॥

हे अग्निदेवा, सोमरसांतील दर्भाची अग्रे वगैरे काढून सर्व सिद्धता करून ठेविली आहे हें तुला विदितच आहे. ह्यासाठी सर्व देवांस इकडे घेऊन ये. त्यांस हवि पोहोंचविणारा तूं आम्हांस अत्यंत पूज्य वाटतोस. ॥ ३ ॥

ताँ उ॑श॒तो वि बो॑धय॒ यद॑ग्ने॒ यासि॑ दू॒त्यम् । दे॒वैरा स॑त्सि ब॒र्हिषि॑ ॥ ४ ॥

तान् उशतः वि बोधय यत् अग्ने यासि दूत्यं । देवैः आ सत्सि बर्हिषि ॥ ४ ॥

हे अग्निदेवा, ज्यावेळीं दूत होऊन तूं देवांकडे जाशील त्यावेळी आमच्या हविंविषयी त्यांचे मनांत इच्छा उत्पन्न करून त्यांस जागृत कर. ह्या दर्भासनावर देवांसहवर्तमान तूं विराजमान हो. ॥ ४ ॥

घृताहवन दीदिवः प्रति ष्म रिषतो दह । अग्ने त्वं रक्षस्विनः ॥ ५ ॥

घृतऽआहवन दीदिऽवः प्रति स्म रिषतः दह । अग्ने त्वं रक्षस्विनः ॥ ५ ॥

घृतांच्या हवींनी उज्ज्वलता धारण करणाऱ्या हे अग्निदेवा, आमच्या शत्रूंचा नाश कर. त्यांनीं राक्षसांशी सख्य जोडलें आहे. ॥ ५ ॥

अग्निनाग्निः समिध्यते कविर्गृहपतिर्युवा । हव्यवाड् जुह्वास्यः ॥ ६ ॥

अग्निना अग्निः सं इध्यते कविः गृहऽपतिः युवा । हव्यवाट् जुहुऽआस्यः ॥ ६ ॥

अग्नि एकदा प्रदीप्त झाला कीं तो स्वसामर्थ्यानेंच वृद्धिंगत होत जातो. अग्निदेवाची बुद्धिमत्ता अपूर्व आहे. गृहांचा खरा अधिपति हाच आहे. ह्याचे तारुण्य अबाधित आहे. ह्याच्याच द्वारें सर्व देवतांस हवि पोहोंचतो. याचें मुख ज्वालामय आहे. ॥ ६ ॥

कविमग्निमुप स्तुहि सत्यधर्माणमध्वरे । देवममीवचातनम् ॥ ७ ॥

कविं अग्निं उप स्तुहि सत्यऽधर्माणं अध्वरे । देवं अमीवऽचातनं ॥ ७ ॥

यज्ञामध्यें अग्नीची स्तुति करीत जा. अग्नि हा फार ज्ञाता आहे. सत्य हें त्याचें ब्रीद आहे. सर्व रोगांचे उच्चाटन ह्या अग्निदेवाकडून होते. ॥ ७ ॥

यस्त्वाम॑ग्ने ह॒विष्प॑तिर्दू॒तं दे॑व सप॒र्यति॑ । तस्य॑ स्म प्रावि॒ता भ॑व ॥ ८ ॥

यः त्वां अग्ने हविःऽपतिः दूतं देव सपर्यति । तस्य स्म प्रऽअविता भव ॥ ८ ॥

हे अग्निदेवा, जो यागकर्ता, तूं देवतांचा दूत म्हणून तुझे पूजन करतो, त्याच्या रक्षणाची चिंता वहा. ॥ ८ ॥

यो अ॒ग्निं दे॒ववी॑तये ह॒विष्माँ॑ आ॒विवा॑सति । तस्मै॑ पावक मृळय ॥ ९ ॥

यः अग्निं देवऽवीतये हविष्मान् आऽविवासति । तस्मै पावक मृळय ॥ ९ ॥

हे सर्वांस पावन करणाऱ्या अग्निदेवा, जो यागकर्ता देवांचा संतोष होण्याकरितां म्हणून तुझी सेवा करतो त्यास तूं सुखांत ठेव. ॥ ९ ॥

स नः॑ पावक दीदि॒वोऽ॑ग्ने दे॒वाँ इ॒हा व॑ह । उप॑ य॒ज्ञं ह॒विश्च॑ नः ॥ १० ॥

सः नः पावक दीदिऽवः अग्ने देवान् इह आ वह । उप यज्ञं हविः च नः ॥ १० ॥

हे सर्वांस पावन करणाऱ्या दीप्तिमान अग्निदेवा, आमचा यज्ञ व हवि ह्यांच्या सन्निध देवांस घेऊन ये. ॥१० ॥

स न॒ः स्तवा॑न॒ आ भ॑र गाय॒त्रेण॒ नवी॑यसा । र॒यिं वी॒रव॑ती॒मिष॑म् ॥ ११ ॥

सः न स्तवानः आ भर गायत्रेण नवीयसा । रयिं वीरऽवतीं इषम् ॥ ११ ॥

अग्निदेवा, तूं असा सर्वविख्यात असल्याकारणानें आम्ही नवीन स्तोत्र गाऊन तुझी स्तुति केली आहे. ह्यास्तव आम्हांस संपत्ति दे. तुझ्या प्रसादाने आम्हांस वीर्यशाली संततिही प्राप्त होऊं दे. ॥ ११ ॥

अग्ने॑ शु॒क्रेण॑ शो॒चिषा॒ विश्वा॑भिर्दे॒वहू॑तिभिः । इ॒मं स्तोम॑ं जुषस्व नः ॥ १२ ॥

अग्ने शुक्रेण शोचिषा विश्वाभिः देवहूतिऽभिः । इमं स्तोमं जुषस्व नः ॥ १२ ॥

हे अग्निदेवा, तुझें तेज अत्यंत उज्ज्वल आहे. तूं आमच्या स्तोत्रांचा व जे हवि आम्ही सर्व देवतांस अर्पण करीत आहों त्या हवींचा स्वीकार कर. ॥ १२ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त १३ (आप्री सूक्त)

ऋषी - मेधातिथि काण्व : देवता - आप्री देवतासमूह : छंद - गायत्री

सुसमिद्धो न आ वह देवाँ अग्ने हविष्मते । होतः पावक यक्षि च ॥ १ ॥

सुऽसमिद्धः नः आ वह देवा अग्ने हविष्मते । होतरिति पावक यक्षि च ॥ १ ॥

हे अग्निदेवा, आमच्या यज्ञांत मी हवि सिद्ध करून ठेविला आहे. त्याचा स्वीकार करण्याकरितां तूं प्रदीप्त होऊन सर्व देवांस घेऊन ये. हे पुण्यप्रद देवा, हे हविर्दात्या, आमचा यज्ञ पूर्णतेस ने. ॥ १ ॥

मधुमन्तं तनूनपाद्यज्ञं देवेषु नः कवे । अद्या कृणुहि वीतये ॥ २ ॥

मधुऽमंतं तनूनपात् यज्ञं देवेषु नः कवे । अद्य कृणुहि वीतये ॥ २ ॥

हे प्रज्ञानशील अग्निदेवा, तूं स्वयंजात आहेस. आमचे हवि देवांस प्राप्त व्हावे म्हणून हा यज्ञ आज देवतासमुदायामध्यें नेऊन त्यांस तो अर्पण कर. ह्यांत मधुर सोमरस सिद्ध करून ठेविला आहे. ॥ २ ॥

नरा॒शंस॑मि॒ह प्रि॒यम॒स्मिन्य॒ज्ञ उप॑ ह्वये । मधु॑जिह्वं हवि॒ष्कृत॑म् ॥ ३ ॥

नराशंसं इह प्रियं अस्मिन् यज्ञे उप ह्वये । मधुऽजिह्वं हविःऽकृतम् ॥ ३ ॥

ह्या यज्ञांत आम्ही अग्नीस पाचारण करतो. तो आम्हांस प्रिय आहे. मनुष्यांनी स्तुति करण्यास तो योग्य आहे. त्याच्या जिव्हेंत माधुर्य आहे, व हवींची पूर्णता त्याच्यामुळें होते. ॥ ३ ॥

अग्ने॑ सु॒खत॑मे॒ रथे॑ दे॒वाँ ई॑ळि॒त आ व॑ह । असि॒ होता॒ मनु॑र्हितः ॥ ४ ॥

अग्ने सुखऽतमे रथे देवान् ईळितः आ वह । असि होता मनुःऽहितः ॥ ४ ॥

हे अग्निदेवा, तुझें स्तवन सर्वांनी केलें आहे. तूं हवि पोहोंचविणारा आहेस. तूं सर्व मनुष्य जातींचा हितकर्ता आहेस. अत्यंत सुखदायक अशा रथांत बसवून सर्व देवतांस तूं घेऊन ये. ॥ ४ ॥

स्तृणीत बर्हिरानुषग्घृतपृष्ठं मनीषिणः । यत्रामृतस्य चक्षणम् ॥ ५ ॥

स्तृणीत बर्हिः आनुषक् घृतऽपृष्ठं मनीषिणः । यत्र अमृतस्य चक्षणम् ॥ ५ ॥

हे सुज्ञ ऋत्विज हो, ज्यांच्या पृष्ठभागांवर चकाकी मारीत आहे, अशी दर्भासनें जवळ जवळ मांडा. त्यांवरच आपणांस अविनाशी रूपाचें दर्शन होणार आहे. ॥ ५ ॥

वि श्रयन्तामृतावृधो द्वारो देवीरसश्चतः । अद्या नूनं च यष्टवे ॥ ६ ॥

वि श्रयंतां ऋताऽवृधः द्वारः देवीः असश्चतः । अद्य नूनं च यष्टवे ॥ ६ ॥

यज्ञसिद्ध्यर्थ आज यज्ञमंडपाची पवित्र द्वारें लवकर खुली करा. येथें यागविधींचे उत्तम परिपालन होते, व हीं इतकी विशाल आहेत कीं, आंत प्रवेश करणाऱ्या पुरुषांना यांची मुळीच अडचण होत नाहीं. ॥ ६ ॥

नक्तोषासा सुपेशसास्मिन्यज्ञ उप ह्वये । इदं नो बर्हिरासदे ॥ ७ ॥

नक्तोषासा सुऽपेशसा अस्मिन् यज्ञे उप ह्वये । इदं नः बर्हिः आऽसदे ॥ ७ ॥

नक्त आणि उषस् या दोन सुस्वरूप देवतांस ह्या यज्ञांत मी निमंत्रण करतो. त्यांना बसण्याकरितां हे दर्भ येथे पसरले आहेत. ॥ ७ ॥

ता सुजिह्वा उप ह्वये होतारा दैव्या कवी । यज्ञं नो यक्षतामिमम् ॥ ८ ॥

ता सुऽजिह्वौ उप ह्वये होतारा दैव्या कवी इति । यज्ञं नः यक्षतां इमम् ॥ ८ ॥

त्या दोघां दिव्य, प्रज्ञायुक्त, व मधुरभाषी होत्यांनाही मी बोलावतो. ते आमचा यज्ञ सिद्धीप्रत नेवोत. ॥ ८ ॥

इळा सरस्वती मही तिस्रो देवीर्मयोभुवः । बर्हिः सीदन्त्वस्रिधः ॥ ९ ॥

इळा सरस्वती मही तिस्रः देवीः मयःऽभुवः । बर्हिः सीदंतु अस्रिधः ॥ ९ ॥

इळा, सरस्वती आणि मही अशा तीन सौख्यदायिनी अमर देवता या दर्भावर विराजमान होवोत. ॥ ९ ॥

इह त्वष्टारमग्रियं विश्वरूपमुप ह्वये । अस्माकमस्तु केवलः ॥ १० ॥

इह त्वष्टारं अग्रियं विश्वऽरूपं उप ह्वये । अस्माकं अस्तु केवलः ॥ १० ॥

सर्वदर्शी व सर्वश्रेष्ठ अशा त्वष्ट्रदेवाला आम्हा यज्ञार्थ आमंत्रण करतो. त्याचे केवळ आमच्यावरच प्रेम असो. ॥ १० ॥

अव॑ सृजा वनस्पते॒ देव॑ दे॒वेभ्यो॑ ह॒विः । प्र दा॒तुर॑स्तु॒ चेत॑नम् ॥ ११ ॥

अव सृज वनस्पते देव देवेभ्यः हविः । प्र दातुः अस्तु चेतनम् ॥ ११ ॥

हे वनस्पतिदेवा, देवांस हवींचे दान कर व यज्ञकर्त्यास ज्ञानप्राप्ति होवो. ॥ ११ ॥

स्वाहा॑ य॒ज्ञं कृ॑णोत॒नेन्द्रा॑य॒ यज्व॑नो गृ॒हे । तत्र॑ दे॒वाँ उप॑ ह्वये ॥ १२ ॥

स्वाहा यज्ञं कृणोतन इन्द्राय यज्वनः गृहे । तत्र देवान् उप ह्वये ॥ १२ ॥

यागकर्त्याच्या गृहांत इंद्राला यज्ञ अर्पण करा. सर्व देवांना मी त्या यज्ञांत आमंत्रण करतो. ॥ १२ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त १४ (विश्वेदेव सूक्त)

ऋषी - मेधातिथि काण्व : देवता - विश्वेदेव : छंद - गायत्री

ऐभि॑रग्ने॒ दुवो॒ गिरो॒ विश्वे॑भिः॒ सोम॑पीतये । दे॒वेभि॑र्याहि॒ यक्षि॑ च ॥ १ ॥

आ एभिः अग्ने दुवः गिरः विश्वेभिः सोमऽपीतये । देवेभिः याहि यक्षि च ॥ १ ॥

हे अग्निदेवा, ह्या सर्व देवांसहवर्तमान सोमपानाची इच्छा धरून आमची स्तवनें व आमची उपासना यांचा स्वीकार करण्याकरितां इकडे ये, आणि आमचा याग सफल कर. ॥ १ ॥

आ त्वा॒ कण्वा॑ अहूषत गृ॒णन्ति॑ विप्र ते॒ धियः॑ । दे॒वेभि॑रग्न॒ आ ग॑हि ॥ २ ॥

आ त्वा कण्वाः अहूषत गृणन्ति विप्र ते धियः । देवेभिः अग्ने आ गहि ॥ २ ॥

कण्वांनी तुला आमंत्रण केलें आहे. हे प्रज्ञाशाली अग्ने, ही स्तोत्रेंही तुझी स्तुति गात आहेत. सर्व देवतांना घेऊन तूं ये. ॥ २ ॥

इ॒न्द्र॒वा॒यू बृह॒स्पति॑म् मि॒त्राग्निं पू॒षणं॒ भग॑म् । आ॒दि॒त्यान्मारु॑तं ग॒णम् ॥ ३ ॥

इन्द्रवायू इति बृहस्पतिंम् मित्रा अग्निं पूषणं भगं । आदित्यान् मारुतं गणम् ॥ ३ ॥

इंद्र, वायु, बृहस्पति, मित्र, अग्नि, पूषा, भग, आदित्य आणि मरुद्गण; ॥ ३ ॥

प्र वो॑ भ्रियन्त॒ इन्द॑वो मत्स॒रा मा॑दयि॒ष्णवः॑ । द्र॒प्सा मध्व॑श्चमू॒षदः॑ ॥ ४ ॥

प्र वः भ्रियन्ते इन्दवः मत्सराः मादयिष्णवः । द्रप्साः मध्वः चमूसदः ॥ ४ ॥

अशा तुम्हां सर्व देवतांकरितां हे सोमरस येथें भरून ठेविले आहेत. ह्यांचे प्राशन फार सुखदायक आहे. ह्यांमुळे चित्तास फार उल्हास वाटतो. हे मधुर आहेत आणि पात्रांत हे कांठोकाठ भरून ठेविल्यामुळें बाहेर सांडतील की काय असे वाटत आहे. ॥ ४ ॥

ईळ॑ते॒ त्वाम॑व॒स्यवः॒ कण्वा॑सो वृ॒क्तब॑र्हिषः । ह॒विष्म॑न्तो अर॒ंकृतः॑ ॥ ५ ॥

ईळते त्वां अवस्यवः कण्वासः वृक्तऽबर्हिषः । हविष्मन्तः अरऽंकृतः ॥ ५ ॥

सोमवल्लीचीं मुळें काढून टाकून व सुंदर हवि तयार करून तुझें पूजन करण्यास हे कण्व बसले आहेत. तूं त्यांचे रक्षण करावें अशी त्यांची इच्छा आहे. ॥ ५ ॥

घृ॒तपृ॑ष्ठा मनो॒यु॒जो॒ ये त्वा॒ वह॑न्ति॒ वह्न॑यः । आ दे॒वान्सोम॑पीतये ॥ ६ ॥

घृतऽपृष्ठा मनःऽयुजः ये त्वा वहन्ति वह्नयः । आ देवान् सोमऽपीतये ॥ ६ ॥

जे अश्व तुला आणि सर्व देवांस सोमपानाकरितां घेऊन येतात, ज्यांच्या पाठी तकतकीत दिसत आहेत, व जे स्वप्रेरणेनेंच तुझ्या रथास नियुक्त होतात, ॥ ६ ॥

तान्यज॑त्राँ ऋता॒वृधोऽ॑ग्ने॒ पत्नी॑वतस्कृधि । मध्वः॑ सुजिह्व पायय ॥ ७ ॥

तान् यजत्राँ ऋतऽवृधः ऽग्ने पत्नीऽवतः कृधि । मध्वः सुऽजिह्व पायय ॥ ७ ॥

त्या पुण्यकारक अश्वांस त्यांच्या सहचरींची भेट करीव. ह्या अश्वांच्यामुळें सर्व विधि यथायोग्य चालतात. तर त्यांस हे मधुर भषण करणाऱ्या देवा, मधुर सोमरसांचेंही प्राशन करीव. ॥ ७ ॥

ये यज॑त्रा॒ य ईड्या॒स्ते ते॑ पिबन्तु जि॒ह्वया॑ । मधो॑रग्ने॒ वष॑ट्कृति ॥ ८ ॥

ये यजत्राः ये ईड्याः ते ते पिबन्तु जिह्वया । मधोः अग्ने वषट्ऽकृति ॥ ८ ॥

हे अग्निदेवा, ज्या ज्या देवांस यज्ञ समर्पण करणें योग्य आहे व जे जे देव स्तवनार्ह आहेत त्या सर्वांच्या जिह्वेस या यज्ञांत मधुर सोमरसांचा आस्वाद मिळो. ॥ ८ ॥

आकीं॒ सूर्य॑स्य रोच॒नाद्विश्वा॑न्दे॒वाँ उ॑ष॒र्बुध॑ः । विप्रो॒ होते॒ह व॑क्षति ॥ ९ ॥

आकीं सूर्यस्य रोचनाद् विश्वान् देवाँ उषःऽबुधः । विप्रः होता इव वक्षति ॥ ९ ॥

हा विद्वान् यागकर्ता, उषःकालाबरोबर जागृत झालेल्या देवतांना सुप्रकाशित अशा सूर्यलोकांतून घेऊन येत आहे. ॥ ९ ॥

विश्वेभिः सोम्यं मध्वग्न इन्द्रेण वायुना । पिबा मित्रस्य धामभिः ॥ १० ॥

विश्वेभिः सोम्यं मधु अग्ने इन्द्रेण वायुना । पिब मित्रस्य धामभिः ॥ १० ॥

हे अग्ने मित्राने ह्या भूतलावर आपली सर्व किरणें फेंकल्याबरोबर इंद्र आणि वायु ह्यांसहवर्तमान येऊन ह्या मधुर सोमरसाचें प्राशन कर. ॥ १० ॥

त्वं होता मनुर्हितोऽग्ने यज्ञेषु सीदसि । सेमं नो अध्वरं यज ॥ ११ ॥

त्वं होता मनुःऽहितः अग्ने यज्ञेषु सीदसि । सः इमं नः अध्वरं यज ॥ ११ ॥

अग्ने, तूं हव्यवाहक आहेस, तूं मनुष्यजातीचा हितकर्ता आहेस. प्रत्येक यज्ञांत तूंच विराजमान होतोस. तूं आमचा यज्ञ सांगतेस (पूर्णतेस) ने. ॥ ११ ॥

युक्ष्वा ह्यरुषी रथे हरितो देव रोहितः । ताभिर्देवाँ इहा वह ॥ १२ ॥

युक्ष्व हि अरुषीः रथे हरितः देव रोहितः । ताभिः देवान् इह आ वह ॥ १२ ॥

हे देवा, आपल्या रक्तवर्ण व चपल अशा घोड्यांना रथास जोड, आणि त्यांचेकडून देवांस येथें घेऊन ये. ॥ १२ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त १५ (ऋतु सूक्त)

ऋषी - मेधातिथि काण्व : देवता - १- इंद्र; २- इंद्र; ३- त्वष्ट्ट; ४- अग्नि; ५- इंद्र;

६- मित्रावरुण; ७-१० द्रविणोदस् अग्निः; ११- अश्विनीकुमार; १२- अग्नि; : छंद - गायत्री

इंद्र सोमं पिब ऋतुना त्वा विशन्त्विन्दवः । मत्सरासस्तदोकसः ॥ १ ॥

इंद्र सोमं पिब ऋतुना त्वा विशन्तु इंदवः । मत्सरासः तत्ऽओकसः ॥ १ ॥

हे इंद्रा ऋतूसहवर्तमान सोमपान कर. हे सोमरसाचे बिंदु तुझ्या उदरांत प्रवेश करोत. यांचे प्राशन केलें असतां तुला हर्ष वाटेल. तुझें उदर हेंच स्थान त्यांना योग्य आहे. ॥ १ ॥

मरुतः पिबत ऋतुना पोत्राद्यज्ञं पुनीतन । यूयं हि ष्ठा सुदानवः ॥ २ ॥

मरुतः पिबत ऋतुना पोत्राद् यज्ञं पुनीतन । यूयं हि स्था सुऽदानवः ॥ २ ॥

हे मरुत् हो, ऋतूसहवर्तमान पात्रांतून सोमपन करा. आमच्या यज्ञास तुमचे हातून पवित्रता येवो. दानशूरतेबद्दल तुमचीच फार प्रसिद्धी आहे. ॥ २ ॥

अ॒भि य॒ज्ञं गृ॑णीहि नो॒ ग्नावो॒ नेष्टः॒ पिब॑ ऋ॒तुना॑ । त्वं हि र॑त्न॒धा असि॑ ॥ ३ ॥

अभि यज्ञं गृणीहि नः ग्नावः नेष्टरिति पिब ऋतुना । त्वं हि रत्नऽधाः असि ॥ ३ ॥

हे सपत्नीक नेष्टृदेवा, आमच्या यज्ञाची प्रशंसा कर आणि ऋतूसहवर्तमान सोमपान कर. उत्कृष्ट रत्नांचा निधि तुझेच जवळ आहे. ॥ ३ ॥

अग्ने॑ दे॒वाँ इ॒हा व॑ह सा॒दया॒ योनि॑षु त्रि॒षु । परि॑ भू॒ष पिब॑ ऋ॒तुना॑ ॥ ४ ॥

अग्ने देवान् इह आ वह सादया योनिषु त्रिषु । परि भूष पिब ऋतुना ॥ ४ ॥

हे अग्निदेवा, देवांस इकडे घेऊन ये, आणि तिन्ही ठिकाणच्या आसनांवर ह्यास विराजित कर. ह्यांस विविध अलंकार दे, व ऋतूसहवर्तमान तूं सोमपन कर. ॥ ४ ॥

ब्राह्मणादिंद्र राधसः पिबा सोममृतूँरनु । तवेद्धि सख्यमस्तृतम् ॥ ५ ॥

ब्राह्मणात् इंद्र राधसः पिबा सोमं ऋतून् अनु । तव इत् हि सख्यं अस्तृतम् ॥ ५ ॥

हे इंद्रा, ऋतूंनी सोमपान केल्यानंतर ह्या सुंदर पात्रांतून सोमरसाचें प्राशन कर. तुझेंच सख्य चिरकाल टिकणारे आहे. ॥ ५ ॥

युवं दक्षं धृतव्रत मित्रावरुण दूळभं । ऋतुना यज्ञमाशाथे ॥ ६ ॥

युवं दक्षं धृतऽव्रता मित्रावरुणा दूऽदभं । ऋतुना यज्ञं आशाथे इति ॥ ६ ॥

हे विधिपरिपालक मित्रवरुण हो, तुम्ही दोघे ऋतूसहवर्तमान ह्या यज्ञाचा अंगीकार करीत आहां. येथें सर्वसिद्धता उत्तम करून ठेविली आहे, व ह्यास विघ्न करणास कोणीही समर्थ नाही. ॥ ६ ॥

द्र॒वि॒णो॒दा द्रवि॑णसो॒ ग्राव॑हस्तासो अध्व॒रे । य॒ज्ञेषु॑ दे॒वमी॑ळते ॥ ७ ॥

द्रविणःऽदाः द्रविणसः ग्रावऽहस्तासः अध्वरे । यज्ञेषु देवं ईळते ॥ ७ ॥

हा पहा द्रविणोदा. ह्याचेसाठी ह्या यज्ञांत सोमरस काढण्याकरितां, वैभवांची इच्छा बाळगणारे हे ऋत्विज, हातांत ग्रावा घेऊन बसले आहेत. ह्या देवाचें पूजन प्रत्येक यज्ञांत करीत असतात. ॥ ७ ॥

द्र॒वि॒णो॒दा द॑दातु नो॒ वसू॑नि॒ यानि॑ शृण्वि॒रे । दे॒वेषु॒ ता व॑नामहे ॥ ८ ॥

द्रविणःऽदाः ददातु नः वसूनि यानि शृण्विरे । देवेषु ता वनामहे ॥ ८ ॥

ज्या वैभवांची महती फार दूरवर ऐकूं येते ती हा द्रविणोदा आम्हांस देवो. सर्व देव समुदायांजवळ आम्ही त्यांच्या प्राप्तीबद्दल प्रार्थना करीत असतो. ॥ ८ ॥

द्र॒वि॒णो॒दाः पि॑पीषति जु॒होत॒ प्र च॑ तिष्ठत । ने॒ष्ट्राद्दृ॒तुभि॑रिष्यत ॥ ९ ॥

द्रविणःऽदाः पिपीषति जुहोत प्र च तिष्ठत । नेष्ट्रात् ऋतुऽभिः इष्यत ॥ ९ ॥

नेष्टा व ऋतु ह्यांच्यापासून पुढें चला, उठा, सोमरसाचा आणखी एक हवी तयार करा. कारण द्रविणोदाला सोमरसाची इच्छा (ददिः) झाली आहे. ॥ ९ ॥

यत्त्वा तुरीयमृतुभिर्द्रविणोदो यजामहे । अध स्मा नः ददिर्भव ॥ १० ॥

यत् त्वा तुरीयं ऋतुऽभिः द्रविणःऽदः यजामहे । अध स्मा नः ददिः भव ॥ १० ॥

हे द्रविणोदा, तूं अनुक्रमाने चौथा देव आहेस, आणि आम्ही ऋतूंसहवर्तमान तुला हवि अर्पण करीत आहों. तेव्हां आम्हांवर मनःपूर्वक प्रसाद कर. ॥ १० ॥

अश्विना पिबतं मधु दीद्यग्नी शुचिव्रता । ऋतुना यज्ञवाहसा ॥ ११ ॥

अश्विना पिबतं मधु दीद्यग्नी दीदिऽअग्नी शुचिव्रता । ऋतुना यज्ञऽवाहसा ॥ ११ ॥

हे देदीप्यमान व पुण्यव्रत अश्विन हो, यज्ञ सिद्धि नेणाऱ्या हा ऋतुसहवर्तमान तुम्ही मधुर सोमरसाचें सेवन करा. ॥ ११ ॥

गार्ह॑पत्येन सन्त्य ऋ॒तुना॑ यज्ञ॒नीर॑सि । दे॒वान्दे॑वय॒ते य॑ज ॥ १२ ॥

गार्हऽपत्येन संत्य ऋतुना यज्ञऽनीः असि । देवान् देवऽयते यज ॥ १२ ॥

हे उदार देवा, खरा गृहस्वामी तूंच असल्याकारणाने ऋतूप्रमाणे तुझ्याकडेही यज्ञाचे अध्वर्युत्व आलेले आहे. माझ्या विनंतीस मान देऊन हा यज्ञ सर्व देवांना पोहोंचीव. ॥ १२ ॥

मण्डल १ - सूक्त १६ (इंद्रसूक्त)

ऋषी - मेधातिथि काण्व : देवता - इंद्र : छंद - गायत्री

आ त्वा॑ वहन्तु॒ हर॑यो॒ वृष॑णं॒ सोम॑पीतये । इंद्र॑ त्वा॒ सूर॑चक्षसः ॥ १ ॥

आ त्वा वहन्तु हरयः वृषणं सोमऽपीतये । इंद्र त्वा सूरऽचक्षसः ॥ १ ॥

हे इंद्रदेवा, तूं वृष्टि करणारा आहेस व तुझेकरितां सोमरस करून ठेवला आहे. ह्यासाठी तुझे हरिद्वर्ण अश्व सूर्याचे दर्शन करीत करीत तुला घेऊन येवोत. ॥ १ ॥

इ॒मा धा॒ना घृ॑त॒स्नुवो॒ हरी॑ इ॒होप॑ वक्षतः । इंद्रं॑ सु॒खत॑मे॒ रथे॑ ॥ २ ॥

इमाः धानाः घृतऽस्नुवः हरी इति इह उप वक्षतः । इंद्रं सुखऽतमे रथे ॥ २ ॥

ह्या लाह्यांत इतके तूप घातलें आहे कीं, त्या जशा कांही निथळत आहेत. त्यांचे सेवन करण्याकरितां सर्व सुखसामग्रींनी सज्ज अशा रथांतून इंद्राचे हरिद्वर्ण अश्व त्यास घेऊन येत आहेत. ॥ २ ॥

इंद्रं॑ प्रा॒तर्ह॑वामह॒ इंद्रं॑ प्र॒य॒त्य॑ध्व॒रे । इंद्रं॒ सोम॑स्य पी॒तये॑ ॥ ३ ॥

इंद्रं प्रातः हवामह इंद्रं प्रऽयति अध्वरे । इंद्रं सोमस्य पीतये ॥ ३ ॥

ह्या प्रातःकालाचे समयीं आम्ही इंद्रास बोलावतो. यज्ञास आरंभ झाला आहे म्हणून आम्ही इंद्रास पाचारण करतो. सोमरसाचे सेवन करण्याकरितां आम्ही इंद्रास हांक मारतो. ॥ ३ ॥

उप॑ नः सु॒तमा ग॑हि॒ हरि॑भिरिंद्र के॒शिभिः॑ । सु॒ते हि त्वा॒ हवा॑महे ॥ ४ ॥

उप नः सुतं आ गहि हरिऽभिः इंद्र केशिऽभिः । सुते हि त्वा हवामहे ॥ ४ ॥

इंद्रा, हे अश्व जोडून तूं आमच्या सोमरसाचा स्वीकार करण्याकरितां इकडे ये. सोमरस पिळून ठेवूनच आम्ही तुला बोलावीत आहोत. ॥ ४ ॥

सेमं न स्तोममा गह्युपेदं सवनं सुतम् । गौरो न तृषितः पिब ॥ ५ ॥

सः इमं नः स्तोमं आ गहि उप इदं सवनं सुतं । गौरः न तृषितः पिब ॥ ५ ॥

आमची प्रार्थना श्रवण करण्याकरितां इकडे आगमन कर. आम्ही काढलेल्या सोमरसाचा स्वीकार करण्याकरितां इकडे ये. एखाद्या तृषाक्रांत हरणाप्रमाणें उत्सुकतेने हा सोमरस पी. ॥ ५ ॥

इमे सोमास इन्दवः सुतासः अधि बर्हिषि । ताँ इन्द्र सहसे पिब ॥ ६ ॥

इमे सोमासः इंदवः सुतासः अधि बर्हिषि । ता इन्द्र सहसे पिब ॥ ६ ॥

हे सोमरसाचे बिंदु दर्भावर पात्रें ठेऊन त्यांत ठेवले आहेत. हे इंद्रा, श्रमपरिहारार्थ ह्यांचे प्राशन कर. ॥ ६ ॥

अयं ते स्तोमो अग्रियो हृदिस्पृगस्तु शंतमः । अथा सोमं सुतं पिब ॥ ७ ॥

अयं ते स्तोमः अग्रियः हृदिऽस्पृक् अस्तु शंऽतमः । अथा सोमं सुतं पिब ॥ ७ ॥

ह्या आमच्या स्तुतिनें तुला समधान वाटो. ही फार सुंदर आहे. ही तुझ्या अंतःकरणांत जाऊन भिडो. आम्ही तयार करून टेविलेला सोमरसही तूं पी. ॥ ७ ॥

विश्वमित्सवनं सुतमिंद्रो मदाय गच्छति । वृत्रहा सोमपीतये ॥ ८ ॥

विश्वं इत् सवनं सुतं इंद्रः मदाय गच्छति । वृत्रऽहा सोमऽपीतये ॥ ८ ॥

हा शत्रूंचा संहार करणारा इंद्र ज्या ज्या यज्ञांत म्हणून सोमरस काढला असेल त्या त्या सर्व ठिकाणीं त्याचें प्राशन करण्याकरितां जातो. ह्यांत त्यास फार आनंद वाटतो. ॥ ८ ॥

सेमं नः काममा पृण गोभिरश्वैः शतक्रतो । स्तवाम त्वा स्वाध्यः ॥ ९ ॥

सः इमं नः कामं आ पृण गोभिः अश्वैः शतक्रतो इति शतऽक्रतो । स्तवाम त्वा सुऽआध्यः ॥ ९ ॥

हे सामर्थवान् इंद्रा, आम्हांस धेनु, अश्व इत्यादि वैभव प्राप्त व्हावें हीच आमची इच्छा आहे. तेवढी तूं परिपूर्ण कर. आम्हांला एकाग्रबुद्धीनें तुझें स्तवन करतां येवो. ॥ ९ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त १७ (इंद्र वरुण सूक्त)

ऋषी - मेधातिथि काण्व : देवता - इंद्रवरुण : छंद - गायत्री; पादनिवृत्

इंद्रा॒वरु॑णयोर॒हं स॒म्राजो॒रव॒ आ वृ॑णे । ता नः॑ मृळात ई॒दृशे॑ ॥ १ ॥

इंद्रावरुणयोः अहं संऽराजोः अवः आ वृणे । ता नः मृळातः ईदृशे ॥ १ ॥

जगतांवर साम्राज्य चालविणाऱ्या इंद्रवरुणांची मी करुणा भाकतो. त्यांस असे शरण गेलें म्हणजे ते आपणांस सुख प्राप्त करून देतात. ॥ १ ॥

गन्ता॑रा॒ हि स्थोऽ॑वसे॒ हवं॒ विप्र॑स्य॒ माव॑तः । ध॒र्तारा॑ चर्षणी॒नाम् ॥ २ ॥

गंतारा हि स्थः अवसे हवं विप्रस्य माऽवतः । धर्तारा चर्षणीनाम् ॥ २ ॥

इंद्र-वरुण हो, माझ्यासारख्या भाविकांनी हांक मारली म्हणजे त्यांचे रक्षण करण्याकरितां तुम्ही नेहमीच उडी घेतां. अखिल प्राणिमात्रांचे पोषणकर्ते तुम्हीच आहां. ॥ २ ॥

अ॒नु॒का॒मं त॑र्पयेथा॒मिंद्रा॑वरुण रा॒य आ । ता वा॒ं नेदि॑ष्ठमीमहे ॥ ३ ॥

अऽनुकामं तर्पयेथां इंद्रावरुणा रायः आ । ता वां नेदिष्ठं ईमहे ॥ ३ ॥

इंद्र-वरुण हो, आमची तृप्ति होईपर्यंत आम्हांस संपत्ति द्या. तुम्ही दोघांही उदार देवांनी आमच्या अगदी सन्निध असावें अशी आमची इच्छा आहे. ॥ ३ ॥

यु॒वाकु॒ हि शची॑नां यु॒वाकु॑ सुमती॒नां । भू॒याम॑ वाज॒दाव्ना॑म् ॥ ४ ॥

युवाकु हि शचीनां युवाकु सुऽमतीनां । भूयाम वाजऽदाव्नाम् ॥ ४ ॥

सामर्थ्याचा लाभ करविणाऱ्या आपल्या कृपेचे आम्ही खरोखर विभागी होणार आणि उत्कृष्ट कार्यक्षमतेसही आम्ही पात्र होणार. ॥ ४ ॥

इंद्र॑ः सहस्र॒दाव्ना॒ं वरु॑ण॒ः शंस्या॑नां । क्रतु॑र्भवत्यु॒क्थ्यः ॥ ५ ॥

इंद्रः सहस्रऽदाव्नां वरुणः शंस्यानां । क्रतुः भवति उक्थ्यः ॥ ५ ॥

सहस्रावधि दानकर्मे करणाऱ्यांत इंद्रच श्रेष्ठ आहे, व जे अत्यंत स्तुत्य आहेत त्यांत वरुणाचाच मान पहिला आहे. ह्या दोघांचेही सामर्थ्य प्रशंसनीय आहे. ॥ ५ ॥

तयो॒रिदव॑सा व॒यं स॒नेम॒ नि च॑ धीमहि । स्यादु॒त प्र॒रेच॑नम् ॥ ६ ॥

तयोः इत् अवसा वयं सनेम नि च धीमहि । स्यात् उत प्रऽरेचनम् ॥ ६ ॥

आम्ही त्याच्या कृपेमुळे संपत्ति प्राप्त करून घेऊं, आणि ती मनमुराद संग्रहासही टाकूं, तथापि त्याचे जवळील संपत्ति पुनः जशीची तशी भरपूरच रहाणार. ॥ ६ ॥

इंद्रा॑वरुण वाम॒हं हु॒वे चि॒त्राय॒ राध॑से । अ॒स्मान्त्सु जि॒ग्युष॑स्कृतम् ॥ ७ ॥

इंद्रावरुणा वां अहं हुवे चित्राय राधसे । अस्मान् सु जिग्युषः कृतम् ॥ ७ ॥

इंद्र-वरुण हो, अपूर्व सौख्यासाठी आणि अनेकविध संपत्तिच्या प्राप्तिसाठी आम्ही तुमचा धांवा करतो. आम्हांस सर्वत्र विजयशाली करा. ॥ ७ ॥

इंद्रा॑वरुण॒ नू नु वां॒ सिषा॑सन्तीषु धी॒ष्वा । अ॒स्मभ्य॒ं शर्म॑ यच्छतम् ॥ ८ ॥

इंद्रावरुणा नू नु वां सिषासंतीषु धीषु आ । अस्मभ्यं शर्म यच्छतम् ॥ ८ ॥

हे इंद्र-वरुण हो, आमचे मन आतुरतेने सर्वस्वी तुमचे चिंतन करीत असल्यामुळे आम्हांस कल्याणाची जोड करून द्या. ॥ ८ ॥

प्र वा॑मश्नोतु सुष्टु॒तिरिंद्रा॑वरुण॒ यां हु॒वे । यामृ॒धाथे॑ स॒धस्तु॑तिम् ॥ ९ ॥

प्र वां अश्नोतु सुऽस्तुतिः इंद्रावरुणा यां हुवे । यां ऋधाथे इति सधऽस्तुतिम् ॥ ९ ॥

हे इंद्र-वरुण हो, तुम्हां दोघांस मिळून मी ही एकच सुंदर स्तुति अर्पण करीत आहे. तुम्हीही तिला उत्तेजन देत आहां, तेव्हां ती तुम्हास सर्वथैव मान्य होवो. ॥ ९ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त १८ (ब्रह्मणस्पति सूक्त)

ऋषी - मेधातिथि काण्व : देवता - १-३ ब्रह्मणस्पति; ४ - ब्रह्मणस्पति, इंद्र व सोम;

५- ब्रह्मणस्पति व दक्षिणा; ६ - ८ सदसस्पति : छंद - गायत्री

सो॒मानं॒ स्व॑रणं कृणु॒हि ब्र॑ह्मणस्पते । क॒क्षीव॑न्तं॒ य औ॑शि॒जः ॥ १ ॥

सोमानं स्वरणं कृणुहि ब्रह्मणऽ पते । कक्षीवंतं यः औशिजः ॥ १ ॥

हे ब्रह्मणस्पते, उशिजाचा पुत्र कुक्षीवान् ह्याने तुला सोम अर्पण केला आहे. तुझ्या भक्तांना त्याच्याप्रमाणे तेजस्विता अर्पण कर. ॥ १ ॥

यो रे॒वान्यो अ॑मीव॒हा व॑सु॒वित्पु॑ष्टि॒वर्ध॑नः । सः नः॑ सिषक्तु॒ यस्तु॒रः ॥ २ ॥

यः रेवान् यः अमीवऽहा वसुऽवित् पुष्टिऽवर्धनः । सः नः सिसक्तु यः तुरः ॥ २ ॥

जो वैभवशाली आहे, जो व्याधीचे हरण करतो, ज्याचे जवळ द्रव्यकोश भरले आहेत, जगताचे पालनपोषण ज्याचेकडून होते, व जो भक्तांकरितां त्वरेने येतो, असा ब्रह्मणस्पति आमचेवर अनुग्रह करो. ॥ २ ॥

मा नः शंसो अररुषो धूर्तिः प्रणङ् मर्त्यस्य । रक्षा णो ब्रह्मणस्पते ॥ ३ ॥

मा नः शंसः अररुषः धूर्तिः प्रणक् मर्त्यस्य । रक्ष नः ब्रह्मणः पते ॥ ३ ॥

हे ब्रह्मणस्पते, आमचा द्वेष करणाऱ्या माणसांची कटु भाषणे वा दुष्कृत्ये आम्हास बाधक होणार नाहीत असे तू कर. तू आमचे सर्वथैव संरक्षण कर. ॥ ३ ॥

स घा वीरो न रिष्यति यमिंद्रो ब्रह्मणस्पतिः । सोमो हिनोति मर्त्यम् ॥ ४ ॥

सः घ वीरः न रिष्यति यं इंद्रः ब्रह्मणः पतिः । सोमः हिनोति मर्त्यम् ॥ ४ ॥

ब्रह्मणस्पति, इंद्र व सोम यांची ज्याच्यावर कृपा झालेली आहे, असा मनुष्य कधीही नाश पावत नाही. ॥ ४ ॥

त्वं तं ब्रह्मणस्पते सोम इंद्रश्च मर्त्यम् । दक्षिणा पात्वंहसः ॥ ५ ॥

त्वं तं ब्रह्मणः पते सोमः इंद्रः च मर्त्यं । दक्षिणा पातु अंहसः ॥ ५ ॥

हे ब्रह्मणस्पते, तूं सोम, इंद्र आणि दक्षिणा यांच्या समवेत सर्व मनुष्यमात्रांचे पातकांपासून रक्षण कर. ॥ ५ ॥

सदसस्पतिमद्भुतं प्रियमिंद्रस्य काम्यम् । सनिं मेधामयासिषम् ॥ ६ ॥

सदसः पतिं अद्भुतं प्रियं इंद्रस्य काम्यं । सनिं मेधां अयासिषम् ॥ ६ ॥

अद्भुत पराक्रम करणाऱ्या प्रज्ञारूप सदसस्पतीजवळ मी गेलो आहे. हा उदार असून भक्ति करण्यास योग्य आहे, व इंद्राशी ह्याचें फारच मित्रत्व आहे. ॥ ६ ॥

यस्मादृते न सिध्यति यज्ञो विपश्चितश्चन । स धीनां योगमिन्वति ॥ ७ ॥

यस्मात् ऋते न सिध्यति यज्ञः विपःऽचितः चन । सः धीनां योगं इन्वति ॥ ७ ॥

ज्याच्या सहाय्यावांचून ज्ञानी मनुष्याचाही यज्ञ सिद्धीस जाणें अशक्य आहे, तो आम्हांस बुद्धिमत्तेची प्राप्ति करून देतो. ॥ ७ ॥

आदृध्नोति हविष्कृतिं प्राञ्चं कृणोत्यध्वरम् । होत्रा देवेषु गच्छति ॥ ८ ॥

आत् ऋध्नोति हविःऽकृतिं प्राञ्चं कृणोति अध्वरं । होत्रा देवेषु गच्छति ॥ ८ ॥

हवींच्या अर्पण कर्मास तो सफलता आणतो, आणि यज्ञांत जर कांही न्यून राहिलें असेल तर तो सांभळून घेतो, व म्हणूनच आमचा हविर्भाग देवांस जाऊन पोहोंचतो. ॥ ८ ॥

नराशंसं सुधृष्टममपश्यं सप्रथस्तमम् । दिवो न सद्ममखसम् ॥ ९ ॥

नराशंसं सुऽधृष्टमं अपश्यं सप्रथःऽतमं । दिवः न सद्मऽमखसम् ॥ ९ ॥

नराशंसाचे आज मला दर्शन घडले. हा फार पराक्रमी आहे, व त्याची कीर्ति अत्यंत विशाल आहे. त्याची कांति तर प्रत्यक्ष द्युलोकाप्रमाणें तळपत आहे. ॥ ९ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त १९ (अग्निमरुत् सूक्त)

ऋषी - मेधातिथि काण्व : देवता - अग्नि, मरुत् : छंद - गायत्री

प्रति॒ त्यं चारु॑मध्व॒रं गो॑पी॒थाय॒ प्र हू॑यसे । म॒रुद्भि॑रग्न॒ आ ग॑हि ॥ १ ॥

प्रति त्यं चारुं अध्वरं गोऽपीथाय प्र हूयसे । मरुत्ऽभिः अग्ने आ गहि ॥ १ ॥

हे अग्निदेवा, ह्या मनोहर यज्ञांत तुला सोमपानार्थ निमंत्रण आहे, ह्याकरितां मरुद्गणांसहित येथें ये. ॥ १ ॥

न॒हि दे॒वो न मर्त्यो॑ म॒हस्तव॒ क्रतुं॑ प॒रः । म॒रुद्भि॑रग्न॒ आ ग॑हि ॥ २ ॥

नहि देवः न मर्त्यः महः तव क्रतुं परः । मरुत्ऽभिः अग्ने आ गहि ॥ २ ॥

तूं इतका पराक्रमी आहेस कीं, देव आणि मनुष्य ह्यांपैकी कोणाचीच गति तुझ्या बरोबरीची नाही. हे अग्ने, मरुतांसह तूं इकडे ये. ॥ २ ॥

ये म॒हो रज॑सो वि॒दुर्विश्वे॑ दे॒वासो॑ अ॒द्रुहः॑ । म॒रुद्भि॑रग्न॒ आ ग॑हि ॥ ३ ॥

ये महः रजसः विदुः विश्वे देवासः अद्रुहः । मरुत्ऽभिः अग्ने आ गहि ॥ ३ ॥

जे द्वेषविकारांपासून मुक्त आहेत व ज्यांस अगाध अशा रजोलोकाचें ज्ञान आहे अशा त्या मरुद्देवांसह, हे अग्निदेवा, तूं इकडे ये. ॥ ३ ॥

य उ॒ग्रा अ॒र्कमा॑नृ॒चुरना॑धृष्टास॒ ओज॑सा । म॒रुद्भि॑रग्न॒ आ ग॑हि ॥ ४ ॥

ये उग्रा अर्कं आनृचुः अनाधृष्टासः ओजसा । मरुत्ऽभिः अग्ने आ गहि ॥ ४ ॥

जे उग्रकृति मरुत् आपल्या तेजाने कोणाच्याही पराक्रमास न जुमानणारे असून अर्काची अर्चना करतात, त्यांसह हे अग्ने, येथें ये. ॥ ४ ॥

ये शुभ्रा घोरवर्पसः सुक्षत्रासो रिशादसः । मरुद्भिरग्न आ गहि ॥ ५ ॥

ये शुभ्राः घोरऽवर्पसः सुऽक्षत्रासः रिशादसः । मरुत्ऽभिः अग्ने आ गहि ॥ ५ ॥

जे अत्यंत शुभ्रवर्ण आहेत, ज्यांची शरीरें फार धिप्पाड आहेत, जे महापराक्रमी म्हणून गाजले आहेत, व जे दुष्टांचे उच्चाटन करण्यांत कुशल आहेत, त्या मरुतांसह हे अग्ने, इकडे ये. ॥ ५ ॥

ये नाकस्याधि रोचने दिवि देवास आसते । मरुद्भिरग्न आ गहि ॥ ६ ॥

ये नाकस्य अधि रोचने दिवि देवासः आसते । मरुत्ऽभिः अग्ने आ गहि ॥ ६ ॥

जे मरुद्देव स्वर्गाचे वसतिस्थान द्युलोकांत वास करतात त्यांसह हे अग्ने, इकडे ये. ॥ ६ ॥

य ईङ्खयन्ति पर्वतान् तिरः समुद्रमर्णवम् । मरुद्भिरग्न आ गहि ॥ ७ ॥

ये ईङ्खयंति पर्वतान् तिरः समुद्रं अर्णवम् । मरुत्ऽभिः अग्ने आ गहि ॥ ७ ॥

ओतप्रोत उचंबळत असलेल्या मेघरूपी पर्वतांसही स्वपराक्रमाने समुद्रापार फेंकून टाकतात, हे अग्ने त्या मरुतांसह तू इकडे ये. ॥ ७ ॥

आ ये त॒न्वन्ति॑ र॒श्मिभि॑स्ति॒रः स॑मु॒द्रमोज॑सा । म॒रुद्‌भि॑रग्न॒ आ ग॑हि ॥ ८ ॥

आ ये तन्वंति रश्मिऽभिः तिरः समुद्रं ओजसा । मरुत्ऽभिः अग्ने आ गहि ॥ ८ ॥

जे आपल्या सामर्थ्याने आपल्या किरणांनी सर्व समुद्र आक्रमून टाकतात, त्या मरुतांसह हे अग्ने, इकडे ये. ॥ ८ ॥

अ॒भि त्वा॑ पू॒र्वपी॑तये सृ॒जामि॑ सो॒म्यं मधु॑ । म॒रुद्‌भि॑रग्न॒ आ ग॑हि ॥ ९ ॥

अभि त्वा पूर्वऽपीतये सृजामि सोम्यं मधु । मरुत्ऽभिः अग्ने आ गहि ॥ ९ ॥

हा मधुर सोमरस सर्वप्रथम तू प्राशन करावा अशी माझी इच्छा आहे. हे अग्ने, तू मरुतांसह इकडे ये. ॥ ९ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त २० (ऋभु सूक्त)

ऋषी - मेधातिथि काण्व : देवता - ऋभु : छंद - गायत्री

अ॒यं दे॒वाय॒ जन्म॑ने॒ स्तोमो॑ विप्रे॑भिरा॒सया । अका॑रि रत्न॒धात॑मः ॥ १ ॥

अयं देवाय जन्मने स्तोमः विप्रेभिः आसया । अकारि रत्नऽधातमः ॥ १ ॥

जन्मास येण्याच्या यातायातीतून ज्या देवांची सुटका झाली नाही त्यांचे प्रित्यर्थ विद्वान उपासकांनी ही स्तुति स्वमुखाने गाइली होती. हया स्तुतीच्या योगाने उत्कृष्ट वैभवांची प्राप्ति होण्याजोगी आहे. ॥ १ ॥

य इंद्रा॑य वचो॒युजा॑ ततक्षु॒र्मन॑सा॒ हरी॑ । शमी॑भिर्य॒ज्ञमा॑शत ॥ २ ॥

ये इंद्राय वचःऽयुजा ततक्षुः मनसा हरी इति । शमीभिः यज्ञं आशत ॥ २ ॥

ह्या देवांनी स्वतःच्या कल्पनेने इंद्रासाठी, हुकुम केल्याबरोरबर आपण होऊन नियुक्त होणारे, असे दोन अश्व निर्माण केले. ह्यांनी आपल्या अद्भुत् कृत्यांनी यज्ञांतील सन्मानास स्वतःस पात्र करून घेतले. ॥ २ ॥

तक्षन्नास॑त्याभ्यां॒ परि॑ज्मानं सु॒खं रथं॑ । तक्ष॑न्धे॒नुं स॑ब॒र्दुघा॑म् ॥ ३ ॥

तक्षन् नासत्याभ्यां परिऽज्मानं सुखं रथं । तक्षन् धेनुं सबःऽदुघाम् ॥ ३ ॥

आणि ह्यांनी अश्वीदेवांकरितां सर्वत्र संचार करणारा असा सुखकारक रथ तयार केला व दुग्ध देणारी धेनूही उत्पन्न केली. ॥ ३ ॥

युवा॑ना पि॒तरा॒ पुनः॑ स॒त्यमं॑न्त्रा ऋजू॒यवः॑ । ऋ॒भवौ॑ वि॒ष्ट्यक्रत ॥ ४ ॥

युवाना पितरा पुनरिति सत्यऽमंत्राः ऋजुऽयवः । ऋभवः विष्टि अक्रत ॥ ४ ॥

ऋभु हे असे आहेत की ज्यांस उद्देशून केलेल्या प्रार्थना निःसंशय सफल होतात. ह्यांची वृत्ति अगदीं सरल आहे. ह्यांनी आपल्या सामर्थ्याने मातापितरांस पुन्हां तरुण केले. ॥ ४ ॥

सं वो॒ मदा॑सो अग्म॒तेन्द्रे॑ण च म॒रुत्व॑ता । आ॒दि॒त्येभि॑श्च॒ राज॑भिः ॥ ५ ॥

सं वः मदासः अग्मत इंद्रेण च मरुत्वता । आदित्येभिः च राजऽभिः ॥ ५ ॥

मरुद्‌गणांसहवर्तमान इंद्र, आणि वैभवश्रीनें मंडित असे आदित्य, ह्यांच्या समुदायाकडे येण्यासाठीं, हे ऋभु जाऊन पोंचले आहेत. हे मूर्तिमान् आनंदच आहेत. ॥ ५ ॥

उ॒त त्यं च॑म॒सं नव॒ं त्वष्टु॑र्दे॒वस्य॒ निष्कृ॑तम् । अक॑र्त च॒तुरः॒ पुनः॑ ॥ ६ ॥

उत त्यं चमसं नवं त्वष्टुः देवस्य निःऽकृतं । अकर्त चतुरः पुनरिति ॥ ६ ॥

शिवाय त्वष्टादेवानें तयार केलेल्या त्या प्रसिद्ध चमसाचे ह्यांनींच पुन्हां चार चमस केले. ॥ ६ ॥

ते नो॒ रत्ना॑नि धत्तन॒ त्रिरा साप्ता॑नि सुन्व॒ते । एक॑मेकं सुश॒स्तिभिः॑ ॥ ७ ॥

ते नः रत्नानि धत्तन त्रिः आ साप्तानि सुन्वते । एकंऽएकं सुशस्तिऽभिः ॥ ७ ॥

तुम्ही असे पराक्रमी असल्यामुळें आपले उत्तम आशीर्वाद, व एकवीस प्रकारची रत्नें, एकेका भक्तास एक एक अशा रीतीनें, आम्हांस द्या. ॥ ७ ॥

अधा॑रयन्त॒ वह्न॒योऽ॑भजन्त सु॒कृ॒त्यया॑ । भा॒गं दे॒वेषु॑ य॒ज्ञिय॑म् ॥ ८ ॥

अधारयंत वह्नयः अभजन्त सुऽकृत्यया । भागं देवेषु यज्ञियम् ॥ ८ ॥

इतर देवांस जसा यज्ञाचा भाग मिळतो तसा भाग ह्यांनीही आपणांस प्राप्त करून घेतला. हे श्रेष्ठ आहेत. यज्ञ हविंचा ह्यांनी स्वीकार केला. ॥ ८ ॥

ऋषी - मेधातिथि काण्व : देवता - इंद्र, अग्नि : छंद - गायत्री

इ॒हेन्द्रा॒ग्नी उप॑ ह्वये॒ तयो॒रित्स्तोम॑मुश्मसि । ता सोम॑ सोम॒पात॑मा ॥ १ ॥

इह इन्द्राग्नी इति उप ह्वये तयोः इत् स्तोमं उश्मसि । ता सोमं सोमऽपातमा ॥ १ ॥

इंद्र आणि अग्नि ह्या दोघांस मी येथे बोलावितो. त्यांच्याच स्तवनाची आम्हास इच्छा आहे. ते सोमप्राशन करोत. त्यांस सोमरस आवडतो. ॥ १ ॥

ता यज्ञेषु प्र शंसतेन्द्राग्नी शुम्भता नरः । ता गायत्रेषु गायत ॥ २ ॥

ता यज्ञेषु प्र शंसत इन्द्राग्नी इति शुम्भत नरः । ता गायत्रेषु गायत ॥ २ ॥

मानवहो, इंद्र व अग्नि ह्यांचे यज्ञांत स्तवन करा, त्यांस स्तुतींनी अलंकृत करा आणि त्यांचे गायन करा. ॥ २ ॥

ता मित्रस्य प्रशंस्तय इंद्राग्नी ता हवामहे । सोमपा सोमपीतये ॥ ३ ॥

ता मित्रस्य प्रऽशस्तये इंद्राग्नी इति ता हवामहे । सोमऽपा सोमऽपीतये ॥ ३ ॥

मित्राच्या गौरवार्थ त्यांस - त्या सोमप्रिय इंद्राग्नींस - मी सोमपानार्थ पाचारण करतो. ॥ ३ ॥

उग्रा सन्ता हवामह उपेदं सवनं सुतम् । इन्द्राग्नी एह गच्छताम् ॥ ४ ॥

उग्रा संता हवामहे उप इदं सवनं सुतं । इन्द्राग्नी इति आ इह गच्छताम् ॥ ४ ॥

त्या उग्र पण उदार देवांस, तयार करून ठेविलेल्या हविचें संनिध आम्ही बोलवतो. हे इंद्राग्नि इकडे येवोत. ॥ ४ ॥

ता म॒हान्ता॒ सद॒स्पती॒ इंद्रा॑ग्नी॒ रक्ष॑ उब्जतम् । अप्र॑जाः सन्त्व॒त्रिणः॑ ॥ ५ ॥

ता महांता सदस्पती इंद्राग्नी इति रक्षः उब्जतं । अप्रजाः सन्तु अत्रिणः ॥ ५ ॥

सर्व लोकसमुदायाचें रक्षण करणारे असे सर्वश्रेष्ठ इंद्राग्निदेवहो, राक्षसांस शासन करा. दुष्ट लोकांचे निसंतान होवो. ॥ ५ ॥

तेन॑ स॒त्येन॑ जागृ॒तमधि॑ प्रचे॒तुने॑ प॒दे । इंद्रा॑ग्नी॒ शर्म॑ यच्छतम् ॥ ६ ॥

तेन सत्येन जागृतं अधि प्रऽचेतुने पदे । इंद्राग्नी इति शर्म यच्छतम् ॥ ६ ॥

हे इंद्राग्निदेवांनो, चैतन्यतेजाने अतिशय उज्ज्वल झालेल्या अशा स्थानावर विराजमान होऊन तुम्ही त्या तुमच्या सर्व प्रसिद्ध सत्यत्वास जागृत रहा, व आम्हांस सौख्य अर्पण करा. ॥ ६ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त २२ (अनेक देवता सूक्त)

ऋषी - मेधातिथि काण्व : देवता - १ ते ४ अश्विनीकुमार; ५ ते ८ सवितृ;

९ ते १० अग्नि; ११ - देवी; १२ - इंद्राणी; १३, १४ द्यावापृथिवी;

१६ ते २१ विष्णु; : छंद - गायत्री

प्रा॒त॒र्युजा॒ वि बो॑धया॒श्विना॒वेह ग॑च्छताम् । अ॒स्य सोम॑स्य पी॒तये॑ ॥ १ ॥

प्रातः युजा वि बोधय अश्विनौ आ इह गच्छतां । अस्य सोमस्य पीतये ॥ १ ॥

प्रभातकाळींच रथ जोडून सिद्ध होणाऱ्या अश्विनांस जाऊन जागें कर. ते येथें त्या सोमरसाच्या प्राशनाकरितां प्राप्त होवोत. ॥ १ ॥

या सुरथा रथीतमोभा देवा दिविस्पृशा । अश्विना ता हवामहे ॥ २ ॥

या सुऽरथा रथिऽतमा उभा देवा दिविऽस्पृशा । अश्विना ता हवामहे ॥ २ ॥

ज्याचा रथ उत्कृष्ट आहे, जे महारथी योद्ध्यांत श्रेष्ठ आहेत, आणि जे द्युलोकापर्यंत जाऊन भिडणारे आहेत, त्या दोन अश्वीदेवांस मी पाचारण करतो. ॥ २ ॥

या वां कशा मधुमत्यश्विना सूनृतावती । तया यज्ञं मिमिक्षतम् ॥ ३ ॥

या वां कशा मधुऽमती अश्विना सूनृताऽवती । तया यज्ञं मिमिक्षतम् ॥ ३ ॥

तुमच्या रथाचा चाबूक ऐकूं आला असतां सन्मानार्थ मधुर सोमरस तयार करण्याची ज्या यज्ञकर्त्याची लगबग उडून जाते, व ज्याच्या ध्वनीबरोबर आपणांस आतां सत्य तत्त्वांचा मनोहर लाभ होणार अशी सर्वांस आशा वाटावयास लागते, त्याच्या योगाने आमच्या यज्ञावर सुखसमृद्धीचे ओघ वाहतील असे करा. ॥ ३ ॥

नहि वामस्ति दूरके यत्रा रथेन गच्छथः । अश्विना सोमिनो गृहम् ॥ ४ ॥

नहि वां अस्ति दूरके यत्रा रथेन गच्छथः । अश्विना सोमिनः गृहम् ॥ ४ ॥

सोमरस अर्पण करणाऱ्या भक्ताच्या ज्या गृहाकडे हे अश्विनहो आपण रथांतून जाण्यास निघतां तें आपणांस मुळींच दूर नाहीं. ॥ ४ ॥

हिर॑ण्यपाणिमू॒तये॑ सवि॒तार॒मुप॑ ह्वये । सः चेत्ता॑ दे॒वता॑ प॒दम् ॥ ५ ॥

हिरण्यऽपाणिं ऊतये सवितारं उप ह्वये । सः चेत्ता देवता पदम् ॥ ५ ॥

ज्याचे कर सुवर्णाप्रमाणें कांतिमान् आहेत अशा सवित्यास आपल्या रक्षणाकरितां मी आमंत्रण करतो. तो सवितादेव परम पदाचा ज्ञाता आहे. ॥ ५ ॥

अ॒पां नपा॑त॒मव॑से सवि॒तार॒मुप॑ स्तुहि । तस्य॑ व्र॒तान्यु॑श्मसि ॥ ६ ॥

अपां नपातं अवसे सवितारं उप स्तुहि । तस्य व्रतानि उश्मसि ॥ ६ ॥

जलापासून अवतीर्ण झालेल्या सविता देवाची, आपले संरक्षण व्हावें म्हणून स्तुति कर. त्याच्या आज्ञा आम्हांस मान्य आहेत. ॥ ६ ॥

वि॒भ॒क्तारं॑ हवामहे॒ वसो॑श्चि॒त्रस्य॒ राध॑सः । स॒वि॒तारं॑ नृ॒चक्ष॑सम् ॥ ७ ॥

विऽभक्तारं हवामहे वसोः चित्रस्य राधसः । सवितारं नृऽचक्षसम् ॥ ७ ॥

सविता देवास आम्ही भक्तीनें वोलावतो. सर्व मनुष्यांवर ह्याची नजर आहे. आश्चर्यकारक व मनास आल्हाद देणाती अशी संपत्ति हा सर्वांस वाटून देतो. ॥ ७ ॥

सखा॑य॒ आ नि षी॑दत सवि॒ता स्तोम्यो॒ नु नः॑ । दाता॒ राधां॑सि शुम्भति ॥ ८ ॥

सखायः आ नि सीदत सविता स्तोम्यः नु नः । दाता राधांसि शुंभति ॥ ८ ॥

मित्रहो, बसा, आपणांस सवित्याची स्तुति करावयाची नाहीं काय ? हा दाता आहे, व मनोरम ऐश्वर्यास हा शोभा आणतो. ॥ ८ ॥

अग्ने पत्नीरिहा वह देवानामुशतीरुप । त्वष्टारं सोमपीतये ॥ ९ ॥

अग्ने पत्नीः इह आ वह देवानां उशतीः उप । त्वष्टारं सोमऽपीतये ॥ ९ ॥

हे अग्निदेवा, इकडे येण्यास संतोषाने तयार असलेल्या देवपत्नीस व त्याचप्रमाणे त्वष्टा देवास येथें सोमपनार्थ घेऊन ये. ॥ ९ ॥

आ ग्ना अग्न इहावसे होत्रां यविष्ठ भारतीम् । वरूत्रीं धिषणां वह ॥ १० ॥

आ ग्नाः अग्ने इह अवसे होत्रां यविष्ठ भारतीं । वरूत्रीं धिषणां वह ॥ १० ॥

अत्यंत तरुण दिसणाऱ्या हे अग्निदेवा, होत्रा, भारती, वरूत्रा व धिषणा ह्या देवस्त्रियांस आमच्या संरक्षणाकरितां येथें घेऊन ये. ॥ १० ॥

अभि नः देवीरवसा महः शर्मणा नृपत्नीः । अच्छिन्नपत्राः सचन्ताम् ॥ ११ ॥

अभि नः देवीः अवसा महः शर्मणा नृऽपत्नीः । अच्छिन्नऽपत्राः सचंताम् ॥ ११ ॥

मार्गांत कोठेही विघ्न न होता आम्हांकडे येऊन वीरपत्नी देवता आम्हांस कृपा, सौख्य व आनंद ह्यांची जोड करून देवोत. ॥ ११ ॥

इ॒हेन्द्रा॒णीमुप॑ हवये वरुणा॒नीं स्व॒स्तये॑ । अ॒ग्नायीं॒ सोम॑पीतये ॥ १२ ॥

इह इंद्राणीं उप हवये वरुणानीं स्वस्तये । अग्नायीं सोमऽपीतये ॥ १२ ॥

आमचें क्षेम असावें म्हणून इंद्राणी, वरुणानी व अग्नायी ह्यांना मी सोमपानार्थ बोलावितो. ॥ १२ ॥

म॒ही द्यौः पृ॑थि॒वी च॑ न इ॒मं य॒ज्ञं मि॑मिक्षताम् । पि॒पृ॒तां नो॒ भरी॑मभिः ॥ १३ ॥

मही द्यौः पृथिवी च नः इमं यज्ञं मिमिक्षतां । पिपृतां नः भरीमऽभिः ॥ १३ ॥

मही, द्यौ व पृथ्वी ह्या, आमचे यज्ञावर सुखसमृद्धीचे ओघ आणोत, त्या आम्हांस भरभराटीने भरपूर भरून टाकोत. ॥ १३ ॥

तयो॒रिद्घृ॒तव॒त्पयो॒ विप्रा॑ रिहन्ति धी॒तिभि॑ः । ग॒न्ध॒र्वस्य॑ ध्रु॒वे प॒दे ॥ १४ ॥

तयोः इत् घृतऽवत् पयः विप्राः रिहंति धीतिऽभिः । गन्धर्वस्य ध्रुवे पदे ॥ १४ ॥

त्याच्याच घृतपरिपूर्ण दुग्धाची विद्वान पुरुष आपल्या स्तोत्रांमध्ये, गंधर्वाच्या अक्षय्यलोकीं प्रशंसा करतात. ॥ १४ ॥

स्यो॒ना पृ॑थिवि भवानृक्ष॒रा नि॒वेश॑नी । यच्छा॑ नः॒ शर्म॑ स॒प्रथः॑ ॥ १५ ॥

स्योना पृथिवि भव अनृक्षरा निऽवेशनी । यच्छ नः शर्म सऽप्रथः ॥ १५ ॥

हे पृथिवीमाते, तूं आम्हांवर संतुष्ट हो. तूं कोणाचा नाश होऊं देणारी नाहींस, सर्वांचा समावेश तूं करतेस, आम्हांस अतिशय सौख्य दे. ॥ १५ ॥

अतो॑ दे॒वा अ॑वन्तु नो॒ यतो॒ विष्णु॑र्विचक्र॒मे । पृ॒थि॒व्याः स॒प्त धाम॑भिः ॥ १६ ॥

अतः देवा अवंतु नः यतः विष्णुः विऽचक्रमे । पृथिव्याः सप्त धामऽभिः ॥ १६ ॥

पृथ्वीचे सप्तप्रदेश धरून ज्या ज्या स्थानाचें विष्णूने आक्रमण केलें त्या त्या ठिकाणी देव आमचे संरक्षण करोत. ॥ १६ ॥

इ॒दं विष्णु॒र्वि च॑क्रमे त्रे॒धा नि द॑धे प॒दम् । समू॑ळ्हमस्य पांसु॒रे ॥ १७ ॥

इदं विष्णुः वि चक्रमे त्रेधा नि दधे पदं । संऽऊळ्हं अस्य पांसुरे ॥ १७ ॥

विष्णूनें हें सर्व आक्रमून टाकले. त्यानें तीन ठिकाणी आपले पाऊल ठेविले. त्याच्या पदरजांत सर्व निमग्न होऊन गेलें होतें. ॥ १७ ॥

त्रीणि॑ प॒दा वि च॑क्रमे॒ विष्णु॑र्गो॒पा अदा॑भ्यः । अतो॒ धर्मा॑णि धा॒रय॑न् ॥ १८ ॥

त्रीणि पदा वि चक्रमे विष्णुः गोपाः अदाभ्यः । अतः धर्माणि धारयन् ॥ १८ ॥

ज्याचा कोणास पराभव करतां यावयाचा नाही व जो जगताचा संरक्षक आहे अशा विष्णूनें त्या त्या ठिकाणीं आपल्या धर्मनियमांची प्रस्थापना करून, तीन पावलें आक्रमण केलीं. ॥ १८ ॥

विष्णोः कर्माणि पश्यत यतो व्रतानि पस्पशे । इंद्रस्य युज्यः सखा ॥ १९ ॥

विष्णोः कर्माणि पश्यत यतः व्रतानि पस्पशे । इंद्रस्य युज्यः सखा ॥ १९ ॥

ज्या अलौकिक पराक्रमी कृत्यांच्या योगाने विष्णूनें जगांतील अखिल कर्मे अवलोकन केलीं त्या कृत्यांकडे दृष्टि फेका. विष्णु हा इंद्राचा सहाय्यकारक व मित्र आहे. ॥ १९ ॥

तद्विष्णोः परमं पदं सदा पश्यन्ति सूरयः । दिवीव चक्षुराततम् ॥ २० ॥

तत् विष्णोः परमं पदं सदा पश्यंति सूरयः । दिविऽइव चक्षुः आऽततम् ॥ २० ॥

त्या विष्णूच्या परमपदाचें ज्ञाते लोक नेहमी निरीक्षण करीत असतात आणि त्यावेळी त्यांचे नेत्र आकाशाकडे टक लावल्याप्रमाणें विस्तार पावतात. ॥ २० ॥

तद्विप्रासोःविपन्यवो जागृवांसः समिंधते । विष्णोर्यत्परमं पदम् ॥ २१ ॥

तत् विप्रासः विपन्यवः जागृऽवांसः सं इंधते । विष्णोः यत् परमं पदम् ॥ २१ ॥

सदा जागृत व परम भक्तीनें स्तवन करणारे बुद्धिशाली पुरुष विष्णूचें जें परमपद आहे त्याची सर्वत्र प्रसिद्धि करतात. ॥ २१ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त २३ (अप्‌सूक्त)

ऋषी - मेधातिथि काण्व : देवता - १ वायु; २-३ इंद्रवायु;

४-६ मित्रावरुण; ७-९ इंद्रमरुत्; १०-१२ विश्वेदेव; १३-१५ पूषन्;

१६-२३ अप्; अग्नि; : छंद - गायत्री, पुरउष्णिह; अनुष्टुभ्; प्रतिष्ठा

ती॒व्राः सोमा॑स॒ आ ग॑ह्या॒शीर्व॑न्तः सु॒ता इ॒मे । वायो तान्प्रस्थि॑तान्पिब ॥ १ ॥

तीव्राः सोमासः आ गहि आशीःऽवन्तः सुताः इमे । वायो इति तान् प्रऽस्थितान् पिब ॥ १ ॥

हे वायुदेवा, तूं ये. हे सोम तीव्र आहेत. ह्यांत दही मिसळून ते तयार करून ठेविलें आहेत. ते तुझ्याकरितां ठेविले आहेत. तूं त्यांचे प्राशन कर. ॥ १ ॥

उ॒भा दे॒वा दि॑वि॒स्पृशे॑न्द्रवा॒यू ह॑वामहे । अ॒स्य सोम॑स्य पी॒तये॑ ॥ २ ॥

उभा देवा दिविऽस्पृशा इन्द्रवायू इति हवामहे । अस्य सोमस्य पीतये ॥ २ ॥

ह्या सोमरसाच्या प्राशनाकरितां मी इंद्र-वायूस बोलावितो. हे दोघेही द्युलोकापर्यंत भिडणारे आहेत. ॥ २ ॥

इ॒न्द्र॒वा॒यू म॑नो॒जुवा॒ विप्रा॑ हवन्त ऊ॒तये॑ । स॒ह॒स्रा॒क्षा धि॒यस्पती॑ ॥ ३ ॥

इन्द्रवायू मनःऽजुवा विप्राः हवन्ते ऊतये । सहस्रऽअक्षा धिय ःपती इति ॥ ३ ॥

विद्वान लोकांनी आपल्या संरक्षणाकरितां इंद्रवायूंनाच पाचारण केले. ह्यांची गति मनाइतकी शीघ्र आहे. त्यांस हजारों नेत्र आहेत व ते सर्व वुद्धिमत्तेचे अधिपति आहेत. ॥ ३ ॥

मि॒त्रं व॒यं ह॑वामहे॒ वरु॑णं॒ सोम॑पीतये । ज॒ज्ञा॒ना पू॒तद॑क्षसा ॥ ४ ॥

मित्रं वयं हवामहे वरुणं सोमऽपीतये । जज्ञाना पूतदक्षसा ॥ ४ ॥

आम्ही मित्र व वरुण ह्यांस सोमपानार्थ निमंत्रण करतो. हे अखिलज्ञानी व पवित्र कार्यासाठी आपल्या सामर्थ्याचा उपयोग करणारे आहेत. ॥ ४ ॥

ऋ॒तेन॒ यावृ॑ता॒वृधा॑वृ॒तस्य॒ ज्योति॑ष॒स्पती॑ । ता मि॒त्रावरु॑णा हुवे ॥ ५ ॥

ऋतेन यौ ऋतऽवृधौ ऋतस्य ज्योतिषः पती इति । ता मित्रावरुणा हुवे ॥ ५ ॥

जे नीतिमार्गानें नीतिनियमनांचा मान वृद्धिंगत करतात आणि जे तेजाचे अधिष्ठाते आहेत त्या मित्रावरुणांस मी हवि अर्पण करतो. ॥ ५ ॥

वरु॑णः प्रावि॒ता भु॑वन्मि॒त्रो विश्वा॑भिरू॒तिभिः॑ । कर॑तां नः सु॒राध॑सः ॥ ६ ॥

वरुणः प्रऽअविता भुवत् मित्रः विश्वाभिरूतिऽभिः । करतां नः सुऽराधसः ॥ ६ ॥

आमचा सांभाळ करण्याचे जेवढे म्हणून मार्ग आहेत तेवढ्या सर्व मार्गांनी मित्र आमचा रक्षणकर्ता होवो. वरुणही आमचा संरक्षक बनो. तें दोघेंही आम्हांस अत्यंत सुखी करोत. ॥ ६ ॥

मरुत्वन्तं हवामह इंद्रमा सोमपीतये । सजूर्गणेन तृम्पतु ॥ ७ ॥

मरुत्वंतं हवामहे इंद्रं आ सोमऽपीतये । सऽजूः गणेन तृंपतु ॥ ७ ॥

मरुद्देवांसहवर्तमान आम्ही इंद्रास सोमपानार्थ बोलावतो. आपल्या गणांनी तो परिवेष्टित आहे. आमचेकडून त्याचा संतोष होवो. ॥ ७ ॥

इंद्रंज्येष्ठा मरुद्गणा देवासः पूषरातयः । विश्वे मम श्रुता हवम् ॥ ८ ॥

इंद्रऽज्येष्ठा मरुत्ऽगणा देवासः पूषऽरातयः । विश्वे मम श्रुत हवम् ॥ ८ ॥

अहो इंद्रप्रमुख मरुद्देवहो, तुम्ही पूषाचे स्नेही आहांत. तुम्ही सर्व माझी हांक ऐका. ॥ ८ ॥

हत वृत्रं सुदानव इंद्रेण सहसा युजा । मा नः दुःशंस ईशत ॥ ९ ॥

हत वृत्रं सुऽदानव इंद्रेण सहसा युजा । मा नः दुःऽशंस ईशत ॥ ९ ॥

हे अति उदार देवहो, तुमच मित्र जो इंद्र त्याच्या पराक्रमाचें साहाय्य घेऊन वृत्राचा वध करा. तो अभद्रभाषी आम्हांवर स्वामित्व न मिळवो. ॥ ९ ॥

विश्वा॑न्दे॒वान्ह॑वामहे म॒रुत॒ः सोम॑पीतये । उ॒ग्रा हि पृश्नि॑मातरः ॥ १० ॥

विश्वान् देवान् हवामहे मरुतः सोमऽपीतये । उग्रा हि पृश्निऽमातरः ॥ १० ॥

आम्ही सोमपानार्थ सर्व मरुद्देवांस निमंत्रण करतो. खरोखर हे पृश्नीचे पुत्र फार उग्र आहेत. ॥ १० ॥

जय॑तामिव तन्य॒तुर्म॒रुता॑मेति धृष्णु॒या । यच्छुभं॑ या॒थना॑ नरः ॥ ११ ॥

जयतांऽइव तन्यतुः मरुतां एति धृष्णुऽया । यत् शुभं याथन नरः ॥ ११ ॥

विजय मिळवून आलेल्या वीरांप्रमाणे मरुतांची गर्जना जोरानें ऐकूं येत आहे. हे शूरहो जें आम्हांस कल्याणप्रद असेल तेथेंच तुमचें गमन होऊं द्या. ॥ ११ ॥

हस्कारादविद्युतस्पर्यतो जाता अवन्तु नः । मरुतः मृळयन्तु नः ॥ १२ ॥

हस्कारात् विऽद्युतः परि अतः जाताः अवंतु नः । मरुतः मृळयंतु नः ॥ १२ ॥

विद्युल्लतेच्या प्रचंड हास्यामधून अवतीर्ण झालेले मरुद्देव आमचे रक्षण करोत. ते आम्हास सुखी ठेवोत. ॥ १२ ॥

आ पूषञ्चित्रबर्हिषमाघृणे धरुणं दिवः । आजा नष्टं यथा पशुम् ॥ १३ ॥

आ पूषन् चित्रऽबर्हिषं आघृणे धरुणं दिवः । आ अजा नष्टं यथा पशुम् ॥ १३ ॥

हे अत्यंत देदीप्यमान पूषा, चित्रविचित्र रंगांच्या मयूरपुच्छांनी नटविलेल्या आकाशाच्या बालकास, एखाद्या चुकलेल्या वासराप्रमाणें, शोधून घेऊन ये. ॥ १३ ॥

पूषा राजानमाघृणिरपगूळ्हं गुहा हितम् । अविन्दच्चित्रबर्हिषम् ॥ १४ ॥

पूषा राजानं आघृणिः अपऽगूळ्हं गुहा हितम् । अविन्दत् चित्रऽबर्हिषम् ॥ १४ ॥

चित्रविचित्र रंगांच्या मयूरपुच्छांनी नटविलेला, परंतु गुहेंत लपवून ठेवल्यामुळें अदृश्य झालेला आमचा राजा, देदीप्य पूषास पुन्हा सांपडला. ॥ १४ ॥

उतो स मह्यमिन्दुभिः षड्युक्ताँ अनुसेषिधत् । गोभिर्यवं न चर्कृषत् ॥ १५ ॥

उतो इति सः मह्यं इंदुऽभिः षट् युक्तान् अनुऽसेषिधत् । गोभिः यवं न चर्कृषत् ॥ १५॥

शिवाय ज्याप्रमाणे शेतकरी हा बैलाच्या योगाने धान्य पिकवून घरीं आणतो त्याप्रमाणे सोमरसानें संतुष्ट होऊन हा पूषा, एकमेकांशी सांखळीप्रमाणें जोडलेल्या सहां ऋतूंस माझ्यासाठीं घेऊन येवो. ॥ १५ ॥

अम्बयो यन्त्यध्वभिर्जामयो अध्वरीयताम् । पृञ्चतीर्मधुना पयः ॥ १६ ॥

अम्बयः यंति अध्वऽभिः जामयः अध्वरीऽयताम् । पृञ्चतीः मधुना पयः ॥ १६ ॥

स्वतःची जलें माधुर्याने परिपूरित करीत, भाविक यजनकर्त्यांच्या ह्या प्रेमळ जननी, स्वमार्गाने वहात आहेत. ॥ १६ ॥

अमूर्या उप सूर्ये याभिर्वा सूर्यः सह । ता नो हिन्वन्त्वध्वरम् ॥ १७ ॥

अमूः याः उप सूर्ये याभिः वा सूर्यः सह । ताः नः हिन्वंतु अध्वरम् ॥ १७ ॥

ज्या सूर्याच्या संनिध आहेत, अथवा सूर्य ज्यांचे समीप आहे, त्या ह्या आमच्या जननी, यज्ञास यशस्वी करोत. ॥ १७ ॥

अपो देवीरुप ह्वये यत्र गावः पिबन्ति नः । सिन्धुभ्यः कर्त्वं हविः ॥ १८ ॥

अपः देवीः उप ह्वये यत्र गावः पिबंति नः । सिंधुभ्यः कर्त्वं हविः ॥ १८ ॥

जेथें आमच्या धेनू उदक प्राशन करतात, त्या जलदेवतांस मी आमंत्रण करतो. ह्या नद्यांस हवि अर्पण करणें योग्य आहे. ॥ १८ ॥

अप्स्वन्तरमृतमप्सु भेषजमपामुत प्रशस्तये । देवा भवत वाजिनः ॥ १९ ॥

अप्ऽसु अंतः अमृतं अप्ऽसु भेषजं अपां उत प्रऽशस्तये । देवाः भवत वाजिनः ॥ १९ ॥

जलांचे अंतरंगी अमृत आहे, जलांचे अंतरंगी औषधिगुण आहे, जलाचे स्तवन करण्याकरितां, हे देवांनो, त्वरा करा. ॥ १९ ॥

अ॒प्सु मे॒ सोमो॑ अब्रवीद॒न्तर्विश्वा॑नि भेष॒जा । अ॒ग्निं च॑ वि॒श्वश॑म्भुव॒माप॑श्च वि॒श्वभे॑षजीः ॥ २० ॥

अप्ऽसु मे सोमः अब्रवीत् अन्तः विश्वानि भेषजा । अग्निं च विश्वऽशम्भुवं आपः च विश्वऽभेषजीः ॥ २० ॥

मला सोमानें सांगितलें कीं, जलांचे अंतरंगी सर्व औषधि आहेत, आणि अग्नि हा सर्वांचा कल्याणकर्ता आहे. उदक हें खरोखरच सर्वरोगपरिहारक होय. ॥ २० ॥

आपः॑ पृणी॒त भे॑ष॒जं वरू॑थं त॒न्वे३मम॑ । ज्योक् च॒ सूर्यं॑ दृ॒शे ॥ २१ ॥

आपः पृणीत भेषजं वरूथं तन्वे मम । ज्योक् च सूर्यं दृशे ॥ २१ ॥

हे जलांनो, माझें शरीरस्वास्थ्य सदोदित रहावें व मला चिरकाल सूर्याचें दर्शन न घेतां यावें म्हणून मला उत्कृष्ट औषध द्या. ॥ २१ ॥

इदमापः प्र वहत यत् किं च दुरितं मयि । यद्वाहमभिदुद्रोह यद्वा शेप उतानृतम् ॥ २२ ॥

इदं आपः प्र वहत यत् किं च दुःऽइतं मयि । यत् वा अहं अभिऽदुद्रोह यत् वा शेपे उत अनृतम् ॥ २२ ॥

हे जलांनो, जो कांही दुष्टपणा माझे अंगी वास करीत असेल, कोणाशींही मी जे शत्रुत्व आचरले असेल, जे मी कोणाचे वाईट इच्छिलें असेल, अथवा जे मी असत्य वर्तन केलें असेल, तें तुम्ही सर्वथैव धुवून टाका. ॥ २२ ॥

आपो अद्यान्वचारिषं रसेन समगस्महि । पयस्वानग्न आ गहि तं मा सं सृज वर्चसा ॥ २३ ॥

आपः अद्य अनु अचारिषं रसेन सं अगस्महि । पयस्वान् अग्ने आ गहि तं मा सं सृज वर्चसा ॥ २३ ॥

हे जलांनो, आज मी तुमचे समीप आलो आहे, व तुमच्या मधुर रसांशी संयुक्त झालो आहे. हे जलनिवासी अग्निदेवा, येथें प्राप्त हो व मला तेजाची जोड करून दे. ॥ २३ ॥

सं माग्ने वर्चसा सृज सं प्रजया समायुषा । विद्युर्मे अस्य देवा इंद्रो विद्यात्सह ऋषिभिः ॥ २४ ॥

सं मा अग्ने वर्चसा सृज सं प्रऽजया सं आयुषा । विद्युः मे अस्य देवाः इंद्रः विद्यात् सह ऋषिऽभिः ॥ २४ ॥

हे अग्निदेवा, तेज, संतति व आयुष्य ह्यांची मला जोड करून दे. म्हणजे हें माझें वैभव देवांस विदित होईल व ऋषींसहवर्तमान इंद्रासही माहित होईल. ॥ २४ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त २४ (अनेक देवतासूक्त)

ऋषी - शुनःशेप आजीगर्ति : देवता १ प्रजापति; २ अग्नि;

३-५ सवितृ; ६-१५ वरुण : छंद - १,२, ६-१५ त्रिष्टुभ्; ३-५ गायत्री

कस्य॑ नू॒नं क॑त॒मस्या॒मृता॑ना॒ं मना॑महे॒ चारु॑ दे॒वस्य॒ नाम॑ ।

को नो॑ म॒ह्या अदि॑तये॒ पुन॑र्दात्पि॒तरं॑ च दृ॒शेयं॑ मा॒तरं॑ च ॥ १ ॥

कस्य नूनं कतमस्य अमृतानां मनामहे चारु देवस्य नाम ।

कः नः मह्यै अदितये पुनः दात् पितरं च दृशेयं मातरं च ॥ १ ॥

खरोखर आम्ही कोणाचे सुंदर नाम - सर्व अमरदेवांपैकी कोणत्या देवाचें मनोहर नाम - स्मरावें ? मला अदितीस पुन्हा कोण भेटवील की जेणेंकरून मी जनकास व जननीस पाहीन ? ॥ १ ॥

अ॒ग्नेर्व॒यं प्र॑थ॒मस्या॒मृता॑नां॒ मना॑महे॒ चारु॑ दे॒वस्य॒ नाम॑ ।

स नो॑ म॒ह्या अदि॑तये॒ पुन॑र्दात्पि॒तरं॑ च दृ॒शेयं॑ मा॒तरं॑ च ॥ २ ॥

अग्नेः वयं प्रथमस्य अमृतानां मनामहे चारु देवस्य नाम ।

सः नः मह्यै अदितये पुनः दात् पितरं च दृशेयं मातरं च ॥ २ ॥

सर्व अमरदेवांपैकीं प्रमुख जो अग्निदेव त्याचें मोहक नांव आम्ही स्मरूं. तो मला अदितीस पुन्हां भेटवील, व मग मी जनकास व जननीस पाहीन. ॥ २ ॥

अ॒भि त्वा॑ देव सवित॒रीशा॑नं॒ वार्या॑णाम् । सदा॑वन्भा॒गमी॑महे ॥ ३ ॥

अभि त्वा देव सवितः ईशानं वार्याणाम् । सदा अवन् भागं ईमहे ॥ ३ ॥

आमचें निरंतर रक्षण करणाऱ्या हे सविता देवा, सर्व स्पृहणीय वस्तूंचा तूं स्वामी आहेस. तुझेजवळ आम्ही अनुरूप असा संपत्तीचा हिस्सा मागतो. ॥ ३ ॥

यश्चि॒द्धि त॑ इ॒त्था भगः॑ शशमा॒नः पु॒रा नि॒दः । अ॒द्वे॒षो हस्त॑योर्द॒धे ॥ ४ ॥

यः चित् हि ते इत्था भगः शशमानः पुरा निदः । अद्वेषः हस्तयोः दधे ॥ ४ ॥

ह्याप्रमाणें जें कांही प्रशंसनीय भाग्य, कीं ज्याची कोणी निंदा करूं म्हणेल तरी तें अशक्य होईल, व ज्यास द्वेष्टे लोकापासून सुद्धां कोणतीही बाधा पोहोंचावयाची नाही, तें तुझ्या हातीं ठेवलेले आहे. ॥ ४ ॥

भग॑भक्तस्य ते व॒यमु॑दशेम॒ तवाव॑सा । मू॒र्धानं॑ रा॒य आ॒रभे॑ ॥ ५ ॥

भगःभक्तस्य ते वयं उत् अशेम तव अवसा । मूर्धानं राय आऽरभे ॥ ५ ॥

तुझ्याच कृपेमुळें आम्ही श्रीमंत होऊं, व संपत्तीच्या अगदीं शिखरावर सुस्थिरपणें बसूं. सर्व मनुष्यांच्या भाग्याची वांटणी करणारा तूंच आहेस. ॥ ५ ॥

नहि ते क्षत्रं न सहो न मन्युं वयश्चनामी पतयन्त आपुः ।

नेमा आपो अनिमिषं चरन्तीर्न ये वातस्य प्रमिनन्त्यभ्वम् ॥ ६ ॥

नहि ते क्षत्रं न सहः न मन्युं वयः चन अमी इति पतयंत आपुः ।

न इमाः आपः अनिऽमिषं चरंतीः न ये वातस्य प्रऽमिनंति अभ्वम् ॥ ६ ॥

हे उंच भराऱ्या मारणारे पक्षी, हीं एक निमिषभरही न थांबतां वाहणारीं उदकें, अथवा वायूचा दर्प जे देव धुडकावून लावतात, त्यांसही तुझा पराक्रम, बल अथवा कोप, ह्यांची बरोबरी करवत नाहीं. ॥ ६ ॥

अबुध्ने राजा वरुणो वनस्योर्ध्वं स्तूपं ददते पूतदक्षः ।

नीचीनाः स्थुरुपरि बुध्न एषामस्मे अन्तर्निहिताः केतवः स्युः ॥ ७ ॥

अबुध्ने राजा वरुणः वनस्य उर्ध्वं स्तूपं ददते पूतऽदक्षः ।

नीचीनाः स्थुः उपरि बुध्नः एषां अस्मे अन्तः निऽहिताः केतवः स्युरिति स्युः ॥ ७ ॥

आकाशास कोणता आधार आहे ? पण तेथें पवित्र पराक्रम करणाऱ्या राजा वरुणानें वृक्षाचा स्तंभ उभा रोंवला. त्याबरोबर त्यांचे बुंधे वर गेले व ते खाली झाले. ह्यांचे आंत कोठेंतरी आमची निवासस्थानें असलीं पाहिजेत. ॥ ७ ॥

उ॒रुं हि राजा॒ वरु॑णश्च॒कार॒ सूर्या॑य॒ पन्था॒मन्वे॑त॒वा उ॑ ।

अ॒पदे॒ पादा॒ प्रति॑धातवेऽकरु॒ताप॑व॒क्ता हृ॑दया॒विधं॑श्चित् ॥ ८ ॥

उरुं हि राजा वरुणः चकार सूर्याय पंथां अनुऊएतवै ऊं इति ।

अपदे पादा प्रतिऽधातवे अकः उत अपऽवक्ता हृदयऽविधः चित् ॥ ८ ॥

सूर्यास आपला दैनिक प्रवास करतां यावा म्हणून वरुण राजानें त्याचा मार्ग विस्तृत केला. जेथे पाऊल टाकण्याचीही सोय नव्हती तेथें पाय ठेवण्याजोगी त्यानें वाट केली. जे दुसऱ्यांस वर्मी लागेल असें बोलतात त्यांची वरुण अत्यंत निर्भर्त्सना करतो. ॥ ८ ॥

श॒तं ते॑ राजन्भि॒षजः॑ स॒हस्र॑मु॒र्वी ग॑भी॒रा सु॑म॒तिष्टे॑ अस्तु ।

बाध॑स्व दू॒रे निर्ऋ॑तिं परा॒चैः कृ॒तं चि॒देनः॒ प्र मु॑मुग्ध्य॒स्मत् ॥ ९ ॥

शतं ते राजन् भिषजः सहस्रं उर्वी गभीरा सुमतिः ते अस्तु ।

बाधस्व दूरे निःऽऋतिं पराचैः कृतं चित् एनः प्र मुमुग्धि अस्मत् ॥ ९ ॥

हे वरुण राजा, तुझ्याजवळ शेंकडोंच काय, पण सहस्रावधि औषधें आहेत; तुझी कृपा सातिशय व अविच्छिन्न असो. आमच्या साडेसातीस पार घालवून देऊन तिचें निर्मूलन कर, आणि आम्हांपासून आमच्या घडलेल्या पातकांस दूर कर. ॥ ९ ॥

अमीय ऋक्षा निहितास उच्चा नक्तं ददृश्रे कुह चिद्दिवेयुः ।

अदब्धानि वरुणस्य व्रतानि विचाकशच्चन्द्रमा नक्तमेति ॥ १० ॥

अमी इति ये ऋक्षाः निऽहितासः उच्चा नक्तं ददृश्रे कुह चित् दिवा ईयुः ।

अदब्धानि वरुणस्य व्रतानि विऽचाकशत् चन्द्रमाः नक्तं एति ॥ १० ॥

हीं जीं नक्षत्रे आकाशांत उंच स्थापन केली आहेत ती रात्रींच मात्र दिसतात. दिवसां कोठेंतरी निघून गेली होती. वरुणाच्या आज्ञा अनुल्लंघनीय आहेत. चंद्रमा रात्री प्रकाशमान होतो. ॥ १० ॥

तत्त्वा यामि ब्रह्मणा वन्दमानस्तदा शास्ते यजमानो हविर्भिः ।

अहेळमानो वरुणेह बोध्युरुशंस मा न आयुः प्र मोषीः ॥ ११ ॥

तत् त्वा यामि ब्रह्मणा वन्दमानः तत् आ शास्ते यजमानः हविःऽभिः ।

अहेळमानः वरुण इह बोधि उरुऽशंस मा नः आयुः प्र मोषीः ॥ ११ ॥

हयाच कारणांस्तव स्तोत्रांनी तुला नमन करीत मी तुझे समीप येतों, याच कारणास्तव याग करणारा भक्त हवि अर्पण करून तुझेजवळ याचना करीत असतो. वरुणा, कोप न करतां येथें जागृतपणानें रहा, व आमचे आयुष्य कमी करूं नको. तुझी कीर्ति फार गाजत असते. ॥ ११ ॥

तदिन्नक्तं॒ तद्दिवा॒ महय॑माहु॒स्तदु॒यं केतौ॑ हृ॒द आ वि च॑ष्टे ।

शु॒न॒ःशेपो॒ यमहव॑द्‌गृभी॒तः सो अ॒स्मान्राजा॒ वरु॑णो मु॒मोक्तु ॥ १२ ॥

तत् इत् नक्तं तत् दिवा महयं आहुः तत् अयं केतः हृदः आ वि चष्टे ।

शुनःशेपः यं अहवत् गृभीतः सः अस्मान् राजा वरुणः मुमोक्तु ॥ १२ ॥

दिवसां व रात्री सर्व लोक मला हीच गोष्ट संगतात, व माझ्या हृदयाचाही मला असाच स्पष्ट उपदेश आहे कीं, शुनःशेप बंधनात पडला असतां त्यानें ज्या वरुणास आळविले तोच आम्हांस बंधमुक्त करील. ॥ १२ ॥

शु॒न॒ःशेपो॒ हयहव॑द्‌गृभी॒तस्त्रि॒ष्वादि॒त्यं द्रु॑प॒दे॑षु ब॒द्धः ।

अवै॑नं राजा॒ वरु॑णः ससृज्याद्वि॒द्वाँ अद॑ब्धो॒ वि मु॑मोक्तु॒ पाशा॑न् ॥ १३ ॥

शुनःशेपः हि अह्वत् गृभीतः त्रिषु आदित्यं द्रुपदेषु बद्धः ।

अव एनं राजा वरुणः ससृज्यात् विद्वान् अदब्धः वि मुमोक्तु पाशान् ॥ १३ ॥

तीन खांबाशी जखडून बांधलेल्या शुनःशेपानें बंधनांत असतांना आदित्याचा धांवा केला. ज्ञानवान् वरुण राजास कोणाला अपाय करतां येणार ? तोच शुनःशेपाचे पाश शिथिल करो व त्यास बंधनांतून मुक्त करो. ॥ १३ ॥

अव॑ ते॒ हेळो॑ वरुण॒ नमो॑भि॒रव॑ य॒ज्ञेभि॑रीमहे ह॒विर्भिः॑ ।

क्षय॑न्न॒स्मभ्य॑मसुर प्रचेता॒ राज॒न्नेनां॑सि शिश्रथः कृ॒तानि॑ ॥ १४ ॥

अव ते हेळः वरुण नमःऽभि अव यज्ञेभिः ईमहे हविःभिः ।

क्षयन् अस्मभ्यं असुर प्रचेत् इति राजन् एनांसि शिश्रथः कृतानि ॥ १४ ॥

नमस्कृतींनी, यागांनी व हवींनी आपला कोप शांत करण्याकरितां हे वरुणा, आम्ही तुझी प्रार्थना करतो. तूं शत्रूंचा नाश करणारा व अतिशय ज्ञानशील आहेस. आम्हांकरितां येथे निवास करून हे वरुणराजा, आमच्या पातकांचा क्षय कर. ॥ १४ ॥

उदु॑त्त॒मं व॑रुण॒ पाश॑म॒स्मदवा॑ध॒मं वि म॑ध्य॒मं श्र॑थाय ।

अथा॑ व॒यमा॑दित्य व्र॒ते तवाना॑गसो॒ अदि॑तये स्याम ॥ १५ ॥

उत् उत्ऽतमं वरुण पाशं अस्मत् अव अधमं वि मध्यमं श्रथय ।

अथ वयं आदित्य व्रते तव अनागसः अदितये स्याम ॥ १५ ॥

हे वरुणा, आमचे वरच्या बाजूचे, मधले व शरीराच्या खालील भागावरील पाश शिथिल कर. हे आदित्या तुझ्या अमलाखाली आम्ही पापविमुक्त होऊन अदितीच्या आश्रयास पात्र होऊं. ॥ १५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त २५ (वरुणसूक्त)

ऋषी - सुनःशेप आजीगर्ति : देवता - वरुण : छंद - गायत्री 0

यच् चि॒द्धि ते॒ विशो॑ यथा॒ प्र दे॑व वरुण व्र॒तम् । मि॒नी॒मसि॒ द्यवि॑द्यवि ॥ १ ॥

यत् चित् हि ते विशः यथा प्र देव वरुण व्रतम् । मिनीमसि द्यविऽद्यवि ॥ १ ॥

हे वरुणा, तुझी प्रजा या नात्यानें जी कांही तुझी आज्ञा आम्हांकडून रोज मोडली जात असेल, ॥ १ ॥

मा नो॑ व॒धाय॑ ह॒त्नवे॑ जिहीळा॒नस्य॑ रीरधः । मा हृ॑णा॒नस्य॑ म॒न्यवे॑ ॥ २ ॥

मा नः वधाय हत्नवे जिहीळानस्य रीरधः । मा हृणानस्य मन्यवे ॥ २ ॥

तिच्याबद्दल वधाचीच शिक्षा ठरलेली असली तरी, आम्हांवर कोपायमान होऊन, ती शिक्षा आम्हांस देऊं नको.
आम्हांवर संतप्त होऊन आपल्या क्रोधाला आम्हांस बळी देऊं नको. ॥ २ ॥

वि मृ॑ळी॒काय॑ ते॒ मनो॑ र॒थीरश्वं॒ न संदि॑तम् । गी॒र्भिर्व॑रुण सीमहि ॥ ३ ॥

वि मृळीकाय ते मनः रथीः अश्वं न संऽदितम् । गीःऽभिः वरुण सीमहि ॥ ३ ॥

हे वरुणा, ज्याप्रमाणें एखादा महारथी आपल्या घोड्यास (त्याने पळून जाऊं नये म्हणून) दोरीनें जखडून ठेवतो, त्याप्रमाणें, तुझ्यापासून सुखें प्राप्त करून घेण्याकरितां अनेक स्तोत्रांच्या द्वारें आम्ही आपलें मन तुझें ठायीं बद्ध करतो. ॥ ३ ॥

परा॒ हि मे॒ विम॑न्यवः॒ पत॑न्ति॒ वस्य॑इष्टये । वयो॒ न व॑स॒तीरुप॑ ॥ ४ ॥

परा हि मे विऽमन्यवः पतंति वस्यःऽइष्टये । वयः न वसतीः उप ॥ ४ ॥

ज्याप्रमाणे पक्षी आपल्या निवासस्थानांकडे पळत सुटतात, त्याप्रमाणे सुखलाभाच्या शोधार्थ माझ्या सर्व उच्चतम मनःकल्पना तुझ्याकडे धांव घेतात. ॥ ४ ॥

क॒दा क्ष॑त्र॒श्रियं॒ नर॒मा वरु॑णं करामहे । मृ॒ळी॒कायो॑रु॒चक्ष॑सम् ॥ ५ ॥

कदा क्षत्रऽश्रियं नरं आ वरुणं करामहे । मृळीकाय उरुऽचक्षसम् ॥ ५ ॥

पराक्रम हेच ज्याचे अलंकार आहेत अशा सर्वसाक्षी वरुणास आमच्या सुखसिध्यर्थ आम्हांस केव्हां घेऊन येतां येईल बरें ? ॥ ५ ॥

तदित्समानमाशाते वेनन्ता न प्र युच्छतः । धृतव्रताय दाशुषे ॥ ६ ॥

तत् इत् समानं आशाते इति वेनंता न प्र युच्छतः । धृतऽव्रताय दाशुषे ॥ ६ ॥

खरोखर अतिशय कनवाळूपणानें हे दोघेही त्याचा समसमान स्वीकार करतात. आज्ञाधारक यागकर्त्यास ते कधीही निराश करीत नाहींत. ॥ ६ ॥

वेदा यः वीनां पदमन्तरिक्षेण पतताम् । वेद नावः समुद्रियः ॥ ७ ॥

वेद यः वीनां पदं अंतरिक्षेण पतताम् । वेद नावः समुद्रियः ॥ ७ ॥

जो अंतरिक्षांतून परिभ्रमण करणाऱ्या पक्ष्यांचा मार्ग जाणतो; समुद्रनिवासी असल्यामुळें तारवाची वाट ज्यास माहीत आहे, ॥ ७ ॥

वेदं मासो धृतव्रतो द्वादश प्रजावतः । वेदाय उपजायते ॥ ८ ॥

वेद मासः धृतऽव्रतः द्वादश प्रजाऽवतः । वेद यः उपऽजायते ॥ ८ ॥

आपल्या आज्ञा सर्वांस मानावयास लावीत असून ज्यास द्वादश मासांचे - कीं ज्यांपैकी प्रत्येकांत लोकसंख्येची एकसारखी वृद्धि होत असते-ज्ञान असतें, शिवाय त्यांस जोडूनच जो महिना कधीं कधीं येतो त्याचीही ज्यास माहिती आहे; ॥ ८ ॥

वेद वातस्य वर्तनिमुरोरृष्वस्य बृहतः । वेदा ये अध्यासते ॥ ९ ॥

वेद वातस्य वर्तनिं उरोः ऋष्वस्य बृहतः । वेद ये अधिऽआसते ॥ ९ ॥

सर्वसंचारी, उत्तुंगगामी व सामर्थ्यवान् अशा वायूची गति ज्यास विदित आहे, व वायुलोकाचेही वरती जे राहतात त्यांनासुद्धां जो ओळखतो; ॥ ९ ॥

नि षसाद धृतव्रतो वरुणः पस्त्या३ स्वा । साम्राज्याय सुक्रतुः ॥ १० ॥

नि ससाद धृतऽव्रतः वरुणः पस्त्यासु आ । सांराज्याय सुक्रतुः ॥ १० ॥

असा सर्वसमर्थ वरुण आपल्या आज्ञांचे परिपालन करवीत साम्राज्य गाजविण्याकरितां सर्व लोकांत येऊन विराजमान झाला आहे. ॥ १० ॥

अतो विश्वान्यद्भुता चिकित्वाँ अभि पश्यति । कृतानि या च कर्त्वा ॥ ११ ॥

अतः विश्वानि अद्भुता चिकित्वान् अभि पश्यति । कृतानि या च कर्त्वा ॥ ११ ॥

तेथून तो ज्ञानवान देव, जी आश्चर्यें त्यानें उत्पन्न केली आहेत व जी त्यास अजून उत्पन्न करावयाची आहेत, त्या सर्वांचे अवलोकन करीत असतो. ॥ ११ ॥

स नो विश्वाहा सुक्रतुरादित्यः सुपथा करत् । प्र ण आयूंषि तारिषत् ॥ १२ ॥

सः नः विश्वाहा सुऊक्रतुः आदित्यः सुऽपथा करत् । प्र णः आयूंषि तारिषत् ॥ १२॥

तो सर्वसमर्थ आदित्य आम्हांस चांगल्या मार्गावर घेऊन जावो. तो आमचीं आयुष्यें वृद्धिंगत करो. ॥ १२ ॥

बिभ्रद्द्रापिं हिरण्ययं वरुणो वस्त निर्णिजम् । परि स्पशो नि षेदिरे ॥ १३ ॥

बिभ्रत् द्रापिं हिरण्ययं वरुणः वस्त निःनिजम् । परि स्पशः नि सेदिरे ॥ १३॥

आपले सुवर्णमय कवच घालून त्यानें देदीप्यमान वस्त्र धारण केलें आहे, सभोंवार त्याचे दूत बसले आहेत. ॥ १३ ॥

न यं दिप्संन्ति दिप्सवो न द्रुह्वाणो जनानाम् । न देवमभिमातयः ॥ १४ ॥

न यं दिप्संति दिप्सवः न द्रुह्वाणः जनानाम् । न देवं अभिऽमातयः ॥ १४॥

ह्यास दुष्ट लोक भिती घालूं शकत नाहींत, ह्यास मनुष्यजातीचे द्वेष्टे भयभीत करीत नाहींत, ह्यास पापकर्मे खलही भयचकित करावयास समर्थ नाहींत. ॥ १४ ॥

उत यो मानुषेष्वा यशश्चक्रे असाम्या । अस्माकमुदरेष्वा ॥ १५ ॥

उत यः मानुषेषु आ यशः चक्रे असामि आ । अस्माकं उदरेषु आ ॥ १५॥

शिवाय अखिल मानवजातींत ह्याने आपले यश गाजविलें आहे, आणि तेंही अर्धवट गाजविले आहे अशांतला भाग मुळींच नाहीं, इतकेच काय पण खुद्द आपल्या उदरांतही ह्यानें कीर्तिपद सुंदर रचना करून ठेविली आहे. ॥ १५ ॥

परा॑ मे यन्ति धी॒तयो॒ गावो॒ न गव्यू॑ती॒रनु॑ । इ॒च्छन्ती॑रुरु॒चक्ष॑सम् ॥ १६ ॥

परा मे यंति धीतयः गावः न गव्यूतीः अनु । इच्छन्तीः उरुऽचक्षसम् ॥ १६॥

ह्या सर्वदर्शी देवाविषयी प्रेमपूरीत झाल्यामुळें माझ्या प्रार्थना, ज्याप्रमाणे गाई चारा ठेवलेल्या गोठ्याकडे उत्सुकतेनें परत येतात त्याप्रमाणें, त्याकडेसच पुनः पुनः वळतात. ॥ १६ ॥

सं नु वो॑चावहै॒ पुन॒र्यतो॑ मे॒ मध्वाभृ॑तम् । होते॑व॒ क्षद॑से प्रि॒यम् ॥ १७ ॥

सं नु वोचावहै पुनः यतः मे मध्व् आभृतम् । होताऽइव क्षदसे प्रियम् ॥ १७॥

माझा मधुर हवि अगदी सिद्ध आहे; तेव्हां आपलें एकमेकाशी प्रत्यक्ष संभाषण होऊं द्या. हा हवि तुला प्रिय आहे. यागकर्त्याप्रमाणें तूं त्याचा स्वीकार करतोस. ॥ १७ ॥

द॒र्शं॒ नु॒ वि॒श्वद॑र्शतं॒ द॒र्शं॒ रथ॒मधि॒ क्षमि॑ । ए॒ता जु॑षत मे॒ गिर॑ः ॥ १८ ॥

दर्शं नु विश्वऽदर्शतं दर्शं रथं अधि क्षमि । एताः जुषत मे गिरः ॥ १८॥

सर्व विश्वांत ज्याची मनोहर रूपाबद्दल ख्याति आहे त्यचें दर्शन आज मला घडलें. ह्या पृथ्वीवर त्याचा रथ मी पाहिला. ह्या माझ्या स्तुतीचा त्यानें स्वीकार केला आहे. ॥ १८ ॥

इ॒मं मे॑ वरुण श्रुधी॒ हव॑म॒द्या च॑ मृळय । त्वाम॑व॒स्युरा च॑के ॥ १९ ॥

इमं मे वरुण श्रुधी हवं अद्य च मृळय । त्वां अवस्युः आ चके ॥ १९॥

हे वरुणा, ही माझी हांक ऐक, व मला सुखांत ठेव. तुझ्या कृपेची इच्छा धरून मी तुझ्याजवळ याचना करीत आहे. ॥ १९ ॥

त्वं विश्व॑स्य मेधिर दि॒वश्च॒ ग्मश्च॑ राजसि । स याम॑नि॒ प्रति॑ श्रुधि ॥ २० ॥

त्वं विश्वस्य मेधिर दिवः च ग्मः च राजसि । सः यामनि प्रति श्रुधि ॥ २०॥

हे प्रज्ञाशील देवा, अखिल पृथ्वी व स्वर्ग ह्यांवर तुझीच सत्ता आहे. म्हणून तूं जाशील तेव्हां मला आश्वासन देऊन जा. ॥ २० ॥

उदु॑त्त॒मं मु॑मुग्धि नो॒ वि पाशं॑ मध्य॒मं चृ॑त । अवा॑ध॒मानि॑ जी॒वसे॑ ॥ २१ ॥

उत् उत्ऽतमं मुमुग्धि नः वि पाशं मध्यमं चृत । अव अधमानि जीवसे ॥ २१॥

आम्ही चिरकालपर्यंत आयुष्याचा उपभोग घ्यावा म्हणून आमचे वरच्या बाजूचे पाश शिथिल कर. आमची मधलीं आणि शरीराच्या खालील भागांवरील बंधनेंही सोडून टाक. ॥ २१ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त २६ (अग्निसूक्त)

ऋषी - सुनःशेप आजीगर्ति : देवता - अग्नि : छंद - गायत्री

वसि॑ष्वा॒ हि मि॑येध्य॒ वस्त्रा॑ण्यूर्जां पते । सेमं नो॑ अध्व॒रं य॑ज ॥ १ ॥

वसिष्व हि मियेध्य वस्त्राणि ऊर्जां पते । सः इमं नः अध्वरं यज ॥ १ ॥

हे सामर्थ्यापति देवा, हे यज्ञार्ह अग्ने, आपली दिव्य वस्त्रें अंगावर घाल आणि अशा रीतीने विभूषित होऊन हा आमचा यज्ञ सिद्धीस ने. ॥ १ ॥

नि नो॒ होता॒ वरे॑ण्यः॒ सदा॑ यविष्ठ॒ मन्म॑भिः । अग्ने॑ दि॒वित्म॑ता॒ वचः॑ ॥ २ ॥

नि नः होता वरेण्यः सदा यविष्ठ मन्मऽभिः । अग्ने दिवित्मता वचः ॥ २ ॥

हे अत्यंत तरुण अग्नेदेवा, आमचे वचन श्रवण कर. तूं दिव्य कांतीने युक्त आहेस. अंतःकरणपूर्वक केलेली स्तवनें तुलाच साजतात. तूं आमचे हवि पोहोंचवितोस. ॥ २ ॥

आ हि ष्मा॑ सू॒नवे॑ पि॒तापिर्यज॑त्या॒पये॑ । सखा॒ सख्ये॒ वरे॑ण्यः ॥ ३ ॥

आ हि स्म सूनवे पिता आपिः यजति आपये । सखा सख्ये वरेण्यः ॥ ३ ॥

खरोखर पुत्रांस जो जणूं पिताच आहे, आप्तसंबंधी मनुष्यांस जो नातलगच आहे व जो मित्रांस अत्युत्तम मित्र आहे असा तो अग्नि आमचे यज्ञ सिद्ध करतो. ॥ ३ ॥

आ नो॑ ब॒र्ही रि॒शाद॑सो॒ वरु॑णो मि॒त्रो अ॑र्य॒मा । सीद॑न्तु॒ मनु॑षो यथा ॥ ४ ॥

आ नः बर्हीः रिशादसः वरुणः मित्रः अर्यमा । सीदंतु मनुषः यथा ॥ ४ ॥

ज्याप्रमाणे आम्ही मनुष्यें दर्भाच्या आसनावर बसतो त्याप्रमाणे खलांचा नाश करणारा मित्र, वरुण व अर्यमा देवही प्रेमानें दर्भासनावर येऊन विराजमान होवोत. ॥ ४ ॥

पूर्व्य॑ होत॒रस्य नो॒ मन्द॑स्व स॒ख्यस्य॑ च । इ॒मा उ॒ षु श्रु॑धी॒ गिर॑ः ॥ ५ ॥

पूर्व्य होतः अस्य नः मन्दस्व सख्यस्य च । इमाः ऊं इति सु श्रुधी गिरः ॥ ५ ॥

देवांस हवि अर्पण करणाऱ्या हे पुराणपुरुषा, आमच्या हवींत संतोष मान, आमच्या प्रेमांत आनंद वाटूं दे व आमच्या प्रार्थना श्रवण कर. ॥ ५ ॥

यच्चि॒द्धि शश्व॑ता॒ तना॑ दे॒वंदे॑वं॒ यजा॑महे । त्वे इद्धू॑यते ह॒विः ॥ ६ ॥

यत् चित् हि शश्वता तना देवंऽदेवं यजामहे । त्वे इत् हूयते हविः ॥ ६ ॥

जो कांही हवि आम्ही निरनिराळ्या देवतांस नेहमीं देत असतो तो तुझ्याच ठायीं अर्पण करतो. ॥ ६ ॥

प्रि॒यो नो॑ अस्तु वि॒श्पति॒र्होता॑ म॒न्द्रो वरे॑ण्यः । प्रि॒याः स्व॒ग्नयो॑ व॒यम् ॥ ७ ॥

प्रियः नः अस्तु विश्पतिः होता मंद्रः वरेण्यः । प्रियाः सुऽअग्नयः वयम् ॥ ७ ॥

शुभकारक अग्नीचें पूजन करणारे आम्ही त्यास प्रिय आहोत. त्याचेवरही आमचें खरें प्रेम असो. तो प्रेम करण्यास योग्य आहे, तो आनंद देणारा आहे, तो देवतांस हवि पोंचवितो, सर्व मानवांचा तो राजा आहे. ॥ ७ ॥

स्व॒ग्नयो॒ हि वार्यं॑ दे॒वासो॑ दधि॒रे च॑ नः । स्व॒ग्नयो॑ मनामहे ॥ ८ ॥

सुऽअग्नयः हि वार्यं देवासः दधिरे च नः । सुऽअग्नयः मनामहे ॥ ८ ॥

शुभदायक अग्नीशी सख्य असणाऱ्या देवांनी आपणाकरितां अत्यंत स्पृहणीय वैभव तयार करून ठेवलें आहे. आम्हीही त्याच कल्याणकारक अग्नीचे भक्त होऊन त्याचे चिंतन करतो. ॥ ८ ॥

अथा॑ न उ॒भये॑षा॒मम॑मृत॒ मर्त्या॑नाम् । मि॒थः स॑न्तु॒ प्रश॑स्तयः ॥ ९ ॥

अथ नः उभयेषां अमृत मर्त्यानाम् । मिथः सन्तु प्रऽशस्तयः ॥ ९ ॥

आणि आतां हे अमरदेवा, यज्ञाचे दोन्ही बाजूस बसलेल्या आम्हांमध्यें एकमेकांच्या संबंधाने प्रेमसंभाषण होवो. ॥ ९ ॥

विश्वे॑भिरग्ने अ॒ग्निभि॑रि॒मं य॒ज्ञमि॒दं वचः॑ । चनो॑ धाः सहसो यहो ॥ १० ॥

विश्वेभिः अग्ने अग्निऽभिः इमं यज्ञं इदं वचः । चनः धाः सहसः यहो इति ॥ १० ॥

सामर्थ्यापासून प्रादुर्भूत होणाऱ्या हे अग्निदेवा, इतर सर्व अग्नीसहवर्तमान ह्या यज्ञावर व ह्या स्तोत्रावर प्रेम कर. ॥ १० ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त २७ (अग्नि व अनेकदेवतासूक्त)

ऋषी - सुनःशेप आजीगर्ति : देवता - १ ते १२ अग्नि; १३ देवगण : छंद - गायत्री, त्रिष्टुभ्

अश्वं न त्वा वारवन्तं वन्दध्या अग्निं नमोभिः । सम्राजन्तमध्वराणाम् ॥ १ ॥

अश्वं न त्वा वारऽवंतं वन्दध्यै अग्निं नमःऽभिः । संऽराजंतं अध्वराणाम् ॥ १ ॥

चिलखत घालून सजविलेल्या अश्वाप्रमाणे अनेकदां वंदन करून मला तुझा बहुमान करूं दे. तूं प्रत्येक यज्ञांत विराजमान होत असतोस. ॥ १ ॥

स घा नः सूनुः शवसा पृथुप्रगामा सुशेवः । मीढ्वाँ अस्माकं बभूयात् ॥ २ ॥

सः घा नः सूनुः शवसा पृथुऽप्रगामा सुऽशेवः । मीढ्वान् अस्माकं बभूयात् ॥ २ ॥

हा दाता स्वसामर्थ्याच्या योगानें अनेक स्थळीं गमन करतो. हा उत्तम सौख्य अर्पण करणारा आहे. तो आम्हांकरितां कृपेचा वर्षाव करो. ॥ २ ॥

स नो॑ दू॒राच्चा॒साच्च॒ नि मर्त्या॑दघा॒योः । पा॒हि सद॒मित्वि॒श्वायुः॑ ॥ ३ ॥

सः नः दूरात् चासात् च नि मर्त्यात् अघऽयोः । पाहि सदं इत् विश्वऽआयुः ॥ ३ ॥

तूं सर्वांचा प्राण आहेस. तो तूं, आम्ही तुझेजवळ असो कीं दूर असो, पातकाचरण करणाऱ्या माणसापासून आमचें नेहमी संरक्षण कर. ॥ ३ ॥

इ॒मम्ू॒ षु त्वम॒स्माकं॑ स॒निं गा॑य॒त्रं नव्यां॑सम् । अग्ने॑ दे॒वेषु॒ प्र वो॑चः ॥ ४ ॥

इमं ऊं इति सु त्वं अस्माकं सनिं गायत्रं नव्यांसम् । अग्ने देवेषु प्र वोचः ॥ ४ ॥

अग्निदेवा, आम्ही गाइलेल्या ह्या सर्वकामनापरिपूरक अशा आमच्या नवीन स्तोत्रांची देवांचे समुदायांत तूं प्रशंसा केलेली आहेस. ॥ ४ ॥

आ नो॑ भज पर॒मेष्वा वाजे॑षु मध्य॒मेषु॑ । शिक्षा॒ वस्वो॒ अन्त॑मस्य ॥ ५ ॥

आ नः भज परमेषु आ वाजेषु मध्यमेषु । शिक्ष वस्वः अंतमस्य ॥ ५ ॥

जें सामर्थ्य सर्वोत्कृष्ट आहे, अथवा जे मध्यम प्रतीचे आहे त्याची प्राप्ति होत असतांना आमचे जवळ ऐस. जी संपत्ति अखेरच्या कोटींतील म्हणून गणली जाते तीही कशी प्राप्त करून घ्यावी हें आम्हांस शिकव. ॥ ५ ॥

वि॒भ॒क्तासि॑ चित्रभानो॒ सिन्धो॑रू॒र्मा उ॑पा॒क आ । स॒द्यः दा॒शुषे॑ क्षरसि ॥ ६ ॥

विऽभक्ता असि चित्रभानो सिंधोः ऊर्मौ उपाके आ । सद्यः दाशुषे क्षरसि ॥ ६ ॥

अलौकिक कांतीने देदीप्यमान असणाऱ्या हे देवा, तूं संपत्तीची वाटणी करणारा आहेस. तूं कृपेचा सिंधु असल्यामुळें तुझ्या प्रसाद लहरींजवळ जो भक्त उभा असतो त्याचेसाठीं तूं ताबडतोब संपत्तीचे पूर वाहवितोस. ॥ ६ ॥

यम॑ग्ने पृ॒त्सु मर्त्य॒मवा॒ वाजे॑षु॒ यं जु॒नाः । स यन्ता॒ शश्व॑ती॒रिषः॑ ॥ ७ ॥

यं अग्ने पृत्ऽसु मर्त्यं अवाः वाजेषु यं जुनाः । सः यंता शश्वतीः इषः ॥ ७ ॥

खरोखर ज्या मानवाचा तूं युद्धांत रक्षणकर्ता होतोस व ज्याला तूं शूरत्वाच्या कृत्यांत प्रेरणा करणारा असतोस त्याची सत्ता शाश्वत संपत्तीवर प्रस्थापित होते. ॥ ७ ॥

नकिरस्य सहन्त्य पर्येता कयस्य चित् । वाजो अस्ति श्रवाय्यः ॥ ८ ॥

नकिः अस्य सहंत्य परिऽएता कयस्य चित् । वाजः अस्ति श्रवाय्यः ॥ ८ ॥

तो कसाही असला तरी हे बलशाली देवा, त्यास कोणी प्रतिरोध करूं शकत नाहीं. त्याच्या सामर्थ्याची कीर्ति सर्वत्र गाजते. ॥ ८ ॥

स वाजं विश्वचर्षणिरर्वद्भिरस्तु तरुता । विप्रेभिरस्तु सनिता ॥ ९ ॥

सः वाजं विश्वऽचर्षणिः अर्वत्ऽभिः अस्तु तरुता । विप्रेभिः अस्तु सनिता ॥ ९ ॥

हा सर्वसंचारी देव, आम्हांस आमचे अश्वांसह पराक्रमाच्या कृत्यांतून पार पाडो व विद्वान् स्तोत्यांसह आम्हांस संपत्ति देवो. ॥ ९ ॥

जराबोध तद्विविड्ढि विशेविशे यज्ञियाय । स्तोमं रुद्राय दृशीकम् ॥ १० ॥

जराऽबोध तत् विविड्ढि विशेऽविशे यज्ञियाय । स्तोमं रुद्राय दृशीकम् ॥ १० ॥

स्तवनांनी जागृत होणाऱ्या हे देवा, यज्ञकर्माशी संबंध असलेल्या प्रत्येक मनुष्यासाठीं रुद्रास प्रिय होईल असें एखादें स्तोत्रे निवडून काढ. ॥ १० ॥

स नो महाँ अनिमानो धूमकेतुः पुरुश्चन्द्रः । धिये वाजाय हिन्वतु ॥ ११ ॥

सः नः महान् अनिऽमानः धूमऽकेतुः पुरुऽचन्द्रः । धिये वाजाय हिन्वतु ॥ ११ ॥

तो अग्नि अत्यन्त थोर आहे, त्याच्या गुणास गणनाच नाहीं. धूम हे त्याच्या ध्वजावरील चिन्ह आहे. व त्याची कीर्ति फार पसरलेली आहे. बुद्धिमत्ता व सामर्थ्य ह्या दोहोंच्या प्राप्तीकरितां तो आमची योजना करो. ॥ ११ ॥

स रेवाँ इव विश्पतिर्दैव्यः केतुः शृणोतु नः । उक्थैरग्निर्बृहद्भानुः ॥ १२ ॥

सः रेवान्ऽइव विश्पतिः दैव्यः केतुः शृणोतु नः । उक्थैः अग्निः बृहत्ऽभानुः ॥ १२ ॥

एखाद्या वैभवशाली राजाप्रमाणें आमच्या स्तुतींनी मोहित होऊन तो अग्नि आमची प्रार्थना श्रवण करो. तो मानवांचा राजा आहे, तो दिव्य सौंदर्याची मूर्ति आहे. त्याचें तेज प्रखर आहे. ॥ १२ ॥

नमो॑ म॒हद्भ्यो॒ नमो॑ अर्भ॒केभ्यो॒ नमो॒ युव॑भ्यो॒ नम॑ आशि॒नेभ्य॑: ।

यजा॑म दे॒वान्यदि॑ श॒क्नवा॑म॒ मा ज्याय॑सः॒ शंस॒मा वृ॑क्षि देवाः ॥ १३ ॥

नमः महत्ऽभ्यः नमः अर्भकेभ्यः नमः युवभ्यः नमः आशिनेभ्यः ।

यजाम देवान् यदि शक्नवाम मा ज्यायसः शंसं आ वृक्षि देवाः ॥ १३ ॥

माझा श्रेष्ठ व्यक्तींना नमस्कार असो, लहानांना माझा नमस्कार असो, जे तरुण असतील त्यांस माझा नमस्कार असो, जे वृद्ध असतील त्यांसही माझा नमस्कार असो. शक्य असेल तर आपण देवांच्या सन्मानार्थ याग करूं या. हे देवहो, जो सर्वांहून थोर आहे त्याची स्तुति माझे हातून कधींही न राहो. ॥ १३ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त २८ (सोमसूक्त)

ऋषी - सुनःशेप आजीगर्ति : देवता - १-४ इंद्र; ५-६ उलूखल;

७-८ उलूखल व मुसळ; ९ प्रजापति : छंद - गायत्री, अनुष्टुभ्

यत्र ग्रावा पृथुबुध्न ऊर्ध्वः भवति सोतवे ।

उलूखलसुतानामवेद्विन्द्र जल्गुलः ॥ १ ॥

यत्र ग्रावा पृथुऽबुध्नः ऊर्ध्वः भवति सोतवे ।

उलूखलऽसुतानां अव इत् ऊं इति इन्द्र जल्गुलः ॥ १ ॥

जे रस सोमवल्लींतून काढण्याकरितां मोठ्या बुडाचा वरवंटा वर न्यावा लागतो, त्या उखळांतून बाहेर पडणाऱ्या सोमरसांचा, हे इंद्रा, तूं उत्सुक्तेने स्वीकार कर. ॥ १ ॥

यत्र द्वाविव जघनाधिषवण्या कृता ।

उलूखलसुतानामवेद्विन्द्र जल्गुलः ॥ २ ॥

यत्र द्वौऽइव जघना अधिऽसवन्या कृता ।

उलूखलऽसुतानां अव इत् ऊं इति इन्द्र जल्गुलः ॥ २ ॥

ज्या सोमरसांकरितां जघनद्वयाप्रमाणे एकमेकांशी संलग्न होणारे दोन रसनिष्पादक पाषाण तयार केलेले असतात त्या उखळांतून बाहेर पडणाऱ्या सोमरसांचा, हे इंद्रा, तूं मोठ्या उत्सुकतेनें स्वीकार कर. ॥ २ ॥

यत्र नार्यपच्यवमुपच्यवं च शिक्षते ।

उलूखलसुतानामवेद्विन्द्र जल्गुलः ॥ ३ ॥

यत्र नारि अपऽच्यवं उपऽच्यवं च शिक्षते ।

उलूखलऽसुतानां अव इत् ऊं इति इन्द्र जल्गुलः ॥ ३ ॥

ज्याच्या योगानें स्त्रीला, हात पुढेमागें करून घुसळावे कसे ह्याचा धडा मिळतो, त्या उखळांतून बाहेर पडणाऱ्या सोमरसांचा, हे इंद्रा, तूं मोठ्या उत्सुकतेनें स्वीकार कर. ॥ ३ ॥

यत्र॒ मन्था॑ विब॒ध्नते॑ र॒श्मीन्यमि॑त॒वा इ॑व ।

उ॒लूख॑लसुताना॒मवेद्वि॑न्द्र जल्गुलः ॥ ४ ॥

यत्र मंथां विऽबध्नते रश्मीन् यमितवैऽइव ।

उलूखलऽसुतानां अव इत् ऊं इति इन्द्र जल्गुलः ॥ ४ ॥

जे सोमरस काढीत असतांना, रवीने भरधांव दौडूं नये म्हणूनचे कीं काय, तिला दोऱ्या बांधलेल्या असतात. त्या उखळांतून बाहेर पडणाऱ्या सोमरसांचा, इंद्रा, तूं मोठ्या उत्सुकतेने स्वीकार कर. ॥ ४ ॥

यच्चि॒द्धि त्वं गृ॒हेगृ॑ह॒ उलू॑खलक यु॒ज्यसे॑ ।

इ॒ह द्यु॒मत्त॑मं वद॒ जय॑तामिव दु॒न्दु॒भिः ॥ ५ ॥

यत् चित् हि त्वं गृहेऽगृह उलूखलक युज्यसे ।

इह द्युमत्ऽतमं वद जयतां इव दुंदुभिः ॥ ५ ॥

हे उखळा, जेव्हां जेव्हां प्रत्येक घरांत तुला उपयोगांत आणले जाईल त्यावेळी विजयी सेनेच्या सन्मानार्थ दुमदुमणाऱ्या दुंदुभीप्रमाणें गंभीर ध्वनि करीत जा. ॥ ५ ॥

उ॒त स्म॑ ते वनस्पते॒ वातो॒ वि वा॒त्यग्र॒मित् ।

अथो॒ इंद्रा॑य॒ पात॑वे सु॒नु सोम॑मुलूखल ॥ ६ ॥

उत स्म ते वनस्पते वातः वि वाति अग्रं इत् ।

अथो इति इंद्राय पातवे सुनु सोमं उलूखल ॥ ६ ॥

हे उत्तम काष्ठा, तुझ्या समोरच हा वारा वहात आहे. हे उखळा, इंद्रास सोमपान घडावें म्हणून तूं सोमरस तयार कर. ॥ ६ ॥

आयजी वाजसातमा ता ह्यु१च्चा विजर्भृतः ।

हरी इवान्धांसि बप्संता ॥ ७ ॥

आयजी इत्याऽयजि वाजऽसातमा ता हि उच्चा विऽजर्भृतः ।

हरी इवेति हरीऽइव अंधांसि बप्सता ॥ ७ ॥

हीं दोन यज्ञसंबंधी उपकरणें - कीं ज्यांच्यामुळे सामर्थ्याचा अत्यंत लाभ होतो - तीं, घोडे गवत खात असतां जशा प्रकरचा आवाज करतात, तशा प्रकारचा ध्वनि उत्पन्न करीत आहेत. ॥ ७ ॥

ता नौ अद्य वनस्पती ऋष्वावृष्वेभिः सोतृभिः ।

इंद्राय मधुमत्सुतम् ॥ ८ ॥

ता नः अद्य वनस्पती इति ऋष्वौ ऋष्वेभिः सोतृऽभिः ।

इंद्राय मधुऽमत् सुतम् ॥ ८ ॥

तर हे उच्चत्वाने शोभणाऱ्या उत्तम काष्ठोपकरणांनो, सोमनिष्पादनांत तरबेज असलेल्या ऋत्विजांची मदत घेऊन इंद्रासाठीं मधुर सोमरस तयार करा. ॥ ८ ॥

उच्छि॒ष्टं च॒म्वोर्भ॑र॒ सोमं॑ प॒वित्र॒ आ सृ॑ज ।

नि धे॑हि॒ गोरधि॑ त्व॒चि ॥ ९ ॥

उत् शिष्टं चम्वोः भर सोमं पवित्रे आ सृज ।

नि धेहि गोः अधि त्वचि ॥ ९ ॥

जो सोमरस खाली पडला असेल तो दोन चमसांत भर व पवित्र दर्भातून गाळण्याकरितां ओत. वृषभाच्या चर्मावर तो नेऊन ठेव. ॥ ९ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त २९ (इंद्रसूक्त)

ऋषी - सुनःशेप आजीगर्ति : देवता - इंद्र : छंद - पंक्ति

यच्चिद्धि सत्य सोमपा अनाशस्ता इव स्मसि ।

आ तू न इंद्र शंसय गोष्वश्वेषु शुभ्रिषु सहस्रेषु तुवीमघ ॥ १ ॥

यत् चित् हि सत्य सोमऽपाः अनाशस्ताःऽइव स्मसि ।

आ तु नः इंद्र शंसय गोषु अश्वेषु शुभ्रिषु सहस्रेषु तुवीऽमघ ॥ १ ॥

हे सत्यस्वरूप व अत्यंत उदार इंद्रा, ज्या अर्थी आम्हांस कोठेंच मान नाहीं असे झाले आहे, त्या अर्थी धेनु, अश्व, उज्ज्वल धन, व सहस्रावधि भोग्यवस्तु ह्यांचेसंबंधात आमचे वर्चस्व सत्वर वाढेल असें कर. ॥ १ ॥

शिप्रिन्वाजानां पते शचीवस्तव दंसना ।

आ तू न इंद्र शंसय गोष्वश्वेषु शुभ्रिषु सहस्रेषु तुवीमघ ॥ २ ॥

शिप्रिन् वाजानां पते शचीवः तव दंसना ।

आ तू नः इंद्र शंसय गोषु अश्वेषु शुभ्रिषु सहस्रेषु तुवीऽमघ ॥ २ ॥

हे सुंदर मुकुट धारण करणाऱ्या अत्यंत उदार इंद्रा, हे सामर्थ्याधिपते, हे पराक्रमी देवा, आपल्या अद्‌भुत कृतीनें धेनु, अश्व, उज्ज्वल धन, व सहस्रावधि भोग्यवस्तु ह्यांचे संबंधात आमचे वर्चस्व सत्वर वाढेल असें कर. ॥ २ ॥

नि ष्वा॑पया मिथू॒दृशा॑ स॒स्तामबु॑ध्यमाने ।

आ तू न॑ इंद्र शंसय॒ गोष्वश्वे॑षु शु॒भ्रिषु॑ स॒हस्रे॑षु तुवीमघ ॥ ३ ॥

नि ष्वापया मिथूदृशा सस्तां अबुध्यमाने ।

आ तू न इंद्र शंसय गोष्व् अश्वेषु शुभ्रिषु सहस्रेषु तुवीमघ ॥ ३ ॥

परस्पराकडे एकसारखी नजर फेंकणाऱ्या त्या दोघीजणींस निद्रित कर. त्या जाग्या न होतां पडून राहतील असें कर. हे अत्यंत उदार इंद्रा, धेनु, अश्व, उज्ज्वल धन, व सहस्रावधि भोग्यवस्तु ह्यांचे संबंधात आमचे वर्चस्व सत्वर वाढेल असें कर. ॥ ३ ॥

स॒सन्तु॑ त्या अरा॑तयो॒ बोध॑न्तु शूर रा॒तयः॑ ।

आ तू न॑ इंद्र शंसय॒ गोष्वश्वे॑षु शु॒भ्रिषु॑ स॒हस्रे॑षु तुवीमघ ॥ ४ ॥

ससंतु त्याः अरातयः बोधंतु शूर रातयः ।

आ तु नः इंद्र शंसय गोषु अश्वेषु शुभ्रिषु सहस्रेषु तुवीऽमघ ॥ ४ ॥

ते आमचे शत्रु निद्रित असोत, व हे शूरा, आमचे स्नेही मात्र जागृत राहोत. हे अत्यंत उदार इंद्रा, धेनु, अश्व, उज्ज्वल धन, व सहस्रावधि भोग्यवस्तु ह्यांचे संबंधात आमचे वर्चस्व सत्वर वाढेल असें कर. ॥ ४ ॥

समि॑न्द्र गर्द॒भं मृ॑ण नु॒वन्तं॑ पा॒पया॑मु॒या ।

आ तू न॑ इंद्र शंसय॒ गोष्वश्वे॑षु शु॒भ्रिषु॑ स॒हस्रे॑षु तुवीमघ ॥ ५ ॥

सं इंद्र गर्दभं मृण नुवंतं पापया अमुया ।

आ तु नः इंद्र शंसय गोषु अश्वेषु शुभ्रिषु सहस्रेषु तुवीऽमघ ॥ ५ ॥

असली अभद्र भाषा बोलणाऱ्या गाढवास मारून टाक. हे अत्यंत उदार इंद्रा, धेनु, अश्व, उज्ज्वल धन, व सहस्रावधि भोग्यवस्तु ह्यांचे संबंधात आमचे वर्चस्व सत्वर वाढेल असें कर. ॥ ५ ॥

पता॑ति कुण्डृ॒णाच्या॑ दू॒रं वात॒ः वना॒दधि॑ ।

आ तू न॑ इंद्र शंसय॒ गोष्वश्वे॑षु शु॒भ्रिषु॑ स॒हस्रे॑षु तुवीमघ ॥ ६ ॥

पताति कुण्डृणाच्या दूरं वातः वनात् अधि ।

आ तु नः इंद्र शंसय गोषु अश्वेषु शुभ्रिषु सहस्रेषु तुवीऽमघ ॥ ६ ॥

वक्र मार्गाने गमन करणाऱ्या वाताचें फार दूर अशा अरण्याच्याही पलीकडे पतन होवो. हे अत्यंत उदार इंद्रा, धेनु, अश्व, उज्ज्वल धन, व सहस्रावधि भोग्यवस्तु ह्यांचे संबंधात आमचे वर्चस्व सत्वर वाढेल असें कर. ॥ ६ ॥

सर्वं परिक्रोशं जहि जम्भया कृकदाश्वम् ।

आ तू न इंद्र शंसय गोष्वश्वेषु शुभ्रिषु सहस्रेषु तुवीमघ ॥ ७ ॥

सर्वं परिऽक्रोशं जहि जम्भय कृकदाश्वम् ।

आ तु नः इंद्र शंसय गोषु अश्वेषु शुभ्रिषु सहस्रे षु तुवीऽमघ ॥ ७ ॥

सर्व शोकांचा संहार कर. आणि जो कोणी अमचा नाश करणास टपून बसला असेल त्यास मारून टाक. हे अत्यंत उदार इंद्रा, धेनु, अश्व, उज्ज्वल धन, व सहस्रावधि भोग्यवस्तु ह्यांचे संबंधात आमचे वर्चस्व सत्वर वाढेल असें कर. ॥ ७ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त ३० (इंद्र, अश्विनीलुमार, उषासूक्त)

ऋषी - सुनःशेप आजीगर्ति : देवता - १-१६ इंद्र; १७-१९ अश्विनीकुमारा;

२०-२२ उषा : छंद - पादनिचृद्गायत्री, त्रिष्टुभ् व गायत्री

आ व॒ इंद्रं॒ क्रिविं॑ यथा वाज॒यन्तः॑ श॒तक्र॑तुम् । मंहि॑ष्ठं सिञ्च॒ इन्दु॑भिः ॥ १ ॥

आ व इंद्रं क्रिविं यथा वाजयन्तः शतक्रतुम् । मंहिष्ठं सिञ्च इन्दुभिः ॥ १ ॥

ज्याचे सामर्थ्य शतपट मोठे आहे, व जो तुम्हांस प्रिय आहे, अशा इंद्राची स्तुति करण्यांत निमग्न झालेल्या अहो ऋत्विजांनो, ज्याप्रमाणें एखादी विहीर पाण्यानें तुडुंब भरून टाकावी त्याप्रमाणे त्या अति उदार इंद्रास आम्ही सोमरसानें जणू भरून टाकीत आहों. ॥ १ ॥

श॒तं वा॒ यः शुची॑नां स॒हस्रं॑ वा॒ समा॑शिराम् । एदु॑ नि॒म्नं न री॑यते ॥ २ ॥

शतं वा यः शुचीनां सहस्रं वा संऽआशिराम् । आ इत् ऊं इति निम्नं न रीयते ॥ २ ॥

ज्याप्रमाणे जल उतरत्या भागाकडे वहात जातें त्याप्रमाणें ह्या इंद्राची सोमरसाकडे साहजिक प्रवृत्ति होते. मग ते दुग्धमिश्रित सोमाचे हजार चमस असोत अथवा ज्यांत कांहीही मिश्र केलेले नाही अशा शुद्ध सोमाचे शंभरच चमस असोत. ॥ २ ॥

सं यन्मदा॑य शु॒ष्मिण॑ ए॒ना ह्य॑स्यो॒दरे॑ । स॒मु॒द्रो न व्यचो॑ द॒धे ॥ ३ ॥

सं यत् मदाय शुष्मिणे एना हि अस्य उदरे । समुद्रः न व्यचः दधे ॥ ३ ॥

जो सोमरस ह्या सामर्थ्यवान इंद्रास संतोष देत असतो त्याच्या योगानें त्याचें उदर समुद्राप्रमणे व्यापून जातें. ॥ ३ ॥

अ॒यमु॑ ते॒ सम॑तसि क॒पोत॑ इव गर्भ॒धिम् । व॒चस्तच्चि॑न्न ओहसे ॥ ४ ॥

अयं ऊं इति ते सं अतसि कपोतःऽइव गर्भऽधिम् । वचः तत् चित् नः ओहसे ॥ ४ ॥

हा सोम तुझाकरितां तयार करून ठेविला आहे. ज्याप्रमाणे कपोत पक्षी आपल्या लहान पिलांकडे प्रेमाने जातो त्याप्रमाणें तूं मोठ्या प्रेमानें ह्या सोमरसाकडे येत आहेस. आणि म्हणूनच आमच्या स्तुतीचाही तूं स्वीकार करीत आहेस. ॥ ४ ॥

स्तो॒त्रं रा॑धानां पते॒ गिर्वा॑हो वीर॒ यस्य॑ ते । विभू॑तिरस्तु सू॒नृता॑ ॥ ५ ॥

स्तोत्रं राधानां पते गिर्वाहः वीर यस्य ते । विऽभूतिः अस्तु सूनृता ॥ ५ ॥

हे इंद्रा, तूं सर्व अभीष्ट वस्तूंचा स्वामी आहेस व तुझी स्तुति केली म्हणजे तूं आपल्या भक्तांकडे येतोस. हे वीरा, ज्या तुझें स्तोत्र आम्ही गात आहों, त्या तुजकडून आम्हांस सत्यप्रेमानें परिपूरीत असे वैभव प्राप्त होऊं दे. ॥ ५ ॥

ऊ॒र्ध्वस्ति॑ष्ठा न ऊ॒तये॑ऽ॒स्मिन्वाजे॑ शतक्रतो । सम॒न्येषु॑ ब्रवावहै ॥ ६ ॥

ऊर्ध्वः तिष्ठा नः ऊतये अस्मिन् वाजे शतक्रतो इति शतऽक्रतो । सं अन्येषु ब्रवावहै ॥ ६ ॥

हे अत्यंत बलशाली इंद्रा, पराक्रमाच्या ह्या कृत्यांत आमचें संरक्षण करण्याकरितां तूं उठून उभा रहा. इतरांना सोडून आपणच एकमेकांशी संभाषण करूं या. ॥ ६ ॥

योगेयोगे तवस्तरं वाजेवाजे हवामहे । सखाय इंद्रमूतये ॥ ७ ॥

योगेऽयोगे तवःऽतरं वाजेऽवाजे हवामहे । सखायः इंद्रं ऊतये ॥ ७ ॥

जेव्हां वैभव प्राप्त करून घेण्याची संधि येईल अथवा जेव्हां जेव्हां शौर्यकर्म गाजविण्याचा प्रसंग पडेल तेव्हां तेव्हां आमच्या संरक्षणाकरितां आम्ही इंद्राचे स्नेहांकित भक्त, त्या अत्यन्त बलाढ्य इंद्रास पाचारण करतो. ॥ ७ ॥

आ घा गमद्यदि श्रवत्सहस्रिणीभिरूतिभिः । वाजेभिरुप नो हवम् ॥ ८ ॥

आ घ गमत् यदि श्रवत् सहस्रिणीभिः ऊतिभिः । वाजेभिः उप नः हवम् ॥ ८ ॥

जर आमची स्तुति त्यास ऐकूं गेली असेल तर आपले हजारो प्रकारचे संरक्षणाचे मार्ग प्रकट करीत व आपलें सामर्थ्य निदर्शनास आणीत हा इंद्र आमच्या हांकेच्या अनुरोधानें निःसंशय येथें प्राप्त होईल. ॥ ८ ॥

अनु प्रत्नस्यौकसो हुवे तुविप्रतिं नरम् । यं ते पूर्वं पिता हुवे ॥ ९ ॥

अनु प्रत्नस्य ओकसः हुवे तुविऽप्रतिं नरम् । यं ते पूर्वं पिता हुवे ॥ ९ ॥

ज्या इंद्राचा पूर्वी तुझ्या पित्यानें धांवा केला होता त्याच अनेक शत्रूंसही दाद न देणाऱ्या शूर इंद्रास आपल्या पुरातन दिव्य स्थानापासून इकडे येण्यासाठीं मी विनंति करतो. ॥ ९ ॥

तं त्वा॑ व॒यं वि॑श्ववा॒रा शा॑स्महे पुरुहूत । सखे॑ वसो जरि॒तृभ्यः᳚ ॥ १० ॥

तं त्वा वयं विश्वऽवार शास्महे पुरुऽहूत । सखे वसो इति जरितृऽभ्यः ॥ १० ॥

हे आमच्या प्रिय इंद्रा, त्या तुझी आज आम्ही स्तुति करीत आहों. सर्व विश्वांत प्रेम करण्यास तुझ्याशिवाय कोणी योग्य नाही. अनेक विद्वानांनी तुझे स्तवन केले आहे. तुझी स्तोत्रें गाणाऱ्या भक्तांचे तूं मूर्तिमंत भाग्यच आहेस. ॥ १० ॥

अ॒स्माकं᳚ शि॒प्रिणी॑नां॒ सोम॑पाः सोम॒पाव्ना॑म् । सखे॑ वज्रि॒न्सखी॑नाम् ॥ ११ ॥

अस्माकं शिप्रिणीनां सोमपाः सोमऽपाव्नाम् । सखे वज्रिन् सखीनाम् ॥ ११ ॥

हे वज्रधारी इंद्रा, तूं आमचा व आमच्या सहचारिणींचा हितकर्ता आहेस. सोमरस प्रिय असणाऱ्या सर्व देवांत तुलाच सोमाची अत्यंत आवड आहे. ॥ ११ ॥

तथा॒ तद॑स्तु सोमपाः॒ सखे॑ वज्रि॒न्तथा॑ कृणु । यथा॑ त उ॒श्मसी॒ष्टये॑ ॥ १२ ॥

तथा तत् अस्तु सोमऽपाः सखे वज्रिन् तथा कृणु । यथा ते उश्मसि इष्टये ॥ १२ ॥

हे वज्रधारी इंद्रा, हे आमचे मित्रा, तूं असें कर - तुझ्या इच्छेने असें होऊं दे - कीं आम्ही तुझ्याच कृपेची इच्छा करावी. ॥ १२ ॥

रे॒वती॑र्नः सध॒माद॒ इंद्रे॑ सन्तु तु॒विवा॑जाः । क्षु॒मन्तः॒ याभि॒र्मदे॑म ॥ १३ ॥

रेवतीः नः सधऽमाद इंद्रे संतु तुविऽवाजाः । क्षुऽमंतः याभिः मदेम ॥ १३ ॥

आमच्या सहवासांत इंद्रास आनंद वाटून वैभवानें युक्त व समृद्धिने परिपूर्ण असे अतिशय सामर्थ्य आम्हांस प्राप्त होवो, कीं ज्याच्या योगाने आम्हांस हर्ष होईल. ॥ १३ ॥

आ घ॒ त्वावा॒न्त्मना॒प्तः स्तो॒तृभ्यो॑ धृष्णविया॒नः । ऋ॒णोरक्षं॒ न च॒क्र्योः ॥ १४ ॥

आ घ त्वाऽवान् त्मना आप्त स्तोतृऽभ्यः धृष्णो इति इयानः । ऋणोः अक्षं न चक्र्योः ॥ १४ ॥

तुला तुझीच उपमा दिली पाहिजे. तूं आमचा आप्त आहेस. तुझी प्रार्थना केली असतां, हे शूर देवा, तूं भक्तांच्याकरितां रथचक्राच्या अक्षाप्रमाणें धांव घेतलेली आहेस. ॥ १४ ॥

आ यद्दुवः शतक्रतवा कामं जरितॄणाम् । ऋणोरक्षं न शचीभिः ॥ १५ ॥

आ यत् दुवः शतक्रतोअ इति शतऽक्रतो आ कामं जरितॄणाम् । ऋणोः अक्षं न शचीभिः ॥ १५ ॥

हे अत्यंत बुद्धिशाली इंद्रा, तुझ्या सेवकांचे हवि ग्रहण करण्याकरितां आणि त्यांच्या इच्छा परिपूर्ण करण्याकरितां तूं आपल्या सर्व सामर्थ्यासह रथचक्राच्या अक्षाप्रमाणें धांव घेतलीस. ॥ १५ ॥

शश्वदिंद्रः पोप्रुथद्भिर्जिगाय नानदद्भिः शाश्वसद्भिर्धनानि ।

स नो हिरण्यरथं दंसनावान्स नः सनिता सनये स नोऽदात् ॥ १६ ॥

शश्वत् इंद्रः पोप्रुथत्ऽभिः जिगाय नानदत्ऽभिः शाश्वसत्ऽभिः धनानि ।

सः नः हिरण्यऽरथं दंसनाऽवान् सः नः सनिता सनये सः नः अदात् ॥ १६ ॥

आपल्या अतिशय फुरफुरणाऱ्या, खिंकाळणाऱ्या आणि जोरानें श्वासोच्छ्वास करणाऱ्या अश्वांच्या योगाने इंद्राने नेहमीच संपत्ति जिंकून आणलेली आहे. अशा त्या अद्‌भुत कृत्य करणाऱ्या व आमच्या संबंधाने औदार्य करणाऱ्या देवानें आमच्या वैभवांत भर टाकण्यास आम्हांस सुवर्णरथ दिला आहे. ॥ १६ ॥

आश्वि॑ना॒वश्वा॑वत्ये॒षा या॑तं॒ शवी॑रया । गोम॑द्दस्रा॒ हिर॑ण्यवत् ॥ १७ ॥

आ अश्विनौ अश्वावत्या एषा यातं शवीरया । गोऽमत् दस्रा हिरण्यऽवत् ॥ १७ ॥

हे अश्विनहो, अश्वादिकांनी परिपूर्ण व कल्याणप्रद अशी संपत्ति घेऊन या. अहो सुंदर देवांनो, तुम्ही दिलेल्या वैभवांत धेनु आणि सुवर्ण यांचा भरपूर सांठा असो. ॥ १७ ॥

स॒मा॒नयो॑जनो॒ हि वां॒ रथो॑ दस्रा॒वम॑र्त्यः । स॒मु॒द्रे अ॑श्वि॒नेय॑ते ॥ १८ ॥

समानऽयोजनः हि वां रथः दस्रौ अमर्त्यः । समुद्रे अश्विना ईयते ॥ १८ ॥

हे सुंदर अश्विनहो, जो अविनाशी रथ तुम्ही दोघांकरितां मिळून जोडतां तो खरोखर समुद्रातसुद्धां गमन करतो. ॥ १८ ॥

न्य१घ्न्यस्य मूर्धनि चक्रं रथस्य येमथुः । परि द्यामन्यदीयते ॥ १९ ॥

नि अघ्न्यस्य मूर्धनि चक्रं रथस्य येमथुः । परि द्यां अन्यत् ईयते ॥ १९ ॥

अभेद्य अशा पर्वताच्याही मस्तकावर तुम्ही आपल्या रथाचें एक चाक भिडविले होते. दुसरें चाक द्युलोकाच्या सभोंवार भ्रमण करीत असतें. ॥ १९ ॥

कस्त उषः कधप्रिये भुजे मर्तो अमर्त्ये । कं नक्षसे विभावरि ॥ २० ॥

कः ते उषः कधऽप्रिये भुजे मर्तः अमर्त्ये । कं नक्षसे विभाऽवरि ॥ २० ॥

हे स्तुतिप्रिय उषे, हे अमर देवते, तुझ्या बाहुबंधनांत कोणत्या मानवास स्थान मिळणर आहे. हे देदीप्यमान देवि, तुझें आगमन कोणाकरितां होत आहे ? ॥ २० ॥

वयं हि ते अमन्मह्यान्तादा पराकात् । अश्वे न चित्रे अरुषि ॥ २१ ॥

वयं हि ते अमन्महि आ अंतात् आ पराकात् । अश्वे न चित्रे अरुषि ॥ २१ ॥

चित्रविचित्र वर्णाच्या एखाद्या तुरगीप्रमाणे शोभिवंत दिसणाऱ्या हे प्रकाशमान उषा देवते, आम्ही दूर असतांना व जवळ असतांना तुझेंच ध्यान खरोखर करीत होतो. ॥ २१ ॥

त्वं त्येभि॒रा ग॑हि॒ वाजे॑भिर्दुहितर्दिवः । अ॒स्मे र॒यिं नि धा॑रय ॥ २२ ॥

त्वं त्येभिः आ गहि वाजेभिः दुहितः दिवः । अस्मे इति रयिं नि धारय ॥ २२ ॥

हे आकाशकन्ये उषे, आपल्या सर्व सामर्थ्यासह तूं इकडे गमन कर, आणि आमचेसाठी वैभव आणून ठेव. ॥ २२ ॥

ॐ तत् सत्

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त ३१ (अग्निसूक्त)

ऋषी - हिरण्यस्तूप अङ्गिरस : देवता - अग्नि : छंद - त्रिष्टुभ्, जगती

त्वम॑ग्ने प्रथ॒मो अङ्गि॑रा॒ ऋषि॑र्दे॒वो दे॒वाना॑मभवः शि॒वः सखा॑ ।

तव॑ व्र॒ते क॒वयो॑ विद्म॒नाप॒सोऽ॑जायन्त म॒रुतः॒ भ्राज॑दृष्टयः ॥ १ ॥

त्वं अग्ने प्रथमः अङ्गिराः ऋषिः देवः देवानां अभवः शिवः सखा ॥

तव व्रते कवयः विद्मनाऽअपसः अजायंत मरुतः भ्राजत्ऽऋष्टयः ॥ १ ॥

हे अग्निदेवा, पहिला अंगिरा ऋषि व देव तूंच आहेस. देवांचा कल्याणकारक मित्र तूंच होतास. तुझ्या आज्ञानुसार देदीप्यमान शस्त्रें धारण करणारे व ज्ञानसामर्थ्यानें युक्त असलेले बुद्धिमान् मरुद्गण अवतीर्ण झाले. ॥ १ ॥

त्वम॑ग्ने प्र॒थमो अङ्गि॑रस्तमः क॒विर्दे॒वानां॒ परि॑ भूषसि व्र॒तम् ।

वि॒भुर्विश्व॑स्मै॒ भुव॑नाय॒ मेधि॑रो द्विमा॒ता श॒युः क॑ति॒धा चि॑दा॒यवे॑ ॥ २ ॥

त्वं अग्ने प्रथमः अङ्गिरःऽतमः कविः देवानां परि भूषसि व्रतम् ॥

विऽभुः विश्वस्मै भुवनाय मेधिरः द्विऽमाता शयुः कतिधा चित् आयवे ॥ २ ॥

हे अग्निदेवा, अगदी पहिला आणि प्रमुख अंगिरा तूंच आहेस. तुझें ज्ञान अतिशय आहे. देवांच्या ज्या पवित्र आज्ञा आहेत त्यांना तूंच शोभा आणतोस. तूं सर्वव्यापी आहेस, तुझ्या अंगी विलक्षण बुद्धिमत्ता आहे. तुला दोन मातांनी जन्म दिला होता. खरोखर प्राणिमात्राच्या व मनुष्याच्या हिताकरितां तूं कितीतरी ठिकाणी वास करतोस. ॥ २ ॥

त्वम॑ग्ने प्र॒थमो मा॑त॒रिश्व॑न आ॒विर्भ॑व सुक्र॒तूया वि॒वस्व॑ते ।

अरे॑जेतां॒ रोद॑सी होतृ॒वूर्येऽ॑सघ्नोर्भा॒रमय॑जो म॒हो व॑सो ॥ ३ ॥

त्वं अग्ने प्रथमः मातरिश्वने आविः भव सुक्रतुऽया विवस्वते ॥

अरेजेतां रोदसी इति होतृऽवूर्ये असघ्नोः भारं अयजः महः वसो इति ॥ ३ ॥

हे अग्निदेवा, तूंच सर्वांचे अगोदर होतास. आपल्या सामर्थ्यासह विवस्वान् आणि मातरिश्वा ह्यांचेकरितां तूं प्रकट हो. तूं मूर्तिमान वैभवच आहेस. जेव्हां होतृस्थानी सर्वांनी तुझी निवडणूक केली त्यावेळी तो कार्यभार तूं सहन केलास आणि सर्व श्रेष्ठ देवांस यज्ञ पोंचविलास. आकाश आणि पृथ्वीमात्र तें पाहून आश्चर्यानें कंपित होऊन गेलीं. ॥ ३ ॥

त्वम॑ग्ने॒ मन॑वे॒ द्याम॑वाशयः पु॒रू॒रव॑से सु॒कृते॑ सु॒कृत्त॑रः ।

श्वा॒त्रेण॒ यत्पि॒त्रोर्मुच्य॑से॒ पर्या त्वा॒ पूर्व॑मनय॒न्नाप॑रं॒ पुनः॑ ॥ ४ ॥

त्वं अग्ने मनवे द्यां अवाशयः पुरूरवसे सुकृते सुऽकृत्ऽतरः ॥

श्वात्रेण यत् पित्रोः मुच्यसे परि आ त्वा पूर्वं अनयन् आ अपरं पुनरिति ॥ ४ ॥

हे अग्निदेवा, मनूचेकरितां तूं द्युलोकांत प्रवेश केलास आणि सत्कृत्यांनी विख्यात झालेल्या पुरूरव्याकरितां तूं अतिशय प्रशंसनीय कृति केलीस. ज्यावेळीं घर्षणक्रियेने तुझ्या माता पितरांकडून तुझी प्रेरणा होते, त्यावेळी ऋत्विजलोक तुला प्रथम पूर्वबाजूस अणि नंतर पुन्हां पश्चिमबाजूस घेऊन फिरतात. ॥ ४ ॥

त्वम॑ग्ने वृ॒ष॒भः पु॑ष्टि॒वर्ध॑न॒ उद्य॑तस्रुचे भवसि श्र॒वाय्यः॑ ।

य आहु॑तिं॒ परि॒ वेदा॒ वष॑ट्कृति॒मेका॑यु॒रग्रे॒ विश॑ आ॒विवा॑ससि ॥ ५ ॥

त्वं अग्ने वृषभः पुष्टिऽवर्धन उद्यतऽस्रुचे भवसि श्रवाय्यः ॥

यः आऽहुतिं परि वेद वषट्ऽकृतिं एकऽआयुः अग्रे विशः आऽविवाससि ॥ ५ ॥

हे अग्निदेवा, तुला हवि अर्पण करण्याकरितां जो मनुष्य यज्ञचमस वर उचलतो त्याच्या संपत्तीची तूं वृद्धि करण्यास अत्यंत बलिष्ठ व कीर्तिमान् आहेस. वषट् या शब्दांनी जी आहुति दिली जाते तिचे ज्ञान असणाऱ्या ऋत्विजास तूं सर्वांचे अगोदर अखंड आयुष्य अर्पण करीत या जगतावर वास करतोस. ॥ ५ ॥

त्वम॑ग्ने वृजि॒नव॑र्तनिं॒ नरं॒ सक्म॑न्पिपर्षि वि॒दथे॑ विचर्षणे ।

यः शूर॑साता॒ परि॑तक्म्ये॒ धने॑ द॒भ्रेभि॑श्चि॒त्सम॑ृता॒ हंसि॒ भूय॑सः ॥ ६ ॥

त्वं अग्ने वृजिनऽवर्तनिं नरं सक्मन् पिपर्षि विदथे विऽचर्षणे ॥

यः शूरऽसाता परिऽतक्म्ये धने दभ्रेभिः चित् संऽऋता हंसि भूयसः ॥ ६ ॥

हे सर्वव्यापी अग्निदेवा, जो मनुष्य पापमार्गाचे अवलंबन करतो, त्यास तूं योग्य कर्मास प्रवृत्त करतोस. शूरांनीच मिळविण्यास योग्य अशा संपत्तिविषयीं युद्ध चालले असतां तू अनेक शत्रूंना थोड्याच लोकांचे हांतून मारवितोस. ॥ ६ ॥

त्वं तम॑ग्ने अमृत॒त्व उ॑त्त॒मे मर्तं॑ दधासि॒ श्रव॑से दि॒वेदि॑वे ।

यस्ता॑तृषा॒ण उ॒भया॑य॒ जन्म॑ने॒ मयः॑ कृ॒णोषि॒ प्रय॒ आ च॑ सू॒रये॑ ॥ ७ ॥

त्वं तं अग्ने अमृतऽत्व उत्ऽतमे मर्तं दधासि श्रवसे दिवेऽदिवे ॥

यः ततृषाणः उभयाय जन्मने मयः कृणोषि प्रयः आ च सूरये ॥ ७ ॥

हे अग्निदेवा, या मनुष्याची रोजचे रोज कीर्ति वाढवीत तूं त्यास उत्तम अविनाशी पदावर चढवितोस. विद्वान् भक्तांकरितां तुझे अंतःकरण अतिशय उत्कंठित होऊन तूं त्यास दोन्ही जन्मास पुरेल इतकी समृद्धि व सौख्यें अर्पण करतोस. ॥ ७ ॥

त्वं नो॑ अग्ने स॒नये॒ धना॑नां य॒शसं॑ का॒रुं कृ॑णुहि॒ स्तवा॑नः ।

ऋ॒ध्याम॒ कर्मा॒पसा॒ नवे॑न दे॒वैर्द्या॑वापृथिवी॒ प्राव॑तं नः ॥ ८ ॥

त्वं नः अग्ने सनये धनानां यशसं कारुं कृणुहि स्तवानः ॥

ऋध्याम कर्मा अपसा नवेन देवैः द्यावापृथिवी इति प्र अवतं नः ॥ ८ ॥

हे अग्निदेवा, आम्ही धनप्राप्तीकरितां तुझें स्तवन करीत असल्यामुळें आम्हांस श्रेयस्कर अशी कीर्ति अर्पण कर. नवीन कृति आचरून आम्ही तुझे यजनकर्म सांग करू. हे द्यावा-पृथिवींनो सर्व देवांसह आमचे संरक्षण करा. ॥ ८ ॥

त्वं नो॑ अग्ने पि॒त्रोरु॒पस्थ॒ आ दे॒वः दे॒वेष्व॑नवद्य॒ जागृ॑विः ।

तनूकृद्बोधि प्रमतिश्च कारवे त्वं कल्याण वसु विश्वमोपिषे ॥ ९ ॥

त्वं नः अग्ने पित्रोः उपस्थे आ देवः देवेषु अनवद्य जागृविः ॥

तनूऽकृत् बोधि प्रऽमतिः च कारवे त्वं कल्याण वसु विश्वं आ उपिषे ॥ ९ ॥

हे निष्कलंक अग्निदेवा, सर्व देवांत तूं श्रेष्ठ देव आहेस. तुझा निवास अगदी मातापितरांच्या सन्निध असतो. तूं आमचेकरितां जागृत रहा. सर्वांची शरीरें निर्माण करणार जो तूं तो आपली भक्ति करणाऱ्या संबंधाने अतिशय प्रेम बाळग व जागरूक रहा. तूं प्रत्यक्ष कल्याणच आहेस; तूं सर्व प्रकारचें द्रव्य सर्वत्र पेरून ठेवीत असतोस. ॥ ९ ॥

त्वमग्ने प्रमतिस्त्वं पितासि नस्त्वं वयस्कृत्तव जामयो वयम् ।

सं त्वा रायः शतिनः सं सहस्रिणः सुवीरं यन्ति व्रतपामदाभ्य ॥ १० ॥

त्वं अग्ने प्रऽमतिः त्वं पिता असि नः त्वं वयःऽकृत् तव जामयः वयम् ॥

सं त्वा रायः शतिनः सं सहस्रिणः सुऽवीरं यंति व्रतऽपां अदाभ्य ॥ १० ॥

हे अग्निदेवा, तुझे अंतःकरण अत्यंत दयाशील आहे. तूं आमचा पिता आहेस. आम्ही तुझे आप्त आहोंत. हे अजिंक्य देवा, शेंकडो किंबहुना हजारो सुखांनी परिपूर्ण अशी संपत्ति तुझ्याकडे आपोआप चालून येते. तूं अतिशय शूर व आपल्या आज्ञांचे परिपालन करविणारा आहेस. ॥ १० ॥

त्वाम॑ग्ने प्र॒थ॒मम॒ायुम॒ायवे॑ दे॒वा अ॑कृण्व॒न्नहु॑षस्य वि॒श्पति॑म् ।

इळा॑मकृण्व॒न्मनु॑षस्य॒ शास॑नीं पि॒तु॒र्यत्पु॒त्रो मम॑कस्य॒ जाय॑ते ॥ ११ ॥

त्वां अग्ने प्रथमं आयुं आयवे देवा अकृण्वन् नहुषस्य विश्पतिम् ॥

इळां अकृण्वन् मनुषस्य शासनीं पितुः यत् पुत्रः ममकस्य जायते ॥ ११ ॥

हे अग्निदेवा, सर्व जगताचे आयुष्य तुजवर अवलंबून आहे. सर्वांचे आयुष्यवर्धन होण्याकरितांच देवांनी तुला प्रथम उत्पन्न करून नहुषाचा सेनापति केले. त्याचप्रमाणे ज्या वेळीं माझ्या पित्यास पुत्रप्राप्ति झाली, त्यावेळीं मनुष्यमात्रास सज्ञान करणारी इळाही तूं उत्पन्न केलीस. ॥ ११ ॥

त्वं नो॑ अग्ने॒ तव॑ देव पा॒युभि॑र्म॒घोनो॑ रक्ष त॒न्वश्च वन्द्य ।

त्रा॒ता तो॒कस्य॒ तन॑ये॒ गवा॑म॒स्यनि॑मेषं॒ रक्ष॑माण॒स्तव॑ व्र॒ते ॥ १२ ॥

त्वं नः अग्ने तव देव पायुऽभिः मघोनः रक्ष तन्वः च वन्द्य ॥

त्राता तोकस्य तनये गवां असि अनिऽमेषं रक्षमाणः तव व्रते ॥ १२ ॥

हे वंदनीय अग्निदेवा, तूं आपल्या सर्वसंरक्षक अशा शक्तींच्या योगाने आमचे व आमच्यावर उपकार करणारांचे प्रतिपालन कर. आपल्या नियमास अनुसरून एक निमिषही न विसंबतां तूं जगाचे रक्षण करतोस. आमचे हे कौटुंबिक वैभव परंपरेने असेंच स्थिर राहण्याकरितां तूं आमच्या मुलाबाळांचा व गाईवासरांचाही सांभाळ करीत असतोस. ॥ १२ ॥

त्वम॑ग्ने॒ यज्य॑वे पा॒युरन्त॑रोऽनिष॒ङ्गाय॑ चतुर॒क्ष इ॑ध्यसे ।

यो रा॒तह॑व्योऽवृ॒काय॒ धाय॑से की॒रेश्चि॒न्मंत्रं॒ मन॑सा व॒नोषि॒ तम् ॥ १३ ॥

त्वं अग्ने यज्यवे पायुः अन्तरः ऽनिषङ्गाय चतुःऽअक्ष इध्यसे ॥

यः रातऽहव्यः अवृकाय धायसे कीरेः चित् मंत्रं मनसा वनोषि तम् ॥ १३ ॥

हे अग्निदेवा, याग करणाऱ्या भक्ताचा तूं अगदी अंतरंगांतील साहाय्यकर्ता आहेस. आणि, हे चार नेत्रांनी विभूषित असलेल्या देवा, जो कोणी कधींही दुसऱ्यावर शस्त्र उचलीत नाही त्यचेकरितां तूं प्रेमाने उद्दीपित होतोस. तूं सर्वांचे पोषण करतोस, तुझ्या हातून कोणाचाही नाश होत नाही. जो स्तुतिकर्ता तुला हवि अर्पण करतो तो कितीही गरीब असो त्याने केलेल्या स्तुतीचा तूं मनःपूर्वक स्वीकार करतोस. ॥ १३ ॥

त्वम॑ग्न उरु॒शंसा॑य वा॒घते॑ स्पा॒र्हं यत्रेक्ण॑ः पर॒मं व॒नोषि॒ तत् ।

आ॒ध्रस्य॑ चि॒त्प्रम॑तिरुच्यसे पि॒ता प्र पाकं॒ शास्सि॒ प्र दिशो॑ वि॒दुष्ट॑रः ॥ १४ ॥

त्वं अग्ने उरुऽशंसाय वाघते स्पार्हं यत् रेक्णः परमं वनोषि तत् ॥

आध्रस्य चित् प्रऽमतिः उच्यसे पिता प्र पाकं शास्सि प्र दिशः विदुःऽतरः ॥ १४ ॥

हे अग्निदेवा, जो उपासक तुझे अतिशय स्तवन करतो त्याचेकरितां तूं सर्व वैभवांत जे अत्यंत स्पृहणीय वैभव असेल तें सिद्ध करून ठेवतोस. तुझा भक्त स्वतःचे पोषण करण्यासही जरी सर्व तऱ्हेने असमर्थ असला तरी तूं

अतिशय प्रेमाने त्याचा सांभाळ करणारा पिताच होतोस असें सर्व लोक बोलतात. तुझें ज्ञान तर अलौलिकच आहे तथापि तूं इतका लडिवाळ आहेस कीं लहान अर्भकास तूं दिशा आणि उपदिशा ह्या शिकवीत बसतोस. ॥ १४ ॥

त्वम॑ग्ने प्रय॑तदक्षिणं नरं॒ वर्मे॑व स्यूतं परि॑ पासि वि॒श्वतः॑ ।

स्वा॒दु॒क्षद्मा॒ यो व॑स॒तौ स्यो॑न॒कृज्जी॑वया॒जं यज॑ते सोप॒मा दि॒वः ॥ १५ ॥

त्वं अग्ने प्रयतऽदक्षिणं नरं वर्मऽइव स्यूतं परि पासि विश्वतः ॥

स्वादुऽक्षद्मा यः वसतौ स्योनऽकृत् जीवऽयाजं यजते सः उपऽमा दिवः ॥ १५ ॥

ज्याप्रमाणे उत्तम तऱ्हेने सांधलेले चिलखत शूरांचे रक्षण करते त्याप्रमाणे पवित्र आणि सदाचारी पुरुषाचे तूं सर्व तऱ्हेने परिपालन करतोस. स्वादिष्ट अन्न तयार करून जो आपल्या घरी अतिथीस संतुष्ट करतो व अशा रीतीने प्राणिमात्रांच्याकरितां जणूं कांही जो अनुष्ठानच करतो, त्यास श्रेष्ठपणांत स्वर्गाचीही उपमा दिली तरी ती शोभते. ॥ १५ ॥

इ॒माम॑ग्ने श॒रणिं॑ मीमृषो न इ॒ममध्वा॑नं॒ यमगा॑म दू॒रात् ।

आ॒पिः पि॒ता प्रम॑तिः सो॒म्याना॒ं भृमि॑रस्यृषि॒कृन्मर्त्या॑नाम् ॥ १६ ॥

इमां अग्ने शरणिं मीमृषः नः इमं अध्वानं यं अगाम दूरात् ॥

आपिः पिता प्रऽमतिः सोम्यानां भृमिः असि ऋषिऽकृत् मर्त्यानाम् ॥ १६ ॥

हे अग्निदेवा, ज्या कुमार्गाने आम्ही दूरपर्यंत गेलो होतो, त्याबद्दल - त्या पातकाबद्दल - तूं क्षमा कर. तूं आमचा आप्त, आमचा पिता, सोमरस अर्पण करणाऱ्या भक्तांचा हितकर्ता, सर्वांचे पोषण करणारा, व अज्ञ मानवास श्रेष्ठ अशा ऋषीचे पदवीस चढविणारा आहेस. ॥ १६ ॥

म॒नु॒ष्वद॑ग्ने अङ्गिर॒स्वद॑ङ्गिरो ययाति॒वत्सद॑ने पूर्व॒वच्छु॑चे ।

अच्छ॑ या॒ह्या व॑हा॒ दैव्यं॒ जन॒मा सा॑दय ब॒र्हिषि॒ यक्षि॑ च प्रि॒यम् ॥ १७ ॥

मनुष्वत् अग्ने अङ्गिरस्वत् अङ्गिरः ययातिऽवत् सदने पूर्वऽवत् शुचे ॥

अच्छ याहि आ वहा दैव्यं जनं आ सादय बर्हिषि यक्षि च प्रियम् ॥ १७ ॥

मनूकडे, अंगिरसाकडे, व ययातीकडे ज्याप्रमाणे तूं पूर्वी जात होतास त्याप्रमाणे, हे पवित्र अग्निदेवा, हे अंगिरसा, तूं आमच्या सदनाकडे ये, आणि दिव्य लोकांतील सर्व मंडळीस बरोबर आण. त्यांस आसनांवर बसव व त्यांच्या आवडीचा हवि त्यांस अर्पण कर. ॥ १७ ॥

ए॒तेना॑ग्ने॒ ब्रह्म॑णा वावृधस्व॒ शक्ती॑ वा॒ यत्ते॑ चकृ॒मा वि॒दा वा॑ ।

उ॒त प्रणे॑ष्य॒भि वस्यो॑ अ॒स्मान्सं नः॑ सृज सुम॒त्या वाज॑वत्या ॥ १८ ॥

एतेन अग्ने ब्रह्मणा ववृधस्व शक्ती वा यत् ते चकृम विदा वा ॥

उत प्र नेषि अभि वस्यः अस्मान् सं नः सृज सुऽमत्या वाजऽवत्या ॥ १८ ॥

हे अग्निदेवा, जे हे स्तोत्र आम्ही आपले सामर्थ्य व बुद्धि उपयोगांत आणून केलेले आहे त्याच्या योगानें तूं आनंदित हो, व आम्हांस शक्ति व उत्तम बुद्धिमत्ता यांची जोड करून दे. आम्हांस अत्यंत स्पृहणीय अशा वैभवाकडे नेणारा तूंच आहेस. ॥ १८ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त ३२ (इंद्रसूक्त)

ऋषी - हिरण्यस्तूप अङ्गिरस : देवता - इंद्र : छंद - त्रिष्टुभ्

इंद्र॑स्य॒ नु वी॒र्या॑णि॒ प्र वो॑चं॒ यानि॑ च॒कार॑ प्रथ॒मानि॑ व॒ज्री ।

अह॒न्नहि॒मन्व॒पस्त॑तर्द॒ प्र व॒क्षणा॑ अभिन॒त्पर्व॑तानाम् ॥ १ ॥

इंद्रस्य नु वीर्याणि प्र वोचं यानि चकार प्रथमानि वज्री ॥

अहन् अहिं अनु अपः ततर्द प्र वक्षणाः अभिनत् पर्वतानाम् ॥ १ ॥

वज्रधारी इंद्राचे पराक्रम मी येथें आवडीने गाइलेले आहेत. अखिल पराक्रमाच्या कृत्यांत ह्यांनाच प्रथम स्थान द्यावे लागेल. ह्या इंद्रदेवानें अहिचा वध केला, उदकांस वाट फोडून दिली व पर्वतांची हृदये विदारण केली. ॥ १ ॥

अह॒न्नहिं॒ पर्व॑ते शिश्रिया॒णं त्वष्टा॑स्मै॒ वज्रं॑ स्व॒र्यं॑ ततक्ष ।

वा॒श्रा इ॑व धे॒नवः॒ स्यन्द॑माना॒ अञ्जः॑ समु॒द्रं अव॑ जग्मु॒रापः॑ ॥ २ ॥

अहन् अहिं पर्वते शिश्रियाणं त्वष्टा अस्मै वज्रं स्वर्यं ततक्ष ।

वाश्राःऽइव धेनवः स्यन्दमानाः अञ्जः समुद्रं अव जग्मुः आपः ॥ २ ॥

त्वष्टा देवाने त्यास वज्र तयार करून दिले होतें. ते घेऊन त्याने पर्वतांत दबा धरून बसलेल्या अहीचा वध केला. त्याबरोबर वत्सासाठी धेनु हंबरतात त्याप्रमाणे मोठा आवाज करीत पाण्याचे लोट वाहू लागले व मोठ्या वेगानें समुद्रास जाऊन मिळाले. ॥ २ ॥

वृ॒षा॒यमा॑णोऽवृणीत॒ सोमं॒ त्रिक॑द्रुकेष्वपिबत्सु॒तस्य॑ ।

आ साय॑कं म॒घवा॑दत्त॒ वज्र॒मह॑न्नेनं प्रथम॒जामही॑नाम् ॥ ३ ॥

वृषऽयमाणः अवृणीत सोमं त्रिऽकद्रुकेषु अपिबत् सुतस्य ॥

आ सायकं मघऽवा अदत्त वज्रं अहन् एनं प्रथमऽजां अहीनाम् ॥ ३ ॥

शौर्याच्या भरांत आल्यावर इंद्रास सोमाची इच्छा झाली व त्याचे त्याने तीन यज्ञांत प्राशन केले. त्या उदार इंद्रदेवाने वज्र हें आपले आयुध केले व सर्व अहींतील ज्येष्ठ अहि जो वृत्र त्याचा वध केला. ॥ ३ ॥

यदि॒न्द्राह॑न्प्रथम॒जामही॑ना॒मान्मा॒यिना॒ममि॑ना॒ः प्रोत मा॒याः ।

आत्सूर्यं॑ ज॒नय॒न्द्यामु॒षासं॑ ता॒दीत्ना॒ शत्रुं॒ न किला॑ विवित्से ॥ ४ ॥

यत् इन्द्र अहन् प्रथमःजां अहीनां आत् मायिनां अमिनाः प्र उत मायाः ॥

आत् सूर्यं जनयन् द्यां उषसं तादीत्ना शत्रुं न किला विवित्से ॥ ४ ॥

ज्यावेळी हे इंद्रा सर्व अहींतील ज्येष्ठ अहीचा तूं वध केलास व कपटकर्मांत प्रवीण असलेल्या रिपूंच्या कपटव्यूहांचा विध्वंस केलास त्यावेळी सूर्य, उषा व द्युलोक ह्यांना जन्म प्राप्त झाला व तुझा हात धरील असा कोणीही शत्रू तुला उरला नाही. ॥ ४ ॥

अह॑न्वृ॒त्रं वृ॑त्र॒तरं॒ व्यंस॒मिंद्रो॒ वज्रे॑ण मह॒ता व॒धेन॑ ।

स्कन्धां॑सीव॒ कुलि॑शेना॒ विवृ॒क्णाहिः॑ शयत उप॒पृक्पृ॑थि॒व्याः ॥ ५ ॥

अहन् वृत्रं वृत्रऽतरं विऽअंसं इंद्रः वज्रेण महता वधेन ॥

स्कन्धांसिऽइव कुलिशेन विऽवृक्णा अहिः शयते उपऽपृक् पृथिव्याः ॥ ५ ॥

अहि ह्या नांवाचा वृत्र म्हणजे क्रूर खरा, परंतु वास्तविक पहातां त्याचा क्रूरपणा नांवापेक्षांही जास्त होता. पण इंद्राने आपल्या अत्यंत उग्र वज्राने त्याचे बाहु छेदून त्यास मारून टाकले. ज्याप्रमाणे कुऱ्हाडीने एखाद्या वृक्षाच्या फांद्या छेदून टाकाव्या त्याप्रमाणे छीन्नविछिन्न होऊन अहि पृथ्वीवर मृत होऊन पडला. ॥ ५ ॥

अ॒यो॒द्धेव॑ दु॒र्मद॒ आ हि जु॒ह्वे म॑हावी॒रं तु॑विबा॒धमृ॑जी॒षम् ।

नाता॑रीदस्य॒ सम्मृ॑तिं व॒धानां॒ सं रु॒जानाः॑ पिपिष॒ इंद्र॑शत्रु॒ः ॥ ६ ॥

अयोद्धाऽइव दुःमदः आ हि जुह्वे महाऽवीरं तुविऽबाधं ऋजीषम् ॥

न अतारीत् अस्य संऽऋतिं वधानां सं रुजानाः पिपिषे इंद्रऽशत्रुः ॥ ६ ॥

आपल्यास कोणीच प्रतिस्पर्धी नाशी अशा भलत्या अभिमानास पेटून अहिनें महापराक्रमी, अजिंक्य व अनेक शत्रूंनाही भारी, अशा इंद्रास आह्वान केले. परंतु त्याच्या अत्यंत उग्रशस्त्रांच्या पुढें त्यास टिकाव धरतां आला नाही. पण इंद्राचें शत्रुत्व त्याचे अंगी इतके बाणले होतें कीं त्याने मोठमोठ्या दुर्गांचाही अगदी चुराडा करून टाकला. ॥ ६ ॥

अ॒पाद॑ह॒स्तो अ॑पृतन्य॒दिंद्र॒मास्य॒ वज्र॒मधि॒ सानौ॑ जघान ।

वृष्णो॒ वध्रिः॑ प्रति॒मानं॒ बुभू॑षन्पुरु॒त्रा वृ॒त्रो अ॑शय॒द्व्यस्तः ॥ ७ ॥

अपात् अहस्तः अपृतन्यत् इंद्रं आ अस्य वज्रं अधि सानौ जघान ॥

वृष्णः वध्रिः प्रतिऽमानं बुभूषन् पुरुऽत्रा वृत्रः अशयत् विऽअस्तः ॥ ७ ॥

हात पाया तुटून गेले तरी अहिने इंद्राशी युद्ध चालविलेंच. इंद्राने आपलें वज्र त्याच्या पर्वतप्राय बाहूंवर मारले. निःसत्व झाल्यावरही पराक्रमी पुरुषाची ऐट मिरविणारा अहि अस्ताव्यस्त होऊन त्याचे धूडच्या धूड जमीनीवर पडले. ॥ ७ ॥

न॒दं न भि॒न्नम॑मु॒या शया॑नं॒ मनो॒ रुहा॑णा॒ अति॑ य॒न्त्याप॑ः ।

याश्चि॑द्वृ॒त्रो म॑हि॒ना प॒र्यति॑ष्ठ॒त्तासा॒महि॑ः पत्सुत॒ःशीर्ब॑भूव ॥ ८ ॥

नदं न भिन्नं अमुया शयानं मनः रुहाणाः अति यन्ति आपः ॥

याः चित् वृत्रः महिना परिऽअतिष्ठत् तासां अहिः पत्सुतःऽशीः बभूव ॥ ८ ॥

जमीनीवर पसरलेल्या एखाद्या महानदाप्रमाणे वृत्र ह्या पृथ्वीवर पडला असतां जलांचे प्रवाहांस धैर्य चढून ते त्याचे अंगावरून वाहूं लागले. आपल्या सामर्थ्याने ज्या उदकांस वृत्राने कोंडून ठेविले होते त्यांच्याच पायांशी तो गतप्राण होऊन पडला. ॥ ८ ॥

नी॒चाव॑या अभवद्वृ॒त्रपु॒त्रेन्द्रो॑ अस्या॒ अव॒ वध॑र्जभार ।

उत्त॑रा॒ सूरध॑रः पु॒त्र आ॑सी॒द्दानुः॑ शये स॒हव॑त्सा॒ न धे॒नुः ॥ ९ ॥

नीचाऽवयाः अभवत् वृत्रऽपुत्रा इन्द्रः अस्याः अव वधः जभार ॥

उत्ऽतरा सूः अधरः पुत्रः आसीत् दानुः शये सहऽवत्सा न धेनुः ॥ ९ ॥

वृत्राची माता त्याचे देहावर आडवी झाली. इंद्राने आपले उग्र वज्र तिचे पोटाराखालून फेंकले. ह्याप्रमाणे माता वर पडलेली व तिचा पुत्र वृत्र खाली पडलेला अशा स्थितीत धेनु जशी आपल्या वासरास पोटाखाली घेते तशीच ती दानु दिसूं लागली. ॥ ९ ॥

अति॑ष्ठन्तीनामनिवेश॒नानां॒ काष्ठा॑नां॒ मध्ये॒ निहि॑तं॒ शरी॑रम् ।

वृ॒त्रस्य॑ नि॒ण्यं वि च॑र॒न्त्यापो॑ दी॒र्घं तम॒ आश॑य॒दिंद्र॑शत्रुः ॥ १० ॥

अतिष्ठंतीनां अनिऽवेशनानां काष्ठानां मध्ये निहितं शरीरम् ॥

वृत्रस्य निण्यं वि चरंति आपः दीर्घं तमः आ अशयत् इंद्रऽशत्रुः ॥ १० ॥

ज्यास कधी खळ नाही व ज्यांस कधीं विश्रांति नाही अशा जलप्रवाहांत वृत्राचे शरीर निमग्न होऊन गेले होते. वृत्राच्या शरीरावर जलाचे प्रवाह खुशाल वहात होते व इंद्रशत्रु वृत्र दीर्घ अंधकारांत जाऊन पडला होता. ॥ १० ॥

दा॒सप॑त्नी॒रहि॑गोपा अतिष्ठ॒न्निरु॑द्धा॒ आप॑ः प॒णिने॑व॒ गाव॑ः ।

अ॒पां बिल॒मपि॑हितं॒ यदासी॑द्वृ॒त्रं ज॑घ॒न्वाँ अप॒ तद्व॑वार ॥ ११ ॥

दासऽपत्नीः अहिऽगोपाः अतिष्ठन् निऽरुद्धाः आपः पणिनाऽइव गावः ॥

अपां बिलं अपिऽहितं यत् आसीत् वृत्रं जघन्वान् अप तत् ववार ॥ ११ ॥

अहिनें प्रतिबंधांत ठेवलेली व म्हणून त्या दुष्टाची दास बनलेली जी जलें ती पणीनें प्रतिबंधांत टाकलेल्या धेनुंप्रमाणे बंदिवान् होऊन गेली होती. उदकांचे निवासस्थान जें पूर्वी बंद झालें होते तें वृत्रास मरून इंद्राने उघडे केले. ॥ ११ ॥

अश्व्यो॒ वारो॑ अभव॒स्तदि॑न्द्र सृ॒के यत्त्वा॑ प्र॒त्यह॑न्दे॒व एक॑ः ।

अजयो गा अजयः शूर सोममवासृजः सर्तवे सप्त सिन्धून् ॥ १२ ॥

अश्व्यः वारः अभवः तत् इंद्र सृके यत् त्वा प्रतिऽअहन् देवः एकः ॥

अजयः गाः अजयः शूर सोमं अव असृजः सर्तवे सप्त सिन्धून् ॥ १२ ॥

हे इंद्रा, तूं एकटा श्रेष्ठ देव आहेस. ज्यावेळी तुझ्या आयुधावर त्या अहीनें प्रहार केला त्यावेळी अश्वाकरितां तयार केलेल्या चिलखताप्रमाणें तूं त्यास दाद दिली नाहींस. तूं धेनूंची प्राप्ति करून घेतलीस. हे शूरा, तूं सोमरसाचाही लाभ करून घेतलास व सप्त नद्यांचा प्रवाह चालू करण्याकरितां त्यांस तूं बंधमुक्त केलेंस. ॥ १२ ॥

नास्मै विद्युन्न तन्यतुः सिषेध न यां मिहमकिरद्ध्रादुनिं च ।

इंद्रश्च यद्युयुधाते अहिश्चोतापरीभ्यो मघवा वि जिग्ये ॥ १३ ॥

न अस्मै विऽद्युत् न तन्यतुः सिसेध न यां मिहं अकिरत् ह्रादुनिं च ॥

इंद्रः च यत् युयुधाते अहिः च उत अपरीभ्यः मघऽवा वि जिग्ये ॥ १३ ॥

विद्युत्प्रयोग अथवा गर्जना ही दोन्ही वृत्रास कांहींच उपयोगी पडली नाहीत. त्याचप्रमाणे त्याने जी पर्जन्यवृष्टि केली व ज्या अशनि फेंकल्या त्यांचाही त्यास उपयोग झाला नाही. ज्यावेळी इंद्र व अहि ह्यांचे युद्ध झाले त्यावेळीं त्या दानशूर इंद्राने चिरकालिक विजय संपादन केला. ॥ १३ ॥

अहेर्यातारं कमपश्य इंद्र हृदि यत्ते जघ्नुषो भीरगच्छत् ।

नव च यन्नवतिं च स्रवन्तीः श्येनो न भीतो अतरो रजांसि ॥ १४ ॥

अहेः यातारं कं अपश्यः इंद्र हृदि यत् ते जघ्नुषः भीः अगच्छत् ॥

नव च यत् नवतिं च स्रवंतीः श्येनः न भीतः अतरः रजांसि ॥ १४ ॥

हे इंद्रा, ज्याअर्थी वृत्रास मारल्यानंतर तुझ्या हृदयांत भितीनें प्रवेश केला त्याअर्थी वृत्राबद्दल सूड उगवणारा असा कोण तुझ्या दृष्टीस पडला ? कारण भयचकित झालेला एखादा श्येनपक्षी ज्याप्रमाणें भराभर अंतरिक्षाचे पार उडून जातो त्याप्रमाणे तूं त्वरेनें नव्याण्णव नद्या ओलांडित पलीकडे गेलास. ॥ १४ ॥

इंद्रो यातोऽवसितस्य राजा शमस्य च शृङ्गिणो वज्रबाहुः ।

सेदु राजा क्षयति चर्षणीनामरान्न नेमिः परि ता बभूव ॥ १५ ॥

इंद्रः यातः अवऽसितस्य राजा शमस्य च शृङ्गिणः वज्रबाहुः ॥

सः इत् ॐ इति राजा क्षयति चर्षणीनां अरान् न नेमिः परि ता बभूव ॥ १५ ॥

सर्व चर व अचर सृष्टीचा इंद्र मालक आहे. जे प्राणी शृंगयुक्त आहेत व जे निरुपद्रवी आहेत त्या दोहोंवरही त्याची सत्ता आहे. त्याचे बाहु वज्राप्रमाणे आहेत; सर्व मानवांचा तो राजा आहे. ज्याप्रमाणें रथचक्राची धांव चाकाच्या आऱ्यांनी वेढून टाकते त्याप्रमाणे इंद्राने हें सर्व वेष्टून टाकले आहे. ॥ १५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त ३३ (इंद्रसूक्त)

ऋषी - हिरण्यस्तूप अङ्गिरस : देवता - इंद्र : छंद - त्रिष्टुभ्

एतायामोप गव्यन्त इंद्रमस्माकं सु प्रमतिं वावृधाति ।

अनामृणः कुविदादस्य रायो गवां केतं परमावर्जते नः ॥ १ ॥

आ इत अयाम उप गव्यंत इंद्रं अस्माकं सु प्रऽमतिं ववृधाति ।

अनामृणः कुवित् आत् अस्य रायः गवां केतं परं आऽवर्जते नः ॥ १॥

या, गोधनाची इच्छा धरून आपण इंद्राकडे जाऊं या. आपल्या बुद्धिमत्तेचे तोच अतिशय वर्धन करीत असतो. तो अमर आहे. वैभव-गोधन प्राप्त करून घेण्याचें मुख्य साधन तो आम्हांस दाखवून देईल काय ? ॥ १ ॥

उपेद॒हं ध॑न॒दामप्र॑तीतं॒ जुष्टां॒ न श्ये॒नो व॑स॒तिं प॑तामि ।

इंद्रं॑ नम॒स्यन्नु॑प॒मेभि॑र॒र्कैर्यः स्तो॒तृभ्यो॒ हव्यो॒ अस्ति॒ याम॑न् ॥ २ ॥

उप इत् अहं धनऽदां अप्रतिऽइतं जुष्टां न श्येनः वसतिं पतामि ।

इंद्रं नमस्यन् उपऽमेभिः अर्कैः यः स्तोतृभ्यः हव्यः अस्ति यामन् ॥ २॥

ज्याप्रेमाणे श्येनपक्षी आपल्या नेहमींच्या राहण्याच्या ठिकाणाकडे उडून जातो त्याप्रमाणे मी इंद्राकडे त्यास उत्तमोत्तम स्तोत्रांनी वंदन करीत मार्गाने गमन केले. हा इंद्र संपत्ति देणारा, शत्रूंस अजिंक्य व भक्तांनी अर्चन करण्यास योग्य असा आहे. ॥ २ ॥

नि सर्व॑सेन इषु॒धीँर॑सक्त॒ सम॒र्यो गा अ॑जति॒ यस्य॒ वष्टि॑ ।

चो॒ष्कू॒यमा॑ण इंद्र॒ भूरि॑ वा॒मं मा प॒णिर्भू॑र॒स्मदधि॑ प्रवृद्ध ॥ ३ ॥

नि सर्वऽसेन इषुऽधीन् असक्त सं अर्यः गाः अजति यस्य वष्टि ।

चोष्कूयमाणः इंद्र भूरि वामं मा पणिः भूः अस्मत् अधि प्रऽवृद्ध ॥ ३॥

आपले सर्व सैन्य बरोबर घेऊन ह्याने बाणाचे भाते पठीशी बांधले आहेत. हा फार श्रेष्ठ आहे. त्याची इच्छा असेल त्याचेकडे तो त्यास देण्याकरितां गाई घेऊन जातो. हे अत्यंत थोर इंद्रा, अनेक प्रकारची उत्कृष्ट संपत्ति घेऊन ये व आमचेविषयी कृपणता धारण करूं नको. ॥ ३ ॥

वधी॒र्हि दस्युं॑ ध॒निनं॑ घ॒नेन॒ँ एक॒श्चर॑न्नुपशा॒केभि॑रिंद्र ।

धनो॒रधि॑ विषु॒णक्ते व्याय॒न्नय॑ज्वानो सन॒काः प्रेति॑मीयुः ॥ ४ ॥

वधीः हि दस्युं धनिनं घनेन एकः श्चरन् उपऽशाकेभिः इंद्र ।

धनोः अधि विषुणक् ते वि आयन् अयज्वानः सनकाः प्रऽइतिं ईयुः ॥ ४॥

हे इंद्रा, जरी तूं आपल्या अनुचरांसह निघाला होतास तथापि आपल्या घणासारख्या शस्त्रानें तूं संपत्तिमान् अशा दस्यूचा एकट्यानेंच वध केलास. ते सर्व बाजूंनी तुझ्या धनुष्यावर एकदम तुटून पडले, परंतु त्या सनकांचा मात्र नाश झाला. तुझे यजन करणें त्यांस कधीं माहितच नव्हते. ॥ ४ ॥

परा चिच्छीर्षा ववृजुस्त इन्द्रायज्वानो यज्वभिः स्पर्धमानाः ।

प्र यद्दिवो हरिव स्थातरुग्र निरव्रताँ अधमो रोदस्योः ॥ ५ ॥

परा चित् शीर्षा ववृजुः ते इन्द्र अयज्वानः यज्वऽभिः स्पर्धमानाः ।

प्र यत् दिवः हरिऽव स्थातः उग्र निः अव्रतान् अधमः रोदस्योः ॥ ५॥

हे उग्र इंद्रा, तुझे स्थैर्य वाखाणण्या जोगे आहे. तुझे अश्व पीतवर्णाचे आहेत. ज्यावेळी तुझ्या आज्ञा न जुमानणाऱ्या दुष्टांस तूं अंतरिक्षांतून, पृथिवीतून व स्वर्गांतून हांकून लावलेस, त्यावेळी त्यांनी आपली मस्तके लज्जेने पाठीमागे फिरविली. स्वतः तुझे यजन कधींही करीत नसून यजन करणाऱ्या लोकांबरोबर त्यांनी स्पर्धा चालविली होती. ॥ ५ ॥

अयुयुत्सन्ननवद्यस्य सेनामयातयन्त क्षितयो नवग्वाः ।

वृषायुधो न वध्रयो निरष्टाः प्रवद्भिरिंद्राच्चितयन्त आयन् ॥ ६ ॥

अयुयुत्सन् अनवद्यस्य सेनां अयातयंत क्षितयः नवऽग्वाः ।

वृषऽयुधः न वध्रयः निःऽअष्टाः प्रवत्ऽभिः इंद्रात् चितयंतः आयन् ॥ ६॥

सर्वतोपरी दोषरहित असा जो इंद्र त्याच्या सेनेबरोबर त्यांनी युद्ध मांडले. नवग्वांनी उभे राहून इंद्रास उत्तेजन दिलें. सामर्थ्यवान पुरुषांशी झगडणाऱ्या निर्बल लोकांची जशी दाणादाण होते त्यप्रमाणे त्यांची स्थिति होतांच इंद्राच्या शक्तीची चांगली ओळख पडून ते सांपडेल त्या मार्गांनी पळत सुटले. ॥ ६ ॥

त्वमे॒तान्रु॑द॒तो जक्ष॑त॒श्चायो॑धयो॒ रज॑सः इंद्र पा॒रे ।

अवा॑दहो दि॒व आ दस्यु॑मु॒च्चा प्र सु॑न्व॒तः स्तु॑व॒तः शंस॑मावः ॥ ७ ॥

त्वं एतान् रुदतः जक्षतः च अयोधयः रजसः इंद्र पारे ।

अव अदहः दिवः आ दस्युं उच्चा प्र सुन्वत स्तुवतः शंसं आवः ॥ ७॥

ते हंसले किंवा रडले तरी त्याची बिलकूल पर्वा न करतां, हे इंद्रा, तूं त्यांच्याशी युद्ध करून त्यांस रजोलोकाच्या पार घालवून दिलेंस. दस्यु उच्च द्युलोकांत असतां तूं त्यास दग्ध केलेस व ज्याने तुझ्याकरितां सोमरस तयार करून तुझें स्तवन केले त्याच्या स्तोत्राचा तूं स्वीकार केलास. ॥ ७ ॥

चक्राणासः परीणहं पृथिव्या हिरण्येन मणिना शुम्भमानाः ।

न हिन्वानासस्तितिरुस्त इंद्रं परि स्पशो अदधात्सूर्येण ॥ ८ ॥

चक्राणासः परिऽनहं पृथिव्या हिरण्येन मणिना शुंभमानाः ।

न हिन्वानासः तितिरुः ते इंद्रं परि स्पशः अदधात् सूर्येण ॥ ८॥

सुवर्णालंकारांनी नटून त्यांनी सर्व पृथ्वीचें परिवेष्टन केलें. त्यांनी आपले सामर्थ्य कितीही प्रकट केले तरी इंद्राचा पराभव त्यांना करतां आला नाहीं. त्यांच्या दूतांस इंद्राने सूर्याकडून हतवीर्य केलें. ॥ ८ ॥

परि यदिन्द्र रोदसी उभे अबुभोजीर्महिना विश्वतः सीम् ।

अमन्यमानाँ अभि मन्यमानैर्निर्ब्रह्मभिरधमो दस्युमिंद्र ॥ ९ ॥

परि यत् इंद्र रोदसी इति उभे अबुभोजीः महिना विश्वतः सीम् ।

अमन्यमानान् अभि मन्यमानैः निः ब्रह्मऽभिः अधमः दस्युं इंद्र ॥ ९॥

हे इंद्रा, ज्यावेळीं आपल्या सामर्थ्यानें तूं पृथिवी व स्वर्ग ह्यांवर सर्व प्रकारें स्वसत्ता प्रस्थापित केलीस त्यावेळी आपल्या भक्तांचे हातून तुझा उपमर्द करणाऱ्यांचा तूं पराभव करविलास व आपल्या तीव्र शस्त्रांनी दस्यूस पराजित केलेंस. ॥ ९ ॥

न ये दिवः पृथिव्या अन्तमापुर्न मायाभिर्धनदां पर्यभूवन् ।

युजं वज्रं वृषभश्चक्र इंद्रो निर्ज्योतिषा तमसो गा अदुक्षत् ॥ १० ॥

न ये दिवः पृथिव्या अंतं आपुः न मायाभिः धनऽदां परिऽअभूवन् ।

युजं वज्रं वृषभः चक्र इंद्रः निः ज्योतिषा तमसः गाः अदुक्षत् ॥ १०॥

स्वर्ग आणि पृथिवी ह्यांचा अंत लावणाऱ्यांससुद्धां धनदात्या इंद्राला आपल्या कपटजालांनी वेढा देता आला नाहीं सामर्थ्यवान् इंद्रानें आपल्या वज्रासच आपले मदतगार बनविले व आपल्या तेजाच्या योगाने धेनूंस अंधकारांतून बाहेत काढले. ॥ १० ॥

अनु॑ स्व॒धाम॑क्षर॒न्नापो॑ अ॒स्याव॑र्धत॒ मध्य॒ आ ना॒व्याना॑म् ।

स॒ध्री॒चीने॑न॒ मन॑सा॒ तमिं॑द्र॒ ओजि॑ष्ठेन॒ हन्म॑नाहन्न॒भि द्‌यून् ॥ ११ ॥

अनु स्वधां अक्षरन् आपः अस्य अवर्धत मध्ये आ नाव्यानाम् ।

सध्रीचीनेन मनसा तं इंद्रः ओजिष्ठेन हन्मना अहन् अभि द्‌यून् ॥ ११॥

इंद्राने जी वाट फोडून दिली त्या वाटेनें जलाचे प्रवाह वाहूं लागले परंतु जेथें नौका सुद्धां चालूं शकतात अशा महनद्‌यांत शिरून वृत्राने विशाल रूप धारण केलें. मग इंद्राने आपले सर्व लक्ष्य वृत्राच्या वधाकडेच देऊन आपल्या प्रबल शस्त्राने त्यास कायमचे जमीनदोस्त केले. ॥ ११ ॥

न्याविध्यदिली॒बिश॑स्य दृ॒ळ्हा वि शृ॒ङ्गिण॑मभिन॒च्छुष्ण॒मिंद्र॑ः ।

या॒वत्तरो॑ मघव॒न्याव॒ ओजो॒ वज्रे॑ण॒ शत्रु॑मवधीः पृत॒न्युम् ॥ १२ ॥

नि अविध्यत् इलीबिशस्य दृळ्हा वि शृङ्गिणं अभिनत् शुष्णं इंद्रः ।

यावत् तरः मघऽवन् यावत् ओजः वज्रेण शत्रुं अवधीः पृतन्युम् ॥ १२॥

इलीबिशाचे दुर्गम किल्ले तूं फोडून टाकलेस व शृंगयुक्त अशा शुष्णाचे तूं विदारण केलेस. जितका वेग व जितके सामर्थ्य तुझे अंगी होतें त्या सर्वांचा उपयोग करून तुझ्यांशी युद्ध करणाऱ्या शत्रूचा तूं आपल्या वज्राने वध केलास. ॥ १२ ॥

अ॒भि सि॒ध्मो अ॑जिगादस्य॒ शत्रू॒न्वि ति॒ग्मेन॑ वृष॒भेणा॒ पुरो॑ऽभेत् ।

सं वज्रे॑णासृजद्वृ॒त्रमिंद्र॒ः प्र स्वां म॒तिं अ॑तिर॒च्छाश॑दानः ॥ १३ ॥

अभि सिध्मः अजिगात् अस्य शत्रून् वि तिग्मेन वृषभेणा पुरः अभेत् ।

सं वज्रेण असृजत् वृत्रं इंद्रः प्र स्वां मतिं अतिरत् शाशदानः ॥ १३॥

त्याचे साहाय्यकरी वज्र त्याच्या शत्रूंवर नेम धरून निघालें. आपल्या तीव्र शस्त्राने त्याने शत्रूंची पुरें फोडून टाकली. इंद्राने वज्राशी वृत्राची गांठ घालून दिली व त्याचा संहार करून आपल्या मनाची हौस फेडून घेतली. ॥ १३ ॥

आव॒ः कुत्स॑मिंद्र॒ यस्मि॑ञ्चा॒कन्प्राव॒ः युध्य॑न्तं वृ॒ष॒भं दश॑द्युम् ।

श॒फच्यु॑तो रे॒णुर्न॑क्षत॒ द्यामुच्छ्वै॑त्रे॒यो नृ॒षाह्या॑य तस्थौ ॥ १४ ॥

आवः कुत्सं इंद्र यस्मिन् चाकन् प्र आवः युध्यन्तं वृषभं दशऽद्युम् ।

शफऽच्युतः रेणुः नक्षत द्यां उत् श्वैत्रेयः नृऽषह्याय तस्थौ ॥ १४॥

ज्या कुत्सावर हे इंद्रा, तुझे अत्यंत प्रेम होते त्याचे तूं संरक्षण केलेंस व वीर्यशाली दशद्यु युद्धांत गुंतलेला असतांना तूं त्याच्या साहाय्यार्थ धांवलास. घोड्यांच्या खुरांनी उडालेली धूळ आकाशापर्यंत वर गेली, श्वैत्रेयही पुन्हां लोकांनी त्याची सत्ता सहन करावी अशा योग्यतेस चढला. ॥ १४ ॥

आव॒ः शर्म॑ वृ॒ष॒भं तुग्र्या॑सु क्षेत्रजे॒षे म॑घव॒ञ्छ्वित्र्य॒ं गाम् ।

ज्योक् चिदत्र तस्थिवांसो अक्रञ्छत्रूयतामधरा वेदनाकः ॥ १५ ॥

आवः शमं वृषभं तुग्र्यासु क्षेत्रऽजेषे मघवन् श्वित्र्यं गाम् ।

ज्योक् चित् अत्र तस्थिऽवांसः अक्रन् शत्रुऽयतां अधरा वेदना अकरित्यकः ॥ १५॥

हे इंद्रा, तुग्रांनी इर्ष्येने भूमि संपादनासाठी आरंभिलेल्या युद्धांत तू श्वित्राच्या धेनूंचे रक्षण करून त्याचा सांभाळ केलास आणि शत्रूंची संपत्ति जिंकून घेतलीस. ॥ १५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त ३४ (अश्विनीकुमार सूक्त)

ऋषी - हिरण्यस्तूप अङ्गिरस : देवता - अश्विनीकुमार : छंद - त्रिष्टुभ्, जगती

त्रिश्चि॑न्नो अ॒द्या भ॑वतं नवेदसा वि॒भुर्वां॒ याम॑ उ॒त रा॒तिर॑श्विना ।

यु॒वोर्हि य॒न्त्रं हि॒म्येव॒ वास॑सोऽभ्याय॒ंसेन्या॑ भवतं मनी॒षिभि॑ः ॥ १ ॥

त्रिः चित् नः अद्य भवतं नवेदसा विऽभुः वां यामः उत रातिः अश्विना ।

युवोः हि यंत्रं हिम्याऽइव वाससः ऽभिऽ आयंसेन्या भवतं मनीषिऽभिः ॥ १॥

हे सर्वज्ञ अश्विनहो, तुम्ही आज तीन्ही वेळा आमचेच व्हा. आपली गति सर्वत्र आहे व आपली दानशूरताही चोहोंकडे अनुभवास येणारी आहे. ज्याप्रमाणे वस्त्राचा व हिंवाळ्या रात्रीचा अत्यंत निकट संबंध असतो त्याप्रमाणे आपण दोघेंही एकमेकांशी असेच संलग्न आहोत. सुज्ञ भक्तास आपण वश व्हा. ॥ १ ॥

त्रयः पवयो मधुवाहने रथे सोमस्य वेनामनु विश्व इद्विदुः ।

त्रय स्कम्भासः स्कभितास आरभे त्रिर्नक्तं याथस्त्रिर्वश्विना दिवा ॥ २ ॥

त्रयः पवयः मधुऽवाहने रथे सोमस्य वेनां अनु विश्वे इत् विदुः ।

त्रय स्कम्भासः स्कभितासः आऽरभे त्रिः नक्तं याथः त्रिः व् अश्विना दिवा ॥ २॥

मधुर रसांची प्राप्ति करून देणाऱ्या आपल्या रथास तीन धांवा आहेत. व तो सोमाच्या मार्गाने गमन करतो हे सर्वांस विदितच आहे. त्या रथाचा तोल बिघडूं नये म्हणून तीन स्तंभ उभे केलेले आहेत. हे अश्विनहो, आपण रात्रौ त्रिवार व दिवसां त्रिवार परिभ्रमण करतां. ॥ २ ॥

समाने अहन्त्रिरवद्यगोहना त्रिरद्य यज्ञं मधुना मिमिक्षतम् ।

त्रिर्वाज॑वती॒रिषो॑ अश्विना यु॒वं दो॒षा अ॒स्मभ्य॑मु॒षस॑श्च पिन्वतम् ॥ ३ ॥

समाने अहन् त्रिः अवद्यऽगोहना त्रिः अद्य यज्ञं मधुना मिमिक्षतम् ।

त्रिः वाजऽवतीः इषः अश्विना युवं दोषाः अस्मभ्यं उषसः च पिन्वतम् ॥ ३॥

एकाच दिवसांत तीन वेळां आपण भक्तांची पातकें नाहीशी करतां. आजच्या दिवसभरांत तुम्ही आमच्या यज्ञावर तीन वेळा मधुसिंचन करा. दिवसा तीनदा आणि रात्री तीनदा अशा क्रमाने तुम्ही आम्हांस पुष्टिकारक अन्न द्या. ॥ ३ ॥

त्रिर्व॒र्तिर्या॑त॒ं त्रिरनु॑व्रते ज॒ने त्रिः सु॑प्रा॒व्ये त्रे॒धेव॑ शिक्षतम् ।

त्रिर्ना॒न्द्यं वहतमश्विना यु॒वं त्रिः पृक्षो॑ अ॒स्मे अ॒क्षरे॑व पिन्वतम् ॥ ४ ॥

त्रिः वर्तिः यातं त्रिः अनुऽव्रते जने त्रिः सुप्रऽअव्ये त्रेधाऽइव शिक्षतम् ।

त्रिः नान्द्यं वहतं अश्विना युवं त्रिः पृक्षः अस्मे इति अक्षराऽइव पिन्वतम् ॥ ४॥

हे अश्विनीकुमारांनो, तुम्ही आमच्या घरी, तसेच तुमच्या अनुयायांच्या आणि सुरक्षणीय व्यक्तींच्या घरी प्रत्येकीं तीनदा येऊन त्यांस उपदेश करा. तुम्ही आमच्याकडे तीन वेळा अन्न आणि सुख घेऊन या, आणि उदकाप्रमाणे पातळ केलेले अन्न आम्हांस द्या. ॥ ४ ॥

त्रिर्नो॑ र॒यिं व॑हतमश्विना यु॒वं त्रिर्दे॒वता॑ता॒ त्रिरु॒ताव॑तं॒ धियः॑ ।

त्रिः सौ॑भग॒त्वं त्रिरु॒त श्रवां॑सि नस्त्रि॒ष्ठं वां॒ सूरे॑ दुहि॒तारु॑ह॒द्रथ॑म् ॥ ५ ॥

त्रिः नः रयिं वहतं अश्विना युवं त्रिः देवऽताता त्रिः उत अवतं धियः ।

त्रिः सौभगऽत्वं त्रिः उत श्रवांसि नः त्रिऽस्थं वां सूरे दुहिता रुहत् रथम् ॥ ५॥

हे अश्विनहो, आमचेकडे तीन वेळा संपत्ति घेऊन या; देवांचे तीन वेळा यजन चालले असतां तीन वेळां आमच्या सद्विचारांत, सुदैवास व सत्कीर्तिस भरती आणा. ॥ ५ ॥

त्रिर्नो॑ अश्विना दि॒व्यानि॑ भेष॒जा त्रिः पार्थि॑वानि॒ त्रिरु॑ दत्तम॒द्भ्यः ।

ओमानं शंयोर्ममकाय सूनवे त्रिधातु शर्म वहतं शुभस्पती ॥ ६ ॥

त्रिः नः अश्विना दिव्यानि भेषजा त्रिः पार्थिवानि त्रिः ऊं इति दत्तं अत्ऽभ्यः ।

ओमानं शंऽयोः ममकाय सूनवे त्रिऽधातु शर्म वहतं शुभः पती इति ॥ ६॥

हे शुभाधिपति अश्विनीकुमारांनो, तुम्ही आम्हांस तीन्ही वेळां दिव्य, पार्थिव व अंतरिक्षातील औषधी द्या. शयु नामक भक्ताला दिलेल्या कृपाप्रसादाच्या तिप्पट प्रसाद आमच्या मुलांसाठी घेऊन या. ॥ ६ ॥

त्रिर्नो अश्विना यजता दिवेदिवे परि त्रिधातु पृथिवीमशायतम् ।

तिस्रो नासत्या रथ्या परावत आत्मेव वातः स्वसराणि गच्छतम् ॥ ७ ॥

त्रिः नः अश्विना यजता दिवेऽदिवे परि त्रिऽधातु पृथिवीं अशायतम् ।

तिस्रः नासत्या रथ्या पराऽवतः आत्माऽइव वातः स्वसराणि गच्छतम् ॥ ७॥

पृथ्वीची प्रतिदिनी तीन वेळां प्रदक्षिणा करणाऱ्या हे रथगामी, नासत्य अश्विनीकुमारांनो, तुमच्या प्रित्यर्थ मी प्रतिदिनी तीन वेळां यज्ञ करतो. शरीरांत संचारणाऱ्या प्राणवायूप्रमाणे तुम्ही अखंडप्रणे तिन्ही लोकीं भ्रमण करीत असतां. ॥ ७ ॥

त्रिरश्विना सिन्धुभिः सप्तमातृभिस्त्रय आहावास्त्रेधा हविष्कृतम् ।

तिस्रः पृथिवीरुपरि प्रवा दिवो नाकं रक्षेथे द्युभिरक्तुभिर्हितम् ॥ ८ ॥

त्रिः अश्विना सिन्धुऽभिः सप्तमातृऽभिः त्रयः आऽहावाः त्रेधा हविः कृतम् ।

तिस्रः पृथिवीः उपरि प्रवा दिवः नाकं रक्षेथे इति द्युऽभिः अक्तुऽभिः हितम् ॥ ८॥

त्रैलोक्यांत भ्रमण करीत रात्रंदिवस द्युलोकांच्या शिखरांचे रक्षण करणाऱ्या, आणि त्यास स्थिर ठेवणाऱ्या हे अश्विनीकुमारांनो, सप्तमातृक सोमाने आणि हविर्द्रव्यांनी भरलेले तीन कलश दिवसातून तीन वेळा मी तुम्हाप्रित्यर्थ सिद्ध केले आहेत. ॥ ८ ॥

क्व१॒त्री चक्रा त्रिवृतो रथस्य क्व१त्रयः वन्धुरः ये सनीळाः ।

कु॒दा योगौ॑ वा॒जिनो॒ रास॑भस्य॒ येन॑ य॒ज्ञं ना॑सत्योपया॒थः ॥ ९ ॥

क्व त्री चक्रा त्रिऽवृतः रथस्य क्व त्रयः वंधुरः ये सऽनीळाः ।

कदा योगः वाजिनः रासभस्य येन यज्ञं नासत्या उपऽयाथः ॥ ९॥

तीन चाकांच्या त्रिकोणी रथातून यज्ञस्थानी येणाऱ्या हे सत्यवत् अश्विनीकुमारांनो, तुमच्या रथाची तीन चाके, तसेंच त्यांच्या बैठकींची तीन लाकडे कशाने बनली आहेत ? ज्यावर आरोहण करून तुम्ही यज्ञाप्रत आगमन करता, अशा शक्तिवान् रासभास तुम्ही केव्हां जोडणार आहांत ? ॥ ९ ॥

आ ना॑सत्या॒ गच्छ॑तं हू॒यते॑ ह॒विर्मध्वः॑ पिबतं मधु॒पेभि॑रा॒सभिः॑ ।

यु॒वोर्हि पूर्वं॑ सवि॒तोषसो॒ रथ॑मृ॒ताय॑ चि॒त्रं घृ॒तव॑न्त॒मिष्य॑ति ॥ १० ॥

आ नासत्या गच्छतं हूयते हविः मध्वः पिबतं मधुऽपेभिः आसऽभिः ।

युवोः हि पूर्वं सविता उषसः रथं ऋताय चित्रं घृतऽवंतं इष्यति ॥ १०॥

हे सत्यस्वरूप अश्विनहो, इकडे या. हा हवि आपणांस अर्पण करण्यांत येत आहे. आपल्या मुखास मधुपान करण्याची चटकच आहे, तेव्हां आपण मधुर सोमरसाचें स्वमुखाने प्राशन करा. आपला अवर्णनीय व घृतसमृद्ध रथ सवितादेव उषेच्याही अगोदर आमच्या यज्ञाकडे पाठवून देत आहेत. ॥ १० ॥

आ ना॑सत्या त्रि॒भिरे॑काद॒शैरि॒ह दे॒वेभि॑र्यातं मधु॒पेय॑मश्विना ।

प्रायु॒स्तारि॑ष्टं॒ नी रपां᳚सि मृक्षतं॒ सेध॑तं॒ द्‌वेषो॒ भव॑तं सचा॒भुवा॑ ॥ ११ ॥

आ नासत्या त्रिऽभिः एकादशैः इह देवेभिः यातं मधुऽपेयं अश्विना ।

प्र आयुः तारिष्टं निः रपांसि मृक्षतं सेधतं द्‌वेषः भवतं सचाऽभुवा ॥ ११॥

हे सत्यस्वरूप अश्विन हो, तेहतीस देवांसहवर्तमान ह्या मधुर पेयांकडे या. आमच्या आयुष्याची वृद्धि करा, पातकांचे क्षालन करा, आमच्या शत्रूंचा निरोध करा व आम्हांस नेहमी आपल्या सहवासाचा लाभ होऊं द्या. ॥ ११ ॥

आ नो॑ अश्विना त्रि॒वृता॒ रथे᳚ना॒र्वाञ्चं᳚ र॒यिं व॑हतं सु॒वीर॑म् ।

शृ॒ण्वन्ता॑ वा॒मव॑से जोहवीमि वृ॒धे च॑ नो भवतं॒ वाज॑सातौ ॥ १२ ॥

आ नः अश्विना त्रिऽवृता रथेन अर्वाञ्चं रयिं वहतं सुऽवीरम् ।

शृण्वंता वां अवसे जोहवीमि वृधे च नः भवतं वाजऽसातौ ॥ १२॥

हे अश्विनहो, आपल्या त्रिकोणाकृति रथांतून वीर्यवान् संततीने युक्त अशी संपत्ति अमचेकडे घेऊन या. आपण आमची प्रार्थना ऐकण्यांस सिद्धच आहांत, म्हणून आपणांस स्वरक्षणासाठी पुनः पुनः हांक मारतो. जेव्हां पराक्रमाच्या योगाने संपत्ति प्राप्त होण्याचा संभव असेल ते आमच्या वैभवांत भर पडेल असे करा. ॥ १२ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त ३५ (सवितृ सूक्त)

ऋषी - हिरण्यस्तूप अङ्गिरस : देवता - सवुतृ : छंद - त्रिष्टुभ्, जगती

हवया॑म्य॒ग्निं प्र॑थ॒मं स्व॒स्तये॒ हवया॑मि मि॒त्रावरु॑णावि॒हाव॑से ।

हवया॑मि॒ रात्रीं॒ जग॑तः नि॒वेश॑नीं॒ हवया॑मि दे॒वं स॑वि॒तार॑मू॒तये॑ ॥ १ ॥

हवयामि अग्निं प्रथमं स्वस्तये हवयामि मित्रावरुणौ इह अवसे ।

हवयामि रात्रीं जगतः निऽवेशनीं हवयामि देवं सवितारं ऊतये ॥ १ ॥

आमच्या कल्याणार्थ प्रथम अग्नीस पाचारण करतो. आमच्या रक्षणार्थ मित्रावरुणासही मी येथे बोलावतो. सर्व जगतास आपापल्या स्थानापर्यंत घेऊन जाणाऱ्या रात्रिस मी आमंत्रण करतो. आमचे प्रतिपालन करण्याकरतां मी सवितादेवासही हांक मारतो. ॥ १ ॥

आ कृष्णेन रजसा वर्तमानो निवेशयन्नमृतं मर्त्यं च ।

हिरण्ययेन सविता रथेना देवो याति भुवनानि पश्यन् ॥ २ ॥

आ कृष्णेन रजसा वर्तमानः निऽवेशयन् अमृतं मर्त्यं च ।

हिरण्ययेन सविता रथेन आ देवः याति भुवनानि पश्यन् ॥ २ ॥

कृष्णवर्ण आकाशांतून मार्ग आक्रमण करीत व अमर्त्य व मर्त्य ह्या सर्वांस आपापल्या उद्योगांत प्रवृत्त करीत सर्व भुवनांचे अवलोकन करणारा सवितादेव आपल्या सुवर्णमय रथांत बसून येतो. ॥ २ ॥

याति देवः प्रवता यात्युद्वता याति शुभ्राभ्यां यजतो हरिभ्याम् ।

आ दे॒वो या॑ति सवि॒ता प॑रा॒वतोऽ॑प॒ विश्वा॑ दुरि॒ता बाध॑मानः ॥ ३ ॥

याति देवः प्रऽवता याति उत्ऽवता याति शुभ्राभ्यां यजतः हरिऽभ्याम् ।

आ देवः याति सविता पराऽवतः अप विश्वा दुःऽइता बाधमानः ॥ ३ ॥

उंच व पुरोगामी मार्गाने सवितादेव गमन करतो तो यजनीय आहे, तो आपल्या शुभ्र अश्वांवर आरोहण करून जात असतो. सर्व दुरितांचा नाश करीत सवितादेव फार दूर प्रदेशांतून इकडे येतो. ॥ ३ ॥

अ॒भीवृ॑तं॒ कृश॑नैर्वि॒श्वरू॑पं॒ हिर॑ण्यशम्यं यज॒तो बृ॒हन्त॑म् ।

आस्था॒द्रथं॑ सवि॒ता चि॒त्रभा॑नुः कृ॒ष्णा रजां॑सि॒ तवि॑षीं॒ दधा॑नः ॥ ४ ॥

अभिऽवृतं कृशनैः विश्वऽरूपं हिरण्यऽशम्यं यजतः बृहन्तम् ।

आ अस्थात् रथं सविता चित्रऽभानुः कृष्णा रजांसि तविषीं दधानः ॥ ४ ॥

सवितादेव आपणांस पूज्य आहे. त्याचे किरण चित्रविचित्र रंगांचे आहेत. कृष्णवर्ण अंधकार नाहींसा करण्याचे त्याचे अंगांत सामर्थ्य आहे. तो पहा आपल्या सुवर्णभूषित रथांत बसला. ह्या रथाची शिवांळ सुद्धा सुवर्णाची केलेली आहे. रथाचे जितके म्हणून निरनिराळे आकार आहेत तितके सर्व ह्या रथाचे ठिकाणी आढळून येतात. ॥ ४ ॥

वि जना॑ञ्छ्या॒वाः शि॑ति॒पादो॑ अख्य॒न्रथं॒ हिर॑ण्यप्रऽउगं॒ वह॑न्तः ।

शश्व॒द्विशः॑ सवि॒तुर्दैव्य॑स्यो॒पस्थे॒ विश्वा॒ भुव॑नानि तस्थुः ॥ ५ ॥

वि जनान् श्यावाः शितिऽपादः अख्यन् रथं हिरण्यऽप्रऽउगं वहंतः ।

शश्वत् विशः सवितुः दैव्यस्य उपस्थे विश्वा भुवनानि तस्थुः ॥ ५ ॥

ज्यांचे जूं सुवर्णाचे आहेत, अशा रथास वाहून नेणारे सवितादेवाचे अश्व - ज्यांची पावलें शुभ्र आहेत - त्यांनी सर्व लोकांवर स्वच्छ प्रकाश पाडला आहे. सर्व लोक व मनुष्ये ही सवितादेवाच्या समीपच निरंतर वास करीत असतात. ॥ ५ ॥

ति॒स्रो द्यावः॑ सवि॒तुर्द्वा उ॒पस्थाँ॒ एका॑ य॒मस्य॒ भुव॑ने विरा॒षाट् ।

आ॒णिं न रथ्य॑म॒मृताधि॑ तस्थुरि॒ह ब्र॑वीतु॒ य उ॒ तच्चिके॑तत् ॥ ६ ॥

तिस्रः द्यावः सवितुः द्वौ उपऽस्था एका यमस्य भुवने विराषाट् ।

आणिं न रथ्यं अमृता अधि तस्थुः इह ब्रवीतु यः उं इति तत् चिकेतत् ॥ ६ ॥

एकंदर द्युलोक तीन आहेत. त्यांपैकी दोन सवितादेवाच्या संनिध असतात व एकाचे स्थान यमाच्या प्रदेशांत आहे. सर्व अमर विश्व चाकाच्या कुणीप्रमाणे सवितादेवावर अवलंबून आहे. ज्यास ह्या गोष्टीचें ज्ञान असेल त्यास बोलण्यास पुढें येऊ द्या. ॥ ६ ॥

वि सु॑प॒र्णो अ॒न्तरि॑क्षाण्यख्यत्गभी॒रवे॑पा॒ असु॑रः सुनी॒थः ।

क्वे३॑दानीं॒ सूर्यः॒ कश्चि॑केत कत॒मां द्यां र॒श्मिर॒स्या त॑तान ॥ ७ ॥

वि सुऽपर्णः अन्तरिक्षाणि अख्यत् गभीरऽवेपाः असुरः सुऽनीथः ।

क्व इदानीं सूर्यः कः चिकेत कतमां द्यां रश्मिः अस्य आ ततान ॥ ७ ॥

ज्याची गति फार सुंदर आहे, ज्याच्या प्रयाणपद्धतींत फार गंभीरपणा आहे, जो शत्रूंचा संहारकर्ता आहे व ज्याचे अंगी उत्तम मार्गदर्शकत्व आहे, अशा त्या सवितादेवाने सर्व अंतरिक्षावर प्रकाश पाडला आहे. ह्यावेळीं सूर्य कोठें असेल बरें ? त्याच्या रश्मीने कोणत्या द्युलोकांपर्यंत मजल मारली आहे हे कोणास माहित असेल ? ॥ ७ ॥

अ॒ष्टौ वि अख्यत्क॒कुभः॑ पृथि॒व्यास्त्री धन्व॒ योज॑ना स॒प्त सिन्धू॑न् ।

हि॒र॒ण्या॒क्षः स॑वि॒ता दे॒व आग॒ाद्द॒धद्रत्ना॑ दा॒शु॒षे वार्या॑णि ॥ ८ ॥

अष्टौ वि अख्यत् ककुभः पृथिव्याः त्री धन्व योजना सप्त सिन्धून् ।

हिरण्यऽअक्षः सविता देवः आगात् दधत् रत्ना दाशुषे वार्याणि ॥ ८ ॥

पृथ्वीच्या आठही दिशा, तिन्ही निर्जल प्रदेश व सातही नद्या ह्यांस त्यानें सुप्रकाशित केले आहे. ज्याचे नेत्र सुवर्णाप्रमाणे चमकदार आहेत असा हा सवितादेव आपल्या उपासकासाठीं उत्तमोत्तम रत्नें बरोबर घेऊन अगदी जवळ येऊन ठेपला आहे. ॥ ८ ॥

हिरण्यपाणिः सविता विचर्षणिरुभे द्यावापृथिवी अन्तरीयते ।

अपामीवां बाधते वेति सूर्यमभि कृष्णेन रजसा द्यामृणोति ॥ ९ ॥

हिरण्यऽपाणिः सविता विऽचर्षणिः उभे इति द्यावापृथिवी इति अंतः ईयते ।

अप अमीवां बाधते वेति सूर्यं अभि कृष्णेन रजसा द्यां ऋणोति ॥ ९ ॥

दूरपर्यंत संचार करणारा व कांचनाप्रमाणें सुंदर वर्णाच्या हस्तांनी सुशोभित असा सविता स्वर्ग व पृथिवी ह्या दोहोंमधून आपला मार्ग आक्रमण करीत असतो. तो रोगांचे निर्मूलन करतो, सूर्याकडे गमन करतो व कृष्णवर्ण अंतरिक्षांतून द्युलोकांपर्यंत जाऊन पोहोंचतो. ॥ ९ ॥

हिरण्यहस्तो असुरः सुनीथः सुमृळीकः स्ववाँ यात्वर्वाङ् ।

अपसेधन्रक्षसो यातुधानानस्थाद्देवः प्रतिदोषं गृणानः ॥ १० ॥

हिरण्यऽहस्तः असुरः सुऽनीथः सुऽमृळीकः स्ववान् यातु अर्वाङ् ।

अपऽसेधन् रक्षसः यातुऽधानान् अस्थात् देवः प्रतिऽदोषं गृणानः ॥ १० ॥

ज्याचे हस्त सुवर्णाप्रमाणें सुंदर आहेत, जो शत्रूंचा नाश करणारा आहे, जो उत्तम मार्गदर्शक आहे, ज्याच्या कृपेने सर्व सुखें प्राप्त होतात, व जो स्वकीयांचा अभिमान धारण करणारा आहे तो सविता आमचेकडे येवो. प्रत्येक सायंकाळी ज्याची कीर्ति गाइली जाते तो सवितादेव राक्षस व यातुधान ह्यांचा संहार करीत येथें येण्यास सिद्ध झाला आहे. ॥ १० ॥

ये ते॒ पन्था॑ः सवितः पू॒र्व्यासो॑ऽरे॒णव॒ः सुकृ॑ता अ॒न्तरि॑क्षे ।

तेभि॑र्नो॑ अ॒द्य प॒थिभि॑ः सु॒गेभि॒ रक्षा॑ च नो॒ अधि॑ च ब्रूहि देव ॥ ११ ॥

ये ते पन्थाः सवितरिति पूर्व्यासः अरेणवः सुऽकृताः अंतरिक्षे ।

तेभिः नः अद्य पथिऽभिः सुऽगेभिः रक्ष च नः अधि च ब्रूहि देव ॥ ११ ॥

हे सवितादेवा, जे अंतरिक्षांतील प्राचीन मार्ग त्यांतील धूळ वगैरे काढून चांगले करून ठेवले आहेत त्या सुगममार्गांनी आज येथें येऊन आमचे रक्षण कर व आम्हांस आशीर्वचन दे. ॥ ११ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त ३६ (अग्नि सूक्त)

ऋषी - कण्व घौर : देवता - अग्नि छंद - १६ प्रकारचे

प्र वो॑ य॒ह्वं पु॑रू॒णां वि॒शां दे॑वय॒तीना॑म् ॥

अ॒ग्निं सू॒क्तेभि॒र्वचो॑भिरीमहे॒ यं सी॒मिद॒न्य ईळ॑ते ॥ १ ॥

प्र वः यह्वं पुरूणां विशां देवऽयतीनां ॥

अग्निं सुऽउक्तेभिः वचःऽओभिः ईमहे यं सीं इत् अन्ये ईळते ॥ १ ॥

देवाच्या दर्शनाची उत्कंठा बाळगणारे तुमच्यासारखे हे अनेक लोक आहेत, त्यांचा अभिमान बाळगणारा जो अग्निदेव त्यास सौन्दर्यपरिप्लुत स्तोत्रांनी मी आळवीत आहे. इतर मनुष्येंसुद्धां हयाचेंच स्तवन करीत असतात. ॥ १ ॥

जना॑सो अ॒ग्निं द॑धिरे सहो॒वृधं॑ ह॒विष्म॑न्तो विधेम ते ॥

स त्वं नो॑ अ॒द्य सु॒मना॑ इ॒हावि॒ता भवा॒ वाजे॑षु सन्त्य ॥ २ ॥

जनासः अग्निं दधिरे सहःऽवृधं हविष्मन्तः विधेम ते ॥

सः त्वं नः अद्य सुऽमनाः इह अविता भव वाजेषु संत्य ॥ २ ॥

सामर्थ्याची वृद्धि करणाऱ्या अग्नीची लोकांनी संस्थापना केली आहे. त्यास हवि अर्पण करून आम्हींही त्याला प्रकट व्हावयास लावूं. हे अत्युदार अग्निदेवा, पराक्रमाच्या कृत्यांत आमचा तूं हया ठिकाणी प्रसन्न अंतःकरणानें संरक्षणकर्ता हो. ॥ २ ॥

प्र त्वा॑ दू॒तं वृ॑णीमहे॒ होता॑रं वि॒श्ववे॑दसम् ॥

म॒हस्ते॑ स॒तो वि च॑रन्त्य॒र्चयो॑ दि॒वि स्पृ॑शन्ति भा॒नवः॑ ॥ ३ ॥

प्र त्वा दूतं वृणीमहे होतारं विश्वऽवेदसं ॥

महः ते सतः वि चरंति अर्चयः दिवि स्पृशंति भानवः ॥ ३ ॥

सर्व देवांस त्यांचे हवि पोहोंचविणारा आणि अखिल ज्ञानसंपूर्ण असा जो तूं त्या तुला आम्ही आपला प्रतिनिधी निवडतो. तूं मोठा आहेस. तुझी दीप्ति सर्वत्र संचार करते व तुझे प्रकाशरश्मि स्वर्गलोकास जाऊन भिडतात. ॥ ३ ॥

दे॒वास॑स्त्वा॒ वरु॑णो मि॒त्रो अ॑र्य॒मा सं दू॒तं प्र॒त्नमि॑न्धते ॥

विश्वं॒ सो अ॑ग्ने जयति॒ त्वया॒ धनं॒ यस्ते॑ द॒दाश॒ मर्त्यः॑ ॥ ४ ॥

देवासः त्वा वरुणः मित्रः अर्यमा सं दूतं प्रत्नं इंधते ॥

विश्वं सः अग्ने जयति त्वया धनं यः ते ददाश मर्त्यः ॥ ४ ॥

तूं देवांचा अतिशय पुरातन प्रतिनिधी आहेस. वरुण, मित्र, व अर्यमा हे सर्व तुला प्रज्वलित करीत असतात. हे अग्निदेवा, जो मानव तुला धन अर्पण करतो तो तुझ्या साहाय्यानें सर्व विश्वावर विजय मिळवितो. ॥ ४ ॥

मन्द्रो होता गृहपतिरग्ने दूतो विशामसि ॥

त्वे विश्वा संगतानि व्रता ध्रुवा यानि देवा अकृण्वत ॥ ५ ॥

मन्द्रः होता गृहऽपतिः अग्ने दूतः विशां असि ॥

त्वे इति विश्वा संऽगतानि व्रता ध्रुवा यानि देवाः अकृण्वत ॥ ५ ॥

हे अग्निदेवा, तूं आमचा हवि आनंदाने देवांप्रत पोहोंचविणारा असून गृहांचा स्वामी व सर्व लोकांचा प्रतिनिधी आहेस. देवांनी जे सनातन नियम केले ते सर्व तुझे ठायी एकत्र झालेले आहेत. ॥ ५ ॥

त्वे इदग्ने सुभगे यविष्ठ्य विश्वमा हूयते हविः ॥

स त्वं नो अद्य सुमना उतापरं यक्षि देवान्त्सुवीर्या ॥ ६ ॥

त्वे इति इत् अग्ने सुऽभगे यविष्ठ्य विश्वं आ हूयते हविः ॥

सः त्वं नः अद्य सुमना उत अपरं यक्षि देवान् सुऽवीर्या ॥ ६ ॥

हे अत्यंत तरुण अग्निदेवा, तूं उत्तम भाग्याने युक्त आहेस. तुझ्या ठिकाणी सर्व हवि अर्पण करण्यांत येतात. यास्तव आज आणि इतःपर सुद्धां आम्हांस अतिशय सामर्थ्याचा लाभ करवून प्रसन्न अंतःकरणानें आमचा यज्ञ देवांस प्राप्त होईल असें कर. ॥ ६ ॥

तं घे॑मि॒त्था न॑म॒स्विन॒ उप॑ स्व॒राज॑मासते ॥

होत्रा॑भिर॒ग्निं मनु॑षः॒ समि॑न्धते तिति॒र्वांसो॒ अति॒ स्रिधः॑ ॥ ७ ॥

तं घ ईं इत्था नमस्विनः उप स्वऽराजं आसते ॥

होत्राभिः अग्निं मनुषः सं इंधते तितिर्वांसः अति स्रिधः ॥ ७ ॥

भक्तिनम्र उपासक स्वतःच्या तेजाने देदीप्यमान अशा अग्नीचें अर्चन करतात. शत्रूंच्यावर ज्यांनी जय मिळविलेला आहे असे पुरुष हवि अर्पण करून अग्नीस प्रदीप्त करतात. ॥ ७ ॥

घ्नन्तो॑ वृ॒त्रम॑तर॒न्रोद॑सी अ॒प उ॒रु क्षया॑य चक्रिरे ॥

भु॒व॒त्कण्वे॑ वृषा॑ द्यु॒म्न्याहु॑तः॒ क्रन्द॑दश्वो॒ गवि॑ष्टिषु ॥ ८ ॥

घ्नंतः वृत्रं अतरन् रोदसी इति अपः उरु क्षयाय चक्रिरे ॥

भुवत् कण्वे वृषा द्युम्नी आऽहुतः क्रन्दत् अश्वः गोऽइष्टिषु ॥ ८ ॥

आपल्या शत्रूचा नाश करून त्या संकटांतून ते पार पडले. स्वर्ग, पृथ्वी आणि जलप्रवाह ह्यांना आपलें निवासस्थान बनविण्याकरितां त्यांनी त्यांचा विस्तार केला. ह्या सामर्थ्यवान् अग्नीचा धावा केला असतां तो कण्वास संपत्तिदायक होवो आणि गोधनादि वैभवाविषयीं आम्हांस इच्छा उत्पन्न झाली असतां गाईंचाच शब्द काय अश्वाचेंही खिंकाळणे ऐकूं येवो. ॥ ८ ॥

सं सी॑दस्व म॒हाँ अ॑सि॒ शोच॑स्व देव॒वीत॑मः ॥

वि धूममग्ने अरुषं मियेध्य सृज प्रशस्त दर्शतम् ॥ ९ ॥

सं सीदस्व महान् असि शोचस्व देवऽवीतमः ॥

वि धूमं अग्ने अरुषं मियेध्य सृज प्रऽशस्त दर्शतं ॥ ९ ॥

हे अग्निदेवा, तूं श्रेष्ठ आहेस. तूं आपल्या आसनावर विराजमान हो. देवसमुदायाकडें तुझें सदोदित आगमन असतें. तुझें तेज प्रकट होऊं दे. तूं यज्ञार्ह आहेस व तुझें स्तवन अतिशय होत असतें तूं आपला शीघ्रसंचारी व रमणीय आकार धारण करणारा धुराचा लोट सोडून दे. ॥ ९ ॥

यं त्वा देवासो मनवे दधुरिह यजिष्ठं हव्यवाहन ॥

यं कण्वो मेध्यातिथिर्धनस्पृतं यं वृषा यमुपस्तुतः ॥ १० ॥

यं त्वा देवासः मनवे दधुः इह यजिष्ठं हव्यवाहन ॥

यं कण्वः मेध्यऽअतिथिः धनऽस्पृतं यं वृषा यं उपऽस्तुतः ॥ १० ॥

सर्व देवांना हवि पोहोंचविणाऱ्या हे अग्ने, तूं अतिशय पवित्र आहेस. मनूकरितां देवांनी ज्यासाठी तुझी येथें स्थापना केली; कण्व, मेध्यातिथी, वृषा आणि उपस्तुत ह्यांनीही तुला याच कार्यासाठी सुस्थापित केले आहे. ॥ १० ॥

यम॒ग्निं मेध्या॑तिथिः॒ कण्व॑ ई॒धे ऋ॒तादधि॑ ॥

तस्य॒ प्रेषो॑ दीदि॒यु॒स्तमि॒मा ऋच॒स्तम॒ग्निं व॑र्धयामसि ॥ ११ ॥

यं अग्निं मेध्यऽअतिथिः कण्व ईधे ऋतात् अधि ॥

तस्य प्रेषः दीदियुः तं इमाः ऋचः तं अग्निं वर्धयामसि ॥ ११ ॥

मेध्यातिथी काण्वाने यज्ञकार्यार्थ प्रदीप्त केलेल्या अग्नीला आम्ही हविर्द्रव्ये अर्पण करीत आहोत. त्यास उद्देशून या ऋचांचे पठण आम्ही करीत आहोत. त्याच अग्नीची थोरवी आम्ही गात आहोत. ॥ ११ ॥

रा॒यस्पू॑र्धि स्वधा॒वोऽ॑स्ति॒ हि तेऽ॑ग्ने दे॒वेष्वाप्य॑म् ॥

त्वं वाज॑स्य॒ श्रुत्य॑स्य राजसि॒ स नो॑ मृळ म॒हाँ अ॑सि ॥ १२ ॥

रायः पूर्धि स्वधाऽवः ऽस्ति हि ते अग्ने देवेषु आप्यं ॥

त्वं वाजस्य श्रुत्यस्य राजसि सः नः मृळ महान् असि ॥ १२ ॥

देव, आप्त आणि स्वधा यांनी संपन्न अशा हे थोर अग्ने, ज्या प्रख्यात संपत्तीचा तूं स्वामी आहेस, ती तूं आम्हांस दे. तूं आम्हास सुख दे. ॥ १२ ॥

ऊ॒र्ध्व ऊ॒ षु ण॑ ऊ॒तये॒ तिष्ठा॑ दे॒वो न स॑वि॒ता ॥

ऊ॒र्ध्वो वाज॑स्य॒ सनि॑ता॒ यद॒ञ्जिभि॑र्वा॒घद्भि॑र्वि॒ह्वया॑महे ॥ १३ ॥

ऊर्ध्वः ऊं इति षु नः ऊतये तिष्ठा देवः नः सविता ॥

ऊर्ध्वः वाजस्य सनिता यत् अञ्जिऽभिः वाघत्ऽभिः विऽह्वयामहे ॥ १३ ॥

हे अग्ने, आम्ही घृतपूर्वक आणि ऋत्विजाद्वारा तुला आवाहन करीत आहोत. सवितृदेवाप्रमाणे तू आमच्या संरक्षणार्थ उभा राहून आम्हास धन दे. ॥ १३ ॥

ऊ॒र्ध्वो नः॑ पा॒ह्यंह॑सो॒ नि के॒तुना॒ विश्वं॒ सम॒त्रिणं॑ दह ॥

कृ॒धी न॑ ऊ॒र्ध्वाञ्च॒रथा॑य जी॒वसे॑ वि॒दा दे॒वेषु॑ नो॒ दुवः॑ ॥ १४ ॥

ऊर्ध्वः नः पाहि अंहसः नि केतुना विश्वं सं अत्रिणं दह ॥

कृधी नः ऊर्ध्वान् चरथाय जीवसे विदाः देवेषु नः दुवः ॥ १४ ॥

हे ऊर्ध्वगामी अग्ने, पापांपासून तू आमचे रक्षण कर, आणि स्वतेजाने आमच्या सर्व शत्रूंना तू एकसमयावच्छेदेकरून दग्ध करून टाक. पृथ्वीलोकी आनंदाने जगण्यासाठी आणि संचरण्यासाठी तू आमची उन्नती कर, आमची सेवा देवांप्रत पोहोचव. ॥ १४ ॥

पा॒हि नो॑ अग्ने र॒क्षसः॑ पा॒हि धू॒र्तेररा॑व्णः ॥

पा॒हि रीष॑त उ॒त वा॒ जिघां॑सतो॒ बृह॑द्भानो॒ यवि॑ष्ठ्य ॥ १५ ॥

पाहि नः अग्ने रक्षसः पाहि धूर्तेः अराव्णः ॥

पाहि रीषतः उत वा जिघांसतः बृहद्भानो इति बृहत्ऽभानो यविष्ठ्य ॥ १५ ॥

हे तेजस्वी, आणि तरुण अग्ने, राक्षसांपासून, धूर्त शत्रूंपासून, द्वेष्ट्यांपासून, तसेच आमचा वध करूं इच्छिणाऱ्यांपासून तू आमचे रक्षण कर. ॥ १५ ॥

घ॒नेव॒ विष्व॒ग्वि ज॒ह्यरा॑व्ण॒स्तपु॑र्जम्भ॒ यो अ॑स्म॒ध्रुक् ॥

यो मर्त्यः॒ शिशी॑ते॒ अत्य॒क्तुभि॒र्मा नः॒ स रि॒पुरी॑शत ॥ १६ ॥

घनाऽइव विष्वक् वि जहि अराव्णः तपुःजंभ यः अस्मऽध्रुक् ॥

यः मर्त्यः शिशीते अति अक्तुऽभिः मा नः सः रिपुः ईशत ॥ १६ ॥

हे ज्वालादंष्ट्र अग्ने, शत मार्गांनी नाहिंशा होणाऱ्या धनाप्रमाणे तूं आमच्या शत्रूंचे खंडन कर. आमचा द्वेष करणाऱ्या तसेच रात्रीच्या वेळी आमच वध करणाऱ्या शत्रूंच्या स्वामित्वापासून तूं आमचा बचाव कर. ॥ १६ ॥

अ॒ग्निर्व॑व्ने सु॒वीर्य॑म॒ग्निः कण्वा॑य॒ सौभ॑गम् ॥

अ॒ग्निः प्राव॑न्मि॒त्रोत मेध्या॑तिथिम॒ग्निः सा॒ता उ॑पस्तु॒तम् ॥ १७ ॥

अग्निः वव्ने सुऽवीर्यं अग्निः कण्वाय सौभगं ॥

अग्निः प्र आवत् मित्रा उत मेध्यऽअतिथिं अग्निः सातौ उपऽस्तुतं ॥ १७ ॥

अग्नीने कण्वाला वीर्यशाली संतती आणि सौभाग्य दिले. त्याने मित्राचे, मेध्यातिथीचे, तसेच उपस्तुताचे युद्धामध्यें रक्षण केले. ॥ १७ ॥

अ॒ग्निना॑ तु॒र्वशं॒ यदुं॑ परा॒वत॑ उ॒ग्रादे॑वं हवामहे ॥

अ॒ग्निर्न॑य॒न्नव॑वास्त्वं बृ॒हद्र॑थं तु॒र्वीतिं॒ दस्य॑वे॒ सहः॑ ॥ १८ ॥

अग्निना तुर्वशं यदुं पराऽवतः उग्रऽदेवं हवामहे ॥

अग्निः नयत् नवऽवास्त्वं बृहत्ऽरथं तुर्वीतिं दस्यवे सहः ॥ १८ ॥

दस्युसंहारक अग्नीच्या द्वारा मी तुर्वश, यदु, उग्रदेव, तसेच नववास्त्व, बृहद्रथ आणि तुर्वीति आदि पूर्वख्यात राजर्षींना पाचारण करतो. ॥ १८ ॥

नि त्वाम॑ग्ने॒ मनु॑र्दधे॒ ज्योति॒र्जना॑य॒ शश्व॑ते ॥

दी॒देथ॒ कण्व॑ ऋ॒तजा॑त उक्षि॒तो यं न॑म॒स्यन्ति॑ कृ॒ष्टय॑ः ॥ १९ ॥

नि त्वां अग्ने मनुः दधे ज्योतिः जनाय शश्वते ॥

दीदेथ कण्वे ऋतऽजात उक्षितः यं नमस्यंति कृष्टयः ॥ १९ ॥

यज्ञामध्यें उत्पन्न झालेल्या आणि वृद्धिंगत झालेल्या हे अग्ने, मनूने पृथ्वीलोकी तुझी स्थापना केली. तोच तू आज कण्वाच्या निवासस्थानी प्रकाशत आहेस. समस्त भक्त तुला वंदन करीत आहेत. ॥ १९ ॥

त्वेषासो अग्नेरमवन्तो अर्चयो भीमासो न प्रतीतये ॥

रक्षस्विनः सदमिद्यातुमावतो विश्वं समत्रिणं दह ॥ २० ॥

त्वेषासः अग्नेः अमऽवंतः अर्चयः भीमासः न प्रतिऽइतये ॥

रक्षस्विनः सदं इत् यातुऽमावतः विश्वं सं अत्रिणं दह ॥ २० ॥

हे अग्ने, तुझ्या ज्वाला बलिष्ठ आणि भयंकर असून त्यांना कोणीही अडवू शकत नाही. म्हणूनच तू बलवान राक्षस आणि समस्त शत्रूंना एकसमयावच्छेदेकरून दग्ध करून टाक. ॥ २० ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ३७ (मरुत् सूक्त)

ऋषि - कण्व घौर : देवता - मरुत् : छंद - गायत्री

क्री॒ळं व॒ः शर्धो॒ मारु॑तमन॒र्वाणं॑ रथे॒शुभ॑म् ॥ कण्वा॑ अ॒भि प्र गा॑यत ॥ १ ॥

क्रीळं वः शर्धः मारुतं अनर्वाणं रथेऽशुभं ॥ कण्वा अभि प्र गायत ॥ १ ॥

हे कण्वहो, मरुद्‌गणांस उद्देशून गायन करा. हे मरुद्‌गण रथावर सुंदर रीतीनें विराजमान झालेले आहेत. परंतु ते आपल्या रथास अश्व जोडीत नसतात. ह्यांस क्रीडा फार आवडते. ॥ १ ॥

ये पृष॑तीभिर्ऋ॒ष्टिभि॑ः सा॒कं वाशी॑भिर॒ञ्जिभि॑ः ॥ अजा॑यन्त॒ स्वभा॑नवः ॥ २ ॥

ये पृषतीभ्ः ऋष्टिऽभिः साकं वाशीभिः अंजिभिः ॥ अजायन्त स्वऽभानवः ॥ २ ॥

हे मरुद्‌गण स्वयंप्रकाशित असून आपल्या ठिपकेदार रंगाच्या हरिणी, आपल्या तरवारी, आपले भाले, व आपली आभरणें, ही सर्व बरोबर घेऊन ह्या जगांत प्रकट झाले. ॥ २ ॥

इ॒हेव॑ शृण्व एषां॒ कशा॒ हस्ते॑षु॒ यद्वदा॑न् ॥ नि याम॑ञ्चि॒त्रमृ॑ञ्जते ॥ ३ ॥

इहऽइव शृण्वे एषां कशाः हस्तेषु यत् वदान् ॥ नि यामन् चित्रं ॠंजते ॥ ३ ॥

ज्यावेळी आपल्या हातांनी ते आपल्या चाबकाचा आवाज काढतात त्यावेळीं जणू काय तो चाबूक येथेंच वाजला अशा तऱ्हेने मला तो ऐकूं येतो. मार्गक्रमण करीत असतां ते मोठ्या ऐटदार पद्धतीने त्यास आपल्या हातांत वागवतात. ॥ ३ ॥

प्र वः॒ शर्धा॑य॒ घृष्व॑ये त्वे॒षद्यु॑म्नाय शु॒ष्मिणे॑ ॥ दे॒वत्तं॒ ब्रह्म॑ गायत ॥ ४ ॥

प्र वः शर्धाय घृष्वये त्वेषऽद्युम्नाय शुष्मिणे ॥ देवत्तं ब्रह्म गायत ॥ ४ ॥

तुम्हांस प्रिय असणाऱ्या ह्या मरुद्गणा प्रित्यर्थ एखाद्या दैविक स्तोत्राचें गायन करा. हे मरुद्गण शत्रूंस चिरडून टाकणारे, तेजोवैभवानें युक्त व अत्यंत प्रबल आहेत. ॥ ४ ॥

प्र शं॑सा॒ गोष्वघ्न्यं॑ क्री॒ळं यच्छर्धो॒ मारु॑तम् ॥ जम्भे॒ रस॑स्य वावृधे ॥ ५ ॥

प्र शंसा गोषु अघ्न्यं क्रीळं यत् शर्धः मारुतं ॥ जंभे रसस्य ववृधे ॥ ५ ॥

धेनूंची प्राप्ति करून घेण्याकरितां पराक्रमी व क्रीडानिपुण अशा मरुद्गणांचे स्तवन कर. स्वादिष्ट रसांचे सेवन करून हे वीर्यवान् झाले. ॥ ५ ॥

को वो वर्षिष्ठ आ नरो दिवश्च ग्मश्च धूतयः ॥ यत्सीमन्तं न धूनुथ ॥ ६ ॥

कः वः वर्षिष्ठः आ नरः दिवः च ग्मः च धूतयः ॥ यत् सीं अंतं न धूनुथ ॥ ६ ॥

स्वर्ग व पृथिवी ह्यांस हालवून सोडणाऱ्या हे मरुद्देवांनो, ह्या विश्वांत असा कोण श्रेष्ठ आहे कीं ज्यास तुझी पृथ्वीच्या टोकापर्यंत फेकून देऊं शकला नाही ? ॥ ६ ॥

नि वो यामाय मानुषो दध्र उग्राय मन्यवे ॥ जिहीत पर्वतो गिरिः ॥ ७ ॥

नि वः यामाय मानुषः दध्रे उग्राय मन्यवे ॥ जिहीत पर्वतः गिरिः ॥ ७ ॥

आपण अगमन करीत असतांना आपल्या उग्र कोपाला भिऊन माणसे प्रत्येकवेळां आधार शोधूं लागलेली आहेत. कठिण शिखरांचा पर्वतसुद्धां आपला कोप पाहून भयकंपित होईल. ॥ ७ ॥

येषामज्मेषु पृथिवी जुजुर्वाँ इव विश्पतिः ॥ भिया यामेषु रेजते ॥ ८ ॥

येषां अज्मेषु पृथिवी जुजुर्वान्ऽइव विश्पतिः ॥ भिया यामेषु रेजते ॥ ८ ॥

ह्या मरुद्देवांचा संचार सुरू होतांच वार्धक्याने क्षीण झालेल्या एखाद्या नृपतीप्रमाणें ही पृथ्वी त्यांचे आगमन होत असतां भितीने लटलट कापू लागते. ॥ ८ ॥

स्थि॒रं हि जान॑मेषां॒ वयो॑ मा॒तुर्निरे॑तवे ॥ यत्सी॒मनु॑ द्वि॒ता शवः॑ ॥ ९ ॥

स्थिरं हि जानं एषां वयः मातुः निःऽएतवे ॥ यत् सीं अनु द्विता शवः ॥ ९ ॥

जेथें ह्यांचा जन्म झाला तें स्थान अतिशय स्थिर आहे. आपल्या मातेच्या उदरांतून बाहेर निघण्याकरितां ते पक्षीच बनले. कारण त्यांचे सामर्थ्य द्विगुणित होते. ॥ ९ ॥

उदु॒ त्ये सू॒नवो॒ गिरः॒ काष्ठा॒ अज्मे॑ष्वत्नत ॥ वा॒श्रा अ॑भि॒ज्ञु यात॑वे ॥ १० ॥

उत् ऊं इति त्ये सूनवः गिरः काष्ठाः अज्मेषु अत्नत ॥ वाश्राः अभिऽज्ञु यातवे ॥ १० ॥

शिवाय ह्या वाग्देवीच्या पुत्रांनी धेनूस आपल्या वत्साकडे नीट जातां यावे म्हणून विश्वाच्या सीमा फार दूरपर्यंत वाढवल्या. ॥ १० ॥

त्यं चि॑द्घा दी॒र्घं पृ॒थुं मि॒हो नपा॑त॒ममृ॑ध्रम् ॥ प्र च्या॑वयन्ति॒ याम॑भिः ॥ ११ ॥

त्यं चित् घ दीर्घं पृथुं मिहः नपातं अमृध्रं ॥ प्र च्यवयन्ति यामभिः ॥ ११ ॥

ते आपल्या मार्गानें जात असतां मेघाच्या बालकास खाली कोसळून पाडतात. ह्या मेघाच्या बालकाचा आकार दीर्घ व विस्तृत असून त्यास प्रायः कोणालाही इजा करतां येत नाही. ॥ ११ ॥

मरु॑तो॒ यद्ध॑ वो॒ ब॒लं जनाँ॑ अचुच्यवीतन ॥ गि॒रीँर॑चुच्यवीतन ॥ १२ ॥

मरुतः यत् ह वः बलं जनान् अचुच्यवीतन ॥ गिरीन् अचुच्यवीतन ॥ १२ ॥

हे मरुद्देवांनो, तुमचे सामर्थ्य इतकें मोठें असल्याकारणानें तुम्ही सर्व लोकांस हालवून सोडतां आणि पर्वतासही कंपित करता. ॥ १२ ॥

यद्ध॒ यान्ति॑ म॒रुत॒ः सं ह॑ ब्रुव॒तेऽ॑ध्व॒न्ना ॥ शृ॒णोति॒ कश्चि॑देषाम् ॥ १३ ॥

यत् ह यांति मरुतः सं ह ब्रुवते ऽध्वन् आ ॥ शृणोति कः चित् एषां ॥ १३ ॥

ज्या वेळीं मरुद्देव गमन करीत असतात त्यावेळी मार्गांत असतांना त्यांचे एकमेकांशी संभाषण होते. कोणातरी भाग्यवान पुरुषास ते ऐकूं येत असेल काय ? ॥ १३ ॥

प्र या॑त॒ शीभ॑मा॒शुभिः॒ सन्ति॒ कण्वे॑षु वो॒ दुवः᳚ ॥ तत्रो॒ षु मा॑दयाध्वै ॥ १४ ॥

प्र यात शीभं आशुऽभिः संति कण्वेषु वः दुवः ॥ तत्रो इति सु मादयाध्वै ॥ १४ ॥

आपल्या शीघ्रसंचारी वाहनावर बसून त्वरेनें इकडे या. कण्वमंडळींत तुमच्याकरितां हवि ठेवलेला आहे, त्यांत आनंद माना. ॥ १४ ॥

अस्ति॒ हि ष्मा॒ मदा॑य वः॒ स्मसि॑ ष्मा व॒यमे॑षाम् ॥ विश्वं॑ चि॒द् आयु॑र्जी॒वसे॑ ॥ १५ ॥

अस्ति हि स्म मदाय वः स्मसि स्म वयं एषां ॥ विश्वं चित् आयुः जीवसे ॥ १५ ॥

आनंद व्हावा ह्याकरितांच खरोखर हा येथें ठेवला आहे. आम्ही मनोभावानें केवळ ह्यांचेच भक्त आहोंत. आम्हांस दीर्घकालपर्यंत ह्या जगांत वास्तव्य करतां यावे म्हणून सर्व जीवन ह्यांनी आमच्या स्वाधीन करून ठेवले आहे. ॥ १५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ३८ (मरुत्सूक्त)

ऋषि - कण्व घौर : देवता - मरुत् : छंद - गायत्री

कद्ध नूनं कधप्रियः पिता पुत्रं न हस्तयोः ॥ दधिध्वे वृक्तबर्हिषः ॥ १ ॥

कत् ह नूनं कधऽप्रियः पिता पुत्रं न हस्तयोः ॥ दधिध्वे वृक्तऽबर्हिषः ॥ १ ॥

ज्याप्रमाणे आपल्या पुत्राचे बोबडे बोलणें ऐकण्याविषयी लोलुप असलेला पिता त्याचा प्रेमानें हात धरतो त्याप्रमाणे, हे मरुद्देवांनो, आपण आम्हांस खरोखर कधीं हातांत धरणार आहांत बरें ? आपणांकरितां आम्ही सोमरसांत पडलेले दर्भाचे तुकडे काढून टाकून तो तयार करून ठेवला आहे. ॥ १ ॥

क्व नूनं कद्वो अर्थं गन्ता दिवो न पृथिव्याः ॥ क्व वो गावो न रण्यन्ति ॥ २ ॥

क्व नूनं कत् वः अर्थं गंत दिवः न पृथिव्याः ॥ क्व वः गावः न रण्यंति ॥ २ ॥

खरोखर - कोणत्या प्रदेशास उद्देशून - आपण स्वर्गांतून जाण्यास निघाला आहां ? आपण पृथ्वीकडून आलां नाही काय ? आपल्या धेनु कोठें आहेत ? त्यांचे हंबरणे ऐकूं येत नाही. ॥ २ ॥

क्व वः सु॒म्ना नव्यां॑सि॒ मरु॑तः॒ क्व सु॒वि॒ता ॥ क्वो३॑ं विश्वा॑नि॒ सौभ॑गा ॥ ३ ॥

क्व वः सुम्ना नव्यांसि मरुतः क्व सुविता ॥ क्वो३इर्ति विश्वानि सौभगा ॥ ३ ॥

हे मरुद्वांनो तुम्ही आणलेले अपूर्व वैभव कोठें आहे ? आपणांपासून प्राप्त होणारी संपत्ति कोठें आहे ? आपणांपासून जी सर्व सुंदर भाग्यें आम्हांस प्राप्त होणार तीं कोठें ठेवली आहेत ? ॥ ३ ॥

यद्यू॒यं पृ॑श्निमातरो॒ मर्ता॑सः॒ स्यात॑न ॥ स्तो॒ता वो॑ अ॒मृतः॑ स्यात् ॥ ४ ॥

यत् यूयं पृश्निमातरः मर्तासः स्यातन ॥ स्तोता वः अमृतः स्यात् ॥ ४ ॥

हे पृश्नींच्या पुत्रांनो, जर तुम्ही मर्त्यांमध्येंच गणले जात असाल आणि तुमची स्तुति करणारा तुमचा उपासक मात्र अमरत्व पावत असेल, ॥ ४ ॥

मा वो॑ मृ॒गो न यव॑से जरि॒ता भू॒दजो॑ष्यः ॥ प॒था य॒मस्य॑ गा॒दुप॑ ॥ ५ ॥

मा वो मृगः न यवसे जरिता भूत् अजोष्यः ॥ पथा यमस्य गात् उप ॥ ५ ॥

तर खरोखर, ज्यप्रमाणे एखाद्या हरिणाला गवत खाण्याकरितां कोणी प्रतिबंध करणर नाही, त्याप्रमाणे तुमच्या सेवकाबरोबरही कोणाचीच अवकृपा होणार नाही व यमाच्या मार्गाने जाण्यास त्यास केव्हांही भाग पडणार नाही. ॥ ५ ॥

मो षु ण॒ः परा॑परा॒ निर्ऋ॑तिर्दु॒र्हणा॑ वधीत् ॥ प॒दी॒ष्ट तृष्ण॑या स॒ह ॥ ६ ॥

मो इति सु नः पराऽपरा निःऋतिः दुःहना वधीत् ॥ पदीष्ट तृष्णया सह ॥ ६ ॥

निर्दयपणाने नुकसार करणारी व एकसारखी वृद्धिंगत होणारी साडेसाती आम्हांस नाशाप्रत न नेवो. मत्त्वाकांक्षेबरोबर तिचाही निःपात होवो. ॥ ६ ॥

स॒त्यं त्वे॒षा अम॑वन्तो॒ धन्व॑ञ्चि॒दा रु॒द्रिया॑सः ॥ मिहं॑ कृण्वन्त्यवा॒ताम् ॥ ७ ॥

सत्यं त्वेषा अमऽवंतः धन्वन् चित् आ रुद्रियासः ॥ मिहं कृण्वंति अवाताम् ॥ ७ ॥

खरोखर हे बलशाली परंतु भिती उत्पन्न करणरे देव, अतिशय नापीक प्रदेशामध्यें सुद्धां वृष्टी करीत आहेत व त्या वृष्टीस वाऱ्याकडून खंड पाडूं देत नाहींत. ॥ ७ ॥

वा॒श्रेव॑ वि॒द्युन्मि॑माति व॒त्सं न मा॒ता सि॑षक्ति ॥ यदे॑षां वृ॒ष्टिरस॑र्जि ॥ ८ ॥

वाशाऽइव विऽद्युत् मिमाति वत्सं न माता सिसक्ति ॥ यत् एषां वृष्टिः असर्जि ॥ ८ ॥

जेव्हां यांच्याकडून पर्जन्याची वृष्टि होते तेव्हां वासराकरितां हंबरणाऱ्या धेनूप्रमाणे वीज गर्जना करते व माता ज्याप्रमाणे आपल्या लेकरास पोटाशी धरते त्याप्रमाणे सर्व जगतास ही घट्ट कवळून धरते. ॥ ८ ॥

दिवा॑ चि॒त्तमः॑ कृण्वन्ति प॒र्जन्ये॑नोदवा॒हेन॑ ॥ यत्पृ॑थि॒वीं व्यु॒न्दन्ति॑ ॥ ९ ॥

दिवा चित् तमः कृण्वंति पर्जन्येन उदऽवाहेन ॥ यत् पृथिवीं वि उंदंति ॥ ९ ॥

ज्यावेळी हे पृथ्वीस पाण्याने चिंब करून टाकतात त्यावेळीं उदकाची वृष्टि करणाऱ्या पर्जन्याकडून हे दिवसांसुद्धां काळाकुट्ट अंधकार पाडतात. ॥ ९ ॥

अध॑ स्व॒नान्म॒रुतां॒ विश्व॒मा सद्म॒ पार्थि॑वम् ॥ अरे॑जन्त॒ प्र मानु॑षाः ॥ १० ॥

अध स्वनात् मरुतां विश्वं आ सद्म पार्थिवम् ॥ अरेजंत प्र मानुषाः ॥ १० ॥

मरुतांची गर्जना ऐकल्याबरोबर ह्या पृथ्वीवरील एकूण एक घरे हादरून जातात. एवढेंच काय पण मनुष्यसुद्धां थरथर कांपू लागतो. ॥ १० ॥

मरु॑तो वीळुपा॒णिभि॑श्चि॒त्रा रोध॑स्वती॒रनु॑ ॥ या॒तेमखि॑द्रयामभिः ॥ ११ ॥

मरुतः वीळुपाणिभिः चित्राः रोधस्वतीः अनु ॥ यात ईं अखिद्रयामऽभिः ॥ ११ ॥

हे मरुद्देवहो, मार्गांत क्लेश न होतां नानाप्रकारच्या मनोहर नदींच्या काठाकाठाने आपल्या सामर्थ्यवान् हस्तांचा प्रताप गाजवीत गमन करा. ॥ ११ ॥

स्थि॒रा वः॑ सन्तु ने॒मयो॒ रथा॒ अश्वा॑स एषाम् ॥ सुसं॑स्कृता अ॒भीश॑वः ॥ १२ ॥

स्थिराः वः संतु नेमयः रथाः अश्वासः एषाम् ॥ सुऽसंस्कृताः अभीशवः ॥ १२ ॥

तुमच्या रथांच्या चाकांच्या धावा भंग न पावणाऱ्या असोत. तुमचे रथ आणि त्यांना जोडलेले अश्व खंबीर असोत. तुमच्या हातांतील लगाम नक्षीदार असोत. ॥ १२ ॥

अच्छा॑ वदा॒ तना॑ गि॒रा ज॒रायै॒ ब्रह्म॑ण॒स्पति॑म् ॥ अ॒ग्निं मि॒त्रं न द॑र्श॒तम् ॥ १३ ॥

अच्छ वद तना गिरा जरायै ब्रह्मणः पतिम् ॥ अग्निं मित्रं न दर्शतम् ॥ १३ ॥

स्तुति करण्याच्या इच्छेनें ब्रह्मणस्पतीस उद्देशून आणि त्याचप्रमानणे अग्नि व हा सुंदर मित्र ह्यांसही अनुलक्षून स्तोत्रांनी निरंतर आळवीत जा. ॥ १३ ॥

मि॒मी॒हि श्लोक॑मा॒स्ये प॒र्जन्य॑ इव ततनः ॥ गाय॑ गाय॒त्रमु॒क्थ्यम् ॥ १४ ॥

मिमीहि श्लोकं आस्ये पर्जन्यःऽइव ततनः ॥ गाय गायत्रं उक्थ्यम् ॥ १४ ॥

सतत कोसळणाऱ्या पावसाप्रमाणे उच्च घोष करून स्तोत्रपाठ करा. स्तुतींनी परिपूर्ण अशा एखाद्या सुंदर गानाचें गायन करा. ॥ १४ ॥

वन्दस्व मारुतं गणं त्वेषम् पनस्युमर्किणम् ॥ अस्मे वृद्धा असन्निह ॥ १५ ॥

वंदस्व मारुतं गणं त्वेषं पनस्युं अर्किणम् ॥ अस्मे इति वृद्धाः असन् इह ॥ १५ ॥

सामर्थ्यवान्, स्तुतीस योग्य आणि अनेक स्तोत्रांनी ज्याचे माहात्म्य वर्णन केले आहे अशा मरुतांच्या समुदायास वंदन कर. ते श्रेष्ठ मरुत् येथें आमच्यावरच अनुग्रह करण्याकरितां बसलेले आहेत. ॥ १५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ३९ (मरुत्सूक्त)

ऋषि - कण्व घौर : देवता - मरुत् : छंद - सम-सतोबृहती; विषम बृहती

प्र यदि॒त्था प॑रा॒वतः॑ शो॒चिर्न मान॒मस्य॑थ ॥

कस्य॒ क्रत्वा॑ मरुतः॒ कस्य॒ वर्प॑सा॒ कं या॑थ॒ कं ह॑ धूतयः ॥ १ ॥

प्र यत् इत्था परावतः शोचिः न मानं अस्यथ ॥

कस्य क्रत्वा मरुतः कस्य वर्पसा कं याथ कं ह धूतयः ॥ १ ॥

सर्व जगास हालवून सोडणाऱ्या हे मरुतांनो, ज्याअर्थी आपण एखाद्या अग्निज्वालेप्रमाणे आपले प्रतिबिंब लांबच्या प्रदेशापासून अशा रीतीनें पुढें फेंकित आहां, त्याअर्थी कोणाच्या करामतीमुळें, कोणाच्या आग्रहाने, कोणास उद्देशून - खरोखर कोणावर अनुग्रह करण्याकरितां आपण चालला आहां बरें ? ॥ १ ॥

स्थि॒रा वः॑ स॒न्त्वायु॑धा परा॒णुदे॑ वी॒ळू उ॒त प्र॑ति॒ष्कभे॑ ॥

यु॒ष्माक॑मस्तु॒ तवि॑षी॒ पनी॑यसी॒ मा मर्त्य॑स्य मा॒यिनः॑ ॥ २ ॥

स्थिरा वः संतु आयुधा पराऽनुदे वीळु उत प्रतिस्कभे ॥

युष्माकं अस्तु तविषी पनीयसी मा मर्त्यस्य मायिनः ॥ २ ॥

शत्रूंची दाणादाण करण्याकरितां तुझी आयुधें एकसारखी चालोत, आणि तुझे बळ त्यांचा योग्य प्रतिकार करो. प्रशंसनीय सामर्थ्य केवळ तुझ्याच जवळ असो, कपटी मनुष्याजवळ कधींही नसो. ॥ २ ॥

परा॑ ह॒ यत्स्थि॒रं ह॒थ नरो॑ व॒र्तय॑था गु॒रु ॥

वि या॑थन व॒निनः॑ पृथि॒व्या व्याशाः॒ पर्व॑तानाम् ॥ ३ ॥

परा ह यत् स्थिरं हथ नरः वर्तयथा गुरु ॥

वि याथन वनिनः पृथिव्याः वि आशाः पर्वतानाम् ॥ ३ ॥

हे वीरांनो, जेव्हां स्थिर पदार्थांना तुम्ही त्याच्या स्थानापासून हलवितां, आणि ज्या वस्तु अतिशय जड आहेत, त्यांना भिंगरीसारखे फिरावयास लावतां, तेव्हां आपले गमन पृथ्वीवरील वृक्षांमधून व पर्वताच्या दरीखोऱ्यांमधून होत असते. ॥ ३ ॥

नहि वः शत्रुर्विविदे अधि द्यवि न भूम्यां रिशादसः ॥

युष्माकमस्तु तविषी तना युजा रुद्रासो नू चिदाधृषे ॥ ४ ॥

नहि वः शत्रुः विविदे अधि द्यवि न भूम्यां रिशादसः ॥

युष्माकं अस्तु तविषी तना युजा रुद्रासः नू चित् आऽधृषे ॥ ४ ॥

हे शत्रुसंहारक मरुद्देवहो, स्वर्ग अथवा पृथ्वी ह्यावर खरोखर आपणास कोणीही शत्रु उरलेला नाही. हे भयप्रद देवांनो, शत्रूवर झडप घालतां यावी म्हणून सामर्थ्याची आपणांस सदैव जोड मिळो. ॥ ४ ॥

प्र वेपयन्ति पर्वतान्वि विञ्चन्ति वनस्पतीन् ॥

प्रो आरत मरुतो दुर्मदा इव देवासः सर्वया विशा ॥ ५ ॥

प्र वेपयंति पर्वतान् वि विञ्चंति वनस्पतीन् ॥

प्रो इति आरत मरुतः दुर्मदाःऽइव देवासः सर्वया विशा ॥ ५ ॥

ते पर्वतांना कंप उत्पन्न करतात आणि मोठठ्या वृक्षास भग्न करतात. मदोन्मत्त मनुष्याप्रमाणे हे मरुद्देव आपल्या परिवारांसहवर्तमान इतस्ततः संचार करीत असतात. ॥ ५ ॥

उपो॒ रथे॑षु॒ पृष॑तीरयुग्ध्वं॒ प्रष्टि॑र्वहति॒ रोहि॑तः ॥

आ वो॒ यामा॑य पृथि॒वी चि॑दश्रो॒दबी॑भयन्त॒ मानु॑षाः ॥ ६ ॥

उपो इति रथेषु पृषतीः अयुग्ध्वं प्रष्टिः वहति रोहितः ॥

आ वः यामाय पृथिवी चित् अश्रोत् अबीभयंत मानुषाः ॥ ६ ॥

चित्रविचित्र वर्णाच्या हरिणींना आपण आपल्या रथास जोडले आहे, आणि प्रमुखत्वानें एक रक्तवर्ण मृग तो रथ ओढीत आहे. आपण याल म्हणून पृथ्वी लक्षपूर्वक ऐकत बसली आहे व मनुष्यें भयव्याकुल होऊन गेलेलीं आहेत. ॥ ६ ॥

आ वो॑ म॒क्षू तना॑य॒ कं रुद्रा॒ अवो॑ वृणीमहे ॥

गन्ता॑ नू॒नं नोऽ॑वसा॒ यथा॑ पु॒रेत्था कण्वा॑य बि॒भ्युषे॑ ॥ ७ ॥

आ वः मक्षु तनाय कं रुद्राः अवः वृणीमहे ॥

गंत् नूनं नः अवसा यथा पुरा इत्था कण्वाय बिभ्युषे ॥ ७ ॥

हे रुद्रहो, आपण ज्याप्रमाणे आमचें संरक्षण करतां तशा प्रकारच्या संरक्षणाची याचना आम्ही नेहमी नेहमी आणि तीही ताबडतोब कोणाजवळ करावी ? पूर्वी ज्याप्रमाणे आमच्या संरक्षणाच्या तजविजीने तुम्ही येत होतां त्याप्रमाणें आतां ही ह्या भयविह्वल कण्वा प्रित्यर्थ इकडे या. ॥ ७ ॥

यु॒ष्मेषि॑तो मरुतो॒ मर्त्ये॑षित॒ आ यो नो॒ अभ्व॒ ईष॑ते ॥

वि तं यु॑योत॒ शव॑सा॒ व्योज॑सा॒ वि यु॒ष्माका॑भिरू॒तिभिः॑ ॥ ८ ॥

युष्माऽइषितः मरुतः मर्त्यऽषितः आ यः नः अभ्वः ईषते ॥ वि तं युयोत शवसा वि ओजसा वि युष्माकाभिः ऊतिभिः ॥ ८ ॥

कोणीही मनुष्य, मग तो तुम्ही पाठविलेला असो अथवा इतर मनुष्यांनी चिथवलेला असो, आम्हांवर हल्ला करण्याकरितां येत असेल त्याचे आपल्या सामर्थ्याने, शक्तीने अथवा भक्तजनसंरक्षक आपल्या शस्त्रांनी दोन तुकडे करा. ‖ ८ ‖

असा॑मि॒ हि प्र॑यज्यव॒ः कण्वं॑ द॒द प्र॑चेतसः ‖

असा॑मिभिर्मरुत॒ आ न॑ ऊ॒तिभि॒र्गन्ता॑ वृ॒ष्टिं न वि॒द्युतः॑ ‖ ९ ‖

असामि हि प्रऽयज्यवः कण्वं दद प्रऽचेतसः ‖ असामिऽभिः मरुतः आ नः ऊतिऽभिः गंता वृष्टिं न विद्युतः ‖ ९ ‖

हे अत्यंत ज्ञानशील व यज्ञार्ह मरुद्देवांनो, आपण कण्वास जे कांही वैभव अर्पण करणार असाल तें संपूर्ण अर्पण करा आणि आमच्या संरक्षणाची संपूर्ण साधने घेऊन, ज्याप्रमाणे विद्युल्लतेचा ओढा पर्जन्यवृष्टीकडे असतो त्याप्रमाणे, आमचेकडे आगमन करा. ‖ ९ ‖

असा॒म्योजो॑ बिभृथा सुदा॒नवोऽ॑सामि धूतय॒ः शवः॑ ‖

ऋषिद्विषे मरुतः परिमन्यव इषुं न सृजत द्विषम् ॥ १० ॥

असामि ओजः बिभृथ सुऽदानवः ऽसामि धूतयः शवः ॥ ऋषिऽद्विषे मरुतः परिऽमन्यवे इषुं न सृजत द्विषम् ॥ १० ॥

सर्व जगतास हालवून सोडणारे व दानकर्मनिपुण मरुद्देवहो, आपले सर्व सामर्थ्य व शक्ति आपल्याजवळ ठेवा, आणि जो क्रोधाविष्ट पुरुष ऋषींचाही द्वेष करीत असेल त्यावर बाण सोडल्याप्रमाणे एखादा शत्रु सोडा. ॥ १० ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ४० (ब्रह्मणस्पति सूक्त)

ऋषि - कण्व घौर : देवता - ब्रह्मणस्पति : छंद - सम-सतोबृहती; विषम बृहती

उत्तिष्ठ ब्रह्मणस्पते देवयन्तस्त्वेमहे ॥

उप॒ प्र य॑न्तु म॒रुत॑ः सु॒दान॑व॒ इन्द्र॑ प्रा॒शूर्भ॑वा॒ सचा॑ ॥ १ ॥

उत् तिष्ठ ब्रह्मणः पते देवऽयंतः त्वा ईमहे ॥

उप प्र यंतु मरुतः सुऽदानवः इन्द्र प्राशूः भवा सचा ॥ १ ॥

हे ब्रह्मणस्पति देवा, ऊठ, देवांची भक्ति करणारे उपासक तुझ्या दर्शनाची इच्छा करीत आहेत. अत्यंत उदार असे मरुत् इकडे येवोत. हे इंद्रा, त्यांचेसह सोमरसाचा आस्वाद घेणारा हो. ॥ १ ॥

त्वामिद्धि स॑हसस्पु॒त्र मर्त्य॑ उपब्रू॒ते धने॑ हि॒ते ॥

सु॒वीर्यं॑ मरु॒त आ स्वश्व्यं॒ दधी॑त॒ यो व॑ आच॒के ॥ २ ॥

त्वां इत् धि सहसः पुत्र मर्त्यः उपऽब्रूते धने हिते ॥

सुऽवीर्यं मरुतः आ सुऽअवश्व्यं दधीत यः व आऽचके ॥ २ ॥

सामर्थ्यांहून प्रादुर्भूत होणाऱ्या हे देवा, धनाची प्राप्ति करून घेण्याचे प्रसंगी प्रत्येक मनुष्य तुलाच बोलावतो. हे मरुतांनो, जो भक्त आपणांस हांक मारील त्याचेसाठी सुंदर अश्वांनी युक्त असें उत्तम सामर्थ्य तयार करून ठेवा. ॥ २ ॥

प्रैतु ब्रह्मणस्पतिः प्र देव्येतु सूनृता ॥

अच्छा वीरं नर्यं पङ्क्तिराधसं देवा यज्ञं नयन्तु नः ॥ ३ ॥

प्र एतु ब्रह्मणः पतिः प्र देवी एतु सूनृता ॥

अच्छ वीरं नर्यं पङ्क्तिऽराधसं देवाः यज्ञं नयंतु नः ॥ ३ ॥

ब्रह्मणस्पति इकडे येवो, देवी सूनृता इकडे आगमन करो. देव आम्हांस असा यज्ञ करण्याची स्फूर्ति देवोत की जो उत्साहाने चालेल, जो मनुष्यांस हितकारी होईल, व ज्याचे पासून अनेकांस संतोष प्राप्त होईल. ॥ ३ ॥

यो वाघते ददाति सूनरं वसु स धत्ते

अक्षि॑ति॒ श्रव॑ः ॥ तस्मा॒ इळां॑ सु॒वीरा॒मा य॑जामहे सु॒प्रतू॑र्तिमने॒हस॑म् ॥ ४ ॥

यः वाघते ददाति सूनरं वसु सः धत्ते अक्षिति श्रवः ॥

तस्मै इळां सुऽवीरां आ यजामहे सुऽप्रतूर्तिं अनेहसम् ॥ ४ ॥

मनुष्याजातीस अत्युपयुक्त असे धन जो भाविक पुरुषास अर्पण करतो तो अक्षय्य कीर्ति प्राप्त करून घेतो. त्याचे कल्याणार्थ आम्ही इळादेवीस हवि अर्पण करतो. ही इळादेवी वीरांचा लाभ करविणारी, शत्रूंचा निःपात करणारी व कोणाकडूनही अपाय न पावणारी अशी आहे. ॥ ४ ॥

प्र नू॒नं ब्रह्म॑ण॒स्पति॒र्मन्त्रं॑ वदत्यु॒क्थ्यम् ॥

यस्मि॒न्निन्द्रो॒ व॑रुणो मि॒त्रो अ॑र्य॒मा दे॒वा ओकां॑सि चक्रि॒रे ॥ ५ ॥

प्र नूनं ब्रह्मणः पतिः मंत्रं वदति उक्थ्यम् ॥

यस्मिन् इन्द्रः वरुणः मित्रः अर्यमा देवाः ओकांसि चक्रिरे ॥ ५ ॥

खरोखर ज्याचे ठिकाणी इंद्र, वरुण, मित्र व अर्यमा हया देवांनी आपला वास केलेला आहे असा अत्यंत प्रशंसायोग्य मंत्र ब्रहमणस्पति म्हणत आहे. ॥ ५ ॥

तमिद्वोचेमा विदथेषु शम्भुवं मन्त्रं देवा अनेहसम् ॥

इमां च वाचं प्रतिहर्यथा नरो विश्वेद्वामा वो अश्नवत् ॥ ६ ॥

तं इत् वोचेम विदथेषु शंऽभुवं मंत्रं देवा अनेहसम् ॥

इमां च वाचं प्रतिऽहर्यथ नरः विश्वा इत् वामा वः अश्नवत् ॥ ६ ॥

यज्ञामध्यें आम्ही, हे देवांनो, तोच कल्याणकारक व अविनाशी मंत्र म्हणत जाऊं. हे वीरांनो, तुम्ही हयाही स्तुतीचा अंगीकार करीत आहां त्याअर्थी तुम्हांपासून प्राप्त होणारीं सर्व सुखें तुमच्या भक्तास निःसंशय उपभोगण्यास सांपडतील. ॥ ६ ॥

को देवयन्तमश्नवज्जनं को वृक्तबर्हिषम् ॥

प्रप्र दाश्वान्पस्त्याभिरस्थितान्तर्वावत्क्षयं दधे ॥ ७ ॥

कः देवयंतं अश्नवत् जनं कः वृक्तऽबर्हिषम् ॥

प्रऽप्र दाश्वान् पस्त्याभिः अस्थित अंतःऽवावत् क्षयं दधे ॥ ७ ॥

भक्तिमान मनुष्यास कोण ग्रासूं शकेल ? सोमरसांतील दर्भांची अग्रें काढून टाकणाऱ्या उपासकास कोण पराभूत करील ? हवि अर्पण करणाऱ्या मनुष्याचा त्याच्या सर्व परिवारांसह आजपर्यंत नेहमी उत्कर्षच झालेला आहे व त्यानें नेहमींच सर्व समृद्धीने भरलेली अशी घरें उभारलेली आहेत. ॥ ७ ॥

उप क्षत्रं पृञ्चीत हन्ति राजभिर्भये चित्सुक्षितिं दधे ॥

नास्य वर्ता न तरुता महाधने नार्भे अस्ति वज्रिणः ॥ ८ ॥

उप क्षत्रं पृंचीत हंति राजऽभिः भये चित् सुऽक्षितिं दधे ॥

न अस्य वर्ता न तरुता महाऽधने न अर्भे अस्ति वज्रिणः ॥ ८ ॥

तो ब्रह्मणस्पति आपलें सर्व बल एकत्र करील, कारण राजांकडून तोच शत्रूस मारवीत असतो. भितीप्रसंगी देखील तो निर्भय निवासस्थान तयार करून ठेवतो. लहान अथवा मोठ्या युद्धांतही ह्या वज्रधारी देवास तोंड देणारा अथवा त्याचा पराभव करणारा कोणी नाही. ॥ ८ ॥

ॐ तत् सत्

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ४१ (मित्र, वरुण, आदित्य, अर्यमन् सूक्त)

ऋषि - काण्व घौर : देवता - आदित्य, मित्र, वरुण अर्यमन् : छंद - गायत्री

यं रक्ष॑न्ति॒ प्रचे॑तसो॒ वरु॑णो मि॒त्रो अ॑र्य॒मा ॥

नू चि॒त्स द॑भ्यते॒ जनः॑ ॥ १ ॥

यं रक्षंति प्रचेतसः वरुणः मित्रः अर्यमा ॥

नु चित् सः दभ्यते जनः ॥ १ ॥

अत्यंत प्रज्ञावान असे मित्र, वरुण आणि अर्यमा हे देव ज्याचे रक्षण करतात अशा मनुष्यास कोणाकडून तरी अपाय होणें शक्य आहे काय ? ॥ १ ॥

यं बा॒हु॒तेव॒ पिप्र॑ति॒ पान्ति॒ मर्त्यं॑ रि॒षः ॥

अरि॑ष्टः॒ सर्व॑ एधते ॥ २ ॥

यं बाहुताऽइव पिप्रति पांति मर्त्यं रिषः ॥

अरिष्टः सर्वः एधते ॥ २ ॥

जणूं कांही आपल्या बाहूवर झेलल्याप्रमाणे ज्या मनुष्यांचे ते पोषण व शत्रूपासून रक्षण करतात तीं मनुष्यें सर्व भितीपासून मुक्त होऊन भरभराटीस चढतात. ॥ २ ॥

वि दु॒र्गा वि द्विषः॑ पु॒रो घ्नन्ति॒ राजा॑न

एषाम् ॥ नय॑न्ति दुरि॒ता ति॒रः ॥ ३ ॥

वि दुःऽगा वि द्विषः पुरः घ्नंति राजानः एषाम् ॥

नयंति दुःऽइता तिरः ॥ ३ ॥

हे सर्व विश्वाचे राजे आपल्या समोर भक्तांच्या संकटांचा व शत्रूंचा नाश करतात आणि त्यांची अरिष्टें पार नाहीशी करतात. ॥ ३ ॥

सुगः पन्थां अनृक्षर आदित्यास ऋतं यते ॥

नात्रावखादो अस्ति वः ॥ ४ ॥

सुऽगः पंथाः अनृक्षरः आदित्यासः ऋतं यते ॥

न अत्र अवऽखादः अस्ति वः ॥ ४ ॥

हे आदित्यहो, जो नीतिपथाकडे जातो त्याचा मार्ग सुगम आणि कंटकरहित असतो. येणेंकरून आपणांसही कधींही वाईट मनुष्याचे हवि मिळण्याचा संभव नाही. ॥ ४ ॥

यं यज्ञं नयथा नर आदित्या ऋजुना पथा ॥

प्र वः स धीतये नशत् ॥ ५ ॥

यं यज्ञं नयथ नरः आदित्याः ऋजुना पथा ॥

प्र वः सः धीतये नशत् ॥ ५ ॥

हे शूर आदित्य हो, ज्या यज्ञास तुम्ही सरळ वाट दाखवून मार्गोपदेशक होतां तो तुमचें स्तवन करण्यास कधींतरी चुकेल काय ? ॥ ५ ॥

स रत्नं॒ मर्त्यो॒ वसु॒ विश्वं॑ तो॒कमु॒त त्मना॑ ॥

अच्छा॑ गच्छ॒त्यस्तृ॑तः ॥ ६ ॥

सः रत्नं मर्त्यः वसु विश्वं तोकं उत त्मना ॥

अच्छा गच्छति अस्तृतः ॥ ६ ॥

तो मनुष्य कोठें पराभव न पावतां उत्तम संपत्ति, सर्व प्रकारचें वैभव आणि संतति ह्यांकडे आपोआप जाऊन पोंचतो. ॥ ६ ॥

क॒था रा॑धाम सखाय॒ स्तोमं॑ मि॒त्रस्या॑र्य॒म्णः ॥

महि॒ प्सरो॒ वरु॑णस्य ॥ ७ ॥

कथा राधाम सखाय स्तोमं मित्रस्य अर्यम्णः ॥

महि प्सरः वरुणस्य ॥ ७ ॥

जिवलग स्नेहयांनो, मित्र आणि अर्यमा ह्यांचे स्तोत्र व वरुणाचा उत्कृष्ट हवि आपण कसा सजवावा बरें ? ॥ ७ ॥

मा वो॒ घ्नन्तं॒ मा शप॑न्तं॒ प्रति॑ वोचे देव॒यन्त॑म् ॥

सु॒म्नैरिद्व॒ आ वि॑वासे ॥ ८ ॥

मा वः घ्नंतं मा शपंतं प्रति वोचे देवऽयंतम् ॥

सुम्नैः इत् वः आ विवासे ॥ ८ ॥

एखादा मनुष्य आपणांस शिव्याशाप देईल किंवा आपणांवर बोटें मोडील तर जरी तो भाविक असला तरी त्याचे बरोबर माझें संभाषण न घडो. तुम्ही दिलेल्याच संपत्तीवर मी संतोष मानून राहतो. ॥ ८ ॥

च॒तुर॑श्चि॒द्दद॑मानाद्बिभी॒यादा निधा॑तोः ॥

न दु॑रु॒क्ताय॑ स्पृहयेत् ॥ ९ ॥

चतुरः चित् ददमानात् बिभीयात् आ निऽधातोः ॥

न दुःऽउक्ताय स्पृहयेत् ॥ ९ ॥

जो चारही संपत्ति देणारा आहे व ज्याचे जवळ संपत्तीचा ठेवा आहे, त्याची नेहमी भिती बाळगावी. त्याचे विषयी दुरुक्ति बोलण्याची आवड बाळगूं नये. ॥ ९ ॥

मण्डल १ सूक्त ४२ (पुषन् सूक्त)

ऋषि - काण्व घौर : देवता - पूषन् : छंद - गायत्री

सम् पू॑ष॒न्नध्व॑नस्तिर॒ व्यंहो॑ वि॒मुचो नपात् ॥ सक्ष्वा॑ दे॒व प्र ण॑स्पु॒रः ॥ १ ॥

सं पूषन्न् अध्वनः तिर वि अंहः विऽमुचः नपात् ॥ सक्ष्व देव प्र नः पुरः ॥ १ ॥

हे पूषा , वाटेने आम्हांस घेऊन जा. हे विमोचनपुत्रा, आमच्या संकटांतून आम्हांस मुक्त कर. हे देवा, आमचे जवळच चाल. ॥ १ ॥

यो नः᳚ पूषन्न॒घो वृको॑ दु॒ःशेव॑ आ॒दिदे॑शति ॥ अप॑ स्म॒ तं प॒थो ज॑हि ॥ २ ॥

यः नः पूषन् अघः वृकः दुःऽशेव आऽदिदेशति ॥ अप स्म तं पथः जहि ॥ २ ॥

हे पूषा, जो हिडीसवाणा व दुष्ट लांडगा आम्हांस मार्गोपदेशक होऊं पाहतो त्यास मार्गातून काढून टाक. ॥ २ ॥

अप॒ त्यं प॑रिप॒न्थिनं᳚ मुषी॒वाणं᳚ हुर॒श्चित॑म् ॥ दू॒रमधि॑ स्रु॒तेर॑ज ॥ ३ ॥

अप त्यं परिऽपंथिनं मुषीवाणं हुरःऽचितम् ॥ दूरं अधि स्रुतेः अज ॥ ३ ॥

जो कपटी चोर आमच्या मार्गांत विघ्न करतो त्यास वाटेंतून दूर हांकून लाव. ॥ ३ ॥

त्वं तस्यं द्व॒या॒विनोऽघशंसस्य॒ कस्यं चित् ॥ प॒दाभि तिष्ठ॒ तपुंषिम् ॥ ४ ॥

त्वं तस्य द्वयाविनः अघऽशंसस्य कस्य चित् ॥ पदा अभि तिष्ठ तपुषिम् ॥ ४ ॥

दुर्भाषणी, दुटप्पी माणसाच्या, तापदायक शरीरावर, मग तो कोणीही असो, पाय देऊन उभा रहा. ॥ ४ ॥

आ तत्ते दस्र मन्तुम॒ः पूष॒न्नवों वृणीमहे ॥ येनं पि॒तॄनचोंदयः ॥ ५ ॥

आ तत् ते दस्र मंतुऽमः पूषन् अवः वृणीमहे ॥ येन पितॄन् अचोदयः ॥ ५ ॥

हे सुंदर प्रज्ञावान पूषा, ज्याचे योगाने तूं आमच्या पितरांस भरभराटीस पोंचविलेस त्या तुझ्या कृपा प्रसादाची आम्ही इच्छा करतो. ॥ ५ ॥

अधां नो विश्वसौभग॒ हिरंण्यवाशीमत्तम ॥ धनांनि सु॒षणां कृधि ॥ ६ ॥

अध नः विश्व*सौभग हिरण्यवाशीमत्ऽतम ॥ धनानि सुऽसना कृधि ॥ ६ ॥

हे सकलसौभाग्यवंता, हे सुवर्णशस्त्रांनी विभूषित देवा, आम्हांस सकल संपत्ति सुलभ कर. ॥ ६ ॥

अति॑ नः स॒श्चतो॑ नय सु॒गा नः᳚ सु॒पथा॑ कृणु ॥ पूष॑न्नि॒ह क्रतुं᳚ विदः ॥ ७ ॥

अति नः सश्चतः नय सुऽगा नः सुऽपथा कृणु ॥ पूषन् इह क्रतुं विदः ॥ ७ ॥

आमचा पाठलाग करणारे असतील त्यांचेमधून आम्हांस बचावून घेऊन जा आणि आमचे मार्ग जाण्यास सुलभ कर. हे पूषा, येथें काय करणें उचित आहे, हें तुला विदितच आहे. ॥ ७ ॥

अ॒भि सू॒यव॑सं नय॒ न न॑वज्वा॒रो अध्व॑ने ॥ पूष॑न्नि॒ह क्रतुं᳚ विदः ॥ ८ ॥

अभि सुऽयवसं नय न नवऽज्वारः अध्वने ॥ पूषन् इह क्रतुं विदः ॥ ८ ॥

जेथें तृणाची समृद्धि असेल अशा प्रदेशांत आम्हांस घेऊन जा आणि मार्गांत कोणताही नविन ताप उत्पन्न न होवो. येथें काय करणें उचित आहे तें हे पूषा, तुला विदितच आहे. ॥ ८ ॥

शग्धि पूर्धि प्र यंसि च शिशीहि प्रास्युदरम् ॥ पूषन्निह क्रतुं विदः ॥ ९ ॥

शग्धि पूर्धि प्र यंसि च शिशीहि प्रासि उदरम् ॥ पूषन् इह क्रतुं विदः ॥ ९ ॥

हे पूषा, तूं सामर्थ्यवान् आहेस म्हणून आमच्या इच्छा परिपूर्ण कर. आम्हांस संपत्ति दे. आम्हांस तृप्त कर. येथें काय करणें उचित आहे हें तुला विदितच आहे. ॥ ९ ॥

न पूषणं मेथामसि सूक्तैरभि गृणीमसि ॥ वसूनि दस्ममीमहे ॥ १० ॥

न पूषणं मेथामसि सुऽक्तैः अभि गृणीमसि ॥ वसूनि दस्मं ईमहे ॥ १० ॥

आम्ही पूषाची निंदा कधींही करणार नाहीं, उलट उत्तम स्तोत्रांनी त्याचें स्तवन करूं. त्या सुंदर देवाजवळ आम्ही वैभवाची याचना करतो. ॥ १० ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ४३ (रुद्र, मित्रावरुण, सोम सूक्त)

ऋषि - काण्व घौर : देवता - रुद्र, मित्रावरुण, सोम : छंद - गायत्री, अनुष्टुभ्

कद्रु॒द्राय॒ प्रचे॑तसे मी॒ळ्हुष्ट॑माय॒ तव्य॑से ॥ वो॒चेम॒ शंत॑मं हृ॒दे ॥ १ ॥

कत् रुद्राय प्रचेतसे मीळ्हुःऽतमाय तव्यसे ॥ वोचेम शंऽतमं हृदे ॥ १ ॥

अत्यन्त प्रज्ञाशील, अतिशय उदार, अतिशय बलवान व हृदयास अत्यंत प्रमोददायक अशा रुद्राप्रित्यर्थ आम्ही केव्हां स्तोत्र म्हणावे बरें ? ॥ १ ॥

यथा॑ नो॒ अदि॑तिः॒ कर॒त्पश्वे॒ नृभ्यो॒ यथा॒ गवे॑ ॥ यथा॑ तो॒काय॑ रु॒द्रिय॑म् ॥ २ ॥

यथा नः अदितिः करत् पश्वे नृऽभ्यः यथा गवे ॥ यथा तोकाय रुद्रियम् ॥ २ ॥

ह्या योगाने आमच्या मुलाबाळांवर, गाईवर, नोकरमाणसांवर व जनावरांवर अदितिदेवी रुद्राचे उत्तम आशिर्वाद आणील, ॥ २ ॥

यथा नो मित्रो वरुणो यथा रुद्रश्चिकेतति ॥ यथा विश्वे सजोषसः ॥ ३ ॥

यथा नः मित्रः वरुणः यथा रुद्रः चिकेतति ॥ यथा विश्वे सऽजोषसः ॥ ३ ॥

व ह्या योगाने मित्र, वरुण, रुद्र, व त्यांचे सहवर्तमान असलेले सर्व देव ह्यांना आमची ओळख राहील. ॥ ३ ॥

गाथपतिं मेधपतिं रुद्रं जलाषभेषजम् ॥ तच्छंयोः सुम्नमीमहे ॥ ४ ॥

गाथऽपतिं मेधऽपतिं रुद्रं जलाषऽभेषजम् ॥ तत् शंऽयोः सुम्नं ईमहे ॥ ४ ॥

सर्व स्तुतींचा नाथ, सर्व यागांचा स्वामी, व जलौषधींचा प्रभु असा जो रुद्र त्याचेजवळ स्वकल्याणेच्छु भक्त जे धन मागतो, त्याच धनाची आम्ही याचना करतो. ॥ ४ ॥

यः शुक्र इव सूर्यो हिरण्यमिव रोचते ॥ श्रेष्ठो देवानां वसुः ॥ ५ ॥

यः शुक्रःऽइव सूर्यः हिरण्यंऽइव रोचते ॥ श्रेष्ठः देवानां वसुः ॥ ५ ॥

हा रुद्र देवांचे श्रेष्ठ वैभव असून, ह्याचें तेज देदीप्यमान सूर्याप्रमाणें व कांति सुवर्णाप्रमाणें आहे. ॥ ५ ॥

शं नः॑ कर॒त्यर्व॑ते सु॒गं मे॒षाय॑ मे॒ष्ये ॥ नृभ्यो॒ नारि॑भ्यो॒ गवे॑ ॥ ६ ॥

शं नः करति अर्वते सुऽगं मेषाय मेष्ये ॥ नृऽभ्यः नारिऽभ्यः गवे ॥ ६ ॥

हा आमचा अश्व, आमचा मेंढा, मेंढी, आमचे नोकर, दासी व धेनु ह्यांना उत्तम रीतीने आनंदांत राहतां येईल असे करतो. ॥ ६ ॥

अ॒स्मे सो॑म॒ श्रिय॒मधि॒ नि धे॑हि श॒तस्य॑ नृ॒णाम् ॥ महि॒ श्रव॑स्तुविनृ॒म्णम् ॥ ७ ॥

अस्मे सोम श्रियं अधि नि धेहि शतस्य नृणाम् ॥ महि श्रवः तुविऽनृम्णम् ॥ ७ ॥

हे सोमा, आमचेसाठीं शेंकडो मनुष्यांचे धन व अनेक शूरांचे यश सिद्ध करून ठेव. ॥ ७ ॥

मा नः॑ सोमपरि॒बाधो॒ मारा॑तयो जुहुरन्त ॥ आ न॑ इन्दो॒ वाजे॑ भज ॥ ८ ॥

मा नः सोमऽपरिबाधः मा अरातयः जुहुरंत ॥ आ नः इन्दो इति वाजे भज ॥ ८ ॥

सोमास त्रास देणारे अथवा आमच्याशीं शत्रुत्व करणरे लोक आम्हांस उपद्रव न करोत. हे इंद्रा, सामर्थ्याचें कृत्य चाललें असतांना तूं आमचे सन्निध रहा. ॥ ८ ॥

यास्ते॑ प्र॒जा अ॒मृत॑स्य॒ पर॑स्मि॒न्धाम॑न्नृ॒तस्य॑ ॥

मू॒र्धा नाभा॑ सोम वेन आ॒भूष॑न्तीः सोम वेदः ॥ ९ ॥

याः ते प्रऽजा अमृतस्य परस्मिन् धामन् ऋतस्य ॥

मूर्धा नाभा सोम वेनः आऽभूषंतीः सोम वेदः ॥ ९ ॥

तूं अमर आहेस. जो तुझा प्रजानन नीतिमत्तेच्या अत्युच्च स्थलावर अधिष्ठित होतो, त्यास हे सोमा, तूं आपल्या पोटाशीं धरलें आहेस - त्यास तूं आपल्य मस्तकावर धारण केलें आहेस. ते दिव्यतेजानें विभूषित झाले हें तुला माहित आहे. ॥ ९ ॥

मण्डल १ सूक्त ४४ (अग्नि सूक्त)

ऋषि - प्रस्कण्व काण्व : देवता - १-२ अश्विनीकुमार, उषा;

१४ अनेकदेवता; सेष अग्नि : छंद - सम-सतोबृहती; विषम बृहती

अग्ने॒ विव॑स्वदु॒षस॑श्चि॒त्रं राधो॑ अमर्त्य ॥

आ दा॒शुषे॑ जातवेदो वहा॒ त्वम॒द्या दे॒वाँ उ॑ष॒र्बुधः॑ ॥ १ ॥

अग्ने विवस्वत् उषसः चित्रं राधः अमर्त्य ॥

आ दाशुषे जातऽवेदः वह त्वं अद्य देवान् उषःऽबुधः ॥ १ ॥

हे अमर अग्निदेवा, तू उषादेवीची आश्चर्यकारक व उज्ज्वल अशी देणगी आहेस. हे अखिलज्ञानवंता, प्रातःकाली प्रबुद्ध होणाऱ्या देवांस, तूं आज हवि अर्पण करणाऱ्या भक्ताकडे घेऊन ये. ॥ १ ॥

जुष्टो॒ हि दू॒तो असि॑ हव्य॒वाह॒नोऽ॑ग्ने र॒थीर॑ध्व॒राणा॑म् ॥

स॒जूर॒श्विभ्या॑मु॒षसा॑ सु॒वीर्य॑म॒स्मे धे॑हि॒ श्रवो॑ बृ॒हत् ॥ २ ॥

जुष्टः हि दूतः असि हव्यऽवाहनः अग्ने रथीः अध्वराणाम् ॥

सऽजूः अश्विऽभ्यां उषसा सुऽवीर्यं अस्मे इति धेहि श्रवः बृहत् ॥ २ ॥

हे अग्निदेवा, यज्ञांस सत्वर सांगतेस नेणारा व देवांस त्यांचे हवि पोंचविणारा असा तूं खरोखर आमचा प्रिय प्रतिनिधि आहेस. अश्विन व उषा ह्यांसह येऊन उत्तम पराक्रमानें युक्त अशी विपुल कीर्ति आमचे वांट्यास आण. ॥ २ ॥

अ॒द्या दू॒तं वृ॑णीमहे॒ वसु॑म॒ग्निं पु॑रुप्रि॒यम् ॥

धू॒मके॑तुं॒ भाऋ॑जीकं॒ व्यु॑ष्टिषु य॒ज्ञाना॑मध्वर॒श्रिय॑म् ॥ ३ ॥

अद्य दूतं वृणीमहे वसुं अग्निं पुरुऽप्रियम् ॥

धूमऽकेतुं भाऽऋजीकं विऽउष्टिषु यज्ञानां अध्वरऽश्रियम् ॥ ३ ॥

यज्ञांचे जणूं वैभवच, तेजःस्वरूप, धूमाच्या निशाणानें युक्त, अनेकांस प्रिय व मूर्तिमान संपत्तिच असा जो अग्नि त्यास आम्ही उषःकालचा स्वच्छ प्रकाश पडल्याबरोबर आमचा प्रतिनिधि नेमीत आहोंत. ॥ ३ ॥

श्रेष्ठं॒ यवि॑ष्ठ॒मति॑थिं॒ स्वाहु॒तं॒ जुष्टं॒ जना॑य दा॒शुषे॑ ॥

दे॒वाँ अच्छा॒ यात॑वे जा॒तवे॑दसम॒ग्निमी॑ळे॒ व्युष्टिषु ॥ ४ ॥

श्रेष्ठं यविष्ठं अतिथिं सुऽआहुतं जुष्टं जनाय दाशुषे ॥

देवान् अच्छ यातवे जातऽवेदसं अग्निं इळे विऽउष्टिषु ॥ ४ ॥

श्रेष्ठ, अत्यंत तरुण, उत्तम हवींचा सन्मान ज्यास मिळतो असा अतिथि, हवि अर्पण करणाऱ्या भक्तजनांस प्रिय अशा सर्वज्ञ अग्नीची, त्यानें देवांचेकडे गमन करावें म्हणून, उषःकालचा स्वच्छ प्रकाश पडल्याबरोबर मी स्तुति करतो. ॥ ४ ॥

स्त॒वि॒ष्यामि॒ त्वाम॒हं विश्व॑स्यामृत भोजन ॥

अग्ने॑ त्रा॒तार॑म॒मृतं॑ मियेध्य॒ यजि॑ष्ठं हव्यवाहन ॥ ५ ॥

स्तविष्यामि त्वां अहं विश्वस्य अमृत भोजन ॥

अग्ने त्रातारं अमृतं मियेध्य यजिष्ठं हव्यऽवाहन ॥ ५ ॥

विश्वाला पोसणाऱ्या हे अमर अग्ने, हवि पोंचविणाऱ्या यज्ञार्ह देवा, तूं आमचा अत्यंत पूज्य संरक्षणकर्ता असल्यामुळें मी तुझें स्तवन करीन. ॥ ५ ॥

सु॒शंसो॑ बोधि गृण॒ते य॑विष्ठ्य॒ मधु॑जिह्वः॒ स्वाहु॒तः ॥

प्रस्क॑ण्वस्य प्रति॒रन्नायु॑र्जी॒वसे॑ नम॒स्या दैव्यं॒ जन॑म् ॥ ६ ॥

सुऽशंसः बोधि गृणते यविष्ठ्य मधुजिह्वः सुऽआहुतः ॥

प्रस्कण्वस्य प्रतिरन् आयुः जीवसे नमस्य दैव्यं जनम् ॥ ६ ॥

तूं मधुरभाषी व सुंदर हवींचा सन्मान पावणारा आहेस. अत्यंत तरुण देवा, तुझी स्तवनेंही उत्तमोत्तम झालेलीं आहेत. यास्तव स्तुति करणाऱ्या भक्तांकरितां तूं जागरूक रहा. प्रस्कण्वानें दीर्घकालपर्यंत जगांत रहावें म्हणून तूं त्याचे आयुष्य वाढवून देवसमुदायांस आमची प्रणति अर्पण कर. ॥ ६ ॥

होतारं विश्ववेदसं सं हि त्वा विश इन्धते ॥

स आ वह पुरुहूत प्रचेतसोऽग्ने देवाँ इह द्रवत् ॥ ७ ॥

होतारं विश्वऽवेदसं सं हि त्वा विशः इंधते ॥

सः आ वह पुरुऽहूत प्रऽचेतसः अग्ने देवान् इह द्रवत् ॥ ७ ॥

देवांस हवि पोंचविणारा व सर्वज्ञ असा जो तूं त्या तुला खरोखर सर्व लोक प्रदीप्त करतात. ह्याकरिता, सर्वांकडून निमंत्रित होणाऱ्या हे अग्निदेवा, तूं अत्यंत प्रज्ञाशील अशा देवांस त्वरेनें येथें घेऊन ये. ॥ ७ ॥

सवितारमुषसमश्विना भगमग्निं व्युष्टिषु क्षपः ॥

कण्वा॑सस्त्वा सु॒तसो॑मास इन्धते हव्य॒वाह॑ं स्वध्वर ॥ ८ ॥

सवितारं उषसं अश्विना भगं अग्निं विऽउष्टिषु क्षपः ॥

कण्वासः त्वा सुतऽसोमासः इंधते हव्यवाहं सुऽअध्वर ॥ ८ ॥

रात्र संपून स्वच्छ पहांट झाल्याबरोबर सविता, उषा, अश्वि, भग व अग्नि, हयांस येथें घेऊन ये. हे यज्ञसिद्धिदात्या अग्निदेवा, तूं देवांस हवि पोंचविणारा असल्यामुळें, हे कण्व, सोमरस सिद्ध करून, तुला प्रज्वलित करीत आहेत. ॥ ८ ॥

पति॒र्ह्य॑ध्व॒राणा॒मग्ने॑ दू॒तो वि॒शाम॑सि ॥

उ॒ष॒र्बुध॒ आ व॑ह॒ सोम॑पीतये दे॒वाँ अ॒द्य स्व॒र्दृश॑ः ॥ ९ ॥

पतिः हि अध्वराणां अग्ने दूतः विशां असि ॥

उषःऽबुधः आ वह सोमऽपीतये देवान् अद्य स्वःऽदृशः ॥ ९ ॥

हे अग्निदेवा, खरोखर तूं यज्ञांचा स्वामी आणि मनुष्यांचा प्रतिनिधि आहेस. प्रभातकाळींच जागृत होणाऱ्या व स्वर्ग लोकास आपल्या नजरेंत ठेवणाऱ्या देवांस आज सोमपानार्थ घेऊन ये. ॥ ९ ॥

अग्ने॒ पूर्वा॒ अनू॒षसो॑ विभावसो दी॒देथ॑ वि॒श्वद॑र्शतः ॥

असि॒ ग्रामे॑ष्ववि॒ता पु॒रोहि॒तोऽ॑सि य॒ज्ञेषु॒ मानु॑षः ॥ १० ॥

अग्ने पूर्वाः अनु उषसः विभाऽवसो दीदेथ विश्वऽदर्शतः ॥

असि ग्रामेषु अविता पुरःऽहितः असि यज्ञेषु मानुषः ॥ १० ॥

दीप्तिवैभवांने युक्त असणाऱ्या हे अग्निदेवा, तूं सर्व विश्वांत अत्यंत सुंदर आहेस. तूं पूर्वकालीन ज्या उषा त्यांच्या मागोमाग प्रकाशित होत होतास. ग्रामांमध्यें तूंच सर्वांचा संरक्षण करणारा आहेस व यज्ञांत मनुष्यांस प्रिय अशा यज्ञाचा अग्रणीही तूंच आहेस. ॥ १० ॥

नि त्वा॑ य॒ज्ञस्य॒ साध॑न॒मग्ने॒ होता॑रमृ॒त्विज॑म् ॥

म॒नु॒ष्वद्दे॑व धीमहि॒ प्रचे॑तसं जी॒रं दू॒तमम॑र्त्यम् ॥ ११ ॥

नि त्वा यज्ञस्य साधनं अग्ने होतारं ऋत्विजम् ॥

मनुष्वत् देव धीमहि प्रऽचेतसं जीरं दूतं अमर्त्यम् ॥ ११ ॥

यज्ञांस साधनीभूत, देवांस हवि पोंचविणारा आचार्य, अत्यंत प्रज्ञाशील, सत्वर गमन करणारा प्रतिनिधि, व मृत्युरहित असा जो तूं त्या तुला हे देवा, आम्ही जनसमुदायांत नेऊन प्रस्थापित करतो. ॥ ११ ॥

यद्दे॒वाना॑ मित्रमहः पु॒रोहि॒तोऽ॑न्तरो॒ यासि॑ दू॒त्यम् ॥

सिन्धो॑रिव॒ प्रस्व॑नितास ऊ॒र्मयो॑ऽ॒ग्नेर्भ्रा॑जन्ते अ॒र्चयः॑ ॥ १२ ॥

यत् देवानां मित्रऽमहः पुरःऽहितः अन्तरः यासि दूत्यम् ॥

सिंधोःऽइव प्रऽस्वनितासः ऊर्मयः अग्नेः भ्राजंते अर्चयः ॥ १२ ॥

स्वमित्रांस आनंददायक, यज्ञाचा आचार्य, व आमचा अंतरंग हितकर्ता असा जो तूं जेव्हां देवांच्या दूतकर्माकरितां गमन करतोस त्यावेळीं तुझ्या ज्वाळा मोठमोठ्या गर्जना करणाऱ्या सिंधूच्या लाटांप्रमाणे शोभतात. ॥ १२ ॥

श्रुधि श्रुत्कर्ण वह्निभिर्देवैरग्ने सयावभिः ॥

आ सीदन्तु बर्हिषि मित्रो अर्यमा प्रातर्यावाणो अध्वरम् ॥ १३ ॥

श्रुधि श्रुत्ऽकर्ण वह्निऽभिः देवैः अग्ने सयावऽभिः ॥

आ सीदंतु बर्हिषि मित्रः अर्यमा प्रातःऽयावानः अध्वरम् ॥ १३ ॥

हे अग्निदेवा, तुझा कान प्रार्थना ऐकण्यास आगदीं तत्पर असतो. तुझेसह संचार करणाऱ्या व भक्तांची चिंता वाहणाऱ्या देवांसहवर्तमान तूं आमची स्तुति ऐक, प्रातःकालींच आमच्या यज्ञाकडे गमन करणारे मित्र आणि अर्यमा हे दर्भासनावर विराजमान होवोत. ॥ १३ ॥

शृण्वन्तु स्तोमम्मरुतः सुदानवोऽग्निजिह्वा ऋतावृधः ॥

पिबं॑तु॒ सोम॒ं वरु॑णो धृ॒तव्र॑तो॒ऽश्विभ्या॑मु॒षसा॑ स॒जूः ॥ १४ ॥

शृण्वंतु स्तोमं मरुतः सुऽदानवः अग्निऽजिह्वाः ऋतऽवृधः ॥

पिबतु सोमं वरुणः धृतऽव्रतः अश्विभ्यां उषसा सऽजूः ॥ १४ ॥

अतिशय उदार असे जे मरुद्देव - कीं जे नीतिनियमांस उत्तेजन देतात व अग्नीच्या द्वारें ज्यांची जिव्हा तृप्त होते - ते आमची स्तुति श्रवण करोत. आपले अनुशासन अंमलांत आणणारा वरुण, अश्विन, आणि उषा ह्यांसहवर्तमान, सोमाचे प्राशन करो. ॥ १४ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ४५ (अग्नि सूक्त)

ऋषि - प्रस्कण्व काण्व : देवता - अग्नि : छंद - अनेक

त्वम॑ग्ने॒ वसूँ॑रि॒ह रु॒द्राँ आ॑दि॒त्याँ उ॒त ॥

यजा॑ स्वध्व॒रं जनं॒ मनु॑जातं घृत॒प्रुष॑म् ॥ १ ॥

त्वं अग्ने वसून् इह रुद्रान् आदित्यान् उत ॥

यज सुऽअध्वरं जनं मनुऽजातं घृतऽप्रुषम् ॥ १ ॥

हे अमर अग्निदेवा, वसु, रुद्र व आदित्य यांचा सन्मान कर. घृताचा हवि देणारे, उत्तम यज्ञ करणारे व मनूपासून जन्म पावलेले जे पुरुष असतील त्यांचाही ह्या यज्ञांत सन्मान कर. ॥ १ ॥

श्रु॒ष्टी॒वानो॒ हि दा॒शुषे॑ दे॒वा अ॑ग्ने॒ विचे॑तसः ॥

तान्रो॑हिदश्व गिर्वण॒स्त्रय॑स्त्रिंशत॒मा व॑ह ॥ २ ॥

श्रुष्टीऽवानः हि दाशुषे देवाः अग्ने विऽचेतसः ॥

तान् रोहित्ऽअश्व गिर्वणः त्रयःऽत्रिंशतं आ वह ॥ २ ॥

रक्तवर्ण अश्वांनी युक्त असलेल्या हे स्तुतिप्रिय अग्निदेवा, सर्व देव अत्यंत प्रज्ञावान असून हवि अर्पण करणाऱ्या भक्ताची प्रार्थना श्रवण करण्यास ते खरोखर अतिशय तत्पर असतात. ह्यासाठीं त्यांस इकडे घेऊन ये. त्यांची एकंदर संख्या तेहतीस आहे. ॥ २ ॥

प्रियमेधवदत्रिवज्जातवेदो विरूपवत् ॥

अङ्गिरस्वन्महिव्रत प्रस्कण्वस्य श्रुधी हवम् ॥ ३ ॥

प्रियमेधऽवत् अत्रिऽवत् जातऽवेदः विरूपऽवत् ॥

अङ्गिरस्वत् महिऽव्रत प्रस्कण्वस्य श्रुधि हवम् ॥ ३ ॥

हे जातवेद अग्निदेवा, तुझ्या आज्ञा फार श्रेष्ठ आहेत. तूं प्रियमेधाप्रमाणे, अत्रीप्रमाणे, विरूपाप्रमाणें व अंगिराप्रमाणें प्रस्कण्वाचीही हांक ऐक. ॥ ३ ॥

महिकेरव ऊतये प्रियमेधा अहूषत ॥

राजन्तमध्वराणामग्निं शुक्रेण शोचिषा ॥ ४ ॥

महिऽकेरवः ऊतये प्रियऽमेधाः अहूषत ॥

राजंतं अध्वराणां अग्निं शुक्रेण शोचिषा ॥ ४ ॥

मोठमोठी स्तोत्रें गाणाऱ्या प्रियमेधांनी आपल्या रक्षणाकरिता, स्वतेजानें यज्ञांत प्रकाशमान होणाऱ्या देदीप्यमान अग्नीसच आमंत्रण केलें होतें. ॥ ४ ॥

घृताहवन सन्त्येमा उ षु श्रुधी गिरः ॥

याभिः कण्वस्य सूनवो हवन्तेऽवसे त्वा ॥ ५ ॥

घृतऽआहवन संत्य इमाः ऊं इति सु श्रुधि गिरः ॥

याभिः कण्वस्य सूनवः हवंते अवसे त्वा ॥ ५ ॥

घृतांच्या हवींचा स्वीकार करणाऱ्या हे उदार देवा, ज्या स्तुतींच्या योगानें कण्वाचे पुत्र तुला हवन करीत आहेत त्या तू श्रवण कर. ॥ ५ ॥

त्वां चि॑त्रश्रवस्तम॒ हव॑न्ते वि॒क्षु ज॒न्तवः॑ ॥

शो॒चिष्के॑शं पुरुप्रि॒याग्ने॑ ह॒व्याय॒ वोळ्ह॑वे ॥ ६ ॥

त्वां चित्रश्रवःऽतम हवंते विक्षु जंतवः ॥

शोचिःऽकेशं पुरुऽप्रिय अग्ने हव्याय वोळ्हवे ॥ ६ ॥

प्रार्थना श्रवण करण्यांत तुझी शक्ति आश्चर्यकारक आहे, तूं अनेक जनांना प्रिय आहेस. तुझे केश ज्वालारूप आहेत. देवांकडे हवि घेऊन जाण्याकरितां हे अग्निदेवा, ह्या जगांतील लोक तुझें पूजन करीत असतात. ॥ ६ ॥

नि त्वा॒ होता॑रमृ॒त्विजं॑ दधि॒रे व॑सु॒वित्त॑मम् ॥

श्रुत्क॑र्णं स॒प्रथ॑स्तमं॒ विप्रा॑ अग्ने॒ दिवि॑ष्टिषु ॥ ७ ॥

नि त्वा होतारं ऋत्विजं दधिरे वसुवित्ऽतमम् ॥

श्रुत्ऽकर्णं सप्रथःऽतमं विप्रा अग्ने दिविष्टिषु ॥ ७ ॥

हवि अर्पण करणारा, यज्ञांतील आचार्य, अतिशय संपत्तिमान, भक्तांच्या हांकेस कान देणारा व अत्यंत कीर्तिमान असा जो तूं त्या तुझी विद्वान लोक यज्ञांत संस्थापना करतात. ॥ ७ ॥

आ त्वा विप्रा अचुच्यवुः सुतसोमा अभि प्रयः ॥

बृहद्भा बिभ्रतो हविरग्ने मर्ताय दाशुषे ॥ ८ ॥

आ त्वा विप्रा अचुच्यवुः सुतऽसोमाः अभि प्रयः ॥

बृहत् भाः बिभ्रतः हविः अग्ने मर्ताय दाशुषे ॥ ८ ॥

हे अग्निदेवा, ज्यांनी सोमरस तयार करून ठेविला आहे, जे अतिशय कांतीने युक्त आहेत, व ज्यांनी हवि हातांत घेतलेलें आहेत अशा विद्वान लोकांनी, भक्तिशील मनुष्यांकरितां, तुझें मन हवींच्या अन्नाकडे वळविलेले आहे. ॥ ८ ॥

प्रा॒त॒र्याव्णः॑ सहस्कृत सोम॒पेया॑य सन्त्य ॥

इ॒हाद्य दैव्यं॒ जनं॑ ब॒र्हिरा सा॑दया वसो ॥ ९ ॥

प्रातःऽर्याव्नः सहःऽकृत सोमऽपेयाय संत्य ॥

इह अद्य दैव्यं जनं बर्हिः आ सादय वसो इति ॥ ९ ॥

सामर्थ्यापासून जन्म पावणाऱ्या हे उदार अग्निदेवा, हे मूर्तिमंत वैभवा, प्रातःकालींच बाहेर गमन करणाऱ्या देवसमुदायांस आज ह्या यज्ञांत सोमपानार्थ दर्भासनांवर आणून बसव. ॥ ९ ॥

अ॒र्वाञ्चं॒ दैव्यं॒ जन॒मग्ने॒ यक्ष्व॒ सहू॑तिभिः ॥

अयं सोमः सुदानवस्तं पात तिरोअह्न्यम् ॥ १० ॥

अर्वाञ्चं दैव्यं जनं अग्ने यक्ष्व सहूतिऽभिः ॥

अयं सोमः सुऽदानवः तं पात तिरःऽअह्न्यम् ॥ १० ॥

हे अग्निदेवा, देवसमुदायांस इकडे आणून त्या सर्वांस एकाच वेळीं आहुति देऊन तृप्त कर. हे अत्यंत उदार देवांनो, हा येथें सोम ठेवलेला आहे. तो आपण प्राशन करा. तो काल तयार केलेला आहे. ॥ १० ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ४६ (अश्विनीकुमार सूक्त)

ऋषि - प्रस्कण्व काण्व : देवता - अश्विनीकुमार : छंद - गायत्री

एषो उषा अपूर्व्या व्युच्छति प्रिया दिवः ॥ स्तुषे वामश्विना बृहत् ॥ १ ॥

एषो इति उषाः अपूर्व्या वि उच्छति प्रिया दिवः ॥ स्तुषे वां अश्विना बृहत् ॥ १ ॥

द्युलोकांस प्रिय असलेली अशी जी अपूर्व तेजोयुक्त उषा देवी ती आपला प्रकाश पाडीत आहे. हे अश्विनहो ! मी तुमची मनःपूर्वक स्तुति करतो. ॥ १ ॥

या द॒स्रा सिन्धु॑मातरा मनो॒तरा॑ रयी॒णाम् ॥ धि॒या दे॒वा व॑सु॒विदा॑ ॥ २ ॥

या दस्रा सिन्धुऽमातरा मनोतरा रयीणाम् ॥ धिया देवा वसुऽविदा ॥ २ ॥

हे अश्विनीदेव सुंदर आहेत. सिंधु ही त्यांची जननी होय. वेगवान पुरुषांशी तुलना केली असतां हे आपल्या वेगानें मनासमुद्धां मार्गें टाकतात. हे अंतःकरणपूर्वक भक्तांना धन अर्पण करतात. ॥ २ ॥

व॒च्यन्ते॑ वां ककु॒हासो॑ जू॒र्णाया॒मधि॑ वि॒ष्टपि॑ ॥ यद्वां॒ रथो॒ विभि॒ष्पता॑त् ॥ ३ ॥

वच्यंते वां ककुहासः जूर्णायां अधि विष्टपि ॥ यत् वां रथः विऽभिः पतात् ॥ ३ ॥

वेगाने धांवण्यांत जणूं पक्षीच अशा तुमच्या अश्वांच्या योगानें जेव्हां तुमचा रथ ताडताड उडत जातो त्यावेळी अति पुरातन अशा स्वर्गलोकांत सुद्धां तुमची स्तोत्रें म्हणण्यांत येतात. ॥ ३ ॥

ह॒विषा॑ जा॒रो अ॒पां पिप॑र्ति॒ पपु॑रिर्नरा ॥ पि॒ता कुट॑स्य चर्ष॒णिः ॥ ४ ॥

हविषा जारः अपां पिपर्ति पपुरिः नरा ॥ पिता कुटस्य चर्षणिः ॥ ४ ॥

हा सर्वसंचारी व सर्वतृप्तिकारक सूर्यदेव कीं - ज्याच्यावर उदकांचा लोभ आहे व ज्याच्यापासून पाण्याचे रांजण (मेघ) जन्म पावतात - तो तुम्हांस हवींनी संतुष्ट करतो. ॥ ४ ॥

आ॒दा॒रो वां᳚ मती॒नां नास॑त्या मतवचसा ॥ पा॒तं सोम॑स्य धृष्णु॒या ॥ ५ ॥

आऽदारः वां मतीनां नासत्या मतऽवचसा ॥ पातं सोमस्य धृष्णुऽया ॥ ५ ॥

हे स्तुतिप्रिय व सत्यस्वरूप अश्विनीदेवहो ! सोमरस हा तुमच्या मनाची कपाटे उघडतो. म्हणून सोमरसाचे मनसोक्त प्राशन करा. ॥ ५ ॥

या न॒ः पीप॑रदश्विना॒ ज्योति॑ष्मती॒ तम॑स्ति॒रः ॥ ताम॒स्मे रा॑साथा॒मिष॑म् ॥ ६ ॥

या नः पीपरत् अश्विना ज्योतिष्मती तमः तिरः ॥ तां अस्मे रासाथां इषम् ॥ ६ ॥

अहो अश्विनहो, जी उज्वल प्रकाश पाडून आम्हांस अंधकाराच्या पार घेऊन जाईल त्या तुमच्या कृपेचा लाभ आम्हांस करून द्या. ॥ ६ ॥

आ नो॑ ना॒वा म॑ती॒नां या॒तं पा॒राय॒ गन्त॑वे ॥ यु॒ञ्जाथा॑मश्विना॒ रथ॑म् ॥ ७ ॥

आ नः नावा मतीनां यातं पाराय गंतवे ॥ युञ्जाथां अश्विना रथम् ॥ ७ ॥

तुमच्या कृपारूपी नौकेंत बसून आम्हांस दुःखसमुद्राच्या पार जातां यावे म्हणून इकडे आगमन करा. हे अश्विनहो, तुम्ही आपला रथ जोडा. ॥ ७ ॥

अ॒रित्रं॑ वां दि॒वस्पृ॒थु ती॒र्थे सिन्धू॑ना॒ं रथ॑ः ॥ धि॒या यु॑यु॒ज्र इन्द॑वः ॥ ८ ॥

अरित्रं वां दिवः पृथु तीर्थे सिंधूनां रथः ॥ धिया युयुज्रे इंदवः ॥ ८ ॥

नदीच्या तीरावरून तुमचे गमन होत असतां तुमचा रथ हीच स्वर्गलोकाहूनही विस्तीर्ण अशी तुमची नौका होते. तुमच्याकरितां आम्हीं येथें भक्तीने सोमरस तयार करून ठेवले आहेत. ॥ ८ ॥

दिवस्कण्वास इन्दवो वसु सिन्धूनां पदे ॥ स्वं वव्रिं कुह धित्सथः ॥ ९ ॥

दिवः कण्वासः इंदवः वसु सिंधूनां पदे ॥ स्वं वव्रिं कुह धित्सथः ॥ ९ ॥

हे कण्वहो, स्वर्गाच्या प्रदेशांत आल्हाददायक तेज भरून राहिलें आहे आणि नद्यांच्या निवासस्थानी तेजःपुंज असे वैभव दृगोचर होत आहे. तर हे अश्विनहो, आपण आपले दिव्य देह कोणते ठिकाणी घेऊन जाल बरें ? ॥ ९ ॥

अभूदु भा उ अंशवे हिरण्यं प्रति सूर्यः ॥ व्यख्यज्जिह्वयासितः ॥ १० ॥

अभूत् ऊं इति भाः ऊं इति अंशवे हिरण्यं प्रति सूर्यः ॥ वि अख्यत् जिह्वया असितः ॥ १० ॥

चोहोंकडे आपले रश्मि फेंकण्याकरितां ही पहा प्रभा सज्ज झाली आहे. आणि हे पहा इकडे सूर्य उगवला. हा कांचनाचीच प्रतिमा होय. अग्नीनेही आपली जिव्हा बाहेर काढून स्वतःची दीप्ति प्रकट केली आहे. ॥ १० ॥

अभू॑दु पा॒रमेत॑वे॒ पन्था॑ ऋ॒तस्य॑ साधु॒या ॥ अद॑र्शि॒ वि स्रु॒तिर्दि॒वः ॥ ११ ॥

अभूत् ऊं इति पारं एतवे पंथाः ऋतस्य साधुऽया ॥ अदर्शि वि स्रुतिः दिवः ॥ ११ ॥

धर्मनीतीचा मार्ग आपणांस दुःखाच्या पलीकडे नेण्यासाठी स्पष्ट दिसूं लागला आहे आणि स्वर्गाची वाटही दृष्टी पडूं लागली आहे. ॥ ११ ॥

तत्त॒दिद॒श्विनो॒रवो॑ जरि॒ता प्रति॑ भूषति ॥ मदे॒ सोम॑स्य॒ पिप्र॑तोः ॥ १२ ॥

तत्ऽतत् इत् अश्विनोः अवः जरिता प्रति भूषति ॥ मदे सोमस्य पिप्रतोः ॥ १२ ॥

सोमप्राशनाने आनंद झाल्याबरोबर जे अश्विनदेव भक्तांस भरपूर वैभव देतात त्यांच्या या कृपाप्रसादाची स्तोतृजन नेहमी वाखाणणी करीत असतो. ॥ १२ ॥

वा॒व॒सा॒ना वि॒वस्व॑ति॒ सोम॑स्य पी॒त्या गि॒रा ॥ म॒नु॒ष्वच्छ॑म्भू॒ आ ग॑तम् ॥ १३ ॥

ववसाना विवस्वति सोमस्य पीत्या गिरा ॥ मनुष्वत् शंभू इति शंभू आ गतम् ॥ १३ ॥

ज्याप्रमाणें पूर्वी तुम्ही मनूचे भेटीस गेलां होतां त्याप्रमाणे आमच्या प्रार्थनांनी व सोमरसाचे प्राशनानें प्रेरीत होऊन विवस्वताकरितां आपले तेज प्रकट करीत आमचे कल्याणकर्ते आपण इकडे या. ॥ १३ ॥

यु॒वोरु॒षा अनु॒ श्रि॒यं परि॑ज्मनोरु॒पाच॑रत् ॥ ऋ॒ता व॑नथो अ॒क्तुभि॑ः ॥ १४ ॥

युवोः उषाः अनु श्रियं परिऽज्मनोः उपऽआचरत् ॥ ऋता वनथः अक्तुऽभिः ॥ १४ ॥

आपण परिभ्रमण करीत असतां आपल्या मार्गाच्या अनुरोधानें उषेनेंही आपलें मार्गक्रमण चालविलें. आपणांस रात्री केलेली यागकर्मे फार आवडतात. ॥ १४ ॥

उ॒भा पि॑बतमश्विनो॒भा न॒ः शर्म॑ यच्छतम् ॥ अ॒वि॒द्रि॒याभि॑रू॒तिभि॑ः ॥ १५ ॥

उभा पिबतं अश्विना उभा नः शर्म यच्छतम् ॥ अविद्रियाभिः ऊतिऽभिः ॥ १५ ॥

हे अश्विनहो, आपल्या कृपेस खंड पडूं न देतां आपण उभयतांही आम्हांस सौख्य अर्पण करा व उभयतां सोमरसाचें प्राशन करा. ॥ १५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ४७ (अश्विनीकुमार)

ऋषि - प्रस्कण्व काण्व : देवता - अश्विनीकुमार

छंद - सम-सतोबृहती; विषम बृहती

अ॒यं वा॒ं मधु॑मत्तमः सु॒तः सोम॑ ऋतावृधा ॥

तम॑श्विना पिबतं ति॒रोअ॑ह्न्यं ध॒त्तं रत्ना॑नि दा॒शुषे॑ ॥ १ ॥

अयं वां मधुमत्ऽतमः सुतः सोमः ऋतऽवृधा ॥

तं अश्विना पिबतं तिरःऽअह्न्यं धत्तं रत्नानि दाशुषे ॥ १ ॥

नीतिधर्मपरिपालनांत आनंद मानणाऱ्या हे अश्विनीदेवांनो, हा अतिशय माधुर्ययुक्त असा सोमरस तुमच्याकरितां काढून ठेवलेला आहे. तो कालच तयार केलेला आहे. त्याचें प्राशन करा आणि आपल्या भक्ताकरितां उत्तम संपत्तिचें भांडार भरून ठेवा. ॥ १ ॥

त्रिवन्धुरेण त्रिवृता सुपेशसा रथेना यातमश्विना ॥

कण्वासो वाम् ब्रह्म कृण्वन्त्यध्वरे तेषां सु शृणुतं हवम् ॥ २ ॥

त्रिऽवंधुरेण त्रिऽवृता सुऽपेशसा रथेन यातं अश्विना ॥

कण्वासः वां ब्रह्म कृण्वंति अध्वरे तेषां सु शृणुतं हवम् ॥ २ ॥

हे अश्विनहो, ज्या आपल्या रथास तीन बंधुरा आहेत, ज्याचा आकार त्रिकोणावृत्त आहे व जो दिसण्यांत सुंदर आहे अशा रथांत बसून इकडे या. ह्या यज्ञांत कण्व तुमची स्तुति करीत आहेत त्यांची हांक आपण श्रवण करा. ॥ २ ॥

अश्विना मधुमत्तमं पातं सोमं ऋतावृधा ॥

अथाद्य दस्रा वसु बिभ्रता रथे दाश्वांसमुप गच्छतम् ॥ ३ ॥

अश्विना मधुमत्ऽतमं पातं सोमं ऋतऽवृधा ॥

अथ अद्य दस्रा वसु बिभ्रता रथे दाश्वांसं उप गच्छतम् ॥ ३ ॥

हे अश्विनीदेवांनो, ह्या अत्यंत मधुर सोमरसाचें प्राशन करा आणि हे सुरूपवान देवांनो आपल्या रथांतून पुष्कळ संपत्ति घेऊन येऊन भक्त जनांकडे आगमन करा. ॥ ३ ॥

त्रिषधस्थे बर्हिषि विश्ववेदसा मध्वा यज्ञं मिमिक्षतम् ॥

कण्वासो वां सुतसोमा अभिद्यवो युवां हवन्ते अश्विना ॥ ४ ॥

त्रिऽसधस्थे बर्हिषि विश्वऽवेदसा मध्वा यज्ञं मिमिक्षतम् ॥

कण्वासः वां सुतऽसोमाः अभिऽद्यवः युवां हवंते अश्विना ॥ ४ ॥

तिघांस एकदम बसतां येईल अशा रीतीने मांडलेल्या दर्भासनावर आरूढ होऊन हे सर्वज्ञ देवहो, आमचा यज्ञ माधुर्याने परिप्लुत करा. हे अश्विनहो, हे तेजस्वीपणाने शोभणारे कण्व सोमरस तयार करून आपणांस आमंत्रण करीत आहेत. ॥ ४ ॥

याभि॒: कण्व॑म॒भिष्टि॑भि॒: प्राव॑तं यु॒वम॑श्विना ॥

ताभि॒: ष्व१स्माँ अ॑वतं शुभस्पती पा॒तं सोम॑मृतावृधा ॥ ५ ॥

याभिः कण्वं अभिष्टिऽभिः प्र आवतं युवं अश्विना ॥

ताभिः सु अस्मान् अवतं शुभः पती इति पातं सोमं ऋतऽवृधा ॥ ५ ॥

ज्या आपल्या कृपासामर्थ्याच्या योगाने हे अश्विनहो, आपण कण्वाचें संरक्षण केलेंत त्याच सामर्थ्यानें युक्त होऊन आमचेंही रक्षण करा. कारण आपण सर्व मंगलतेचे स्वामी व न्यायनीतीस उत्तेजन देणारे आहां. ॥ ५ ॥

सु॒दासे॑ दस्रा॒ वसु॒ बिभ्र॑ता॒ रथे॒ पृक्षो॑ वहतमश्विना ॥

र॒यिं स॑मु॒द्रादु॒त वा॑ दि॒वस्पर्य॒स्मे ध॑त्तं पु॒रु॒स्पृह॑म् ॥ ६ ॥

सुऽदासे दस्रा वसु बिभ्रता रथे पृक्षः वहतं अश्विना ॥

रयिं समुद्रात् उत वा दिवः परि अस्मे धत्तं पुरुऽस्पृहम् ॥ ६ ॥

अहो सुंदर अश्विदेवहो, ज्या अर्थी आपण सुदासाकरितां संपत्ति घेऊन आला त्याअर्थी आपल्या रथांतून आमच्याकरितांही जीवनसामग्री घेऊन या. ज्यावर पुष्कळ लोकांचा डोळा असतो असे वैभव आम्हांस अर्पण करा. मग ते आपण महासागरांमधून आणलेले असो अथवा स्वर्गाच्या भोंवतालील प्रदेशांतून आणलेलें असो. ॥ ६ ॥

यन्ना॑सत्या परा॒वति॒ यद्वा॒ स्थो अधि॑ तु॒र्वशे॑ ॥

अतो॒ रथे॑न सु॒वृता॑ न॒ आ ग॑तं सा॒कं सूर्य॑स्य र॒श्मिभि॑ः ॥ ७ ॥

यन् नासत्या पराऽवति यत् वा स्थः अधि तुर्वशे ॥

अतः रथेन सुऽवृता नः आ गतं साकं सूर्यस्य रश्मिऽभिः ॥ ७ ॥

हे सत्यस्वरूप अश्विनदेवतांनो ! आपण तुर्वशापासून जवळ असा अथवा फार लांब असा; तेथून आपल्या सुंदर रथांत बसून इकडे या आणि येतांना सूर्याच्या किरणांसही बरोबर घेऊन या. ॥ ७ ॥

अ॒र्वाञ्चा॑ वां॒ सप्त॑योऽध्वर॒श्रियो॒ वह॑न्तु॒ सव॒नेदुप॑ ॥

इषं॑ पृ॒ञ्चन्ता॑ सु॒कृते॑ सु॒दान॑व॒ आ ब॒र्हिः सी॑दतं नरा ॥ ८ ॥

अर्वाञ्चा वां सप्तयः अध्वरऽश्रियः वहंतु सवना इत् उप ॥

इषं पृञ्चंता सुऽकृते सुऽदानवे आ बर्हिः सीदतं नरा ॥ ८ ॥

यज्ञास ललामभूत असे आपले अश्व आपणांस आमच्या हवींकडे घेऊन येवोत. अहो शूरांनो ! आपणांस प्रेमाने हवि अर्पण करणाऱ्या सदाचारी भक्तासाठी समृद्धीची भरती करून ह्या कुशासनावर विराजमान व्हा ॥ ८ ॥

तेन॑ नास॒त्या ग॑तं॒ रथे॑न॒ सूर्य॑त्वचा ॥

येन॒ शश्व॑दू॒हथु॑र्दा॒शुषे॒ वसु॒ मध्वः॒ सोम॑स्य पी॒तये॑ ॥ ९ ॥

तेन नासत्या आ गतं रथेन सूर्यऽत्वचा ॥

येन शश्वत् ऊहथुः दाशुषे वसु मध्वः सोमस्य पीतये ॥ ९ ॥

हे सत्यस्वरूप अश्विनीदेवतांनो ! सूर्यासही आच्छादून टाकणाऱ्या आपल्या रथांत बसून इकडे या. जेव्हां जेव्हां आपणांस मधुर सोमरसाच्या पानाची इच्छा होते, त्या त्या वेळी आपण नेहमी ह्याच रथांतून आपल्या भक्तांकरितां सोमरस आणीत असतां. ॥ ९ ॥

उक्थेभिरर्वागवसे पुरूवसू अर्कैश्च नि ह्वयामहे ॥

शश्वत्कण्वानां सदसि प्रिये हि कं सोमं पपथुरश्विना ॥ १० ॥

उक्थेभिः अर्वाक् अवसे पुरूवसू इति पुरुऽवसू अर्कैः च नि ह्वयामहे ॥

शश्वत् कण्वानां सदसि प्रिये हि कं सोमं पपथुः अश्विना ॥ १० ॥

अनेक वैभवांनी संपन्न अशा अश्विनीदेवांस आम्ही स्तुति स्तोत्रें गाऊन आम्हांकडे पाचारण करीत आहों. हे अश्विनहो ! आपणांस प्रिय असलेल्या कण्वांच्या सदनांत जाऊन आपण खरोखर नेहमी सोमप्राशन केलेलें आहे. ॥ १० ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ४८ (उषा सूक्त)

ऋषि - प्रस्कण्व काण्व : देवता - उषा : छंद - सम-सतोबृहती; विषम बृहती

स॒ह वा॒मेन॑ न उषो॒ व्युच्छा दुहितर्दिवः ॥

स॒ह द्यु॒म्नेन॑ बृह॒ता वि॑भावरि रा॒या दे॑वि॒ दास्व॑ती ॥ १ ॥

सह वामेन नः उषः वि उच्छ दुहितः दिवः ॥

सह द्युम्नेन बृहता विभाऽवरि राया देवि दास्वती ॥ १ ॥

द्युलोकदुहिते हे उषादेवी, अत्यंत सुंदर अशा तुझ्या कांतीने येथे आमचेसाठी सुप्रकाशित हो. हे देदीप्यमान देवते, तूं दानशूर असल्यामुळें विपुल संपत्ति व वैभव हे बरोबर घेऊन येऊन येथें प्रकाश पाड. ॥ १ ॥

अश्वा॑वती॒र्गोम॑तीर्विश्वसु॒विदो॒ भूरि॑ च्यवन्त॒ वस्त॑वे ॥

उदी॑रय॒ प्रति॑ मा सू॒नृता॑ उष॒श्चोद॒ राधो॑ म॒घोना॑म् ॥ २ ॥

अश्वऽवतीः गोऽमतीः विश्वऽसुविदः भूरि च्यवंत वस्तवे ॥

उत् ईरय प्रति मा सूनृताः उषः चोद राधः मघोनाम् ॥ २ ॥

ह्या उषा, अश्व, धेनु, व ह्या विश्वांतील उत्तम उत्तम सौख्यें हीं आपल्या बरोबर घेऊन जगतीतलावर प्रकाश पाडण्याकरितां आकाशांतून उतरून आल्या आहेत. हे उषे, माझेबरोबर मधुर संभाषण कर व श्रीमंत पुरुषांजवळ जितकें धन असतें तितकें धन आम्हांस अर्पण कर. ॥ २ ॥

उवासोषा उच्छाच्च नु देवी जीरा रथानाम् ॥

ये अस्या आचरणेषु दध्रिरे समुद्रे न श्रवस्यवः ॥ ३ ॥

उवास उषाः उच्छात् च नु देवी जीरा रथानाम् ॥

ये अस्याः आऽचरणेषु दध्रिरे समुद्रे न श्रवस्यवः ॥ ३ ॥

उषेनें आपला प्रकाश पाडला आहे व ती असाच आपला प्रकाश पाडणार. (सायंकाळी मुक्कामास राहिलेल्या गाड्यांना) हीच पुढें जाण्याविषयीं प्रेरणा करते. कारण, ज्याप्रमाणें समुद्रपर्यटनास निघणारे साहसी लोक समुद्राकडे दृष्टि लावून बसतात त्याप्रमाणें सर्व रथ उषेच्या आगमनाची प्रतीक्षा करीत बसलेले असतात. ॥ ३ ॥

उषो ये ते प्र यामेषु युञ्जते मनो दानाय सूरयः ॥

अत्राह तत्कण्व एषां कण्वतमो नाम गृणाति नृणाम् ॥ ४ ॥

उषः ये ते प्र यामेषु युञ्जते मनः दानाय सूरयः ॥

अत्र अह तत् कण्वः एषां कण्वऽतमः नाम गृणाति नृणाम् ॥ ४ ॥

जे विद्वान लोक तुझें आगमन झाले असतां दानकर्म करण्याकडे स्वतःच्या मनाची प्रवृत्ति करतात त्यांचे नाम हा कण्व कुलांतील श्रेष्ठ ह्या यज्ञांत मोठ्या सन्मानानें गात असतो. ॥ ४ ॥

आ घा योषेव सूनर्युषा याति प्रभुञ्जती ॥

जरयन्ती वृजनं पद्वदीयत उत्पातयति पक्षिणः ॥ ५ ॥

आ घ योषाऽइव सूनरी उषाः याति प्रऽभुंजती ॥

जरयंती वृजनं पत्ऽवत् ईयते उत् पातयति पक्षिणः ॥ ५ ॥

एखाद्या सुंदर स्त्रीप्रमाणें ही उषा विलास करीत करीत व सर्व दुरितांस नाशाप्रत पोंचवीत येत आहे. ज्यांस पाय आहेत अशा प्राण्यांस ती चालावयास लावते व ज्यांस पंख आहेत अशा जीवांस ती अंतरिक्षांत उडण्यास प्रवृत्त करते. ॥ ५ ॥

वि या सृजति समनं व्यऽर्थिनः पदं न वेत्योदती ॥

वयो नकिष्टे पप्तिवांस आसते व्युष्टौ वाजिनीवति ॥ ६ ॥

वि या सृजति समनं वि अर्थिनः पदं न वेति ओदती ॥

वयः नकिः टे पप्तिऽवांसः आसते विऽउष्टौ वाजिनीऽवति ॥ ६ ॥

जे उद्योगशील आहेत व ज्यांस धन मिळविण्याची इच्छा आहे त्यांना ती आपापल्या कामास प्रवृत्त करते. ह्या उदार देवतेस विश्रांतीची मुळींच गरज वाटत नाही. उत्साहवर्धन करणारी ही उषादेवी प्रकाशमान झाली कीं ज्यास् उडण्याचें सामर्थ्य आहे असा एकही पक्षी घरट्यांत बसून रहात नाहीं. ॥ ६ ॥

एषायुक्त परावतः सूर्यस्योदयनादधि ॥

शतं रथेभिः सुभगोषा इयं वि यात्यभि मानुषान् ॥ ७ ॥

एषा अयुक्त पराऽवतः सूर्यस्य उत्अयनात् अधि ॥

शतं रथेभिः सुऽभगा उषाः इयं वि याति अभि मानुषान् ॥ ७ ॥

सूर्याच्या उदयस्थानाच्याही पलीकडे असलेल्या लांबच्या प्रदेशापासून हिनें आपले अश्व जोडून आणलेले आहेत. ही परोपकारी उषा मनुष्यांच्याकडे शंभर रथांत बसून येते. ॥ ७ ॥

विश्व॑मस्या नाना॒म चक्ष॑से॒ जग॒ज्ज्योति॑ष्कृणोति सू॒नरी॑ ॥

अप॒ द्वेषो॑ म॒घोनी॑ दुहि॒ता दि॒व उ॒षा उ॑च्छ॒दप॒ स्रिध॑ः ॥ ८ ॥

विश्वं अस्याः ननाम चक्षसे जगत् ज्योतिः कृणोति सूनरी ॥

अप द्वेषः मघोनी दुहिता दिवः उषाः उच्छत् अप स्रिधः ॥ ८ ॥

हिचें दर्शन झाल्याबरोबर सर्व जगानें हिला प्रणाम केला आहे. ही उपकारी उषा सर्वांस प्रकाश देते. ह्या द्युलोकाच्या उदार कन्येनें सर्व द्वेषकारक व बाधक जीवांचे उन्मूलन करून टाकलें आहे. ॥ ८ ॥

उष॒ आ भा॑हि भा॒नुना॑ च॒न्द्रेण॑ दुहितर्दिवः ॥

आवहन्ती भूर्यस्मभ्यं सौभंगं व्युच्छन्ती दिविष्टिषु ॥ ९ ॥

उषः आ भाहि भानुना चंद्रेण दुहितः दिवः ॥

आऽवहंती भूरि अस्मभ्यं सौभगं विऽउच्छंती दिविष्टिषु ॥ ९ ॥

द्युलोककन्ये हे उषादेवी, आमची यज्ञकर्में सुरू होण्याकरितां येथें आपला प्रकाश पाडून व आम्हांस अतिशय सौख्याचा लाभ करून देऊन आपल्या आल्हाददायक किरणांनी येथे प्रकट हो. ॥ ९ ॥

विश्वस्य हि प्राणनं जीवनं त्वे वि यदुच्छसि सूनरि ॥

सा नो रथेन बृहता विभावरि श्रुधि चित्रामघे हवम् ॥ १० ॥

विश्वस्य हि प्राणनं जीवनं त्वे वि यत् उच्छसि सूनरि ॥

सा नः रथेन बृहता विभाऽवरि श्रुधि चित्रऽमघे हवम् ॥ १० ॥

जेव्हां हे सुखदायिनी देवी, तूं आपला प्रकाश पाडतेस तेव्हां तुझेपासून विश्वाला, आपला प्राण आपलें चैतन्य मिळालें असे वाटते. हे उज्ज्वल व अलौकिक औदार्य प्रकट करणारे देवते, तूं आपल्या मोठ्या रथांत बसून येऊन आमची हांक ऐक. ॥ १० ॥

उषो॒ वाजं॒ हि वंस्व॒ यश्चि॒त्रो मानु॑षे॒ जने॑ ॥

तेना व॑ह सु॒कृतो॑ अध्व॒राँ उप॒ ये त्वा॑ गृ॒णन्ति॒ वह्न॑यः ॥ ११ ॥

उषः वाजं हि वंस्व यः चित्रः मानुषे जने ॥

तेन वह सुऽकृतः अध्वरान् उप ये त्वा गृणंति वह्नयः ॥ ११ ॥

हे उषादेवते, आपले अंगी असें सामर्थ्य आण कीं ज्याबद्दल सर्व मनुष्यांस आचंबा वाटेल. त्या सामर्थ्याचे योगानें आमचे कल्याण करणाऱ्या देवांना, जे उपास्क तुझें स्तवन करतात त्यांच्या यज्ञांसमीप, घेऊन ये. ॥ ११ ॥

विश्वा॑न्दे॒वाँ आ व॑ह॒ सोम॑पीतये॒ऽन्तरि॑क्षादु॒षस्त्वम् ॥

सास्मासु॑ धा॒ गोम॒दश्वा॑वदु॒क्थ्य१॑मुषो॒ वाजं॑ सु॒वीर्य॑म् ॥ १२ ॥

विश्वान् देवान् आ वह सोमऽपीतये अन्तरिक्षात् उषः त्वम् ॥

सा अस्मासु धाः गोऽमत् अश्वऽवत् उक्थ्यं उषः वाजं सुऽवीर्यम् ॥ १२ ॥

हे उषादेवी, सर्व देवांना अंतरिक्षांतून येथें सोमपानार्थ घेऊन ये, आणि, हे उषे, आमच्या अंगी असे सामर्थ्य आण की ज्याचें योगानें आम्हांस आपलें वीर्य गाजवितां येईल, ज्याची फार प्रशंसा होईल व ज्याचेमुळें आम्हांस धेनूंचा व अश्वांचा लाभ करून घेतां येईल. ॥ १२ ॥

यस्या॒ रुश॑न्तो अ॒र्चय॒ः प्रति॑ भ॒द्रा अदृ॑क्षत ॥

सा नो॑ र॒यिं वि॒श्ववा॑रं सु॒पेश॑समु॒षा द॑दातु॒ सुग्म्य॑म् ॥ १३ ॥

यस्याः रुशंतः अर्चयः प्रति भद्राः अदृक्षत ॥

सा नः रयिं विश्वऽवारं सुऽपेशसं उषाः ददातु सुग्म्यम् ॥ १३ ॥

जिची उज्ज्वल व कल्याणकारक किरणें दिसूं लागली आहेत ती ही उषा आम्हांस, सर्व लोकांस हवीशी वाटणारी अशी उत्तम प्रकारची संपत्ति, आम्हांस प्रयास न पडतां अर्पण करो. ॥ १३ ॥

ये चि॒द्धि त्वामृष॑य॒ः पूर्व॑ ऊ॒तये॑ जुहू॒रे॑ऽवसे महि ॥

सा न॒ः स्तोमाँ॑ अ॒भि गृ॑णीहि॒ राध॒सोष॑ः शु॒क्रेण॑ शो॒चिषा॑ ॥ १४ ॥

ये चित् हि त्वां ऋषयः पूर्वे ऊतये जुहूरे अवसे महि ॥

सा नः स्तोमान् अभि गृणीहि राधसा उषः शुक्रेण शोचिषा ॥ १४ ॥

ज्या प्रचीन ऋषींनी, हे श्रेष्ठ उषादेवी, स्वसंरक्षणार्थ तुला पाचारण केलें त्यांच्या पूजनास पात्र झालेल्या व उज्ज्वल कांतीने युक्त असलेल्या हे उषे, तूं आपली कृपा आम्हांवर करून आमच्या स्तोत्रांबद्दल आपली प्रशंसाबुद्धि व्यक्त कर. ॥ १४ ॥

उषो॒ यद॒द्य भा॒नुना॒ वि द्वारा॑वृ॒णवो॑ दि॒वः ॥

प्र नो यच्छतादवृकं पृथु छर्दिः प्र देवि गोमतीरिषः ॥ १५ ॥

उषः यत् अद्य भानुना वि द्वारौ ऋणवः दिवः ॥

प्र नः यच्छतात् अवृकं पृथु छर्दिः प्र देवि गोऽमती इषः ॥ १५ ॥

हे उषादेवी, ज्या अर्थी आज तूं आपल्या तेजानें स्वर्गाची द्वारें खुली केली आहेस, त्याअर्थी हे देवी आम्हांस जेथें शत्रूंचा त्रास होणार नाही असें विशाल मंदिर लाभेल असें कर व आम्हांला धेनु प्राप्त होतील अशी आम्हांविषयी कृपा धारण कर. ॥ १५ ॥

सं नो राया बृहता विश्वपेशसा मिमिक्ष्वा समिळाभिरा ॥

सं द्युम्नेन विश्वतुरोषो महि सं वाजैर्वाजिनीवति ॥ १६ ॥

सं नः राया बृहता विश्वऽपेशसा मिमिक्ष्व सं इळाभिः आ ॥

सं द्युम्नेन विश्वऽतुरा उषः महि सं वाजैः वाजिनीऽवति ॥ १६ ॥

हे सामर्थ्यवान् श्रेष्ठ उषादेवी, आम्हांस अखिल प्रकारच्या संपत्तींनी, समृद्धींनी, सर्वत्र प्रसार पावणाऱ्या कीर्तिवैभवानें व बलानें परिपूर्ण करून टाक. ॥ १६ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ४९ (उषा सूक्त)

ऋषि - प्रस्कण्व काण्व : देवता - उषा : छंद - अनुष्टुभ्

उषो॑ भ॒द्रेभि॒रा ग॑हि दि॒वश्चि॑द्रोच॒नादधि॑ ॥

वह॑न्त्वरु॒णप्स॑व॒ उप॑ त्वा सो॒मिनो॑ गृ॒हम् ॥ १ ॥

उषः भद्रेभिः आ गहि दिवः चित् रोचनात् अधि ॥

वहंतु अरुणऽप्सवः उप त्वा सोमिनः गृहम् ॥ १ ॥

हे उषादेवी, देदीप्यमान द्युलोकाच्या वरील भागकडून येथे आपल्या कल्याणप्रद कांतीने विभूषित होऊन आगमन कर. तुझे रक्तवर्ण अश्व सोमरस अर्पण करणाऱ्या भक्ताच्या घराकडे तुला घेऊन येवोत. ॥ १ ॥

सु॒पेश॑सं सु॒खं रथ॒ं यम॒ध्यस्था॑ उष॒स्त्वम् ॥

तेना॑ सु॒श्रव॑स॒ं जन॒ं प्राव॒ाद्य दु॑हितर्दिवः ॥ २ ॥

सुऽपेशसं सुऽखं रथं यं अध्ऽअस्थाः उषः त्वम् ॥

तेन सुऽश्रवसं जनं प्र अव अद्य दुहितः दिवः ॥ २ ॥

हे उषादेवी, ज्या सुखावह व सुंदर रथांत तूं विराजमान झाली आहेस त्यांत बसून येऊन, हे द्युलोककन्ये, उत्तम कीर्तीची इच्छा करणाऱ्या ह्या मनुष्यांचे संरक्षण कर. ॥ २ ॥

वय॑श्चित्ते पत॒त्रिणो॑ द्वि॒पच्चतु॑ष्पदर्जुनि ॥

उष॒ः प्रार॑न्नृ॒तूँरनु॑ दि॒वो अन्ते॑भ्य॒स्परि॑ ॥ ३ ॥

वयः चित् ते पतत्रिणः द्विऽपत् चतुःऽपत् अर्जुनि ॥

उषः प्र आरन् ऋतून् अनु दिवः अंतेभ्यः परि ॥ ३ ॥

हे देदीप्यमान देवी, द्युलोकाच्या आसमंतातील भागांतून तुझें आगमन झाल्याबरोबर, उडणारे पक्षी व द्विपाद आणि चतुष्पाद प्राणी बाहेर निघण्यास सिद्ध झाले. ॥ ३ ॥

व्यु॒च्छन्ती॒ हि र॒श्मिभि॒र्विश्व॑मा॒भासि॑ रोच॒नम् ॥

तां त्वामु॑षर्वसू॒यवो॑ गी॒र्भिः कण्वा॑ अहूषत ॥ ४ ॥

विऽउच्छंती हि रश्मिऽभिः विश्वं आऽभासि रोचनम् ॥

तां त्वां उषः वसूऽयवः गीःऽभिः कण्वा अहूषत ॥ ४ ॥

आपल्या किरणांनी जगावर प्रकाश पाडीत जी तूं सर्व जगास प्रकाशमय करून टाकतेस त्या तुझ्या, हे उषे, कण्वांनी संपत्तीची इच्छा धरून, स्तोत्रांचे योगानें धांवा केला आहे. ॥ ४ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ५० (सूर्य सूक्त)

ऋषि - प्रस्कण्व काण्व : देवता - सूर्य : छंद - गायत्री, अनुष्टुभ्

उदु॒त्यं जा॒तवे॑दसं दे॒वं व॑हन्ति के॒तवः॑ ॥ दृ॒शे विश्वा॑य॒ सूर्य॑म् ॥ १ ॥

उत् ऊं इति त्यं जातऽवेदसं देवं वहंति केतवः ॥ दृशे विश्वाय सूर्यम् ॥ १ ॥

या सूर्याचें सर्वांस दर्शन घडावे म्हणून त्या सर्वज्ञ सूर्यदेवास त्याचे रश्मि इकडे घेऊन येत आहेत. ॥ १ ॥

अप॒ त्ये ता॒यवो॑ यथा॒ नक्ष॑त्रा यन्त्य॒क्तुभिः॑ ॥ सूरा॑य वि॒श्वच॑क्षसे ॥ २ ॥

अप त्ये तायवः यथा नक्षत्रा यंति अक्तुऽभिः ॥ सूराय विश्वऽचक्षसे ॥ २ ॥

ह्या सर्वदर्शी सूर्यास पाहून नक्षत्रे, रात्रीसहवर्तमान चोरांप्रमाणे पळ काढतात. ॥ २ ॥

अदृ॑श्रमस्य के॒तवो॒ वि र॒श्मयो॒ जनाँ॒ अनु॑ ॥ भ्राज॑न्तो अ॒ग्नयौ॑ यथा ॥ ३ ॥

अदृश्रं अस्य केतवः वि रश्मयः जनान् अनु ॥ भ्राजंतः अग्नयः यथा ॥ ३ ॥

सर्व लोकांवर प्रकाश पाडण्याकरितां येत असतां अग्निप्रमाणे तेजस्वी असे ह्याचे उज्ज्वल रश्मि दिसत आहेत. ॥ ३ ॥

त॒रणि॑र्वि॒श्वद॑र्शतो ज्योति॒ष्कृद॑सि सूर्य ॥ विश्व॒मा भा॑सि रोच॒नम् ॥ ४ ॥

तरणिः विश्वऽदर्शतः ज्योतिःऽकृत् असि सूर्य ॥ विश्वं आ भासि रोचनम् ॥ ४ ॥

हे सूर्या ! तूं प्रकाश देणारा, सर्वांत अत्यंत सुंदर व सर्वसंचारी आहेस. ह्या अखिल जगावर तूं प्रकाश पाडून त्यास उज्ज्वलता आणतोस. ॥ ४ ॥

प्र॒त्यङ् दे॒वानां॒ विशः॑ प्र॒त्यङ्ङुदे॑षि॒ मानु॑षान् ॥ प्र॒त्यङ्विश्वं॒ स्व॑र्दृ॒शे ॥ ५ ॥

प्रत्यङ् देवानां विशः प्रत्यङ् उत् एषि मानुषान् ॥ प्रत्यङ् विश्वं स्वः दृशे ॥ ५ ॥

तुझा प्रकाश सर्वांच्या नजरेस पडावा म्हणून देवसमुदाय, मनुष्यें, किंबहुना विश्व ह्यांच्या समोर, तू ढळढळीत प्रकाशमान होतोस. ॥ ५ ॥

येना॑ पावक॒ चक्ष॑सा भुर॒ण्यन्तं॒ जनाँ॒ अनु॑ ॥ त्वं व॑रुण॒ पश्य॑सि ॥ ६ ॥

येन पावक चक्षसा भुरण्यंतं जनान् अनु ॥ त्वं वरुण पश्यसि ॥ ६ ॥

ह्या योगाने हे वरुणा, हे जगतास पावन करणाऱ्या देवा, तुला सर्व लोकांचा भार सहन करणाऱ्या ह्या जगताकडे स्वनेत्राने पाहतां येते. ॥ ६ ॥

वि द्यामे॑षि॒ रज॑स्पृ॒थ्वहा॒ मिमा॑नो अ॒क्तुभिः॑ ॥ पश्य॒ञ्जन्मा॑नि सूर्य ॥ ७ ॥

वि द्यां एषि रजः पृथु अहा मिमानः अक्तुऽभिः ॥ पश्यन् जन्मानि सूर्य ॥ ७ ॥

हे सूर्या, सर्व प्राणिमात्रांचे निरीक्षण करीत व रात्रीच्या योगाने दिवसाचें मापन करीत तूं द्युलोकावर व विस्तीर्ण रजोलोकावर आगमन करतोस. ॥ ७ ॥

स॒प्त त्वा॑ ह॒रितो॒ रथे॒ वह॑न्ति देव सूर्य ॥ शो॒चिष्के॑शं विचक्षण ॥ ८ ॥

सप्त त्वा हरितः रथे वहंति देव सूर्य ॥ शोचिःऽकेशं विऽचक्षण ॥ ८ ॥

हे सर्वनिरीक्षक सूर्यदेवा ! ज्याचे केश दीप्तिमय आहेत अशा तुला सात रक्तवर्ण अश्व रथांतून आणीत असतात. ॥ ८ ॥

अयु॑क्त स॒प्त शु॒न्ध्युव॒ः सूरो॒ रथ॑स्य न॒प्त्यः ॥ ताभि॑र्याति॒ स्वयु॑क्तिभिः ॥ ९ ॥

अयुक्त सप्त शुंध्युवः सूरः रथस्य नप्त्यः ॥ ताभिः याति स्वयुक्तिऽभिः ॥ ९ ॥

रथाच्या पुढील भागास जोडल्यामुळें ज्या जणुं कांही त्या रथापासून उत्पन्न झाल्या असल्याचाच भास होतो अशा सात घोड्या हया सूर्यानें स्वरथास जोडल्या आहेत. त्या रथाचें जूं आपले आपणच मानेवर घेणाऱ्या असल्यामुळें, त्यांस सज्ज करून तो बाहेर प्रयाण करतो. ॥ ९ ॥

उद्व॒यं तम॑स॒स्परि॒ ज्योति॒ष्पश्य॑न्त॒ उत्त॑रम् ॥

दे॒वं दे॑व॒त्रा सूर्य॒मग॑न्म॒ ज्योति॑रुत्त॒मम् ॥ १० ॥

उत् वयं तमसः परि ज्योतिः पश्यंत उत्ऽतरम् ॥

देवं देवऽत्रा सूर्यं अगन्म ज्योतिः उत्ऽतमम् ॥ १० ॥

जें सर्व अंधकारावर आपलें प्राबल्य प्रकट करील असें उत्तम तेज शोधीत असतां आम्ही ह्या उत्कृष्ट ज्योतीकडे-सूर्याकडे आलो. हा देव अखिल देवांत श्रेष्ठ आहे. ॥ १० ॥

उ॒द्यन्न॒द्य मि॑त्रमह आ॒रोह॒न्नुत्त॑रां॒ दिव॑म् ॥

हृ॒द्रो॒गं मम॑ सूर्य हरि॒माणं॑ च नाशय ॥ ११ ॥

उत्ऽयन् अद्य मित्रऽमह आऽरोहन् उत्ऽतरां दिवम् ॥

हृऽरोगं मम सूर्य हरिमाणं च नाशय ॥ ११ ॥

स्वमित्रांस आनंद देणाऱ्या हे सूर्या ! आज येथें उदय पावून व ह्या वर दिसणाऱ्या आकाशावर आरोहण करून माझा हृद्रोग व कावीळ नाहींशी कर. ॥ ११ ॥

शुके॑षु मे हरि॒माणं॑ रोप॒णाका॑सु दध्मसि ॥

अथो॑ हारिद्र॒वेषु॑ मे हरि॒माणं॒ नि द॑ध्मसि ॥ १२ ॥

शुकेषु मे हरिमाणं रोपणाकासु दध्मसि ॥

अथो इति हारिद्रवेषु मे हरिमाणं नि दध्मसि ॥ १२ ॥

माझी कावीळ आम्ही पोपटांवर आणि रोपणाका ह्या नांवाच्या पक्ष्यांवर घालतों. अथवा हारिद्रव पक्ष्यांवर माझी कावीळ जाऊन बसेल असें आम्ही करतो. ॥ १२ ॥

उद॑गाद॒यमा॑दि॒त्यो विश्वे॑न॒ सह॑सा स॒ह ॥

द्वि॒षन्तं॒ मह्यं॑ र॒न्धय॒न्मो अ॒हं द्वि॑ष॒ते र॑धम् ॥ १३ ॥

उत् अगात् अयं आदित्यः विश्वेन सहसा सह ॥

द्विषंतं मह्यं रंधयन् मो इति अहं द्विषते रधम् ॥ १३ ॥

आपल्या सर्व सामर्थ्यानें सज्ज होऊन, माझे शत्रूंस मजपुढें शरण येण्यास भाग पाडीत, हा आदित्य येथें उगवला आहे. मी शत्रूच्या मुठींत कधींही न जावो. ॥ १३ ॥

ॐ तत् सत्

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ५१ (इंद्र सूक्त)

ऋषि - सव्य अङ्गिरस : देवता - इंद्र : छंद - जगती; त्रिष्टुभ्

अ॒भि त्यं मे॒षं पु॑रुहू॒तमृ॒ग्मिय॒मिन्द्रं॑ गी॒र्भिर्म॑दता॒ वस्वो॑ अ॒र्ण॒वम् ॥

यस्य॒ द्यावो॒ न वि॒चर॑न्ति॒ मानु॑षा भु॒जे मंहि॑ष्ठम॒भि विप्र॑मर्चत ॥ १ ॥

अभि त्यं मेषं पुरुऽहूतं ऋग्मियं इंद्रं गीःऽभिः मदत वस्वः अर्णवम् ॥

यस्य द्यावः न वि*चरंति मानुषा भुजे मंहिष्ठं अभि विप्रं अर्चत ॥ १ ॥

त्या मेषरूपधारी इंद्रास स्तुतींनी संतुष्ट करा. ह्यास संकटकाळी अनेकांनी पाचारण केलेले आहे, ह्याची स्तोत्रें सर्वत्र गाईली जातात व हा संपत्तीचा महोदधि आहे. ज्याची मानवांच्या कल्याणार्थ केलेलीं कृत्यें किरणांप्रमाणेंच जिकडे जावे तिकडे दृगोचर होतात त्या अत्यंत उदार व प्रज्ञाशाली इंद्राचें अर्चन करा. ॥ १ ॥

अ॒भीम॑वन्वन्स्वभि॒ष्टिमू॒तयो॑ ऽन्तरिक्ष॒प्रां तवि॑षीभि॒राव॑ृतम् ॥

इन्द्रं॒ दक्षा॑स ऋ॒भवो॑ मद॒च्युत॑ं श॒तक्र॑तुं॒ जव॑नी सू॒नृता॑रुहत् ॥ २ ॥

अभि ईं अवन्वन् सुऽअभिष्टिं ऊतयः अन्तरिक्षऽप्रां तविषीभिः आवृतम् ॥

इंद्रं दक्षासः ऋभवः मदऽच्युतं शतऽक्रतुं जवनी सूनृता आ अरुहत् ॥ २ ॥

सामर्थ्यवान् ऋभु, इंद्रास साहाय्यभूत होऊन, भक्तांचे संरक्षण करण्यास सर्व तऱ्हेने समर्थ, अंतरिक्षास व्यापून राहिलेल्या, अखिल सामर्थ्यांनी युक्त व शत्रूंच्या आनंदाचा बिघाड करणाऱ्या अशा ह्या इंद्राकडे आले. ह्या अत्यंत पराक्रमी इंद्रास त्यांच्या उत्तेजनपर शब्दांनी स्फुरण चढविलें. ॥ २ ॥

त्वं गो॒त्रमङ्गि॑रोभ्योऽवृणो॒रपो॒तात्र॑ये श॒तद्॑रेषु गातु॒वित् ॥

सु॒सेन॑ चिद्वि॒म॒दाया॑वहो॒ वस्वा॒जावद्रिं॑ वावसा॒नस्य॑ न॒र्तय॑न् ॥ ३ ॥

त्वं गोत्रं अङ्गिरःऽभ्यः अवृणोः अप उत अत्रये शतऽदुरेषु गातुऽवित् ॥

ससेन चित् विऽमदाय अवहः वसु आजौ अद्रिं ववसानस्य नर्तयन् ॥ ३ ॥

जेथे धेनूंना कोंडून ठेवलें होते तो दुर्ग तूं अंगिरसाकरितां उघडलास आणि शेंकडो दरवाज्यांमधून तूं अत्रीकरितां मार्ग शोधून काढलास. वावसानाच्या युद्धांत आपले वज्र शत्रुसमुदायांतून नाचवीत तूं विमदाला धनधान्य अर्पण केलेंस ॥ ३ ॥

त्वम॒पाम॑पि॒धाना॑वृणो॒रपाधा॑रयः॒ पर्व॑ते॒ दानु॑म॒द्वसु॑ ॥

वृ॒त्रं यदि॑न्द्र॒ शव॒साव॑धी॒रहि॒मादित्सूर्यं॑ दि॒व्यारो॑हयो दृ॒शे ॥ ४ ॥

त्वं अपां अपिऽधाना अवृणोः अप अधारयः पर्वते दानुऽमत् वसु ॥

वृत्रं यत् इंद्र शवसा अवधीः अहिं आत् इत् सूर्यं दिवि आ आरोहयः दृशे ॥ ४ ॥

तूं उदकांवरील आवरण काढून टाकलेंस व पर्वतांत शिरून विपुल संपत्ति हस्तगत करून घेतलीस. जेव्हां हे इंद्रा, वृत्र०अहीस तूं आपल्या सामर्थ्याएं मारून टाकलेंस त्या वेळीं तू, सर्वांच्या दृष्टीस पडेल अशा रीतीनें सूर्याची द्युलोकांत स्थापना केलीस. ॥ ४ ॥

त्वम् मा॒याभि॒रप॑ मा॒यिनो॑ऽधमः स्व॒धाभि॒र्ये अधि॒ शुप्ता॒वजु॑ह्वत ॥

त्वम् पिप्रो॑र्नृमण॒ः प्रारु॑ज॒ः पुर॒ः प्र ऋ॒जिश्वा॑नं दस्यु॒हत्ये॑ष्वाविथ ॥ ५ ॥

त्वं मायाभिः अप मायिनः अधमः स्वधाभिः ये अधि शुप्तौ अजुह्वत ॥

त्वं पिप्रोः नृऽमनः प्र अरुजः पुरः प्र ऋजिश्वानं दस्युऽहत्येषु आविथ ॥ ५ ॥

युक्तिप्रयुक्तींचा बळावर तूं कपटी शत्रूंचा धुव्वा उडविलास व त्याचप्रमाणें जे लोक तुझी थट्टा करण्याकरितां तुला हवि अर्पण करण्याचें ढोंग करीत असत त्यांनाही तूं आपल्या युद्धपद्धतीनें चीत केलेंस. मानवांचे कल्याण करणाऱ्या हे इंद्रा, तूं पिप्रूच्या पुरांचा विध्वंस केलास, आणि दस्यु मारावयास आले असतां ऋजिश्वानाचें संरक्षण केलेंस. ॥ ५ ॥

त्वं कुत्सं शुष्णहत्येष्वाविथारंन्धयोऽतिथिग्वाय शम्बंरम् ॥

महान्तं चिदर्बुदं नि क्रमीः पदा सनादेव दस्युहत्याय जज्ञिषे ॥ ६ ॥

त्वं कुत्सं शुष्णऽहत्येषु आविथ अरंधयः अतिथिऽग्वाय शम्बरम् ॥

महांतं चित् अर्बुदं नि क्रमीः पदा सनात् एव दस्युऽहत्याय जज्ञिषे ॥ ६ ॥

सुष्ण मारावयास धांवला असतां तूं कुत्साचें संरक्षण केलेंस आणि अतिथिग्वाचा पक्ष घेऊन शंबराचा चुराडा करून टाकलास. अर्बुद एवढा मोठा असतांही तूं त्यावर पाय देऊन उभा राहिलास. दस्यूंचे हनन करण्याकरितांच तूं पुरातनकालापासून जन्म घेतला आहेस. ॥ ६ ॥

त्वे विश्वा तविषी सध्र्यग्घिता तव राधः सोमपीथाय हर्षते ॥

तव वज्रश्चिकिते बाह्वोर्हितो वृश्चा शत्रोरव विश्वानि वृष्ण्या ॥ ७ ॥

त्वे इति विश्वा तविषी सध्र्यक् घिता तव राधः सोमऽपीथाय हर्षते ॥

तव वज्रः चिकिते बाह्वोः हितः वृश्च शत्रोः अव विश्वानि वृष्ण्या ॥ ७ ॥

तुझे ठिकाणी सर्व सामर्थ्य पूर्णपणें सुस्थापित झालें आहे. सोमपानासाठी आनंदाला उकळी येत असते. बाहूंवर ठेवलेल्या तुझ्या वज्राची सर्वांस ओळख आहे. ते घेऊन तूं शत्रूच्या अखिल सामर्थ्यांचे विदारण कर. ॥ ७ ॥

वि जा॑नी॒ह्यार्या॒न्ये च॒ दस्य॑वो ब॒र्हिष्म॑ते रन्धया॒ शास॑दव्र॒तान् ॥

शाकी॑ भव॒ यज॑मानस्य चोदि॒ता विश्वेत्ता ते॑ सध॒मादे॑षु चाकन ॥ ८ ॥

वि जानीहि आर्यान् ये च दस्यवः बर्हिष्मते रंधय शासत् अव्रतान् ॥

शाकी भव यजमानस्य चोदिता विश्वा इत् ता ते सधऽमादेषु चाकन ॥ ८ ॥

आर्य कोण आणि दस्यु कोण हे नीट ओळखून ठेव आणि जे तुझी आज्ञा न पाळणारे आहेत त्यांस शासन करून आपल्या उपासकांपुढे त्यांना शरण यावयास लाव. तूं सामर्थ्यवान आहेस. आपल्या भक्तांस तूं उत्कर्षाप्रत पोंचीव. तुझे सर्व पराक्रम यज्ञामध्यें गात असतां मला आनंद देतात. ॥ ८ ॥

अनु॑व्रताय र॒न्धय॒न्नप॑व्रताना॒भूभि॒रिन्द्रः॑ श्न॒थय॒न्नना॑भुवः ॥

वृ॒द्धस्य॑ चि॒द्वर्ध॑तो॒ द्यामिन॑क्षत॒ स्तवा॑नो व॒म्रो वि ज॑घान सं॒दिहः॑ ॥ ९ ॥

अनुऽव्रताय रंधयन् अपऽव्रतान् आऽभूभिः इंद्रः श्नथयन् अनाभुवः ॥

वृद्धस्य चित् वर्धतः द्यां इनक्षतः स्तवानः वम्रः वि जघान संऽदिहः ॥ ९ ॥

जे इंद्राची आज्ञा मानतात त्यांच्या पुढें त्याच्या आज्ञांस न जुमानणाऱ्या लोकांना वांकावयास लावून हा इंद्र भक्तांकडून भक्तिहीनांचा नाश करवीत असतो. वम्र तुझें स्तवन करीत असल्यामुळें त्याला त्याच्या शत्रूनें सांठवून ठेवलेल्या संपत्तीचा विध्वंस करता आला. हा त्याचा शत्रू अगोदरच फार बलिष्ठ झालेला असूनही त्याचें बल वाढतच चाललेलें होते व तो स्वर्गापर्यंत जाऊन भिडला होता. ॥ ९ ॥

तक्ष॒द्यत्त॑ उ॒शना॒ सह॑सा॒ सहो॒ वि रोद॑सी म॒ज्मना॑ बाधते॒ शवः॑ ॥

आ त्वा॒ वात॑स्य नृमणो मनो॒युज॒ आ पूर्य॑माणमवहन्न॒भि श्रवः॑ ॥ १० ॥

तक्षत् यत् ते उशना सहसा सहः वि रोदसी इति मज्मना बाधते शवः ॥

आ त्वा वातस्य नृऽमनः मनःऽयुजः आ पूर्यमाणं अवहन् अभि श्रवः ॥ १० ॥

उशनानें आपल्या शक्तीच्या योगानें जे सामर्थ्य तुझ्याकरिता निर्माण केलें त्या सामर्थ्यांत इतके बल आहे कीं तें द्युलोक व भूलोक ह्या दोहोंसही भारी होऊन बसलें आहे. मानवांचे हित करण्याची बुद्धि बाळगणाऱ्या हे इंद्रा, स्वतःस रथाला आपोआप जोडून घेणाऱ्या वायूच्या अश्वांनी, सर्वत्र भरून राहणाऱ्या तुला, पुष्कळ कीर्ति प्राप्त करून दिली आहे. ॥ १० ॥

मन्दि॑ष्ट॒ यदु॒शने॑ का॒व्ये सचा॒ँ इन्द्रो॑ व॒ङ्कू व॑ङ्कु॒तराधि॑ तिष्ठति ॥

उ॒ग्रो य॒यिं निर॒पः स्रोत॑सासृज॒द्वि शुष्ण॑स्य दृंहि॒ता ऐ॑रय॒त्पुरः॑ ॥ ११ ॥

मंदिष्ट यत् उशने काव्ये सचा इंद्रः वङ्कू वङ्कुऽतरा अधि तिष्ठति ॥

उग्रः ययिं निः अपः स्रोतसा असृजत् वि शुष्णस्य दृंहिताः ऐरयत् पुरः ॥ ११ ॥

ज्या वेळी उशनाकाव्या सहवर्तमान इंद्र संतुष्ट झाला त्यावेळीं ऐटीनें वांकडे वांकडे चालणाऱ्या अशा अश्वांतील अतिशय उत्कृष्ट अश्वांवर त्यानें आरोहण केलें. त्या प्रतापी देवानें प्रवाहरूपानेंच जलांना मोकळें सोडून त्यांस शीघ्रगति आणली आणि शुष्णाच्या बळकट किल्ल्याचें त्यानें विदारण केलें. ॥ ११ ॥

आ स्मा॒ रथं॑ वृष॒पाणे॑षु तिष्ठसि शार्या॒तस्य॒ प्रभृं॑ता॒ येषु॒ मन्दं॑से ॥

इन्द्र॒ यथा॑ सु॒तसो॑मेषु चा॒कनो॑ऽन॒र्वाणं॒ श्लोक॒मा रो॑हसे दि॒वि ॥ १२ ॥

आ स्मा रथं वृषऽपानेषु तिष्ठसि शार्यातस्य प्रऽभृताः येषु मंदसे ॥

इंद्र यथा सुतऽसोमेषु चाकनः अनर्वाणं श्लोकं आ रोहसे दिवि ॥ १२ ॥

सामर्थ्यवान पुरुष ज्याचें प्राशन करतात त्या सोमरसाचा आस्वाद घेत असतां तू रथावर आरूढ होतोस. शार्याताचे सोमरसाचे चमस तयार आहेत. तुलाही त्यामुळें फार आनंद होतो. हे इंद्रा, ज्या ज्या प्रमाणानें आम्ही सिद्ध केलेल्या सोमरसाविषयीं तुझी आवड वाढत जाते त्या त्या प्रमाणानें तूं द्‍युलोकांत आपोआप कीर्तीस पात्र होत जातोस. ॥ १२ ॥

अद॑दा॒ अर्भां म॒हते व॑च॒स्यवे॑ क॒क्षीव॑ते वृच॒यामि॑न्द्र सु॒न्व॒ते ॥

मेना॑भवो वृष॒ण॒श्वस्य॑ सुक्र॒तो॒ विश्वेत्ता ते॒ सव॑नेषु प्र॒वाच्या॑ ॥ १३ ॥

अददाः अर्भां महते वचस्यवे कक्षीवते वृचयां इंद्र सुन्वते ॥

मेना अभवः वृषणश्वस्य सुक्रतो इति सुऽक्रतो विश्वा इत् ता ते सवनेषु प्रऽवाच्या ॥ १३ ॥

हे इंद्रा, तुझें स्तोत्र गाणाऱ्या व तुला सोमरस अर्पण करणाऱ्या वृद्ध कक्षीवानास तूं कोमल वयाची वृचया अर्पण केलीस. हे बुद्धिसामर्थ्यवान देवा ! तूंच वृषाणश्वाची कन्या मेना ही बनलास. ही तुझी सर्व कृत्यें यज्ञांत गाण्यास योग्य आहेत. ॥ १३ ॥

इन्द्रो॑ अश्रायि सु॒ध्यो निरे॒के प॒ज्रेषु॒ स्तोमो॒ दुर्यो॒ न यूप॑ः ॥

अ॒श्व॒युर्ग॒व्यू र॑थ॒युर्व॑सू॒युरिन्द्र॒ इद्रा॒यः क्ष॑यति प्रय॒न्ता ॥ १४ ॥

इंद्रः अश्रायि सुऽध्यः निरेके पज्रेषु स्तोमः दुर्यः न यूपः ॥

अश्वऽयुः गव्युः रथऽयुः वसुऽयुः इंद्रः इत् रायः क्षयति प्रऽयंता ॥ १४ ॥

विपत्काली सदाचारी लोकांनी इंद्राचाच आश्रय केलेला आहे. जसा दाराचा खांब कधी ढळत नाहीं त्याप्रमाणें पज्रांचे कुलांत इंद्राची पूजा कधींही चुकावयाची नाही. अश्व, धेनु, रथ व वित्त ह्यांची आवड धरणारा व दानकर्मांत शूर असणारा इंद्र हाच एकटा सर्व वैभवांचा स्वामी आहे. ॥ १४ ॥

इ॒दं नमो॑ वृ॒ष॒भाय॑ स्व॒राजे॑ स॒त्यशु॑ष्माय त॒वसे॑ऽवाचि ॥

अ॒स्मिन्नि॑न्द्र वृ॒जने॒ सर्व॑वीराः॒ स्मत्सू॒रिभि॒स्तव॒ शर्म॑न्स्याम ॥ १५ ॥

इदं नमः वृषभाय स्वराजे सत्यऽशुष्माय तवसे अवाचि ॥

अस्मिन् इंद्र वृजने सर्वऽवीराः स्मत् सूरिऽभिः तव शर्मन् स्याम ॥ १५ ॥

सामर्थ्यवान, स्वतेजाने युक्त, सत्य कार्यांत बलाचा विनियोग करणारा आणि शक्तिसंपन्न अशा इंद्राचे सन्मानार्थ ही नम्र स्तुति आम्ही म्हटली आहे. हे इंद्रा ! आमच्या पदरचे सर्व पराक्रमी पुरुष व विद्वान लोक ह्यांचेसह ह्या संकटसमयी आम्ही तुझ्या कृपेचा आधार मानून राहूं ॥ १५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ५२ (इंद्र सूक्त)

ऋषि - सव्य अंगिरस : देवता - इंद्र : छंद - जगती; त्रिष्टुभ्

त्यं सु मेषं महया स्वर्विदं शतं यस्य सुभ्वः साकमीरते ॥

अत्यं न वाजं हवनस्यदं रथमेन्द्रं ववृत्यामवसे सुवृक्तिभिः ॥ १ ॥

त्यं सु मेषं महय स्वःऽविदं शतं यस्य सुऽभ्वः साकं ईरते ॥

अत्यं न वाजं हवनऽस्यदं रथं इंद्रं ववृत्यां अवसे सुवृक्तिऽभिः ॥ १ ॥

ज्याने प्रकाशाची प्राप्ती करून घेतली त्या मेषाचे चांगले अर्चन कर. ह्याच्चीच कीर्ति शेंकडो स्तोते एकत्र बसून गात असतात. ज्याप्रमाणे एखाद्या जोमदार अश्वाला यज्ञाकडे निघालेल्या रथास जोडण्याकरितां प्रयत्नपूर्वक वळवून

आणावे लागते त्याप्रमाणे ह्या इंद्रास आमच्या संरक्षणार्थ सुंदर स्तोत्रांनी वळवून आणण्यास मी समर्थ होवो. ॥ १ ॥

स पर्व॑तो॒ न ध॒रुणे॒ष्वच्यु॑तः स॒हस्र॑मूति॒स्तवि॑षीषु वावृधे ॥

इन्द्रो॒ यद् वृ॒त्रमव॑धीन्नदी॒वृत॑मु॒ब्जन्नर्णां॑सि॒ जर्हृ॑षाणो॒ अन्ध॑सा ॥ २ ॥

सः पर्वतः नः धरुणेऽषु अच्युतः सहस्रं ऊं इतिः तविषीषु ववृधे ॥

इंद्रः यत् वृत्रं अवधीत् नदीऽवृतं उब्जन् अर्णांसि जर्हृषाणः अंधसा ॥ २ ॥

ज्यावेळी हवींनी संतुष्ट होऊन इंद्राने नद्यांचा मार्ग मोकळा करीत करीत जलांस प्रतिबंध करणाऱ्या वृत्राचा वध केला त्यावेळी आपल्याच सामर्थ्यानी परिवेष्टीत होऊन व कठीण भूभागावर असलेल्या पर्वताप्रमाणे स्थिर राहून हजारों प्रकारांनी भक्तांचे संरक्षण करणारा तो इंद्र जास्त जास्त मोठा होत गेला. ॥ २ ॥

स हि द्व॒रो द्व॒रिषु॑ व॒व्र ऊध॑नि च॒न्द्रबु॑ध्नो॒ मद॑वृद्धो मनी॒षिभिः॑ ॥

इन्द्रं॒ तम॑ह्वे स्व॒प॒स्यया॑ धि॒या मंहि॑ष्ठराति॒ं स हि प॒प्रिरन्ध॑सः ॥ ३ ॥

सः हि द्वरः द्वरिषु वव्र ऊधनि चंद्रऽबुध्नः मदऽवृद्धः मनीषिभिः ॥

इंद्रं तं अह्वे सुऽअपस्यया धिया मंहिष्ठरातिं सः हि पप्रिः अंधसः ॥ ३ ॥

शत्रूंमध्यें शत्रूप्रमाणे असलेला व गाईच्या कांसेप्रमाणे दिसणाऱ्या अशा ह्या अंतरिक्षांत व्याप्त होऊन राहिलेल्या, ह्या इंद्राचे मुख्य निवासस्थान आल्हाददायक प्रकाशांत आहे व विद्वान् लोकांनी सोमरस अर्पण करून त्याचा आनंद वृद्धिंगत केला आहे. मनांत फार तत्परता बाळगून त्या परम उदार इंद्रास मी पाचारण करतो. अन्नाची समृद्धि करणारा तोच होय. ॥ ३ ॥

आ यं पृ॒णन्ति॑ दि॒वि सद्म॑बर्हिषः समु॒द्रं न सु॒भ्व१ स्वा अ॒भिष्ट॑यः ॥

तं वृ॑त्र॒हत्ये॒ अनु॑ तस्थुरू॒तयः॒ शुष्मा॒ इन्द्र॑मवा॒ता अह्रु॑तप्सवः ॥ ४ ॥

आ यं पृणंति दिवि सद्मऽबर्हिषः समुद्रं न सुऽभ्वः स्वा अभिष्टयः ॥

तं वृत्रऽहत्ये अनु तस्थुः ऊतयः शुष्माः इंद्रं अवाताः अह्रुतऽप्सवः ॥ ४ ॥

यज्ञगृहात आसनावर विराजमान होणारे ज्याचे उत्साही सेवक ज्यास द्‌युलोकांत समुद्राप्रमाणे सोमरसाने भरून टाकतात त्या इंद्राचे समीप त्याचे सामर्थ्यवान्, कोणत्याही प्रतिरोधास न जुमानणारे, व सरलाकृति सहाय्यकर्ते वृत्रहनप्रसंगी उभे होते. ॥ ४ ॥

अ॒भि स्वव॑ृष्टिं॒म् मदे॑ अ॒स्य युध्य॑तो र॒घ्वीरि॑व प्र॒वणे स॑स्रुरू॒तय॑ः ॥

इन्द्रो॒ यद्व॒ज्री धृ॒षमा॑णो॒ अन्ध॑सा भि॒नद्व॒लस्य॑ परि॒धीँरि॑व त्रि॒तः ॥ ५ ॥

अभि स्वऽवृष्टिं मदे अस्य युध्यतः रघ्वीःऽइव प्रवणे सस्रुः ऊतयः ॥

इंद्रः यत् वज्री धृषमाणः अंधसा भिनत् वलस्य परिधीन्ऽइव त्रितः ॥ ५ ॥

ज्यावेळी सोमरसामुळे उत्साहपरिप्लुत झालेल्या वज्रधर इंद्राने त्रिताप्रमाणे बलाच्या भोंवतालचे दुर्ग फोडून टाकले, त्यावेळी हर्षाच्या भरांत युद्ध करणाऱ्या त्या देवाचे साहृयकर्ते, ज्याप्रमाणे उतार जागेवरून नद्‌या वेगानें धांवत जातात, त्याप्रमाणे पर्जन्यवृष्टीस प्रतिबंध करणाऱ्या त्या वृत्रावर तुटून पडले. ॥ ५ ॥

परीं घृणा चंरति तित्विषे शवोऽपो वृत्वी रजसो बुध्नमाशयत् ॥

वृत्रस्य यत्प्रवणे दुर्गृभिश्वनो निजघन्थ हन्वोरिन्द्र तन्यतुम् ॥ ६ ॥

परि ईं घृणा चरति तित्विषे शवः अपः वृत्वी रजसः बुध्नं आ अशयत् ॥

वृत्रस्य यत् प्रवणे दुःऽगृभिश्वनः निऽजघंथ हन्वोः रिंद्र तन्यतुम् ॥ ६ ॥

हे इंद्रा, ज्यावेळी तू आपले वज्र पराजय करण्यास दुष्कर अशा वृत्राच्या हनुवटीखाली फेंकून मारलेंस त्यावेळी तुझे तेज तुझ्या सभोंवार पसरले. तुझ्या सामर्थ्याचा प्रकाश पडला व उदकांस प्रतिबंध करणारा वृत्र रजोलोकाच्या तळाशी मरून पडला. ॥ ६ ॥

ह्रदं न हि त्वा न्यृषन्त्यूर्मयो ब्रह्माणीन्द्र तव यानि वर्धना ॥

त्वष्टा चित्ते युज्यं वावृधे शवस्ततक्ष वज्रमभिभूत्योजसम् ॥ ७ ॥

ह्रदं न हि त्वा निऽऋषंति ऊर्मयः ब्रह्माणी इंद्र तव यानि वर्धना ॥

त्वष्टा चित् ते युज्यं ववृधे शवः ततक्ष वज्रं अभिभूतिऽयोजसम् ॥ ७ ॥

जी स्तोत्रें तुझी महती वृद्धिंगत करतात ती, ज्याप्रमाणें उदकाचे प्रवाह डोहाकडे धांवत जातात त्याप्रमाणे तुझ्याकडे धांव घेतात. त्वष्ट्यानेंच तुझ्या उपयोगी पडणारे असे तुझें सामर्थ्य वाढविलें आणि शत्रूंचा पराभव करण्यास समर्थ असे वज्र तुझ्या करितांच तयारे केले. ॥ ७ ॥

ज॒घ॒न्वाँ उ॒ हरि॑भिः सम्भृतक्रत॒विन्द्र॑ वृ॒त्रं मनु॑षे गातु॒यन्न॒पः ॥

अय॑च्छथा बा॒ह्वोर्वज्र॑माय॒समधा॑रयो दि॒व्या सूर्यं॑ दृ॒शे ॥ ८ ॥

जघन्वान् ऊं इति हरिऽभिः संभृतक्रतो इति संभृतऽक्रतो इंद्र वृत्रं मनुषे गातुयन् अपः ॥

अयच्छथाः बाह्वोः वज्रं आयसं अधारयः दिवि आ सूर्यं दृशे ॥ ८ ॥

सामर्थ्यपरिप्लुत असणाऱ्या हे इंद्रदेवा, मानवांचे हिताकरितां उदकांस वहाण्यास मार्ग मोकळा करण्याकरितां तूं आपल्या अश्वांचे योगाने वृत्राचा वध केलास. तू आपल्या बाहूंवर लोखंडाचे केलेले वज्र धारण केलेस व सूर्यदेव सर्वांचे नजरेस पडावा अशा रीतीनें त्याची द्युलोकांत स्थापना केलीस. ॥ ८ ॥

बृहत्स्वश्चन्द्रममवद्यदुक्थ्य१मकृण्वत भियसा रोहणं दिवः ॥

यन्मानुषप्रधना इन्द्रमूतयः स्वर्नृषाचो मरुतोऽमदन्ननु ॥ ९ ॥

बृहत् स्वःऽचंद्रं अमऽवत् यत् उक्थ्यं अकृण्वतः भियसा रोहणं दिवः ॥

यत् मानुषऽप्रधनाः इंद्रं ऊतयः स्वः नृऽसाचः मरुतः अमदन् अनु ॥ ९ ॥

ज्यावेळी मनुष्यांनी भितीने तुझे जोरदार, आपोआप आल्हाद उत्पन्न करणारे, दीर्घ, व स्वर्गलोकापर्यंत प्रवेश करणारे, असे तुझे स्तोत्र गाइले, ज्यावेळी मनुष्यांच्या हिताकरितां युद्धास प्रवृत्त होणारे, स्वर्गामध्यें नेहमी शूरांचा सहवास करणारे, व इंद्रास साहयभूत होणारे, अशा मरुतांनी इंद्रास प्रोत्साहन दिले, ॥ ९ ॥

द्यौश्चिदस्यामवाँ अहेः स्वनादयोयवीद्भियसा वज्र इन्द्र ते ॥

वृत्रस्य यद्बद्बधानस्य रोदसी मदे सुतस्य शवसाभिनच्छिरः ॥ १० ॥

द्यौः ह्चित् अस्य अमऽवान् अहेः स्वनात् अयोयवीत् भियसा वज्रः इंद्र ते ॥

वृत्रस्य यत् बद्‌बधानस्य रोदसी इति मदे सुतस्य शवसा अभिनत् शिरः ॥ १० ॥

आणि ज्यावेळी, हे इंद्रा, तुझ्या वज्राने द्‌युलोक आणि भूलोक ह्या दोहोंसही पीडा उत्पन्न करणाऱ्या वृत्राचे शिर सोमरसाच्या आनंददायक स्फुरणांत तुझ्या वज्राने आपल्या सामर्थ्याने छेदून टाकले, त्यावेळी भयामुळें, बलिष्ठ असा स्वर्गलोकसुद्धां, त्या अहीच्या गर्जनेने थरथर कांपू लागला. ॥ १० ॥

यदिन्न्वै॑न्द्र पृथि॒वी दश॑भुजि॒रहा॑नि॒ विश्वा॑ त॒तन॑न्त कृ॒ष्टयः॑ ॥

अत्राह॑ ते मघव॒न्विश्रु॑तं॒ सहो॒ द्यामनु॒ शव॑सा ब॒र्हणा॑ भुवत् ॥ ११ ॥

यत् इत् नु इंद्र पृथिवी दशऽभुजिः अहानि विश्वा ततनंत कृष्टयः ॥

अत्र अह ते मघऽवन् विऽश्रुतं सहः द्यां अनु शवसा बर्हणा भुवत् ॥ ११ ॥

हे इंद्रा, जर खरोखर पृथिवी दसपट वाढेल आणि मनुष्याचें आयुष्य चिरकाल टिकणारे होईल, तरच हे उदार देवा, तुझे विख्यात सामर्थ्य, शक्ति आणि पराक्रम ह्या बाबतींत, द्‌युलोकांत मावूं लागेल. ॥ ११ ॥

त्वमस्य पारे रजसो व्योमनः स्वभूत्योजा अवसे धृषन्मनः ॥

चकृषे भूमिं प्रतिमानमोजसोऽपः स्वःपरिभूरेष्या दिवम् ॥ १२ ॥

त्वं अस्य पारे रजसः विऽओमनः स्वभूतिऽओजाः अवसे धृषत्ऽमनः ॥

चकृषे भूमिं प्रतिऽमानं ओजसः अपः स्वः इति स्वः परिऽभूः एषि आ दिवम् ॥ १२ ॥

मनांत अतिशय उत्साह बाळगणाऱ्या हे इंद्रा, स्वसंरक्षण करण्यास स्वतःच्या पराक्रमानेंच समर्थ असणारा जो तूं त्याने रजोलोकाच्या व आकाशाच्या पलीकडे राहून या पृथिवीस आपले सामर्थ्य मोजण्याचें मापच बनविलेले आहे. तूं उदक व प्रकाश यांस व्यापून द्युलोकांतही प्रवेश करतोस. ॥ १२ ॥

त्वं भुवः प्रतिमानं पृथिव्या ऋष्ववीरस्य बृहतः पतिर्भूः ॥

विश्वमाप्रा अन्तरिक्षं महित्वा सत्यमद्धा नकिरन्यस्त्वावान् ॥ १३ ॥

त्वं भुवः प्रतिऽमानं पृथिव्याः ऋष्वऽवीरस्य बृहतः पतिः भूः ॥

विश्वं आ अप्रा अंतरिक्षं महिऽत्वा सत्यं अद्धा नकिः अन्यः त्वाऽवान् ॥ १३ ॥

तूं ह्या पृथिवीस मापून टाकले आहेस व ज्यांत अत्युच्च योग्यतेचे शूर पुरुष आहेत अशा विशाल स्वर्गलोकाचा तू स्वामी होऊन बसला आहेस. तूं आपल्या समर्थ्यानें सर्व अंतरिक्ष व्यापून टाकले आहेस. खरोखर तुझ्यासारखा ह्या जगांत दुसरा कोणीही नाही. ॥ १३ ॥

न यस्य॒ द्यावा॑पृथि॒वी अनु॒ व्यचो॒ न सिन्ध॑वो॒ रज॑सो॒ अन्त॑मान॒शुः ॥

नोत स्ववृ॑ष्टिं॒ मदे॑ अस्य॒ युध्य॑त॒ एको॑ अ॒न्यच्च॑कृषे॒ विश्व॑मानु॒षक् ॥ १४ ॥

न यस्य द्यावापृथिवी इति अनु व्यचः न सिंधवः रजसः अंतं आनशुः ॥

न उत स्वऽवृष्टिं मदे अस्य युध्यत एकः अन्यत् चकृषे विश्वं आनुषक् ॥ १४ ॥

ज्याच्या व्यापकपणाची सर द्युलोक अथवा भूलोक ह्या दोहोंसही आलेली नाही व ज्याचा अंत अंतरिक्षांतल्या नद्यांसही लागला नाही, त्याचप्रमाणे सोमरसाच्या आनंदाचे भरांत, उदकांस प्रतिबंध करणाऱ्या वृत्राशी युद्ध करीत

असतांही (ज्याचे पूर्ण ज्ञान कोणासही झाले नाही), अशा तूं एकट्यानें आत्मव्यतिरिक्त सर्व जगतास, स्वतःस वश करून ठेवलें आहेस. ॥ १४ ॥

आर्च॒न्नत्र॑ म॒रुत॒ः सस्मि॑न्ना॒जौ विश्वे॑ दे॒वासो॑ अमद॒न्ननु॑ त्वा ॥

वृ॒त्रस्य॒ यद्भृ॑ष्टि॒मता॑ व॒धेन॒ नि त्वमि॑न्द्र॒ प्रत्या॒नं ज॒घन्थ॑ ॥ १५ ॥

आर्चन् अत्र मरुतः सस्मिन् आजौ विश्वे देवासः अमदन् अनु त्वा ॥

वृत्रस्य यत् भृष्टिऽमता वधेन नि त्वं इंद्र प्रति आनं जघंथ ॥ १५ ॥

ज्यावेळी आपल्या तीक्ष्ण शस्त्रानें हे इंद्रा, तूं वृत्राच्या मुखावर वार केलास त्यावेळी त्या युद्धप्रसंगी मरुतांनी तुझे पूजन केले व सर्व देवांनी तुला प्रोत्साहन दिले. ॥ १५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ५३ (इंद्र सूक्त)

ऋषि - सव्य अंगिरस : देवता - इंद्र : छंद - जगती; त्रिष्टुभ्

न्यू॒ षु वा॒चं प्र म॒हे भ॑रामहे॒ गिर॒ इन्द्रा॑य॒ सद॑ने वि॒वस्व॑तः ॥

नू चि॒द्धि रत्नं॑ सस॒ताम॒िवावि॑दु॒न्न दु॑ष्टु॒तिर्द्र॑विणो॒दे॑षु शस्यते ॥ १ ॥

नि ऊं इति सु वाचं प्र महे भरामहे गिरः इंद्राय सदने विवस्वतः ॥

नु चित् हि रत्नं ससतांऽइव अविदत् न दुःऽस्तुतिः द्रविणःऽदेषु शस्यते ॥ १ ॥

ह्या श्रेष्ठ इंद्रास उद्देशून आम्ही स्तोत्र गाण्यास बसलो. विवस्वानाचे सदनांत आम्ही त्यास स्तुति अर्पण करतो. निजल्या निजल्या ज्याप्रमाणे एखाद्यास कोणी द्रव्य आणून द्यावे, त्याप्रमाणें त्याने आम्हांस संपत्ति अर्पण केली आहे. अशा धनदात्याची कोणी कधीही वाईट स्तुति करीत नसतात. ॥ १ ॥

दु॒रो अश्व॑स्य दु॒र इ॑न्द्र॒ गोर॑सि दु॒रो यव॑स्य॒ वसु॑न इ॒नस्पतिः॑ ॥

शिक्षानरः प्रदिवो अकामकर्शनः सखा सखिभ्यस्तमिदं गृणीमसि ॥ २ ॥

दुरः अश्वस्य दुरः इंद्र गोः असि दुरः यवस्य वसुनः इनः पतिः ॥

शिक्षाऽनरः प्रऽदिवः अकामऽकर्शनः सखा सखिऽभ्यः तं इदं गृणीमसि ॥ २ ॥

तूं अश्व देणारा, धेनु देणारा व धान्य देणारा असून सर्व संपत्तीचा स्वामी व प्रभु आहेस. पुरातन कालापासून तू मानवांचा मार्गदर्शक आहेस. तूं कोणाच्याही आशेचा कधींही भंग केलेला नाहींस. तू आपल्या मित्रांचा जिवलग मित्र आहेस. तू असा थोर असल्याकारणानें आम्ही तुझ्या सन्मानार्थ हे स्तोत्र गातो. ॥ २ ॥

शचीव इन्द्र पुरुकृद्द्युमत्तम तवेदिदमभितश्चेकिते वसु ॥

अतः संगृभ्याभिभूत आ भर मा त्वायतो जरितुः काममूनयीः ॥ ३ ॥

शचीऽवः इंद्र पुरुऽकृत् द्युमत्ऽतम तव इत् इदं अभितः चेकिते वसु ॥

अतः संऽगृभ्य अभिऽभूत आ भर मा त्वाऽयतः जरितुः कामं ऊनयीः ॥ ३ ॥

हे ज्ञानसामर्थ्ययुक्त इंद्रा, हे अनेक महत्कृत्यें करणाऱ्या व अत्यंत दीप्तिशाली देवा, जे हे वैभव सभोंवार प्रकाशमान होत आहे, ते तुझे आहे. ह्यासाठी, शत्रूस पराभूत करणाऱ्या हे इंद्रा, ते घेऊन आम्हांस आणून दे. तुझी भक्ति करणाऱ्या तुझ्या स्तोत्याचा मनोरथ भग्न होऊं देऊं नकोस. ॥ ३ ॥

एभिर्द्युभिः सुमना एभिरिन्दुभिर्निरुन्धानो अमतिं गोभिरश्विना ॥

इन्द्रेण दस्युं दरयन्त इन्दुभिर्युतद्वेषसः समिषा रभेमहि ॥ ४ ॥

एभिः द्युऽभिः सुऽमना एभिः इंदुऽभिः निऽरुन्धानः अमतिं गोभिः अश्विना ॥

इंद्रेण दस्युं दरयंत इंदुऽभिः युतऽद्वेषसः सं इषा रभेमहि ॥ ४ ॥

ह्या यज्ञांतील अग्निज्वालांनी व ह्या सोमरसाच्या बिंदूंनी मनांत संतुष्ट होऊन तूं धेनु व अश्व ही आम्हांस देऊन आमचे दारिद्र्य नष्ट कर. सोमरस अर्पण करून इंद्रचे हातून दस्युंचा वध करवून घेऊन आम्ही शत्रूंपासून अगदी निर्भय होऊं व धनधान्याने समृद्ध बनूं. ॥ ४ ॥

समिन्द्र राया समिषा रभेमहि सं वाजेभिः पुरुश्चन्द्रैरभिद्युभिः ॥

सं देव्या प्रमत्या वीरशुष्मया गोअग्रयाश्वावत्या रभेमहि ॥ ५ ॥

सं इंद्र राया सं इषा रभेमहि सं वाजेभिः पुरुऽचंद्रैः अभिद्युभिः ॥

सं देव्या प्रऽमत्या वीरऽशुष्मया गोऽअग्रया अश्वऽवत्या रभेमहि ॥ ५ ॥

आम्ही संपत्तीने, धनसंचयाने, व अनेक तऱ्हेने आनंदकारक व तेजस्वीपणाने युक्त अशा सामर्थ्याने सुसमृद्ध होऊं. त्याचप्रमाणे जिच्यामुळें आमच्या पदरच्या शूर पुरुषांचे बल दृष्टीस पडेल व जिच्यांत धेनूंचा लाभ प्रमुख असून अश्वही मिळण्याजोगे आहेत अशा तुझ्या दिव्य कृपेचीही आम्हांस प्राप्ति होईल. ॥ ५ ॥

ते त्वा मदा अमदन्तानि वृष्ण्या ते सोमासो वृत्रहत्येषु सत्पते ॥

यत्कारवे दश वृत्राण्यप्रति बर्हिष्मते नि सहस्राणि बर्हयः ॥ ६ ॥

ते त्वा मदाः अमदन् तानि वृष्ण्या ते सोमासः वृत्रऽहत्येषु सत्ऽपते ॥

यत् कारवे दश वृत्राणि अप्रति बर्हिष्मते नि सहस्राणि बर्हयः ॥ ६ ॥

वृत्रहनप्रसंगी, हे सज्जनांच्या नायका इंद्रा, त्या आनंदकारक पेयांनी, त्या उत्साहवर्धक हवींनी, व त्या सोमरसांनी, तुला खचित नवीन आवेश आला. कारण, त्याचे भरांत तुझ्याकरितां दर्भावर मांडून तुझी कीर्ति गाणाऱ्या भक्तांकरितां, तू कोणाच्या प्रतिरोधाची पर्वा न करतां, दहा वृत्रांना कापून काढलेस. ॥ ६ ॥

युधा युधमुप घेदेषि धृष्णुया पुरा पुरं समिदं हंस्योजसा ॥

नम्या यदिन्द्र सख्या परावति निबर्हयो नमुचिं नाम मायिनम् ॥ ७ ॥

युधा युधं उप घ इत् एषि धृष्णुऽया पुरा पुरं सं इदं हंसि ओजसा ॥

नम्या यत् इंद्र सख्या पराऽवति निऽबर्हयः नमुचिं नाम मायिनम् ॥ ७ ॥

हे इंद्रा, ज्यावेळी तुझा जिवलग भक्त जो नमी त्यास बरोबर घेऊन तू नमुचि नांवाच्या कपटी राक्षसास अत्यंत दूर अशा प्रदेशांत जाऊन कापून काढलेस, तेव्हां रणसंग्रामांत मोठ्या आवेशाने शिरणारा जो तूं त्या तुला युद्धामागून युद्ध करावे लागलें व आपल्या सामर्थ्यानें पुरामागून पुरांचा तूं विध्वंस करीत सुटलास. ॥ ७ ॥

त्वं करञ्जमुत पर्णयं वधीस्तेजिष्ठयातिथिग्वस्य वर्तनी ॥

त्वं शता वङ्गृदस्याभिनत्पुरोऽनानुदः परिषूता ऋजिश्वना ॥ ८ ॥

त्वं करंजं उत पर्णयं वधीः तेजिष्ठया अतिथिऽग्वस्य वर्तनी ॥

त्वं शता वंगृदस्य अभिनत् पुरः अननुऽदः परिऽसूताः ऋजिश्वना ॥ ८ ॥

अतिथिग्वाच्या अत्यंत तेजस्वी चक्राच्या योगाने तूं करंज व पर्णय ह्यांचा वध केलास. ऋजिश्वानानें वेढा दिलेली वृंगदाची शंभर पुरें तूं उध्वस्त करून टाकलीस. तुझ्या दातृत्वास खरोखर कोणाचीच जोड मिळणार नाही. ॥ ८ ॥

त्वमेताञ्जनराज्ञो द्विर्दशाबन्धुना सुश्रवसोपजग्मुषः ॥

षष्टिं सहस्रा नवतिं नव श्रुतो नि चक्रेण रथ्या दुष्पदावृणक् ॥ ९ ॥

त्वं एतान् जनऽराज्ञः द्विः दश अबंधुना सुऽश्रवसा उपऽजग्मुषः ॥

षष्टिं सहस्रा नवतिं नव श्रुतः नि चक्रेण रथ्या दुःऽपदा अवृणक् ॥ ९ ॥

तूं सत्कीर्तीने मंडित आहेस. ज्यावेळीं सुश्रवस ह्याला सहाय्य करण्यास कोणी नाही असे पाहून वीर राजांनी त्याचेवर स्वारी केली त्यावेळी, ज्याचेपुढें कोणाचा टिकाव लागणार नाही असे एक रथचक्र घेऊन तूं त्यांचा व त्याबरोबरच त्यांच्या साठ हजार नव्व्याण्णव लोकांचा उच्छेद करून टाकलास. ॥ ९ ॥

त्वमा॑विथ सु॒श्रव॑सं॒ तवो॒तिभि॒स्तव॒ त्राम॑भिरिन्द्र॒ तूर्व॑याणम् ॥

त्वम॑स्मै॒ कुत्स॑मतिथि॒ग्वमा॒युं म॒हे रा॒ज्ञे यून॑ अरन्धनायः ॥ १० ॥

त्वं आविथ सुऽश्रवसं तव उतिऽभिः तव त्रामऽभिः इंद्र तूर्वयाणम् ॥

त्वं अस्मै कुत्सं अतिथिऽग्वं आयुं महे राज्ञे यूने अरंधनायः ॥ १० ॥

हे इंद्रा, तू आपल्या कृपाछत्रामुळें सुश्रवसाचे संरक्षण केलेंस व आपलें साहाय्य देऊन तुर्वयाणाचा बचाव केलास. तूं ह्या श्रेष्ठ व तरुण नृपतीपुढें कुत्स, अतिथिग्व व आयु ह्यांना शरण यावयास लावलेंस. ॥ १० ॥

य उ॒दृचीन्द्र॒ दे॒वगो॑पाः॒ सखा॑यस्ते शि॒वत॑मा॒ असा॑म ॥

त्वां स्तोषाम त्वया सुवीरा द्राघीय आयुः प्रतरं दधानाः ॥ ११ ॥

य उत्ऽऋचि इंद्र देवऽगोपाः सखायः ते शिवऽतमा असाम ॥

त्वां स्तोषाम त्वया सुवीराः द्राघीयः आयुः प्रऽतरं दधानाः ॥ ११ ॥

सर्व देवांच्या संरक्षणाखाली असलेल्या आम्हांस तुझे जिवलग भक्त होऊन इतरही सौख्यांतच असूं दे. अत्यंत दीर्घ व चिरकालिक आयुष्याचा उपभोग घेत तुझ्या कृपेनें प्राप्त झालेल्या आमच्या पदरच्या शूर माणसांसह तुझें स्तवन करीत आम्हांस बसूं दे. ॥ ११ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ५४ (इंद्र सूक्त)

ऋषि - सव्य अंगिरस : देवता - इंद्र : छंद - जगती; त्रिष्टुभ्

मा नो॑ अ॒स्मिन्म॑घवन्पृ॒त्स्वंह॑सि न॒हि ते॒ अन्त॒ः शव॑सः परी॒णशे॑ ॥

अक्र॑न्दयो न॒द्यो रोरु॑व॒द्वना॑ क॒था न क्षो॒णीर्भि॒यसा॒ समा॑रत ॥ १ ॥

मा नः अस्मिन् मघऽवन् पृत्ऽसु अंहसि नहि ते अंतः शवसः परिऽनशे ॥

अक्रंदयः नद्यः रोरुवत् वना कथा न क्षोणीः भियसा सं आरत ॥ १ ॥

हे उदार देवा, ह्या युद्धांत अशा कठीण प्रसंगी आम्हांस मोकलूं नकोस. खरोखर तुझ्या सामर्थ्याचा अंत लागणें अशक्य आहे. तूं गर्जना केल्याबरोबर नद्या व वृक्ष ह्यांना मोठ्यानें ओरडावयास लाविलेंस. अशा स्थितींत तुझ्या भितीनें मनुष्यें एकत्र कशी जमणार नाहींत बरें ? ॥ १ ॥

अर्चा॑ श॒क्राय॑ शा॒किने॒ शची॑वते शृ॒ण्वन्त॒मिन्द्रं॑ म॒हय॑न्न॒भि ष्टु॑हि ॥

यो धृ॒ष्णु॒ना॒ शव॑सा॒ रोद॑सी उ॒भे वृषा॑ वृ॒ष॒त्वा वृ॑ष॒भो न्यृ॒ञ्जते॑ ॥ २ ॥

अर्च शक्राय शाकिने शचीऽवते शृण्वंतं इंद्रं महयन् अभि स्तुहि ॥

यः धृष्णुना शवसा रोदसी इति उभे इति वृषा वृषत्वा वृषभः निऽऋञ्जते ॥ २ ॥

सामर्थ्यवान्, पराक्रमी व बलवान इंद्राचे अर्चन करा. भक्तांची हांक ऐकण्यास तयार असलेल्या इंद्राचा गौरव करून त्याचें स्तवन करा. शक्तिसामर्थ्यानें युक्त असा हा इंद्र आपली धाडशी शक्ति व वीर्य ह्याच्या योगानें द्युलोक व भूलोक ह्या दोहोंसही भूषित करतो. ॥ २ ॥

अर्चा दिवे बृहते शूष्यं३ वचः स्वक्षत्रं यस्य धृषतो धृषन्मनः ॥

बृहच्छ्रवा असुरो बर्हणा कृतः पुरो हरिभ्यां वृषभो रथो हि षः ॥ ३ ॥

अर्च दिवे बृहते शूष्यं वचः स्वऽक्षत्रं यस्य धृषतः धृषत् मनः ॥

बृहत्ऽश्रवाः असुरः बर्हणा कृतः पुरः हरिऽभ्यां वृषभः रथः हि सः ॥ ३ ॥

ज्या शूराचे अंतःकरणांत स्वतःच्या सामर्थ्याविषयी विश्वास असून त्याची धाडसाकडे प्रवृत्ति आहे त्या देदीप्यमान व श्रेष्ठ इंद्रास उद्देशून एकादें जोरदार स्तोत्र म्हणा. त्याची कीर्ति विशाल आहे. तो शत्रूंचा नाश करणारा आहे, तो

पराक्रमी आहे, तो हरिद्वर्ण अश्व रथाच्या पुढें जोडीत असतो. तो सामर्थ्यवान् आहे व भक्तांकडे जाणारा तो जणूं काय रथच आहे. ॥ ३ ॥

त्वं दि॒वो बृ॑ह॒तः सानु॑ कोप॒योऽ॑व॒ त्मना॑ धृष॒ता शम्ब॑रं भिनत् ॥

यन्मा॒यिनो॑ व्र॒न्दिनो॑ म॒न्दिना॑ धृ॒षच्छि॒तां गभ॑स्तिम॒शनिं॑ पृत॒न्यसि॑ ॥ ४ ॥

त्वं दिवः बृहतः सानु कोपयः अव त्मना धृषता शंबरं भिनत् ॥

यत् मायिनः व्रंदिनः मंदिना धृषत् शितां गभस्तिं अशनिं पृतन्यसि ॥ ४ ॥

ज्यावेळी हातांत बळकट धरलेल्या तीक्ष्ण अशा वज्रानें, तूं तुला आनंद देणाऱ्या सोमरसाच्या योगानें स्फुरण चढल्यामुळें, कपटी राक्षसांच्या चमूशी युद्ध केलेंस त्यावेळी विस्तीर्ण द्युलोकाचें शिखरही तूं हालवावयास लावलेंस व आपल्या जोराच्या प्रहारानें शंबराचें शरीर विदीर्ण केलेंस. ॥ ४ ॥

नि यद्वृ॒णक्षि॑ श्वस॒नस्य॑ मू॒र्धनि॒ शुष्ण॑स्य चिद्व्र॒न्दिनो॒ रोरु॑व॒द्वना॑ ॥

प्रा॒चीने॑न॒ मन॑सा ब॒र्हणा॑वता॒ यद॒द्या चि॑त्कृ॒णव॒ः कस्त्वा॒ परि॑ ॥ ५ ॥

नि यत् वृणक्षि श्वसनस्य मूर्धनि शुष्णस्य चित् व्रंदिनः रोरुवत् वना ॥

प्राचीनेन मनसा बर्हणाऽवता यत् अद्य चित् कृणवः कः त्वा परि ॥ ५ ॥

ज्याअर्थी वृक्षांना रुदन करावयास लावून शुष्णाच्याही सैन्यास तूं वायूच्या शिखरावर नेऊन कापून काढलेंस आणि ज्या अर्थी आपल्या उत्साही मनाची प्रवृत्ति अशाच पराक्रमाकडे ठेवून अजून सुद्धां तूं असे पराक्रम गाजवीत असतोस त्या अर्थी तुझ्यापेक्षा श्रेष्ठ कोण आहे ? ॥ ५ ॥

त्वमा॑विथ॒ नर्यं॑ तु॒र्वशं॒ यदु॒ं त्वं तु॒र्वीतिं॑ व॒य्यं शतक्रतो ॥

त्वं रथ॒मेत॑शं॒ कृत्व्ये॒ धने॒ त्वं पुरो॑ नव॒तिं द॑म्भयो॒ नव॑ ॥ ६ ॥

त्वं आविथ नर्यं तुर्वशं यदुं त्वं तुर्वीतिं वय्यं शतक्रतो इति शतऽक्रतो ॥

त्वं रथं एतशं कृत्व्ये धने त्वं पुरः नवतिं दंभयः नव ॥ ६ ॥

तूं नर्य, तुर्वश व यदु ह्यांचे रक्षण केलेस. हे सामर्थ्यवान् इंद्रा तूं वय्य तुर्वीतीचेंही रक्षण केलेंस. संग्रामाचा प्रसंग प्राप्त झाला असतां तूं रथ आणि एतश ह्यांचे रक्षण केलेंस आणि शत्रूंची नव्व्याण्णव पुरें फोडून टाकलीस. ॥ ६ ॥

स घा राजा सत्पतिः शूशुवज्जनौ रातहव्यः प्रति यः शासमिन्वति ॥

उक्था वा यो अभिगृणाति राधसा दानुरस्मा उपरा पिन्वते दिवः ॥ ७ ॥

सः घ राजा सत्ऽपतिः शूशुवत् जनः रातऽहव्यः प्रति यः शासं इन्वति ॥

उक्था वा यः अभिऽगृणाति राधसा दानुः अस्मै उपरा पिन्वते दिवः ॥ ७ ॥

इंद्रास हवि अर्पण करून जो त्याच्या अनुशासनाप्रमाणे चालतो तो सज्जनांतील प्रमुख मनुष्य, राजा होऊन, अभिवृद्धीस पावतो. अथवा जो संतोषदायक हवि अर्पण करून त्यास उद्देशून स्तोत्रें म्हणतो, त्याचेसाठी वरून द्युलोकांतून, विपुल धनाची वृष्टि होते. ॥ ७ ॥

असमं क्षत्रमसमा मनीषा प्रसोमपा अपसा सन्तु नेमे ॥

ये ते इन्द्र ददुषो वर्धयन्ति महि क्षत्रं स्थविरं वृष्ण्यं च ॥ ८ ॥

असमं क्षत्रं असमा मनीषा प्र सोमऽपाः अपसा संतु नेमे ॥

ये ते इंद्र ददुषः वर्धयंति महि क्षत्रं स्थविरं वृष्ण्यं च ॥ ८ ॥

तुझ्या बलास सीमा नाही, तुझ्या बुद्धिमत्तेसही सीमा नाही. जे सोमपान करणारे तुझे उपासक, दानकर्मांत प्रवीण अशा तुझ्या श्रेष्ठ सामर्थ्याची व विशाल शक्तीची थोरवी गातात, ते आपल्या सत्कृत्यांनी अभिवृद्धीला पोंहोचोत. ॥ ८ ॥

तुभ्येदेते बहुला अद्रिदुग्धाश्चमूषदश्चमसा इन्द्रपानाः ॥

व्यश्नुहि तर्पया काममेषामथा मनो वसुदेयाय कृष्व ॥ ९ ॥

तुभ्य इत् एते बहुलाः अद्रिऽदुग्धाः चमूसदः चमसाः इंद्रऽपानाः ॥

वि अश्नुहि तर्पय कामं एषां अथ मनः वसुऽदेयाय कृष्व ॥ ९ ॥

पाषाणाच्या केलेल्या उलूखलांत घालून पिळलेले, पात्रांत भरून ठेवलेले व इंद्रा तूं प्राशन करावेंस ह्याच हेतूनें तयार केलेले हे सोमरसाचे अनेक चमस तुझ्याचकरितां ठेवलेले आहेत. तूं त्यांचे प्राशन कर. ह्यांच्या संबंधाने तुझी जेवढी वांछा असेल तेवढी तृप्त करून घे, आणि आम्हांस संपत्ति देण्याकडे आपल्या मनाची प्रवृत्ति कर. ॥ ९ ॥

अ॒पाम॑तिष्ठद्ध॒रुण॑ह्वरं॒ तमो॑ऽ॒न्तर्वृ॒त्रस्य॑ ज॒ठरे॑षु॒ पर्व॑तः ॥

अ॒भीमिन्द्रो॑ न॒द्यो॑ व॒व्रिणा॑ हि॒ता विश्वा॑ अ॒नु॒ष्ठाः प्र॑व॒णेषु॑ जिघ्नते ॥ १० ॥

अपां अतिष्ठत् धरुणऽह्वरं तमः अन्तः वृत्रस्य जठरेषु पर्वतः ॥

अभि ईं इंद्रः नद्यः वव्रिणा हिताः विश्वाः अनुस्थाः प्रवणेषु जिघ्नते ॥ १० ॥

अंधकार उदकांच्या प्रवाहास बंद करून बसलेला होता, आणि पर्वतही वृत्राच्या जठरांत होता. पण इंद्राने त्या जलांस प्रतिबंध करणाऱ्या राक्षसानें अडविलेल्या नद्यांस, त्या सर्वांनी सखल प्रदेशांतून एकीप्रमाणें दुसरीनें वहावें ह्या उद्देशानें वाट फोडून दिली. ॥ १० ॥

स शेवृ॑धमधि॑ धा द्यु॒म्नम॒स्मे महि॑ क्ष॒त्रं जना॒षाळि॑न्द्र॒ तव्य॑म् ॥

रक्षा॑ च नो म॒घोनः॑ पा॒हि सू॒रीन्रा॒ये च॑ नः स्वप॒त्या इ॒षे धाः॑ ॥ ११ ॥

सः शेऽवृधं अधि धाः द्युम्नं अस्मे इति महि क्षत्रं जनाषाट् इंद्र तव्यम् ॥

रक्ष च नः मघोनः पाहि सूरीन् राये च नः सुऽअपत्यै इषे धाः ॥ ११ ॥

तर आतां आम्हांस हे इंद्रा, आमचे सौख्यवर्धन होईल असें वैभव अर्पण कर, आणि लोकांपेक्षां वरचढ असें विपुल शौर्य व बलही आम्हांस दे. हे औदार्यशाली देवा, आमचे रक्षण व आमच्या पदरच्या विद्वान् लोकांचेंही परिपालन कर आणि आम्हांस असे वैभव व समृद्धि दे कीं जिच्यांत उत्तम संततीचाही समावेश होईल. ॥ ११ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ५५ (इंद्र सूक्त)

ऋषि - सव्य अंगिरस : देवता - इंद्र : छंद - जगती

दि॒वश्चि॑दस्य वरि॒मा वि प॑प्रथ॒ इन्द्रं॒ न म॒ह्ना पृ॑थि॒वी च॒न प्रति॑ ॥

भी॒मस्तु॒वि॑ष्मा॑ञ्चर्ष॒णिभ्य॑ आत॒पः शिशी॑ते॒ वज्रं॒ तेज॑से॒ न वंस॑गः ॥ १ ॥

दिवः चित् अस्य वरिमा वि पप्रथे इंद्रं न मह्ना पृथिवी चन प्रति ॥

भीमः तुविष्मान् चर्षणिऽभ्य आऽतपः शिशीते वज्रं तेजसे न वंसगः ॥ १ ॥

ह्याचा श्रेष्ठपणा द्युलोकाहूनही जास्त आहे. पृथिवीसुद्धां आपल्या मोठेपणांत इंद्राची बरोबरी करूं शकणार नाहीं. हा शत्रूंस भितीप्रद, सामर्थ्यवान, व मानवांकरितां आपला प्रताप गाजविणारा असून, एखादा वृषभ आपल्या शिंगांस तीक्ष्णता आणण्याकरितां ती जशी पाजळतो त्याप्रमाणें आपलें वज्र जास्त तीक्ष्ण व्हावें म्हणून तो त्याची धारा तिखट करतो. ॥ १ ॥

सो अ॑र्ण॒वो न न॒द्यः॑ समु॒द्रियः॒ प्रति॑ गृभ्णाति॒ विश्रि॑ता॒ वरी॑मभिः ॥

इन्द्रः॒ सोम॑स्य पी॒तये॑ वृषायते स॒नात्स यु॒ध्म ओज॑सा पनस्यते ॥ २ ॥

सः अर्णवः न नद्यः समुद्रियः प्रति गृभ्णाति विऽश्रिताः वरीमऽभिः ॥

इंद्रः सोमस्य पीतये वृषऽयते सनात् सः युध्मः ओजसा पनस्यते ॥ २ ॥

समुद्रामध्यें निवास करून, एखाद्या महासागराप्रमाणें, त्याच्या आश्रयार्थ येणाऱ्या सर्व नद्यांचा, तो आपल्या श्रेष्ठ सामर्थ्याच्या योगाने स्वीकार करतो, आपणास सोमाचे प्राशन घडावें म्हणून एखाद्या वृषभाप्रमाणें तो आपली शक्ति प्रदर्शित करतो. त्याच्या अलौकिक बलामुळें हा योद्धा सनातन कालापासून स्तवनास पात्र झालेला आहे. ॥ २ ॥

त्वं तमिन्द्र पर्वतं न भोजसे महो नृम्णस्य धर्मणामिरज्यसि ॥

प्र वीर्येण देवताति चेकिते विश्वस्मा उग्रः कर्मणे पुरोहितः ॥ ३ ॥

त्वं तं इंद्र पर्वतं न भोजसे महः नृम्णस्य धर्मणां इरज्यसि ॥

प्र वीर्येण देवता अति चेकिते विश्वस्मै उग्रः कर्मणे पुरःऽहितः ॥ ३ ॥

हे इंद्रा, त्या पर्वतास जणूं काय ग्रासून टाकण्याकरितांच तूं अतिशय पौरुष आणि पराक्रम स्वतःकरितां प्राप्त करून घेतोस. सर्व अद्‌भुत कृत्यांत हा उग्र इंद्र पुढाकार घेत असून आपल्या सामर्थ्यांत सर्व देवतांस तो मागे टाकतो. ॥ ३ ॥

स इद्वने॑ नम॒स्युभि॑र्वचस्यते॒ चारु॒ जने॑षु प्रब्रुवा॒ण इ॑न्द्रि॒यम् ॥

वृषा॒ छन्दु॑र्भवति हर्य॒तो वृषा॒ क्षेमे॑ण॒ धेनां॑म् म॒घवा॒ यदिन्व॑ति ॥ ४ ॥

सः इत् वने नमस्युऽभिः वचस्यते चारु जनेषु प्रऽब्रुवाण इंद्रियम् ॥

वृषा छंदुः भवति हर्यतः वृषा क्षेमेण धेनां मघऽवा यत् इन्वति ॥ ४ ॥

सर्व लोकांमध्ये आपल्या कल्याणप्रद सामर्थ्याची प्रसिद्धि करणाऱ्या या एकट्या इंद्राचीच नमस्कृतिपूर्वक स्तुति होत असते. ज्यावेळी हवि अर्पण करणारा भक्त स्वकल्याणाच्या इच्छेनें इंद्राच्या स्तुतीस प्रवृत्र होतो, त्यावेळी हा पराक्रमी इंद्र त्याचेवर संतुष्ट होतो, त्याचेपुढें तो आपलें रमणीयत्व प्रकट करतो. ॥ ४ ॥

स इन्म॒हानि॑ समि॒थानि॑ म॒ज्मना॑ कृ॒णोति॑ यु॒ध्म ओज॑सा॒ जने॑भ्यः ॥

अधा॑ च॒न श्रद्द॑धति॒ त्विषी॑मत॒ इन्द्रा॑य॒ वज्रं॑ नि॒घनि॑घ्नते व॒धम् ॥ ५ ॥

सः इन् महानि संऽइथानि मज्मना कृणोति युध्मः ओजसा जनेभ्यः ॥

अध चन श्रत् दधति त्विषीऽमते इंद्राय वज्रं निऽघनिघ्नते वधम् ॥ ५ ॥

हाच योद्धा आपलें बल व सामर्थ्य ह्यांचे योगानें जनहिताकरितां मोठेमोठी युद्धे करतो, आणि म्हणूनच ह्या तेजस्वी व घातुक वज्रानें शत्रूंवर पुनःपुनः प्रहार करणाऱ्या इंद्रावर सर्वलोक श्रद्धा ठेवतात. ॥ ५ ॥

स हि श्र॑व॒स्युः सद॑नानि कृ॒त्रिमा॑ क्ष्म॒या वृ॑धा॒न ओज॑सा विना॒शय॑न् ॥

ज्योतीं॑षि कृ॒ण्वन्न॑वृ॒काणि॒ यज्य॒वेऽ॑व सु॒क्रतुः॒ सर्त॒वा अ॒पः सृ॑जत् ॥ ६ ॥

सः हि श्रवस्युः सदनानि कृत्रिमा क्ष्मया वृधानः ओजसा विऽनाशयन् ॥

ज्योतींषि कृण्वन् अवृकाणि यज्यवे अव सुऽक्रतुः सर्तवै अपः सृजत् ॥ ६ ॥

खरोखर कीर्तीची इच्छा असलेल्या ह्या सामर्थ्यवान् इंद्रानें, पृथिवीप्रमाणें विशाल रूप धारण करून, आपल्या पराक्रमानें शत्रूंनी बांधलेल्या सदनांचा विध्वंस करून आणि यजन करणाऱ्या भक्तांकरितां आकाशस्थ ज्योतींना त्रासापासून विमुक्त करून, जलांचे प्रवाह पुन्हां वाहूं लागावे म्हणून त्यांस बंधमुक्त केले. ॥ ६ ॥

दा॒नाय॒ मनः॑ सोमपावन्नस्तु तेऽ॒र्वाञ्चा॒ हरी॑ वन्दनश्रु॒दा कृ॑धि ॥

यमि॑ष्ठासः॒ सार॑थयो॒ य इ॑न्द्र ते॒ न त्वा॒ केता॒ आ द॑भ्नुवन्ति॒ भूर्ण॑यः ॥ ७ ॥

दानाय मनः सोमऽपावन् अस्तु ते अर्वांचा हरी इति वंदनऽश्रुत् आ कृधि ॥

यमिष्ठासः सारथयः ये इंद्र ते न त्वा केताः आ दभ्नुवंति भूर्णयः ॥ ७ ॥

हे सोमप्राशन करणाऱ्या इंद्रा, तुझें मन आम्हांविषयी दातृत्वबुद्धि धारण करो आणि आमच्या नम्र स्तुति ऐकणाऱ्या हे देवा, तूं आपले पीतवर्ण अश्व आमच्याकडे वळव. इंद्रा, तुझे सारथी तुझ्या अश्वांस ताब्यांत ठेवण्यांत अत्यंत कुशल आहेत, आणि म्हणून तुझे अश्व कितीही चपल असोत, ते तुला भलतीकडे कधीच घेऊन जात नाहीत. ॥ ७ ॥

अप्रक्षितं वसु बिभर्षि हस्तयोरषाळ्हं सहस्तन्वि श्रुतो दधे ॥

आवृतासोऽवतासो न कर्तृभिस्तनूषु ते क्रतव इन्द्र भूरयः ॥ ८ ॥

अप्रऽक्षितं वसु बिभर्षि हस्तयोः अषाळ्हं सहः तन्वि श्रुतः दधे ॥

आऽवृतासः अवतासः न कर्तृऽभिः तनूषु ते क्रतवः इंद्र भूरयः ॥ ८ ॥

हे इंद्रा, तूं विख्यात आहेस, ज्यास कधीं विनाश नाही असें वैभव तूं आपले हातांत वागवितोस. तूं शत्रूंस वरचढ करण्यास कठीण असे सामर्थ्य आपले अंगी धारण केले आहेस. कर्तृत्ववान् पुरुष ज्याचे सभोंवती उभे आहेत अशा विहिरीप्रमाणे शोभणाऱ्या तुझ्या अनेक शक्ति, हे इंद्रा ! तुझ्या शरीरांत वास करून आहेत. ॥ ८ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ५६ (इंद्र सूक्त)

ऋषि - सव्य अंगिरस : देवता - इंद्र : छंद - जगती

एष प्र पूर्वीरव तस्य चम्रिषोऽत्यो न योषामुदयंस्त भुर्वणिः ॥

दक्षं महे पाययते हिरण्ययं रथमावृत्या हरियोगमृभ्वसम् ॥ १ ॥

एष प्र पूर्वीः अव तस्य चम्रिषः अत्यः न योषां उत् अयंस्त भुर्वणिः ॥

दक्षं महे पाययते हिरण्ययं रथं आऽवृत्य हरिऽयोगं ऋभ्वसम् ॥ १ ॥

ज्याप्रमाणे एखादा तुरग आपल्या तुरगीकरितां उत्सुक असतो, त्याप्रमाणे चमसांत भरपूर भरून ठेवलेला सोमरस पिण्यास हा उतावीळपणे उद्युक्त झाला आहे. ज्यास पीतवर्ण अश्व जोडलेले आहेत असा आपला मोठा रथ इकडे फिरवून हा इंद्र महत्कार्यास अत्यवश्यक असा सामर्थ्यदायक सोमरस प्राशन करतो. ॥ १ ॥

तं गूर्तयो नेमन्निषः परीणसः समुद्रं न संचरणे सनिष्यवः ॥

पतिं दक्षस्य विदथस्य नू सहो गिरिं न वेना अधि रोह तेजसा ॥ २ ॥

तं गूर्तयः नेमन्ऽइषः परीणसः समुद्रं न संऽचरणे सनिष्यवः ॥

पतिं दक्षस्य विदथस्य नु सहः गिरिं न वनाः अधि रोह तेजसा ॥ २ ॥

ज्याप्रमाणे प्रवासास निघण्याचेवेळी धनार्जनेच्छु धाडसी लोकांची समुद्रावर गर्दी होते, त्याप्रमाणे हवि सिद्ध करून तयार असलेल्या स्तोत्रजनांची ह्याचे सभोंवती गर्दी जमते. यज्ञाचे केवळ बलच असा जो हा सामर्थ्याधिपति सूर्य त्यास हे देवा, ज्याप्रमाणे ह्या सुंदर युवति (म्ह. उषा) पर्वतावर आरूढ झालेल्या आहेत त्याप्रमाणे, पर्वतावर संस्थापित कर. ॥ २ ॥

स तु॒र्वणि॑र्म॒हाँ अ॑रे॒णु पौंस्ये॑ गि॒रेर्भृ॒ष्टिर्न भ्रा॑जते तु॒जा शवः॑ ॥

येन॒ शुष्णं᳚ मा॒यिन॑माय॒सो मदे॑ दु॒ध्र आ॒भूषु॑ रा॒मय॒न्नि दाम॑नि ॥ ३ ॥

सः तुर्वणिः महान् अरेणु पौंस्ये गिरेः भृष्टिः न भ्राजते तुजा शवः ॥

येन शुष्णं मायिनं आयसः मदे दुध्रः आभूषु रमयन् नि दामनि ॥ ३ ॥

तो शत्रूंचा नाश करणारा व श्रेष्ठ आहे. त्याचे अत्यंत शुद्ध बल आपल्या सामर्थ्याने प्रत्येक युद्धांत गिरिशिखराप्रमाणे चमकत असतें. ह्या बलाच्या योगानें ह्या अजिंक्य देवानें सोमरसामुळें उत्पन्न झालेल्या आनंदाच्या भरांत आपले लोखंडी वज्र घेऊन, कपटी शुष्णाचा पराभव केला व त्यास शृंखलाबद्ध करून कारागृहांत कोंडून टाकलें. ॥ ३ ॥

दे॒वी यदि॒ तवि॑षी॒ त्वावृ॑धो॒तय॒ इन्द्रं॒ सिष॑क्त्यु॒षसं॒ न सूर्यः॑ ॥

यो धृ॒ष्णुना॒ शव॑सा॒ बाध॑ते॒ तम॒ इय॑र्ति रे॒णुं बृ॒हद॑र्हरि॒ष्वणिः॑ ॥ ४ ॥

देवी यदि तविषी त्वाऽवृधा ऊतये इंद्रं सिसक्ति उषसं न सूर्यः ॥

यः धृष्णुना शवसा बाधते तम इयर्ति रेणुं बृहत् अर्हरिऽस्वनिः ॥ ४ ॥

ज्यावेळी तूंच लहानपणापासून वाढविलेली शक्तिरूपी देवता, ज्याप्रमाणे सूर्य उषेवर आसक्त होतो त्याप्रमाणें, स्वसंरक्षणार्थ इंद्राचा आश्रय करते त्यावेळी आपल्या प्रतापी सामर्थ्यानें अंधकाराचा नाश करणारा हा देव जयघोष करीत सर्व मलिनतेस दूर घालवून देतो. ॥ ४ ॥

वि यत्तिरो धरुणमच्युतं रजोऽतिष्ठिपो दिव आतासु बर्हणा ॥

स्वर्मीळ्हे यन्मदं इन्द्र हर्ष्याहन्वृत्रं निरपामौब्जो अर्णवम् ॥ ५ ॥

वि यत् तिरः धरुणं अच्युतं रजः अतिस्थिपः दिवः आतासु बर्हणा ॥

स्वः मीळ्हे यत् मद इंद्र हर्ष्या अहन् वृत्रं निः अपां औब्जः अर्णवम् ॥ ५ ॥

जेव्हां तूं आपल्या सामर्थ्याने द्युलोकाच्या सीमेवर रजोलोकाची दृढपणें व सुस्थिरपणें संस्थापना केलीस व जेव्हां सोमरसामुळे उत्पन्न झालेल्या हर्षाच्या भरांत तूं मोठ्या आवेशाने वृत्राचा युद्धांत वध केलास तेव्हां उदकाचा संचय तुझे हातून बंधमुक्त झाला. इंद्रा, तूं श्रेष्ठ आहेस, तूं पृथिवीच्या प्रदेशांत आपल्या सामर्थ्यानें आकाशाच्या बालकास घेऊन येतोस. सोमरसामुळें उत्पन्न झालेल्या हर्षाचे भरांत तूं उदकांना वाट फोडून दिलीस व वृत्राच्या दगडी तटांचा उच्छेद करून टाकलास. ॥ ५ ॥

त्वं दिवो धरुणं धिष ओजसा पृथिव्या इन्द्र सदनेषु माहिनः ॥

त्वं सुतस्य मदे अरिणा अपो वि वृत्रस्य समया पाष्यारुजः ॥ ६ ॥

त्वं दिवः धरुणं धिषे ओजसा पृथिव्याः इंद्र सदनेषु माहिनः ॥

त्वं सुतस्य मदे अरिणाः अपः वि वृत्रस्य समया पाष्या अरुजः ॥ ६ ॥

द्युलोकातील जलराशी स्वपराक्रमाने पृथ्वीवर आणणाऱ्या हे इंद्रा, सोमरसाच्या आवेशात वृत्राच्या पाषाणमय दुर्गांचा भेद करून त्यामध्ये कोंडलेल्या जलराशी तू विमुक्त केल्यास. ॥ ६ ॥

ऋग्वेद - ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ५७ (इंद्र सूक्त)

ऋषि - सव्य अंगिरस : देवता - इंद्र : छंद - जगती

प्र मंहिष्ठाय बृहते बृहद्रये सत्यशुष्माय तवसे मतिं भरे ॥

अपामिव प्रवणे यस्य दुर्धरं राधो विश्वायु शवसे अपावृतम् ॥ १ ॥

प्र मंहिष्ठाय बृहते बृहत्ऽरये सत्यऽशुष्माय तवसे मतिं भरे ॥

अपांऽइव प्रवणे यस्य दुःधरं राधः विश्वऽआयु शवसे अपऽवृतम् ॥ १ ॥

अत्यंत उदार, श्रेष्ठ, अत्यंत वैभवशाली, सत्य, सामर्थ्यवान् व पराक्रमाचा पुतळाच अशा ह्या देवा प्रित्यर्थ मी स्तुति अर्पण करतो. ज्याप्रमाणे उतार जमीनीवर पाण्याचा झोत सुरू झाला म्हणजे तो कोणत्याही प्रतिबंधास न जुमानतां सर्वत्र पसरतो त्याप्रमाणे सर्वत्र दृगोचर होणाऱ्या व अखंड सुरू असणाऱ्या कृपाप्रसादाची कपाटें भक्तांचे अंगी सामर्थ्य आणण्याकरितां सदैव खुली असतात. ॥ १ ॥

अध॑ ते॒ विश्व॒मनु॑ हासदि॒ष्टय॒ आपो॑ नि॒म्नेव॒ सव॑ना ह॒विष्म॑तः ॥

यत्पर्व॑ते॒ न स॒मशी॑त हर्य॒त इन्द्र॑स्य॒ वज्रः॒ श्नथि॑ता हिर॒ण्ययः॑ ॥ २ ॥

अध ते विश्वं अनु ह असत् इष्टये आपः निम्नाऽइव सवना हविष्मतः ॥

यत् पर्वते न संऽअशीत हर्यतः इंद्रस्य वज्रः श्नथिता हिरण्ययः ॥ २ ॥

ज्यावेळीं सुवर्णमय, सुंदर परंतु प्राणघातक वज्र पर्वतावर फेंकल्याप्रमाणे वृत्राच्या शरीरावर जाऊन पडलें त्यावेळी सर्व विश्व तुझें पूजन करण्यास प्रवृत्त झालें व सखल जमीनीकडे पाण्याचा ओघ जसा भराभर वहात जातो त्याप्रमाणें भक्तांचे हवि तुझ्याकडे एकसारखे येऊं लागले. ॥ २ ॥

अ॒स्मै भी॒माय॒ नम॑सा॒ सम॑ध्व॒र उषो॒ न शु॑भ्र॒ आ भ॑रा॒ पनी॑यसे ॥

यस्य॒ धाम॒ श्रव॑से॒ नामे॑न्द्रि॒यं ज्योति॒रका॑रि ह॒रितो॒ नाय॑से ॥ ३ ॥

अस्मै भीमाय नमसा सं अध्वरे उषः न शुभ्रे आ भर पनीयसे ॥

यस्य धाम श्रवसे नाम इंद्रियं ज्योतिः आकारि हरितः न अयसे ॥ ३ ॥

ज्याचे तेज, ज्याचें नाम, ज्याचें बल व ज्याचा प्रकाश यांची चोहोंकडे प्रशंसा व्हावी म्हणून तूं त्यांना सर्वत्र प्रसृत होण्याकरितां, त्या इंद्राच्या पीतवर्ण अश्वांप्रमाणेंच प्रवृत्र केलेंस. त्या भितीप्रद पण स्तुतिस्तोत्रें गाण्यास योग्य अशा इंद्रास, उषेप्रमाणें कांतिमान दिसणारी हे युवति, हया यज्ञांत नमस्कृति अर्पण करून घेऊन ये. ॥ ३ ॥

इ॒मे त॑ इन्द्र॒ ते व॒यं पु॑रुष्टुत॒ ये त्वा॒रभ्य॒ चरा॑मसि प्रभूवसो ॥

नहि त्वदन्यो गिर्वणो गिरः सघत्क्षोणीरिव प्रति नो हर्य तद्वचः ॥ ४ ॥

इमे ते इंद्र ते वयं पुरुऽस्तुत ये त्वा आऽरभ्य चरामसि प्रभूवसो इति प्रभुऽवसो ॥

नहि त्वत् अन्यः गिर्वणः गिरः सघत् क्षोणीःऽइव प्रति नः हर्य तत् वचः ॥ ४ ॥

अनेकांनी ज्याची स्तुति केली अशा हे वैभवशाली इंद्रा, आम्ही सर्वस्वी तुझें आहोत. कारण तुझा आश्रय धरून आम्ही ह्या जगांत नांदत असतो. हे स्तुतिप्रिय देवा, तुझ्या वांचून अन्य कोणासही स्तुति प्राप्त होत नाहींत. ह्यासाठी ज्याप्रमाणे पृथ्वी ही जीवनमात्रास जागा देते तद्वत् तूंही आमच्या स्तोत्रांचा स्वीकार कर. ॥ ४ ॥

भूरि त इन्द्र वीर्यं१ ं तव स्मस्यस्य स्तोतुर्मघवन्काममा पृण ॥

अनु ते द्यौर्बृहती वीर्यम् मम इयं च ते पृथिवी नेम ओजसे ॥ ५ ॥

भूरि ते इंद्र वीर्यं तव स्मसि अस्य स्तोतुः मघऽवन् कामं आ पृण ॥

अनु ते द्यौः बृहती वीर्यं ममे इयं च ते पृथिवी नेमे ओजसे ॥ ५ ॥

हे इंद्रा ! तुझे बल विपुल आहे. आम्ही तुझे आहोंत. तूं ह्या आपल्या भक्ताची इच्छा पुरव. या विशाल द्युलोकानें आपलें सामर्थ्यशी तोलून पाहिले आहे व ही पृथ्वीही तुझ्या पराक्रमापुढें नम्र झाली आहे. ॥ ५ ॥

त्वं तमि॑न्द्र॒ पर्व॑तं म॒हामु॒रुं वज्रे॑ण वज्रिन्पर्व॒शश्च॑कर्तिथ ॥

अवा॑सृजो॒ निवृ॑ता॒ः सर्त॒वा अ॒पः स॒त्रा विश्वं᳚ दधिषे॒ केव॑लं॒ सहः॑ ॥ ६ ॥

त्वं तं इंद्र पर्वतं महां उरुं वज्रेण वज्रिन् पर्वऽशः चकर्तिथ ॥

अव असृजः निऽवृताः सर्तवै अपः सत्रा विश्वं दधिषे केवलं सहः ॥ ६ ॥

हे वज्रधारी इंद्रा, त्या मोठ्या व विशाल पर्वताचे तूं आपल्या वज्रानें तुकडे तुकडे केलेस. रोखून टाकलेले जलप्रवाह पुन्हां चालू व्हावे म्हणूनही तूंच त्यास मार्ग करून दिलास. खरोखर सर्व सामर्थ्य काय तें तूंच एकटा धारण करतोस. ॥ ६ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ५८ (अग्नि सूक्त)

ऋषि - नोधस् गौतम : देवता - अग्नि : छंद - जगती; त्रिष्टुभ्

नू चि॑त्सहो॒जा अ॒मृतो॒ नि तु॑न्दते॒ होता॒ यद्दू॒तो अभ॑वद्वि॒वस्व॑तः ॥

वि साधि॑ष्ठेभिः प॒थिभी॒ रजो॑ मम॒ आ दे॒वता॑ता ह॒विषा॑ विवासति ॥ १ ॥

नु चित् सहःऽजाः अमृतः नि तुंदते होता यत् दूतः अभवत् विवस्वतः ॥

वि साधिष्ठेभिः पथिऽभिः रजः ममे आ देवऽताता हविषा विवासति ॥ १ ॥

हा देवांस हवि पोंचविणारा अग्नि विवस्वानाचा दूत झालेला आहे. म्हणूनच हा सामर्थ्यापासून जन्म पावणारा अमर्त्य देव कधींही श्रांत होत नाही. तो उत्तम मार्गांनी रजोलोकाचे आक्रमण करतो व यज्ञांत देवांस हवि अर्पण करून त्यांचे आदरातिथ्य करतो. ॥ १ ॥

आ स्वमद्म॑ यु॒वमा॑नो अ॒जर॑स्तृ॒ष्ववि॒ष्यन्न॑त॒सेषु॑ तिष्ठति ॥

अत्यो॒ न पृ॒ष्ठं प्रु॑षि॒तस्य॑ रोचते दि॒वो न सानु॑ स्त॒नय॑न्नचिक्रदत् ॥ २ ॥

आ स्वं अद्म युवमानः अजरः तृषु अविष्यन् अतसेषु तिष्ठति ॥

अत्यः नः पृष्ठं प्रुषितस्य रोचते दिवः न सानु स्तनयन् अचिक्रदत् ॥ २ ॥

ज्यास जरेची भिती नाही असा हा अग्निदेव आपल्या अन्नाचा सत्वर व आतुरतेनें स्वीकार करून काष्टामध्यें प्रज्वलित होऊन राहतो. त्यास घृत अर्पण केले म्हणजे ह्याचा पृष्ठभाग एखाद्या ताज्यातवान्या अश्वाप्रमाणे तुकतुकीत दिसतो. ह्यानें जणूं कांही स्वर्गाच्याही टोंकापर्यंत उत्पन्न करीत गर्जना केली आहे. ॥ २ ॥

क्रा॒णा रु॒द्रेभि॒र्वसु॑भिः पु॒रोहि॑तो॒ होता॒ निष॑त्तो रयि॒षाळम॑र्त्यः ॥

रथो॒ न वि॒क्ष्वृञ्जसा॒न आ॒युषु॒ व्यानु॒षग्वार्या॑ दे॒व ऋ॑ण्वति ॥ ३ ॥

क्राणाः रुद्रेभिः वसुभिः पुरःऽहितः होता निःऽसत्तः रयिषाट् अमर्त्यः ॥

रथः न विक्षु ऋञ्जसानः आयुषु वि आनुषक् वार्या देव ऋण्वति ॥ ३ ॥

जो कर्तृत्वशील आहे, रुद्र आणि वसु ह्यांनी ज्यास प्रमुखत्व दिले आहे, ज्याने वैभव जिंकून आणले आहे व ज्यास मृत्युभय नाही असा हा हविर्दाता अग्नि येथें येऊन विराजमान झाला आहे. हा देव ह्या जगांत असणाऱ्या सर्व मनुष्यांत प्रतिष्ठा पावून एखाद्या रथाप्रमाणे एकसारखी संपत्ति घेऊन येत असतो. ॥ ३ ॥

वि वातजूतो अतसेषु तिष्ठते वृथा जुहूभिः सृण्या तुविष्वणिः ॥

तृषु यदग्ने वनिनो वृषायसे कृष्णं त एम रुशदूर्मे अजर ॥ ४ ॥

वि वातऽजूतः अतसेषु तिष्ठते वृथा जुहूभिः सृण्या तुविऽस्वनिः ॥

तृषु यत् अग्ने वनिनः वृषऽयसे कृष्णं ते एम रुशत्ऽदूर्मे अजर ॥ ४ ॥

वायूनें प्रेरित होतांच हा मोठीं गर्जना करून आपली जिव्हारूप कोयती बरोबर घेऊन काष्ठसमुदायांत सहज रीतीनें ठाणे देतो. ज्वलज्वालांनी परिवेष्टित व वार्धक्यपीडेपासून निर्मुक्त असणाऱ्या हे अग्निदेवा, जेव्हां तूं काष्ठसमुदायांत आपलें सामर्थ्य एकदम प्रकट करतोस त्यावेळी तुझा मार्ग धुरानें काळा होऊन जातो. ॥ ४ ॥

तपुर्जम्भो वन आ वातचोदितो यूथे न साह्वाँ अव वाति वंसगः ॥

अ॒भि॒व्र॒ज॒न्नक्षि॑तं॒ पाज॑सा॒ रज॑ स्था॒तु॒श्च॒रथं॑ भयते पत॒त्रिणः॑ ॥ ५ ॥

तपुःजंभः वने आ वातऽचोदितः यूथे न सह्वान् अव वाति वंसगः ॥

अभिऽव्रजन् अक्षितं पाजसा रजः स्थातुः चरथं भयते पतत्रिणः ॥ ५ ॥

ज्याची दंष्ट्रा ज्वालामय आहे असा हा अग्नि वायूनें प्रेरित होऊन जेव्हां काष्ठसमुदायांत शिरतो त्यावेळी, एखादा शक्तिमान वृषभ जसा आपल्या कळपांत निर्भय संचार करतो, तसा हा संचार करूं लागतो. जेव्हां अविनाशी अशा रजोलोकांतून आपल्या सामर्थ्याने हा गमन करतो, त्यावेळी सर्व चराचर सृष्टीस ह्या पक्षिराजाचें भय वाटूं लागतें. ॥ ५ ॥

द॒धुष्ट्वा॒ भृग॑वो॒ मानु॑षे॒ष्वा र॒यिं न चारुं॑ सु॒हवं॒ जने॑भ्यः ॥

होता॑रमग्ने॒ अति॑थिं॒ वरे॑ण्यं मि॒त्रं न शेवं॑ दि॒व्याय॒ जन्म॑ने ॥ ६ ॥

दधुः त्वा भृगवः मानुषेषु आ रयिं न चारुं सुऽहवं जनेभ्यः ॥

होतारं अग्ने अतिथिं वरेण्यं मित्रं न शेवं दिव्याय जन्मने ॥ ६ ॥

संपत्तीप्रमाणें मोहक असणारा, सर्व लोकांस हांक मारण्यास सुलभ वाटणारा, व दिव्य लोकांतील पुरुषांना मित्राप्रमाणें सौख्यदायक असणारा असा हा जो श्रेष्ठ हविर्दाता, तो तूं हे अग्निदेवा जेव्हां भृगूंचा अतिथि झालास तेव्हां त्यांनी तुला मानवसमुदायांत सन्मानाने जागा दिली. ॥ ६ ॥

होता॑रं स॒प्त जु॒ह्वो३यजि॑ष्ठं॒ यं वा॒घतौ॑ वृ॒णते॑ अध्व॒रेषु॑ ॥

अ॒ग्निं विश्वे॑षामर॒तिं वसू॑नां सप॒र्यामि॒ प्रय॑सा॒ यामि॒ रत्न॑म् ॥ ७ ॥

होतारं सप्त जुह्वः यजिष्ठं यं वाघतः वृणते अध्वरेषु ॥

अग्निं विश्वेषां अरतिं वसूनां सपर्यामि प्रयसा यामि रत्नम् ॥ ७ ॥

भक्तांस सर्व संपत्ति अर्पण करणाऱ्या अग्नीचें मी हवींनी पूजन करतो व त्यामुळें मला उत्कृष्ट संपत्तिही प्राप्त होते. हा अग्नि देवांस हवि पोंचविणारा असल्यामुळें ह्या यज्ञार्ह अग्नीचें यज्ञांत आगमन व्हावें अशी हवि अर्पण करणारे सप्त ऋत्विज नेहमी इच्छा करीत असतात. ॥ ७ ॥

अच्छिद्रा सूनो सहसो नो अद्य स्तोतृभ्यो मित्रमहः शर्म यच्छ ॥

अग्ने गृणन्तमंहस उरुष्योर्जो नपात्पूर्भिरायसीभिः ॥ ८ ॥

अच्छिद्रा सूनो इति सहसः नः अद्य स्तोतृऽभ्यः मित्रऽमहः शर्म यच्छ ॥

अग्ने गृणंतं अंहसः उरुष्य ऊर्जः नपात् पूःऽर्भिः आयसीभिः ॥ ८ ॥

सामर्थ्यापासून जन्म पावणाऱ्या व स्वमित्रांस आनंद देणाऱ्या हे अग्निदेवा ! तुझें स्तवन करणाऱ्या भक्तांस तूं आज अक्षय्य सुख प्राप्त करून दे. हे शक्तिपुत्र अग्ने, तुझी स्तुति गाणाऱ्या सेवकांस लोखंडी तटांची नगरें बांधून देऊन तूं त्यांचे संकटांपासून संरक्षण कर. ॥ ८ ॥

भवा वरूथं गृणते विभावो भवा मघवन्मघवद्भ्यः शर्म ॥

उरुष्याग्ने अंहसो गृणन्तं प्रातर्मक्षू धियावसुर्जगम्यात् ॥ ९ ॥

भव वरूथं गृणते विभाऽवः भवा मघऽवन् मघवत्ऽभ्यः शर्म ॥

उरुष्य अग्ने अंहसः गृणंतं प्रातः मक्षू धियाऽवसुः जगम्यात् ॥ ९ ॥

हे दीप्तिमान अग्निदेवा, तुझी स्तुति करणाऱ्या भक्ताचें तूं कवच हो. हे उदार देवा जे तुला हवि अर्पण करतात त्यांस तूं प्रत्यक्ष कल्याणस्वरूपच हो. तूं आपल्या स्तोतृजनांचें संकटापासून संरक्षण करीतच असतोस, तेव्हां असंख्य स्तुति स्तोत्रांनी मंडित असा अग्निदेव प्रातःकाळी लवकरच आमच्या यज्ञाकडे येवो. ॥ ९ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ५९ (अग्नि सूक्त)

ऋषि - नोधस् गौतम : देवता - वैश्वानर अग्नि : छंद - त्रिष्टुभ्

वया इदग्ने अग्नयस्ते अन्ये त्वे विश्वे अमृता मादयन्ते ॥

वैश्वानर नाभिरसि क्षितीनां स्थूणेव जनाँ उपमिद्ययन्थ ॥ १ ॥

वया इत् अग्ने अग्नयः ते अन्ये त्वेइति विश्वे अमृताः मादयंते ॥

वैश्वानर नाभिः असि क्षितीनां स्थूणाऽइव जनान् उपऽमित् ययंथ ॥ १ ॥

हे अग्निदेवा, इतर सर्व अग्नि ह्या तुझ्या शाखा आहेत. सर्व अमर देव तुझ्याच ठिकाणी अत्यंत संतोष पावतात. सर्व विश्वाविषयी मित्रत्व धारण करणाऱ्या हे अग्निदेवा, तूं सर्व पृथ्वीचा मध्यबिंदु आहेस. ॥ १ ॥

मू॒र्धा दि॒वो नाभि॑र॒ग्निः पृ॑थि॒व्या अथा॑भवदर॒ती रोद॑स्योः ॥

तं त्वा॑ दे॒वासो॑ऽजनयन्त दे॒वं वैश्वा॑नर॒ ज्योति॒रिदार्या॑य ॥ २ ॥

मूर्धा दिवः नाभिः अग्निः पृथिव्याः अथ अभवत् अरतीः रोदस्योः ॥

तं त्वा देवासः अजनयंत देवं वैश्वानर ज्योतिः इत् आर्याय ॥ २ ॥

अग्नि हा द्युलोकाचें मस्तक व पृथिवीची नाभि आहे. शिवाय द्युलोक व भूलोक ह्यांचा अधिपति झाला आहे. सर्व विश्वाविषयी मित्रत्व धारण करणाऱ्या हे अग्निदेवा, तूं असा श्रेष्ठ देव असल्यामुळें तू आर्यजनांची मार्गदर्शक अशी ज्योतिच व्हावेंस ह्या हेतूनें तुला देवांनी निर्माण केलें. ॥ २ ॥

आ सूर्ये॒ न र॒श्मयो॑ ध्रु॒वासो॑ वैश्वान॒रे द॑धिरेऽ॒ग्ना वसू॑नि ॥

या पर्व॑ते॒ष्वोष॑धीष्व॒प्सु या मानु॑षे॒ष्वसि॒ तस्य॒ राजा॑ ॥ ३ ॥

आ सूर्ये न रश्मयः ध्रुवासः वैश्वानरे दधिरे अग्ना वसूनि ॥

या पर्वतेषु ओषधीषु अप्ऽसु या मानुषेषु असि तस्य राजा ॥ ३ ॥

ज्याप्रमाणे सूर्याचे ठिकाणी रश्मींचा निरंतर वास असतो त्याप्रमाणे सर्व विश्वाविषयी मित्रत्व धारण करणाऱ्या ह्या अग्नीचे ठिकणी सर्व वैभवें संस्थापित झालेलीं आहेत. ज्या द्रव्यनिधींचा, पर्वत, वनस्पति अथवा मर्त्यलोक ह्यांचे ठिकाणी निवास असतो त्या सर्वांचा तूंच एकटा राजा आहेस. ॥ ३ ॥

बृ॒ह॒ती इ॑व सू॒नवे॒ रोद॑सी॒ गिरो॒ होता॑ मनु॒ष्यो३॑ न दक्षः॑ ॥

स्वर्वते सुत्यशुष्माय पूर्वीर्वैश्वानुराय नृतमाय यह्वीः ॥ ४ ॥

बृहती इवेति बृहतीऽइव सूनवे रोदसी इति गिरः होता मनुष्यः न दक्षः ॥

स्वःऽवते सत्यऽशुष्माय पूर्वीः वैश्वानराय नृऽतमाय यह्वीः ॥ ४ ॥

जणूं कांही ह्या उदार अग्निप्रित्यर्थच द्युलोक व भूलोक इतके विस्तीर्ण झालेले आहेत. ह्या प्रकाशमान, सत्यबलानें युक्त, सर्व विश्वाविषयी मित्रभाव धारण करणाऱ्या व सर्व शूरांमध्यें श्रेष्ठ अशा अग्निदेवास हा उपासक प्रज्ञावान पुरुषाप्रमाणे मोठीं मोठीं अशी असंख्य स्तोत्रें अर्पण करीत आहे. ॥ ४ ॥

दिवश्चित्ते बृहतो जातवेदो वैश्वानर प्र रिरिचे महित्वम् ॥

राजा कृष्टीनामसि मानुषीणां युधा देवेभ्यो वरिवश्चकर्थ ॥ ५ ॥

दिवः चित् ते बृहतः जातऽवेदः वैश्वानर प्र रिरिचे महिऽत्वम् ॥

राजा कृष्टीनां असि मानुषीणां युधा देवेभ्यः वरिवः चकर्थ ॥ ५ ॥

सर्व विश्वाविषयी मित्रत्व धारण करणाऱ्या हे सर्वज्ञ अग्निदेवा, तुझा महिमा ह्या विस्तीर्ण द्युलोकासही पुरून उरला आहे. तूं सर्व मानवसमुदायाचा राजा आहेस. राक्षसांशी युद्ध करून तूं देवांना सुरक्षितपणा उत्पन्न केलास. ॥ ५ ॥

प्र नू म॑हि॒त्वं वृ॑ष॒भस्य॑ वोचं॒ यं पू॒रवो॑ वृत्र॒हणं॒ सच॑न्ते ॥

वै॒श्वा॒न॒रो दस्यु॑म॒ग्निर्ज॑घ॒न्वाँ अधू॑नो॒त्काष्ठा॒ अव॒ शम्ब॑रं भेत् ॥ ६ ॥

प्र नु महिऽत्वं वृषभस्य वोचं यं पूरवः वृत्रऽहनं सचंते ॥

वैश्वानरः दस्युं अग्निः जघन्वान् अधूनोत् काष्ठाः अव शंबरं भेत् ॥ ६ ॥

वृत्राचा वध करणाऱ्या ज्या अग्नीचा आश्रय सर्व लोक शोधतात त्या सामर्थ्यवान् देवाचा महिमा ह्या स्तोत्रांत मी गाइला आहे. सर्व विश्वाविषयी मित्रत्व बाळगणाऱ्या ह्या अग्नीनें दस्यूंचा वध करून उदकांचे मार्गांतील प्रतिबंध नाहींसा केला व शंबरास छिन्नविच्छिन्न करून टाकले. ॥ ६ ॥

वै॒श्वा॒न॒रो म॑हि॒म्ना वि॒श्वकृ॑ष्टिर्भ॒रद्वा॑जेषु यज॒तो वि॒भावा॑ ॥

शा॒त॒व॒ने॒ये श॒तिनी॑भिर॒ग्निः पु॑रुणी॒थे ज॑रते सू॒नृता॑वान् ॥ ७ ॥

वैश्वानरः महिम्ना विश्वऽकृष्टिः भरत्ऽवाजेषु यजतः विभाऽवा ॥

शातऽवनेये शतिनीभिः अग्निः पुरुऽनीथे जरते सूनृताऽवान् ॥ ७ ॥

सर्व विश्वाविषयी मित्रत्व धारण करणारा व आपल्या सामर्थ्याने सर्वत्र वास करणारा असा हा पूज्य व दीप्तिमान् अग्नि भारद्वाज कुलांतील पुरुषांमध्यें येऊन विराजमान झाला आहे. ज्याची वाणी मधुर परंतु सत्यपरिप्लुत आहे अशा अग्नीची शांतवनेय व पुरुणीथ ह्यांच्या यज्ञांत शेंकडो स्तोत्रांनी स्तुति झालेली आहे. ॥ ७ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ६० (अग्नि सूक्त)

ऋषि - नोधस् गौतम : देवता - अग्नि : छंद - त्रिष्टुभ्

वह्निं॑ य॒शसं॑ वि॒दथ॑स्य के॒तुं सु॑प्रा॒व्यं दू॒तं स॒द्योअ॑र्थम् ॥

द्वि॒जन्मा॑नं र॒यिमि॑व प्रश॒स्तं रा॒तिं भ॑र॒द्भृग॑वे मात॒रिश्वा॑ ॥ १ ॥

वह्निं यशसं विदथस्य केतुं सुप्रऽअव्यं दूतं सद्यःऽअर्थम् ॥

द्विऽजन्मानं रयिंऽइव प्रऽशस्तं रातिं भरत् भृगवे मातरिश्वा ॥ १ ॥

जो आमचे हवि देवतांप्रत पोंचविणारा आहे, जो मूर्तिमंत कीर्तिच आहे, यज्ञाची जो केवळ ध्वजाच होय, जो यज्ञगृहात ठेवण्यास अत्यंत योग्य आहे, जो आमचा दूत होऊन देवांकडे त्वरेने गमन करतो, जो दोन वेळां जन्मास येत असतो, उत्कर्षाप्रमाणे जो प्रशंसनीय आहे व जो केवळ वैभवाची मूर्तिच होय अशा त्या अग्नीस मातरिश्वा भृगूकरितां घेऊन आला. ॥ १ ॥

अ॒स्य शासु॑रु॒भया॑सः सचन्ते ह॒विष्म॑न्त उ॒शिजो॒ ये च॒ मर्ताः॑ ॥

दि॒वश्चि॒त्पूर्वो॒ न्यसादि॒ होता॒पृच्छ्यो॑ वि॒श्पति॑र्वि॒क्षु वे॒धाः ॥ २ ॥

अस्य शासुः उभयासः सचंते हविष्मंतः उशिजः ये च मर्ताः ॥

दिवः चित् पूर्वः नि असादि होता आऽपृच्छ्यः विश्पतिः विक्षु वेधाः ॥ २ ॥

हवींचे ग्रहण करण्याविषयी उत्सुक असलेले जे देव व जे मर्त्यलोकांतील मानव आहेत ते अशा रीतीने उभयलोक ह्याची आज्ञा मान्य करीत असतात. सर्व लोकांस जो सन्मानानें सत्कार करण्यास योग्य आहे, जो सर्व मानवांमध्ये त्यांचा राजा होऊन वर्तन करतो व ज्याचे कर्तृत्व विलक्षण आहे असा हा हविर्दाता सूर्योदयापूर्वीच येथें येऊन स्थानापन्न झाला आहे. ॥ २ ॥

तं नव्यसी हृद आ जायमानमस्मत्सुकीर्तिर्मधुजिह्वमश्याः ॥

यं ऋत्विजो वृजने मानुषासः प्रयस्वन्त आयवो जीजनन्त ॥ ३ ॥

तं नव्यसी हृदः आ जायमानं अस्मत् सुऽकीर्तिः मधुऽजिह्वं अश्याः ॥

यं ऋत्विजः वृजने मानुषासः प्रयस्वंतः आयवः जीजनंत ॥ ३ ॥

ज्यास त्याची उपासना करणारे ह्या जगांतील मानव आपले संकटसमयी हवींनी प्रज्वलित करीत आले आहेत त्या भक्तांच्या हृदयांत प्रकट होणाऱ्या व मधुर भाषण करणाऱ्या अग्नीस हें आम्ही मनःपूर्वक गाइलेले नवीन स्तोत्र जाऊन पोहोंचो. ॥ ३॥

उ॒शिक्पा॑व॒को वसु॒र्मानु॑षेषु॒ वरे॑ण्यो॒ होता॑धायि वि॒क्षु ॥

दमू॑ना गृ॒हप॑ति॒र्दम॒ आँ अ॒ग्निर्भु॑वद्रयि॒पती॑ रयी॒णाम् ॥ ४ ॥

उशिक् पावकः वसुः मानुषेषु वरेण्यः होता अधायि विक्षु ॥

दमूनाः गृहऽपतिः दम आ अग्निः भुवत् रयिऽपतिः रयीणाम् ॥ ४ ॥

हवींकरितां उत्सुकता बाळगणारा व सर्व जगास पावन करणारा आणि प्रत्यक्ष वैभवच कीं काय असा जो श्रेष्ठ हविर्दाता अग्नि त्याची येथे मर्त्य अशा मानवांच्या समुदायांत स्थापना करण्यांत आलेली आहे. आपल्या भक्तांच्या गृहांत निवास करणारा व गृहांत गृहाचा अधिपति म्हणून शोभणारा असा जो अग्नि त्याचेकडेच सर्व संपत्तींचे प्रभुत्व आजपर्यंत निर्बाध चालत आलेले आहे. ॥ ४ ॥

तं त्वा॑ व॒यं पति॑मग्ने रयी॒णां प्र शं॑सामो म॒तिभि॒र्गोत॑मासः ॥

आ॒शुं न वा॑जम्भ॒रं म॒र्जय॑न्तः प्रा॒तर्म॒क्षू धि॒याव॑सुर्जगम्यात् ॥ ५ ॥

तं त्वा वयं पतिं अग्ने रयीणां प्र शंसामः मतिःऽभिः गोतमासः ॥

आशुं न वाजंऽभरं मर्जयंतः प्रातः मक्षू धियाऽवसुः जगम्यात् ॥ ५ ॥

हे अग्निदेवा, अश्वाच्या पाठीवरून ज्याप्रमाणे एकादा मोतद्दार हात फिरवितो त्याप्रमाणे सामर्थ्याची प्राप्ति देणाऱ्या तुला वारा घालीत आम्ही गोतम कुलोत्पन्न तुझे भक्त सर्व संपत्तीचा स्वामी जो तू त्या तुझी अनेक स्तोत्रांच्या द्वारें स्तुति करतो. स्तुतिस्तोत्रें हेंच ह्या अग्निदेवाचें वैभव आहे. हा प्रातःकाळी लवकरच येथें प्राप्त होवो. ॥ ५ ॥

ॐ तत् सत्

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ६१ (संपात सूक्त)

ऋषि - नोधस् गौतम : देवता - इंद्र : छंद - त्रिष्टुभ्

अ॒स्मा इदु॒ प्र त॒वसे॑ तु॒राय॒ प्रयो॒ न ह॑र्मि॒ स्तोमं॒ माहि॑नाय ॥

ऋची॑षमा॒याध्रि॑गव॒ ओह॒म् इन्द्रा॑य॒ ब्रह्मा॑णि रा॒तत॑मा ॥ १ ॥

अस्मै इत् ऊं इति प्र तवसे तुराय प्रयः न हर्मि स्तोमं माहिनाय ॥

ऋचीषमाय अध्रिऽगवे ओहं इंद्राय ब्रह्माणि रातऽतमा ॥ १ ॥

प्रबल, त्वरावान् व श्रेष्ठ अशा ह्या इंद्रास उद्देशूनच मी हा हवि व त्याचप्रमाणे हें स्तवन अर्पण करतो. मी त्या स्तवनार्ह आणि निर्बाध रीतीनें संचार करणाऱ्या इंद्रास अनुलक्षून अशा स्तुति गातो कीं जी त्यास अर्पण करण्यास योग्य आहे व अशी स्तोत्रें कीं जी आजपर्यंत त्याचे सन्मानार्थ केलेल्या स्तोत्रांत उत्कृष्ट आहेत. ॥ १ ॥

अ॒स्मा इदु॒ प्रय॑ इव॒ प्र यं॑सि॒ भरा॑म्य् आङ्गू॒षं बाधे॑ सुवृ॒क्ति ॥

इन्द्रा॑य हृ॒दा मन॑सा मनी॒षा प्र॒त्नाय॒ पत्ये॒ धियो॑ मर्जयन्त ॥ २ ॥

अस्मै इत् ऊं इति प्रयःऽइव प्र यंसि भरामि अंगुषं बाधे सुऽवृक्ति ॥

इंद्राय हृदा मनसा मनीषा प्रत्नाय पत्ये धियः मर्जयंत ॥ २ ॥

खरोखर ह्या देवास मी जणूं कांही हविच अर्पण करीत आहे, ह्या शत्रू विनाशक देवास मी एक सुंदर स्तवन अर्पण करतो. इंद्र हा जो ह्या विश्वाचा पुरातन प्रभु त्याचे प्रित्यर्थ विद्वान् उपासकांनी आपले अंतःकरण, मन, बुद्धि खर्च करून अनेक स्तोत्रें गाइलेली आहेत. ॥ २ ॥

अ॒स्मा इदु॒ त्यमु॑प॒मं स्व॒र्षां भरा॑म्याङ्गू॒षमा॒स्येन ॥

मंहिष्ठमच्छोक्तिभिर्मतीनां सुवृक्तिभिः सूरिं वावृधध्यै ॥ ३ ॥

अस्मै इत् ऊं इति त्यं उपऽमं स्वःऽसां भरामि आङ्गूषं आस्येन ॥

मंहिष्ठं अच्छोक्तिऽभिः मतीनां सुवृक्तिऽभिः सूरिं ववृधध्यै ॥ ३ ॥

खरोखर ज्याची उपमा दुसऱ्या स्तोत्रांस देण्यांत यावी व जें प्रकाशाचा लाभ करून देणारें आहे असें स्तोत्र मी त्या इंद्रा प्रित्यर्थ गात आहे. त्या अत्यंत उदार व प्रज्ञाशाली देवाचें माहात्म्य माझ्या मनाजोग्या सुंदर स्तुतींनी वर्णन करण्याचा माझा हेतु आहे. ॥ ३ ॥

अस्मा इदु स्तोमं सं हिनोमि रथं न तष्टेव तत्सिनाय ॥

गिरश्च गिर्वाहसे सुवृक्तीन्द्राय विश्वमिन्वं मेधिराय ॥ ४ ॥

अस्मै इत् ऊं इति स्तोमं सं हिनोमि रथं न तष्टाऽइव तत्ऽसिनाय ॥

गिरः च गिर्वाहसे सुऽवृक्ति इंद्राय विश्वंऽइन्वं मेधिराय ॥ ४ ॥

ज्या मनुष्याला रथाची गरज असते त्याचेकडे ज्याप्रमाणे एखादा सुतार रथ तयार करून पाठवितो त्याप्रमाणे खरोखर ह्या इंद्राकडे मी आपली स्तुति पाठवीत आहे. त्याचप्रमाणे सुंदर सुंदर स्तवनें व ज्याचा सर्वत्र स्वीकार केला जाईल असें एक स्तोत्र ही भक्तांच्या स्तवनांचा स्वीकार करणाऱ्या ह्या इंद्राकडे मी पाठवून देतो. ॥ ४ ॥

अ॒स्मा इदु॒ सप्ति॑मिव श्रव॒स्येन्द्रा॑या॒र्कं जु॒ह्वा३॒॑सम॑ञ्जे ॥

वी॒रं दा॒नौक॑सं व॒न्दध्यै॑ पु॒रां गू॒र्तश्र॑वसं द॒र्माण॑म् ॥ ५ ॥

अस्मै इत् ऊं इति सप्तिंऽइव श्रवस्या इंद्राय अर्कं जुह्वा सं अञ्जे ॥

वीरं दानऽओकसं वंदध्यै पुरां गूर्तऽश्रवसं दर्माणम् ॥ ५ ॥

एखाद्या अश्वास ज्याप्रमाणें सजवून तयार करतात त्याप्रमाणें खरोखर मी कीर्ति प्राप्त करून घेण्याची इच्छा धरून, स्ववाणीनें इंद्राप्रित्यर्थ एक स्तोत्र नीटनेटकें सजवीत आहे. त्या योगानें वीर्यशाली, सर्व दानशूरतेचे आगर, शत्रूंच्या पुरांचा विध्वंस करणारा व ज्याची कीर्ति सर्वत्र गात असतात अशा इंद्रास माझी प्रणीत अर्पण करावी अशी माझी इच्छा आहे. ॥ ५ ॥

अ॒स्मा इदु॒ त्वष्टा॑ तक्ष॒द्वज्रं॒ स्वप॑स्तमं स्व॒र्यं१॑रणा॑य ॥

वृ॒त्रस्य॑ चिद्वि॒दद्येन॒ मर्म॑ तु॒जन्नीशा॑नस्तु॒ज॒ता कि॑ये॒धाः ॥ ६ ॥

अस्मै इत् ऊं इति त्वष्टा तक्षत् वज्रं स्वपऽतमं स्वर्यं रणाय ॥

वृत्रस्य चित् विदत् येन मर्म तुजन् ईशानः तुजता कियेधाः ॥ ६ ॥

शत्रूवर प्रहार करणाऱ्या ज्या वज्राने शत्रूंचा संहार करीत ह्या बलशाली विश्वाधिपतीनें वृत्राच्या मर्माशीच गांठ घातली तें उज्ज्वल व वधकर्मास अत्यंत उपयोगी असें वज्र खरोखर ह्या इंद्राप्रित्यर्थच त्वष्टा देवानें तयार करून दिलें. ॥ ६ ॥

अ॒स्येदु॑ मा॒तुः सव॑नेषु स॒द्यो म॒हः पि॒तुं प॑पि॒वाञ्चार्वन्ना॑ ॥

मु॒षा॒यद्विष्णुः॑ पच॒तं सही॑या॒न्विध्य॑द्वरा॒हं ति॒रो अद्रि॒मस्ता॑ ॥ ७ ॥

अस्य इत् ऊं इति मातुः सवनेषु सद्यः महः पितुं पपिऽवान् चारु अन्ना ॥

मुषायत् विष्णु पचतं सहीयान् विध्यत् वराहं तिरः अद्रिं अस्ता ॥ ७ ॥

खरोखर ह्याच्या मातेनें केलेल्या यागांतच ह्याने एकदम उत्कृष्ट पेय प्राशन केले व हवींचा उत्कृष्ट आस्वाद घेतला. बलवान् विष्णूनेंही ह्याचेकरितां ज्यांची पाकसिद्धि उत्तम झाली होती असे हवि हरण करून आणले. त्यांचे भक्षण करून अस्त्रविद्येंत प्रवीण असलेल्या देवानें, त्या डुकराच्या अंगावर वज्र तिरपें करून फेंकून त्याचा देह छिन्नविच्छिन्न करून टाकला. ॥ ७ ॥

अ॒स्मा इदु॒ ग्नाश्चि॑द्दे॒वप॑त्नी॒रिन्द्रा॑या॒र्कम॑हि॒हत्य॑ ऊवुः ॥

परि॒ द्यावा॑पृथि॒वी ज॑भ्र उ॒र्वी नास्य॒ ते म॑हि॒मान॒ं परि॑ ष्टः ॥ ८ ॥

अस्मै इत् ऊं इति ग्नाः चित् देवऽपत्नीः इंद्राय अर्कं अहिहत्ये ऊवुरित्यूवुः ॥

परि द्यावापृथिवी इति जभ्रे उर्वी इति न अस्य ते इति महिमानं परि स्तइतिस्तः ॥ ८ ॥

अहीचा वध करणाऱ्या ह्या इंद्राप्रित्यर्थच स्त्रियांनीही (खुद्द देवांच्या पत्नींनी) एक सुंदर स्तोत्र गुंफले. विस्तीर्ण असे जे द्‍युलोक व भूलोक ह्यांचे त्याने आकलन केलें आहे. परंतु ह्याचा महिमा आकलन करण्याचें सामर्थ्य मात्र त्यांच्या अंगांत नाही. ॥ ८ ॥

अ॒स्येदे॒व प्र रि॑रिचे महि॒त्वं दि॒वस्पृ॑थि॒व्याः पर्य॒न्तरि॑क्षात् ॥

स्व॒राळिन्द्रो॒ दम॒ आ वि॒श्वगू॑र्तः स्व॒रिरम॑त्रो ववक्षे॒ रणा॑य ॥ ९ ॥

अस्य इत् एव प्र रिरिचे महिऽत्वं दिवः पृथिव्याः परि अंतरिक्षात् ॥

स्वराट् इंद्रः दमे आ विश्वऽगूर्तः सुऽअरिः अमत्रः ववक्षे रणाय ॥ ९ ॥

खरोखर ह्याचा महिमा द्‍युलोक, भूलोक व अंतरिक्ष ह्या सर्वांहूनही अधिक आहे. स्वतेजानें विराजमान होणाऱ्या इंद्राचे घरोघरी स्तवन होत असते. हा समर्थ्यवान् इंद्र शत्रूंशी लढण्याकरितां उच्च घोष करून एकदम वृद्धिंगत झाला होता. ॥ ९ ॥

अ॒स्येदे॒व शव॑सा शु॒षन्तं॒ वि वृ॑श्च॒द्वज्रे॑ण वृ॒त्रमिन्द्रः॑ ॥

गा न व्रा॒णा अ॒वनी॑रमु॒ञ्चद॒भि श्रवो॑ दा॒वने॒ सचे॑ताः ॥ १० ॥

अस्य इत् एव शवसा शुषंतं वि वृश्चत् वज्रेण वृत्रं इंद्रः ॥

गाः न व्राणाः अवनीः अमुञ्चत् अभि श्रवः दावने सऽचेताः ॥ १० ॥

जगताचे शोषण करणाऱ्या वृत्रास इंद्रानें स्वसामर्थ्यानें वज्र घेऊन छिन्नविच्छिन्न करून टाकले. आपल्या कीर्तिचा प्रसार करण्याकरिता दानकर्माकडे मनाची प्रवृत्ति असलेल्या ह्या इंद्रानें धेनूप्रमाणें प्रतिबंधांत पडलेल्या जलप्रवाहांना वाट मोकळी करून दिली. ॥ १० ॥

अ॒स्येदु॑ त्वे॒षसा॑ रन्त॒ सिन्ध॑वः॒ परि॒ यद्वज्रे॑ण सी॒मय॑च्छत् ॥

ई॒शा॒न॒कृद्दा॒शुषे॑ दश॒स्यन्तु॒र्वीत॑ये गा॒धं तु॒र्वणि॑ः कः ॥ ११ ॥

अस्य इत् ऊं इति त्वेषसा रंत सिंधवः परि यत् वज्रेण सीं अयच्छत् ॥

ईशानऽकृत् दाशुषे दशस्यन् तुर्वीतये गाधं तुर्वणिः करितिकः ॥ ११ ॥

ज्यावेळी आपल्या वज्रानें त्या वृत्रास जिंकले त्यावेळी हा त्याच्याच सामर्थ्याचा प्रताप, कीं नद्या आनंदानें बागडूं लागल्या. सर्व विश्वावर अधिपत्य स्थापन करणारा, हवि अर्पण करणाऱ्या भक्ताविषयी दातृत्वबुद्धि धारण करणारा व शत्रूंचा संहार करणारा जो हा इंद्र त्यानेंच तुर्वीतीकरितां पाण्यास उतार पाडला. ॥ ११ ॥

अ॒स्मा इदु॒ प्र भ॑रा॒ तूतु॑जानो वृ॒त्राय॒ वज्र॒मीशा॑नः किये॒धाः ॥

गोर्न पर्व॒ वि र॑दा तिर॒श्चेष्य॒न्नर्णां॑स्य॒पां च॒रध्यै॑ ॥ १२ ॥

अस्मै इत् ऊं इति प्र भर तूतुजानः वृत्राय वज्रं ईशानः कियेधाः ॥

गोः न पर्व वि रद तिरश्चः इष्यन् अर्णांसि अपां चरध्यै ॥ १२ ॥

तूं जगताचा प्रभु व सामर्थ्यवान् आहेस म्हणून ह्या वृत्रावर नेम धरून सत्वर वज्र फेंक. उदकांचे प्रवाह पुन्हां वाहूं लागावे म्हणून त्यांच्यांत गति उत्पन्न करून ह्या वृत्राच्या शरीराच्या सांध्यासांध्यावर वार करून एखाद्या बैलाच्या देहाच्या सांध्याप्रमाणे त्यांचे विदारण करून टाक. ॥ १२ ॥

अ॒स्येदु॒ प्र ब्रू॑हि पू॒र्व्याणि॑ तु॒रस्य॒ कर्मा॑णि॒ नव्य॑ उ॒क्थैः ॥

युधे यदिष्णान आयुधान्यृघायमाणो निरिणाति शत्रून् ॥ १३ ॥

अस्य इत् ऊं इति प्र ब्रूहि पूर्व्याणि तुरस्य कर्माणि नव्यः उक्थैः ॥

युधे यत् इष्णानः आयुधानि ऋघायमाणः निऽरिणाति शत्रून् ॥ १३ ॥

खरोखर वेगाने शत्रूवर तुटून पडणाऱ्या ह्या देवाचे पुरातन कालापासूनचे पराक्रम गाऊं लागा. स्तुतींच्या योगाने शरण जाण्यास हा योग्य आहे, कारण लढाई करण्यासाठीं आपली आयुधें सरसावून व शत्रूंना मारून तो त्यांचा नायनाट करून टाकतो. ॥ १३ ॥

अस्येदु भिया गिरयश्च दृळ्हा द्यावा च भूमा जनुषस्तुजेते ॥

उपो वेनस्य जोगुवान ओणिं सद्यो भुवद्वीर्याय नोधाः ॥ १४ ॥

अस्य इत् ऊं इति भिया गिरयः च दृळ्हाः द्यावा च भूम जनुषः तुजेते इति॥

उपो इति वेनस्य जोगुवानः ओणिं सद्यः भुवत् वीर्याय नोधाः ॥ १४ ॥

खरोखर हा जगांत अवतीर्ण झाल्याबरोबर त्याच्या भितीनें अतिशय स्थिर असे प्रत्यक्ष पर्वत - एव्ढेंच काय पण भूलोक व द्युलोक ह्यांनाही कांपरें भरते. ह्या सुंदर देवाच्या भक्त संरक्षण सामर्थ्याची प्रशंसा करणारा नोधा ह्यास एकाएकी पुष्कळ पराक्रम करतां येऊं लागले. ॥ १४ ॥

अ॒स्मा इदु॒ त्यदनु॑ दाय्येषा॒मेको॒ यद्व॒व्ने भूरे॒रीशा॑नः ॥

प्रैत॑शं॒ सूर्ये॑ पस्पृधा॒नं सौव॑श्व्ये॒सुष्विं॑माव॒दिन्द्रः॑ ॥ १५ ॥

अस्मै इत् ऊं इति त्यत् अनु दायि एषां एकः यत् वव्ने भूरेः ईशानः ॥

प्र एतशं सूर्ये पस्पृधानं सौवश्व्ये सुस्विं आवत् इंद्रः ॥ १५ ॥

खरोखर, विपुल संपत्तिचा एकटाच मालक असा जो इंद्र त्यानें ह्या सकल वस्तूंपैकी जी जी वस्तू आपणास असावी अशी इच्छा केली ती ती त्यास अर्पण होत गेली. अश्वावर चांगला बसणारा कोण ह्याविषयी एतशाची सूर्याबरोबर जेव्हां स्पर्धा लागली तेव्हां एतशा हा इंद्राचा सोमरसाचे उत्तम हवि अर्पण करणारा भक्त असल्यामुळे, त्यानें एतशाचें रक्षण केलें. ॥ १५ ॥

एवा ते हारियोजना सुवृक्तीन्द्र ब्रह्माणि गोतमासो अक्रन् ॥

ऐषु विश्वपेशसं धियंधाः प्रातर्मक्षू धियावसुर्जगम्यात् ॥ १६ ॥

एव ते हारिऽयोजन सुऽवृक्ति इंद्र ब्रह्माणि गोतमासः अक्रन् ॥

आ एषु विश्वपेशसं धियं धाः प्रातः मक्षू धियाऽवसु जगम्यात् ॥ १६ ॥

हे पीतवर्ण अश्वांवर आरोहण करणाऱ्या इंद्रा, ह्याप्रमाणें गोतमांनी ही स्तोत्रें इतक्या सुरेख रीतीनें खरोखर तुझ्याच प्रित्यर्थ केली आहेत. ह्या स्तोत्रांवर तूं सर्व प्रकारानें कृपादृष्टी ठेव. स्तुतिस्तोत्रांच्या वैभवानें परिपूर्ण असा हा इंद्र आमचेकडे प्रातःकाली त्वरेनें आगमन करो. ॥ १६ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ६२ (इंद्र सूक्त)

ऋषि - नोधस् गौतम : देवता - इंद्र : छंद - त्रिष्टुभ्

प्र मन्महे शवसानाय शूषमाङ्गूषं गिर्वणसे अङ्गिरस्वत् ॥

सुवृक्तिभिः स्तुवत ऋग्मियायार्चामार्कं नरे विश्रुताय ॥ १ ॥

प्र मन्महे शवसानाय शूषं आङ्गूषं गिर्वणसे अङ्गिरस्वत् ॥

सुवृक्तिऽभि स्तुवते ऋग्मियाय अर्चाम अर्कं नरे विऽश्रुताय ॥ १ ॥

सामर्थ्यवान् व स्तुतिप्रिय अशा इंद्राकरितां अंगिरसाप्रमाणें, एखादे जोरदार स्तोत्र आम्ही आठवून ठेवीत आहों. स्तुति करणाऱ्या भक्तांस अत्यंत स्तवनीय, व अतिशय कीर्तिमान्, अशा त्या वीराचे सन्मानार्थ, सुंदर शब्दरचना करून, आपण स्तोत्र म्हणूं या. ॥ १ ॥

प्र वो महे महि नमो भरध्वमाङ्गूष्यं शवसानाय साम ॥

येना नः पूर्वे पितरः पदज्ञा अर्चन्तो अङ्गिरसो गा अविन्दन् ॥ २ ॥

प्र वः महे महि नमः भरध्वं आङ्गूष्यं शवसानाय साम ॥

येन नः पूर्वे पितरः पदऽज्ञाः अर्चंतः अङ्गिरसः गाः अविंदन् ॥ २ ॥

दुसऱ्याची पावले ओळखून काढण्यांत तरबेज असणाऱ्या अंगिरस नांवाच्या आमच्या भक्तिमान् अशा प्राचीन पूर्वजांना ज्याच्या कृपेमुळें धेनूंची प्राप्ति करून घेतां आली त्या श्रेष्ठ इंद्रास तुम्ही अत्यंत नम्रतेने वंदन करा, त्या सामर्थ्यवान् इंद्राप्रित्यर्थ तुम्ही स्तुतीनें परिपूर्ण असें एखादें गायन करा. ॥ २ ॥

इन्द्र॒स्याङ्गि॑रसां चे॒ष्टौ वि॒दत्स॒रमा॒ तन॑याय धा॒सिम् ॥

बृह॒स्पति॑र्भि॒नदद्रिं᳚ वि॒दद्गाः समु॒स्रिया॑भिर्वावशन्त॒ नरः॑ ॥ ३ ॥

इंद्रस्य अंगिरसां च इष्टौ विदत् सरमा तनयाय धासिम् ॥

बृहस्पतिः भिनत् अद्रिं विदत् गाः सं उस्रियाभिः वावशंत नरः ॥ ३ ॥

इंद्र आणि अंगिरस ह्यांच्या इच्छेनें सरमेस आपल्या पुत्राकरितां उत्तम पेय मिळाले, बृहस्पतीनें पर्वत फोडला व गाईंची प्राप्ति करून घेतली आणि शूर लोकांनी घेनूंसह आनंदाच्या आरोळ्या ठोकल्या. ॥ ३ ॥

स सु॒ष्टुभा॒ स स्तु॒भा स॒प्त विप्रैः॑ स्व॒रेणाद्रिं॑ स्व॒र्यो३॒॑नव॑ग्वैः ॥

स॒र॒ण्युभिः॑ फलि॒गमि॑न्द्र शक्र व॒लं रवे॑ण दरयो॒ दश॑ग्वैः ॥ ४ ॥

सः सुऽस्तुभा सः स्तुभा सप्त विप्रैः स्वरेण अद्रिं स्वर्यः नवऽग्वैः ॥

सरण्युऽभिः फलिऽगं इंद्र शक्र वलं रवेण दरयः दशऽग्वैः ॥ ४ ॥

तूं तेजस्वी आहेस. तुला सप्त विप्रांनी व अत्यंत चपल अशा नवग्वांनी व दशग्वांनी स्तुतिस्तोत्रें व गीतें गाऊन प्रोत्साहन दिले तेव्हां, हे पराक्रमी इंद्रा तूं पर्वताचा, मेघाचा व वलाचा मोठी गर्जना करून ध्वंस केलास. ॥ ४ ॥

गृ॒णा॒नो अङ्गि॑रोभिर्दस्म॒ वि व॑रु॒षसा॒ सूर्ये॑ण॒ गोभि॒रन्धः॑ ॥

वि भूम्या॑ अप्रथय इन्द्र॒ सानु॑ दि॒वो रज॒ उप॑रमस्तभायः ॥ ५ ॥

गृणानः अंगिरःऽओभिः दस्म वि वः उषसा सूर्येण गोभिः अंधः ॥

वि भूम्याः अप्रथयः इंद्र सानु दिवः रजः उपरं अस्तभायः ॥ ५ ॥

हे सौंदर्यवान् इंद्रदेवा, अंगिरसांनी तुझी स्तुति केली तेव्हां तूं उषा, सूर्य व धेनु ह्यांस घेऊन अंधकाराचा उच्छेद केलास. तूं भूलोकाची मर्यादा विस्तृत केलीस व रजोलोकाचे वर द्युलोकाची संस्थापना केलीस. ॥ ५ ॥

तदु प्रयक्षतममस्य कर्म दुस्मस्य चारुतममस्ति दंसः ॥

उपह्वरे यदुपरा अपिन्वन्मध्वर्णसो नद्य१श्चतस्रः ॥ ६ ॥

तत् ऊं इति प्रयक्षऽतमं अस्य कर्म दस्मस्य चारुऽतमं अस्ति दंसः ॥

उपऽह्वरे यत् उपराः अपिन्वत् मधुऽअर्णसः नद्यः चतस्रः ॥ ६ ॥

ह्या सौंदर्यवान् देवाचे हे कर्म अतिशय सन्मानार्ह आहे - हे त्याचे अद्भुत कृत्य खरोखर अतिशय सुंदर आहे - कीं क्षितिजापाशी त्यानें मधुर जलाच्या चार नद्या वरच्यावरच तुडुंब भरून टाकल्या. ॥ ६ ॥

द्वि॒ता वि व॑व्रे स॒नजा॒ सनी॑ळे अ॒यास्य॒ स्तव॑मानेभिर॒र्कैः ॥

भगो॒ न मेने॑ पर॒मे व्योम॒न्नधा॑रय॒द्रोद॑सी सु॒दंसाः॑ ॥ ७ ॥

द्विता वि वव्रे सनऽजा सनीळे इति सऽनीळे अयास्यः स्तवमानेभिः अर्कैः ॥

भगः न मेन इति परमे विऽओमन् अधारयत् रोदसी इति सुऽदंसाः ॥ ७ ॥

स्तुतींनी परिपूर्ण अशी स्तोत्रें चाललीं असतांना ह्या कधींही श्रांत न होणाऱ्या देवानें प्राचीन काळापासून एकत्र असणारी जोडी फोडून तिचे दोन भाग लेले. अनेक सुंदर व आश्चर्यकारक पराक्रम करणाऱ्या ह्या देवानें भगाप्रमाणे स्वर्गभू व पृथ्वी ह्या दोन युवतींची ह्या विशाल आकाशभागीं स्थापना केली. ॥ ७ ॥

स॒नाद्दिवं॒ परि॒ भूमा॒ विरू॑पे पुन॒र्भुवा॑ युव॒ती स्वेभि॒रेवैः॑ ॥

कृ॒ष्णेभि॑र॒क्तोषा रुश॑द्भि॒र्वपु॑र्भि॒रा च॑रतो अ॒न्यान्या॑ ॥ ८ ॥

सनात् दिवं परि भूम विरूपे इति विऽरूपे पुनःऽभुवा युवती स्वेभिः एवैः ॥

कृष्णेभिः अक्ता उषाः रुशत्ऽभिः वपुःऽभिः आ चरतः अन्याऽअन्या ॥ ८ ॥

सनातन कालापासून रात्र व उषा ह्या रोज जन्मणाऱ्या दोन युवती, कीं ज्यांची रूपें भिन्न आहेत, त्या आपापल्या गमनपद्धनीनें द्युलोक व पृथ्वी ह्यांचे सभोंवार, रात्र कृष्णरूपें धारण करून एकएकटी व उषा उज्ज्वलरूपें धारण करून एकएकटी अशा परिभ्रमण करीत असतात. ॥ ८ ॥

सने॑मि स॒ख्यं स्व॑प॒स्यमा॑नः सू॒नु॒र्दा॑धार॒ शव॑सा सु॒दंसाः॑ ॥

आ॒मासु॑ चिद् दधिषे प॒क्वम् अ॒न्तः पयः॑ कृ॒ष्णासु॑ रु॒शद् रोहि॑णीषु ॥ ९ ॥

सनेमि सख्यं सुऽअपस्यमानः सूनुः दाधार शवसा सुऽदंसाः ॥

आमासु चित् दधिषे पक्वं अंतरिति पयः कृष्णासु रुशत् रोहिणीषु ॥ ९ ॥

सुंदर सुंदर चमत्कार करणारा व अत्यंत उदार अशा ह्या इंद्रानें आपल्या सामर्थ्यानें श्रेष्ठ कृत्यें करीत सर्व विश्वाविषयीं चिरकालिक प्रेमबुद्धि धारण केली आहे. हे इंद्रा, गाईंचा रंग तांबडा असो कीं काळा असो, किंबहुना, त्या जरी अगदी नवीन वेताच्याच असल्या, तरी त्यांचे ठिकाणी तूं तकतकीत पांढरे व मधुर दूध ठेवतोस. ॥ ९ ॥

सनात्सनीळा अवनीरवाता व्रता रक्षन्ते अमृताः सहोभिः ॥

पुरू सहस्रा जनयो न पत्नीर्दुवस्यन्ति स्वसारो अह्रयाणम् ॥ १० ॥

सनात् सऽनीळा अवनीः अवाताः व्रता रक्षंते अमृताः सहःऽभिः ॥

पुरू सहस्रा जनयः न पत्नीः दुवस्यंति स्वसारः अह्रयाणम् ॥ १० ॥

ज्यांची गति एकाच ठिकाणाकडे आहे व ज्यांस प्रत्यवाय अथवा नाश होण्याची भिती नाही अशा नद्या पुरातनकालापासून स्वसामर्थ्यानुरूप ह्या देवाच्या आज्ञांचे परिपालन करीत आहेत. एकाच पुरुषाच्या ज्याप्रमाणें लग्नाच्या हजारों बायका असाव्यात त्याप्रमाणें ह्या बहिणी बहिणी ह्याची एकट्याची सेवा करीत असतात व तो ती मनमोकळें करून घेतो. ॥ १० ॥

सनायुवो नमसा नव्यो अर्कैर्वसूयवो मतयो दस्म दद्रुः ॥

पतिं न पत्नीरुशतीरुशन्तं स्पृशन्ति त्वा शवसावन्मनीषाः ॥ ११ ॥

सनाऽयुवः नमसा नव्यः अर्कैः वसूऽयवः मतयः दस्म दद्रुः ॥

पतिं न पत्नीः उशतीः उशंतं स्पृशंति त्वा शवसाऽवन् मनीषाः ॥ ११ ॥

नमस्कृनींनी व स्तोत्रांनी अर्चन करण्यास तूं योग्य आहेस. हे सौंदर्ययुक्त देवा, धनाची व लाभाची इच्छा धरून, आमच्या मनाची स्फूर्ति तुजकडे धांव घेत असते. हे बलशाली देवा, ज्याप्रमाणें अनुरक्त पत्नी अनुरक्त पतीस आलिंगन देते त्याप्रमाणें आमच्या स्तुति तुला भेटावयास येतात. ॥ ११ ॥

स॒नादे॒व तव॒ रायो॒ गभ॑स्तौ॒ न क्षीय॑न्ते॒ नोप॑ दस्यन्ति दस्म ॥

द्यु॒माँ अ॑सि॒ क्रतु॑माँ इन्द्र॒ धीरः॒ शिक्षा॑ शचीव॒स्तव॑ नः॒ शची॑भिः ॥ १२ ॥

सनात् एव तव रायः गभस्तौ न क्षीयंते न उप दस्यंति दस्म ॥

द्युऽमान् असि क्रतुऽमान् इंद्र धीरः शिक्ष शचीऽवः तव नः शचीभिः ॥ १२ ॥

सनातन कालापासून तुझ्या हातांत संपत्ति आहे. तिचा क्षय अथवा ऱ्हास, हे लावण्यवान देवा, कधीही होत नाहीं. इंद्रा तूं कांतीमान, बुद्धिमान व प्रज्ञावान आहेस. स्वशक्तीच्या योगानें, हे सामर्थ्यवान् देवा, आम्हांस सन्मार्गास लाव. ॥ १२ ॥

स॒ना॒य॒ते गोत॑म इन्द्र॒ नव्यं॒ अत॑क्ष॒द्ब्रह्म॑ हरि॒योज॑नाय ॥

सु॒नी॒थाय॑ नः शवसान नो॒धाः प्रा॒तर्म॒क्षू धि॒याव॑सुर्जगम्यात् ॥ १३ ॥

सनाऽयते गोतमः इंद्र नव्यं अतक्षत् ब्रह्म हरिऽयोजनाय ॥

सुऽनीथाय नः शवसान नोधाः प्रातः मक्षु धियाऽवसुः जगम्यात् ॥ १३ ॥

हे इंद्रा, हा गोतम प्राचीन ऋषींचे अनुकरण करीत आहे. हरिद्वर्ण अश्वांवर आरोहण करणारा जो तूं, त्या तुजकरितां त्यानें नवीन स्तोत्र रचले आहे. हे सामर्थ्यवान् देवा, तूं आमचा सन्मार्गदर्शक आहेस. तुझ्याकरितां नोधा ऋषीने स्तुति केली आहे. अनेक स्तोत्रांनी आळविलेला हा देव प्रातःकाळीच आम्हांकडे सत्वर गमन करो. ॥ १३ ॥

मण्डल १ सूक्त ६३ (इंद्र सूक्त)

ऋषि - नोधस् गौतम : देवता - इंद्र : छंद - त्रिष्टुभ्

त्वं म॒हाँ इ॑न्द्र॒ यो ह॒ शुष्मै॑र्द्यावा॑ जज्ञा॒नः पृ॑थि॒वी अमे॑ धाः ॥

यद्ध॑ ते॒ विश्वा॑ गि॒रय॑श्चि॒दभ्वा॑ भि॒या दृ॒ळ्हासः॑ कि॒रणा॒ नैज॑न् ॥ १ ॥

त्वं महान् इंद्र यः ह शुष्मैः द्यावा जज्ञानः पृथिवी अमे धाः ॥

यत् ह ते विश्वा गिरयः चित् अभ्वा भिया दृळ्हासः किरणाः न ऐजन् ॥ १ ॥

ज्या अर्थी हे इंद्रा, कठीण पर्वत आणी भूमीवर दृढ संस्थापित झालेल्या इतरही सर्व अवाढव्य वस्तु तुझ्या भितीमुळे सूर्याच्या किरणाप्रमाणे लटलट हलूं लागल्या, त्या अर्थी तूं खचित मोठा आहेस - इतका मोठा कीं तूं सर्वज्ञ असून, द्युलोक आणि भूलोक ह्यांनानी स्वसामर्थ्यानें तूं आपल्या धाकांत ठेवलें आहेस. ॥ १ ॥

आ यद्धरी इन्द्र विव्रता वेरा ते वज्रं जरिता बाह्वोर्धात् ॥

येनाविहर्यतक्रतो अमित्रान्पुर इष्णासि पुरुहूत पूर्वीः ॥ २ ॥

आ यत् हरी इति इंद्र विऽव्रता वेः आ ते वज्रं जरिता बाह्वोः धात् ॥

येनाविहर्यतक्रतो इत्यविहर्यतऽक्रतो अमित्रान् पुरः इष्णासि पुरुऽहूत पूर्वीः ॥ २ ॥

जेव्हां हे इंद्रा, अनेक तऱ्हेने तुझा हुकूम मानणारे स्वतःचे अश्व तूं जोडलेस त्यावेळीं तुझें स्तवन करणाऱ्या भक्तानें तुझ्या बाहूंवर वज्र दिलें. स्वतःच्या बुद्धीनें वागणाऱ्या व अनेक भक्तांनी स्वसंरक्षणार्थ पाचारण केलेल्या हे इंद्रा, तेंच वज्र घेऊन तूं शत्रूंचा व त्यांच्या, संपत्तीनें समृद्ध अशा, पुरांचा उच्छेद करतोस. ॥ २ ॥

त्वं सत्य इन्द्र धृष्णुरेतान् त्वं ऋभुक्षा नर्यस्त्वं षाट् ॥

त्वं शुष्णं वृजने पृक्ष आणौ यूने कुत्साय द्युमते सचाहन् ॥ ३ ॥

त्वं सत्यः इंद्र धृष्णुः एतान् त्वं ऋभुक्षाः नर्यः त्वं षाट् ॥

त्वं शुष्णं वृजने पृक्ष आणौ यूने कुत्साय द्युऽमते सचा अहन् ॥ ३ ॥

इंद्रा, तूं सत्यस्वरूप आहेस, तूं ह्या शत्रूंचा उच्छेदक आहेस, तूं ऋभूंचा स्वामी आहेस, तूं मनुष्यांचा कल्याणकर्ता आहेस व तुझ्याशी युद्धास प्रवृत्त होणारास तूं जेरीस आणणारा आहेस. तूं तेजस्वी व तरुण अशा कुत्साचा पक्ष घेऊन संग्रामांत, युद्धांत व लढाईंत सुष्णाचे हनन केलेंस. ॥ ३ ॥

त्वं ह त्यदिन्द्र चोदीः सखा वृत्रं यद्वज्रिन्वृषकर्मन्नुभ्नाः ॥

यद्ध शूर वृषमणः पराचैर्वि दस्यूँर्योनावकृतो वृथाषाट् ॥ ४ ॥

त्वं ह त्यत् इंद्र चोदीः सखा वृत्रं यत् वज्रिन् वृषऽकर्मन् उभ्नाः ॥

यत् ह शूर वृषऽमनः पराचैः वि दस्यून् योनौ अकृतः वृथाषाट् ॥ ४ ॥

वीर्यशाली पुरुषाप्रमाणें मनाची प्रवृत्ति असलेल्या हे शूर इंद्रा, ज्यावेळीं दस्यूंवर सहज विजय गाजवून व त्यांस पळावयास लावून खुद्द त्यांच्या निवासाच्या ठिकाणींच तूं त्यांना खरोखर कापून काढलेंस व ज्यावेळीं, पराक्रमी पुरुषाप्रमाणे कृत्यें करणाऱ्या हे वज्रधर इंद्रा, तूं कुत्साचा स्नेही होऊन वृत्राचा वध केलास, त्यावेळीं त्या कृत्याविषयीं तुझी स्वतःचीच बलवत्तर इच्छा होती. ॥ ४ ॥

त्वं ह॒ त्यदि॒न्द्रारि॑षण्यन्दृ॒ळ्हस्य॑ चि॒न्मर्ता॑ना॒मजु॑ष्टौ ॥

व्य१॒॑स्मदा काष्ठा॒ अर्व॑ते वर्घ॒नेव॑ वज्रि॒ञ्छ्नथिहय॒मित्रा॑न् ॥ ५ ॥

त्वं ह त्यत् इंद्र अरिषण्यन् दृळ्हस्य चिन् मर्तानां अजुष्टौ ॥

वि अस्मत् आ काष्ठाः अर्वते वः घनाऽइव वज्रिन् श्नथिहि अमित्रान् ॥ ५ ॥

मानवांपैकीं जो अत्यंत बलिष्ठ असेल त्याचा जरी तोष झाला तथापि, हे इंद्रा, तूं त्यांत विघ्न येऊं दिलें नाहीस. तूं आमच्या अश्वांकरितां सर्व दिशा मोकळ्या ठेविल्यास. हे बज्रधर इंद्रा, हातांत घण घेऊन मारल्याप्रमाणें शत्रूंचा नाश कर. ॥ ५ ॥

त्वां ह त्यदिन्द्रार्णसातौ स्वर्मीळ्हे नर आजा हवन्ते ॥

तव स्वधाव इयमा समर्य ऊतिर्वाजेष्वतसाय्या भूत् ॥ ६ ॥

त्वां ह त्यत् इंद्र अर्णऽसातौ स्वःऽमीळ्हे नरः आजा हवंते ॥

तव स्वधाऽवः इयं आ समर्ये ऊतिः वाजेषु अतसाय्या भूत् ॥ ६ ॥

समुद्रावर वर्चस्व मिळविण्याच्या अथवा स्वर्गप्राप्ति करून घेण्याच्या इच्छेनें आरंभिलेल्या युद्धांत ह्याच कारणामुळें योद्धेजन तुला खरोखर हांक मारतात. हे अनेक हवींचा उपभोग घेणाऱ्या इंद्रा, समरामध्यें अथवा पराक्रमाच्या कृत्यांत हें तुझेंच साहाय्य आम्हांस सुलभ रीतीनें प्राप्त झालें. ॥ ६ ॥

त्वं ह त्यदिन्द्र सप्त युध्यन्पुरो वज्रिन्पुरुकुत्साय दर्दः ॥

बर्हिर्न यत्सुदासे वृथा वर्गंहो राजन्वरिवः पूरवे कः ॥ ७ ॥

त्वं ह त्यत् इंद्र सप्त युध्यन् पुरः वज्रिन् पुरुऽकुत्साय दर्दरिति दर्दः ॥

बर्हिः न यत् सुऽदासे वृथा वर्क् अंहः राजन् वरिवः पूरवे करितिकः ॥ ७ ॥

हे वज्रधारी इंद्रा, ह्याच कारणास्वत तूं पुरुकुत्साकरितां युद्ध करून सप्त पुरांचा विध्वंस केलास. ज्यवेळी सुदासाकरितां तूं त्याचे शत्रूंस कांही एक श्रम न करतां गवत कापल्याप्रमाणें कापून काढलेंस, त्यावेळीं, हे राजन्, पुरूचा तूं संकटापासून बचाव केलास. ॥ ७ ॥

त्वं त्यां न॑ इन्द्र देव चि॒त्रामि॒षमापो॒ न पी॑पयः॒ परि॑ज्मन् ॥

यया॑ शूर॒ प्रत्य॒स्मभ्यं॒ यंसि॒ त्मन॒मूर्जं॒ न वि॒श्वध॒ क्षर॑ध्यै ॥ ८ ॥

त्वं त्यां नः इंद्र देव चित्रां इषं आपः न पीपयः परिज्मन् ॥

यया शूर प्रति अस्मभ्यं यंसि त्मनं ऊर्जं न विश्वध क्षरध्यै ॥ ८ ॥

हे सर्वसंचारी इंद्रदेवा, तूं आम्हांवर उदकाप्रमाणें त्या तुझ्या अलौकिक कृपादृष्टीचा असा वर्षाव केलास कीं ज्याच्या योगानें, हे शूरा, सर्व ठिकाणीं जणूं काय उदकाप्रमाणें सांडत जाईल अशा रीतीनें तुझेपासून आम्हांस उत्तम सामर्थ्याचा लाभ झाला. ॥ ८ ॥

अका॑रि त इन्द्र॒ गोत॑मेभि॒र्ब्रह्मा॒ण्योक्ता॒ नम॑सा॒ हरि॑भ्याम् ॥

सु॒पेश॑सं॒ वाज॒मा भ॑रा नः प्रा॒तर्म॒क्षू धि॒याव॑सुर्जगम्यात् ॥ ९ ॥

अकारि ते इंद्र गोतमेभिः ब्रह्माणि आऽउक्ता नमसा हरिऽभ्याम् ॥

सुऽपेशसं वाजं आ भर नः प्रातः मक्षू धियाऽवसुः जगम्यात् ॥ ९ ॥

हे इंद्रा, गौतमांनी तुझें स्तवन केलें आहे आणि तुझ्या अश्वांस वंदन करून त्यांचे सन्मानार्थही त्यांनी स्तोत्रें गाईलीं आहेत. आम्हास उत्तम प्रमारचें सामर्थ्य दे. असंख्य स्तुतिस्तोत्रांनी आळविलेला हा देव आम्हांकडे प्रातःकाळी लवकर गमन करो. ॥ ९ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ६४ (मरुत् सूक्त)

ऋषि - नोधस् गौतम : देवता - मरुत् : छंद - जगती; त्रिष्टुभ्

वृष्णे॒ शर्धा॑य॒ सु॒म॑खाय वे॒धसे॒ नोधः॑ सुवृ॒क्तिं प्र भ॑रा म॒रुद्भ्यः॑ ॥

अ॒पो न धीरो॒ मन॑सा सु॒हस्त्यो॒ गिरः॒ सम॑ञ्जे वि॒दथे॑ष्वा॒भुवः॑ ॥ १ ॥

वृष्णे शर्धाय सुऽमखाय वेधसे नोधः सुऽवृक्तिं प्र भरा मरुत्ऽभ्यः ॥

अपः न धीरः मनसा सुऽहस्त्यः गिरः सं अंजे विदथेषु आऽभुवः ॥ १ ॥

मरुत् देवांचे सन्मानार्थ, हे नोधा, सामर्थ्यवान्, अत्यंत पूज्य व अत्यंत कर्तृत्ववान् अशा त्यांच्या गणास उद्देशून एक सुंदर स्तोत्र अर्पण करा. मनांत बाळगून व चांगली हातोटी साध्य करून घेऊन मी यज्ञप्रसंगी प्रभावसंपन्न स्तोत्रांची पाण्याप्रमाणें वृष्टि करतो. ॥ १ ॥

ते ज॑ज्ञिरे दि॒व ऋ॒ष्वास॑ उ॒क्षणो॑ रु॒द्रस्य॒ मर्या॒ असु॑रा अ॒रेपसः॑ ॥

पा॒व॒कासः॒ शुच॑यः॒ सूर्या॑ इव॒ सत्वा॑नो॒ न द्र॒प्सिनो॑ घो॒रव॑र्पसः ॥ २ ॥

ते जज्ञिरे दिवः ऋष्वासः उक्षणः रुद्रस्य मर्याः असुराः अरेपसः ॥

पावकासः शुचयः सूर्याःऽइव सत्वानः न द्रप्सिनः घोरऽवर्पसः ॥ २ ॥

रुद्राचे पुत्र, शत्रूंचा नाश करणारे, सर्व अवगुणांपासून अलिप्त, जगतास पावन करणारे, सूर्याप्रमणे तेजःपुंज व वृष्टि करणारे असून सामर्थ्यवान पुरुषाप्रमाणे भयप्रद असे हे उंच शरीराचे पराक्रमी वृषभ द्युलोकापासून जन्म पावले. ॥ २ ॥

युवा॑नो रु॒द्रा अ॒जरा॑ अभो॒ग्घनो॑ ववु॒क्षुरधि॑गावः॒ पर्व॑ता इव ॥

दृ॒ळ्हा चि॒द्विश्वा॒ भुव॑नानि॒ पार्थि॑वा॒ प्र च्या॑वयन्ति दि॒व्यानि॑ म॒ज्मना॑ ॥ ३ ॥

युवानः रुद्राः अजराः अभोक्ऽहनः ववक्षुः अध्रिऽगावः पर्वताःऽइव ॥

दृळ्हा चित् विश्वा भुवनानि पार्थिवा प्र च्यवयंति दिव्यानि मज्मना ॥ ३ ॥

तारुण्ययुक्त, जरारहित, भक्तिहीन कृपण पुरुषांचा नाश करणारे, व कोणाच्या प्रतिरोधास न जुमानणारे हे रुद्र पर्वताप्रमाणे बलवान होत गेले. आपल्या सामर्थ्याच्या योगानें हे दिव्य लोकांना, व पृथ्वीवरील प्रदेशांना, ते कितीही अचल असले तरी हालवून सोडतात. ॥ ३ ॥

चित्रैरञ्जिभिर्वपुषे व्यञ्जते वक्षःस्सु रुक्माँ अधि येतिरे शुभे ॥

अंसेष्वेषां नि मिमृक्षुरृष्टयः साकं जज्ञिरे स्वधया दिवो नरः ॥ ४ ॥

चित्रैः अंजिऽभिः वपुषे वि अंजते वक्षःऽसु रुक्मान् अधि येतिरे शुभे ॥

अंसेषु एषां नि मिमृक्षुः ऋष्टयः साकं जज्ञिरे स्वधया दिवः नरः ॥ ४ ॥

सुंदर दिसण्याचे हेतूनें ते चित्रविचित्र आभरणांनी स्वतःस भूषवित आहेत. शोभेकरितां त्यांनी आपल्या वक्षःस्थलावर सुवर्णलंकार धारण केलेले आहेत. त्यांच्या खांद्याव भाले लखलखतांना दिसत आहेत व हे वीर, स्वतःचाच मार्ग धारण करून, द्युलोकापासून उत्पन्न झालेले आहेत. ॥ ४ ॥

ईशानकृतो धुनयो रिशादसो वातान्विद्युतस्तविषीभिरक्रत ॥

दुहन्त्यूधर्दिव्यानि धूतयो भूमिं पिन्वन्ति पयसा परिज्रयः ॥ ५ ॥

ईशानऽकृतः धुनयः रिशादसः वातान् विऽद्युतः तविषीभिः अक्रत ॥

दुहंति ऊधः दिव्यानि धूतयः भूमिं पिन्वंति पयसा परिऽज्रयः ॥ ५ ॥

विश्वावर अधिपत्य संपादन करणाऱ्या, सर्व जगास हालवून सोडणाऱ्या, व दुष्टांचा संहार करणाऱ्या, ह्या मरुतांनी वारे व विजा ह्यांना स्वसामर्थ्यानें उत्पन्न केलें. हे शूर स्वर्भूमीच्या कांसेचे दोहन करतात व सर्वत्र संचार करून दुग्धानें पृथ्वीस पुष्टि आणतात. ॥ ५ ॥

पिन्वन्त्यपो मरुतः सुदानवः पयो घृतवद्विदथेष्वाभुवः ॥

अत्यं न मिहे वि नयन्ति वाजिनमुत्सं दुहन्ति स्तनयन्तमक्षितम् ॥ ६ ॥

पिन्वंति अपः मरुतः सुऽदानवः पयः घृतऽवत् विऽदथेषु आऽभुवः ॥

अत्यं न मिहे वि नयंति वाजिनं उत्सं दुहंति स्तनयंतं अक्षितम् ॥ ६ ॥

कर्तृत्व अंगी असलेले हे दानशूर मरुत् जलाची व घृतपरिपूर्ण अशा दुग्धाची समृद्धि करतात. ते सामर्थ्यवान् अश्वास जणूं काय वृष्टि करण्याचेंच शिक्षण देतात व मोठ्यानें शब्द करणाऱ्या अविनाशी झऱ्यांचे दोहन करतात. ॥ ६ ॥

महिषासो मायिनश्चित्रभानवो गिरयो न स्वतवसो रघुष्यदः ॥

मृगा इव हस्तिनः खादथा वना यदारुणीषु तविषीरयुग्ध्वम् ॥ ७ ॥

महिषासः मायिनः चित्रऽभानवः गिरयः न स्वऽतवसः रघुऽस्यदः ॥

मृगाःऽइव हस्तिनः खादथ वना यत् आरुणीषु तविषीः अयुग्ध्वम् ॥ ७ ॥

हे मरुतांनो, आकाशातील विजेच्या प्रकाशमान आणि आरक्त ज्वालांसमवेत तुम्ही कार्यान्वित होताच, तुमच्या महान, मायावी, तेजसंपन्न, पर्वतसदृश आणि शीघ्रगामी सामर्थ्याने रानटी हत्तीप्रमाणे सारी वने तुम्ही भक्षण करता, नष्ट करता. ॥ ७ ॥

सिंहा इव नानदति प्रचेतसः पिशा इव सुपिशो विश्ववेदसः ॥

क्षपो॒ जिन्व॑न्तः॒ पृष॑तीभिर्ऋ॒ष्टिभिः॒ समित्स॒बाधः॒ शव॒साहि॑मन्यवः ॥ ८ ॥

सिंहाःऽइव नानदति प्रऽचेतसः पिशाःऽइव सुऽपिशः विश्ववेदसः ॥

क्षपः जिन्वंतः पृषतीभिः ऋष्टिऽभिः सं इत् सऽबाधः शवसा अहिऽमन्यवः ॥ ८ ॥

ज्यावेळी बलवान्, सर्व युक्तिप्रयुक्तींत निष्णात, आश्चर्यकारक तेजानें युक्त, पर्वताप्रमाणे स्वसामर्थ्यानें परिपूर्ण व शीघ्रसंचारी असे आपण आपल्या रक्तवर्ण हरिणींपैकीं बलिष्ठ हरिणींना आपल्या रथास जोडतां, त्यावेळी एखाद्या रानटी हत्तीप्रमाणे आपण सर्व झाडेझुडे खाऊनच टाकता किं काय असा भास होतो. ॥ ७ ॥

रोद॑सी॒ आ व॑दता गणश्रियो॒ नृषा॑चः शूराः॒ शव॒साहि॑मन्यवः ॥

आ व॒न्धुरे॑ष्व॒मति॒र्न द॑र्श॒ता वि॒द्युन्न त॑स्थौ मरुतो॒ रथे॑षु वः ॥ ९ ॥

रोदसी इति आ वदत गणऽश्रियः नृऽसाचः शूराः शवसा अहिऽमन्यवः ॥

आ वंधुरेषु अमतिः न दर्शता विऽद्युत् न तस्थौ मरुतः रथेषु वः ॥ ९ ॥

अत्यंत प्रज्ञाशील रुरु नांवाच्या मृगाप्रमाणें सुंदर, सर्वज्ञ, आपल्या ठिपकेदार हरिणी जोडून व भाले घेऊन रात्रीला पळवून लावणारे, शत्रूस एकदम एकाच वेळी पीडा देणारे व बलिष्ठ असल्यामुळें सर्पाप्रमाणें रागीट असे हे मरुत् सिंहाप्रमाणें गर्जना करीत आहेत. ॥ ८ ॥

विश्ववेदसो रयिभिः समोकसः सम्मिश्लासस्तविषीभिर्विरप्शिनः ॥

अस्तार इषुं दधिरे गभस्त्योरनन्तशुष्मा वृषखादयो नरः ॥ १० ॥

विश्वऽवेदसः रयिऽभिः संऽओकसः संऽमिश्लासः तविषीभिः विऽरप्शिनः ॥

अस्तारः इषुं दधिरे गभस्त्योः अनंतऽशुष्माः वृषऽखादयः नरः ॥ १० ॥

समुदायामध्यें शोभिवंत दिसणाऱ्या, मनुष्यांस साहाय्यभूत होणाऱ्या व अंगी सामर्थ्य असल्यामुळें सर्पाप्रमाणें कुपित होणाऱ्या हे शूर मरुद्देवांनो, स्वर्ग व पृथ्वी ह्या दोन्ही लोकांशी संभाषण करा. तुमच्या रथाच्या वन्धुरांवर सुंदर तेज दृगोचर होत नाहीं काय व तुमच्या रथावर विद्युत् विराजमान झाली नाहीं काय ? ॥ ९ ॥

हिरण्ययेभिः पविभिः पयोवृध उज्जिघ्नन्त आपथ्योऽन पर्वतान् ॥

मखा अयासः स्वसृतो ध्रुवच्युतो दुध्रकृतो मरुतो भ्राजदृष्टयः ॥ ११ ॥

हिरण्ययेभिः पविऽभिः पयःऽवृधः उत्ऽजिघ्नंते आऽपथ्यः न पर्वतान् ॥

मखाः अयासः स्वऽसृतः ध्रुवऽच्युतः दुध्रऽकृतः मरुतः भ्राजत्ऽऋष्टयः ॥ ११ ॥

सर्वज्ञ, स्ववैभव धारण करून एकत्र निवास करणाऱ्या, एकमेकांशी अगदीं संलग्न असलेल्या, स्वसामर्थ्याच्या योगानें श्रेष्ठपणा पावलेल्या, अस्त्रविद्यानिपुण, अपार बल अंगी असलेल्या व आयुधें धारण करणाऱ्या ह्या शूर मरुतांनी हातांत बाण घेतलेला आहे. ॥ १० ॥

घृषुं पावकं वनिनं विचर्षणिं रुद्रस्यं सूनुं हवसा गृणीमसि ॥

रजस्तुरं तवसं मारुतं गणमृंजीषिणं वृषणं सश्चत श्रिये ॥ १२ ॥

घृषुं पावकं वनिनं विऽचर्षणिं रुद्रस्य सूनुं हवसा गृणीमसि ॥

रजःऽतुरं तवसं मारुतं गणं ऋजीषिणं वृषणं सश्चत श्रिये ॥ १२ ॥

पवित्र, चपल, स्वमार्गाने गमन करणारे, स्थिर पदार्थांस चळविणारे, स्वतःस शत्रूंकडून अजिंक्यपणा प्राप्त करून घेणारे व हातांत भाले चमकविणारे हे मरुत् दुग्धप्राशनानें सामर्थ्यवान बनून आपल्या सुवर्णमय पवींनी पर्वतांचा मार्गावरील एखाद्या क्षुद्र पदार्थाप्रमाणें चुराडा करून टाकतात. ॥ ११ ॥

प्र नू स मर्त॒ः शव॑सा॒ जना॒ँ अति॑ त॒स्थौ व॑ ऊ॒ती म॑रुतो॒ यमाव॑त ॥

अर्व॑द्भि॒र्वाजं॑ भरते॒ धना॒ नृभि॑रा॒पृच्छ्यं॒ क्रतु॒मा क्षे॑ति॒ पुष्य॑ति ॥ १३ ॥

प्र नू सः मर्तः शवसा जनान् अति तस्थौ वः ऊती मरुतः यं आवत ॥

अर्वत्ऽभिः वाजं भरते धना नृऽभिः आऽपृच्छ्यं क्रतुं आ क्षेति पुष्यति ॥ १३ ॥

युद्धसंघर्षणांत चतुर, पवित्र, अरण्यांत संचार करणारे व सर्वत्र परिभ्रमण करणारे असे जे रुद्राचे पुत्र त्यांचा धांवा करून आम्ही त्यांचे स्तवन करतो. रजोलोकांत जाणारे, बलिष्ठ, सरल गतीनें धावणारे व अतिशय शक्तिमान असे जे मरुद्गण त्यांस तुम्ही वैभव प्राप्त होण्याकरितां भजा ॥ १२ ॥

च॒र्कृत्यं॑ मरुतः पृ॒त्सु दु॒ष्टरं॑ द्यु॒मन्तं॒ शुष्मं॑ म॒घव॑त्सु धत्तन ॥

धनस्पृतमुक्थ्यं विश्वचर्षणिं तोकं पुष्येम तनयं शतं हिमाः ॥ १४ ॥

चर्कृत्यं मरुतः पृत्ऽसु दुऽस्तरं द्युऽमंतं शुष्मं मघवत्ऽसु धत्तन ॥

धनऽस्पृतं उक्थ्यं विश्वऽचर्षणिं तोकं पुष्येम तनयं शतं हिमाः ॥ १४ ॥

आपलें साहाय्य अर्पण करून ज्याचें तुम्ही संरक्षण करतां तो मानव हे मरुत् हो, आपल्या सामर्थानें सर्व लोकांपेक्षां ज्यास्त बलवान् होतो. तो आपल्या अश्वांच्या योगानें सामर्थ्य संपादन करतो, तो आपल्या पदरच्या शूर माणसांकडून संपत्ति मिळवितो, लोकांनी जिच्याबद्दल कौतुकानें चौकशी करावी अशी शक्ति त्यास प्राप्त होते व तो भरभराटीस चढतो. ॥ १३ ॥

नू ष्ठिरं मरुतो वीरवन्तमृतीषाहं रयिमस्मासु धत्त ॥

सहस्रिणं शतिनं शूशुवांसं प्रातर्मक्षू धियावसुर्जगम्यात् ॥ १५ ॥

नु स्थिरं मरुतः वीरऽवंतं ऋतीऽसहं रयिं अस्मासु धत्त ॥

सहस्रिणं शतिनं शूशुऽवांसं प्रातः मक्षू धियाऽवसुः जगम्यात् ॥ १५ ॥

धनाची प्राप्ति करून देणारी, प्रशंसनीय, सर्व विश्वांत विदित होणारी, अत्यंत स्तुत्य, युद्धांत हार न जाणावी व उज्ज्वल अशी शक्ति हे मरुत् हो, तुम्हांस हवि देणाऱ्या भक्तांचे अंगी आणा. आम्हांस शतायु पुत्रपौत्र लाभोत. ॥ १४ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ६५ (अग्नि सूक्त)

ऋषि - पराशर शाक्त्य : देवता - अग्नि : छंद - द्विपदा विराज्

पश्वा न तायुं गुहा चतन्तं नमो युजानं नमो वहन्तम् ॥

सजोषा धीराः पदैरनु ग्मन्नुप त्वा सीदन्विश्वे यजत्राः ॥ १ ॥

पश्वा न तायुं गुहा चतंतं नमः युजानं नमः वहंतम् ॥

सऽजोषा धीराः पदैः अनु ग्मन् उप त्वा सीदन् विश्वे यजत्राः ॥ १ ॥

ज्याप्रमाणे गुरें चोरून नेऊन एकादा चोर गुहेंत लपून बसला असतां त्याच्या पावलांवरून त्याचा माग काढतात त्याप्रमाणे प्रज्ञाशील पुरुषांनी आपापसांत एकमत करून सर्वांच्या नमस्कृति स्वतः स्वीकारून त्या देवांकडे पोंचविणाऱ्या तुझ्या पावलांवरून तुझा शोध लावला व ते सर्व पुण्यशील पुरुष तुझ्यासमीप विराजमान झाले. ॥ १ ॥

ऋ॒तस्य॑ दे॒वा अनु॑ व्र॒ता गु॒र्भु॒वत्परि॑ष्टि॒र्द्यौर्न भूम॑ ॥

वर्ध॑न्ती॒माप॑ः प॒न्वा सुशि॑श्विमृ॒तस्य॒ योना॒ गर्भे॒ सुजा॑तम् ॥ २ ॥

ऋतस्य देवाः अनु व्रता गुः भुवत् परिष्टिः द्यौः न भूम ॥

वर्धंति ईं आपः पन्वा सुऽशिश्विं ऋतस्य योना गर्भे सुऽजातम् ॥ २ ॥

सत्यनियमांपासून उत्पन्न झालेल्या अनुशासनांचे देवांनी परिपालन केले. स्वर्गाप्रमाणे पृथ्वीही त्या सत्यनियमांचे आश्रयस्थान झाली. प्रत्यक्ष सत्यानें जेथें जन्म घेतला अशा गर्भांतून अतिशय थाटामाटांत ज्याचें जनन झालें तो अग्नि वृद्धिंगत होऊं लागला असतां सर्व उदकांनी त्याचें स्तवन करून त्याच्या वर्धनास उत्तेजन दिले. ॥ २ ॥

पु॒ष्टिर्न र॒ण्वा क्षि॒तिर्न पृ॒थ्वी गि॒रिर्न भुज्म॒ क्षोदो॒ न श॒म्भु ॥

अत्यो॒ नाज्म॒न्सर्ग॑प्रतक्तः॒ सिन्धु॒र्न क्षोदः॒ क ईं॑ वराते ॥ ३ ॥

पुष्टिः न रण्वा क्षितिः न पृथ्वी गिरिः न भुज्म क्षोदः न शंऽभु ॥

अत्यः न अज्मन् सर्गऽप्रतक्तः सिंधुः न क्षोदः कः ईं वराते ॥ ३ ॥

उत्कर्ष जसा रमणीय असतो, पृथ्वी जशी विस्तीर्ण आहे, गिरि जसा पुष्पफलादिक भोग्यवस्तूंनी परिपूर्ण असतो, उदक जसें हितकर असते, धांवत असतांही जास्त चेतविलेला घोडा जसा आणखी दौड करतो अथवा एखादी महानदी ज्याप्रमाणे आपले तट भंगून टाकील अशी सामर्थ्यवान् असते, तसा हा अग्नि आहे. खरोखर ह्यास कोण प्रतिबंध करूं शकेल ? ॥ ३ ॥

जा॒मिः सिन्धू॑नां॒ भ्राते॑व॒ स्वस्रा॒मिभ्या॒न्न राजा॒ वना॑न्यत्ति ॥

यद्वात॑जूतो॒ वना॒ व्यस्था॑द॒ग्निर्ह॑ दाति॒ रोमा॑ पृथि॒व्याः ॥ ४ ॥

जामिः सिंधूनां भ्राताऽइव स्वस्रां इभ्यान् न राजा वनानि अत्ति ॥

यत् वातऽजूतः वना वि अस्थात् अग्निः ह दाति रोम पृथिव्याः ॥ ४ ॥

हा नद्यांचा जिवलग आप्त आहे कीं जणूं कांही त्या बहिणी व हा भाऊच. ज्याप्रमाणे एखादा नृपति शत्रूंचा संहार करतो त्याप्रमाणे हा सबंध अरण्यांचे भक्षण करतो. ज्याप्रमाणे वायूनें प्रेरित होऊन ह्याचा मोर्चा वनांचेकडे वळलेला असतो त्यावेळी खरोखर हा अग्नि पृथ्वीचे जणूं कांही केंसच कापून टाकतो. ॥ ४ ॥

श्वसि॑त्य॒प्सु हं॒सो न सीद॒न् क्रत्वा॒ चेति॑ष्ठो वि॒शामु॑ष॒र्भुत् ॥

सोमो॒ न वे॒धा ऋ॒तप्र॑जातः प॒शुर्न शिश्वा॑ वि॒भुर्दू॒रेभाः॑ ॥ ५ ॥

श्वसिति अप्ऽसु हंसः न सीदन् क्रत्वा चेतिष्ठः विशां उषःभुत् ॥

सोमः न वेधा ऋतऽप्रजातः पशुः न शिश्वा विऽभुः दूरेऽभाः ॥ ५ ॥

हंसाप्रमाणे उदकांत बसून हा श्वासोच्छ्वास करतो. हा आपल्या बुद्धिवान्पणामुळें अतिशय ज्ञानशील आहे. सर्व लोकांस प्रभातकालीं हा जागृत करतो. सोमाप्रमाणे ह्याचे अंगांत तरतरी आहे. ह्याचा जन्म सत्यापासून झालेला आहे. ज्याप्रमाणे एखादें जनावर पुष्ट असलें म्हणजे देखणें दिसतें त्याप्रमाणें हा दिसतो. हा सर्वव्यापी आहे. ह्याची कांती दूरवर पसरते. ॥ ५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ६६ (अग्नि सूक्त)

ऋषि - पराशर शाक्त्य : देवता - अग्नि : छंद - द्विपदा विराट्

रयिर्न चित्रा सूरो न संदृगायुर्न प्राणो नित्यो न सूनुः ॥

तक्वा न भूर्णिर्वना सिषक्ति पयो न धेनुः शुचिर्विभावा ॥ १ ॥

रयिः न चित्रा सूरः न संऽदृक् आयुः न प्राणः नित्यः न सूनुः ॥

तक्वा न भूर्णिः वना सिसक्ति पयः न धेनुः शुचिः विभाऽवा ॥ १ ॥

तेजस्वी व प्रभावशील असा हा अग्नि आश्चर्यप्रद संपत्तीप्रमाणे, सर्वदर्शी सूर्याप्रमाणें, जीवनप्रद आयुष्याप्रमाणे, स्वतःच्या औरस पुत्राप्रमाणें, व चपल अश्वाप्रमाणें असून ज्याप्रमाणें धेनु दुग्धास धारण करते त्याप्रमाणें वनांतील वृक्षांना बळकट धरून ठेवतो. ॥ १ ॥

दा॒धार॒ क्षेम॒मोको॒ न र॒ण्वो यवो॒ न प॒क्वो जेता॒ जना॑नाम् ॥

ऋषि॒र्न स्तुभ्वा॑ वि॒क्षु प्र॑श॒स्तो वा॒जी न प्री॒तो वयो॑ दधाति ॥ २ ॥

दाधार क्षेमं ओकः न रण्वः यवः न पक्वः जेता जनानाम् ॥

ऋषिः न स्तुभ्वा विक्षु प्रऽशस्तः वाजी न प्रीतः वयः दधाति ॥ २ ॥

सर्व लोकांवर विजय मिळविणारा हा अग्नि पक्व झालेल्या शेतांतील धान्याप्रमाणें अथवा शोभिवंत अशा एखाद्या मंदिराप्रमाणें असून त्यानें भक्तांचे क्षेम राहील असें केलें आहे. स्तोत्रें गाण्यांत मग्न झालेला ऋषि अथवा सर्वांचा आवडता असा एकादा अश्व ह्यांची जशी सर्व जनांत तारीफ होते तशी ह्याची विश्वांत प्रशंसा होत असते व हा सर्वांस त्यांचे हीवन अर्पण करतो. ॥ २ ॥

दु॒रोक॑शोचिः॒ क्रतु॒र्न नित्यौ॑ जा॒येव॒ योना॒वरं॒ विश्व॑स्मै ॥

चि॒त्रो यदभ्रा॑ट् श्वे॒तो न वि॒क्षु रथो॒ न रु॒क्मी त्वे॒षः स॒मत्सु॑ ॥ ३ ॥

दुरोकऽशोचिः क्रतुः न नित्यः जायाऽइव योनौ अरं विश्वस्मै ॥

चित्रः यत् अभ्राट् श्वेतः न विक्षु रथः न रुक्मी त्वेषः समत्ऽसु ॥ ३ ॥

शाश्वत टिकणाऱ्या सामर्थ्याप्रमाणे अथवा स्वगृहांतील प्रियपत्नीप्रमाणें हा सर्वांस पूज्य व प्रिय असून ह्याचें तेज दूरवर पसरणारे आहे व सर्व विश्वाची हा तृप्ति करणारा आहे. जेव्हां आपल्या चित्रविचित्र कांतीनें हा विराजमान

झालेला असतो त्यावेळीं सुवर्णाप्रमाणें, अथवा जनसमुदायांत आपल्या तेजानें तळपणाऱ्या एखाद्या तेजस्वी पुरुषाप्रमाणें, हा शोभावयास लागतो. संग्रामामध्यें ह्याचा त्वेष फार तीव्र असतो. ॥ ३ ॥

सेनेव सृष्टामं दधात्यस्तुर्न दिद्युत्त्वेषप्रतीका ॥

यमो ह जातो यमो जनित्वं जारः कनीनां पतिर्जनीनाम् ॥ ४ ॥

सेनाऽइव सृष्टा अमं दधाति अस्तुः न दिद्युत् त्वेषऽप्रतीका ॥

यमः ह जातः यमः जनिऽत्वं जारः कनीनां पतिः जनीनाम् ॥ ४ ॥

शत्रूविरुद्ध पाठविलेल्या सेनेप्रमाणें अथवा एखाद्या अस्त्रकुशल वीरानें त्वेषानें फेंकलेल्या दीप्तिमान् बाणाप्रमाणें हा भिती उत्पन्न करतो. हा मूर्तिमान् यमच आहे- मग त्यानें जन्म धारण केलेला असो अथवा त्याचें मानस जन्म घेण्याच्या तयारींत असो. हा कुमारिकांचा वल्लभ व विवाहित स्त्रियांचा नाथ आहे. ॥ ४ ॥

तं वश्चराथा वयं वसत्यास्तं न गावो नक्षन्त इद्धम् ॥

सि॒न्धु॒र्न क्षोद॒ः प्र नीची॑रैनो॒न्नव॑न्त॒ गाव॒ः स्व१॒॑र्दृशी॑के ॥ ५ ॥

तं वः चराथा वयं वसत्या अस्तं न गावः नक्षंते इद्धम् ॥

सिंधुः न क्षोदः प्र नीचीः ऐनोन् नवंत गावः स्वः दृशीके ॥ ५ ॥

ज्याप्रमाणे धेनु स्वगृहाकडे गमन करतात त्याप्रमाणें, तुम्हांस प्रिय असा जो अग्नि तो प्रज्वलित झाला असतां, आम्ही आपल्या स्थावर व जंगम संपत्तीसह त्या अग्नीकडे गमन करतो. एखाद्या महानदीप्रमाणे जलाचे प्रवाह उतरत्या मार्गानें व्हावयास ह्यानेंच लावले. धेनूही वरती सूर्याकडे पाहून हंबरावयास लागल्या. ॥ ५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ६७ (अग्नि सूक्त)

ऋषि - पराशर शाक्त्य : देवता - अग्नि : छंद - द्विपदा विराट्

वने॑षु जा॒युर्मर्ते॑षु मि॒त्रो वृ॑णी॒ते श्रु॒ष्टिं राजे॑वाजु॒र्यम् ॥

क्षेमो॒ न सा॒धुः क्रतु॒र्न भ॒द्रो भुव॑त्स्वा॒धीर्होता॑ हव्य॒वाट् ॥ १ ॥

वनेषु जायुः मर्तेषु मित्रः वृणीते श्रुष्टिं राजाऽइव अजुर्यम् ॥

क्षेमः न साधुः क्रतुः न भद्रः भुवत् सुऽआधीः होता हव्यऽवाट् ॥ १ ॥

अरण्यें दग्ध करून विजय संपादन करून हा मनुष्य जातीचा कल्याणकर्ता, एखाद्या राजाप्रमाणें, जो उपासक सेवेनें थकल्यासारखा होणार नाहीं अशा सेवकास चाहतो. मनुष्याचें क्षेम जसें त्यास सुखदायक असतें अथवा बुद्धिसामर्थ्य जसे मनुष्याचे उपयोगी पडतें त्याप्रमाणे सौख्यकारक असणारा हा अत्यंत प्रज्ञाशील अग्नि आमचे हवि देवांप्रत नेऊन त्यांस ते अर्पण करो. ॥ १ ॥

हस्ते॒ दधा॑नो नृ॒म्णा विश्वा॒न्यमे॑ दे॒वान्धा॒द्गुहा॑ नि॒षीद॑न् ॥

वि॒दन्ती॒मत्र॒ नरो॑ धियं॒धा हृ॒दा यत्त॒ष्टान् मन्त्राँ॒ अशं॑सन् ॥ २ ॥

हस्ते दधानः नृम्णा विश्वानि अमे देवान् धात् गुहा निऽसीदन् ॥

विदंतीं अत्र नरः धियंऽधाः हृदा यत् तष्टान् मंत्रान् अशंसन् ॥ २ ॥

सर्व वैभवें आपल्या हातांत वागविणाऱ्या ह्या देवानें गुहेंत लपून बसून मोठ्या घोरांत पाडलें. मन तल्लीन करून रचलेल्या प्रार्थना जेव्हां बुद्धिवान् भक्तजन प्रेमानें गात बसलेले असतात त्यावेळी ह्या देवाचें ह्या जगांत ज्ञान होते. ॥ २ ॥

अजो न क्षां दाधार पृथिवीं तस्तम्भ द्यां मन्त्रेभिः सत्यैः ॥

प्रिया पदानि पश्वो नि पाहि विश्वायुरग्ने गुहा गुहं गाः ॥ ३ ॥

अजः न क्षां दाधार पृथिवीं तस्तंभ द्यां मंत्रेभिः सत्यैः ॥

प्रिया पदानि पश्वः नि पाहि विश्वऽआयुः अग्ने गुहा गुहं गाः ॥ ३ ॥

जन्मरहित अशा परमेश्वराप्रमाणें ह्यानें विस्तीर्ण पृथ्वीचें पोषण केलें आहे, सत्यस्फुरित प्रार्थनांच्या योगाने त्यानें द्युलोकास सांवरून धरलें आहे. हे अग्निदेवा, तूं विश्वाचा प्राण आहेस, तूं गुहागुहांतून परिभ्रमण करीत असतोस, परंतु आमच्या पशूंची जेवढीं चरण्याची आवडतीं ठिकाणें असतील तेवढ्यांचा अवश्य बचाव कर. ॥ ३ ॥

य ईं॑ चि॒केत॒ गुहा॒ भव॑न्त॒मा यः स॒साद॒ धारा॑मृ॒तस्य॑ ॥

वि ये चृ॒तन्त्यृ॒ता सप॑न्त॒ आदिद्वसू॑नि॒ प्र व॑वाचास्मै ॥ ४ ॥

य ईं चिकेत गुहा भवंतं आ यः ससाद धारां ऋतस्य ॥

वि ये चृतंति ऋता सपंत आत् इत् वसूनि प्र ववाच अस्मै ॥ ४ ॥

गुहेमध्यें निवास करणाऱ्या ह्या अग्निदेवाचें जास्त ज्ञान करून घेण्याची इच्छा आहे. सत्यरूपी अमृताची धारा प्राशन करण्याकरितां जो तिच्या सभोंवती टपून बसलेला असतो व जो अग्नीच्या सत्य नियमांचे परिपालन करून त्यास त्याच्या निवासस्थानांतून बाहेर आणतो त्याला तो संपत्ति प्राप्त होण्याबद्दल आशीर्वचनें देतो. ॥ ४ ॥

वि यो वी॒रुत्सु॒ रोध॑न्महि॒त्वोत प्र॒जा उ॒त प्र॒सूष्व॒न्तः ॥

चित्तिरपां दमे विश्वायुः सद्मेव धीराः सम्माय चक्रुः ॥ ५ ॥

वि यः वीरुत्ऽसु रोधन् महिऽत्वा उत प्रऽजाः उत प्रऽसूषु अंतरिति ॥

चित्तिः अपां दमे विश्वऽआयुः सद्मऽइव धीराः संऽमाय चक्रुः ॥ ५ ॥

जो आपल्या सामर्थ्यानें लतासमुदायांत वृद्धिंगत होतो, जो त्यांचे अपत्यच होय, व जो आपल्या जननीमध्यें राहतो, जो प्रज्ञाशील आहे व जो विश्वाचा जणूं कांही प्राणच होय, तो अग्निदेव जलांच्या गृहांत वास करतो. सुज्ञलोकांनी त्या गृहाचें माप घेऊन तें त्यांचे जणूं मंदिरच केलें आहे. ॥ ५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ६८ (अग्नि सूक्त)

ऋषि - पराशर शाक्त्य : देवता - अग्नि : छंद - द्विपदा विराट्

श्री॒णन्नुप॑ स्था॒द्दिवं॑ भु॒र॒ण्युः स्था॒तुश्च॒रथ॑म॒क्तून्व्यूर्णोत् ॥

परि॒ यदे॑षा॒मेको॒ विश्वे॑षां॒ भुव॑द्दे॒वो दे॒वानां॑ महि॒त्वा ॥ १ ॥

श्रीणन् उप स्थात् दिवं भुरण्युः स्थातुः चरथं अक्तून् वि ऊर्णोत् ॥

परि यत् एषां एकः विश्वेषां भुवत् देवः देवानां महिऽत्वा ॥ १ ॥

सर्व वस्तू परिपक्वतेस पोंचवीत हा चपल अग्नि द्युलोकावर आरूढ झाला आहे. स्थावरापासून जंगमापर्यंत सर्व वस्तूंस- इतकेंच काय पण रात्रींसही - त्यानें सुप्रकाशित केलें आहे. हा देव ह्या सर्व वस्तू एकटा वेष्टून टाकून आपल्या श्रेष्ठ गुणांमुळे देवांतील प्रमुख देव होऊन बसला आहे. ॥ १ ॥

आदित्ते॒ विश्वे॒ क्रतुं॑ जुषन्त॒ शुष्का॒द्यद्दे॑व जी॒वो जनि॑ष्ठाः ॥

भज॑न्त॒ विश्वे॑ देव॒त्वं नाम॑ ऋ॒तं सप॑न्तो अ॒मृत॒मेवैः॑ ॥ २ ॥

आत् इत् ते विश्वे क्रतुं जुषंत शुष्कात् यत् देव जीवः जनिष्ठाः ॥

भजंत विश्वे देवऽत्वं नाम ऋतं सपंतः अमृतं एवैः ॥ २ ॥

ज्यावेळीं हे देवा, तूं जीव बनून शुष्क काष्ठापासून जन्म घेतलास त्यावेळी तुझ्या बुद्धिसामर्थ्याची त्या सर्वांनी वाहवा केली. आपापल्या मार्गांनी तुझ्या अविनाशी सत्य नियमांचे जेव्हां त्यांनी परिपालन केले त्यावेळी त्या सर्वांस 'देव' ही संज्ञा प्राप्त झाली. ॥ २ ॥

ऋ॒तस्य॒ प्रेषा॑ ऋ॒तस्य॑ धी॒तिर्वि॒श्वायु॒र्विश्वे॒ अपां॑सि चक्रुः ॥

यस्तु॒भ्य॒ं दाशा॒द्यो वा॑ ते॒ शिक्षा॒त्तस्मै॑ चिकि॒त्वान्र॒यिं द॑यस्व ॥ ३ ॥

ऋतस्य प्रेषाः ऋतस्य धीतिः विश्वऽआयुः विश्वे अपांसि चक्रुः ॥

यः तुभ्यं दाशात् यः वा ते शिक्षात् तस्मै चिकित्वान् रयिं दयस्व ॥ ३ ॥

सत्यनियमांचा हा प्रेरक आहे. सत्यनियमांचा हा कल्पक आहे. सर्व विश्वाचा हा प्राण आहे. ह्याच्यामुळेंच सर्व लोक आपापल्या कर्मास प्रवृत्त होतात. तूं ज्ञानवान् आहेस. जो तुला हवि अर्पण करील, अथवा जो तुझी सेवा करील त्यास तूं संपत्ति दे. ॥ ३ ॥

होता॒ निष॑त्तो॒ मनो॒रप॑त्ये॒ स चि॒न्न्वासां॒ पती॑ रयी॒णाम् ॥

इ॒च्छन्त॒ रेतो॑ मि॒थस्त॒नूषु॒ सं जा॑नत॒ स्वैर्दक्षै॒रमू॑राः ॥ ४ ॥

होता निऽसत्तः मनोः अपत्ये सः चिन् नु आसां पतीः रयीणाम् ॥

इच्छंत रेतः मिथः तनूषु सं जानत स्वैः दक्षैः अमूराः ॥ ४ ॥

मनूच्या अपत्यांचे समुदायांत हा 'हविर्दाता' होऊन बसला आहे. सर्व संपत्तीचा हा खरोखर स्वामी आहे. आपल्या शरांत वीर्य असावें अशी स्त्रीपुरुषांना परस्परांस इच्छा झाली तेव्हां त्यांचेवर मनोभंग होण्याचा प्रसंग न येतां त्यांस आपल्या शक्तीच्या योगानें संततिलाभ करून घेतां आला. ॥ ४ ॥

पि॒तुर्न पु॒त्राः क्रतुं॑ जुषन्त॒ श्रोष॒न्ये अ॑स्य॒ शासं॑ तु॒रासः॑ ॥

वि राय॑ और्णो॒द्दुरः॑ पु॒रु॒क्षुः पि॒पेश॒ नाकं॒ स्तृभि॒र्दमू॑नाः ॥ ५ ॥

पितुः न पुत्राः क्रतुं जुषंत श्रोषन् ये अस्य शासं तुरासः ॥

वि रायः और्णोत् दुरः पुरुऽक्षुः पिपेश नाकं स्तृभिः दमूनाः ॥ ५ ॥

ज्यांनी ह्याच्या आज्ञा ताबडतोब ऐकलेल्या आहेत त्यांना, ज्याप्रमाणें पुत्राला पित्याचा अधिकार प्राप्त होतो त्याप्रमाणें, ह्याचें सामर्थ्य प्राप्त झालेलें आहे. सर्वांच्या पोषणाची व्यवस्था करणाऱ्या ह्या अग्नीनें, एखाद्या गृहाचीं द्वारें खुली केल्याप्रमाणें, आपली संपत्ति खुली करून ठेवली आहे. सर्वांच्या गृहस्वास्थ्यांत आनंद मानणाऱ्या ह्या अग्नीनें नक्षत्रांचे योगानें स्वर्गास शोभा आणिली आहे. ॥ ५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ६९ (अग्नि सूक्त)

ऋषि - पराशर शाक्त्य : देवता - अग्नि : छंद - द्विपदा विराट्

शु॒क्रः शु॑शु॒क्वाँ उ॒षो न जा॒रः प॒प्रा स॑मी॒ची दि॒वो न ज्योतिः॑ ॥

परि॒ प्रजा॑तः॒ क्रत्वा॑ बभू॒थ भुवो॑ दे॒वानां॑ पि॒ता पु॒त्रः सन् ॥ १ ॥

शुक्रः शुशुक्वान् उषः न जारः पप्रा समीची इति संऽईची दिवः न ज्योतिः ॥

परि प्रऽजातः क्रत्वा बभूथ भुवः देवानां पिता पुत्रः सन् ॥ १ ॥

उषेच्या वल्लभाप्रमाणे हा उज्ज्वल व देदीप्यमान असून स्वर्गातील ज्योतीप्रमाणे द्युलोक व पृथ्वी ह्यांचे आक्रमण करतो. जन्म घेतल्याबरोबर ह्याने आपल्या सामर्थ्यानें सर्व जग वेढून टाकले व पुत्र असतांही तो देवांचा पिता झाला. ॥ १ ॥

वे॒धा अदृ॑प्तो अ॒ग्निर्वि॑जा॒नन्नूध॒र्न गोना॒ं स्वाद्मा॑ पितू॒नाम् ॥

जने॒ न शेव॑ आ॒हूर्यः॒ सन्मध्ये॒ निष॑त्तो र॒ण्वो दु॑रो॒णे ॥ ॥ २ ॥

वेधा अदृप्तः अग्निः विऽजानन् ऊधः न गोनां स्वाद्म पितूनाम् ॥

जने न शेवः आऽहूर्यः सन् मध्ये निऽसत्तः रण्वः दुरोणे ॥ ॥ २ ॥

ह्या अग्नीचे ठिकाणी कर्तृत्वशक्ति फार आहे. ह्याचें ज्ञान विशाल असतांही ह्यास गर्वाचा विटाळ नाही. धेनूंच्या कांसेप्रमाणें पेय पदार्थांतील हा मूर्तिमंत माधुर्यच आहे. ह्याचा ताप दुर्धर असतांही प्रत्यक्ष सौख्याप्रमाणें हा जनांस आनंद देणारा आहे. घराच्या मध्यभागीं स्थित असतांही हा रमणीय दिसतो. ॥ २ ॥

पु॒त्रो न जा॒तो र॒ण्वो दु॑रो॒णे वा॒जी न प्री॒तो विशो॒ वि ता॑रीत् ॥

विशो॒ यदह्वे॒ नृभिः॒ सनी॑ळा अ॒ग्निर्दे॑व॒त्वा विश्वा॑न्यश्याः ॥ ३ ॥

पुत्रः न जातः रण्वः दुरोणे वाजी न प्रीतः विशः वि तारीत् ॥

विशः यत् अह्वे नृभिः सऽनीळा अग्निः देवऽत्वा विश्वानि अश्याः ॥ ३ ॥

पोटी पुत्र जन्मास आला म्हणजे तो जसा घरांत पित्यास रमणीय दिसतो तसा हा रमणीय वाटतो. आवडत्या घोड्याप्रमाणे हा अवघड प्रसंग निभावून नेतो. मनुष्यांशी सहवास करण्यांत ज्या देवसमुदायांस आनंद वाटतो त्यास मी जेव्हां जेव्हां आपल्या यज्ञाकडे बोलावतो तेव्हां तेव्हां त्या सर्वांचा हाच दूत होऊन येतो. ॥ ३ ॥

नकि॑ष्ट ए॒ता व्र॒ता मि॑नन्ति॒ नृभ्यो॒ यदे॒भ्यः श्रु॒ष्टिं च॒कर्थ॑ ॥

तत्तु ते॒ दंसो॒ यदह॑न्समा॒नैर्नृभि॒र्यद्यु॒क्तो वि॒वे रपां॑सि ॥ ४ ॥

नकिः ते एता व्रता मिनंति नृऽभ्यः यत् एभ्यः श्रुष्टिं चकर्थ ॥

तत् तु ते दंसः यत् अहन् समानैः नृऽभिः यत् युक्तः विवेः रपांसि ॥ ४ ॥

ज्या अर्थी ह्या सर्व मानवांकडे तूं आजपर्यंत लक्ष्य पुरविलेलें आहेस त्या अर्थी ह्या तुझ्या आज्ञा मोडण्यास वस्तुतः कोणीच उद्युक्त होणार नाही. खरोखर तो तुझाच पराक्रम होय कीं समबल अशा देवांच्या साहाय्यानें तुं शत्रूंचा वध केला व वीर पुरुषांस हाताशीं घेऊन तूं दुर्भाषणी निंदकाची दाणादाण करून टाकली. ॥ ४ ॥

उ॒षो न जा॒रो वि॒भावो॒स्रः संज्ञा॑तरूप॒श्चिके॑तदस्मै ॥

त्मना॒ वह॑न्तो॒ दुरो॒ व्यृण्व॒न्नव॑न्त॒ विश्वे॒ स्व१॑र्दृशी॑के ॥ ५ ॥

उषः न जारः विभाऽवा उस्रः संज्ञातऽरूपः चिकेतत् अस्मै ॥

त्मना वहंतः दुरः वि ऋण्वन् नवंत विश्वे स्वः दृशीके ॥ ५ ॥

उषेच्या वल्लभप्रमाणें देदीप्यमान व तेजस्वी असणाऱ्या ह्या अग्नीची कांति सर्वांच्या ओळखीची आहे. आपल्या स्वतःच्या प्रेरणेनें रथ वाहून नेणाऱ्या अग्नीच्या अश्वांनी द्वारें उघडली व सूर्यदर्शन झाल्याबरोबर आनंदाचा शब्द केला. ॥ ५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ७० (अग्नि सूक्त)

ऋषि - पराशर शाक्त्य : देवता - अग्नि : छंद - द्विपदा विराट्

व॒नेम॑ पू॒र्वीर॒र्यो म॑नी॒षा अ॒ग्निः सु॒शोको॒ विश्वा॒न्यश्याः ॥

आ दैव्या॑नि व्र॒ता चि॑कि॒त्वाना मानु॑षस्य॒ जन॑स्य॒ जन्म॑ ॥ १ ॥

वनेम पूर्वीः अर्यः मनीषा अग्निः सुशोकः विश्वानि अश्याः ॥

आ दैव्यानि व्रता चिकित्वान् आ मानुषस्य जनस्य जन्म ॥ १ ॥

अग्नीची उपासना करणारे आम्ही त्याची मनःपूर्वक स्तुति करून भरपूर प्राप्त होण्याबद्दल याचना करूं. कारण हा अत्यंत तेजःपुंज अग्नि सर्व विश्वास व्याप्त करून टाकणारा आहे. देवलोकांतील नियमांचे ह्यास पूर्ण ज्ञान आहे व मनुष्यजातींतील प्राणी कसे जन्म पावतात हें हा उत्तम रीतीनें जाणतो. ॥ १ ॥

गर्भो यो अपां गर्भो वनानां गर्भश्च स्थातां गर्भश्चरथाम् ॥

अद्रौ चिदस्मा अन्तर्दुरोणे विशां न विश्वो अमृतः स्वाधीः ॥ २ ॥

गर्भः यः अपां गर्भः वनानां गर्भश्च स्थातां गर्भः चरथाम् ॥

अद्रौ चित् अस्मै अंतः दुरोणे विशां न विश्वः अमृतः सुऽआधीः ॥ २ ॥

उदकांचा जो गर्भ आहे, जो तरुलतादिकांचा गर्भ आहे, जो चर व अचर सृष्टीचाही गर्भ आहे, त्या ह्या अग्नीपुढें, मग तो अंतर्भागांत असो कीं गृहांच्या अंतर्भागांत असो, मानव जातींतील प्रत्येक मनुष्य व त्याचप्रमाणें अमरांचा समुदायही संतोषानें नम्र होतो. ॥ २ ॥

स हि क्ष॒पावाँ॑ अ॒ग्नी र॑यी॒णां दा॒श॒द्यो अ॑स्मा॒ अरं॑ सू॒क्तैः ॥

ए॒ता चि॑कित्वो॒ भूमा॒ नि पा॑हि दे॒वानां॒ जन्म॒ मर्तां॑श्च वि॒द्वान् ॥ ३ ॥

सः हि क्षपाऽवान् अग्निः रयीणां दाशत् यः अस्मै अरं सुऽउक्तैः ॥

एता चिकित्वः भूम नि पाहि देवानां जन्म मर्तान् च विद्वान् ॥ ३ ॥

जो ह्या अग्नीस उत्तम स्तोत्रांसह तृप्ति होईपर्यंत हवि अर्पण करतो, त्याचेकरितां हा रात्रीचा स्वामी अग्नि धनाचें भांडार देतो. देवांचा जन्म व मर्त्यजन ह्यांचे ज्यास ज्ञान आहे अशा हे ज्ञानशील अग्निदेवा, ह्या सर्व भूप्रदेशांचें संरक्षण कर. ॥ ३ ॥

वर्धा॒न्यं पू॒र्वीः क्ष॒पो वि॑रू॑पाः स्था॒तुश्च॒ रथ॑मृ॒तप्र॑वीतम् ॥

अरा॑धि॒ होता॒ स्व१॑र्निष॑त्तः कृ॒ण्वन्विश्वा॒न्यपां॑सि स॒त्या ॥ ४ ॥

वर्धान् यं पूर्वीः क्षपः विऽरूपाः स्थातुः च रथं ऋतऽप्रवीतम् ॥

अराधि होता स्वः निऽसत्तः कृण्वन् विश्वानि अपांसि सत्या ॥ ४ ॥

स्वर्गांत अधिष्ठित झालेला हा हविर्दाता अग्नि सत्यानें परिपूर्ण असे पराक्रम करीत असतां त्याची आराधना आमचेकडून झालेली आहे. हा सत्यानें परिवेष्टीत आहे. ह्याचें वर्धन भिन्न भिन्न स्वरूपांच्या अनेक रात्रींनी व त्याचप्रमाणे स्थावर जंगम सर्व पदार्थांनी केलें आहे. ॥ ४ ॥

गोषु प्रशस्तिं वनेषु धिषे भरन्त विश्वे बलिं स्वर्णः ॥

वि त्वा नरः पुरुत्रा संपर्यन्पितुर्न जिव्रेर्वि वेदो भरन्त ॥ ५ ॥

गोषु प्रऽशस्तिं वनेषु धिषे भरंत विश्वे बलिं स्वः नः ॥

वि त्वा नरः पुरुऽत्रा सपर्यन् पितुः न जिव्रेः वि वेदः भरंत ॥ ५ ॥

तूं आमच्या धेनूंची प्रशंसा करवितोस, तूं आमच्या तब्यांतील वनांची प्रशंसा करवितोस. आमच्या द्युलोकांतील सर्व मनुष्यें तुला स्वर्गांतील बलि अर्पण करतात. तुझी अनेक स्थानी मानवांकडून स्तुति झाली आहे व वृद्ध झालेल्या

पित्याची संपत्ति ज्याप्रमाणें त्याच्या पुत्रांस प्राप्त होते त्याप्रमाणें तुझेकडून त्यांस संपत्ति मिळालेली आहे. ॥ ५ ॥

सा॒धुर्न गृ॒ध्नुरस्ते॑व॒ शूरो॒ याते॑व भी॒मस्त्वे॒षः स॒मत्सु॑ ॥ ६ ॥

साधुः न गृध्नुः अस्ताऽइव शूरः याताऽइव भीमः स्त्वेषः समत्ऽसु ॥ ६ ॥

तो कार्यसाधु मनुष्याप्रमाणें आपला मतलब पकडणारा, अस्त्रकुशल मनुष्याप्रमाणें शूर, सूड उगविणाऱ्या खुनशी माणसाप्रमाणें भयप्रद व संग्रामांत उग्रपणा धारण करणारा आहे. ॥ ६ ॥

ॐ तत् सत्

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ७१ (अग्नि सूक्त)

ऋषि - पराशर शाक्त्य : देवता - अग्नि : छंद - त्रिष्टुभ्

उप॒ प्र जि॑न्वन्नुश॒तीरु॒शन्तं॒ पतिं॒ न नित्यं॒ जन॑यः॒ सनी॑ळाः ॥

स्वसा॑रः॒ श्यावी॒मरु॑षीमजुष्रञ्चि॒त्रमु॒च्छन्ती॑मु॒षसं॒ न गावः॑ ॥ १ ॥

उप प्र जिन्वन् उशतीः उशंतं पतिं न नित्यं जनयः सऽनीळाः ॥

स्वसारः श्यावीं अरुषीं अजुषन् चित्रं उच्छंतीं उषसं न गावः ॥ १ ॥

ज्याप्रमाणे प्रेमळ बायका आपल्या प्रेमळ पतीस संतुष्ट करतात त्याचप्रमाणें एकाच ठिकाणीं राहणाऱ्या ह्या स्त्रियांनी त्यास संतुष्ट केलें आहे. ज्याप्रमाणें उषेला पाहून गाईंना आनंद होतो त्याप्रमाणें ह्यांनी आश्चर्यकरक

तेजाच्या योगानें प्रकाशमान होणारा शुभ्रवर्ण दिवस व कृष्णवर्ण रात्र ह्यांस पाहून त्यांचे आनंदानें स्वागत केलें आहे. ॥ १ ॥

वी॒ळु चि॑द्दृ॒ळ्हा पि॒तरो॑ न उ॒क्थैरद्रिं॑ रुज॒न्नङ्गि॑रसो॒ रवे॑ण ॥

च॒क्रुर्दि॒वो बृ॑ह॒तो गा॒तु॒म॒स्मे अहः॒ स्वर्विविदुः के॒तु॒मु॒स्राः ॥ २ ॥

वीळु चित् दृळ्हा पितरः नः उक्थैः अद्रिं रुजन् अङ्गिरसः रवेण ॥

चक्रुः दिवः बृहतः गातुं अस्मे अहरिति स्वः विविदुः केतुं उस्राः ॥ २ ॥

आमच्या पितरांनी नुसत्या स्तोत्रसामर्थ्यांनी अत्यंत दुर्भेद्य असे दुर्गही फोडून टाकले. त्याचप्रमाणे अंगिरसांनी स्तोत्रघोषानें पर्वतांचा भंग केला. त्यांनी आमचेकरितां विस्तीर्ण द्युलोकाकडे जाण्यास मार्ग तयार केला व दिवस, स्वर्ग, दीप्ति आणि प्रकाश ह्यांचा लाभ करून घेतला. ॥ २ ॥

दध॑न्नृ॒तं ध॒नय॑न्नस्य धी॒तिमादिद॒र्यो दि॑धि॒ष्वो विभृ॑त्राः ॥

अतृ॑ष्यन्तीरपसौ॑ यन्त्यच्छा॑ देवाञ्जन्म॒ प्रय॑सा वर्धय॑न्तीः ॥ ३ ॥

दधन् ऋतं धनयन् अस्य धीतिं आत् इत् अर्यः दिधिष्वः विऽभृत्राः ॥

अतृष्यंतीः अपसः यंति अच्छ देवान् जन्म प्रयसा वर्धयंतीः ॥ ३ ॥

प्रेमाने त्याची उपासना करणारे जे त्याचे किंकर त्यांनी त्याच्या सत्यनियमांचे अवलंबन केले व त्यांच्या प्रार्थना सफल करून घेतल्या. देवसमुदायास संतुष्ट करणाऱ्या कर्मव्यापृत परंतु निर्लोभ अशा त्या अग्नीकडे गमन करीत असतात. ॥ ३ ॥

मथीद्यदीं॑ विभृ॑तो मात॒रिश्वा॑ गृहेगृ॑हे श्येतो जेन्यो॒ भूत् ॥

आदीं॒ राज्ञे न सही॑यसे सचा॒ सन्ना दूत्यं१॑ भृग॑वाणो विवाय ॥ ४ ॥

मथीत् यत् ईं विऽभृतः मातरिश्वा गृहेऽगृहे श्येतः जेन्यः भूत् ॥

आत् ईं राज्ञे न सहीयसे सचा सन् आ दूत्यं भृगवाणः विवाय ॥ ४ ॥

त्यास सर्वव्यापी मातरिश्वा ह्यानें मन्थन करून उत्पन्न केलें तेव्हांपासून हा देदीप्यमान अग्नि प्रत्येक घरांत प्रादुर्भूत होऊं लागला. एखाद्या बलिष्ठ राजाची कामगिरी अंगावर घेतल्याप्रमाणें त्या भृगुसारखा दिसणाऱ्या अग्निदेवानें प्रत्येक ठिकाणीं हजर राहून सर्वांचे प्रतिनिधित्व पत्करलें आहे. ॥ ४ ॥

म॒हे यत्पि॒त्र ईं॒ रसं॑ दि॒वे कर॑व त्सरत्पृश॒न्यश्चिकि॒त्वान् ॥

सृ॒जदस्ता॑ धृ॒ष॒ता दि॒द्युमं॑स्मै॒ स्वाया॑ दे॒वो दु॑हि॒तरि॒ त्विषिं॑ धात् ॥ ५ ॥

महे यत् पित्र ईं रसं दिवे कः अव त्सरत् पृशन्यः चिकित्वान् ॥

सृजत् अस्ता धृषता दिद्युं अस्मै स्वायां देवः दुहितरि त्विषिं धात् ॥ ५ ॥

अग्निदेव हा चित्रविचित्र कांतीने युक्त व प्रज्ञावान आहे. आपला पिता जो श्रेष्ठ द्युलोक ह्याची हौस त्यानें पुरविली व मग तो खालीं निघून गेला. त्याबरोबर त्याचेवर रागाने अस्त्रवेत्त्या पराक्रमी पुरुषानें प्रज्वलित बाण सोडला, व त्या दिव्य लोकानें आपल्या कन्येचे ठिकाणीं प्रकाश उत्पन्न केला. ॥ ५ ॥

स्व आ यस्तुभ्यं॒ दम॒ आ वि॒भाति॒ नमो॑ वा॒ दाशा॑दुश॒तो अनु॒ द्यून् ॥

वर्धो॑ अग्ने॒ वयो॑ अस्य द्वि॒बर्हा॒ यास॑द्रा॒या स॒रथं॒ यं जु॒नासि॑ ॥ ६ ॥

स्वे आ यः तुभ्यं दमे आ विऽभाति नमः वा दाशात् उशतः अनु द्यून् ॥

वर्धो इति अग्ने वयः अस्य द्विऽबर्हा यासत् राया सऽरथं यं जुनासि ॥ ६ ॥

जो आपल्या घरी तुझे प्रित्यर्थ तुझी ज्वाला प्रज्वलित करतो, आणि भक्तांच्या उपासनेचा आवडीनें स्वीकार करणाऱ्या तुला जो प्रत्यहीं नमन करतो त्याचे, हे द्विगुणित कांतीनें विभूषित असणाऱ्या अग्निदेवा, तूं आयुष्य वाढव. ज्याचा तूं कैवार घेतोस त्यास वैभव प्राप्त होऊन तो रथांत बसो. ॥ ६ ॥

अ॒ग्निं विश्वा॑ अ॒भि पृक्षः॑ सचन्ते समु॒द्रं न स्र॒वतः॑ स॒प्त य॒ह्वीः ॥

न जा॒मिभि॒र्वि चि॑किते॒ वयो॑ नो वि॒दा दे॒वेषु॒ प्रम॑तिं चिकि॒त्वान् ॥ ७ ॥

अग्निं विश्वा अभि पृक्षः सचंते समुद्रं न स्रवतः सप्त यह्वीः ॥

न जामिऽभिः वि चिकिते वयः नः विदाः देवेषु प्रऽमतिं चिकित्वान् ॥ ७ ॥

ज्याप्रमाणे सप्त महानद्या समुद्रास जाऊन मिळतात त्याप्रमाणें विश्वांतील सर्व हवि अग्नीकडेच जातात. आमच्या अगदी जवळच्या नातलगांस सुद्धां आमचें आयुष्य किती आहे ह्याचें ज्ञान नाहीं, पण तूं इतका प्रज्ञावान आहेस कीं देवा मनांत काय विचार चालतात ते सुद्धां तुला विदित होतात. ॥ ७ ॥

आ यदि॒षे नृ॒पतिं॒ तेज॒ आन॒ट् शुचि॒ रेतो॒ निषि॑क्तं॒ द्यौर॒भीके॑ ॥

अ॒ग्निः शर्ध॑मनव॒द्यं युवा॑नं स्वा॒ध्यं जनयत्सू॒दय॑च् च ॥ ८ ॥

आ यत् इषे नृऽपतिं तेजः आनट् शुचि रेतः निऽसिक्तं द्यौः अभीके ॥

अग्निः शर्धं अनवद्यं युवानं सुऽआध्यं जनयत् सूदयत् च ॥ ८ ॥

ज्यावेळी सर्व लोकांचा स्वामी जो अग्निदेव त्यास विश्वामध्यें सुखसमृद्धि नांदावी म्हणून त्याच्या तेजानें व्यापून टाकलें त्यावेळी खरोखर उज्ज्वल वीर्यानेंच त्याचे शरीरांत संचार केला. हें सर्व पहाण्यास द्युलोक जवळच साक्षी होता. मग त्या वीर्याचे योगानें अग्नीनें तारुण्ययुक्त, सुविचारसंपन्न व निर्दोष अशी प्रजा निर्माण केली आणि त्यांस आपल्या कर्मास प्रवृत्त केलें. ॥ ८ ॥

मनो॒ न योऽ॑ध्वनः स॒द्य एत्येकः॑ स॒त्रा सूरो॒ वस्व॑ ईशे ॥

राजा॑ना मि॒त्रावरु॑णा सुपा॒णी गोषु॑ प्रि॒यम॒मृतं॒ रक्ष॑माणा ॥ ९ ॥

मनः न यः अध्वनः सद्यः एति एकः सत्रा सूरः वस्वः ईशे ॥

राजाना मित्रावरुणा सुपाणी इति सुऽपाणी गोषु प्रियं अमृतं रक्षमाणा ॥ ९ ॥

ज्याचें आपल्या मार्गानें मनाप्रमाणें त्वरेने गमन होत असतें तो सूर्य संपत्तीवर स्वतः एकटा अधिकार गाजवितो. मित्र आणि वरुण हे सुंदर हस्तांनी सुशोभित असलेले सार्वभौम, धेनूंचे ठिकाणीं असलेल्या गोड अमृताचें रक्षण करीत असतात. ॥ ९ ॥

मा नो॑ अग्ने स॒ख्या पित्र्या॑णि॒ प्र म॑र्षिष्ठा अ॒भि वि॒दुष्क॒विः सन् ॥

नभो॒ न रू॒पं ज॑रि॒मा मि॑नाति पु॒रा तस्या॑ अ॒भिश॑स्ते॒रधी॑हि ॥ १० ॥

मा नः अग्ने सख्या पित्र्याणि प्र मर्षिष्ठाः अभि विदुः कविः सन् ॥

नभः न रूपं जरिमा मिनाति पुरा तस्याः अभिऽशस्तेः अधि इहि ॥ १० ॥

हे अग्निदेवा, ज्या अर्थी तूं अतिशय ज्ञाता व प्रज्ञाशाली आहेस, त्या अर्थी आमच्या वाडवडिलांपासून आमच्याशीं तुझा चालत आलेला स्नेहसंबंध तूं तोडून टाकूं नकोस. वार्धक्य हें काळ्या ढगाप्रमाणें सुंदर रूपाचा बिघाड करणारें आहे, म्हणून त्या दुष्टाच्या येण्याचे अगोदर तुंच आमचेकडे ये. ॥ १० ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ७२ (अग्नि सूक्त)

ऋषि - पराशर शाक्त्य : देवता - अग्नि : छंद - त्रिष्टुभ्

नि काव्या॑ वे॒धसः॒ शश्व॑तस्क॒र्हस्ते॒ दधा॑नो॒ नर्या॑ पु॒रूणि॑ ॥

अ॒ग्निर्भु॑वद्रयि॒पती॑ रयी॒णां स॒त्रा च॑क्रा॒णो अ॒मृता॑नि॒ विश्वा॑ ॥ १ ॥

नि काव्या वेधसः शश्वतः कः हस्ते दधानः नर्या पुरूणि ॥

अग्निः भुवत् रयिऽपतिः रयीणां सत्रा चक्राणः अमृतानि विश्वा ॥ १ ॥

अनेक हितकारक लाभ आपले हती ठेवणाऱ्या अग्निदेवानें कित्येक कवींचीं काव्यें आपल्याकडे आकर्षून घेतली आहेत. सर्व प्रकारची शाश्वत संपत्ति सदैव निर्माण करून अग्नि वैभवांचा स्वामी झाला आहे. ॥ १ ॥

अ॒स्मे व॒त्सं परि॒ षन्तं॒ न वि॑न्दन्नि॒च्छन्तो॒ विश्वे॑ अ॒मृता॒ अमू॑राः ॥

श्र॒म॒युवः॑ पद॒व्यो धि॒यं॒धास्त॒स्थुः प॒दे प॑र॒मे चार्व॒ग्नेः ॥ २ ॥

अस्मे इति वत्सं परि संतं न विंदन् इच्छंतः विश्वे अमृताः अमूराः ॥

श्रमऽयुवः पदऽव्यः धियंऽधाः तस्थुः पदे परमे चारु अग्नेः ॥ २ ॥

ज्यांचे मन गोंधळून जाणें संभवनीय नाहीं अशा सर्व देवांनी आमचेकडे आमचे भोंवती भोंवती बसून राहणाऱ्या ह्या बालकाचा मनःपूर्वक शोध केला तरी त्यांस हे बालक सांपडलें नाही. पण त्याच्या पावलांमागें जातां जातां

श्रमानें थकलेल्या देवांनी त्याची स्तुति करतांच अग्नीच्या श्रेष्ठ पदाचे ठिकाणी ते सहज रीतीनें जाऊन उभे राहिले. ॥ २ ॥

ति॒स्रो यद॑ग्ने श॒रद॒स्त्वामिच्छुचिं॑ घृ॒तेन॒ शुच॑यः सप॒र्यान् ॥

नामा॑नि चिद्दधिरे य॒ज्ञिया॒न्यसू॑दयन्त त॒न्वः१॒॑ सुजा॑ताः ॥ ३ ॥

तिस्रः यत् अग्ने शरदः त्वां इच् शुचिं घृतेन शुचयः सपर्यान् ॥

नामानि चित् दधिरे यज्ञियानि असूदयंत तन्वः सुऽजाताः ॥ ३ ॥

हे अग्निदेवा, तूं देदीप्यमान आहेस. ज्यावेळीं त्या तेजस्वी पुरुषांनी तीन वर्षेपर्यंत तुझी घृतानें पूजा केली त्यावेळी यज्ञांत सर्वत्र विदित अशी पदवी त्यांस प्राप्त झाली व त्या सुंदर पुरुषांना महत्कृत्यें करण्याकडे आपल्या स्वतःची प्रेरणा करतां येऊं लागली. ॥ ३ ॥

आ रोद॑सी बृ॒ह॒ती वेवि॑दानाः॒ प्र रु॒द्रिया॑ जभ्रिरे य॒ज्ञिया॑सः ॥

विदन्मर्तो नेमधिता चिकित्वानग्निं पदे परमे तस्थिवांसम् ॥ ४ ॥

आ रोदसी इति बृहती इति वेविदानाः प्र रुद्रिया जभ्रिरे यज्ञियासः ॥

विदत् मर्तः नेमऽधिता चिकित्वान् अग्निं पदे परमे तस्थिऽवांसम् ॥ ४ ॥

विशाल असे द्युलोक व पृथ्वीलोक हयांतून शोध करतां करतां त्या यज्ञार्ह पुरुषांस रुद्राचे सामर्थ्याचा लाभ झाला. जेव्हां मर्त्य माणसांना हें विदित झालें तेव्हां अत्यंत श्रेष्ठ पदावर विराजमान झालेल्या अग्नीस ते उच्च स्थानावर आरोहण करून जाणण्यास समर्थ झाले. ॥ ४ ॥

संजानाना उप सीदन्नभिज्ञु पत्नीवन्तो नमस्यं नमस्यन् ॥

रिरिक्वांसस्तन्वः कृण्वत स्वाः सखा सख्युर्निमिषि रक्षमाणाः ॥ ५ ॥

संऽजानानाः उप सीदन् अभिऽज्ञु पत्नीऽवंतः नमस्यं नमस्यन्निति नमस्यन् ॥

रिरिक्वांसः स्तन्वः कृण्वत स्वाः सखा सख्युः निऽमिषि रक्षमाणाः ॥ ५ ॥

तुझें ज्ञान झाल्यावर ते गुडघे टेंकून तुझे समीप बसले, आणि तूं त्यांस अत्यंत पूज्य असल्यामुळें तुला त्यांनी वंदन केलें. एका मित्राचा डोळा लागला असतां दुसऱ्या मित्रानें तेथें रक्षण करीत बसावें अशा रीतीने अतिरिक्त प्रयत्न करून त्यांनी आपले स्वतःस अमर करून घेतले. ॥ ५ ॥

त्रिः सप्त यद्गुह्यानि त्वे इत्पदाविदन्निहिता यज्ञियासः ॥

तेभी रक्षन्ते अमृतं सजोषाः पशूञ्च स्थातॄञ्चरथं च पाहि ॥ ६ ॥

त्रिः सप्त यत् गुह्यानि त्वे इति इत् पदा अविदन् निऽहिता यज्ञियासः ॥

तेभीः रक्षंते अमृतं सऽजोषाः पशून् च स्थातॄन् चरथं च पाहि ॥ ६ ॥

जी एकवीस गुह्य पदें फक्त तुझ्याच ठिकाणी ठेवलेलीं आहेत त्यांचे त्या यज्ञार्ह पुरुषांस ज्ञान झालें. त्या गुह्य पदांच्याच योगानें ते ऐक्यभावानें राहून स्वतःच्या अमरत्वाचें रक्षण करीत असतात. हे अग्निदेवा, तूं आमच्या गुरावासरांचे व स्थावर जंगम संपत्तीचें परिपालन कर. ॥ ६ ॥

विद्वाँ अग्ने वयुनानि क्षितीनां व्यानुषक् छुरुधो जीवसे धाः ॥

अ॒न्त॒र्वि॒द्वाँ अध्व॑नो देव॒याना॒नत॑न्द्रो दू॒तो अ॑भवो हवि॒र्वाट् ॥ ७ ॥

विद्वान् अग्ने वयुनानि क्षितीनां वि आनुषक् शुरुधः जीवसे धाः ॥

अंतःऽविद्वान् अध्वनः देवऽयानान् अतंद्रः दूतः अभवः हविःऽवाट् ॥ ७ ॥

हे अग्निदेवा, सर्व मनुष्याचे विचार तूं जाणार असून त्यांच्या जीवनार्थ त्यांच्या पोषणाची तूं चिरकालिक योजना केलेली आहेस, देवांचे गमन करण्याचे अंतर्मार्गही तुला विदित आहेत व त्यामुळें तूं त्यांस हवि पोहोंचविणारा दूत झाला आहेस. तुला आलस्य कसें तें माहीत नाहीं. ॥ ७ ॥

स्वा॒ध्यो दि॒व आ स॒प्त य॒ह्वी रा॒यो दुरो॒ व्यृत॒ज्ञा अ॑जानन् ॥

वि॒दद्गव्यं॑ स॒रमा॑ दृ॒ळ्हमू॒र्वं येना॒ नु कं॒ मानु॑षी॒ भोज॑ते॒ विट् ॥ ८ ॥

सुऽआध्यः दिवः आ सप्त यह्वीः रायः दुरः वि ऋतऽज्ञाः अजानन् ॥

विदत् गव्यं सरमा दृळ्हं ऊर्वं येना नु कं मानुषी भोजते विट् ॥ ८ ॥

तुझे चिंतन करणाऱ्या व तुझे सत्यनियम पाळणाऱ्या त्या पुरुषांस द्युलोकांतील सप्त नद्या व संपत्तीचीं द्वारें ह्यांचे ज्ञान झालें. सरमेसही गाई कोंडून ठेवलेले दुर्भेद्यस्थान सांपडलें. ह्याचे योगानेंच मानवजातीस सुखांत राहतां येत आहे. ॥ ८ ॥

आ ये विश्वा स्वपत्यानि तस्थुः कृण्वानासो अमृतत्वाय गातुम् ॥

महना महद्भिः पृथिवी वि तस्थे माता पुत्रैरदितिर्धायसे वेः ॥ ९ ॥

आ ये विश्वा सुअपत्यानि तस्थुः कृण्वानासः अमृतऽत्वाय गातुम् ॥

महना महद्भिः पृथिवी वि तस्थे माता पुत्रैः अदितिः धायसे वेरिति वेः ॥ ९ ॥

अमरत्व मिळविण्याकरितां मार्ग तयार करण्याच्या उद्देशानें जे पुरुष आपल्या सर्व अपत्यांजवळ साहाय्य याचनार्थ गेले त्या श्रेष्ठ पुरुषांकरितां पृथ्वी आपल्या सामर्थ्यानें विस्तृत झाली- त्या आपल्या पुत्रांकरितां- आपल्या चिमुकल्या पांखरांस आपली तृषा भागवितां यावी म्हणून- अदिति मातेनें विशाल रूप धारण केलें. ॥ ९ ॥

अधि श्रियं नि दधुश्चारुमस्मिन्दिवो यदक्षी अमृता अकृण्वन् ॥

अध॑ क्षरन्ति॒ सिन्ध॑वो॒ न सृ॒ष्टाः प्र नीची॑रग्ने॒ अरु॑षीरजानन् ॥ १० ॥

अधि श्रियं नि दधुः चारुं अस्मिन् दिवः यत् अक्षी इति अमृताः अकृण्वन् ॥

अध क्षरंति सिंधवः न सृष्टाः प्र नीचीः अग्ने अरुषीः अजानन् ॥ १० ॥

मृत्यूपासून मुक्त असलेल्या देवांनी ज्यावेळीं स्वर्गलोकाचे दोन डोळे निर्माण केले त्यावेळीं त्यांनी ह्या अग्नीचे ठिकाणीं अत्यंत सुंदर तेज ठेवलें त्याबरोबर अगदीं मोकळ्या सोडल्याप्रमाणें अग्नीपासून तेजाच्या नद्या वाहूं लागल्या व त्या, खाली पृथ्वीवर आल्याबरोबर, अखिल प्राणिमात्रांस त्यांचे ज्ञान झालें ॥ १० ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ७३ (अग्नि सूक्त)

ऋषि - पराशर शाक्त्य : देवता - अग्नि : छंद - त्रिष्टुभ्

र॒यिर्न यः पि॑तृवि॒त्तो व॑यो॒धाः सु॒प्रणी॑तिश्चिकि॒तुषो॒ न शासुः॑ ॥

स्यो॒न॒शीरति॑थि॒र्न प्री॑णा॒नो होते॑व॒ सद्म॑ वि॒धतो॒ वि ता॑रीत् ॥ १ ॥

रयिः न यः पितृऽवित्तः वयःऽधाः सुऽप्रनीतिः चिकितुषः न शासुः ॥

स्योनऽशीः अतिथिः न प्रीणानः होताऽइव सद्म विधतः वि तारीत् ॥ १ ॥

जो अग्निदेव बापापासून मिळालेल्या संपत्तीप्रमाणें आयुष्यास वृद्धिकारक होतो, ज्ञानी मनुष्याच्या उपदेशाप्रमाणें जो सन्मार्ग दाखवून देतो, ज्याची बरदास्त उत्तम आहे अशा पाहुण्याप्रमाणें जो संतुष्ट होतो, अशा ह्या अग्निदेवानें भक्ताचे हवि पोंचविण्याचे कार्य करून उपासकाचें घर समृद्धीनें भरून टाकलें आहे. ॥ १ ॥

दे॒वो न यः स॑वि॒ता स॒त्यम॑न्मा॒ क्रत्वा॑ नि॒पाति॑ वृ॒जना॑नि॒ विश्वा॑ ॥

पु॒रु॒प्र॒श॒स्तो अ॒मति॒र्न स॒त्य आ॒त्मेव॒ शेवो॑ दिधि॒षाय्यो॑ भूत् ॥ २ ॥

देवः न यः सविता सत्यऽमन्मा क्रत्वा निऽपाति वृजनानि विश्वा ॥

पुरुऽप्रशस्तः अमतिः न सत्यः आत्माऽइव शेवः दिधिषाय्यः भूत् ॥ २ ॥

जो सवितादेवाप्रमाणें सत्यबुद्धिशील आहे, जो आपल्या सामर्थ्यानें सर्व दुरितांचा निःपात करतो, ज्याची स्तुति अनेकांकडून झालेली आहे, स्वतःचें रूप जसें बदलतां येत नाहीं त्याप्रमाणें जो कधींही बदलत नाहीं, स्वतःच्या प्राणामुळें जो मनुष्यास सुखदायक वाटतो असा हा अग्निदेव सर्वांस प्रिय झाला आहे. ॥ २ ॥

देवो न यः पृथिवीं विश्वधाया उपक्षेति हितमित्रो न राजा ॥

पुरःसदः शर्मसदो न वीरा अनवद्या पतिजुष्टेव नारी ॥ ३ ॥

देवः न यः पृथिवीं विश्वऽधायाः उपऽक्षेति हितऽमित्रः न राजा ॥

पुरःऽसदः शर्मऽसदः न वीराः अनवद्या पतिजुष्टाऽइव नारी ॥ ३ ॥

एखाद्या देवाप्रमाणें विश्वाचें पोषण करून, हितकारक व मित्रत्व धारण करणाऱ्या नृपतीप्रमाणें, अथवा युद्धांत पुढाकार घेणाऱ्या व सुखांत लोळणाऱ्या वीरांप्रमाणें अथवा एखाद्या पतिप्रिय व निष्कलंक स्त्रीप्रमाणें सर्वांस सन्माननीय होऊन ह्या पृथ्वीवर तो विराजमान होतो. ॥ ३ ॥

तं त्वा नरो दम आ नित्यमिद्धमग्ने सचन्त क्षितिषु ध्रुवासु ॥

अधि द्युम्नं नि दधुर्भूर्यस्मिन्भवा विश्वायुर्धरुणो रयीणाम् ॥ ४ ॥

तं त्वा नरः दमे आ नित्यं इद्धं अग्ने सचंत क्षितिषु ध्रुवासु ॥

अधि द्युम्नं नि दधुः भूरि अस्मिन् भव विश्वऽआयुः धरुणः रयीणाम् ॥ ४ ॥

हे अग्निदेवा, प्रत्येक गृहीं प्रज्वलित होणाऱ्या तुला ह्या सनातन विश्वांत मनुष्यें भजत आलीं आहेत. ह्या अग्नीचे ठिकाणीं त्यांनी पुष्कळ धन अर्पण केलें आहे, म्हणून हे अग्निदेवा, तूं त्यांचे करितां वैभव घेऊन ये. तूं सर्व विश्वाचा प्राण आहेस. ॥ ४ ॥

वि पृक्षो अग्ने मघवानो अश्युर्वि सूरयो ददतो विश्वमायुः ॥

सनेम वाजं समिथेष्वर्यो भागं देवेषु श्रवसे दधानाः ॥ ५ ॥

वि पृक्षः अग्ने मघऽवानः अश्युः वि सूरयः ददतः विश्वं आयुः ॥

सनेम वाजं संऽइथेषु अर्यः भागं देवेषु श्रवसे दधानाः ॥ ५ ॥

हे अग्निदेवा, तुझी उपासना करणाऱ्यांना पोटभर अन्न मिळालेंच पाहिजे. तुला हवि अर्पण करणाऱ्या विद्‌वान् स्तोत्यांस पूर्ण आयुष्य प्राप्त झालेंच पाहिजे. आम्हांस विजय मिळावा म्हणून देवांसाठी त्यांचा हविर्भाग तयार करून ठेवणारे जे आम्ही भक्तिमान लोक त्यांस युद्धांत शौर्याचा लाभ खात्रीनें होईल. ॥ ५ ॥

ऋ॒तस्य॒ हि धे॒नवो॑ वावशा॒नाः स्मदू॑ध्नीः पी॒पय॑न्त॒ द्‌युभ॑क्ताः ॥

प॒रा॒वतः॑ सु॒म॒तिं भिक्ष॑माणा॒ वि सिन्ध॑वः स॒मया॑ सस्रु॒रद्रि॑म् ॥ ६ ॥

ऋतस्य हि धेनवः वावशानाः स्मत्ऽऊध्नीः पीपयंत द्‌युऽभक्ताः ॥

पराऽवतः सुऽमतिं भिक्षमाणाः वि सिंधवः समया सस्रुः अद्रिम् ॥ ६ ॥

तुझ्या सत्य नियमनांचा अभिमान धारण करणाऱ्या व स्वर्गलोकांतील एक हिस्सा प्राप्त करून घेणाऱ्या धेनूंची सर्व जगास, आपल्या सदोदित भरपूर भरलेल्या कांसेंतील दुग्ध उत्सुकतेनें पाजले. तुझ्या कृपेची याचना करणाऱ्या महानद्‌या फार लांबच्या प्रदेशांतून पर्वताचे संनिध येऊन ठेपल्या. ॥ ६ ॥

त्वे अ॑ग्ने सुम॒तिं भिक्ष॑माणा दि॒वि श्रवो॑ दधिरे य॒ज्ञिया॑सः ॥

नक्ता॑ च च॒क्रुरु॒षसा॒ विरू॑पे कृ॒ष्णं च॒ वर्ण॑मरु॒णं च॒ सं धुः॑ ॥ ७ ॥

त्वे इति अग्ने सुऽमतिं भिक्षमाणाः दिवि श्रवः दधिरे यज्ञियासः ॥

नक्ता च चक्रुः उषसा विरूपे इति विऽरूपे कृष्णं च वर्णं अरुणं च सं धुरिति धुः ॥ ७ ॥

हे अग्निदेवा पवित्र देवांनी तुझेजवळ कृपेची भिक्षा मागून स्वर्गलोकांत कीर्ति मिळविली. त्यांनी रात्र व उषा ह्या दोन भिन्न स्वरूपाच्या देवतांस उत्पन्न केलें आणि ह्याप्रमाणें काळा रंग व तांबडा रंग ह्यांस त्यांनी एका जागीं आणले. ॥ ७ ॥

यान्रा॒ये मर्ता॒न्सुषू॑दो अग्ने॒ ते स्या॑म म॒घवा॑नो व॒यं च॑ ॥

छा॒येव॒ विश्वं॒ भुव॑नं सिसक्ष्यापप्रि॒वान्रोद॑सी अ॒न्तरि॑क्षम् ॥ ८ ॥

यान् राये मर्तान् सुसूदः अग्ने ते स्याम मघऽवानः वयं च ॥

छायाऽइव विश्वं भुवनं सिसक्षि आपप्रिऽवान् रोदसी इति अंतरिक्षम् ॥ ८ ॥

हे अग्निदेवा, ज्या आम्हां मानवांची तूं वैभवप्राप्त्यर्थ योजना करून ठेविली आहेस त्या अर्थी आम्हींही तुला हवि अर्पण करूं. द्युलोक व पृथ्वीलोक ह्यांची जोडी आणि अंतरिक्ष ह्यांस व्याप्त करून तूं छायेप्रमाणें ह्या सर्व विश्वास चिकटला आहेस. ॥ ८ ॥

अर्वद्भिरग्ने अर्वतो नृभिर्नृन्वीरैर्वीरान्वनुयामा त्वोताः ॥

ईशानासः पितृवित्तस्य रायो वि सूरयः शतहिमा नो अश्युः ॥ ९ ॥

अर्वत्ऽभिः अग्ने अर्वतः नृभिः नृन् वीरैः वीरान् वनुयाम त्वाऽऊताः ॥

ईशानासः पितृऽवित्तस्य रायः वि सूरयः शतऽहिमाः नः अश्युः ॥ ९ ॥

हे अग्निदेवा, तूं आमचा संरक्षक झालास तर आम्हीं आपल्या अश्वांनी शत्रूच्या अश्वांस जिंकू. आम्ही आपल्या माणसांकडून शत्रूंची माणसें जेरीस आणूं, व आम्ही आपल्या लढवय्यांकडून शत्रूकडील योध्यांस पराभूत करूं.

आमच्या कुलांतील विद्वान् पुरुषांस वाडवडिलांनी मिळविलेल्या संपत्तीचें स्वामित्व मिळून त्यांस शंभर वर्षें आयुष्य प्राप्त होवो. ॥ ९ ॥

ए॒ता ते॑ अग्न उ॒चथा॑नि वेधो॒ जुष्टा॑नि सन्तु॒ मन॑से हृ॒दे च॑ ॥

श॒केम॑ रा॒यः सु॒धुरो॒ यम॒ं तेऽधि॒ श्रवो॑ दे॒वभ॑क्तं॒ दधा॑नाः ॥ १० ॥

एता ते अग्न उचथानि वेधः जुष्टानि संतु मनसे हृदे च ॥

शकेम रायः सुऽधुरः यमं ते अधि श्रवः देवऽभक्तं दधानाः ॥ १० ॥

हे कर्तृत्ववान् अग्निदेवा, ही तुझी स्तोत्रें तुझ्या चित्तास व अंतःकरणास प्रिय होवोत. देवांच्या कृपेनें प्राप्त झालेली कीर्ति धारण करीत आम्ही सर्व वैभवांवर ताबा चालविणारा जो तूं त्या तुझे नियम पाळण्यास खचित समर्थ होऊं. ॥ १० ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ७४ (अग्नि सूक्त)

ऋषि - गोतम राहूगण : देवता - अग्नि : छंद - गायत्री

उपप्रयन्तो अध्वरं मन्त्रं वोचेमाग्नये ॥

आरे अस्मे च शृण्वते ॥ १ ॥

उपऽप्रयंतः अध्वरं मंत्रं वोचेम अग्नये ॥

आरे अस्मे इति च शृण्वते ॥ १ ॥

जो आपली हांक लांब असतांनासुद्धां ऐकतो अशा ह्या अग्निप्रित्यर्थ आपण एक स्तोत्र म्हणू या. ॥ १ ॥

यः स्नीहितीषु पूर्व्यः संजग्मानासु कृष्टिषु ॥

अरक्षद्दाशुषे गयम् ॥ २ ॥

यः स्नीहितीषु पूर्व्यः संऽजग्मानासु कृष्टिषु ॥

अरक्षत् दाशुषे गयम् ॥ २ ॥

जेव्हां एकमेकाचा वध करण्याच्या हेतुनें माणसे एकमेकांवर तुटून पडतात तेव्हां ह्या पुरातन अग्निदेवानें भक्ताकरितां त्याच्या घरादाराचा सांभाळ केला आहे. ॥ २ ॥

उत ब्रुवन्तु जन्तव उदग्निर्वृत्रहाजनि ॥

धनञ्जयो रणेरणे ॥ ३ ॥

उत ब्रुवंतु जंतवः उत् अग्निः वृत्रऽहा अजनि ॥

धनंऽजयः रणेऽरणे ॥ ३ ॥

आतां लोकांना बिनधोक म्हणू द्या कीं प्रत्येक युद्धांतून धनाची लूट आणणाऱ्या ह्या अग्निदेवानें वृत्राचे वधार्थ जन्म घेतला होता. ॥ ३ ॥

यस्य दूतो असि क्षये वेषि हव्यानि वीतये ॥

दस्मत्कृणोष्यध्वरम् ॥ ४ ॥

यस्य दूतः असि क्षये वेषि हव्यानि वीतये ॥

दस्मत् कृणोषि अध्वरम् ॥ ४ ॥

ज्याच्या घरी तूं देवाचा प्रतिनिधि ह्या नात्यानें राहतोस, ज्याच्या हवीचा आस्वाद घेण्याकरितां तूं तिकडे गमन करतोस, अथवा ज्याचा यज्ञ सुंदर व्हावा अशी तू तजवीज करतोस, ॥ ४ ॥

तमित्सुहव्यमङ्गिरः सुदेवं सहसो यहो ॥

जना आहुः सुबर्हिषम् ॥ ५ ॥

तं इत् सुऽहव्यं अङ्गिरः सुऽदेवं सहसः यहो इति ॥

जना आहुः सुऽबर्हिषम् ॥ ५ ॥

हे अंगिरसा, हे सामर्थ्यापासून जन्म पावणाऱ्या अग्निदेवा, त्याच मनुष्याचा हवि उत्तम झाला असे लोक म्हणतात. तोच अतिशय तेजस्वी असे लोक समजतात, त्याचाच यज्ञ उत्तम अशी लोकांत प्रशंसा होते. ॥ ५ ॥

आ च॒ वहा॑सि॒ ताँ इ॒ह दे॒वाँ उप॒ प्रश॑स्तये ॥

ह॒व्या सु॑श्चन्द्र वी॒तये॑ ॥ ६ ॥

आ च वहासि तान् इह देवान् उप प्रऽशस्तये ॥

हव्या सुऽचंद्र वीतये ॥ ६ ॥

हे अत्यंत आल्हाद देणाऱ्या अग्निदेवा, हवींचा आस्वाद घेण्याकरितां व स्तवनांचा स्वीकार करण्याकरितां त्या सुप्रसिद्ध देवांस तूं इकडे घेऊन येत असतोस. ॥ ६ ॥

न योरु॑प॒ब्दिरश्व्य॑ः शृ॒ण्वे रथ॑स्य॒ कच्च॒न ॥

यद॑ग्ने॒ यासि॑ दू॒त्यम् ॥ ७ ॥

न योः उपब्दिः अश्व्यः शृण्वे रथस्य कत् चन ॥

यत् अग्ने यासि दूत्यम् ॥ ७ ॥

हे अग्निदेवा, जेव्हां तू आपलें प्रतिनिधिपणाचे कार्य बजावण्याकरितां जातोस त्यावेळीं तुझ्या रथाचा अथवा अश्वांच्या चालण्याचा शब्द मुळींच ऐकूं येत नाहीं. ॥ ७ ॥

त्वोतो॑ वा॒ज्यह्र॑योऽ॒भि पू॒र्व॑स्मा॒दप॑रः ॥

प्र दा॒श्वाँ अ॑ग्ने अस्थात् ॥ ८ ॥

त्वाऽऊतः वाजि अह्रयः अभि पूर्वस्मात् अपरः ॥

प्र दाश्वान् अग्ने अस्थात् ॥ ८ ॥

अग्निदेवा जेव्हां तुला हवि अर्पण करणाऱ्यास तूं आपले संरक्षणाखाली घेतलेंस तेव्हां त्याचें बल वाढून व हीन स्थिति नाहींशी होऊन तो पूर्वीपेक्षां उच्च स्थितीस चढला व भरभराटीस पोंहोचला. ॥ ८ ॥

उत द्युमत्सुवीर्यम् बृहदंग्ने विवाससि ॥

देवेभ्यो देव दाशुषे ॥ ९ ॥

उत द्युऽमत् सुऽवीर्यं बृहत् अग्ने विवाससि ॥

देवेभ्यः देव दाशुषे ॥ ९ ॥

अग्निदेवा, देवास हवि देणाऱ्यास तूं तेजानें युक्त असे विपुल सामर्थ्य अर्पण करतोस. ॥ ९ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ७५ (अग्नि सूक्त)

ऋषि - गोतम राहूगण : देवता - अग्नि : छंद - गायत्री

जुषस्वं सप्रथंस्तमं वचो देवप्संरस्तमम् ॥ हव्या जुह्वांन आसनि ॥ १ ॥

जुषस्व सप्रथःतमं वचः देवप्सरःऽतमम् ॥ हव्या जुह्वान आसनि ॥ १ ॥

आपले मुखांत हवि ठेवीत असतां, देवांस प्रिय असें जे माझे एक मोठे स्तोत्र आहे, त्याचा स्वीकार कर. ॥ १ ॥

अथा॑ ते अङ्गिरस्त॒माग्ने॑ वेधस्तम प्रि॒यम् ॥ वो॒चेम॒ ब्रह्म॑ सान॒सि ॥ २ ॥

अथ ते अङ्गिरःऽस्तम अग्ने वेधःऽतम प्रियम् ॥ वोचेम ब्रह्म सानसि ॥ २ ॥

हे अग्ने, हे अंगिरसा, हे अत्यंत कर्तृत्वशील देवा, तुला आवडणारे असें एक सुंदर स्तोत्र आतां आम्ही म्हणणार आहोंत. ॥ २ ॥

कस्ते॑ जा॒मिर्जना॑ना॒मग्ने॒ को दा॒श्वध्वरः ॥ को ह॒ कस्मि॑न्नसि श्रि॒तः ॥ ३ ॥

कः ते जामिः जनानां अग्ने कः दाशुऽअध्वरः ॥ कः ह कस्मिन् असि श्रितः ॥ ३ ॥

हे अग्निदेवा, सर्व मनुष्यांत तुला कोण आप्त वाटतो ? तुला यज्ञ समर्पण करणारा कोण ? खरोखर तू कोण आहेस ? व कोणाचे संनिध तुला रहावेंसे वाटते ? ॥ ३ ॥

त्वं जा॒मिर्जना॑ना॒मग्ने॑ मि॒त्रो अ॑सि प्रि॒यः ॥ सखा॒ सखि॑भ्य॒ ईड्यः॑ ॥ ४ ॥

त्वं जामिः जनानां अग्ने मित्रः असि प्रियः ॥ सखा सखिऽभ्य ईड्यः ॥ ४ ॥

हे अग्निदेवा, तूं सर्वांचा आप्त आहेस, तूं आमचा प्रिय मित्र आहेस, तुझ्यावर प्रेम करणारांचा तूं सन्माननीय स्नेही आहेस. ॥ ४ ॥

यजा॑ नो मि॒त्रावरु॑णा॒ यजा॑ दे॒वाँ ऋ॒तं बृ॒हत् ॥ अग्ने॒ यक्षि॒ स्वं दम॑म् ॥ ५ ॥

यजा नः मित्रावरुणा यज देवान् ऋतं बृहत् ॥ अग्ने यक्षि स्वं दमम् ॥ ५ ॥

मित्र आणि वरुण ह्यांस तूं आमचा यज्ञ पोहोंचीव, देव व तुझी श्रेष्ठ सत्यनियमनें ह्यांना आमची पूजा अर्पण कर. अग्निदेवा, तूं आमचा यज्ञ घरीं घेऊन जात असतोस. ॥ ५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ७६ (अग्नि सूक्त)

ऋषि - गोतम राहूगण : देवता - अग्नि : छंद - त्रिष्टुभ्

का त॒ उपे॑ति॒र्मन॑सो॒ वरा॑य॒ भुव॑दग्ने॒ शंत॑मा॒ का म॑नी॒षा ॥

को वा॑ य॒ज्ञैः परि॒ दक्षं॑ त आप॒ केन॑ वा ते॒ मन॑सा दाशेम ॥ १ ॥

का त उपऽइतिः मनसः वराय भुवत् अग्ने शंऽतमा का मनीषा ॥

कः वा यज्ञैः परि दक्षं ते आप केन वा ते मनसा दाशेम ॥ १ ॥

कोणते स्तोत्र तुझ्या अगदीं अंतःकरणापर्यंत भिडून तुला आनंद देईल. हे अग्निदेवा, कोणती स्तुति तुला फार संतोषदायक वाटेल. यज्ञ अर्पण करून तुझेपासून कोणी सामर्थ्यप्राप्ति करून घेतली ? कशा अंतःकरणानें आम्ही तुला हवि अर्पण करावे ? ॥ १ ॥

एह्य॑ग्न इ॒ह होता॒ नि षी॒दाद॑ब्धः॒ सु पु॑रए॒ता भ॑वा नः ॥

अव॑तां त्वा॒ रोद॑सी विश्वमि॒न्वे यजा॑ म॒हे सौमन॒साय॑ दे॒वान् ॥ २ ॥

आ इहि अग्ने इह होता नि सीद अदब्धः सु पुरःऽएता भव नः ॥

अवतां त्वा रोदसी इति विश्वमिन्वे इति विश्वंऽइन्वे यज महे सौमनसाय देवान् ॥ २ ॥

अग्निदेवा, इकडे ये. आमचा हविर्दाता होऊन येथें विराजमान हो. तूं आमचा पुढारी हो, कारण तुला कोणीही अपाय करण्यास समर्थ होणार नाही. विश्वांत सर्वत्र पसरलेले द्युलोक व पृथ्वीलोक तुझे रक्षण करोत. देवांचा आमचेवर मोठा अनुग्रह व्हावा म्हणून आमचा यज्ञ त्यांस अर्पण कर. ॥ २ ॥

प्र सु विश्वा॑न्र॒क्षसो॒ धक्ष्य॑ग्ने॒ भवा॑ य॒ज्ञाना॑मभिशस्ति॒पावा॑ ॥

अथा व॑ह॒ सोम॑पतिं॒ हरि॑भ्यामाति॒थ्यम॑स्मै चकृमा सु॒दाव्ने॑ ॥ ३ ॥

प्र सु विश्वान् रक्षसः धक्षि अग्ने भव यज्ञानां अभिशस्तिऽपावा ॥

अथ आ वह सोमऽपतिं हरिऽभ्यां आतिथ्यं अस्मै चकृम सुऽदाव्ने ॥ ३ ॥

हे अग्निदेवा, सर्व राक्षसांचे तूं दहन करतोस, म्हणून ह्या आमच्या यज्ञाचा लौकिक कायम राहील अशी तजवीज कर. शिवाय सोमरसाचा मुख्य भोक्ता जो इंद्र त्याचे घोडे जोडून इकडे आण. त्या उदार देवाच्या आदराप्रित्यर्थ सर्व तयारी आम्ही करून ठेवली आहे. ॥ ३ ॥

प्रजावंता वचसा वह्निरासा च हुवे नि च सत्सीह देवैः ॥

वेषि होत्रमुत पोत्रं यजत्र बोधि प्रयन्तर्जनितर्वसूनाम् ॥ ४ ॥

प्रजाऽवता वचसा वह्निः आसा च हुवे नि च सत्सि इह देवैः ॥

वेषि होत्रं उत पोत्रं यजत्र बोधि प्रऽयंतः जनितः वसूनाम् ॥ ४ ॥

आमच्या कुळांतील सर्व माणसे जी तुझी स्तुति गात आहेत तिच्या योगानें व स्वमुखानेंही मी तुझें पूजन करीत आहे म्हणून तूं देवांसह येथे येऊन बस. हे यज्ञार्ह देवा, हवि पोहोंचविणे व यज्ञास पवित्रता आणणें ही दोन्ही कामें तूं सांभाळीत असतोस. संपत्ति उत्पन्न करणाऱ्या व तिचे दान करणाऱ्या हे देवा, लवकर जागृत हो. ॥ ४ ॥

यथा विप्रस्य मनुषो हविर्भिर्देवाँ अयजः कविभिः कविः सन् ॥

ए॒वा हो॑तः सत्यतर॒ त्वम॒द्याग्ने॑ म॒न्द्रया॑ जु॒ह्वा यजस्व ॥ ५ ॥

यथा विप्रस्य मनुषः हविःऽभिः देवान् अयजः कविऽभिः कविः सन् ॥

एव होतरिति सत्यऽतर त्वं अद्य अग्ने मंद्रया जुह्वा यजस्व ॥ ५ ॥

ज्याप्रमाणें विद्वान् मनूच्या हवींनी, तू बुद्धिमान उपासकांचेसह, स्वतः प्रज्ञावंत असल्यामुळें, देवांचे यजन केलेंस, त्याचप्रमाणे हे अत्यंत सत्यस्वरूप हविर्दात्या, देवांस आनंद उत्पन्न करणाऱ्या ह्या यज्ञचमसानें तूं त्यांस हवि अर्पण कर. ॥ ५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ७७ (अग्नि सूक्त)

ऋषि - गोतम राहूगण : देवता - अग्नि : छंद - गायत्री

क॒था दा॑शेमा॒ग्नये॒ कास्मै॑ दे॒वजु॑ष्टोच्यते भा॒मिने॒ गीः ॥

यो मर्त्ये॑ष्व॒मृत॑ ऋ॒तावा॒ होता॒ यजि॑ष्ठ॒ इत्कृ॒णोति॑ दे॒वान् ॥ १ ॥

कथा दाशेम अग्नये का अस्मै देवऽजुष्टोच्यते भामिने गीः ॥

यः मर्त्येषु अमृतः ऋतऽवा होता यजिष्ठः इत् कृणोति देवान् ॥ १ ॥

ह्या अग्निला आम्ही कोणत्या रीतीनें हवि द्यावा बरें ? जो अमर, सत्य धर्माचा प्रणेता, हविर्दाता व यज्ञार्ह असून देवांना मानवांचे समुदायांत आणून बसविण्याचें काम ज्याचे एकट्याचेच हातून होतें अशा त्या देदीप्यमान अग्निकरितां देवांना पसंत पडेल असे आम्ही कोणते स्तोत्र म्हणावें बरें ? ॥ १ ॥

यो अ॑ध्व॒रेषु॒ शंत॑म ऋ॒तावा॒ होता॒ तमू॒ नमो॑भि॒रा कृ॑णुध्वम् ॥

अ॒ग्निर्यद्वेर्मर्ता॑य दे॒वान्स चा॒ बोधा॑ति॒ मन॑सा यजाति ॥ २ ॥

यः अध्वरेषु शंऽतमः ऋतऽवा होता तं ऊं इति नमःऽओभिः आ कृणुध्वम् ॥

अग्निः यत् वेः मर्ताय देवान् सः चा बोधाति मनसा यजाति ॥ २ ॥

ज्याचें दर्शन घडल्याबरोबर मनास अत्यंत संतोष होतो, जो सत्यधर्माचा प्रणेता आहे, व जो देवांना हवि पोहोंचवितो त्या अग्निदेवास अनेकदां वंदन करून तुम्ही येथें घेऊन या. ज्यावेळी मानवांच्या कामासाठी अग्नि देवांकडे जातो त्यावेळी तो त्यांपैकीं प्रत्येकास ओळखतो व त्यांचे मनःपूर्वक पूजन करतो. ॥ २ ॥

स हि क्रतु॒ः स मर्य॒ः स सा॒धुर्मि॒त्रो न भू॒दद्भु॑तस्य र॒थीः ॥

तं मेधे॑षु प्रथ॒मं दे॑व॒यन्ती॒र्विश॒ उप॑ ब्रुवते द॒स्ममारी॑ः ॥ ३ ॥

सः हि क्रतुः सः मर्यः सः साधुः मित्रः न भूत् अद्भुतस्य रथीः ॥

तं मेधेषु प्रथमं देवऽयंतीः विशः उप ब्रुवते दस्मं आरीः ॥ ३ ॥

जगांत जे कोठे बुद्धिसामर्थ्य आढळतें तें तोच होय. तोच खरा मनुष्य होय. तो फार चांगला आहे. ज्याप्रमाणे मित्र आपल्या आश्चर्यकारक रथावर आरोहण करतो त्याप्रमाणे हाही अद्भुत रथावर विराजमान होतो. देवांचे श्रद्धाळु उपासक ह्याच सौंदयवान देवास यज्ञांत प्रथम बोलावतात. ॥ ३ ॥

स नो॑ नृ॒णां नृत॑मो रि॒शादा॑ अ॒ग्निर्गिरोऽ॑वसा वेतु धी॒तिम् ॥

तना॑ च॒ ये म॒घवा॑नः॒ शवि॑ष्ठा॒ वाज॑प्रसूता इ॒षय॑न्त॒ मन्म॑ ॥ ४ ॥

सः नः नृणां नृऽतमः रिशादा अग्निः गिरः अवसा वेतु धीतिम् ॥

तना च ये मघऽवानः शविष्ठा वाजऽप्रसूताः इषयंत मन्म ॥ ४ ॥

सर्व नरांत अत्यंत श्रेष्ठ आणि शत्रूंचा संहार करणारा तो अग्नि आम्हांस आपल्या संरक्षणाखाली घेऊन आमच्या स्तुतिस्तोत्रांचा अंगिकार करो, आणि त्याचप्रमाणें, तुला हवि अर्पण करणाऱ्या आणि त्यामुळें सामर्थ्यवान व पराक्रमी बनलेल्या अशा ज्या कोणी पुरुषांनी तुझें स्तवन केलें असेल त्याचाही तूं स्वीकार कर. ॥ ४ ॥

ए॒वाग्निर्गोत॑मेभिर्ऋ॒तावा॒ विप्रे॑भिरस्तोष्ट जा॒तवे॑दाः ॥

स ए॑षु द्यु॒म्नं पी॑पय॒त्स वाजं॒ स पु॒ष्टिं या॑ति॒ जोष॒म् आ चि॑कि॒त्वान् ॥ ५ ॥

एव अग्निः गोतमेभिः ऋतऽवा विप्रेभिः अस्तोष्ट जातऽवेदाः ॥

सः एषु द्युम्नं पीपयत् सः वाजं सः पुष्टिं याति जोषं आ चिकित्वान् ॥ ५ ॥

सत्यधर्माचा प्रणेता आणि सर्वज्ञ अशा ह्या अग्नीची विद्वान् गौतमांनी ह्याप्रमाणे स्तुति केली. त्यानेंच त्यांना वैभव, सामर्थ्य व समृद्धि ह्यांचा लाभ करून दिला. तो प्रज्ञाशील अग्नि सर्वांना आवडतो. ॥ ५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ७८ (अग्नि सूक्त)

ऋषि - गोतम राहूगण : देवता - अग्नि : छंद - गायत्री

अ॒भि त्वा॒ गोत॑मा गि॒रा जात॑वेदो॒ विच॑र्षणे ॥ द्यु॒म्नैर॒भि प्र णो॑नुमः ॥ १ ॥

अभि त्वा गोतमाः गिरा जातऽवेदः विऽचर्षणे ॥ द्युम्नैः अभि प्र नोनुमः ॥ १ ॥

हे सर्वज्ञ व सर्वसंचारी अग्निदेवा, आम्ही गोतम, तुला प्रार्थना व उत्तम हवि अर्पण करून पुन्हा पुन्हा वंदन करतो. ॥ १ ॥

तमु॑ त्वा॒ गोत॑मो गि॒रा रा॒यस्का॑मो दुवस्यति ॥ द्यु॒म्नैर॒भि प्र णो॑नुमः ॥ २ ॥

तं ऊं इति त्वा गोतमः गिरा रायःऽकामः दुवस्यति ॥ द्युम्नैः अभि प्र नोनुमः ॥ २ ॥

वैभवाची इच्छा धरून हा गोतम तुझी ह्याप्रमाणें सेवा करीत आहे. उत्तम उत्तम हवि अर्पण करून आम्ही तुला पुन्हा पुन्हा वंदन करतो. ॥ २ ॥

तमु॑ त्वा वाज॒सात॑ममङ्गिर॒स्वद्ध॑वामहे ॥ द्यु॒म्नैर॒भि प्र णो॑नुमः ॥ ३ ॥

तं ऊं इति त्वा वाजऽसातमं अङ्गिरस्वत् हवामहे ॥ द्युम्नैः अभि प्र नोनुमः ॥ ३ ॥

सामर्थ्याची अतिशय प्राप्ति करून देणाऱ्या त्या तुला आम्ही अंगिरसाप्रमाणे हांक मारतो. आम्ही उत्तम उत्तम हवि अर्पण करून, तुला पुन्हा पुन्हा वंदन करतो. ॥ ३ ॥

तमु॑ त्वा वृत्र॒हन्त॑मं॒ यो दस्यूँ॑रवधू॒नु॒षे ॥ द्यु॒म्नैर॒भि प्र णो॑नुमः ॥ ४ ॥

तं ऊं इति त्वा वृत्रहन्ऽतमं यः दस्यून् अवऽधूनुषे ॥ द्युम्नैः अभि प्र नोनुमः ॥ ४ ॥

वृत्राचा विध्वंस करून दस्यूची दाणादाण उडवून देणाऱ्या ह्या तुला उत्तम हवि अर्पण करून, आम्ही तुला पुन्हा पुन्हा वंदन करतो. ॥ ४ ॥

अवो॑चाम॒ रहू॑गणा अ॒ग्नये॒ मधु॑म॒द्वचः॑ ॥ द्यु॒म्नैर॒भि प्र णो॑नुमः ॥ ५ ॥

अवोचाम रहूगणाः अग्नये मधुऽमत् वचः ॥ द्युम्नैः अभि प्र नोनुमः ॥ ५ ॥

अग्निदेवास उद्देशून आम्ही रहूगणांनी हे अत्यंत मधुर स्तोत्र म्हटलें आहे; तुला उत्तम उत्तम हवि अर्पण करून, अग्निदेवा, आम्ही तुला पुन्हा पुन्हा वंदन करतो. ॥ ५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ७९ (अग्नि सूक्त)

ऋषि - गोतम राहूगण : देवता - अग्नि : छंद - गायत्री; त्रिष्टुभ; उष्णिह

हिरण्यकेशो रजसो विसारेऽहिर्धुनिर्वात इव ध्रजीमान् ॥

शुचिभ्राजा उषसो नवेदा यशस्वतीरपस्युवो न सत्याः ॥ १ ॥

हिरण्यऽकेशः रजसः विऽसारे अहिः धुनिः वातःऽइव ध्रजीमान् ॥

शुचिऽभ्राजा उषसः नवेदाः यशस्वतीः रपस्युवः न सत्याः ॥ १ ॥

ह्याचे केश सुवर्णाप्रमाणे आहेत. हा जेव्हां रजोलोकाच्या विस्तीर्ण प्रदेशांत असतो तेव्हां भितीनें गडबड उडवून देणारा जणूं कांही सापच, अथवा सोसाट्याने वाहणारा वाऱ्या सारखा आहे असा भास होतो. ह्याची दीप्ति अत्यंत प्रज्वलित आहे. दासीप्रमाणे इमानानें काम करणाऱ्या व सदा यशस्वी अशा ज्या उषा त्यांचे ह्यांस ज्ञान आहे. ॥ १ ॥

आ ते सुपर्णा अमिनन्तँ एवैः कृष्णो नोनाव वृषभो यदीदम् ॥

शि॒वाभि॒र्न स्मय॑मानाभि॒रागा॒त्पत॑न्ति॒ मिह॑ स्त॒नय॑न्त्य॒भ्रा ॥ २ ॥

आ ते सु॒ऽपर्णा अमिनंत एवैः कृष्णः नोनाव वृषभः यदि इदम् ॥

शिवाभिः न स्मयमानाभिः आ अगात् पतंति मिहः स्तनयंति अभ्रा ॥ २ ॥

तुझे मोठमोठ्या पंखाचे पक्षी सर्व वस्तूंचा नाश करूं लागले व काळ्या रंगाचा वृषभ मोठमोठ्यानें डुरकण्या फोडूं लागला. इकडे असे होत आहे तोंच हांसल्यासारख्या आवाज करणाऱ्या कोल्हयांनाही तो घेऊन आला. मग काय ? पावसाची मुसळ धार लागली व मेघ गर्जना करूं लागले. ॥ २ ॥

यदी॑मृ॒तस्य॒ पय॑सा॒ पिया॑नो॒ नय॑न्नृ॒तस्य॑ प॒थिभी॒ रजि॑ष्ठैः ॥

अ॒र्य॒मा मि॒त्रो वरु॑णः॒ परि॑ज्मा॒ त्वचं॑ पृञ्च॒न्त्युप॑रस्य॒ योनौ ॥ ३ ॥

यत् ईं ऋतस्य पयसा पियानः नयन् ऋतस्य पथिऽभिः रजिष्ठैः ॥

अर्यमा मित्रः वरुणः परिऽज्मा त्वचं पृचंति उपरस्य योनौ ॥ ३ ॥

ज्यावेळीं सत्यधर्माच्या सरळ मार्गांनी लोकांना वाट दाखवीत हा सत्याच्या उदकांचे पान करतो त्यवेळी अर्यमा, मित्र आणि वरुण दोहोंकडे हिंडून वर आकाशांत असलेल्या पखालीच्या चामड्यांत तेथल्या तेथेंच पाणी भरून ठेवतात. ॥ ३ ॥

अग्ने॒ वाज॑स्य॒ गोम॑त॒ ईशा॑नः सहसो यहो ॥ अ॒स्मे धे॑हि जातवेदो॒ महि॒ श्रव॑ः ॥ ४ ॥

अग्ने वाजस्य गोऽमतः ईशानः सहसः यहो इति॥

अस्मे इति धेहि जातऽवेदः महि श्रवः ॥ ४ ॥

सामर्थ्यापासून जन्म घेणाऱ्या हे अग्ने, ज्यापासून गोधनांचा लाभ होतो अशा सामर्थ्यावर तुझी सत्ता आहे. हे सर्वज्ञ देवा, आमचे करितां अत्यंत मोठ्या कीर्तिचा ठेवा तयार कर. ॥ ४ ॥

स इ॑धा॒नो वसु॑ष्क॒विर॒ग्निरी॒ळेन्यो॑ गि॒रा ॥ रे॒वद॒स्मभ्य॑ं पुर्वणीक दीदिहि ॥ ५ ॥

सः इधानः वसुः कविः अग्निः ईळेन्यः गिरा ॥ रेवत् अस्मभ्यं पुरुऽअनीक दीदिहि ॥ ५

तो तूं सर्वप्रसिद्ध अग्नि, देदीप्यमान, वैभवाचा पुतळा, प्रज्ञावान व स्तुतींनी गुण गाण्यास योग्य असा आहेस. अनेक सेनांवर अधिपत्य गाजविणाऱ्या हे देवा, आम्हांस धन प्राप्त होईल अशा रीतीनें आपली ज्योति प्रज्वलित कर. ॥ ५ ॥

क्षपो राजन्नुत त्मनाग्ने वस्तोरुतोषसः ॥ स तिग्मजम्भ रक्षसो दह प्रति ॥ ६ ॥

क्षपः राजन् उत त्मना अग्ने वस्तोः उत उषसः ॥ सः तिग्मऽजंभ रक्षसः दह प्रति ॥ ६

हे तीक्ष्णदंष्ट्र अग्निदेवा, हे राजाधिराजा, प्रत्येक रात्री व उषेचा प्रकाश पडल्याबरोबर आपल्या ज्वालांनी राक्षसांचे दहन कर. ॥ ६ ॥

अवा नो अग्न ऊतिभिर्गायत्रस्य प्रभर्मणि ॥ विश्वासु धीषु वन्द्य ॥ ७ ॥

अवा नः अग्ने ऊतिऽभिः गायत्रस्य प्रऽभर्मणि ॥ विश्वासु धीषु वंद्य ॥ ७ ॥

अखिल स्तोत्रांत ज्याला नमन केलेलें असते अशा, हे अग्निदेवा, आम्ही गायत्री छंदातील स्तवनें तुला अर्पण करीत असल्यामुळें तूं आमच्यावर कृपा करून आमचें रक्षण कर. ॥ ७ ॥

आ नो॑ अग्ने र॒यिं भ॑र सत्रा॒साहं॒ वरे॑ण्यम् ॥ विश्वा॑सु पृ॒त्सु दु॒ष्टर॑म् ॥ ८ ॥

आ नः अग्ने रयिं भर सत्राऽसाहं वरेण्यम् ॥ विश्वासु पृत्ऽसु दुस्तरम् ॥ ८ ॥

हे अग्निदेवा, आम्हांस असें वैभव दे कीं जें नेहमी टिकेल, जे आम्हांस हवें असें वाटेल व जें आमच्यापासून कोणत्याही युद्धांत शत्रूस हिसकावून घेतां येणार नाही. ॥ ८ ॥

आ नो॑ अग्ने सु॒चे॒तुना॑ र॒यिं वि॒श्वायु॑पोषसम् ॥ मा॒र्डी॒कं धे॑हि जी॒वसे॑ ॥ ९ ॥

आ नः अग्ने सुऽचेतुना रयिं विश्वायुऽपोषसम् ॥ मार्डीकं धेहि जीवसे ॥ ९ ॥

हे अग्निदेवा, आमच्या आपत्तींचा नीट विचार करून आम्हांस सुखावह होणारी व आमच्या पोषणास जन्मभर उपयोगी पडणारी अशी संपत्ति आमचे जीवन चालण्याकरितां आम्हांस अर्पण कर. ॥ ९ ॥

प्र पू॒तास्ति॒ग्मशो॑चिषे॒ वाचो॑ गोतमा॒ग्नये॑ ॥ भर॑स्व सु॒म्न॒युर्गिर॑ः ॥ १० ॥

प्र पूताः तिग्मऽशोचिषे वाचः गोतम अग्नये ॥ भरस्व सुम्नऽयुः गिरः ॥ १० ॥

हे गोतमा, ह्या प्रखर ज्वालांनी युक्त असलेल्या ह्या अग्नीस संपत्तीची इच्छा धारण करून, पवित्र स्तुतिस्तोत्रें अर्पण कर. ॥ १० ॥

यो नो॑ अग्नेऽभिदासत्यन्ति॑ दूरे प॑दीष्ट सः ॥ अस्माकमिद्वृधे भ॑व ॥ ११ ॥

यः नः अग्ने अभिऽदासति अंति दूरे पदीष्ट सः ॥ अस्माकं इत् वृधे भव ॥ ११ ॥

हे अग्निदेवा, जो कोणी समीप अथवा दूर असतांना आम्हांस उपद्रव देतो त्याचा निःपात होवो. तूं केवल आमच्याच अभिवृद्धीस कारणीभूत हो. ॥ ११ ॥

सहस्राक्षो विच॑र्षणिरग्नी रक्षां॑सि सेधति ॥ होता॑ गृणीत उक्थ्यः ॥ १२ ॥

सहस्रऽअक्षः विऽचर्षणिः अग्निः रक्षांसि सेधति ॥ होता गृणीते उक्थ्यः ॥ १२ ॥

सहस्र नेत्रांनी युक्त व सर्वसंचारी हा अग्नि राक्षसांस हांकून लावतो. स्तवनांस योग्य असा हा हविर्दाता हा पहा भाषण करीत आहे. ॥ १२ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ८० (इंद्र सूक्त)

ऋषि - गोतम राहूगण : देवता - इंद्र : छंद - पंक्ति

इ॒त्था हि सोम॒ इन्मदे॑ ब्र॒ह्मा च॒कार॒ वर्ध॑नम् ॥

शवि॑ष्ठ वज्रि॒न्नोज॑सा पृथि॒व्या निः श॑शा॒ अहि॒मर्च॒न्ननु॑ स्व॒राज्य॑म् ॥ १ ॥

इत्था हि सोमे इत् मदे ब्रह्मा चकार वर्धनम् ॥

शविष्ठ वज्रिन् ओजसा पृथिव्याः निः शशाः अहिं अर्चन् अनु स्वऽराज्यम् ॥ १ ॥

तुला संतोष उत्पन्न होण्याकरितां सोमरसाची सिद्धता होताच ह्या विद्वान् उपासकानें तुझे महत्त्व वर्णन केलें आहे. हे अत्यंत बलशाली व वज्रधारी देवा, स्वतःचें सम्राज्य स्थान करण्याची इच्छा धरून तू अहीस ह्या पृथ्वीवरून हांकून लावलेंस. ॥ १ ॥

स त्वा॑मद॒द्वृषा॒ मद॒ः सोम॑ः श्ये॒नाभृ॑तः सु॒तः ॥

येना॑ वृ॒त्रं निर॒द्भ्यो ज॒घन्थ॑ वज्रि॒न्नोज॒सार्च॒न्न् अनु॑ स्व॒राज्य॑म् ॥ २ ॥

सः त्वा अमदत् वृषा मदः सोमः श्येनऽआभृतः सुतः ॥

येन वृत्रं निः अत्ऽभ्यः जघंथ वज्रिन् ओजसा अर्चन् अनु स्वऽराज्यम् ॥ २ ॥

त्या श्येन पक्ष्यानें आणलेल्या व पिळून ठेवलेल्या उत्साहवर्धक सोमरसानें तुला स्फुरण उत्पन्न केले व त्याच्यायोगानें हे वज्रधारी देवा, स्वतःचें साम्राज्य स्थापन करण्याची इच्छा धरून तूं आपल्या सामर्थ्यानें वृत्राचा पाण्यांतून वध केलास. ॥ २ ॥

प्रेह्य॒भीहि॑ धृष्णु॒हि न ते॒ वज्रो॒ नि यं॑सते ॥

इन्द्रं नृम्णं हि ते शवो हनो वृत्रं जया अपोऽर्चन्ननु स्वराज्यम् ॥ ३ ॥

प्र इहि अभि इहि धृष्णुहि न ते वज्रः नि यंसते ॥

इंद्र नृम्णं हि ते शवः हनः वृत्रं जयाः अपः अर्चन् अनु स्वऽराज्यम् ॥ ३ ॥

पुढें चालून जा, हल्ला कर, पराक्रम गाजव. तुझ्या वज्राला कोणी प्रतिबंध करणार नाही. हे इंद्रा, तुझें सामर्थ्य शौर्यगुणानें युक्त आहे. स्वतःचे साम्राज्य स्थापन करण्याची इच्छा धरून तूं वृत्रास मारलेंस व उदकांस जिंकून आणलेस. ॥ ३ ॥

निरिन्द्र भूम्या अधि वृत्रं जंघन्थ निर्दिवः ॥

सृजा मरुत्वतीरव जीवधन्या इमा अपोऽर्चन्ननु स्वराज्यम् ॥ ४ ॥

निः इंद्र भूम्याः अधि वृत्रं जघंथ निः दिवः ॥

सृज मरुत्वतीः अव जीवऽधन्याः इमाः अपः अर्चन् अनु स्वऽराज्यम् ॥ ४ ॥

हे इंद्रा, तूं भूलोकांतून व द्युलोकांतून वृत्राचा नायनाट करून टाकलास. तर आतां स्वतःचें साम्राज्य स्थापन करण्याची इच्छा धरून ह्या सर्व प्राणिवर्गाच्या जिवितांचे धारण करणाऱ्या व मरुत् देवांनी प्रेरित केलेल्या उदकांस खाली मोकळें सोडून दे. ॥ ४ ॥

इन्द्रो॑ वृ॒त्रस्य॒ दोध॑तः॒ सानुं॒ वज्रे॑ण हीळि॒तः ॥

अ॒भि॒क्रम्याव॑ जिघ्नतेऽ॒पः सर्मा॑य चो॒दय॒न्नर्च॒न्ननु॑ स्व॒राज्य॑म् ॥ ५ ॥

इंद्रः वृत्रस्य दोधतः सानुं वज्रेण हीळितः ॥

अभिऽक्रम्य अव जिघ्नते अपः सर्माय चोदयन् अर्चन् अनु स्वऽराज्यम् ॥ ५ ॥

स्वतःचें साम्राज्य स्थापन करण्याची इच्छा धरून व उदकांचा प्रवाह सुरळीत सुरू होण्याकरितां त्यांत गति उत्पन्न करावी ह्या हेतूनें इंद्रानें, कोपनिष्ठ होऊन सर्व जगतास हालवून सोडणाऱ्या वृत्रावर हल्ला करून त्याचे शिर पायानें तुडवून टाकलें आहे. ॥ ५ ॥

अधि॒ सानौ॒ नि जि॑घ्नते॒ वज्रे॑ण श॒तप॑र्वणा ॥

म॒न्दा॒न इन्द्रो॒ अन्ध॑सः॒ सखि॑भ्यो गा॒तुमि॑च्छ॒त्यर्च॒न्ननु॑ स्व॒राज्य॑म् ॥ ६ ॥

अधि सानौ नि जिघ्नते वज्रेण शतऽपर्वणा ॥

मंदानः इंद्रः अंधसः सखिऽभ्यः गातुं इच्छति अर्चन् अनु स्वऽराज्यम् ॥ ६ ॥

ज्याला शंभर सांधे होते असे आपले वज्र घेऊन इंद्र वृत्राच्या मस्तकावर घाव घालीत आहे. स्वतःचे साम्राज्य स्थापन करण्याची इच्छा धरणारा इंद्र भक्तांच्या हवींनी संतुष्ट होऊन आपल्या प्रेमांतील मनुष्यांची चलती व्हावी असा हेतु मनांत बाळगतो. ॥ ६ ॥

इन्द्र॒ तुभ्य॒मिद॑द्रि॒वोऽ॑नुत्तं वज्रि॒न्वी॒र्यम् ॥

यद्ध॒ त्यं मा॒यिनं॑ मृ॒गं तमु॒ त्वं मा॒यया॑वधी॒रर्च॒न्ननु॑ स्व॒राज्य॑म् ॥ ७ ॥

इंद्र तुभ्यं इत् अद्रिऽवः अनुत्तं वज्रिन् वीर्यम् ॥

यत् ह त्यं मायिनं मृगं तं ऊं इति त्वं मायया अवधीः अर्चन् अनु स्वऽराज्यम् ॥ ७ ॥

हे शस्त्रास्त्रमंडित इंद्रा, हे वज्रधारी देवा, ज्याचा कोणास प्रतिकार करतां यावयाचा नाही असे सामर्थ्य केवळ तुझ्याच जवळ आहे कारण स्वतःचे साम्राज्य स्थापन करण्याची इच्छा धारण करून तूं युक्तिप्रयुक्तीनें त्या कपटाचरणी पशूचा वध केलास. ॥ ७ ॥

वि ते॒ वज्रा॑सो अस्थिरन्नव॒तिं ना॒व्या३॑ अनु॑ ॥

म॒हत्त॑ इंद्र वी॒र्यं॑ बा॒ह्वोस्ते॒ बलं॑ हि॒तमर्च॒न्ननु॑ स्व॒राज्य॑म् ॥ ८ ॥

वि ते वज्रासः अस्थिरन् नवतिं नाव्या अनु ॥

महत् ते इंद्र वीर्यं बाह्वोः ते बलं हितं अर्चन् अनु स्वःराज्यम् ॥ ८ ॥

तूं उगारलेले वज्र नव्वद महानद्यांवर दिसत होते. स्वतःचे साम्राज्य स्थापन करण्याची इच्छा बाळगणारा जो तूं त्या तुझे सामर्थ्य फार श्रेष्ठ आहे. तुझें बाहुबल जगताचे हितच करणारे आहे. ॥ ८ ॥

स॒हस्रं॑ सा॒कम॑र्चत॒ परि॑ ष्टोभत विंश॒तिः ॥

शतैनमन्वंनोनवुरिन्द्राय ब्रह्मोद्यतमर्चन्ननु स्वराज्यम् ॥ ९ ॥

सहस्रं साकं अर्चत परि स्तोभत विंशतिः ॥

शता एनं अनु अनोनवुः इंद्राय ब्रह्म उत्ऽयतं अर्चन्न् अनु स्वऽराज्यम् ॥ ९ ॥

सहस्र माणसें एके ठिकाणी जमून त्याचे पूजन करा. वीस मिळून त्याची स्तुति करा. शेंकडो भक्तांनी त्याची स्तुति केली आहे. ह्या इंद्राकरितां एक स्तोत्र अगदी तयार आहे. ह्यास स्वतःचे साम्राज्य स्थापन करण्याची इच्छा आहे ॥ ९ ॥

इंद्रो वृत्रस्य तविषीं निरहन्सहसा सहः ॥

महत्तदस्य पौंस्यं वृत्रं जघन्वाँ असृजदर्चन्ननु स्वराज्यम् ॥ १० ॥

इंद्रः वृत्रस्य तविषीं निः अहन् सहसा सहः ॥

महत् तत् अस्य पौंस्यं वृत्रं जघन्वान् असृजत् अर्चन् अनु स्वऽराज्यम् ॥ १० ॥

इंद्राने वृत्राच्या सामर्थ्याचा मोड केला, त्याने आपल्या बलानें त्याच्या बलाचा निरोध केला. वृत्राला मारून त्याने जलप्रवाहास मोकळें सोडून दिले हा त्याचा फार मोठा पराक्रम होय. स्वतःचे साम्राज्य स्थापन करण्याची त्याची इच्छा होती. ॥ १० ॥

इ॒मे चि॒त्तव॑ म॒न्यवे॒ वेपे॑ते भि॒यसा॑ म॒ही ॥

यदिं॑द्र वज्रि॒न्नोज॑सा वृ॒त्रं म॒रुत्वा॒ँ अव॑धी॒रर्च॒न्ननु॑ स्व॒राज्य॑म् ॥ ११ ॥

इमे इति चित् तव मन्यवे वेपेते इति भियसा मही इति ॥

यत् इंद्र वज्रिन् ओजसा वृत्रं मरुत्वान् अवधीः अर्चन्न् अनु स्वऽराज्यम् ॥ ११ ॥

तुझ्या क्रोधापुढें हे दोन्ही विस्तीर्ण लोक सुद्धां भितीनें कांपू लागतात. कारण स्वतःचे साम्राज्य स्थापन करण्याचा इच्छा धरून, हे इंद्रा, तूं मरुद्गणांचे साहाय्य घेऊन आपल्या सामर्थ्यानें वृत्राचा वध केलास. ॥ ११ ॥

न वेप॑सा॒ न त॑न्य॒तेन्द्रं॑ वृ॒त्रो वि बी॑भयत् ॥

अ॒भ्येनं॒ वज्र॑ आय॒सः स॒हस्र॑भृष्टिराय॒तार्च॒न्ननु॒ स्व॒राज्य॑म् ॥ १२ ॥

न वेपसा न तन्यता इंद्रं वृत्रः वि बीभयत् ॥

अभि एनं वज्र आयसः सहस्रऽभृष्टिः आयत अर्चन् अनु स्वऽराज्यम् ॥ १२ ॥

पृथ्वीस गदगदां हालवून अथवा मोठमोठ्या गर्जना करूनही वृत्रास इंद्राचे मनांत भिती उत्पन्न करतां आली नाहीं पण उलट स्वतःचे साम्राज्य स्थापन करण्याची इच्छा धरणाऱ्या इंद्राचेंच हजार धारांचे लोखंडी वज्र त्याचे अंगावर पडले. ॥ १२ ॥

यद्वृ॒त्रं तव॑ चा॒शनिं॒ वज्रे॑ण स॒मयो॑धयः ॥

अहि॑मिन्द्र॒ जिघां॑सतो दि॒वि ते॑ बद्ब॒धे शवोऽ॑र्च॒न्ननु॒ स्व॒राज्य॑म् ॥ १३ ॥

यत् वृत्रं तव च अशनिं वज्रेण संऽअयोधयः ॥

अहिं इंद्र जिघांसतः दिवि ते बद्बधे शवः अर्चन् अनु स्वऽराज्यम् ॥ १३ ॥

ज्यावेळी तूं आपल्या वज्रानें वृत्रांची व तुझ्या शस्त्रांची गांठ घालून दिलीस त्यावेळीं हे इंद्रा, स्वतःचे साम्राज्य स्थापन करण्याची इच्छा धारण करणाऱ्या तुझें सामर्थ्य, तूं वृत्राचा वध करण्याचें मनांत आणल्यामुळें स्वर्गलोकांत सुद्धा अनुभवास आले. ॥ १३ ॥

अभिष्टने ते अद्रिवो यत्स्था जगच्च रेजते ॥

त्वष्टा चित्तव मन्यव इंद्र वेविज्यते भियार्चन्ननु स्वराज्यम् ॥ १४ ॥

अभिऽस्तने ते अद्रिऽवः यत् स्थाः जगत् च रेजते ॥

त्वष्टा चित् तव मन्यवे इंद्र वेविज्यते भिया अर्चन् अनु स्वऽराज्यम् ॥ १४ ॥

हे वज्रधारी देवा, तूं गर्जना केली असतां चल वस्तु व अचल पदार्थ देखील कंपित होऊन जातात. फार तर काय पण स्वतःचें साम्राज्य स्थापन करण्याची इच्छा धारण करणाऱ्या तुझ्या क्रोधाकडे पाहून प्रत्यक्ष त्वष्टा देखील भितीनें थरथर कापूं लागतो. ॥ १४ ॥

नहि नु यादधीमसीन्द्रं को वीर्या परः ॥

तस्मिं॑न्नृ॒म्णमु॒त क्रतुं॑ दे॒वा ओजां॑सि॒ सं दं॑धु॒रर्च॒न्ननु॑ स्व॒राज्यं॑म् ॥ १५ ॥

नहि नु यात् अधिऽमसि ईंद्रं कः वीर्या परः ॥

तस्मिन् नृम्णं उत क्रतुं देवाः ओजांसि सं दधुः अर्चन् अनु स्वऽराज्यम् ॥ १५ ॥

सामर्थ्यांत इंद्राच्याही पलीकडे असा कोणी आम्हांस दिसत नाही. त्याच्या पराक्रमापुढें कोणाची गति आहे ? स्वतःचे साम्राज्य स्थापन करण्याची इच्छा धारण करणाऱ्या इंद्राचे अंगी देवांनी शक्ति, सामर्थ्य व तेजस्वीपणा ह्यांची स्थापना केली. ॥ १५ ॥

याम॑थ॑र्वा॒ मनु॑ष्पि॒ता द॒ध्यङ् धिय॒मत्नं॑त ॥

तस्मि॒न्ब्रह्मा॑णि पू॒र्वथेन्द्रं॑ उ॒क्था सं अं॑ग्म॒ता॒र्च॒न्ननु॑ स्व॒राज्यं॑म् ॥ १६ ॥

यां अथर्वा मनुः पिता दध्यङ् धियं अत्नत ॥

तस्मिन् ब्रह्माणि पूर्वऽथा इंद्रे उक्था सं अग्मत अर्चन् अनु स्वऽराज्यम् ॥ १६ ॥

जी स्तुति अथर्वा, सर्वांचा पिता मनु आणि दध्यङ ह्यांनी केली त्याचप्रमाणे जी स्तोत्रें व स्तवनें त्यांनी गाइली ती सर्व आपले स्वतःचे साम्राज्य स्थापन करण्याची इच्छा धारण करणाऱ्या त्या इंद्रासच पूर्वीप्रमाणे जाऊन पोहोंचली. ॥ १६ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ८१ (इंद्र सूक्त)

ऋषि - गोतम राहूगण : देवता - इंद्र : छंद - पंक्ति

इंद्रो॒ मदा॑य वावृधे॒ शव॑से वृत्र॒हा नृभिः॑ ॥

तमिन्म॒हत्स्वा॒जिषू॒तेमर्भे॑ हवामहे॒ स वाजे॑षु॒ प्र नो॑ऽविषत् ॥ १ ॥

इंद्रः मदाय ववृधे शवसे वृत्रऽहा नृभिः ॥

तं इत् महत्ऽसु आजिषु उत ईं अर्भे हवामहे सः वाजेषु प्र नः अविषत् ॥ १ ॥

वृत्राचा वध करणाऱ्या इंद्रास आनंद व्हावा व त्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून मनुष्याकडून त्याचे स्तवन होत आहे. ज्यावेळी मोठे युद्ध उपस्थित होते त्यावेळीं आम्ही त्यास हांक मारतो व लहानशा युद्धांतही आम्ही त्यास बोलावतो. पराक्रमाच्या कृत्यांत त्याने आमचें नेहमी रक्षण केले आहे. ॥ १ ॥

असि हि वीर सेन्योऽसि भूरि परादुदिः ॥

असि दभ्रस्य चिद्वृधो यजमानाय शिक्षसि सुन्वते भूरि ते वसु ॥ २ ॥

असि हि वीर सेन्यः असि भूरि पराऽददिः ॥

असि दभ्रस्य चित् वृधः यजमानाय शिक्षसि सुन्वते भूरि ते वसु ॥ २ ॥

हे वीरा, खरोखर तूंच सेनानायक शोभतोस. अनेक तऱ्हेने भक्तांस वैभव अर्पण करणारा तूंच आहेस. जगाच्या दृष्टीने जी माणसें लहान त्यांना सुद्धा तूं उत्कर्षाप्रत पोहोंचवितोस व सोमरस अर्पण करणाऱ्या आपल्या भक्तांस, तुझ्याजवळ असलेली विपुल संपत्ति प्राप्त करून घेण्याचें ज्ञान तूं देत असतोस. ॥ २ ॥

यदुदीरत आजयो धृष्णवे धीयते धना ॥

युक्ष्वा मंदुच्युता हरी कं हनः कं वसौ दधोऽस्माँ इंन्द्र वसौ दधः ॥ ३ ॥

यत् उत्ऽईरते आजयः धृष्णवे धीयते धना ॥

युक्ष्व मदऽच्युता हरी इति कं हनः कं वसौ दधः अस्मान् इंद्र वसौ दधः ॥ ३ ॥

ज्यावेळी युद्धांना प्रारंभ होतो त्यावेळी धारिष्टवान पुरुषावर तुझ्याकडून संपत्तीचा वर्षाव होतो. शत्रूंचा गर्व हरण करणारे आपले अश्व तूं रथास जोड. तूं कोणाचा वध केलास बरें ! तूं वैभववावर कोणाची स्थापना केलीस. खरोखर, हे इंद्रा, तूं आमची वैभववावर स्थापना केली आहेस. ॥ ३ ॥

क्रत्वा महाँ अनुष्वधं भीम आ वावृधे शवः ॥

श्रिय ऋष्व उपाकयोर्नि शिप्री हरिवान्दधे हस्तयोर्वज्रमायसम् ॥ ४ ॥

क्रत्वा महान् अनुऽस्वधं भीमः आ ववृधे शवः ॥

श्रिये ऋष्वः उपाकयोः नि शिप्री हरिऽवान् दधे हस्तयोः वज्रं आयसम् ॥ ४ ॥

आपल्या सामर्थ्याच्या योगानें श्रेष्ठत्व पावलेल्या व आपल्या स्वतःच्या युद्धपद्धतीमुळें शत्रूंस भयंकर वाटणाऱ्या ह्या देवानें आपले सामर्थ्य पुष्कळ वृद्धिंगत केले आहे. सुंदर मुकुटानें विभूषित व पीतवर्ण अश्वांनी संपन्न अशा ह्या श्रेष्ठ देवानें एकमेकांशी भिडलेल्या आपल्या दोन्ही बाहूंवर शोभेकरितां लोखंडी वज्र धारण केले आहे. ॥ ४ ॥

आ प॑प्रौ॒ पार्थि॑वं॒ रजो॑ बद्ब॒धे रो॑च॒ना दि॒वि ॥

न त्वावाँ॑ इंद्र॒ कश्च॒न न जा॒तो न ज॑निष्य॒तेऽ॑ति॒ विश्वं॑ ववक्षिथ ॥ ५ ॥

आ पप्रौ पार्थिवं रजः बद्बधे रोचना दिवि ॥

न त्वाऽवान् इंद्र कः चन न जातः न जनिष्यते अति विश्वं ववक्षिथ ॥ ५ ॥

ह्याने भूलोकासह रजोलोकाला व्याप्त करून टाकले आहे. द्युलोकांतील सर्व देदीप्यमान प्रदेशांत हा भरून राहिला आहे. हे इंद्रा, तुझ्या सारखा ह्या जगांत अन्य कोणीही नाही. एवढेंच काय परंतु असा पूर्वीही कोणी झाला नाही, व पुढेंही कोणी होणार नाही. तूं सर्वांपेक्षा सुद्धा जास्त मोठा झाला आहेस. ॥ ५ ॥

यो अ॒र्यो म॑र्त॒भोज॑नं परा॒ददा॑ति दा॒शुषे॑ ॥

इंद्रो अस्मभ्यं शिक्षतु वि भंजा भूरि ते वसु भक्षीय तव राधसः ॥ ६ ॥

यः अर्यः मर्तऽभोजनं पराऽददाति दाशुषे ॥

इंद्रः अस्मभ्यं शिक्षतु वि भज भूरि ते वसु भक्षीय तव राधसः ॥ ६ ॥

जो भक्तांवर प्रेम करीत असून आपल्या उपासकांकरितां मानवांना योग्य अशी पोषणाची तजवीज करतो, तो इंद्र आम्हांस वैभव प्राप्त करून घेण्याचें शिक्षण देवो. तुझ्याजवळ संपत्ति पुष्कळ आहे. ती तूं आम्हांस वाटून दे. तुझ्या कृपेचा मला उपभोग घेवूं दे. ॥ ६ ॥

मदेमदे हि नो ददिर्यूथा गवांमृजुक्रतुः ॥

सं गृंभाय पुरू शतोभयाहस्त्या वसु शिशीहि राय आ भर ॥ ७ ॥

मदेऽमदे हि नः ददिः यूथा गवां ऋजुऽक्रतुः ॥

सं गृभाय पुरू शता उभयाहस्त्या वसु शिशीहि रायः आ भर ॥ ७ ॥

आपल्या सामर्थ्याचा सरळ मनानें उपभोग करणारा हा इंद्र जेव्हां जेव्हां आपल्या हर्षाच्या भरांत येतो तेव्हां तेव्हां खरोखर धेनूंचे कळपच्या कळप आम्हांस अर्पण करतो. हे इंद्र देवा, शेंकडो प्रकारची वैभवें आपल्या दोन्ही हातांत घेऊन ठेव. आमचे तेज वाढव आणि आम्हांस संपत्ति अर्पण कर. ॥ ७ ॥

मा॒दय॑स्व सु॒ते सचा॒ शव॑से शू॒र॒ राध॑से ॥

वि॒द्मा हि त्वा॑ पु॒रू॒वसु॒मुप॒ कामा॑न्ससृ॒ज्महेऽ॑था नोऽवि॒ता भ॑व ॥ ८ ॥

मादयस्व सुते सचा शवसे शूर राधसे ॥

विद्म हि त्वा पुरुऽवसुं उप कामान् ससृज्महे अथा नः अविता भव ॥ ८ ॥

हे शूरा, सोमरस सिद्ध केल्यानंतर तूं आम्हांस सामर्थ्य देण्याकरितां, आणि आमच्यावर कृपा करण्याकरितां आमच्या सोमरसांनी संतुष्ट हो. तुझ्याजवळ अनेक प्रकारची संपत्ति आहे हे आम्हांस खचित माहीत आहे. आम्ही आपले सर्व मनोरथ तुझ्यापुढें ठेवतो, म्हणून तूं आमचा संरक्षणकर्ता हो. ॥ ८ ॥

ए॒ते त॑ इंद्र ज॒न्तवो॒ विश्वं॑ पुष्यन्ति॒ वार्य॑म् ॥

अन्तर्हि ख्यो जनानामर्यो वेदो अदाशुषां तेषां नो वेद आ भर ॥ ९ ॥

एते ते इंद्र जंतवः विश्वं पुष्यंति वार्यम् ॥

अंतः हि ख्यः जनानां अर्यः वेदः अदाशुषां तेषां नः वेद आ भर ॥ ९ ॥

हे इंद्रा, ही तुझ्या आश्रयाखाली राहणारी माणसें, दिवसानुदिवस सर्व प्रकारची स्पृहणीय संपत्ति वृद्धिंगत करून घेत आहेत. भक्तिहीन पातकी लोकांनी आपल्याजवळ किती संपत्ति सांठवून ठेवलेली आहे हे तूं भक्तवत्सल असल्यामुळें तुला विदित आहे; तेव्हां त्यांची संपत्ति हरण करून आम्हांस आणून दे. ॥ ९ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ८२ (इंद्र सूक्त)

ऋषि - गोतम राहूगण : देवता - इंद्र : छंद - पंक्ति; जगती

उपो॒ षु शृ॑णु॒ही गिरो॒ मघ॑व॒न्मात॑था इव ॥

य॒दा नः॑ सू॒नृता॑वतः॒ कर॒ आद॒र्थया॑स॒ इद्योजा॑ न्विन्द्र ते॒ हरी॑ ॥ १ ॥

उपो इति सु शृणुही गिरः मघऽवन् मा अतथाऽइव ॥

यदा नः सूनृताऽवतः करः आत् अर्थयासे इत् योज नु इंद्र ते हरी इति ॥ १ ॥

हे उदार इंद्र देवा, इकडे ये व आमच्या प्रार्थना ऐक. आमच्याविषयी पूर्वीपेक्षा भिन्न भावना धारण करूं नकोस. ज्या अर्थी गोड गोड वाणीने तुझ्याजवळ याचना कशा करावी हें तूं आम्हांस शिकविलेले आहेस, त्या अर्थी आम्ही तुझ्याजवळ आळ घेणारच घेणार. यास्तव हे इंद्रा, खरोखर आपले अश्व तू सिद्ध कर. ॥ १ ॥

अक्ष॒न्नमी॑मदन्त॒ ह्यव॑ प्रि॒या अ॑धूषत ॥

अस्तौ॑षत॒ स्वभा॑नवो॒ विप्रा॒ नवि॑ष्ठया म॒ती योजा॑ न्विन्द्र ते॒ हरी॑ ॥ २ ॥

अक्षन् अमीमदंत हि अव प्रियाः अधूषत ॥

अस्तोषत स्वऽभानवः विप्राः नविष्ठया मती योज नु इंद्र ते हरी इति॥ २ ॥

ते सुखांत राहिले, त्यांनी आनंद केला. त्यांच्यावर तुझी प्रीति असल्यामुळें त्यांनी हर्षाने आपली मस्तकें डोलविली. स्वतःच्याच तेजानें युक्त असलेल्या त्या विद्वान् लोकांनी अभिनव स्तोत्रें रचून तुझे स्तवनही केले. यास्तव, हे इंद्रा तूं खरोखर आपले अश्व आतां सिद्ध कर. ॥ २ ॥

सुसंदृशं त्वा वयं मघवन्वन्दिषीमहि ॥

प्र नूनं पूर्णवन्धुर स्तुतो याहि वशाँ अनु योजा न्विन्द्र ते हरी ॥ ३ ॥

सुऽसंदृशं त्वा वयं मघऽवन् वंदिषीमहि ॥

प्र नूनं पूर्णऽवंधुरः स्तुतः याहि वशान् अनु योज नु इंद्र ते हरी इति ॥ ३ ॥

ज्याचें दर्शन फार रमणीय आहे अशा तुला, हे उदार इंद्रदेवा, आम्ही वंदन करूं. आम्ही तुझी स्तुति केली असल्यामुळें, आपल्या रथामध्यें सर्व प्रकारची वैभवें भरून घेऊन, तुझ्या सेवकांसमीप तूं आगमन कर. खरोखर, हे इंद्रा, तूं आपले अश्व आतां जोड. ॥ ३ ॥

स घा तं वृषणं रथमधि तिष्ठाति गोविदम् ॥

यः पात्रं हारियोजनं पूर्णमिन्द्र चिकेतति योजा न्विन्द्र ते हरी ॥ ४ ॥

सः घ तं वृषणं रथं अधि तिष्ठाति गोऽविदम् ॥

यः पात्रं हारिऽयोजनं पूर्णं इंद्र चिकेतति योज नु इंद्र ते हरी इति ॥ ४ ॥

हे इंद्रदेवा, सोमरसाने भरलेले जें यज्ञपात्र, तुला आपले अश्व जोडण्यास प्रवृत्त करतें. त्यांची रुची काय आहे हे कोणी जाणत असेल तो धेनूंची प्राप्ति करून घेण्यास समर्थ असलेल्या अशा आपल्या रथावर आरूढ होवो. इंद्र देवा, खरोखर आपले अश्व तूं सिद्ध कर. ॥ ४ ॥

युक्तस्ते अस्तु दक्षिण उत सव्यः शतक्रतो ॥

तेन जायामुप प्रियां मन्दानो याह्यन्धसो योजा न्विन्द्र ते हरी ॥ ५ ॥

युक्तः ते अस्तु दक्षिणः उत सव्यः शतक्रतो इति शतऽक्रतो ॥

तेन जायां उप प्रियां मंदानः याहि अंधसः योज नु इंद्र ते हरी इति ॥ ५ ॥

तुझा उजवे बाजूचा घोडा रथास जोडलेला असो, व अत्यंत प्रबल इंद्रा, तुझे डावे बाजूकडील घोडाही रथास जोडला जावो. त्या रथांत बसून आम्ही अर्पण केलेल्या हवींत संतोष मानीत तूं आपल्या प्रियपत्नीकडे गमन कर. खरोखर, हे इंद्रा, तूं आपले अश्व जोड. ॥ ५ ॥

यु॒नज्मि॑ ते॒ ब्रह्म॑णा के॒शिना॒ हरी॒ उप॒ प्र या॑हि दधि॒षे गभ॑स्त्योः ॥

उत् त्वा॑ सु॒तासो॑ रभ॒सा अ॑मन्दिषुः पू॒षण्वान्व॑ज्रि॒न्समु॒ पत्न्या॑मदः ॥ ६ ॥

युनज्मि ते ब्रह्मणा केशिना हरी इति उप प्र याहि दधिषे गभस्त्योः ॥

उत् त्वा सुतासः रभसाः अमंदिषुः पूषण्ऽवान् वज्रिन् सं ऊं इति पत्न्या अमदः ॥ ६ ॥

तुझी स्तोत्रें गाऊन आम्ही तुझ्या अश्वांना तुझे रथास नियुक्त होण्याची प्रेरणा करीत आहोंत. याची आयाळ किती दीर्घ आहे पहा. तूं इकडे ये; कारण तू आपल्या हातांत सर्व संपत्ति धारण करतोस. चित्तास हुषारी आणणाऱ्या

ह्या सोमरसांनी तुला आनंद दिला आहे. आणि पूषादेव आपली पत्नी यांचे सहवर्तमान, हे वज्रधारी देवा, तूं त्यांत रममाण होऊन गेला आहेस. ॥ ६ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ८३ (इंद्र सूक्त)

ऋषि - गोतम राहूगण : देवता - इंद्र : छंद - जगती

अश्वा॑वति प्रथ॒मो गोषु॑ गच्छति सुप्रा॒वीरि॑न्द्र॒ मर्त्य॒स्तवो॒तिभिः॑ ॥

तमित्पृ॑णक्षि॒ वसु॑ना॒ भवी॑यसा॒ सिंधु॒मापो॒ यथा॒भितो॒ विचे॑तसः ॥ १ ॥

अश्वऽवति प्रथमः गोषु गच्छति सुप्रऽअवीः इंद्र मर्त्यः तव उतिभिः ॥

तं इत् पृणक्षि वसुना भवीयसा सिंधुं आपः यथा अभितः विऽचेतसः ॥ १ ॥

हे इंद्रदेवा, आपल्या कृपासामर्थ्याने तूं ज्या मानवाचें संरक्षण करतोस तो सर्वांचे अगोदर धेनू व अश्वयुक्त संपत्ति यांप्रत प्राप्त होतो. ज्याप्रमाणें त्वरेनें धांवणारे पाणी चोहोंकडून येऊन समुद्रास भरून टाकते, त्याप्रमाणें खरोखर तूं त्या मानवास विपुल धनानें भरून टाकतोस. ॥ १ ॥

आपो॒ न दे॒वीरुप॑ यन्ति हो॒त्रिय॑म॒वः प॑श्यन्ति॒ वित॑तं॒ यथा॒ रजः॑ ॥

प्रा॒चैर्दे॒वासः॒ प्र ण॑यन्ति देव॒युं ब्र॑ह्म॒प्रिय॑ं जोषयन्ते व॒रा इ॑व ॥ २ ॥

आपः न देवीः उप यंति होत्रियं अवः पश्यंति विऽततं यथा रजः ॥

प्राचैः देवासः प्र नयंति देवऽयुं ब्रह्मऽप्रियं जोषयंते वराःऽइव ॥ २ ॥

पुण्यकारक नद्यांप्रमाणे ते त्या यज्ञार्ह इंद्र देवासभोंवती जमतात व जगताचें संरक्षण करण्याचे त्याचे रजोलोकाप्रमाणे सर्वत्र पसरलेले सामर्थ्य ते अवलोकन करतात. भक्तिमान पुरुषास सर्व देव प्रमुख स्थानाकडे घेऊन जातात, व ज्याप्रमाणे विवाहोत्सुक पुरुष वधूंचा शोध करतात त्याप्रमाणे स्वस्तुति गाणाऱ्या भक्तास ते देव शोधीत जातात. ॥ २ ॥

अधि॒ द्व॒यौरदधा उ॒क्थ्यं१ं वचौ य॒तस्रुं॑चा मिथु॒ना या स॑प॒र्यतः॑ ॥

असं॑यत्तो व्र॒ते तें॑ क्षेति॒ पुष्यं॑ति भ॒द्रा श॒क्तिर्यज॑मानाय सुन्व॒ते ॥ ३ ॥

अधि द्व॒योः अदधा उक्थ्यं वचः यतऽस्रुचा मिथुना या सपर्यतः ॥

असंऽयत्तः व्रते ते क्षेति पुष्यति भद्रा शक्तिः यजमानाय सुन्वते ॥ ३ ॥

यज्ञचमस सिद्ध करून जे प्रधूवर तुझे पूजन करतात त्या उभयतांवर तूं प्रशंसायुक्त वचनांचा वर्षाव करतोस. जो कोणी तुझ्या आज्ञेंत राहतो तो कोणाकडूनही उपद्रव न पावतां भरभराटीस पोहोंचतो. जो भक्त तुला सोमरस अर्पण करतो त्यास कल्याणप्रद असे सामर्थ्य प्राप्त होते. ॥ ३ ॥

आदङ्गिं॑राः प्र॒थ॒मं द॑धिरे॒ वयं॑ इ॒द्धाग्नं॑यः॒ शम्या॒ ये सुं॑कृ॒त्यया॑ ॥

सर्वं॑ प॒णेः सम॑विंदन्त॒ भोज॑न॒मश्वा॑वन्तं॒ गोमं॑न्त॒मा प॒शुं नरः॑ ॥ ४ ॥

आत् अङ्गिराः प्रथमं दधिरे वयः इद्धऽअग्नयः शम्या ये सुऽकृत्यया ॥

सर्वं पणेः सं अविंदंत भोजनं अश्वऽवंतं गोमंतं आ पशुं नरः ॥ ४ ॥

सत्कृत्यें व भक्ति यांच्या योगानें ज्या अंगिरसांनी अग्नीस प्रदिप्त केलें होते त्या सर्वांचे अगोदर ज्यांना दीर्घ आयुष्याची प्राप्ति झाली, त्या पुरुषांस पणीची सर्व अन्नसामग्री तसेच त्यानें बाळगलेले अश्वधेनू इत्यादि सर्व पशु हेही मिळाले. ॥ ४ ॥

य॒ज्ञैरथ॑र्वा प्रथ॒मः प॒थस्त॑त॒ते तत॒ः सूर्यो॑ व्रत॒पा वे॒न आज॑नि ॥

आ गा आ॑जदु॒शना॑ का॒व्यः सचा॑ य॒मस्य॑ जा॒तम॒मृतं᳚ यजामहे ॥ ५ ॥

यज्ञैः अथर्वा प्रथमः पथः तते ततः सूर्यः व्रतऽपा वेनः आ अजनि ॥

आ गा आजत् उशना काव्यः सचा यमस्य जातं अमृतं यजामहे ॥ ५ ॥

प्रथम अथर्वणाने यज्ञाच्या योगाने मार्ग तयार केला नंतर नीतिनियमनांचे परिपालन करणाऱ्या सुंदर सूर्यदेवानें जन्म घेतला. उशना काव्यानें नंतर लगेच धेनू हांकून आणल्या. आम्ही आतां यमानें जन्म घेतल्याबद्दल त्याचें पूजन करीत आहों. ह्यास मृत्युची बाधा नाही. ॥ ५ ॥

ब॒र्हिर्वा॒ यत्स्व॑प॒त्याय॑ वृ॒ज्यते॑ऽ॒र्को वा॒ श्लोक॑मा॒घोष॑ते दि॒वि ॥

ग्रावा॒ यत्र॒ वद॑ति का॒रुरु॒क्थ्य१॑स्तस्येदिंद्रो॑ अभिपि॒त्वेषु॑ रण्यति ॥ ६ ॥

बर्हिः वा यत् सुऽअपत्याय वृज्यते अर्कः वा श्लोकं आऽघोषते दिवि ॥

ग्रावा यत्र वदति कारुः उक्थ्यः तस्य इत् इंद्रः अभिऽपित्वेषु रण्यति ॥ ६ ॥

ज्यावेळी चांगल्या अपत्याची प्राप्ति व्हावी म्हणून भक्तिमान लोक दर्भ कापून आणतात अथवा ज्यावेळीं स्तोत्रें अथवा गायनें ह्यांचा घोष द्युलोकापर्यंत जाऊन पोहोंचतो, अथवा जेथें सोमवल्लींतून तिचा रस बाहेर काढण्यास समर्थ अशा एखाद्या शोभिवंत यज्ञ पाषाणाचा ध्वनि चाललेला असतो त्यावेळी असा यज्ञ आपल्या समीप चाललेला पाहून इंद्रास फार हर्ष होतो. ॥ ६ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ८४ (इंद्र सूक्त)

ऋषि - गोतम राहूगण : देवता - इंद्र : छंद - अनेक

असा॑वि॒ सोम॑ इंद्र ते॒ शवि॑ष्ठ धृष्ण॒वा ग॑हि ॥

आ त्वा॑ पृणक्त्विंद्रि॒यं रज॒ः सूर्यो॒ न र॒श्मिभि॑ः ॥ १ ॥

असावि सोमः इंद्र ते शविष्ठ धृष्णो इति आ गहि ॥

आ त्वा पृणक्तु इंद्रियं रजः सूर्यः न रश्मिभिः ॥ १ ॥

हे इंद्रा, तुझ्याकरितां येथे सोमरस तयार करून ठेवला आहे, म्हणून हे अत्यंत बलाढ्य व धारिष्टवान देवा, तूं इकडे ये. ज्याप्रमाणे आपल्या किरणांनी सूर्य रजोलोकास व्याप्त करून टाकतो त्याप्रमाणे तुझ्या शरीरांत सर्वत्र उत्साह प्रवेश करो. ॥ १ ॥

इंद्र॒मिद्धरी॑ वह॒तोऽ॑प्रतिधृष्टशवसम् ॥

ऋषी॑णां च स्तु॒तीरुप॑ य॒ज्ञं च॒ मानु॑षाणाम् ॥ २ ॥

इंद्रं इत् हरी इति वहतः अप्रतिधृष्टऽशवसम् ॥

ऋषीणां च स्तुतीः उप यज्ञं च मानुषाणाम् ॥ २ ॥

ज्याच्या बलाचा प्रतिरोध कोणास करतां यावयाचा नाही असा जो केवळ इंद्रच त्याचे अश्व, ऋषीजनांच्या स्तुति ऐकण्याकरितां व इतर मनुष्याच्या यज्ञांचा स्वीकार करण्याकरितां घेऊन येत असतात. ॥ २ ॥

आ तिष्ठ वृत्रहन्रथं युक्ता ते ब्रह्मणा हरी ॥

अर्वाचीनं सु ते मनो ग्रावा कृणोतु वग्नुना ॥ ३ ॥

आ तिष्ठ वृत्रऽहन् रथं युक्ता ते ब्रह्मणा हरी इति ॥

अर्वाचीनं सु ते मनः ग्रावा कृणोतु वग्नुना ॥ ३ ॥

हे वृत्राचा वध करणाऱ्या देवा, तूं रथावर आरूढ हो. आम्ही स्तोत्रे गाऊन तुला आपले अश्व रथास जोडण्यास प्रवृत्त केले आहे. हा सोमफलक आपल्या मधुर ध्वनीनें तुझे मन आमचेकडे वळवो. ॥ ३ ॥

इ॒ममिं॑द्र सु॒तं पि॑ब॒ ज्येष्ठ॒मम॑र्त्यं॒ मदं॑म् ॥

शु॒क्रस्य॑ त्वा॒भ्यक्षर॒न्धारा॑ ऋ॒तस्य॒ साद॑ने ॥ ४ ॥

इमं इंद्र सुतं पिब ज्येष्ठं अमर्त्यं मदम् ॥

शुक्रस्य त्वा अभि अक्षरन् धाराः ऋतस्य सदने ॥ ४ ॥

हे इंद्र देवा, जणूं प्रत्यक्ष आनंदच अशा ह्या अत्युत्तम व अमरत्व प्राप्त करून देणाऱ्या सोमरसाचें प्राशन कर. ह्या उज्ज्वल सोमाच्या धारा तुला उद्देशून यज्ञगृहामध्यें वाहूं लागल्या आहेत. ॥ ४ ॥

इंद्रा॑य नू॒नम॑र्चतो॒क्थानि॑ च ब्रवीतन ॥

सु॒ता अ॑मत्सु॒रिंद॑वो॒ ज्येष्ठं॑ नमस्यता॒ सहः॑ ॥ ५ ॥

इंद्राय नूनं अर्चत उक्थानि च ब्रवीतन ॥

सुताः अमत्सुः इंदवः ज्येष्ठं नमस्यता सहः ॥ ५ ॥

खरोखर ह्या इंद्रास उद्देशून पूजा अर्पण करा. त्याचे सन्मानार्थ स्तोत्रें म्हणा. ह्या सोमवल्लींतून काढलेल्या रसबिंदूनीं त्यास आनंद उत्पन्न केला आहे. म्हणून ह्या सर्वश्रेष्ठ सामर्थ्यापुढें विनयानें प्रणाम करा. ॥ ५ ॥

नकिष्ट्वद्रथीतरो हरी यदिंद्र यच्छसे ॥

नकिष्ट्वानु मज्मना नकिः स्वश्व आनशे ॥ ६ ॥

नकिःष् त्वत् रथीऽतरः हरी इति यत् इंद्र यच्छसे ॥

नकिः त्वा अनु मज्मना नकिः सुऽअश्व आनशे ॥ ६ ॥

ज्यावेळी हे इंद्रा, तूं आपले अश्व रथास जोडतोस त्यावेळीं रथ चालविण्यांत तुझ्यापेक्षां जास्त निपुण खरोखर दुसरा कोणीही नसेल. सामर्थ्यांत तुझी बरोबरी करणारा खरोखर कोणीही नाही, व तुझ्यासारखें अश्वनैपुण्य संपादन करून आजपर्यंत कोणीही तुझ्यावर वरचढ केली नाही हे खचित आहे. ॥ ६ ॥

य एक इद्विदयते वसु मर्ताय दाशुषे ॥

ईशानो अप्रतिष्कुत इंद्रो अङ्ग ॥ ७ ॥

यः एकः इत् विऽदयते वसु मर्ताय दाशुषे ॥

ईशानः अप्रतिऽष्कुतः इंद्रः अङ्ग ॥ ७ ॥

भक्तीनें हवि अर्पण करणाऱ्या मानवास जो धन अर्पण करतो असा हा अप्रतिहत सामर्थ्यवान इंद्र प्रभूच एकटा होय. ॥ ७ ॥

कुदा मर्तमराधसं पुदा क्षुम्पमिव स्फुरत् ॥

कुदा नः शुश्रवद्गिर इंद्रो अङ्ग ॥ ८ ॥

कदा मर्तं अराधसं पदा क्षुंपंऽइव स्फुरत् ॥

कदा नः शुश्रवत् गिर इंद्रः अङ्ग ॥ ८ ॥

इंद्राचे पूजन न करणाऱ्या मानवास तो तृणाप्रमाणे पायाखाली केव्हां तुडवून टाकील बरें ? खरोखर तो आमच्या प्रार्थना केव्हां ऐकेल ? ॥ ८ ॥

यश्चि॒द्धि त्वा॑ ब॒हुभ्य॒ आ सु॒तावाँ᳚ आ॒विवा॑सति ॥

उ॒ग्रं तत्प॑त्यते॒ शव॒ इंद्रो᳚ अ॒ङ्ग ॥ ९ ॥

यः चित् हि त्वा बहुऽभ्य आ सुतऽवान् आऽविवासति ॥

उग्रं तत् पत्यते शवः इंद्रः अङ्ग ॥ ९ ॥

खरोखर दुसऱ्या अनेक देवता सोडून मनुष्य सोमरसानें तुझी उपासना करतो असेंच उग्र सामर्थ्य ह्या इंद्राजवळ आहे. ॥ ९ ॥

स्वा॒दोरि॒त्था वि॑षू॒वतो॒ मध्वः॑ पिबन्ति गौ॒र्यः॑ ॥

या इंद्रे॑ण स॒याव॑री॒र्वृष्णा॒ मद॑न्ति शो॒भसे॒ वस्वी॒रनु॑ स्व॒राज्य॑म् ॥ १० ॥

स्वादोः इत्था विषूऽवतः मध्वः पिबंति गौर्यः ॥

याः इंद्रेण सऽयावरीः वृष्णा मदंति शोभसे वस्वीः अनु स्वऽराज्यम् ॥ १० ॥

ज्या उज्ज्वल धेनू इंद्राबरोबर असतात, ज्या त्या पराक्रमी देवाच्या सहवासांत शोभा पावून आनंदाचा उपभोग घेतात, व ज्यांना त्याच्या अप्रतिहत जगत्प्रभुत्वामुळें तेज आलेले आहे, त्या धेनूही ह्याप्रमाणे सर्व शरीरांत एकदम प्रवेश करणाऱ्या मधुर व उत्तम सोमरसाचें प्राशन करीत असतात. ॥ १० ॥

ता अ॒स्य पृश॒ना॒युव॒ः सोमं॑ श्रीणन्ति॒ पृश्न॑यः ॥

प्रि॒या इं॒द्र॑स्य धे॒नवो॒ वज्रं॑ हिन्वन्ति॒ साय॑कं॒ वस्वी॒रनु॑ स्व॒राज्य॑म् ॥ ११ ॥

ताः अस्य पृशनऽयुवः सोमं श्रीणंति पृश्नयः ॥

प्रियाः इंद्रस्य धेनवः वज्रं हिन्वंति सायकं वस्वीः अनु स्वऽराज्यम् ॥ ११ ॥

चित्रविचित्र वर्णांच्या ह्या धेनूंना इंद्राच्या सान्निध्याची फार आवड असते. व त्या सोमरसास परिपक्वत्व आणतात. ह्या धेनू इंद्रास प्रिय आहेत. सर्व विश्वांवर जे इंद्राचें अधिपत्य आहे त्यामुळें ह्यांनाही तेज चढून त्या ह्याचे आयुध जे वज्र त्यास स्फुरण चढवितात. ॥ ११ ॥

ता अ॑स्य॒ नम॑सा॒ सहः॑ सप॒र्यन्ति॒ प्रचे॑तसः ॥

व्र॒तान्य॑स्य सश्चिरे पु॒रूणि॑ पू॒र्वचि॑त्तये॒ वस्वी॒रनु॑ स्व॒राज्य॑म् ॥ १२ ॥

ताः अस्य नमसा सहः सपर्यंति प्रऽचेतसः ॥

व्रतानि अस्य सश्चिरे पुरूणि पूर्वऽचित्तये वस्वीः अनु स्वऽराज्यम् ॥ १२ ॥

त्या ज्ञानवान धेनू त्याचे सामर्थ्यास वंदन करून त्याचें पूजन करतात. सर्वांचे अगोदर आपणांस ज्ञान प्राप्त व्हावे ह्या इच्छेनें, इंद्राच्या अधिपत्यामुळें तेज पावलेल्या त्या धेनूंनी त्याच्या अनेक नियमनांचे योग्य परिपालन केले. ॥ १२ ॥

इंद्रो॑ दधी॒चो अ॒स्थभि॑र्वृ॒त्राण्यप्र॑तिष्कुतः ॥ ज॒घान॑ नव॒तीर्नव॑ ॥ १३ ॥

इंद्रः दधीचः अस्थऽभिः वृत्राणि अप्रतिऽष्कुतः ॥ जघान नवतीः नव ॥ १३ ॥

ज्याच्या सामर्थ्यापुढें शत्रूंचा निभाव लागत नाही अशा त्या इंद्रानें, दधिचाच्या अस्थि घेऊन त्यांच्यायोगानें नव्याण्णव वृत्राचा वध केला. ॥ १३ ॥

इ॒च्छन्नश्व॑स्य॒ यच्छिरः॒ पर्व॑ते॒ष्वप॑श्रितम् ॥ तद्वि॑दच्छर्य॒णाव॑ति ॥ १४ ॥

इच्छन् अश्वस्य यच् शिरः पर्वतेषु अपऽश्रितम् ॥ तत् विदत् शर्यणाऽवति ॥ १४ ॥

पर्वतांत गुप्त होऊन राहिलेलें जे अश्वाचे शिर इंद्र शोधीत होता तें त्याला शरणावृतामध्यें सांपडलें. ॥ १४ ॥

अत्राह॒ गोर॑मन्वत॒ नाम॒ त्वष्टु॑रपी॒च्यम् ॥ इ॒त्था च॒न्द्रम॑सो गृ॒हे ॥ १५ ॥

अत्र अह गोः अमन्वत नाम त्वष्टुः अपीच्यम् ॥ इत्था चंद्रमसः गृहे ॥ १५ ॥

त्वष्टा देवाच्या वृषभाचें नांव सुद्धां लुप्त झाले असतां यांस त्याच ठिकाणीं त्याचा शोध लागला व चंद्राच्या सदनांत सुद्धां तें ह्याच प्रमाणे उपलब्ध झाले. ॥ १५ ॥

को अ॒द्य यु॑ङ्क्ते धु॒रि गा ऋ॒तस्य॒ शिमी॑वतो भा॒मिनो॑ दु॒र्हृणा॒यून् ॥

आ॒सन्नि॑षून्हृ॒त्स्वसो॑ मयो॒भून्य ए॑षां भृ॒त्यामृ॒णध॒त्स जी॑वात् ॥ १६ ॥

कः अद्य युङ्क्ते धुरि गाः ऋतस्य शिमीऽवतः भामिनः दुःहृणायून् ॥

आसन्ऽइषून् हृत्सुऽअसः मयःऽभून् यः एषां भृत्यां ऋणधत् सः जीवात् ॥ १६ ॥

सामर्थ्यवान, तेजस्वी, ताब्यांत ठेवण्यास कठीण असलेलें, मुख व वक्षस्थलें बाणाप्रमाणें घातक असतांही जे सौख्य अर्पण करणारे आहेत अशा वृषभांस सत्यनियमनांच्या धुरेस आज कोण जोडील बरें ? खरोखर जो कोणी ह्यांच्या सेनेस उत्तेजन देईल त्यास दीर्घ आयुष्य प्राप्त होईल. ॥ १६ ॥

क ई॑षते तु॒ज्यते॒ को बि॑भाय॒ को मं॑सते॒ सन्त॒मिन्द्रं॒ को अन्ति॑ ॥

कस्तो॒काय॒ क इभा॑यो॒त रा॒येऽधि॑ ब्रवत्त॒न्वे३ को जना॑य ॥ १७ ॥

कः ईषते तुज्यते कः बिभय कः मंसते संतं इंद्रं कः अंति ॥

कः तोकाय कः इभाय उत राये अधि ब्रवत् तन्वे कः जनाय ॥ १७ ॥

इंद्रास पाहून कोण पळ काढील ? कोणास धडकी भरेल ? कोण भिईल ? इंद्र आमचे जवळच आहे असें कोणास वाटावयास लागेल ? त्यास आपल्या बलाच्या विषयी कोण प्रार्थना करील ? आपल्या नोकरचाकरांविषयी, व आपली चीजवस्त व शरीरस्वास्थ्य ह्यांविषयीं त्यास कोण विनवील ? आपल्या पदरच्या माणसाविषयीं त्याचेजवळ कोण विनंती करील ? ॥ १७ ॥

को अ॒ग्निमी॑ट्टे ह॒विषा॑ घृ॒तेन॑ स्रु॒चा य॑जाता ऋ॒तुभि॑र्ध्रु॒वेभिः॑ ॥

कस्मै॑ दे॒वा आ व॑हाना॒शु होम॒ को मं᳚सते वी॒तिहो॑त्रः सुदे॒वः ॥ १८ ॥

कः अग्निं ईट्टे हविषा घृतेन स्रुचा यजातै ऋतुऽभिः ध्रुवेभिः ॥

कस्मै देवाः आ वहान् आशु होम कः मंसते वीतिऽहोत्रः सुदेवः ॥ १८ ॥

हवीनें घृतानें त्याचें कोण पूजन करतो ? ठराविक योग्य वेळीं त्यास यज्ञचमसानें कोण हवि देतो ? देव यज्ञद्रव्यें त्वरेनें कोणाकरितां घेऊन येतात ? कल्याणकर्त्या अशा देवांचा कोणता उपासक त्यास यज्ञ अर्पण करून त्यांचे चिंतन करतो ? ॥ १८ ॥

त्वमङ्ग प्र शंसिषो देवः शविष्ठ मर्त्यम् ॥

न त्वदन्यो मघवन्नस्ति मर्डितेन्द्र ब्रवीमि ते वचः ॥ १९ ॥

त्वं अङ्ग प्र शंसिषः देवः शविष्ठ मर्त्यम् ॥

न त्वत् अन्यः मघऽवन् अस्ति मर्डिता इंद्र ब्रवीमि ते वचः ॥ १९ ॥

हे अत्यंत पराक्रमी देवा, खरोखर तूं श्रेष्ठ देव असूनही मानवांची महती वाढविली आहेस. हे उदार इंद्रा तुझेवाचून सौख्याची प्राप्ति करून देणारा कोणी नाहीं हें मी तुला खचित सांगतो. ॥ १९ ॥

मा ते राधांसि मा त ऊतयो वसोऽस्मान्कदा चना दभन् ॥

विश्वा॑ च न उपमिमी॒हि मा॑नुष॒ वसू॑नि चर्ष॒णिभ्य॒ आ ॥ २० ॥

मा ते राधांसि मा ते ऊतयः वसो इति अस्मान् कदा चन दभन् ॥

विश्वा च नः उपऽमिमीहि मानुष वसूनि चर्षणिऽभ्य आ ॥ २० ॥

हे वैभवस्वरूपदेवा, तुझी कृपा व आमचें संरक्षण करणारें तुझें सामर्थ्य ह्याचा आमच्यांत कधींही भंग न पावो. मानवांचे हित करणाऱ्या हे देवा, आमच्या व आमच्या जवळच्या माणसांच्या पदरात सर्व संपत्ति मोजून टाक. ॥ २० ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ८५ (मरुत् सूक्त)

ऋषि - गोतम राहूगण : देवता - मरुत् : छंद - त्रिष्टुभ्; जगती

प्र ये शुम्भंन्ते जनंयो न सप्तंयो यामंन्रुद्रस्यं सूनवंः सुदंसंसः ॥

रोदंसी हि मरुतंश्चक्रिरे वृधे मदंन्ति वीरा विदथेषु घृष्वंयः ॥ १ ॥

प्र ये शुम्भंते जनयः न सप्तयः यामन् रुद्रस्य सूनवः सुऽदंससः ॥

रोदसी इति हि मरुतः चक्रिरे वृधे मदंति वीरा विदथेषु घृष्वयः ॥ १ ॥

अद्भुत पराक्रम करणारे व शीघ्रसंचारी असे जे रुद्राचे पुत्र स्वमार्गानें गमन करीत असतां, युवतीप्रमाणें आपली शरीरें नटवीत असतात त्यांनीच - खरोखर त्या मरुतांनीच - द्यावा पृथिवींना उत्कर्षाप्रत पोहोंचविलें. ते शूर व युद्ध संघर्षणांत चतुर आहेत. यज्ञ चालला असतां त्यांना फार आनंद होतो. ॥ १ ॥

त उंक्षितासों महिमानंमाशत दिवि रुद्रासो अधिं चक्रिरे सदंः ॥

अर्चंन्तो अर्कं जनयंन्त इन्द्रियमधि श्रियों दधिरे पृश्निंमातरः ॥ २ ॥

ते उक्षितासः महिमानं आशत दिवि रुद्रासः अधि चक्रिरे सदः ॥

अर्चंतः अर्कं जनयंतः इंद्रियं अधि श्रियः दधिरे पृश्निऽमातरः ॥ २ ॥

वृद्धिंगत होत होत, ते महत्वास पोहोंचले. त्या रुद्रानी द्युलोकांत आपलें निवासस्थान केलें. अर्काची उपासना करीत व शरीरबलास प्रगल्भता आणीत त्या पृश्निच्या पुत्रांनी पुष्कळ तेज संपादन केलें. ॥ २ ॥

गोमा॑तरो॒ यच्छु॒भय॑न्ते अ॒ञ्जिभि॑स्त॒नूषु॑ शु॒भ्रा द॑धिरे वि॒रुक्म॑तः ॥

बाध॑न्ते॒ विश्व॑मभिमा॒तिन॒मप॒ वर्त्मा॑न्येषा॒मनु॑ रीयते घृ॒तम् ॥ ३ ॥

गोऽमातरः यत् शुभयंते अञ्जिऽभिः तनूषु शुभ्राः दधिरे विरुक्मतः ॥

बाधंते विश्वं अभिऽमातिनं अप वर्त्मानि एषां अनु रीयते घृतम् ॥ ३ ॥

हे धेनूचे देदीप्यमान पुत्र ज्यावेळी भूषणांनी स्वतःस सजवितात त्यावेळी ते उज्ज्वल अलंकार आपल्या अंगावर घालतात. ते सर्व दुष्टांचा नाश करतात व त्यांचे मार्गावरून घृताचा प्रवाह चाललेला असतो. ॥ ३ ॥

वि ये भ्राज॑न्ते॒ सुम॑खास ऋ॒ष्टिभि॑ः प्रच्या॒वय॑न्तो॒ अच्यु॑ता चि॒दोज॑सा ॥

म॒नो॒जुवो॒ यन्म॑रुतो॒ रथे॒ष्वा वृष॑व्रातास॒ः पृष॑ती॒रयु॑ग्ध्वम् ॥ ४ ॥

वि ये भ्राजंते सुऽमखासः ऋष्टिऽभिः प्रऽच्यवयंतः अच्युता चित् ओजसा ॥

मनःऽजुवः यत् मरुतः रथेषु आ वृषऽव्रातासः पृषतीः अयुग्ध्वम् ॥ ४ ॥

स्वसामर्थ्यानें अचल वस्तूंना सुद्धां चळावयास लावणारे जे परमपूज्य देव आपल्या आयुधांमुळे शोभिवंत असतात अशा हे मरुतांनो, जेव्हां तुम्ही सर्व बलिष्ठ देव एकत्र जमतां व आपल्या रथांस ठिपकेदार रंगाच्या हरिणी जोडतां त्यावेळी तुमच्या गतींत मनाइतका वेग येतो. ॥ ४ ॥

प्र यद्रथे॑षु॒ पृष॑ती॒रयु॑ग्ध्वं॒ वाजे॒ अद्रिं॑म्मरुतो रं॒हय॑न्तः ॥

उ॒तारु॒षस्य॒ वि ष्य॑न्ति॒ धारा॒श्चर्मे॑वो॒दभि॒र्व्युन्दन्ति॒ भूम॑ ॥ ५ ॥

प्र यत् रथेषु पृषतीः अयुग्ध्वं वाजे अद्रिं मरुतः रंहयंतः ॥

उत अरुषस्य वि स्यंति धाराः चर्मऽइव उदऽभिः वि उंदंति भूम ॥ ५ ॥

हे मरुत् हो, ज्यावेळी मोठ्या आवेशाने आपलें शस्त्र फेंकीत तुम्ही ठिपकेदार रंगाच्या हरिणी स्वरथास जोडतां त्या तेजाच्याच धारा चोहोंकडे पसरतात व ज्याप्रमाणे पाण्याच्या योगानें एखादी पखाल चिंब भिजावी त्याप्रमाणें पृथ्वीस त्या स्वतःच्या प्रवाहांत बुडवितात. ॥ ५ ॥

आ वो॑ वहन्तु॒ सप्त॑यो रघु॒ष्यदो॑ रघु॒पत्वा॑नः॒ प्र जि॑गात बा॒हुभिः॑ ॥

सीद॒ता ब॒र्हिरु॒रु वः॒ सद॑स्कृ॒तं मा॒दय॑ध्वं मरुतो॒ मध्वो॒ अन्ध॑सः ॥ ६ ॥

आ वः वहंतु सप्तयः रघुऽस्यदः रघुऽपत्वानः प्र जिगात बाहुऽभिः ॥

सीदत आ बर्हिः उरु वः सदः कृतं मादयध्वं मरुतः मध्वः अंधसः ॥ ६ ॥

हे मरुत्हो, शीघ्रगामी, चपल व उड्डाण करणारे असे तुमचे अश्व तुम्हांस घेऊन येवोत. तुम्ही याल तेव्हां तुमचे बाहू सरसावून या व ह्या आसनावर बसा. तुमच्याकरितां प्रशस्त जागा तयार केली आहे. आमचे मधुर हवि गोड करून घ्या. ॥ ६ ॥

तेऽवर्धन्त॒ स्वत॑वसो महित्व॒ना नाकं॑ त॒स्थुरु॒रु च॑क्रिरे॒ सदः॑ ॥

विष्णुर्यद्धावद्वृषणं मदच्युतं वयो न सीदन्नधि बर्हिषि प्रिये ॥ ७ ॥

ते अवर्धंत स्वऽतवसः महिऽत्वना नाकं तस्थुः उरु चक्रिरे सदः ॥

विष्णुः यत् ह आवत् वृषणं मदऽच्युतं वयः न सीदन् अधि बर्हिषि प्रिये ॥ ७ ॥

स्वसामर्थ्यानें युक्त असलेले ते मरुत् आपल्या सामर्थ्यानें वृद्धि पावले. स्वर्गापर्यंत ते आरूढ झाले. त्यांनी स्वतःकरितां विस्तीर्ण सदन निर्माण केलें. शत्रूंच्या गर्वाचें हरण करणाऱ्या त्या पराक्रमी देवांस ज्यावेळी विष्णुनें साहाय्य केलें त्यावेळीं मरुत् देव पक्ष्यांप्रमाणें आपल्या आवडीच्या कुशासनावर जाऊन बसले. ॥ ७ ॥

शूरा इवेद्युयुधयो न जग्मयः श्रवस्यवो न पृतनासु येतिरे ॥

भयन्ते विश्वा भुवना मरुद्भ्यो राजान इव त्वेषसंदृशो नरः ॥ ८ ॥

शूराःऽइव इत् युयुधयः न जग्मयः श्रवस्यवः न पृतनासु येतिरे ॥

भयंते विश्वा भुवना मरुत्ऽभ्यः राजानःऽइव त्वेषऽसंदृशः नरः ॥ ८ ॥

शूरांप्रमाणें शत्रूंवर त्वरेनें चाल करून जाणाऱ्या, योद्ध्यांप्रमाणें अथवा लढाईंत नांव कमवावयाची हांव असणाऱ्या लढवय्यांप्रमाणें ते युद्धांत आपली पराकाष्ठा करतात. ह्या मरुतांची सर्व जगास भिती वाटते. राजाप्रमाणें ह्याचें अंगांत त्वेष दिसतो. ॥ ८ ॥

त्वष्टा यद्वज्रं सुकृतं हिरण्ययं सहस्रभृष्टिं स्वपा अवर्तयत् ॥

धत्त इन्द्रो नर्यपांसि कर्तवेऽहन्वृत्रं निरपामौब्जदर्णवम् ॥ ९ ॥

त्वष्टा यत् वज्रं सुऽकृतं हिरण्ययं सहस्रऽभृष्टिं सुऽअपाः अवर्तयत् ॥

धत्ते इंद्रः नरि अपांसि कर्तवे अहन् वृत्रं निः अपां औब्जत् अर्णवम् ॥ ९ ॥

ज्यावेळीं कुशल त्वष्टा देवानें हजार धारांनी युक्त असें एक सोन्याचें सुंदर वज्र घडवून तयार केलें त्यावेळीं शौर्याची कृत्यें करण्याकरितां इंद्रानें त्याचा स्वीकार करून वृत्राचा वध केला व उदकांच्या प्रवाहांस मार्ग मोकळा करून दिला. ॥ ९ ॥

ऊर्ध्वं नुनुद्रेऽवतं त ओजसा दादृहाणं चिद्बिभिदुर्वि पर्वतम् ॥

धमन्तो वाणं मरुतः सुदानवो मदे सोमस्य रण्यानि चक्रिरे ॥ १० ॥

ऊर्ध्वं नुनुद्रे अवतं ते ओजसा दद्दहाणं चित् बिभिदुः वि पर्वतम् ॥

धमंतः वाणं मरुतः सुऽदानवः मदे सोमस्य रण्यानि चक्रिरे ॥ १० ॥

त्यांनी स्वसामर्थ्यांनी विहीर खालून वरती आणली व दृढ पर्वताचा सुद्धां भेद केला. त्य उदार मरुतांनी सोमरसाच्या आनंददायक स्फूर्तीचे भरांत, मधुर वेणूध्वनि करीत, अनेक आश्चर्यकारक कृत्यें केलीं. ॥ १० ॥

जिह्मं नुनुद्रेऽवतं तया दिशासिञ्चन्नुत्सं गोतमाय तृष्णजे ॥

आ गच्छन्तीमवसा चित्रभानवः कामं विप्रस्य तर्पयन्त धामभिः ॥ ११ ॥

जिह्मं नुनुद्रे अवतं तया दिशा असिञ्चन् उत्सं गोतमाय तृष्णऽजे ॥

आ गच्छंति ईं अवसा चित्रऽभानवः कामं विप्रस्य तर्पयंत धामऽभिः ॥ ११ ॥

त्या वक्रकूपास त्यांनी त्या दिशेनें वर नेलें, आणि तृषार्त गौतमासाठी त्यांनी उदकाचा झरा वहावयास लावला. चित्रविचित्र क्रांतीनें युक्त असलेले हे मरुत् भक्तांचे संरक्षण करणाऱ्या आपल्या सामर्थ्यासह त्याचेकडे गेले व आपल्या तेजानें त्यांनी त्या विद्वान ऋषीची इच्छा परिपूर्ण केली. ॥ ११ ॥

या वः॒ शर्म॑ शशमा॒नाय॒ सन्ति॑ त्रि॒धातू॑नि दा॒शुषे॑ यच्छ॒ताधि॑ ॥

अ॒स्मभ्यं॒ तानि॑ मरुतो॒ वि य॑न्त र॒यिं नो॑ धत्त वृषणः सु॒वीर॑म् ॥ १२ ॥

या वः शर्म शशमानाय संति त्रिऽधातूनि दाशुषे यच्छत अधि ॥

अस्मभ्यं तानि मरुतः वि यंत रयिं नः धत्त वृषणः सुवीरम् ॥ १२ ॥

जी सौख्यें तुमचें स्तवन करणाऱ्या करितांच राखलेलीं आहेत त्यांस त्रिगुणित करून ती हवि अर्पण करणाऱ्या भक्तांस द्या व हे मरुत् देवांनो, आम्हांसही त्यांचा लाभ घडूं द्या. हे शूर मरुतांनो, वीर्यशाली संततीनें युक्त असें वैभव आम्हांस अर्पण करा. ॥ १२ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ८६ (मरुत् सूक्त)

ऋषि - गोतम राहूगण : देवता - मरुत् : छंद - गायत्री

मरु॑तो॒ यस्य॒ हि क्षये॑ पा॒था दि॒वो वि॑महसः ॥ स सु॑गो॒पात॑मो॒ जनः॑ ॥ १ ॥

मरुतः यस्य हि क्षये पाथ दिवः विऽमहस ॥ सः सुऽगोपातमः जनः ॥ १ ॥

हे अत्यंत तेजःपुंज मरुत् हो, द्युलोकांतून येऊन खरोखर ज्याचे सदनांत तुम्ही सोमरसाचे पान करतां त्यास त्याचे रक्षण करण्यास उत्तमच संरक्षणकर्ता भेटला असे म्हटले पाहिजे. ॥ १ ॥

य॒ज्ञैर्वा॑ यज्ञवाहसो॒ विप्र॑स्य वा मती॒नाम् ॥ मरु॑तः शृणु॒ता हव॑म् ॥ २ ॥

यज्ञैः वा यज्ञऽवाहसः विप्रस्य वा मतीनाम् ॥ मरुतः शृणुत हवम् ॥ २ ॥

यज्ञ करणाऱ्या भक्ताच्या यज्ञांकडे पाहून अथवा विद्वान उपासकाच्या स्तुतींचा आदर करून, हे मरुत् हो, आपण आमची हांक श्रवण करा. ॥ २ ॥

उ॒त वा॒ यस्य॑ वा॒जिनोऽ॒॑नु॒ विप्र॒मत॑क्षत ॥ स गन्ता॒ गोम॑ति व्र॒जे ॥ ३ ॥

उत वा यस्य वाजिनः अनु विप्रं अतक्षत ॥ सः गंता गोऽमति व्रजे ॥ ३ ॥

शिवाय ज्या सामर्थ्यवान पुरुषाविषयी तुमचा इतका आदर आहे की आपल्या विद्वान भक्तास तुम्ही त्याचेप्रमाणे व्हावयास सांगता त्यासच जेथें धेनू विपुल आहेत अशा वैभवाचे स्थान प्राप्त होते. ॥। ३ ॥

अ॒स्य वी॒रस्य॑ ब॒र्हिषि॑ सु॒तः सोमो॒ दिवि॑ष्टिषु ॥ उ॒क्थम् मद॑श्च शस्यते ॥ ४ ॥

अस्य वीरस्य बर्हिषि सुतः सोमः दिविष्टिषु ॥ उक्थं मदः च शस्यते ॥ ४ ॥

यज्ञामध्यें ह्याच वीराच्या पवित्र दर्भांवर सोमरस काढून ठेवतात व स्तुति व संतोषप्रद गायन करतात. ॥ ४ ॥

अ॒स्य श्रो॑ष॒न्त्वा भुवो॒ विश्वा॒ यश्च॑र्ष॒णीर॒भि ॥ सूरं॑ चित्स॒स्रु॒षी॒रिषः॑ ॥ ५ ॥

अस्य श्रोषंतु आ भुवः विश्वाः यः चर्षणीः अभि ॥ सूरं चित् सस्रुषीः इषः ॥ ५ ॥

जो सर्व मानवांपेक्षा वरिष्ठ आहे अशा ह्या भक्ताची हांक मरुत् देव श्रवण करोत. ह्याचे वैभव सूर्यापर्यंत जाऊन पोंचेल इतके विपुल आहे. ॥ ५ ॥

पूर्वीभिर्हि ददाशिम शरद्भिर्मरुतो वयम् ॥ अवोभिश्चर्षणीनाम् ॥ ६ ॥

पूर्वीभिः हि ददाशिम शरत्ऽभिः मरुतः वयम् ॥ अवःऽभिः चर्षणीनाम् ॥ ६ ॥

हे मरुत् हो, तुम्ही मानवांचे किती दक्षतेने रक्षण करतां हे पाहून आम्ही अनेक वर्षांपासून आपणांस हवि अर्पण करीत आहोंत. ॥ ६ ॥

सुभगः स प्रयज्यवो मरुतो अस्तु मर्त्यः ॥ यस्य प्रयांसि पर्षथ ॥ ७ ॥

सुऽभगः सः प्रऽयज्यवः मरुतः अस्तु मर्त्यः ॥ यस्य प्रयांसि पर्षथ ॥ ७ ॥

हे अत्यंत पूज्य मरुत् देवहो, ज्याचे हवि तुम्ही स्वीकारतां तो मनुष्य खचित परम भाग्यवान होय. ॥ ७ ॥

श॒श॒मा॒नस्य॑ वा नरः॒ स्वेद॑स्य सत्यशवसः ॥ वि॒दा काम॑स्य॒ वेन॑तः ॥ ८ ॥

शशमानस्य वा नरः स्वेदस्य सत्यऽशवसः ॥ विद कामस्य वेनतः ॥ ८ ॥

सत्यबलसमृद्ध हे मरुत् देवांनो, तुमची स्तुति भक्तजन किती परिश्रमपूर्वक करतात व तुमचे संबंधी प्रेम बाळगणाऱ्या भाविकाचे मनांत काय इच्छा असतात हें तुम्हास विदितच आहे. ॥ ८ ॥

यू॒यं तत्स॑त्यशवस आ॒विष्क॑र्त महित्व॒ना ॥ विध्य॑ता वि॒द्युता॒ रक्षः॑ ॥ ९ ॥

यूयं तत् सत्यऽशवसः आविः कर्त महिऽत्वना ॥ विध्यता विऽद्युता रक्षः ॥ ९ ॥

सत्यबलपरिपूर्ण हे मरुत् देवहो, तुम्ही आपल्या सामर्थाचे योगाने त्याची प्रतीति दाखवा, व विद्युतप्रहार करून राक्षसांचे विदारण करा. ॥ ९ ॥

गूह॑ता॒ गुह्यं॒ तमो॒ वि या॑त॒ विश्व॑म॒त्रिण॑म् ॥ ज्योति॑ष्कर्ता॒ यदु॒श्मसि॑ ॥ १० ॥

गूहत गुह्यं तमः वि यात विश्वं अत्रिणम् ॥ ज्योतिः कर्त यत् उश्मसि ॥ १० ॥

हा निबिड अंधकार नाहींसा करा व सर्व दुष्टांना पार घालवून द्या. ज्या प्रकाशाची आम्हांस आवड आहे तो प्रकाशही आम्हांस अर्पण करा. ॥ १० ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ८७ (मरुत् सूक्त)

ऋषि - गोतम राहूगण : देवता - मरुत् : छंद - जगती

प्रत्वक्षसः प्रतवसो विरप्शिनोऽनानता अविथुरा ऋजीषिणः ॥

जुष्टतमासो नृतमासो अञ्जिभिर्व्यानज्रे के चिदुस्रा इव स्तृभिः ॥ १ ॥

प्रऽत्वक्षसः प्रऽतवसः विऽरप्शिनः अनानताः अविथुराः ऋजीषिणः ॥

जुष्टऽतमासः नृऽतमासः अञ्जिऽभिः वि आनज्रे के चित् उस्राःऽइव स्तृऽभिः ॥ १ ॥

ज्याप्रमाणें प्रकाश किरण नजरेस पडले की त्यांचेबरोबर आकाशस्थ ज्योति दृष्टीस पडावयाच्याच त्याप्रमाणे हें पहा कित्येक मरुद्देव आपली सुंदर भूषणें धारण करून प्रकट झाले आहेत. ह्यांचे सामर्थ्य विशाल, बल अगाध, महत्त्व मोठे व पराक्रम अतिशय असून हे कोणापुढेंही नम्र होणार नाहींत. हे कोणाकडूनही स्थानभ्रष्ट होणार नाहींत. ह्यांचा स्वभाव सरळ आहे आणि त्यामुळें सर्वांस अत्यंत आवडते झाले आहेत. ॥ १ ॥

उ॒प॒ह्व॒रेषु॒ यदचि॑ध्वं य॒यिं वय॑ इव मरुत॒ः केन॑ चित्प॒था ॥

श्चोत॑न्ति॒ कोशा॒ उप॑ वो॒ रथे॒ष्वा घृ॒तमु॑क्षता॒ मधु॑वर्ण॒मर्च॑ते ॥ २ ॥

उपऽह्वरेषु यत् अचिध्वं ययिं वयःऽइव मरुतः केन चित् पथा ॥

श्चोतंति कोशाः उप वः रथेषु आ घृतं उक्षत मधुऽवर्णं अर्चते ॥ २ ॥

हे मरुत् हो, जेव्हां कोणत्यातरी अद्‌भुत मार्गांनी पक्ष्यांप्रमाणे येऊन तुम्ही पृथ्वीचे समीप धांवत्या मेघांस थंबवून धरतां, त्यावेळी तुमचे रथावर ते उदकांचे संचय कोसळूं लागतात. म्हणून आपल्या भक्ताच्या विनंतीस मान देऊन तुम्ही मधुसदृश अशा उदकाची वृष्टि करा. ॥ २ ॥

प्रैषामज्मेषु विथुरेव रेजते भूमिर्यामेषु यद्ध युञ्जते शुभे ॥

ते क्रीळयो धुनयो भ्राजदृष्टयः स्वयं महित्वं पनयन्त धूतयः ॥ ३ ॥

प्र एषां अज्मेषु विथुराऽइव रेजते भूमिः यामेषु यत् ह युञ्जते शुभे ॥

ते क्रीळयः धुनयः भ्राजत्ऽऋष्टयः स्वयं महिऽत्वं पनयंत धूतयः ॥ ३ ॥

ज्यावेळी ते बाहेर जातांना आपण सुंदर दिसावे म्हणून आपली भूषणें चढवूं लागतात त्यावेळी ह्याच्या प्रत्येक चलनवलनाबरोबर एखाद्या अस्थिर वस्तूप्रमाणें पृथिवी हालूं लागते. क्रिडा करणारे, जग हालवून सोडणारे, लकलकणारी शस्त्रास्त्रें धारण करणारे, व सर्वांची दाणादाण उडविणारे मरुत्देव आपला महिमा आपणच गावयास लागतात. ॥ ३ ॥

स हि स्वसृत्पृषदश्वो युवा गणोऽया ईशानस्तविषीभिरावृतः ॥

असि सत्य ऋणयावानेद्योऽस्या धियः प्राविताथा वृषा गणः ॥ ४ ॥

सः हि स्वऽसृत् पृषत्ऽअश्वः युवा गणः अया ईशानः तविषीभिः आऽवृतः ॥

असि सत्य ऋणऽयावा अनेद्यः अस्याः धियः प्रऽअविता अथ वृषा गणः ॥ ४ ॥

स्वतःसंचारी, ठिपकेदार रंगाच्या अश्वांवर आरूढ होणारा, तारुण्ययुक्त आणि अशा प्रकारे सर्वांवर आपली सत्ता चालविणारा, हा मरुतांचा समुदाय, खरोखर अनेक प्रकारच्या सामर्थ्यांनी परिवेष्टित झालेला आहे. ॥ ४ ॥

पि॒तुः प्र॒त्नस्य॒ जन्म॑ना वदामसि॒ सोम॑स्य जि॒ह्वा प्र जि॑गाति॒ चक्ष॑सा ॥

यदी॒मिन्द्रं॒ शम्यृक्वा॑ण॒ आश॒तादिन्नामा॑नि य॒ज्ञिया॑नि दधिरे ॥ ५ ॥

पितुः प्रत्नस्य जन्मना वदामसि सोमस्य जिह्वा प्र जिगाति चक्षसा ॥

यत् ईं इंद्रं शमि ऋक्वाणः आशत् आत् इत् नामानि यज्ञियानि दधिरे ॥ ५ ॥

आमच्या पुरातनकाली जन्म पावलेल्या पितरांचे नांव घेऊन आम्ही सांगतो कीं सोमाचे दर्शन घडल्याबरोबर ह्या मरुतांची जिव्हा लालसेनें पुढे येते. ज्यावेळी उत्तेजनकारक शब्द करीत हे युद्धकालीं इंद्रास जाऊन मिळाले तेव्हांच त्यांस यज्ञयागांत विख्यात असलेले पवित्र नांव प्राप्त झालें. ॥ ५ ॥

श्रियसे कं भानुभिः सं मिमिक्षिरे ते रश्मिभिस्त ऋक्वभिः सुखादयः ॥

ते वाशीमन्त इष्मिणो अभीरवो विद्रे प्रियस्य मारुतस्य धाम्नः ॥ ६ ॥

श्रियसे कं भानुऽभिः सं मिमिक्षिरे ते रश्मिऽभिः ते ऋक्वऽभिः सुऽखादयः ॥

ते वाशीऽमंतः इष्मिणः अभीरवः विद्रे प्रियस्य मारुतस्य धाम्नः ॥ ६ ॥

उत्तम हवि ज्यांस सदोदित प्राप्त होतात अशा त्या मरुतांनी सौंदर्याच्या वृद्धीसाठी कोणास तेजस्विता अर्पण केली ? ह्यांनी प्रकाशाचा लाभ कोणास करून दिला ? व कोणाची प्रशंसा व्हावयास लावली ? चपल, निर्भय, व शस्त्रास्त्रें धारण करणाऱ्या त्या मरुत् देवांनी आपल्या प्रिय निवासस्थानाकडे संचार केला ॥ ६ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ८८ (मरुत् सूक्त)

ऋषि - गोतम राहूगण : देवता - मरुत् : छंद - प्रसारपंक्ति; विराट्‌रूपा; त्रिष्टुभ्

आ वि॒द्युन्म॑द्भि॒र्मरुतः स्व॒र्कै रथे॑भिर्यात ऋष्टि॒मद्भि॒रश्व॑पर्णैः ॥

आ वर्षि॑ष्ठया न इ॒षा वयो॒ न प॑प्तता सुमायाः ॥ १ ॥

आ विद्युन्मत्ऽभिः मरुतः सुऽअर्कैः रथेभिः यात ऋष्टिमत्ऽभिः अश्वऽपर्णैः ॥

आ वर्षिष्ठया नः इषा वयः न पप्तत सुऽमायाः ॥ १ ॥

अश्व हेच ज्यांचे पक्ष आहेत, ज्यांत आयुधांचा भरपूर पुरवठा आहे, ज्यांची फार स्तुति झालेली आहे, व ज्यांत विजा लखलखत आहेत अशा आपल्या रथांत बसून, हे मरुत्हो, इकडे या. युक्तिप्रयुक्तींत अत्यंत चतुर असणाऱ्या हे देवांनो, सर्व लोकात अत्यंत विपुल समजली जाईल अशी पोषणसामग्री बरोबर घेऊन येथें पक्ष्याप्रमाणें उड्डाण करा. ॥ १ ॥

तेऽरुणेभिर्वरमा पिशङ्गैः शुभे कं यान्ति रथतूर्भिरश्वैः ॥

रुक्मो न चित्रः स्वधितीवान्पव्या रथस्य जङ्घनन्त भूम ॥ २ ॥

ते अरुणेभिः वरं आ पिशङ्गैः शुभे कं यान्ति रथतूःऽभिः अश्वैः ॥

रुक्मः न चित्रः स्वधितीऽवान् पव्या रथस्य जङ्घनंत भूम ॥ २ ॥

कोणा श्रेष्ठ पुरुषाचे गृह सुशोभित करण्याकरितां ते रथास वेगानें वाहून नेणाऱ्या आपल्या ताम्रवर्ण आणि पीतवर्ण अश्वांवर आरूढ होऊन चालले आहेत ? स्वहस्तांत आयुधें धारण करणारा हा मरुत् देवांचा समुदाय सुवर्णाप्रमाणे आश्चर्यकारक कांतीनें युक्त दिसत आहे. ह्या मरुतांनी आपल्या रथचक्राच्या धांवेने जमीन विदारण करून टाकली आहे. ॥ २ ॥

श्रिये कं वो अधि तनूषु वाशीर्मेधा वना न कृणवन्त ऊर्ध्वा ॥

युष्मभ्यं कं मरुतः सुजातास्तुविद्युम्नासो धनयन्ते अद्रिम् ॥ ३ ॥

श्रिये कं वः अधि तनूषु वाशीः मेधा वना न कृणवंते ऊर्ध्वा ॥

युष्मभ्यं कं मरुतः सुजाताः तुविऽद्युम्नासः धनयंते अद्रिम् ॥ ३ ॥

जयश्रीनें कोणास विभूषित करण्याकरितां तुमच्या देहावर शस्त्रास्त्रें चमकत आहेत ? ज्याप्रमाणें लतादिक आकाशांत डोकें उंच वर काढतात त्याप्रमाणें तुझे भक्त वर तुझ्याकडे स्तोत्रें पाठवून देत आहेत. मोठ्या वैभवांत जन्म पावलेल्या व अत्यंत तेजानें युक्त असलेल्या हे मरुत् देवांनो, तुमच्यासाठींच हे भक्तजन यज्ञपाषाणाचे (सोमरस काढण्याचे) काम चालू करीत आहेत. ॥ ३ ॥

अहा॑नि॒ गृध्राः॒ पर्या व॒ आगु॑रि॒मां धियं॑ वार्का॒र्यां॑ च॑ दे॒वीम् ॥

ब्रह्म॑ कृ॒ण्वन्तो॒ गोत॑मासो अ॒र्कैरू॒र्ध्वं नु॑नुद्र उत्स॒धिं पिब॑ध्यै ॥ ४ ॥

अहानि गृध्राः परि आ वः आ अगुः इमां धियं वार्कार्यां च देवीम् ॥

ब्रह्म कृण्वंतः गोतमासः अर्कैः ऊर्ध्वं नुनुद्रे उत्सऽधिं पिबध्यै ॥ ४ ॥

जिच्यामध्यें उदकवृष्टि घडवून आणण्याचे सामर्थ्य आहे अशा ह्या दिव्य स्तुतीभोंवती व तुमच्या सभोंवार, हे गृध्रहो, उज्ज्वल प्रकाश देणारे दिवस आकर्षित झाले. स्तुति करणाऱ्या गोतमांनीही आपल्या स्तवनांच्या योगानें आपणांस उदकपान करावयास सांपडावें म्हणून पाण्याच्या झऱ्यास वर पाठविलें. ॥ ४ ॥

ए॒तत्त्यन्न योज॑नमचेति स॒स्वर्ह॒ यन्म॑रुतो॒ गोत॑मो वः ॥

पश्य॒न्हिर॑ण्यचक्रा॒नयो᳚दंष्ट्रान्वि॒धाव॑तो व॒राहू॑न् ॥ ५ ॥

एतत् त्यत् न योजनं अचेति सस्वः ह यन् मरुतः गोतमः वः ॥

पश्यन् हिरण्यऽचक्रान् अयःऽदंष्ट्रान् विऽधावतः वराहून् ॥ ५ ॥

ज्यांनी सुवर्णचक्र हातांत धारण केलें आहे व ज्याच्या दंष्ट्रा लोखंडाप्रमाणे बळकट आहेत असे जे आपण सर्वत्र संचार करणारे वराह त्यांचे प्रत्यक्ष दर्शन होत असतांना, हे मरुत् देवांनो, गोतमानें जे स्तोत्र गाइलें तें इतके यशस्वी होतें की कोणत्याही दुसऱ्या स्तोत्रास त्याची सर आली नाही. ॥ ५ ॥

ए॒षा स्या वो᳚ मरुतोऽनुभ॒र्त्री प्रति॑ ष्टोभति वा॒घतो॒ न वाणी॑ ॥

अस्तौ॑भय॒द्वृथा॑सा॒मनु॑ स्व॒धां गभ॑स्त्योः ॥ ६ ॥

एषा स्या वः मरुतः अनुऽभर्त्री प्रति स्तोभति वाघतः न वाणी ॥

अस्तोभयत् वृथा आसां अनु स्वधां गभस्त्योः ॥ ६ ॥

हे मरुत् हो, तुमच्या मनास संतोष अर्पण करणारी ही स्तुति, तुमच्या इतर भक्तांच्या वाणीप्रमाणेंच तुमचें स्तवन करण्यांत निमग्न झाली आहे. ज्या अर्थी तुमच्या हातीं वैभवाचा ठेवा आहे त्या अर्थीं उपासकांनी तुमचें स्तवन केलें हें साहजिकच होय. ॥ ६ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ८९ (शंतिपाठ सूक्त)

ऋषि - गोतम राहूगण : देवता - विश्वेदेव : छंद - जगती; त्रिष्टुभ्

आ नो॑ भ॒द्राः क्रत॑वो यन्तु वि॒श्वतोऽ॑दब्धासो॒ अप॑रीतास उ॒द्भिदः॑ ॥

दे॒वा नो॒ यथा॒ सद॒मिद्वृ॒धे अस॒न्नप्रा॑युवो रक्षि॒तारो॑ दि॒वेदि॑वे ॥ १ ॥

आ नः भद्राः क्रतवः यंतु विश्वतः अदब्धासः अपरिऽइतासः उत्ऽभिदः ॥

देवा नः यथा सदं इत् वृधे असन् अप्रऽआयुवः रक्षितारः दिवेऽदिवे ॥ १ ॥

ज्यांस प्रतिरोध करता येणे शक्य आहे, ज्यांस कधींही पराभव माहीत नाहीं व जी सर्वदा विजयशाली होतात अशी कल्याणप्रद सामर्थ्यें दोहोंकडून आम्हांस प्राप्त होवोत. ह्यामुळेंच देव आम्हांस सदोदित उत्कर्षप्रद व आमचे रोजचेरोज अविश्रांत संरक्षणकर्ते होतील. ॥ १ ॥

दे॒वानां॑ भ॒द्रा सु॑म॒तिरृ॑जूय॒तां दे॒वानां॑ रा॒तिर॒भि नो॒ नि व॑र्तताम् ॥

दे॒वानां॑ स॒ख्यमुप॑ सेदिमा व॒यं दे॒वा न॒ आयुः॒ प्र ति॑रन्तु जी॒वसे॑ ॥ २ ॥

देवानां भद्रा सुऽमतिः ऋजुऽयतां देवानां रातिः अभि नः नि वर्तताम् ॥

देवानां सख्यं उप सेदिम वयं देवाः नः आयुः प्र तिरंतु जीवसे ॥ २ ॥

सरलत्व गुणानें युक्त अशा देवांची कल्याणकारक कृपा व त्यांची उदारता आम्हांस अनुलक्षून प्रवृत्त होतो. देवांच्या मित्रत्वाचा आम्हांस उपयोग घडो. आमचें जीवन दीर्घकाल पर्यंत कायम रहावें म्हणून देव आमचें आयुष्य वर्धन करोत. ॥ २ ॥

तान्पूर्व॑या नि॒विदा॑ हूमहे व॒यं भग॑ं मि॒त्रमदि॑तिं॒ दक्ष॑म॒स्रिध॑म् ॥

अ॒र्य॒मणं॒ व॒रु॑णं॒ सोम॑म॒श्विना॒ सर॑स्वती नः सु॒भगा॒ मय॑स्करत् ॥ ३ ॥

तान् पूर्वया निऽविदा हूमहे वयं भगं मित्रं अदितिं दक्षं अस्रिधम् ॥

अर्यमणं वरुणं सोमं अश्विना सरस्वती नः सुऽभगा मयः करत् ॥ ३ ॥

त्या देवांस म्हणजे भग, मित्र, अदिति ज्यास कोणाकडूनही अपाय होणें शक्य नाही असा दक्ष ह्यांना, व त्याचप्रमाणें अर्यमा, वरुण, सोम व अश्विनद्वय ह्यांनाही मी एक प्राचीन स्तोत्र गाऊन निमंत्रण करतो. दयाळू सरस्वती आम्हांस सौख्य अर्पण करो. ॥ ३ ॥

तन्नो॒ वातो॑ मयो॒भु वा॑तु भेष॒जं तन्मा॒ता पृ॑थि॒वी तत्पि॒ता द्यौः ॥

तद्ग्रावा॑णः सोम॒सुतो॑ मयो॒भुव॒स्तद॑श्विना शृणुतं धिष्ण्या यु॒वम् ॥ ४ ॥

तत् नः वातः मयःऽभु वातु भेषजं तन् माता पृथिवी तत् पिता द्यौः ॥

तत् ग्रावाणः सोमऽसुतः मयःऽभुवः तत् अश्विना शृणुतं धिष्ण्या युवम् ॥ ४ ॥

ते हितकारक औषध आमचेकडे वायु वाहून आणो. त्याचप्रमाणे माता पृथिवी व पिता द्युलोक हेही तें औषध घेऊन येवोत. सोमनिष्पादन करणारे असे सुखदायक यज्ञपाषाण व अश्विनीदेवहो तें आम्हास आणून देवोत. हे स्तवनार्ह अश्विनी देवहो, तुम्ही आमची प्रार्थना ऐका. ॥ ४ ॥

तमीशा॑न॒ं जग॑तस्त॒स्थुष॒स्पतिं॑ धियंजि॒न्वमव॑से हूमहे व॒यम् ॥

पू॒षा नो॒ यथा॒ वेद॑सा॒मस॑द्वृ॒धे र॑क्षि॒ता पा॒युरद॑ब्धः स्व॒स्तये॑ ॥ ५ ॥

तं ईशानं जगतः तस्थुषः पतिं धियंऽजिन्वं अवसे हूमहे वयम् ॥

पूषा नः यथा वेदसां असत् वृधे रक्षिता पायुः अदब्धः स्वस्तये ॥ ५ ॥

बुद्धिस प्रेरणा करणाऱ्या व स्थावर जंगम वस्तुमात्रावर अंमल गाजविणाऱ्या त्या सात्ताधीश देवास आम्ही स्वसंरक्षणार्थ आमंत्रण करतो. ह्या योगानें पूषा आमच्या वैभवाची वृद्धि करणारा व आम्हांस सुखशांतता अर्पण करणारा होईल. कारण तो अजिंक्य असून आमचें संरक्षण व परिपालन करणारा आहे. ॥ ५ ॥

स्व॒स्ति न॒ इन्द्रो॑ वृ॒द्धश्र॑वाः स्व॒स्ति नः॑ पू॒षा वि॒श्ववे॑दाः ॥

स्व॒स्ति न॒स्तार्क्ष्यो॒ अरि॑ष्टनेमिः स्व॒स्ति नो॒ बृह॒स्पति॑र्दधातु ॥ ६ ॥

स्वस्ति न इंद्रः वृद्धऽश्रवाः स्वस्ति नः पूषा विश्वऽवेदाः ॥

स्वस्ति नः तार्क्ष्यः अरिष्टऽनेमिः स्वस्ति नः बृहस्पतिः दधातु ॥ ६ ॥

ज्याची कीर्ति अतिशय विस्तार पावेलेली आहे असा इंद्र आम्हांस क्षेम अर्पण करो, सर्वज्ञ पूषा देव आम्हांस क्षेम अर्पण करो, ज्याच्या रथाच्या धांवेस कोठेंही प्रतिबंध नाही असा तार्क्ष्य आम्हांस क्षेम अर्पण करो, व बृहस्पतीही आम्हांस क्षेम अर्पण करोत. ॥ ६ ॥

पृष॑दश्वा म॒रुत॒ः पृश्नि॑मातरः शु॒भं॒यावा॑नो वि॒दथे॑षु॒ जग्म॑यः ॥

अ॒ग्नि॒जि॒ह्वा मन॑व॒ः सूर॑चक्षसो॒ विश्वे॑ नो दे॒वा अव॒सा ग॑मन्नि॒ह ॥ ७ ॥

पृषत्ऽअश्वा मरुतः पृश्निऽमातरः शुभंऽयावानः विदथेषु जग्मयः ॥

अग्निऽजिह्वा मनवः सूरऽचक्षसः विश्वे नः देवाः अवसा गमन् इह ॥ ७ ॥

ज्यांच्या अश्वांचा वर्ण ठिपकेदार आहे, ज्यांची माता पृश्नि ही होय, सर्वांचे शुभ करण्याकडे ज्यांची प्रवृत्ति आहे व जे यज्ञांमध्यें नेहमी गमन करतात असे मरुत् देव व त्याचप्रमाणे अग्नि हीच ज्यांची जिव्हा आहे व जे सूर्याचें निरीक्षण करणारे आहेत असे मनु, असे हे सर्व देव, सर्वांचे संरक्षण करणारें असें आपलें सामर्थ्य बरोबर घेऊन, येथें गमन करोत. ॥ ७ ॥

भ॒द्रं कर्णे॑भिः शृणुयाम देवा भ॒द्रम् प॑श्येमा॒क्षभि॑र्यजत्राः ॥

स्थि॒रैरङ्गै॑स्तुष्टु॒वांस॑स्त॒नूभि॒र्व्यशेम दे॒वहि॑तं॒ यदायु॑ः ॥ ८ ॥

भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः भद्रं पश्येम अक्षऽभिः यजत्राः ॥

स्थिरैः अङ्गैः स्तुस्तुऽवांसः तनूभिः वि अशेम देवहितं यत् आयुः ॥ ८ ॥

हे देवहो, तुमच्या कृपेनें आम्हांस कानांनी चांगले ऐकूं येईल, व हे यज्ञार्ह पुरुषहो, तुमच्या कृपेने आमच्या नेत्रांनी आम्हांस चांगले दिसेल. खरोखर जें आयुष्य देवांनी आम्हांस दिलें असेल त्याचा, आमची गात्रें शाबूत राहून व शरीरस्थैर्य चांगले टिकून, त्यांचे स्तवन करीत करीत आम्ही उपभोग घेऊं. ॥ ८ ॥

श॒तमिन्नु॒ श॒रदो॒ अन्ति॑ देवा॒ यत्रा॑ नश्च॒क्रा ज॒रसं॑ त॒नूना॑म् ॥

पु॒त्रासो॒ यत्र॑ पि॒तरो॒ भव॑न्ति॒ मा नो॑ म॒ध्या री॑रिष॒तायु॒र्गन्तोः॑ ॥ ९ ॥

शतं इत् नु शरदः अंति देवाः यत्र नः चक्रा जरसं तनूनाम् ॥

पुत्रासः यत्र पितरः भवंति मा नः मध्या रीरिषत आयुः गंतोः ॥ ९ ॥

हे देवहो, आमचे आयुष्याची काय ती शंभरच वर्षें असतात व त्यांत तुम्ही आमच्या शरीरास वार्धक्य आणतां व त्यांतच आज जे पुत्र म्हणून आहेत ते उद्यां बाप व्हावयाचे असतात. ह्यासाठीं आमच्या आयुष्यक्रमणाच्या मध्यंतरीच त्याची सांखळी तोडूं नकोस. ॥ ९ ॥

अदि॑ति॒र्द्यौरदि॑तिर॒न्तरि॑क्ष॒मदि॑तिर्मा॒ता स पि॒ता स पु॒त्रः ॥

विश्वे॑ दे॒वा अदि॑तिः॒ पञ्च॒ जना॒ अदि॑तिर्जा॒तमदि॑ति॒र्जनि॑त्वम् ॥ १० ॥

अदितिः द्यौः अदितिः अंतरिक्षं अदितिः माता सः पिता सः पुत्रः ॥

विश्वे देवा अदितिः पञ्च जनाः अदितिः जातं अदितिः जनित्वम् ॥ १० ॥

अदिति हीच द्युलोक होय. अदिति हीच अंतरिक्ष होय. अदिति हीच माता, तीच पिता व तीच पुत्रही होय. अदिति हीच सर्व देव व पांचही प्रकारचे मानव होय. जें सर्व कांही उत्पन्न झालें आहे ती अदितिच होय व जें कांही अजून उत्पन्न व्हावयाचें आहे तेंही अदितिच होय. ॥ १० ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ९० (मधुपर्क सूक्त)

ऋषि - गोतम राहूगण : देवता - विश्वेदेव : छंद - गायत्री; अनुष्टुभ्

ऋ॒जु॒नी॒ती नो॒ वरु॑णो मि॒त्रो न॑यतु वि॒द्वान् ॥ अ॒र्य॒मा दे॒वैः स॒जोषा॑ः ॥ १ ॥

ऋजुऽनीती नः वरुणः मित्रः नयतु विद्वान् ॥ अर्यमा देवैः सऽजोषाः ॥ १ ॥

वरुण, प्रज्ञावान मित्र आणि सर्व देवांसहवर्तमान अर्यमा, आम्हांस सरळ मार्गानें घेऊन जावोत. ॥ १ ॥

ते हि वस्वो॒ वस॑वाना॒स्ते अप्र॑मूरा॒ महो॑भिः ॥ व्र॒ता र॑क्षन्ते वि॒श्वाहा॑ ॥ २ ॥

ते हि वस्वः वसवानाः ते अप्रऽमूराः महःऽभिः ॥ व्रता रक्षंते विश्वाहा ॥ २ ॥

वैभवाचा संग्रह करणारे हे देव, आपल्या सामर्थ्यामुळें आपल्या दक्षतेंत कधींही अंतर न पडूं देता सदैव आपल्या अनुशासनांचे संरक्षण करीत असतात. ॥ २ ॥

ते अस्मभ्यं शर्म यंसन्नमृता मर्त्येभ्यः ॥ बाधमाना अप द्विषः ॥ ३ ॥

ते अस्मभ्यं शर्म यंसन् अमृताः मर्त्येभ्यः ॥ बाधमानाः अप द्विषः ॥ ३ ॥

दुष्ट लोकांचे निर्मूलन करून त्या मृत्युबाधेपासून निर्मुक्त अशा देवांनी आम्हां मानवांस सौख्य अर्पण केले आहे. ॥ ३ ॥

वि नः पथः सुविताय चियन्त्विंद्रो मरुतः ॥ पूषा भगो वन्द्यासः ॥ ४ ॥

वि नः पथः सुविताय चियंतु इंद्रः मरुतः ॥ पूषा भगः वंद्यासः ॥ ४ ॥

ते वंद्य असे इंद्र, मरुत्, पूषा, व भग हे देव आमच्या कल्याणासाठीं मार्ग हुडकून काढोत. ॥ ४ ॥

उत नो धियो गोअग्राः पूषन् विष्णवेवयावः ॥ कर्ता नः स्वस्तिमतः ॥ ५ ॥

उत नः धियः गोऽअग्राः पूषन् विष्णो इति एवऽयावः ॥ कर्त नः स्वस्तिऽमतः ॥ ५ ॥

आपापल्या मार्गांनी गमन करणाऱ्या हे पूषा व विष्णु देवांनो, आमच्या प्रार्थना आम्हांस मुख्यत्वेंकरून धेनूंचा लाभ घडवितील असे करा व आम्हांस सुखी ठेवा. ॥ ५ ॥

मधु॒ वाता॑ ऋताय॒ते मधु॑ क्षरन्ति॒ सिन्ध॑वः ॥ माध्वी॑र्नः स॒न्त्वोष॑धीः ॥ ६ ॥

मधु वाता ऋतऽयते मधु क्षरंति सिंधवः ॥ माध्वीः नः संतु ओषधीः ॥ ६ ॥

जो नीतिनियमनंचे योग्य पालन करतो त्याचेकरितां वारे संतोषदायक रीतीनें वाहूं लागतात व त्याचेकरितां नद्याही मधुर रीतीनें वाहतात. आमच्या ओषधी आमच्याकरितां माधुर्ययुक्त होवोत. ॥ ६ ॥

मधु॒ नक्त॑मु॒तोषसो॒ मधु॑म॒त्पार्थि॑वं॒ रजः॑ ॥ मधु॒ द्यौर॑स्तु नः पि॒ता ॥ ७ ॥

मधु नक्तं उत उषसः मधुऽमत् पार्थिवं रजः ॥ मधु द्यौः अस्तु नः पिता ॥ ७ ॥

रात्र व प्रभातकाल हे गोड असोत, व भूलोक व रजोलोक हेही माधुर्यानें भरलेले असोत. आमचा प्रिय पिता द्युलोक हाही आमचेसाठी सुखावह होवो. ॥ ७ ॥

मधु॑मान्नो॒ वन॒स्पति॒र्मधु॑माँ अस्तु॒ सूर्यः॑ ॥ माध्वी॒र्गावो॑ भवन्तु नः ॥ ८ ॥

मधुऽमान् नः वनस्पतिः मधुऽमान् अस्तु सूर्यः ॥ माध्वीः गावः भवंतु नः ॥ ८ ॥

आमचेसाठी वनस्पति माधुर्ययुक्त असोत व आमचेसाठी सूर्यही सुंदर होवो. धेनु आम्हांस गोड दूध देणाऱ्या होवोत. ॥ ८ ॥

शं नो॑ मि॒त्रः शं वरु॑णः॒ शं नो॑ भवत्वर्य॒मा ॥

शं न॒ इन्द्रो॒ बृह॒स्पतिः॒ शं नो॒ विष्णु॑रुरुक्र॒मः ॥ ९ ॥

शं नः मित्रः शं वरुणः शं नः भवतु अर्यमा ॥

शं नः इंद्रः बृहस्पतिः शं नः विष्णुः उरुऽक्रमः ॥ ९ ॥

मित्र आम्हांस सुखावह होवो, वरुण आम्हांस सुखावह होवो, अर्यमाही आम्हांस सुखावह होवो, इंद्र व बृहस्पति आम्हांस सुखावह होवोत व अनेक प्रदेशावर गमन करणारा विष्णुही आम्हांस सुखावह होवो. ॥ ९ ॥

ॐ तत् सत्

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त ९१ (सोम सूक्त)

ऋषि - गोतम राहूगण : देवता - सोम : छंद - अनेक

त्वं सो॑म॒ प्र चि॑कितो मनी॒षा त्वं रजि॑ष्ठ॒मनु॑ नेषि॒ पन्था॑म् ॥

तव॒ प्रणी॑ती पि॒तरो॑ न इंदो दे॒वेषु॒ रत्न॑मभजन्त॒ धीराः॑ ॥ १ ॥

त्वं सोम प्र चिकितः मनीषा त्वं रजिष्ठं अनु नेषि पंथाम् ॥

तव प्रऽणीती पितरः नः इंदो इति देवेषु रत्नं अभजंत धीराः ॥ १ ॥

हे सोम देवा, तूं अत्यंत प्रज्ञावन व विचारी आहेस. तूंच सर्व जगास सरळ मार्गाकडे नेऊन पोंचवितोस. हे इंदो, तुझ्या मार्गदर्शकपणाखाली आमच्या सुज्ञ वाडवडिलांस देवसमुदायामधून उत्तम उत्तम देणग्यांचा लाभ झाला. ॥ १ ॥

त्वं सो॑म॒ क्रतु॑भिः सु॒क्रतु॑र्भू॒स्त्वं दक्षैः॑ सु॒दक्षो॑ वि॒श्ववे॑दाः ॥

त्वं वृषा॑ वृष॒त्वेभि॑र्महि॒त्वा द्यु॒म्नेभि॑र्द्यु॒म्न्यभवो नृ॒चक्षाः॑ ॥ २ ॥

त्वं सोम क्रतुऽभिः सुऽक्रतुः भूः त्वं दक्षैः सुऽदक्षः विश्वऽवेदाः ॥

त्वं वृषा वृषऽत्वेभिः महिऽत्वा द्युम्नेभिः द्युम्नी अभवः नृऽचक्षाः ॥ २ ॥

हे सोम देवा, तुझ्या ठायीं अनेक सामर्थ्यें एकत्र झाल्यामुळें तूं सामर्थ्यवान झालास. तूं सर्वज्ञ असून अनेक प्रकारची शक्ति तुझ्या ठायी वास करीत असल्यामुळें तूं शक्तिमान बनलास. आपल्या श्रेष्ठपणामुळें अनेक बलें तुला संपादन करतां आली म्हणून बलवानपणा तुझ्या अंगी आला. अनेक प्रकारची उज्ज्वल संपत्ति तुला प्राप्त झाली म्हणून तुला वैभवशालित्व आलें. सर्व मानवांवर तुझी दृष्टी आहे. ॥ २ ॥

राज्ञो॒ नु ते॒ वरु॑णस्य व्र॒तानि॑ बृ॒हद्ग॑भी॒रं तव॑ सोम॒ धाम॑ ॥

शुचि॒ष्ट्वम॑सि प्रि॒यो न मि॒त्रो द॒क्षाय्यो॑ अर्य॒मेवा॑सि सोम ॥ ३ ॥

राज्ञः नु ते वरुणस्य व्रतानि बृहत् गभीरं तव सोम धाम ॥

शुचिः त्वं असि प्रियः न मित्रः दक्षाय्यः अर्यमाऽइव असि सोम ॥ ३ ॥

जीं जीं नियमनें ह्या पृथ्वीवर प्रचलित आहेत तीं तीं तूं तो राजा वरुण त्याचींच होत. हे सोमा, तुझें निवासस्थान विशाल व भव्य आहे. तूं देदीप्यमानही आहेस. हे सोम देवा, तूं मित्राप्रमाणें सर्वांच आवडता व अर्यमाप्रमाणें सामर्थ्यवान आहेस. ॥ ३ ॥

या ते॒ धामा॑नि दि॒वि या पृ॑थि॒व्यां या पर्व॑ते॒ष्वोष॑धीष्व॒प्सु ॥

तेभि॑र्नो॒ विश्वैः॑ सु॒मना॒ अहे॑ळ॒न्राज॑न्त्सोम॒ प्रति॑ ह॒व्या गृ॑भाय ॥ ४ ॥

या ते धामानि दिवि या पृथिव्यां या पर्वतेषु ओषधीषु अप्ऽसु ॥

तेभिः नः विश्वैः सुऽमनाः अहेळन् राजन् सोम प्रति हव्या गृभाय ॥ ४ ॥

द्युलोकांत, पृथिवीवर, पर्वतांवर, ओषधींत, अथवा उदकांमध्यें जीं जीं तुझी निवासस्थानें असतील त्या त्या सर्व ठिकाणी हे सोम राजा, तूं आमच्यावरचा राग टाकून प्रसन्न मनानें ह्या हवींचा स्वीकार कर. ॥ ४ ॥

त्वं सो॑मासि॒ सत्प॑ति॒स्त्वं राजो॒त वृ॑त्र॒हा ॥ त्वम् भ॒द्रो अ॑सि॒ क्रतुः॑ ॥ ५ ॥

त्वं सोम असि सत्ऽपतिः त्वं राजा उत वृत्रऽहा ॥ त्वं भद्रः असि क्रतुः ॥ ५ ॥

हे सोमा, तूंच सर्वांचा दयाशील अधिपति आहेस. तूं राजा आहेस, तूं वृत्राचा वध करणारा आहेस, तूं कल्याणकारक अशी श्रेष्ठ शक्ति आहेस. ॥ ५ ॥

त्वं च॑ सोम नो॒ वशो॑ जी॒वातुं॒ न म॑रामहे ॥ प्रि॒यस्तो॑त्रो॒ वन॒स्पतिः॑ ॥ ६ ॥

त्वं च सोम नः वशः जीवातुं न मरामहे ॥ प्रियऽस्तोत्रः वनस्पतिः ॥ ६ ॥

हे सोमा, आम्ही आपल्या आयुष्याचा उपभोग घ्यावा असें तूं मनांत आणशील, तर आम्हास मध्येंच मृत्यु येणार नाही. तूं अरण्यांतील वृक्षांचा मालक आहेस व तुला स्तुति प्रिय आहे. ॥ ६ ॥

त्वं सो॑म म॒हे भग॒ं त्वं यून॑ ऋताय॒ते ॥ दक्ष॑ं दधासि जी॒वसे॑ ॥ ७ ॥

त्वं सोम महे भगं त्वं यूने ऋतऽयते ॥ दक्षं दधासि जीवसे ॥ ७ ॥

हे सोमा, तुझे नीतिनियम पाळणाऱ्या भक्तास, तो तरुण असतांना अथवा वृद्धत्व पावल्यावरही तूं सौख्य अर्पण करतोस. त्याची आयुष्यवृद्धि व्हावी म्हणून तूं त्यास उत्तम सामर्थ्य देतोस. ॥ ७ ॥

त्वं नः॑ सोम वि॒श्वतो॒ रक्षा॑ राजन्नघाय॒तः ॥ न रि॑ष्ये॒त्त्वाव॑तः॒ सखा॑ ॥ ८ ॥

त्वं नः सोम विश्वतः रक्ष राजन् अघऽयतः ॥ न रिष्येत् त्वाऽवतः सखा ॥ ८ ॥

हे सोमराजा, पातकी मनुष्यापासून तूं आमचे चोहोंकडून रक्षण कर. तूं ज्याचा संरक्षक आहेस अशा तुझ्या प्रिय भक्तांचा नाश होणें युक्त नाहीं. ॥ ८ ॥

सोम॒ यास्ते॑ मयो॒भुव॑ ऊ॒तय॒ः सन्ति॑ दा॒शुषे॑ ॥ ताभि॑र्नोऽवि॒ता भ॑व ॥ ९ ॥

सोम याः ते मयःऽभुवः ऊतयः संति दाशुषे ॥ ताभिः नः अविता भव ॥ ९ ॥

हे सोमा, तुला हवि अर्पण करणाऱ्या भक्तांच्या संरक्षणाकरितां जीं सुखपरिणामी साधनें तूं सज्ज करून ठेवली असशील तीं घेऊन आमचें संरक्षण कर. ॥ ९ ॥

इ॒मं य॒ज्ञमि॒दं वचो॑ जुजुषा॒ण उ॒पाग॑हि ॥ सोम॒ त्वं नो॑ वृ॒धे भ॑व ॥ १० ॥

इमं यज्ञं इदं वचः जुजुषाणः उपऽआगहि ॥ सोम त्वं नः वृधे भव ॥ १० ॥

हा यज्ञ व ही स्तुति ह्यांचा स्वीकार करीत इकडे ये. हे सोमा, तूं आमचा उत्कर्ष करणारा हो. ॥ १० ॥

सोम॑ गी॒र्भिष्ट्वा॑ व॒यं व॒र्धया॑मो वचो॒विद॑ः ॥ सु॒मृ॒ळी॒को न॒ आ वि॑श ॥ ११ ॥

सोम गीःऽभिः त्वा वयं वर्धयामः वचःऽविदः ॥ सुऽमृळीकः न आ विश ॥ ११ ॥

हे सोमा, स्तुति कशी करावी ह्याचें ज्ञान संपादन करून आम्ही स्तोत्रांनी तुला संतुष्ट करीत आहोंत. ह्यासाठीं तूं प्रसन्न अंतःकरणानें आम्हांकडे ये. ॥ ११ ॥

गयस्फानो अमीवहा वसुवित्पुष्टिवर्धनः ॥ सुमित्रः सोम नो भव ॥ १२ ॥

गयऽस्फानः अमीवऽहा वसुऽवित् पुष्टिऽवर्धनः ॥ सुऽमित्रः सोम नः भव ॥ १२ ॥

सोमा, तूं आमच्या वैभवाची वृद्धि कर, आमचे रोग हरण कर, आम्हांस संपत्ति दे, आमचे घरी धनधान्याची वृद्धि होऊं दे, व तूं आमचा उत्तम मित्र हो. ॥ १२ ॥

सोम रारन्धि नो हृदि गावो न यवसेष्वा ॥ मर्य इव स्व ओक्ये ॥ १३ ॥

सोम ररंधि नः हृदि गावः न यवसेषु आ ॥ मर्यःऽइव स्व ओक्ये ॥ १३ ॥

हे सोमा, ज्याप्रमाणे स्वगृही मनुष्य आनंदांत असतो अथवा तृण पाहून धेनु संतुष्ट होतात, त्याप्रमाणें आमच्या अंतःकरणांत संतोष उत्पन्न कर. ॥ १३ ॥

यः सो॑म सु॒ख्ये तव॑ रा॒रण॑द्देव॒ मर्त्यः॑ ॥ तं दक्षः॑ सचते क॒विः ॥ १४ ॥

यः सोम सख्ये तव ररणत् देव मर्त्यः ॥ तं दक्षः सचते कविः ॥ १४ ॥

हे सोमदेवा, जो मानव तुझ्या मित्रत्वांत आनंद मानतो त्याच्याच सहवासाची सामर्थ्यवान व प्रज्ञावान लोक इच्छा करतात. ॥ १४ ॥

उ॒रु॒ष्या णो॑ अ॒भिश॑स्तेः॒ सोम॒ नि पा॒ह्यंह॑सः ॥ सखा॑ सु॒शेव॑ एधि नः ॥ १५ ॥

उरुष्य नः अभिऽशस्तेः सोम नि पाहि अंहसः ॥ सखा सुऽशेव एधि नः ॥ १५ ॥

हे सोमा, दुरुक्तीपासून आमचा बचाव कर, व पातकापासून आमचें संरक्षण कर. सौख्य अर्पण करून तूं आमचा उत्तम स्नेही हो. ॥ १५ ॥

आ प्या॑यस्व॒ समे॑तु ते वि॒श्वतः॑ सोम॒ वृष्ण्य॑म् ॥ भवा॒ वाज॑स्य सङ्ग॒थे ॥ १६ ॥

आ प्यायस्व सं एतु ते विश्वतः सोम वृष्ण्यम् ॥ भव वाजस्य संऽगथे ॥ १६ ॥

हे सोमा तूं प्रवृद्ध हो, सामर्थ्याचा प्रवाह चोहोंकडून तुझ्याकडे चालू होवो. जेथें अनेक पराक्रम एकवटलेले असतील त्या ठिकाणीं तुझा वास असो. ॥ १६ ॥

आ प्यायस्व मदिन्तम सोम विश्वेभिरंशुभिः ॥

भवा नः सुश्रवस्तमः सखा वृधे ॥ १७ ॥

आ प्यायस्व मदिन्ऽतम सोम विश्वेभिः अंशुऽभिः ॥

भव नः सुश्रवःऽतमः सखा वृधे ॥ १७ ॥

हे अत्यंत आनंद अर्पण करणाऱ्या सोमा, आपल्या सर्व प्रकाशकिरणांनी तूं वृद्धिंगत हो. तुझी मनोहर कीर्ति सर्वत्र विदित आहे, व तूं आमचा प्रेमळ स्नेही आहेस, म्हणून तूं आम्हांस उत्कर्ष प्राप्त करून दे. ॥ १७ ॥

सं ते पयांसि समु यन्तु वाजाः सं वृष्ण्यान्यभिमातिषाहः ॥

आप्यायमानो अमृताय सोम दिवि श्रवांस्युत्तमानि धिष्व ॥ १८ ॥

सं ते पयांसि सं ऊं इति यंतु वाजाः सं वृष्ण्यानि अभिमातिऽसहः ॥

आऽप्यायमानः अमृताय सोम दिवि श्रवांसि उत्ऽतमानि धिष्व ॥ १८ ॥

दुष्टांचा पराभव करणाऱ्या हे सोमा, ह्या जगांत जेवढें म्हणून दुग्ध आहे तेवढें सर्व तुझ्याकडे येवो, सर्व सामर्थ्य तुला प्राप्त होवो, व सर्व शक्तीचा ओघ तुझ्याकडे वळो. हे सोमा, आपलें अमरत्व प्रस्थापित होण्याकरितां तूं अभिवृद्धि पावून द्‌युलोकांत उत्तम कीर्ति धारण कर. ॥ १८ ॥

या ते धामा॑नि ह॒विषा॒ यज॑न्ति॒ ता ते॒ विश्वा॑ परि॒भूर॑स्तु य॒ज्ञम् ॥

ग॒य॒स्फान॑ः प्र॒तर॑णः सु॒वीरोऽ॑वीरहा॒ प्र च॑रा सोम॒ दुर्या॑न् ॥ १९ ॥

या ते धामानि हविषा यजंति ता ते विश्वा परिऽभूः अस्तु यज्ञम् ॥

गयऽस्फानः प्रऽतरणः सुऽवीरः अवीरऽहा प्र चर सोम दुर्यान् ॥ १९ ॥

तुझ्या ज्या निवासस्थानांची सर्व लोक हवींनी पूजा करतात, ती सर्व आमच्या यज्ञावर हरएक बाजूंनी कृपादृष्टी राखोत. हे सोमा, आमच्या वैभवाची वृद्धि करीत, आम्हांविषयीं दानशूरता धारण करीत, आपलें वीर्य गाजवीत, व जे भित्रे असतील त्यांचे हनन करीत, तूं आमच्या गृहाकडे येण्यास प्रवृत्त हो. ॥ १९ ॥

सोमो॑ धे॒नुं सोमो॒ अर्व॑न्तमा॒शुं सोमो॑ वी॒रं क॑र्म॒ण्यं ददाति ॥

सा॒द॒न्यं वि॒द॒थ्यं स॒भेयं॑ पितृ॒श्रव॑णं॒ यो ददा॑शदस्मै ॥ २० ॥

सोमः धेनुं सोमः अर्वंतं आशुं सोमः वीरं कर्मण्यं ददाति ॥

सदन्यं विदथ्यं सभेयं पितृऽश्रवणं यः ददाशत् अस्मै ॥ २० ॥

जो ह्या सोमास हवि अर्पण करतो, त्यास सोम धेनूंचा लाभ घडवितो, वेगानें धांवणारा अश्व देतो, व स्वकर्माविषयी दक्ष, घरादाराची काळजी घेणाऱ्या, यज्ञकर्में चुकूं न देणाऱ्या, समाजांत प्रतिष्ठितपणें वागणाऱ्या, व आपल्या पित्याची कीर्ति वाढविणाऱ्या अशा शूर अपत्याची प्राप्ति करून देतो. ॥ २० ॥

अषा॑ळ्हं यु॒त्सु पृत॑नासु॒ पप्रिं॑ स्व॒र्षाम॒प्सां वृ॒जन॑स्य गो॒पाम् ॥

भरेषुजां सुक्षितिं सुश्रवसं जयन्तं त्वामनु मदेम सोम ॥ २१ ॥

अषाळ्हं युत्सु पृतनासु पप्रिं स्वःऽसां अप्सां वृजनस्य गोपाम् ॥

भरेषुऽजां सुऽक्षितिं सुऽश्रवसं जयंतं त्वां अनु मदेम सोम ॥ २१ ॥

युद्धांत अजिंक्य, संग्रामांत साहाय्यकारक, स्वर्गांतून उदकास आणणारा, संकटकाली रक्षण करणारा, यज्ञांत आविर्भूत होणारा, उत्तम मंदिरांत वास्तव्य करणारा, उत्तम कीर्तिनें मंडित असलेला, व सर्वदा विजयी, असा जो तूं त्या तुला पाहून हे सोमा, आम्ही प्रमुदित होऊं. ॥ २१ ॥

त्वमिमा ओषधीः सोम विश्वास्त्वमपो अजनयस्त्वं गाः ॥

त्वमा ततन्थोर्व१न्तरिक्षं त्वं ज्योतिषा वि तमो ववर्थ ॥ २२ ॥

त्वं इमाः ओषधीः सोम विश्वाः त्वं अपः अजनयः त्वं गाः ॥

त्वं आ ततंथ उरु अंतरिक्षं त्वं ज्योतिषा वि तमः ववर्थ ॥ २२ ॥

हे सोमा, तूं ह्या सर्व वनस्पति उत्पन्न केल्यास, तूं पाणी उत्पन्न केलेंस, व तूं धेनू निर्माण केल्यास, हे विशाल अंतरिक्ष तूं सर्वत्र पसरलेंस, व प्रकाशाच्या योगानें तूं अंधकाराचा नाश केलास. ॥ २२ ॥

दे॒वेन॑ नो॒ मन॑सा देव सोम रा॒यो भा॒गं स॑हसावन्न॒भि यु॑ध्य ॥

मा त्वा त॑न॒दीशि॑षे वी॒र्यस्यो॒भये॑भ्यः॒ प्र चि॑कित्सा॒ गवि॑ष्टौ ॥ २३ ॥

देवेन नः मनसा देव सोम रायः भागं सहसाऽवन् अभि युध्य ॥

मा त्वा तनत् ईशिषे वीर्यस्य उभयेभ्यः प्र चिकित्स गोऽइष्टौ ॥ २३ ॥

हे सामर्थ्यवान सोम देवा, आमच्याकरितां संपत्तीची भरती करण्याकरितां तुझ्या दिव्य अंतःकरणांत जितकी कळकळ असेल तितक्या कळकळीनें युद्ध कर. तुला कोणीही प्रतिबंध न करो. सर्व सामर्थ्याचा स्वामी तूंच आहेस. धेनुप्राप्तीकरितां युद्ध चाललें असतां तूं दोन्ही पक्षांना आपलें तेज जाणावयास लाव. ॥ २३ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त ९२ (उषा सूक्त)

ऋषि - गोतम राहूगण : देवता - १-१५ उषा; १६-१८ अश्विनीकुमार : छंद - जगती; त्रिष्टुभ्

एता उ त्या उषसः केतुमक्रत पूर्वे अर्धे रजसो भानुमञ्जते ॥

निष्कृण्वाना आयुधानीव धृष्णवः प्रति गावोऽरुषीर्यन्ति मातरः ॥ १ ॥

एताः ऊं इतिउ त्याः उषसः केतुं अक्रत पूर्वे अर्धे रजसः भानुं अञ्जते ॥

निःऽष्कृण्वानाः आयुधानिऽइव धृष्णवः प्रति गावः अरुषीः यंति मातरः ॥ १ ॥

त्या ह्या सर्व प्रसिद्ध उषांनी आपलें निशाण फडकाविले आहे. अंतरिक्षाच्या पहिल्या अर्ध्या भागांत त्या आपलें सुंदर किरण फेंकीत आहेत. आपलीं शस्त्रें परजणाऱ्या शूर योद्ध्याप्रमाणें आपलें लखलखणारे तेज प्रकट करीत ह्या माता - ह्या धेनु - इकडे येऊं लागल्या आहेत. ॥ १ ॥

उदपप्तन्नरुणा भानवो वृथा स्वायुजो अरुषीर्गा अयुक्षत ॥

अक्रन्नुषासो वयुनानि पूर्वथा रुशन्तं भानुमरुषीरशिश्रयुः ॥ २ ॥

उत् अपप्तन् अरुणाः भानवः वृथा सुऽआयुजः अरुषीः गाः अयुक्षत ॥

अक्रन् उषासः वयुनानि पूर्वऽथा रुशंतं भानुं अरुषीः अशिश्रयुः ॥ २ ॥

ह्यांची रक्तवर्ण किरणें कशी सहज रीतीनें वर उड्या मारीत येत आहेत. रथास जोडण्यास कधींही त्रास न देणाऱ्या अशा लखलखीत प्रकाशाच्या गाई, ह्यांनी आपल्या रथास जोडल्या आहेत. पूर्वीप्रमाणें आजही सर्व जगावर उजेड पाडावा असा विचार ह्या उषांनी केला आहे. ह्या उज्ज्वल उषांनी झळझळणारें तेज धारण केलें आहे. ॥ २ ॥

अर्चन्ति नारीरपसो न विष्टिभिः समानेन योजनेना परावतः ॥

इषं वहन्तीः सुकृते सुदानवे विश्वेदह यजमानाय सुन्वते ॥ ३ ॥

अर्चंति नारीः अपसः न विष्टिऽभिः समानेन योजनेन आ पराऽवतः ॥

इषं वहंतीः सुऽकृते सुऽदानवे विश्वा इत् अह यजमानाय सुन्वते ॥ ३ ॥

सदाचारी, उत्तम हवि अर्पण करणाऱ्या, व सोमरस सिद्ध ठेवणाऱ्या, अशा आपल्या भक्ताकरितां त्याच्या पोषणास भरपूर होईल इतकी संपत्ति सदैव घेऊन येणाऱ्या ह्या युवति फार लांबच्या प्रदेशापासून एकाच रथांत बसून येऊन, मोठ्या आवेशानें जणूं कांही आपण किती पराक्रमी आहों ह्याचें प्रदर्शनच करीत आहेत. ॥ ३ ॥

अधि॒ पेशां॑सि वपते नृ॒तूरि॒वापो॑र्णुते॒ वक्ष॑ उ॒स्रेव॒ बर्ज॑हम् ॥

ज्योति॒र्विश्व॑स्मै॒ भुव॑नाय कृण्व॒ती गावो॒ न व्र॒जं व्यु१॒॑षा आ॑व॒र्तमः॑ ॥ ४ ॥

अधि पेशांसि वपते नृतूःऽइव अप ऊर्णुते वक्षः उस्राऽइव बर्जहम् ॥

ज्योतिः विश्वस्मै भुवनाय कृण्वती गावः न व्रजं वि उषा आवरित्यावः तमः ॥ ४ ॥

ज्याप्रमाणें एखादी नटी निरनिराळे वेष धारण करते त्याप्रमाणे ही उषा निरनिराळी रूपें घेऊन येते. जशी धेनु आपली कांस सर्वांच्या दृष्टीस पडूं देते, त्याप्रमाणें ही आपला वक्षप्रदेश अनावृत ठेविते. सर्व जगास प्रकाश देणाऱ्या

ह्या उषेनें ज्या प्रमाणें गाई आपला गोठा उघडा टाकून जातात, त्याप्रमाणे अंधकारास उघडें टाकून दिलें आहे. ॥ ४ ॥

प्रत्यर्चीं रुशदस्या अदर्शि वि तिष्ठते बाधते कृष्णमभ्वम् ॥

स्वरुं न पेशो विदथेष्वञ्जञ्चित्रं दिवो दुहिता भानुमश्रेत् ॥ ५ ॥

प्रति अर्चिः रुशत् अस्याः अदर्शि वि तिष्ठते बाधते कृष्णं अभ्वम् ॥

स्वरुं न पेशः विदथेषु अंजन् चित्रं दिवः दुहिता भानुं अश्रेत् ॥ ५ ॥

हिचा उज्जवल प्रकाश दिसूं लागला आहे. तो सर्वत्र पसरत असून निबिड अंधकाराचा नाश करीत आहे. यज्ञामध्यें ज्या प्रमाणे यज्ञस्तंभास शोभवितात त्या प्रमाणें स्वशरीरास हिनें शोभविलें आहे. ही द्युलोकदुहिता आश्चर्यकारक प्रकाश आपले बरोबर घेऊन आली आहे. ॥ ५ ॥

अतारिष्म तमसस्पारमस्योषा उच्छन्ती वयुना कृणोति ॥

श्रि॒ये छन्दो॒ न स्म॑यते विभा॒ती सु॒प्रती॑का सौमन॒साया॑जीगः ॥ ६ ॥

अतारिष्म तमसः पारं अस्य उषाः उच्छंती वयुना कृणोति ॥

श्रिये छंदः न स्मयते विऽभाती सुऽप्रतीका सौमनसाय अजीगरिति ॥ ६ ॥

ह्या अंधकाराचे बाहेर आम्ही एकदांचे निघालो. ही पहा उषा आपला प्रकाश पाडीत आपले हेतु व्यक्त करीत आहे. ह्या दीप्तिमान उषेनें कवितेप्रमाणे चारुता धारण केलेली असून तिचे हंसरे मुख व्यक्त होत आहे. आपल्या अत्यंत मनोहर स्वरूपानें ती आम्हांवर कृपाप्रसाद करण्याकरितां आली आहे. ॥ ६ ॥

भास्व॑ती ने॒त्री सू॒नृता॑नां दि॒व स्त॑वे दुहि॒ता गोत॑मेभिः ॥

प्र॒जाव॑तो नृ॒वतो॒ अश्व॑बुध्या॒नुषो॒ गोअ॑ग्रा॒ँ उप॑ मासि॒ वाजा॑न् ॥ ७ ॥

भास्वती नेत्री सूनृतानां दिव स्तवे दुहिता गोतमेभिः ॥

प्रजाऽवतः नृऽवतः अश्वऽबुध्यान् उषः गोऽअग्रान् उप मासि वाजान् ॥ ७ ॥

सत्य व माधुर्य ह्यांची स्फूर्ति करविणारी जी ही देदीप्यमान द्युलोककन्या, तिचे स्तवन गोतमांनी केलें आहे. हे उषा देवी, ज्यांचे योगानें आम्हांस संतति व शूर लोक ह्यांचा लाभ होईल, अश्वांच्या योगानें ज्यांचे अस्तित्व दृगोचर होईल, व मुख्यतः ज्यांचे योगानें धेनूंची प्राप्ति होईल, अशी सामर्थ्यें तूं आम्हांस देत असतेस. ॥ ७ ॥

उषस्तमश्यां यशसं सुवीरं दासप्रवर्गं रयिमश्वबुध्यम् ॥

सुदंससा श्रवसा या विभासि वाजप्रसूता सुभगे बृहन्तम् ॥ ८ ॥

उषः तं अश्यां यशसं सुऽवीरं दासऽप्रवर्गं रयिं अश्वऽबुध्यम् ॥

सुऽदंससा श्रवसा या विऽभासि वाजऽप्रसूता सुऽभगे बृहंतम् ॥ ८ ॥

सामर्थ्यापासून जन्म पावून जी तूं, आश्चर्यकारक पराक्रम व कीर्ति प्रकट करीत, अत्यंत उज्ज्वल तेजानें प्रकाशत आहेस असे हे दयाशील उषा देवी, तुझ्या कृपेने वीर पुरुष आमचे पदरी असल्याविषयींची कीर्ति मला प्राप्त होईल व नोकरचाकरांची विपुलता असलेले व अश्वशालेंत अनेक अश्व असल्यामुळें सहज ओळखतां येण्याजोगें असे वैभवही मला उपभोगण्यास सांपडेल. ॥ ८ ॥

विश्वा॑नि दे॒वी भुव॑नाभि॒चक्ष्या॑ प्रती॒ची चक्षु॑रुर्वि॒या वि भा॑ति ॥

विश्वं॑ जी॒वं च॒रसे॑ बो॒धय॑न्ती॒ विश्व॑स्य॒ वाच॑मविदन्मना॒योः ॥ ९ ॥

विश्वानि देवी भुवना अभिऽचक्ष्य प्रतीची चक्षुः उर्विया वि भाति ॥

विश्वं जीवं चरसे बोधयंती विश्वस्य वाचं अविदन् मनायोः ॥ ९ ॥

सर्व जगताकडे एकदां नजर फेंकून ही देवी आपली दृष्टि परत फिरविते व मग उज्ज्वल प्रकाश पाडावयास लागते. सर्व जीवांना संचारार्थ जागृत करून हिनें अखिल प्रतिभाशाली कवींची स्तवनें संपादन करून घेतली आहेत. ॥ ९ ॥

पुनः॑पुन॒र्जाय॑माना पु॒राणी स॑मा॒नं वर्ण॑म॒भि शुम्भ॑माना ॥

श्व॒घ्नीव॑ कृ॒त्नुर्विज॑ आमिना॒ना मर्त॑स्य दे॒वी ज॒रय॒न्त्यायुः॑ ॥ १० ॥

पुनःऽपुनः जायमाना पुराणी समानं वर्णं अभि शुंभमाना ॥

श्वघ्नीऽइव कृत्नुः विजः आऽमिनाना मर्तस्य देवी जरयंति आयुः ॥ १० ॥

पुनः पुनः जन्म घेत असून ही जी अति पुरातन म्हणून प्रसिद्ध आहे, त्याच त्याच रंगाच्या वस्त्रांनी जी आपणास भूषवीत असते व श्वानांचा वध करण्याकरितां त्यांचेवर हत्यार चालविणाऱ्या व त्यामुळें भिती उत्पन्न करणाऱ्या हिंसक मनुष्याप्रमाणे जी सर्वांच्या आयुष्याची हानि करते, ती ही उषा देवी, मानवांचे आयुष्य हरण करीत येथें उभी आहे. ॥ १० ॥

व्यू॒र्ण्व॒ती दि॒वो अन्ताँ॑ अबो॒ध्यप॒ स्वसा॑रं सनु॒तर्यु॑योति ॥

प्र॒मि॒न॒ती म॑नु॒ष्या यु॒गानि॒ योषा॑ जा॒रस्य॒ चक्ष॑सा॒ वि भा॑ति ॥ ११ ॥

विऽऊर्ण्वती दिवः अंतान् अबोधि अप स्वसारं सनुतः युयोति ॥

प्रऽमिनती मनुष्या युगानि योषा जारस्य चक्षसा वि भाति ॥ ११ ॥

द्युलोकाच्या सीमेपर्यंत प्रकाश पाडीत ही जागृत झाली आहे. आपली भगिनी जी रात्र तिला ही अतिशय दूर घालवून देत आहे. मानवांच्या आयुष्याचा अवधि कमी कमी करीत ही युवति आपल्या वल्लभाच्या कांतीने युक्त होऊन येथें प्रकाशत आहे. ॥ ११ ॥

पशून्न चित्रा सुभगा प्रथाना सिंधुर्न क्षोद उर्विया व्यश्वैत् ॥

अमिनती दैव्यानि व्रतानि सूर्यस्य चेति रश्मिभिर्दृशाना ॥ १२ ॥

पशून् न चित्रा सुऽभगा प्रथाना सिंधुः न क्षोदः उर्विया वि अश्वैत् ॥

अमिनती दैव्यानि व्रतानि सूर्यस्य चेति रश्मिऽभिः दृशाना ॥ १२ ॥

ज्याप्रमाणे उदधि हा आपल्या उदकाचे प्रदर्शन मांडतो त्याप्रमाणें सर्व पशूंना बाहेर मैदानांत आणून त्यांचे जणूं कांही प्रदर्शन मांडीत ही कृपाशील परंतु आश्चर्यकारक प्रकाशानें मंडित अशी उषा दूरवर प्रकाशली आहे. देवांच्या आज्ञांचा कधींही भंग न होऊं देतां सूर्याच्या किरणांनी प्रकाशणारी ही उषा येथें दृग्गोचर होत आहे. ॥ १२ ॥

उषस्तच्चित्रमा भरास्मभ्यं वाजिनीवति ॥ येन तोकं च तनयं च धामहे ॥ १३ ॥

उषः स्तत् चित्रं आ भर अस्मभ्यं वाजिनीऽवति ॥ येन तोकं च तनयं च धामहे ॥ १३ ॥

हे सामर्थ्यवान उषादेवते, ज्याच्या योगानें मुलें आणि नातवंडे ह्यांचा लाभ होईल असलें दुर्मिळ भाग्य आम्हांस प्राप्त होईल असें कर. ॥ १३ ॥

उषो॑ अ॒द्येह गो॑म॒त्यश्वा॑वति विभावरि ॥ रे॒वद॒स्मे व्युच्छ सूनृतावति ॥ १४ ॥

उषः अद्य इह गोऽमति अश्वऽवति विभाऽवरि ॥ रेवत् अस्मे इति वि उच्छ सूनृताऽवति ॥ १४ ॥

सत्य व माधुर्य ह्यानें परिप्लुत भाषण करणारे हे उषे, धेनु व अश्व ह्यांनी सुसंपन्न असणारे हे देवी, आम्हांस वैभव प्राप्त होण्यासाठी तुझा मंगल प्रकाश आम्हांवर पाड. ॥ १४ ॥

यु॒क्ष्वा हि वा॑जिनीव॒त्यश्वाँ॑ अ॒द्यारु॒णाँ उ॑षः ॥ अथा॑ नो॒ विश्वा॒ सौभ॑गा॒न्या व॑ह ॥ १५ ॥

युक्ष्वा हि वाजिनीऽवति अश्वान् अद्य अरुणान् उषः ॥ अथ नः विश्वा सौभगानि आ वह ॥ १५ ॥

सामर्थ्यसंपन्न हे उषादेवी, आपलें रक्तवर्ण अश्व आज जोड आणि सर्व सौख्यें आम्हांकडे घेऊन ये. ॥ १५ ॥

अश्विना वर्तिरस्मदा गोमद्दस्रा हिरण्यवत् ॥ अर्वाग्रथं समनसा नि यच्छतम् ॥ १६ ॥

अश्विना वर्तिः अस्मत् आ गोमत् दस्रा हिरण्यऽवत् ॥ अर्वाक् रथं सऽमनसा नि यच्छतम् ॥ १६ ॥

शत्रूंचा नाश करणाऱ्या हे अश्विनी देवांनो, आमचें घर धेनूंनी व सुवर्णानें मंडित करण्याकरितां आपण एकमतानें आपला रथ तिकडे घेऊन या. ॥ १६ ॥

यावित्था श्लोकम् आ दिवो ज्योतिर्जनाय चक्रथुः ॥ आ न ऊर्जं वहतमश्विना युवम् ॥ १७ ॥

यौ इत्था श्लोकं आ दिवः ज्योतिः जनाय चक्रथुः ॥ आ नः ऊर्जं वहतं अश्विना युवम् ॥ १७ ॥

हे अश्विनहो, आम्हांकरितां पुष्कळ सामर्थ्य इकडे घेऊन या. ह्या सर्व लोकांकरितां प्रशंसायोग्य असें उज्ज्वल तेज द्युलोकांतून आपणच ह्याप्रमाणें इकडे आणलें. ॥ १७ ॥

एह देवा मयोभुवा दस्रा हिरण्यवर्तनी ॥ उषर्बुधो वहन्तु सोमपीतये ॥ १८ ॥

आ इह देवा मयःऽभुवा दस्रा हिरण्यवर्तनी इति हिरण्यऽवर्तनी ॥ उषःऽबुधः वहंतु सोमऽपीतये ॥ १८ ॥

सौख्याची प्राप्ति करून घेणारे, शत्रूंचा नाश करणारे, व सुवर्णमय मार्गांवरून गमन करणारे हे दोघे अश्विनी देव प्रतःकालींच जागृत होणाऱ्या देवांस सोमपानार्थ इकडे घेऊन येवोत. ॥ १८ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त ९३ (अग्निषोम सूक्त)

ऋषि - गोतम राहूगण : देवता - अग्निषोम : छंद - गायत्री; अनुष्टुभ्; त्रिष्टुभ्

अग्नी॑षोमावि॒मं सु मे॑ शृणु॒तं वृ॑षणा॒ हव॑म् ॥

प्रति॑ सू॒क्तानि॑ हर्यत॒ं भव॑तं दा॒शुषे॒ मयः॑ ॥ १ ॥

अग्नीषोमौ इमं सु मे शृणुतं वृषणा हवम् ॥

प्रति सुऽक्तानि हर्यतं भवतं दाशुषे मयः ॥ १ ॥

हे सामर्थ्यवान अग्नि व सोम हो, माझी हांक नीट ऐका, माझ्या सुंदर स्तोत्रांचा स्वीकार करा व आपणांस हवि अर्पण करणाऱ्या आपल्या उपासकास सौख्य अर्पण करणारे व्हा. । १ ॥

अग्नीषोमा यो अद्य वामिदं वचः सपर्यति ॥

तस्मै धत्तं सुवीर्यं गवां पोषं स्वश्व्यम् ॥ २ ॥

अग्नीषोमा यः अद्य वां इदं वचः सपर्यति ॥

तस्मै धत्तं सुऽवीर्यं गवां पोषं सुऽअश्व्यम् ॥ २ ॥

हे अग्नि व सोमहो, जो आज आपणांस स्तोत्र अर्पण करून आळवीत आहे त्यास अशा उत्तम शौर्याची प्राप्ति करून द्या, कीं त्याच्या योगानें त्यास सुंदर अश्व लाभावे व त्याच्या धेनूंच्या संख्येतही भर पडत जावी. ॥ २ ॥

अग्नीषोमा य आहुतिं यो वां दाशाद्धविष्कृतिम् ॥

स प्रजया सुवीर्यं विश्वमायुर्व्यश्नवत् ॥ ३ ॥

अग्नीषोमा यः आहुतिं यः वां दाशात् हविःऽकृतिम् ॥

सः प्रऽजया सुऽवीर्यं विश्वं आयुः वि अश्नवत् ॥ ३ ॥

हे अग्नि व सोमहो, जो भक्त आपणांस आहुति अर्पण करतो अथवा आपणांस उद्देशून यज्ञ करतो त्यास उत्तम संतति व शौर्य प्राप्त होवो आणि त्यास पूर्ण आयुष्याचा उपभोग मिळो. ॥ ३ ॥

अग्नीषोमा चेति तद्वीर्यं वां यदमुष्णीतमवसं पणिं गाः ॥

अव॑तिरतं बृस॑यस्य शेषोऽ॑विंदतं ज्योतिरेकं बहुभ्यः ॥ ४ ॥

अग्नीषोमा चेति तत् वीर्यं वां यत् अमुष्णीतं अवसं पणिं गाः ॥

अवातिरतं बृसयस्य शेषः अविंदतं ज्योतिः एकं बहुऽभ्यः ॥ ४ ॥

हे अग्नि व सोमहो, ज्यावेळी तुम्ही पणीने अगदी जपून ठेवलेले धन - म्हणजे धेनू - ह्यांचे हरण केले, ज्यावेळी तुम्ही बृसयाच्या शेष राहिलेल्या अनुचरांचा पराभव केला, व ज्यावेळी अनेकांच्या हिताकरितांच तुम्ही एकच देदीप्यमान ज्योति घेऊन आलां त्यावेळी ते आपले सर्वसिद्ध वीर्य सर्वांस विदित झाले. ॥ ४ ॥

युवमेतानि दिवि रोचनान्यग्निश्च सोम सक्रतू अधत्तम् ॥

युवं सिंधूँरभिशस्तेरवद्यादग्नीषोमावमुञ्चतं गृभीतान् ॥ ५ ॥

युवं एतानि दिवि रोचनानि अग्निः च सोम सक्रतू अधत्तम् ॥

युवं सिंधून् अभिऽशस्तेः अवद्यात् अग्नीषोमौ अमुंचतं गृभीतान् ॥ ५ ॥

हे सोमा तूं आणि अग्नि, हे दोघेही सामर्थ्यवान असल्यामुळे तुम्ही दोघांनी ह्या नक्षत्ररूपी ज्योतींची द्युलोकांत संस्थापना केली. हे अग्नि आणि सोमहो, प्रतिबंधात पडलेल्या सर्व नद्यांस तुम्ही अमंगल निंदेपासून मुक्त केले ॥ ५ ॥

आन्यं दिवो मातरिश्वा जभारामथ्नादन्यं परि श्येनो अद्रेः ॥

अग्नीषोमा ब्रह्मणा वावृधानोरुं यज्ञायं चक्रथुरुलोकम् ॥ ६ ॥

आ अन्यं दिवः मातरिश्वा जभार अमथ्नात् अन्यं परि श्येनः अद्रेः ॥

अग्नीषोमा ब्रह्मणा वावृधाना उरुं यज्ञाय चक्रथुः ऊं इति लोकम् ॥ ६ ॥

ह्या दोघांपैकी एकास मातरिश्वा देवानें द्युलोकांतून येथे आणले व दुसऱ्यास श्येन पक्षी पर्वतांतून मंथन क्रियेनें उत्पन्न करून घेऊन आला. हे अग्नि आणि सोमहो, स्तुतिस्तोत्रांच्या योगानें तुम्ही प्रमुदित होऊन यज्ञकर्माच्या सिद्धतेसाठी ह्या जगतास विस्तीर्णता आणली. ॥ ६ ॥

अग्नीषोमा हुविषः प्रस्थितस्य वीतं हर्यतं वृषणा जुषेथाम् ॥

सुशर्माणा स्ववसा हि भूतमथा धत्तं यजमानाय शं योः ॥ ७ ॥

अग्नीषोमा हविषः प्रऽस्थितस्य वीतं हर्यतं वृषणा जुषेथाम् ॥

सुऽशर्माणा सुऽअवसा हि भूतं अथ धत्तं यजमानाय शं योः ॥ ७ ॥

हे अग्नि व सोमहो, हा येथे तुमच्याकरितां हवि सिद्ध आहे, त्याचा आस्वाद घ्या, त्याचा स्वीकार करा. हे पराक्रमी देवांनो, तो गोड मानून घ्या. आपण आमचे कल्याण करणारे व आमच्या रक्षणाचा भार घेणारे व्हा. आपणांस शरण येणाऱ्या भक्तास जें सौख्य आपण अर्पण करतां तेंच याग करणाऱ्या उपासकसही अर्पण करा. ॥ ७ ॥

यो अ॒ग्नीषोमा॑ ह॒विषा॑ सप॒र्याद्दे॑व॒द्रीचा॒ मन॑सा॒ यो घृ॒तेन॑ ॥

तस्य॑ व्र॒तं र॑क्षतं पा॒तमं॑ह॑सो वि॒शे जना॑य॒ महि॒ शर्म॑ यच्छतम् ॥ ८ ॥

यः अग्नीषोमा हविषा सपर्यात् देवद्रीचा मनसा यः घृतेन ॥

तस्य व्रतं रक्षतं पातं अंहसः विशे जनाय महि शर्म यच्छतम् ॥ ८ ॥

हे अग्नि व सोमहो, जो उपासक हवि अर्पण करून आपलें पूजन करील अथवा अंतःकरण भक्तियुक्त करून जो आपलें घृतानें अर्चन करील त्याच्या सत्कर्माचें आपण रक्षण करा, व संकटांपासून त्यास बचावून न्या. सर्व लोक हे आपली प्रजा असल्यामुळें त्यांनाही आपण उत्तम सुख अर्पण करा. ॥ ८ ॥

अग्नी॑षोमा॒ सवे॑दसा॒ सहू॑ती वनत॒ं गिरः॑ ॥ सं दे॑व॒त्रा ब॑भूवथुः ॥ ९ ॥

अग्नीषोमा सऽवेदसा सहूती इति सऽहुती वनतं गिरः ॥ सं देवऽत्रा बभूवथुः ॥ ९ ॥

हे अग्नि व सोमहो, आपणांस सर्व गोष्टी सारख्याच विदित होत असल्यामुळें व आम्ही आपणां दोघांस एकदमच हाक मारीत असल्यामुळें आमच्या स्तोत्रावर आपण प्रेम ठेवा. देवसमुदायांत आपण एकदम प्रकट झाला. ॥ ९ ॥

अग्नीषोमावनेन वां यो वां घृतेन दाशति ॥ तस्मै दीदयतं बृहत् ॥ १० ॥

अग्नीषोमौ अनेन वां यः वां घृतेन दाशति ॥ तस्मै दीदयतं बृहत् ॥ १० ॥

हे अग्नि व सोमहो, जो घृताचे योगानें आपणांस हवि अर्पण करतो त्याचेकरितां उत्तम संपत्ति धारण करून आपण सुप्रकाशित व्हा. ॥ १० ॥

अग्नीषोमाविमानि नो युवं हव्या जुजोषतम् ॥ आ यातमुप नः सचा ॥ ११ ॥

अग्नीषोमौ इमानि नः युवं हव्या जुजोषतम् ॥ आ यातं उप नः सचा ॥ ११ ॥

हे अग्नि व सोमहो, ह्या हविंचा आपण आवडीनें स्वीकार करा व दोघे मिळून आम्हांकडे या. ॥ ११ ॥

अग्नीषोमा पिपृतमर्वतो न आ प्यायन्तामुस्रिया हव्यसूदः ॥

अस्मे बलानि मघवत्सु धत्तं कृणुतं नो अध्वरं श्रुष्टिमन्तम् ॥ १२ ॥

अग्नीषोमा पिपृतं अर्वतः नः आ प्यायंतां उस्रिया हव्यऽसूदः ॥

अस्मे इति बलानि मघवत्ऽसु धत्तं कृणुतं नः अध्वरं श्रुष्टिऽमंतम् ॥ १२ ॥

हे अग्नि व सोमहो, आमच्या अश्वांच्या पोषणाची उत्तम तजवीज करा. ज्यांच्या दुग्धामुळें आम्हांस हवि तयार करता येतात त्या आमच्या गाईही वृद्धि पावोत. आम्ही आपणांस आहुति अर्पण करीत असल्यामुळें आमचे अंगी अनेक प्रकारचे सामर्थ्य आणा व आमच्या यज्ञाची कीर्ति दूरवर जाईल असें करा. ॥ १२ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त ९४ (अग्नि सूक्त)

ऋषि - कुत्स अंगिरस : देवता - १-८ अग्नि; शेष अनेक : छंद - अनेक

इमं स्तोममर्हते जातवेदसे रथमिव सं महेमा मनीषया ॥

भद्रा हि नः प्रमतिरस्य संसद्यग्ने सख्ये मा रिषामा वयं तव ॥ १ ॥

इमं स्तोमं अर्हते जातऽवेदसे रथंऽइव सं महेम मनीषया ॥

भद्रा हि नः प्रऽमतिः अस्य संऽसदि अग्ने सख्ये मा रिषाम वयं तव ॥ १ ॥

सन्मानास योग्य व सर्वज्ञ अशा अग्निदेवास आपण, एखाद्यास जसा रथ आणून द्यावा, त्याचप्रमाणें हे स्तोत्र अंतःकरणपूर्वक अर्पण केलें पाहिजे. खरोखर ह्याची कृपाशील बुद्धि सर्व लोकांत आमच्य संबंधाने फार अनुकूल आहे. हे अग्निदेवा, तुझें सख्य आम्ही जोडलें असल्यामुळें आमचा नाश होऊं देऊं नको. ॥ १ ॥

यस्मै त्वमायजसे स साधत्यनर्वा क्षेति दधते सुवीर्यम् ॥

स तूताव नैनमश्नोत्यंहतिरग्ने सख्ये मा रिषामा वयं तव ॥ २ ॥

यस्मै त्वं आऽयजसे सः साधति अनर्वा क्षेति दधते सुऽवीर्यम् ॥

सः तूताव नैनं अश्नोति अंहतिरग्ने सख्ये मा रिषाम वयं तव ॥ २ ॥

ज्याचेकरितां तूं यज्ञ संपादन करतोस त्याचे हेतु सिद्ध होतात. त्याचेजवळ अश्व नसले तरी पराभव न पावतां त्यास राहतां येते. उत्तम प्रकारचे शौर्य तो संपादन करून घेतो. अभिवृद्धिही त्यास प्राप्त झालीच असें समजावे त्याला कसलीही अडचण येत नाहीं. हे अग्निदेवा, तुझें सख्य आम्ही जोडलें असल्यामुळें आमचा नाश होऊं देऊं नको. ॥ २ ॥

श॒केम॑ त्वा स॒मिधं᳚ सा॒धया॒ धिय॒स्त्वे दे॒वा ह॒विर॑द॒न्त्याहु॑तम् ॥

त्वम् आ॑दि॒त्याँ आ व॑ह॒ तान्ह्यु१॑श्मस्यग्ने॑ स॒ख्ये मा रि॑षामा व॒यं तव॑ ॥ ३ ॥

शकेम त्वा संऽइधं साधय धियः त्वे इति देवाः हविः अदंति आऽहुतम् ॥

त्वं आदित्यान् आ वह तान् हि उश्मसि अग्ने सख्ये मा रिषाम वयं तव ॥ ३ ॥

तुला प्रज्वलित करण्याचे सामर्थ्य आम्हांस खचित प्राप्त होईल. तूं आमच्या प्रार्थना सफल कर. तुझे ठिकाणी अर्पण केलेल्या हवीचेंच सर्व देव सेवन करतात. तूं आदित्यांना इकडे घेऊन ये. त्याच्याविषयी आम्हांस फार प्रेम आहे. हे अग्निदेवा, तुझें सौख्य आम्ही जोडलेले असल्यामुळें आमचा नाश होऊं देऊं नको. ॥ ३ ॥

भरा॑मे॒ध्मं कृ॒णवा॑मा ह॒वींषि॑ ते चि॒तय॑न्तः॒ पर्व॑णापर्वणा व॒यम् ॥

जी॒वात॑वे प्र॒तरं सा॑धया॒ धियोऽ॑ग्ने सु॒ख्ये मा रि॑षामा व॒यं तव॑ ॥ ४ ॥

भराम इध्मं कृणवाम हवींषि ते चितयंतः पर्वणाऽपर्वणा वयम् ॥

जीवातवे प्रऽतरं साधय धियः अग्ने सख्ये मा रिषाम वयं तव ॥ ४ ॥

तुला आम्ही इंधन अर्पण करूं व पर्वणीपर्वणीला तुला प्रदीप्त करीत तुला हवि देत जाऊं. आमचे आयुष्य वृद्धि पावावे म्हणून तूं आमच्या प्रर्थना उत्तम रीतीनें सफल कर. हे अग्निदेवा, तुझें सख्य आम्ही जोडलें असल्यामुळें आमचा नाश होऊं देऊं नको. ॥ ४ ॥

वि॒शां गो॒पा अ॑स्य चरन्ति ज॒न्तवौ॑ द्वि॒पच्च॒ यदु॒त चतु॑ष्पद॒क्तुभिः॑ ॥

चि॒त्रः प्रके॒त उ॒षसौ म॒हाँ अ॒स्यग्ने स॒ख्ये मा रिषामा व॒यं तव ॥ ५ ॥

विशां गोपाः अस्य चरंति जंतवः द्विऽपत् च यत् उत चतुःऽपत् अक्तुऽभिः ॥

चित्रः प्रऽकेतः उषसः महान् असि अग्ने सख्ये मा रिषाम वयं तव ॥ ५ ॥

हा सर्व लोकांचा संरक्षक आहे. ह्याच्याच मुळें द्विपाद व चतुष्पाद असे सर्व प्राणी रात्री संचार करण्यास समर्थ होतात. तूं उषेचा आश्चर्यकारक परंतु श्रेष्ठ असा कीर्ति ध्वज आहेस. हे अग्निदेवा, तुझें सख्य आम्ही जोडलें असल्यामुळें आमचा नाश होऊं देऊं नको. ॥ ५ ॥

त्वमध्व॒र्यु॒रु॒त होतासि पू॒र्व्यः प्रशा॒स्ता पोता ज॒नुषा पु॒रोहितः ॥

विश्वा वि॒द्वाँ आर्त्विज्या धीर पुष्य॒स्यग्ने स॒ख्ये मा रिषामा व॒यं तव ॥ ६ ॥

त्वं अध्वर्युः उत होता असि पूर्व्यः प्रऽशास्ता पोता जनुषा पुरःऽहितः ॥

विश्वा विद्वान् आर्त्विज्या धीर पुष्यसि अग्ने सख्ये मा रिषाम वयं तव ॥ ६ ॥

तूं अध्वर्यु आहेस, हवि अर्पण करणारा तूं पुरातनकालीन होता आहेस. तूं यज्ञामध्यें आपलें अनुशासन चालविणारा व यज्ञास पवित्रता आणणारा आहेस. जन्मतःच तूं यज्ञाचा अग्रणी आहेस. तूं प्रज्ञावान असल्यामुळें, हे सुज्ञवर अग्निदेवा, ऋत्विजांची सर्व कार्यें तूं सहजच सांभाळून नेतोस. हे अग्निदेवा, तुझें सख्य आम्ही जोडलें असल्यामुळें आमचा नाश होऊं देऊं नको. ॥ ६ ॥

यो वि॒श्वतः॑ सु॒प्रती॑कः स॒दृङ्ङ्सि॑ दू॒रे चि॒त्सन्त॒ळिदि॒वाति॑ रोचसे ॥

रात्र्या॑श्चि॒दन्धो॒ अति॑ देव पश्य॒स्यग्ने॑ स॒ख्ये मा रि॑षामा व॒यं तव॑ ॥ ७ ॥

यः विश्वतः सुऽप्रतीकः सऽदृङ् असि दूरे चित् सन् तळित्ऽइव अति रोचसे ॥

रात्र्याः चित् अंधः अति देव पश्यसि अग्ने सख्ये मा रिषाम वयं तव ॥ ७ ॥

हे अग्निदेवा तूं सर्व प्रकारें सारखा देखणा आहेस. दूर असतांनासुद्धां तूं जवळ असल्याप्रमाणेंच अति प्रखर तेजानें तळपत असतोस. रात्रीच्या अंधकारांतूनसुद्धां हे देवा, तू अवलोकन करण्यास समर्थ होतोस. हे अग्निदेवा, तुझें सख्य आम्ही जोडलें असल्यामुळें आमचा नाश होऊं देऊं नको. ॥ ७ ॥

पूर्वो॑ देवा भवतु सुन्व॒तो रथो॑ऽ॒स्माकं॒ शंसो॑ अ॒भ्यस्तु दू॒ढ्यः॑ ॥

तदा जा॑नीतो॒त पु॑ष्यता॒ वचो॑ऽग्ने स॒ख्ये मा रि॑षामा व॒यं तव॑ ॥ ८ ॥

पूर्वः देवा भवतु सुन्वतः रथः अस्माकं शंसः अभि अस्तु दुःऽध्यः ॥

तत् आ जानीत उत पुष्यत वचः अग्ने सख्ये मा रिषाम वयं तव ॥ ८ ॥

हे देवहो, सोमरस सिद्ध करणाऱ्या उपासकाचा रथ सर्वांच्यापुढें असो, आणि आमची स्तुती दुष्ट हृदयाच्या माणसांना ओलांडून पुढें जावो. ती आमची प्रार्थना नीट समजून घ्या व तिला यशस्वी करा. हे अग्निदेवा, तुझें सख्य आम्ही जोडलें असल्यामुळें आमचा नाश होऊं देऊं नको. ॥ ८ ॥

व॒धैर्दुः॒शंसा॒ँ अप॑ दू॒ढ्यो जहि दू॒रे वा॒ ये अन्ति॑ वा॒ के चि॑द॒त्रिणः॑ ॥

अथा॑ य॒ज्ञाय॑ गृ॒णते सु॒गं कृ॒ध्यग्ने॑ स॒ख्ये मा रि॑षामा व॒यं तव॑ ॥ ९ ॥

वधैः दुःशंसान् अप दुःऽध्यः जहि दूरे वा ये अंति वा के चित् अत्रिणः ॥

अथा यज्ञाय गृणते सुऽगं कृधि अग्ने सख्ये मा रिषाम वयं तव ॥ ९ ॥

आपल्या घातक शस्त्रांनी दुष्ट हृदयांच्या मनुष्यांस व त्याचप्रमाणे जे कोणी दुरात्मे तुझ्या समीप अथवा तुझ्यापासून दूर असतील त्यांसही मारून टाक. तुझी स्तोत्रें गाणाऱ्या भक्तांकरितां यज्ञाचा मार्ग सुगम कर. हे अग्निदेवा, तुझें सख्य आम्ही जोडलें असल्यामुळें आमचा नाश होऊं देऊं नको. ॥ ९ ॥

यदयु॑क्था अरु॒षा रोहि॑ता॒ रथे॒ वात॑जूता वृ॒षभस्ये॑व ते॒ रवः॑ ॥

आदि॑न्वसि व॒निनो॑ धू॒मके॑तु॒नाग्ने॑ स॒ख्ये मा रि॑षामा व॒यं तव॑ ॥ १० ॥

यत् अयुक्थाः अरुषा रोहिता रथे वातऽजूता वृषभस्यऽइव ते रवः ॥

आत् इन्वसि वनिनः धूमऽकेतुना अग्ने सख्ये मा रिषाम वयं तव ॥ १० ॥

ज्यावेळी देदीप्यमान कांतीनें युक्त व जणूं काय कांही वाऱ्यानें प्रेरणा केल्याप्रमाणें धावणारे असे रक्तवर्ण अश्व तूं जोडलेले असतात त्यावेळी एखाद्या वृषभाप्रमाणें तुझी गर्जना होते, व धूम्ररूपी निशाण फडकविणाऱ्या आपल्या

ज्वालांनी तूं वृक्षांना व्यापून टाकतोस. हे अग्निदेवा, तुझें सख्य आम्ही जोडलें असल्यामुळें आमचा नाश होऊं देऊं नको. ॥ १० ॥

अध॑ स्व॒नादु॒त बि॑भ्युः पत॒त्रिणो॑ द्र॒प्सा यत्ते॑ यव॒सादो॒ व्यस्थि॑रन् ॥

सु॒गं तत्ते॑ ताव॒केभ्यो॒ रथे॒भ्योऽग्ने॑ स॒ख्ये मा रि॑षामा व॒यं तव॑ ॥ ११ ॥

अध स्वनात् उत बिभ्युः पतत्रिणः द्रप्सा यत् ते यवसऽअदः वि अस्थिरन् ॥

सुऽगं तत् ते तावकेभ्यः रथेभ्यः अग्ने सख्ये मा रिषाम वयं तव ॥ ११ ॥

ज्या तुझ्या ठिणग्या तृणाचा संहार करीत चोहोंकडे पसरतात त्यवेळी तुझी गर्जना ऐकून पक्षीसुद्धां भयभीत होतात. तुझ्या रथाचा मार्गही त्यावेळीं सुलभ होतो. हे अग्निदेवा, तुझें सख्य आम्ही जोडलें असल्यामुळें आमचा नाश होऊं देऊं नको. ॥ ११ ॥

अ॒यं मि॒त्रस्य॒ वरु॑णस्य॒ धाय॑सेऽवया॒तां म॒रुतां॒ हेळो॒ अद्भु॑तः ॥

मृळा सु नो भूत्वेषां मनः पुनरग्ने सख्ये मा रिषामा वयं तव ॥ १२ ॥

अयं मित्रस्य वरुणस्य धायसे अवऽयातां मरुतां हेळः अद्भुतिः ॥

मृळा सु नः भूतु एषां मनः पुनः अग्ने सख्ये मा रिषाम वयं तव ॥ १२ ॥

मित्र व वरुण ह्यांच्या संतोषार्थ खाली गमन करणाऱ्या मरुतांचा हा क्रोध खरोखर आश्चर्य उत्पन्न करणारा आहे. हे अग्निदेवा आम्हांस सौख्य अर्पण कर. त्या मरुतांचे मन पुन्हां आमच्याकडे आकर्षित होवो. हे अग्निदेवा, तुझें सख्य आम्ही जोडलें असल्यामुळें आमचा नाश होऊं देऊं नको. ॥ १२ ॥

देवो देवानामसि मित्रो अद्भुऽतो वसुर्वसूनामसि चारुरध्वरे ॥

शर्मन्त्स्याम तव सप्रथस्तमेऽग्ने सख्ये मा रिषामा वयं तव ॥ १३ ॥

देवः देवानां असि मित्रः अद्भुनतः वसुः वसूनां असि चारुः अध्वरे ॥

शर्मन् स्याम तव सप्रथःऽतमे अग्ने सख्ये मा रिषाम वयं तव ॥ १३ ॥

तूं सर्व देवांत श्रेष्ठ देव आहेस, तूं अद्‌भुत मित्र आहेस, सर्व वसूंत श्रेष्ठ वसु आहेस, सर्व यज्ञांत तूं शोभणारा आहेस. तुझ्या सर्वविस्तृत अशा मंगल आश्रयाखाली आम्ही राहूं. हे अग्निदेवा, तुझें सख्य आम्ही जोडलें असल्यामुळें आमचा नाश होऊं देऊं नको. ॥ १३ ॥

तत्ते॑ भ॒द्रं यत्समि॑द्धः॒ स्वे दमे॒ सोमा॑हुतो॒ जर॑से मृळ॒यत्त॑मः ॥

दधा॑सि॒ रत्नं॒ द्रवि॑णं च दा॒शुषेऽ॑ग्ने स॒ख्ये मा रि॑षामा व॒यं तव॑ ॥ १४ ॥

तत् ते भद्रं यत् संऽइद्धः स्वे दमे सोमऽआहुतः जरसे मृळयत्ऽतमः ॥

दधासि रत्नं द्रविणं च दाशुषे अग्ने सख्ये मा रिषाम वयं तव ॥ १४ ॥

हेंच तुझे मांगल्यकारक कृत्य कीं तुझ्या सदनांत तुला सोमाचा हवि दिला असतां तूं प्रदीप्त होऊन भक्तास अत्यंत सौख्य प्राप्त करून देण्याकरितां मधुर शब्द बोलतोस व आपल्या अर्चकास उत्तम उत्तम वस्तु व धन अर्पण करतोस. हे अग्निदेवा, तुझें सख्य आम्ही जोडलें असल्यामुळें आमचा नाश होऊं देऊं नको. ॥ १४ ॥

यस्मै॒ त्वं सु॑द्रविणो॒ ददा॑शोऽनागा॒स्त्वम॑दिते स॒र्वता॑ता ॥

यं भद्रेण शवसा चोदयासि प्रजावता राधसा ते स्याम ॥ १५ ॥

यस्मै त्वं सुऽद्रविणः ददाशः अनागाःऽत्वं अदिते सर्वऽताता ॥

यं भद्रेण शवसा चोदयासि प्रजाऽवता राधसा ते स्याम ॥ १५ ॥

हे वैभवसंपन्न व अखंड सामर्थ्ययुक्त देवा, सर्व तऱ्हेने निष्पापपणा राखण्याविषयी तूं ज्यास सामर्थ्य देतोस व ज्यास सौख्य व बल अर्पण करून तूं भरभराटीस पोंचवितोस तसें आम्हीही होऊन, उत्तम संतति प्राप्त करून देणाऱ्या तुझ्या कृपाछत्राखाली आनंदानें राहूं. ॥ १५ ॥

स त्वमग्ने सौभगत्वस्य विद्वानस्माकमायुः प्र तिरेह देव ॥

तन्नो मित्रो वरुणो मामहन्तामदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ॥ १६ ॥

सः त्वं अग्ने सौभगऽत्वस्य विद्वान् अस्माकं आयुः प्र तिर इह देव ॥

तन् नः मित्रः वरुणः मामहंतां अदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ॥ १६ ॥

हे अग्निदेवा, खरे कल्याण कशांत आहे ह्याचें तुला ज्ञान असल्यामुळें ह्या जगांत तूं आमचे आयुष्य वृद्धिंगत कर. ह्या आमच्या विनंतीस मित्र व वरुण हे व त्याचप्रमाणे अदिति, सिन्धु, पृथिवी व द्युलोक हेही संमति देवोत. ॥ १६ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त ९५ (ऋतु उत्पत्ति सूक्त)

ऋषि - कुत्स अंगिरस : देवता - अग्नि : छंद - त्रिष्टुभ्

द्वे विरूपे चरतः स्वर्थे अन्यान्या वत्समुप धापयेते ॥

हरिरन्यस्यां भवति स्वधावाञ्छुक्रो अन्यस्यां ददृशे सुवर्चाः ॥ १ ॥

द्वे इति विरूपे इति विऽरूपे चरतः स्वर्थे इति सुऽअर्थे अन्याऽअन्या वत्सं उप धापयेते इति ॥

हरिः अन्यस्यां भवति स्वधाऽवान् शुक्रः अन्यस्यां ददृशे सुऽअर्चाः ॥ १ ॥

रूपांत अगदींच भिन्न अशा ह्या दोघी युवती आपआपल्या सुंदर मार्गांनी गमन करीत असतात. दोघींपैकी प्रत्येक, एक एक बालकाला पाजीत असते. एकीजवळ पीतवर्ण बालक पुष्ट होत असते व दुसरीजवळ शुभ्रवर्ण बालक झपाट्यानें वाढत असलेले आढळलें आहे. ॥ १ ॥

द॒शेमं त्वष्टु॑र्जनयन्त॒ गर्भ॒मत॑न्द्रासो यु॒व॒तयो॒ विभृ॑त्रम् ॥

ति॒ग्मानी॑कं॒ स्वय॑शसं॒ जने॑षु वि॒रोच॑मानं॒ परि॑ षीं नयन्ति ॥ २ ॥

दश इमं त्वष्टुः जनयंत गर्भं अतंद्रासः युवतयः विऽभृत्रम् ॥

तिग्मऽअनीकं स्वऽयशसं जनेषु विऽरोचमानं परि सीं नयंति ॥ २ ॥

त्वष्टा देवाच्या निरालस अशा दहा युवतींनी ह्या खेळकर बाळास जन्म दिला. जेव्हां ह्याची प्रखर कांति दृष्टीस पडून ह्याची ख्याति सर्व लोकांत पसरली तेव्हां ह्या देदीप्यमान बालकास इकडे तिकडे सर्वत्र घेऊन जाऊं लागले. ॥ २ ॥

त्रीणि जाना परि भूषन्त्यस्य समुद्र एकं दिव्येकमप्सु ॥

पूर्वामनु प्र दिशं पार्थिवानामृतून्प्रशासद्वि दधावनुष्ठु ॥ ३ ॥

त्रीणि जाना परि भूषंति अस्य समुद्र एकं दिवि एकं अप्ऽसु ॥

पूर्वां अनु प्र दिशं पार्थिवानां ऋतून् प्रऽशासत् वि दधौ अनुष्ठु ॥ ३ ॥

समुद्रांतील एक, द्युलोकांतील एक व अंतरिक्षांतील जलांत एक अशा रीतीनें ह्याच्या तिन्ही जन्मांचे कविजन सुंदर वर्णन करतात. पूर्व दिशेपासून पृथिवीच्या भागांतील सर्व दिशांचे नियमन करून व त्याचप्रमाणे ऋतूंवर आपला अधिकार चालवून ह्यानें त्यांच्या त्यांच्या क्रमाप्रमाणें त्यांची संस्थापना केली आहे. ॥ ३ ॥

क इमं वो निण्यमा चिकेत वत्सो मातृर्जनयत स्वधाभिः ॥

बह्वीनां गर्भो अपसामुपस्थान्महान्कविर्निश्चरति स्वधावान् ॥ ४ ॥

क इमं वः निण्यं आ चिकेत वत्सः मातृः जनयत स्वधाभिः ॥

बह्वीनां गर्भः अपसां उपऽस्थान् महान् कविः निः चरति स्वधावान् ॥ ४ ॥

अंतर्हित असतांना हा तुम्हांपैकी कोणास ओळखूं येतो ? ह्या बालकानें आपल्या स्वतःच्या सामर्थ्यानें आपल्या मातांसही जन्म दिला. अनेक वस्तूंना गर्भरूप, श्रेष्ठ, प्रज्ञावान व सामर्थ्यशाली असा हा अग्नि आपल्या अद्भुत पराक्रमांच्या जागेमधून बाहेर निघून सर्वत्र संचार करीत आहे. ॥ ४ ॥

आ॒विष्ट्यो॑ वर्धते॒ चारु॑रासु जि॒ह्मानां॑मू॒र्ध्वः स्वय॑शा उ॒पस्थे॑ ॥

उ॒भे त्वष्टु॑र्बिभ्यतु॒र्जाय॑मानात्प्रती॒ची सिं॒हं प्रति॑ जोषयेते ॥ ५ ॥

आविः त्यः वर्धते चारुः आसु जिह्मानां ऊर्ध्वः स्वऽयशाः उपऽस्थे ॥

उभे त्वष्टुः बिभ्यतुः जायमानात् प्रतीची इति सिंहं प्रति जोषयेते इति ॥ ५ ॥

हा सुंदर अग्नि जलांमध्यें राहून सर्वांच्या दृष्टीस पडेल अशा रीतीनें वृद्धिंगत होतो. हा स्वतःच्या कीर्तिनें मंडित होऊन, तीं जलें वक्र गतीनें वहात असतांही त्यांचेमध्यें सरळ उभा राहतो. ह्याचा जन्म होत असतां, त्वष्टा देवानें

निर्माण केलेल्या द्युलोक व पृथिवी ह्या दोघींस त्याची भिती वाटली, परंतु पुन्हां परत वळून त्यांनी ह्या सिंहाचा आश्रय केला. ॥ ५ ॥

उभे भद्रे जोषयेते न मेने गावो न वाश्रा उप तस्थुरेवैः ॥

स दक्षाणां दक्षपतिर्बभूवाञ्जन्ति यं दक्षिणतो हविर्भिः ॥ ६ ॥

उभे इति भद्रे इति जोषयेते इति न मेने इति गावः न वाश्राः उप तस्थुः एवैः ॥

सः दक्षाणां दक्षऽपतिः बभूव अंजंति यं दक्षिणतः हविःऽभिः ॥ ६ ॥

त्या उभयतां कल्याणप्रद द्यावापृथिवींनी, दोघी स्त्रियांप्रमाणें, ह्याचें परिपालन केलें. वत्सासाठी हंबरणाऱ्या गाईप्रमाणें त्या धांवत धांवत ह्याचेजवळ आल्या. ज्यास दक्षिण बाजूनें सर्व उपासक लोक हवि अर्पण करून भूषवित असतात असा तो अग्नि सर्व सामर्थ्यवान पुरुषांत सामर्थ्यवान ठरला. ॥ ६ ॥

उदयंयमीति सवितेव बाहू उभे सिचौ यतते भीम ऋञ्जन् ॥

उच्छुक्रमत्कंमजते सिमस्मान्नवां मातृभ्यो वसंना जहाति ॥ ७ ॥

उत् यंयमीति सविताऽइव बाहू इति उभे इति सिचौ यतते भीम ऋंजन् ॥

उत् छुक्रं अत्कं अजते सिमस्मात् नवा मातृभ्यः वसना जहाति ॥ ७ ॥

सवित्याप्रमणें हा आपले बाहू उभारतो व वृष्टिकारक अशा त्या दोघी द्यावापृथिवींस अलंकृत करीत हा सत्कृत्यांत जोमाने गढून जातो. सर्वांपासून हा त्यांची उज्ज्वल प्रावरणें हिसकावून घेतो. स्वतःच्या जननीपासून सुद्धां हा त्यांची नूतन वसनें काढून घेतो. ॥ ७ ॥

त्वेषं रूपं कृणुत उत्तरं यत्संम्पृञ्चानः सदंने गोभिंरद्भिः ॥

कविर्बुध्नं परिं मर्मृज्यते धीः सा देवतांता समिंतिर्बभूव ॥ ८ ॥

त्वेषं रूपं कृणुते उत्ऽतरं यत् संऽपृंचानः सदने गोभिः अत्ऽभिः ॥

कविः बुध्नं परि मर्मृज्यते धीः सा देवऽताता संऽइतिः बभूव ॥ ८ ॥

हा स्वसदनांत धेनु व उदक ह्यांच्याशी जेव्हां संपर्क ठेवतो तेव्हां ह्यास अति उज्ज्वल रूप धारण करतां येतें. मूर्तिमंत बुद्धिच असा हा प्रज्ञावान अग्नि स्वर्गलोकाच्या मूल स्तंभास निर्मलत्व आणतो, व म्हणू हीच त्याची कृति त्याची यज्ञांत देवांबरोबर भेट होण्यास कारणीभूत होते. ॥ ८ ॥

उ॒रु ते॒ ज्रय॒ः पर्ये॑ति बु॒ध्नं वि॒रोच॑मानं महि॒षस्य॒ धाम॑ ॥

विश्वे॑भिरग्ने॒ स्वय॑शोभिरि॒द्धोऽ॑दब्धेभिः पा॒यु॒भिः॑ पाह्य॒स्मान् ॥ ९ ॥

उरु ते ज्रयः परि एति बुध्नं विऽरोचमानं महिषस्य धाम ॥

विश्वेभिः अग्ने स्वयशाःऽभिः इद्धः अदब्धेभिः पायुभिः पाहि अस्मान् ॥ ९ ॥

श्रेष्ठ असा जो तूं त्या तुझें वसतिस्थान स्वर्गलोकाच्या मूल प्रदेशावर आहे व त्यास तुझें विस्तृत व देदीप्यमान तेज व्याप्त करून टाकीत आहे. हे अग्नि देवा, सर्वविख्यात अशी आपल्या सकल ज्वालांचे योगानें प्रदीप्त हो व कधींही कुंठित न होणाऱ्या अशा आपल्या भक्तसंरक्षक सामर्थ्यानें आमचें रक्षण कर. ॥ ९ ॥

धन्व॒न्स्रोतः॑ कृणुते गा॒तुमू॒र्मिं शु॒क्रैरू॒र्मिभि॑र॒भि न॑क्षति॒ क्षाम् ॥

विश्वा सनानि जठरेषु धत्तेऽन्तर्नवासु चरति प्रसूषु ॥ १० ॥

धन्वन् स्रोतः कृणुते गातुं ऊर्मिं शुक्रैः ऊर्मिऽभिः अभि नक्षति क्षाम् ॥

विश्वा सनानि जठरेषु धत्ते अंतः नवासु चरति प्रऽसूषु ॥ १० ॥

निर्जल प्रदेशांत हा जलप्रवाह आणतो, तेथें उदकांना मार्ग करतो व पाण्याच्या लाटा उसळावयास लावतो. प्रकाशामुळें चकाकणाऱ्या अशा वीचींच्या योगानें हा पृथिवीस भरून टाकतो. सर्व पुरातन वस्तूंना तो आपल्या उदरांत टाकतो आणि नूतन तरुलतामध्यें हा निर्भयपणें संचार करतो. ॥ १० ॥

एवा नो अग्ने सुमिधा वृधानो रेवत्पावक श्रवसे वि भाहि ॥

तन्नो मित्रो वरुणो मामहन्तामदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ॥ ११ ॥

एव नः अग्ने संऽइधा वृधानः रेवत् पावक श्रवसे वि भाहि ॥

तन् नः मित्रः वरुणः मामहंतां अदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ॥ ११ ॥

हे अग्निदेवा, आम्ही अर्पण केलेल्या इंधनामुळें अशा रीतीनें वृद्धिंगत होऊन, हे सर्वांस पावन करणाऱ्या देवा, तूं आपला प्रकाश सर्वत्र पाड. आम्हांस धन देऊन उत्तम कीर्ति मिळव. ह्या आमच्या विनंतीस मित्र व वरुण व त्याचप्रमाणें अदिति, सिंधु, पृथिवी व द्युलोक ह्यांचेही अनुमोदन असो. ॥ ११ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त ९६ (अग्नि सूक्त)

ऋषि - कुत्स अंगिरस : देवता - द्रविणोदसग्नि : छंद - त्रिष्टुभ्

स प्र॒त्नथा॒ सह॑सा॒ जाय॑मानः स॒द्यः काव्या॑नि॒ बळ॑धत्त॒ विश्वा॑ ॥

आप॑श्च मि॒त्रं धि॒षणा॑ च साधन्दे॒वा अ॒ग्निं धा॑रयन्द्रविणो॒दाम् ॥ १ ॥

सः प्रत्न्ऽथा सहसा जायमानः सद्यः काव्यानि बळ् अधत्त विश्वा ॥

आपः च मित्रं धिषणा च साधन् देवाः अग्निं धारयन् द्रविणःऽदाम् ॥ १ ॥

पूर्वीप्रमाणे सामर्थ्यापासूनच जन्म घेणाऱ्या ह्या अग्नीनें खरोखर सर्व बुद्धिमत्व एकदम प्राप्त करून घेतलें. ह्यास उदकें व प्रज्ञा ह्यांनी जगाचा मित्र होण्यास प्रवृत्त केलें व ह्या वैभवदायक अग्नीचा सर्व देवांनी आश्रय केला. ॥ १ ॥

स पूर्वया निविदा कव्यतायोरिमाः प्रजा अजनयन्मनूनाम् ॥

विवस्वता चक्षसा द्यामपश्च देवा अग्निं धारयन्द्रविणोदाम् ॥ २ ॥

सः पूर्वया निऽविदा कव्यता आयोः इमाः प्रऽजाः अजनयन् मनूनाम् ॥

विवस्वता चक्षसा द्यां अपः च देवाः अग्निं धारयन् द्रविणःऽदाम् ॥ २ ॥

आयूच्या स्तोत्रांनी संतुष्ट होऊन त्यानें आपल्या पुरातन प्रज्ञावानपणानें ही मनूची सर्व प्रजा निर्माण केली व आपल्या सर्वप्रसृत तेजानें द्युलोक व उदक ह्यांस जन्म दिला. ह्या वैभवदायक अग्नीचा सर्व देवांनी आश्रय केला आहे. ॥ २ ॥

तमीळत प्रथमं यज्ञसाधं विश आरीराहुतमृञ्जसानम् ॥

ऊर्जः पुत्रं भरतं सृप्रदानुं देवा अग्निं धारयन्द्रविणोदाम् ॥ ३ ॥

तं ईळत प्रथमं यज्ञऽसाधं विशः आरीः आहुतं ऋंजसानम् ॥

ऊर्जः पुत्रं भरतं सृप्र*दानुं देवाः अग्निं धारयन् द्रविणःऽदाम् ॥ ३ ॥

सामर्थ्याचा पुत्र, विश्वाचें भरण करणारा, व दानकर्मांत अत्यंत उदार अशा ह्या यज्ञसिद्धिदायक अग्नीस श्रद्धावान लोकांनी सर्वांचे अगोदर आमंत्रण करून व सर्वांचे अगोदर भूषणांनी सजवून स्तुतींनी संतुष्ट केले. ह्या वैभदायक अग्नीचा सर्व देवांनी आश्रय केला आहे. ॥ ३ ॥

स मातरिश्वा पुरुवारपुष्टिर्विदद्गातुं तनयाय स्वर्वित् ॥

विशां गोपा जनिता रोदस्योर्देवा अग्निं धारयन्द्रविणोदाम् ॥ ४ ॥

सः मातरिश्वा पुरुवारऽपुष्टिः विदत् गातुं तनयाय स्वःऽवित् ॥

विशां गोपा जनिता रोदस्योः देवाः अग्निं धारयन् द्रविणःऽदाम् ॥ ४ ॥

सर्व मानवाचा संरक्षणकर्ता, द्युलोक आणि भूलोक ह्यांचा उत्पादक, स्वर्गाची प्राप्ति करून देणारा व असंख्य वैभवें जवळ बाळगणारा असा जो हा मातरिष्वा त्यानें आपल्या अपत्यांकरितां उत्तम नीति मार्ग शोधून काढला व म्हणूनच ह्या वैभवदायक अग्नीचा सर्व देवांनी आश्रय केला आहे. ॥ ४ ॥

नक्तोषासा वर्णमामेम्याने धापयेते शिशुमेकं समीची ॥

द्यावाक्षामा रुक्मो अन्तर्वि भाति देवा अग्निं धारयन्द्रविणोदाम् ॥ ५ ॥

नक्तोषासा वर्णं आमेम्याने धापयेते शिशुं एकं समीची ॥

द्यावाक्षामा रुक्मः अंतर्वि भाति देवा अग्निं धारयन् द्रविणःऽदाम् ॥ ५ ॥

नेहमी आपली अंगकांति बदलणाऱ्या अशा रात्र व उषा एकत्र जमून ह्या एकाच बालकास दुग्धपान करवितात. सुवर्णाप्रमाणे शोभणारा हा देव द्युलोक व भूलोक ह्या दोन्ही लोकांत आपली प्रभा पसरवितो. ह्या वैभवदायक अग्नीचा सर्व देवांनी आश्रय केला आहे. ॥ ५ ॥

रा॒यो बु॒ध्नः सं॒गम॑नो॒ वसू॑नां य॒ज्ञस्य॑ के॒तुर्म॑न्म॒साध॑नो॒ वेः ॥

अ॒मृ॒त॒त्वं रक्ष॑माणास एनं दे॒वा अ॒ग्निं धा॑रयन्द्रविणो॒दाम् ॥ ६ ॥

रायः बुध्नः संऽगमनः वसूनां यज्ञस्य केतुः मन्मऽसाधनः वेः ॥

अमृतऽत्वं रक्षमाणासः एनं देवाः अग्निं धारयन् द्रविणःऽदाम् ॥ ६ ॥

हा संपत्तीचें मूल भांडार, धनाची प्राप्ति करून देणारा, यज्ञाची ध्वजा व याचकाचें इच्छित पुरविणारा आहे. आपले अमरत्व कायम राहण्याकरितां प्रयत्न करणाऱ्या देवांनी ह्या वैभवदायक अग्नीचा आश्रय केला आहे. ॥ ६ ॥

नू च॑ पु॒रा च॒ सद॑नं रयी॒णां जा॒तस्य॑ च॒ जाय॑मानस्य च॒ क्षाम् ॥

स॒तश्च॑ गो॒पां भव॑तश्च॒ भूरे॑र्दे॒वा अ॒ग्निं धा॑रयन्द्रविणो॒दाम् ॥ ७ ॥

नु च पुरा च सदनं रयीणां जातस्य च जायमानस्य च क्षाम् ॥

सतः च गोपां भवतः च भूरेः देवा अग्निं धारयन् द्रविणःऽदाम् ॥ ७ ॥

जो आतां व पूर्वींही वैभवाचें मंदिरच होता, आजपर्यंत जन्म पावलेल्या व जन्मास येत असलेल्या सर्व जीवांचे जो आनंद स्थान आहे, व जे अनेक जीव आतां अस्तित्वांत आहेत अथवा पुढें अस्तित्वांत येणार आहेत त्यांचा जो संरक्षणकर्ता आहे त्या वैभवदायक अग्नीचा सर्व देवांनी आश्रय केला आहे. ॥ ७ ॥

द्रविणोदा द्रविणसस्तुरस्य द्रविणोदाः सनरस्य प्र यंसत् ॥

द्रविणोदा वीरवतीमिषं नो द्रविणोदा रासते दीर्घमायुः ॥ ८ ॥

द्रविणःऽदा द्रविणसः तुरस्य द्रविणःऽदाः सनरस्य प्र यंसत् ॥

द्रविणःऽदा वीरवतीं इषं नः द्रविणःऽदा रासते दीर्घं आयुः ॥ ८ ॥

ह्या वैभवदायक देवानें, सत्वर वृद्धि पावणारी संपत्ति आम्हांस दिली आहे. त्यानें वीर पुरुषांनी युक्त अशी संपत्ति आम्हांस दिली आहे. त्यानें वीर्यशाली संततीसह आमच्या पोषणास अगदीं पुरेसें होईल इतकें द्रव्य आम्हांस दिलें आहे. हा वैभवदायक देव आम्हांस दीर्घ आयुष्यही देत आहे. ॥ ८ ॥

एवा नो अग्ने समिधा वृधानो रेवत्पावक श्रवसे वि भाहि ॥

तन्नो॑ मि॒त्रो वरु॑णो मामहन्ता॒मदि॑तिः॒ सिंधुः᳚ पृथि॒वी उ॒त द्‌यौः ॥ ९ ॥

एव नः अग्ने संऽइधा वृधानः रेवत् पावकः श्रवसे वि भाहि ॥

तन् नः मित्रः वरुणः मामहंतां अदितिः सिंधुः पृथिवी उत द्‌यौः ॥ ९ ॥

हे अग्निदेवा, आम्ही अर्पण केलेल्या इंधनामुळें अशा रीतीनें वृद्धिंगत होऊन, हे सर्वांस पावन करणाऱ्या देवा, तूं आपला प्रकाश सर्वत्र पाड व आम्हांस धन देऊन उत्तम कीर्ति मिळव. ह्या आमच्या विनंतीस मित्र व वरुण व त्याचप्रमाणें अदिति, सिंदु, पृथिवी व द्‌युलोक ह्यांचेही अनुमोदन असो. ॥ ९ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त ९७ (अग्नि सूक्त)

ऋषि - कुत्स अंगिरस : देवता - अग्नि : छंद - गायत्री

अप॑ नः॒ शोशु॑चद॒घमग्ने॑ शुशु॒ग्ध्या र॒यिम् ॥ अप॑ नः॒ शोशु॑चद॒घम् ॥ १ ॥

अप नः शोशुचत् अघं अग्ने शुशुग्धि आ रयिम् ॥ अप नः शोशुचत् अघम् ॥ १ ॥

हा अग्नि प्रज्वलित होऊन आमचे पाप नाहींसे करो. हे अग्निदेवा, आमचेवर संपत्तीचा प्रकाश पाड. खरोखर हा अग्नि प्रज्वलित होऊन आमचें पाप नाहींसे करो. ॥ १ ॥

सु॒क्षे॒त्रि॒या सु॑गातु॒या व॑सू॒या च॑ यजामहे ॥ अप॑ नः॒ शोशु॑चद॒घम् ॥ २ ॥

सुऽक्षेत्रिया सुगातुऽया वसूऽया च यजामहे ॥ अप नः शोशुचत् अघम् ॥ २ ॥

सुस्थळीं राहणाऱ्या व सुमार्गांनी मिळविणाऱ्या संपत्तीची इच्छा धरून आम्ही ह्याचें अर्चन करीत आहोंत. हा अग्नि प्रज्वलित होऊन आमचें पाप नाहींसे करो. ॥ २ ॥

प्र यद्भन्दि॑ष्ठ एषां॒ प्रास्माका॑सश्च सू॒रयः॑ ॥ अप॑ नः॒ शोशु॑चद॒घम् ॥ ३ ॥

प्र यत् भंदिष्ठः एषां प्र अस्माकासः च सूरयः ॥ अप नः शोशुचत् अघम् ॥ ३ ॥

ह्या सर्वांत ज्या अर्थी हाच तुझा भक्त तुझें अतिशय स्तवन करीत आहे व त्याचप्रमणें आमच्या कुलांतील इतर विद्वान लोकही तुझ्या स्तुतींत अत्यंत निमग्न आहेत, त्या अर्थीं हा अग्नि प्रज्वलित होऊन आमचें पाप नाहींसे करो. ॥ ३ ॥

प्र यत्ते॑ अग्ने सू॒रयो॒ जाये॑महि॒ प्र ते॑ व॒यम् ॥ अप॑ नः॒ शोशु॑चद॒घम् ॥ ४ ॥

प्र यत् ते अग्ने सूरयः जायेमहि प्र ते वयम् ॥ अप नः शोशुचत् अघम् ॥ ४ ॥

हे अग्निदेवा, ज्या अर्थीं आम्हीं तुझे उपासक होऊन जन्मलों आहोंत - ज्या अर्थीं आम्ही तुझे आहोंत - त्या अर्थीं हा अग्नि प्रज्वलित होऊन आमचें पाप नाहींसे करो. ॥ ४ ॥

प्र यद॒ग्नेः सह॑स्वतो वि॒श्वतो॒ यन्ति॑ भा॒नवः॑ ॥ अप॑ नः॒ शोशु॑चद॒घम् ॥ ५ ॥

प्र यत् अग्नेः सहस्वतः विश्वतः यंति भानवः ॥ अप नः शोशुचत् अघम् ॥ ५ ॥

ज्या अर्थीं प्रबल अग्निचे रश्मि सर्वत्र प्रसरले आहेत त्या अर्थी हा अग्नि प्रज्वलित होऊन आमचे पाप नाहींसे करो. ॥ ५ ॥

त्वं हि वि॑श्वतोमुख वि॒श्वत॑ः परि॒भूरसि॑ ॥ अप॑ नः॒ शोशु॑चद॒घम् ॥ ६ ॥

त्वं हि विश्वतःऽमुख विश्वतः परिऽभूः असि ॥ अप नः शोशुचत् अघम् ॥ ६ ॥

चारी दिशांकडे ज्याचें सुंदर मुख दिसत असते अशा हे अग्निदेवा, खरोखर तूं सर्वत्र आहेस. हा अग्नि प्रज्वलित होऊन आमचे पाप नाहींसे करो. ॥ ६ ॥

द्विषो॑ नो विश्वतोमु॒खाति॑ ना॒वेव॑ पारय ॥ अप॑ नः॒ शोशु॑चद॒घम् ॥ ७ ॥

द्विषः नः विश्वतःऽमुख अति नावाऽइव पारय ॥ अप नः शोशुचत् अघम् ॥ ७ ॥

चारी दिशांकडे ज्याचें सुंदर मुख दिसत असतें अशा हे अग्निदेवा, नौकेंत बसवून नेल्याप्रमाणें आमच्या शत्रूंच्या पलिकडे आम्हांस घेऊन जा. हा अग्नि प्रज्वलित होऊन आमचे पाप नाहींसे करो. ॥ ७ ॥

स नः॒ सिंधु॑मिव ना॒वयाति॑ पर्षा स्व॒स्तये॑ ॥ अप॑ नः॒ शोशु॑चद॒घम् ॥ ८ ॥

सः नः सिंधुंऽइव नावया अति पर्षा स्वस्तये ॥ अप नः शोशुचत् अघम् ॥ ८ ॥

नौकेंत बसवून समुद्राच्या पार नेल्याप्रमाणें आमच्या स्वास्थ्याकरितां आम्हांस संकटांतून बचावून ने. हा अग्नि प्रज्वलित होऊन आमचे पाप नाहींसे करो. ॥ ८ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त ९८ (अग्नि सूक्त)

ऋषि - कुत्स अंगिरस : देवता - वैश्वानर अग्नि : छंद - त्रिष्टुभ्

वै॒श्वा॒न॒रस्य॑ सु॒म॒तौ स्या॑म॒ राजा॒ हि कं॒ भुव॑नानामभि॒श्रीः ॥

इ॒तो जा॒तो विश्व॑मि॒दं वि च॑ष्टे वैश्वान॒रो य॑तते॒ सूर्ये॑ण ॥ १ ॥

वैश्वानरस्य सुऽमतौ स्याम राजा हि कं भुवनानां अभिऽश्रीः ॥

इतः जातः विश्वं इदं वि चष्टे वैश्वानरः यतते सूर्येण ॥ १ ॥

अखिल मानवांविषयीं प्रेमबुद्धि बाळगणाऱ्या ह्या अग्नीच्या कृपादृष्टीखाली आम्हीं राहूं. हा राजा कोणाचे रक्षण करीत असतो बरें ? हा सर्व भुवनांचे भूषण आहे. येथेंच जन्म पावून हें सर्व विश्व तो अवलोकन करतो. अखिल मानवांविषयीं प्रेमबुद्धि बाळगणारा हा अग्नि सूर्याशीं स्पर्धा करीत असतो. ॥ १ ॥

पृष्टो दिवि पृष्टो अग्निः पृथिव्यां पृष्टो विश्वा ओषधीरा विवेश ॥

वैश्वानरः सहसा पृष्टो अग्निः स नो दिवा स रिषः पातु नक्तम् ॥ २ ॥

पृष्टः दिवि पृष्टः अग्निः पृथिव्यां पृष्टः विश्वाः ओषधीः आ विवेश ॥

वैश्वानरः सहसा पृष्टः अग्निः सः नः दिवा सः रिषः पातु नक्तम् ॥ २ ॥

द्युलोकांत ज्यास सर्व शोधीत असतात, व पृथ्वीवरही ज्याचा शोध करतात, अशा ह्या अग्नीनें सर्व ओषधींत प्रवेश केला. मानवाविषयीं प्रेमबुद्धि बाळगणाऱ्या ह्या अग्नीस, तो बलवान असल्यामुळेंच सर्व शोधीत असतात. तो अग्निदेव दिवसां व रात्रीं आमचें दुष्ट लोकांपासून संरक्षण करो. ॥ २ ॥

वैश्वानर तव तत्सत्यमस्त्वस्मान्रायो मघवानः सचन्ताम् ॥

तन्नो॑ मि॒त्रो वरु॑णो मामहन्ता॒मदि॑तिः॒ सिंधुः॑ पृथि॒वी उ॒त द्यौः ॥ ३ ॥

वैश्वानर तव तत् सत्यं अस्तु अस्मान् रायः मघऽवानः सचंताम् ॥

तन् नः मित्रः वरुणः मामहंतां अदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ॥ ३ ॥

सर्व मानवाविषयीं स्नेह बुद्धि बाळगणाऱ्या हे अग्निदेवा, तें तुझें सत्य निरंतर तुझे जवळ असो. विपुल संपत्ति आमचेकडे येऊन प्राप्त होवो. ह्या आमच्या प्रार्थनेस मित्र व वरुण आणि त्याचप्रमाणें अदिति, सिंदु, पृथिवी, व द्युलोक ह्यांचेही अनुमोदन असो. ॥ ३ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त ९९ (सूक्त)

ऋषि - कश्यप मारीच : देवता - अग्नि : छंद - त्रिष्टुभ्

जा॒तवे॑दसे सुनवाम॒ सोम॑मरातीय॒तो नि द॑हाति॒ वेदः॑ ॥

स नः॑ पर्ष॒दति॑ दु॒र्गाणि॒ विश्वा॑ ना॒वेव॒ सिंधुं॑ दुरि॒तात्य॒ग्निः ॥ १ ॥

जातऽवेदसे सुनवाम सोमं अरातिऽयतः नि दहाति वेदः ॥

सः नः पर्षत् अति दुःऽगाणि विश्वा नावाऽइव सिंधुं दुःऽइता अति अग्निः ॥ १ ॥

चला, ह्या सर्वज्ञ अग्नीच्या सन्मानार्थ आपण सोमरस काढून ठेवूं या. आमच्याविषयीं शत्रुत्व आचरणाऱ्या मनुष्यांचे धन हा दग्ध करून टाकतो. जहाजात बसवून समुद्राच्या पार नेल्याप्रमाणें हा अग्नि सर्व संकटें व दुरितें ह्यांतून आम्हांस निभावून नेवो. ॥ १ ॥

ऋग्वेद - मण्डल १ - सूक्त १०० (इंद्र सूक्त)

ऋषि - ऋज्राश्व वार्षागिर : देवता - इंद्र : छंद - त्रिष्टुभ्

स यो वृषा वृष्ण्येभिः समोका महो दिवः पृथिव्याश्च सम्राट् ॥

सतीनसत्वा हव्यो भरेषु मरुत्वान्नो भवत्विंद्र ऊती ॥ १ ॥

सः यः वृषा वृष्ण्येभिः संऽओका महः दिवः पृथिव्याः च संऽराट् ॥

सतीनऽसत्वा हव्यः भरेषु मरुत्वान् नः भवतु इंद्रः ऊती ॥ १ ॥

तो बलवान इंद्र - कीं जो दुसऱ्या अनेक वीर्यशाली देवतांसहवर्तमान वास करतो, जो ह्या विस्तीर्ण द्युलोकाचा व पृथ्वीचा अधिपती आहे, ज्याच्या बलाचें अस्तित्व खरोखर अनुभवास येण्याजोगें आहे व सोमरस सिद्ध झाल्याबरोबर जो हवींनी संतुष्ट करण्यास सर्वथैव योग्य आहे, तो इंद्र मरुतांसहवर्तमान, आमचें संरक्षण करण्याची इच्छा धारण करून येथें येवो. ॥ १ ॥

यस्यानाप्तः सूर्यस्येव यामो भरेभरे वृत्रहा शुष्मो अस्ति ॥

वृषन्तमः सखिभिः स्वेभिरेवैर्मरुत्वान्नो भवत्विंद्र ऊती ॥ २ ॥

यस्य अनाप्तः सूर्यस्यऽइव यामः भरेऽभरे वृत्रऽहा शुष्मः अस्ति ॥

वृषन्ऽतमः सखिऽभिः स्वेभिः एवैः मरुत्वान् नः भवतु इंद्र ऊती ॥ २ ॥

तो इंद्र, - कीं ज्याचा मार्ग सूर्याच्या मार्गाप्रमाणें अप्रतिहत आहे, जेव्हां जेव्हां सोमरस सिद्ध होतो तेव्हां तेव्हां ज्या वृत्रघातक इंद्राची पराक्रमाकडे प्रवृत्ति होते, व स्वमित्रांचे साहाय्य असल्यामुळें जो अत्यंत सामर्थ्यवान झालेला आहे - तो इंद्र, मरुतांसहवर्तमान, आमचें संरक्षण करण्याची इच्छा धारण करून आपली वाट चालत येथें प्राप्त होवो. ॥ २ ॥

दि॒वो न यस्य॒ रेत॑सो॒ दुघा॑नाः॒ पन्था॑सो॒ यन्ति॒ शव॒साप॑रीताः ॥

त॒रद्द्वे॑षाः सास॒हिः पौंस्ये॑भिर्म॒रुत्वा॑न्नो भव॒त्विंद्र॑ ऊ॒ती ॥ ३ ॥

दिवः न यस्य रेतसः दुघानाः पंथासः यंति शवसा अपरिऽइताः ॥

तरत्ऽद्वेषाः ससहिः पौंस्येभिः मरुत्वान् नः भवतु इंद्र ऊती ॥ ३ ॥

सामर्थ्यामुळे अप्रतिहत झालेले ज्याचे मार्ग, द्युलोकांतील उदकाचें जणूं कांही दोहनच करीत, पुढें सुरू असतात, जो आपल्या शत्रूंतून सहज निभावून निघून जातो व जो आपल्या पराक्रमांमुळें सर्वत्र विजयी झालेला आहे - तो इंद्र, मरुतांसहवर्तमान, आमचें संरक्षण करण्याची इच्छा धारण करून येथें येवो. ॥ ३ ॥

सो अङ्गि॑यरो॒भिरङ्गि॑॑रस्तमो भू॒द्वृषा॒ वृष॑भिः॒ सखि॑भिः॒ सखा॒ सन् ॥

ऋ॒ग्मिभि॑रृ॒ग्मी गा॒तुभि॒र्ज्येष्ठो॑ म॒रुत्वा॑न्नो भव॒त्विंद्र॑ ऊ॒ती ॥ ४ ॥

सः अङ्गिखरःऽभिः अङ्गिरःऽतमः भूत् वृषा वृषऽभिः सखिऽभिः सखा सन् ॥

ऋग्मिऽभिः ऋग्मी गातुऽभिः ज्येष्ठः मरुत्वान् नः भवतु इंद्रः ऊती ॥ ४ ॥

आपल्या मित्रांशी मित्र होऊन वागणारा व पराक्रमी पुरुषांत पराक्रमी म्हणून गाजणारा जो इंद्र, तो सर्व अंगिरसांतील श्रेष्ठ अंगिरस झाला. स्तवनार्ह देवतांत जो अत्यंत स्तवनार्ह ठरला आहे व स्तवनाच्या योगानें ज्याचें माहत्म्य प्रस्थापित झालें आहे असा तो इंद्र, मरुतांसहवर्तमान, आमचें संरक्षण करण्याची इच्छा धारण करून येथें येवो. ॥ ४ ॥

स सूनुभिर्न रुद्रेभिरृभ्वा नृषाह्ये सासह्वाँ अमित्रान् ॥

सनीळेभिः श्रवस्यानि तूर्वन्मरुत्वान्नो भवत्विंद्र ऊती ॥ ५ ॥

सः सूनुऽभिः न रुद्रेभिः ऋभ्वा नृऽसह्ये ससह्वान् अमित्रान् ॥

सऽनीळेभिः श्रवस्यानि तूर्वन् मरुत्वान् नः भवतु इंद्रः ऊती ॥ ५ ॥

युद्धांत आपल्या द्वेष्ट्यांस जिंकणारा हा इंद्र, जणूं कांही पुत्राच्याच साहाय्याप्रमाणें रुद्रांचे साहाय्य मिळाल्यामुळें अतिशय श्रेष्ठतेस चढला. आपल्या बरोबरच निवास करणारे जे देव त्यांच्यासह कीर्तिप्रद पराक्रम करीत हा इंद्र, मरुतांसहवर्तमान, आमचें संरक्षण करण्याची इच्छा धारण करून येथें येवो. ॥ ५ ॥

स मन्युमीः समदनस्य कर्तास्माकेभिर्नृभिः सूर्यं सनत् ॥

अस्मिन्नहन्सत्पतिः पुरुहूतो मरुत्वान्नो भवत्विंद्र ऊती ॥ ६ ॥

सः मन्युऽमीः सऽमदनस्य कर्ता अस्माकेभिः नृऽभिः सूर्यं सनत् ॥

अस्मिन् अहन् सत्ऽपतिः पुरुऽहूतः मरुत्वान् नः भवतु इंद्र ऊती ॥ ६ ॥

शत्रूच्या क्रोधाची धुंदी उतरविणाऱ्या व अनेक युद्धें करणाऱ्या हया इंद्रानें आमच्या शूर पुरुषांचे साहाय्य घेऊन सूर्याचा शोध लावला. ज्यास अनेक भक्तजन नेहमीं बोलावीत असतात व जो सज्जनांचा प्रतिपालक आहे असा तो इंद्र आज, मरुतांसहवर्तमान, आमचें संरक्षण करण्याची इच्छा धारण करून येथें येवो. ॥ ६ ॥

तमू॒तयो॑ रणय॒ञ्छूर॑साता॒ौ तं क्षेम॑स्य क्षि॒तय॑ः कृण्वत॒ त्राम् ॥

स विश्व॑स्य क॒रुण॑स्येश॒ एको॑ म॒रुत्वा॑न्नो भव॒त्विंद्र॑ ऊ॒ती ॥ ७ ॥

तं ऊतयः रणयन् शूरऽसातौ तं क्षेमस्य क्षितयः कृण्वत त्राम् ॥

सः विश्वस्य करुणस्य ईश एकः मरुत्वान् नः भवतु इंद्र ऊती ॥ ७ ॥

शूर लोक जेथें धनप्राप्त्यर्थ युद्ध करीत असतात अशा प्रसंगी त्यास त्याच्या स्वतःच्या सामर्थ्यानेंच उत्साह उत्पन्न केला. सर्व मनुष्यांनी हयासच आपल्या कल्याणाचा जबाबदार केले आहे. हया जगांतील अखिल

सत्कृत्यांचा हाच एकटा अधिपति आहे. हयास्तव हा इंद्र, मरुतांसहवर्तमान, आमचें संरक्षण करण्याची इच्छा धारण करून येथें येवो. ॥ ७ ॥

तम॑प्सन्त॒ शव॑स उत्स॒वेषु॒ नरो॒ नर॒मव॑से॒ तं धना॑य ॥

सो अ॒न्धे चि॒त्तम॑सि॒ ज्योति॑र्विदन्म॒रुत्वा॑न्नो भव॒त्विंद्र॑ ऊ॒ती ॥ ८ ॥

तं अप्संत शवसः उत्ऽसवेषु नरः नरं अवसे तं धनाय ॥

सः अंधे चित् तमसि ज्योतिः विदन् मरुत्वान् नः भवतु इंद्रः ऊती ॥ ८ ॥

आनंदोत्सवाचे समयीं त्यास नवीन स्फुरण चढत असे व स्वसंरक्षण व धनप्राप्ति हयांची इच्छा धरून शूर पुरुष हया पराक्रमी देवाचा आश्रय करीत असत. अत्यंत निबिड असा अंधकार पडला असतांही त्यांतून हयानें तेजाची प्राप्ति करून घेतली. हयास्तव हा इंद्र मरुतांसहवर्तमान, आमचें संरक्षण करण्याची इच्छा धारण करून येथें येवो. ॥ ८ ॥

स स॒व्येन॑ यमति॒ व्राध॑तश्चि॒त्स द॑क्षि॒णे संगृ॑भीता कृ॒तानि॑ ॥

स की॒रिणा॑ चि॒त्सनि॑ता॒ धना॑नि म॒रुत्वा॑न्नो भव॒त्विंद्र॑ ऊ॒ती ॥ ९ ॥

सः सव्येन यमति व्राधतः चित् सः दक्षिणे संऽगृभीता कृतानि ॥

सः कीरिणा चित् सनिता धनानि मरुत्वान् नः भवतु इंद्रः ऊती ॥ ९ ॥

आपल्या डाव्या हातानें बलिष्ठांचेही नियमन करतो आणि हरण केलेलें धन तो उजव्या हातांत धारण करतो. स्तवन करणाऱ्या उपासकानें विनविलें असतांही हा धनाची प्राप्ति करून घेतो. असा हा इंद्र, मरुतांसहवर्तमान, आमचें संरक्षण करण्याची इच्छा धारण करून येथें येवो. ॥ ९ ॥

स ग्रामे॑भिः॒ सनि॑ता॒ स रथे॑भिर्वि॒दे विश्वा॑भिः कृ॒ष्टिभि॒र्न्वद्य ॥

स पौंस्ये॑भिरभि॒भूरश॑स्तीर्म॒रुत्वा॑न्नो भव॒त्विंद्र॑ ऊ॒ती ॥ १० ॥

सः ग्रामेभिः सनिता सः रथेभिः विदे विश्वाभिः कृष्टिऽभिः नु अद्य ॥

सः पौंस्येभिः अभिऽभूः अशस्तीः मरुत्वान् नः भवतु इंद्रः ऊती ॥ १० ॥

सैनिकांच्या समुदायाच्या व रथांच्या योगानें हा धन जिंकून आणतो. सर्व मानवांस तो आज विदित झाला आहे. आपली स्तुति न करणाऱ्या दुष्टांचा तो आपल्या सामर्थ्यानें पराभव करतो. असा हा इंद्र, मरुतांसहवर्तमान, आमचें संरक्षण करण्याची इच्छा धारण करून येथें येवो. ॥ १० ॥

स जामिभिर्यत्समजाति मीळ्हेऽजामिभिर्वा पुरुहूत एवैः ॥

अपां तोकस्य तनयस्य जेषे मरुत्वान्नो भवत्विंद्र ऊती ॥ ११ ॥

सः जामिऽभिः यत् संऽअजाति मीळ्हे अजामिऽभिः वा पुरुऽहूत एवैः ॥

अपां तोकस्य तनयस्य जेषे मरुत्वान् नः भवतु इंद्रः ऊती ॥ ११ ॥

अनेक भक्तांनी ज्यास पाचारण केलें आहे असा हा इंद्र, आपले आप्त अथवा अनाप्त ह्यांनी बोलाविल्यावरून जेव्हां युद्धाकडे शीघ्र गतीनें गमन करतो तेव्हां, उदक, पुत्र, व पौत्र ह्यांची आम्हांस प्राप्ति करून देण्याकरितां तो मरुतांसहवर्तमान, आमचें संरक्षण करण्याची इच्छा धारण करून येथें येवो. ॥ ११ ॥

स वज्रभृद्दस्युहा भीम उग्रः सहस्रचेताः शतनीथ ऋभ्वा ॥

च॒म्री॒षो न शव॑सा॒ पाञ्च॑जन्यो म॒रुत्वा॑न्नो भव॒त्विंद्र॑ ऊ॒ती ॥ १२ ॥

सः वज्रऽभृत् दस्युऽहा भीमः उग्रः सहस्रऽचेताः शतऽनीथः ऋभ्वा ॥

चम्रीषः न शवसा पांचऽजन्यः मरुत्वान् नः भवतु इंद्रः ऊती ॥ १२ ॥

हा वज्र धारण करणारा आहे, हा शत्रूचा नाश करणारा आहे, हा भितीप्रद, उग्र, सहस्र प्रज्ञांनी युक्त, शतावधि सैनिकांचा नायक व सामर्थ्यवान आहे. उत्साहीपणांत हा सोमरसासारखा आहे व पांचही मानवसमाजांचा हा संरक्षणकर्ता आहे. हा इंद्र, मरुतांसहवर्तमान, आमचें संरक्षण करण्याची इच्छा धारण करून येथें येवो. ॥ १२ ॥

तस्य॒ वज्र॑ः क्रन्दति॒ स्मत्स्व॒र्षा दि॒वो न त्वे॒षो र॒वथ॒ः शिमी॑वान् ॥

तं स॑चन्ते स॒नय॒स्तं धना॑नि म॒रुत्वा॑न्नो भव॒त्विंद्र॑ ऊ॒ती ॥ १३ ॥

तस्य वज्रः क्रंदति स्मत् स्वःऽसाः दिवः न त्वेषः रवथः शिमीऽवान् ॥

तं सचंते सनयः तं धनानि मरुत्वान् नः भवतु इंद्रः ऊती ॥ १३ ॥

द्युलोकाच्या प्रबल व त्वेषाच्या गर्जनेप्रमाणें ह्याचें वज्र स्वर्गोलोकांसही गवसणी घालून जोरानें गर्जना करतें. अनेक प्रकारचे लाभ व संपत्ति त्याचेकडे चालत येत असतात. हा इंद्र, मरुतांसहवर्तमान, आमचें संरक्षण करण्याची इच्छा धारण करून येथें येवो. ॥ १३ ॥

यस्या॒जस्रं॒ शव॑सा॒ मान॑मु॒क्थं प॑रिभु॒जद्रोद॑सी वि॒श्वत॑ः सीम् ॥

स पा॑रिष॒त्क्रतु॑भिर्मन्दसा॒नो म॒रुत्वा॑न्नो भव॒त्विंद्र॑ ऊ॒ती ॥ १४ ॥

यस्य अजस्रं शवसा मानं उक्थं परिऽभुजत् रोदसी इति विश्वतः सीम् ॥

सः पारिषत् क्रतुऽभिः मंदसानः मरुत्वान् नः भवतु इंद्रः ऊती ॥ १४ ॥

ज्याच्या सामर्थ्यामुळें त्याचे माहात्म व कीर्ति हीं द्युलोक व भूलोक ह्यांना सर्वत्र व सतत वेष्टून टाकतात तो इंद्र, आमच्या अर्चनांनी संतुष्ट होऊन आम्हांस संकटांतून पलिकडे घेऊन जावो. हा इंद्र, मरुतांसहवर्तमान, आमचें संरक्षण करण्याची इच्छा धारण करून येथें येवो. ॥ १४ ॥

न यस्य॑ दे॒वा दे॒वता॒ न मर्ता॒ आप॑श्च॒न शव॑सो॒ अन्त॑मा॒पुः ॥

स प्ररिक्वा त्वक्षंसा क्ष्मो दिवश्चं मरुत्वांन्नो भवत्विंद्रं ऊती ॥ १५ ॥

न यस्य देवाः देवता न मर्ताः आपः चन शवसः अंतं आपुः ॥

सः प्रऽरिक्वा त्वक्षसा क्ष्मः दिवः च मरुत्वान् नः भवतु इंद्र ऊती ॥ १५ ॥

ज्याच्या सामर्थ्याचा अंत, देव, देवता, मर्त्य, अथवा उदकें ह्यांपैकी कोणासही लागला नाहीं तो इंद्र, आपल्या बलानें द्युलोक व भूलोक ह्यांचे आक्रमण करणारा तो इंद्र, मरुतांसहवर्तमान, आमचें संरक्षण करण्याची इच्छा धारण करून येथें येवो. ॥ १५ ॥

रोहिच्छ्यावा सुमदंशुर्ललामीर्द्युक्षा राय ऋज्राश्वंस्य ॥

वृषंण्वन्तं बिभ्रंती धूर्षु रथं मन्द्रा चिंकेत नाहुंषीषु विक्षु ॥ १६ ॥

रोहित् श्यावा सुमत्ऽअंशुः ललामीः द्युक्षा राये ऋज्रऽअश्वस्य ॥

वृषण्ऽवंतं बिभ्रती धूःऽसु रथं मंद्रा चिकेत नाहुषीषु विक्षु ॥ १६ ॥

हा समर्थ्यवान देव आपल्या रथांत विराजमान झाला असतांना त्याच्या रथाचें जूं वाहून नेणारी किंचित् रक्तवर्ण व किंचित् श्यामवर्ण अशी त्याची द्युलोकांत निवास करणारी देदीप्यमान व सुंदर तुरगी ऋज्राश्वास संपत्ति अर्पण करण्याकरितां मानवसमुदायांतून आनंदानें येत असतांना दिसत आहे. ॥ १६ ॥

एतत्त्यत्त इंद्र वृष्ण उक्थं वार्षागिरा अभि गृणन्ति राधः ॥

ऋज्राश्वः प्रष्टिभिरम्बरीषः सहदेवो भयमानः सुराधाः ॥ १७ ॥

एतत् त्यत् ते इंद्र वृष्ण उक्थं वार्षागिराः अभि गृणंति राधः ॥

ऋज्रऽअश्वः प्रष्टिऽभिः अम्बरीषः सहऽदेवः भयमानः सुऽराधाः ॥ १७ ॥

हे इंद्रा, ऋज्राश्व, अम्बरीष, सहदेव, भयमान आणि सुराधा हे वृषागिराचे पुत्र आपआपल्या मित्रगणांसह, सामर्थ्यवान असा जो तूं, त्या तुझ्या सन्मानार्थ हें तुझें आनंददायक स्तोत्र गात आहे. ॥ १७ ॥

दस्यूञ्छिम्यूंश्च पुरुहूत एवैर्हत्वा पृथिव्यां शर्वा नि बर्हीत् ॥

सनत्क्षेत्रं सखिभिः श्वित्न्येभिः सनत्सूर्यं सनदपः सुवज्रः ॥ १८ ॥

दस्यून् शिम्यून् च पुरुऽहूतः एवैः हत्वा पृथिव्यां शर्वा नि बर्हीत् ॥

सनत् क्षेत्रं सखिऽभिः श्वित्न्यैभिः सनत् सूर्यं सनत् अपः सुऽवज्रः ॥ १८ ॥

ज्याचा अनेक भक्तजन धांवा करीत असतात अशा त्या इंद्रानें पृथ्वीवर दुष्ट लोक व पीडा देणारे शत्रु ह्यांचे क्रमाक्रमानें हनन करून टाकलें. त्या वज्रधारी देवानें आपल्या तेजस्वी मित्रांच्या साहाय्यानें भूमीची प्राप्ति करून घेतली, सूर्याचा शोध लावला, व उदकांस उपलब्ध केलें. ॥ १८ ॥

विश्वाहेन्द्रो अधिवक्ता नो अस्त्वपरिह्वृताः सनुयाम वाजम् ॥

तन्नो मित्रो वरुणो मामहन्तामदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ॥ १९ ॥

विश्वाहा इंद्रः अधिऽवक्ता नः अस्तु अपरिऽह्वृताः सनुयाम वाजम् ॥

तन् नः मित्रः वरुणः मामहंतां अदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ॥ १९ ॥

इंद्र आम्हांस नेहमीं मंगल आशीर्वचनें देणारा असो. ह्यायोगानें मार्गांत कोणतेंही विघ्न न येतां खरोखर आम्हांस सामर्थ्याची प्राप्ति होईल. ह्या आमच्या विनंतीस मित्र, वरुण, व त्याचप्रमाणें अदिति, सिंधु, पृथिवी व द्युलोक ह्यांचेंही अनुमोदन असो. ॥ १९ ॥

ॐ तत् सत्

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १०१

ऋषि : अंगिरसः कुत्स - देवता : इंद्र - छन्द : जगती त्रिष्टुभ्

प्र म॒न्दिने॑ पितु॒मद॑र्चता॒ वचो॒ यः कृ॒ष्णग॑र्भा नि॒रह॑न्नृ॒जिश्व॑ना ॥

अ॒व॒स्यवो॒ वृष॑णं॒ वज्र॑दक्षिणं म॒रुत्व॑न्तं स॒ख्याय॑ हवामहे ॥ १ ॥

प्र मंदिने पितुऽमत् अर्चता वचः यः कृष्णऽगर्भा निःऽअहन् ऋजिश्वना ॥

अवस्यवः वृषणं वज्रऽदक्षिणं मरुत्वंतं सख्याय हवामहे ॥ १ ॥

ज्याने ऋजिश्वा ह्याचे हातून, ज्यांची संतति कृष्णवर्ण, अशा लोकांचा वध करविला, त्या आनंददायक इंद्रास, हवीसह एक स्तोत्र अर्पण करा. त्यानें आमचें संरक्षण व्हावें ह्यासाठी, त्याच्या मित्रत्वाची इच्छा धरून, आम्ही त्या दक्षिण हस्तांत वज्र धारण करणाऱ्या पराक्रमी देवास मरुतासहवर्तमान निमंत्रण करतो. ॥ १ ॥

यो व्यंसं जाहृषाणेन मन्युना यः शंबरं यो अहन्पिप्रुमव्रतम् ॥

इंद्रो यः शुष्णमशुषं न्यावृणङ्मपरुत्वन्तं सख्याय हवामहे ॥ २ ॥

यः विऽअंसं जाहृषाणेन मन्युना यः शंबरं यः अहन् पिप्रुं अव्रतम् ॥

इंद्रः यः शुष्णं अशुषं नि आवृणक् मरुत्वंतं सख्याय हवामहे ॥ २ ॥

ज्याने क्रोधाच्या भरांत व्यंसाचा वध केला, ज्यानें शम्बराला मारले व ज्याने पिप्रूचेंही हनन केले, ज्याचा नाश करणें शक्य नव्हतें अशा शुष्णाचाही ज्यानें नायनाट केला त्या इंद्राच्या मित्रत्वाची इच्छा धरून आम्ही त्यास मरुतांसहवर्तमान निमंत्रण करतो. ॥ २ ॥

यस्य द्यावापृथिवी पौंस्यं महद्यस्य व्रते वरुणो यस्य सूर्यः ॥

यस्येन्द्र॑स्य॒ सिंध॑व॒ः सश्च॑ति व्र॒तं म॒रुत्व॑न्तं स॒ख्याय॑ हवामहे ॥ ३ ॥

यस्य द्यावापृथिवी इति पौंस्यं महत् यस्य व्रते वरुणः यस्य सूर्यः ॥

यस्य इंद्रस्य सिंधवः सश्चति व्रतं मरुत्वंतं सख्याय हवामहे ॥ ३ ॥

द्युलोक आणि पृथिवीलोक हा ज्याचा मोठा पराक्रम आहे, ज्याच्या आज्ञेंत वरुण राहत असतो, सूर्यही ज्याच्या आज्ञेंत आहे, ज्याच्या आज्ञेस सर्व नद्याही अनुसरतात, त्या इंद्रास, मित्रत्वाची इच्छा धरून, आम्ही मरुतांसहवर्तमान निमंत्रण करतो. ॥ ३ ॥

यो अश्वा॑नां॒ यो गवां॒ गोप॑तिर्व॒शी य आ॑रि॒तः कर्म॑णिकर्मणि स्थि॒रः ॥

वी॒ळोश्चि॒दिंद्रो॒ यो असु॑न्वतो व॒धो म॒रुत्व॑न्तं स॒ख्याय॑ हवामहे ॥ ४ ॥

यः अश्वानां यः गवां गोपऽतिः वशी यः आरितः कर्मणिऽकर्मणि स्थिरः ॥

वीळोः चित् इंद्रः यः असुन्वतः वधः मरुत्वंतं सख्याय हवामहे ॥ ४ ॥

जो अश्वांचा प्रभु आहे, जो धेनूंचाही प्रभु आहे, जो सर्वांना वश ठेवतो, जो सर्वत्र सन्मान पावलेला असून प्रत्येक कृत्यांत ज्याचें अस्तित्व निश्चयानें दृगोचर होतें, व हवि अर्पण न करणारा (अभक्त) कितीही प्रबल असला तरी त्याचा जो वध करतो त्या इंद्रास, त्याच्या मित्रत्वाची इच्छा धरून, आम्ही मरुतांसहवर्तमान निमंत्रण करतो. ॥ ४ ॥

यो विश्व॑स्य॒ जग॑तः प्राण॒तस्पति॒र्यो ब्र॒ह्मणे॑ प्रथ॒मो गा अवि॑दत् ॥

इंद्रो॒ यो दस्यूँ॒रध॑राँ अ॒वाति॑रन्म॒रुत्व॑न्तं स॒ख्याय॑ हवामहे ॥ ५ ॥

यः विश्वस्य जगतः प्राणतः पतिः यः ब्रह्मणे प्रथमः गा अविंदत् ॥

इंद्रः यः दस्यून् अधरान् अवऽआतिरत् मरुत्वंतं सख्याय हवामहे ॥ ५ ॥

सर्व प्राणिमात्रांचा जो प्रभु आहे, ज्यानें भक्तिशील उपासकाप्रित्यर्थ प्रथमतः धेनूची प्राप्ति करविली व ज्यानें दुष्ट लोकांना दूर खाली फेंकून दिलें त्या इंद्रास, त्याच्या मित्रत्वाची इच्छा धरून आम्ही मरुतांसहवर्तमान निमंत्रण करतो. ॥ ५ ॥

यः शू॑रे॑भि॒र्हव्यो॒ यश्च॑ भी॒रुभि॒र्यो धाव॑द्भि॒र्हू॒यते॒ यश्च॑ जि॒ग्युभिः॑ ॥

इंद्रं॒ यं विश्वा॒ भुव॑ना॒भि सं॑द॒धुर्म॒रुत्व॑न्तं स॒ख्याय॑ हवामहे ॥ ६ ॥

यः शूरेभिः हव्यः यः च भीरुभिः यः धावत्ऽभिः हूयते यः च जिग्युऽभिः ॥

इंद्रं यं विश्वा भुवना अभि संऽदधुः मरुत्वंतं सख्याय हवामहे ॥ ६ ॥

शूरांनी जो हांक मारण्यास योग्य आहे व भीरु जनांनींही जो हांक मारण्यास योग्य आहे, युद्धांतून पळ काढणारे ज्याचा धांवा करतात व युद्धांत विजयी झालेले पुरुषही ज्याचा धांवा करतात, सर्व जगानेंही ज्या इंद्राच्या संगतीची इच्छा धरलेली आहे त्या इंद्रास, त्याचे मित्रत्व प्राप्त होण्याकरतां, आम्ही मरुतांसहवर्तमान निमंत्रण करतो. ॥ ६ ॥

रु॒द्राणा॑मेति प्र॒दिशा॑ विचक्ष॒णो रु॒द्रेभि॒र्योषा॑ तनुते पृ॒थु ज्रयः॑ ॥

इंद्रं॑ मनी॒षा अ॒भ्यर्चति श्रु॒तं म॒रुत्व॑न्तं स॒ख्याय॑ हवामहे ॥ ७ ॥

रुद्राणां एति प्रदिशा विऽचक्षणः रुद्रेभिः योषा तनुते पृथु ज्रयः ॥

इंद्रं मनीषा अभि अर्चति श्रुतं मरुत्वंतं सख्याय हवामहे ॥ ७ ॥

हा प्रज्ञावान इंद्र रुद्रांच्याच दिशेकडून येतो व ह्या रुद्रांचेसहवर्तमान ती युवतीही आपलें विशाल तेज पसरते. भक्तांची स्तोत्रें ह्या कीर्तिमान इंद्राचेंच अर्चन करीत असतात. आम्हींही त्याचेंच मित्रत्व प्राप्त होण्याकरितां त्यास मरुतांसहवर्तमान निमंत्रण करतो. ॥ ७ ॥

यद्वा॑ मरुत्वः पर॒मे स॒धस्थे॒ यद्वा॑व॒मे वृ॒जने॑ मा॒दया॑से ॥

अत॒ आ या॑ह्यध्व॒रं नो॒ अच्छा॑ त्वा॒या ह॒विश्च॑कृमा सत्यराधः ॥ ८ ॥

यत् वा मरुत्वः परमे सधःऽस्थे यत् वा अवमे वृजन मादयासे ॥

अतः आ याहि अध्वरं नः अच्छ त्वाऽया हविः चकृम सत्यऽराधः ॥ ८ ॥

मरुतांसहवर्तमान असणाऱ्या हे इंद्रा, सर्व देव एकत्र जमण्याच्या एखाद्या मोठ्या ठिकाणीं तूं आनंद करीत असलास अथवा एकाद्या क्षुद्र स्थलांतच तूं आनंदानें बसला असलास तरी तेथून ह्या आमच्या यज्ञाकडे आगमन कर. सत्यांत संतोष मानणाऱ्या हे देवा, तुझ्या प्रेमामुळे आम्ही हा हवि तयार केला आहे. ॥ ८ ॥

त्वायेन्द्र सोमं सुषुमा सुदक्ष त्वाया हविश्चकृमा ब्रह्मवाहः ॥

अधा नियुत्वः सगणो मरुद्भिरस्मिन्यज्ञे बर्हिषि मादयस्व ॥ ९ ॥

त्वायेन्द्र सोमं सुषुमा सुदक्ष त्वाया हविश्चकृमा ब्रह्मवाहः ॥

अधा नियुत्वः सगणः मरुद्भिचरस्मिन् यज्ञे बर्हिषि मादयस्व ॥ ९ ॥

हे वीर्यशाली इंद्रा, तुझ्याविषयी प्रेम बाळगून आम्ही सोमरस तयार केला, व हे स्तुतींचा स्वीकार करणाऱ्या देवा, तुझ्या प्रेमाने प्रेरित होऊनच आम्ही हविही सिद्ध केला. ह्यासाठी हे अश्वांवर आरूढ होणाऱ्या इंद्रा, तूं आपल्या गणांसह कुशासनावर विराजमान होऊन मरुतांचे बरोबर ह्या यज्ञांत आनंद कर. ॥ ९ ॥

मादयस्व हरिभिर्ये त इंद्र वि ष्यस्व शिप्रे वि सृजस्व धेने ॥

आ त्वा सुशिप्र हरयो वहन्तूशन्हव्यानि प्रति नो जुषस्व ॥ १० ॥

मादयस्व हरिभिर्ये त इंद्र वि ष्यस्व शिप्रे वि सृजस्व धेने ॥

आ त्वा सुशिप्र हरयः वहंतूशन् हव्यानि प्रति नः जुषस्व ॥ १० ॥

तुझे जे पीतवर्ण अश्व आहेत त्यांचेसह ह्या यज्ञांत आनंद कर. तूं आपले ओंठ उघड व आपल्या सुंदर मुखाचे दोन्ही भाग तूं हालवूं लाग. हे उत्तम मुकुटानें शोभणाऱ्या इंद्रा, तुला तुझे अश्व घेऊन येवोत. आमच्या हवींविषयी आवड बाळगून तूं त्यांचे सेवन कर. ॥ १० ॥

मरुत्स्तोत्रस्य वृजनस्य गोपा वयमिंद्रेण सनुयाम वाजम् ॥

तन्नो मित्रो वरुणो मामहन्तामदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ॥ ११ ॥

मरुत्स्तोत्रस्य वृजनस्य गोपा वयं इंद्रेण सनुयाम वाजम् ॥

तन् नः मित्रः वरुणः मामहंतां अदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ॥ ११ ॥

ज्या ठिकाणीं मरुतांची स्तुति चाललेली असते त्याचें संरक्षण करणारा हा इंद्रच होय. इंद्राच्याच कृपेमुळें आम्हांस सामर्थ्याचा लाभ करून घेतां येईल. ह्या आमच्या विनंतीस मित्र, वरुण व त्याचप्रमाणें अदिति, सिंधु, पृथिवी आणि द्युलोक हेही अनुमोदन देवोत. ॥ ११ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १०२ (इंद्र सूक्त)

ऋषि : अंगिरसः कुत्स - देवता : इंद्र - छन्द : जगती त्रिष्टुभ्

इ॒मां ते॒ धियं॒ प्र भ॑रे म॒हो म॒हीम॒स्य स्तो॒त्रे धि॒षणा॒ यत्त॑ आन॒जे ॥

तमु॑त्स॒वे च॑ प्रस॒वे च॑ सास॒हिमिंद्रं॑ दे॒वासः॒ शव॑सामद॒न्ननु॑ ॥ १ ॥

इमां ते धियं प्र भरे महः महीं अस्य स्तोत्रे धिषणा यत् ते आनजे ॥

तं उत्ऽसवे च प्रऽसवे च सासहिं इंद्रं देवासः शवसा अमदन् अनु ॥ १ ॥

हे इंद्रा ज्या अर्थीं तुझे मन ह्या स्तोत्रांत आसक्त झालेलें दिसतें त्या अर्थी हे उत्कृष्ट स्तोत्र तूं जो श्रेष्ठ देव त्या तुला मी अर्पण करतो. आनंदोत्सव प्रसंगी अथवा लाभसमयीं जो विजयीच असतो त्या इंद्रास पाहून त्याच्या सामर्थ्यामुळें देवांना हर्ष झाला. ॥ १ ॥

अ॒स्य श्रवो॑ न॒द्यः॑ स॒प्त बि॑भ्रति॒ द्यावा॒क्षामा॑ पृथि॒वी द॑र्श॒तं वपुः॑ ॥

अ॒स्मे सू॑र्याचन्द्र॒मसा॑भि॒चक्षे॑ श्र॒द्धे कमि॑न्द्र चरतो वितर्तु॒रम् ॥ २ ॥

अस्य श्रवः नद्यः सप्त बिभ्रति द्यावाक्षामा पृथिवी दर्शतं वपुः ॥

अस्मे इति सूर्याचंद्रमसा अभिऽचक्षे श्रद्धे कं इंद्र चरतः विऽतर्तुरम् ॥ २ ॥

ह्याची कीर्ति सप्त नद्या भरून नेतात व ह्याच्या सुंदर देहास स्वर्ग व भूमि हे दोन विशाल लोक धारण करतात. खरोखर, हे इंद्रा, तुझेवर आमची श्रद्धा बसावी म्हणूनच हे सूर्य आणि चंद्र, आम्हांस प्रकाश देण्याकरितां, एकमेकांची गांठ न पडूं देतां, संचार करीत असतात. ॥ २ ॥

तं स्मा रथं मघवन्प्राव सातये जैत्रं यं ते अनुमदाम संगमे ॥

आजा न इंद्र मनसा पुरुष्टुत त्वायद्भ्यो मघवञ्छर्म यच्छ नः ॥ ३ ॥

तं स्म रथं मघऽवन् प्र अव सातये जैत्रं यं ते अनुऽमदाम संऽगमे ॥

आजा नः इंद्र मनसा पुरुऽस्तुत त्वायत्ऽभ्यः मघऽवन् शर्म यच्छ नः ॥ ३ ॥

हे उदार इंद्रा, जो तुझा विजयी रथ प्राप्त झाला असतां आम्हांस आनंद होतो त्या रथाचें त्याच्या योगानें आम्हांस संपत्तीचा लाभ घडावा म्हणून तूं रक्षण कर. हे अनेक भक्तांनी स्तुति केलेल्या उदार इंद्रा, मनःपूर्वक तुजवर प्रेम करणाऱ्या आम्हांस युद्धांत सुरक्षितपणा अर्पण कर. ॥ ३ ॥

वयं जयेम त्वया युजा वृतमस्माकमंशमुदवा भरेभरे ॥

अस्मभ्यमिंद्र वरिवः सुगं कृधि प्र शत्रूणां मघवन्वृष्ण्या रुज ॥ ४ ॥

वयं जयेम त्वया युजा वृतं अस्माकं अंशं उत् अव भरेऽभरे ॥

अस्मभ्यं इंद्र वरिवः सुऽगं कृधि प्र शत्रूणां मघऽवन् वृष्ण्या रुज ॥ ४ ॥

तूं आम्हांस साहाय्यकर्ता असल्यावर आम्हांस अडविणाऱ्या शत्रूंस आम्ही खात्रीनें जिंकू. सोमरसाचा हवि तुला जेव्हां जेव्हां अर्पण होईल तेव्हां तेव्हां आमच्या पक्षाच्या रक्षणार्थ तूं उभा रहा. हे इंद्रा, आमचेसाठी सुलभ असें बचावाचें साधन निर्माण कर आणि हे उदार देवा शत्रूंच्या सामर्थ्यांचा पुरा मोड करून टाक. ॥ ४ ॥

नाना॒ हि त्वा॒ हव॑माना॒ जना॑ इ॒मे धना॑नां धर्त॒रव॑सा विप॒न्यव॑ः ॥

अ॒स्माकं॑ स्मा॒ रथ॒मा ति॑ष्ठ सा॒तये॒ जैत्रं॒ हीन्द्र॒ निभृं॑त॒म् मन॒स्तव॑ ॥ ५ ॥

नाना हि त्वा हवमानाः जनाः इमे धनानां धर्तः अवसा विपन्यवः ॥

अस्माकं स्म रथं आ तिष्ठ सातये जैत्रं हि इंद्र निऽभृतं मनः तव ॥ ५ ॥

संपत्तीस धारण करणाऱ्या हे इंद्रा, तुझ्या कृपाकटाक्षाची हांव धरून तुझें स्तवन व पूजन करणारे हे जन नानाविध आहेत. परंतु तूं केवल आम्हांसच लाभ प्राप्त करून देण्याच्या इच्छेनें रथांत आरूढ हो. हे इंद्रा, तुझी मनःप्रवृत्ति खरोखर अतिशय विजयशाली असते. ॥ ५ ॥

गो॒जिता॑ बा॒हू अमि॑तक्रतुः सि॒मः कर्म॑न्कर्मञ्छ॒तमू॑तिः खजङ्क॒रः ॥

अ॒क॒ल्प इंद्र॑ः प्रति॒माननमोज॒साथा॒ जना॒ वि ह्व॑यन्ते सिषा॒सव॑ः ॥ ६ ॥

गोऽजिता बाहू इति अमितऽक्रतुः सिमः कर्मन्ऽकर्मन् शतम्ऽऊतिः खजंऽकरः ॥

अकल्पः इंद्रः प्रतिऽमानं ओजसा अथ जनाः वि ह्वयंते सिसासवः ॥ ६ ॥

त्याचे बाहू गोधन जिंकून आणतात. त्याच्या बुद्धिसामर्थ्यास सीमा नाही. तो श्रेष्ठ आहे. प्रत्येक कृत्यांत तो शेंकडो रीतीनें साहाय्य करण्यास समर्थ आहे. तो युद्ध करण्यांत निपुण आहे. ह्या इंद्राची कोणाला कल्पना करता यावयाची नाही. ह्याच्या अद्वितीय सामर्थ्यामुळें तो प्रमाणच होऊन बसला आहे. त्यांत त्याची सेवा करणारे लोक त्यास अनेक तऱ्हेनें हांक मारतात. ॥ ६ ॥

उत्ते॑ श॒तान्म॑घव॒न्नुच्च॒ भूय॑स॒ उत्स॒हस्रा॑द्रिरिचे कृ॒ष्टिषु॒ श्रव॑ः ॥

अ॒मा॒त्रं त्वा॑ धि॒षणा॑ तित्विषे म॒ह्यधा॑ वृ॒त्राणि॑ जिघ्नसे पुरंदर ॥ ७ ॥

उत् ते शतान् मघऽवन् उत् च भूयसः उत् सहस्रात् रिरिचे कृष्टिषु श्रवः ॥

अमात्रं त्वा धिषणा तित्विषे मही अध वृत्राणि जिघ्नसे पुरंऽदर ॥ ७ ॥

मानवांमध्यें तुझे पसरलेले यश शेंकडो लोकांपेक्षां - शेंकड्याहूनही जास्ती लोकांपेक्षां - सहस्रावधि लोकांपेक्षां - जास्त आहे. ज्याच्या सामर्थ्याचें मापन कधींही करतां यावयाचे नाही अशा तुला आमच्या उत्कृष्ट स्तुतींनी प्रोत्साहन दिले आणि म्हणूनच शत्रूंच्या पुरांचा विध्वंस करणाऱ्या हे देवा तूं राक्षसांचा नाश करण्यास समर्थ होतोस. ॥ ७ ॥

त्रिविष्टिधातु प्रतिमानमोजसस्तिस्रो भूमीर्नृपते त्रीणि रोचना ॥

अतीदं विश्वं भुवनं ववक्षिथाशत्रुरिंद्र जनुषा सनादसि ॥ ८ ॥

त्रिविष्टिऽधातु प्रतिऽमानं ओजसाः तिस्रः भूमीः नृऽपते त्रीणि रोचना ॥

अति इदं विश्वं भुवनं ववक्षिथ अशत्रुः इंद्र जनुषा सनात् असि ॥ ८ ॥

आम्हां मानवांचे प्रभो, तीन भूलोक अथवा तीन देदीप्यमान प्रदेश (स्वर्गलोक) असे तुझा सामर्थ्याचे त्रिगुणित प्रमाण आहे. ह्या अखिल भुवनांपेक्षाही तूं जास्त मोठा झाला आहेस. हे इंद्रा, फार प्राचीन काळापासून तुला जन्मतः कोणीच शत्रु नाहीं. ॥ ८ ॥

त्वां दे॒वेषु॑ प्रथ॒मं ह॑वामहे॒ त्वं ब॑भूथ॒ पृत॑नासु सास॒हिः ॥

सेमं नः॑ का॒रुमु॑पम॒न्युमु॒द्भिकद॒मिंद्रः॑ कृणोतु प्रस॒वे रथं॑ पु॒रः ॥ ९ ॥

त्वां देवेषु प्रथमं हवामहे त्वं बभूथ पृतनासु सासहिः ॥

सः इमं नः कारुं उपऽमन्युं उत्ऽभिदं इंद्रः कृणोतु प्रऽसवे रथं पुरः ॥ ९ ॥

देवामध्यें आम्ही प्रथम तुला हांक मारतो. युद्धांत तूंच विजय मिळविणारा निघालास. असा हा इंद्र ह्या स्तवन कर्त्यास बाणेदार व स्फुर्तिसंपन्न करो व आम्हांस संपत्तीचा लाभ व्हावा म्हणूनच तो आमचा रथ सर्वांच्यापुढें नेवो. ॥ ९ ॥

त्वं जिं॑गेथ॒ न धना॑ रुरोधि॒थार्भे॑ष्वा॒जा मं॑घवन्म॒हत्सु॑ च ॥

त्वामु॒ग्रमव॑से॒ सं शि॑शीम॒स्यथा॑ न इंद्र॒ हव॑नेषु चोदय ॥ १० ॥

त्वं जिगेथ न धना रुरोधिथ अर्भेषु आजा मघऽवन् महत्ऽसु च ॥

त्वां उग्रं अवसे सं शिशीमसि अथ नः इंद्र हवनेषु चोदय ॥ १० ॥

हे उदार देवा, लहान युद्धांत व मोठमोठ्या संग्रामांत तूं जय मिळवितोस, पण कधीही संपत्ति बळकावून बसत नाहीस. तूं उग्रच आहेस, तथापि आमच्या संरक्षणार्थ तूं सज्ज व्हावेंस म्हणून तुला आम्ही जास्त स्फुरण चढवितो. ह्यास्तव हे इंद्रा, आम्ही जेव्हां जेव्हां तुझे पूजन करूं त्या त्या वेळी आमचा उत्कर्ष करीत जा. ॥ १० ॥

वि॒श्वाहेन्द्रो᳚ अधिव॒क्ता नो᳚ अ॒स्त्वप॑रिह्वृताः सनुयाम॒ वाज॑म् ॥

तन्नो᳚ मि॒त्रो वरु॑णो मामहन्ता॒मदि॑तिः॒ सिंधुः॑ पृथि॒वी उ॒त द्‌यौः ॥ ११ ॥

विश्वाहा इन्द्रः अधिऽवक्ता नः अस्तु अपरिऽह्वृताः सनुयाम वाजम् ॥

तन् नः मित्रः वरुणः ममहंतां अदितिः सिंधुः पृथिवी उत द्‌यौः ॥ ११ ॥

इंद्र आम्हांस नेहमीं मंगल आशिर्वचनें देणारा असो. ह्या योगानें आमच्या मार्गांत कोणतेंही विघ्न न येतां खरोखर आम्हांस सामर्थ्याची प्राप्ति होईल. ह्या आमच्या विनंतीस मित्र, वरुण, व त्याचप्रमाणें अदिति, सिंधु, पृथिवी आणि द्‌युलोक हेही अनुमोदन देवोत. ॥ ११ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १०३ (इंद्र सूक्त)

ऋषि : अंगिरसः कुत्स - देवता : इंद्र - छन्द : जगती त्रिष्टुभ्

तत्त॑ इंद्रि॒यं प॑र॒मं प॑रा॒चैरधा॑रयन्त क॒वयः॑ पु॒रेदम् ॥

क्ष॒मेदम॒न्यद्दि॒व्य१◌॑न्यद॑स्य॒ समी॑ पृच्यते सम॒नेव॑ के॒तुः ॥ १ ॥

तत् त इंद्रियं परमं पराचैः अधारयंत कवयः पुरा इदम् ॥

क्ष्मा इदं अन्यत् दिवि अन्यत् अस्य सं ईं इति पृच्यते समनाऽइव केतुः ॥ १ ॥

येथें दृग्गोचर होणाऱ्या त्या तुझ्या श्रेष्ठ सामर्थ्याचा विद्वान लोकांनी प्राचीनकाली अति उच्च गौरव केला होता. तुझ्या शक्तीचा एक अंश पृथिवीवर दृष्टीस पडतो व एक अंश स्वर्गलोकीं अनुभवास येतो. आणि ज्यप्रमाणें युद्धकालीं लढाईचे एक निशाण दुसऱ्याजवळ जाऊन मिळते त्याप्रमाणें तुज्या शक्तीचे ते दोन्ही भाग तुझे ठायी एकत्र होतात. ॥ १ ॥

स धा॑रयत्पृथि॒वीं प॒प्रथ॑च्च॒ वज्रे॑ण ह॒त्वा निर॒पः स॑सर्ज ॥

अह॒न्नहि॒मभि॑नद्रौहि॒णं व्यह॒न्व्यंसं म॒घवा॒ शची॑भिः ॥ २ ॥

सः धारयत् पृथिवीं पप्रथत् च वज्रेण हत्वा निः अपः ससर्ज ॥

अहन् अहिं अभिनत् रौहिणं वि अहन् विऽअंसं मघऽवा शचीभिः ॥ २ ॥

त्यानें पृथिवीला धारण करून तिचा विस्तार केला, आणि आपल्या वज्रानें वृत्रास मारून त्यानें उदकांचा मार्ग मोकळा केला. त्या उदार देवानें अहीचा वध केला, त्यानें रोहिणाचा उच्छेद केला व त्यानें आपल्या सामर्थ्यानें कंसास मारलें. ॥ २ ॥

स जा॒तूभ॑र्मा श्र॒द्दधा॑न॒ ओज॒ः पुरो॑ विभि॒न्दन्न॑चर॒द्वि दासी॑ः ॥

वि॒द्वान्व॑ज्रि॒न्दस्य॑वे हे॒तिम॒स्यार्य॒ं सहो॑ वर्धया द्यु॒म्नमिं॑द्र ॥ ३ ॥

सः जातूऽभर्मा श्रत्ऽदधानः ओजः पुरः विऽभिंदन् अचरत् वि दासीः ॥

विद्वान् वज्रिन् दस्यवे हेतिं अस्य आर्यं सहः वर्धयः द्युम्नं इंद्र ॥ ३ ॥

आपलें वज्र व आपल्या सामर्थ्यावर विश्वास ठेवून त्याने दहा शत्रूंच्या पुरांचा विध्वंस करीत त्यांच्या सैन्यास पायाखाली तुडविलें. हे वज्रधर इंद्रा, तूं सर्व जाणत असल्यामुळें शत्रूंवर आपलें आयुध सोड व तुझ्यावर विश्वास टाकणाऱ्या भक्तांचे बल व वैभव वृद्धिंगत कर. ॥ ३ ॥

तदू॒चुषे॒ मानु॑षे॒मा यु॒गानि॑ की॒र्तेन्य॑ं म॒घवा॒ नाम॒ बिभ्र॑त् ॥

उपप्रयन्दस्युहत्याय वज्री यद्ध सूनुः श्रवसे नाम दधे ॥ ४ ॥

तत् ऊचुषे मानुषा इमा युगानि कीर्तेन्यं मघऽवा नाम बिभ्रत् ॥

उपऽप्रयन् दस्युऽहत्याय वज्री यत् ह सूनुः श्रवसे नाम दधे ॥ ४ ॥

वज्रधारी व उदार इंद्रानें दस्यूंचा वध करण्याकरितां त्यांचेवर चाल करून जात आतां आपली कीर्ति वाढवून जे नांव मिळविलें तेंच प्रशंसनीय नांव त्या औदार्यशील देवानें मानवी कालांतसुद्धां आपल्या भक्ताच्या हितासाठीं राखले आहे. ॥ ४ ॥

तदस्येदं पश्यता भूरि पुष्टं श्रदिंद्रस्य धत्तन वीर्याय ॥

स गा अविंदत्सो अविंदुदश्वान्त्स ओषधीः सो अपः स वनानि ॥ ५ ॥

तत् अस्य इदं पश्यत भूरि पुष्टं श्रत् इंद्रस्य धत्तन वीर्याय ॥

सः गा अविंदत् सः अविंदत् अश्वान् सः ओषधीः सः अपः सः वनानि ॥ ५ ॥

त्याचें तें विपुल व अतिशय वृद्धि पावलेले सामर्थ्य अवलोकन करा व त्या इंद्राच्या शक्तीवर विश्वास ठेवा. त्यानेंच धेनूंची प्राप्ति करून घेतली, अश्व मिळविले, औषधि संपादन केल्या, उदकें जिंकून आणली व अरण्यांचा ताबा घेतला. ॥ ५ ॥

भूरि॑कर्मणे वृष॒भाय॒ वृष्णे॑ स॒त्यशु॑ष्माय सुनवाम॒ सोम॑म् ॥

य आ॒दृत्या॑ परिप॒न्थीव॒ शूरोऽ॑यज्वनो वि॒भज॒न्नेति॒ वेदः॑ ॥ ६ ॥

भूरिऽकर्मणे वृषभाय वृष्णे सत्यऽशुष्माय सुनवाम सोमम् ॥

य आऽदृत्या परिपंथीऽइव शूरः अयज्वनः विऽभजन् एति वेदः ॥ ६ ॥

वाटेंत अडविणाऱ्या तस्कराप्रमाणें जो शूर अभक्तांचा प्रथम आदरसत्कार करून मागाहून त्याच्या संपत्तीचा भंग करीत इकडे आगमन करतो त्या अनेक पराक्रम करणाऱ्या, सामर्थ्यवान, बलशाली व सत्यशक्तियुक्त इंद्राकरितां आपण सोमरस तयार केला पाहिजे. ॥ ६ ॥

तदि॑न्द्र॒ प्रेव॑ वी॒र्यं॑ चकर्थ॒ यत्स॒सन्तं॒ वज्रे॒णाबो॑ध॒योऽ॑हिम् ॥

अनु॑ त्वा॒ पत्नी॑र्हृषि॒तं वय॑श्च॒ विश्वे॑ दे॒वासो॑ अमद॒न्ननु॑ त्वा ॥ ७ ॥

तत् इंद्र प्रऽइव वीर्यं चकर्थ यत् ससंतं वज्रेण अबोधयः अहिम् ॥

अनु त्वा पत्नीः हृषितं वयः च विश्वे देवासः अमदन् अनु त्वा ॥ ७ ॥

हे इंद्रा निद्रिस्त असलेल्या अहीस तूं वज्रानें जागें केलेंस हे तूं खरोखर जणूं काही अत्यन्त मोठेंच शूरत्वाचें कृत्य केलेंस. तूं आनंदित झाल्याबरोबर अखिल देवपत्नी, सर्व पक्षी, व सकल देव ह्यांनाही आनंद झाला ॥ ७ ॥

शुष्ण॒म् पिप्रुं॒ कुय॑वं वृ॒त्रमिं॑द्र य॒दाव॑धी॒र्वि पुर॒ः शम्ब॑रस्य ॥

तन्नो॑ मि॒त्रो वरु॑णो मामहन्ता॒मदि॑तिः॒ सिंधु॑ः पृथि॒वी उ॒त द्यौः ॥ ८ ॥

शुष्णं पिप्रुं कुयवं वृत्रं इंद्र यदा अवधीः वि पुरः शंबरस्य ॥

तत् नः मित्रः वरुणः ममहंतां अदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ॥ ८ ॥

हे इंद्रा, ज्या वेळी तूं शुष्ण, विप्रु, कुयव आणि वृत्र ह्यांचा वध केलास त्यावेळीं तूं शम्बराच्या पुराचाही विध्वंस केलास. ह्या आमच्या विनंतीस मित्र, वरुण व त्याचप्रमाणें अदिति, सिंधु, पृथिवी आणि द्युलोक ह्यांचेही अनुमोदन असो. ॥ ८ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १०४ (इंद्र सूक्त)

ऋषि : अंगिरसः कुत्स - देवता : इंद्र - छन्द : जगती त्रिष्टुभ्

योनि॑ष्ट इंद्र नि॒षदे॑ अकारि॒ तमा नि षी॑द स्वा॒नो नार्वा॑ ॥

वि॒मुच्या॒ वयो॑ऽव॒सायाश्वा॑न्दो॒षा वस्तो॒र्वही॑यसः प्रपि॒त्वे ॥ १ ॥

योनिः ते इंद्र निऽसदे अकारि तं आ नि सीद स्वानः न अर्वा ॥

विऽमुच्य वयः अवऽसाय अश्वान् दोषा वस्तोः वहीयसः प्रऽपित्वे ॥ १ ॥

हे इंद्रा, तूं विराजमान व्हावेंस म्हणून हें आसन सिद्ध केलें आहे. अश्व जसा आनंदानें खिंकाळू लागतो त्याप्रमाणें आनंदानें ह्याचा स्वीकार कर. पक्ष्यांप्रमाणें वेगवान असे आपले घोडे आतां सोड. तुला रात्र असो कीं दिवस असो, संतोषानें सोमपानार्थ वाहून घेऊन जाणाऱ्या तुझ्या अश्वांस तूं आतां मोकळे कर. ॥ १ ॥

ओ त्ये नर॒ इंद्र॑मू॒तये॑ गु॒र्नू चि॒त्तान्त्स॒द्यो अध्व॑नो जगम्यात् ॥

दे॒वासो॑ म॒न्युं दास॑स्य श्चम्न॒न्ते न॒ आ व॑क्षन्सुवि॒ताय॒ वर्ण॑म् ॥ २ ॥

ओ इति त्ये नरः इंद्रं ऊतये गुः नु चित् तान् सद्यः अध्वनः जगम्यात् ॥

देवासः मन्युं दासस्य श्चम्नन् ते नः आ वक्षन् सुविताय वर्णम् ॥ २ ॥

ते पुरुष आपलें संरक्षण व्हावें ह्या हेतूनें इंद्राकडे गेले. तोही त्यांच्याच मार्गाकडे जाणार नाहीं काय ? सर्व देव मिळून दुष्ट शत्रूचा राग शमवोत, आणि आमच्या वर्णाच्या लोकांस ते कल्याणाच्या मार्गाकडे घेऊन जावोत. ॥ २ ॥

अव॒ त्मना॑ भरते॒ केत॑वेदा॒ अव॒ त्मना॑ भरते॒ फेन॑मु॒दन् ॥

क्षी॒रेण॑ स्नात॒ः कुय॑वस्य॒ योषे॑ ह॒ते ते स्या॑तां प्रव॒णे शिफा॑याः ॥ ३ ॥

अव त्मना भरते केतऽवेदाः अव त्मना भरते फेनं उदन् ॥

क्षीरेण स्नातः कुयवस्य योषे इति हते इति ते इति स्यातां प्रवणे शिफायाः ॥ ३ ॥

दुसऱ्याच्या मनांतले जाणणाऱ्या त्या कपट्यानें पाण्यांत फेंस भरून ठेवला; त्या कुयवाच्या बायकामात्र दुधानें स्नान करतात. शिफेच्या भोवऱ्यांत त्या बुडून तरी जावोत. ॥ ३ ॥

यु॒योप॒ नाभि॒रुप॑रस्या॒योः प्र पूर्वा॑भिस्तिरते॒ राष्टि॒ शूर॑ः ॥

अ॒ञ्ज॒सी कु॑लि॒शी वी॒रप॑त्नी॒ पयो॑ हिन्वा॒ना उ॒दभि॑र्भरन्ते ॥ ४ ॥

युयोप नाभिः उपरस्य आयोः प्र पूर्वाभिः तिरते राष्टि शूरः ॥

अंजसी कुलिशी वीरऽपत्नी पयः हिन्वानाः उदऽभिः भरंते ॥ ४ ॥

आयु वर आकाशांत होता. त्याच्या नाभिस्थलानें सर्व दिसेनासें केले होतें. परंतु आपल्या पुरातन सामर्थ्यानें इंद्र त्यांतून सहज तरून गेला व त्याचेवर त्या शूरानें आपला अधिकार प्रस्थापित केला. त्या वीराच्या पत्नी ज्या अजंसी व कुलिशी त्यांनी उदकामध्यें गति उत्पन्न करून त्या आयूस पाण्याने भरून टाकले. ॥ ४ ॥

प्रति॒ यत्स्या नीथाद॑र्शि॒ दस्यो॒रोको॒ नाच्छा॒ सद॑नं जान॒ती गा॑त् ॥

अध॑ स्मा नो मघवञ्चर्कृ॒तादिन्मा नो॑ म॒घेव॑ निष्ष॒पी परा॑ दाः ॥ ५ ॥

प्रति यत् स्या नीथा अदर्शि दस्योः ओकः न अच्छा सदनं जानती गात् ॥

अध स्मा नः मघऽवन् चर्कृतात् इत् मा नः मघाऽइव निष्षपी परा दाः ॥ ५ ॥

ज्या अर्थी त्या दुष्ट राक्षसाचा मार्ग दृष्टीस पडूं लागला आहे व आपल्या घराची माहिती असणारी स्त्री ज्याप्रमाणें तिकडे जाते त्याप्रमाणें तो थेट तिकडे निघाला आहे, त्या अर्थी हे उदार देवा, आम्हांस अपाय होऊं देऊं नकोस व ज्याप्रमाणें एखादा विषयासक्त पुरुष आपली संपत्ति उडवून टाकतो त्याप्रमाणें आम्हांस टाकून देऊं नकोस. ॥ ५ ॥

स त्वं नं इंद्र सूर्ये सो अप्स्वनागास्त्व आ भंज जीवशंसे ॥

मान्तरां भुजमा रीरिषो नः श्रद्धिंतं ते महत इंद्रियायं ॥ ६ ॥

सः त्वं नः इंद्र सूर्ये सः अप्ऽसु अनागाःऽत्वे आ भज जीवऽशंसे ॥

मा अंतरां भुजं आ रीरिषः नः श्रद्धितं ते महते इंद्रियाय ॥ ६ ॥

हे इंद्रा, सूर्य, उदकें, निष्पापपणा व सर्व जीवांत प्रशंसनीय स्थिति हयांचा आम्हास लाभ व्हावा म्हणून तूं आमच्या जवळ अस. आम्ही अगदी आंत गांठ मारून ठेवलेल्या संपत्तीचा नाश तूं होऊं देऊं नकोस. प्रत्यक्ष शरीरबलच असा जो तूं श्रेष्ठ देव त्याचेवर आमचा विश्वास आहे. ॥ ६ ॥

अधां मन्ये श्रत्ते अस्मा अधायि वृषां चोदस्व महते धनांय ॥

मा नो अकृते पुरुहूत योनाविंद्र क्षुध्यंद्भ्यो वयं आसुतिं दाः ॥ ७ ॥

अध मन्ये श्रत् ते अस्मै अधायि वृषा चोदस्व महते धनाय ॥

मा नः अकृते पुरुऽहूत योनौ इंद्र क्षुध्यत्ऽभ्यः वयः आऽसुतिं दाः ॥ ७ ॥

हे इंद्रा माझी अशी मनःपूर्वक समजूत आहे कीं आम्हीं तुजवर विश्वास ठेवला आहे. तूं सामर्थ्यवान आहेस म्हणूनच तूं अतिशय संपत्तीकडे आमची प्रेरणा कर. अनेक भक्तांनी ज्यास पाचारण केलें आहे असे हे इंद्रदेवा, आम्हांस क्षुधा लागेल तेव्हां अन्न पाणी पुरवितांना आमचें घर बांधण्याचें तसेंच अपुरें ठेवून मात्र ते आम्हांस देऊं नकोस. ॥ ७ ॥

मा नो॑ वधीरिंद्र॒ मा परा॑ दा॒ मा नः॑ प्रि॒या भोज॑नानि॒ प्र मो॑षीः ॥

आ॒ण्डा मा नो॑ मघवञ्छक्र॒ निर्भे॒न्मा नः॒ पात्रा॑ भेत् स॒हजा॑नुषाणि ॥ ८ ॥

मा नः वधीः इंद्र मा परा दाः मा नः प्रिया भोजनानि प्र मोषीः ॥

आण्डा मा नः मघऽव शक्र निः भेत् मा नः पात्रा भेत् सहजानुषाणि ॥ ८ ॥

हे इंद्रा आमचा वध करूं नको, आम्हांस टाकूं नकोस; हे सामर्थ्यवान व उदार इंद्रा, गर्भांत असलेल्या आमच्या संततीचा नाश करूं नकोस - अनेक शिशूंनासुद्धां जी एकदम जन्म देतात अशी अंडी तूं फोडूं नकोस. ॥ ८ ॥

अ॒र्वाङ्ए॑हि॒ सोम॑कामं त्वाहुर॒यं सु॒तस्तस्य॑ पिबा॒ मदा॑य ॥

उ॒रु॒व्यचा॑ ज॒ठर॒ आ वृ॑षस्व पि॒तेव॑ नः शृणुहि हू॒यमा॑नः ॥ ९ ॥

अर्वाङ् आ इहि सोमऽकामं त्वा आहुः अयं सुतः तस्य पिब मदाय ॥

उरुऽव्यचाः जठरे आ वृषस्व पिताऽइव नः शृणुहि हूयमानः ॥ ९ ॥

इकडे ये. सोमाची तुला अत्यंत आवड आहे असे म्हणतात. म्हणून हा सोमरस येथें ओतला आहे तो पी व आनंदित हो. तूं अनेक स्थलें व्यापून टाकली आहेस. तूं हा सोमरस पोटांत घालून सामर्थ्यवान हो. जेव्हां आम्ही तुला हांक मारूं तेव्हां आमच्या पित्याप्रमाणें आमची हांक ऐक. ॥ ९ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १०५ (विश्वेदेव सूक्त)

ऋषि : अंगिरसः कुत्स - देवता : विश्वेदेव - छन्द : जगती त्रिष्टुभ्

चन्द्रमा अप्स्व१ऽन्तरा सुपर्णो धावते दिवि ।

न वो हिरण्यनेमयः पदं विंदन्ति विद्युतो वित्तं मे अस्य रोदसी ॥ १ ॥

चंद्रमा अप्ऽसु अंतः आ सुऽपर्णः धावते दिवि ॥

न वः हिरण्यऽनेमयः पदं विंदंति विऽद्युतः वित्तं मे अस्य रोदसी इति ॥ १ ॥

चंद्रमा जलांतून धांवत जात आहे व हा सुंदर पंखांचा पक्षी आकाशांत धांवत आहे. ज्यांचे पदर सोन्याचे आहेत अशा ह्या विजांना सुद्धां तुमचें स्थान कोणते तें नेमके माहीत नाहीं. हे द्युलोक व भूलोक हो, माझी प्रार्थना लक्षांत घ्या. ॥ १ ॥

अर्थमिद्वा उ अर्थिन आ जाया युवते पतिम् ।

तुञ्जाते वृष्ण्यं पयः परिदाय रसं दुहे वित्तं मे अस्य रोदसी ॥ २ ॥

अर्थं इत् वै ऊं इति अर्थिनः आ जाया युवते पतिम् ॥

तुंजाते इति वृष्ण्यं पयः परिऽदाय रसं दुहे वित्तं मे अस्य रोदसी इति ॥ २ ॥

आपल्या इष्टार्थाची इच्छा करणाऱ्या मनुष्यास इच्छित वस्तु प्राप्त होते, आणि भार्येस पतीची भेट होते. ती दोघें वीर्यसंपन्न अशा उदकास प्रेरणा करतात व तें परस्परांस देऊन त्यापैंकी प्रत्येकजण स्वतःस आनंद प्राप्त करून घेतो. हे द्युलोक व भूलोक हो, माझी प्रार्थना लक्षांत घ्या. ॥ २ ॥

मो षु दे॑वा अ॒दः स्व१॑र॑व॑ पादि दि॒वस्परि॑ ।

मा सो॒म्यस्य॑ श॒म्भुव॒ः शूने॑ भूम॒ कदा॑ च॒न वि॒त्तं मे॑ अ॒स्य रो॑दसी ॥ ३ ॥

मो इति सु देवाः अदः स्वः अव पादि दिवः परि ॥

मा सोम्यस्य शंऽभुवः शूने भूम कदा चन वित्तं मे अस्य रोदसी इति ॥ ३ ॥

हे देवहो, हे तेज स्वर्गापासून कधींही च्युत न होवो. आम्हांस हितकारी असा जो सोम तो जेथें नाही अशा ठिकाणी आम्ही कधींही नसावे. हे द्युलोक व भूलोक हो, माझी प्रार्थना लक्षांत घ्या. ॥ ३ ॥

य॒ज्ञं पृ॑च्छाम्यव॒मं स तद्दू॒तो वि वो॑चति ।

क्व ऋ॒तं पू॒र्व्यं ग॒तं कस्तद्बि॑भर्ति॒ नूत॑नो वि॒त्तं मे॑ अ॒स्य रो॑दसी ॥ ४ ॥

यज्ञं पृच्छामि अवमं सः तत् दूतः वि वोचति ॥

क्व ऋतं पूर्व्यं गतं कः तत् बिभर्ति नूतनः वित्तं मे अस्य रोदसी इति ॥ ४ ॥

मी सर्वांत शेवटच्या यज्ञांस एक प्रश्न विचारतो. तो सर्वांचा दूत असल्यामुळें त्याचें उत्तर देईल. तें पूर्वींचे सत्य कोठें नाहीसें झाले ? कोणत्या नवीन मनुष्याचे जवळ ते गेले आहे ? हे द्युलोक व भूलोक हो, माझी प्रार्थना लक्षांत घ्या. ॥ ४ ॥

अ॒मी ये दे॑वा॒ स्थन॑ त्रि॒ष्वा रो॑च॒ने दि॒वः ।

कद्व॑ ऋ॒तं कदनृ॑तं॒ क्व प्र॒त्ना व॒ आहु॑तिर्वि॒त्तं मे॑ अ॒स्य रौदसी ॥ ५ ॥

अमी इति ये देवाः स्थन त्रिषु आ रोचने दिवः ॥

कत् वः ऋतं कत् अनृतं क्व प्रत्ना वः आऽहुतिः वित्तं मे अस्य रोदसी इति ॥ ५ ॥

द्युलोकाच्या तिन्ही देदीप्यमान प्रदेशांत जे निवास करतात अशा हे देवांनो, तुमचें सत्य कोणतें, व तुमचें असत्य कोणतें ? तुम्हांस मी पूर्वी अर्पण केलेली आहुति कोठे गेली ? हे द्युलोक व भूलोक हो, माझी प्रार्थना लक्षांत घ्या. ॥ ५ ॥

कद्व॑ ऋ॒तस्य॑ धर्ण॒सि कद्वरु॑णस्य॒ चक्ष॑णम् ।

कद॑र्य॒म्णो म॒हस्प॒थाति॑ क्रामेम दू॒ढ्यो वि॒त्तं मे॑ अ॒स्य रौदसी ॥ ६ ॥

कत् व ऋतस्य धर्णसि कत् वरुणस्य चक्षणम् ॥

कत् अर्यम्णः महः पथा अति क्रामेम दुःऽध्यः वित्तं मे अस्य रोदसी इति ॥ ६ ॥

तुमचें सत्याचे परिपालन कोणते ? वरुणाची अमृत दृष्टि कोणती ? श्रेष्ठ अर्यमाच्या मार्गानें, आम्ही आमचें वाईट चिंतणाऱ्या लोकांना दाद न देतां, कसें पुढें जाऊं ? हे द्युलोक व भूलोक हो, माझी प्रार्थना लक्षांत घ्या. ॥ ६ ॥

अहं सो अस्मि यः पुरा सुते वदामि कानि चित् ।

तं मा व्यन्त्याध्यो३ वृको न तृष्णजं मृगं वित्तं मे अस्य रोदसी ॥ ७ ॥

अहं सः अस्मि यः पुरा सुते वदामि कानि चित् ॥

तं मा व्यंति आऽध्यः वृकः न तृष्णऽजं मृगं वित्तं मे अस्य रोदसी इति ॥ ७ ॥

जो मी पूर्वी सोमरस सिद्ध करून अनेक स्तोत्रें म्हणत होतो तोच मी होय, परंतु एखाद्या तृषित मृगाला ज्याप्रमाणें लांडगा खाऊन टाकतो त्याप्रमाणें आतां मला चिंता खाऊन टाकीत आहेत. हे द्युलोक व भूलोक हो, माझी प्रार्थना लक्षांत घ्या. ॥ ७ ॥

सं मा तपन्त्यभितः सपत्नीरिव पर्शवः ।

मूषो॒ न शि॒श्ना व्यदन्ति मा॒ध्य स्तो॒तारं॑ ते शतक्रतो वि॒त्तं मे॑ अ॒स्य रो॑दसी ॥ ८ ॥

सं मा तपंति अभितः सपत्नीःऽइव पर्शवः ॥

मूषः न शिश्ना वि अदंति मा आऽध्यः स्तोतारं ते शतक्रतो इति शतऽक्रतो वित्तं मे अस्य रोदसी इति ॥ ८ ॥

ज्याप्रमाणे सवती सवती जमल्या म्हणजे त्या दोन्हीकडून नवऱ्यास छळूं लागतात त्याप्रमाणे माझ्या कृश झालेल्या बरगड्या मला दोन्हींकडून टोंचीत आहेत. हे अत्यंत सामर्थ्यवान देवा, मी तुझी स्तुति गाणारा असून ज्याप्रमाणें उंदीर कोष्ठ्याच्या भागांतील दोरे खाऊन टाकतात त्याप्रमाणे मला चिंता खाऊन टाकीत आहेत. हे द्युलोक व भूलोक हो, माझी प्रार्थना लक्षांत घ्या. ॥ ८ ॥

अ॒मी ये स॒प्त र॒श्मय॒स्तत्रा॑ मे॒ नाभि॒रात॑ता ।

त्रि॒तस्तद्वे॑दा॒प्त्यः स जा॑मि॒त्वाय॑ रेभति वि॒त्तं मे॑ अ॒स्य रो॑दसी ॥ ९ ॥

अमी इति ये सप्त रश्मयः तत्र मे नाभिः आऽतता ॥

त्रितः तत् वेद आप्त्यः सः जामिऽत्वाय रेभति वित्तं मे अस्य रोदसी इति ॥ ९ ॥

हे जे सूर्याचे सात रंगाचें किरण पसरलेले आहेत त्यांच्याच खाली माझी नाभी उघडी पडली आहे. आप्त्य त्रिताला हें माहीत आहे व कोणी तरी त्यास मायाळु आप्त भेटावा म्हणून तो प्रार्थना करीत आहे. हे द्युलोक व भूलोक हो, माझी प्रार्थना लक्षांत घ्या. ॥ ९ ॥

अमी ये पञ्चोक्षणो मध्ये तस्थुर्महो दिवः ।

देवत्रा नु प्रवाच्यं सध्रीचीना नि वावृतुर्वित्तं मे अस्य रोदसी ॥ १० ॥

अमी इति ये पंच उक्षणः मध्ये तस्थुः महः दिवः ॥

देवऽत्रा नु प्रऽवाच्यं सध्रीचीनाः नि ववृतुः वित्तं मे अस्य रोदसी इति ॥ १० ॥

जे हे पांच प्रबल देव विस्तीर्ण द्युलोकाच्या मध्यभागी विराजमान झाले आहेत ते माझी स्तुति श्रवण करून देवांच्या समुदायातं परत गेले. हे द्युलोक व भूलोक हो, माझी प्रार्थना लक्षांत घ्या. ॥ १० ॥

सुपर्णा एत आसते मध्य आरोधने दिवः ।

ते सेधन्ति पथो वृकं तरन्तं यह्वतीरपो वित्तं मे अस्य रोदसी ॥ ११ ॥

सुऽपर्णाः एते आसते मध्ये आऽरोधने दिवः ॥

ते सेधंति पथः वृकं तरंतं यह्वतीः अपः वित्तं मे अस्य रोदसी इति ॥ ११ ॥

द्युलोकांच्या सीमांत प्रदेशावर हे सुंदर पंखांचे पक्षी विराजमान झालेले आहेत व ते ह्या विस्तीर्ण उदकामधूनही तरून जाणाऱ्या लांडग्यास हांकून लावीत आहेत. हे द्युलोक व भूलोक हो, माझी प्रार्थना लक्षांत घ्या. ॥ ११ ॥

नव्यं तदुक्थ्यं हितं देवासः सुप्रवाचनम् ।

ऋतमर्षन्ति सिंधवः सत्यं तातान सूर्यो वित्तं मे अस्य रोदसी ॥ १२ ॥

नव्यं तत् उक्थ्यं हितं देवासः सुऽप्रवाचनम् ॥

ऋतं अर्षंति सिंधवः सत्यं तताान सूर्यः वित्तं मे अस्य रोदसी इति ॥ १२ ॥

हे देवहो, प्रशंसनीय व भक्तांचे कल्याण करणारें असें तें उत्तम स्तोत्र अगदी नवे आहे. ह्या पहा महानद्या आपल्या प्रवाहाबरोबर देवांच्या नीतिनियमनांचा प्रसार करीत आहेत व सूर्यानें चोहोंकडे सत्य पसरलें आहे. हे द्युलोक व भूलोक हो, माझी प्रार्थना लक्षांत घ्या. ॥ १२ ॥

अग्ने॒ तव॒ त्यदु॒क्थ्यं दे॒वेष्व॒स्त्याप्य॑म् ।

स नः॑ स॒त्तो म॑नु॒ष्वदा दे॒वान्य॑क्षि वि॒दुष्ट॑रो वि॒त्तं मे॑ अ॒स्य रौ॑दसी ॥ १३ ॥

अग्ने तव त्यत् उक्थ्यं देवेषु अस्ति आप्यम् ॥

सः नः सत्तः मनुष्वत् आ देवान् यक्षि विदुःऽतरः वित्तं मे अस्य रोदसी इति ॥ १३ ॥

हे अग्निदेवा, तुझें देवांच्याबरोबर तें सर्वप्रसिद्ध नातें आहे, व त्याची सर्वत्र प्रशंसाही होत आहे. ह्यास्तव तूं जसा मनूच्या यज्ञांत विराजमान झाला होतास तसा येथें आमच्या करितां विराजमान हो, व अत्यंत प्रज्ञाशील असल्यामुळें तूं देवांना आमचा यज्ञ पोंचीव. हे द्युलोक व भूलोक हो, माझी प्रार्थना लक्षांत घ्या. ॥ १३ ॥

स॒त्तो होता॑ मनु॒ष्वदा दे॒वाँ अच्छा॑ वि॒दुष्ट॑रः ।

अ॒ग्निर्ह॒व्या सु॑षूदति दे॒वो दे॒वेषु॒ मेधि॑रो वि॒त्तं मे॑ अ॒स्य रौ॑दसी ॥ १४ ॥

सत्तः होता मनुष्वत् आ देवान् अच्छ विदुःऽतरः ॥

अग्निः हव्या सुसूदति देवः देवेषु मेधिरः वित्तं मे अस्य रोदसी इति ॥ १४ ॥

सर्व देवांत अत्यंत प्रज्ञाशील व बुद्धिमान असा हा अग्निदेव, मनूच्या यज्ञाप्रमाणें आमच्या यज्ञांत स्थित होऊन, आमचे हवि देवांकडे पोंचवितो. कारण हवि पोंचविण्याचें काम त्याचेंस आहे. हे द्युलोक व भूलोक हो, माझी प्रार्थना लक्षांत घ्या. ॥ १४ ॥

ब्रह्मा॑ कृणोति॒ वरु॑णो गातु॒विदं॒ तमी॑महे ।

व्यूर्णोति हृ॒दा म॒तिं नव्यौ जायतामृ॒तं वि॒त्तं मे॑ अ॒स्य रौ॑दसी ॥ १५ ॥

ब्रह्मा कृणोति वरुणः गातुऽविदं तं ईमहे ॥

वि ऊर्णोति हृदा मतिं नव्यः जायतां ऋतं वित्तं मे अस्य रोदसी इति ॥ १५ ॥

वरुण हाच स्तोत्र रचण्याची स्फूर्ति देतो, व म्हणून चांगला मार्ग कोणता ह्याचे ज्ञान असणाऱ्या त्या देवाची आम्ही प्रार्थना करतो. भक्तांचे हृदय व अंतःअकरण प्रकट व्हावयास तोच लावतो. खरोखर आज नीतीचा पुन्हां नवीन उदय होवो. हे द्युलोक व भूलोक हो, माझी प्रार्थना लक्षांत घ्या. ॥ १५ ॥

असौ यः पन्थां आदित्यो दिवि प्रवाच्यं कृतः ।

न स देवा अतिक्रमे तं मर्तासो न पश्यथ वित्तं मे अस्य रोदसी ॥ १६ ॥

असौ यः पंथा आदित्यः दिवि प्रऽवाच्यं कृतः ॥

न सः देवाः अतिऽक्रमे तं मर्तासः न पश्यथ वित्तं मे अस्य रोदसी इति ॥ १६ ॥

आदित्याचा जो हा आकाशांतील मार्ग सर्वांचे स्तुतीस पात्र होईल अशा रीतीनें तयार करण्यांत आलेला आहे त्याचें अतिक्रमण, हे देवहो, तुम्हांसही करतां आलें नाही व हे मर्त्यहो, तुमच्याही तो दृष्टीस पडत नाही. हे द्युलोक व भूलोक हो, माझी प्रार्थना लक्षांत घ्या. ॥ १६ ॥

त्रि॒तः कूपेऽव॑हितो दे॒वान्ह॑वत ऊ॒तये॑ ।

तच्छु॑श्राव॒ बृह॒स्पतिः॑ कृ॒ण्वन्न॑हूर॒णादु॒रु वि॒त्तं मे॑ अ॒स्य रो॑दसी ॥ १७ ॥

त्रितः कूपे अवऽहितः देवान् हवते ऊतये ॥

तत् शुश्राव बृहस्पतिः कृण्वन् अंहूरणात् उरु वित्तं मे अस्य रोदसी इति ॥ १७ ॥

त्रित विहीरींत पडला म्हणून आपल्या रक्षणाकरितां तो देवांना हांक मारीत आहे. बृहस्पतीने त्याचा संकटापासून बचाव करून त्याची ती हांक ऐकली. हे द्युलोक व भूलोक हो, माझी प्रार्थना लक्षांत घ्या. ॥ १७ ॥

अ॒रु॒णो मा॑ स॒कृद्वृकः॑ प॒था यन्तं॑ द॒दर्श॒ हि ।

उज्जि॑हीते नि॒चाय्या॒ तष्टे॑व पृष्ट्या॒म॒यी वि॒त्तं मे॑ अ॒स्य रो॑दसी ॥ १८ ॥

अरुणः मा सकृत् वृकः पथा यंतं ददर्श हि ॥

उत् जिहीते निऽचाय्य तष्टाऽइव पृष्टिऽआमयी वित्तं मे अस्य रोदसी इति ॥ १८ ॥

मी मार्गानें जात असतां मला एकदां एका लाल रंगाच्या लांडग्यानें पाहिलें. मग काम करून करून पाठींत कळ आलेल्या सुताराप्रमाणें तो हळू हळू उठला व माझेकडे चालूं लागला. हे द्युलोक व भूलोक हो, माझी प्रार्थना लक्षांत घ्या. ॥ १८ ॥

एनाङ्गूषेण वयमिंद्रवन्तोऽभि ष्याम वृजने सर्ववीराः ।

तन्नो मित्रो वरुणो मामहन्तामदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ॥ १९ ॥

एना आगूषेण वयं इंद्रऽवंतः अभि स्याम वृजने सर्वऽवीराः ॥

तत् नः मित्रः वरुणः ममहंतां अदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ॥ १९ ॥

ह्या स्तोत्राच्या योगानें इंद्राची कृपा संपादन करून आम्ही आपल्या पदरच्या सर्व योद्ध्यांसह, आपल्या संकटांतून सुरक्षितपणें पार पडूं. ह्या आमच्या प्रार्थनेस मित्र, वरुण व त्याचप्रमाणें अदिति, सिंधु, पृथिवी आणि द्युलोक ह्यांचेही अनुमोदन असो. ॥ १९ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १०६ (इंद्र सूक्त)

ऋषि : अंगिरसः कुत्स - देवता : इंद्र - छन्द : जगती त्रिष्टुभ्

इंद्रं॑ मि॒त्रं वरु॑णम॒ग्निमू॒तये॒ मारु॑तं॒ शर्धो॒ अदि॑तिं हवामहे ॥

रथं॒ न दु॒र्गाद्व॑सवः सुदानवो॒ विश्व॑स्मान्नो॒ अंह॑सो॒ निष्पि॑पर्तन ॥ १ ॥

इंद्रं मित्रं वरुणं अग्निं ऊतये मारुतं शर्धः अदितिं हवामहे ॥

रथं न दुःऽगात् वसवः सुऽदानवः विश्वस्मान् नः अंहसः निः पिपर्तन ॥ १ ॥

आम्ही आपल्या संरक्षणाकरितां इंद्र, मित्र, वरुण अग्नि, मरुद्‍गण व अदिति ह्यांना आमंत्रण करतो. प्रत्यक्ष वैभवच अशा ह्या उदार देवांनो, ज्याप्रमाणे एखाद्या गाडीस अडचणीच्या जागेंतून काढावें त्याप्रमाणें आम्हांस सर्व संकटांतून बाहेर काढा. ॥ १ ॥

त आ॑दित्या॒ आ ग॑ता स॒र्वता॑तये भू॒त दे॑वा वृत्र॒तूर्ये॑षु श॒म्भुवः॑ ॥

रथं॒ न दु॒र्गाद्व॑सवः सुदानवो॒ विश्व॑स्मान्नो॒ अंह॑सो॒ निष्पि॑पर्तन ॥ २ ॥

ते आदित्याः आ गत सर्वऽतातये भूत देवाः वृत्रऽतूर्येषु शम्ऽभुवः ॥

रथं न दुःऽगात् वसवः सुऽदानवः विश्वस्मान् नः अंहसः निः पिपर्तन ॥ २ ॥

हे देवहो, तुम्हां सर्वांस उद्देशून जो आम्ही यज्ञ करीत आहों तत्प्रित्यर्थ इकडे या. हे देवहो, दुष्टांचे हनन करून आमचें कल्याण करणारे व्हा. प्रत्यक्ष वैभवच अशा उदार देवांनो, ज्याप्रमाणे एखाद्या गाडीस अडचणीच्या जागेंतून काढावें त्याप्रमाणें आम्हांस सर्व संकटांतून बाहेर काढा. ॥ २ ॥

अव॑न्तु नः पि॒तरः॑ सुप्रवाच॒ना उ॒त दे॒वी दे॒वपु॑त्रे ऋता॒वृधा॑ ॥

रथं॒ न दु॒र्गाद्व॑सवः सुदानवो॒ विश्व॑स्मान्नो॒ अंह॑सो॒ निष्पि॑पर्तन ॥ ३ ॥

अवंतु नः पितरः सुऽप्रवाचनाः उत देवी इति देवऽपुत्रे ऋतऽवृधा ॥

रथं न दुःऽगात् वसवः सुऽदानवः विश्वस्मान् नः अंहसः निः पिपर्तन ॥ ३ ॥

स्तुति करण्यास सर्वथैव योग्य असे पितर आमचे संरक्षण करोत आणि नीतिनियमनांस उत्तेजन देणाऱ्या व देवांना जन्म देणाऱ्या दोघी देवीही आमचे संरक्षण करोत. प्रत्यक्ष वैभवच अशा उदार देवांनो, ज्याप्रमाणे एखाद्या गाडीस अडचणीच्या जागेंतून काढावें त्याप्रमाणें आम्हांस सर्व संकटांतून बाहेर काढा. ॥ ३ ॥

नरा॒शंसं॑ वा॒जिनं॑ वा॒जय॑न्नि॒ह क्ष॒यद्वी॑रं पू॒षणं॑ सु॒म्नैरी॑महे ॥

रथं॒ न दु॒र्गाद्व॑सवः सुदानवो॒ विश्व॑स्मान्नो॒ अंह॑सो॒ निष्पि॑पर्तन ॥ ४ ॥

नराशंसं वाजिनं वाजयन् इह क्षयत्ऽवीरं पूषणं सुम्नैः ईमहे ॥

रथं न दुःऽगात् वसवः सुऽदानवः विश्वस्मान् नः अंहसः निः पिपर्तन ॥ ४ ॥

सामर्थ्यवान नराशंसाचे येथें स्तवन करीत, ज्याचेजवळ वीरांचा निवास असतो अशा पूषादेवास, उत्तम उत्तम हवींनी आम्ही आळवीत आहों. प्रत्यक्ष वैभवच अशा उदार देवांनो, ज्याप्रमाणे एखाद्या गाडीस अडचणीच्या जागेंतून काढावें त्याप्रमाणें आम्हांस सर्व संकटांतून बाहेर काढा. ॥ ४ ॥

बृहस्पते सदमिन्नः सुगं कृधि शं योर्यत्ते मनुर्हितं तदीमहे ॥

रथं न दुर्गाद्वसवः सुदानवो विश्वस्मान्नो अंहसो निष्पिपर्तन ॥ ५ ॥

बृहस्पते सदं इत् नः सुऽगं कृधि शं योः यत् ते मनुःऽहितं तत् ईमहे ॥

रथं न दुःऽगात् वसवः सुऽदानवः विश्वस्मान् नः अंहसः निः पिपर्तन ॥ ५ ॥

हे बृहस्पतिदेवा, आम्हांकरितां सदोदित सर्व मार्ग सुलभ कर. मानवांस हितकारक असें जें कांही सौख्य तुला शरण येणाऱ्याकरितांच तूं राखून ठेवलेलें असशील त्याची आम्हीं तुझेपाशीं याचना करतो. प्रत्यक्ष वैभवच अशा उदार देवांनो, ज्याप्रमाणे एखाद्या गाडीस अडचणीच्या जागेंतून काढावें त्याप्रमाणें आम्हांस सर्व संकटांतून बाहेर काढा. ॥ ५ ॥

इंद्रं कुत्सो वृत्रहणं शचीपतिं काटे निबाळ्ह ऋषिरह्वदूतये ॥

रथं न दुर्गाद्वसवः सुदानवो विश्वस्मान्नो अंहसो निष्पिपर्तन ॥ ६ ॥

इंद्रं कुत्सः वृत्रऽहनं शचीऽऽपतिं काटे निऽबाळ्ह ऋषिः अह्वत् ऊतये ॥

रथं न दुःऽगात् वसवः सुऽदानवः विश्वस्मान् नः अंहसः निः पिपर्तन ॥ ६ ॥

कूपांत पडलेल्या कुत्स ऋषीनें, आपल्या रक्षणासाठी, वृत्राचा वध करणाऱ्या सामर्थ्यवान इंद्राचा धावा केला. प्रत्यक्ष वैभवच अशा उदार देवांनो, ज्याप्रमाणे एखाद्या गाडीस अडचणीच्या जागेंतून काढावें त्याप्रमाणें आम्हांस सर्व संकटांतून बाहेर काढा. ॥ ६ ॥

दे॒वैर्नो॑ दे॒व्यदि॑ति॒र्नि पा॑तु दे॒वस्त्रा॒ता त्रा॑यता॒मप्र॑युच्छन् ॥

तन्नो॑ मि॒त्रो वरु॑णो मामहन्ता॒मदि॑तिः॒ सिंधुः॑ पृथि॒वी उ॒त द्यौः ॥ ७ ॥

देवैः नः देवि अदितिः नि पातु देवः त्राता त्रायतां अप्रऽयुच्छन् ॥

तत् नः मित्रः वरुणः ममहंतां अदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ॥ ७ ॥

सर्व देवांसह अदितिदेवी आमचें संरक्षण करो आणि आमचा पालनकर्ता देवही, आम्हांकडे यत्किंचित् दुर्लक्ष न करतां, आमचे संरक्षण करो. ह्या आमच्या प्रार्थनेस मित्र, वरुण व त्याचप्रमाणें अदिति, सिंधु, पृथिवी आणि द्युलोक ह्यांचेही अनुमोदन असो. ॥ ७ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १०७ (अग्नि सूक्त)

ऋषि : अंगिरसः कुत्स - देवता : अग्नि - छन्द : जगती त्रिष्टुभ्

य॒ज्ञो दे॒वाना॒ं प्रत्ये॑ति सु॒म्नमादि॑त्यासो॒ भव॑ता मृळ॒यन्त॑ः ॥

आ वो॑ऽ॒र्वाची॑ सु॒मति॑र्ववृत्याद॒ंहोश्चि॒द्या व॑रिवो॒वित्त॒रास॑त् ॥ १ ॥

यज्ञः देवानां प्रति एति सुम्नं आदित्यासः भवत मृळयंतः ॥

आ वः अर्वाची सुऽमतिः ववृत्यात् अंहोः चित् या वरिवोवित्ऽतरा असत् ॥ १ ॥

यज्ञ हा देवांची उत्तम कृपा संपादन करून घेण्यास साधनीभूत होत असतो. हे आदित्यहो, तुम्ही आम्हांस सौख्य अर्पण करणारे व्हा. ही तुमची अनुग्रहबुद्धि संकटांतून उत्तम संरक्षण करीत असते ती आमचेकडेच वळो. ॥ १ ॥

उप॑ नो दे॒वा अव॒सा ग॑म॒न्त्वङ्गि॑रसां॒ साम॑भि स्तू॒यमा॑नाः ॥

इंद्र॑ इंद्रि॒यैर्म॒रुतो॑ म॒रुद्भि॑रादि॒त्यैर्नो॒ अदि॑तिः॒ शर्म॑ यंसत् ॥ २ ॥

उप नः देवाः अवसा आ गमंतु अङ्गिरसां सामऽभि स्तूयमानाः ॥

इंद्रः इंद्रियैः मरुतः मरुत्भिः आदित्यैः नः अदितिः शर्म यंसत् ॥ २ ॥

अंगिरसांच्या स्तोत्रांनी ज्याचें स्तवन झालेले आहे असे देव आम्हांवर कृपा करण्याकरितां आमचेकडे येवोत. इंद्र आपल्या सर्व सामर्थ्यांसह, मरुत्देव व इतर सर्व मरुतांसह, व अदिति सर्व आदित्यांसह येथें येवो व आम्हांस सौख्य अर्पण करो. ॥ २ ॥

तन्न॒ इंद्र॒स्तद्वरु॑ण॒स्तद॒ग्निस्तद॑र्य॒मा तत्स॑वि॒ता चनो॑ धात् ॥

तन्नो॑ मि॒त्रो वरु॑णो मामहन्ता॒मदि॑तिः॒ सिंधु॑ः पृथि॒वी उ॒त द्यौः ॥ ३ ॥

तत् नः इंद्रः तत् वरुणः तत् अग्निः तत् अर्यमा तत् सविता चनः धात् ॥

तत् नः मित्रः वरुणः ममहंतां अदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ॥ ३ ॥

ही आमची स्तुति इंद्र गोड करून घेवो. ही वरुण गोड करून घेवो. ही अर्यमा गोड करून घेवो, व ही सविताही गोड करून घेवो. ह्या आमच्या प्रार्थनेस मित्र, वरुण व त्याचप्रमाणें अदिति, सिंधु, पृथिवी आणि द्युलोक ह्यांचेही अनुमोदन असो. ॥ ३ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १०८ (इंद्राग्नी सूक्त)

ऋषि : अंगिरसः कुत्स - देवता : इंद्राग्नौ - छन्द : जगती त्रिष्टुभ्

य इं᳚द्राग्नी चि॒त्रत॑मो॒ रथौ॑ वाम॒भि विश्वा॑नि॒ भुव॑नानि॒ चष्टे॑ ॥

तेना या॑तं सु॒रथं᳚ तस्थि॒वांसाथा॒ सोम॑स्य पिबतं सु॒तस्य॑ ॥ १ ॥

यः इंद्राग्नी इति चित्रऽतमः रथः वां अभि विश्वानि भुवनानि चष्टे ॥

तेन आ यातं सऽरथं तस्थिऽवांसा अथ सोमस्य पिबतं सुतस्य ॥ १ ॥

हे इंद्र आणी अग्निदेवहो, जो तुमचा अत्यंत आश्चर्यकारक रथ मार्गक्रमण करीत असतां अखिल विश्वांचे अवलोकन करीत असतो त्या रथांत दोघेही एकत्र बसून येथें या व हा सोमरस काढून ठेवला आहे त्याचे प्राशन करा. ॥ १ ॥

याव॑दि॒दण् भुव॑नं॒ विश्व॒मस्त्यु॑रु॒व्यचा॑ वरि॒मता॑ गभी॒रम् ॥

तावाँ᳚ अ॒यं पात॑वे॒ सोमो॑ अ॒स्त्वर॑मिंद्राग्नी॒ मन॑से यु॒वभ्या॑म् ॥ २ ॥

यावत् इदं भुवनं विश्वं अस्ति उरुऽव्यचा वरिमता गभीरम् ॥

तावान् अयं पातवे सोमः अस्तु अरं इंद्राग्नी इति मनसे युवऽभ्याम् ॥ २ ॥

हे इंद्र आणि अग्निदेवहो, हे सर्व जगत् आपल्या विस्तीर्ण आकारामुळें जसें खोलपर्यंत पसरलेले आहे तसा हा सोम तुमच्या प्राशनास भरपूर पुरून तुमच्या मनास सर्वतोपरी आनंदकारक होवो. ॥ २ ॥

चक्राथे हि सध्र्य१ङ्नाम भद्रं संध्रीचीना वृत्रहणा उत स्थः ॥

ताविंद्राग्नी सध्र्यञ्चा निषद्या वृष्णः सोमस्य वृषणा वृषेथाम् ॥ ३ ॥

चक्राथे इति हि सध्र्यक् नाम भद्रं सध्रीचीना वृत्रऽहनौ उत स्थः ॥

ताउ इंद्राग्नी इति सध्र्यञ्चा निऽषद्य वृष्णः सोमस्य वृषणा वृषेथाम् ॥ ३ ॥

तुम्ही खरोखर उत्कृष्ट रीतीनें उत्तम नांव मिळविले आहे व वृत्राचे हनन करणारे तुम्ही खरोखर उत्कृष्ट कृति करणारे आहां. तेव्हां ह्या यज्ञांत उत्कृष्ट रीतीनें विराजमान होऊन, हे सामर्थ्यवान इंद्र आणि अग्निदेवहो, तुम्ही ह्या सामर्थ्यप्रद सोमराचें प्राशन करा. ॥ ३ ॥

समिद्धेष्वग्निष्वानजाना यतस्रुचा बर्हिरु तिस्तिराणा ॥

तीव्रैः सोमैः परिषिक्तेभिरर्वागेन्द्राग्नी सौमनसाय यातम् ॥ ४ ॥

संऽइद्धेषु अग्निषु आनजाना यतऽस्रुचा बर्हिः ऊं इति उ तिस्तिराणा ॥

तीव्रैः सोमैः परिऽसिक्तेभिः अर्वाक् आ इन्द्राग्नी इति सौमनसाय यातम् ॥ ४ ॥

हे इंद्र आणि अग्निदेवहो, अग्नि प्रदीप्त केल्यावर ज्या तुम्हांस भूषणें चढविलीं आहेत, ज्यांचेकरितां यज्ञचमस वर उचलण्यांत येत आहेत, व जे तुम्ही दर्भासनावर विराजमान झालेले आहां, ते हा तीव्र सोमरस सिद्ध केल्यावरोबर आम्हांवर कृपा करण्याची इच्छा धरून इकडे या. ॥ ४ ॥

यानीन्द्राग्नी चक्रथुर्वीर्याणि यानि रूपाण्युत वृष्ण्यानि ॥

या वां प्रत्नानि सख्या शिवानि तेभिः सोमस्य पिबतं सुतस्य ॥ ५ ॥

यानि इन्द्राग्नी इति चक्रथुः वीर्याणि यानि रूपाणि उत वृष्ण्यानि ॥

या वां प्रत्नाऽनि सख्या शिवानि तेभिः सोमस्य पिबतं सुतस्य ॥ ५ ॥

हे इंद्र व अग्निदेवहो, जी वीरकर्मे आजपर्यंत तुम्ही केलीं, जी नानाप्रकारचीं रूपें तुम्ही दाखविलीं, व जे अनेक पराक्रम तुम्ही गाजविलें त्याचें व जी तुमची मित्रत्वाची कृत्यें पुरातन कालापासून प्रख्यात आहेत त्या सर्वांचे स्मरण ठेवून ह्या आम्ही सिद्ध केलेल्या सोमरसाचें प्राशन करा. ॥ ५ ॥

यदब्रवं प्रथमं वां वृणानोऽयं सोमो असुरैर्नो विहव्यः ॥

तां सत्यां श्रद्धामभ्या हि यातमथा सोमस्य पिबतं सुतस्य ॥ ६ ॥

यत् अब्रवं प्रथमं वां वृणानः अयं सोमः असुरैः नः विऽहव्यः ॥

तां सत्यां श्रद्धां अभि आ हि यातं अथ सोमस्य पिबतं सुतस्य ॥ ६ ॥

ज्या अर्थी प्रथम तुमच्या दर्शनाची आवड मनात धरून मी म्हणालों, - "हा सोम आमच्याच यज्ञांतील उपासकांनी तुला अर्पण केला पाहिजे" - त्या अर्थी त्या माझ्या खऱ्या भक्तीकडे पाहून तुम्ही या व ह्या आम्हीं सिद्ध केलेल्या सोमरसाचें प्राशन करा. ॥ ६ ॥

यदिंद्राग्नी मदथः स्वे दुरोणे यद्ब्रह्मणि राजनि वा यजत्रा ॥

अतः परि वृषणाव् आ हि यातम् अथा सोमस्य पिबतं सुतस्य ॥ ७ ॥

यत् इंद्राग्नी इति मदथः स्वे दुरोणे यत् ब्रह्मणि राजनि वा यजत्रा ॥

अतः परि वृषणौ आ हि यातं अथ सोमस्य पिबतं सुतस्य ॥ ७ ॥

हे यज्ञार्ह इंद्र आणि अग्निदेवहो, जरी तुम्ही आपल्या मंदिरात, एखाद्या विद्वान भक्ताच्या घरी, अथवा एखाद्या राजाच्या यज्ञांत आनंद करीत बसलां असाल तरी तेथूनही, हे सामर्थ्यवान देवांनो, इकडे या व आम्ही तयार केलेल्या सोमरसाचें प्राशन करा. ॥ ७ ॥

यदिंद्राग्नी यदुषु तुर्वशेषु यद्द्रुह्युष्वनुषु पूरुषु स्थः ॥

अतः परि वृषणावा हि यातमथा सोमस्य पिबतं सुतस्य ॥ ८ ॥

यत् इंद्राग्नी इति यदुषु तुर्वशेषु यत् द्रुह्युषु अनुषु पूरुषु स्थः ॥

अतः परि वृषणौ आ हि यातं अथ सोमस्य पिबतं सुतस्य ॥ ८ ॥

हे इंद्र आणि अग्निदेवहो, जरी तुम्ही यदु, तुर्वश, दह्यु, अनु अथवा पूरू ह्यांचे सदनांत असलां तरी तेथूनही, हे सामर्थ्यवान देवांनो, इकडे या व आम्ही तयार केलेल्या सोमरसाचें प्राशन करा. ॥ ८ ॥

यदिंद्राग्नी अवमस्यां पृथिव्यां मध्यमस्यां परमस्यामुत स्थः ॥

अतः परि वृषणाव् आ हि यातम् अथा सोमस्य पिबतं सुतस्य ॥ ९ ॥

यत् इंद्राग्नी इति अवमस्यां पृथिव्यां मध्यमस्यां परमस्यां उत स्थः ॥

अतः परि वृषणौ आ हि यातं अथ सोमस्य पिबतं सुतस्य ॥ ९ ॥

हे इंद्र व अग्निदेवहो, जरी तुम्ही पृथिवीच्या अगदी खालच्या प्रदेशांत असलां अथवा मधल्या किंवा वरच्या प्रदेशांत असलां तरी तेथूनही, हे सामर्थ्यवान देवांनो, इकडे या व आम्ही तयार केलेल्या सोमरसाचें प्राशन करा. ॥ ९ ॥

यदिं॑द्राग्नी पर॒मस्यां॑ पृथि॒व्यां म॑ध्य॒मस्यां॑मव॒मस्यां॑मु॒त स्थः ॥

अतः॒ परि॑ वृषणा॒वा हि या॒तमथा॒ सोम॑स्य पिबतं सु॒तस्य॑ ॥ १० ॥

यत् इंद्राग्नी इति परमस्यां पृथिव्यां मध्यमस्यां अवमस्यां उत स्थः ॥

अतः परि वृषणौ आ हि यातं अथ सोमस्य पिबतं सुतस्य ॥ १० ॥

हे इंद्र आणि अग्निदेवहो, जरी तुम्ही पृथिवीच्या अगदीं वरच्या प्रदेशात असलां अथवा मधल्या किंवा खालच्या प्रदेशांत असलां तरी तेथूनही, हे सामर्थ्यवान देवांनो, इकडे या व आम्ही तयार केलेल्या सोमरसाचें प्राशन करा. ॥ १० ॥

यदिं॑द्राग्नी दि॒वि ष्ठो यत्पृ॑थि॒व्यां यत्पर्व॑ते॒ष्वोष॑धीष्व॒प्सु ॥

अतः परि वृषणावा हि यातमथा सोमस्य पिबतं सुतस्य ॥ ११ ॥

यत् इंद्राग्नी इति दिवि श्थः यत् पृथिव्यां यत् पर्वतेषु ओषधीषु अप्ऽसुः ॥

अतः परि वृषणौ आ हि यातं अथ सोमस्य पिबतं सुतस्य ॥ ११ ॥

हे इंद्र आणि अग्निदेवहो, जरी तुम्ही स्वर्गांत, पृथिवीवर, वनस्पतींमध्यें अथवा उदकात असलां तरी तेथूनही, हे सामर्थ्यवान देवांनो, इकडे या व आम्ही तयार केलेल्या सोमरसाचें प्राशन करा. ॥ ११ ॥

यदिंद्राग्नी उदिता सूर्यस्य मध्ये दिवः स्वधया मादयेथे ॥

अतः परि वृषणावा हि यातमथा सोमस्य पिबतं सुतस्य ॥ १२ ॥

यत् इंद्राग्नी इति उत्ऽइता सूर्यस्य मध्ये दिवः स्वधया मादयेथे इति ॥

अतः परि वृषणौ आ हि यातं अथ सोमस्य पिबतं सुतस्य ॥ १२ ॥

हे इंद्र व अग्निदेवहो, तुम्ही सूर्योदयाचे वेळीं जरी स्वर्गलोकाच्या मध्यभागीं बसून आनंदानें हवीचें सेवन करीत असला तरी तेथूनही, हे सामर्थ्यवान देवांनो, इकडे या व आम्ही तयार केलेल्या सोमरसाचें प्राशन करा. ‖ १२ ‖

एवेन्द्राग्नी पपिवांसा सुतस्य विश्वास्मभ्यं सं जयतं धनानि ‖

तन् नो मित्रो वरुणो मामहन्तामदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ‖ १३ ‖

एव इन्द्राग्नी इति पपिऽवांसा सुतस्य विश्वा अस्मभ्यं सं जयतं धनानि ‖

तत् नः मित्रः वरुणः ममहंतां अदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ‖ १३ ‖

हे इंद्र व अग्निदेवहो, ह्याप्रमाणें सोमरसाचें प्राशन करून आमचेकरितां सर्व वैभवें जिंकून घेऊन या. आमच्या विनंतीस मित्र, वरुण व त्याचप्रमाणें अदिति, सिंधु, पृथिवी व द्युलोक ह्यांचेही अनुमोदन असो. ‖ १३ ‖

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १०९ (इंद्राग्नी सूक्त)

ऋषि : अंगिरसः कुत्स - देवता : इंद्राग्नौ - छन्द : जगती त्रिष्टुभ्

वि ह्यख्यं॒ मन॑सा॒ वस्य॑ इ॒च्छन्निंद्रा॑ग्नी ज्ञा॒स उ॒त वा॑ सजा॒तान् ॥

नान्या यु॒वत्प्रम॑तिरस्ति॒ मह्यं॒ स वां॒ धियं॑ वाज॒यन्ती॑मतक्षम् ॥ १ ॥

वि हि अख्यं मनसा वस्यः इच्छन् इंद्राग्नी इति ज्ञासः उत वा सऽजातान् ॥

न अन्या युवत् प्रऽमतिऽ अस्ति मह्यं सः वां धियं वाजऽयंतीं अतक्षम् ॥ १ ॥

मनामध्यें वैभवाची इच्छा ठेवून मी मला कोणी ज्ञातिबांधव अथवा आप्त मदत करतील काय म्हणून त्यांना शोधावयास लागलो. हे इंद्र आणि अग्निदेवहो, तुमच्या मनाची प्रवृत्तिही माझेविषयीं अन्यप्रकारची नाही, व म्हणूनच हें जोरदार स्तोत्र मी तुमचे सन्मानार्थ रचलें आहे. ॥ १ ॥

अश्र॑वं॒ हि भू॑रि॒दाव॑त्तरा वां॒ विजा॑मातुरु॒त वा॑ घा स्या॒लात् ॥

अथा सोमस्य प्रयती युवभ्यामिंद्राग्नी स्तोमं जनयामि नव्यम् ॥ २ ॥

अश्रवं हि भूरिदावत्ऽतरा वां विऽजामातुः उत वा घ स्यालात् ॥

अथ सोमस्य प्रऽयती युवऽभ्यां इंद्राग्नी इति स्तोमं जनयामि नव्यम् ॥ २ ॥

खरोखर मेहुण्यापेक्षां अथवा एखाद्या गुणहीन जांवयापेक्षांही आपण जास्ती सढळपणानें द्रव्य देणारे आहांत असें मी ऐकलें आहे. ह्यासाठी हे इंद्र व अग्निदेवहो, तुम्हांस सोमरस अर्पण करून मी हे नूतन स्तोत्र रचीत आहे. ॥ २ ॥

मा छेद्म रश्मीँरिति नाधमानाः पितॄणां शक्तीरनुयच्छमानाः ॥

इन्द्राग्निभ्यां कं वृषणो मदन्ति ता ह्यद्री धिषणाया उपस्थे ॥ ३ ॥

मा छेद्म रश्मीन् इति नाधमानाः पितॄणां शक्तीः अनुऽयच्छमानाः ॥

इंद्राग्निऽभ्यां कं वृषणः मदंति ता हि अद्री इति धिषणायाः उपऽस्थे ॥ ३ ॥

आमचा वंशविच्छेद न होवो अशी प्रार्थना करणारे व आपल्या वाडवडिलांचे सामर्थ्य आपल्या संततीच्या अंगी उतरावें अशी इच्छा बाळगणारे जे सामर्थ्यवान पुरुष सौख्याचा उपभोग घेत असतात ते केवळ इंद्र आणि अग्नि ह्यांच्याच कृपेमुळेंच होय. कारण ते पहा, सोमरस काढण्यासाकरितां त्यांनी आणलेले यज्ञपाषाण जवळच ठेवलेले दिसत आहेत. ॥ ३ ॥

यु॒वाभ्यां॑ दे॒वी धि॒षणा॒ मदा॒येन्द्रा॑ग्नी॒ सोम॑म् उश॒ती सु॑नोति ॥

ताव॑श्विना भद्रहस्ता सुपाणी॒ आ धा॑वत॒ं मधु॑ना पृ॒ङ्क्त म॒प्सु ॥ ४ ॥

युवाभ्यां देवी धिषणा मदाय इन्द्राग्नी इति सोमं उशती सुनोति ॥

ताउ अश्विना भद्रऽहस्ता सुपाणी इति सुपाऽनी आ धावतं मधुना पृङ्क्तं अप्ऽसु ॥ ४ ॥

हे इंद्र आणि अग्निदेवांनो, हें दिव्य सोमरसपात्र तुमच्या संतोषाकरितां मोठ्या हौसेनें सोमरस काढून घेत आहे. तर हे अश्विनी देवहो, आपले मंगल हस्त सरसावून धांवत या व हा सोमरस उदकांत घालून त्यावर मधुर रसाचें सिंचन करा. ॥ ४ ॥

युवामिंद्राग्नी वसुनो विभागे तवस्तमा शुश्रव वृत्रहत्ये ॥

तावासद्या बर्हिषि यज्ञे अस्मिन्प्र चर्षणी मादयेथां सुतस्य ॥ ५ ॥

युवां इंद्राग्नी इति वसुनः विऽभागे तवःऽतमा शुश्रव वृत्रऽहत्ये ॥

तौ आऽसद्या बर्हिषि यज्ञे अस्मिन् प्र चर्षणी मादयेथां सुतस्य ॥ ५ ॥

हे इंद्र आणि अग्नि देवतांनो, मी असे ऐकलें आहे कीं दुष्टाचें हनन करण्याचे कामीं आणि वैभव अर्पण करण्याचे प्रसंगी आपण सर्वांहून जास्त अधिकार चालवितां. तेव्हां हे अनेक स्थलीं संचार करणाऱ्या देवांनो, ह्या यज्ञांत कुशासनावर अधिष्ठित होऊन ह्या सोमरसानें संतुष्ट व्हा. ॥ ५ ॥

प्र चर्षणिभ्यः पृतनाहवेषु प्र पृथिव्या रिरिचाथे दिवश्च ॥

प्र सिंधुभ्यः प्र गिरिभ्यो महित्वा प्रेन्द्राग्नी विश्वा भुवनात्यन्या ॥ ६ ॥

प्र चर्षणिऽभ्यः पृतनाऽहवेषु प्र पृथिव्याः रिरिचाथे इति दिवः च ॥

प्र सिंधुऽभ्यः प्र गिरिऽभ्यः महिऽत्वा प्र इन्द्राग्नी इति विश्वा भुवना अति अन्या ॥ ६ ॥

हे इंद्र आणि अग्नि देवहो, एकमेकांत युद्धार्थ आव्हान करणाऱ्या पुरुषापेक्षां, पृथिवीपेक्षां, द्युलोकापेक्षां, महानद्यांपेक्षां, पर्वतांपेक्षां, आणि ह्यावांचून जे कोणते दुसरे लोक उरले असतील त्यांच्यापेक्षांही तूं श्रेष्ठपणांत अधिक आहेस. ॥ ६ ॥

आ भरतं शिक्षतं वज्रबाहू अस्माँ इंद्राग्नी अवतं शचीभिः ॥

इमे नु ते रश्मयः सूर्यस्य येभिः सपित्वं पितरो न आसन् ॥ ७ ॥

आ भरतं शिक्षतं वज्रबाहू इति वज्रऽबाहू अस्मान् इंद्राग्नी इति अवतं शचीभिः ॥

इमे नु ते रश्मयः सूर्यस्य येभिः सपित्वं पितरः न आसन् ॥ ७ ॥

ज्याचे बाहु वज्राप्रमाणें बळकट आहेत अशा हे इंद्र आणि अग्नि देवांनो, आमची भरभराट करा, आम्हांस शिकवा व आपल्या सामर्थ्याचे योगानें आमचे संरक्षण करा. हेच खरोखर ते सूर्याचे रश्मि कीं ज्यांच्या स्वरूपांत आमचे वाडवडील जाऊन मिळाले. ॥ ७ ॥

पुरंदरा शिक्षतं वज्रहस्तास्माँ इंद्राग्नी अवतं भरेषु ॥

तन्नो मित्रो वरुणो मामहन्तामदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ॥ ८ ॥

पुरंऽदरा शिक्षतं वज्रऽहस्ता अस्मान् इंद्राग्नी इति अवतं भरेषु ॥

तत् नः मित्रः वरुणः ममहंतां अदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ॥ ८ ॥

शत्रूंची नगरें उध्वंस करणाऱ्या हे वज्रधारी इंद्र आणि अग्निदेवांनो, आम्हांस सन्मार्गास लावा व अमचे हवि स्वीकारून आमचें संरक्षण करा. हया आमच्या प्रार्थनेस मित्र, वरुण व त्याचप्रमाणें अदिति, सिंधु, पृथिवी व द्युलोक हयांचेही अनुमोदन असो. ॥ ८ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ११० (इंद्राग्नी सूक्त)

ऋषि : अंगिरसः कुत्स - देवता : ऋभवः - छन्द : जगती त्रिष्टुभ्

त॒तं मे॒ अप॒स्तदु॑ ताय॒ते पुनः॒ स्वादि॑ष्ठा धी॒तिरु॒चथा॑य शस्यते ॥

अ॒यं स॑मु॒द्र इ॒ह वि॒श्वदे॑व्यः॒ स्वाहा॑कृतस्य॒ समु॑ तृप्णुत ऋभवः ॥ १ ॥

ततं मे अपः तत् ऊं इति तायते पुनरिति स्वादिष्ठा धीतिः उचथाय शस्यते ॥

अयं समुद्र इह विश्वऽदेव्यः स्वाहाऽकृतस्य सं ऊं इति तृप्णुत ऋभवः ॥ १ ॥

माझे योजलेले कृत्य समाप्त झाले आणि तथापि तें मी पुन्हां करीत आहें, करण ही पहा एक अत्यंत मधुर स्तुति ऋभूंच्या गौरवार्थ मी गात आहे. हा येथें सर्व देवांस उद्देशून सोमरसाचा समुद्र भरून ठेवलेला आहे. हे ऋभूंनो, तो सोम 'स्वाहा' असा उच्चार करून तुम्हांस अर्पण केल्याबरोबर तुम्ही त्याचा स्वीकार करा व तृप्त व्हा. ॥ १ ॥

आ॒भो॒गयं॒ प्र यदि॒च्छन्त॒ ऐत॒नापा॑काः॒ प्राञ्चो॒ मम॒ के चि॑दा॒पयः॑ ॥

सौध॑न्वनासश्चरि॒तस्य॑ भू॒मनाग॑च्छत सवि॒तुर्दा॒शुषो॑ गृ॒हम् ॥ २ ॥

आऽभोगयं प्र यत् इच्छंतः ऐतन अपाकाः प्राञ्चः मम के चित् आपयः ॥

सौधन्वनासः चरितस्य भूमना अगच्छत सवितुः दाशुषः गृहम् ॥ २ ॥

ज्यावेळीं अज्ञानापासून सर्वथैव निर्मुक्त व माझे जणूं कोणी आप्तच असे तुम्ही पुराण पुरुष हवींच्या उपभोगाची आवड धरून त्यांच्या प्राप्तीच्या उद्योगास लागलां त्या वेळीं, हे सुधव्याच्या पुत्रांनो, आपल्या पराक्रमाच्या कृत्यांच्या श्रेष्ठपणामुळेंच तुम्हांस त्या उदार सविता देवाच्या सदनांत जातां आलें. ॥ २ ॥

तत्स॑वि॒ता वौ॑ऽमृत॒त्वमासु॑व॒दगौ॑ह्य॒ं यच्छ्र॒वय॑न्त॒ ऐत॑न ॥

त्यं चि॑च्चम॒समसु॑रस्य॒ भक्ष॑ण॒मेकं॒ सन्त॑मकृणुता॒ चतु॑र्वयम् ॥ ३ ॥

तत् सविता वः अमृतऽत्वं आ असुवत् अगोह्यं यत् श्रवयंत ऐतन ॥

त्यं चित् चमसं असुरस्य भक्षणं एकं संतं अकृणुत चतुःऽवयम् ॥ ३ ॥

ज्यास कधींही गुप्त ठेवणे शक्य नाहीं अशा त्या सवित्याचें यश वर्णन करण्याचें ज्या वेळीं तुम्ही श्रम घेतले त्या वेळी मात्र सवित्यानें तुम्हांस अमरत्व अर्पण केलें. त्या उदार त्वष्टा देवाचा जो पिण्याचा एकच रस होता त्याचे तुम्ही चार चमस केले. ॥ ३ ॥

वि॒ष्ट्वी शमी॑ तरणि॒त्वेन॑ वा॒घतो॒ मर्ता॑सः॒ सन्तो॑ अमृ॒तत्वमा॑नशुः ॥

सौ॒ध॒न्व॒ना ऋ॒भवः॒ सूर॑चक्षसः संवत्स॒रे सम॑पृच्यन्त धी॒तिभिः॑ ॥ ४ ॥

विष्ट्वी शमी तरणिऽत्वेन वाघतः मर्तासः संतः अमृतऽत्वं आनशुः ॥

सौधन्वनाः ऋभवः सूरऽचक्षसः संवत्सरे सं अपृच्यंत धीतिभिः ॥ ४ ॥

सत्कर्माचें मोठ्या उत्साहानें आचरण करीत देवांची उपासना करणारे ऋभु मानव असून सुद्धां अमरत्वास जाऊन पोंचले. हे सुधव्याचे पुत्र ऋभु सूर्याचेंही दर्शन प्राप्त होण्याच्या योग्यतेस चढून, एका वर्षाच्या आंत, दुसऱ्यांनी त्यांची स्तोत्रें गावी अशा पदवीस चढले. ॥ ४ ॥

क्षेत्र॑मिव॒ वि म॑मु॒स्तेज॑नेनँ॒ एकं॒ पात्र॑मृ॒भवो॒ जेह॑मानम् ॥

उप॑स्तुता उप॒मं नाध॑माना॒ अम॑र्त्येषु॒ श्रव॑ इ॒च्छमा॑नाः ॥ ५ ॥

क्षेत्रंऽइव वि ममुः तेजनेन एकं पात्रं ऋभवः जेहमानम् ॥

उपऽस्तुताः उपऽमं नाधमानाः अमर्त्येषु श्रवः इच्छमानाः ॥ ५ ॥

अमर अशा देवांच्या समुदायामधें सुद्धां आपली कीर्ति वाढावी व अशा रीतीनें अत्यंत उत्कृष्ट यश आपणांस प्राप्त व्हावें अशी इच्छा धारण करणाऱ्या ऋभूंना अखेर मानवांकडून स्तुति प्राप्त होऊन त्यांनी, ज्याप्रमाणें शेताची मोजणी करावी त्याप्रमाणें, आपल्या तेजस्वी हत्यारानें उघड्या तोंडाच्या त्या एकाच यज्ञपात्राची मोजणी केली. ॥ ५ ॥

आ म॑नी॒षाम॒न्तरि॑क्षस्य॒ नृभ्यः॑ स्रु॒चेव॑ घृ॒तं जु॑हवाम वि॒द्मना॑ ॥

त॒र॒णि॒त्वा ये पि॒तुर॑स्य सश्चि॒र ऋ॒भवो॒ वाज॑मरुहन्दि॒वो रजः॑ ॥ ६ ॥

आ मनीषां अंतरिक्षस्य नृऽभ्यः स्रुचाऽइव घृतं जुहवाम विद्मना ॥

तरणिऽत्वा ये पितुः अस्य सश्चिरे ऋभवः वाजं अरुहन् दिवः रजः ॥ ६ ॥

ह्या ऋभूंची श्रेष्ठ पदवी लक्ष्यांत घेऊन अंतरिक्षांत वास करणाऱ्या ह्या वीरांना आपण, पळीनें घृत अर्पण केल्याप्रमाणे, एक स्तोत्र अर्पण करूं या. ह्याच परम पित्याशीं ते आपल्या उत्साहपूर्वक कृतींनी ऐक्य पावले व सामर्थ्याचा लाभ करून घेऊन दिव्य रजोलोकांवर आरूढ झाले. ॥ ६ ॥

ऋ॒भुर्न॒ इंद्रः॒ शव॑सा॒ नवी॑यानृ॒भुर्वाजे॑भि॒र्वसु॑भि॒र्वसु॑र्द॒दिः ॥

यु॒ष्माकं॑ देवा॒ अव॒साह॑नि प्रि॒ये३॒॑भि ति॑ष्ठेम पृत्सु॒तीरसु॑न्वताम् ॥ ७ ॥

ऋभुः नः इंद्रः शवसा नवीयान् ऋभुः वाजेभिः वसुऽभिः वसुः ददिः ॥

युष्माकं देवाः अवसा अहनि प्रिये अभि तिष्ठेम पृत्सुतीः असुन्वताम् ॥ ७ ॥

ऋभु हाच आमचा आपल्या सामर्थ्यामुळें नवीन आवेश चढलेला इंद्र होय. ऋभु हाच आपल्या शक्तीमुळें व संपत्तीमुळें आमचें निधान व आमचा उदार दाता होय. हे देवहो, आपल्या कृपेनें आम्ही, ज्या दिवसावर आमचें निरंतर प्रेम राहील अशा एखाद्या दिवशीं, भक्तिहीन लोकांच्या सैन्यांवर विजय मिळवूं. ॥ ७ ॥

निश्चर्म॑ण ऋभवो॒ गाम॑पिंशत॒ सं व॒त्सेना॑सृजता मा॒तरं॒ पुन॑ः ॥

सौध॑न्वनासः स्वप॒स्यया॑ नरो॒ जिव्री॒ युवा॑ना पि॒तरा॑कृणोतन ॥ ८ ॥

निः चर्मण ऋभवः गां अपिंशत सं वत्सेन असृजत मातरं पुनरिति ॥

सौधन्वनासः सुऽअपस्यया नरः जिव्री इति युवाना पितरा अकृणोतन ॥ ८ ॥

हे ऋभूहो, तुम्हींच नुसत्या चर्मापासून एक खरोखरी जिवंत गाय बनविली व मातेची व तिच्या वत्साची गांठ घालून दिली. हे सुधन्व्याच्या पुत्रांनो, तुम्ही अद्भुत कृति करून आपल्या वयस्क मातापितरांस पुन्हां तरुण केलें. ॥ ८ ॥

वाजे॑भिर्नो॒ वाज॑सातावविड्ढ्यृभु॒माँ इं॑द्र चि॒त्रमा द॑र्षि॒ राध॑ः ॥

तन्नो॑ मि॒त्रो वरु॑णो मामहन्ता॒मदि॑तिः॒ सिंधु॑ः पृथि॒वी उ॒त द्यौः ॥ ९ ॥

वाजेभिः नः वाजऽसातौ अविड्ढि ऋभुऽमान् इंद्र चित्रं आ दर्षि राधः ॥

तत् नः मित्रः वरुणः ममहंतां अदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ॥ ९ ॥

हे इंद्रा, पराक्रमामुळें जेथें लाभ होण्याचा संभव असेल अशा युद्धांत आपल्या सामर्थ्यानें आमचें रक्षण कर आणी ऋभूंसहवर्तमान येऊन आम्हांस आश्चर्यकारक असें सौख्य अर्पण कर. ह्या आमच्या प्रार्थनेस मित्र, वरुण व त्याचप्रमाणें अदिति, सिंधु, पृथिवी व द्युलोक ह्यांचेही अनुमोदन असो. ॥ ९ ॥

ॐ तत् सत्

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १११ (इंद्राग्नी सूक्त)

ऋषि : अंगिरसः कुत्स - देवता : ऋभवः - छन्द : जगती त्रिष्टुभ्

तक्ष॒न्रथं॑ सु॒वृतं॑ विद्म॒नाप॑स॒स्तक्ष॒न्हरी॑ इंद्र॒वाहा॒ वृष॑ण्वसू ॥

तक्ष॑न्पि॒तृभ्या॑मृ॒भवो॒ युव॒द्वय॒स्तक्ष॑न् व॒त्साय॑ मा॒तरं॑ सचा॒भुव॑म् ॥ १ ॥

तक्षन् रथं सुऽवृतं विद्मनाऽअपसः तक्षन् हरी इति इंद्रऽवाहा वृषण्वसू इति वृषण्ऽवसू ॥

तक्षन् पितृभ्यां ऋभवः युवत् वयः तक्षन् वत्साय मातरं सचाऽभुवम् ॥ १ ॥

ज्ञानांनी ज्यांस कुशलता प्राप्त झाली आहे अशा हे ऋभूंनो, तुम्ही सुंदर रथ व इंद्रास वाहून नेणारे सामर्थ्यान अश्व निर्माण केले. तुम्ही आपल्या मातापितरांस तारुण्ययुक्त आयुष्य दिले व वत्सासाठी त्याचेजवळच सदोदित राहील अशी माता उत्पन्न केली. ॥ १ ॥

आ नो॑ य॒ज्ञाय॑ तक्षत ऋभु॒मद्वयः॒ क्रत्वे॒ दक्षा॑य सु॒प्रजाव॑ती॒मिष॑म् ॥

यथा॒ क्षया॑म॒ सर्व॑वीरया वि॒शा तन्नः॒ शर्धा॑य धासथा स्वैंद्रि॒यम् ॥ २ ॥

आ नः यज्ञाय तक्षत ऋभुऽमत् वयः क्रत्वे दक्षाय सुऽप्रजावतीं इषम् ॥

यथा क्षयाम सर्वऽवीरया विशा तत् नः शर्धाय धासथ सु इंद्रियम् ॥ २ ॥

हे ऋभूंनो, आपल्या सामर्थ्यानें आम्हांस यज्ञयाग करण्यासाठी आयुष्य द्या आणि आमचे अंगी पराक्रम व बल यावें म्हणून आम्हांस उत्तम संतति व पोटभर अन्न द्या. शिवाय आम्ही आपल्या पदरच्या सर्व शूर पुरुषांसह निर्विघ्नपणें ह्या जगांत वस्ती करावी म्हणून आमच्या सेनेच्या अंगी जोमदारपणा उत्पन्न करा. ॥ २ ॥

आ त॑क्षत सा॒तिम॒स्मभ्य॑मृभवः सा॒तिं रथा॑य सा॒तिमर्व॑ते नरः ॥

सा॒तिं नो॒ जैत्रीं॒ सं म॑हेत वि॒श्वहा॑ जा॒मिमजा॑मिं॒ पृत॑नासु स॒क्षणि॑म् ॥ ३ ॥

आ तक्षत सातिं अस्मभ्यं ऋभवः सातिं रथाय सातिं अर्वते नरः ॥

सातिं नः जैत्रीं सं महेत विश्वहा जामिं अजामिं पृतनासु सक्षणिम् ॥ ३ ॥

हे ऋभूंनो, आमची अभिवृद्धि करा, आमच्या रथांची अभिवृद्धि करा व आमच्या अश्वांची अभिवृद्धि करा. तुम्ही आमची सदोदित अशी विजयशाली अभिवृद्धि केली पाहिजे कीं जिच्यामुळें आमचे नतलग अथवा परके - कोणीही आमच्याशीं युद्ध करण्यास पुढें येवो - त्यांचा पराजयच होत जावा. ॥ ३ ॥

ऋ॒भु॒क्षण॒मिंद्र॒मा हु॑व ऊ॒तय॑ ऋ॒भून्वाजा॑न्म॒रुत॒ः सोम॑पीतये ॥

उ॒भा मि॒त्रावरु॑णा नू॒नम॒श्विना॒ ते नो॑ हिन्वन्तु सा॒तये॑ धि॒ये जि॒षे ॥ ४ ॥

ऋभुक्षणं इंद्रं आ हुव ऊतये ऋभून् वाजान् मरुतः सोमऽपीतये ॥

उभा मित्रावरुणा नूनं अश्विना ते नः हिन्वंतु सातये धिये जिषे ॥ ४ ॥

आमचे संरक्षणार्थ मी ऋभूंचा अधिपति इंद्र ह्यास व त्याचप्रमाणें ऋभु, वाज, मरुत्, उभयतां मित्र आणि वरुण, व दोघेही अश्विन ह्या देवांसही सोमपान करण्याकरितां बोलावतो. आम्हांस अनेक लाभ, बुद्धिशालित्व व विजयीपणा ही प्राप्त होतील अशा रीतीनें ते आमची अभिवृद्धि करोत. ॥ ४ ॥

ऋ॒भुर्भरा॑य॒ सं शि॑शातु सा॒तिं स॑मर्य॒जिद्वाजो॑ अ॒स्माँ अ॑विष्टु ॥

तन्नो॑ मि॒त्रो वरु॑णो मामहन्ता॒मदि॑तिः॒ सिंधुः॑ पृथि॒वी उ॒त द्यौः ॥ ५ ॥

ऋभुः भराय सं शिशातु सातिं समर्यऽजित् वाजः अस्मान् अविष्टु ॥

तत् नः मित्रः वरुणः ममहंतां अदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ॥ ५ ॥

आम्हांस हवि अर्पण करण्याचे सामर्थ्य यावे म्हणून ऋभु आम्हांस अनेक लाभ घडवो आणि समरांगणांत विजयी होणारा वाज आमचें संरक्षण करो. ह्या आमच्या प्रार्थनेस मित्र, वरुण व त्याचप्रमाणें अदिति, सिंधु, पृथिवी व द्युलोक ह्यांचेही अनुमोदन असो. ॥ ५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ११२ (अश्विनौ सूक्त)

ऋषि : अंगिरसः कुत्स - देवता : १ - अग्नि द्यावा पृथिवी,

शेष सर्व अश्विनीकुमार - छन्द : जगती त्रिष्टुभ्

ईळे॒ द्यावा॑पृथि॒वी पू॒र्वचि॑त्तयेऽ॒ग्निं घ॒र्मं सु॒रुचं॒ याम॑न्नि॒ष्टये॑ ॥

याभि॒र्भरे॑ का॒रमंशा॑य॒ जिन्व॑थ॒स्ताभि॑रू॒ षु ऊ॒तिभि॑रश्वि॒ना ग॑तम् ॥ १ ॥

ईळे द्यावापृथिवी इति पूर्वऽचित्तये अग्निं घर्मं सुऽरुचं यामन् इष्टये ॥

याभिः भरे कारं अंशाय जिन्वथः ताभिः ऊं इति सु ऊतिऽभिः अश्विना आ गतम् ॥ १ ॥

द्युलोक आणि भूलोक ह्यांनी आमच्या प्रार्थनेकडे प्रथम लक्ष द्यावे म्हणून मी त्यांचे स्तवन करतो व त्या सुंदर कांतीनें युक्त असलेल्या देदीप्यमान अग्नीनें इकडे येत असतां आमच्या कामना परिपूर्ण कराव्या म्हणून मी त्याचेंही स्तवन करतो. हे अश्वीनहो तुमच्या स्तुतिकर्त्यानें तुम्हांस सोमरस अर्पण केला असतां ज्या आपल्या भक्तजन रक्षक सामर्थ्यांनी तुम्ही त्यास आपल्या वैभवाचे वांटेकरी करतां तीं सामर्थ्यें बरोबर घेऊन तुम्हीं येथें आगमन करा. ॥ १ ॥

यु॒वोर्दा॒नाय॑ सु॒भरा॑ अस॒श्चतो॒ रथ॒मा त॑स्थुर्वच॒सं न मन्त॑वे ॥

याभि॒र्धियोऽ॑वथ॒: कर्म॑न्नि॒ष्टये॒ ताभि॒रू॒ षु ऊ॒तिभि॑रश्वि॒ना ग॑तम् ॥ २ ॥

युवोः दानाय सुऽभराः असश्चतः रथं आ तस्थुः वचसं न मंतवे ॥

याभिः धियः अवथः कर्मन् इष्टये ताभिः ऊं इति सु ऊतिऽभिः अश्विना आ गतम् ॥ २ ॥

भक्तजनांची तुम्हांला आठवण होऊन तुम्ही त्यांना आपलें औदार्य दाखविण्यास प्रवृत्त व्हावें म्हणून ते तुम्हांस सोमरस अर्पण करीत तुमच्या काय काय आज्ञा बाहेर पडतात त्याची जणूं काय वाटच पहात तुमच्या रथाभोंवती एकएकटे तिष्ठत बसलेले आहेत. हे अश्विनहो, भक्तजनांना त्याचें अभीष्ट प्राप्त व्हावें म्हणून त्यांची बुद्धि ज्या आपल्या भक्तजन रक्षक सामर्थ्यांनी तुम्ही उचित कर्मांचे ठिकाणीं निमग्न करतां ती सामर्थ्यें बरोबर घेऊन तुम्ही येथें आगमन करा. ॥ २ ॥

यु॒वं तासां॑ दि॒व्यस्य॑ प्र॒शास॑ने वि॒शां क्ष॑यथो अ॒मृत॑स्य म॒ज्मना॑ ॥

याभि॑र्धे॒नुम॒स्वं१॑ पिन्व॑थो नरा॒ ताभि॑रू॒ षु ऊ॒तिभि॑रश्वि॒ना ग॑तम् ॥ ३ ॥

युवं तासां दिव्यस्य प्रऽशासने विशां क्षयथः अमृतस्य मज्मना ॥

याभिः धेनुं अस्वं पिन्वथः नरा ताभिः ऊं इति सु ऊतिऽ भिः अश्विना आ गतम् ॥ ३ ॥

त्या दिव्य अमृतामुळें तुम्हांस नवीन उत्साह येत असल्याकारणानेंच ह्या सर्व लोकांवर तुम्ही अधिकार चालवीत राहिला आहां. हे शूर अश्विनहो, ज्या आपल्या भक्तजन रक्षक सामर्थ्यांनी तुम्ही कधीं न विणाऱ्या अशा गाईलाही भरपूर दूध आणले तीं सामर्थ्यें बरोबर घेऊन तुम्ही येथें आगमन करा. ॥ ३ ॥

याभि॒ः परि॑ज्मा॒ तन॑यस्य म॒ज्मना॑ द्विमा॒ता तू॒र्षु त॒रणि॑र्वि॒भूष॑ति ॥

याभि॑स्त्रि॒मन्तु॒रभ॑वद्विचक्ष॒णस्ताभि॑रू॒ षु ऊ॒तिभि॑रश्वि॒ना ग॑तम् ॥ ४ ॥

याभिः परिज्मा तनयस्य मज्मना द्विऽमाता तूर्षु तरणिः विऽभूषति ॥

याभिः त्रिमंतुः अभवत् विऽचक्षणः ताभिः ऊं इति सु ऊतिऽभिः अश्विना आ गतम् ॥ ४ ॥

चोहोंकडे परिभ्रमण करणारा व दोन मातांपासून जन्म पावलेला असा पुरुष ज्या तुमच्या भक्तजन रक्षक सामर्थ्यांमुळें स्वपुत्राच्या पराक्रमाच्या साहाय्यानें सर्व शीघ्रगामी लोकांत जास्त शीघ्रगामीं ठरून शोभा पावत आहे

व ज्या सामर्थ्यांचे योगानें त्रिमन्तु प्रज्ञावान होण्यास समर्थ झाला ती आपली सामर्थ्यें बरोबर घेऊन हे अश्विनहो तुम्ही येथें आगमन करा. ॥ ४ ॥

याभी रेभं निवृतं सितमद्भ्य् उद्वन्दनमैरयतं स्वर्दृशे ॥

याभिः कण्वं प्र सिषासन्तमावतं ताभिरू षु ऊतिभिरश्विना गतम् ॥ ५ ॥

याभी रेभं निऽवृतं सितं अत्ऽभ्य उत् वंदनं ऐरयतं स्वः दृशे ॥

याभिः कण्वं प्रः सिसासंतं आवतं ताभिः ऊं इति सु ऊतिऽभिः अश्विना आ गतम् ॥ ५ ॥

ज्या तुमच्या भक्तजन रक्षक सामर्थ्यामुळें तुम्ही बंधनांत पडलेल्या व पाशांत सांपडेलेया रेभ व वंदन ह्यांच्या दृष्टीस पडावा ह्यास्तव त्यांना उदकांतून बाहेर काढलें व ज्यांच्या योगानें तुमच्या चिंतनांत सदैव निमग्न असणाऱ्या कण्वाचें तुम्ही संरक्षण केलें ती आपली सामर्थ्यें बरोबर घेऊन, हे अश्विनहो, तुम्ही येथें आगमन करा. ॥ ५ ॥

याभिरन्तकं जसमानमारणे भुज्युं याभिरव्यथिभिर्जिजिन्वथुः ॥

याभि॑ः क॒र्कन्धु᳚ व॒य्यं च॒ जिन्व॑थ॒स्ताभि॑रू॒ षु ऊ॒तिभि॑रश्वि॒ना ग॑तम् ॥ ६ ॥

याभिः अंतकं जसमानं आऽरणे भुज्युं याभिः अव्यथिऽभिः जिजिन्वथुः ॥

याभिः कर्कन्धुं वय्यं च जिन्वथः ताभिः ऊं इति सु ऊतिऽभिः अश्विना आ गतम् ॥ ६ ॥

अन्तक चालतां चालतां थकून गेला असतां ज्या आपल्या भक्तजन रक्षक सामर्थ्यांमुळें तुम्ही त्यास हुषारी आणली, दुःखितास दुःखविमुक्त करणाऱ्या ज्या आपल्या सामर्थ्यामुळें तुम्ही भुज्यूचे अंगी नवीन उत्साह उत्पन्न केला व ज्याचे योगानें तुम्ही कर्कन्धु व वय्य ह्यांना तरतरी आणली ती सामर्थ्यें बरोबर घेऊन, हे अश्विनहो, तुम्ही येथें आगमन करा. ॥ ६ ॥

याभि॑ः शु॒चन्तिं ध॑न॒सां सु॑ष॒ंसदं᳚ त॒प्तं घ॒र्मम॒ोम्याव॑न्त॒मत्र॑ये ॥

याभि॒ः पृश्नि॑गुं पु॒रु॒कुत्स॒माव॑त॒ं ताभि॑रू॒ षु ऊ॒तिभि॑रश्वि॒ना ग॑तम् ॥ ७ ॥

याभिः शुचंतिं धनऽसां सुऽसंसदं तप्तं घर्मं ओम्याऽवंतं अत्रये ॥

याभिः पृश्निऽगुं पुरुऽकुत्सं आवतं ताभिः ऊं इति सु ऊतिभिः अश्विना आ गतम् ॥ ७ ॥

ज्या तुमच्या भक्तजन रक्षक सामर्थ्यामुळें तुम्ही शुचंतीला द्रव्याने भरलेले असे गृह अर्पण केले, ज्यांचे योगाने तुम्ही दाहक तापही अत्रीला सोसता येईल इतका सौम्य केला व ज्यांचे योगानें तुम्ही पृश्निगु आणि पुरुकुत्सु यांचे रक्षण केले, ती आपली सामर्थ्यें बरोबर घेऊन, हे अश्विनहो, तुम्ही येथें आगमन करा. ॥ ७ ॥

याभिः शचीभिर्वृषणा परावृजं प्रान्धं श्रोणं चक्षसे एतवे कृथः ॥

याभिर्वर्तिकां ग्रसितामम‍ुञ्चतं ताभिरू षु ऊतिभिरश्विना गतम् ॥ ८ ॥

याभिः शचीभिर्वृषणा परावृजं प्रान्धं श्रोणं चक्षसः एतवे कृथः ॥

याभिः वर्तिकां ग्रसितां अमुञ्चतं ताभिः ऊं इति सु ऊतिऽभिः अश्विना आ गतम् ॥ ८ ॥

हे अश्विनहो, ज्या तुमच्या भक्तजन रक्षक सामर्थ्यामुळें तुम्ही अंध व पंगु असलेल्या अशा परावृजालापहाण्याची व चालण्याची शक्ति दिली व ज्यांचे योगाने तुम्ही हिंसक प्राण्याच्या भक्षस्थानी पडलेल्या लावी पक्षिणीस त्याच्यापासून सोडविले ती आपली सामर्थ्यें बरोबर घेऊन इकडे आगमन करा. ॥ ८ ॥

याभि॒ः सिंधु॒ं मधु॑मन्त॒मस॑श्चत॒ं वसि॑ष्ठ॒ं याभि॑रजरा॒वजि॑न्वतम् ॥

याभि॒ः कुत्सं॑ श्रु॒तर्यं॒ नर्य॒माव॑त॒ं ताभि॑रू॒ षु ऊ॒तिभि॑रश्वि॒ना ग॑तम् ॥ ९ ॥

याभिः सिंधुं मधुऽमंतं असश्चतं वसिष्ठं याभिः अजरौ अजिन्वतम् ॥

याभिः कुत्सं श्रुतर्यं नर्यं आवतं ताभिः ऊं इति सु ऊतिऽभिः अश्विना आ गतम् ॥ ९ ॥

ज्या आपल्या भक्तजन रक्षक सामर्थ्यामुळें तुम्ही माधुर्ययुक्त नद्यांस पूर आणला, ज्यांचे योगानें, हे जरारहित अश्विनी देवहो, तुम्ही वसिष्ठाची भरभराट केली व ज्यांचे योगाने तुम्ही कुत्स, श्रुतर्य व नर्य ह्यांचे संरक्षण केलें, ती आपली सामर्थ्यें बरोबर घेऊन इकडे आगमन करा. ॥ ९ ॥

याभि॑र्वि॒श्पलां॑ धन॒साम॑थ॒र्व्यं॑ स॒हस्र॑मीळ्ह आ॒जावजि॑न्वतम् ॥

याभि॒र्वश॑म॒श्व्यं प्रे॒णिमाव॑त॒ं ताभि॑रू॒ षु ऊ॒तिभि॑रश्वि॒ना ग॑तम् ॥ १० ॥

याभिः विश्पलां धनऽसां अथर्व्यं सहस्रमीळ्हे आजौ अजिन्वतम् ॥

याभिः वशं अश्व्यं प्रेणिं आवतं ताभिः ऊं इति सु ऊतिऽभिः अश्विना आ गतम् ॥ १० ॥

अथर्व्याच्या कुलांत उत्पन्न झलेल्या धनवान विश्पलेचा ज्या आपल्या भक्तजन रक्षक सामर्थ्यामुळें तुम्ही युद्धांत हजारो माणसें लढत असतां त्यांतूनही बचाव केला आणि तुमच्यावर प्रेम करणाऱ्या ज्या अश्व कुलांतील वशाचे तुम्ही संरक्षण केलेंत ती आपली सामर्थ्यें बरोबर घेऊन इकडे आगमन करा. ॥ १० ॥

याभिः सुदानू औशिजाय वणिजे दीर्घश्रवसे मधु कोशो अक्षरत् ॥

कक्षीवन्तं स्तोतारं याभिरावतं ताभिरू षु ऊतिभिरश्विना गतम् ॥ ११ ॥

याभिः सुदानू इति सुऽदानू औशिजाय वणिजे दीर्घऽश्रवसे मधु कोशः अक्षरत् ॥

कक्षीवंतं स्तोतारं याभिः आवतं ताभिः ऊं इति सु ऊतिऽभिः अश्विना आ गतम् ॥ ११ ॥

हे अत्यंत उदार अश्विनहो, ज्या आपल्या भक्तजन रक्षक सामर्थ्यामुळें उशिजा कुलांत जन्म पावलेल्या दीर्घश्रवा नांवाच्या व्यापाऱ्यासाठी मेघाने मधुर जलाची वृष्टी केली व ज्यांचे योगाने तुमची स्तुति करणाऱ्या कक्षीवानाचें तुम्ही रक्षण केलेंत ती आपली सामर्थ्यें बरोबर घेऊन इकडे आगमन करा. ॥ ११ ॥

याभी रसां क्षोदसोद्नः पिपिन्वथुरनश्वं याभी रथमावतं जिषे ॥

याभिस्त्रिशोक उस्रिया उदाजत ताभिरू षु ऊतिभिरश्विना गतम् ॥ १२ ॥

याभी रसां क्षोदसा नः पिपिन्वथुः अनश्वं याभीः रथं आवतं जिषे ॥

याभिः त्रिशोकः उस्रियाः उत्ऽआजत ताभिः ऊं इति सु ऊतिऽभिः अश्विना आ गतम् ॥ १२ ॥

हे अश्विनहो, ज्या आपल्या भक्तजन रक्षक सामर्थ्यामुळें तुम्ही रसा नांवाच्या नदीला जलप्रवाह वाहवून पूर आणला, ज्यांच्यामुळें तुम्ही अश्व नसलेल्या रथासही विजयी करण्याकरितां त्याचा बचाव केला आणि ज्यांच्यामुळें त्रिशोक आपल्या घराकडे धेनु घेऊन जाण्यास समर्थ झाला, ती आपली सामर्थ्यें बरोबर घेऊन तुम्ही इकडे आगमन करा. ॥ १२ ॥

याभिः सूर्यं परियाथः परावति मन्धातारं क्षैत्रपत्येष्वावतम् ॥

याभिर्विप्रं प्र भरद्वाजमावतं ताभिरू षु ऊतिभिरश्विना गतम् ॥ १३ ॥

याभिः सूर्यं परिऽयाथः पराऽवति मंधातारं क्षैत्रऽपत्येषु आवतम् ॥

याभिः विप्रं प्र भरत्ऽवाजं आवतं ताभिः ऊं इति सु ऊतिऽभिः अश्विना आ गतम् ॥ १३ ॥

हे अश्विनहो, ज्या आपल्या भक्तजन रक्षक सामर्थ्यांमुळें तुम्हांस फार दूरच्या प्रदेशांत सूर्याचे सभोंवती फिरतां येते, ज्यांच्यामुळें मंधाता भूमीचें स्वामित्व मिळविणाऱ्या प्रयत्नात असतां त्याचें रक्षण केलें आणि ज्यांच्या योगाने विद्वान भरद्वाजाचेंही तुम्ही परिपालन केलें ती तुमची सामर्थ्यें बरोबर घेऊन तुम्ही इकडे आगमन करा. ॥ १३ ॥

याभि॑र्म॒हाम॑तिथि॒ग्वं क॑शो॒जुवं॒ दिवो॑दासं शम्बर॒हत्य॒ आव॑तम् ॥

याभिः॑ पू॒र्भिद्ये॑ त्र॒सद॑स्यु॒माव॑तं॒ ताभि॑रू॒ षु ऊ॒तिभि॑रश्वि॒ना ग॑तम् ॥ १४ ॥

याभिः महां अतिथिऽग्वं कशःऽजुवं दिवःऽदासं शम्बरऽहत्य आवतम् ॥

याभिः पूःऽभिद्ये त्रसदस्युं आवतं ताभिः ऊं इति सु ऊतिऽभिः अश्विना आ गतम् ॥ १४ ॥

हे अश्विनहो, भक्तजन रक्षक अशा ज्या तुमच्या सामर्थ्यांमुळें तुम्ही शम्बराचा वध करण्याचे प्रसंगी त्या श्रेष्ठ अतिथिग्वाचे, कशोजूचे व दिवोदासाचें रक्षण केलें व ज्याच्या योगानें शत्रूंच्या पुरांचा भेद करीत असतां तुम्ही त्रसदस्यूचा बचाव केला, ती तुमची सामर्थ्यें बरोबर घेऊन तुम्ही इकडे आगमन करा. ॥ १४ ॥

याभिर्वम्रं विपिपानमुपस्तुतं कलिं याभिर्वित्तजानिं दुवस्यथः ॥

याभिर्व्यश्वमुत पृथिमावतं ताभिरू षु ऊतिभिरश्विना गतम् ॥ १५ ॥

याभिः वम्रं विऽपिपानं उपऽस्तुतं कलिं याभिः वित्तऽजानिं दुवस्यथः ॥

याभिः विऽअश्वं उत पृथिं आवतं ताभिः ऊं इति सु ऊतिऽभिः अश्विना आ गतम् ॥ १५ ॥

हे अश्विनहो, भक्तजन रक्षक अशा ज्या तुमच्या सामर्थ्यामुळें सोमरसाचें अतिशय पान करणाऱ्या, वम्रास, उपस्तुतास व पत्नीला लाभ करून घेणाऱ्या कलीस तुम्ही सन्मान प्राप्त करून देतां व ज्यांचे योगाने व्यश्व व पृथि ह्यांचे तुम्ही संरक्षण केले ती तुमची सामर्थ्यें बरोबर घेऊन तुम्ही इकडे आगमन करा. ॥ १५ ॥

याभिर्नरा शयवे याभिरत्रये याभिः पुरा मनवे गातुमीषथुः ॥

याभिः शारीराजतं स्यूमरश्मये ताभिरू षु ऊतिभिरश्विना गतम् ॥ १६ ॥

याभिः नरा शयवे याभिः अत्रये याभिः पुरा मनवे गातुं ईषथुः ॥

याभिः शारीः आजतं स्यूमऽरश्मये ताभिः ऊं इति सु ऊतिऽभिः अश्विना आ गतम् ॥ १६ ॥

हे शूर अश्विनहो, भक्तजन रक्षक अशा ज्या तुमच्या सामर्थ्यामुळें तुम्ही प्राचीन काली, शयु, अत्रि व मनु ह्यांची भरभराट व्हावी अशी इच्छा धारण केली, आणि ज्यांचे योगानें तुम्ही स्यूमरश्मीकरितां बाण सोडले, ती तुमची सामर्थ्यें बरोबर घेऊन तुम्ही इकडे आगमन करा. ॥ १६ ॥

याभिः पठर्वा जठरस्य मज्मनाग्निर्नादीदेच्चित इद्धो अज्मन्ना ॥

याभिः शर्यातमवथो महाधने ताभिरू षु ऊतिभिरश्विना गतम् ॥ १७ ॥

याभिः पठर्वा जठरस्य मज्मना अग्निः न अदीदेत् चितः इद्धः अज्मन् आ ॥

याभिः शर्यातं अवथः महाऽधने ताभिः ऊं इति सु ऊतिऽभिः अश्विना आ गतम् ॥ १७ ॥

हे अश्विनहो, भक्तजन रक्षक अशा ज्या तुमच्या सामर्थ्यामुळें अंगिरसाच्या स्तुतीनें संतोष पावलां व जेथें गाईंचा समुदाय कोंडून ठेवला होता अशा गुहेमध्यें सर्वांच्या पुढें होऊन शिरला आणि ज्यांच्या योगाने तुम्ही शूर मनूला अन्नसामग्री देऊन त्याचे संरक्षण केले, ती तुमची सामर्थ्यें बरोबर घेऊन तुम्ही इकडे आगमन करा. ॥ १७ ॥

याभि॑रङ्गि॒रो॒ मन॑सा नि॒रण्यथो॒ऽग्रं॑ ग॒च्छ॑थो वि॒वरे॒ गोअ॑र्णसः ॥

याभि॒र्मनुं॒ शूर॑मि॒षा स॒मावतं॒ ताभि॑रू॒ षु ऊ॒तिभि॑रश्वि॒ना ग॑तम् ॥ १८ ॥

याभिः अङ्गिरः मनसा निऽरण्यथः अग्रं गच्छथः विऽवरे गोऽअर्णसः ॥

याभिः मनुं शूरं इषा संऽआवतं ताभिः ऊं इति सु ऊतिऽभिः अश्विना आ गतम् ॥ १८ ॥

हे अश्विनहो, भक्तजन रक्षक अशा ज्या तुमच्या सामर्थ्यामुळें तुम्ही विमदास भार्या मिळवून दिली, ज्यांच्यामुळें ताम्रवर्ण धेनूंस तुम्ही आपल्या आज्ञा मानावयास शिकविले व ज्याच्या योगानें तुम्ही सुदेव्याला सुदासाकडे घेऊन आला त्या तुमच्या सामर्थ्यासह तुम्ही इकडे या. ॥ १८ ॥

याभिः॒ पत्नी॑र्विम॒दाय॑ न्यू॒हथु॒रा घ॑ वा॒ याभि॑ररु॒णीरशि॑क्षतम् ॥

याभिः सुदासं ऊहथुः सुदेव्यं१ ताभिरू षु ऊतिभिरश्विना गतम् ॥ १९ ॥

याभिः पत्नीः विऽमदाय निऽऊहथुः आ घ वा याभिः अरुणीः अशिक्षतम् ॥

याभिः सुऽदासः ऊहथुः सुऽदेव्यं ताभिः ऊं इति सु ऊतिऽभिः अश्विना आ गतम् ॥ १९ ॥

विमद नामक ऋषीला पत्नी आणि आरक्तवर्ण धेनू प्रदान करणाऱ्या, तसेच सुदास राजाला दिव्य धन देणाऱ्या हे अश्विनीकुमारांनो, तुम्ही तुमची सर्व सामर्थ्यें बरोबर घेऊन इकडे या. ॥ १९ ॥

याभिः शंताती भवथो ददाशुषे भुज्युं याभिरवथो याभिरध्रिगुम् ॥

ओम्यावतीं सुभरामृतस्तुभं ताभिरू षु ऊतिभिरश्विना गतम् ॥ २० ॥

याभिः शंताती इति शंऽताती भवथः ददाशुषे भुज्युं याभिः अवथः याभिः अध्रिऽगुम् ॥

ओम्याऽवतीं सुऽभरां ऋतऽस्तुभं ताभिः ऊं इति सु ऊतिऽभिः अश्विना आ गतम् ॥ २० ॥

हे अश्विनहो, भक्तजन रक्षक अशा ज्या तुमच्या सामर्थ्यामुळें तुम्ही हवी अर्पण करणाऱ्या भक्तास कल्याणप्रद होतां, ज्यांच्या योगानें तुम्ही भुज्यु आणि अध्रिगु ह्यांचे संरक्षण करतां, आणि ज्यांच्यामुळें तुम्ही उत्तम हवि देणाऱ्या ऋतस्तुभेला सौख्यामध्यें ठेवतां, ती तुमची सामर्थ्यें बरोबर घेऊन तुम्ही इकडे या. ॥ २० ॥

याभिः᳚ कृ॒शानु॒मस॑ने दुव॒स्यथौ᳚ ज॒वे याभि॒र्यूनो॒ अर्व॑न्त॒माव॑तम् ॥

मधु॑ प्रि॒यं भ॑रथो॒ यत्स॒रड्भ्य॒स्ताभि॑रू॒ षु ऊ॒तिभि॑रश्वि॒ना ग॑तम् ॥ २१ ॥

याभिः कृशानुं असने दुवस्यथः जवे याभिः यूनः अर्वंतं आवतम् ॥

मधु प्रियं भरथः यत् सरद्ऽभ्यः ताभिः ऊं इति सु ऊतिऽभिः अश्विना आ गतम् ॥ २१ ॥

हे अश्विनहो, भक्तजन रक्षक अशा ज्या तुमच्या सामर्थ्यामुळें तुम्ही शरसंधानप्रसंगी कृशानूची वाहवा करविली, ज्यांचे योगानें तुम्ही त्या तरुण पुरुषाचा अश्व वेगानें धांवत असतां त्याचे संरक्षण केलेंत व ज्यांचे योगाने तुम्ही भ्रमरांना त्यांचा आवडता मध आणून देतां ती तुमची सामर्थ्यें बरोबर घेऊन तुम्ही इकडे या. ॥ २१ ॥

याभि॒र्नरं᳚ गोषु॒युधं᳚ नृ॒षाह्ये॒ क्षेत्र॑स्य सा॒ता तन॑यस्य॒ जिन्व॑थः ॥

याभी॒ रथाँ॒ अव॑थो॒ याभि॒रर्व॑त॒स्ताभि॑रू॒ षु ऊ॒तिभि॑रश्वि॒ना ग॑तम् ॥ २२ ॥

याभिः नरं गोषुऽयुधं नृसह्ये क्षेत्रस्य साता तनयस्य जिन्वथः ॥

याभी रथान् अवथः याभिः अर्वतः ताभिः ऊं इति सु ऊतिऽभिः अश्विना आ गतम् ॥ २२ ॥

हे अश्विनहो, भक्तजन रक्षक अशा ज्या तुमच्या सामर्थ्यांमुळें तुम्ही धेनूंच्या प्राप्तिकरितां युद्ध करणाऱ्या त्या वीराचा, त्यास युद्धांत भूमि व संतति मिळवून देऊन उत्कर्ष करविला, आणि ज्यांचे योगानें तुम्ही रथ व अश्व ह्यांचे संरक्षण करतां, ती तुमची सामर्थ्यें बरोबर घेऊन तुम्ही इकडे या. ॥ २२ ॥

याभिः॒ कुत्स॑मार्जु॒ने॒यं श॑तक्रतू॒ प्र तु॒र्वीति॒ं प्र च॑ द॒भीति॒माव॑तम् ॥

याभि॑र्ध्व॒सन्ति॑ं पुरु॒षन्ति॒माव॑त॒ं ताभि॑रू॒ षु ऊ॒तिभि॑रश्वि॒ना ग॑तम् ॥ २३ ॥

याभिः कुत्सं आर्जुनेयं शतक्रतू इति शतऽक्रतू प्र तुर्वीतिं प्र च दभीतिं आवतम् ॥

याभिः ध्वसंतिं पुरुऽसंतिं आवतं ताभिः ऊं इति सु ऊतिऽभिः अश्विना आ गतम् ॥ २३ ॥

हे अश्विनहो, भक्तजन रक्षक अशा ज्या तुमच्या सामर्थ्यामुळें तुम्ही अर्जुनीचा पुत्र कुत्स व त्याचप्रमाणे तुर्वीति व दभीति ह्यांचे संरक्षण केले व ज्यांचे योगानें तुम्ही ध्वसन्ति व पुरुषन्ति ह्यांचेही परिपालन केले, ती तुमची सामर्थ्यें बरोबर घेऊन तुम्ही इकडे या. ॥ २३ ॥

अप्नस्वतीमश्विना वाचमस्मेकृतं नो दस्रा वृषणा मनीषाम् ॥

अद्यूत्येऽवसे नि ह्वये वां वृधे च नो भवतं वाजसातौ ॥ २४ ॥

अप्नस्वतीं अश्विना वाचं अस्मे इति कृतं नः दस्रा वृषणा मनीषाम् ॥

अद्यूत्ये अवसे नि ह्वये वां वृधे च नः भवतं वाजऽसातौ ॥ २४ ॥

हे शत्रूंचा नाश करणाऱ्या पराक्रमी अश्विनी देवांनो, आम्हांवर कृपाळू होऊन आमची स्तुति व प्रार्थना सफल करा. सूर्याची प्रभा फांकली नाहीं तोंच आमच्या संरक्षणासाठी मी तुमचा धांवा करीत आहे. ह्यासाठीं आम्हांस सामर्थ्य अर्पण करून आमची भरभराट करा. ॥ २४ ॥

द्युभिरक्तुभिः परि पातमस्मानरिष्टेभिरश्विना सौभगेभिः ॥

तन्नो॑ मि॒त्रो वरु॑णो मामहन्ता॒मदि॑तिः॒ सिंधुः॑ पृथि॒वी उ॒त द्यौः ॥ २५ ॥

द्युभिः अक्तुऽभिः परि पातं अस्मान् अरिष्टेभिः अश्विना सौभगेभिः ॥

तत् नः मित्रः वरुणः ममहंतां अदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ॥ २५ ॥

हे अश्विनहो, आमच्या सौख्यांत कधींही खंड पडूं न देता रात्रंदिवस आमचे संरक्षण करा. ह्या आमच्या प्रार्थनेस मित्र, वरुण व त्याचप्रमाणें अदिति, सिंधु, पृथिवी व द्युलोक ह्यांचेही अनुमोदन असो. ॥ ॥ २५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ११३ (उषा सूक्त)

ऋषि : अंगिरस कुत्स - देवता : १ - रात्रि, शेष उषा - छंद - त्रिष्टुभ्

इ॒दं श्रेष्ठं॒ ज्योति॑षां॒ ज्योति॒रागा॑च्चि॒त्रः प्र॑के॒तो अ॑जनिष्ट॒ विभ्वा॑ ॥

यथा॒ प्रसू॑ता सवि॒तुः स॒वायँ॑ ए॒वा रात्र्यु॒षसे॒ योनि॑मारैक् ॥ १ ॥

इदं श्रेष्ठं ज्योतिषां ज्योतिः आ अगात् चित्रः प्रऽकेतः अजनिष्ट विऽभ्वा ॥

यथा प्रऽसूता सवितुः सवाय एव रात्री उषसे योनिं आरैक् ॥ १ ॥

हे सर्व तेजांतील श्रेष्ठ तेज अवतीर्ण झाले आहे. हा आश्चर्यकारक व सर्वव्यापी प्रकाश उदय पावला आहे. सवित्र्यास जन्म देण्याकरितांच ही उषा प्रादुर्भूत झाली आहे व म्हणून रात्रीनें तिचेकरितां जागा केली. ॥ १ ॥

रुश॑द्वत्सा॒ रुश॑ती श्वे॒त्यागा॒दारै॑गु कृ॒ष्णा सद॑नान्यस्याः ॥

स॒मा॒नब॑न्धू अ॒मृते॑ अनू॒ची द्‌यावा॒ वर्णं॑ चरत आमिना॒ने ॥ २ ॥

रुशत्ऽवत्सा रुशती श्वेत्या आ अगात् अरैक् ऊं इति कृष्णा सदनानि अस्याः ॥

समानबंधू इति समानऽबंधू अमृते अनूची इति द्‌यावा वर्णं चरतः आमिनाने इत्याऽमिनाने ॥ २ ॥

आपले शुभ्रवर्ण बालक घेऊन ही शुभ्र व देदीप्यमान उषा प्राप्त झाली आहे. कृष्णवर्ण रात्रीनें आपलीं सर्व निवासस्थानें हिच्याकरितां मोकळी करून ठेवली आहेत. परस्परांशी समान नात्याच्या अशा ह्या एकमेकींस अनुसरणाऱ्या दोघी अमर देवता, जगताचा वर्ण पालटीत, आकाशमार्गानें संचार करीत असतात. ॥ २ ॥

समानो अध्वा स्वस्रोरनन्तस्तमन्यान्या चरतो देवशिष्टे ॥

न मेथेते न तस्थतुः सुमेके नक्तोषासा समनसा विरूपे ॥ ३ ॥

समानः अध्वा स्वस्रोः अनंतः तं अन्याऽअन्या चरतः देवशिष्टे इति देवऽशिष्टे ॥

न मेथेते इति न तस्थतुः सुमेके इति सुऽमेके नक्तोषसा सऽमनसा विरूपे इति विऽरूपे ॥ ३ ॥

ह्या दोघी भगिनींचा मार्ग अनंत आहे. देवांच्या आज्ञेस अनुसरून त्या पाळीपाळीनें त्या मार्गानें संचार करतात. एका विचारानें चालणाऱ्या परंतु स्वरूपांत भिन्न अशा ह्या सुंदर दोघीजणी, रात्र व उषा, कोठेंच थांबत अथवा विश्रांती घेत नाहींत. ॥ ३ ॥

भास्वती नेत्री सूनृतानामचेति चित्रा वि दुरो न आवः ॥

प्राप्र्या जगद्व्यु नो रायो अख्यदुषा अजीगर्भुवनानि विश्वा ॥ ४ ॥

भास्वती नेत्री सूनृतानां अचेति चित्रा वि दुरः नः आवरित्यावः ॥

प्रऽअर्प्य जगत् वि ऊं इति नः रायः अख्यत् उषाः अजीगः भुवनानि विश्वा ॥ ४ ॥

देदीप्यमान, व माधुर्ययुक्त सत्याचा लाभ घडविणारी ही आश्चर्यकारक उषा दिसूं लागली आहे. हिनें आमच्या गृहांची द्वारें उघडली आहेत. सर्व जगतास आपापल्या उद्योगाकडे प्रवृत्त करून तिने आम्हांकरितां वैभवें खुली केलीं आहेत, व तिनें सर्व प्राणिमात्रास जागृत केलें आहे. ॥ ४ ॥

जिह्मश्येॅ चरितवे मघोन्याभोगयं इष्टये राय उं त्वम् ॥

दभ्रं पश्यद्भ्यद उर्विया विचक्ष उषा अजीगर्भुवनानि विश्वा ॥ ५ ॥

जिह्मऽश्ये चरितवे मघोनि आऽभोगय इष्टये राय ऊं इति त्वम् ॥

दभ्रं पश्यत्ऽभ्य उर्विया विऽचक्षे उषाः अजीगः भुवनानि विश्वा ॥ ५ ॥

ह्या उदार उषेनें सर्व प्राणिमात्रास जागृत केले आहे, ह्या हेतूनें कीं जो वाटसरू रस्त्यांत आडवातिडवा निजला असेल त्यानें चालूं लागावे, त्याचप्रमाणें तुम्हांपैकी कोणी भोग्यवस्तूंकरितां प्रयत्न करावा, कोणी इष्टार्थ लाभासाठीं झटावें, कोणी धनप्राप्त्यर्थ खटपट करावी, व ज्यास अल्प दिसत असेल त्यास स्पष्ट रीतीने दिसूं लागावें. ॥ ५ ॥

क्ष॒त्राय॑ त्वं॒ श्रव॑से त्वम् मही॒या इ॒ष्टये॑ त्व॒मर्थ॑मिव त्वमि॒त्यै ॥

विस॑दृशा जीवि॒ताभि॑प्र॒चक्ष॑ उ॒षा अ॑जीग॒र्भुव॑नानि॒ विश्वा॑ ॥ ६ ॥

क्षत्राय त्वं श्रवसे त्वं महीयै इष्टये त्वं अर्थम्ऽइव त्वं इत्यै ॥

विऽसदृशा जीविता अभिऽप्रचक्षे उषाः अजीगः भुवनानि विश्वा ॥ ६ ॥

तुम्हींपैकीं कोणी सामर्थ्य मिळविण्याचा प्रयत्न करावा, कोणी कीर्तिकरितां खटपट करावी, कोणी आपला उच्च इष्ट हेतु तडीस जावा म्हणून झटावें, कोणी आपल्या आवडत्या योजनेच्या सिद्धीस जाऊन पोंचावे आणि प्रत्येकास आपआपल्या भिन्न भिन्न चरितार्थाचा मार्ग दिसावा म्हणून ह्या उषेनें सर्व प्राणिमात्रास जागृत केलें आहे. ॥ ६ ॥

ए॒षा दि॒वो दु॑हि॒ता प्रत्य॑दर्शि व्यु॒च्छन्ती॑ युव॒तिः शु॒क्रवा॑साः ॥

विश्व॒स्येशा॑ना॒ पार्थि॑वस्य॒ वस्व॒ उषो॑ अ॒द्येह सु॑भगे॒ व्युच्छ ॥ ७ ॥

एषा दिवः दुहिता प्रति अदर्शि विऽउच्छंती युवतिः शुक्रऽवासाः ॥

विश्वस्य ईशाना पार्थिवस्य वस्वः उषः अद्य इह सुऽभगे वि उच्छ ॥ ७ ॥

शुभ्र वस्त्रें परिधान केलेली व पृथिवीवरील सर्व वैभवाची स्वामिनी अशी ही देदीप्यमान द्युलोककन्या दृगोचर झाली आहे. हे मंगलप्रद उषे आज येथें आपला उज्ज्वल प्रकाश पाड. ॥ ७ ॥

प॒रा॒य॒ती॒नामन्वे॑ति॒ पाथ॑ आयती॒नां प्र॑थ॒मा शश्व॑तीनाम् ॥

व्यु॒च्छन्ती॑ जी॒वमु॑दी॒रय॑न्त्यु॒षा मृ॒तं कं च॒न बो॒धय॑न्ती ॥ ८ ॥

पराऽयतीनां अनु एति पाथः आऽयतीनां प्रथमा शश्वतीनाम् ॥

विऽउच्छंती जीवं उत्ऽईरयंति उषाः मृतं कं चन बोधयंती ॥ ८ ॥

आपला उज्ज्वल प्रकाश सर्वत्र पाडीत, सर्व प्राण्यांस आपआपल्या कार्यास प्रवृत्त करीत व कोणी मृतवत् शय्येवर पडले असतां त्यांस जागृत करीत ही शाश्वतपणें पुढें येणाऱ्या सर्व उषातील पहिली उषा मागें गेलेल्या उषांच्या मार्गानें चालली आहे. ॥ ८ ॥

उषो॒ यद॒ग्निं स॒मिधे॑ च॒कर्थ॒ वि यदाव॒श्चक्ष॑सा॒ सूर्य॑स्य ॥

यन्मा॑नु॒षान्य॒क्ष्यमा॑णाँ॒ अजी॑ग॒स्तद्दे॒वेषु॑ चकृषे भ॒द्रमप्नः॑ ॥ ९ ॥

उषः यत् अग्निं संऽइधे चकर्थ वि यत् आवः चक्षसा सूर्यस्य ॥

यत् मानुषान् यक्ष्यमाणान् अजीगरिति तत् देवेषु चकृषे भद्रं अप्नः ॥ ९ ॥

हे उषे, तूं अग्नीस प्रदीप्त होण्यास सिद्ध केलेंस, सूर्याच्या नेत्राच्या योगानें जगतास प्रकाशित केलेस, व यज्ञव्यापृत होण्यास इच्छिणाऱ्या सर्व मानवांस तूं जागृत केलेंस, हे देवांच्यावर तुझें मोठेंच उपकाराचें कृत्य झालें. ॥ ९ ॥

किया॒त्या यत्स॒मया॒ भवा॑ति॒ या व्यू॒षुर्याश्च॑ नू॒नं व्यु॒च्छान् ॥

अनु पूर्वाः कृपते वावशाना प्रदीध्याना जोषमन्याभिरेति ॥ १० ॥

कियाति आ यत् समया भवाति या विऽऊषुः याः च नूनं विऽउच्छान् ॥

अनु पूर्वाः कृपते वावशाना प्रऽदीध्याना जोषं अन्याभिः एति ॥ १० ॥

ज्या उषा पूर्वी प्रकाशून गेल्या आणि खरोखर ज्या पुढे प्रकाशणार आहेत, त्यांपैकीं प्रत्येक किती थोडा वेळ आपणांजवळ राहणारी आहे बरें ? जी उषा येते ती मोठ्या करुण रवानें तिच्या अगोदर येऊन गेलेल्या उषांविषयी शोक करते व आपला प्रकाश प्रकट करीत इतर उषांची सोबत भेटली कीं त्यांस मिळते. ॥ १० ॥

ईयुष्टे ये पूर्वतरामपश्यन्व्युच्छन्तीमुषसं मर्त्यासः ॥

अस्माभिरू नु प्रतिचक्ष्याभूदो ते यन्ति ये अपरीषु पश्यान् ॥ ११ ॥

ईयुः ते ये पूर्वऽतरां अपश्यन् विऽउच्छंतीं उषसं मर्त्यासः ॥

अस्माभिः ऊं इति नु प्रतिऽचक्ष्या अभूत् ओ इति ते यंति ये अपरीषु पश्यान् ॥ ११ ॥

ज्या मानवांनी पूर्वकालीन उषेस प्रकाशतांना पाहिलें ते मानव गेले. ही उषा आतां आमचे दृष्टीस पडत आहे व जे पुढें येणाऱ्या उषांना पाहतील ते लोकही मार्ग क्रमीत आहेत. ॥ ११ ॥

यावयद्द्वेषा ऋतपा ऋतेजाः सुम्नावरी सूनृता ईरयन्ती ॥

सुमङ्गरलीर्बिभ्रती देववीतिमिहाद्योषः श्रेष्ठतमा व्युच्छ ॥ १२ ॥

यावयत्ऽद्वेषाः ऋतऽपाः ऋतेऽजाः सुम्नऽवरी सूनृताः ईरयंती ॥

सुऽमङ्गउलीः बिभ्रती देवऽवीतिं इह अद्य उषः श्रेष्ठऽतमा वि उच्छ ॥ १२ ॥

हे उषे, द्वेष्ट्यांचा निःपात करणारी, सत्याचे परिपालन करणारी, सत्यासाठी जन्म घेणारी, उत्कृष्ट वैभवानें युक्त, माधुर्यपरिपूर्ण असें सत्य भाषण करणारी, अत्यंत मंगल, देवांचे हवि घेऊन येणारी व त्यांत श्रेष्ठ अशी तूं, आपला उज्ज्वल प्रकाश येथें पाड. ॥ १२ ॥

शश्वत्पुरोषा व्युवास देव्यथो अद्येदं व्यावो मघोनी ॥

अथो व्युच्छादुत्तराँ अनु द्यूनजरामृता चरति स्वधाभिः ॥ १३ ॥

शश्वत् पुरा उषाः वि उवास देवि अथो इति अद्य इदं वि आवः मघोनी ॥

अथो इति वि उच्छात् उत्ऽतरात् अनु द्यून् अजरा अमृता चरति स्वधाभिः ॥ १३ ॥

ही उषादेवी प्राचीन कालापासून एकसारखी प्रकाशत आहे, त्या उदार देवतेनें ह्याप्रमाणें आजही आपला प्रकाश पाडला आहे व तसेंच ती सतत प्रकाशित राहील. ही जरा व मृत्यु ह्यांच्या पीडेपासून मुक्त अशी उषा आपल्या मार्गांनी गमन करीत असतें. ॥ १३ ॥

व्य१ञ्जिभिर्दिव आतास्वद्यौदप कृष्णां निर्णिजं देव्यावः ॥

प्रबोधयन्त्यरुणेभिरश्वैरोषा याति सुयुजा रथेन ॥ १४ ॥

वि अञ्जिभिः दिवः आतासु अद्यौत् अप कृष्णां निःऽनिजं देवी आवरित्यावः ॥

प्रऽबोधयंति अरुणेभिः अश्वः आ उषाः याति सुऽयुजा रथेन ॥ १४ ॥

आपल्या आभरणांनी मंडित अशी ही उषा द्युलोकाच्या विस्तीर्ण प्रदेशांत प्रकाशली आहे. ह्या देवीनें जगताचा कृष्ण देह शुभ्र केला आहे. आपल्या रक्तवर्ण अश्वांच्या योगानें सर्वांस जागृत करीत ही उषा आपल्या उत्तम रीतीनें सिद्ध केलेल्या रथांत आरूढ होऊन येत आहे. ॥ १४ ॥

आ॒वह॑न्ती॒ पोष्या॒ वार्या॑णि चि॒त्रं के॒तुं कृ॑णु॒ते चेकि॑ताना ॥

ई॒युषी॑णामु॒प॒मा शश्व॑तीनां विभाती॒नां प्र॑थ॒मोषा व्यश्वैत् ॥ १५ ॥

आऽवहंती पोष्या वार्याणि चित्रं केतुं कृणुते चेकिताना ॥

ईयुषीणां उपऽमा शश्वतीनां विऽभातीनां प्रथमा उषाः वि अश्वैत् ॥ १५ ॥

सर्वांच्या आवडीचे पोषक पदार्थ आपले बरोबर आणून ही प्रज्ञावती उषा आपलें आश्चर्यकारक तेज प्रकट करीत आहे. ज्या अविनाशी उषा आतांपर्यंत प्रकाशून गेल्या त्यांपैकीं शेवटची व पुढें प्रकाशमान होणाऱ्या उषांपैकीं पहिली अशा ह्या उषेनें येथें आपली प्रभा पसरली आहे. ॥ १५ ॥

उदी॑र्ध्वं जी॒वो असु॑र्न॒ आगा॒दप॒ प्रागा॒त्तम॒ आ ज्योति॑रेति ॥

आरैक्पन्थां यातवे सूर्यायागन्म यत्र प्रतिरन्त आयुः ॥ १६ ॥

उत् ईर्ध्वं जीवः असुः नः आ अगात् अप प्र अगात् तमः आ ज्योतिः एति ॥

अरैक् पंथां यातवे सूर्याय अगन्म यत्र प्रऽतिरंते आयुः ॥ १६ ॥

चला उठा, आपला चैतन्यमय प्राण आला आहे. अंधकार पळून गेला आणि प्रकाशाचे आगमन होत आहे. सूर्यास आपला प्रवास करतां यावा म्हणून उषेने त्याचेकरितां मार्ग मोकळा करून दिला आहे. जेथें सर्व लोक आपल्या आयुष्याची वृद्धि करून घेतात अशा स्थली आपण येऊन पोंचलों आहो. ॥ १६ ॥

स्यूमना वाच उदियर्ति वह्निः स्तवानो रेभ उषसो विभातीः ॥

अद्या तदुच्छ गृणते मघोन्यस्मे आयुर्नि दिदीहि प्रजावत् ॥ १७ ॥

स्यूमना वाचः उत् इयर्ति वह्निः स्तवानः रेभः उषसः विऽभातीः ॥

अद्य तत् उच्छ गृणते मघोनि अस्मे इति आयु ह् नि दिदीहि प्रजाऽवत् ॥ १७ ॥

देदीप्यमान उषाची स्तुति करीत हा स्तोता त्यांच्या सन्मानार्थ उत्तम गाणी गुंफुन तीं गात असतो. ह्यास्तव हे उदार देवी, तूं ह्या स्तोत्याकरितां आज प्रकाशित हो व आम्हांवर संततीनें युक्त अशा दीर्घ आयुष्याची प्रभा पाड. ॥ १७ ॥

या गोम॑तीरु॒षस॑ः सर्व॑वीरा व्यु॒च्छन्ति॑ दा॒शुषे॒ मर्त्या॑य ॥

वा॒योरि॑व सू॒नृता॑नामु॒दर्के ता अ॑श्व॒दा अ॑श्नवत्सोम॒सुत्वा॑ ॥ १८ ॥

या गोऽमतीः उषसः सर्वऽवीरा विऽउच्छंति दाशुषे मर्त्याय ॥

वायोःऽइव सूनृतानां उत्ऽअर्के ताः अश्वदाः अश्नवत् सोमऽसुत्वा ॥ १८ ॥

गोधनाची व अश्वांची प्राप्ति करून देणाऱ्या व सर्व वीरांना पूज्य अशा ज्या उषा, हवि अर्पण करणाऱ्या मानवाकरितां सुप्रकाशित होतात, त्यांचेप्रत हा त्यांचा सोमयागीं उपासक, हीं उत्तम स्तोत्रें वायूप्रमाणें उच्चरवानें गाइल्याबरोबर, जाऊन प्राप्त होवो. ॥ १८ ॥

मा॒ता दे॒वाना॒मदि॑ते॒रनी॑कं य॒ज्ञस्य॑ के॒तुर्बृ॑ह॒ती वि भा॑हि ॥

प्रशस्तिकृद्ब्रह्मणे नो व्यु१च्छा नो जने जनय विश्ववारे ॥ १९ ॥

माता देवानां अदितेः अनीकं यज्ञस्य केतुः बृहती वि भाहि ॥

प्रशस्तिऽकृत् ब्रह्मणे नः वि उच्छ आ नः जने जनय विश्ववारे ॥ १९ ॥

देवांची माता, अदितीचे बल, यज्ञाचा ध्वज व श्रेष्ठ अशी जी ती तूं आम्हांकरितां प्रकाश पाड. आमच्या यज्ञाची प्रशंसा करीत आमचें स्तोत्र श्रवण करून उज्ज्वल कांतीनें युक्त हो. हे सर्वांस प्रिय असणारे उषे, हया लोकांत आम्ही रहात असतां आम्हांस नवीन जीवन अर्पण कर. ॥ १९ ॥

यच्चित्रमप्न उषसो वहन्तीजानाय शशमानाय भद्रम् ॥

तन्नो मित्रो वरुणो मामहन्तामदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ॥ २० ॥

यत् चित्रं अप्नः उषसः वहंति ईजानाय शशमानाय भद्रम् ॥

तत् नः मित्रः वरुणः ममहंतां अदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ॥ २० ॥

पूजन व स्तवन करणाऱ्या उपासकासाठीं जे मंगल व आश्चर्यकारक बल उषा घेऊन येत असतील त्यास मित्र, वरुण, अदिति, सिंधु, पृथिवी व द्‌युलोक ह्या सर्वांचे अनुमोदन असो. ॥ २० ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ११४ (रुद्र सूक्त)

ऋषि : अंगिरस कुत्स - देवता : रुद्र - छंद - जगती, त्रिष्टुभ्

इ॒मा रु॒द्राय॑ त॒वसे॑ क॒प॒र्दिने॑ क्ष॒यद्वी॑राय॒ प्र भ॑रामहे म॒तीः ॥

यथा॒ शम॑सद्द्वि॒पदे॒ चतु॑ष्पदे॒ विश्वं᳚ पु॒ष्टं ग्रामे॑ अ॒स्मिन्न॑नातु॒रम् ॥ १ ॥

इमाः रुद्राय तवसे कपर्दिने क्षयत्ऽवीराय प्र भरामहे मतीः ॥

यथा शं असत् द्‌विऽपदे चतुःऽपदे विश्वं पुष्टं ग्रामे अस्मिन् अनातुरम् ॥ १ ॥

जो प्रत्यक्ष पराक्रमच आहे, जो जटाभारानें मंडित आहे व ज्याचा आश्रय अखिल वीर करीत असतात अशा रुद्रदेवास आम्ही ह्या स्तुति अर्पण करीत आहोंत. ह्या योगानें आमच्या सर्व द्विपाद व चतुष्पाद प्राण्यांचे कल्याण होईल व ह्या ग्रामांतील सर्व जन अभिवृद्धि पावून सर्व त्रासांतून मुक्त होतील. ॥ १ ॥

मृळा नो रुद्रोत नो मयस्कृधि क्षयद्वीराय नमसा विधेम ते ॥

यच्छं च योश्च मनुरायेजे पिता तदश्याम तव रुद्र प्रणीतिषु ॥ २ ॥

मृळ नः रुद्र उत नः मयः कृधि क्षयत्ऽवीराय नमसा विधेम ते ॥

यच् शं च योः च मनुः आऽयेजे पिता तत् अश्याम तव रुद्र प्रऽनीतिषु ॥ २ ॥

हे रुद्रा, आम्हांस सौख्य दे व आम्हांस आनंद होईल असें कर. ज्या तुझा सर्व शूर पुरुष आश्रय करतात त्या तुला वंदन करून आम्ही तुझी सेवा करूं. तुझा आश्रय करणाऱ्या भक्तासच प्राप्त होण्यास योग्य अशा ज्या कल्याणाची आमचा मनु ह्यानें इच्छा केली तें, हे रुद्रा, तुझ्या मार्गदर्शकत्वाखालींच आम्हांस प्राप्त होईल. ॥ २ ॥

अश्याम ते सुमतिं देवयज्यया क्षयद्वीरस्य तव रुद्र मीढ्वः ॥

सुम्नायन्निद्विशो अस्माकमा चरारिष्टवीरा जुहवाम ते हविः ॥ ३ ॥

अश्याम ते सुऽमतिं देवऽयज्यया क्षयत्ऽवीरस्य तव रुद्र मीढ्वः ॥

सुम्नऽयन् इत् विशः अस्माकं आ चर अरिष्टऽवीराः जुहवाम ते हविः ॥ ३ ॥

हे उदार रुद्रा, ज्याचा आश्रय सर्व वीर पुरुष शोधतात अशा तुझ्या कृपेचा लाभ आम्हांस देवांची उपासना केल्यामुळेंच प्राप्त होईल. आमच्या कुटुंबांतील सर्व माणसांकरितां उत्तम उत्तम वैभवें घेऊन तूं इकडे ये. आमच्या पदरचे सर्व शूर लोक खुशाल राहून आम्ही तुला हवि अर्पण करूं. ॥ ३ ॥

त्वेषं वयं रुद्रं यज्ञसाधं वङ्कुंव कविमवसे नि ह्वयामहे ॥

आरे अस्मद्दैव्यं हेळो अस्यतु सुमतिमिद्वयमस्या वृणीमहे ॥ ४ ॥

त्वेषं वयं रुद्रं यज्ञऽसाधं वङ्कुंष कविं अवसे नि ह्वयामहे ॥

आरे अस्मत् दैव्यं हेळः अस्यतु सुऽमतिं इत् वयं अस्य आ वृणीमहे ॥ ४ ॥

अतिशय त्वेषयुक्त, यज्ञ सिद्धिस नेणारा, वक्रगतीनें मंडित व प्रज्ञाशील अशा रुद्रास आम्ही आपल्या संरक्षणाकरितां निमंत्रण करतो. तो देवांचा कोप आम्हांपासून दूर घालवो. त्याच्या कृपेचीच आम्ही इच्छा करीत आहोंत. ॥ ४ ॥

दि॒वो व॑रा॒हम॑रु॒षं क॑प॒र्दिनं॑ त्वे॒षं रू॒पं नम॑सा॒ नि ह्व॑यामहे ॥

हस्ते॒ बिभ्र॑द्भेष॒जा वार्या॑णि॒ शर्म॒ वर्म॑ छ॒र्दिर॒स्मभ्यं॑ यंसत् ॥ ५ ॥

दिवः वराहं अरुषं कपर्दिनं त्वेषं रूपं नमसा नि ह्वयामहे ॥

हस्ते बिभ्रत् भेषजा वार्याणि शर्म वर्म छर्दिः अस्मभ्यं यंसत् ॥ ५ ॥

देदीप्यमान, जटाधारी व त्वेषयुक्त रूप धारण करणारा अशा त्या स्वर्गलोकांतील वराहास वंदन करून आम्ही बोलावीत आहोंत. तो आपले हातांत सर्वांना हवींशी वाटणारी औषधें धारण करून आम्हांस सौख्य, अभय व सुरक्षितपणा अर्पण करो. ॥ ५ ॥

इ॒दं पि॒त्रे म॒रुता॑मु॒च्यते॒ वचः॑ स्वा॒दोः स्वादी॑यो रु॒द्राय॒ वर्ध॑नम् ॥

रास्वा॑ च नो अमृत मर्त॒भोज॑नं॒ त्मने॑ तो॒काय॒ तन॑याय मृळ ॥ ६ ॥

इदं पित्रे मरुतां उच्यते वचः स्वादोः स्वादीयः रुद्राय वर्धनम् ॥

रास्व च नः अमृत मर्तऽभोजनं त्मने तोकाय तनयाय मृळ ॥ ६ ॥

मधुराहून मधुर व संतोषदायक असें हे स्तोत्र आम्ही मरुतांचा पिता जो रुद्र त्याचेकरितां गात आहोंत. म्हणून हे अमर देवा, तूं आम्हां मानवांस अशा भोग्य व पोषणाच्या वस्तु अर्पण कर व आम्हांस व आमच्या मुळाबाळांना सौख्य दे. ॥ ६ ॥

मा नो॑ म॒हान्तं॑मु॒त मा नो॑ अर्भ॒कं मा न॒ उक्षं॑न्तमु॒त मा नं॑ उक्षि॒तम् ॥

मा नो॑ वधीः पि॒तरं॒ मोत मा॒तरं॒ मा नः॑ प्रि॒यास्त॒न्वो रुद्र रीरिषः ॥ ७ ॥

मा नः महांतं उत मा नः अर्भकं मा न उक्षंतं उत मा नः उक्षितम् ॥

मा नः वधीः पितरं मा उत मातरं मा नः प्रियाः तन्वः रुद्र रीरिषः ॥ ७ ॥

हे रुद्रा, आमच्यांतील जे थोर असतील अथवा जे लहान असतील, जे मोठे होत असतील अथवा जे मोठे झाले असतील, त्यापैकीं कोणासही इजा पोंचू देऊं नकोस. आमचा पिता आणि आमची माता ह्यांना मारूं नकोस व आम्हांस प्रिय जो आमची शरीरें त्यांनाही इजा पोंचू देऊं नकोस. ॥ ७ ॥

मा न॑स्तो॒के तन॑ये॒ मा न॑ आ॒यौ मा नो॒ गोषु॒ मा नो॒ अश्वे॑षु रीरिषः ॥

वी॒रान्मा नो॑ रुद्र भामि॒तो व॑धीर्ह॒विष्म॑न्तः॒ सद॒मित्त्वा॑ हवामहे ॥ ८ ॥

मा नः तोके तनये मा नः आयौ मा नः गोषु मा नः अश्वेषु रीरिषः ॥

वीरान् मा नः रुद्र भामितः वधीः हविष्मंतः सदं इत् त्वा हवामहे ॥ ८ ॥

आपल्या मुलाबाळांस, आमच्या नोकरांस, आमच्या धेनूंस आणि आमच्या अश्वांस इजा पोंचू देऊं नकोस. हे रुद्रा, तूं क्रुद्ध होऊन आमच्या पदरच्या शूर पुरुषांस मारूं नकोस. आम्ही हवि अर्पण करून सदैव तुझे पूजन करीत असतो. ॥ ८ ॥

उप॑ ते॒ स्तोमा॑न्पशु॒पा इ॒वाक॑रं॒ रास्वा॑ पितर्मरुतां सु॒म्नम॒स्मे ॥

भ॒द्रा हि ते॑ सु॒म॒तिर्मृ॑ळ॒यत्त॒माथा॑ व॒यमव॒ इत्ते॑ वृणीमहे ॥ ९ ॥

उप ते स्तोमान् पशुपाःऽइव आ अकरं रास्व पितः मरुतां सुम्नं अस्मे इति ॥

भद्रा हि ते सुऽमतिः मृळयत्ऽतमा अथ वयं अवः इत् ते वृणीमहे ॥ ९ ॥

ज्याप्रमाणें गुराखी गुरें जमा करतो त्याप्रमाणें मी तुझ्या सन्मानार्थ अनेक स्तोत्रें एकत्र करीत आहे. हे मरुतांच्या पित्या, तूं आम्हांस उत्कृष्ट वैभव अर्पण कर. तुझी कृपा मंगलप्रद व अत्यंत सुखदायक आहे व ह्याचेमुळें मी तुझ्या कृपाप्रसादाचीच केवळ याचना करतो. ॥ ९ ॥

आ॒रे ते॑ गो॒घ्नमु॒त पू॑रुष॒घ्नं क्षय॑द्वीर सु॒म्नम॒स्मे ते॑ अस्तु ॥

मृ॒ळा च॑ नो॒ अधि॑ च ब्रूहि दे॒वाधा॑ च नः॒ शर्म॑ यच्छ द्वि॒बर्हाः॑ ॥ १० ॥

आरे ते गोघ्नं उत पूरुषऽघ्नं क्षयत्ऽवीर सुम्नं अस्मे इति ते अस्तु ॥

मृळ च नः अधि च ब्रूहि देव अध च नः शर्म यच्छ द्विऽबर्हाः ॥ १० ॥

धेनु व पुरुष ह्यांचा वध करणारे तुझें शस्त्र दूर राहो, व हे सर्व वीर पुरुषांना आश्रयभूत असलेल्या देवा, तुझ्याजवळील उत्कृष्ट वैभव मात्र आम्हांकरितां असो. हे देवा, तूं आम्हांस सौख्य दे आणि आमचा कैवार घेऊन बोल, आणि तूं द्‌विगुणित समर्थ्यवान असल्यामुळें आम्हांस सुरक्षितपणा अर्पण कर. ॥ १० ॥

अवो॑चाम॒ नमो॑ अस्मा अव॒स्यवः॑ शृ॒णोतु॑ नो॒ हवं॑ रु॒द्रो म॒रुत्वा॑न् ॥

तन्नो॑ मि॒त्रो वरु॑णो मामहन्ता॒मदि॑तिः॒ सिंधुः॑ पृथि॒वी उ॒त द्यौः ॥ ११ ॥

अवोचाम नमः अस्मै अवस्यवः शृणोतु नः हवं रुद्रः मरुत्वान् ॥

तत् नः मित्रः वरुणः ममहंतां अदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ॥ ११ ॥

त्या रुद्रानें आमचे रक्षण करावे अशी इच्छा बाळगून नमस्कृतिपूर्ण हे स्तोत्र आम्ही गाइले आहे, व म्हणून तो रुद्र, मरुतांसहवर्तमान, आमची हांक श्रवण करो. ह्या आमच्या प्रार्थनेस मित्र, वरुण व त्याचप्रमाणें अदिति, सिंधु, पृथिवी व द्‌युलोक ह्यांचेही अनुमोदन असो. ॥ ११ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ११५ (सौर सूक्त)

ऋषि : अंगिरस कुत्स - देवता : सूर्य - छंद - त्रिष्टुभ्

चि॒त्रं दे॒वाना॒मुद॑गा॒दनी॑कं॒ चक्षु॑र्मि॒त्रस्य॒ वरु॑णस्या॒ग्नेः ॥

आप्रा॒ द्‌यावा॑पृथि॒वी अ॒न्तरि॑क्षं॒ सूर्य॑ आ॒त्मा जग॑तस्त॒स्थुष॑श्च ॥ १ ॥

चित्रं देवानां उत् अगात् अनीकं चक्षुः मित्रस्य वरुणस्य अग्नेः ॥

आ अप्राः द्‌यावापृथिवी इति अंतरिक्षं सूर्यः आत्मा जगतः तस्थुषः च ॥ १ ॥

मित्र, वरुण व अग्नि ह्यांचे जणू कांही नेत्रच असे हे देवांचे आश्चर्यकारक बल उदय पावले आहे. स्थाव जंगम वस्तूंचा जणू कांही प्राणच अशा ह्या सूर्याने द्‌युलोक, भूलोक व अंतरिक्ष ह्यांना व्यापून टाकलें आहे. ॥ १ ॥

सूर्यो॑ दे॒वीमु॒षसं॒ रोच॑मानां॒ मर्यो॒ न योषा॑म॒भ्येति प॒श्चात् ॥

यत्रा नरौ देवयन्तौ युगानि वितन्वते प्रति भद्राय भद्रम् ॥ २ ॥

सूर्यः देवीं उषसं रोचमानां मर्यः नं योषां अभि एति पश्चात् ॥

यत्र नरः देवऽयंतः युगानि विऽतन्वते प्रति भद्राय भद्रम् ॥ २ ॥

जसा एखादा मनुष्य आपणास प्रिय अशा एखाद्या तरुणीच्या मागोमाग जाऊं लागतो त्याप्रमाणे हा सूर्य देदीप्यमान अशा ह्या उषादेवीच्या पाठीमागे चालत असून, ज्या ठिकाणी भक्तिमान लोक आपले आयुष्यक्रमण करीत असतात अशा मंगल स्थानी त्यांचे मंगल करण्याकरितां जात आहे. ॥ २ ॥

भद्रा अश्वा हरितः सूर्यस्य चित्रा एतग्वा अनुमाद्यासः ॥

नमस्यन्तौ दिव आ पृष्ठमस्थुः परि द्यावापृथिवी यन्ति सद्यः ॥ ३ ॥

भद्राः अश्वाः हरितः सूर्यस्य चित्राः एतऽग्वाः अनुऽमाद्यासः ॥

नमस्यंतः दिवः आ पृष्ठं अस्थुः परि द्यावापृथिवी इति यंति सद्यः ॥ ३ ॥

सूर्याचे अश्व मंगलप्रद, आश्चर्यकारक, अनेक प्रकारच्या रंगांचे व आनंददायक आहेत. सूर्यास नमन करून त्यांनी द्युलोकाचा पृष्ठभाग व्यापून टाकला आहे. ते द्युलोक व भूलोक ह्यांचेभोंवती निमिषमात्रांत जाऊं शक्तात. ॥ ३ ॥

तत्सूर्यस्य देवत्वं तन्महित्वंम् मध्या कर्तोर्विततं सं जभार ॥

यदेदयुक्त हरितः सधस्थादाद्रात्री वासस्तनुते सिमस्मै ॥ ४ ॥

तत् सूर्यस्य देवऽत्वं तत् महिऽत्वं मध्या कर्तोः विऽततं सं जभार ॥

यदा इत् अयुक्त हरितः सधऽस्थात् आत् रात्री वासः तनुते सिमस्मै ॥ ४ ॥

सूर्याची तीन दिव्य शक्ति, तेंच त्याचें श्रेष्ठत्व होय कीं मनुष्याचें काम चाललें असतां त्यानें मध्येंच आपलें सर्वत्र पसरलेले किरणजाल काढून घेतलें. रात्र व सूर्य ह्यांचे एकत्र निवासस्थान जें हें जग त्याचेपासून गमन करण्याकरितां जेव्हां ह्यानें आपले अश्व जोडलेले असतात तेव्हां रात्र आपले आच्छादन सर्व विश्वावर पसरते. ॥ ४ ॥

तन्मि॒त्रस्य॒ वरु॑णस्याभि॒चक्षे॒ सूर्यो॑ रू॒पं कृ॑णुते॒ द्योरु॒पस्थे॑ ॥

अ॒न॒न्तम॒न्यद्रुश॑दस्य॒ पाजः॑ कृ॒ष्णम॒न्यद्ध॒रितः॒ सं भ॑रन्ति ॥ ५ ॥

तत् मित्रस्य वरुणस्य अभिऽचक्षे सूर्यः रूपं कृणुते द्योः उपऽस्थे ॥

अनंतं अन्यत् रुशत् अस्य पाजः कृष्णं अन्यत् हरितः सं भरंति ॥ ५ ॥

मित्र आणि वरुण, ह्यांचे दृष्टीस आपलें रूप पडावें म्हणून सूर्य तें स्वर्गलोकाच्या सीमांत प्रदेशावर प्रकट करतो. त्याचे अश्व एकेवेळी त्याचें देदीप्यमान अनंत तेज, तर दुसरे वेळी त्याची कृष्ण कांति ह्यांचे प्रदर्शन करण्याकरितां त्यांस जगासमोर आणतात. ॥ ५ ॥

अ॒द्या दे॑वा॒ उदि॑ता॒ सूर्य॑स्य॒ निरंह॑सः पिपृ॒ता निर॑व॒द्यात् ॥

तन्नो॑ मि॒त्रो वरु॑णो मामहन्ता॒मदि॑तिः॒ सिंधुः॑ पृथि॒वी उ॒त द्यौः ॥ ६ ॥

अद्य देवाः उत्ऽइता सूर्यस्य निः अंहसः पिपृत निः अवद्यात् ॥

तत् नः मित्रः वरुणः ममहंतां अदितिः सिंधुः पृथिवी उत द्यौः ॥ ६ ॥

हे देवहो, आज सूर्योदय झाल्याबरोबर तुम्ही आम्हांस पातकापासून व निंदेपासून मुक्त करा. ह्या आमच्या प्रार्थनेस मित्र, वरुण व त्याचप्रमाणें अदिति, सिंधु, पृथिवी व द्युलोक ह्यांचेही अनुमोदन असो. ॥ ६ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ११६ (अश्विनीकुमार सूक्त)

ऋषि : कक्षीवत् औशिज - देवता : अश्विनी कुमार - छंद - त्रिष्टुभ्

नास॑त्याभ्यां ब॒र्हिरि॑व॒ प्र वृं॑ञ्जे॒ स्तोमाँ॑ इयर्म्य॒भ्रिये॑व॒ वातः॑ ॥

याव॒र्भ॑गाय विम॒दाय॑ जा॒यां से॑ना॒जुवा॑ न्यू॒हतू॒ रथे॑न ॥ १ ॥

नासत्याभ्यां बर्हिःऽइव प्र वृञ्जे स्तोमान् इयर्मि अभ्रियाऽइव वातः ॥

यौ अर्भगाय विऽमदाय जायां सेनाऽजुवा निऽऊहतूः रथेन ॥ १ ॥

त्या सत्यस्वरूप देवांनी बालवयाच्या विमदाकडे त्याच्या पत्नीस सैन्याप्रमाणें वेगवान अशा रथात घालून आणले, त्या देवांच्या सन्मानार्थ मी जणूं कांही कुशासनच तयार करीत आहे. कारण पहा ज्याप्रमाणें वायु हा मेघोदकांची प्रेरणा करतो त्याचप्रमाणें मीही त्यास अनेक स्तोत्रें अर्पण करीत आहे. ॥ १ ॥

वी॒ळु॒पत्म॑भिराशु॒हेम॑भिर्वा दे॒वानां॑ वा जू॒तिभिः॒ शाश॑दाना ॥

तद्रास॑भो नासत्या स॒हस्र॑मा॒जा य॒मस्य॑ प्र॒धने॑ जिगाय ॥ २ ॥

वीळुपत्मऽभिः आशुहेमऽभिः वा देवानां वा जूतिऽभिः शाशदाना ॥

तत् रासभः नासत्या सहस्रं आजा यमस्य प्रऽधने जिगाय ॥ २ ॥

ज्यांचे उड्डाण अतिशय जोराचे असते आणि ज्यांचा वेग अतिशय तीव्र असतो असे तुमचे अश्व अथवा देवांचे प्रोत्साहनपर शब्द हेंच काय ते तुम्हांस ह्या यज्ञांत आणीत असतात. परंतु हे सत्यस्वरूप देवांनो, तुमचा

रासभसुद्धां इतका सामर्थ्यवान आहे कीं स्वतः यम ज्या ठिकाणी जातीनें लढत होता अशा युद्धांत त्यानें हजारो शत्रूंना जिंकले होते. ॥ २ ॥

तुग्रो॑ ह भुज्युम॑श्विनोदमे॒घे र॒यिं न कश्चि॑न्ममृ॒वाँ अवा॑हाः ॥

तं ऊ॑हथुर्नौ॒भिरा॑त्म॒न्वती॑भिरन्तरिक्ष॒प्रुद्भि॒रपो॑दकाभिः ॥ ३ ॥

तुग्रः ह भुज्युं अश्विना उदऽमेघे रयिं न कः चित् ममृऽवान् अव अहाः ॥

तं ऊहथुः नौभिः आत्मन्ऽवतीभिः अंतरिक्षप्रुत्ऽभिः अपऽउदकाभिः ॥ ३ ॥

हे अश्विनहो, जसा एखादा मृत मनुष्य हे ऐहिक वैभव सोडून देऊन निघून जातो त्याप्रमाणे खरोखर त्या तुग्रानें भुज्यूला उदकाच्या प्रवाहांत टाकून दिले होते. पण अंतरिक्षांतून उड्डाण करणाऱ्या व उदकाच्या स्पर्शापासून अलिप्त राहणाऱ्या अशा नौकांत बसवून त्यास तुम्ही सुरक्षितपणें घेऊन आलां. ॥ ३ ॥

ति॒स्रः क्षप॒स्त्रिरहा॑ति॒व्रज॑द्भि॒र्नास॑त्या भु॒ज्युमू॑हथुः पत॒ङ्गैः ॥

समुद्रस्य धन्वन्नार्द्रस्य पारे त्रिभी रथैः शतपद्भिः षळश्वैः ॥ ४ ॥

तिस्रः क्षपः त्रिः अहा अतिव्रजत्ऽभिः नासत्या भुज्युं ऊहथुः पतंगैः ॥

समुद्रस्य धन्वन् आर्द्रस्य पारे त्रिऽभी रथैः शतपत्ऽभिः षट्ऽअश्वैः ॥ ४ ॥

हे सत्यस्वरूप देवहो, तीन दिवस व तीन रात्रीं ह्याहूनही जास्त वेळपर्यंत एकसारखे धांवणाऱ्या व पक्ष्यांप्रमाणें चपल अशा अश्वांच्या साहाय्यानें भुज्यूला शंभर खूर व सहा घोडे जोडलेल्या अशा तीन रथांत बसवून तुम्ही त्यास उदकानें भरलेल्या अशा समुद्राच्या पलीकडे कोरड्या जमीनीवर घेऊन आलां. ॥ ४ ॥

अनारम्भणे तदवीरयेथामनास्थाने अग्रभणे समुद्रे ॥

यदश्विना ऊहथुर्भुज्युमस्तं शतारित्रां नावमातस्थिवांसम् ॥ ५ ॥

अनारंभणे तत् अवीरयेथां अनास्थाने अग्रभणे समुद्रे ॥

यत् अश्विनौ ऊहथुः भुज्युं अस्तं शतऽअरित्रां नावं आ तस्थिवांसम् ॥ ५ ॥

हे अश्विनहो, जिला शंभर वल्हीं लागत होती अशा नौकेंत भुज्यूला तुम्ही त्याच्या घरी सुखरूप पोंचता केला हा तुमचा समुद्रावरचा मोठाच पराक्रम होय. कारण त्या समुद्राचा आरंभ कोठें झाला, त्याला टेंका कशाचा असतो व त्याला ताब्यांत आणावे कसें हे कांहींच समजत नव्हते. ॥ ५ ॥

यमंश्विना दुदथुः श्वेतमश्वमुघाश्वाय शश्वदित्स्वस्ति ॥

तद्वां दात्रं महि कीर्तेन्यं भूत्पैद्वो वाजी सदमिद्धव्यो अर्यः ॥ ६ ॥

यं अश्विना ददथुः श्वेतं अश्वं अघऽअश्वाय शश्वत् इत् स्वस्ति ॥

तत् वां दात्रं महि कीर्तेन्यं भूत् पैद्वः वाजी सदं इत् हव्यः अर्यः ॥ ६ ॥

हे अश्विनहो, सदोदित समाधान उत्पन्न करणारा असा जो शुभ्रवर्ण अश्व तुम्ही अधाश्वाला दिला तें तुमचे श्रेष्ठ दातृत्व खरोखर वर्णन करण्याजोगें होते. पेदूचा उत्कृष्ट अश्व सन्मान करण्यास सदैव पात्र असा झाला. ॥ ६ ॥

युवं नरा स्तुवते पज्रियाय कक्षीवते अरदतं पुरंधिम् ॥

कारोतराच्छफादश्वस्य वृष्णः शतं कुम्भाँ असिञ्चतं सुरायाः ॥ ७ ॥

युवं नरा स्तुवते पज्रियाय कक्षीवते अरदतं पुरंऽधिम् ॥

कारोतरात् शफात् अश्वस्य वृष्णः शतं कुम्भान् असिञ्चतं सुरायाः ॥ ७ ॥

पज्राच्या कुलांत उत्पन्न झालेल्या कक्षीवानानें तुमची स्तुति केल्याबरोबर तुम्ही त्याला अतिशय कुशाग्र बुद्धि अर्पण केली आणि भांड्याप्रमाणें आकार असलेल्या एका सामर्थ्यवान अश्वाच्या खुरापासून तुम्ही सुरेचे शंभर कुंभ निर्माण केले. ॥ ७ ॥

हिमेनाग्निं घ्रंसमवारयेथां पितुमतीमूर्जमस्मा अधत्तम् ॥

ऋबीसे अत्रिमश्विनावनीतमुन्निन्यथुः सर्वगणं स्वस्ति ॥ ८ ॥

हिमेन अग्निं घ्रंसं अवारयेथां पितुऽमतीं ऊर्जं अस्मै अधत्तम् ॥

ऋबीसे अत्रिं अश्विना अवऽनीतं उन् निन्यथुः सर्वऽगणं स्वस्ति ॥ ८ ॥

तुम्ही गारवा उत्पन्न करून तापदायक अग्निचें निवारण केले आणि त्या अत्रीस उत्तम पेयांच्या योगानें तकवा उत्पन्न करणारे असें नवीन बल त्याचे अंगी उत्पन्न केलें. अत्रीला खाली खळग्यांत फेंकून दिले असतां तुम्ही त्याला त्याच्या सर्व माणसांसह सुखरूप ठेवून त्यांतून वर काढलें. ॥ ८ ॥

परावतं नासत्यानुदेथामुच्चाबुध्नं चक्रथुर्जिह्मबारम् ॥

क्षरन्नापो न पायनाय राये सहस्राय तृष्यते गोतमस्य ॥ ९ ॥

परा अवतं नासत्या अनुदेथां उच्चाऽबुध्नं चक्रथुः जिह्मऽबारम् ॥

क्षरन् आपः न पायनाय राये सहस्राय तृष्यते गोतमस्य ॥ ९ ॥

हे नासत्यानो, तृषार्त गोतम ऋषींसाठी दूर अंतरावर असणारी विहीर तुम्ही जवळ आणलीत, आणि त्या विहीरीचा तळ वर आणून तिचे तोंड मोठे केलेंत. तुमच्या या कृत्याने गोतमाला विपुल जल आणि धन प्राप्त झाले. ॥ ९ ॥

जुजुरुषो नासत्योत वव्रिं प्रामुञ्चतं द्रापिमिव च्यवानात् ॥

प्रातिरतं जहितस्यायुर्दस्रादित्पतिमकृणुतं कनीनाम् ॥ १० ॥

जुजुरुषः नासत्या उत वव्रिं प्र अमुञ्चतं द्रापिंऽइव च्यवानात् ॥

प्र अतिरतं जहितस्य आयुः दस्रा आत् इत् पतिं अकृणुतं कनीनाम् ॥ १० ॥

हे सत्यस्वरूप अश्विनहो, जसें एखाद्याच्या अंगावरचें चिलखत काढून टाकावे त्याप्रमाणे तुम्ही वृद्ध च्यवनावरची वार्धक्याची कळा काढून टाकली. त्या बिचाऱ्यास सर्वांनी सोडून दिले असतां तुम्ही त्याचे आयुष्य वाढविलें व त्यास तरुण वयाच्या कुमारिकांचा पति केलें. ॥ १० ॥

तद्वां नरा शंस्यं राध्यं चाभिष्टिमन्नासत्या वरूथम् ॥

यद्विद्वांसा निधिमिवापगूळ्हमुद्दर्शतादूपथुर्वन्दनाय ॥ ११ ॥

तत् वां नरा शंस्यं राध्यं च अभिष्टिऽमन् नासत्या वरूथम् ॥

यत् विद्वांसा निधिंऽइव अपऽगूळ्हं उत् दर्शतात् ऊपथुः वंदनाय ॥ ११ ॥

हे सत्यस्वरूप व शूर अश्विनहो, हे ज्ञानवान देवांनो, ती तुमची कृपा खरोखर प्रशंसनीय, सौख्यप्प्रद व हितकारक होय कीं जिच्या योगानें तुम्ही दृष्टिआड झालेला धनाचा ठेवाच जणूं कांही, वन्दनासाठीं शोधून बाहेर काढला. ॥ ११ ॥

तद्वां नरा सनये दंस उग्रमाविष्कृणोमि तन्यतुर्न वृष्टिम् ॥

दध्यङ् ह यन्मध्वाथर्वणो वामश्वस्य शीर्ष्णा प्र यदीमुवाच ॥ १२ ॥

तत् वां नरा सनये दंसः उग्रं आविः कृणोमि तन्यतुः न वृष्टिम् ॥

दध्यङ् ह यत् मधु आथर्वणः वा अश्वस्य शीर्ष्णा प्र यत् ईं उवाच ॥ १२ ॥

हे शूरहो, ज्याप्रमाणे मेघगर्जना पर्जन्यवृष्टि होणार असें प्रसिद्ध करतें त्याप्रमाणे, मला वैभवाची प्राप्ति व्हावी म्हणून मी तुमच्या शौर्याच्या त्या कृत्याची सर्वत्र प्रसिद्धि करतो कीं ज्याच्या योगानें अथर्वाच्या वंशांतील दध्यंचानें अश्वाचे शिर धारण करून तुमचे बरोबर मधुर संभाषण केलें. ॥ १२ ॥

अजोहवीन्नासत्या करा वां महे यामन्पुरुभुजा पुरंधिः ॥

श्रुतं तच्छासुरिव वध्रिमत्या हिरण्यहस्तमश्विनावदत्तम् ॥ १३ ॥

अजोहवीत् नासत्या करा वां महे यामन् पुरुऽभुजा पुरंऽधिः ॥

श्रुतं तत् शासुःऽइव वध्रिऽमत्या हिरण्यऽहस्तं अश्विनौ अदत्तम् ॥ १३ ॥

हे सत्यस्वरूप अश्विनहो, आपण आपले दीर्घ मार्ग क्रमण करीत असतां वृध्रिमतीनें अनेक स्तोत्रें गाऊन, कर्तृत्ववान व अनेकांचे पोषण करणारे जे तुम्हीं त्या तुम्हांस हवि अर्पण केले. आपणही तीं कांही वृध्रिमतीची आज्ञाच असें समजून तिचीं स्तोत्रें ऐकलीं व तिला हिरण्यहस्त नांवाचा पुत्र दिला. ॥ १३ ॥

आस्नो वृकस्य वर्तिकामभीके युवं नरा नासत्यामुमुक्तम् ॥

उतो कविं पुरुभुजा युवं ह कृपमाणमकृणुतं विचक्षे ॥ १४ ॥

आस्नः वृकस्य वर्तिका अभीके युवं नरा नासत्या अमुमुक्तम् ॥

उतो इति कविं पुरुऽभुजा युवं ह कृपमाणं अकृणुतं विऽचक्षे ॥ १४ ॥

हे सत्यस्वरूप देवांनो, ती लावीपक्षीण लांडग्याच्या अगदीं मुखाजवळ गेली असतांना तुम्ही तिला सोडविली व हे अनेक भक्तांचे पोषण करणाऱ्या अश्विनहो, कवीनें तुमची कृपा भाकल्याबरोबर तुम्हीं त्यास पाहण्याचे सामर्थ्य दिलें. ॥ १४ ॥

च॒रित्रं॒ हि वेरि॒वाच्छे॑दि प॒र्णमा॒जा खे॒लस्य॒ परि॑तक्म्यायाम् ॥

स॒द्यो जङ्घा॒◌ुमाय॑सीं वि॒श्पला॑यै॒ धने॑ हि॒ते सर्त॑वे॒ प्रत्य॑धत्तम् ॥ १५ ॥

चरित्रं हि वेःऽइव अच्छेदि पर्णं आजा खेलस्य परिऽतक्म्यायाम् ॥

सद्यः जङ्घां◌ि आयसीं विश्पलायै धने हिते सर्तवे प्रति अधत्तम् ॥ १५ ॥

एकाद्या पक्ष्याचा ज्याप्रमाणें पंख तुटावा त्याप्रमाणें खेलाच्या युद्धांत रात्रीचे वेळेस विश्पलेचा पाय तुटला. पण लढाई सुरू झालाबरोबर तिला समरांगणावर वाटेल तेथें जातां यावें म्हणून तुम्ही तिला लगेच लोखंडाचा पाय बसविला. ॥ १५ ॥

श॒तं मे॒षान्वृ॒क्ये चक्षदा॒नमृ॒ज्राश्वं॒ तं पि॒तान्धं च॑कार ॥

तस्मा॑ अ॒क्षी ना॑सत्या वि॒चक्ष॒ आध॑त्तं दस्रा भिषजावन॒र्वन् ॥ १६ ॥

शतं मेषान् वृक्ये चक्षदानं ऋज्रऽअश्वं तं पिता अंधं चकार ॥

तस्मै अक्षी इति नासत्या विऽचक्ष आ अधत्तं दस्रा भिषजौ अनर्वन् ॥ १६ ॥

ऋज्राश्वानें एका लांडगीला खाऊं घालण्यासाठी शंभर मेंढे कापले असतां त्याच्या पित्यानें त्याला आंधळे केले. परंतु शत्रुंचा संहार करणाऱ्या हे सत्यस्वरूप वैद्यराजांनो, तुम्ही त्याला पुन्हां दिसूं लागावे म्हणून, कोणताही अडथळा येऊं न देतां, त्याचे नेत्र पुन्हां जसेच्या तसे करून ठेवले. ॥ १६ ॥

आ वां॒ रथं॑ दुहि॒ता सूर्य॑स्य॒ कार्ष्मे॑वातिष्ठ॒दर्व॑ता॒ जय॑न्ती ॥

विश्वे॑ दे॒वा अन्व॑मन्यन्त हृ॒द्भिः सम॑ु श्रि॒या ना॑सत्या सचेथे ॥ १७ ॥

आ वां रथं दुहिता सूर्यस्य कार्ष्मऽइव अतिष्ठत् अर्वता जयंती ॥

विश्वे देवाः अनु अमन्यंत हृत्ऽभिः सं ऊं इति श्रिया नासत्या सचेथे इति ॥ १७ ॥

आपल्या चपल अश्वाच्या योगानें शर्यत जिंकणारी सूर्याची दुहिता, तुमचा रथ हेंच जणूं कांही पैजेचें ठिकाण असें समजून, तुमच्या रथावर चढली. सर्व देवांनीही त्यास अंतःकरण पूर्वक मान्यता दर्शविली व हे सत्यस्वरूप देवांनो, आपण अशा रीतीनें मोठ्या वैभवानें मंडित दिसूं लागलां. ॥ १७ ॥

यदयातं दिवोदासाय वर्तिर्भरद्वाजायाश्विना हयन्ता ॥

रेवदुवाह सचनो रथो वां वृषभश्च शिंशुमारश्च युक्ता ॥ १८ ॥

यत् अयातं दिवःऽदासाय वर्तिः भरत्ऽवाजाय अश्विना हयंता ॥

रेवत् उवाह सचनः रथः वां वृषभः च शिंशुमारः च युक्ता ॥ १८ ॥

ज्यावेळीं, हे अश्विनहो, दिवोदास आणि भरद्वाज ह्यांचेसाठी तुम्ही त्वरेनें त्यांचे गृहाकडे गेलां, त्यावेळी जो रथ तुमचे बरोबर होता त्यानें पुष्कळ धन आणलें. त्यास एक वृषभ व एक नक्र असे जोडलेले होते. ॥ १८ ॥

रयिं सुक्षत्रं स्वपत्यमायुः सुवीर्यं नासत्या वहन्ता ॥

आ जह्नावीं समनसोप वाजैस्त्रिरह्नो भागं दधतीमयातम् ॥ १९ ॥

रयिं सुऽक्षत्रं सुऽअपत्यं आयुः सुऽवीर्यं नासत्या वहंता ॥

आ जह्नावीं सऽमनसा उप वाजैः स्त्रिः अह्नः भागं दधतीं अयातम् ॥ १९ ॥

दिवसातून तीन वेळा तुम्हांस हविर्भाग अर्पण करणाऱ्या जन्हूच्या वंशजाकडे, हे सत्यस्वरूप देवहो, तुम्हीं जमीन जुमला, मुळेंबाळें वगैरे वैभव व ज्यांत उत्तम पराक्रम गाजविण्याची शक्ति आहे असे आयुष्य घेऊन अतिशय सामर्थ्यासह, दोघेही एका विचारानें गेलां होतां. ॥ १९ ॥

परिविष्टं जाहुषं विश्वतः सीं सुगेभिर्नक्तमूहथू रजोभिः ॥

विभिन्दुना नासत्या रथेन वि पर्वताँ अजरयू अयातम् ॥ २० ॥

परिऽविष्टं जाहुषं विश्वतः सीं सुऽगेभिः नक्तं ऊहथूः रजःऽभिः ॥

विऽभिंदुना नासत्या रथेन वि पर्वतान् अजरयू अयातम् ॥ २० ॥

हे जरारहित व सत्यस्वरूप देवांनो, जाहुषाला चोहोंकडोन शत्रूंचा वेढा पडला असतांना तुम्ही त्यास आक्रमण करण्यास सुलभ अशा रजोलोकांतून रात्रीं घेऊन गेलां. पाषाणाचा भेद करणाऱ्या रथांत बसून तुम्ही पर्वतांतून सुद्धां मार्ग काढला. ॥ २० ॥

एकस्या वस्तोरावतं रणाय वशमश्विना सनये सहस्रा ॥

निरहतं दुच्छुना इंद्रवन्ता पृथुश्रवसो वृषणावरातीः ॥ २१ ॥

एकस्या वस्तोः आवतं रणाय वशं अश्विना सनये सहस्रा ॥

निः अहतं दुच्छुनाः इंद्रऽवंता पृथुऽश्रवसः वृषणौ अरातीः ॥ २१ ॥

हे अश्विनहो, वशाला हजारों प्रकारच्या संपत्तीचा लाभ व्हावा म्हणून तुम्हीं एका दिवसात त्यास युद्ध करण्याची शक्ति आणली. हे सामर्थ्यवान देवांनो, तुम्हीं इंद्राचे साहाय्य घेऊन पृथुश्रवाच्या दुष्ट शत्रूंचे हनन केलें. ॥ २१ ॥

शरस्य चिदार्चत्कस्यावतादा नीचादुच्चा चक्रथुः पातवे वाः ॥

शयवे चिन्नासत्या शचीभिर्जसुरये स्तर्यं पिप्यथुर्गाम् ॥ २२ ॥

शरस्य चित् आर्चत्ऽकस्य अवतात् आ नीचात् उच्चा चक्रथुः पातवे वारिति वा ॥

शयवे चित् नासत्या शचीभिः जसुरये स्तर्यं पिप्यथुः गाम् ॥ २२ ॥

ऋचत्काचा पुत्र जो शर त्याची तृषा शांत करण्याकरितां तुम्ही खोल विहिरींतून पाणी बाहेर काढलें. थकलेल्या शयूकरितांही तुम्ही न विणाऱ्या धेनूचे अंगी भरपूर दूध उत्पन्न केलें. ॥ २२ ॥

अवस्यते स्तुवते कृष्णियाय ऋजूयते नासत्या शचीभिः ॥

पशुं न नष्टमिव दर्शनाय विष्णाप्वं ददथुर्विश्वकाय ॥ २३ ॥

अवस्यते स्तुवते कृष्णियाय ऋजूऽयते नासत्या शचीभिः ॥

पशुं न नष्टंऽइव दर्शनाय विष्णाप्वं ददथुः विश्वकाय ॥ २३ ॥

हे सत्यस्वरूप देवांनो, कृष्णाच्या कुलांत उत्पन्न झालेल्या व सरळ वर्तनाच्या विश्वकानें तुमचें स्तवन करून तुमच्या साहाय्याची याचना केली. त्यामुळें ज्याप्रमाणें हरवलेले गुरु आपल्या धन्यास सांपडावें त्याप्रमाणें तुम्ही त्याचा पुत्र विष्णापू ह्याची व विश्वकाची भेट करवून विष्णापूस त्याचे स्वाधीन केलें. ॥ २३ ॥

दश॒ रात्री॒रशि॑वेना॒ नव॒ द्यूनव॑नद्धं श्नथि॒तम् अ॒प्स्व१॑न्तः ॥

विप्रु॑तं रे॒भमु॒दनि॒ प्रवृ॑क्त॒मुन्नि॑न्यथुः॒ सोम॑मिव स्रु॒वेण॑ ॥ २४ ॥

दश रात्रीः अशिवेन नव द्यून् अवऽनद्धं श्नथितं अप्ऽसु अंतरिति ॥

विऽप्रुतं रेभं उदनि प्रऽवृक्तं उत् निन्यथुः सोमंऽइव स्रुवेण ॥ २४ ॥

दहा रात्री व नऊ दिवसपर्यंत अमंगळ रीतीनें पाण्याच्या खालीं बद्ध करून ठेवलेला व त्यामुळें पीडा पावत असलेला आणि सर्वांग चिंब होऊन क्लेश भोगीत असलेला जो रेभ त्याला तुम्हीं, ज्याप्रमाणें पात्रांतून सोमरस वर काढून घ्यावा त्याप्रमाणें, पाण्यांतून बाहेर काढलें. ॥ २४ ॥

प्र वा॒ं दंसां॑स्यश्विनाववोचम॒स्य पतिः॑ स्यां सु॒गवः॑ सु॒वीरः॑ ॥

उ॒त पश्य॑न्नश्नु॒वन्दी॒र्घमायु॒रस्त॑मि॒वेज्ज॑रि॒माणं॑ जगम्याम् ॥ २५ ॥

प्र वां दंसांसि अश्विनौ अवोचं अस्य पतिः स्यां सुऽगवः सुऽवीरः ॥

उत पश्यन् अश्नुवन् दीर्घं आयुः अस्तंइव इत् जरिमाणं जगम्याम् ॥ २५ ॥

हे अश्विनहो, मी तुमची महत्कृत्यें येथें वर्णन केली आहेत. ह्याकरितां तुमच्या कृपेनें मला उत्तम धेनु व शूर मनुष्यें ह्यांची प्राप्ति होऊन मी ह्या गृहाचा वैभवशाली यजमान होईन. माझी दृष्टि शाबूत राहून आणि मला दीर्घ आयुष्य प्राप्त होऊन, हे अश्विनहो, ज्याप्रमाणें एखादा मनुष्य आपल्या सदनांत आनंदानें प्रवेश करतो त्याप्रमाणे माझा वार्धक्यदशेंत आनंदानें प्रवेश होवो. ॥ २५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ११७ (अश्विनीकुमार सूक्त)

ऋषि : कक्षीवत् औशिज - देवता : अश्विनी कुमार - छंद - त्रिष्टुभ्

मध्वः सोमस्याश्विना मदाय प्रत्नो होता विवासते वाम् ॥

बर्हिष्मती रातिर्विश्रिता गीरिषा यातं नासत्योप वाजैः ॥ १ ॥

मध्वः सोमस्य अश्विना मदाय प्रत्नःव होता आ विवासते वाम् ॥

बर्हिष्मती रातिः विऽश्रिता गीः इषा यातं नासत्या उप वाजैः ॥ १ ॥

हे अश्विनहो, मधुर सोमरसानें तुम्हांस आनंद व्हावा म्हणून हा तुमचा पुरातन सेवक तुमची उपासना करीत आहे. आम्ही आपला हवि पवित्र दर्भांवर ठेवला आहे व आमची स्तुतिही तुमचेप्रत जाऊन पोंचली आहे. ह्याकरितां आम्हांस पुरेल इतके अन्नसाहित्य व अनेक प्रकारचें सामर्थ्य बरोबर घेऊन या. ॥ १ ॥

यो वामश्विना मनसो जवीयान्रथः स्वश्वो विश आजिगाति ॥

येन गच्छथः सुकृतो दुरोणं तेन नरा वर्तिरस्मभ्यं यातम् ॥ २ ॥

यः वा अश्विना मनसः जवीयान् रथः सुऽअश्वः विश आऽजिगाति ॥

येन गच्छथः सुकृतः दुरोणं तेन नरा वर्तिः अस्मभ्यं यातम् ॥ २ ॥

हे अश्विनहो, मनापेक्षांही चपळ असा तुमचा रथ सुंदर अश्वांनी युक्त होऊन सर्व लोकांचेकडे येत आहे. ज्या रथांत बसून तुम्ही सदाचारी पुरुषांच्या गृहांकडे जात असता त्यांत विराजमान होऊन, हे शूरहो, आमचेसाठी आमच्या गृहाकडे या. ॥ २ ॥

ऋषिं॑ न॒रा॒वंह॑सः॒ पाञ्च॑जन्यमृ॒बीसा॒दत्रिं॑ मुञ्चथो ग॒णेन॑ ॥

मि॒नन्ता॒ दस्यो॒रशि॑वस्य मा॒या अ॑नुपू॒र्वं वृ॑षणा चो॒दय॑न्ता ॥ ३ ॥

ऋषिं नराउ अंहसः पाञ्चजन्यं ऋबीसात् अत्रिं मुञ्चथः गणेन ॥

मिनंता दस्योः अशिवस्य मायाः अनुऽपूर्वं वृषणा चोदयंता ॥ ३ ॥

हे सामर्थ्यवान वीरहो, पहिल्याप्रमाणें आमची उत्कर्षाकडें प्रेरणा करून आणि त्या अभद्र दानवाच्या सर्व युक्त्यांची मोड करून तुम्ही त्या पांचही प्रकारच्या लोकांस प्रिय अशा अत्रि ऋषीस, त्याच्या सर्व माणसांसहवर्तमान, अतिशय भयंकर गुहेमधून बाहेर काढले. ॥ ३ ॥

अश्वं न गूळ्हमश्विना दुरेवैरृषिं नरा वृषणा रेभमप्सु ॥

सं तं रिणीथो विप्रुतं दंसोभिर्न वां जूर्यन्ति पूर्व्या कृतानि ॥ ४ ॥

अश्वं न गूळ्हं अश्विना दुःऽएवैः ऋषिं नरा वृषणा रेभं अप्ऽसु ॥

सं तं रिणीथः विऽप्रुतं दंसःऽभिः न वा जूर्यंति पूर्व्या कृतानि ॥ ४ ॥

रेभ ऋषि पाण्यांत बुडून जाऊन, दुष्ट लोकांच्या कृतिमुळे, एखाद्या घोड्याप्रमाणें जलांत अदृश्य होऊन गेला होता. तरी पण, हे समर्थ्यवान वीरांनो, तुम्ही अद्भुत कृति करून त्याचा बचाव केला. तुमची कृत्यें कितीही पुरातन असलीं तरी तीं कधींही जुनीं होत नाहींत. ॥ ४ ॥

सुषुप्वांसं न निरृतेरुपस्थे सूर्यं न दस्रा तमसि क्षियन्तम् ॥

शुभे रुक्मं न दर्शतं निखातमुदूपथुरश्विना वन्दनाय ॥ ५ ॥

सुसुप्वासं न निःऽऋतेः उपऽस्थे सूर्यं न दस्रा तमसि क्षियंतम् ॥

शुभे रुक्मं न दर्शतं निऽखातं उत् ऊपथुः अश्विना वंदनाय ॥ ५ ॥

शत्रूंचा संहार करणाऱ्या हे अश्विनी देवांनो, विनाशाच्या जणूं पायथ्याशी लोंबत पडलेला व तसेंच सूर्याप्रमाणें अंधकारांत असलेला सुंदर द्रव्यसंचय, सुवर्ण ज्याप्रमाणें उकरून बाहेर काढतात त्याप्रमाणे, वंदनाच्या कल्याणार्थ तुम्ही बाहेर काढला. ॥ ५ ॥

तद्वां नरा शंस्यं पज्रियेण कक्षीवंता नासत्या परिज्मन् ॥

शफादश्वस्य वाजिनो जनाय शतं कुम्भाँ असिञ्चतं मधूनाम् ॥ ६ ॥

तत् वां नरा शंस्यं पज्रियेण कक्षीवता नासत्या परिऽज्मन् ॥

शफात् अश्वस्य वाजिनः जनाय शतं कुंभान् असिञ्चतं मधूनाम् ॥ ६ ॥

हे शूर व सत्यस्वरूप देवांनो, पज्रकुळांत जन्मलेल्या कक्षीवानाकडून स्तुति व्हावी असेंच तें तुमचे कृत्य होते. कारण परिभ्रमण करीत असतां तुम्हीं एका सामर्थ्यवान अश्वाच्या खुरापासून लोकांचे हिताकरितां मधुर रसाचे शंभर घट उत्पन्न केले. ॥ ६ ॥

युवं नरा स्तुवते कृष्णियाय विष्णाप्वं ददथुर्विश्वकाय ॥

घोषायै चित्पितृषदे दुरोणे पतिं जूर्यन्त्या अश्विनावदत्तम् ॥ ७ ॥

युवं नरा स्तुवते कृष्णियाय विष्णाप्वं ददथुः विश्वकाय ॥

घोषायै चित् पितृऽसदे दुरोणे पतिं जूर्यंत्यै अश्विनौ अदत्तम् ॥ ७ ॥

हे वीरांनो, कृष्णवंशोत्पन्न विश्वकानें तुमचे स्तवन केले म्हणून तुम्ही त्यास त्याचा पुत्र विष्णापू शोधून दिला आणि पित्याच्या घरी राहून राहून वृद्ध होत चाललेल्या घोषेलाही तुम्ही पति पाहून दिला. ॥ ७ ॥

युवं श्यावाय रुशतीमदत्तं महः क्षोणस्याश्विना कण्वाय ॥

प्रवाच्यं तद्वृषणा कृतं वां यन्नार्षदाय श्रवो अध्यधत्तम् ॥ ८ ॥

युवं श्यावाय रुशतीं अदत्तं महः क्षोणस्य अश्विना कण्वाय ॥

प्रऽवाच्यं तत् वृषणा कृतं वा यत् नार्सदाय श्रवः अधिऽअधत्तम् ॥ ८ ॥

हे अश्विनहो, तुम्ही श्यावाला रुशती नांवाची भार्या दिली आणि कण्वास गृहसौख्य अर्पण केले. हे सामर्थ्यवान देवांनो, तें तुमचे कृत्य खरोखर वर्णन करण्याजोगें आहे कीं तुम्ही नृषदाच्या पुत्रास कान दिले. ॥ ८ ॥

पुरू वर्पांस्यश्विना दधाना नि पेदवं ऊहथुराशुमश्वंम् ॥

सहस्रसां वाजिनमप्रंतीतमहिहनं श्रवस्यं१ंतरुंत्रम् ॥ ९ ॥

पुरू वर्पांसि अश्विना दधाना नि पेदव ऊहथुः आशुं अश्वम् ॥

सहस्रऽसां वाजिनं अप्रतिऽइतं अहिऽहनं श्रवस्यं तरुत्रम् ॥ ९ ॥

अनेक प्रकारची रूपें धारण करणाऱ्या हे अश्विनहो, तुम्हीं पेदूकरितां असा अश्व आणला कीं जो सहस्रावधि वैभवें जिंकून आणण्याजोगा होता, ज्याचें सामर्थ्य मोठें होते, ज्याला कोठेंही जोड मिळण्याजोगी नव्हती, जो सर्पाचा वध करणारा होता, ज्याची कीर्ति फार पसरली होती आणि जो संकटांतून बचाव करण्याजोगा होता. ॥ ९ ॥

एतानिं वां श्रवस्या सुदानू ब्रह्मांङ्गूषं सदंनं रोदंस्योः ॥

यद्वां पज्रासो अश्विना हवन्ते यातमिषा च विदुषे च वाजम् ॥ १० ॥

एतानि वां श्रवस्या सुदानू ब्रह्म आङ्गूसषं सदनं रोदस्योः ॥

यत् वा पज्रासः अश्विना हवंते यातं इषा च विदुषे च वाजम् ॥ १० ॥

हे अत्यंत उदार देवांनो, हेच तुमचे कीर्तिमान पराक्रम होत. द्युलोकांत अथवा भूलोकांत स्तुतिस्तोत्रें हेंच तुमचे निवासस्थान असतें. हे अश्विनहो, ज्या अर्थी पज्र हे तुमचा धांवा करीत आहेत त्या अर्थी विपुल अन्नसामग्री घेऊन इकडे या व ह्या विद्वान स्तुतिकर्त्याला सामर्थ्य अर्पण करा. ॥ १० ॥

सूनोर्मानेनाश्विना गृणाना वाजं विप्राय भुरणा रदन्ता ॥

अगस्त्ये ब्रह्मणा वावृधाना सं विश्पलां नासत्यारिणीतम् ॥ ११ ॥

सूनोः मानेन अश्विना गृणाना वाजं विप्राय भुरणा रदंता ॥

अगस्त्ये ब्रह्मणा ववृधाना सं विश्पलां नासत्या अरिणीतम् ॥ ११ ॥

सर्व विश्वाचे पोषण करणाऱ्या व सत्यस्वरूप अशा हे अश्विनी देवांनो, जेव्हां मानानें तुमची पुत्रप्राप्त्यर्थ स्तुति केली त्यावेळी त्या विद्वान उपासकास सामर्थ्य अर्पण करून तुम्ही अगस्त्यानें केलेल्या स्तोत्रांत संतोष मानीत विश्पलेला तिच्या व्यथेपासून बरी केली. ॥ ११ ॥

कुह॒ यान्ता॑ सुष्टु॒तिं का॒व्यस्य॒ दिवो॑ नपाता वृषणा शयु॒त्रा ॥

हिर॑ण्यस्येव क॒लशं॒ निखा॑त॒मुदू॑पथु॒र्दश॒मे अ॑श्वि॒नाह॑न् ॥ १२ ॥

कुह यांता सुऽस्तुतिं काव्यस्य दिवः नपाता वृषणा शयुऽत्रा ॥

हिरण्यस्यऽइव कलशं निऽखातं उत् ऊपथुः दशमे अश्विना अहन् ॥ १२ ॥

हे अश्विनहो, हे सामर्थ्यवान द्युलोक पुत्रांनो, शयूचें संरक्षण करणारे असे तुम्ही काव्याची सुंदर स्तुति ग्रहण करण्याकरितां त्यावेळी कोठें निभाला होता कीं ज्यावेळी, जसा एखादा सोन्याचा हांडा उकरून बाहेर काढावा त्याप्रमाणें गुप्त ठेवलेला भांडार, तुम्ही दहाव्या दिवशी बाहेर काडलें ? ॥ १२ ॥

यु॒वं च्यवा॑नमश्विना॒ जर॑न्तं॒ पुन॒र्युवा॑नं चक्रथुः॒ शची॑भिः ॥

यु॒वो रथं॑ दुहि॒ता सूर्य॑स्य स॒ह श्रि॒या ना॑सत्यावृणीत ॥ १३ ॥

युवं च्यवानं अश्विना जरंतं पुनः युवानं चक्रथुः शचीभिः ॥

युवोः रथं दुहिता सूर्यस्य सह श्रिया नासत्या अवृणीत ॥ १३ ॥

हे अश्विनहो, वृद्धावस्था येत चाललेया च्यवनास तुम्ही आपल्या सामर्थ्यानें पुन्हां तरुण केलें. हे सत्यस्वरूप देवांनो, सूर्याच्या कन्येनेंही आपल्या सर्व वैभवासह आरूढ होण्यासाठी तुमच्याच रथाची निवड केली. ॥ १३ ॥

यु॒वं तुग्रा॑य पू॒र्व्येभि॑रे॒वैः पुन॑र्म॒न्याव॑भवतं युवाना ॥

यु॒वं भु॒ज्युमर्ण॑सो॒ निः स॑मु॒द्राद्विभि॑रूहथुर्ऋ॒ज्रेभि॒रश्वैः॑ ॥ १४ ॥

युवं तुग्राय पूर्व्येभिः एवैः पुनः मन्यौ अभवतं युवाना ॥

युवं भुज्युं अर्णसः निः समुद्रात् विऽभिः ऊहथुः ऋज्रेभिः अश्वैः ॥ १४ ॥

हे तारुण्ययुक्त देवांनो, आपल्या प्राचीन पद्धतीस अनुसरून तुम्हांस तुग्रासंबंधानें पुन्हा कळवळा आला. तुम्ही भुज्यूला, आपल्या पक्ष्यांप्रमाणे दिसणाऱ्या चपल अश्वांचे साहाय्यानें, मोठमोठ्या लाटा चालत असतांही समुद्रांतून बाहेर काढले. ॥ १४ ॥

अजो॑हवीदश्विना तौ॒ग्र्यो वां॒ प्रोळ्हः॑ समु॒द्रम॑व्य॒थिर्ज॑ग॒न्वान् ॥

निष्टमू॑हथुः सु॒युजा॒ रथे॑न॒ मनो॑जवसा वृषणा स्व॒स्ति ॥ १५ ॥

अजोहवीत् अश्विना तौग्र्यः वा प्रऽऊळ्हः समुद्रं अव्यथिः जगन्वान् ॥

निः तं ऊहथुः सुऽयुजा रथेन मनःऽजवसा वृषणा स्वस्ति ॥ १५ ॥

हे अश्विनहो, तुग्राच्या पुत्रानें तुमचे पूजन केले. त्यास समुद्रावर कामगिरीवर पाठविले असतां तो बिलकुल न घाबरतां गेला. हे सामर्थ्यवान देवांनो, उत्तम रीतीनें सिद्ध केलेल्या व मनाप्रमाणें वेगवान असलेल्या अशा आपल्या रथांत घालून तुम्ही त्यास सुखरूप बाहेर काढले. ॥ १५ ॥

अजो॑हवीदश्विना॒ वर्ति॑का वामा॒स्नो यत्सी॒ममु॑ञ्चतं॒ वृक॑स्य ॥

वि जयुषा ययथुः सान्वद्रेर्जातं विष्वाचो अहतं विषेण ॥ १६ ॥

अजोहवीत् अश्विना वर्तिका वां आस्नः यत् सीं अमुञ्चतं वृकस्य ॥

वि जयुषा ययथुः सानु अद्रेः जातं विष्वाचः अहतं विषेण ॥ १६ ॥

हे अश्विनहो, ज्या वेळी तुम्ही लावी पक्षिणीस लांडग्याच्या मुखांतून सोडविली त्या वेळी तिने तुमचे पूजन केले. तुम्ही आपल्या विजयी रथांत बसून पर्वताच्या शिखराचा भेद करून गेलां आणि विष्णापूच्या पुत्रास विष घालून मारून टाकले. ॥ १६ ॥

शतं मेषान्वृक्ये मामहानं तमः प्रणीतमशिवेन पित्रा ॥

आक्षी ऋज्राश्वे अश्विनावधत्तं ज्योतिरन्धाय चक्रथुर्विचक्षे ॥ १७ ॥

शतं मेषान् वृक्ये ममहानं तमः प्रऽनीतं अशिवेन पित्रा ॥

आ अक्षी इति ऋज्रऽअश्वे अश्विनौ अधत्तं ज्योतिः अंधाय चक्रथुः विऽचक्षे ॥ १७ ॥

ऋज्राश्वानें लांडगीला खाऊं घालण्यासाठी तिला शंभर मेंढे आणून दिल्यामुळें त्याच्या दुष्ट बापानें त्यास आंधळे केले असतां तुम्ही त्यावर अनुग्रह करून त्यास डोळे दिले आणि त्या बिचाऱ्यास दृष्टि यावी म्हणून त्याच्या नेत्रांत तुम्ही प्रकाश उत्पन्न केला. ॥ १७ ॥

शु॒नम॒न्धाय॒ भर॑मह्वय॒त्सा वृ॒कीर॑श्विना वृषणा॒ नरेति॑ ॥

जा॒रः क॒नीन॑ इव चक्षदा॒न ऋ॒ज्राश्वः॑ श॒तमेकं॑ च मे॒षान् ॥ १८ ॥

शुनं अंधाय भरं अह्वयत् सा वृकीः अश्विना वृषणा नरा इति ॥

जारः कनीनःऽइव चक्षदानः ऋज्रऽअश्वः शतं एकं च मेषान् ॥ १८ ॥

त्या लांडग्यानें त्या अंध ऋज्राश्वासाठी अतिशय कळवळ्याने प्रार्थना केली - " हे अश्विनहो, हे सामर्थ्यवान देवांनो, हे वीरहो, ऋज्राश्वानें माझेकरितां, एखाद्या तारुण्याच्या ऐन भरांत आलेल्या वल्लभाप्रमाणें, एकशे एक मेंढे मला कापून खावयास घातले". ॥ १८ ॥

म॒ही वा॑मू॒तिर॑श्विना मयो॒भूरु॒त स्रा॒मं धि॑ष्ण्या॒ सं रि॑णीथः ॥

अथा युवामिदह्वयत्पुरंधिरागच्छतं सीं वृषणाववोभिः ॥ १९ ॥

मही वां ऊतिः अश्विना मयःऽभूः उत स्रामं धिष्ण्या सं रिणीथः ॥

अथ युवां इत् अह्वयत् पुरंऽधिः आ अगच्छतं सीं वृषणौ अवःऽभिः ॥ १९ ॥

हे अश्विनहो, भक्तजन संरक्षक असें तुमचें सामर्थ्य विशाल व सौख्यप्रद आहे. हे धैर्यशाली देवांनो, तुम्ही पंगू मनुष्यासमुद्धां पुन्हां बरे करतां; ह्याच कारणाकरितां पुरंदीनें सुद्धां तुम्हालाच आमंत्रण केले. हे शूरांनो, तुम्ही आपल्या सामर्थ्यासह तिचे रक्षणार्थ तिकडे गेलां. ॥ १९ ॥

अधेनुं दस्रा स्तर्यं१ विषक्तामपिन्वतं शयवे अश्विना गाम् ॥

युवं शचीभिर्विमदाय जायां न्यूहथुः पुरुमित्रस्य योषाम् ॥ २० ॥

अधेनुं दस्रा स्तर्यं विऽसक्तां अपिन्वतं शयवे अश्विना गाम् ॥

युवं शचीभिः विऽमदाय जाया नि ऊहथुः पुरुऽमित्रस्य योषाम् ॥ २० ॥

शत्रूंचा संहार करणाऱ्या हे अश्विनी देवांनो, तुम्ही शयूकरितां, कधी दूध न देणाऱ्या, कधीं न विणाऱ्या व अतिशय कृश झालेल्या गाईचें अंगी भरपूर दूध आणले. तुम्ही आपल्या सामर्थ्यानें पुरुमित्राची कन्या विमदास बायको करून दिली. ॥ २० ॥

यव॒ं वृके॑णाश्विना॒ वप॒न्तेषं॑ दु॒हन्ता॒ मनु॑षाय दस्रा ॥

अ॒भि दस्यु॒ं बकु॑रेणा॒ धम॑न्तो॒रु ज्योति॑श्चक्रथु॒रार्या॑य ॥ २१ ॥

यवं वृकेण अश्विना वपंता इषं दुहंता मनुषाय दस्रा ॥

अभि दस्युं बकुरेण धमंता उरु ज्योतिः चक्रथुः आर्याय ॥ २१ ॥

शत्रूंचा संहार करणाऱ्या हे अश्विनहो, नांगराच्या योगानें धान्य पेरीत, मानवांकरितां अन्नसामग्री निर्माण करीत, आणि आपल्या वज्राच्या योगानें दुष्टांचे निर्दालन करीत, तुम्ही भक्तिमान लोकांकरितां विपुल प्रकाश उत्पन्न केला. ॥ २१ ॥

आ॒थ॒र्व॒णाया॑श्विना दधी॒चेऽ॑श्व्य॒ं शिर॒ः प्रत्यै॑रयतम् ॥

स वा॒ं मधु॒ प्र वो॑चदृता॒यन्त्वा॒ष्ट्रं यद्द॑स्रावपिक॒क्ष्यं वाम् ॥ २२ ॥

आथर्वणाय अश्विना दधीचे अश्व्यं शिरः प्रति ऐरयतम् ॥

सः वां मधु प्र वोचत् ऋतऽयन् त्वाष्ट्रं यत् दस्रौ अपिऽकक्ष्यं वाम् ॥ २२ ॥

हे अश्विनहो, अथर्वाचा पुत्र जो दध्यङ् त्यास तुम्ही अश्वाचें शिर लावलें. नंतर त्या सत्य वर्तनाच्या पुरुषानें तुम्हांस असें एक मधुर गुह्य सांगितले की जे केवल त्वष्टादेवास विदित होते व जे तुम्हांस मोठें रहस्य असें वाटलें. ॥ २२ ॥

सदा॑ कवी सुम॒तिमा च॑के वा॒ं विश्वा॒ धियो॑ अश्विना॒ प्राव॑तम् मे ॥

अ॒स्मे र॒यिं ना॑सत्या बृ॒हन्त॑मपत्य॒साचं॒ श्रुत्यं᳚ रराथाम् ॥ २३ ॥

सदा कवी इति सुऽमतिं आ चके वा विश्वाः धियः अश्विना प्र अवतं मे ॥

अस्मे इति रयिं नासत्या बृहंतं अपत्यऽसाचं श्रुत्यं रराथाम् ॥ २३ ॥

हे विज्ञानशाली देवांनो, तुमच्या कृपेचीच मी नेहमी याचना करतो. हे अश्विनहो, माझ्या सर्व स्तुतींचे प्रेमानें ग्रहण करा. हे सत्यस्वरूप देवांनो, आम्हांस अपत्यसहित व कीर्तियुक्त असे विपुल वैभव अर्पण करा. ॥ २३ ॥

हिर॑ण्यहस्तमश्विना॒ ररा॑णा पु॒त्रं न॑रा वध्रिम॒त्या अ॑दत्तम् ॥

त्रिधा॑ ह॒ श्याव॑मश्विना॒ विक॑स्त॒मुज्जी॒वस॑ ऐरयतं सुदानू ॥ २४ ॥

हिरण्यऽहस्तं अश्विना रराणा पुत्रं नरा वध्रिऽमत्याः अदत्तम् ॥

त्रिधा ह श्यावं अश्विना विऽकस्तं उत् जीवसे ऐरयतं सुदानू इति सुऽदानू ॥ २४ ॥

हे उदार व शूर अश्विनहो, तुम्ही वध्रिमतीला हिरण्यहस्त नांवाचा पुत्र दिला. हे अत्यन्त दातृत्वशील अश्विनी देवांनो, श्यावाचें शरीर तीन ठिकाणी विच्छिन्न झालें असतां तुम्ही त्यास पुन्हां चैतन्य दशेकडे घेऊन गेला. ॥ २४ ॥

ए॒तानि॑ वामश्विना वी॒र्या॑णि॒ प्र पू॒र्व्याण्या॒यवो॑ऽवोचन् ॥

ब्रह्म॑ कृ॒ण्वन्तौ॑ वृषणा यु॒वभ्यां᳚ सु॒वीरा॑सो वि॒दथ॒मा व॑देम ॥ २५ ॥

एतानि वां अश्विना वीर्याणि प्र पूर्व्याणि आयवः अवोचन् ॥

ब्रह्म कृण्वंतः वृषणा युवऽभ्यां सुऽवीरासः विदथं आ वदेम ॥ २५ ॥

हे अश्विनहो, ही तुमची पुरातन महत्कृत्यें अनेक मनुष्यांनी वर्णन केलेलीं आहेत. हे सामर्थ्यवान देवांनो, तुमचें स्तोत्र गात आम्ही आपल्या कुलांतील वीर पुरुषांसह आमच्या यज्ञाची कीर्ति वाढवूं. ॥ २५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ११८ (अश्विनीकुमार सूक्त)

ऋषि : कक्षीवत् औशिज - देवता : अश्विनी कुमार - छंद - त्रिष्टुभ्

आ वां॒ रथौ॑ अश्विना श्ये॒नप॑त्वा सुमृ॒ळी॒कः स्ववाँ᳚ यात्व॒र्वाङ् ॥

यो मर्त्यस्य मनसो जवीयान्त्रिवन्धुरो वृषणा वातरंहाः ॥ १ ॥

आ वा रथः अश्विना श्येनऽपत्वा सुऽमृळीकः स्वऽवान् यातु अर्वाङ् ॥

यः मर्त्यस्य मनसः जवीयान् त्रिऽवंधुरः वृषणा वातऽरंहाः ॥ १ ॥

हे बलशाली अश्विनहो, जो मानवांच्या मनापेक्षांही चपल आहे, ज्यास तीन वन्धुरा आहेत, व ज्याचा वेग वाऱ्याप्रमाणें आहे असा तुमचा स्वकीय तेजानें शोभणारा व सुखावह रथ, त्यास जोडलेल्या शेनपक्ष्यांच्या योगानें उड्डाण करीत इकडे येवो. ॥ १ ॥

त्रिवन्धुरेण त्रिवृता रथेन त्रिचक्रेण सुवृता यातमर्वाक् ॥

पिन्वतं गा जिन्वतमर्वतो नो वर्धयतमश्विना वीरमस्मे ॥ २ ॥

त्रिऽवंधुरेण त्रिऽवृता रथेन त्रिऽचक्रेण सुऽवृता आ यातं अर्वाक् ॥

पिन्वतं गाः जिन्वतं अर्वतः नः वर्धयतं अश्विना वीरं अस्मे इति ॥ २ ॥

हे अश्विनहो, तीन वन्धुरांनी युक्त, त्रिकोणाकृति, व तीन चाकें असलेल्या अशा आपल्या सुंदर रथांत बसून इकडे या. आमच्या गाईंच्या अंगी भरपूर दूध उत्पन्न करा आणि आमच्या अश्वांस चपलता आणा. आमच्याकरितां आमच्या कुलांतील वीर पुरुषांची भरभराट करा. ॥ २ ॥

प्रवद्यामना सुवृता रथेन दस्राविमं शृणुतं श्लोकमद्रेः ॥

किमङ्गं वां प्रत्यवर्तिं गमिष्ठाहुर्विप्रासो अश्विना पुराजाः ॥ ३ ॥

प्रवत्ऽयामना सुऽवृता रथेन दस्रौ इमं शृणुतं श्लोकं अद्रेः ॥

किं अङ्गग वां प्रति अवर्तिं गमिष्ठा आहुः विप्रासः अश्विना पुराऽजाः ॥ ३ ॥

शत्रूंचा संहार करणाऱ्या हे देवांनो, आपल्या सरल गतीच्या सुंदर रथांत आरूढ होऊन सोमपाषाणाचा हा सुंदर ध्वनि श्रवण करा. हे अश्विनहो, प्राचीन विद्वान लोक आपणांस " क्लेशहरणार्थ सत्वर गमन करणारे " असे कां म्हणत होते बरें ? ॥ ३ ॥

आ वां श्येनासो अश्विना वहन्तु रथे युक्तास आशवः पतंगाः ॥

ये अप्तुरो दिव्यासो न गृध्रा अभि प्रयो नासत्या वहन्ति ॥ ४ ॥

आ वां श्येनासः अश्विना वहंतु रथे युक्तासः आशवः पतंगाः ॥

ये अप्ऽतुरः दिव्यासः न गृध्राः अभि प्रयः नासत्या वहंति ॥ ४ ॥

हे अश्विनहो, तुमच्या रथास जोडलेले, व उड्डाण करण्यांत प्रवीण असलेले असे तुमचे चपल श्येनपक्षी तुम्हांस इकडे घेऊन येवोत. हे सत्यस्वरूप देवांनो, द्युलोकांतील गृध्रांप्रमाणे ते आमचे परिपालन करणारे आहेत आणि आमचेसाठी ते आमच्या उपजीविकेची सामग्री घेऊन येत असतात. ॥ ४ ॥

आ वां रथं युवतिस्तिष्ठदत्र जुष्ट्वी नरा दुहिता सूर्यस्य ॥

परि वामश्वा वपुषः पतंगा वयो वहन्त्वरुषा अभीके ॥ ५ ॥

आ वां रथं युवतिः तिष्ठत् अत्र जुष्ट्वी नरा दुहिता सूर्यस्य ॥

परि वां अश्वाः वपुषः पतंगाः वयः वहंतु अरुषाः अभीके ॥ ५ ॥

हे शूरहो, ती प्रेमळ युवति - सूर्याची कन्या - येथें तुमच्या रथावर आरूढ होत आहे. तुमचे सुंदर अश्व - तुमचे ते उड्डाण करणारे देदीप्यमान पक्षी - तुम्हास इकडे घेऊन येवोत. ॥ ५ ॥

उद्वन्दंनमैरतं दंसनाभिरुद्रेभं दंस्रा वृषणा शचीभिः ॥

निष्टौग्र्यं पारयथः समुद्रात्पुनश्च्यवानं चक्रथुर्युवानम् ॥ ६ ॥

उत् वंदनं ऐरतं दंसनाभिः उत् रेभं दस्रा वृषणा शचीभिः ॥

निः तौग्र्यं पारयथः समुद्रात् पुनरिति च्यवानं चक्रथुः युवानम् ॥ ६ ॥

शत्रूंचा संहार करणाऱ्या हे सामर्थ्यवान देवांनो, तुम्ही आपल्या अद्भुत कृतींनी वंदनास वर आणले व आपल्या सामर्थ्यानें रेभासही वरती उचलून घेतलें. तुम्ही तुग्राच्या पुत्रास समुद्रांतून पलीकडे घेऊन गेलां व च्यवनास फिरून तरुण केलें. ॥ ६ ॥

युवमत्रयेऽवनीताय तप्तमूर्जमोमानमश्विनावधत्तम् ॥

यु॒वं कण्वा॒यापि॑रिप्ताय॒ चक्षु॒ः प्रत्य॑धत्तं सुष्टु॒तिं जु॑जुषा॒णा ॥ ७ ॥

युवं अत्रये अवऽनीताय तप्तं ऊर्जं ओमानं अश्विनौ अधत्तम् ॥

युवं कण्वाय अपिऽरिप्ताय चक्षुः प्रति अधत्तं सुऽस्तुतिं जुजुषाणा ॥ ७ ॥

हे अश्विनहो, खाली तप्त स्थली नेलेल्या अत्रीस तुम्ही सामर्थ्य व साह्य अर्पण केलें. आंधळा बनलेल्या अत्रीची सुंदर स्तुति ग्रहण करून तुम्ही त्यास डोळे दिले. ॥ ७ ॥

यु॒वं धे॒नुं श॒यवे॑ नाधि॒तायापि॑न्वतमश्विना पू॒र्व्याय॑ ॥

अमु॑ञ्चत॒ं वर्ति॑का॒मंह॑सो॒ निः प्रति॒ जङ्घां॑ वि॒श्पला॑या अधत्तम् ॥ ८ ॥

युवं धेनुं शयवे नाधिताय अपिन्वतं अश्विना पूर्व्याय ॥

अमुंचतं वर्तिकां अंहसः निः प्रति जङ्घांध विश्पलायाः अधत्तम् ॥ ८ ॥

हे अश्विनहो, त्या पूर्वकालीन शयूनें तुमची प्रार्थना केल्याबरोबर तुम्ही त्याच्या धेनूचे अंगी भरपूर दूध आणले. तुम्ही लावी पक्षिणीस संकटांतून सोडविले आणि विश्पलेला पुन्हां पाय बसविला. ॥ ८ ॥

यु॒वं श्वे॒तं पे॒दव॒ इंद्र॑जूतमहि॒हन॑मश्विनादत्त॒मश्व॑म् ॥

जो॒हूत्र॑म॒र्यो अ॒भिभू॑तिमु॒ग्रं स॑हस्र॒सां वृष॑णं वी॒ड्वङ्गाम् ॥ ९ ॥

युवं श्वेतं पेदवे इंद्रऽजूतं अहिऽहनं अश्विना अदत्तं अश्वम् ॥

जोहूत्रं अर्यः अभिऽभूतिं उग्रं सहस्रऽसां वृषणं वीळुऽअङ्गिम् ॥ ९ ॥

हे अश्विनहो, तुम्ही पेदूला एक अश्व दिला कीं ज्याचा रंग पांढरा होता, ज्यास इंद्र हांकीत असे, जो सर्पाचा वध करण्यास समर्थ होता, सदाचारी लोक दृष्टीस पडतांच जो शत्रूंचा पराभव करणारा होता, जो उग्र दिसत असे, जो हजारों प्रकारची संपत्ति जिंकून आणीत असे, जो सामर्थ्यवान होता व ज्याचें शरीरबळ फार फार मोठें होते. ॥ ९ ॥

ता वां॑ नरा॒ स्वव॑से सुजा॒ता हवा॑महे अश्विना॒ नाध॑मानाः ॥

आ न उप वसुमता रथेन गिरो जुषाणा सुविताय यातम् ॥ १० ॥

ता वां नरा सु अवसे सुऽजाता हवामहे अश्विना नाधमानाः ॥

आ नः उप वसुऽमता रथेन गिरः जुषाणा सुविताय यातम् ॥ १० ॥

उच्च वंशात जन्म घेणाऱ्या हे शूर अश्विनहो, तुमची प्रार्थना करून आम्ही तुम्हांस आमचे संरक्षणार्थ बोलावीत आहोंत. आमच्या स्तोत्रांचा स्वीकार करून व आपल्या संपत्तीनें भरलेल्या रथांत विराजमान होऊन आमचे कल्याणार्थ तुम्ही इकडे या. ॥ १० ॥

आ श्येनस्य जवसा नूतनेनास्मे यातं नासत्या सजोषाः ॥

हवे हि वामश्विना रातहव्यः शश्वत्तमाया उषसो व्युष्टौ ॥ ११ ॥

आ श्येनस्य जवसा नूतनेन अस्मे इति यातं नासत्या सऽजोषाः ॥

हवे हि वा अश्विना रातऽहव्यः शश्वत्ऽतमायाः उषसः विऽउष्टौ ॥ ११ ॥

हे सत्यस्वरूप देवहो, आपल्या श्येनास नूतन वेग देऊन तुम्ही दोघे एक विचारानें इकडे या. हे अश्विनहो, ह्या सनातन उषेचा प्रकाश दिसूं लागल्या बरोबर मी तुम्हांस हवि अर्पण करून तुमचें पूजन करतो. ॥ ११ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त ११९ (अश्विनीकुमार सूक्त)

ऋषि : कक्षीवत् औशिज - देवता : अश्विनी कुमार - छंद - जगती

आ वा॒ं रथं॑ पुरुमा॒यं मं॑नो॒जुवं॑ जी॒राश्वं॑ य॒ज्ञियं॑ जी॒वसे॑ हुवे ॥

स॒हस्रं॑केतुं व॒निनं॑ श॒तद्व॑सुं श्रुष्टी॒वानं॑ वरिवो॒धाम॒भि प्रयः॑ ॥ १ ॥

आ वां रथं पुरुऽमायं मनःऽजुवं जीरऽअश्वं यज्ञियं जीवसे हुवे ॥

सहस्रऽकेतुं वनिनं शतत्ऽवसुं श्रुष्टीऽवानं वरिवःऽधां अभि प्रयः ॥ १ ॥

आमचे आयुष्य वाढावे म्हणून ह्या हवीकडे मी तुमच्या रथास पाचारण करतो. ह्या रथावर नाना प्रकारच्या योजना केलेल्या आहेत, त्याचा वेग मनाएवढा आहे, त्याचे अश्व चपल आहेत, तो यजनार्ह आहे, त्याच्यावर हजारों निशाणें फडकत आहेत, तो उत्तम लांकडाचा केलेला आहे, त्याच्यावर शेंकडो प्रकारचें धन भरलेले आहे, त्याची प्रसिद्धि सर्वत्र झालेली आहे व त्याचेपासून भक्तांचे उत्तम रीतीने संरक्षण होतें. ॥ १ ॥

ऊ॒र्ध्वा धी॒तिः प्रत्य॑स्य॒ प्रया॑म॒न्यधा॑यि॒ शस्म॒न्सम॑यन्त॒ आ दिशः॑ ॥

स्वदा॑मि घ॒र्मं प्रति॑ यन्त्यू॒तय॒ आ वा॑मू॒र्जानी॒ रथ॑मश्विनारुहत् ॥ २ ॥

ऊर्ध्वा धीतिः प्रति अस्य प्रऽयामनि अधायि शस्मन् सं अयंते आ दिशः ॥

स्वदामि घर्मं प्रति यंति ऊतयः आ वां ऊर्जानी रथं अश्विना अरुहत् ॥ २ ॥

हा तुमचा रथ चालू लागल्याबरोबर माझी मति खडबडून जागी झाली, एवढेंच काय पण तुमचें स्तवन करण्याकरितां जणूं कांही दाही दिशा एकत्र झाल्या आहेत. माझा ऊनऊन हवीही मी जितका होईल तितका मधुर

करीत आहे. भक्तजन संरक्षक अशी तुमचीं सामर्थ्यें माझेकडे येऊं लागली आहेत, व हे अश्विनहो, ऊर्जानी तुमच्या रथावर आरूढ झालेली आहे. ॥ २ ॥

सं यन्मिथः पस्पृधानासो अग्मत शुभे मखा अमिता जायवो रणे ॥

युवोरह प्रवणे चेकिते रथो यदश्विना वहथः सूरिम् आवरम् ॥ ३ ॥

सं यत् मिथः पस्पृधानासः अग्मत शुभे मखाः अमिताः जायवः रणे ॥

युवोः अह प्रवणे चेकिते रथः यत् अश्विना वहथः सूरिं आ वरम् ॥ ३ ॥

ज्या वेळी विजयेच्छु असे अगणित महान योद्धे आपणांस जयश्री प्राप्त व्हावी म्हणून ईर्ष्येनें एकमेकांशी रणांगणांत भिडलेले असतात, त्यावेळी तुमचा रथ वरून उतरत येत असतां दृष्टीस पडतो व त्या वेळी, हे अश्विनहो, तुम्ही आपल्या चतुर भक्तास उत्कृष्ट वैभव अर्पण करतां. ॥ ३ ॥

युवं भुज्युं भुरमाणं विभिर्गतं स्वयुक्तिभिर्निवहन्ता पितृभ्य आ ॥

या॒सि॒ष्टं व॒र्तिर्वृ॑षणा विजे॒न्यं१॒॑दिवो॑दासाय॒ महि॑ चेति वा॒मवः॑ ॥ ४ ॥

युवं भुज्युं भुरमाणं विऽभिः गतं स्वयुक्तिऽभिः निऽवहंता पितृऽभ्यः आ ॥

यासिष्टं वर्तिः वृषणा विऽजेन्यं दिवःऽदासाय महि चेति वां अवः ॥ ४ ॥

पक्ष्यांप्रमाणे चपल अशा आपल्या अश्वांवर आरूढ होऊन तुम्ही बुडत असलेल्या भुज्यूकडे गेलां व त्याच अश्वाच्या योगानें - जे स्वतःच रथास नियुक्त होतात - तुम्ही त्यास आपल्या मातापितरांकडे पोंचविले. हे सामर्थ्यवान देवांनो, त्या भुज्यूचें सदन फार दूर होतें तरी तेथपर्यंत तुम्ही गमन केले. दिवोदासाचें तुम्ही किती उत्कृष्ट तऱ्हेने संरक्षण केलें हें तर सर्व प्रसिद्धच आहे. ॥ ४ ॥

यु॒वोर॑श्विना॒ वपु॑षे युवा॒यु॒जं रथं॒ वाणी॑ येमतुरस्य॒ शर्ध्य॑म् ॥

आ वां॑ पति॒त्वं स॒ख्याय॑ ज॒ग्मुषी॒ योषा॑वृणीत॒ जेन्या॑ यु॒वां पती॑ ॥ ५ ॥

युवोः अश्विना वपुषे युवाऽयुजं रथं वाणी इति येमतुः अस्य शर्ध्यम् ॥

आ वां पतिऽत्वं सख्याय जग्मुषी योषा अवृणीत जेन्या युवां पती ॥ ५ ॥

हे अश्विनहो, जो तुमचा रथ तुम्ही स्वतः मौजेने जोडला होता त्यास केवळ तुमचा हुकूमच त्याच्या सीमेपर्यंत घेऊन गेला. तुम्ही पति व्हावे अशी इच्छा करणारी जी सुंदर युवति तुमच्याकडे तुमच्याशी मित्रत्व जोडण्याकरितां आली होती तिनें शेवटीं तुम्हांसच पति म्हणून पसंत केलें. ॥ ५ ॥

यु॒वं रे॒भं परि॑षूतेरुरुष्यथो हि॒मेन॑ घ॒र्मं परि॑तप्त॒मत्र॑ये ॥

यु॒वं श॒योर॑व॒सं पि॑प्यथु॒र्गवि॒ प्र दी॒र्घेण॒ वन्द॑नस्ता॒र्यायु॑षा ॥ ६ ॥

युवं रेभं परिऽसूतेः उरुष्यथः हिमेन घर्मं परिऽतप्तं अत्रये ॥

युवं शयोः अवसं पिप्यथुः गवि प्र दीर्घेण वंदनः तारि आयुषा ॥ ६ ॥

तुम्ही रेभाचे संकटापासून संरक्षण केले आणि तुम्ही थंडी उत्पन्न करून अत्रीचा तप्त दाह शांत केला. तुम्ही शयूच्या धेनूचे अंगी कसदार असे दूध उत्पन्न केले व वंदनास तुमचेकडून दीर्घ आयुष्याचा लाभ झाला. ॥ ६ ॥

यु॒वं वन्द॑नं॒ निर्ऋ॑तं जर॒ण्यया॒ रथं॒ न द॑स्रा कर॒णा समि॑न्वथः ॥

क्षेत्रा॒दा विप्रं॑ जनथो विप॒न्यया॒ प्र वा॒मत्र॑ विध॒ते दं॒सना॑ भुवत् ॥ ७ ॥

युवं वंदनं निःऽऋतं जरण्यया रथं न दस्रा करणा सं इन्वथः ॥

क्षेत्रात् आ विप्रं जनथः विपन्यया प्र वां अत्र विधते दंसना भुवत् ॥ ७ ॥

शत्रूंचा संहार करणाऱ्या हे कर्तृत्वशाली देवांनो, एखाद्या जुन्या गाडीची दुरुस्ती करावी त्याप्रमाणे जरेनें जर्जर झालेल्या वंदनास तुम्ही पुन्हां तारुण्याचा तजेला दिला. तुम्ही स्तुतींनी संतुष्ट होऊन त्या विद्वान उपासकास जमीनींतून जिवंत उत्पन्न केले. तुमची येथें स्तुति करणाऱ्या ह्या भक्ताकरितांही आश्चर्यकारक कृत्यें घडोत. ॥ ७ ॥

अग॑च्छतं॒ कृप॑माणं परा॒वति॑ पि॒तुः स्वस्य॒ त्यज॑सा॒ निबा॑धितम् ॥

स्वर्वतीरि॒त ऊ॒तीर्यु॒वोरह॑ चि॒त्रा अ॒भीके॑ अभवन्न॒भिष्ट॑यः ॥ ८ ॥

अगच्छतं कृपमाणं पराऽवति पितुः स्वस्य त्यजसा निऽबाधितम् ॥

स्वःऽवतीः इतः ऊतीः युवोः अह चित्राः अभीके अभवन् अभिष्टयः ॥ ८ ॥

पित्यानें टाकल्यामुळें कष्ट भोगीत असलेल्या व म्हणून दूरच्या प्रदेशांत तुमची करुणा भाकणाऱ्या भुज्यूकरितां तुम्ही धांवत गेला. जेव्हां तुम्ही त्याचे समीप होता तेव्हां तुमचे भक्त संरक्षक सामर्थ्य फार उज्ज्वल व तुमचें साहाय्य मोठें आश्चर्यकारक दिसलें. ॥ ८ ॥

उ॒त स्या वां॒ मधु॑म॒न्मक्षि॑कारप॒न्मदे॒ सोम॑स्यौशि॒जो हु॑वन्यति ॥

यु॒वं द॑धी॒चो मन॒ आ वि॑वास॒थोऽ॑था॒ शिर॒ः प्रति॑ वा॒मश्व्यं᳚ वदत् ॥ ९ ॥

उत स्या वां मधुऽमत् मक्षिका अरपत् मदे सोमस्य औशिजः हुवन्यति ॥

युवं दधीचः मनः आ विवासथः अथ शिरः प्रति वां अश्व्यं वदत् ॥ ९ ॥

त्या मधुमक्षिकेनें तुमची फार मधुर स्तोत्रांनी स्तुति केली आणि सोमपान करून तुम्ही संतुष्ट व्हावे म्हणून उशिजाचा पुत्रही तुम्हांस पाचारण करीत आहे. तुम्ही दध्यचाचेंही मन संतुष्ट करीत आहां. अश्वाच्या शिरानें तुमच्याशी संभाषण केले होते. ॥ ९ ॥

युवं पेदवे पुरुवारमश्विना स्पृधां श्वेतं तरुतारं दुवस्यथः ॥

शर्यैरभिद्युं पृतनासु दुष्टरं चर्कृत्यमिंद्रमिव चर्षणीसहम् ॥ १० ॥

युवं पेदवे पुरुऽवारं अश्विना स्पृधां श्वेतं तरुतारं दुवस्यथः ॥

शर्यैः अभिऽद्युं पृतनासु दुस्तरं चर्कृत्यं इंद्रंऽइव चर्षणीऽसहम् ॥ १० ॥

हे अश्विनहो, तुम्ही पेदूला जो पांढरा अश्व दिला, तो सर्वांस हवासा वाटण्याजोगा, शत्रूंचा पराभव करण्याजोगा, तेजस्वी, युद्धांत शत्रूंस अजिंक्य, सर्वत्र वाहवा होण्याजोगा व इंद्राप्रमाणें सर्व मानवांस भारी असा होता. ॥ १० ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १२० (अश्विनीकुमार सूक्त)

ऋषि : कक्षीवत् औशिज - देवता : अश्विनी कुमार - छंद - अनेक

का रा॑ध॒द्धोत्रा॑श्विना वां॒ को वां॒ जोष॑ उ॒भयोः॑ ।

कु॒था वि॑धा॒त्यप्र॑चेताः ॥ १ ॥

का राधत् धोत्रा अश्विना वा कः वा जोषे उभयोः ।

कथा विधाति अप्रऽचेताः ॥ १ ॥

हे अश्विनहो, तुम्हांस कोणता यज्ञ संतोष देतो ? तुम्हां दोघांचा आनंद कशांत आहे ? अज्ञानी मनुष्य तुमच्या कृपेवांचून कसें करील ? ॥ १ ॥

वि॒द्वांसा॒विद्दुरः॑ पृच्छे॒दवि॑द्वानि॒त्थाप॑रो अचे॒ताः ।

नू॒ चि॒न्नु मर्ते॒ अक्रौ ॥ २ ॥

विद्वांसौ इत् दुरः पृच्छेत् अविद्वान् इत्था अपरः अचेताः ।

नू चित् नु मर्ते अक्रौ ॥ २ ॥

अविद्वान असो कीं अज्ञानी असा कोणी अन्य मनुष्य असो, त्यानें विद्वान अशा अश्विनी देवांचाच मार्ग विचारावा. कारण खरोखर मर्त्य मानवां संबंधाने अमुक एक गोष्ट त्यांना करता येणार नाहीं असे काय आहे ? ॥ २ ॥

ता वि॒द्वांसा॑ हवामहे वां॒ ता नौ॑ वि॒द्वांसा॒ मन्म॑ वोचेतम॒द्य ।

प्रार्च॒द्दय॑मानो यु॒वाकुः॑ ॥ ३ ॥

ता विद्वांसा हवामहे वां ता नः विद्वांसा मन्म वोचेतं अद्य ।

प्र आर्चत् दयमानः युवाकुः ॥ ३ ॥

ज्ञानवान अश्विनीकुमारांना आम्ही आवाहन करतो. हे विद्वान आणि सर्वज्ञ अश्विनीकुमारांनो, तुमचा भक्त तुमची हविपूर्वकन प्रार्थना करीत आहे. तुम्हीच आज आम्हास स्तोत्र शिकवा. ॥ ३ ॥

वि पृ॑च्छामि पा॒क्या३॒॑न दे॒वान्वष॑ट्कृतस्याद्भु॒ तस्य॑ दस्रा ।

पा॒तं च॒ सह्य॑सो यु॒वं च॒ रभ्य॑सो नः ॥ ४ ॥

वि पृच्छामि पाक्या न देवान् वषट्ऽकृतस्य अत्ऽभुतस्य दस्रा ।

पातं च सह्यसः युवं च रभ्यसः नः ॥ ४ ॥

शत्रूंचा संहार करणाऱ्या हे अश्विनहो, ' वषट् ' असा शब्दोच्चार करून अर्पण केलेला जो अद्भुत हवि त्याचेविषयी जणूं कांही लडिवाळपणानेंच मी देवांना विचारीत आहे. तुम्ही आमचें बलिष्ठ व हल्ला करणाऱ्या शत्रूंपासून संरक्षण करा. ॥ ४ ॥

प्र या घोषे॒ भृग॑वाणे॒ न शोभे॒ यया॑ वा॒चा यज॑ति पज्रि॒यो वा॑म् ।

प्रैषयुर्न विद्वान् ॥ ५ ॥

प्र या घोषे भृगवाणे न शोभे यया वाचा यजति पज्रियः वाम् ।

प्र इषऽयुः न विद्वान् ॥ ५ ॥

भृगूप्रमाणे तुमची भक्ति करणाऱ्या घोषाचे मुखात जी स्तुति जणूं अतिशय शोभा पावत आहे, व जिच्यायोगानें पज्राचा पुत्र विद्वान इषयूप्रमाणें तुमचे अर्चन करीत असतो, ती तुम्हांस प्रिय होवो. ॥ ५ ॥

श्रुतं गायत्रं तकवानस्याहं चिद्धि रिरेभाश्विना वाम् ।

आक्षी शुभस्पती दन् ॥ ६ ॥

श्रुतं गायत्रं तकवानस्य अहं चित् हि रिरेभ अश्विना वाम् ।

अक्षी इति शुभः पती इति दन् ॥ ६ ॥

तुमचे स्तवन करण्याकरितां अतिशय त्वरा करणाऱ्या भक्ताचें स्तोत्र श्रवण करा. ज्याने तुमचे स्तवन केले तो, हे अश्विनहो, मीच होय. हे मांगल्याचे अधिकारी हो, तुम्ही इकडे दृष्टि द्या. ॥ ६ ॥

यु॒वं ह्यास्तं॑ म॒हो रन्यु॒वं वा॒ यन्नि॒रत॑तंसतम् ।

ता नो॑ वसू सुगो॒पा स्या॑तं पा॒तं नो॒ वृका॑दघा॒योः ॥ ७ ॥

युवं हि आस्तं महः रन् युवं वा यत् निः अततंसतम् ।

ता नः वसू इति सुऽगोपा स्यातं पातं नः वृकात् अघऽयोः ॥ ७ ॥

ज्या अर्थी विपुल संपत्ति देणारे तुम्ही व ती नेणारे ही तुम्हींच होतां, त्या अर्थी, हे वैभवस्वरूप देवांनो, तुम्ही आमचे उत्तम संरक्षणकर्ते व्हा व दुष्ट लांडग्यापासून आमचे संरक्षण करा. ॥ ७ ॥

मा कस्मै॑ धातम॒भ्यमि॒त्रिणे॑ नो॒ माकुत्रा॑ नो गृ॒हेभ्यो॑ धे॒नवो॑ गुः ।

स्त॒ना॒भुजो॒ अशि॑श्वीः ॥ ८ ॥

मा कस्मै धातं अभि अमित्रिणे नः मा अकुत्र नः गृहेभ्यः धेनवः गुः ।

स्तनऽभुजः अशिश्वीः ॥ ८ ॥

जो आमचे मित्र नाही अशा कोणत्याही मनुष्याशी आमची गांठ घालूं नका आणि आमच्या घरच्या दूध देणाऱ्या गाईंना कोठेंही त्यांच्या वासरांस सोडून घरापासून लांब जाऊं देऊं नका. ॥ ८ ॥

दुहीयन्मित्रधितये युवाकु राये च नो मिमीतं वाजवत्यै ।

इषे च नो मिमीतं धेनुमत्यै ॥ ९ ॥

दुहीयत् मित्रऽधितये युवाकु राये च नः मिमीतं वाजऽवत्यै ।

इषे च नः मिमीतं धेनुऽमत्यै ॥ ९ ॥

तुमच्यावर प्रेम असल्यामुळेंच ह्या भक्तजनांनी तुमचे मित्रत्व संपादन करण्याकरितां गाईचें दोहन केले आहे. ह्यासाठी सामर्थ्यपरिपूर्ण असें वैभव व धेनूंनी परिपूर्ण अशी धान्यसमृद्धि आम्हांस द्यावयासाठी काढा. ॥ ९ ॥

अश्विनोरसनं रथमनश्वं वाजिनीवतोः ।

तेनाहं भूरि चाकन ॥ १० ॥

अश्विनोः आसनं रथं अनश्वं वाजिनीऽवतोः ।

तेन अहं भूरि चाकन ॥ १० ॥

सामर्थ्यवान अशा अश्विनीदेवाचा अश्वावांचून चालणारा रथ मला प्राप्त झाला आहे व त्याचे योगानें मी अतिशय आनंदात आहे. ॥ १० ॥

अयं समह मा तनूह्याते जनाँ अनु ।

सोमपेयं सुखो रथः ॥ ११ ॥

अयं समह मा तनु ऊह्याते जनान् अनु ।

सोमऽपेयं सुऽखः रथः ॥ ११ ॥

हा सुखकारक रथ ह्या लोकांच्या मागोमाग जाऊन जेथें सोमरस तयार करून ठेवला आहे तेथें मला नेहमी मंदगतीनें घेऊन जावो. ॥ ११ ॥

अध॒ स्वप्न॑स्य॒ निर्वि॒देऽ॑भुञ्जतश्च रे॒वत॑ः ।

उ॒भा ता बस्रि॑ नश्यतः ॥ १२ ॥

अध स्वप्नस्य निः विदे अभुंजतः च रेवतः ।

उभा ता बस्रि नश्यतः ॥ १२ ॥

निद्रा आणि श्रीमंती असून उपभोग न घेणारा पुरुष, ह्या दोहोंचाही त्या रथास फार तिटकारा आहे. दोन्ही लवकर नाशाप्रत जातात. ॥ १२ ॥

ॐ तत् सत्

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १२१ (अश्विनीकुमार सूक्त)

ऋषि : कक्षीवत् औशिज - देवता : विश्वेदेव - छंद - त्रिष्टुभ्

कदि॒त्था नॄँः पात्रं॑ देव॒यतां श्रव॒द्गिरो॒ अङ्गि॑रसां तुर॒ण्यन् ॥

प्र यदान॒ड्विश॒ आ ह॒र्म्यस्यो॒रु क्रं॑सते अध्व॒रे यज॑त्रः ॥ १ ॥

कत् इत्था नॄन् पात्रं देवऽयता श्रवत् गिरः अंगिरसां तुरण्यन् ॥

प्र यत् आनट् विशः आ हर्म्यस्य उरु क्रंसते अध्वरे यजत्रः ॥ १ ॥

मानवांचे पालन करणारा तो इंद्र ह्याप्रमाणें सत्वर इकडे येऊन भक्तिशील अंगिरसांची स्तुति केव्हां ऐकेल बरें ? जेव्हां सदनांत राहणाऱ्या मानवांकडे येतो तेव्हां तो यज्ञार्ह देव यज्ञाकडे मोठ्या प्रौढतेनें पावलें टाकीत जातो. ॥ १ ॥

स्तम्भीद्ध द्यां स धरुणं प्रुषायदृभुर्वाजाय द्रविणं नरो गोः ॥

अनु स्वजां महिषश्चक्षत व्रां मेनामश्वस्य परि मातरं गोः ॥ २ ॥

स्तंभीत् ह द्या सः धरुणं प्रुषायत् ऋभुः वाजाय द्रविणं नरः गोः ॥

अनु स्वऽजा महिषः चक्षत व्रां मेनां अश्वस्य परि मातरं गोः ॥ २ ॥

त्यानें द्युलोकाची स्थापना केली. त्या कुशल वीरानें मानवांना सामर्थ्याची प्राप्ति व्हावी म्हणून धेनूंच्या कांसेंतील सर्वांस पुष्टिकारक अशा उत्कृष्ट द्रव्याची वृष्टि केली. त्या महान इंद्रानें आपण निर्माण केलेल्या प्राणि समुदायाचे - अश्वाच्या मादीचें व वासराच्या आईचें - अवलोकन केले. ॥ २ ॥

नक्षद्धवमरुणीः पूर्व्यं राट् तुरो विशामङ्गियरसामनु द्यून् ॥

तक्षद्वज्रं नियुतं तस्तम्भद्द्यां चतुष्पदे नर्याय द्विपादे ॥ ३ ॥

नक्षत् हवं अरुणीः पूर्व्यं राट् तुरः विशां अङ्गिरसां अनु द्यून् ॥

तक्षत् वज्रं निऽयुतं तस्तंभत् द्यां चतुःऽपदे नर्याय द्विऽपादे ॥ ३ ॥

ताम्रवर्ण उषाचे अगोदर सत्वर प्रकाशून त्यानें प्रतिदिवशी अंगिरस कुलांतील मनुष्यांच्या पूजेचा स्वीकार केला आहे. जें व्रत तो स्वहस्तांत वागवितो तें त्यानेंच तयार केले व मानवास उपयुक्त असे जे चतुष्पाद व द्विपाद प्राणीही त्यांचेसाठी. त्यानेंच द्युलोकाची स्थापना केली. ॥ ३ ॥

अस्य मदे स्वर्यं दा ऋतायापीवृतमुस्रियाणामनीकम् ॥

यद्ध प्रसर्गे त्रिककुम्निवर्तदप द्रुहो मानुषस्य दुरो वः ॥ ४ ॥

अस्य मदे स्वर्यं दाः ऋताय अपीऽवृतं उस्रियाणां अनीकम् ॥

यत् ह प्रऽसर्गे त्रिऽककुप् निऽवर्तत् अप द्रुहः मानुषस्य दुरः वरिति वः ॥ ४ ॥

सोमरसाच्या आनंदांत असतांना तूं प्रतिबंधात पडलेल्या गाईंचा देदीप्यमान समूह सत्कृत्यें नीट चालण्याकरितां पुन्हां आणून दिलास. ज्या वेळीं तिप्पट विशाल रूप धारण करणाऱ्या ह्या इंद्रानें पुन्हां युद्धाकडे मोर्चा फिरविला त्या वेळी मानवजातीच्या शत्रूंच्या गृहांचे दरवाजे त्यानें फोडून टाकले. ॥ ४ ॥

तुभ्यं॒ पयो॒ यत्पि॒तरा॒वनी॑ता॒ राधः॑ सु॒रेत॑स्तु॒रणे॑ भु॒रण्यू ॥

शुचि॒ यत्ते॒ रेक्ण॒ आय॑जन्त सब॒र्दुघा॑याः॒ पय॑ उ॒स्रिया॑याः ॥ ५ ॥

तुभ्यं पयः यत् पितरौ अनीता राधः सुऽरेतः तुरणे भुरण्यू इति ॥

शुचि यत् ते रेक्णः आ अयजंत सबःऽदुघायाः पय उस्रियायाः ॥ ५ ॥

ज्या वेळी अमृताचा पान्हा देणाऱ्या गाईंचे दूध अर्पण करून तुझ्या मातापितरांनी तुला तेजस्वी पेय दिलें त्या वेळी, तुझ्या पोषणाची सत्वर तजवीज करणाऱ्या त्या तुझ्या आईबापाकडून तुला जें सामर्थ्यवर्धक व आल्हाद देणारे दुग्ध मिळालें तें केवळ तुझेच साठी होते. ॥ ५ ॥

अध॒ प्र ज॑ज्ञे त॒रणि॑र्ममत्तु॒ प्र रो॑च्य॒स्या उ॒षसो॒ न सूरः॑ ॥

इंदु॒र्येभि॒राष्ट॒ स्वेदु॑हव्यैः स्रु॒वेण॑ सि॒ञ्चञ्ज॒रणा॒भि धाम॑ ॥ ६ ॥

अध प्र जज्ञे तरणिः ममत्तु प्र रोचि अस्याः उषसः न सूरः ॥

इंदुः येभिः आष्ट स्वऽइदुहव्यैः स्रुवेण सिंचन् जरणा अभि धाम ॥ ६ ॥

हा पहा प्रादुर्भूत झाला. तो वेगवान देव प्रमुदित होवो. उषेनंतर हा सूर्याप्रमाणें प्रकाशित झाला आहे. ह्या तिघांनी मिळून स्तोत्रें व ऊनऊन हवि ह्याचेसह यज्ञगृहांत यज्ञचमसातून खाली सांडतील इतके सोमरसाचे बिंदु स्वतःस अर्पण करावयास लावले आहेत. ॥ ६ ॥

स्वि॒ध्मा यद्व॒नधि॑तिरप॒स्यात्सूरो॑ अध्व॒रे परि॒ रोध॑ना॒ गोः ॥

यद्ध॑ प्र॒भासि॒ कृत्व्याँ॒ अनु॒ द्यूनन॑र्विशे प॒श्विषे॑ तु॒राय॑ ॥ ७ ॥

सुऽइध्मा यत् वनऽधितिः अपस्यात् सूरः अध्वरे परि रोधना गोः ॥

यत् ह प्रऽभासि कृत्व्यान् अनु द्यून् अनर्विशे पशुऽइषे तुराय ॥ ७ ॥

सूर्याच्या यज्ञात वृषभास बद्ध करून ठेवणारी व सुंदर इंधन घातलेली काष्ठांची रास जेव्हां प्रदीप्त होण्यास सिद्ध होते व जेव्हां सर्व दिवसांची कामें सुरळीत चालावीं म्हणून तूं आपला प्रकाश पाडतोस, त्या वेळीं रथांत आरूढ होणाऱ्या, पशूंस शोधणाऱ्या व आपल्या कामाकडे त्वरेनें निघणाऱ्या प्रत्येक मनुष्याचें काम होतें. ॥ ७ ॥

अ॒ष्टा म॒हो दि॒व आदो॒ हरी॑ इ॒ह द्यु॑म्ना॒साह॑म॒भि यो॑धा॒न उत्स॑म् ॥

ह॒रिं यत्ते॑ म॒न्दिनं॑ दु॒क्षन्वृ॒धे गोर॑भस॒मद्रि॑भिर्वा॒ताप्य॑म् ॥ ८ ॥

अष्टा महः दिवः आदः हरी इति इह द्युम्नऽसहं अभि योधानः उत्सम् ॥

हरिं यत् ते मंदिनं धुक्षन् वृधे गोऽरभसं अद्रिऽभिः वाताप्यम् ॥ ८ ॥

देदीप्यमान असा जो झरा त्याचे प्राप्त्यर्थ युद्ध करीत असतां तूं विशाल द्युलोकांतून आठ घोडे घेऊन आलास, आणि त्या वेळीं तुला आनंद होण्याकरिता, कढविलेला, दुग्धामुळें जास्ती तीव्र बनलेला, व तुला हर्ष उत्पन्न करणारा असा पिंवळा धमक सोमरस तुझ्या भक्तांसी हातांत यज्ञपाषाण घेऊन तयार केला. ॥ ८ ॥

त्वमा॑य॒सं प्रति॑ वर्तयो॒ गोर्दि॒वो अश्मा॑न॒मुप॑नीत॒मृभ्वा॑ ॥

कुत्सा॑य॒ यत्र॑ पुरुहूत व॒न्वञ्छुष्ण॑मन॒न्तैः प॑रि॒यासि॑ व॒धैः ॥ ९ ॥

त्वं आयसं प्रति वर्तयः गोः दिवः अश्मानं उपऽनीतं ऋभ्वा ॥

कुत्साय यत्र पुरुऽहूत वन्वन् शुष्णं अनंतैः परिऽयासि वधैः ॥ ९ ॥

अनेक भक्तांनी पाचारण केलेल्या हे इंद्रा, ज्या वेळीं कुत्सावर प्रसन्न होऊन तूं अगणित शस्त्रांनी शुष्णास वेढून टाकलेंस त्या वेळीं द्युलोकांतून आणलेला लोखंडाचा गोटा तूं आपल्या कुशलतेनें गोफणीनें शुष्णावर फेंकलास. ॥ ९ ॥

पु॒रा यत्सू॒र॒स्तम॑सो॒ अपी॑ते॒स्तम॑द्रिवः फलि॒गं हे॒तिम॑स्य ॥

शुष्ण॑स्य चि॒त्परि॑हितं॒ यदोजो॑ दि॒वस्परि॒ सुग्र॑थितं॒ तदादः॑ ॥ १० ॥

पुरा यत् सूरः तमसः अपिऽइतेः तं अद्रिऽवः फलिऽगं हेतिं अस्य ॥

शुष्णस्य चित् परिऽहितं यत् ओजः दिवः परि सुऽग्रथितं तत् आ अदरित्यदः ॥ १० ॥

हे वज्रधारी इंद्रा, तमानें सूर्यास ग्रासण्याचे पूर्वींच तूं आपलें शस्त्र मेघावर फेंकलेस. शुष्णाचे जे बल सर्व द्युलोकास व्यापुन अनिर्बाधपणें राहिलें होतें त्याचाही तूं नाश करून टाकलास. ॥ १० ॥

अनु॑ त्वा म॒ही पाज॑सी अ॒च॒क्रे द्यावा॒क्षामा॑ मदतामिंद्र॒ कर्म॑न् ॥

त्वं वृ॒त्रमा॒शया॑नं सि॒रासु॑ म॒हो वज्रे॑ण सिष्वपो व॒राहु॑म् ॥ ११ ॥

अनु त्वा मही इति पाजसी इति अचक्रेऽइति द्यावाक्षामा मदतां इंद्र कर्मन् ॥

त्वं वृत्रं आऽशयानं सिरासु महः वज्रेण सिस्वपः वराहुम् ॥ ११ ॥

हे इंद्रा, चाकांवाचून फिरणारे ते श्रेष्ठ व सामर्थ्यवान द्युलोक व भूलोक ह्यांना तुझा पराक्रम पाहून आनंद होतो. तूं सर्वांहून वरिष्ठ असल्यामुळें, उदकांत दबा धरून बसलेल्या त्या वराहास - वृत्रास - तूं आपल्या वज्रानें चीत केलेंस. ॥ ११ ॥

त्वमिंद्र नर्यो याँ अवो नॄन्तिष्ठा वातस्य सुयुजो वहिष्ठान् ॥

यं ते काव्य उशना मन्दिनं दाद्वृत्रहणं पार्यं ततक्ष वज्रम् ॥ १२ ॥

त्वं इंद्र नर्यः यान् अवः नॄन् तिष्ठ वातस्य सुऽयुजः वहिष्ठान् ॥

यं ते काव्यः उशना मंदिनं दात् वृत्रऽहनं पार्यं ततक्ष वज्रम् ॥ १२ ॥

इंद्रा, ज्या मानवाचें तूं रक्षण करतोस त्याचा तूं हितकर्ता असल्यामुळें तूं वायूच्या बलवान व सुलभ रीतीनें जोडले जाणाऱ्या अश्वावर आरूढ हो. उशना काव्यानें जें आनंददायक वज्र तुला दिलें तें त्यानें तुला उपयोगी पडावें व तूं वृत्रास मारावें म्हणून केलें होतें. ॥ १२ ॥

त्वं सूरो हरितो रामयो नॄन्भरच्चक्रमेतशो नायमिंद्र ॥

प्रास्य पारं नवतिं नाव्यानामपि कर्तमवर्तयोऽयज्यून् ॥ १३ ॥

त्वं सूरः हरितः रमयः नॄन् भरत् चक्रं एतशः न अयं इंद्र ॥

प्रऽअस्य पारं नवतिं नाव्यानां अपि कर्तं अवर्तयः अयज्यून् ॥ १३ ॥

हे इंद्रा, तूं सूर्याचे पीतवर्ण अश्व थांबविलेस आणि ह्या एतशानेंही चाक ओढले नाहीं. तुझें पूजन न करणाऱ्या लोकास तूं नव्वद नद्यांचे पलीकडे फेंकून त्यांना एका मोठ्या खळग्यांत टाकून दिलेस. ॥ १३ ॥

त्वं नो अस्या इंद्र दुर्हणायाः पाहि वज्रिवो दुरितादभीके ॥

प्र नो वाजान्रथ्यो अश्वबुध्यानिषे यन्धि श्रवसे सूनृतायै ॥ १४ ॥

त्वं नः अस्याः इंद्र दुःऽहणायाः पाहि वज्रिऽवः दुःऽइतात् अभीके ॥

प्र नः वाजान् रथ्यः अश्वऽबुध्यान् इषे यंधि श्रवसे सूनृतायै ॥ १४ ॥

हे वज्रधारी इंद्रा, आम्हांवर येऊन ठेपलेल्या दुरितापासून व ह्या क्लेशदायक आपत्तीपासून आमचें रक्षण कर. आम्हांस पोटास भरपूर मिळावें, आमची कीर्ति वाढावी, व आम्हांस मधुर सत्याचा लाभ व्हावा म्हणून ज्या सामर्थ्याच्या योगानें आम्हांस पुष्कळ रथ मिळतील, व अनेक अश्व पदरीं असल्यामुळें ज्याची लोकांस खूण पटेल, असें सामर्थ्य आम्हांस अर्पण कर. ॥ १४ ॥

मा सा ते अस्मत्सुमतिर्वि दसद्वाजप्रमहः समिषो वरन्त ॥

आ नो भज मघवन्गोष्वर्यो मंहिष्ठास्ते सधमादः स्याम ॥ १५ ॥

मा सा ते अस्मत् सुऽमतिः वि दसत् वाजऽप्रमहः सं इषः वरंत ॥

आ नः भज मघऽवन् गोषु अर्यः मंहिष्ठाः ते सधऽमादः स्याम ॥ १५ ॥

तुझी ती कृपाबुद्धि आम्हांवरून उडून न जावो व हे सामर्थ्यवान देवा, आम्हांस पुष्कळ धनधान्य प्राप्त होवो. हे उदार इंद्रा, तूं श्रेष्ठ असल्यामुळें आम्हांस धेनूंचा लाभ होत असतां तूं तेथें अस. आम्ही तुला हवि अर्पण करून सर्वजण आनंदांत राहूं. ॥ १५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १२२ (विश्वेदेव सूक्त)

ऋषि : कक्षीवत् औशिज - देवता : विश्वेदेव - छंद - त्रिष्टुभ्

प्र वः॒ पान्तं॑ रघुमन्य॒वोऽ॑न्धो य॒ज्ञं रु॒द्राय॑ मी॒ळ्हुषे॑ भरध्वम् ॥

दि॒वो अ॑स्तो॒ष्यसु॑रस्य वी॒रैरि॑षु॒ध्येव॑ म॒रुतो॒ रोद॑स्योः ॥ १ ॥

प्र वः पांतं रघुऽमन्यवः अंधः यज्ञं रुद्राय मीळ्हुषे भरध्वम् ॥

दिवः अस्तोषि असुरस्य वीरैः इषुध्याऽइव मरुतः रोदस्योः ॥ १ ॥

हे ऋत्विजांनो, तुमचे अंगी औत्सुख्यचापल्य आहे. तेव्हां आपले पेय, हवि व आपला यज्ञ तुम्ही रुद्राला अर्पण करा; तो सर्व सिद्धिंचा जणो वर्षावच करीत आतो. इकडे मीही मरुतांचे स्तवन केलेले आहे. हे मरुत् महदाकाशस्थ परमेश्वराच्या वीरांसहवतमान अंतिरिक्षांत जणों काय ईर्ष्येनेंच रहात असतात. ॥ १ ॥

पत्नी॑व पू॒र्वहू॑तिं वावृ॒धध्या॑ उ॒षासा॒नक्ता॑ पु॒रुधा विदा॑ने ॥

स्त॒रीर्नात्कं॒ व्यु॒तं वसा॑ना॒ सूर्य॑स्य श्रि॒या सु॒दृशी॒ हिर॑ण्यैः ॥ २ ॥

पत्नि्ऽइव पूर्वऽहूतिं ववृधध्यैआ उषसानक्ता पुरुधा विदाने इति ॥

स्तरीः न अत्कं विऽउतं वसाना सूर्यस्य श्रिया सुऽदृशी हिरण्यैः ॥ २ ॥

प्रथमाहुतीस ऐन रंग यावा म्हणुन उषा व रात्र यांस अनुकूल करून घेतलें पाहिजे. ह्या, नव वधूंप्रमाणे नाना प्रकारांनी नटत असतात. पैकीं एक विद्युल्लतारूप वस्त्र अघळपघळ नेसून झळकत असते व दुसरी रविकिरणाच्या प्रभारूप सुवर्णलंकारांनी फार खुलून दिसते. ॥ २ ॥

म॒मत्तु॑ नः॒ परि॑ज्मा वस॒र्हा म॒मत्तु॒ वातो॑ अ॒पां वृष॑ण्वान् ॥

शि॒शी॒तमि॑न्द्रापर्वता यु॒वं न॒स्तन्नो॒ विश्वे॑ वरिवस्यन्तु दे॒वाः ॥ ३ ॥

ममत्तु नः परिऽज्मा वसर्हा ममत्तु वातः अपां वृषण्ऽवान् ॥

शिशीतं इंद्रापर्वता युवं नः तत् नः विश्वे वरिवस्यंतु देवाः ॥ ३ ॥

सर्व आकाशभर प्रदक्षिणा करतां करतां अंधःकाराचा नायनाट करून टाकणारा असा हा दिनमणि आम्हांस आनंदी आनंद करो. पर्जन्यवृष्टि करणारा वायुदेवही आनंदमय करो. हे पर्वतयुक्त इंद्रा, आमची बुद्धि अतिशय कुशाग्र कर आणि सकल देव ह्या सर्व गोष्टींचा आम्हांस लाभ करुन देवोत. ॥ ३ ॥

उ॒त त्या मे॑ य॒शसा॑ श्वे॒तना॒यै व्यन्ता॒ पान्तौ॑शि॒जो हु॒वध्यै॑ ॥

प्र वो॒ नपा॑तम॒पां कृ॑णु॒ध्वं॒ प्र मा॒तरा॑ रास्पि॒नस्या॒योः ॥ ४ ॥

उत त्या मे यशसा श्वेतनायै व्यंता पांता औशिजः हुवध्यै ॥

प्र वः नपातं अपां कृणुध्वं प्र मातरा रास्पिनस्य आयोः ॥ ४ ॥

हा मी उशिजेचा पुत्र सुप्रभाती त्या दोघां यशस्कर आणि नाशरहित जगत्पालकांस मजकडे बोलावीत आहे. तेव्हां तुम्हींही आपल्या अग्नीचे परोपरीने स्तवन करा, आणि ह्या चित् शक्तिस प्रकट करणाऱ्या ज्या दोन अरणी त्या आपल्यापुढें ठेवा. हा अग्नि आकाशांतील उदकामध्येंही प्रकट होतो व आपल्या प्रचंड घोषाने भक्तांस आशीर्वाद देतो. ॥ ४ ॥

आ वो रुवण्युमौशिजो हुवध्यै घोषेव शंसमर्जुनस्य नंशे ॥

प्र वः पूष्णे दावन आँ अच्छा वोचेय वसुतातिमुग्नेः ॥ ५ ॥

आ वः रुवण्युं औशिजः हुवध्यै घोषाऽइव शंसं अर्जुनस्य नंशे ॥

प्र वः पूष्णे दावने आन् अच्छ वोचेय वसुऽतातिं अग्नेः ॥ ५ ॥

हा मी उशिजेचा पुत्र तुमच्याकरितां, प्रचंड गर्जना करणाऱ्या अग्नीनें येथें यावे म्हणून स्तवन करीत आहे. अशीच स्तुती पूर्वी घोषा हिने आपला श्वेतरोग नाहींसा व्हावा म्हणून केली होती. तुमच्यासाठी त्या दानशूर पूषाची मी करुणा भाकतो आणि अभीष्ट संपत्तीचा ओघ अग्नीपासून वाहतो, म्हणून त्या प्रित्यर्थ अग्नीची प्रार्थना करतो. ॥ ५ ॥

श्रुतं मे मित्रावरुणा हवेमोत श्रुतं सदने विश्वतः सीम् ॥

श्रोतु नः श्रोतुरातिः सुश्रोतुः सुक्षेत्रा सिंधुरद्भिःन ॥ ६ ॥

श्रुतं मे मित्रावरुणा हवा इमा उत श्रुतं सदने विश्वतः सीम् ॥

श्रोतु नः श्रोतुऽरातिः सुऽश्रोतुः सुऽक्षेत्रा सिंधुः अत्ऽभिः ॥ ६ ॥

मित्रावरुणहो, माझ्या ह्य हाकांकडे लक्ष द्या. तुम्ही आपल्या घरी असतां तरीही चोहोंकडे चाललेल्या प्रार्थनांकडे लक्ष द्या. ताबडतोव हांक ऐकणारा असा हा सिंधुही आम्ही स्तवन करीत आहों ते ऐको. ह्या सिंधूच्या देणग्या तर सर्व प्रसिद्धच आहेत. हा सुपीक प्रदेशांना आपल्या पाण्यानें अगदी तर्र करून टाकतो. ॥ ६ ॥

स्तुषे सा वां वरुण मित्र रातिर्गवां शता पृक्षयामेषु पज्रे ॥

श्रुतरथे प्रियरथे दधानाः सद्यः पुष्टिं निरुन्धानासो अग्मन् ॥ ७ ॥

स्तुषे सा वां वरुण मित्र रातिः गवां शता पृक्षऽयामेषु पज्रे ॥

श्रुतऽरथे प्रियऽरथे दधानाः सद्यः पुष्टिं निऽरुंधानासः अग्मन् ॥ ७ ॥

हे मित्रावरुणहो, तुम्ही अनेक यज्ञप्रसंगी मला पज्र कुलोत्पन्नाला गोधनाच्या शेंकडो देणग्या दिल्या आहेत. त्या आठवून ह्या तुमच्या दातृत्वाची अतिशय स्तुति होत असते. आहा ! ज्याच्या रथाच्या दर्शनाविषयींही प्रेम वाटावे, त्या श्रुतरथास ऐश्वर्य देऊन ते कायम करणारे असे हे मित्रावरुण आलेच पहा. ॥ ७ ॥

अ॒स्य स्तु॑षे॒ महि॑मघस्य॒ राधः॒ सचा॑ सने॒म नहु॑षः सु॒वीराः॑ ॥

जनो॒ यः प॒ज्रेभ्यो॑ वा॒जिनी॑वा॒नश्वा॑वतो र॒थिनो॒ मह्यं॑ सू॒रिः ॥ ८ ॥

अस्य स्तुषे महिऽमघस्य राधः सचा सनेम नहुषः सुऽवीराः ॥

जनः यः पज्रेभ्यः वाजिनीऽवान् अश्वऽवतः रथिनः मह्यं सूरिः ॥ ८ ॥

ज्याचें ऐश्वर्य अपार आहे अशा ह्या भगवंताच्या दातृत्व गुणांची प्रशंसा मी करीत आहे. आपण सर्व शौर्यसंपन्न आहोंत, तर आपण सर्वांनी मिळून त्याचे गुणानुवाद गाइले पाहिजेत. ह्यानेंच पज्र कुलोत्पन्नांना पवित्र सामर्थ्य दिलें आहे, आणि वीरांना घोड्यावर स्वार होऊन माझ्या साहाय्याकरितां येण्यास हाच परम बुद्धिमान प्रेरणा करीत असतो. ॥ ८ ॥

जनो॒ यो मि॑त्रावरुणावभि॒ध्रुग॒पो न वां॑ सु॒नोत्य॑क्ष्णया॒ध्रुक् ॥

स्व॒यं स यक्ष्मं॒ हृद॑ये॒ नि ध॑त्त॒ आप॒ यदीं॒ होत्रा॑भिरृ॒तावा॑ ॥ ९ ॥

जनः यः मित्रावरुणौ अभिऽध्रुग् अपः न वां सुनोति अक्ष्णयाऽध्रुक् ॥

स्वयं सः यक्ष्मं हृदये नि धत्ते आप यत् ईं होत्राभिः ऋतावा ॥ ९ ॥

हे मित्रावरुणहो, सर्वांचा जो उघडपेणे द्वेष करतो, जो सोमरस अर्पण करून सेवा करीत नाही, आणि पोटांत डाव धरून जो दुसऱ्याचा घात करूं पाहतो अशा दुष्ट मनुष्याच्या दृष्टीस जेव्हां असें येतें की सदाचारसंपन्न भक्तांस त्याच्या सद्भक्तीचें उत्कृष्ट फळ मिळाले, तेव्हां तो आपण होऊनच आपल्या अंतःकरणास हृद्रोग उत्पन्न करून घेतो. ॥ ९ ॥

स व्राध॑तो॒ नहु॑षो॒ दंसु॑जूतः॒ शर्ध॑स्तरो न॒रां गू॒र्तश्र॑वाः ॥

विसृ॑ष्टरातिर्याति बाळ्ह॒सृत्वा॒ विश्वा॑सु पृ॒त्सु सद॒मिच्छूरः॑ ॥ १० ॥

सः व्राधतः नहुषः दंऽसुजूतः शर्धऽतरः नरां गूर्तऽश्रवाः ॥

विसृष्टऽरातिः याति बाळ्हऽसृत्वा विश्वासु पृत्ऽसु सदं इच् शूरः ॥ १० ॥

आणि इकडे तो भक्तजन अशा वेगानें पुढें सरसावतो कीं, त्याचे आश्चर्यच करीत रहावे. बलशाली पुरुषांतही तो उत्तरोत्तर बलाढ्य होत जातो व सर्व लोकांत त्याची कीर्ति अधिकाधिकच पसरत जाते. वाटेल तितका बिकट प्रसंग असो, दानतत्पर शूर भक्त, अशा प्रसंगातून केव्हांही बेधडक पार पडून जातो. ॥ १० ॥

अध॒ ग्मन्ता॒ नहु॑षो॒ हवं॑ सू॒रेः श्रोता॑ राजानो अ॒मृत॑स्य मन्द्राः ॥

न॒भो॒जुवो॒ यन्नि॑र॒वस्य॒ राधः॒ प्रश॑स्तये महि॒ना रथ॑वते ॥ ११ ॥

अध ग्मंत नहुषः हवं सूरेः श्रोत राजानः अमृतस्य मंद्राः ॥

नभःऽजुवः यत् निरवस्य राधः प्रऽशस्तये महिना रथऽवते ॥ ११ ॥

तर ह्या ऋषीच्या - ह्या भक्तजनाच्या हांकेसरशी येथें या. हे देवहो अमरत्वाचे पद भक्तांस देणें, हे अतिशय स्तुत्य कृत्य म्हणजे तुमचा हातचा मळ आहे. आकाशासही तुम्ही भेदून टाकलें आहे, तर या असहाय वीराची विनवणी ऐका व असें करा कीं याची सर्वत्र वाखाणणी होऊन ह्याचे आंगी मोठेंपणा येईल. ॥ ११ ॥

एतं शर्धं धाम यस्य सूरेरित्यवोचन्दशतयस्य नंशे ॥

द्युम्नानि येषु वसुताती रारन्विश्वे सन्वन्तु प्रभृथेषु वाजम् ॥ १२ ॥

एतं शर्धं धाम यस्य सूरेः इति अवोचन् दशऽतयस्य नंशे ॥

द्युम्नानि येषु वसुऽतातिः ररन् विश्वे सन्वंतु प्रऽभृथेषु वाजम् ॥ १२ ॥

ज्या भक्ताच्या यज्ञांत दहा प्रकारच्या हवीचा स्वीकार करण्यास आम्हीं येतो, त्याचें सामर्थ्य अशा तऱ्हेने अतिशय प्रबल असतें अशी भाक प्रत्यक्ष देवांनी दिलेली आहे; तर सर्व प्रकारची ओजस्विता आणि सर्व स्पृहणीय वस्तु ज्याच्या ठिकाणी प्रेमानें एकवट होतात, असे सकल देव आम्हांस यज्ञामध्यें पवित्र सामर्थ्य प्राप्त करून देवोत. ॥ १२ ॥

मन्दा॑महे॒ दश॑तयस्य धा॒सेर्द्विर्यत्पञ्च॒ बिभ्र॑तो॒ यन्त्यन्ना॑ ॥

किमि॒ष्टाश्व॑ इ॒ष्टर॑श्मिरे॒त ईशा॒नास॒स्तरु॑ष ऋञ्जत॒े नॄन् ॥ १३ ॥

मंदामहे दशऽतयस्य धासेः द्विः यत् पंच बिभ्रतः यंति अन्ना ॥

किं इष्टऽअश्व इष्टऽरश्मिः एते ईशानासः तरुषः ऋंजते नॄन् ॥ १३ ॥

देव एखादे वेळेस असेंही उद्गार काढतात कीं, " चला, हे ऋत्विज दहा प्रकारचें हविरन्न घेऊन आपल्यापुढें आले आहेत, तर त्या दशविध हवीचा आपण स्वीकार करूं या. इष्टाश्व म्हणा किंवा इष्टरश्मि म्हणा हे आमच्या भक्तांपेक्षां आणखी अधिक तें काय करतात ? लोकांवर अधिकार चालविणारे आणि यशस्वी असे हे भक्त खरोखर सर्व लोकांस भूषणप्रद आहेत ". ॥ १३ ॥

हिर॑ण्यकर्णं मणिग्रीव॒मर्ण॒स्तन्नो॒ विश्वे॑ वरिवस्यन्तु दे॒वाः ॥

अ॒र्यो गिरः॑ स॒द्य आ ज॒ग्मुषी॒रोस्राश्चा॑कन्तू॒भये॑ष्व॒स्मे ॥ १४ ॥

हिरण्यऽकर्णं मणिऽग्रीवं अर्णः तत् नः विश्वे वरिवस्यंतु देवाः ॥

अर्यः गिरः सद्य आ जग्मुषीः आ उस्राः चाकंतु उभयेषु अस्मे इति ॥ १४ ॥

कानांत सुवर्णकुंडले व गळ्यांत रत्नजडीत हार असे हे दिव्य स्वरूप आहे, त्याचा लाभ देव आम्हांस करून देवोत. आम्हां दोघांच्याही मुखांतून स्वयंस्फूर्तीनें बाहेत पडणारी स्तुतिस्तोत्रें ऐकण्यास त्या देदीपमान विभूतींस प्रेम वाटो. ॥ १४ ॥

च॒त्वारो॑ मा म॒शर्शा॑रस्य॒ शिश्व॒स्त्रयो॒ राज्ञ॒ आय॑वसस्य जि॒ष्णोः ॥

रथो॑ वां मि॒त्रावरुणा दी॒र्घाप्सा॒ः स्यूम॑गभस्ति॒ः सूरो॒ नाद्यौत् ॥ १५ ॥

चत्वारः मा मशर्शारस्य शिश्वः त्रयः राज्ञः आयवसस्य जिष्णोः ॥

रथः वां मित्रावरुणा दीर्घऽअप्साः स्यूमऽगभस्तिः सूरः न अद्यौत् ॥ १५ ॥

ते मशर्शाराचे चार पोरगे आणि आयवस राजा मोठा बलाढ्य, त्यांची मला त्रास देण्याची आतां काय प्राज्ञा आहे ? कारण हे मित्रावरुण हो, हा पहा, तुमचा विशाल रथ आतां दिसूं लागला आहे. त्याचे किरण सुद्धां सुखमय असून तो सूर्याप्रमाणें तेजःपुंज आहे. ॥ १५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १२३ (उषा सूक्त)

ऋषि : कक्षीवत् औशिज - देवता : उषा - छंद - त्रिष्टुभ्

पृ॒थू रथो॒ दक्षि॑णाया अयो॒ज्यैनं᳚ दे॒वासो॑ अ॒मृता॑सो अस्थुः ॥

कृ॒ष्णादुद् अ॑स्थादु॒र्या विहा॑या॒श्चिकि॑त्सन्ती॒ मानु॑षाय॒ क्षया॑य ॥ १ ॥

पृथुः रथः दक्षिणायाः अयोजि ऐनं देवासः अमृतासः अस्थुः ॥

कृष्णात् उत् अस्थात् अर्या विऽहायाः चिकित्संती मानुषाय क्षयाय ॥ १ ॥

ही उषा फार प्रेमळ आहे. हा पहा तिचा भव्य रथ जोडून तयार झाला आहे, व त्याच्या भोंवती हा नाशरहित तेजःपुंज तारांगण कसा चमकत आहे. ह्या काळ्याभोर काळोखांतून ही परम थोर स्वामिनी जी प्रकट झाली, त्यांत तिचा हेतू ह्या मनुष्यलोकावर प्रकाश पाडून अनुग्रह करावा इतकाच आहे. ॥ १ ॥

पूर्वा विश्वस्माद्भुवनादबोधि जयन्ती वाजं बृहती सनुत्री ॥

उच्चा व्यख्यद्युवतिः पुनर्भूरोषा अगन्प्रथमा पूर्वहूतौ ॥ २ ॥

पूर्वा विश्वस्मात् भुवनात् अबोधि जयंती वाजं बृहती सनुत्री ॥

उच्चा वि अख्यत् युवतिः पुनःऽभूः आ उषाः अगन् प्रथमा पूर्वऽहूतौ ॥ २ ॥

सर्व जग निद्रावश असतां सर्वांच्या आधीं हीच जागी होत असते. मनच्या पवित्रपणाचे जे सामर्थ्य असतें, त्यांत हिच्यापेक्षां कोणीही वरचढ नाही. ही थोर आणि अतिशय उदार आहे. सर्वदा तरुणच असणारी ही सुंदरी पुनः पुनः

जन्म घेऊन अति उंच अशा आकाशांतून जगाचें निरीक्षण करीत असते. ती ही उषा, पहा प्रथमाहुतीच्या वेळी सर्वांचे अगोदर येऊन पोहोंचली आहे. ॥ २ ॥

यद॒द्य भा॒गं वि॒भजा॑सि॒ नृभ्य॒ उषो॑ देवि मर्त्य॒त्रा सु॑जाते ॥

दे॒वो नो॒ अत्र॑ सवि॒ता दमू॑ना॒ अना॑गसो वोचति॒ सूर्या॑य ॥ ३ ॥

यत् अद्य भागं विऽभजासि नृऽभ्यः उषः देवि मर्त्यऽत्रा सुऽजाते ॥

देवः नः अत्र सविता दमूनाः अनागसः वोचति सूर्याय ॥ ३ ॥

हे देवी उषे, तूं अत्युच्च ठिकाणी जन्म घेऊन मनुष्यमात्राचें रक्षण करीत असतेस. तूं आजच्या दिवसाचा सुखदुःखाचा वांटा ज्याचा त्यास देण्याचे विचारांत आहेस, तर आमचे साठीं असा प्रयत्न कर की जो ईश्वर स्वतः आत्मसंयमी असून सर्वांस प्रेरणा करतो, त्यानें आम्हीं निष्पाप आहों, असे आज उगवत्या सूर्याला बजावून सांगावे. ॥ ३ ॥

गृ॒हंगृ॑हमह॒ना या॒त्यच्छा॑ दि॒वेदि॑वे॒ अधि॒ नामा॒ दधा॑ना ॥

सिषासन्ती द्योतना शश्वदागादग्रंमग्रमिद्भजते वसूनाम् ॥ ४ ॥

गृहंऽगृहं अहना याति अच्छ दिवेऽदिवे अधि नामा दधाना ॥

सिसासंती द्योतना शश्वत् आ अगात् अग्रऽमग्रं इत् भजते वसूनाम् ॥ ४ ॥

दररोज निरनिराळाच थाट करून ही प्रकाशवती उषा घरोघर भेट देण्यास जात असते. सज्जनांवर अनुग्रह करण्याविषयी फारच उत्सुक आणि सदैव तेजःपुंह अशी ही उषा पहा ! येऊन पोहोंचली आहे. जगांत यच्चावत् ज्या सुंदर वस्तु आहेत त्यांचा वरवरचा म्हणजे उत्तम उत्तम जो भोग असतो, त्यांचा आस्वाद (प्रकाशाच्या योगानें) हीच घेते. ॥ ४ ॥

भगस्य स्वसा वरुणस्य जामिरुषः सूनृते प्रथमा जरस्व ॥

पश्चा स दघ्या यो अघस्य धाता जयेम तं दक्षिणया रथेन ॥ ५ ॥

भगस्य स्वसा वरुणस्य जामिः उषः सूनृते प्रथमा जरस्व ॥

पश्चा सः दघ्याः यः अघस्य धाता जयेम तं दक्षिणया रथेन ॥ ५ ॥

भाग्यदात्या देवाची तूं बहीण आणि वरुणाचीही पण आप्तच शोभतेस. हे उषे, सत्य आणि मनोहर स्तोत्रें म्हणण्याची स्फूर्तीही देणारी तूंच आहेस. तुझेंच वर्णन प्रथम होऊं दे. पापकर्म करणारा जो मनुष्य असेल त्यास चांगलीच ठोकर लागून तो मागच्या मागें धडपडून पडो. तूं सदाचार प्रवर्तक आहेस, म्हणून तुझ्याच सहाय्यानें आम्हीं त्यास हा हा म्हणतां पादाक्रांत करून टाकूं. ॥ ५ ॥

उदीरतां सूनृता उत्पुरंधीरुदग्नयः शुशुचानासो अस्थुः ॥

स्पार्हा वसूनि तमसापगूळ्हाविष्कृण्वन्त्युषसो विभातीः ॥ ६ ॥

उत् ईरतां सूनृताः उत् पुरंऽधीः उत् अग्नयः शुशुचानासः अस्थुः ॥

स्पार्हा वसूनि तमसा अपऽगूळ्हा आविः कृण्वंति उषसः विऽभातीः ॥ ६ ॥

आतां सत्यार्थपूर्ण आणि हृदयंगम स्तोत्रें गाण्यास सुरवात होऊं द्या, कारण ह्या उषःकाली वेदीवरील अग्नी प्रदीप्त झाले आहेत, आणि जगांतील आल्हादकारक संपत्ति जी अंधःकारांत आतांपर्यंत गडप होऊन पडली होती, तिला ह्या देदीप्यमान उषेनें आपल्या नजरेस पुन्हां पाडले आहे. ॥ ६ ॥

अपा॒न्यदेत्य॒भ्य१॑न्यदे॑ति॒ विषु॑रूपे॒ अह॑नी॒ सं च॑रेते ॥

प॒रि॒क्षितो॒स्तमो॑ अ॒न्या गुहा॑क॒रद्यौदु॒षाः शोशु॑चता॒ रथे॑न ॥ ७ ॥

अप अन्यत् एति अभि अन्यत् एति विषुरूपे इति विषुऽरूपे अहनी इति सं चरेते इति ॥

परिऽक्षितोः तमः अन्या गुहा अकः अद्यौत् उषाः शोशुचता रथेन ॥ ७ ॥

एक दिसूं लागतांच दुसरें दृष्टिआड होते, ह्याप्रमाने ह्या वर्षरूप पुरुषाची उषा आणि रात्र हीं दोन अंगे लहान मोठी होतात, व एकामागून एक अशीं लागोपाठ फिरत असतात. हे जे वर्षाचे दोन प्रकार पृथ्वीवर अनुक्रमानें होत असतात, त्यापैकीं एक, म्हणजे रात्र, अंधःकारास कोनाकोपऱ्यांत दडवून ठेवते न ठेवते तोंच दुसरी, म्हणजे उषा, ही उज्ज्वल अशा रथांत बसून उदय पावते. ॥ ७ ॥

स॒दृशी॑र॒द्य स॒दृशी॒रिदु॑ श्वो दी॒र्घं स॑चन्ते॒ वरु॑णस्य॒ धाम॑ ॥

अ॒न॒व॒द्यास्त्रिं॒शतं॒ योज॑ना॒न्येकै॑का॒ क्रतुं॑ परि॑ यन्ति स॒द्यः ॥ ८ ॥

सऽदृशीः अद्य सऽ दृशीः इत् ऊं इति श्वः दीर्घं सचंते वरुणस्य धाम ॥

अनवद्याः त्रिंशतं योजनानि एकाऽएका क्रतुं परि यंति सद्यः ॥ ८ ॥

ह्या उषा जशा आज दिसतात तशाच त्या उद्याही दिसतील. आणि अशाच रीतीनें वरुणाच्या आकाशरूपी अवाढव्य राज्यांतून ह्या प्रवास करीत असतात. ह्यांच्यामध्यें कोणी कांही दोष काढूं म्हणेल तर अशक्य अशा त्या निष्कलंक आहेत. ह्यांच्यापैकीं, प्रत्येक उषा आकाशास तीस तीस प्रदक्षिणा करते, व अशा रीतीनें सर्वजणी आपआपलें नेमून दिलेले काम पार पाडीत असतात. ॥ ८ ॥

जा॒न॒त्यह्नः॑ प्रथ॒मस्य॒ नाम॑ शु॒क्रा कृ॒ष्णाद॑जनिष्ट श्विती॒ची ॥

ऋ॒तस्य॒ योषा॒ न मि॑नाति॒ धामाह॑रहर्निष्कृ॒तमा॒ चर॑न्ती ॥ ९ ॥

जानति अह्नः प्रथमस्य नाम शुक्रा कृष्णात् अजनिष्ट श्वितीची ॥

ऋतस्य योषा न मिनाति धाम अहःऽअहः निःऽकृतं आऽचरंती ॥ ९ ॥

नूतन वर्षारंभाचा प्रथमच दिवस आतां खास उगवणार, असें जिच्या येण्यानें समजते ती ही उषा पहा काळ्याकुट्ट अंधःकारातून शुभ्र तेजानें मंडित होऊन वर निघत आहे आणि यद्यपि आपला नेमलेला कार्यभाग संपविण्यांत रात्रंदिवस ती गर्क होऊन गेलेली असते; तरीही ती सुंदरी सूर्याचा जो पुरातन सत्यमार्ग आहे, त्याला सोडून केंसाइतकीसुद्धां बाजूस जात नाहीं. ॥ ९ ॥

क॒न्येव त॒न्वा३॑ शाश॑दानाँ॒ एषि॑ देवि दे॒वमिय॑क्षमाणम् ॥

सं॒स्मय॑माना युव॒तिः पु॒रस्ता॑दा॒विर्वक्षां॑सि कृणुषे विभा॒ती ॥ १० ॥

कन्याऽइव तन्वा शाशदाना एषि देवि देवं इयक्षमाणम् ॥

संऽस्मयमाना युवतिः पुरस्तात् आविः वक्षांसि कृणुषे विऽभाती ॥ १० ॥

जिचे सर्व अवयव अगदी कसे रेखल्यासारखे भरदार आहेत, अशा एखाद्या नववधूप्रमाणें हे तेजःपुंज उषे, तू आपल्या देदीप्यमान प्रियकराकडे जात असतेस, कारण तोही तुजप्रमाणेंच उत्सुक झालेला असतो, तेव्हां गालांतल्या गालांत हसत हसत व चमकत आपल्या तारुण्याच्या भरांत तूं आपले कुचमंडल त्याच्या देखत किंचित उघडे करावेंस हे साहजिकच आहे. ॥ १० ॥

सु॒सं॒का॒शा मा॒तृमृ॑ष्टेव॒ योषा॒विस्त॒न्वं कृणुषे दृ॒शे कम् ॥

भ॒द्रा त्वमु॑षो वित॒रं व्युच्छ॒ न तत्ते॑ अ॒न्या उ॒षसो॑ नशन्त ॥ ११ ॥

सुऽसंकाशा मातृमृष्टाऽइव योषा आविः तन्वं कृणुषे दृशे कम् ॥

भद्रा त्वं उषः विऽतरं वि उच्छ न तत् ते अन्याः उषसः नशंत ॥ ११ ॥

एखाद्या तरुण सुंदरीला तिच्या आईनें न्हाऊं घालून दागदागिन्यांनी सजवावी, त्याप्रमाणे नटून आमच्या डोळ्यांचे पारणे फेडण्यासाठीच तूं आपलें रूप आम्हांपुढें प्रकट करीत असतेस; तर हे उषे तूं आज प्रकाशून सर्वांचे कल्याण

कर, आणि आजपर्यंत पुष्कळ प्रभातसमय झाले, परंतु त्यांच्यापैकीं एकाला तरी तुझी सर आली असें कधींही होऊं देऊं नको. ॥ ११ ॥

अश्वा॑वती॒र्गोम॑तीर्वि॒श्ववा॑रा॒ यत॑माना र॒श्मिभिः॒ सूर्य॑स्य ॥

परा॑ च॒ यन्ति॒ पुन॒रा च॑ यन्ति भ॒द्रा नाम॒ वह॑माना उ॒षासः॑ ॥ १२ ॥

अश्वऽवतीः गोऽमतीः विश्वऽवाराः यतमानाः रश्मिभिः सूर्यस्य ॥

परा च यंति पुनः आ च यंति भद्रा नाम वहमानाः उषासः ॥ १२ ॥

ह्या उषांच्या अंगी चापल्य कसें अगदी ओतप्रत भरलें आहे. ह्या आपल्या प्रभेनें सूर्यकिरणांशी स्पर्धा करतां करतां गुप्त होतात व पुन्हां प्रगटही होतात. ह्याप्रमाणें अनेक मंगल स्वरूपें धारण करण्याचा यांचा क्रम चालत आतो. ॥ १२ ॥

ऋ॒तस्य॑ र॒श्मिम॑नु॒यच्छ॑माना भ॒द्रम्भ॑द्रं॒ क्रतु॑म॒स्मासु॑ धेहि ॥

उषो नो अद्य सुहवा व्युच्छास्मासु रायो मघवत्सु च स्युः ॥ १३ ॥

ऋतस्य रश्मिं अनुऽयच्छमाना भद्रंऽभद्रं क्रतुं अस्मासु धेहि ॥

उषः नः अद्य सुऽहवा वि उच्छ अस्मासु रायः मघवत्ऽसु च स्युरिति स्युः ॥ १३ ॥

सत्यस्वरूप जो सूर्य त्याच्या किरणांशी तूं एकरूप होऊन जातेस, त्याप्रमाणें आमच्या मध्येंही तुझ्या कृपेनें उत्तरोत्तर कल्याणप्रद अशी कर्तृत्वशक्ति येऊं दे. हे उषे तुझी आज आम्ही मनःपूर्वक प्रार्थना केली आहे, तर आमच्याकरितां उत्तम रीतीनें प्रकाशित हो आणि उत्कृष्ट अशी जी संपत्ति आहे तिचा लाभ, आम्ही आणि आमचे औदार्यशील यजमान, अशा दोघांसही होऊं दे. ॥ १३ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १२४ (उषा सूक्त)

ऋषि : कक्षीवत् औशिज - देवता : उषा - छंद - त्रिष्टुभ्

उषा उच्छन्ती समिधाने अग्ना उद्यन्सूर्य उर्विया ज्योतिरश्रेत् ॥

देवो नो अत्र सविता न्वर्थं प्रासावीद्द्विपत्प्र चतुष्पदित्यै ॥ १ ॥

उषाः उच्छंती संऽइधाने अग्ना उत्ऽयन् सूर्यः उर्विया ज्योतिः अश्रेत् ॥

देवः नः अत्र सविता नु अर्थं प्र असावीत् द्विऽपत् प्र चतुःऽपत् इत्यै ॥ १ ॥

आतां अग्नि प्रज्वलित झाला आहे, उषादेवी अंधःकार नाहींसा करीत असून सूर्यही उदयोन्मुख होत आहे, आणि दोघांच्याही प्रकाशानें दिशा दूरवर कोंदाटून गेल्या आहेत, अशा वेळीं सर्वत्र चैतन्य उत्पन्न करणारा जो प्रकाशमय भगवान त्यानें येथें आमच्याकरिता - मनुष्यें काय आणि पशू काय - प्रत्येकानें काम करावें म्हणून सर्वांसच झोपेंतून पुन्हां पूर्व स्थितीवर आणले आहे. ॥ १ ॥

अमिनती दैव्यानि व्रतानि प्रमिनती मनुष्या युगानि ॥

ईयुषीणामुपमा शश्वतीनामायतीनां प्रथमोषा व्य् अद्यौत् ॥ २ ॥

अमिनती दैव्यानि व्रतानि प्रऽमिनती मनुष्या युगानि ॥

ईयुषीणां उपमा शश्वतीनां आऽयतीनां प्रथमा उषाः वि अद्यौत् ॥ २ ॥

ईश्वरी नियमास बाध न आणतां मनुष्यमात्राच्या आयुष्याची मर्यादा मात्र ही उषा कमी कमी करीत असते. आजपर्यंत ज्या असंख्य उषा येऊन गेल्या, त्यांच्यामध्ये नामांकित, व अजून ही ज्या पुढें येणार आहेत, त्यांच्यामध्यैंही उत्कृष्ट अशी ही पहा आजची उषा उदय पावली आहे. ॥ २ ॥

एषा दिवो दुहिता प्रत्यदर्शि ज्योतिर्वसाना समना पुरस्तात् ॥

ऋतस्य पन्थामन्वेति साधु प्रजानतीव न दिशो मिनाति ॥ ३ ॥

एषा दिवः दुहिता प्रति अदर्शि ज्योतिः वसाना समना पुरऽस्तात् ॥

ऋतस्य पंथां अनु एति साधु प्रजानतीऽइव न दिशः मिनाति ॥ ३ ॥

आहा ! ही पहा आकाशकन्या उषा पूर्व दिग्भागीं पुन्हां दिसूं लागली. ही वीर स्त्री प्रकाशाचींच वस्त्रें ल्यायली असून सत्यस्वरूप सूर्यानें जो मार्ग आंखून दिला त्याच मार्गानें एखाद्या अत्यंत चतुर स्त्रीप्रमाणें जात असते, आपली दिशा कधींसुद्धां चुकत नाहीं. ॥ ३ ॥

उपो अदर्शि शुन्ध्युवो न वक्षो नोधा इवाविरकृत प्रियाणि ॥

अद्मसन्न ससतो बोधयन्ती शश्वत्तमागात्पुनरेयुषीणाम् ॥ ४ ॥

उपो इति अदर्शि शुन्ध्युवः न वक्षः नोधाःऽइव आविः अकृत प्रियाणि ॥

अद्मऽसत् न ससतः बोधयंती शश्वत्ऽतमा आ अगात् पुनः आऽईयुषीणाम् ॥ ४ ॥

हे पहा येथे तिचे जणों शुभ्र आणि उज्ज्वल वक्षस्थलच कीं काय दिसत आहे. एखादा कवी ज्याप्रमाणें कोमल अंतःकरण वृत्तींची आपणांस ओळख करून देतो त्याप्रमाणें जगांतील सौंदर्याची ओळख हिनेंच आपणांस करून दिली आहे. घरची मालकीण मुलाबाळांस उठविते, त्याप्रमाणें झोपेंत घोरत पडलेल्या सर्व विश्वाला ही जागें करीत आहे आणि आपल्यास सोडून न जातां, गेलेल्या उषांमधून पुन्हां आपणाकडे परत आली आहे. ॥ ४ ॥

पूर्वे अर्धे रजसो अप्त्यस्य गवां जनित्र्यकृत प्र केतुम् ॥

व्यु प्रथते वितरं वरीय ओभा पृणन्ती पित्रोरुपस्था ॥ ५ ॥

पूर्वे अर्धे रजसः अप्त्यस्य गवां जनित्रि अकृत प्र केतुम् ॥

वि ऊं इति प्रथते विऽतरं वरीयः आ उभा पृणंती पित्रोः उपऽस्था ॥ ५ ॥

बाष्प आणि धुकें ह्यांनी भरून गेलेल्या पूर्वेकडील अर्ध्या आकाशांत, प्रकाशाला प्रसविणाऱ्या ह्या उषादेवीनें पहा कसा आपला ध्वज रोवून दिला आहे. त्याची प्रभा इतकी दूरवर फांकलेली आहे, कीं आईबापांच्या ज्या क्षितिजरूपी मांडीवर ही उषा बसत असते, ते सर्व क्षितीजच दोन्ही बाजूस प्रकाशानें कसे तिने घनदाट भरून टाकलें आहे. ॥ ५ ॥

एवेदेषा पुरुतमा दृशे कं नाजामिं न परि वृणक्ति जामिम् ॥

अरेपसा तन्वा शाशदाना नार्भादीषते न महो विभाती ॥ ६ ॥

एव इत् एषा पुरुऽतमा दृशे कं न अजामिं न परि वृणक्ति जामिम् ॥

अरेपसा तन्वा शाशदाना न अर्भात् ईषते न महः विभाती ॥ ६ ॥

सर्वांनी दर्शनसुख अनुभवावें अशी तर ह्या अति उदार उषेची इच्छा म्हणून ही स्वकीय असो परकीय असो कोणासही वगळित नाही. ही तेजस्वी उषा आपल्या निष्कलंक लावण्यामुळें सर्वांस स्पष्ट दिसणारी अशी आहे. ही लहानापासून थोरांपर्यंत कोणाचाही अव्हेर करीत नाही. ॥ ६ ॥

अ॒भ्रा॒तेव॑ पुं॒स ए॑ति प्रती॒ची ग॑र्ता॒रुगि॑व स॒नये॒ धना॑नाम् ॥

जा॒येव॒ पत्य॑ उश॒ती सु॒वासा॑ उ॒षा ह॒स्रेव॒ नि रि॑णीते॒ अप्सः॑ ॥ ७ ॥

अभ्राताऽइव पुंसः एति प्रतीची गर्तऽआरुगिव सनये धनानाम् ॥

जायाऽइव पत्ये उशती सुऽवासा उषाः हस्राऽइव नि रिणीते अप्सः ॥ ७ ॥

ही उषा आम्हां वीर पुरुषांसन्मुख येते तेव्हां ती राजाच्या एकुलत्या एक कन्येप्रमाणे मोठ्या थाटानें न्यायासनावर जणों काय बसून निर्णय केल्याप्रमाणे लोकांस यथान्याय भाग्यसंपत्ति वाटून देण्याकरितां येते, परंतु कधीं कधीं पतीकरितां उत्सुक होऊन वस्त्रालंकारांनी नटून सजून त्याच्याकडे निघालेल्या युवतीप्रमाणें, हिचा डौल असतो व तेव्हां ही उषा स्मित हास्य करणाऱ्या बालिकेप्रमाणें आपलें सौंदर्य खुबीनें प्रकट करतें. ॥ ७ ॥

स्वसा॒ स्वस्रे॒ ज्याय॑स्यै॒ योनि॑मारै॒गपै॑त्यस्याः प्रति॒चक्ष्ये॑व ॥

व्यु॒च्छन्ती॑ र॒श्मिभि॒ः सूर्य॑स्या॒ञ्ज्यङ्क्तेष समन॒गा इ॑व॒ व्राः ॥ ८ ॥

स्वसा स्वस्रे ज्यायस्यै योनिं अरैक् अप एति अस्याः प्रतिचक्ष्यऽइव ॥

विऽउच्छंती रश्मिऽभिः सूर्यस्य अंजि अंक्ते समनगाःऽइव व्राः ॥ ८ ॥

धाकट्या बहिणीनें वडील बहिण दृष्टीस पडतांच तिच्याकरितां जागा मोकळी करून दिली आणि तिच्याकडे जणों काय पहात पहातच तिचा निरोप घेतला. अशा वेळेस वडील बहिण उषा हिचा, बालरवीच्या किरणांच्या बरोबरीनें असा उज्ज्वल प्रकाश पडतो कीं, जणों काय, विद्युल्लतांचा लोळच चमकून राहिला आहे. ॥ ८ ॥

आसाम् पूर्वासामहस्सु स्वसॄणामपरा पूर्वामभ्येति पश्चात् ॥

ताः प्रत्नवन्नव्यसीर्नूनमस्मे रेवदुच्छन्तु सुदिना उषासः ॥ ९ ॥

आसां पूर्वासां अहऽसु स्वसृणां अपरा पूर्वां अभि एति पश्चात् ॥

ताः प्रत्नतवत् नव्यसीः नूनं अस्मे इति रेवत् उच्छंतु सुऽदिना उषसः ॥ ९ ॥

परस्परांच्या बहिणी अशा ज्या ह्या उषा आजपर्यंत येऊन गेल्या त्यामध्यें ही तऱ्हा दिसतें कीं दररोज एक येऊन जाते न जाते तोंच पुढची लागलीच ठेवलेली तर आतांही पुढील आनंदाचे दिवस दाखविणाऱ्या ज्या नूतन उषा अजून यावयाच्या आहेत; त्या पूर्वींच्या उषां प्रमाणेंच आम्हांवर सद्भाग्याचा प्रकाश पाडोत. ॥ ९ ॥

प्र बोधयोषः पृणतो मघोन्यबुध्यमानाः पणयः ससन्तु ॥

रेवदुच्छ मघवद्भ्यो मघोनि रेवत्स्तोत्रे सूनृते जारयन्ती ॥ १० ॥

प्र बोधय उषः पृणतः मघोनि अबुध्यमानाः पणयः ससंतु ॥

रेवत् उच्छ मघवत्ऽभ्यः मघोनि रेवत् स्तोत्रे सूनृते जारयंती ॥ १० ॥

हे औदार्यशालिनी उषे, दानशूर भक्त जनांना जागृत कर, परंतु कवडीचुंबक दुष्ट मात्र जागे न होतां निरंतर घोरत पडोत. हे उदारचरिते, तूं दानशील भक्त जनांना ऐश्वर्याने प्रकाशित कर. हे उषे, सत्य व सुरस असें भाषण करण्याला स्फूर्ति तूंच देतेस. कवींना प्रेरणा करणारीही तूंच; तर आतां भगवत् स्तवन करणाऱ्या भक्तांस ऐश्वर्यानें प्रकाशित कर. ॥ १० ॥

अवे॒यम॑श्वैद्युव॒तिः पु॒रस्ता॑द्यु॒ङ्क्ते गवा॑मरु॒णाना॒मनी॑कम् ॥

वि नू॒नमु॑च्छा॒दस॑ति॒ प्र के॒तुर्गृ॒हंगृ॑ह॒मुप॑ तिष्ठाते अ॒ग्निः ॥ ११ ॥

अव इयं अश्वैत् युवतिः पुरस्तात् युङ्क्ते गवां अरुणानां अनीकम् ॥

वि नूनं उच्छात् असति प्र केतुः गृहंऽगृहं उप तिष्ठाते अग्निः ॥ ११ ॥

पहा समोर ही लावण्यवती उषा आपल्या वैभवाच्या भरांत दिसूं लागली आहे. हिनें आपल्या रथास जे घोडे जोडले आहेत, तेही आरक्त किरणांचेच असतात. तिच्या तेजःपुंज पताकेचा प्रकाश ह्या आकाशाच्या तमोमय पोकळींत आतां खात्रीनें दूरवर झळकेल, आणि तत्क्षणी घरोघर अग्नीची स्तवनें सुरू होतील. ॥ ११ ॥

उत्ते॒ वय॑श्चिद्वस॒तेर॑पप्त॒न्नर॑श्च॒ ये पि॑तु॒भाजो॒ व्युष्टौ ॥

अ॒मा स॒ते व॑हसि॒ भूरि॑ वा॒ममु॑षो देवि दा॒शुषे॒ मर्त्या॑य ॥ १२ ॥

उत् ते वयः चित् वसतेः अपप्तन् नरः च ये पितुऽभाजः विऽउष्टौ ॥

अमा सते वहसि भूरि वामं उषः देवि दाशुषे मर्त्याय ॥ १२ ॥

तुझा प्रकाश दिसूं लागतांच हे पहा पक्षिगण आपापल्या घरट्यांतून बाहेर उडून गेले, आणि पोटाच्या व्यवसायांत मग्न असणारे लोक आपापल्या उद्योगास लागले. परंतु एक दानकर्मरत सद्भक्त मात्र व्यर्थ यातायात न करतां आपल्या ठिकाणीं स्वस्थ असतो, तथापि त्याच्यासाठी अत्युत्कृष्ट संपत्ति तूं स्वतः विपुल घेऊन येतेस. ॥ १२ ॥

अस्तो॑ढ्वं स्तोम्या॒ ब्रह्म॑णा॒ मेऽ◌॑वीवृधध्वमुश॒तीरु॑षासः ॥

यु॒ष्माकं॑ देवी॒रव॑सा सनेम सह॒स्रिणं॑ च श॒तिनं॑ च॒ वाज॑म् ॥ १३ ॥

अस्तोढ्वं स्तोम्याः ब्रह्मणा मे अवीवृधध्वं उशतीः उषसः ॥

युष्माकं देवीः अवसा सनेम सहस्रिणं च शतिनं च वाजम् ॥ १३ ॥

महनीय उषांनो, ह्या माझ्या स्तोत्रानें तुमचे स्तवन यथामति झाले आहे व त्यामुळें हे प्रेमळ देवींनो, तुम्ही अतिशय संतुष्टही झाल्या आहांत. तर आतां तुमच्या प्रसादानें अशा सामर्थ्याचा लाभ होवो कीं जें शेंकडो किंवा हजारोंनाही भारी होईल. ॥ १३ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १२५ (दान सूक्त)

ऋषि : कक्षीवत् औशिज - देवता : स्वनय दानस्तुति - छंद - जगती, त्रिष्टुभ्

प्राता रत्नम् प्रातरित्वा दधाति तं चिकित्वान्प्रतिगृह्या नि धत्ते ॥

तेन प्रजां वर्धयमान आयू रायस्पोषेण सचते सुवीरः ॥ १ ॥

प्रातरिति रत्नं प्रातःऽइत्वा दधाति तं चिकित्वान् प्रतिऽगृह्य नि धत्ते ॥

तेन प्रऽजां वर्धयमानः आयूः रायः पोषेण सचते सुऽवीरः ॥ १ ॥

पाहुण्याने अगदी पहांटेस येऊन आपल्या जवळची रत्नें सकाळी आपल्या पित्यापुढें ठेविलीं व त्यानेंही तीं निरखून पाहून त्यांचा स्वीकार केला. तेव्हां ह्या सत्पात्री केलेल्या औदार्यामुळें त्या पराक्रमी राजास भरपूर संपत्ति व दीर्घायुष्य ह्यांचा लाभ होऊन उत्तरोत्तर वृद्धिंगत होणारी समृद्धिही त्यास प्राप्त झाली. ॥ १ ॥

सुगुरसत्सुहिरण्यः स्वश्वो बृहदस्मै वय इंद्रो दधाति ॥

यस्त्वायन्तं वसुना प्रातरित्वो मुक्षीजयेव पदिमुत्सिनाति ॥ २ ॥

सुऽगुः असत् सुऽहिरण्यः सुऽअश्वः बृहत् अस्मै वयः इंद्रः दधाति ॥

यः त्वा आऽयंतं वसुना प्रातःऽइत्वः मुक्षीजयाऽइव पदिं उत्ऽसिनाति ॥ २ ॥

त्या राजाला ज्ञानगोधन, अक्षव्य संपत्ति आणि जातिवंत घोडेही प्राप्त होवोत. इंद्र त्याला ऐन उमेदीच्या वयांत ठेवील, कारण पाहुण्या असें पहा, कीं पारधी जसा जाळ्यात शिकार पकडतो, त्याप्रमाणें तूं आलेला पाहून त्यानें आपल्या जवळची अमोलिक संपत्ति देऊन तुला बांधून टाकले आहे. ॥ २ ॥

आय॑म॒द्य सु॒कृतं॑ प्रा॒तरि॒च्छन्नि॒ष्टेः पु॒त्रं वसु॑मता॒ रथे॑न ॥

अं॒शोः सु॒तं पा॑यय मत्स॒रस्य॑ क्ष॒यद्वी॑रं वर्धय सू॒नृता॑भिः ॥ ३ ॥

आयं अद्य सुऽकृतं प्रातःऽ इच्छन् इष्टेः पुत्रं वसुऽमता रथेन ॥

अंशोः सुतं पायय मत्सरस्य क्षयत्ऽवीरं वर्धय सूनृताभिः ॥ ३ ॥

यज्ञकर्मनिष्ठ पुरुषाच्या सच्छील पुत्राला भेटण्याकरितां आज सकाळी मी आपल्या रथांत भरपूर धन भरून घेऊन येथें आलो आहे. तर परमपुरुष ईश्वरास सोमवल्ली पिळून काढलेला आल्हाददायक रस अर्पण कर आणि शूर पुरुषांनाही ज्याचा आसरा असतो, त्या रुद्राचें सत्य आणि रसभरित स्तोत्रांनी स्तवन कर. ॥ ३ ॥

उप॑ क्षरन्ति॒ सिंध॑वो मयो॒भुव॑ ईजा॒नं च॑ य॒क्ष्यमा॑णं च धे॒नवः॑ ॥

पृ॒णन्तं॑ च॒ पपु॑रिं च श्रव॒स्यवो॑ घृ॒तस्य॒ धारा॒ उप॑ यन्ति वि॒श्वतः॑ ॥ ४ ॥

उप क्षरंति सिंधवः मयःऽभुव ईजानं च यक्ष्यमाणं च धेनवः ॥

पृणंतं च पपुरिं च श्रवस्यवः घृतस्य धाराः उप यंति विश्वतः ॥ ४ ॥

जो पुण्य पुरुष प्रत्यक्ष यज्ञ करतो, त्याच्याच केवळ नव्हे, तर यज्ञ करण्याचा नुसता हेतुही जो मनांत बाळगतो, त्यांच्याकडे सुद्धां धेनू आणि आनंदाचे पूर लोटणाऱ्या महानद्या धांव घेत असतात. त्याचप्रमाणें ईश्वराला संतुष्ट करणाऱ्या सत्पुरुषाकडे सुकीर्तिरूप घृताचे प्रवाहचे प्रवाह चोहोंकडून वहात येतात. ॥ ४ ॥

नाक॑स्य पृ॒ष्ठे अधि॑ तिष्ठति श्रि॒तो यः पृ॒णाति॒ स ह॑ दे॒वेषु॑ गच्छति ॥

तस्मा॒ आपो॑ घृ॒तम॑र्षन्ति॒ सिंध॑व॒स्तस्मा॑ इ॒यं दक्षि॑णा पिन्वते॒ सदा॑ ॥ ५ ॥

नाकस्य पृष्ठे अधि तिष्ठति श्रितः यः पृणाति सः ह देवेषु गच्छति ॥

तस्मै आपः घृतं अर्षंति सिंधवः तस्मै इयं दक्षिणा पिन्वते सदा ॥ ५ ॥

जो कोणी दान धर्मानें ईश्वरास संतुष्ट करतो तो स्वर्गाच्या शिखरावर चढून जाऊन तेथेंच राहतो. त्याचा देवांच्या मंडळात प्रवेश होतो. त्याच्याचकडे स्वर्गातील व पृथ्वीवरील नद्या घृताचे लोट वाहून नेतात. आणि त्याच्याकरितां ही सुपीक धरित्री समृद्धीनें ओतप्रोत भरून जाते. ॥ ५ ॥

दक्षि॑णावता॒मिदि॒मानि॑ चि॒त्रा दक्षि॑णावतां दि॒वि सू॒र्या॑सः ॥

दक्षि॑णावन्तो अ॒मृत॑ं भजन्ते॒ दक्षि॑णावन्तः॒ प्र ति॑रन्त॒ आयु॑ः ॥ ६ ॥

दक्षिणाऽवतां इत् इमानि चित्रा दक्षिणाऽवतां दिवि सूर्यासः ॥

दक्षिणाऽवंतः अमृतं भजंते दक्षिणाऽवंतः प्र तिरंते आयुः ॥ ६ ॥

जे दानशाली आहेत, त्यांच्याच करितां ही जगांतील अमोलिक संपत्ति असते. दानशाली लोककरितांच आकाशांत सूर्य व तारे प्रकाशतात. दानशाली लोकांनाच अविनाशी पद मिळते आणि दानशाली लोकच आपले व दुसऱ्यांचे आयुष्य वाढवूं शकतात. ॥ ६ ॥

मा पृणन्तो दुरितमेन आरन्मा जारिषुः सूरयः सुव्रतासः ॥

अन्यस्तेषां परिधिरस्तु कश्चिदपृणन्तमभि सं यन्तु शोकाः ॥ ७ ॥

मा पृणंतः दुःऽइतं एन आ अरन् मा जारिषुः सूरयः सुऽव्रतासः ॥

अन्यः तेषां परिऽधिः अस्तु कः चित् अपृणंतं अभि सं यंतु शोकाः ॥ ७ ॥

दानधर्मानें ईश्वरास संतुष्ट करणारे लोक कधींही दुःखांत आणि पातकांत न पडोत. सदाचाररत ज्ञानी कधींही वार्धक्यानें दुर्बल न होवोत. वाटेल तो मनुष्य त्यांचा साहाय्यकर्ता होईल आणि सर्व दुःखदायक प्रसंग कंजुष माणसांवर कोसळतील. ॥ ७ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १२६ (स्वनय दानस्तुति सूक्त)

ऋषि : कक्षीवत् औशिज - देवता : स्वनय दानस्तुति - छंद - जगती, त्रिष्टुभ्

अमं॑न्दा॒न् स्तोमा॒न्प्रभ॑रे मनी॒षा सिन्धा॒वधि॑ क्षिय॒तः भा॒व्यस्य॑ ।

यः मे॑ सु॒हस्र॒ं अमि॑मीत स॒वान॒तूर्तः॒ राजा॒ श्रव॑ इ॒च्छमा॑नः ॥ १ ॥

अमंदान् स्तोमान् प्र भरे मनीषा सिंधौ अधि क्षियतः भाव्यस्य ॥

यः मे सहस्रं अमिमीत सवान् अतूर्तः राजा श्रवः इच्छमानः ॥ १ ॥

मी भाव्य राजाची जी मनःपूर्वक प्रशंसा करीत आहे, ती सामान्य नव्हे. हा भाव्य, सिंधु देशाचा राजा हयानेंच मजकरितां हजारों यज्ञ केले. हा राजा अजिंक्य असून सत्कर्मोत्सुकही आहे. ॥ १ ॥

श॒तं राज्ञो नाध॑मानस्य नि॒ष्कान् श॒तमश्वा॒न्प्रय॑तान्स॒द्य आद॑म् ।

श॒तं क॒क्षीवाँ॒ असु॑रस्य॒ गोनां॑ दि॒वि श्रवोऽ॒जर॒मा त॑तान ॥ २ ॥

शतं राज्ञः नाधमानस्य निष्कान् शतं अश्वान् प्रऽयतान् सद्यः आदम् ॥

शतं कक्षीवान् असुरस्य गोनां दिवि श्रवः अजरं आ ततान ॥ २ ॥

त्याने आग्रह केल्यामुळे शेंकडों सुवर्ण निष्क, शेंकडों कुमाईत घोडे ह्यांचा मी ताबडतोब स्वीकार केला. मज कक्षिवानाला त्या पराक्रमी राजापासून शेंकडों गाई मिळाल्या. आणि मी त्याची अखंड कीर्ति स्वर्गापर्यंत पसरविली. ॥ २ ॥

उप॑ मा श्या॒वाः स्व॒नये॑न द॒त्ता व॒धूम॑न्तो॒ दश॒ रथा॑सो अस्थुः ।

ष॒ष्टिः स॒हस्र॒मनु॒ गव्य॒मागा॒त्सन॑त्क॒क्षीवाँ॑ अभिपि॒त्वे अह्ना॑म् ॥ ३ ॥

उप मा श्यावाः स्वनयेन दत्ता वधूमंतः दश रथासः अस्थुः ॥

षष्टिः सहस्रं अनु गव्यं आ अगात् सनत् कक्षीवान् अभिऽपित्वे अह्नाम् ॥ ३ ॥

ह्या वेळेस स्वनय राजाने दिलेले दहा रथ मजजवळ होते, त्यांस काळेभोर घोडे जोडले असून रथांत माझ्या नूतन विवाहित पत्नी बसल्या होत्या, व त्यांच्यामागें साठ हजार गाईंचे खिल्लार चाललें होतें. ही सर्व देणगी मला कक्षिवानाला आदल्या दिवशी संध्याकाळीं मिळाली. ॥ ३ ॥

च॒त्वा॒रिं॒शद्दश॑रथस्य॒ शोणाः᳚ स॒हस्र॒स्याग्रे॒ श्रेणिं᳚ नयन्ति ।

म॒द॒च्युतः᳚ कृश॒नाव॑तो॒ अत्या॑न्क॒क्षीव॑न्त॒ उद॑मृक्षन्त प॒ज्राः ॥ ४ ॥

चत्वारिंशत् दशऽरथस्य शोणाः सहस्रस्य अग्रे श्रेणिं नयंति ॥

मदऽच्युतः कृशनऽवतः अत्यान् कक्षीवंतः उत् अमृक्षंत पज्राः ॥ ४ ॥

ह्या दहा रथांच्या बरोबर एक हजार शिपाई चालले होते. आणि त्यांच्यापुढें चाळीस अबलख घोड्यांची विनी होती. हे घोडे अगदी मस्त असल्यामुळें झुलत चाललें होते व त्यांच्या आंगावर सोन्यामोत्यांचे साज असून कक्षिवानाच्या व त्याच्या भाऊबंदांच्या नोकरांनींच ह्या घोड्यास मालीश करून तयार केलें होतें. ॥ ४ ॥

पूर्वा॒मनु॒ प्रय॑ति॒माद॑दे व॒स्त्रीन्यु॒क्ताँ अ॒ष्टाव॒रिधा॑यसो॒ गाः ।

सु॒बन्ध॑वः॒ ये वि॒श्या इ॒व व्रा अन॑स्वन्तः॒ श्रव॒ ऐष॑न्त प॒ज्राः ॥ ५ ॥

पूर्वां अनु प्रऽयतिं आ ददे वऽ त्रीन् युक्तान् अष्टौ अरिऽधायसः गाः ॥

सुऽबंधवः ये विश्याःऽइव व्राः अनस्वंतः श्रवः ऐषंत पज्राः ॥ ५ ॥

पहिलीचा स्वीकार केल्यानंतर लागलीच तुमचेकडून मला तीन आणि आठ मिळून गाड्यांस जोडलेल्या अकरा बैलांची दुसरी देणगी मिळाली. हे बैल असे तयार होते कीं, ते राजाच्याच वाड्यांत असणें योग्य. बाबानों, एकाच कुटुंबांतील माणसांप्रमाणे तुमचा एकमेकांशी सलोखा आहे, परंतु आम्ही पज्राचे वंशजही अस्सलच आहोंत व आम्ही सत्कार्याचीच आस धरलेली आहे. ॥ ५ ॥

आगधिता परिंगधिता या कशीकेव जङ्गहे ।

ददाति मह्यं यादुरी याशूनां भोज्या शता ॥ ६ ॥

आऽगधिता परिऽगधिता या कशीकाऽइव जंगहे ॥

ददाति मह्यं यादुरी याशूनां भोज्या शता ॥ ६ ॥

सर्वांगित आलिंगनानें जी एखाद्या लतेप्रमाणे माझे शरीरास वेष्टून राहते ती ही तरुणी प्रेमरसानें पूर्ण आणि सर्व सौख्यदायिनी असल्यामुळे मला शेंकडों प्रकारांनी आनंदवीत आहे. ॥ ६ ॥

उपोप मे परा मृश मा मे दभ्राणि मन्यथाः ।

सर्वाहं अस्मि रोमशा गन्धारीणामिवाविका ॥ ७ ॥

उपऽउप मे परा मृश मा मे दभ्राणि मन्यथाः ॥

सर्वा अहं अस्मि रोमशा गंधारीणांऽइव अविका ॥ ७ ॥

ये, अगदी जवळ ये. मला स्पर्श कर. असें समजूं नकोस कीं मी अजून लहानच आहे. पहा, गंधार देशांतील मेंढी जशी ताजीतवानी व तुंद दिसते तशी सर्वतोपरी मीही पण दिसत आहे. ॥ ७ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १२७ (अग्नि सूक्त)

ऋषि : परुच्छेपः - देवता : अग्नि - छंद - अत्यष्टी

अ॒ग्निं होता॑रं मन्ये॒ दास्व॑न्तं॒ वसुं॑ सू॒नुं सह॑सः जा॒तवे॑दसं॒ विप्रं॒ न जा॒तवे॑दसम् ।

य ऊ॒र्ध्वया॑ स्वध्व॒रो दे॒वो दे॒वाच्या॑ कृ॒पा ।

घृ॒तस्य॒ विभ्रा॑ष्टि॒मनु॑ वष्टि शो॒चिषा॒जुह्वा॑नस्य स॒र्पिषः॑ ॥ १ ॥

अग्निं होतारं मन्ये दास्वन्तं वसुं सूनुं सहसः जातऽवेदसं विप्रं न जातवेदसम् ॥

य ऊर्ध्वया सुऽअध्वरः देवः देवाच्या कृपा ॥

घृतस्य विऽभ्राष्टिं अनुं वष्टि शोचिषा आऽजुह्वानस्य सर्पिषः ॥ १ ॥

माझे चित्त अग्नीच्या ठिकाणी आहे. हाच यज्ञांतील होता होय. हा अतिशय उदार. हा संपत्तीचा निधि आणि दुर्बलांस धैर्य देणारा आहे. जसा विद्वान ब्राह्मण आपल्या शास्त्रांत पारंगत असतो, तशी ह्याला या सृष्टीची खडान्खडा माहिती आहे. हाच भगवंत आमचा यज्ञ उत्तम रीतीनें तडीस नेतो. ह्याची कृपा उदात्त आणि त्याच्या देवपणास साजेशी आहे. आहुती देण्याकरितां तयार केलेल्या घृताची आणि नवनीताची स्वच्छता व लकाकी आपल्यास फार आवडते असें हा आपल्या ज्वालांनी दर्शवितो. ॥ १ ॥

यजि॑ष्ठं त्वा॒ यज॑माना हुवेम॒ ज्येष्ठ॒मङ्गि॑ रसां विप्र॒ मन्म॑भि॒र्विप्रे॑भिः शु॒क्र मन्म॑भिः ।

परि॑ज्मानमिव॒ द्यां होता॑रं चर्षणी॒नाम् ।

शो॒चिष्के॑शं॒ वृष॑णं॒ यमि॒मा विशः॒ प्राव॑न्तु जू॒तये॒ विशः॑ ॥ २ ॥

यजिष्ठं त्वा यजमानाः हुवेम ज्येष्ठं अङ्गिरसां विप्र मन्मभिः विप्रेभिः शुक्र मन्मऽभिः ॥

परिज्मानंऽइव द्यां होतारं चर्षणीनाम् ॥

शोचिःऽकेशं वृषणं यं इमा विशः प्र अवंतु जूतये विशः ॥ २ ॥

तूं अत्यंत पूज्य व अंगिरसांमध्यें अत्यंत श्रेष्ठ आहेस. तुझ्या प्रित्यर्थ हे सर्वज्ञ अग्निदेवा आम्हीं तुझे सेवक एकाग्र मनानें हवन करीत आहों. हे तेजोनिधे, विद्वान ब्राह्मणांसहित सुंदर स्तोत्रांनी तुला आळवीत आहोंत. तूं आकाशाला विद्युत्रूपाने जणूं काय वेढाच देत असतोस. सर्व मानवांचा तूं आचार्य असून वीर्यशाली आहेस. प्रदीप्त ज्वाळा हेच तुझे केश; अशा तुजला सर्व जग, सर्व लोक उच्च मनोवृत्ति प्राप्त व्हावी म्हणून शरणांगत असोत. ॥ २ ॥

सः हि पु॒रू चि॒दोज॑सा वि॒रुक्म॑ता॒ दीद्या॑नो॒ भव॑ति द्रुहंत॒रः प॑र॒शुर्न द्रु॑हंत॒रः ।

वी॒ळु चि॒द्यस्य॒ समृ॑तौ॒ श्रु॒व॒द्वने॑व॒ यत्स्थि॒रम् ।

निः॒षह॑माणो यमते॒ नाय॑ते धन्वा॒सहा॒ नाय॑ते ॥ ३ ॥

सः हि पुरु चित् ओजसा विरुक्मता दीद्यानः भवति द्रुहंऽतरः परशुः न द्रुहंऽतरः ॥

वीळु चित् यस्य संऽऋतौ श्रुवत् वनाऽइव यत् स्थिरम् ॥

निःसहमानः यमते न अयते धन्वऽसहा न अयते ॥ ३ ॥

खरोखर आपल्या झगझगीत शस्त्राच्या योगनें हा अग्नि अतिशय उज्वल दिसतो, आणि आपल्या दिव्य प्रभावानें दुर्जनांचा असा नायनाट करतो कीं, जणों काय शत्रूचें निर्दालन करणारा फरशूच. त्याचा स्पर्श होण्याबरोबर कसाही कठीण पदार्थ असो पार वितळून जातो, किंवा कसाही कडक पदार्थ असो, जंगलांप्रमाणे होरपळून जातो. ह्याला कोणीही विरोध करूं शकत नाही. एकदां ठाकून उभा राहिला कीं मागें फिरण्याची गोष्टच नको. मोठमोठ्या धनुर्धरांपुढें सुद्धा तो हार खात नाहीं ॥ ३ ॥

दृ॒ळ्हा चि॑दस्मा॒ अनु॑ दु॒र्यथा॑ वि॒दे तेजि॑ष्ठाभि॒ररणि॑भिर्दा॒ष्ट्यव॑सेऽ॒ग्नये॑ दा॒ष्ट्यव॑से ।

प्र यः पु॒रूणि॒ गाह॑ते॒ तक्ष॒द्वशने॑व शो॒चिषा॑ ।

स्थि॒रा चि॒दन्ना॒ नि रि॑णा॒त्योज॑सा॒ नि स्थि॒राणि॑ चि॒दोज॑सा ॥ ४ ॥

दृळ्हा चित् अस्मै अनु दुः यथा विदे तेजिष्ठाभिः अरणिऽभिः दाष्टि अवसे अग्नये दाष्टि अवसे ॥

प्र यः पुरूणि गाहते तक्षत् वनाऽइव शोचिषा ॥

स्थिरा चित् अन्ना नि रिणाति ओजसा नि स्थिराणि चित् ओजसा ॥ ४ ॥

ह्याला कडक पदार्थांची आहुति देत असतात हें सर्वांस माहीत आहेच व म्हणून प्रज्वलित झालेल्या अरणींच्या योगानें यजमान त्याचा प्रसाद प्राप्त करून घेण्यांकरितां हवन करतो, त्याचें साहाय्य मिळावें म्हणूनही हवन करतो. आपल्या ज्वाळांच्या सपाट्यानें तो अरण्यांची अरण्यें फस्त करतो त्याचप्रमाणेंच पदार्थ कितीही पुष्कळ असोत त्यांच्या आंत तो शिरतो, आणि आपल्या अद्‌भुत सामर्थ्यानें कठीण कठीण धान्यें पक्व दशेस आणतो व उष्णतेनें अतिशय घट्ट पदार्थांचेही पाणी करून टाकतो. ॥ ४ ॥

तमस्य पृक्षमुपरासु धीमहि नक्तं यः सुदर्शतरो दिवातरादप्रायुषे दिवातरात् ।

आदस्यायुर्ग्रभणवद्वीळु शर्म न सूनवे ।

भक्तमभक्तमवो व्यन्तो अजरा अग्नयो व्यन्तो अजराः ॥ ५ ॥

तं अस्य पृक्षं उपरासु धीमहि नक्तं यः सुदर्शऽतरो दिवाऽतरात् अप्रऽआयुषे दिवाऽतरात् ॥

आत् अस्य आयुः ग्रभणऽवत् वीळु शर्म न सूनवे ॥

भक्तं अभक्तं अवो व्यंतः अजराः अग्नयः व्यंतः अजराः ॥ ५ ॥

हा दिवसापेक्षां रात्री विशेषच मनोहर दिसतो. दिवसगतीनें आंगांतील जोम कधींही नाहींसा होणार नाही असें आयुष्य आपल्यास असावें म्हणून आपण वेदीजवळ त्याच्या त्या सामर्थ्याचें चिंतन करूं या. बापाची कीर्ति जशी मुलाला, तसेंच ह्या अग्नीचें चित् सामर्थ्य, हाच यजमानाचा सर्वस्वी आधार. वेदीजवळ अग्नीची रूपें - जीं केव्हांही नष्ट होत नाहींत किंवा हीन होत नाहींत -नेहमी जशींच्या तशींच सतेज असतात तींच आमचे आतांचे व पुढें मिळणारे असें सर्व प्रकारचें सहाय्य होय. ॥ ५ ॥

सः हि शर्धो॒ न मारु॑तं तुवि॒ष्वणि॒रप्न॑स्वतीषू॒र्वरा॑स्वि॒ष्टनि॒रार्त॑नास्वि॒ष्टनिः॑ ।

आद॑द्ध॒व्यान्या॑द॒दिर्य॒ज्ञस्य॑ के॒तुर॒र्हणा॑ ।

अध॑ स्मास्य॒ हर्ष॑तो॒ हृषी॑वतो॒ विश्वे॑ जुषन्त॒ पन्थां॑ नरः॑ शु॒भे न पन्था॑म् ॥ ६ ॥

सः हि शर्धः न मारुतं तुविऽस्वनिः अप्नस्वतीषु उर्वरासु इष्टनिः आर्तनासु इष्टनिः ॥

आदत् हव्यानि आऽददिः यज्ञस्य केतुः अर्हणा ॥

अध स्म अस्य हर्षतः हृषीवतः विश्वे जुषण्त पंथां । नरः शुभे न पंथाम् ॥ ६ ॥

उत्तम सुपीक जमीनीवरून सपाट्यानें जातांना अगर शत्रु सैन्यांत आवेशानें घुसतांना तो वाऱ्याच्या सोसाट्याप्रमाणें भयंकर शब्द करतो. हा हविर्भोक्ता अग्नि यज्ञाचा उज्वल ध्वज आहे, व ह्यानें आमच्या हवींचा यथासांग स्वीकार केल आहे. हा स्वतः आनंदरूप असून दुसऱ्यांनाही आनंद देतो, तर हाच मार्ग खऱ्या कल्याणाचा, अशा श्रद्धेनें ह्याच्या सेवेचा मार्ग सर्व लोकांनी पत्करला आहे. ॥ ६ ॥

द्वि॒ता यतीं॑ की॒स्तासो॑ अ॒भिद्य॑वो नम॒स्यन्त॑ उप॒वोच॑न्त॒ भृग॑वो म॒थ्नन्तः॑ दा॒शा भृग॑वः ।

अ॒ग्निरी॑शे॒ वसू॑ना॒ं शुचि॒र्यो ध॒र्णिरे॑षाम् ।

प्रि॒याँ अ॑पि॒धीँर्व॑निषीष्ट॒ मेधि॑र॒ आ व॑निषीष्ट॒ मेधि॑रः ॥ ७ ॥

द्विता यत् ईं कीस्तासः अभिद्यवः नमस्यंतः उपऽवोचंत भृगवः मथ्नंतः दाशा भृगवः ॥

अग्निः ईशे वसूनां शुचिः यः धर्णिः एषाम् ॥

प्रियाँ अपिऽधीन् वनिषीष्ट मेधिरः आ वनिषीष्ट मेधिरः ॥ ७ ॥

महाकवि जो भृगू त्यांनी आकाशामध्यें दृष्टि स्थिर करून नमस्कारपूर्वक ज्या अग्नीचें दोन प्रकारांनी स्तवन केलें - ह्या भृगूंनी अत्यंत लीन होऊन ज्याचें अरणींतून मंथन केलें असा हा अग्नि सर्व स्पृहणीय संपत्तीचा प्रभु होय. हा अत्यंत पवित्र म्हणूनच त्य संपत्तींना हा आपल्या स्वाधीन ठेवूं शकतो. आमचे हविर्भाग याला प्रिय आहेत, म्हणून हा प्रज्ञावान अग्नि त्या हवींचा प्रेमानें स्वीकार करतो. हा अग्नि, हा परमात्मा आमच्या हविर्दानानें प्रसन्न होवो. ॥ ७ ॥

विश्वा॑सां त्वा वि॒शां पति॑ं हवामहे॒ सर्वा॑सां समा॒नं दम्प॑तिं भु॒जे स॒त्यगि॑र्वाहसं भु॒जे ।

अति॑थिं॒ मानु॑षाणां पि॒तुर्न यस्या॑स॒या ।

अ॒मी च॒ विश्वे॑ अ॒मृता॑स॒ आ वयो॑ ह॒व्या दे॒वेष्वा वयः॑ ॥ ८ ॥

विश्वासां त्वा विशां पतिं हवामहे सर्वासां समानं दऽंपतिं भुजे सत्यऽगिर्वाहसं भुजे ॥

अतिथिं मानुषाणां पितुः न यस्य आसया ॥

अमी इति च विश्वे अमृतासः आ वयः हव्या देवेषु आ वयः ॥ ८ ॥

तूं सकल जनांचा प्रभु आहेस. सर्वांचे मिळून एकच कुलदैवत आहे तें तूंच. आम्हीं आपल्या कल्याणार्थ, आम्हीं आपल्या हितार्थ तुला हाक मारीत आहों. आम्हीं मनःपूर्वक केलेल्या प्रार्थना परमेश्वरापर्यंत पोहोंचविणाराही तूंच. तूं सर्व मनुष्यमात्राचा महनीय अतिथीच आहेस. बापाच्या नजरेखाली असल्यामुळें तुझ्या छायेखाली असल्यामुळें, हे सर्व अमर देव नेहमी ऐन तारुण्यात राहतात. आणि तुझ्याच द्वारें ऋत्विज हे देवांच्या ठिकाणी हविर्भाग पोहोंचता करीत असतात. ॥ ८ ॥

त्वम॑ग्ने सह॑सा सह॑न्तमः शुष्मिन्त॑मो जायसे दे॒वता॑तये र॒यिर्न दे॒वता॑तये ।

शु॒ष्मिन्त॑मो॒ हि ते॒ मदो॑ द्यु॒म्निन्त॑म उ॒त क्रतुः॑ ।

अध॑ स्मा ते॒ परि॑ चरन्त्यजर श्रुष्टी॒वानो॒ नाज॑र ॥ ९ ॥

त्वं अग्ने सहसा सहन्ऽतमः शुष्मिन्ऽतमः जायसे देवऽतातये रयिः न देवऽतातये ॥

शुष्मिन्ऽतमः हि ते मदः द्युम्निन्ऽतम उत क्रतुः ॥

अध स्म ते परि चरंति अजर श्रुष्टीऽवानः न अजर ॥ ९ ॥

हे अग्निदेवा, तूं अत्यंत प्रतापी असून तुझ्या दैवी प्रभावामुळें तुझे सामर्थ्य पूर्णपणें अप्रतिहत आहे. देवाची प्रार्थना आम्हास करता यावी म्हणूनच तूं प्रकट होत असतोस. संसारांत जशी संपत्ति तशी देवाच्या सेवेकरितां तुझीच आवश्यकता आहे. तुझा आनंद निरतिशय आणि तुझा पराक्रम अत्यंत प्रखर असतो. हे अग्निदेवा, तुला कधींच वार्धक्य येत नाहीं, आणि म्हणूनच सर्व वस्तु तुझ्याच सेवेस तत्पर असतात व, हे अक्षय्य अग्ने, एखाद्या नोकराप्रमाणें तुझ्याच आज्ञेंत वागतात. ॥ ९ ॥

प्र वो॑ म॒हे सह॑सा॒ सह॑स्वत उष॒र्बुधे॑ पशु॒षे नाग्नये॒ स्तोमो॑ बभूत्व॒ग्नये॑ ।

प्रति॒ यती॑ ह॒विष्मा॒न्विश्वा॑सु॒ क्षासु॒ जोगु॑वे ।

अग्रे॑ रे॒भो न ज॑रत ऋषू॒णां जूर्णि॒र्होत॑ ऋषू॒णाम् ॥ १० ॥

प्र वः महे सहसा सहस्वते उषःऽबुधे पशुऽसे न अग्नये स्तोमः बभूतु अग्नये ॥

प्रति यत् ईं हविष्मान् विश्वासु क्षासु जोगुवे ॥

अग्रे रेभः न जरते ऋषूणां जूर्णिः होत ऋषूणाम् ॥ १० ॥

हा महा थोर, आणि स्वसामर्थ्यामुळें तेजस्वी आहे. एखाद्या गोपालकाप्रमाणें हा अरुणोदयापूर्वींच जागृत होत असतो. तर अशा अग्नीचें, अशा ह्या अग्निदेवाचें चित्त ह्या तुमच्या स्तवनानें वेधून जावो. हातात हवि घेऊन यजमान ह्या अग्नीचे गुणानुवाद गात असतांना सर्व पृथ्वीवर दृष्टीस पडतात. राजे लोकांपुढे बंदिजन जसा पोवाडे गात असतो त्याप्रमाणें बुद्धिमान ऋत्विज सर्व देवतांपुढें ह्या अग्नीचें यशोवर्णन करीत असतो. ॥ १० ॥

स नो॒ नेदि॑ष्ठं॒ दद्द॑शान॒ आ भ॒राग्ने॑ दे॒वेभिः॒ सच॑नाः सुचे॒तुना॑ म॒हो रा॒यः सु॑चे॒तुना॑ ।

महि॑ शविष्ठ नस्कृधि सं॒चक्षे॑ भु॒जे अ॒स्यै ।

महि॑ स्तो॒तृभ्यो॑ मघवन्सु॒वीर्यं॒ मथी॑रु॒ग्रो न शव॑सा ॥ ११ ॥

सः नः नेदिष्ठं दद्दशानः आ भर अग्ने देवेभिः सऽचनाः सुऽचेतुना महः रायः सुऽचेतुना ॥

महि शविष्ठ नः कृधि संऽचक्षे भुजे अस्यै ॥

महि स्तोतृऽभ्यः मघऽवन् सुऽवीर्यं मथीः उग्रः न शवसा ॥ ११ ॥

हे अग्निदेवा, तूं आमच्या अगदीं जवळ प्रकट होतोस तेव्हां कृपाळूपणानें इतर देवांप्रमाणें प्रसन्न होऊन, अत्यंत विशुद्ध संपत्ति दयार्द्र अंतःकरणानें आम्हांस दे. हे सर्वसमर्थ अग्ने असें कर कीं, उदात्त तत्व कोणतें तें आम्हांस कळेल, आणि ह्या पृथ्वीचा उपभोग आम्हांस मिळेल. सर्वांचा नाश करशील कीं काय अशा तऱ्हेचा भयंकर तूं आपल्या प्रतापामुळें दिसतोस, परंतु हे उदारचरिता, तुझें स्तवन करणारांस तूं उत्कृष्ट प्रतीचें शौर्य देतोस. ॥ ११ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १२८ (अग्नि सूक्त)

ऋषि : परुच्छेपः - देवता : अग्नि - छंद - अत्यष्टी

अ॒यं जा॑यत॒ मनु॑षो॒ धरी॑मणि॒ होता॒ यजि॑ष्ठ उ॒शिजा॒मनु॑ व्र॒तम॒ग्निः स्वमनु॑ व्र॒तम् ।

वि॒श्वश्रु॑ष्टिः सखीय॒ते र॒यिरि॑व श्रवस्य॒ते ।

अद॑ब्धो॒ होता॒ नि ष॑ददि॒ळस्प॒दे परि॑वीत इ॒ळस्प॒दे ॥ १ ॥

अयं जायत मनुषः धरीमणि होता यजिष्ठः उशिजां अनु व्रतं अग्निः स्वं अनु व्रतम् ॥

विश्वऽश्रुष्टिः सखीऽयते रयिःऽइव श्रवस्यते ॥

अदब्धः होता नि सदत् इळः पदे परिऽवीतः इळः पदे ॥ १ ॥

उशिजेच्या पुत्रांनी केलेल्या तपामुळें मनूच्या पुरातन वेदीवर, हा अत्यंत माननीय अग्नि, हा आचार्य, आपल्या स्वतःच्या प्रतिज्ञेस अनुसरून प्रकट झाला आहे. ह्याचा सहवास निरंतर असावा अशी इच्छा करणाऱ्या भक्तजनांस हा सर्व प्रकारचें साहाय्य करतो. पुण्यकर्मे करण्याची लालसा बाळगणारांस तर हा जणूं काय अमुल्य ठेवा आहे. ज्याला पराजय कसा तो माहीत सुद्धां नाही, असा हा आचार्य ह्या वेदीवर अधिष्ठित झाला आहे - आपल्या परिवारासह या पृथीवर अवतीर्ण झाला आहे. ॥ १ ॥

तं य॑ज्ञ॒साध॒मपि॑ वातयामस्यृ॒तस्य॑ प॒था नम॑सा ह॒विष्म॑ता दे॒वता॑ता ह॒विष्म॑ता ।

स न॑ ऊ॒र्जामु॒पाभृ॑त्य॒या कृ॒पा न जू॑र्यति ।

यं मा॑त॒रिश्वा॒ मन॑वे परा॒वतो॑ दे॒वं भाः प॑रा॒वतः॑ ॥ २ ॥

तं यज्ञऽसाधं अपि वातयामसि ऋतस्य पथा नमसा हविष्मता देवऽताता हविष्मता ॥

सः नः ऊर्जां उपऽआभृति अया कृपा न जूर्यति ॥

यं मातरिश्वा मनवे पराऽवतः देवं भारिति भाः पराऽवतः ॥ २ ॥

यज्ञ यथासांग तडीस नेणारा तोच, म्हणून त्या अग्नीची आम्हीं भक्तिभावानें आराधना करतो, व ती आराधना सत्य धर्माच्या मार्गाप्रमाणें नमस्कार करून आणि देवाचें ध्यान करीत असतांना प्रथम आहुति देऊन करीत असतो. हा एवढा कनवाळू, म्हणूनच दैवी तेजाची प्राप्ति आम्हांस सुलभ करण्याच्या कामीं कधींही कंटाळा करीत नाहीं. अशा या देदीप्यमान अग्नीला, मातरिश्वा नांवाचा एक ऋषि होऊन गेला त्यानें पुरातन काळीं मनूकरितां म्हणून देवलोकांतून पृथ्वीवर आणले. ॥ २ ॥

एवे॑न स॒द्यः पर्ये॑ति॒ पार्थि॑वं मुहु॒र्गी रेतो॑ वृष॒भः कनि॑क्रदद्द॒ध॒द्रेतः॒ कनि॑क्रदत् ।

श॒तं चक्षा॑णो अ॒क्षभि॑र्दे॒वो वने॑षु तु॒र्वणिः॑ ।

सदो॒ दधा॑न॒ उप॑रेषु॒ सानु॑ष्व॒ग्निः परे॑षु॒ सानु॑षु ॥ ३ ॥

एवेन सद्यः परि एति पार्थिवं मुहुःऽगी रेतः वृषभः कनिक्रदत् दधत् रेतः कनिक्रदत् ॥

शतं चक्षाणः अक्षऽभिः देवः वनेषु तुर्वणिः ॥

सदः दधानः उपरेषु सानुषु अग्निः परेषु सानुषु ॥ ३ ॥

ज्याचें स्तवन वारंवार होत असतें व जो प्रचंडघोष करून इच्छित वस्तूची वृष्टि करतो, असा हा अग्नि पृथ्विला सफल करणाऱ्या मेघजलास एकाच फेऱ्यानें एकदम वळसा घालतो, आणि पुनः गर्जना करून जलवृष्टि करतो. आपल्या शेंकडो डोळ्यांनी सर्व जगत् न्याहाळून पहात पहात व मेघरूप अरण्यांत धुमाकूळ घालीत हा अग्नि जवळच्या गिरिशिखरावर व तसेंच दूरच्याही पर्वतांच्या शिखरांवर उतरून विश्रांती घेतो. ॥ ३ ॥

सः सु॒क्रतु॑ः पु॒रोहि॑तो॒ दमे॑दमेऽ॒ग्निर्य॒ज्ञस्या॑ध्व॒रस्य॑ चेतति॒ क्रत्वा॑ य॒ज्ञस्य॑ चेतति ।

क्रत्वा॑ वे॒धा इ॑षू॒यते विश्वा॑ जा॒तानि॑ पस्पशे ।

यतो॑ घृत॒श्रीरति॑थि॒रजा॑यत॒ वह्नि॑र्वे॒॑धा अजा॑यत ॥ ४ ॥

सः सुऽक्रतुः पुरःऽहितः दमेऽदमे अग्निः यज्ञस्य अध्वरस्य चेतति क्रत्वा यज्ञस्य चेतति ॥

क्रत्वा वेधाः इषूऽयते विश्वा जातानि पस्पशे ॥

यतः घृतऽश्रीः अतिथिः अजायत वह्निः वेधा अजायत ॥ ४ ॥

हा अग्नि महत्कृत्यकुशल आणि यज्ञांतील मुख्य आचार्य आहे. घरोघर जें जें हविर्दान होतें त्या प्रत्येक ठिकाणीं हा सिद्ध असतो; कारण प्रत्येक यज्ञ चालू होतांच दैवी सामर्थ्याच्या योगानें त्याला कळत असतें. आपल्या प्राप्तीची उत्कट इच्छा करणाऱ्या भक्तांस त्याच सामर्थ्याच्या योगानें हा अनुकूल परिस्थिती उत्पन्न करतो. यच्चावत् सृष्टीवर सारखी नजर ठेवतो म्हणूनच हा पहा घृताहुतींनी देदीप्यमान होणारा अग्नि आज अतिथि झाला आहे, हा हव्यवाचन आणि जगन्नियंता अग्नि प्रकट झाला आहे. ॥ ४ ॥

क्रत्वा॒ यद॑स्य॒ तवि॑षीषु पृ॒ञ्चते॑ऽ॒ग्नेरवे॑ण म॒रुता॒ं न भो॒ज्येऽशि॒राय॒ न भो॒ज्या ।

स हि ष्मा॒ दान॒मिन्व॑ति॒ वसू॑नां च म॒ज्मना॑ ।

स न॑स्त्रासते दुरि॒ताद॑भि॒ह्रुतः॒ शंसा॑द॒घाद॑भि॒ह्रुतः॑ ॥ ५ ॥

क्रत्वा यत् अस्य तविषीषु पृंचते अग्नेः अवेन मरुतां न भोज्या इशिराय न भोज्या ॥

सः हि स्म दानं इन्वति वसूनां च मज्मना ॥

सः नः त्रासते दुःऽइतात् अभिऽह्रुतः शंसात् अघात् अभिऽह्रुतः ॥ ५ ॥

ज्या वेळेस मारुताच्याप्रमाणें विहित विधीस अनुसरून ह्या अग्नीच्या ज्वालांमध्यें अत्यादरानें आपण एखाद्या पाहुण्यास मिष्टान्न भोजन दिल्याप्रमाणें हविर्भाग अर्पण करतो, तेव्हां हा अग्नि आपणास कमनीय संपत्तीचें दान आपल्या प्रभावानें करण्यास उत्सुक होतो. आणि आम्हांस दडपून टाकणाऱ्या संकटांपासून तसेंच दुसऱ्याच्या शापापासून किंवा ज्याच्यायोगानें आपण पतित होऊं अशा पातकांपासून आमच बचाव करतो. ॥ ५ ॥

विश्वो॒ विहा॑या अ॒रति॒र्वसु॑र्दधे॒ हस्ते॒ दक्षि॑णे त॒रणि॒र्न शि॑श्रथच्छ्रव॒स्यया॒ न शि॑श्रथत् ।

विश्व॑स्मा॒ इति॑षुध्य॒ते दे॑व॒त्रा ह॒व्यमोहि॑षे ।

विश्व॑स्मा॒ इत्सु॒कृते॒ वार॑मृण्वत्य॒ग्निर्द्वारा॒ वृण्वति ॥ ६ ॥

विश्वः विहाया अरतिः वसुः दधे हस्ते दक्षिणे तरणिः न शिश्रथत् श्रवस्यया न शिश्रथत् ॥

विश्वस्मै इत् इषुध्यते देवऽत्रा हव्यं आ ऊहिषे ॥

विश्वस्मै इत् सुऽकृते वारं ऋण्वति अग्निः द्वारा वि ऋण्वति ॥ ६ ॥

स्पृहणीय संपत्ति ह्याच विश्वव्यापक समर्थ प्रभूच्या उजव्या हातीं आहे. सूर्य जसा प्रकाश देतो, त्या प्रमाणें तिला तो भक्तांस देऊन टाकतो खरा, परंतु कीर्तीच्या लोभानें देतो असें मात्र नव्हे. अनन्य भावानें भगवत् प्राप्तीची इच्छा करण्यासाठींच, हे सुरश्रेष्ठा आग्नि देवा, तूं हविर्भाग देवांस पोहोंचवितोस. सर्व साधुपुरुषांना हा अग्निदेव सर्वोत्कृष्ट अशी संपत्ति देण्याकरितां घेऊन येतो. आणि आपल्या कृपेचें द्वार भक्तांकरतां उघडून ठेवतो. ॥ ६ ॥

सः मानु॑षे वृ॒जने॒ शंत॑मो हि॒तो३ऽ॒ग्निर्य॒ज्ञेषु॒ जेन्यो॒ न वि॒श्पति॑ः प्रि॒यो य॒ज्ञेषु॑ वि॒श्पति॑ः ।

स ह॒व्या मानु॑षाणामि॒ळा कृ॒तानि॑ पत्यते ।

स न॑स्त्रासते॒ वरु॑णस्य धू॒र्तेर्म॒हो दे॒वस्य॑ धू॒र्तेः ॥ ७ ॥

सः मानुषे वृजने शंऽतमः हितः अग्निः यज्ञेषु जेन्यः न विश्पतिः प्रियः यज्ञेषु विश्पतिः ॥

सः हव्या मानुषाणां इळा कृतानि पत्यते ॥

सः नः त्रासते वरुणस्य धूर्तेः महः देवस्य धूर्तेः ॥ ७ ॥

मनुष्यप्राणी पापमग्न झाल्याकारणानें एखादा विजयी राजा अथवा सर्व लोकांस प्रिय असणारा एखादा अध्यक्ष हा ज्याप्रमाणें धर्मसभेमध्यें येऊन बसतो, त्याप्रमाणें हा अग्नि यज्ञामध्यें स्थानापन्न झाला आहे, कारण पवित्र असें सुख हाच देऊं शकतो. वेदीवर जें हवि अर्पण होतें त्याचा स्वामी हाच आणि पातकाबद्दल जो दंड होतो- जी शिक्षा होते तिची, वरुणापासून, त्या परम थोर देवापासून आम्हांस हाच माफी मिळवून देतो. ॥ ७ ॥

अ॒ग्निं होता॑रमीळते॒ वसु॑धितिं प्रि॒यं चेति॑ष्ठमर॒तिं न्येरिरे हव्य॒वाहं॒ न्येरिरे ।

वि॒श्वायु᳚ वि॒श्ववे॑दसं॒ होता॑रं यज॒तं क॒विम् ।

दे॒वासो᳚ र॒ण्वमव॑से वसू॒यवो᳚ गी॒र्भी र॒ण्वं व॑सू॒यवः᳚ ॥ ८ ॥

अग्निं होतारं ईळते वसुऽधितिं प्रियं चेतिष्ठं अरतिं नि एरिरे हव्यऽवाहं नि एरिरे ॥

विश्वऽआयुं विश्वऽवेदसं होतारं यजतं कविम् ॥

देवासः रण्वं अवसे वसुऽयवः गीःऽभी रण्वं वसुऽयवः ॥ ८ ॥

यज्ञाचा आचार्य जो अग्नि, त्यांचे स्तवन ऋत्विजांनी केले आहे. हाच भक्तिप्रिय अग्नि स्पृहणीय संपत्तींचा निधि आहे. अत्यंत ज्ञानवान असा जो ईश्वर तो हाच. ह्या अग्नीपुढें लीन होऊन ऋत्विजांनी देवांस हविर्भाग पोहोंचविण्याकरिता ह्याची योजना केली. जो सर्व विश्वाचा प्राण, एकंदर विश्वाचें ज्याला यथातथ्य ज्ञान, आणि जो यज्ञाचा आचार्य म्हणून सर्व देवता अभीष्ट प्राप्तिकरितां उत्सुक होऊन करीत असतात. ॥ ८ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १२९ (इंद्र सूक्त)

ऋषि : परुच्छेपः - देवता : इंद्रः - छंद - अत्यष्टी

यं त्वं रथ॑मिंद्र मे॒धसा॑तयेऽपा॒का सन्त॑मिषिर प्र॒णय॑सि॒ प्रान॑वद्य॒ नय॑सि ।

स॒द्यश्चि॒त्तम॒भिष्ट॑ये॒ करो॒ वश॑श्च वा॒जिन॑म् ।

सास्माक॑मनवद्य तूतुजान वे॒धसा॑मि॒मां वाचं॒ न वे॒धसा॑म् ॥ १ ॥

यं त्वं रथं इंद्र मेधऽसातये अपाका संतं इषिर प्रऽनयसि प्रऽनवद्य नयसि ॥

सद्यः चित् तं अभिष्टये करः वशः च वाजिनम् ॥

सः अस्माकं अनवद्य तूतुजान वेधसां इमां वाचं नः वेधसाम् ॥ १ ॥

सर्वांस प्रेरणा करणाऱ्या हे इंद्रा, यज्ञ यथासांग व्हावा म्हणून ज्या महात्म्याजवळ - मग तो कितीही दूर रहात असो - तूं आपला रथ घेऊन जातोस. हे निष्कलंक इंद्रा, तूं ज्याच्याजवळ आपला रथ घेऊन जातोस, त्याचे हेतू पुरविण्याकरितां तूं तात्काळ त्याच्यावर लोभ करतोस व त्यास बलाढ्य करून सोडतोस. हे दोषरहित इंद्रा, साधु जनांच्या साहाय्यार्थ तूं धांव घेतोस तर आमच्याकडेही लक्ष दे, आणि प्रेमळांमध्येंही जे प्रेमळ कवि आहेत त्यांची हांक ऐकतोस, त्याप्रमाणें आमचीही हांक ऐक. ॥ १ ॥

स श्रु॑धि॒ यः स्मा॒ पृत॑नासु॒ कासु॑ चिद्द॒क्षाय्य॑ इंद्र॒ भर॑हूतये॒ नृभि॒रसि॒ प्रतू॑र्तये॒ नृभिः॑ ।

यः शूरैः॒ स्वः१॒॑ सनि॑ता॒ यो विप्रै॒र्वाजं॒ तरु॑ता ।

तमी॑शा॒नास॑ इरधन्त वा॒जिनं॑ पृ॒क्षमत्यं॒ न वा॒जिन॑म् ॥ २ ॥

सः श्रुधि यः स्म पृतनासु कासु चित् दक्षाय्य इंद्र भरऽहूतये नृऽभिः असि प्रऽतूर्तये नृऽभिः ॥

यः शूरैः स्व१ः॑रिति स्वः सनिता यः विप्रैः वाजं तरुता ॥

तं ईशानासः इरधंत वाजिनं पृक्षं अत्यं न वाजिनम् ॥ २ ॥

हे इंद्रा, सर्व युद्धांच्या प्रसंगी लढाईची नौबत झडूं लागली असतां वीरांना तुझें स्तवन भक्तीनें करावें लागतें आणि पाप क्षालनाकरितां सुद्धां लोकांना तुझेंच स्तवन करावे लागतें, तर असा जो तूं तो आमची प्रार्थना ऐक. आपण शूरांच्या बरोबर राहिलों तर हा इंद्र स्वर्ग मिळवून देईल आणि सत्पुरुषाच्या संगतीनें दिव्य सामर्थ्य देईल. बलाढ्य राजेसुद्धां हा अत्यंत शूर म्हणून ह्याचेच पाय धरतात. हा मूर्तिमान तीव्र सामर्थ्य म्हणून ह्याच वीराला शरण जातात. ॥ २ ॥

द॒स्मो हि ष्मा॒ वृष॑णं॒ पिन्व॑सि॒ त्वचं॒ कं चि॑द्यावीर॒ररुं॑ शूर॒ मर्त्यं॑ परिवृ॒णक्षि॒ मर्त्य॑म् ।

इंद्रो॒त तुभ्यं॒ तद्दि॒वे तद्रु॒द्राय॒ स्वय॑शसे ।

मि॒त्राय॑ वोचं॒ वरु॑णाय स॒प्रथः॑ सुमृळी॒काय॑ स॒प्रथः॑ ॥ ३ ॥

दस्मः हि स्म वृषणं पिन्वसि त्वचं कं चित् यावीः अररुं शूर मर्त्यं परिऽवृणक्षि मर्त्यम् ॥

इंद्र उत तुभ्यं तत् दिवे तत् रुद्राय स्वऽयशसे ॥

मित्राय वोचं वरुणाय सऽप्रथः सुऽमृळीकाय सऽप्रथः ॥ ३ ॥

खरोखरच तूं अद्‌भुत चमत्कार करणारा आहेस. कारण वृष्टियोग्य अशा मेघपटलास तूं छिद्र पाडतोस व हरएक दुर्जन मनुष्यास पिटाळून लावतोस. आणि हे वीरा, अमर आत्म्यापासून हें नाशवंत शरीर भिन्न ठेवतोस. हे इंद्रा, ह्या तुझ्या अद्‌भुत पराक्रमाचें वर्णन मी तुझ्यापुढें, तसेंच आकाशस्थ रुद्रापुढें, म्हणजे जो आपल्याच पराक्रमामुळेंच प्रख्यात आहे अशा रुद्रापुढें व मित्रापुढें केलेलें आहे. आणि त्याचप्रमाणें वरुणापुढें, त्या परम सुखप्रद वरुणापुढेंही तुमच्या त्या जगद्विख्यात यशाचें वर्णन सविस्तर केलेलें आहे. ॥ ३ ॥

अस्माकं व इंद्रम् उश्मसीष्टये सखायं विश्वायुं प्रासहं युजं वाजेषु प्रासहं युजम् ।

अस्माकं ब्रह्मोतयेऽवा पृत्सुषु कासु चित् ।

नहि त्वा शत्रु स्तरंते स्तृणोषि यं विश्वं शत्रुं स्तृणोषि यम् ॥ ४ ॥

अस्माकं वः इंद्रं उश्मसि इष्टये सखायं विश्वऽआयुं प्रऽसहं युजं वाजेषु प्रऽसहं युजम् ॥

अस्माकं ब्रह्म ऊतये अवा पृत्सुषु कासु चित् ॥

नहि त्वा शत्रु स्तरते स्तृणोषि यं विश्वं शत्रुं स्तृणोषि यम् ॥ ४ ॥

तुमचे व आमचे अशा दोघांचेही मनोरथ पूर्ण करण्याकरितां इंद्रानें येथें यावें अशी आमची उत्कट इच्छा आहे. हा इंद्र आम्हांस अत्यंत प्रिय आहे. हा विश्वात्मा, हयाच्यापुढें कोणींही युद्धास उभा राहू शकत नाहीं हा नेहमीं आम्हाबरोबर असून संग्रामात सर्वांस पादाक्रांत करणारा असा आमचा विश्वासू साहाय्यकर्ता आहे. प्रत्येक युद्धप्रसंगी आमच्या स्तोत्रांनी तुला हर्ष होवो, कारण त्यानेंच आमचें रक्षण होत असतें. तुझ्यापुढें कोणत्याही शत्रूचा क्षणभरही निभाव लागत नाही. कोणीही शत्रू तुजपुढें येवो; त्यास तूं पिटाळून लावतोस आणि मनुष्यमात्राचा शत्रू मग तो कोणीही असो त्यास तूं ठार करतोस. ॥ ४ ॥

नि षू न॒माति॑मतिं॒ कय॑स्य चि॒त्तेजि॑ष्ठाभिर॒रणि॑भि॒र्नोतिभि॑रु॒ग्राभि॑रुग्रो॒तिभिः᳚ ।

नेषि॑ णो॒ यथा॑ पु॒राने॒नाः शू॑र॒ मन्य॑से ।

विश्वा॑नि पू॒रोरप॑ पर्षि॒ वह्नि॑रा॒सा वह्नि॑र्न॒ः अच्छ॑ ॥ ५ ॥

नि सु नम अतिमऽतिं कयस्य चित् तेजिष्ठाभिः अरणिऽभिः न उतिऽभिः उग्राभिः उग्र ऊतिऽभिः ॥

नेषि नः यथा पुरा अनेनाः शूर मन्यसे ॥

विश्वानि पूरोः अप पर्षि वह्निः आसा वह्निः र्नः अच्छ ॥ ५ ॥

तूं आम्हास सहाय्य करून उन्मत्त लोकांचे नाक खालीं करून टाक, हे इंद्रा, भयंकर पेटलेल्या हिलालाप्रमाणें जाज्वल्य अशा शस्त्रास्त्रांनी त्याची रग जिरवून टाक. पूर्वीप्रमाणे आतांही तूंच आमचा धुरीण आहेस. कारण हे वीरा, निष्कलंक म्हणूनच तूं सर्वांस माहित आहेस. तूं अभीष्ट दाता आहेस तर सद्‍गुरुप्रमाणें आम्हांकडे येऊन आमच्या कायिक व मानसिक अशा सर्व पापाचें क्षालन कर. ॥ ५ ॥

प्र तद्वो॑चेयं॒ भव्या॒येन्द॑वे॒ हव्यो॒ न य इ॒षवा॒न्मन्म॒ रेज॑ति रक्षो॒हा मन्म॒ रेज॑ति ।

स्व॒यं सो अ॒स्मदा नि॒दः व॒धैर॑जेत दु॒र्म॒तिम् ।

अव स्रवेदुघशंसो ऽवतुरमवं क्षुद्रमिंव स्रवेत् ॥ ६ ॥

प्र तत् वोचेयं भव्याय इंदवे हव्यः नः य इषऽवान् मन्म रेजति रक्षःऽहा मन्म रेजति ॥

स्वयं सः अस्मत् आ निदः वधैः अजेत दुःऽमतिम् ॥

अव स्रवेत् अघऽशंसः अवऽतरं अव क्षुद्रंऽइव स्रवेत् ॥ ६ ॥

तो तुझा पराक्रम भव्य अशा सोमापुढेंसुद्धां वर्णन करणें मला उचित आहे. चित्तास हुषारी आणण्याची शक्ति त्याच्यामध्यें आहे म्हणून तोही पूज्य असल्याप्रमाणेंच आहे. हा राक्षस नाशक असूनही, पवित्र विचाराची लाट ह्याच्यामुळें अंतःकरणांत उत्पन्न होते. स्तवनाची स्फूर्तिही हाच देतो. हा आपण स्वतः आपल्या मारक शस्त्रांनी निंदकांना आणि दुर्जनांना आमच्यापासून हांकून देऊन त्यांचा उच्छेद करो - ह्याच्यापुढें येणारे पातकी पार वितळून जावोत - धुक्याप्रमाणें विरून जावोत. ॥ ६ ॥

वनेम तद्धोत्रया चितन्त्या वनेमं रयिं रयिवः सुवीर्यं रण्वं सन्तं सुवीर्यम् ।

दुर्मन्मानं सुमन्तुभिरेमिषा पृचीमहि ।

आ स॒त्याभि॒रिंद्रं द्यु॒म्नहू॑तिभि॒र्यज॑त्रं द्यु॒म्नहू॑तिभिः ॥ ७ ॥

वनेम तत् होत्रया चितंत्या वनेम रयिं रयिऽवः सुऽवीर्यं रण्वं संतं सुऽवीर्यम् ॥

दुःऽमन्मानं सुमंतुऽभिः आ ईं इषा पृचीमहि ॥

आ सत्याभिः इंद्रं द्युम्नहूतिऽभिः यजत्रं द्युम्नहूतिऽभिः ॥ ७ ॥

हे भगवन् इंद्रा, जें पुरुषार्थानेंच प्राप्त होतें, जें अत्यंत रमणीय, अत्यंत उदात्त आहे व ज्याच्या योगानें पुरुषार्थाचीच सत्कृत्यें हातून होतात असें जें दिव्यैश्वर्य आहे, त्याचा लाभ तुझी प्रार्थना व एकाग्र ध्यान केल्यामुळेंच आम्हांस होणार. तर सुविचारपूर्वक केलेल्या प्रार्थना आणि तुला प्रसन्न करणारा हविर्भाग अशा दोहोंच्या योगानें अचिंत्य जो तूं त्या तुझी पूर्ण तृप्ति आम्हांकडून होवो. आणि प्रेरणेनें सुचलेली सत्यार्थबोधक सूक्तें आणि आमचें अत्यंत उत्कृष्ट प्रेम ह्यांचाही योग त्या अत्यंत पूज्य इंद्राशी होवो. ॥ ७ ॥

प्रप्रा॑ वो अ॒स्मे स्वय॑शोभिरू॒ती प॑रिव॒र्ग इंद्रो॑ दुर्मती॒नां दरी॑मन्दुर्मती॒नाम् ।

स्व॒यं सा रि॑ष॒यध्यै॒ या न॑ उपे॒षे अ॒त्रैः ।

हतेमसुन्न वक्षति क्षिप्ता जूर्णिर्न वक्षति ॥ ८ ॥

प्रऽप्र वः अस्मे इति स्वयशःऽभिः ऊती परिऽवर्ग इंद्रः दुःऽमतीनां दरीमन् दुःऽमतीनाम् ॥

स्वयं सा रिषयध्यै या नः उपऽईषे अत्रैः ॥

हता ईं असत् न वक्षति क्षिप्ता जूर्णिः न वक्षति ॥ ८ ॥

पहा तुम्हा आम्हां सारख्यांच्यासाठी सुद्धां आपल्या पवित्र नावाच्या दराऱ्यानें दुष्टवासनाचें निर्मूलन व दुर्जनांचा धुव्वा उडविणाऱ्या कामी सहाय्य करण्यास इंद्र सदैव तत्पर आहे. तेव्हां आमच्यावर चढाई करून आमचा घात करण्यास पाठविलेल्या राक्षस सेनेचाच खुद्द फडशा होऊन जावो, ती आम्हांपर्यंत येऊनही न पोहोंचो. त्यांनी आम्हांवर सोडलेले आगीचे बाण आम्हांपर्यंत येऊं शकत नाहींत हा केवढा चमत्कार. ॥ ८ ॥

त्वं न इंद्र राया परीणसा याहि पथाँ अनेहसा पुरो याह्यरक्षसा ।

सचस्व नः पराक आ सचस्वास्तमीक आ ।

पाहि नौ दूरादारादुभिष्टिभिः सदा पाह्यभिष्टिभिः ॥ ९ ॥

त्वं नः इंद्र राया परीणसा याहि पथान् अनेहसा पुरः याहि अरक्षसा ॥

सचस्व नः ः पराके आ सचस्व अस्तऽईके आ ॥

पाहि नः दूरात् आरात् अभिष्टिऽभिः सदा पाहि अभिष्टिऽभिः ॥ ९ ॥

हे इंद्रा, जो मार्ग विपुल ऐश्वर्याचा आणि निर्दोष असेल त्याच मार्गानें आम्हांस घेऊन चल, ज्या मार्गांत दुर्वासनारूप राक्षस नसतील त्याच मार्गानें आम्हांस घेऊन चल. आम्हीं परदेशी असलो तरी आमच्याबरोबर रहा, व घरीं असलों तरी रहा. आम्ही जवळ किंवा दूर असलो तरी आपल्या सहाय्यानें आपल्या कृपाछत्रानें आमचें सदैव रक्षण कर. ॥ ९ ॥

त्वं न इंद्र राया तरूषसोग्रं चित्त्वा महिमा सक्षदवसे मुहे मित्रं नावसे ।

ओजिष्ठ त्रातरविता रथं कं चिदमर्त्य ।

अन्यमस्मद्रिरिषेः कं चिदद्रिवो रिरिक्षन्तं चिदद्रिवः ॥ १० ॥

त्वं नः इंद्र राया तरूषसा उग्रं चित् त्वा महिमा सक्षत् अवसे महे मित्रं न अवसे ॥

ओजिष्ठ त्रातः अवितरिति रथं कं चित् अमर्त्य ॥

अन्यं अस्मत् रिरिषेः कं चित् अद्रिऽवः रिरिक्षंतं चित् अद्रिऽवः ॥ १० ॥

हे इंद्रा, तूं आणि तुझी विजयसंपत्ति हे सर्व आमचेच आहांत. तुम्हाकडे वर डोळा करून कोणाच्यानेंही पहावत नाहीं, म्हणूनच महद्यश जणों काय स्वतःच्याच परम सुखाकरितां व रक्षणाकरितां, जिवलग मित्राजवळ राहिल्याप्रमाणें तुलाच चिकटून राहिलें आहे. हे इंद्रा, तुझें तेज अत्यंत प्रखर होय. हे लोकतारका, हे नाशरहिता, तूंच रथस्थित भक्तांचे परिपालन करतोस तर हे वज्रहस्ता, आमच्याशिवाय दुसरे म्हणजे जे जे दुष्ट आहेत त्यांचा वज्रप्रहारानें चुराडाकरून टाक. हे वज्रधरा आमचा घात करूं पाहाणाऱ्या दुष्टांचा विध्वंस करून टाक. ॥ १० ॥

पाहि नं इंद्र सुष्टुत स्रिधोऽवयाता सदमित्दुर्मतीनां देवः सन्दुर्मतीनाम् ।

हन्ता पापस्यं रक्षसंस्त्राता विप्रंस्य मावंतः ।

अधा॒ हि त्वा॑ जनि॒ता जीज॑नद्वसो रक्षो॒हणं॑ त्वा॒ जीज॑नद्वसो ॥ ११ ॥

पाहि नः इंद्र सुऽष्टुत स्रिधः अवऽयाता सदं इत् दुःऽमतीनां देवः सन् दुःऽमतीनाम् ॥

हंता पापस्य रक्षसः त्राता विप्रस्य माऽवतः ॥

अध हि त्वा जनिता जीजनत् वसो इति रक्षःऽहनं त्वा जीजनत् वसो इति ॥ ११ ॥

हे इंद्रा, तुझी स्तुती होत असते, ती भक्तिपूर्वक होत असते. पातकांपासून आम्हांस दूर ठेव. दुर्जनांचा निरंतर उच्छेद करणारा एक तूंच आहेस. आणि ईश्वरस्वरूप असल्यामुळें सर्व दुर्जनांचा समूळ नाश करणाराही तूंच. घोर पातकें करणाऱ्या राक्षसांचा विध्वंस तूं करतोस व मजसारख्या दीन ब्राह्मणाचा कैवारही तूंच घेतोस. आणि म्हणूनच हे आनंदनिधाना, जगत्पिता जो परमेश्वर त्यानें तुला प्रकट केलें. हे सुखनिधाना राक्षसांचा विध्वंस करणारा म्हणून तुला प्रकट केलें. ॥ ११ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १३० (इंद्र सूक्त)

ऋषि : परुच्छेपः - देवता : इंद्रः - छंद - अत्यष्टी

एन्द्र॑ या॒ह्युप॑ नः परा॒वतः॒ नायमच्छा॑ वि॒दथा॑नीव॒ सत्प॑ति॒रस्तं॒ राजे॑व॒ सत्प॑तिः ।

हवा॑महे त्वा व॒यं प्रय॑स्वन्तः सु॒ते सचा॑ ।

पु॒त्रासो॒ न पि॒तरं॒ वाज॑सातये॒ मंहि॑ष्ठं॒ वाज॑सातये ॥ १ ॥

आ इंद्र याहि उप नः पराऽवतः न अयं अच्छ विदथानिऽइव सत्ऽपतिः अस्तं राजाऽइव सत्ऽपतिः ॥

हवामहे त्वा वयं प्रयस्वंतः सुते सचा ॥

पुत्रासः नः पितरं वाजऽसातये मंहिष्ठं वाजऽसातये ॥ १ ॥

जसा एखादा सत्वशील महात्मा सभेमध्ये येऊन बसतो, अथवा सज्जन प्रतिपालक राजा आपल्या स्वतःच्या घरी परत येतो, त्याप्रमाणें हे इंद्रा तूं आपल्या अत्युच्च लोकाहून आमच्याकडे ये. आम्ही परम सुखाची इच्छा करीत

आहोंत, तर सोमरस तयार होतांच तुझी प्रार्थना करून, पुत्र जसे बापाला हांक मारतात तसे तुला हांक मारतो. आम्हांस दिव्य सामर्थ्य प्राप्त व्हावें म्हणून, विजय प्राप्त व्हावा म्हणून, तुज दातृश्रेष्ठाची प्रार्थना करीत आहोत. ॥ १ ॥

पिबा॒ सोम॑मिंद्र सु॒वा॒नमद्रि॑भिः॒ कोशे॑न सि॒क्तम॑व॒तं न वंस॑गस्तातृषा॒णो न वंस॑गः ।

मदा॑य हर्य॒ताय॑ ते तु॒विष्ट॑माय॒ धाय॑से ।

आ त्वा॑ यच्छन्तु॒ ह॒रितो॒ न सूर्य॒मह॒ा॒ विश्वे॑व॒ सूर्य॑म् ॥ २ ॥

पिबा सोमं इंद्र सुवानं अद्रिऽभिः कोशेन सिक्तं अवतं नः वंसगः ततृषाणः न वंसगः ॥

मदाय हर्यताय ते तुविःऽतमाय धायसे ॥

आ त्वा यच्छंतु हरितः न सूर्यं अहा विश्वाऽइव सूर्यम् ॥ २ ॥

जसा एखादा तान्हेलेला वृषभ पंचपात्रानें भरलेल्या हौदांतून मोठ्या आसोशीनें पाणी पितो, अथवा मेघोदकानें तुडुंब भरलेला एखादा तलाव, प्रखर झालेला चंडभानू, पार शोशून टाकतो, त्याप्रमाणे पाषाणांनी वांटून पिळून वाढलेला हा सोमरस, हे इंद्रा, तूं ग्रहण कर. तुला मनोरम आल्हाद व्हावा, तुझी आकंठ तृप्ती व्हावी म्हणून तुझे दिव्य वारू, सूर्याप्रमाणे जाज्वल्य अशा तुला येथें घेऊन येवोत. ज्याप्रमाणें सर्वांस उत्साहप्रद अशा सूर्यास ते दररोज घेऊन येतात त्याप्रमाणे आणोत. ॥ २ ॥

अवि॑न्दद्दि॒वो निहि॑तं॒ गुहा॑ नि॒धिं वेर्न गर्भं॒ परि॑वीत॒मश्म॑न्यन॒न्ते अ॒न्तरश्म॑नि ।

व्र॒जं व॒ज्री गवां᳚ इव॒ सिषा॑स॒न्नङ्गि॑रस्तमः ।

अपा॑वृणो॒दिष॒ इंद्र॒ः परी॑वृता॒ द्वार॒ इष॒ः परी॑वृताः ॥ ३ ॥

अविंदत् दिवः निऽहितं गुहा निऽधिं वेः न गर्भं परिऽवीतं अश्मनि अनंते अंतः अश्मनि ॥

व्रजं वज्री गवां इव सिसासन् अंगिरःऽतमः ॥

अप अवृणोत् इषः इंद्रः परिऽवृता द्वारः इषः परिऽवृताः ॥ ३ ॥

अत्यंत विशाल अशा पर्वताच्या कड्यांप्रमाणे पडलेल्या शिळेच्या पोटांत दडलेला पक्षिगर्भ ज्याप्रमाणें बाहेर आणावा, त्याप्रमाणें आकाशाच्या उदरांत ठेवलेला प्रकाशांचा निधि त्या इन्द्रानें शोधून काढून जगासमोर आणला. हा अंगिरसांचा प्रभू जो इंद्र, त्यानें प्रकाशरूपी धेनूंचा समूह अजून हस्तगत करून घ्यावयाचा आहे कीं काय अशा डौलानें वज्र हातीं घेऊन आनंदगृहाचे (गुप्त असलेले) दरवाजे बंद होते, ते भक्तजनांसाठी खुले करून ठेवले. ॥ ३ ॥

दा॒दृ॒हा॒णो वज्र॒मिंद्रो॒ गभ॑स्त्योः॒ क्षद्मे॑व ति॒ग्ममस॑नाय॒ सं श्य॑दहि॒हत्या॑य॒ सं श्य॑त् ।

सं॒वि॒व्या॒न ओज॑सा॒ शवो॑भिरिंद्र म॒ज्मना॑ ।

तष्टे॑व वृ॒क्षं व॒निनो॒ नि वृ॑श्चसि पर॒श्वेव॒ नि वृ॑श्चसि ॥ ४ ॥

दादृहाणः वज्रं इंद्रः गभस्त्योः क्षद्मऽइव तिग्मं असनाय सं श्यत् अहिऽहत्याय सं श्यत् ॥

संऽविव्यान ओजसा शवःऽभिः इंद्र मज्मना ॥

तष्टाऽइव वृक्षं वनिनः नि वृश्चसि परश्वाऽइव नि वृश्चसि ॥ ४ ॥

आपले वज्र आपल्या दोन्ही हातांनी बळकट धरून, तें फेंकून मारण्यासाठी एखाद्या अतिशय तीक्ष्ण तरवारीप्रमाणे इंद्रानें त्यस पाजळले; वृत्रास ठार मारण्यासाठी त्यास धार लावली. हे इंद्रा, तूं दिव्य तेजानें तळपत आहेस, आपल्या दिव्य शक्तीनें आणि प्रभावानें अगदी तुंद आहेस; तेव्हां झाडें तोडणाऱ्यानें कुऱ्हाड घेऊन जसा एखादा वृक्ष सरोबरीनें पार तोडून टाकावा, त्याप्रमाणें तूं घातक शत्रूंचा शिरच्छेद करून टाकतोस. ॥ ४ ॥

त्वं वृथा॑ न॒द्य इं॒द्र सर्त॒वेऽ॑च्छा समु॒द्रमं॑सृजो॒ रथाँ॑ इव वाजय॒तः रथाँ॑ इव ।

इ॒त ऊ॒तीर॑यु॒ञ्जत समा॒नमर्थ॒मक्षि॑तम् ।

धे॒नूरि॑व॒ मन॑वे वि॒श्वदो॑हसो॒ जना॑य वि॒श्वदो॑हसः ॥ ५ ॥

त्वं वृथा नद्यः इंद्र सर्तवे अच्छ समुद्रं असृजः रथान्ऽइव वाजऽयतः रथान्ऽइव ॥

इतः ऊतीः अयुंजत समानं अर्थं अक्षितम् ॥

धेनूःऽइव मनवे विश्वऽदोहसः जनाय विश्वऽदोहसः ॥ ५ ॥

हे इंद्रा, तूं ह्या भरधांव धांवणाऱ्या नद्यांना वहात समुद्रास जाऊन मिळावे म्हणून सहज लीलेनें उत्पन्न केलेंस. आमच्यावर प्रसन्न होऊन ह्या नद्यांनी सर्वांनाच एकसारखी हितकर व चिरकाल टिकणारी अशी एक मोठी गोष्ट साधली आहे, ती ही कीं, मनु राजास ज्याप्रमाणें कामधेनु इच्छित पदार्थ देत असतात, त्याप्रमाणें ह्या नद्यांपासून सर्व जगास वाटेल तो पदार्थ आज मिळत आहे. ॥ ५ ॥

इ॒मां ते॒ वाचं॑ वसू॒यन्त॑ आ॒यवो॒ रथं॒ न धीरः॒ स्वपा॑ अतक्षिषुः सु॒म्नाय॒ त्वाम् अ॑तक्षिषुः ।

शु॒म्भन्तो॒ जेन्यं॑ यथा॒ वाजे॑षु विप्र वा॒जिन॑म् ।

अत्य॑मिव॒ शव॑से सा॒तये॒ धना॒ विश्वा॒ धना॑नि सा॒तये॑ ॥ ६ ॥

इमां ते वाचं वसुऽयंतः आयवः रथं न धीरः सुऽअपाः अतक्षिषुः सुम्नाय त्वां अतक्षिषुः ॥

शुंभंतः जेन्यं यथा वाजेषु विप्र वाजिनम् ॥

अत्यंऽइव शवसे सातये धना विश्वा धनानि सातये ॥ ६ ॥

इच्छित धनाच्या प्राप्तीकरितां आम्ही दीनजन हें तुम्हें प्रार्थनासूक्त ठाकठिकीनें बसविलें आहे. जसा चतुर आणि कुशल कारागीर एखादा रथ व्यवस्थित सजवून देतो, त्याप्रमाणें आमच्या कल्याणाकरितां तुझें स्वरूप आम्ही ध्यानानें अंतःकरणांत घडविलें आहे. तूं निरंतर विजयशाली म्हणून, हे परमबुद्धिमंता, तुझा आम्हीं नेहमी गौरव करतो, युद्धांत पराक्रमी आणि धाडशी अशा वीराला वस्त्रें भूषणें अर्पण करतात, त्याप्रमाणें आम्हीं प्रबल व्हावें, वैभव मिळवावें आणि सर्व प्रकारचें यशोधन जिंकून आणावें म्हणून तुझा गौरव करीत असतो. ॥ ६ ॥

भि॒नत्पुरो॑ नव॒तिमि॑न्द्र पू॒रवे॒ दिवो॑दासाय॒ महि॑ दा॒शुषे॑ नृतो॒ वज़्रे॑ण दा॒शुषे॑ नृतो ।

अ॒ति॒थि॒ग्वाय॒ शम्ब॑रं गि॒रेरु॒ग्रो अवा॑भरत् ।

म॒हो धना॑नि॒ दय॑मान॒ ओज॑सा॒ विश्वा॒ धना॒न्योज॑सा ॥ ७ ॥

भिनत् पुरः नवतिं इंद्र पूरवे दिवःऽदासाय महि दाशुषे नृतो इति वज़्रेण दाशुषे नृतो इति ॥

अतिथिऽग्वाय शंबरं गिरेः उग्रः अव अभरत् ॥

महः धनानि दयमानः ओजसा विश्वा धनानि ओजसा ॥ ७ ॥

आपला भक्त महा दानशूर जो दिवोदास त्याच्याकरितां हे रणभैरवा, हे रणशूर इंद्रा, तूं आपल्या वज्रानें शत्रूच्या नव्वद दुर्गांचा चक्काचूर करून टाकलास. महा भयंकर इंद्रानें अतिथिग्वाकरितां, शंबरासुराला पर्वतावरून खाली ओढून मारलें. इंद्र हा असा आहे कीं, श्रेष्ठ संपत्ति तो भक्तांस आपल्या दिव्य बलानें, आपल्या ईश्वरी सामर्थ्यानें देत असतो. ॥ ७ ॥

इंद्रः॑ सु॒मत्सु॒ यज॑मान॒मार्यं॒ प्राव॒द्विश्वे॑षु श॒तमू॑ति॒रा॒जिषु॒ स्व॑र्मीळ्हेष्वा॒जिषु॑ ।

मन॑वे॒ शास॑दव्र॒तान्त्वचं॑ कृ॒ष्णाम॑रन्धयत् ।

दक्ष॒न्न विश्वं॑ ततृषा॒णमो॑षति॒ न्यर्शसा॒नं ओ॑षति ॥ ८ ॥

इंद्रः समत्ऽसु यजमानं आर्यं प्र आवत् विश्वेषु शतंऽऊतिः आजिषु स्वःऽमीळ्हेषु आजिषु ॥

मनवे शासत् अव्रतान् त्वचं कृष्णां अरंधयत् ॥

दक्षन् नः विश्वं ततृषाणं ओषति नि अर्शसानं ओषति ॥ ८ ॥

इंद्रानें आपल्या अनंत शक्तींनी, संग्रामामध्यें - ज्यांच्या योगानें स्वर्गसुखाचा लाभ होतो अशा संग्रामामध्यें - आपल्या भक्तजनांचे रक्षण केलेलें आहे. मनुराजाकरितां अधार्मिक लोकांना त्यानें शिक्षा करून योग्य मार्गास लावले, आणि कृष्णवर्ण राक्षसांना जिंकून त्यांना त्याच्या कबजांत आणून दिले. आपल्या प्रखर तेजानें सर्व जग जणों जाळणारा असा हा इंद्र, अत्यंत लोभाविष्ट अशा दुर्जनांचे भस्म करून टाकतो. तसेंच साधूंना गांजणाऱ्या दुष्टांसही पार होरपळून टाकतो. ॥ ८ ॥

सूर॑श्च॒क्रं प्र वृ॑हज्जा॒त ओज॑सा प्रपि॒त्वे वाच॑मरु॒णो मु॑षायतीशा॒न आ मु॑षायति ।

उ॒शना॒ यत्प॑रा॒वतोऽ॑जगन्नू॒तये॑ कवे ।

सु॒म्नानि॒ विश्वा॒ मनु॑षेव तु॒र्वणि॒रहा॒ विश्वे॑व तु॒र्वणिः॑ ॥ ९ ॥

सूरः चक्रं प्र वृहत् जातः ओजसा प्रऽपित्वे वाचं अरुणः मुषायति ईशानः आ मुषायति ॥

उशना यत् पराऽवतः अजगन् ऊतये कवे ॥

सुम्नानि विश्वा मनुषाऽइव तुर्वणिः अहा विश्वाऽइव तुर्वणिः ॥ ९ ॥

आपण प्रकट होऊन आपल्या प्रभावानें, त्याने सूर्याचें एक चाक राक्षसांस फेंकून मारण्याकरितां उगारले आणि क्रोधानें लाल होऊन प्रातःकाळीं दुसऱ्या चाकांची घरघर सुद्धां बंद करून टाकली. हे प्राज्ञ इंद्रा, पुरातन काळी जेव्हां उशना स्वतःच्या रक्षणार्थ तुझ्याकडे आला त्यावेळी त्यानें तुझ्याकडे येऊन मनुष्यास जीं जीं सुखें मिळणें शक्य तीं तीं जणों काय सर्व जिंकून आपलीशी करून घेतली. ॥ ९ ॥

स नो॒ नव्ये॑भिर्वृषकर्मन्नु॒क्थैः पुरां॑ दर्तः पा॒युभिः॑ पाहि श॒ग्मैः ।

दि॑वोदा॒सेभि॑रिंद्र॒ स्तवा॑नो वावृधी॒था अहो॑भिरिव॒ द्यौः ॥ १० ॥

सः नः नव्येभिः वृषऽकर्मन्न् उक्थैः पुरां दर्तरिति दर्तः पायुऽभिः पाहि शग्मैः ॥

दिवःऽदासेभः इंद्र स्तवानः वावृधीथाः अहोभिःऽइव द्यौः ॥ १० ॥

हे इंद्रा, वृत्राचे किल्ले फोडून टाकणारा आणि सर्व मनोरथांची वृष्टीच भक्तांवर करणारा असा तूं, आमच्या अपूर्व स्तोत्रांनी प्रसन्न होऊन आपल्या संरक्षक कृपाछत्रानें आमचें रक्षण कर. हे इंद्रा, दिवोदासानें तुझें स्तवन केलेलें

आहे, तर दिवसांच्या प्रकाशामुळें आकाश जसें अवर्णनीय शोभा पावतें, त्याप्रमाणें तूं आपला गौरव प्रकट कर. ॥ १० ॥

ॐ तत् सत्

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १३१ (इंद्र सूक्त)

ऋषि : परुच्छेपः - देवता : इंद्रः - छंद - अत्यष्टी

इंद्रा॑य॒ हि द्यौरसु॑रो॒ अन॑म्न॒तेन्द्रा॑य म॒ही पृ॑थि॒वी वरी॑मभिर्द्यु॒म्नसा॑ता॒ वरी॑मभिः ।

इंद्रं॒ विश्वे॑ स॒जोष॑सो दे॒वासो॑ दधिरे पु॒रः ।

इंद्रा॑य॒ विश्वा॒ सव॑नानि॒ मानु॑षा रा॒तानि॑ सन्तु॒ मानु॑षा ॥ १ ॥

इंद्राय हि द्यौः असुरः अनम्नत इंद्राय मही पृथिवी वरीमऽभिः द्युम्नसाता वरीमऽभिः ॥

इंद्रं विश्वे सऽजोषसः देवासः दधिरे पुरः ॥

इंद्राय विश्वा सवनानि मानुषा रातानि संतु मानुषा ॥ १ ॥

प्रकाशयुक्त व अमर्याद असें आकाश फक्त एका इंद्रालाच प्रणिपात करते आणि ही अवाढव्य पृथ्वीसुद्धां सौभाग्यसंपन्न होण्याकरितां आपल्या सर्वोत्कृष्ट संपत्तीसह आपल्या अत्युत्तम फलपुष्पांसह इंद्रापुढेंच लोटांगण घालते. प्रेमामुळें एक झालेल्या सर्व देवांनी, इंद्रालाच अग्रेसरत्व दिले आहे, तेव्हां आम्हां मनुष्यांचे सर्व सोमरस आम्हां भक्तजनांचे हविर्भाग, सर्व इंद्रालाच अर्पण असोत. ॥ १ ॥

विश्वे॑षु॒ हि त्वा॒ सव॑नेषु तु॒ञ्जते॑ समा॒नमेकं॒ वृष॑मण्यवः॒ पृथ॒क् स्वः सनि॒ष्यवः॒ पृथ॑क् ।

तं त्वा॒ नावं॒ न प॒र्षणिं॑ शू॒षस्य॑ धु॒रि धी॑महि ।

इंद्रं॒ न य॒ज्ञैश्चि॒तय॑न्त आ॒यवः॒ स्तोमे॑भि॒रिंद्र॑मा॒यवः॑ ॥ २ ॥

विश्वेषु हि त्वा सवनेषु तुञ्जते समानं एकं वृषऽमन्यवः पृथक् स्वरिति स्वः सनिष्यवः पृथक् ॥

तं त्वा नावं न पर्षणिं शूषस्य धुरि धीमहि ॥

इंद्रं न यज्ञैः चितयंतः आयवः स्तोमेभिः इंद्रं आयवः ॥ २ ॥

सोम अर्पण करण्याच्या प्रत्येक प्रसंगी, तूं सर्वांचा मिळोन एकच देव, म्हणून तुझी विनवणी आपआपल्या परीनें यजमान लोक पराकाष्ठेच्या उत्कंठेने करीत असतात व प्रत्येक जण अक्षय्य आनंद प्राप्त व्हावा म्हणून स्वतः निरनिराळी प्रार्थनाही करीत असतो. तेव्हां एखादा प्राणरक्षक नौकेप्रमाणें सर्व महत्कार्यारंभी, अगोदर तुझी योजना आम्ही प्रथम करावी हेंच योग्य आहे, म्हणून आम्हीं मानवजन, यज्ञांच्या निमित्तानें सूक्त गायनाच्या योगानें इंद्राच्याच ठिकाणीं चित्त एकाग्र करतो. ॥ २ ॥

वि त्वा॑ ततस्रे मिथु॒ना अ॑व॒स्यवो॑ व्र॒जस्य॑ सा॒ता गव्य॑स्य निः॒सृजः॒ सक्ष॑न्त इंद्र निः॒सृजः॑ ।

यद्ग॒॑व्यन्ता॒ द्वा जना॒ स्व१॑र्यन्ता॑ स॒मूहसि॑ ।

आ॒विष्करि॑क्र॒द्वृष॑णं सचा॒भुवं॒ वज्र॑मिंद्र सचा॒भुव॑म् ॥ ३ ॥

वि त्वा ततस्रे मिथुना अवस्यवः व्रजस्य साता गव्यस्य निःऽसृजः सक्षंतः इंद्र निःऽसृजः ॥

यत् गव्यंता द्वा जना स्वः यंता संऽऊहसि ॥

आविः करिक्रत् वृषणं सचाऽभुवं वज्रं इंद्र सचाऽभुवम् ॥ ३ ॥

तुझ्या प्रसादाची लालसा धरून यजमान व त्याची पत्नी अशी अनेक जोडपीं स्वर्गीय गोधन प्राप्त होण्यांकरितां, हे इंद्रा, तुला हवि अर्पण करतात, व आहुति देऊन सर्व दुर्वासना बाजूस सारून तुझें यजन तत्परतेनें करीत असतात. दिव्यप्रकाश आणि स्वर्गसुख ह्यांच्यासाठीं उत्सुक झालेल्या जोडप्यांना जेव्हां जेव्हां तूं स्वर्लोकीं नेतोस, तेव्हां तेव्हां, हे इंद्रा, तुझें अमोघ वज्र आमच्या सहज दृष्टीस पडतें, जें तुझा जीव कीं प्राण आहे. त्याचा तुझा कधींही वियोग घडत नाहीं. ॥ ३ ॥

वि॒दुष्टे॑ अ॒स्य वी॒र्यस्य पू॒रवः॒ पुरो॒ यदि॑न्द्र॒ शार॑दीर॒वाति॑रः सासहा॒नो अ॒वाति॑रः ।

शास॒स्तमि॑न्द्र॒ मर्त्य॒मय॑ज्युं शवसस्पते ।

म॒हीम॑मुष्णाः पृथि॒वीमि॒मा अ॒पो म॑न्दसा॒न इ॒मा अ॒पः ॥ ४ ॥

विदुः ते अस्य वीर्यस्य पूरवः पुरः यत् इंद्र शारदीः अवऽआतिरः ससहानः अवऽआतिरः ॥

शासः तं इंद्र मर्त्यं अयज्युं शवसः पते ॥

महीं अमुष्णाः पृथिवीं इमा अपः मंदसानः इमाः अपः ॥ ४ ॥

तुझा एक पराक्रम आतां सर्व जगास माहीत झाला आहे, तो हा कीं, हे इंद्रा, आवर्षणरूप राक्षसाचे शरद ऋतूंत अभेद्य होणारे किल्ले तूं फोडून टाकलेस. अनावर होऊन तूं ते जमीनदोस्त करून टाकलेस. हे सामर्थ्यसागरा, तूं त्या धर्मलंड लोकांना शासन केलेंस व विजयश्रीच्या हर्षभरांत भक्तांकरितां ही पृथ्वी, ह्या नद्या व हे नदीकांठचे प्रदेश तूं हस्तगत करून घेतलेस. ॥ ४ ॥

आदित्ते अस्य वीर्यस्य चर्किरन्मदेषु वृषन्नुशिजो यदाविथ सखीयतो यदाविथ ।

चकर्थ कारमेभ्यः पृतनासु प्रवन्तवे ।

ते अन्यामन्यां नद्यं सनिष्णत श्रवस्यन्तः सनिष्णत ॥ ५ ॥

आत् इत् ते अस्य वीर्यस्य चर्किरन् मदेषु वृषन् उशिजः यत् आविथ सखिऽयतः यत् आविथ ॥

चकर्थ कारं एभ्यः पृतनासु प्रऽवंतवे ॥

ते अन्याऽअन्या नद्यं सनिष्णत श्रवस्यंतः सनिष्णत ॥ ५ ॥

हे औदार्यशीला, सहवासाकरितां अत्युत्सुक झालेल्या भक्तांचे तूं रक्षण केलेस, व तुझ्याशी सख्य जोडण्यास आतुर झालेल्या भक्तांना तूं सहाय्य केलेंस. आणि त्यांच्याकरितां युद्धांत जय मिळविण्याच्या ईर्ष्येनें जेव्हां तूं सिंहनाद केलास, तेव्हां त्यांनी एकीमागून दुसरी याप्रमाणे एकूणएक नद्यांमधील प्रदेश जिंकले. ॥ ५ ॥

उतो नौ अस्या उषसौ जुषेत ह्य१र्कस्य बोधि हविषो हवींमभिः स्वर्षाता हवींमभिः ।

यदिन्द्र हन्तवे मृधो वृषा वज्रिं चिकेतसि ।

आ मे अस्य वेधसः नवीयसो मन्म श्रुधि नवीयसः ॥ ६ ॥

उतो इति नः अस्याः उषसः जुषेत हि अर्कस्य बोधि हविषः हवीमऽभिः स्वःऽसाता हवीमऽभिः ॥

यत् इंद्र हंतवे मृधः वृषा वज्रिन् चिकेतसि ॥

आ मे अस्य वेधसः नवीयसः मन्म श्रुधि नवीयसः ॥ ६ ॥

आतां आज तरी ह्या सुप्रभातीं हा इंद्र आम्हांस आपलेसे म्हणेल काय ? हे इंद्रा, आमची साम-गायनें मान्य करून घे. आम्हीं आर्जवानें तुला हवि अर्पण करितों तें हवि व आम्हांस दिव्य प्रकाशाचा लाभ व्हावा म्हणून प्रार्थना करतो त्याही मान्य करून घे. हे वज्रधर इंद्रा, मी केलेलें हे स्तवन तत्कालिक स्फूर्तिनें, अपूर्व प्रतिमेनें सुचलेले हें तुझें स्तोत्र तू कृपा करून ऐकून घेत जा. ॥ ६ ॥

त्वं तमिंन्द्र वावृधानो अंस्मयुरंमित्रयन्तं तुविजात मर्त्यं वज्रेण शूर मर्त्यम् ।

जहि यो नौ अघायतिं श‍ृणुष्व सुश्रवंस्तमः ।

रिष्टं न यामन्नपं भूतु दुर्मतिर्विश्वापं भूतु दुर्मतिः ॥ ७ ॥

त्वं तं इंद्र वावृधानः अस्मऽयुः अमित्रऽयंतं तुविऽजात मर्त्यं वज्रेण शूर मर्त्यम् ॥

जहि यः नः अघऽयति श‍ृणुष्व सुश्रवःऽतमः ॥

रिष्टं नः यामन् अप भूतु दुःऽमतिः विश्वा अप भूतु दुःऽमतिः ॥ ७ ॥

हे इंद्रा, तूं अत्यंत बलाढ्य असूनही आमच्या विषयीं तुला अतिशय प्रेम वाटतें. तूं स्वाभाविकपणेंच सर्वसमर्थ आहेस, तर हे शूरा, आमचा निष्कारण द्वेष करणाऱ्या दुष्टाचा, त्या अधम मानवाचा तूं आपल्या शस्त्रानें निःपात करून टाक, व आमच्या विरुद्ध अत्याचार करतो त्यालाही मारून टाक. एवढें आमचे ऐक. पहा तुझी केवढी लोकोत्तर कीर्ति आहे ती. तर दुष्ट वासना आणि सर्व दुर्जन आमच्याकडे येऊं लागतांच नाहिंसे होवोत. एखाद्या मोडक्या खटाऱ्याप्रमाणें वाटेंतच मोडून पडोत. ॥ ७ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १३२ (इंद्र सूक्त)

ऋषि : परुच्छेपः - देवता : इंद्रः - छंद - अत्यष्टी

त्वया॑ व॒यं म॑घव॒न्पूर्व्ये॒ धन॒ इंद्र॑त्वोताः सासह्याम पृतन्य॒तो व॑नु॒याम॑ वनुष्य॒तः ।

नेदि॑ष्ठे अ॒स्मिन्नह॒न्यधि॑ वोचा॒ नु सु॑न्व॒ते ।

अ॒स्मिन्य॒ज्ञे वि च॑येमा॒ भरे॑ कृ॒तं वा॑ज॒यन्तो॒ भरे॑ कृ॒तम् ॥ १॥

त्वया वयं मघऽवन् पूर्व्ये धने इंद्रत्वाऽऊताः ससह्याम पृतन्यतः वनुयाम वनुष्यतः ॥

नेदिष्ठे अस्मिन् अहनि अधि वोच नु सुन्वते ॥

अस्मिन् यज्ञे वि चयेम भरे कृतं वाजऽयंतः भरे कृतम् ॥ १ ॥

पूर्वींच्या युद्धांत होत असे त्याप्रमाणे, हे उदार इंद्रा, आतांही आमच्यावर सैन्यानिशी चढाई करून येणाऱ्या शत्रूंचा तुझ्याच कृपेनें आणि तुझ्याच संरक्षणामुळें आम्ही प्रतिकार करूं, आणि आमचा सर्वथैव घात करूं पाहणाऱ्या दुष्टांची खोड मोडूं, असें कर. हा आणीबाणीचा दिवस तर येऊन ठेपलाच, तर आतां तुला सोमरसानें संतुष्ट करणाऱ्या भक्तांस, आशीर्वाद दे. आम्हांला पराक्रम गाजविण्याचीच केवळ इच्छा आहे, तेव्हां युद्धांत आम्हांस जें जें काय मिळेल, आम्ही जें जें कांही जिंकून आणूं, तें तें सर्व ह्या यज्ञांमध्यें तुझ्याच पायी वाहण्याचा आमचा संकल्प झालेला आहे. ॥ १ ॥

स्व॒र्जे॑षे भरे॑ आ॒प्रस्य॒ वक्म॑न्यु॒ष॒र्बुधः॒ स्वस्मि॒न्नञ्ज॑सि क्रा॒णस्य॒ स्वस्मि॒न्नञ्ज॑सि ।

अह॒न्निंद्रो॒ यथा॑ वि॒दे शी॒र्ष्णाशी॑र्ष्णो॒पवाच्यः॑ ।

अ॒स्म॒त्रा ते॑ स॒ध्र्यक् सन्तु रा॒तयो॑ भ॒द्रा भ॒द्रस्य॑ रा॒तयः॑ ॥ २॥

स्वःऽजेषे भरे आप्रस्य वक्मनि उषःऽबुधः स्वस्मिन् अंजसि क्राणस्य स्वस्मिन् अंजसि ॥

अहन् इंद्रः यथा विदे शीर्ष्णाऽशीर्ष्णा उपवाच्यः ॥

अस्मत्रा ते सध्र्यक् संतु रातयः भद्रा भद्रस्य रातयः ॥ २ ॥

जो स्वर्गलोक मिळवून देतो, जो खऱ्या वीराचें वैभवच आहे अशा त्या युद्धप्रसंगी भक्तानें प्रातःकाळीं उठून स्वतः केलेल्या कळवळ्याच्या प्रार्थनेनें आणि निरंतर सेवारत जनाच्या कळवळीनें संतुष्ट होऊन इंद्रानें शत्रूंचा संहार केला, हें सर्व विश्रुत आहेच. तो हा इंद्र असा आहे कीं त्याच्या चरणांवर लोळण घेऊन त्याचा गौरव करावा. हे इंद्रा, तूं मूर्तिमंत सद्भाग्यच आहेस, तर तुझे कृपाप्रसाद, तुझीं मंगलप्रद वरदानें आमच्याकडे वळोत. ॥ २ ॥

तत्तु प्रयः॑ प्र॒त्नथा॑ ते शुशुक्व॒नं यस्मि॑न्य॒ज्ञे वार॒मकृ॑ण्वत॒ क्षय॑मृ॒तस्य॒ वार॑सि॒ क्षय॑म् ।

वि तत्वौचेरध द्विताान्तः पश्यन्ति रश्मिभिः ।

स घा विदे अन्विंद्रः गवेषणो बन्धुक्षिद्भ्यो गवेषणः ॥ ३॥

तत् तु प्रयः प्रत्नरथा ते शुशुक्वनं यस्मिन् यज्ञे वारं अकृण्वत क्षयं ऋतस्य वाः असि क्षयम् ॥

वि तत् वोचेः अध द्विता अंतरिति पश्यंति रश्मिऽभिः ॥

सः घ विदे अनु इंद्रः गोऽएषणः बंधुक्षिद्भ्यः गोऽएषणः ॥ ३ ॥

ज्या यज्ञांत तुझ्यासाठीं सुंदर वेदि म्हणजे रमणीय निवासस्थान भक्तांनी तयार केलेलें आहे त्या ह्या यज्ञांतील हा अत्यंत उज्ज्वल हविर्भाग पूर्वीप्रमाणेंच आतांही तुलाच अर्पण होत असतो, व भक्तांना सनातन सत्यलोकीं घेऊन जाणाराही तूंच आहेस. तर अशा भक्तांना, सूर्यप्रकाशाच्या योगानें दोहोंच्यामध्यें अर्थात् अंतराळी काय काय दिसत असतें तें सांग बरे. हें तर प्रसिद्धच आहे कीं दिव्य धेनूंचा समूह हुडकून काढणारा असा एक इंद्रच आणि एकदां आपलें म्हटलें की त्याच्याकरितां त्या प्रकाशधेनूंना सोडवून आणणाराही एक इंद्रच. ॥ ३ ॥

नू इत्था ते पूर्वथा च प्रवाच्यं यदङ्गिरोभ्योऽवृणोरप व्रजमिंद्र शिक्षन्नप व्रजम् ।

ऐभ्यः समान्या दिशास्मभ्यं जेषि योत्सि च ।

सुन्वद्भ्यो रन्धया कं चिदव्रतं हृणायन्तं चिदव्रतम् ॥ ४॥

नू इत्था ते पूर्वऽथा च प्रऽवाच्यं यत् अंगिरःऽभ्यः अवृणोः अप व्रजं इंद्र शिक्षन् अप व्रजम् ॥

आ एभ्यः समान्या दिशा अस्मभ्यं जेषि योत्सि च ॥

सुन्वत्ऽभ्यः रंधय कं चित् अव्रतं हृणायंतं चित् अव्रतम् ॥ ४ ॥

हे इंद्रा, खरोखर तुझी चरित्रें पूर्वीप्रमाणे पुनः पुनः वर्णन करावी असे वाटण्यासारखीच आहेत. पहा कीं अंगिरसांकरितां, प्रकाशरूपी धेनूंना कोंडून धरणारा कोट तूं फोडून टाकलास आणि त्या ज्ञानधेनू हस्तगत करून अंगिरसांचे स्वाधीन केल्यास, तर तुझे भक्त जे आम्हीं त्या आमच्याकरितां सुद्धां अशाच रीतीनें, युद्ध करून आम्हांस जय मिळवून देशीलच परंतु जे तुला सोम अर्पण करून तुझी सेवा करतात त्यांच्या सत्तेखाली सर्व अधार्मिक लोकांना, सज्जनांवर संतापणाऱ्या सर्व दुराचारी मानवांना, पूर्णपणें आण. ॥ ४ ॥

सं यज् जनान् क्रतुभिः शूरं ईक्षयद्धने हिते तरुषन्त श्रवस्यवः प्र यक्षन्त श्रवस्यवः ।

तस्मा॒ आयु॑ः प्र॒जाव॒दित्बाधे॑ अर्च॒न्त्योज॑सा ।

इंद्र॑ ओ॒क्यं दिधिषन्त धी॒तयो॑ दे॒वाँ अच्छा॒ न धी॒तय॑ः ॥ ५॥

सं यत् जनान् क्रतुऽभिः शूरः ईक्षयत् धने हिते तरुषंत श्रवस्यवः प्र यक्षंत श्रवस्यवः ॥

तस्मै आयुः प्रजाऽवत् इत् बाधे अर्चंति ओजसा ॥

इंद्र ओक्यं दिधिषंत धीतयः देवान् अच्छ न धीतयः ॥ ५ ॥

हे शूरा, पुढें काय होणार हें उत्तम रीतीनें पाहण्याची शक्ति आपल्या ईश्वरी सामर्थ्यानें तूं भक्तांना दिली आहेस त्या योगानें, युद्धप्रसंग येतो त्या त्या वेळी सत्कीर्ति संपादनोत्सुक वीर शत्रूंवर तुटून पडून सहजच विजय संपादन करतात, व पुण्य जोडण्याकरितां तुझ्याप्रित्यर्थ यज्ञादिक करीत असतात. जोमदार व पुत्रपौत्रयुक्त असेंच दीर्घायुष प्राप्त व्हावें म्हणून संकटकाळीं गायन करून कंठरवानें इंद्राचीच करुणा भाकीत असतात आणि तें इतर देवतांचे स्तवन करतात त्या वेळींही त्यांचे चित्त इंद्राच्याच ठिकाणीं जडलेले असतें. ॥ ५ ॥

यु॒वं तमि॑न्द्रापर्वता पु॒रो॒यु॒धा॒ यः न॑ः पृ॒त॒न्याद॒प॒ तंत॒मिद्ध॑तं॒ वज्रे॑ण॒ तंत॒मिद्ध॑तम् ।

दूरे चत्ताय छन्त्सद्गहनं यदिनक्षत् ।

अस्माकं शत्रून्परि शूर विश्वतो दर्मा दर्षीष्ट विश्वतः ॥ ६॥

युवं तं इंद्रापर्वता पुरःऽयुधा यः नः पृतन्यात् अप तंऽतं इत् हतं वज्रेण तंऽतं इत् हतम् ॥

दूरे चत्ताय छंत्सत् गहनं यत् इनक्षत् ॥

अस्माकं शत्रून् परि शूर विश्वतः दर्मा दर्षीष्ट विश्वतः ॥ ६ ॥

हे इंद्र आणि पर्वतहो, तुम्हीच आमचे धुरीण आहांत, तेव्हां सैन्यानिशीं आमच्यावर कोणीही चाल करून येवो, त्याचा व त्याच्या सर्व सागालाग्यांचा आपल्या वज्रप्रहारानें नाश करून टाका. तुमचें शस्त्र पाहिजे त्या शत्रूस मारून टाकील असे आहे, मग तो कितीही दूर गेलेला असो किंवा कितीही बिकट ठिकाणी छपून बसलेला असो. हे शूर इंद्रा, प्रतिस्पर्ध्याच्या चिंधड्या करणारे अस्त्र आमच्या ठिकाणच्या शत्रूंचा सर्व बाजूंनी पार फडशाच उडवील. ॥ ६ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १३३ (राक्षोघ्न सूक्त)

ऋषि : परुच्छेपः - देवता : इंद्रः - छंद - त्रिष्टुप्

उ॒भे पु॑नामि॒ रोद॑सी ऋ॒तेन॒ द्रुहो॑ दहामि॒ सं म॒हीर॑नि॒न्द्राः ।

अ॒भि॒व्लग्य॒ यत्र॑ ह॒ता अ॒मित्रा॑ वैलस्था॒नं परि॑ तृ॒ळ्हा अशे॑रन् ॥ १ ॥

उभे इति पुनामि रोदसी इति ऋतेन द्रुहः दहामि सं महीः अनिंद्राः ।

अभिव्लग्य यत्र हताः अमित्राः वैलऽस्थानं परि तृळ्हाः अशेरन् ॥ १ ॥

सनातन खरा धर्म म्हणजे यज्ञ, त्याच्या योगानें आकाश व पृथ्वी ह्या दोहोंनाही मी शुद्ध करतो. इंद्रास न मानणाऱ्या अशा कांही बलाढ्य आणि पुष्ट चेटक्या असतील त्यांनानी यज्ञाच्या योगानेंच जाळून भस्म करतो. पहा येथें हे आमचे शत्रु हल्ल्याच्या सपाट्यांत मारले जाऊन त्यांचे तुकडे तुकडे होऊन ते मसणांत पडलेले आहेत. ॥ १ ॥

अभिव्लग्या चिदद्रिवः शीर्षा यातुमतीनाम् ।

छिन्धि वटूरिणा पदा महावटूरिणा पदा ॥ २ ॥

अभिव्लग्या चित् अद्रिऽवः शीर्षा यातुऽमतीनाम् ।

छिंधि वटूरिणा पदा महाऽवटूरिणा पदा ॥ २ ॥

हे वज्रधरा, एकदम हल्ला चढवून ह्या जादूटोणा करणाऱ्या अधमांची डोचकीं चेंचून टाक; आपल्या प्रचंड जगड्व्याळ पायाखाली चिरडून टाक. ॥ २ ॥

अवासां मघवन् जहि शर्धो यातुमतीनाम् ।

वैलस्थानके अर्मके महावैलस्थे अर्मके ॥ ३ ॥

अवासां मघऽवन् जहि शर्धः यातुऽमतीनाम् ।

वैलऽस्थानके अर्मके महाऽवैलस्थे अर्मके ॥ ३ ॥

हे अत्युदा इंद्रदेवा, ह्या जादूगारांची बलाढ्य टोळी मसणवटींत घाणेरड्या जागी - घोर स्मशानांत अतिशय गलिच्छ जागी दडून रहात असते तेथें - गांठून तिचा फडशा पाडून टाक. ॥ ३ ॥

यासां᳚ ति॒स्रः प॑ञ्चा॒शतो॑ऽभिव्ल॒ङ्गै॑र॒पाव॑पः ।

तत्सु ते॑ मनायति त॒कत्सु ते॑ मनायति ॥ ४ ॥

यासां तिस्रः पंचाशतः अभिव्लङ्गैः◌ः अपाऽवपः ।

तत् सु ते मनायति तकत् सु ते मनायति ॥ ४ ॥

ह्या पूर्वींच त्या टोळीपैकी पन्नास पन्नासाची एकेक अशा तीन तुकड्यांचा तूं आपल्या सपाट्यानें चक्काचूर करून टाकला आहेस व हें कृत्य जरी तुला कांहींच वाटलें नाहीं तरी आम्हां खऱ्या भक्तांना त्याचे फारच महत्व वाटत असतें. ॥ ४ ॥

पि॒शङ्गं॑गभृष्टिमम्भृ॒णं पि॒शाचिं᳚ इं॒द्र सं मृं॑ण ।

सर्वं रक्षः नि बर्हय ॥ ५ ॥

पिशंगभृष्टिं अंभृणं पिशाचिं इंद्र सं मृण ।

सर्वं रक्षः नि बर्हय ॥ ५ ॥

हे इंद्रा, पिंगट रंगाचा आणि विक्राळ भेसूर ओरडणारा जो पिशाच्च आहे त्याला ठार करून टाक, आणि त्याच्या बरोबरच इतर सर्व राक्षसांचाही संहार कर. ॥ ५ ॥

अवर्मह इन्द्र दादृहि श्रुधी नः शुशोच हि द्यौः क्षा न भीषाँ अद्रिवो घृणान् न भीषाँ अद्रिवः ।

शुष्मिन्तमो हि शुष्मिभिर्वधैरुग्रेभिरीयसे ।

अपूरुषघ्नो अप्रतीत शूर सत्वभिस्त्रिसप्तैः शूर सत्वभिः ॥ ६ ॥

अवः महः इंद्र ददृहि श्रुधी नः शुशोच हि द्यौः क्षाः न भीषा अद्रिवः घृणान् न भीषा अद्रिवः ।

शुष्मिम्ऽतमः हि शुष्मिऽभिः वधैः उग्रेभिः ईयसे ।

अपूरुषऽघ्नः अप्रतिऽइत शूर सत्वऽभिः त्रिसप्तैः शूर सत्वऽभिः ॥ ६ ॥

हे इंद्रा, ह्या घोर अंधकाराच्या ठिकऱ्या उडवून दे. आमच्या प्रार्थनेकडे तुझें लक्ष आहे ना ? आकाशांतून अशनींची वृष्टी करणाऱ्या वज्रधर इंद्रा ! तुझ्या ह्या अतिशय प्रखर आहाळाच्या भितीमुळेंच कीं काय पृथ्वीप्रमाणें आकाशसुद्धां भयानें अगदी खिन्न झाल्यासारखें दिसत आहे. तूं अत्यंत सामर्थ्यवान तूं, आपलीं घातक शस्त्रास्त्रें पाजळून सर्व ठिकाणी संचार करीत असतोस, परंतु हे वीरा सात्विकांनाही अचिंतनीय असा, तूं सज्जनांना यत्किंचितही धक्का न लावतां एकवीस सेवकानिशीं सर्वत्र जात असतोस. ॥ ६ ॥

व॒नोति॒ हि सु॒न्वन्क्षयं॒ परीं॑णसः सु॒न्वा॒नः हि ष्मा॒ यज॒त्यव॒ द्विषो॒ दे॒वाना॒मव॒ द्विषः॑ ।

सु॒न्वा॒न इत्सि॑षासति स॒हस्रा॑ वा॒ज्यवृ॑तः ।

सु॒न्वा॒नायेन्द्रो॑ ददात्या॒भुवं॑ र॒यिं द॑दात्या॒भुव॑म् ॥ ७ ॥

वनोति हि सुन्वन् क्षयं परीणसः सुन्वानः हि स्म यजति अव द्विषः देवानां अव द्विषः ।

सुन्वानः इत् सिसासति सहस्रा वाजि अवृतः ।

सुन्वानाय इंद्रः ददाति आऽभुवं रयिं ददाति आऽभुवम् ॥ ७ ॥

खरोखर सर्व संपत्तीचें जें आगर तें, सोमरस अर्पण करणाऱ्या यजमानास प्राप्त होते. सोम अर्पण करणारा भक्तच शत्रूंना आपल्या कह्यांत ठेऊं शकतो व देवद्वेष्ट्यांचा पराभव करूं शकतो. सोम अर्पण करणारा भक्त वीर कोणासही हार न जातां हजारों जय मिळवतो. इंद्र हा अशा भक्तालाच मनमुराद सुख संपत्ति देतो आणि दिव्यैश्वर्यही पण तो त्यालाच यथेच्छ देत असतो. ॥ ७ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १३४ (वायुः सूक्त)

ऋषि : परुच्छेपः - देवता : वायुः - छंद - अत्यष्टी

आ त्वा॒ जुवो॑ रारहा॒णा अ॒भि प्रयो॒ वायो॒ वह॑न्त्वि॒ह पू॒र्वपी॑तये॒ सोम॑स्य पू॒र्वपी॑तये ।

ऊ॒र्ध्वा ते॒ अनु॑ सू॒नृता॒ मन॑स्तिष्ठतु जान॒ती ।

नि॒यु॒त्व॑ता॒ रथे॒ना या॑हि दा॒वने॒ वाय॒ो म॒खस्य॑ दा॒वने॑ ॥ १ ॥

आ त्वा जुवः रारहाणाः अभि प्रयः वायो इति वहंतु इह पूर्वऽपीतये सोमस्य पूर्वऽपीतये ।

ऊर्ध्वा ते अनु सूनृता मनः तिष्ठतु जानती ।

नियुत्वता रथेन आ याहि दावने वायो इति मखस्य दावने ॥ १ ॥

हे वायो, तुझे वाऱ्यासारखे वेगवान घोडे ह्या रुचिर हविकडे, ह्या सोमरसाचा पहिल्यानें आणि उत्तम रीतीनें आस्वाद घेण्याकरितां तुला इकडे घेऊन येवोत. हे सत्य मधुर स्तोत्र, हे ज्ञानमय आणि उदात्त स्तोत्र तुझ्या चित्ताचे रंजन करो. नियुत् नांवाचे वायुरूप घोडे रथास जोडून आम्ही अर्पण केलेल्या हवीचा, ह्या आमच्या अध्वर्यूनें अर्पण केलेल्या हवीचा स्वीकार करण्याकरितां इकडे ये. ॥ १ ॥

मन्द॑न्तु त्वा म॒न्दिनो॑ वाय॒विन्द॑वोऽ॒स्मत्क्रा॒णासः॑ सु॒कृ॑ता अ॒भिद्य॑वो॒ गोभिः॑ क्रा॒णा अ॒भिद्य॑वः ।

यद्ध॑ क्रा॒णा इ॒रध्यै॒ दक्षं॒ सच॑न्त ऊ॒तयः॑ ।

स॒ध्री॒ची॒ना नि॒युतः॑ दा॒वने॒ धिय॒ उप॑ ब्रुवत ईं॒ धियः॑ ॥ २ ॥

मंदंतु त्वा मंदिनः वायो इति इंदवः अस्मत् क्राणासः सुऽकृताः अभिऽद्यवः गोभिः क्राणाः अभिऽद्यवः ।

यत् ह क्राणाः इरध्यै दक्षं सचंते ऊतयः ।

सध्रीचीनाः निऽयुतः दावने धियः उप ब्रुवते ईं धियः ॥ २ ॥

हे वायुदेवा, आमचे हे सोमरस हर्षकर आहेत, उत्साहप्रद आहेत; ते मोठ्या खुबीनें तयार केले असून त्यांचे तेज तर असें आहे कीं ते जणूं काय स्वर्गलोकींचेच, शिवाय त्यांत दूध घालून त्यांस फारच रुचि आणलेली आहे. तर ह्या सोमरसांनी तूं हर्षभरीत हो. तुझे साहाय्यकारी घोडे महासमर्थ अशा तुजबरोबरच सेवेकरितां सदैव तत्पर असे असतात. नेहमीं रथास जोडलेले असे ते अश्व जेव्हां भक्तांच्या हृदयांत पवित्र विचार जागृत करण्यास उद्युक्त होतात, तेव्हां आमचे बुद्धिमान ऋत्विज ह्या वायु प्रित्यर्थ स्तोत्रगायन करीतच असतात. ॥ २ ॥

वा॒युर्यु॑ङ्क्ते॒ रोहि॑ता वा॒युर॑रु॒णा वा॒यू रथे॑ अजि॒रा धु॒रि वोळ्ह॑वे॒ वहि॑ष्ठा धु॒रि वोळ्ह॑वे ।

प्र बो॑धया॒ पुरं॑धिं जा॒र आ स॑स॒तीमि॑व ।

प्र च॑क्षय॒ रोद॑सी वासयो॒षस॒ः श्रव॑से वासयो॒षस॑ः ॥ ३ ॥

वायुः युंक्ते रोहिता वायुः अरुणा वायुः रथे अजिरा धुरि वोळ्हवे वहिष्ठा धुरि वोळ्हवे ।

प्र बोधय पुरंऽधिं जारः आ ससतींऽइव ।

प्र चक्षय रोदसी इति वासय उषसः श्रवसे वासय उषसः ॥ ३ ॥

वायुदेव हा आपल्या रथास कधीं कधीं दोन अबलख आणि कधीं कधीं दोन लाल घोडेही जोडतो. हा वायुदेव, आपल्या स्वतःस पाहिजे तिकडे घेऊन जाण्याकरितां, सर्वत्र संचार करण्याकरितां, अतिशय वेगवान व अतिशय बळकट घोडे रथेच्या धुरेला जोडीत असतो. हे वायुदेवा, प्रियतमा निद्रावश असतां तिचा प्रियकर ज्याप्रमाणें तिला हळूच जागी करतो त्याप्रमाणें आमच्या अंतःकरणांतील उच्च कल्पना जागृत कर, आणि पृथ्वी व आकाश ह्यांच्यावरील आवरण दूर करून तीं आम्हांस दिसतील असें कर. उषेला सुप्रकाशित कर, आमच्या हातून सत्कर्में व्हावी म्हणून तिला सुप्रकाशित कर. ॥ ३ ॥

तुभ्य॑मु॒षास॒ः शुच॑यः परा॒वति॑ भ॒द्रा वस्त्रा॑ तन्वते॒ दंसु॑ र॒श्मिषु॑ चि॒त्रा नव्ये॑षु र॒श्मिषु॑ ।

तुभ्यं धेनुः सबर्दुघा विश्वा वसूनि दोहते ।

अजनयो मरुतो वक्षणाभ्यो दिव आ वक्षणाभ्यः ॥ ४ ॥

तुभ्यं उषसः शुचयः पराऽवति भद्रा वस्त्रा तन्वते दंऽसु रश्मिषु चित्रा नव्येषु रश्मिषु ।

तुभ्यं धेनुः सबःऽदुघा विश्वा वसूनि दोहते ।

अजनयः मरुतः वक्षणाभ्यः दिवः आ वक्षणाभ्यः ॥ ४ ॥

हे वायुदेवा, तुझ्यासाठीं ही देदीप्यमान उषादेवी आपल्या अद्‌भुत प्रमेमध्यें आपल्या अपूर्व किरणामध्यें सुंदर व तलम अशीं मंगल वस्त्रें आकाशांत दूरवर उलगडून तयार ठेवते. अमृतस्राविणी दिव्य धेनूही तुझ्यासाठींच यच्चावत् रमणीय पदार्थांचा पान्हा सोडतात. आकाशाच्या उदरांत तूं वादळें उत्पन्न करतोस, ती नद्यांच्या पोषणासाठीं उत्पन्न करतोस. ॥ ४ ॥

तुभ्यं शुक्रासः शुचयस्तुरण्यवो मदेषूग्रा इषणन्त भुर्वण्यपामिषन्त भुर्वणि ।

त्वां त्सा॒री दस॑मानो॒ भग॑मीट्टे तक्व॒वीये॑ ।

त्वं विश्व॑स्मा॒द्भुव॑नात्पासि॒ धर्म॑णासु॒र्यात्पासि॒ धर्म॑णा ॥ ५ ॥

तुभ्यं शुक्रासः शुचयः तुरण्यवः मदेषु उग्राः इषणंत भुर्वणि अपां इषंत भुर्वणि ।

त्वां त्सारी दसमानः भगं ईट्टे तक्वऽवीये ।

त्वं विश्वस्मात् भुवनात् पासि धर्मणा असुर्यात् पासि धर्मणा ॥ ५ ॥

हे स्वच्छ शुभ्र सोमरस तरतरी आणणारे आहेत, परंतु अंगांत उत्साह उत्पन्न करण्याच्या कामीं जरा कडकच आहेत. ते तुला स्वस्थ बसूं देत नाहींत. मेघमंडळांत सोसाट्यानें भ्रमण करावयास व जलवृष्टि करावयास लावतात. प्रवासानें बावरलेला व थकलेला भक्त, चोरांनी अंगावर चाल केली असतां तुझें मंगल नाम घेऊन स्तवन करतो, तेव्हां त्या भक्ताचें रक्षण, सर्व जग त्याच्या विरुद्ध असलें तरीही तूं त्याच्या केवळ भक्तीमुळें प्रसन्न होऊन करतोस, निबिड अंधःकारामध्येंही आपल्या दिव्य शक्तीनें रक्षण करतोस. ॥ ५ ॥

त्वं नो॑ वायवेषा॒मपू॑र्व्यः॒ सोमा॑नां प्रथ॒मः पी॒तिम॑र्हसि सु॒ताना॑ं पी॒तिम॑र्हसि ।

उ॒तो वि॒हुत्म॑तीनां वि॒शां व॑व॒र्जुषी॑णाम् ।

विश्वा॒ इत्ते॑ धे॒नवः॑ दुह्र आ॒शिरं॑ घृ॒तं दु॑ह्रत आ॒शिर॑म् ॥ ६ ॥

त्वं नः वायो इति एषां अपूर्व्यः सोमानां प्रथमः पीतिं अर्हसि सुतानां पीतिं अर्हसि ।

उतो इति विहुत्मतीनां विशां ववर्जुषीणाम् ।

विश्वाः इत् ते धेनवः दुह्रे आऽशिरं घृतं दुह्रते आऽशिरम् ॥ ६ ॥

हे वायो, यज्ञामध्यें तूं पहिला, सर्वांच्या अगोदर येणारा आहेस, तर आमच्या ह्या सोमरसाचें पान प्रथम तूंच करावेंस हें योग्य आहे. शिवाय हा सोमरस नाना प्रकारचें हवि अर्पण करून पातकापासून दूर राहण्याचा प्रयत्न करणाऱ्या भक्तजनांनीच तुला अर्पण केलेला आहे. तुझ्याचसाठीं धेनू अतिशय कसदार अशा उत्कृष्ट घट्ट दुधाचा पान्हा सोडतात. ॥ ६ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १३५ (वायुः सूक्त)

ऋषि : परुच्छेपः - देवता : वायुः - छंद - अत्यष्टी

स्ती॒र्णं ब॒र्हिरुप॑ नो याहि वी॒तये॑ स॒हस्रे॑ण नि॒युता॑ नियुत्वते श॒तिनी॑भिर्नियुत्वते ।

तु॒भ्यं॒ हि पू॒र्वपी॑तये दे॒वा दे॒वाय॑ येमि॒रे ।

प्र ते॑ सु॒तासो॒ मधु॑मन्तो अस्थिर॒न्मदा॑य॒ क्रत्वे॑ अस्थिरन् ॥ १ ॥

स्तीर्णं बर्हिः उप नः याहि वीतये सहस्रेण निऽयुता नियुत्वते शतिनीभिः नियुत्वते ।

तुभ्यं हि पूर्वऽपीतये देवाः देवाय येमिरे ।

प्र ते सुतासः मधुऽमंतः अस्थिरन् मदाय क्रत्वे अस्थिरन् ॥ १ ॥

हे दर्भासन आंथरले आहे, तर हे वायू आमचेकडे हविचा स्वीकार करण्याकरितां ये; आपले हजारो घोडे रथास जोडून, हा जो आम्ही सिद्ध केलेला सोमरस शेंकडो प्रशंसापर सूक्तांनी अधिकच तीव्र बनला आहे त्याची रुची

घेण्याकरितां ये. भगवंता वायुदेवा, इतर दैवतें प्रथम सोमपान करण्याविषयी तुला आग्रह करीत आहेत, यास्तव हे मधुर सोमबिंदु तुला आल्हाद व्हावा म्हणून सादर केले आहेत - तूं आपल्या सत्कार्यक्षमत्वाचा उपयोग करावास म्हणून अर्पण केले आहेत. ॥ १ ॥

तुभ्यायं सोमः परिपूतो अद्रिभि स्पार्हा वसानः परि कोशमर्षति शुक्रा वसानो अर्षति ।

तवायं भाग आयुषु सोमः देवेषु हूयते ।

वह वायो नियुतो याह्यस्मयुर्जुषाणो याह्यस्मयुः ॥ २ ॥

तुभ्य अयं सोमः परिऽपूतः अद्रिऽभि स्पार्हा वसानः परि कोशं अर्षति शुक्रा वसानः अर्षति ।

तव अयं भागः आयुषु सोमः देवेषु हूयते ।

वह वायो इति निऽयुतः याहि अस्मऽयुः जुषाणः याहि अस्मऽयुः ॥ २ ॥

पाषाणांनी पिळून काढलेला हा स्वच्छ सोमरस तुझ्यासाठी तयार केला आहे. हा शुभ्र कांतियुक्त सोमरस पात्रांत ओतून ठेवला आहे. मोत्यासारखा चमकणारा हा सोमरस गाळून ठेवला आहे. हा भाग तुझ्याकरितां ठेवून हा बाकीचा इतर देवतांना व दिव्य जनांना अर्पण केला आहे, तर हे वायू, आपले घोडे तूं इकडे वळव. आमच्याशी वात्सल्याने, प्रेमाने वागणारा असा तूं इकडे येऊन संतुष्ट हो. ॥ २ ॥

आ नो᳚ नि॒युद्भिः॑ श॒तिनी॑भिरध्व॒रं स॑ह॒स्रिणी॑भि॒रुप॑ याहि वी॒तये॒ वायो᳚ ह॒व्यानि॑ वी॒तये॑ ।

तवा॒यं भा॒ग ऋ॒त्वियः॒ सर॑श्मिः॒ सूर्ये॒ सचा॑ ।

अ॒ध्व॒र्युभि॒र्भर॑माणा अयंसत॒ वायः॑ शु॒क्रा अ॑यंसत ॥ ३ ॥

आ नः नियुत्ऽभिः शतिनीभिः अध्वरं सहस्रिणीभिः उप याहि वीतये वायो इति हव्यानि वीतये ।

तव अयं भागः ऋत्वियः सऽरश्मिः सूर्ये सचा ।

अध्वर्युऽभिः भरमाणाः अयंसत वायो इति शुक्राः अयंसत ॥ ३ ॥

आपले शेकडोंच काय पण हजारो घोडे जोडून हे वायू, आमच्या यज्ञयागप्रसंगी हविर्भागाचा स्वीकार करण्यासाठी, त्याचा आस्वाद घेण्यासाठी ये. हा तुझा भाग तुझ्याकरितां योग्य रीतीनें वेगळा काढून ठेवला आहे व आतां तो रविकिरणांच्या सान्निध्यामुळें फारच तेजःपुंज दिसत आहे. हे वायुदेवा, असा हा सोमरस अध्वर्यूंनी पात्रांत ओतून, भरून त्तुझ्यापुढे ठेवला आहे. हा शुभ्र रस तुला सादर अर्पण केला आहे. ॥ ३ ॥

आ वां॒ रथो॑ नि॒युत्वा॑न्वक्ष॒दव॑सेऽ॒भि प्रयां᳚सि॒ सुधि॑तानि वी॒तये॒ वायो॑ ह॒व्यानि॑ वी॒तये॑ ।

पिब॑तं॒ मध्वो॒ अन्ध॑सः पूर्व॒पेयं॒ हि वां᳚ हि॒तम् ।

वाय॒वा च॒न्द्रेण॒ राध॒सा ग॑त॒मिंद्र॑श्च॒ राध॒सा ग॑तम् ॥ ४ ॥

आ वां रथः नियुत्वान् वक्षत् अवसे अभि प्रयांसि सुऽधितानि वीतये वायो इति हव्यानि वीतये ।

पिबतं मध्वः अंधसः पूर्वऽपेयं हि वां हितम् ।

वायो इति आ चंद्रेण राधसा आ गतं इंद्रः च राधसा गतम् ॥ ४ ॥

नियुत् नावाचे घोडे जोडलेला हा तुमचा रथ तुम्हां दोघांनाही येथे आमच्या रक्षणाकरिता, आमच्या पक्वानाचा नैवेद्य वाढूने ठेवला आहे त्याचा आस्वाद घेण्याकरितां, आणि हे वायू, आमच्या हवींचा स्वीकार करण्याकरितां, घेऊन आलेला आहे. हा मधुर रस तुम्ही प्राशन करा. खरोखर प्रथम पिण्याकरितां रस काढून ठेवला आहे तो तुमच्यासाठींच. तर हे वायू, तूं आणि इंद्र असे दोघे आपला प्रसाद घेऊन या, आपला आल्हाददायक असा कृपा प्रसाद घेऊन या. ॥ ४ ॥

आ वां धियौ ववृत्युरध्वराँ उपेममिन्दुं मर्मृजन्त वाजिनमाशुमत्यं न वाजिनम् ।

तेषां पिबतमस्मयू आ नौ गन्तं इहोत्या ।

इंद्रवायू सुतानामद्रिभिर्युवं मदाय वाजदा युवम् ॥ ५ ॥

आ वां धियः ववृत्युः अध्वरान् उप इमं इंदुं मर्मृजंत वाजिनं आशुं अत्यं न वाजिनम् ।

तेषां पिबतं अस्मयू इत्यस्मऽयू आ नः गंतं इह ऊत्या ।

इंद्रवायू इति सुतानां अद्रिऽभिः युवं मदाय वाजऽदा युवम् ॥ ५ ॥

आमच्या ध्यानयुक्त प्रार्थना तुम्हां दोघांनाही आमच्या सध्यां चालू असलेल्या यज्ञयागाकडे वळवितीलच. कारण हा उत्साहवर्धक रस, जसे एखाद्या तेजस्वी आणि तल्लख वारूला स्वच्छ करावें त्याप्रमाणे आमच्या ऋत्विजांनी फार काळजीपूर्वक स्वच्छ केला आहे. तुम्ही आमच्यावर प्रेम करतां तर हे रस प्राशन करा आणि आमच्या साहाय्याकरितां या. हे इंद्रा, हे वायु, सोमग्राव्यांनी स्वच्छ केलेले हे रस तुम्ही दोघेही ग्रहण करा, म्हणजे हे दिव्य सामर्थ्य देणाऱ्या देवांनो तुम्ही प्रसन्न चित्त व्हाल. ॥ ५ ॥

इ॒मे वां॒ सोमा॑ अ॒प्स्वा सु॒ता इ॒हाध्व॒र्यु॒भि॒र्भर॑माणा अयंस॒त वायौ॑ शु॒क्रा अ॑यंसत ।

ए॒ते वा॑म॒भ्यसृक्षत ति॒रः प॒वित्र॑मा॒शवः॑ ।

यु॒वा॒यवोऽ॑ति॒ रोमा॑ण्य॒व्यया॒ सोमा॑सो॒ अत्य॒व्यया॑ ॥ ६ ॥

इमे वां सोमाः अप्ऽसु आ सुताः इह अध्वर्युऽभिः भरमाणाः अयंसत वायो इति शुक्राः अयंसत ।

एते वां अभि असृक्षत तिरः पवित्रं आशवः ।

युवाऽयवः अति रोमाणि अव्यया सोमासः अति अव्यया ॥ ६ ॥

हे पाणी घालून पिळलेले सोमरस, ऋत्विजांनी ह्या यज्ञ पात्रात गाळून तुला अर्पण केले आहेत. हे शुभ्र रस, हे वायुदेवा, तुला समर्पण केलेले आहेत. तुम्हा दोघांकरितां हे रस दर्भाच्या चाळणीतून छानले आहेत, हे आल्हाददायक व तुमच्याकरितां उत्सुका झालेले रस कधींही खराब न होणाऱ्या लोकरीच्या वस्त्रातून गाळलेले आहेत. ॥ ६ ॥

अति॑ वायो सस॒तो या॑हि॒ शश्व॑तो॒ यत्र॒ ग्रावा॒ वद॑ति॒ तत्र॑ गच्छतं गृ॒हमिं॑द्र॑श्च गच्छतम् ।

वि सू॒नृता॒ ददृ॑शे॒ रीय॑ते घृ॒तमा पू॒र्णया॑ नि॒युता॑ याथो अध्व॒रम् ।

इंद्र॑श्च याथो अध्व॒रम् ॥ ७ ॥

अति वायो इति ससतः याहि शश्वतः यत्र ग्रावा वदति तत्र गच्छतं गृहं इंद्रः च गच्छतम् ।

वि सूनृता ददृशे रीयते घृतं आ पूर्णया निऽयुता याथः अध्वरं ।

इंद्रः च याथः अध्वरम् ॥ ७ ॥

हे वायुदेवा, ह्या पहांटेच्या वेळेस पुष्कळ लोक निजून राहिले असतील तर त्यांना वगळून जेथे सोमरस पिळणाऱ्या पाषाणांचा मधुर आवाज होत असेल तर तेथें जा. हे वायू तूं आणि इंद्र दोघेही त्या घरी जा. मधुर व प्रेमळ असे स्तोत्र गायन जेथें चाललें असेल आणि घृताच्या धारा यज्ञाग्नीमध्यें जेथें एकसारख्या चालल्या असतील अशा पवित्र यागालाच आपले पवित्र घोडे जोडून तूं आणि इंद्र मिळून जा. ॥ ७ ॥

अत्राह॒ तत्व॑हेथे॒ मध्व॒ आहु॑तिं॒ यम॑श्व॒त्थमु॑प॒तिष्ठ॑न्त जा॒यवो॑ऽ॒स्मे ते स॑न्तु जा॒यवः᳚ ।

सा॒कं गाव॒ः सुव॑ते॒ पच्य॑ते॒ यवो॒ न ते॑ वाय॒ उप॑ दस्यन्ति धे॒नवो॑ ।

नाप॑ दस्यन्ति धे॒नवः᳚ ॥ ८ ॥

अत्र अह तत् वहेथे इति मध्व आऽहुतिं यं अश्वत्थं उपऽतिष्ठंत जायवः अस्मे ते संतु जायवः ।

साकं गावः सुवते पच्यते यवः न ते वायो इति उप दस्यंति धेनवः ।

न अप दस्यंति धेनवः ॥ ८ ॥

सोमरसाचा मधुर हविर्भाग इकडे घेऊन ये. ह्याच गोड सोमवल्लीला अश्वत्थाप्रमाणें पवित्र मानून वीर पुरुष त्याची अतिशय वाखाणणी करीत असतात - असे विजयी वीर नेहमी आमच्या बाजूला असोत. आमच्या धेनू एकदम प्रसवतात व शेतांत धान्य चांगले लागास होते. हे वायू, तुझा ह्या दुभत्या गाईंना कधीं रोग होत नाही व त्या कधींही क्षीण होत नाहींत. ॥ ८ ॥

इ॒मे ये ते॒ सु वा॑यो बा॒ह्वोजसोऽ॒न्तर्न॒दी ते॑ प॒तय॑न्त्यु॒क्षणो॒ महि॒ व्राध॑न्त उ॒क्षणः॑ ।

धन्व॑न् चि॒द्ये अ॑ना॒शवो॑ जी॒राश्चि॒दगि॑रौकसः ।

सूर्य॑स्येव र॒श्मयो॑ दुर्नि॒यन्त॑वो॒ हस्त॑योर्दुर्नि॒यन्त॑वः ॥ ९ ॥

इमे ये ते सु वायो इति बाह्वुऽओजसः अंतः नदी इति ते पतयंति उक्षणः महि व्राधंतः उक्षणः ।

धन्वन् चित् ये अनाशवः जीराः चित् अगिरऽओकसः ।

सूर्यस्यऽइव रश्मयः दुःऽनियंतवः हस्तयोः दुःऽनियंतवः ॥ ९ ॥

वायुदेवा, हे पहा तुम्हे मजवूत बांध्याचे तेजस्वी घोडे आकाशाच्या नादयुक्त पोकळींतून भरधाव चालले आहेत, व पळत असतांही धिप्पाड आणि फुगलेले दिसत आहेत. पाणी नाही अशा प्रदेशांत देखील ते थकत नाहींत. भरवेगात चालले असतांना केवढाही आवाज झाला तरी ते बिचकत नाहींत, आणि सूर्याच्या किरणांना ज्याप्रमाणें दाबून ठेवणें अशक्य त्याप्रमाणें त्या घोड्यांनाही कोणी खेंचून धरूं शकत नाही. ॥ ९ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १३६ (मित्रावरुणौ सूक्त)

ऋषि : परुच्छेपः - देवता : मित्रावरुणौ - छंद - अत्यष्टी

प्र सु ज्येष्ठ॑ं निचि॒राभ्या॑ं बृ॒हन्नमो॑ ह॒व्यं म॒तिं भ॑रता मृळ॒यद्भ्या॒ं स्वादि॑ष्ठं मृळ॒यद्भ्या॑ म् ।

ता स॒म्राजा॑ घृ॒तासु॑ती य॒ज्ञेय॑ज्ञ॒ उप॑स्तुता ।

अथै॑नोः क्ष॒त्रं न कुत॑श्च॒नाधृषे॑ देव॒त्वं नू चि॑दा॒धृषे॑ ॥ १ ॥

प्र सु ज्येष्ठं निऽचिराभ्यां बृहन् नमः हव्यं मतिं भरत मृळयत्ऽभ्यां स्वादिष्ठं मृळयत्ऽभ्याम् ।

ता संऽराजा घृतासुती इति घृतऽआसुती यज्ञेऽयज्ञ उपऽस्तुता ।

अथ एनोः क्षत्रं न कुतः चन आऽधृषे देवऽत्वं नु चित् आऽधृषे ॥ १ ॥

सनातन, आनंदरूप आणि आनंददायक अशा मित्रावरुणांना अत्यंत नम्रपणानें प्रणिपात करा, अति एकाग्र चित्तानें त्यांचे ध्यान करा आणि अत्यंत मधुर हवि त्यांना अर्पण करा. ते विश्वाचे अधिराजे आहेत, घृताप्रमाणे तेजस्वी असा पर्जन्य तेच पाडतात आणि त्यांचे यजन प्रत्येक यज्ञामध्यें होत असतें. त्यांच्या विश्वावरील सार्वभौम सत्तेविरुद्ध कोणी बोटही उचलू शकत नाही, अगर त्यांच्या ईश्वरत्वाबद्दल ब्र सुद्धा काढूं शकत नाहीं ॥ १ ॥

अद॑र्शि गा॒तुरु॒रवे॒ वरी॑यसी॒ पन्था॑ ऋ॒तस्य॒ सम॑यंस्त र॒श्मिभि॒श्चक्षु॒र्भग॑स्य र॒श्मिभिः॑ ।

द्यु॒क्षं मि॒त्रस्य॒ साद॑नमर्य॒म्णो वरु॑णस्य च ।

हा॑ दधाते बृ॒हदु॒क्थ्यं१॑वय॑ उप॒स्तुत्यं॑ बृ॒हद्वयः॑ ॥ २ ॥

अदर्शि गातुः उरवे वरीयसी पंथाः ऋतस्य सं अयंस्त रश्मिऽभिः चक्षुः भगस्य रश्मिऽभिः ।

द्युक्षं मित्रस्य सदनं अर्यम्णः वरुणस्य च ।

अथ दधते बृहत् उक्थ्यं वयः उपऽस्तुत्यं बृहत् वयः ॥ २ ॥

पहा ही लावण्यवती उषा आमच्या महा यज्ञाकरितां उदय पावली आहे. त्रिकाल सत्य अशा आकाशांतील तिचा मार्ग किरणांनी प्रकाशित झाला आहे, आणि दयाळु भगवंताचा नेत्रसुद्धां आपल्या नेहमींच्या उज्ज्वल किरणांच्या वेषानें दिसूं लागला आहे. अशाच रीतीनें मित्र, अर्यमा आणि वरुण ह्यांचे स्थानही सुप्रकाशित झाले असून तेथूनच उत्कट व प्रशंसनीय उत्साह आणि अत्यंत नामांकित असें तारुण्य, ते प्रसन्न होऊन देत असतात. ॥ २ ॥

ज्योति॑ष्मती॒मदि॑तिं धार॒यत्क्षि॑तिं॒ स्व॑र्वती॒मा स॑चेते दि॒वेदि॑वे जागृ॒वांसा॑ दि॒वेदि॑वे ।

ज्योति॑ष्मत्क्ष॒त्रमा॑शाते आदि॒त्या दान॑ु॒नस्पती॑ ।

मि॒त्रस्तयो॒र्वरु॑णो यात॒यज्ज॑नोऽर्य॒मा या॑त॒यज्ज॑नः ॥ ३ ॥

ज्योतिष्मतीं अदितिं धारयत्ऽक्षितिं स्वःऽवतीं आ सचेते दिवेऽदिवे जागृऽवांसा दिवेऽदिवे ।

ज्योतिष्मत् क्षत्रं आशाते इति आदित्या दानु॒नः पती इति ।

मित्रः तयोः वरुणः यातयत्ऽजनः अर्यमा यातयत्ऽजनः ॥ ३ ॥

जी ही अपरंपार तेजोमय पोकळी आदिति रूपानें पृथ्वीला आणि नक्षत्रांना सांवरून धरीत आहे त्या ह्या आदितीच्या बरोबरच मित्रावरुण ह्या निद्रारहित विभूति, निरंतर असतात व विश्वाच्या वैभवयुक्त साम्राज्याचा हेच दानशूर आदित्य उपभोग घेत असतात. त्यांच्यामध्ये मित्र व वरुण हे लोकांना आपापल्या कर्त्यव्याची प्रेरणा करतात, व अर्यमाही अशी प्रेरणा करतो. ॥ ३ ॥

अ॒यं मि॒त्राय॒ वरु॑णाय॒ शंत॑मः॒ सोमो॑ भूत्वव॒पाने॒ष्वाभ॑गो दे॒वो दे॒वेष्वाभ॑गः ।

तं दे॒वासो॑ जुषेरत॒ विश्वे॑ अ॒द्य स॒जोष॑सः ।

तथा॑ राजाना करथो॒ यदीम॑ह॒ ऋता॑वाना॒ यदीम॑हे ॥ ४ ॥

अयं मित्राय वरुणाय शंऽतमः सोमः भूतु अवऽपानेषु आऽभगः देवः देवेषु आऽभगः ।

तं देवासः जुषेरत विश्वे अद्य सऽजोषसः ।

तथा राजाना करथः यत् ईमहे ऋतऽवाना यत् ईमहे ॥ ४ ॥

हा सोमरस मित्रावरुणांना अत्यंत सुखदायक होवो. हा दिव्य कांतियुक्त मधुर सोमरस, देवास अत्यंत प्रिय असा हा रस, यज्ञपात्रांतून प्राशन करतांना त्यांना फारच रचकर लागो. प्रेमानें एकत्र झालेले सर्व देव ह्या रसाचा यथेच्छ उपभोग घेवोत. हे विश्वाधिपति मित्रावरुणहो, आम्ही तुम्हांपाशी याचना करीत आहों ती पूर्ण करा. हे सत्यधर्मप्रवर्तकहो, आम्ही दान मागतो तें कृपा करून द्या. ॥ ४ ॥

यो मि॒त्राय॒ वरु॑णाया॒यावि॑ध॒ज्जनो॑ऽन॒र्वाणं॒ तं परि॑ पातो॒ अंह॑सो दा॒श्वांसं॒ मर्त॒मंह॑सः ।

तम॑र्य॒माभि र॑क्षत्यृजू॒यन्त॒मनु॑ व्र॒तम् ।

उ॒क्थैर्य ए॑नोः परि॒भूष॑ति व्र॒तं स्तोमै॑रा॒भूष॑ति व्र॒तम् ॥ ५ ॥

यः मित्राय वरुणाय अविधत् जनः अनर्वाणं तं परि पातः अंहसः दाश्वांसं मर्तं अंहसः ।

तं अर्यमा अभि रक्षति ऋजुऽयंतं अनु व्रतम् ।

उक्थैः यः एनोः परिऽभूषति व्रतं स्तोमैः आऽभूषति व्रतम् ॥ ५ ॥

जो भक्त मित्रावरुणांची सेवा करतो त्या अजातशत्रु आणि उदार भक्तांचे पातकांपासून आणि क्लेशांपासून सर्व प्रकारें रक्षण करा. जो प्रामाणिकपणें सद्धर्मानें चालतो, जो यज्ञांना स्तोत्रगायनानें अलंकृत करतो आणि उपासनेला स्तवनांनी विभूषित करतो त्या भक्ताचें अर्यमा सर्व प्रकारें संरक्षण करतो. ॥ ५ ॥

नमो॑ दि॒वे बृ॑ह॒ते रोद॑सीभ्यां मि॒त्राय॑ वोच॒ं वरु॑णाय मी॒ळ्हुषे॑ सुमृळी॒काय॑ मी॒ळ्हुषे॑ ।

इं॑द्र॑म॒ग्निमुप॑ स्तुहि द्यु॒क्षम॑र्य॒मण॒ं भग॑म् ।

ज्योग्जीव॑न्तः प्र॒जया॑ सचेमहि॒ सोम॑स्यो॒ती स॑चेमहि ॥ ६ ॥

नमः दिवे बृहते रोदसीभ्यां मित्राय वोचं वरुणाय मीळ्हुषे सुऽमृळीकाय मीळ्हुषे ।

इंद्रं अग्निं उप स्तुहि द्युक्षं अर्यमणं भगम् ।

ज्योक् जीवंतः प्रऽजया सचेमहि सोमस्य ऊती सचेमहि ॥ ६ ॥

पृथ्वी आणि आकाश ह्यांच्या मध्यभागीं प्रकाशणाऱ्या मित्राचें मी स्तवन करतो. दानशूर, दयाळू आणि औदार्यशील वरुणाचेही मी गुणानुवाद गातो. हे ऋत्विजांनो, इंद्र, अग्नि, भग आणि स्वर्गलोकवासी अर्यमा ह्यांचे यश गा. आम्हांस सत्पुत्रयुक्त दीर्घायुष्य प्राप्त होवो व ते सोमरस अर्पण केल्याच्या योगानें प्राप्त होवो. ॥ ६ ॥

ऊ॒ती दे॒वानां॑ व॒यमिंद्र॑वन्तो मंसी॒महि॒ स्वय॑शसो म॒रुद्भिः॑ ।

अ॒ग्निर्मि॒त्रो वरु॑णः॒ शर्म॑ यंस॒न् तद॑श्याम म॒घवा॑नो व॒यं च॑ ॥ ७ ॥

ऊती देवानां वयं इंद्रऽवंतः मंसीमहि स्वऽयशसः मरुत्ऽभिः ।

अग्निः मित्रः वरुणः शर्म यंसन् तत् अश्याम मघऽवानः वयं च ॥ ७ ॥

मरुतांच्या व देवांच्या दयेनें आम्हांवर त्या इंद्राची कृपा होवो. आणि आम्ही स्वकष्टानें सत्कीर्ति संपादन केली अशा दृष्टीनें आम्हांस लोक ओळखोत. अग्नि, मित्र आणि वरुण हे आम्हां सर्वांस सुख शांती देवोत, व तिचा उपभोग आमचे यजमान आणि आम्ही अशा सर्वांस चिरकाल घडो. ॥ ७ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १३७ (मित्रावरुणौ सूक्त)

ऋषि : परुच्छेपः - देवता : मित्रावरुणौ - छंद - निचृच्छकरी

सु॒षु॒मा या॑त॒मद्रि॑भि॒र्गोश्री॑ता मत्स॒रा इ॒मे सोमा॑सो मत्स॒रा इ॒मे ।

आ रा॑जाना दिविस्पृशास्म॒त्रा ग॑न्त॒मुप॑ नः ।

इ॒मे वां᳚ मित्रावरुणा॒ गवा॑शिरः॒ सोमाः᳚ शु॒क्रा गवा॑शिरः ॥ १ ॥

सुसुम आ यातं अद्रिऽभिः गोऽश्रीताः मत्सराः इमे सोमासः मत्सराः इमे ।

आ राजाना दिविऽस्पृशा अस्मऽत्रा गंतं उप नः ।

इमे वां मित्रावरुणा गोऽआशिरः सोमाः शुक्रा गोऽआशिरः ॥ १ ॥

मित्रावरुणांनो या, आम्हीं हे सोमरस ग्राव्यांच्या योगानें पिळून काढलेले आहेत. त्यांच्यामध्यें दूध घातलें असून ते उत्साहकर व हर्षप्रद आहेत. हे जगन्नायकहो तुम्ही आकाश सुद्धां व्यापून टाकणारे आहां, तुम्हींच आमचे रक्षणकर्ते आहा, तर आम्हांकडे या. मित्रावरुणहो हे शुभ्र सोमरस तुमच्याच करितां केले असून त्यांत मिष्ट, दाट असें दूध आणि थोडेसें पाणी घातलेले आहे. ॥ १ ॥

इ॒म आ या॑त॒मिन्द॑वः॒ सोमा॑सो॒ दध्या॑शिरः सु॒तासो॒ दध्या॑शिरः ।

उ॒त वा॑मु॒षसः॑ बु॒धि सा॒कं सूर्य॑स्य र॒श्मिभिः॑ ।

सु॒तो मि॒त्राय॒ वरु॑णाय पी॒तये॒ चारु॑र्ऋ॒ताय॑ पी॒तये॑ ॥ २ ॥

इम आ यातं इंदवः सोमासः दधिऽआशिरः सुतासः दधिऽआशिरः ।

उत वां उषसः बुधि साकं सूर्यस्य रश्मिऽभिः ।

सुतः मित्राय वरुणाय पीतये चारुः ऋताय पीतये ॥ २ ॥

इकडे या, आमच्या येथें ह्या सोमरसांत दह्यासारखें घट्ट दूध घातलें आहे. हा रस पिळून त्यांत मिष्ट दहींही घातले आहे. प्रभात होऊन सूर्याचे कोमल किरण दिसूं लागतांच तुम्हा दोघांकरितां म्हणजे मित्र व वरुण यांच्याकरितां हा रस पिळून तयार केला आहे, त्यांनी हा सुंदर रस प्राशन करावा म्हणून - त्या सत्य स्वरूप मित्रावरुणांनी ग्रहण करावा म्हणून सिद्ध केला आहे. ॥ २ ॥

तां वां᳚ धे॒नुं न वा॑स॒रीमं॒शुं दु॑ह॒न्त्यद्रि॑भिः॒ सोमं᳚ दु॑ह॒न्त्यद्रि॑भिः ।

अ॒स्म॒त्रा ग॑न्त॒मुप॑ नोऽ॒र्वाञ्चा॒ सोम॑पीतये ।

अ॒यं वां᳚ मित्रावरुणा॒ नृभि॑ः सु॒तः सोम॒ आ पी॒तये॑ सु॒तः ॥ ३ ॥

तां वां धेनुं न वासरीं अंशुं दुहंति अद्रिऽभिः सोमं दुहंति अद्रिऽभिः ।

अस्मऽत्रा गंतं उप नः अर्वांचा सोमऽपीतये ।

अयं वां मित्रावरुणा नृभिः सुतः सोमः आ पीतये सुतः ॥ ३ ॥

हे देवांनो, दुधाचे प्रवाहाचे प्रवाह सोडणाऱ्या त्या तुमच्या प्रकाशरूपी धेनूंचे दूध काढावें त्याप्रमाणे आमचे ऋत्विज ह्या सोमवल्लीचे जणों दूधच काढीत आहेत. ग्राव्याच्या योगानें त्या पाषाणाच्या योगाने, जणुं त्या वनस्पतीचें जणों दोहनच करीत आहेत; तर हे भक्तरक्षकांनो आमच्या इकडे सोमपानार्थ या. हे मित्रावरुणांनो, ऋत्विजांनी हा येथें तुमच्याकरितां सोमरस सिद्ध करून ठेवला आहे, तो तुम्ही ग्रहण करावा म्हणून येथें त्यांनी पात्रांत ओतून तुम्हांपुढें ठेविला आहे. ॥ ३ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १३८ (पूषन् सूक्त)

ऋषि : परुच्छेपः - देवता : पूषा - छंद - अत्यष्टिः

प्रप्र॑ पू॒ष्णस्तु॑विजा॒तस्य॑ शस्यते महि॒त्वम॑स्य त॒वसो॒ न त॑न्दते स्तो॒त्रम॑स्य॒ न त॑न्दते ।

अर्चा॑मि सु॒म्न॒यन्न॒हमन्त्यू॑तिं मयो॒भुव॑म् ।

विश्व॑स्य॒ यो मन॑ आयुयु॒वे म॒खो दे॒व आ॑युयु॒वे म॒खः ॥ १ ॥

प्रऽप्र पूष्णः तुविऽजातस्य शस्यते महिऽत्वं

अस्य तवसः न तंदते स्तोत्रं अस्य न तंदते ।

अर्चामि सुम्नऽयन् अहं अंतिऽऊतिं मयःऽभुवम् ।

विश्वस्य यः मनः आऽयुयुवे मखः देवः आऽयुयुवे मखः ॥ १ ॥

समर्थ अशा पूषाचा महिमा मी आता यथामति वर्णन करीत आहे. हा जातीचाच प्रतापी ! ह्याच्या पराक्रमाची कीर्ति कधींही कमी होत नाही, किंवा ह्याची स्तुति आता संपली असेंही होत नाही. शांतिसुखाची मनीषा धरून मी ज्या ह्या पूषाची उपासना करीत आहे, तो भक्तांचे रक्षण करण्यास एका पायावर तयार, व सर्वोत्कृष्ट आनंदाचा

लाभ करून देणारा असा आहे. हा परम प्रभु सर्व विश्वाचें चित्त आपल्याकडे आकर्षण करून घेतो, आणि ह्याच्या प्रित्यर्थ केलेला यज्ञही सर्वांची मनें वेधून टाकतो. ॥ १ ॥

प्र हि त्वा॑ पूषन्नजि॒रं न याम॑नि॒ स्तोमे॑भिः कृ॒ण्व ऋ॒णवो॒ यथा॒ मृध॒ उष्ट्रो॒ न पी॑परो॒ मृधः॑ ।

हु॒वे यत्त्वा॑ मयो॒भुवं॑ दे॒वं स॒ख्याय॒ मर्त्यः॑ ।

अ॒स्माक॑माङ्गू॒षां द्यु॒म्निन॑स्कृधि॒ वाजे॑षु द्यु॒म्निन॑स्कृधि ॥ २ ॥

प्र हि त्वा पूषन् अजिरं न यामनि स्तोमेभिः

कृण्वे ऋणवः यथा मृधः उष्ट्रः न पीपरः मृधः ।

हुवे यत् त्वा मयःऽभुवं देवं सख्याय मर्त्यः ।

अस्माकं आंगूषान् द्युम्निनः कृधि वाजेषु द्युम्निनः कृधि ॥ २ ॥

हे पूषा, चापल्यांत वायुप्रमाणें अत्यंत चंचल अशा तुझे भजन आम्ही स्तोत्रांनी करीत असतो. तर युद्धप्रसंगी आमचे रक्षण करतोस त्याप्रमाणे शत्रूच्या ह्या बेचिराख प्रदेशांतूनही आम्हास उंटाच्या पाठीवर बसवून नेल्याप्रमाणें पार पाड. तूं परमानंददायक परमेश्वर व मी गरीब मर्त्य तुझा सहवास घडावा म्हणून तुला विनवीत आहे. भजनांत आमच्या स्तुतींना सफल कर, आणि समरांगणात आमचे बाण यशस्वी कर. ॥ २ ॥

यस्य॑ ते पूषन्त्स॒ख्ये वि॑प॒न्यव॒: क्रत्वा॑ चि॒त्सन्तोऽ॑वसा बुभुज्रि॒र इति॒ क्रत्वा॑ बुभु॒ज्रिरे ।

तामनु॑ त्वा॒ नवी॑यसीं नि॒युतं॑ रा॒य ईमहे ।

अहे॑ळमान उरुशंस॒ सरी॑ भव॒ वाजे॑वाजे॒ सरी॑ भव ॥ ३ ॥

यस्य ते पूषन् सख्ये विपन्यवः क्रत्वा चित्

संतः अवसा बुभुज्रिरे इति क्रत्वा बुभुज्रिरे ।

तां अनु त्वा नवीयसीं निऽयुतं रायः ईमहे ।

अहेळमानः उरुऽशंस सरी भव वाजेऽवाजे सरी भव ॥ ३ ॥

हे पूषा, तुझ्या सहवासानें विद्वान साधुजन आपल्या सत्कृत्यामुळे आणि तुझ्या कृपेमुळें जगाच्या उपयोगी पडले, आणि खरोखर ह्या सत्कर्मामुळेंच ते आनंदपदाचा उपभोग घेत आहेत. तर तुझ्या पूज्य नांवाला साजतील असे कोट्यावधि दिव्यप्रसाद आम्ही तुजपशी पदर पसरून मागतो, तर आम्हांस न झिडकारतां, हे जनस्तुत पूषा, तूंच आमचा पाठिराखा हो, प्रत्येक युद्धांत तूंच आमचा धुरीण हो. ॥ ३ ॥

अ॒स्या ऊ॒ षु ण॒ उप॑ सा॒तये॑ भु॒वोऽहे॑ळमानो ररि॒वाँ अ॑जाश्व श्रवस्य॒ताम॑जाश्व ।

ओ षु त्वा॑ ववृतीमहि॒ स्तोमे॑भिर्दस्म सा॒धुभिः॑ ।

न॒हि त्वा॑ पूषन्नति॒मन्य॑ आघृ॒णे न ते॑ स॒ख्यम॑पह्नु॒वे ॥ ४ ॥

अस्या ऊं इति सु णः उप सातये भुवः

अहेळमानः ररिऽवान् अजऽअश्व श्रवस्यतां अजऽअश्व ।

ओ इति सु त्वा ववृतीमहि स्तोमेभिः दस्म साधुऽभिः ।

नहि त्वा पूषन् अतिऽमन्य आघृणे न ते सख्यं अपऽह्नुवे ॥ ४ ॥

हे पूषा तुझे अश्वसुद्धां जन्मरहित आहेत, तर अशी दिव्य संपत्ति मिळवून देण्याकरितां सदा सर्वदा आमच्या अगदी जवळ रहा. हे अद्‌भुत पराक्रम करणाऱ्या पूषा, आमच्या मनोहर स्तोत्राच्या योगानें आम्हांस तुझें अंतःकरण आमच्याकडे वळविता येवो. हे प्रखर दीप्तिमान पूषा, तुझा विसर मला क्षणभरही न पडो, आणि तुझा सहवासाची उपेक्षा मजकडून यत्किंचितही कधींही न होवो. ॥ ४ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १३९ (विश्वेदेव सूक्त)

ऋषि : परुच्छेपः - देवता : विश्वेदेवः - छंद - अत्यष्टिः

अस्तु श्रौषट् पुरो अग्नीं धिया दध आ नु तच्छर्धो दिव्यं वृणीमह इंद्रवायू वृणीमहे ।

यद्ध॑ क्रा॒णा वि॒वस्व॑ति॒ नाभा॑ सं॒दायि॒ नव्य॑सी ।

अध॒ प्र सू न॒ उप॑ यन्तु धी॒तयो॑ दे॒वाँ अच्छा॒ न धी॒तयः॑ ॥ १ ॥

अस्तु श्रौषट् पुरः अग्निं धिया दधे आ नु तत् शर्धः दिव्यं वृणीमहे इंद्रवायू इति वृणीमहे ।

यत् ह क्राणा विवस्वति नाभा संऽदायि नव्यसी ।

अध प्र सु नः उप यंतु धीतयः देवान् अच्छ न धीतयः ॥ १ ॥

ऐका ऐका, मी आपल्यासमोर अग्नीची स्थापना भक्तिपुरःसर करून त्याच्याजवळ आम्हांस ते दिव्य सामर्थ्य प्राप्त व्हावें म्हणून प्रार्थना करतो. हे इंद्रवायूहो, त्या सामर्थ्याकरितां आम्हीं पदर पसरतो. अपूर्व आणि हटकून कार्यभाग साधून देणारी जी जी प्रार्थना असते ती ती ह्या प्रकाशाच्या निधीच्या ठिकाणी संलग्न होऊन जाते म्हणून आमचेही लक्ष पूर्णपणे त्याच्याचकडे लागो आणि देवाच्या दृष्टीखाली असल्याप्रमाणें आमच्या काव्य प्रतिभेचा भर निषेध पसरो. ॥ १ ॥

यद्ध॒ त्यन्मि॑त्रावरुणावृ॒तादध्या॑द॒दाथे॒ अनृ॑तं॒ स्वेन॑ म॒न्युना॒ दक्ष॑स्य॒ स्वेन॑ म॒न्युना॑ ।

युवोरित्थाधि सद्मस्वपश्याम हिरण्ययम् ।

धीभिश्चन मनसा स्वेभिरक्षभिः सोमस्य स्वेभिरक्षभिः ॥ २ ॥

यत् ध त्यत् मित्रावरुणौ ऋतात् अधि आददाथे इत्याऽददाथे अनृतं स्वेन मन्युना दक्षस्य स्वेन मन्युना ।

युवोः इत्था अधि सद्मऽसु अपश्याम हिरण्ययम् ।

धीभिः चन मनसा स्वेभिः अक्षऽभिः सोमस्य स्वेभिः अक्षऽभिः ॥ २ ॥

हे मित्रावरुणांनो, जेव्हां तुम्ही आपल्या स्वेच्छेनें व आपल्या चातुर्याच्या धोरणास अनुसरून सत्यस्वरूप आत्म्यापासून हे असत्य शरीर वेगळे करून ठेवलेंत, तेव्हांच तुमचे हिरण्यमय स्वरूप तुमच्या निवासस्थानांत आमच्या दृष्टीस आले. ते प्रथम आमच्या सूक्ष्म बुद्धींस मात्र गोचर झाले, नंतर मनाला, नंतर इंद्रियांना आणि शेवटी सोमाकडे लागलेल्या आमच्या प्रत्यक्ष डोळ्यांनाही गोचर झाले. ॥ २ ॥

युवां स्तोमेभिर्देवयन्तो अश्विनाश्रावयन्त इव श्लोकमायवो युवां हव्याभ्या३यवः ।

युवोर्विश्वा अधि श्रियः पृक्षश्च विश्ववेदसा ।

प्रुषायन्ते वां पवयो हिरण्यये रथे दस्रा हिरण्यये ॥ ३ ॥

युवां स्तोमेभिः देवऽयंतः अश्विना आश्रावयंतःऽइव श्लोकं आयवः युवां हव्या अभि आयवः ।

युवोः विश्वाः अधि श्रियः पृक्षः च विश्वऽवेदसा ।

प्रुषायंते वां पवयः हिरण्यये रथे दस्रा हिरण्यये ॥ ३ ॥

हे अश्वी देवांनो, इकडे बंदिजनाप्रमाणें तुमची कीर्ति पसरविणारे कित्येक ऋत्विज तुमचे स्तवन करून तुम्हांस आळवीत असतात, तर इकडे दुसरे काही ऋत्विज तुम्हांस हविर्भाग देऊन भजत असतात. हे ज्ञानसागरांनो, सर्व प्रकारची संपत्ति, सर्व प्रकारचें सामर्थ्य ही तुमच्याकडे वसत आहेत. हे अद्‌भुत पराक्रमी अश्विंनो, तुमच्या अविनाशी सुवर्ण रथाच्या धावा इच्छित मनोरथांचा जणों पाऊसच पाडीत असतात. ॥ ३ ॥

अचेति दस्रा व्यु१ नाकमृण्वथो युञ्जते वां रथयुजो दिविष्टिष्वध्वस्मानो दिविष्टिषु ।

अधि॑ वां स्थाम॑ वन्धुरे रथे॑ दस्रा हिरण्यये॑ ।

पथेव यन्ता॑वनुशास॑ता रजोऽ॑ञ्जसा शास॑ता रज॑ः ॥ ४ ॥

अचेति दस्रा वि ऊं इति नाकं ऋण्वथः युंजते वां रथऽयुजः दिविष्टिषु अध्वस्मानः दिविष्टिषु ।

अधि वां स्थाम वंधुरे रथे दस्रा हिरण्यये ।

पथाऽइव यंतौ अनुऽशासता रजः अंजसा शासता रजः ॥ ४ ॥

हे पराक्रमी अश्विंनो, आकाशाची कवाडें तुम्ही उघडितां हे सर्वांसच माहीत आहे. आपल्या रथाचे घोडे भक्तजनांच्या सकाळच्या इष्टीकडे जाण्याकरितां तुम्ही जोडीत असतां, ते तुमचे कधींही नाश न पावणारे घोडे देवलोकीं राहण्याची इच्छा करणाऱ्या भक्तांकडे जाण्याकरितां तुम्ही जोडीत असता. हे अश्वीदेवांनो, तुमची कर्मे अद्‌भुत आहेत. तुमच्या अविनाशी रथांत सारथ्याच्या शेजारी आम्हास बसूं द्या; कारण पृथ्वीवरील एखाद्या पक्क्या सडकेवरून चालल्याप्रमाणें तुम्ही नीट अंतराळीं घोडे दौडत असतां, व दिव्य लोकांच्या मार्गानें रथ भरधांव सोडीत असता. ॥ ४ ॥

शची॑भिर्नः शचीवसू॒ दिवा॒ नक्तं॑ दशस्यतम् ।

मा वां॑ रा॒तिरुप॑ दस॒त्कदा॑ च॒नास्मद्रा॒तिः कदा॑ च॒न ॥ ५ ॥

शचीभिः नः शचीवसू इति दिवा नक्तं दशस्यतम् ।

मा वां रातिः उप दसत् कदा चन अस्मत् रातिः कदा चन ॥ ५ ॥

हे अश्वीदेवहो, विलक्षण सामर्थ्यें ही तुमची संपत्ति, तर अशा त्या सामर्थ्यांच्या योगानें रात्रंदिवस तुम्ही आम्हांस सहाय्य करा. तुमच्या औदार्याला कधींही खळ न पडो. आम्हावरील तुमची कृपाही कधीं न संपो. ॥ ५ ॥

वृष॑न्निंद्र वृष॒पाणा॑स॒ इन्द॑व इ॒मे सु॒ता अद्रि॑षुतासः उ॒द्भिद॒स्तुभ्यं॑ सु॒तास॑ उ॒द्भिदः॑ ।

ते त्वा॑ मन्दन्तु दा॒वने॑ म॒हे चि॒त्राय॒ राध॑से ।

गी॒र्भिर्गि॑र्वाह॒ स्तव॑मान॒ आ ग॑हि सुमृळी॒कः न॒ आ ग॑हि ॥ ६ ॥

वृषन् इंद्र वृषऽपानासः इंदवः इमे सुताः अद्रिऽसुतासः उत्ऽभिदः तुभ्यं सुतासः उत्ऽभिदः ।

ते त्वा मंदंतु दावने महे चित्राय राधसे ।

गीःऽभिः गिर्वाहः स्तवमानः आ गहि सुऽमृळीकः नः आ गहि ॥ ६ ॥

हे औदार्यसागरा इंद्रा, हे सोमरस तुझ्यासारख्या शूरालाच पिण्यायोग्य आहेत. हे ग्राव्यांनी पिळून गाळलेले तीव्र सोमरस, हे शरीरांत भिनणारे रस तुझ्याकरितां तयार केले आहेत. तूं प्रसन्न होऊन आम्हांस फार मोठी व अद्‌भुत अशी देणगी द्यावीस म्हणून हे रस तुला हर्ष उत्पन्न करोत. हे स्तुतीनें प्रसन्न होणाऱ्या इंद्रा सुंदर स्तोत्रांनी तुझे गुणानुवाद आम्हीं गात आहोंत, आमच्याकडे ये. तूं आम्हांस अति सुखकर आहेस, तर आम्हांकडे ये. ॥ ६ ॥

ओ षू णो॑ अग्ने शृणुहि॒ त्वमी॑ळि॒तो दे॒वेभ्यो॑ ब्रवसि य॒ज्ञिये॑भ्यो॒ राज॑भ्यो य॒ज्ञिये॑भ्यः ।

यद्ध॒ त्यामङ्गि॑रोभ्यो धे॒नुं दे॑वा॒ अद॑त्तन ।

वि तां दु॑ह्रे अर्य॒मा क॒र्तरी॒ सचाँ॑ ए॒ष तां वे॑द मे॒ सचा॑ ॥ ७ ॥

ओ इति सु नः अग्ने श्रृणुहि त्वं ईळितः देवेभ्यः ब्रवसि यज्ञियेभ्यः राजऽभ्यः यज्ञियेभ्यः ।

यत् ह त्यां अंगिरोभ्यः धेनुं देवाः अदत्तन ।

वि तां दुह्रे अर्यमा कर्तरी सचान् एषः तां वेद मे सचा ॥ ७ ॥

हे अग्निदेवा, आमचे ऐक. तुझे गुणसंकीर्तन आम्ही करीत असतों, ती ही गोष्ट त्या माननीय देवांपाशी - त्या यज्ञार्ह आणि देदीप्यमान देवांपाशी तूं सांगशीलच. देवांनो, जेव्हां तुम्ही अंगिरसांना काम धेनू दिलीत, तेव्हां यज्ञ करणाऱ्या यजमानाकरितां अर्यमानें तिचे दोहन केले आणि ती गाय कोणती हें एक त्याला किंवा मलाच माहीत आहे. ॥ ७ ॥

मो षु वो॑ अ॒स्मद॒भि तानि॒ पौंस्या॒ सना॑ भूवन्द्यु॒म्नानि॒ मोत जा॑रिषुर॒स्मत् पु॒रोत जा॑रिषुः ।

यद्वः॑ श्चि॒त्रं यु॒गेयु॑गे नव्यं॒ घोषा॒दम॑र्त्यम् ।

अ॒स्मासु॒ तन्म॑रुतो॒ यच्च॑ दु॒ष्टरं॑ दिधृ॒ता यच्च॑ दु॒ष्टर॑म् ॥ ८ ॥

मो इति सु वः अस्मत् अभि तानि पौंस्या सना भूवन् द्युम्नानि मा उत जारिषुः अस्मत् पुरा उत जारिषुः ।

यत् वः चित्रं युगेऽयुगे नव्यं घोषात् अमर्त्यम् ।

अस्मासु तत् मरुतः यत् च दुस्तरं दिधृत यच् च दुस्तरम् ॥ ८ ॥

हे मरुतांनो, आम्हांकरितां तुम्ही जे पराक्रम केलेत, त्या आतां जुन्या पुराण्या गोष्टी झाल्या असे कधींही न घडो. आमचे उज्ज्वल यश कधीं मलीन न होवो, अर्थात् आमच्या डोळ्यांदेखत तर कधींही न होवो. अद्भुत व पिढ्यान पिढ्या लोटल्या तरी नवीनच आणि लोकोत्तर अशी जी तुमची देणगी सर्वप्रसिद्ध असेल ती, हे मरुतांनो, आम्हांस द्या. जे जे दुःसाध्य असेल, जे जे दुर्लभ असेल, तें सुद्धां दिल्यावांचून राहूं नका. ॥ ८ ॥

द॒ध्यङ् ह॑ मे ज॒नु॒षं॒ पूर्वो॒ अङ्गि॑राः प्रि॒यमे॑धः॒ कण्वो॒ अत्रि॒र्मनु॑र्विदु॒स्ते मे॒ पूर्वे॒ मनु॑र्विदुः ।

तेषां॑ दे॒वेष्वाय॑तिर॒स्माकं॒ तेषु॒ नाभ॑यः ।

तेषां॑ प॒देन॒ मह्या न॑मे गि॒रेन्द्रा॒ग्नी आ न॑मे गि॒रा ॥ ९ ॥

दध्यङ् ह मे जनुषं पूर्वः अंगिराः प्रियऽमेधः कण्वः अत्रिः मनुः विदुः ते मे पूर्वे मनुः विदुः ।

तेषां देवेषु आऽयतिः अस्माकं तेषु नाभयः ।

तेषां पदेन महि आ नमे गिरा इंद्राग्नी इति आ नमे गिरा ॥ ९ ॥

पुरातन ऋषि दध्यङ्, तसेंच अंगिरा, प्रियमेध, कण्व, अत्रि आणि मनु ह्यांस माझे कुल माहीत आहे. जे जे माझ्यापूर्वी होऊन गेले ते ते ऋषि आणि मनु राजा ह्या सर्वांस माझी माहिती आहे; कारण त्यांचा संबंध देवांपर्यंत पोहोंचतो, आणि आमचे मुख्य पूर्वजही त्यांच्यापैकींच होते. तेव्हां त्यांच्याच पद्धतीस अनुसरून मी इंद्राग्नीचे स्तवन करून त्यांच्या पुढें नम्र होतों, त्यांचे यशोवर्णन करून त्यांसच प्रणिपात करतो. ॥ ९ ॥

होता॑ यक्षद्व॒निनो॑ वन्त॒ वार्यं॒ बृह॒स्पति॑र्यजति वे॒न उ॒क्षभिः॑ पु॒रु॒वारे॑भिरु॒क्षभिः॑ ।

ज॒गृ॒भ्मा दू॒रआ॑दिशं॒ श्लोक॒मद्रे॒रध॒ त्मना॑ ।

अधा॑रयतर॒रिन्दा॑नि सु॒क्रतुः॑ पु॒रू सद्मा॑नि सु॒क्रतुः॑ ॥ १० ॥

होता यक्षत् वनिनः वंत वार्यं बृहस्पतिः यजति वेनः उक्षऽभिः पुरुऽवारेभिः उक्षऽभिः ।

जगृभ्म दूरेऽआदिशं श्लोकं अद्रेः अध त्मना ।

अधारयत् अररिंदानि सुऽक्रतुः पुरू सद्मानि सुऽक्रतुः ॥ १० ॥

आचार्याला देवाचे यजन करूं द्या, व प्रेमळ देवही उत्कृष्ट हविरन्नाचा स्वीकार करण्यास प्रवृत्त होवोत. कारण आतां ज्ञानवान बृहस्पति हा बलवर्धक सोमरस अर्पण करून देवयजन करण्यास उद्युक्त झाला आहे, व सर्व गुणसंपन्न आणि तीव्र अशा सोमरसानें यजन करीत आहे. तेव्हां सोमवल्ली पिळण्याच्या पाषाणांचा दूरवर ऐकूं येणासा असा ध्वनि आमच्या सहजीच कानी पडला. महत्कार्य करणाऱ्या ह्या सोमाच्या हातीं पाऊस पाडण्याचे आहे म्हणूनच पुण्यकर्म आचरणाराला राहण्यास विस्तृत आणि उत्कृष्ट स्थलें मिळाली आहेत. ॥ १० ॥

ये दे॑वासो दि॒व्येका॑दश॒ स्थ पृ॑थि॒व्यामध्येका॑दश॒ स्थ ।

अ॒प्सु॒क्षितो॑ महि॒नैका॑दश॒ स्थ ते दे॑वासो य॒ज्ञमि॒मं जु॑षध्वम् ॥ ११ ॥

ये देवासः दिवि एकादश स्थ पृथिव्यां अधि एकादश स्थ ।

अप्सुऽक्षितः महिना एकादश स्थ ते देवासः यज्ञं इमं जुषध्वम् ॥ ११ ॥

हे दिव्य विभूतींनो, तुम्ही आकाशामध्यें अकराजण रहात आहां, पृथ्वीवर अकराच जण आणि उदकांमध्येन्ही अकराच जण मोठ्या वैभवानें रहात आहां. तेव्हां तुम्ही हा आमचा यज्ञ मान्य करून घ्या. ॥ ११ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १४० (अग्नि सूक्त)

ऋषि : दीर्घतमाः - देवता : अग्निः - छंद - जगती

वे॒दि॒षदे॑ प्रि॒यधा॑माय सु॒द्यु॑ते धा॒सिमि॑व॒ प्र भ॑रा॒ योनि॑म॒ग्नये॑ ।

वस्त्रे॑णेव वासया॒ मन्म॑ना॒ शुचिं॑ ज्यो॒तीर॑थं शु॒क्रव॑र्णं तमो॒हन॑म् ॥ १ ॥

वेदिऽसदे प्रियऽधामाय सुऽद्युते धासिंऽइव प्र भर योनिं अग्नये ।

वस्त्रेणऽइव वासय मन्मना शुचिं ज्योतिःऽरथं शुक्रऽवर्णं तमःऽहनम् ॥ १ ॥

जो हा अग्नि वेदीवर आरूढ होत असतो, व ज्यास त्याचें स्वतःचे तेजोमय स्थान फार प्रिय असते अशा परम देदीप्यमान अग्निकरितां घृतपात्र घेऊन या. घृत हेंच त्याला हविरन्नाप्रमाणे आहे, आणि वस्त्रानें मंडित केल्याप्रमाणें अग्नीस मननीय स्तोत्रानें आच्छादित करा. हा परम पवित्र, शुभ्र तेजोमय असून प्रकाश हाच जो त्याचा रथ, त्याच्या योगानें तो अंधःकाराचा नाश करीत असतो. ॥ १ ॥

अ॒भि द्वि॒जन्मा॑ त्रि॒वृदन्न॑मृज्यते संवत्स॒रे वा॑वृधे ज॒ग्धमी॒ पुन॑ः ।

अ॒न्यस्या॒सा जि॒ह्वया॒ जेन्यो॒ वृषा॒ न्य१॒॑न्येन॑ व॒निनो॑ मृष्ट वार॒णः ॥ २ ॥

अभि द्विऽजन्मा त्रिऽवृत् अन्नं ऋज्यते संवत्सरे ववृधे जग्धं ईमिति पुनरिति ।

अन्यस्य आसा जिह्वया जेन्यः वृषा नि अन्येन वनिनः मृष्ट वारणः ॥ २ ॥

दोघांपासून म्हणजे पृथ्वी आणि आकाश ह्यांच्यापासून हा प्रकट होतो, आणि तीन प्रकारचें अन्न ग्रहण करून एक वर्षानें पुन्हां त्याच भक्षण केलेल्या अन्नाची धान्यरूपानें अनेक पटीनें वृद्धि करतो. बलशाली अग्नि अत्यंत

उदारचरित दिसतो, तेव्हांचे त्याचे मुख आणि जिव्हा हीं वेगळीं, आणि अनिवार होऊन अरण्याचीं अरण्यें फस्त करून टाकतो, तेव्हांचे वेगळे. ॥ २ ॥

कृ॒ष्ण॒प्रु॒तौ॑ वेवि॒जे अ॑स्य स॒क्षितौ॑ उ॒भा त॑रेते अ॒भि मा॒तरा॒ शिशु॑म् ।

प्रा॒चाजि॑ह्वं ध्व॒सय॑न्तं तृषु॒च्युत॒मा साच्यं॒ कुप॑यं॒ वर्ध॑नं पि॒तुः ॥ ३ ॥

कृष्णऽप्रुतौ वेविजे इति अस्य सऽक्षितौ उभा तरेते इति अभि मातरा शिशुम् ।

प्राचाऽजिह्वं ध्वसयंतं तृषुऽच्युतं आ साच्यं कुपयं वर्धनं पितुः ॥ ३ ॥

प्रथम दोघी अंधःकारांत गडप असतात व एकमेकींस चिकटून राहून जोरानें हालूं लागतात व नंतर प्रकट झालेल्या अग्निरूप बालकाजवळ दोघीही धांवत येतात. हा बालक सामान्य नव्हे. ह्याची जिव्हा लांब बाहेर येऊन पूर्वाभिमुख होते. हा एकदम प्रकट होऊन चमकतो व सर्व अनिष्टांचा नाश करतो. याची सेवा सर्वांनी केली पाहिजे. हा भक्तांच्या अंतःकरण वृत्तींना उचंबळून टाकून जगताच्या पित्याला हर्षभरीत करतो. ॥ ३ ॥

मु॒मु॒क्ष्वो३॒॑मन॑वे मानवस्य॒ते र॑घु॒द्रुवः॑ कृ॒ष्णसी॑तास ऊ॒ जुवः॑ ।

असमना अंजिरासौ रघुष्यदो वातंजूता उपं युज्यन्त आशवः ॥ ४ ॥

मुमुक्ष्वः मनवे मानवस्यते रघुऽद्रुवः कृष्णऽसीतासः ऊं इति जुवः ।

असमनाः अजिरासः रघुऽस्यदः वातऽजूताः उप युज्यंते आशवः ॥ ४ ॥

अग्निदेवा, हे तुझे मोकळे सुटण्याविषयी आतुर झालेले, सर्वव्यापक, भरधांव जाणारे अश्व वेगानें उडत जात असतां त्यांचा मार्ग काळा होत जातो. ह्या अश्वांची तोंडे निरनिराळ्या दिशांकडे वळलेली असून हे वायुरूप शीघ्रगति आणि वायुप्रेरित अश्व, त्या मनुराजाकरितां जोडलेले असतात. ॥ ४ ॥

आदंस्य ते ध्वसयंन्तो वृथेरते कृष्णमभ्वं महि वर्पः करिंक्रतः ।

यत्सीं महीमवनिं प्राभि मर्मृशदभिश्वसन्स्तनयन्नेति नानंदत् ॥ ५ ॥

आत् अस्य ते ध्वसयंतः वृथा ईरते कृष्णं अभ्वं महि वर्पः करिक्रतः ।

यत् सीं महीं अवनिं प्र अभि मर्मृशत् अभिऽश्वसन् स्तनयन् एति नानदत् ॥ ५ ॥

जाता जाता मार्गांतील अंधकाराचा समूळ उच्छेदकरून आपले अवाढव्य रूप प्रकट करणारे ते अग्नीचे अश्व सहज परंतु मोठ्या धडाक्यानें उडत जात असतात, कारण त्या वेळी हा अग्निही पृथ्वीच्या विस्तीर्ण भाल प्रदेशाचे चुंबन घेऊन मेघ गर्जनारूप प्रचंड घोष करीत सोसाट्यानें जात असतो. ॥ ५ ॥

भूषन्न योऽधि बभ्रूषु नम्नंते वृषेव पत्नीरभ्येति रोरुवत् ।

ओजायमानस्तन्वश्च शुम्भते भीमो न शृङ्गा दविधाव दुर्गृभिः ॥ ६ ॥

भूषन् न यः अधि बभ्रूषु नम्नते वृषाऽइव पत्नीःन अभि एति रोरुवत् ।

ओजायमानः तन्वः च शुंभते भीमः न शृंगा दविधाव दुःऽगृभिः ॥ ६ ॥

चित्रविचित्र औषधींना आपल्या प्रभेने अलंकृत करण्याकरितांच कीं काय हा अग्नि त्यांच्याकडे वांकून पाहून एखादा शूर योद्धा आपल्या प्रिय पत्नींना भेटावयास जातो, त्याप्रमाणें गर्जना करीत करीत त्या औषधींकडे जातो. त्याचा दिव्य प्रताप प्रकट झाल्यानेंच त्याच्या शरीरास विशेष शोभा येते. परंतु त्यावेळेस एखाद्या भयंकर श्वापदाप्रमाणे तो दुर्निवार होऊन आपली ज्वालारूप आयाळ एकदम हालवितो. ॥ ६ ॥

स सं॒स्तिरो॑ वि॒ष्टिरः॒ सं गृ॑भायति जा॒नन्ने॒व जा॑न॒तीर्नित्य॒ आ श॑ये ।

पुन॑र्वर्धन्ते॒ अपि॑ यन्ति दे॒व्यम॒न्यद्वर्पः॑ पि॒त्रोः कृ॑ण्वते॒ सचा॑ ॥ ७ ॥

स संऽस्तिरः विऽस्तिरः सं गृभायति जानन् एव जानतीः नित्यः आ शये ।

पुनः वर्धंते अपि यंति देव्यं अन्यत् वर्पः पित्रोः कृण्वते सचा ॥ ७ ॥

त्या ज्वाला संकलित असोत किंवा निरनिराळ्या दृष्टीस पडण्यासारख्या असोत, त्या सर्वांस जाणणारा हा सनातन अग्नि त्या सर्वांसच कवटाळतो, व त्याही अग्नीला आपला म्हणून ओळखतात व म्हणून त्यांच्या समूहामध्यें जाऊन तो शयन करतो तेव्हां पुन्हा त्या ज्वाला वृद्धिंगत होतात, व दिव्यरूप पावून आईबापांसह एक निराळेंच रूप धारण करतात. ॥ ७ ॥

तम॒ग्रुवः॑ के॒शिनीः॒ सं हि रे॑भि॒र ऊ॒र्ध्वास्त॑स्थुर्म॒म्रुषीः॒ प्राय॑वे॒ पुनः॑ ।

तासा॑ं ज॒रां प्र॑मु॒ञ्चन्ने॑ति॒ नान॑द॒दसु॒ं पर॑ं ज॒नय॑ञ्जी॒वमस्तृ॑तम् ॥ ८ ॥

तं अग्रुवः केशिनीः सं हि रेभिरे ऊर्ध्वाः तस्थुः ममृषीः प्र आयवे पुनरिति ।

तासां जरां प्रऽमुंचन् एति नानदत् असुं परं जनयन् जीवं अस्तृतम् ॥ ८ ॥

सुंदर केश कलाप धारण करणाऱ्या, परंतु ह्या लावण्यवतींनी अग्नीला आलिंगन दिले त्याच्या अगोदर त्या मृतप्रायच होत्या, परंतु ह्या विश्वजीवनाकरितांच त्या उठून उभ्या राहिल्या, तेव्हां त्यांचे वार्धक्य घालवून त्यांच्यामध्यें उत्साहपूर्ण, व नष्ट किंवा क्षीण न होणारी अशी अपूर्व जीवशक्ति उत्पन्न करून तो जयघोष करीत करीत त्यांच्याकडे आला. ॥ ८ ॥

अ॒धी॒वा॒सं परि॑ मा॒तू रि॒हन्नह॑ तुवि॒ग्रेभिः॒ सत्व॑भिर्याति॒ वि ज्रयः॑ ।

वयो॒ दध॑त्प॒द्वते॒ रेरि॑ह॒त्सदा॒नु श्येनी॑ सचते व॒र्तनीरह॑ ॥ ९ ॥

अधीवासं परि मातू रिहन् अह तुविऽग्रेभिः सत्वऽभिः याति वि ज्रयः ।

वयः दधत् पत्ऽवते रेरिहत् सदानु श्येनी सचते वर्तनिः अह ॥ ९ ॥

पृथ्वीमातेच्या वस्त्राच्या पदराचें चुंबन घेत घेत हा तीव्र अग्नि वणव्याच्या रूपानें धडाक्यानें पुढे जात असतो, व तो जवळ येतांच घोर वन्य श्वापदेंसुद्धां ओरडत सैरावैरा धांवू लागतात. पृथ्वीचा पृष्ठभाग चाटीत चाटीत जात असतां हा अग्नि पादचारी प्राण्यांच्याअंगांत त्यांस अन्न देऊन नेहमी नवा जोम उत्पन्न करतो. परंतु हा पुढें गेल्यावर पाठीमागे त्याचा मार्ग मात्र काळा होत जातो. ॥ ९ ॥

अ॒स्माक॑मग्ने म॒घव॑त्सु दीदि॒ह्यध॒ श्वसी॑वान्वृष॒भो दमू॑नाः ।

अ॒वास्या॒ शिशु॑मतीरदीदे॒र्वर्मे॑व यु॒त्सु प॑रि॒जर्भु॑राणः ॥ १० ॥

अस्माकं अग्ने मघवत्ऽसु दीदिहि अध श्वसीवान् वृषभः दमूनाः ।

अवऽअस्य शिशुऽमतीः अदीदेः वर्मऽइव युत्ऽसु परिऽजर्भुराणः ॥ १० ॥

हे अगिदेवा, आमच्या औदार्यशील यजमानांवर आपल्या दयेचा प्रकाश पाड. तूं वीर्यवान व आत्मसंयमी असून तुझा श्वासोश्वास सुद्धां ओजस्वी असतो. तूं आपले बालरूप टाकून समरांगणांत तेजस्वी चिलखत घालून वावरल्याप्रमाणें आपल्या प्रकाशानें सर्वांस दिपवून टाकलें आहेस. ॥ १० ॥

इ॒दम॑ग्ने॒ सुधि॑तं॒ दुर्धि॑ता॒दधि॑ प्रि॒यादु॑ चि॒न्मन्म॑नः॒ प्रेयः॑ अस्तु ते ।

यत्ते॑ शु॒क्रं त॒न्वो३॒॑रोच॑ते॒ शुचि॒ तेना॒स्मभ्यं॑ वनसे॒ रत्न॒मा त्वम् ॥ ११ ॥

इदं अग्ने सुऽधितं दुःऽधितात् अधि प्रियात् ऊं इति चिन् मन्मनः प्रेयः अस्तु ते ।

यत् ते शुक्रं तन्वः रोचते शुचि तेन अस्मभ्यं वनसे रत्नं आ त्वम् ॥ ११ ॥

हे अग्निदेवा, कशाबशा रचलेल्या एखाद्या कवनापेक्षां, किंवा तुला आवडणाऱ्या एखाद्या सुरस पद्यापेक्षांही हे माझें सुव्यवस्थित स्तोत्र तुला विशेष आवडो. तुझ्या शरीराचा जो शुभ्र आणि पवित्र प्रकाश पडत असतो त्याच्या योगानें तूं आम्हांस तुझी कृपा हें रत्नच देत आहेस, असे होवो. ॥ ११ ॥

रथा॑य॒ नाव॑मु॒त नो॑ गृ॒हाय॒ नित्या॑रित्रां प॒द्वतीं॑ रास्यग्ने ।

अ॒स्माकं॑ वी॒राँ उ॒त नो॑ म॒घोनो॒ जनाँ॑श्च॒ या पा॒रया॒च्छर्म॒ या च॑ ॥ १२ ॥

रथाय नावं उत नः गृहाय नित्यऽअरित्रां पत्ऽवतीं रासि अग्ने ।

अस्माकं वीरान् उत नः मघोनः जनान् च या पारयात् शर्म या च ॥ १२ ॥

हे अग्ने, आम्हांस राहण्यासाठीं व जलद चालण्यासाठीं, अभंग असे सुकाणूं आणि वल्ही असलेली अशी एक नौका तूं देणार आहेसच, परंतु ती अशी पाहिजे कीं, जिच्यामध्यें आमचे सर्व योद्धे यजमान आणि मुलें माणसें ही सर्व बसून पार जातील व जी आम्हांस सुखाचा आसरा होईल. ॥ १२ ॥

अ॒भी नो॑ अग्न उ॒क्थमिज्जु॑गुर्या॒ द्यावा॒क्षामा॒ सिन्ध॑वश्च॒ स्वगू॑र्ताः ।

गव्यं॒ यव्यं॒ यन्तो॑ दी॒र्घाहेषं॒ वरं॑ अरु॒ण्यो वरन्त ॥ १३ ॥

अभि नः अग्ने उक्थं इत् जुगुर्याः द्यावाक्षामा सिंधवः च स्वऽगूर्ताः ।

गव्यं यव्यं यंतः दीर्घा अहा इषं वरं अरुण्यः वरंत ॥ १३ ॥

हे अग्ने, हे आमचे प्रशंसास्तोत्र उत्तम मानून घे, म्हणजे, पृथ्वी आकाश आणि स्वयशोमंडित अशा महानद्या ह्या आम्हांस दिव्य गोधनें, धान्यसमृद्धि व दीर्घायुष्य ही प्राप्त करून देतील, व अरुणवर्ण अशा उषादेवी आम्हांसाठीं मनःसामर्थ्य हेंच वरदान मागून घेतील. ॥ १३ ॥

ॐ तत् सत्

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १४१ (अग्नि सूक्त)

ऋषि : दीर्घतमाः - देवता : अग्निः - छंद - जगती

बळि॒त्था तद्वपु॑षे धायि दर्श॒तं दे॒वस्य॒ भर्गः॒ सह॑सो॒ यतो॒ जनि॑ ।

यदी॒मुप॒ ह्वर॑ते॒ साध॑ते म॒तिर्ऋ॒तस्य॒ धेना॑ अनयन्त स॒स्रुतः॑ ॥ १ ॥

बट् इत्था तत् वपुषे धायि दर्शतं देवस्य भर्गः सहसः यतः जनि ।

यत् ईं उप ह्वरते साधते मतिः ऋतस्य धेना अनयंत सस्रुतः ॥ १ ॥

खरोखरच देवाचें अवर्णनीय असें तेज सामर्थ्याच्या प्रभावामुळें झालें म्हणूनच ते हे अग्निरूप तेज एक दर्शनीय वस्तु होऊन बसले आहे आणि म्हणून माझी चित्तवृत्ति त्याच्याकडे लागते व ती तत्काळ फलद्रुपही होते, व त्यामुळे सत्यधर्मप्रवर्तक अशा आमच्या स्तुतींचा ओघही तिकडेच वळलेला असतो. ॥ १ ॥

पृक्षो वपुः पितुमान्नित्य आ शये द्वितीयमा सप्तशिवासु मातृषु ।

तृतीयमस्य वृषभस्य दोहसे दशप्रमतिं जनयन्त योषणः ॥ २ ॥

पृक्षः वपुः पितुऽमान् नित्य आ शये द्वितीयं आ सप्तऽशिवासु मातृषु ।

तृतीयं अस्य वृषभस्य दोहसे दशऽप्रमतिं जनयंत योषणः ॥ २ ॥

सामर्थ्यवान, नाशरहित आणि सर्वांगसंपन्न असा हा अग्नि प्राण्यांच्या शरीरांत वास करीत असतो. त्याचें दुसरे स्वरूप, सातांही भुवनांस जी मातेप्रनाणें कल्याणप्रद होतात अशा उदकांत असतें. ह्या वीर्यवान अग्नीच्या तिसऱ्या स्वरूपाची योजना त्याच्यापासून मनोरथरूप दुग्ध काढण्याकरितां केलेली आहे आणि येवढ्या करितांच लोकत्रयांत पूज्य अशा अग्नीला सुंदर युवतींनी प्रकट केलें आहे. ॥ २ ॥

निर्यदीं बुध्नान्महिषस्य वर्पस ईशानासः शवसा क्रन्त सूरयः ।

यदीमनु प्रदिवो मध्व आधवे गुहा सन्तं मातरिश्वा मथायति ॥ ३ ॥

निः यत् ईं बुध्नात् महिषस्य वर्पसः ईशानासः शवसा क्रंत सूरयः ।

यत् ईं अनु प्रऽदिवः मध्वः आऽधवे गुहा संतं मातरिश्वा मथायति ॥ ३ ॥

जेव्हां अति विशाळ अशा ह्या आकाशरूप शरीराच्या मूळ प्रदेशापासून महात्म्यांनी अथवा ज्ञानसंपन्न ऋषींनी आपल्या सामर्थ्यानें ह्याला बाहेर प्रकट केलें, आणि मधुर रसाची आहुति देण्याकरितां पुरातन काळीं तो गुप्त रूपानें राहिला असतांही मातरिश्वानें मंथन करून जेव्हां त्यास बाहेर आणले, ॥ ३ ॥

प्र यत्पितुः परमान्नीयते पर्या पृक्षुधो वीरुधो दंसु रोहति ।

उभा यदस्य जनुषं यदिन्वत आदिद्यविष्ठः अभवद्घृ णा शुचिः ॥ ४ ॥

प्र यत् पितुः परमात् नीयते परि आ पृक्षुधः वीरुधः दंऽसु रोहति ।

उभा यत् अस्य जनुषं यत् इन्वतः आत् इत् यविष्ठः अभवत् घृणा शुचिः ॥ ४ ॥

जेव्हां त्याला परात्पर पित्याजवळून खाली आणून भोंवताली फिरवितात, तेव्हां सामर्थ्यवर्धक आहुतीमधून आणि समिधांच्या लतांमधून तो विलक्षण तेजानें एकदम प्रज्वलित होतो. त्याला प्रकट करण्याचा योग दोघेजण जुळवून आणतात, तेव्हां तो अति पवित्र अग्नि आपल्या प्रखर तेजानें अत्यंत तरुण असाच प्रादुर्भूत होतो. ॥ ४ ॥

आदिन्मा॒तॄरावि॑श॒द्यास्वा शुचि॒रहिं॑स्यमान उर्वि॒या वि वा॑वृधे ।

अनु॒ यत्पूर्वा॒ अरु॑हत्सना॒जुवो॒ नि नव्य॑सी॒ष्वव॑रासु धावते ॥ ५ ॥

आत् इत् मातॄः आ अविशत् यासु आ शुचिः अहिंस्यमानः उर्विया वि ववृधे ।

अनु यत् पूर्वाः अरुहत् सनाऽजुवः नि नव्यसीषु अवरासु धावते ॥ ५ ॥

नंतर तो पवित्र अग्नि मातृसमूहांत ताबडतोब प्रवेश करून निष्प्रतिबंधपणें अतिशय वृद्धिंगत होतो, आणि त्यांच्यापैकी ज्या त्याच्या विस्तारवृद्धीस प्रथा कारणीभूत झाल्या असतात त्यांच्या मधून अगोदर प्रज्वलित होऊन नंतर मग नवीन आणि कनिष्ठ समूहांत वेगानें संचार करतो. ॥ ५ ॥

आदिद्धोतारं वृणते दिविष्टिषु भगमिव पपृचानास ऋञ्जते ।

देवान्यत्क्रत्वा मज्मना पुरुष्टुतो मर्तं शंसं विश्वधा वेति धायसे ॥ ६ ॥

आत् इत् होतारं वृणते दिविष्टिषु भगंऽइव पपृचानासः ऋंजते ।

देवान् यत् क्रत्वा मज्मना पुरुऽस्तुतः मर्तं शंसं विश्वधा वेति धायसे ॥ ६ ॥

अर्थात् प्रातर्यज्ञाच्या वेळेस ऋत्विज त्यालाच आपला आचार्य करतात, पूर्णपणे हवन करून त्याला प्रसन्न करून घेतात. मग आपल्या प्रज्ञाप्रभावानें आणि अद्‌भुत सामर्थ्यानें सर्वांच्या स्तुतीस पात्र झालेला, व सर्व विश्वाला ज्याचा आधार आहे असा अग्नि सुप्रसन्न होऊन, भक्तजनांची स्तवनें ऐकण्याकरितां, आणि त्यांच्या सोमरसाचा आस्वाद घेण्याकरितां देवतांस घेऊन येतो. ॥ ६ ॥

वि यदस्थाद्यजतो वातचोदितः ह्वारो न वक्वा जरणा अनाकृतः ।

तस्य पत्मन्दक्षुषः कृष्णजंहसः शुचिजन्मनो रज आ व्यध्वनः ॥ ७ ॥

वि यत् अस्थात् यजतः वातऽचोदितः ह्वारः न वक्वा जरणाः अनाकृतः ।

तस्य पत्मन् दक्षुषः कृष्णऽजंहसः शुचिजन्मनः रजः आ विऽअध्वनः ॥ ७ ॥

हा अत्यंत पूज्य अग्नि वाऱ्यामुळें क्षुब्ध झाला असतां स्तुतीस न जुमानणाऱ्या एखाद्या चतुर वस्ताद पंडिताप्रमाणेंआपल्या मार्गानें जेव्हां अनिवार होऊन नीट जातो, व सर्व पातकाचें भस्म करून टाकतो, ज्याचे दोन्ही पंख कृष्णवर्णच असतात, तरीही जो शुद्ध स्थानीच प्रकट होतो व ज्याच्या कृपेचे मार्ग नाना प्रकारचे आहेत असा हा अग्नि जात असतां वाटेंत अंतरिक्षांतून वर चढत जातो. ॥ ७ ॥

रथो॒ न या॒तः शिक्व॑भिः कृ॒तो द्यामङ्गे॑◌ुभिररु॒षेभि॑रीयते ।

आद॑स्य॒ ते कृ॒ष्णासो॑ दक्षि सू॒रयः॒ शूर॑स्येव त्वे॒षथा॑दीषते॒ वयः॑ ॥ ८ ॥

रथः न यातः शिक्वऽभिः कृतः द्यां अंगेभिः अरुषेभिः ईयते ।

आत् अस्य ते कृष्णासः दक्षि सूरयः शूरस्यऽइव त्वेषथात् ईषते वयः ॥ ८ ॥

यंत्र सामर्थ्यानें चालविलेल्या व सजवून तयार केलेल्या एखाद्या वाहनांत बसल्याप्रमाणें, तो आपल्या आरक्त परिवारासह सिद्ध होऊन आकाशलोकीं संचार करतो. हे अग्ने तुझे दहन कर्म जेव्हां झपाट्यानें चालू असतें, तेव्हां कृष्णवर्ण धूराचे लोटच्या लोट वर चाललेले असतात व प्रतापी शूरास भ्यावे त्याप्रमाणे पक्षिगण तुझ्या प्रखर कोपाला भिऊन दशदिशा पळून जातात. ॥ ८ ॥

त्वया॒ ह्यग्ने॒ वरु॑णो धृ॒तव्र॑तो मि॒त्रः शा॑श॒द्रे अ॑र्य॒मा सु॒दान॑वः ।

यत्सी॒मनु॒ क्रतु॑ना वि॒श्वथा॑ वि॒भु॒र॒रान्न ने॒मिः प॑रि॒भूरजा॑यथाः ॥ ९ ॥

त्वया हि अग्ने वरुणः धृतव्रतः मित्रः शाशद्रे अर्यमा सुऽदानवः ।

यत् सीं अनु क्रतुना विश्वऽथा विऽभुः अरान् न नेमिः परिऽभूः अजायथाः ॥ ९ ॥

हे अग्निदेवा, तुझ्याच द्वारानें वरुण आपल्या धर्म नीति नियमाचे पालन करवितो व मित्र, अर्यमा हे उदारधी देव पातक्यांना शासन करतात. तूं आतां सर्व व्यापक अशा रूपानें प्रकट झाला आहेस, व चाकांची धांव अरांना आपापल्या ठिकाणी दाबून ठेवते त्याप्रमाणें आपल्या प्रज्ञाबलानें सर्वांना सर्व प्रकारें संभाळित आहेस. ॥ ९ ॥

त्वम॑ग्ने शशमा॒नाय॑ सु॒न्व॒ते रत्नं॑ यविष्ठ दे॒वता॑तिमिन्वसि ।

तं त्वा॒ नु नव्यं॑ सहसो युवन्व॒यं भग॒ं न का॒रे म॑हिरत्न॥ धीमहि ॥ १० ॥

त्वं अग्ने शशमानाय सुन्वते रत्नं यविष्ठ देवऽतातिं इन्वसि ।

तं त्वा नु नव्यं सहसः युवन् वयं भगं न कारे महिऽरत्न धीमहि ॥ १० ॥

हे अग्निदेवा, तूं सर्वकाल ऐन तारुण्याच्या भरांत असतोस व स्तवनपूर्वक सोमरस अर्पण करणाऱ्या भक्तांना इच्छित रत्न संपत्ति व देवभजनबुद्धि अशा दोहोंचीही जोड करून देतोस. तूं प्रत्यक्ष सामर्थ्याच्याच तारुण्यदशेची मूर्ति आहेस, तर हे महा वैभव संपन्न अग्निदेवा स्तुतिस पात्र अशा तुला आमचा भाग्य दाता म्हणून आमच्या सर्व उद्योगांत आम्ही आरंभी तुझीच आठवण करीत असतो. ॥ १० ॥

अ॒स्मे र॒यिं न स्वर्थ॒ं दमू॑नस॒ं भग॒ं दक्ष॒ं न प॑पृचासि धर्ण॒सिम् ।

र॒श्मीँरि॑व॒ यो यम॑ति॒ जन्म॑नी उ॒भे दे॒वाना॒ं शंस॑मृ॒त आ च॑ सु॒क्रतु॑ः ॥ ११ ॥

अस्मे इति रयिं न सुऽअर्थं दमूनसं भगं दक्षं न पपृचासि धर्णसिम् ।

रश्मीन्ऽइव यः यमति जन्मनी इति उभे इति देवानां शंसं ऋते आ च सुऽक्रतुः ॥ ११ ॥

हे अग्निदेवा, स्वतः पूर्ण व सत्कार्यीं व्यय करतां येण्याइतके ऐश्वर्य आणि बलवत्तर दैव ह्या गोष्टी ज्याप्रमाणें तूं आम्हांस दिल्यास त्याप्रमाणें सर्व सहन करण्याचें सामर्थ्यही आम्हांस भरपूर दे. घोड्याचा लगाम धरून त्यास कह्यांत ठेवतात त्याप्रमाणें हा अग्नि सहज लीलेने दैवी आणि मानवी जन्मांवर आपलें प्रभुत्व चालवीत असतो आणि सद्धर्म विहित जो यज्ञ त्या यज्ञप्रसंगी देवांप्रित्यर्थ स्तवन करण्याची स्फूर्तिही तोच सत्कृत्यशील देव देत असतो. ॥ ११ ॥

उत नः सुद्योत्मा जीराश्वो होता मन्द्रः शृणवच्चन्द्ररथः ।

स नो नेषन्नेषतमैरमूरोऽग्निर्वामं सुवितं वस्यो अच्छ ॥ १२ ॥

उत नः सुऽद्योत्मा जीरऽश्वः होता मंद्रः शृणवत् चंद्रऽरथः ।

स नः नेषत् नेषऽतमैः अमूरः अग्निः वामं सुवितं वस्यः अच्छ ॥ १२ ॥

अत्यंत दैदीप्यमान, सर्व वस्तु तात्काळ व्यापून टाकणारा आणि आनंदरूप असा हा यज्ञसंपादक अग्नि तेजोमय रथातून जात असतो, तो आमचा धांवा ऐको. अविद्यारहित अग्नि अचूक प्रेरणांनी आम्हांस अभीष्ट सुखाकडे, स्पृहणीय आनंदाकडे घेऊन जावो. ॥ १२ ॥

अस्ता॑व्य॒ग्निः शिमी॑वद्भिर॒र्कैः साम्रा॑ज्याय प्रत॒रं दधा॑नः ।

अ॒मी च॒ ये म॒घवा॑नः व॒यं च॒ मिह॒ं न सूर॒ः अति॒ निष्ट॑तन्युः ॥ १३ ॥

अस्तावि अग्निः शिमीवत्ऽभिः अर्कैः सांऽराज्याय प्रऽतरं दधानः ।

अमी इति च ये मघऽवानः वयं च मिहं न सूरः अति निः टतन्युः ॥ १३ ॥

ज्यांचा प्रभाव विलक्षण आहे, अशा स्तोत्रगायनांनी अग्नीचें स्तवन केलेले आहे. विश्वाचे साम्राज्य भोगण्याला हा अगदी योग्य आहे, म्हणूनच हा सर्वांत अग्रेसर ठरला आहे. तर आमचे दातृत्वशाली यजमान आणि आम्हीं अशा सर्वांनी, सूर्य ज्याप्रमाणे हिमजलाचा उच्छेद करतो त्याप्रमाणें अधर्माचें उन्मूलन करून अत्यंत वृद्धिंगत व्हावें. ॥ १३ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १४२ (अप्री सूक्त)

ऋषि : दीर्घतमाः - देवता : अग्निः - छंद - अनुष्टुप्

समिद्धो अग्न आ वह देवाँ अद्य यतस्रुचे ।

तन्तुं तनुष्व पूर्व्यं सुतसोमाय दाशुषे ॥ १ ॥

संऽइद्धः अग्ने आ वह देवान् अद्य यतऽस्रुचे ।

तंतुं तनुष्व पूर्व्यं सुतऽसोमाय दाशुषे ॥ १ ॥

हे अग्ने तू प्रदीप्त झाला आहेस, तर आहुती देण्यास उद्युक्त झालेल्या यजमानांकडे आज आपल्या देवतांना घेऊन ये. आणि पुरातन यज्ञ धर्माची ही आमची परंपरा सोमरस काढून अर्पण करणाऱ्या भक्तजनांकरितां यथासांग कर. ॥ १ ॥

घृतवन्तम् उप मासि मधुमन्तं तनूनपात् ।

यज्ञं विप्रस्य मावतः शशमानस्य दाशुषः ॥ २ ॥

घृतऽवंतं उप मासि मधुऽमंतं तनूऽनपात् ।

यज्ञं विप्रस्य माऽवतः शशमानस्य दाशुषः ॥ २ ॥

हे स्वयंभू अग्निदेवा, तुझें स्तवन करून हवि अर्पण करणाऱ्या मजसारख्या भक्तजनाच्या जो यज्ञ तू सन्निध राहून यथासांग तडीस नेतोस, त्यांत अर्थातच घृताची आणि मधुर मधाची कधींही उणीव नसते. ॥ २ ॥

शुचिः पावको अद्भुतो मध्वा यज्ञं मिमिक्षति ।

नरा॒शंस॒स्त्रिरा दि॒वो दे॒वो दे॒वेषु॑ य॒ज्ञियः॑ ॥ ३ ॥

शुचिः पावकः अद्भुतः मध्वा यज्ञं मिमिक्षति ।

नराशंसः त्रिः आ दिवः देवः देवेषु यज्ञियः ॥ ३ ॥

हा नराशंस म्हणजे सर्व जनस्तुतियोग्य असा अग्नि, स्वतः पवित्र, इतरांस पावन करणारा आणि आश्चर्यचकित करणारा आहे. तो द्युलोकांतून येऊन तीन वेळां आमचा यज्ञ मधुररसाने पूर्ण करतो. तो सर्व देवतांमध्यें अत्यंत पूज्य आहे. ॥ ३ ॥

ई॒ळि॒तो अ॑ग्न॒ आ व॒हेन्द्रं॑ चि॒त्रमि॒ह प्रि॒यम् ।

इ॒यं हि त्वा॑ म॒तिर्ममाच्छा॑ सुजिह्व व॒च्यते॑ ॥ ४ ॥

ईळितः अग्ने आ वह इंद्रं चित्रं इह प्रियम् ।

इयं हि त्वा मतिः मम अच्छ सुऽजिह्व वच्यते ॥ ४ ॥

हे अग्निदेव, आमच्या स्तवनांनी तूं प्रसन्न झाला आहेस, तर ज्याचे यश अत्यंत उज्ज्वल आहे, अशा इंद्राला येथें घेऊन ये. तूं मधुरभाषणी आहेस व हे माझें स्तोत्र तुझ्या प्रित्यर्थच मी गात आहे. ॥ ४ ॥

स्तृणानासो यतस्रुचो बर्हिर्यज्ञे स्वध्वरे ।

वृञ्जे देवव्यचस्तममिंद्राय शर्म सप्रथः ॥ ५ ॥

स्तृणानासः यतऽस्रुचः बर्हिः यज्ञे सुऽअध्वरे ।

वृंजे देवव्यचःऽतमं इंद्राय शर्म सऽप्रथः ॥ ५ ॥

ह्या अध्वर यज्ञांमध्यें ऋत्विज कुशासन आंथरून हातांत ऋचा घेऊन आहुति देण्यास तयार आहेत, व मीही इंद्राकरितां त्या विश्वव्यापक देवाला साजेल असेंच विस्तृत आसन सुशोभित करीत आहे. ॥ ५ ॥

वि श्रयन्तामृतावृधः प्रयै देवेभ्यो महीः ।

पावकासः पुरुस्पृहो द्वारो देवीरसश्चतः ॥ ६ ॥

वि श्रयंतां ऋतऽवृधः प्रऽयै देवेभ्यः महीः ।

पावकासः पुरुऽस्पृहः द्वारः देवीः असश्चतः ॥ ६ ॥

देवतांनी आंत प्रवेश करावा म्हणून यज्ञशालेची पवित्र महाद्वारें उघडोत, ही दुष्टाच्या स्पर्शानें कलंकित झालेलीं नसून सनातनधर्म वृद्धिंगत करणारी, पवित्र करणारी आणि सर्वांस अत्यंत प्रिय अशीं आहेत. ॥ ६ ॥

आ भन्दमाने उपाके नक्तोषासा सुपेशसा ।

यह्वी ऋतस्यं मातरा सीदतां बर्हिरा सुमत् ॥ ७ ॥

आ भंदमाने इति उपाके इति नक्तोषसा सुऽपेशसा ।

यह्वी इति ऋतस्यं मातरा सीदतां बर्हिः आ सुऽमत् ॥ ७ ॥

सर्वांनी आनंदानें ज्यांचा सत्कार करावा, ज्या परस्पराशी अगदी संलग्न झालेल्या असून, आपल्या सौंदर्यामुळें फार मोहक दिसत असतात अशा रात्र आणि उषारूप देवता म्हणजे सत्यधर्माच्या जणोंकाय श्रेष्ठ माताच, त्या प्रसन्नांतःकरणानें कुशासनांवर येऊन बसोत. ॥ ७ ॥

म॒न्द्रजि॑ह्वा जु॒गु॒र्वणी॒ होता॑रा॒ दैव्या॑ क॒वी ।

य॒ज्ञं नो॑ यक्षताम॒मं सि॒ध्रम॒द्य दि॑वि॒स्पृश॑म् ॥ ८ ॥

मंद्रऽजिह्वा जुगुर्वणी इति होतारा दैव्या कवी इति ।

यज्ञं नः यक्षतां इमं सिध्रं अद्य दिविऽस्पृशम् ॥ ८ ॥

मधुरभाषी, भगवंताचें अत्यंत प्रेमानें स्तवन करणारे कवि असे दोघेही दिव्य ऋत्विज हा आमचा यज्ञ सर्वार्थप्रद व स्वर्गातील देवतां पर्यंत पोहोंचणारा यज्ञ यथासांग शेवटास नेवोत. ॥ ८ ॥

शुचि॑र्दे॒वेष्वर्पि॑ता॒ होत्रा॑ म॒रुत्सु॒ भार॑ती ।

इळा सरस्वती मही बर्हिः सीदन्तु यज्ञियाः ॥ ९ ॥

शुचिः देवेषु अर्पिता होत्रा मरुत्ऽसु भारती ।

इळा सरस्वती मही बर्हिः सीदंतु यज्ञियाः ॥ ९ ॥

शुद्ध चारित्र्य आणि देवतांमध्यें व मरुद्गणांमध्येंही पूज्य असलेली होत्रा, भारती, इळा आणि परम श्रेष्ठ सरस्वती अशा सर्व वंद्य देवता आसनावर आपण होऊन येऊन बसोत. ॥ ९ ॥

तन्नस्तुरीयमद्भुतं पुरु वारं पुरु त्मना ।

त्वष्टा पोषाय वि ष्यतु राये नाभा नो अस्मयुः ॥ १० ॥

तत् नः तुरीयं अद्भुतं पुरु वा अरं पुरु त्मना ।

त्वष्टा पोषाय वि स्यतु राये नाभा नः अस्मयुः ॥ १० ॥

आमच्यावर कृपा करणारा त्वष्ट्रदेव यज्ञमंडपांत नाभीवर म्हणजे उत्तर वेदीवर आरूढ होऊन आमचे ठिकाणी अतिशय ओजस्वी आणि साहजिकपणें अतिशय विपुल असें जे आश्चर्यकारक वीर्य आहे, त्याची अशी योजना करो कीं तेणें करून आम्ही समर्थ होऊन आमचा उत्कर्ष होईल. ॥ १० ॥

अवसृजन्नुप त्मना देवान्यक्षि वनस्पते ।

अग्निर्हव्या सुषूदति देवः देवेषु मेधिरः ॥ ११ ॥

अवऽसृजन् उप त्मना देवान् यक्षि वनस्पते ।

अग्निः हव्या सुसूदति देवः देवेषु मेधिरः ॥ ११ ॥

हे वृक्षराजा येथे ये आणि स्वतः हवि अर्पण करून देवांचे यजन कर. परम बुद्धिमान अग्निसुद्धां देवतांमध्यें ज्यांचा हविर्भाग त्यांस देत असतो. ॥ ११ ॥

पूषण्वते मरुत्वते विश्वदेवाय वायवे ।

स्वाहा गायत्रवेपसे हव्यं इंद्राय कर्तन ॥ १२ ॥

पूषण्ऽवते मरुत्वते विश्वऽदेवाय वायवे ।

स्वाहा गायत्रऽवेपसे हव्यं इंद्राय कर्तन ॥ १२ ॥

पूषा व तसेच मरुत्ही ज्याचे अंकित आहेत, जो विश्वाधीश व सर्वगति अशा वायुचाही जो आत्मा आहे; जो गायत्रीगायनाविषयी स्फूर्ति देतो; त्या इंद्राला, हे ऋत्विजानों, स्वाहा उच्चार करून हवि अर्पण करा. ॥ १२ ॥

स्वाहाकृतान्या गह्युप हव्यानि वीतये ।

इंद्रा गहि श्रुधी हवं त्वां हवन्ते अध्वरे ॥ १३ ॥

स्वाहाऽकृतानि आ गहि उप हव्यानि वीतये ।

इंद्रा गहि श्रुधि हवं त्वां हवंते अध्वरे ॥ १३ ॥

स्वाहा शब्द उच्चारून हीं हव्यें अर्पण केलीं आहेत. तर हे इंद्रा, त्यांचा स्वीकार करण्यास येच. ह्या अध्वर यज्ञाकरितांच हे ऋत्विज तुला हांक मारीत आहेत. ॥ १३ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १४३ (अग्निः सूक्त)

ऋषि : दीर्घतमाः - देवता : अग्निः - छंद - अनुष्टुप्

प्र तव्य॑सीं॒ नव्य॑सीं धी॒तिम॒ग्नये॑ वा॒चो म॒तिं सह॑सः सू॒नवे॑ भरे ।

अ॒पां नपा॒द्यो वसु॑भिः स॒ह प्रि॒यो होता॑ पृथि॒व्यां न्यसी॑ददृ॒त्विय॑ः ॥ १ ॥

प्र तव्यसीं नव्यसीं धीतिं अग्नये वाचः मतिं सहसः सूनवे भरे ।

अपां नपात् यः वसुऽभिः सह प्रियः होता पृथिव्यां नि असीदत् ऋत्वियः ॥ १ ॥

जे नेहमी फलद्रूप होते असे माझे ध्यान मी आतां अग्नीच्या ठिकाणीं लावतो, आणि माझे मनोहर व शब्दांनी व्यक्त केलेले विचारही आम्हांस धैर्यबळ देणाऱ्या त्या अग्नीच्याच सेवेला अर्पण करतो. स्वर्लोकीच्या उदकांतून जो प्रादुर्भूत झाला आहे, तो लोकप्रिय अग्नि यज्ञाचा होता होऊन आपल्या दिव्य निधींसह यज्ञसमयीं येऊन पृथ्वीवरील ह्या वेदीवर अधिष्ठित झाला आहे. ॥ १ ॥

सः जाय॑मानः पर॒मे व्योम॑न्या॒विर॒ग्निर॑भवन्मात॒रिश्व॑ने ।

अ॒स्य क्रत्वा॑ समिधा॒नस्य॑ म॒ज्मना॒ प्र द्यावा॑ शो॒चिः पृ॑थि॒वी अ॑रोचयत् ॥ २ ॥

सः जायमानः परमे विऽओमनि आविः अग्निः अभवत् मातरिश्वने ।

अस्य क्रत्वा संऽइधानस्य मज्मना प्र द्यावा शोचिः पृथिवी इति अरोचयत् ॥ २ ॥

अत्युच्च आकाशांत हा अग्नि प्रकट होतांक्षणींच मातरिश्वाच्या प्रथम दृष्टीस पडला आणि तो आपल्याच प्रज्ञाबलानें आणि पराक्रमानें प्रज्वलित झाला असतां त्याच्या दीप्तीनें पृथ्वी आणि आकाश ही दोन्हीही ओतप्रोत भरून गेली. ॥ २ ॥

अस्य त्वेषा अजरा अस्य भानवः सुसंदृशः सुप्रतीकस्य सुद्युतः ।

भात्वक्षसु अत्युक्तुर्न सिन्धवो ऽग्ने रेजन्ते असंसन्तो अजराः ॥ ३ ॥

अस्य त्वेषाः अजराः अस्य भानवः सुऽसंदृशः सुऽप्रतीकस्य सुऽद्युतः ।

भाऽत्वक्षसः अति अक्तुः न सिंधवः अग्ने रेजंते असंसंतः अजराः ॥ ३ ॥

ह्याच्या ज्वाला कधीही खंगत नसून नेहमी घवघवीत असतात, आणि ह्या भव्य अग्नीचे किरणही मोठे प्रेक्षणीय आणि देदीप्यमान असतात. चंडकिरणाप्रमाणें ह्याच्याही तेजाच्या लहरी न थकता किंवा निद्रावश न होतां, रात्रीच्या निबिड अंधःकारास भेदून टाकून चोहोंकडे पसरतात. ॥ ३ ॥

यमेरिरे भृगवो विश्ववेदसं नाभा पृथिव्या भुवनस्य मज्मना ।

अग्निं तं गीर्भिर्हिनुहि स्व आ दमे य एकः वस्वो वरुणो न राजति ॥ ४ ॥

यं आऽईरिरे भृगवः विश्वऽवेदसं नाभा पृथिव्या भुवनस्य मज्मना ।

अग्निं तं गीःऽभिः हिनुहि स्वे आ दमे यः एकः वस्वः वरुणः न राजति ॥ ४ ॥

सकल ऐश्वर्याचा स्वामी अशा ज्या अग्नीला भृगुऋषींनी त्रिभुवनांचे बळ खर्च करून स्वर्गांतून आणून पृथ्वीच्या मध्यभागीं वेदीवर प्रस्थापीत केले. तो स्वस्थानी विराजमान झाला असतां त्यास आपल्या स्तुतींनी आपलासा कर. कारण, वरुणाप्रमाणें भगवद्रूप असणारा हा सुद्धां दैवी संपत्तीचा एकटाच प्रभू होय. ॥ ४ ॥

न यो वरा॑य म॒रुता॑मिव स्व॒नः सेने॑व सृ॒ष्टा दि॒व्या यथा॒शनिः॑ ।

अ॒ग्निर्जम्भै॑स्तिग्गि॒तैर॑त्ति॒ भर्व॑ति यो॒धो न शत्रू॒न्स वना॒ न्यृञ्जते ॥ ५ ॥

न यः वराय मरुतांऽइव स्वनः सेनाऽइव सृष्टा दिव्या यथा अशनिः ।

अग्निः जम्भैः तिगितैः अत्ति भर्वति योधः न शत्रून् स वना नि ऋंजते ॥ ५ ॥

मेघांची गर्जना, अथवा धनुष्यापासून सुटलेला बाण किंवा आकाशांतील उल्कापात जसे कोणासही थांबवून धरतां येणार नाहींत, त्याप्रमाणे ह्या अग्नीला कोणी आवरून धरूं म्हणेल तर तें शक्य नाहीं. आपल्या तीक्ष्ण दंष्ट्रांनी

सपाट्यांत येईल ते सर्व हा खाऊन भस्म करून टाकतो व एखाद्या लढवय्या शत्रूवर तुटून पडावा, त्याप्रमाणे अरण्याचीं अरण्यें घेरून गडप करतो. ॥ ५ ॥

कुविन्नो अग्निरुचथस्य वीरसद्वसुष्कुवित्वसुभिः काममावरत् ।

चोदः कुवित्तुतुज्यात्सातये धियः शुचिप्रतीकं तमया धिया गृणे ॥ ६ ॥

कुविन् नः अग्निः उचथस्य वीः असत् वसुः कुवित् वसुऽभिः कामं आऽवरत् ।

चोदः कुवित् तुतुज्यात् सातये धियः शुचिऽप्रतीकं तं अया धिया गृणे ॥ ६ ॥

अमचे स्तोत्रगायन अग्नि मोठ्या कौतुकानें वारंवार गोड करून घेवो. हा दैवीसंपत्तीचा भांडारी, आम्हांस ती संपत्ति वारंवार देऊन आमचा मनोरथ पूर्ण करो. हा प्रेरक आमचे सुविचार अंगिकृत कार्यांत उत्तम तऱ्हेने चालतील असे करो. पवित्रपणाची मूर्तिच अशा त्या अग्नीचे स्तवन मी करतो. ते अशा स्फूर्तिजन्य स्तोत्राच्या द्वारानेंच करतो. ॥ ६ ॥

घृतप्रतीकं व ऋतस्य धूर्षदमग्निं मित्रं न समिधान ऋञ्जते ।

इन्धा॑नो अ॒क्रो वि॒दथे॑षु॒ दीद्य॑च्छु॒क्रव॑र्णा॒मुदु॑ नो यंसते॒ धिय॑म् ॥ ७ ॥

घृतऽप्रतीकं वः ऋतस्य धुःऽसदं अग्निं मित्रं न संऽइधान ऋंजते ।

इंधानः अक्रः विदथेषु दीद्यत् शुक्रऽवर्णां उत् ऊं इति नः यंसते धियम् ॥ ७ ॥

अग्नीची उज्ज्वल कांति घृताने सुशोभितच दिसते. हा सत्यधर्माचा मार्गदर्शक म्हणून तुमच्यासाठी प्रेमळ मित्राप्रमाणें उद्बोधन करून जेव्हां ह्याला भक्तजन सुप्रसन्न करतात तेव्हां आपल्या नेहमींच्या भरधोशानें प्रदीप्त होऊन, सर्व यज्ञमंडपांत दिव्य कांतीनें चमकणारा असा हा अग्नि आमच्या निष्कलंक प्रेमाचें अतिशय कौतुक करतो. ॥ ७ ॥

अप्र॑युच्छ॒न्नप्र॑युच्छद्भिरग्ने शि॒वेभि॑र्नः पा॒युभि॑ः पाहि श॒ग्मैः ।

अद॑ब्धेभि॒रदृ॑पितेभिरि॒ष्टेऽनि॑मिषद्भिः॒ परि॑ पाहि नो॒ जाः ॥ ८ ॥

अप्रऽयुच्छन्न् अप्रऽयुच्छत्ऽभिः अग्ने शिवेभिः नः पायुऽभिः पाहि शग्मैः ।

अदब्धेभिः अदृपितेभिः इष्टे अनिमिषत्ऽभिः परि पाहि नः जाः ॥ ८ ॥

हे अग्निदेवा, तूं भक्तांची कधींही उपेक्षा न करतां आपल्या अमोघ मंगलदायक आणि सुखकर अशा उपायांनी आमचें संरक्षण कर. तुझ्या योजना अशा आहेत कीं त्यांच्यात कोठेंही न्यून म्हणून सांपडणार नाही, त्या कोणासही हाणून पाडता येणार नाहींत, व शिवाय त्यांत कधींही खंड पडत नाही. तर हे परमपूज्य देवा, अशा योजनांनी आमच्या स्वकीयांचे संरक्षण कर. ॥ ८ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १४४ (अग्निः सूक्त)

ऋषि : दीर्घतमाः - देवता : अग्निः - छंद - जगती

एति प्र होता व्रतमस्य माययोर्ध्वां दधानः शुचिपेशसं धियम् ।

अभि स्रुचः क्रमते दक्षिणावृतः या अस्य धाम प्रथमं ह निंसते ॥ १ ॥

एति प्र होता व्रतं अस्य मायया उर्ध्वां दधानः शुचिऽपेशसं धियम् ।

अभि स्रुचः क्रमते दक्षिणाऽआवृतः या अस्य धाम प्रथमं ह निंसते ॥ १ ॥

आपल्या उपासना प्रावीण्याच्या भरांत जेव्हां ऋत्विज ह्या अग्नीची सेवा करण्यास प्रवृत्त होतो, तेव्हां तो आपल्या सर्वांगसुंदर गायनाचे आलाप खड्या सुरांत काढीत असतो. त्याबरोबर अग्नीही प्रेमभराने आहुति देण्यासाठी पुढे केलेल्या पळीकडे उजव्या बाजूस वळतो. कारण सर्वांच्या पूर्वी तीच त्याच्या आसनास भिडून त्याचें चुंबन घेत असते. ॥ १ ॥

अ॒भीमृ॒तस्य॑ दो॒हना॑ अनूषत॒ योनौ॑ दे॒वस्य॒ सद॑ने॒ परी॑वृताः ।

अ॒पामु॒पस्थे॒ विभृ॑तो॒ यदाव॑स॒दध॑ स्व॒धा अ॑धय॒द्याभि॒रीय॑ते ॥ २ ॥

अभि ईं ऋतस्य दोहनाः अनूषत योनौ देवस्य सदने परिऽवृताः ।

अपां उपऽस्थे विऽभृतः यत् आ अवसत् अध स्वधाः अधयत् याभिः ईयते ॥ २ ॥

सत्यधर्माचे प्रवाह आपल्या उद्‌गमस्थानांत म्हणजे देवाच्या निवासस्थानांत दृग्गोचर झाले. त्यांनीही अग्नीचा गौरव केला. स्वर्गंगेच्या अंकावर लीलेने क्रीडा करीत असतां ह्या अग्नीरूप बालकानें ईश्वरी तेजाचें पान केले, त्यामुळेंच त्याची आतां सर्वत्र प्रार्थना होत असते. ॥ २ ॥

युयू॑षतः॒ सव॑यसा॒ तदिद्वपुः॑ समा॒नमर्थं॑ वि॒तरि॑त्रता मि॒थः ।

आदीं॒ भगो॒ न हव्यः॒ सम॒स्मदा वोळ्हु॒र्न र॒श्मीन्सम॑यंस्त॒ सार॑थिः ॥ ३ ॥

युयूषतः सऽवयसा तत् इत् वपुः समानं अर्थं विऽतरित्रता मिथः ।

आत् ईं भगः न हव्यः सं अस्मत् आ वोळ्हुः न रश्मीन् सं अयंस्त सारथिः ॥ ३ ॥

एकच उद्देश साधण्यासाठी दोघेही परस्पर आतुर झालेले असून दोघांचाही उत्साह सारखाच. तेव्हां अग्नीचें तें अपूर्व रूप प्रकट व्हावें म्हणून दोघेही प्रयत्न करतात. अर्थात् अमच्या भाग्याचे निधान हेंच अशा भावनेनें आम्हींही ह्या अग्नीचा धांवा करावा हें अगदीं योग्य, कारण घोड्याचा लगाम हाती असावा त्याप्रमाणें आमच्या नशीबाचीं सूत्रें ह्याच सूत्रधाराच्या हातीं असतात. ॥ ३ ॥

यमीं द्वा सवयसा सपर्यतः समाने योना मिथुना समोकसा ।

दिवा न नक्तं पलितो युवाजनि पुरू चरन्नजरो मानुषा युगा ॥ ४ ॥

यं ईं द्वा सऽवयसा सपर्यतः समाने योना मिथुना संऽओकसा ।

दिवा न नक्तं पलितः युवा अजनि पुरु चरन्न् अजरः मानुषा युगा ॥ ४ ॥

ज्या अग्नीची उपासना दोघेही ऋत्विज एकाच घरांत राहणारे एकाच वेदीवर जोडीने सारख्याच उत्साहानें करतात; तो हा अग्नि दिवसा काय किंवा रात्री काय, नेहमींच तरुण असणारा हा शुभ्र तेजस्वी अग्नि पहा अवतीर्ण झाला आहे. आणि मनुष्य जातीची कित्येक युगें होऊन जातील, परंतु हा कधीही जराग्रस्त होणार नाहीं. ॥ ४ ॥

तमीं हिन्वन्ति धीतयो दश व्रिशो देवं मर्तास ऊतये हवामहे ।

धनोरधि प्रवत आ सः ऋण्वत्यभिव्रजद्भि र्वयुना नवाधित ॥ ५॥

तं ईं हिन्वंति धीतयः दश व्रिशः देवं मर्तासः ऊतये हवामहे ।

धनोः अधि प्रऽवतः आ सः ऋण्वति अभिव्रजत्ऽभिः वयुना नवा अधित ॥ ५ ॥

ध्यानयुक्त स्तोत्रांनी दहा वेळां प्रार्थना करतों, ती याचीच. आणि आम्ही मर्त्य मानव संरक्षणार्थ हांक मारतों, त्याही ह्या भगवंतालाच. हा कमानदार अशा आकाशांतून सोसाट्यानें खाली येतो, आणि आपलें स्वागत करणाऱ्या भक्तांस बरोबर घेऊन जगांत अपूर्व ज्ञानाचा प्रसार करतो. ॥ ५ ॥

त्वं ह्यग्ने दि॒व्यस्य॒ राज॑सि॒ त्वं पार्थि॑वस्य पशु॒पा इ॑व॒ त्मना॑ ।

एनी॑ त ए॒ते बृ॑ह॒ती अ॑भि॒श्रिया॑ हिर॒ण्ययी॒ वक्व॑री ब॒र्हिरा॑शाते ॥ ६ ॥

त्वं हि अग्ने दिव्यस्य राजसि त्वं पार्थिवस्य पशुपाःऽइव त्मना ।

एनी इति ते एते इति बृहती इति अभिऽश्रिया हिरण्ययी इति वक्वरी इति बर्हिः आशाते इति ॥ ६ ॥

हे अग्निदेवा, ह्या आकाशांतील भुवनांचा राजा एक तूंच आहेस व ह्या भूगोलाचाही राजा तूंच. एखादा गोपाल जसा गाईंस वळवितो त्याप्रमाणें तूं स्वतः ह्या दोन्ही लोकांवर सत्ता चालवितोस. हे पृथ्वी वगैरे गोल येवढे

प्रचंड, शुभ्रवर्ण, तेजःपुंज, नाशरहित आणि भ्रमणशील असे जरी आहेत; तरी ह्या अग्नीच्या कुशासनाला सुद्धां जेमतेमच पुरतात. ॥ ६ ॥

अग्ने जुषस्व प्रति हर्य तद्वचो मन्द्र स्वधाव ऋतजात सुक्रतः ।

यः विश्वतः प्रत्यङ्ङ्सि दर्शतः रण्वः संदृष्टौ पितुमाँ इव क्षयः ॥ ७ ॥

अग्ने जुषस्व प्रति हर्य तत् वचः मंद्र स्वधाऽव ऋतऽजात सुक्रतो इति सुऽक्रतो ।

यः विश्वतः प्रत्यङ् असि दर्शतः रण्वः संऽदृष्टौ पितुमान्ऽइव क्षयः ॥ ७ ॥

हे अग्निदेवा, तूं प्रसन्न होऊन ह्या आमच्या स्तवनानें आनंदभरीत हो. हे अग्ने, तूं आनंदमय, स्वतंत्र, सद्धर्मप्रभव आणि परमप्रज्ञ आहेस. तुझे दर्शन होतांच सर्व दिशांनी तूं भक्तसन्मुखच होतोस, आणि सर्व समृद्धींनी युक्त अशा राजवाड्याप्रमाणें सर्व दिशांनी तूं भक्ताच्या सन्मुख होत असतोस. ॥ ७ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १४५ (अग्निः सूक्त)

ऋषि : दीर्घतमाः - देवता : अग्निः - छंद - जगती

तं पृच्छता स: जगामा स: वेद स चिकित्वाँ ईयते सा न्वीयते ।

तस्मिंन्त्सन्ति प्रशिषस्तस्मिन्निष्टय: स: वाजस्य शवस: शुष्मिणस्पतिः ॥ १ ॥

तं पृच्छत स: जगाम स: वेद स: चिकित्वान् ईयते स: नु ईयते ।

तस्मिन् संति प्रऽशिषः तस्मिन्न् इष्टयः स: वाजस्य शवस: शुष्मिणः पतिः ॥ १ ॥

हा पहा अग्नि इकडेच येत आहे. त्यालाच विचारा. त्याला सर्व गोष्टींची माहिती असते, तो सर्वज्ञ आहे. सगळे त्याचींच आर्जवे करतात व प्रार्थना करतात. सर्व शास्त्र नियम ह्याच्या ठिकाणी, सर्व यज्ञयागही त्याच्याचमध्यें, पवित्र सामर्थ्याचा, सर्व प्रतापांचा आणि प्रतापी पुरुषांचाही अधिपति तोच आहे. ॥ १ ॥

तमित् पृच्छन्ति न सिमो वि पृच्छति स्वेनेव धीरो मनसा यदग्रभीत् ।

न मृष्यते प्रथमं नापरं वचोऽस्य क्रत्वा सचते अप्रदृपितः ॥ २ ॥

तं इत् पृच्छंति न सिमः वि पृच्छति स्वेनऽइव धीरः मनसा यत् अग्रभीत् ।

न मृष्यते प्रथमं न अपरं वचः अस्य क्रत्वा सचते अप्रऽदृपितः ॥ २ ॥

कांहि विचारणें असेल तर ह्यालाच विचारतात. परंतु वाटेल तो मनुष्य त्याला प्रश्न करूं शकेल असें मात्र नाहीं. फक्त साधु पुरुष मात्र त्याच्या स्वतःच्या मनांत जो विचार येईल, त्याप्रमाणें आपलें हृद्गत त्याला विचारूं शकतो. तो महात्मा अग्नीनें सांगितलेला पुढचा व मागचा असे एकूण एक शब्द न विसरतां ध्यानांत धरून अग्नीच्याच सद्बुद्धिस अनुसरून चालत असतो. ॥ २ ॥

तमिद्गच्छन्ति जुह्वस्तमर्वतीर्विश्वान्येकः शृणवद्वचांसि मे ।

पुरुप्रैषस्ततुरिर्यज्ञसाधनोऽच्छिद्रोतिः शिशुरादत्त सं रभः ॥ ३ ॥

तं इत् गच्छंति जुह्वः तं अर्वतीः विश्वानि एकः शृणवत् वचांसि मे ।

पुरुऽप्रैषः ततुरिः यज्ञऽसाधनः अच्छिद्रऽऊतिः शिशुः आ अदत्त सं रभः ॥ ३ ॥

घृताहुतींनी भरलेल्या पळ्या त्याच्याचकडे जातात. स्फूर्तिजन्य स्तुतिस्तोत्रांचे स्थानही तोच. आम्ही केलेल्या सर्व विनवण्याही त्याच्याच कानीं पडोत. हा नाना प्रकारांच्या प्रार्थनांचा स्वीकार करणारा, जयशाली, यज्ञ यथासांग पूर्ण करणारा, आणि हा बालरूप अग्नि आपल्या जोराची चुणुक प्रकट करूं लागला आहे. ह्यांचे कृपाछत्र असें पूर्ण आहे कीं, त्यांत दोष काढणें अगदी अशक्य आहे. ॥ ३ ॥

उ॒प॒स्थायं॑ चरति॒ यत्स॒मार॑त स॒द्यो जा॒तस्त॑त्सार॒ युज्ये॑भिः ।

अ॒भि श्वा॒न्तं मृ॑शते ना॒न्द्ये मु॒दे यदीं॒ गच्छ॑न्त्यु॒श॒तीर॑पिष्ठि॒तम् ॥ ४ ॥

उपऽस्थायं चरति यत् संऽआरत सद्यः जातः तत्सार युज्येभिः ।

अभि श्वांतं मृशते नांद्ये मुदे यत् ईं गच्छंति उशतीः अपिऽस्थितम् ॥ ४ ॥

अग्नि आपले सर्व अंग आवरून घेतो, तेव्हां मात्र तो आजुबाजूस हलके हलके संचार करतो. परंतु नवीन प्रकट होतो, तेव्हां आपल्या परिवारासहवर्तमान एकदम झपाट्यानें निघून जातो. पण अग्नि प्रकट झाल्याबरोबर

प्रेमभरानें जेव्हां त्याची स्तुति करावी तेव्हां मात्र जवळ येऊन, शिणलेल्या भक्तजनांस आनंदाचे व प्रेमाचे भरतें यावे म्हणून, तो त्याच्या पाठीवरून हात फिरवतो. ॥ ४ ॥

स ईं मृगो अप्यो वनर्गुरुप त्वच्युपमस्यां नि धायि ।

व्यब्रवीद्वयुना मर्त्येभ्योऽग्निर्विद्वाँ ऋतचिद्धि सत्यः ॥ ५ ॥

स ईं मृगः अप्यः वनर्गुः उप त्वचि उपऽमस्यां नि धायि ।

वि अब्रवीत् वयुना मर्त्येभ्यः अग्निः विद्वान् ऋतऽचित् धि सत्यः ॥ ५ ॥

हाए मेघोदकांत किंवा अरण्यांत असतो, तेव्हां एखाद्या वन्य श्वापदाप्रमाणेंउग्र दिसतो खरा परंतु आता आकाश आणि पृथ्वीवरील वेदीच्या उत्कृष्ट पृष्ठभागावर त्याची स्थापना केलेली आहे. मनुष्यास सद्धर्माचें ज्ञान त्यानेंच प्रथम शिकविले. कारण, तो सर्वज्ञ असून परम धर्माचा शास्ता आणि सत्याची केवळ मूर्तिच होय. ॥ ५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १४६ (अग्निः सूक्त)

ऋषि : दीर्घतमाः - देवता : अग्निः - छंद - त्रिष्टुप्

त्रिमूर्धानं सप्तरश्मिं गृणीषेऽनूनमग्निं पित्रोरुपस्थे ।

निषत्तमस्य चरतः ध्रुवस्य विश्वा दिवो रोचनापप्रिवांसम् ॥ १ ॥

त्रिऽमूर्धानं सप्तऽरश्मिं गृणीषे अनूनं अग्निं पित्रोः उपऽस्थे ।

निऽसत्तं अस्य चरतः ध्रुवस्य विश्वा दिवः रोचना आपप्रिऽवांसम् ॥ १ ॥

अग्नीची मस्तकें तीन प्रकारची आणि किरण सात प्रकारचे असून त्याच्या स्वरूपांत न्यून म्हणून सांपडावयाचेंच नाही. तो जगाच्या आईबापाच्या सन्निध बसलेला आहे, अशा अग्नीचें मी गुणसंकीर्तन करतो पहा. त्याने दिसण्यांत चल परंतु स्वतः अचल अशा आकाशाचा तेजोरूप आणि विस्तीर्ण प्रदेश कसा ओतप्रोत भरून टाकला आहे. ॥ १ ॥

उक्षा महाँ अभि ववक्ष एने अजरस्तस्थावितऊतिर्ऋष्वः ।

उर्व्याः पदः नि दधाति सानौ रिहन्त्यूधौ अरुषासौ अस्य ॥ २ ॥

उक्षा महान् अभि ववक्षे एने इति अजरः तस्थौ इतःऽऊतिः ऋष्वः ।

उर्व्याः पदः नि दधाति सानौ रिहंति ऊधः अरुषासः अस्य ॥ २ ॥

वीर्यभराने स्फुरण पावणाऱ्या ह्या महान अग्नीनें आकाश आणि पृथ्वी ह्या दोहोंनाही केव्हांच घेरून टाकले. जरारहित आणि उदारचरित अग्नि येथपासून पसरत पसरत आकाशापर्यंत जाऊन भिडला, तोंच त्याच्या आरक्त शिखा मेघरूप गाईच्या कासेस जाऊन चाटूं लागल्या. ॥ २ ॥

समानं वत्समभि सञ्चरन्ती विष्वग्धेनू वि चरतः सुमेके ।

अनपवृज्याँ अध्वनो मिमाने विश्वान्केताँ अधि महो दधाने ॥ ३ ॥

समानं वत्सं अभि संचरंती विष्वक् धेनु इति वि चरतः सुऽमेके ।

अनपऽवृज्याँ अध्वनः मिमाने इति विश्वान् केतान् अधि महः दधाने इति ॥ ३ ॥

त्या दोन्ही मनोहर धेनू आपल्या वासराभोंवती चक्कर मारीत मारीत एकामागून एक अशा निघून जातात व जातांच त्याचे मार्ग निष्कलंक करून ठेवतात; कारण त्यांचे एकंदर लक्ष (त्यांच्या वासराकडे) त्या सर्वश्रेष्ठ अग्निकडे लागलेले असते. ॥ ३ ॥

धीरा॑सः प॒दं क॒वयो॑ नयन्ति॒ नाना॑ हृ॒दा रक्ष॑माणा अजु॒र्यम् ।

सिषा॑सन्तः॒ पर्य॑पश्यन्त॒ सिन्धु॑मा॒विरे॑भ्यो अभव॒त् सूर्यो॒ नॄन् ॥ ४ ॥

धीरासः पदं कवयः नयंति नाना हृदा रक्षमाणा अजुर्यम् ।

सिषासंतः परि अपश्यंत सिंधुं आविः एभ्यः अभवत् सूर्यः नॄन् ॥ ४ ॥

ज्ञाते ऋषि अग्नीला त्याच्या स्वस्थानाकडे नेतात व तेथें खऱ्या कळवळ्यानें योजलेल्या नाना प्रकारच्या युक्तिप्रयुक्तींनी त्या जरारहित अग्नीला तेथेंच ठेऊन घेतात. त्यायोगानें उत्कंठेने सेवा करणाऱ्या त्या ऋषिवर्यांनी आकाशरूप सागराकडे दृष्टि फेंकतांच ह्या ऋषींच्यामुळें मर्त्यजनांकरितां सूर्य प्रकट झाला. ॥ ४ ॥

दि॒दृ॒क्षेण्यः॒ परि॒ काष्ठा॑सु॒ जेन्य॑ ई॒ळेन्यो॑ म॒हो अर्भा॑य जी॒वसे॑ ।

पु॒रु॒त्रा यद॒भ॑व॒त्सूरहै॑भ्यो॒ गर्भे॑भ्यो म॒घवा॑ वि॒श्वद॑र्शतः ॥ ५ ॥

दिदृक्षेण्यः परि काष्ठासु जेन्यः ईळेन्यः महः अर्भाय जीवसे ।

पुरुऽत्रा यत् अभवत् सूः अह एभ्यः गर्भेभ्यः मघऽवा विश्वऽदर्शतः ॥ ५ ॥

कोणत्याही स्थळी दर्शन घेण्यास योग्य असा कोणी असेल तर हीच विभूति होय. सर्व लहान थोरांनी दीर्घायुष्य प्राप्त्यर्थ स्तवन करून ह्यालाच प्रसन्न केले पाहिजे; कारण हा सर्वरक्षक, महोदार, सर्वांना दर्शन देणारा असा अग्नि ह्या सर्व जीवांचा पिता होय. ॥ ५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १४७ (दीर्घतमस् जन्मकथा सूक्त)

ऋषि : दीर्घतमाः - देवता : अग्निः - छंद - त्रिष्टुप्

कुथा ते अग्ने शुचयन्त आयोर्ददाशुर्वाजेभिराशुषाणाः ।

उभे यत्तोके तनये दधाना ऋतस्य सामन्न् रणयन्त देवाः ॥ १ ॥

कथा ते अग्ने शुचयंत आयोः ददाशुः वाजेभिः आशुषाणाः ।

उभे इति यत् तोके इति तनये दधानाः ऋतस्य सामन् रणयंत देवाः ॥ १ ॥

हे अग्निदेवा, पुण्यप्रभावानें तेजःपुंज आणि तूं परमात्मा म्हणून, तुला अंतःकरणपूर्वक भजणारे असे भक्तजन तुझी सेवा यज्ञांनी कशी करतात तें कृपा करून आम्हांस सांग. म्हणजे त्यायोगानें पुत्रपौत्र असे दोन्हीही आम्हांस देणारे देव आमच्या धर्माचरणानें संतुष्ट होतील. ॥ १ ॥

बोधा मे अस्य वचसो यविष्ठ मंहिष्ठस्य प्रभृतस्य स्वधावः ।

पीयति त्वो अनु त्वो गृणाति वन्दारुस्ते तन्वं वन्दे अग्ने ॥ २ ॥

बोधा मे अस्य वचसः यविष्ठ मंहिष्ठस्य प्रऽभृतस्य स्वधाऽवः ।

पीयति त्वः अनु त्वः गृणाति वंदारुः ते तन्वं वंदे अग्ने ॥ २ ॥

हवींनी संतुष्ट होणाऱ्या हे अत्यंत तरुण अग्निदेवा, हे माझे स्तोत्र कृपा करून ऐक. त्यांत औदार्य वर्णन केलें असून पद्यरचनाही मनोरम आहे. कोणी निंदोत वा वंदोत, पण हे अग्ने, मी मात्र तुझा सेवक तूं जो सर्ववंद्य देव त्या तुज्यापुढें नम्र होणारच. ॥ २ ॥

ये पायवौ मामतेयं ते अग्ने पश्यन्तो अन्धं दुरितादरक्षन् ।

ररक्ष तान्त्सुकृतौ विश्ववेदा दिप्सन्त इद्रिपवो नाह देभुः ॥ ३ ॥

ये पायवः मामतेयं ते अग्ने पश्यंतः अंधं दुःऽइतात् अरक्षन् ।

ररक्ष तान् सुऽकृतः विश्वऽवेदा दिप्संतः इत् रिपवः न अह देभुः ॥ ३ ॥

तुझ्या आज्ञांकित सेवकांनी त्या ममतेच्या अंध असलेल्या पुत्राला पहातांच त्याचें त्या दुःखापासून रक्षण केले. हे परम बुद्धिमान भगवंता, त्या भक्ताचे तूं अशा रीतीनें रक्षण केलेंस म्हणून, मनांत नुकसान करावयाचें असतांही शत्रु त्या भक्तजनाचें कांहीएक वांकडे करूं शकले नाहींत. ॥ ३ ॥

यो नौ अग्ने अररिवाँ अघायुररातीवा मर्चयति द्वयेन ।

मन्त्रौ गुरुः पुनरस्तु सो अस्मा अनु मृक्षीष्ट तन्वं दुरुक्तैः ॥ ४ ॥

यः नः अग्ने अररिऽवान् अघऽयुः अरातिऽवा मर्चयति द्वयेन ।

मंत्रः गुरुः पुनः अस्तु सः अस्मै अनु मृक्षीष्ट तन्वं दुःऽउक्तैः ॥ ४ ॥

हे अग्ने, जो कोणी नीच मनुष्य आपण स्वतः भक्ति करीत नाही तो नाहींच, पण सज्जनांना मात्र पाण्यांत पाहतो, आणि कपट लढवून आम्हांस फसविण्याचा घाट घालतो. अशा दुरात्म्याचा दुष्ट बेत उलट त्याच्याच गळ्यांत येतो आणि त्याच्या शिव्याशापांनी त्याचा स्वतःचाच निःपात होतो. ॥ ४ ॥

उत वा यः सहस्य प्रविद्वान्मर्तो मर्तं मर्चयति द्वयेन ।

अतः पाहि स्तवमान स्तुवन्तमग्ने माकिर्नो दुरिताय धायीः ॥ ५ ॥

उत वा यः सहस्य प्रऽविद्वान् मर्तः मर्तं मर्चयति द्वयेन ।

अतः पाहि स्तवमान स्तुवंतं अग्ने माकिः नः दुःऽइताय धायीः ॥ ५ ॥

तसेंच हे परमप्रतापी अग्निदेवा, तुझें स्तवन सर्वत्र होत असतें. जर तो मनुष्य जाणूनबुजून दुसऱ्याचा कपटानें घात करूं पाहील, अशा मनुष्याच्या तावडींतून तूं आपल्या गुणसंकीर्तन करणाऱ्या भक्ताचा बचाव कर, आणि आम्हांवर अनर्थ ओढवेल असें होऊं देऊं नको. ॥ ५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १४८ (अग्निः सूक्त)

ऋषि : दीर्घतमाः - देवता : अग्निः - छंद - त्रिष्टुप्

मथी॒द्यदीं॑ वि॒ष्टो मा॑त॒रिश्वा॒ होता॑रं वि॒श्वाप्सुं॑ वि॒श्वदे॑व्यम् ।

नि यं द॒धुर्म॑नु॒ष्यासु वि॒क्षु स्व१॒॑र्ण चि॒त्रं वपु॑षे वि॒भाव॑म् ॥ १ ॥

मथीत् यत् ईं विष्टः मातरिश्वा होतारं विश्वऽअप्सुं विश्वऽदेव्यम् ।

नि यं दधुः मनुष्यासु विक्षु स्वः न चित्रं वपुषे विभाऽवम् ॥ १ ॥

जो यज्ञाचा आचार्य, सर्व प्रकारची स्वरूपें धारण करणारा, सर्व देवांचे मूर्त स्वरूप आहे, अशा अग्नीला जेव्हां स्वाधीनचित्त अशा मातरिश्वानें मंथन करून प्रकट केलें तेव्हांपासून देदीप्यमान सूर्याप्रमाणेंच ही एक अद्‌वितीय व तेजस्वी विभूति म्हणून मनुष्य लोकांत त्याची स्थापना झाली. ॥ १ ॥

द॒दा॒नमिन्न द॑दभन्त॒ मन्मा॒ग्निर्वरू॑थं॒ मम॒ तस्य॑ चाकन् ।

जु॒षन्त॒ विश्वा॑न्यस्य॒ कर्मोप॑स्तुतिं॒ भर॑माणस्य का॒रोः ॥ २ ॥

ददानं इत् न ददभंत मन्म अग्निः वरूथं मम तस्य चाकन् ।

जुषंत विश्वानि अस्य कर्म उपऽस्तुतिं भरमाणस्य कारोः ॥ २ ॥

जो खरोखर भक्तिभावानें देवाची प्रार्थना करतो, त्याची हानि कोणीही करूं शकत नाही. अग्नीला अशा प्रकारची प्रार्थना मनापासून आवडते. त्यामुळेंच माझें चिलखत बनून तो रक्षण करीत आहे. लोकांस धर्मरत भक्तांचे सत्कर्म, सेवा इत्यादि सर्व कांही मिळतच असते. ॥ २ ॥

नित्ये चिन्नु यं सदने जगृभ्रे प्रशस्तिभिर्दधिरे यज्ञियासः ।

प्र सू नयन्त गृभयन्त इष्टावश्वासो न रथ्यो रारहाणाः ॥ ३ ॥

नित्ये चित् नु यं सदने जगृभ्रे प्रशस्तिऽभिः दधिरे यज्ञियासः ।

प्र सु नयंत गृभयंत इष्टौ अश्वासः न रथ्यः रारहाणाः ॥ ३ ॥

पूज्य ऋषिजनांना, अग्नि त्यांच्या शाश्वत स्थानींच सांपडला मग मोठ्या गौरवानें त्यांनी त्याची वेदीवर स्थापना केली. नंतर त्याला आदरानें ते यज्ञामध्यें घेऊन गेले. परंतु रथास जोडलेल्या अश्वाप्रमाणें ते मोठ्या झपाट्यानें गेले. ॥ ३ ॥

पुरूणि दुस्मो नि रिणाति जम्भैराद्रोचते वन आ विभावा ।

आदस्य वातो अनु वाति शोचिरस्तुर्न शर्यामसन्म् अनु द्यून् ॥ ४ ॥

पुरूणि दस्मः नि रिणाति जंभैः आत् रोचते वने आ विभाऽवा ।

आत् अस्य वातः अनु वाति शोचिः अस्तुः न शर्यां असनां अनु द्यून् ॥ ४ ॥

अग्नि हा अघटित चमत्कार घडवून आणतो, परंतु त्याचप्रमाणें शेंकडो पदार्थ आपल्या दाढेखालीं घालून रगडूनही टाकतो. आणि लोकांचे डोळे दिपवून सोडून सर्व अरण्य प्रज्वलित करतो. अशा स्थितींत वारासुद्धां एखाद्या धनुर्धरानें वेगानें सोडलेल्या बाणाला जसा साहाय्यभूत होतो; त्याप्रमाणें दररोज अग्नीच्या ज्वालांनी अनुकूल असाच वहात असतो. ॥ ४ ॥

न यं रिपवो न रिषण्यवो गर्भे सन्तं रेषणा रेषयन्ति ।

अन्धा अपश्या न दभन्नभिख्या नित्यास ईं प्रेतारो अरक्षन् ॥ ५ ॥

न यं रिपवः न रिषण्यवः गर्भे संतं रेषणाः रेषयंति ।

अंधाः अपश्याः न दभन् अभिऽख्या नित्यास ईं प्रेतारः अरक्षन् ॥ ५ ॥

अग्नि गर्भावस्थेंत जरी असला तरी त्याला कोणीही शत्रु, कोणीही घातकी किंवा कोणीही अत्याचारी पातकी उपसर्ग देऊं शकत नाही. तो प्रकट झाल्यावर त्याच्या जाज्वल्य तेजानें ते आंधळे होऊन त्यांना दिसेनासे होतें, मग अर्थात् ते उपद्रव देऊं शकतच नाहींत. पण निरंतर उपासनानिष्ठ भक्तजन मात्र त्याला अंतःकरणांत सांठवून ठेवीत असतात. ॥ ५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १४९ (अग्निः सूक्त)

ऋषि : दीर्घतमाः - देवता : अग्निः - छंद - विराट्

म॒हः स रा॒य एष॑ते॒ पति॒र्दन्नि॒न इ॒नस्य॒ वसु॑नः प॒द आ ।

उप॒ ध्रज॑न्त॒मद्र॑यो वि॒धन्नित् ॥ १ ॥

महः सः राय एषते पतिः दन् इनः इनस्य वसुनः पदे आ ।

उप ध्रजंतं अद्रयः विधन् इत् ॥ १ ॥

हा पहा दिव्य संपत्तीचा उदार अधिपति, राजांचाही राजा, ह्या पवित्र निधीच्या स्थानाकडेस, इकडेच येत आहे. तेव्हां आतां त्याचें आगमन होत आहे, इतक्यांत हे सोमप्रस्तर त्याच्याअ सेवेस तयार असोत. ॥ १ ॥

स यो वृषा॑ न॒रां न रोद॑स्यो॒ः श्रवो॑भि॒रस्ति॑ जी॒वपी॑तसर्गः ।

प्र यः स॑स्रा॒णः शि॑श्री॒त योनौ॑ ॥ २ ॥

सः यः वृषा नरां न रोदस्योः श्रवःऽभिः अस्ति जीवपीतऽसर्गः ।

प्र यः सस्राणः शिश्रीत योनौ ॥ २ ॥

हा अग्नि ह्या भूतलावरील लोकांचा आणि तसाच अंतराळांतील भुवनांचा आपल्या कीर्तिनें धुरीण म्हणून गाजत आहे. ज्याच्या किरणरूप सृष्टिचें पान यच्चावत् जीव निरंतर करीत असतात असा हा अग्नि पुढे होऊन आपल्या आसनावर आरोहण करीत आहे. ॥ २ ॥

आ यः पुर॒ं नार्मि॑णी॒मदी॑दे॒दत्यः॑ क॒विर्न॑भ॒न्यो३॒॑नार्वा॑ ।

सूरो॒ न रु॑रु॒क्वाञ्छ॒तात्मा॑ ॥ ३ ॥

आ यः पुरं नार्मिणीं अदीदेत् अत्यः कविः नभन्यः न अर्वा ।

सूरः न रुरुक्वान् शतऽआत्मा ॥ ३ ॥

ज्याने नार्णिमीच्या तटबंदी शहरावर उज्वल प्रकश पाडला तो हा महाज्ञानी अग्नि, आकाश दुमदुमून सोडणारा जणो चपल अश्वच आणि सूर्याप्रमाणें तेजःपुंज असा अग्नि, आत्मशक्तीनें शतपट भरून राहिला आहे. ॥ ३ ॥

अ॒भि द्‌वि॒जन्मा॒ त्री रो॑च॒नानि॒ विश्वा॒ रजां᳚सि शुशुचा॒नो अ॑स्थात् ।

होता॒ यजि॑ष्ठो अ॒पां स॒धस्थे॑ ॥ ४ ॥

अभि द्विऽजन्मा त्री रोचनानि विश्वा रजांसि शुशुचानः अस्थात् ।

होता यजिष्ठः अपां सधऽस्थे ॥ ४ ॥

दोन ठिकाणी प्रकट होणारा व तिन्ही दिव्य लोक आणि सर्व अंतराळ प्रकाशानें ओतप्रत भरून सोडणारा असा जो हा अत्यंत पूज्य आचार्य तो स्वर्गंगेच्या वसतिस्थानांत वास करीत असतो. ॥ ४ ॥

अ॒यं स होता॒ यो द्वि॒जन्मा॒ विश्वा॑ द॒धे वार्या॑णि श्रव॒स्या ।

मर्तो॒ यो अ॑स्मै सु॒तुको॑ द॒दाश॑ ॥ ५ ॥

अयं सः होता यः द्विऽजन्मा विश्वा दधे वार्याणि श्रवस्या ।

मर्तः यः अस्मै सुऽतुकः ददाश ॥ ५ ॥

तो हा अग्नि दोन्ही ठिकाणी प्रकट होणारा असा यज्ञाचा आचार्य होय. खऱ्या भक्तानें प्रेरित होऊन, जो जो भक्त ह्याला हविर्भाग अर्पण करतो त्याला हा अग्नि अत्युत्कृष्ट संपत्ति आणि जगद्विख्यात सत्कीर्ति ह्यांचा लाभ करून देतो. ॥ ५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १५० (अग्निः सूक्त)

ऋषि : दीर्घतमाः - देवता : अग्निः - छंद - उष्णिक्

पु॒रु त्वा॑ दा॒श्वान्वो॑चे ऽ॒रिर॑ग्ने॒ तव॑ स्वि॒दा । तो॒दस्ये॑व शर॒ण आ म॒हस्य॑ ॥ १ ॥

पुरु त्वा दाश्वान् वोचे अरिः अग्ने तव स्वित् आ । तोदस्यइव शरणे आ महस्य ॥ १ ॥

अग्निदेवा, मी तुजपाशी पुष्कळ मागणारच, कारण मी तुझा थोर आणि अनन्य भक्त म्हणून तुझ्या कृपाछत्राखाली असलो म्हणजे अत्यंत थोर अशा सतकर्मप्रवर्तकाच्या छत्राखाली असल्याप्रमाणेंच आहे. ॥ १ ॥

व्यनिनस्य धनिनः प्रहोषे चिदररुषः । कुदा चुन प्रजिगतो अदेवयोः ॥ २ ॥

वि अनिनस्य धनिनः प्रऽहोषे चित् अररुषः । कदा चन प्रऽजिगतः अदेवऽयोः ॥ २ ॥

तर कृपा कर आणि जो नास्तिक, धनाढ्य असूनही यज्ञ न करणारा आणि देव पराङ्मुख आहे अशा मनुष्याने केवढाही आक्रोश केला तरी तिकडे ढुंकून सुद्धां पाहूं नको. ॥ २ ॥

स चुन्द्रो विप्र मर्त्यो मुहः व्राधन्तमो दिवि । प्रप्रेत्ते अग्ने वुनुषः स्याम ॥ ३ ॥

सः चंद्रः विप्र मर्त्यः महः व्राधन्ऽतमः दिवि । प्रऽप्र इत् ते अग्ने वनुषः स्याम ॥ ३ ॥

हे ज्ञानरूपा, तुझा भक्त चंद्राप्रमाणें आल्हाददायक आणि स्वर्गलोकींच्या श्रेष्ठ पुरुषामध्येंही, त्याचा उत्कर्ष असतो, तर हे अग्ने आम्ही तुझे भक्त सुद्धां असेच सर्वांमध्यें वरिष्ठ व्हावें असें कर. ॥ ३ ॥

ॐ तत् सत्

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १५१ (मित्रावरुणौ सूक्त)

ऋषि : दीर्घतमाः - देवता : मित्रावरुणौ - छंद - जगती

मि॒त्रं न यं शिम्या॒ गोषु॑ ग॒व्यवः॑ स्वा॒ध्यो॑ वि॒दथे॑ अ॒प्सु जीज॑नन् ।

अरे॑जेतां॒ रोद॑सी॒ पाज॑सा गि॒रा प्रति॑ प्रि॒यं य॑ज॒तं ज॒नुषा॒मवः॑ ॥ १ ॥

मित्रं नः यं शिम्या गोषु गव्यवः सुऽआध्यः विदथे अप्ऽसु जीजनन् ॥

अरेजेतां रोदसी इति पाजसा गिरा प्रति प्रियं यजतं जनुषां अवः ॥ १ ॥

ध्यानासक्त पुरुषांनी ज्ञानगोधन लाभाची इच्छा धरून यज्ञप्रसंगी, मित्राप्रमाणें उपकारक अशा प्रिय व पूज्य अग्नीला आपल्या प्रभावानें आकाशोदकापासून प्रकट केलें, तेव्हां त्याच्या द्वेषामुळें आणि गर्जनेमुळें आकाश आणि पृथ्वी हीं चळचळा कापूं लागलीं. कारण, मनुष्यमात्राचें रक्षण आतां कसें होईल ही त्यांना विवंचना पडली. ॥ १ ॥

यद्ध त्यदवां पुरुमीळ्हस्य सोमिनः प्र मित्रासो न दधिरे स्वाभुवः ।

अध क्रतुं विदतं गातुमर्चत उत श्रुतं वृषणा पस्त्यावतः ॥ २ ॥

यत् ह त्यत् वां पुरुऽमीळ्हस्य सोमिनः प्र मित्रासः न दधिरे सुऽआभुवः ॥

अध क्रतुं विदतं गातुं अर्चत उत श्रुतं वृषणा पस्त्यऽवतः ॥ २ ॥

सोमयाग करणाऱ्या पुरुमीळ्हाच्या आज्ञेप्रमाणें चालणाऱ्या ऋत्विजांनी प्रेमळ अंतःकरणानें तुम्हांस तोच हविर्भाग अर्पण केला आहे, तर भक्तीनें तुमचें स्तवन करणाऱ्या भक्तास प्रज्ञा आणि काव्यस्फूर्ति द्या. हे वीरांनो, घरधनी जो यजमान त्याच्या प्रार्थनेकडे लक्ष असूं द्या. ॥ २ ॥

आ वां भूषन्क्षितयः जन्म रोदस्योः प्रवाच्यं वृषणा दक्षसे महे ।

यदी॑मृ॒ताय॒ भर॑थः॒ यदर्व॑ते॒ प्र होत्र॑या॒ शिम्या॑ वीथो अध्व॒रम् ॥ ३ ॥

आ वां भूषन् क्षितयः जन्म रोदस्योः प्रऽवाच्यं वृषणा दक्षसे महे ॥

यत् ईं ऋताय भरथः यत् अर्वते प्र होत्रया शिम्या वीथः अध्वरम् ॥ ३ ॥

हे वीरांनो, तुम्ही अंतराळांतून प्रकट झालांत, तेव्हां उत्कृष्ट कर्तृत्वशक्ति प्राप्त व्हावी म्हणून ह्या तुमच्या अति स्तुत्य अवताराचें रसभरीत वर्णन लोक करीत असतात, आणि भक्तियुक्त यथाविधि केलेल्या यज्ञाचा तुम्ही प्रेमानें स्वीकार केलात म्हणजे ती कर्तृत्वशक्ति धर्मप्रसाराकरितां आणि भक्तांस देण्याकरितांच घेऊनच येतां. ॥ ३ ॥

प्र सा क्षि॒तिर॑सु॒र या महि॑ प्रि॒य ऋता॑वानावृ॒तमा घौ॑षथो बृ॒हत् ।

यु॒वं दि॒वो बृ॑ह॒तो दक्ष॑मा॒भुव॒ं गां न धु॒र्युप॑ युञ्जाथे अ॒पः ॥ ४ ॥

प्र सा क्षितिः असुरा या महि प्रिय ऋतऽवानाउ ऋतं आ घोषथः बृहत् ॥

युवं दिवः बृहतः दक्षं आऽभुवं गां नः धुरि उप युञ्जाथे इति अपः ॥ ४ ॥

ईश्वर स्वरूप मित्रावरुणांनो ज्या लोकांवर तुमची विशेष कृपा असते, तो वैभवास चढतो. धर्मप्रतिपालक देवांनो, आमच्या यज्ञाची अतिशय प्रशंसा करा. महान अशा द्युलोकापासून प्राप्त होणाऱ्या सर्वोत्कृष्ट व कार्यक्षम अशा सामर्थ्याची आणि पुण्यकर्माची सांगड, रथाला बैल जोडल्याप्रमाणें तुम्ही पक्की घालून टाकतां. ॥ ४ ॥

म॒ही अत्र॑ महि॒ना वार॑मृण्वथोऽरे॒णव॒स्तुज॒ आ सद्म॑न्धे॒नवः॑ ।

स्वर॑न्ति॒ ता उ॑प॒रता॑ति॒ सूर्य॒मा नि॒म्रुच॑ उ॒षस॑स्तक्व॒वीरि॑व ॥ ५ ॥

मही इति अत्र महिना वारं ऋण्वथः अरेणवः तुजः आ सद्मन् धेनवः ॥

स्वरंति ताः उपरऽताति सूर्यं आ निऽम्रुच उषसः तक्ववीःऽइव ॥ ५ ॥

आपल्या महिम्यानें तुम्ही ह्या पृथ्वीवरील सर्व स्पृहणीय संपत्तीचा सांठा पुढें मांडून ठेवतां ह्यामुळें निष्कलंक आणि कुशाग्र अशा बुद्धिरूप धेनू आपल्या ठिकाणीं सुखरूप राहतात. आणि आकाश मेघाच्छादित होतें अशा

दिवशी सकाळ संध्याकाळ सूर्यदर्शनासाठी मंजुळ ओरडणाऱ्या तक्कवि पक्ष्याप्रमाणें त्या धेनूही सुस्वर असा काव्य ध्वनी काढीत असतात. ॥ ५ ॥

आ वा॑मृ॒ताय॑ के॒शिनी॑रनूषत॒ मित्र॒ यत्र॒ वरु॑ण गा॒तुमर्च॑थः ।

अव॒ त्मना॑ सृ॒जत॒ं पिन्व॑त॒ं धियो॑ यु॒वं विप्र॑स्य॒ मन्म॑नामिरज्यथः ॥ ६ ॥

आ वा ऋताय केशिनीः अनूषत मित्र यत्र वरुण गातुं अर्चथः ॥

अव त्मना सृजतं पिन्वतं धियः युवं विप्रस्य मन्मनां इरज्यथः ॥ ६ ॥

हे मित्रावरुणांनो, ज्या ज्या यज्ञांत तुम्ही स्वतःच्या उच्च स्वरानें गायन करीत असतां, त्या यज्ञांत मनोहर केशकलापभूषित अशा दिव्यांगना तुमच्या यशाचें वर्णन करीत असतात. तर तुम्ही आपण होऊन आमच्या बुद्धींस प्रेरणा करून त्या विकसित करा, माझ्यासारख्या कवीच्या स्तवनांना स्फूर्ति देणारे तुम्हींच आहांत. ॥ ६ ॥

यो वां॑ य॒ज्ञैः श॑शमा॒नो ह॒ दाश॑ति क॒विर्होता॒ यज॑ति मन्म॒साध॑नः ।

उपाह॒ तं गच्छं॑थो वी॒थो अं॑ध्व॒रमच्छा॒ गिर॑ः सु॒म॒तिं गं॑न्तमस्म॒यू ॥ ७ ॥

यः वा यज्ञैः शशमानः ह दाशति कविः होता यजति मन्मऽसाधनः ॥

उप अह तं गच्छथः वीथः अध्वरं अच्छ गिरः सुमतिं गंतं अस्मयू इति अस्मऽयू ॥ ७ ॥

जो तुमचे स्तवन करून यज्ञद्वारा तुम्हांस हवि अर्पण करतो, व जो कोणी कवि किंवा आचार्य प्रतिभायुक्त स्तवनांनी तुमची उपासना करतो, त्याच्या सन्निध जाऊन तुम्ही त्याच्या यज्ञाचा प्रेमानें स्वीकार करता, तर हे आम्हांवर लोभ करणाऱ्या नित्रवरुणांनो, प्रार्थना आणि खरी भक्ति याच्या योगानें आमच्याकडे या. ॥ ७ ॥

यु॒वां य॒ज्ञैः प्र॑थ॒मा गोभि॑रञ्जत॒ ऋता॑वाना॒ मनं॑सो॒ न प्रयुं॑क्तिषु ।

भरं॑न्ति वां॒ मन्मं॑ना सं॒यता॒ गिरोऽ॑दृप्यता॒ मनं॑सा रे॒वदा॑शाथे ॥ ८ ॥

युवां यज्ञैः प्रथमा गोभिः अंजत ऋतऽवाना मनसः नः प्रऽयुक्तिषु ॥

भरंति वां मन्मना संऽयता गिरः अदृप्यता मनसा रेवत् आशाथे इति ॥ ८ ॥

न्यायप्रवर्तक मित्रावरुणांनो, यज्ञार्थ आणलेल्या गोरसानें मानसिक ध्यानविधीप्रमाणें प्रथम तुमचेंच अर्चन होत असते. भक्तजन आपली अनन्य भक्ति व प्रार्थना ही दोन्ही तुम्हांस एकदमच अर्पण करतात आणि तुम्हींही प्रेमळ अंतःकरणानें दिव्य वैभव घेऊन त्यांच्याजवळ प्राप्त होत असता. ॥ ८ ॥

रेवद्वयो दधाथे रेवदाशाथे नरा मायाभिरितऊति माहिनम् ।

न वां द्यावोऽहभिर्नोत सिन्धवो न देवत्वं पणयो नानशुर्मघम् ॥ ९ ॥

रेवत् वयः दधाथे इति रेवत् आशाथे इति नरा मायाभिः इतऽऊति माहिनम् ॥

न वां द्यावः अहऽभिः न उत सिंधवः न देवत्वं पणयः न आनशुः मघम् ॥ ९ ॥

हे वीरांनो, अप्रतिम तारुण्य ते तुमच्या अंगी असते. अत्युच्च आणि सर्वरक्षक असे जे मोठे ऐश्वर्य तेंही तुम्हींच आपल्या दैवी सामर्थ्यानें आपलेंसे केलेले आहे. म्हणून आकाश, समुद्र किंवा पाणी ह्यांपैकी कोणासही तुमच्या देवत्वाची अगर ऐश्वर्याची बरोबरी केव्हांही करतां आली नाहीं. ॥ ९ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १५२ (मित्रावरुणौ सूक्त)

ऋषि : दीर्घतमाः - देवता : मित्रावरुणौ - छंद - त्रिष्टुप्

यु॒वं वस्त्रा॑णि पीव॒सा व॑साथे यु॒वोरच्छि॑द्रा॒ मन्त॑वो ह॒ सर्गा॑: ।

अवा॑तिरत॒मनृ॑तानि॒ विश्व॑ ऋ॒तेन॑ मित्रावरुणा सचेथे ॥ १ ॥

युवं वस्त्राणि पीवसा वसाथे इति युवोः अच्छिद्रा मंतवः ह सर्गाः ॥

अव अतिरतं अनृतानि विश्वा ऋतेन मित्रावरुणा सचेथे इति ॥ १ ॥

तुम्ही असें आहांत की, तुमची वस्त्रें म्हणजे भरगच्च प्रकाश, तुमचे नेमानेम व तुमची करणी ही कधीच चुकायची नाहींत, कसलीही लबाडी त्मच्यापुढें टिकत नाहीं, कारण हे मित्रावरुणांनो, सत्यधर्मापासून तुम्ही कधी रेंसभरही ढळत नाही. ॥ १ ॥

एतच्चन त्वो वि चिकेतदेषां सत्यो मन्त्रः कविशस्त ऋघावान् ।

त्रिरश्रिं हन्ति चतुरश्रिरुग्रो देवनिदो ह प्रथमा अजूर्यन् ॥ २ ॥

एतच् चन त्वः वि चिकेतत् एषां सत्यः मंत्रः कविऽशस्त ऋघावान् ॥

त्रिःऽअश्रिं हंति चतुःऽअश्रिः उग्रः देवऽनिदः ह प्रथमा अजूर्यन् ॥ २ ॥

ही गोष्ट कोणासही सहज समजेल कीं, मोठमोठे ज्ञानी ऋषि त्याच्या ज्या नेमानेमाची अतिशय स्तुति करीत असतात तें तंतोतंत खरे आणि अगदीं अपरिहार्य असते. शत्रूंचे हत्यार जर त्रिधारी तर ह्यांचे भयंकर चारधारी होऊन त्याचा नायनाट करते व त्याच सपाट्यांत देवनिंदक दुष्टांचा सप्पा पहिल्या प्रथम उडतो. ॥ २ ॥

अपादेति प्रथमा पद्वतीनां कस्तद्वां मित्रावरुणा चिकेत ।

गर्भो भारं भरत्या चिदस्य ऋतं पिपर्त्यनृतं नि तारीत् ॥ ३॥

अपात् एति प्रथमा पत्ऽवतीनां कः तत् वा मित्रावरुणा चिकेत ॥

गर्भः भारं भरति आ चित् अस्य ऋतं पिपर्ति अनृतं नि तारीत् ॥ ३ ॥

हा काय चमत्कार पहा कीं जिला पाय नाहींत तीच तर सर्वांच्यापुढें येते. हे मित्रावरुणांनो, ह्या तुमच्या महिम्याचा पार कोण जाणील ? तुमचा बालरूप अवतार ह्या जगाचा भार वाहतो आणि सत्यधर्माची अभिवृद्धि करून असत्याचा नाश करतो. ॥ ३ ॥

प्र॒यन्त॒मित्परि॑ जा॒रं क॒नीनां॒ पश्या॑मसि॒ नोप॑नि॒पद्य॑मानम् ।

अन॑वपृग्णा॒ वित॑ता॒ वसा॑नं प्रि॒यं मि॒त्रस्य॒ वरु॑णस्य॒ धाम॑ ॥ ४॥

प्रयंतं इत् परि जारं कनीनां पश्यामसि न उपऽनिपद्यमानम् ॥

अनवऽपृग्णा विऽतता वसानं प्रियं मित्रस्य वरुणस्य धाम ॥ ४ ॥

दिव्यांगनांच्या प्रीतीस पात्र झालेला नेहमीं चालत असलेलाच आमच्या दृष्टीस पडतो. त्याला विश्रांती घेतांना आम्ही कधींच पहात नाहीं. त्याची वस्त्रें तेजोरूप असून त्यांचा झोळ एकसारखा दूरवर पसरलेला असतो. मित्राचें व वरुणाचेंही प्रियस्थान तोच. ॥ ४ ॥

अनश्वः जातो अनभीशुरर्वा कनिक्रदत्पतयदूर्ध्वसानुः ।

अचित्तं ब्रह्म जुजुषुर्युवानः प्र मित्रे धाम वरुणे गृणन्तः ॥ ५॥

अनश्वः जातः अनभीशुः अर्वा कनिक्रदत् पतयत् ऊर्ध्वऽसानुः ॥

अचित्तं ब्रह्म जुजुषुः युवानः प्र मित्रे धाम वरुणे गृणंतः ॥ ५ ॥

अश्वाप्रमाणे परंतु अश्वाच्या जातीचा मात्र नव्हे व त्याला लगामही नाही असा हा सूर्य उदय पावतांच गर्जना करीत व ऐटीने छाती उंच करीत करीत एकदम आकाशांत उड्डाण करतो. ह्या चमत्कारामुळे तारुण्याचा निरंतर उपभोग घेणारे देव, मित्रावरुणांच्या ठिकाणी दिसणाऱ्या वैभवाचें आश्चर्य करीत ईश्वराच्या अतर्क्य गुणवर्णनांत गर्क होऊन जातात. ॥ ५ ॥

आ धेनवो मामतेयमवन्तीर्ब्रह्मप्रियं पीपयन्त्सस्मिन्नूधन् ।

पित्वो भिक्षेत वयुनानि विद्वानासाविवासन्नदितिमुरुष्येत् ॥ ६॥

आ धेनवः मामतेयं अवंतीः ब्रह्मऽप्रियं पीपयन् सस्मिन् ऊधन् ॥

पित्वः भिक्षेत वयुनानि विद्वान् आसा आऽविवासन्न् अदितिं उरुष्येत् ॥ ६ ॥

ज्या धेनूंनी माझे म्हणजे ममतापुत्राचें संरक्षण केले त्यांनींच मला उपासनानिष्ठ भक्ताला आपल्या कासेंतील दुग्धरसानें पुष्ट केले आहे. सर्व विद्यापारंगत झाल्यावर मग दिव्यज्ञान भोजन मिळण्याविषयीं त्यांना प्रार्थना करावी. आणि अनादि अनंतावर समक्ष सर्व भार टाकून दुःख मुक्त होण्याची आकांक्षा धरावी. ॥ ६ ॥

आ वां मित्रावरुणा हव्यजुंष्टिं नमंसा देवावर्वसा ववृत्याम् ।

अस्माकं ब्रह्म पृतंनासु सह्या अस्माकं वृष्टिर्दिव्या सुपारा ॥ ७॥

आ वां मित्रावरुणा हव्यऽजुष्टिं नमसा देवौ अवसा ववृत्याम् ॥

अस्माकं ब्रह्म पृतनासु सह्याः अस्माकं वृष्टिः दिव्या सुऽपारा ॥ ७ ॥

हे देवांनो, मित्रावरुणांनो, सेवा आणि भक्ति ह्याच्या आधारावर मी अर्पण केलेल्या हवींचा स्वीकार करण्याकडे तुमचें लक्ष मला वेधतां येऊं द्या. आमची प्रार्थना युद्धांत यशस्वी होवो, आणि दिव्य अशी ज्ञान वृष्टि आम्हांस कल्याणकारक होवो. ॥ ७ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १५३ (मित्रावरुणौ सूक्त)

ऋषि : दीर्घतमाः - देवता : मित्रावरुणौ - छंद - त्रिष्टुप्

यजा॑महे वां म॒हः स॒जोषा॑ ह॒व्येभि॑र्मित्रावरुणा॒ नमो॑भिः ।

घृ॒तैर्घृ॑तस्नू॒ अध॒ यद्वा॑म॒स्मे अ॑ध्व॒र्यवो॒ न धी॒तिभि॒र्भर॑न्ति ॥ १ ॥

यजामहे वा महः सऽजोषा हव्येभिः मित्रावरुणा नमःऽभिः ॥

घृतैः घृतस्नू इति घृतऽस्नू अध यत् वां अस्मे इति अध्वर्यवः न धीतिऽभिः भरंति ॥ १ ॥

मित्रावरुणांनो, तुम्ही समर्थ आहांत, आम्ही सारख्याच प्रेमानें हव्य अर्पण करून आणि नम्रपणानें प्रार्थना करून तुमची सेवा करीत आहोंत. स्वर्गीय घृताचा वर्षाव करणाऱ्या देवांनो, हे आमचे अध्वर्यु तुम्हाला घृताहुतीप्रमाणेंच माननीय स्तोत्रांनी संतुष्ट करीत आहेत. ॥ १ ॥

प्रस्तु॑तिर्वां॒ धाम॒ न प्रयु॑क्ति॒रया॑मि मित्रावरुणा सुवृ॒क्तिः ।

अ॒नक्ति॒ यद्वां॑ वि॒दथे॑षु॒ होता॑ सु॒म्नं वां॑ सू॒रिर्वृ॑षणा॒विय॑क्षन् ॥ २ ॥

प्रऽस्तुतिः वां धाम न प्रऽयुक्तिः अयामि मित्रावरुणा सुऽवृक्तिः ॥

अनक्ति यत् वा विदथेषु होता सुम्नं वां सूरिः वृषणौ इयक्षन् ॥ २ ॥

तुमची उत्कृष्ट स्तुती ही सुद्धां तुमचें ध्यान करण्याप्रमाणेंच एक सामर्थ्य आहे; म्हणून हे मित्रावरुणांनो, मी आपलें हें सुंदर स्तोत्र तुम्हांस अर्पण केले आहे. आचार्य जेव्हां धर्ममंदिरांत नेमका तुमचें भजन करूं लागतो, तेव्हां हे वीरांनो, तुमच्यापासून खऱ्या आनंदाचा लाभ व्हावा अशीच त्या महात्म्याची अपेक्षा असते. ॥ २ ॥

पीपाय धेनुरदितिरृताय जनाय मित्रावरुणा हविर्दे ।

हिनोति यद्वां विदथे सपर्यन्त्स रातहव्यो मानुषो न होता ॥ ३ ॥

पीपाय धेनुः अदितिः ऋताय जनाय मित्रावरुणा हविःऽदे ॥

हिनोति यत् वां विदथे सपर्यन् सः रातऽहव्यः मानुषः नः होता ॥ ३ ॥

मित्रावरुणांनो, यज्ञसभामंदिरांत आचार्यसुद्धां इतर सामान्य मनुष्याप्रमाणेंच हवि देऊन तुमचें अर्चन करून आपल्या अंतःकरणास तुमच्या सेवेला पाठवून देतो, त्या वेळेस चिच्छक्तिरूप धेनू सत्यधर्माच्या वृद्धिसाठी व हविर्दात्या भक्तासाठी दिव्य दुग्धानें भरून तुस्त होऊन जाते. ॥ ३ ॥

उत वां विक्षु मद्यास्वन्धो गाव आपश्च पीपयन्त देवीः ।

उतो नो अस्य पूर्व्यः पतिर्दन्वीतं पातं पयस उस्रियायाः ॥ ४ ॥

उत वां विक्षु मद्यासु अंधः गावः आपः च पीपयंत देवीः ॥

उतो इति नः अस्य पूर्व्यः पतिः दन् वीतं पातं पयसः उस्रियायाः ॥ ४ ॥

आणखी शिवाय तुमच्या आनंदमग्न भक्तमंडळांत सोमरस, दिव्य धेनू आणि स्वर्गीय उदक ह्यांची रेलचेल असते. तो सनातन भगवंत आम्हांसही असाच आनंद देईल, तर या, आणि प्रकाशरूप धेनूच्या मधूर दुग्धाचा आस्वाद घ्या. ॥ ४ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १५४ (विष्णु सूक्त)

ऋषि : दीर्घतमाः - देवता : विष्णुः - छंद - त्रिष्टुप्

विष्णो॒र्नु कं॑ वी॒र्याणि॒ प्र वो॑चं॒ यः पार्थि॑वानि विम॒मे रजां॑सि ।

यो अस्क॑भाय॒दुत्त॑रं स॒धस्थं॑ विचक्रमा॒णस्त्रे॒धोरु॑गा॒यः ॥ १ ॥

विष्णोः नु कं वीर्याणि प्र वोचं यः पार्थिवानि विऽममे रजांसि ॥

यः अस्कभायत् उत्ऽतरं सधऽस्थं विऽचक्रमाणः त्रेधा उरुऽगायः ॥ १ ॥

आतां मी विष्णूचे पराक्रम कितीतरी वर्णन केले तरी ते थोडेच. सर्व भुवने त्यानें व्यापून टाकिली इतकेंच नाही, तर अत्युच्च देवलोक आहे तो सुद्धां त्यानेंच सांवरून धरला आहे. निरनिराळी तीनच पावलें टाकून त्यानें सर्व व्यापून टाकले आहे. ॥ १ ॥

प्र तद्विष्णुः स्तवते वीर्येण मृगो न भीमः कुचरो गिरिष्ठाः ।

यस्योरुषु त्रिषु विक्रमणेष्वधिक्षियन्ति भुवनानि विश्वा ॥ २ ॥

प्र तत् विष्णुः स्तवते वीर्येण मृगः न भीमः कुचरः गिरिऽस्थाः ॥

यस्य उरुषु त्रिषु विऽक्रमणेषु अधिऽक्षियंति भुवनानि विश्वा ॥ २ ॥

विष्णूची त्याच्या पराक्रमामुळेंच फार स्तुति होत असते. गिरिकंदरांत राहून घोर प्रदेशांत संचार करणाऱ्या, भयंकर सिंहाप्रमाणें हा दिव्य विभूतींमध्यें महा पराक्रमी आहे. पहा सर्वव्यापक अशा निरनिराळ्या तीन पावलांतच विश्वांतील यच्चावत् भुवनें सहज मावली आहेत. ॥ २ ॥

प्र विष्ण॑वे शू॒षमे॑तु॒ मन्म॑ गिरि॒क्षित॑ उरुगा॒याय॒ वृष्णे॑ ।

य इ॒दं दी॒र्घं प्रय॑तं स॒धस्थ॒मेको॑ विम॒मे त्रि॒भिरित्प॒देभिः॑ ॥ ३ ॥

प्र विष्णवे शूषं एतु मन्म गिरिऽक्षित उरुऽगायाय वृष्णे ॥

यः इदं दीर्घं प्रऽयतं सधऽस्थं एकः विऽममे त्रिऽभिः इत् पदेभिः ॥ ३ ॥

हे कार्यक्षम व मनोहर कवन विष्णूच्या कानांवर जावो. प्रेमळ स्तुतींचा भोक्ता आणि ज्याचें यश सर्वव्यापक असा वीर तो आहे. हे एवढें अवाढव्य जगड्व्याळ विश्व परंतु तें फक्त हयाच्या एकट्याच्या तीनच पावलांत खलास होऊन गेले. ॥ ३ ॥

यस्य॒ त्री पू॒र्णा मधु॑ना प॒दान्यक्षी॑यमाणा स्व॒धया॒ मद॑न्ति ।

य उं त्रिधातु पृथिवीमुत द्यामेकौ दाधार भुवनानि विश्वा ॥ ४ ॥

यस्य त्री पूर्णा मधुना पदानि अक्षीयमाणा स्वधया मदंति ॥

य ऊं इति त्रिऽधातु पृथिवीं उत द्यां एकः दाधार भुवनानि विश्वा ॥ ४ ॥

ह्याची निवासस्थानेंही तीन व तींही मधुर रसानें पूर्ण ओथंबलेली, अक्षय्य व आपल्याच स्वाभाविक सहजानंदांत निमग्न अशी आहेत. आणि तो स्वतः असा आहे कीं हे त्रिगुणात्मक विश्व म्हणजे पृथ्वी, आकाश आणि इतर भुवनें हे सर्व एकट्यानें सांवरून धरलें आहे. ॥ ४ ॥

तदस्य प्रियमभि पाथौ अश्यां नरो यत्र देवयवो मदन्ति ।

उरुक्रमस्य स हि बन्धुरित्था विष्णोः पदे परमे मध्व उत्सः ॥ ५ ॥

तत् अस्य प्रियं अभि पाथः अश्यां नः रः यत्र देवऽयवः मदंति ॥

उरुऽक्रमस्य सः हि बंधुः इत्था विष्णोः पदे परमे मध्वः उत्सः ॥ ५ ॥

देवतांची आराधना करणारे उत्तम पुरुष ज्या प्रिय मार्गाचा अवलंब करून ज्ञानी झाले, ते स्थान मलाही प्राप्त व्हावे. त्या पराक्रमी विष्णुच्या परमपदी अमृतादि मधुर साठा आहे. वस्तुतः विष्णु सर्वांचा बंधुच आहे. ॥ ५ ॥

ता वा॒ं वास्तू॑न्युश्मसि॒ गम॑ध्यै॒ यत्र॒ गाव॒ः भूरि॑शृङ्गान अ॒यासः॑ ।

अत्राह॒ तदु॑रुगा॒यस्य॒ वृष्णः॑ पर॒मं प॒दमव॑ भाति॒ भूरि॑ ॥ ६ ॥

ता वां वास्तूनि उश्मसि गमध्यै यत्र गावः भूरिऽशृङ्गाः अयासः ॥

अत्र अह तत् उरुऽगायस्य वृष्णः परमं पदं अव भाति भूरि ॥ ६ ॥

जेथे जेथे उत्तम श्रृंगे असलेली व शीघ्रगामी गाईंची स्थाने आहेत त्या सर्व स्थानी तुम्हां दोघांना (यजमान व यजमान पत्नी) कसल्याही आडकाठीविना विचरण करता यावे अशी मी विष्णुकडे प्रार्थना करीत आहे. कारण ती सर्व स्थाने स्तवनीय, अभीष्टवर्धक व परमपद अशा विष्णुची आहेत. ॥ ६ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १५५ (विष्णु सूक्त)

ऋषि : दीर्घतमाः - देवता : विष्णुः - छंद - जगती

प्र वः पान्तमन्धसो धियायते महे शूराय विष्णवे चार्चत ।

या सानुनि पर्वतानामदाभ्या महस्तस्थतुरर्वतेव साधुना ॥ १ ॥

प्र वः पांतं अंधसः धियाऽयते महे शूराय विष्णवे च अर्चत ॥

या सानुनि पर्वतानां अदाभ्या महः तस्थतुः अर्वताऽइव साधुना ॥ १ ॥

तुम्ही आपल्या सोमरसाच्या माधुर्याचे वर्णन परम श्रेष्ठ आणि शूर विष्णूपुढे करीत जा. खऱ्या भक्तीनें केलेल्या प्रार्थना तो खचित ऐकतो. ते पहा त्या पर्वताच्या शिरावर ते दोघेही अजिंक्य योद्धे एखाद्या घोड्यावर आरूढ झाल्याप्रमाणे उंच उभे राहिले आहेत. ॥ १ ॥

त्वेषमित्था समरणं शिमीवतोरिंद्राविष्णू सुतपा वामुरुष्यति ।

या मर्त्याय प्रतिधीयमानमित्कृशानोरस्तुरसनामुरुष्यथः ॥ २ ॥

त्वेषं इत्था संऽअरणं शिमीऽवतोः इंद्राविष्णू इति सुतऽपाः वां उरुष्यति ॥

या मर्त्याय प्रतिऽधीयमानं इत् कृशानोः अस्तुः असनां उरुष्यथः ॥ २ ॥

हे इंद्रविष्णूहो, तुम्ही प्रबल आहात, म्हणून सोमरसाचा प्रसाद जो ग्रहण करतो तो त्वेषानें चाललेल्या घोर संग्रामांतून सुद्धां न हटतां पार पडतो. धनुष्यावर बाण चढवून तो निरपराधी मनुष्यावर सोडण्याच्या बेतांत कृशानु धनुर्धर असला तरीही त्याच्या बाणाची दिशा फिरवून त्या भक्ताचें तुम्ही रक्षण करतां ॥ २ ॥

ता ईं वर्धन्ति मह्यस्य पौंस्यं नि मातरा नयति रेतसे भुजे ।

दधाति पुत्रोऽवरं परं पितुर्नाम तृतीयमधि रोचने दिवः ॥ ३ ॥

ता ईं वर्धंति महि अस्य पौंस्यं नि मातरा नयति रेतसे भुजे ॥

दधाति पुत्रः अवरं परं पितुः नाम तृतीयं अधि रोचने दिवः ॥ ३ ॥

त्या हवि अर्पणामुळे ह्याचा अगोदरच मोठा पराक्रम इतका वाढतो की, लोकांस पौरुषाचा उपभोग दीर्घकाल घडावा म्हणून आईबाप (म्हणजे आकाश व पृथ्वी) ह्यांच्या पर्यंत येऊन पोहोंचतो. म्हणजे अर्थातच पुत्र, हा आपल्या पित्याचें सामान्यप्रतीचें, मध्यमप्रतीचें, आणि तिसते उत्तम प्रतीचे स्थित्यंतर अशी तिन्ही स्थित्यंतरे त्या दैदिप्यमान स्वर्गलोकांत राहतील असे करतो. ॥ ३ ॥

तत्तदिदस्य पौंस्यं गृणीमसीनस्य त्रातुरवृकस्य मीळ्हुषः ।

यः पार्थिवानि त्रिभिरिद्विगामभिरुरु क्रमिष्टोरुगायाय जीवसे ॥ ४ ॥

तत्ऽतत् इत् अस्य पौंस्यं गृणीमसि इनस्य त्रातुः अवृकस्य मीळ्हुषः ॥

यः पार्थिवानि त्रिऽभिः इत् विगामऽभिः उरु क्रमिष्ट उरुऽगायाय जीवसे ॥ ४ ॥

हा विश्वाधिपती, भक्तरक्षक, कृपाळू आणि उदार आहे तरी, त्यानें तीनच पावलांनी भूलोकाचें आक्रमण केले व तेंही मनुष्याने उन्नति आणि दीर्घायुष्य ही दोन्ही साधावी म्हणून केलें, ह्या पराक्रमाचीच आम्ही विशेष वाखाणणी करतो. ॥ ४ ॥

द्वे इदंस्य क्रमंणे स्वर्दृशोऽभिख्याय मर्त्यो भुरण्यति ।

तृतीयंमस्य नकिरा दंधर्षति वयंश्चन पतयंन्तः पतत्रिणः ॥ ५ ॥

द्वे इति इत् अस्य क्रमणे इति स्वःदृशः अभिऽख्याय मर्त्यः भुरण्यति ॥

तृतीयं अस्य नकिः आ दधर्षति वयः चन पतयंतः पतत्रिणः ॥ ५ ॥

हा आकाशस्थ सर्व द्रष्टा विष्णू, त्याची दोनच पावले पाहून मनुष्य आश्चर्यानें थक्क होऊन जातो. त्याच्या तिसऱ्या पावलाकडे पाहण्याची सुद्धां कोणाची प्राज्ञा नाही. सामर्थ्याची तरतरी किंवा कल्पना शक्तिरूपी पक्ष्याच्या भराऱ्या ह्यापैकी कशाचीही तेथे मात्रा चालत नाही. ॥ ५ ॥

चतुर्भिः साकं नंवतिं च नामंभिश्चक्रं न वृत्तं व्यतीँरवीविपत् ।

बृहच्छंरीरो विमिमांन ऋक्वंभिर्युवाकुंमारः प्रत्येत्याहवम् ॥ ६ ॥

चतुर्भिः साकं नवतिं च नामऽभिः चक्रं नः वृत्तं व्यतीन् अवीविपत् ॥

बृहत्ऽशरीरः विऽमिमान ऋक्वऽभिः युवा अकुमारः प्रति एति आऽहवम् ॥ ६ ॥

चार प्रकारच्या नांवांनी प्राण्याच्या जन्माची नव्वद विलक्षन स्थित्यंतरे तो एखाद्या वाटोळ्या चाकाप्रमाणे गरगर फिरवीत आहे. हा शरीरानें इतका अवाढव्य परंतु भक्तिनें सहज मोजला जातो. तरुण परंतु बालरूप नव्हे, असा हा विष्णू भक्तांनी हाक मारल्याबरोबर येऊन उभा राहतो. ॥ ६ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १५६ (विष्णु सूक्त)

ऋषि : दीर्घतमाः - देवता : विष्णुः - छंद - जगती

भवा॑ मि॒त्रो न शेव्यो॑ घृ॒तासु॑ति॒र्विभू॑तद्युम्न एव॒या उ॑ स॒प्रथाः॑ ।

अधा॑ ते विष्णो वि॒दुषा॑ चि॒दर्ध्यः॒ स्तोमो॑ य॒ज्ञश्च॒ राध्यो॑ ह॒विष्म॑ता ॥ १ ॥

भव मित्रः न शेव्यः घृतऽआसुतिः विभूतऽद्युम्नः एवऽया ॐ इति सऽप्रथाः ॥

अधा ते विष्णो इति विदुषा चित् अर्ध्यः स्तोमः यज्ञः च राध्यः हविष्मता ॥ १ ॥

तुझे यजन घृताहुतींनी होत असतें. तुझे ऐश्वर्य अप्रतीम, तूं सर्वव्यापी, व भक्तांकरितां त्वरेने येतोस तर तूं जिवलग मित्राप्रमाणे आम्हांस आनंदप्रद हो. हे विष्णू, ज्ञानी जनांनी तुझें यश वृद्धिंगत करावे, आणि भक्तांनी हवि देऊन यज्ञद्वारा तुला प्रसन्न करावे हे योग्यच आहे. ॥ १ ॥

यः पूर्व्याय वेधसे नवीयसे सुमज्जानये विष्णवे ददाशति ।

यो जातमस्य महतो महि ब्रवत्सेदु श्रवोभिर्युज्यं चिदभ्यसत् ॥ २ ॥

यः पूर्व्याय वेधसे नवीयसे सुमत्ऽजानये विष्णवे ददाशति ॥

यः जातं अस्य महतः महि ब्रवत् सः इत् ॐ इति श्रवःऽभिः युज्यं चित् अभि असत् ॥ २ ॥

तो पुराण पुरुष खरा, परंतु नवीन म्हटला तर नवीनही आहे, व सृष्टी नियामक व स्वयंभू आहे, म्हणून ह्या विष्णूची जो भक्ति करतो, जो ह्या परमश्रेष्ठ विष्णूच्या अवताराचें स्तवन करतो, त्याचा दैवी ऐश्वर्याशी योग खचित घडून येईल. ॥ २ ॥

तमु॑ स्तोतारः पू॒र्व्यं यथा॑ वि॒द ऋ॒तस्य॒ गर्भं॑ ज॒नुषा॑ पिपर्तन ।

आस्य॑ जा॒नन्तो॒ नाम॑ चिद्विवक्तन म॒हस्ते॑ विष्णो सुम॒तिं भ॑जामहे ॥ ३ ॥

तं ऊं इति स्तोतारः पूर्व्यं यथा विद ऋतस्य गर्भं जनुषा पिपर्तन ॥

आ अस्य जानंतः नाम चित् विवक्तन महः ते विष्णो इति सुऽमतिं भजामहे ॥ ३ ॥

हे स्तोतृजनहो, सकल धर्मव्यवस्थेचे आदिकरण स्वभावतः हाच विष्णू होय, तेव्हां तुम्ही आपल्या अल्पज्ञानाप्रमाणे त्याच्या अवताराचे स्तवन करून त्याला आनंदाने परिपूर्ण करा. त्याची जी जी चरित्रें तुम्हांस माहीत आहेत ती ती वर्णन करा. हे विष्णू, तुज परमश्रेष्ठाच्या कृपेचा अनुभव आम्हीं घेतच आहों. ॥ ३ ॥

तम॑स्य॒ राजा॒ वरु॑ण॒स्तम॒श्विना॒ क्रतुं॑ सचन्त॒ मारु॑तस्य वे॒धसः॑ ।

दाधार दक्षमुत्तममहर्विदं व्रजं च विष्णुः सखिवाँ अपोर्णुते ॥ ४ ॥

तं अस्य राजा वरुणः तं अश्विना क्रतुं सचंत मारुतस्य वेधसः ॥

दाधार दक्षं उत्ऽतमं अहःऽविदं व्रजं च विष्णुः सखिऽवान् अपऽउर्णुते ॥ ४ ॥

मरुतांचे नियमन करणाऱ्या ह्या विष्णूच्या त्या पराक्रमाचा विभागी राजा वरुण आहे, तसेंच अश्वी देवही आहेत. सर्वोत्कृष्ट, आणि दिवस उत्पन्न करून विश्वाला प्रकाशित करणारे असे सामर्थ्य विष्णूच्या अंगी आहे. तो आपल्या अनुचरांसह जाऊन स्वर्गीय धेनूंचा समूह मोकळा सोडून देतो. ॥ ४ ॥

आ यो विवाय सचथाय दैव्य इंद्राय विष्णुः सुकृते सुकृत्तरः ।

वेधा अजिन्वत्त्रिषधस्थ आर्यमृतस्य भागे यजमानमाभजत् ॥ ५ ॥

आ यः विवाय सचथाय दैव्यः इंद्राय विष्णुः सुऽकृते सुकृत्ऽतरः ॥

वेधा अजिन्वत् त्रिऽसधस्थः आर्यं ऋतस्य भागे यजमानं आ अभजत् ॥ ५ ॥

अगोदर इंद्र हा सत्कृत्य तत्पर, आणि त्यात शक्तियुक्त आणि सत्कृत्यांविषयीं विशेष उत्सुक असा विष्णू त्या इंद्राकडे त्याचकरितां गेला. त्रिभुवनांचा अधिपति आणि शास्ता जो विष्णु त्यानें आर्ययजमानास सुखी केले आणि श्रेष्ट धर्माचा वांटेकरी करून त्याची उन्नति केली. ॥ ५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १५७ (अश्विनौ सूक्त)

ऋषि : दीर्घतमाः - देवता : अश्वोनौ - छंद - त्रिष्टुप्

अबौध्यग्निर्ज्म उदेति सूर्यो व्युषाश्चन्द्रा मह्यावो अर्चिषा ।

आयुंक्षातामश्विना यातवे रथं प्रासावीद्देवः सविता जगत्पृथक् ॥ १ ॥

अबोधि अग्निः ज्मः उत् एति सूर्यः वि उषाः चंद्रा मही आवः अर्चिषा ॥

आयुक्षातां अश्विना यातवे रथं प्र असावीत् देवः सविता जगत् पृथक् ॥ १ ॥

अग्नि जागृत आहे, सूर्य क्षितिजावर उदय पावण्याच्या बेतात आहे, श्रेष्ठ आणि सुखकर उषा आपल्या तेजाने सुप्रकाशित झाली आहे. आणि अश्वीदेवही रथ जोडून निघण्याच्या तयारींतच आहे, अशावेळी जगत्प्रेरक परमात्म्याने प्राणिमात्रांनाही आपआपल्या उद्योगास लावण्याकरितां जागृत केले आहे. ॥ १ ॥

यद्यु॒ञ्जाथे॒ वृष॑णमश्विना॒ रथं॑ घृ॒तेन॑ नो॒ मधु॑ना क्ष॒त्रमु॑क्षतम् ।

अ॒स्माकं॒ ब्रह्म॒ पृत॑नासु जिन्वतं व॒यं धना॒ शूर॑साता भजेमहि ॥ २ ॥

यत् युञ्जाथे इति वृषणं अश्विना रथं घृतेन नः ◌ः मधुना क्षत्रं उक्षतम् ॥

अस्माकं ब्रह्म पृतनासु जिन्वतं वयं धना शूरऽसाता भजेमहि ॥ २ ॥

हे अश्विदेवहो, तुम्ही आपला विजयशाली रथ जोडून तयार व्हाल तेव्हां आमच्या शूर सैनिकांवर घृत आणि मध यांची जयसूचक अशी वृष्टी करून आशिर्वाद द्या. आम्ही केलेले स्तवन आम्हांस रणांगणांत यशस्वी करील असे

करा. आणि ज्या अतुल संपत्तिकरितां वीर एकमेकांशी झगडत असतात, त्या अप्रतीम ऐश्वर्याचा लाभ आम्हांस घडेल असे करा. ॥ २ ॥

अ॒र्वाङ् त्रि॒च॒क्रो म॑धु॒वाह॑नो॒ रथो॑ जी॒राश्वो॑ अ॒श्विनो॑र्यातु॒ सुष्टु॑तः ।

त्रि॒व॒न्धु॒रो म॒घवा॑ वि॒श्वसौ॑भगः॒ शं न॒ आ व॑क्षद्द्वि॒पदे॒ चतु॑ष्पदे ॥ ३ ॥

अर्वाङ् त्रिऽचक्रः मधुऽवाहनः रथः जीरऽअश्वः अश्विनोः यातु सुऽसुतः ॥

त्रिऽवंधुरः मघऽवा विश्वऽसौभगः शं नः आ वक्षत् द्विऽपदे चतुःऽपदे ॥ ३ ॥

अश्विदेवहो, तुमचा प्रेमरूप मधाने भरून गेलेला अत्यंत नामांकित असा तीनचाकी रथ आमच्या बाजूस येवो, ह्या तुमच्या रथाचे घोडे अतिशय तल्लख असतात व रथाला तीन बैठकी असून त्याच्या येण्याने भक्तांना इच्छित लाभ होतात. त्यामुळे सहजच तो सर्व जगाला भाग्यसंपन्न करणारा असा झाला आहे. तर असा हा तुमचा रथ आमच्या मनुष्यांना व चतुष्पदांनाही सुख घेऊन येवो. ॥ ३ ॥

आ न॒ ऊर्जं॑ वहतमश्विना यु॒वं मधु॑मत्या नः॒ कश॑या मिमिक्षतम् ।

प्रायुस्तारिष्टं नी रपांसि मृक्षतं सेधतं द्वेषः भवतं सचाभुवा ॥ ४ ॥

आ नः ऊर्जं वहतं अश्विना युवं मधुऽमत्या नः ः कशया मिमिक्षतम् ॥

प्र आयुः तारिष्टं नीः रपांसि मृक्षतं सेधतं द्वेषः भवतं सचाऽभुवा ॥ ४ ॥

अश्विदेवहो, आम्हांस देण्याकरितां आणाल तर ओजस्वीपणा घेऊन या. मधाने ओथंबलेल्या तुमच्या चाबकाने आशिर्वादाचें पवित्र सिंचन आम्हांवर करा. आमचे आयुष्य वाढवा. क्लेशाचा नायनाट करा. द्वेषबुद्धि विलयास न्या आणि सदैव आमचे पाठिराखे व्हा. ॥ ४ ॥

युवं ह गर्भं जगतीषु धत्थो युवं विश्वेषु भुवनेष्वन्तः ।

युवमग्निं च वृषणावपश्च वनस्पतीँरश्विनावैरयेथाम् ॥ ५ ॥

युवं ह गर्भं जगतीषु धत्थः युवं विश्वेषु भुवनेषु अंतरिति ॥

युवं अग्निं च वृषणौ अपः च वनस्पतीन् अश्विनौ ऐरयेथाम् ॥ ५ ॥

स्त्रीजातीमध्यें गर्भाची योजना तुम्हींच करता, तुम्हीच सर्व भुवनांत चैतन्याची ज्योत पाजळतां, आणि हे अश्विदेवहो, हे वीरांनो, ऊष्णतेचे प्रवर्तन तुम्हीच करतां, जलवृष्टि तुम्हींच करतां, व वनस्पनींना जीवनकला तुम्हींच देतां. ॥ ५ ॥

युवं ह स्थो भिषजा भेषजेभिरथो ह स्थो रथ्या३ राथ्येभिः ।

अथो ह क्षत्रमधि धत्थ उग्रा यो वां हविष्मान्मनसा ददाश ॥ ६ ॥

युवं ह स्थः भिषजा भेषजेभिः अथो इति ह स्थः रथ्या राथ्येभिरितिरथेभिः ॥

अथो इति ह क्षत्रं अधि धत्थः उग्रा यः वां हविष्मान् मनसा ददाश ॥ ६ ॥

तुम्ही औषधीसंपन्न असे भिषग्वर्य आहांत. तुम्ही महारथी वीर आहांत. तेव्हां रथास जोडण्यायोग्य उत्कृष्ट घोडे तुमच्या पदरीं असावयाचेच. आणि हे उग्ररूप अश्विदेवहो, तुम्हाला भक्तिनें ज्यानें हवि अर्पण केलें आहे, त्याला तुम्ही लोकांचे अधिपत्य देत असतां. ॥ ६ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १५८ (अश्विनौ सूक्त)

ऋषि : दीर्घतमाः - देवता : अश्वोनौ - छंद - त्रिष्टुप्

वसू रुद्रा पुरुमन्तू वृधन्ता दशस्यतं नो वृषणावभिष्टौ ।

दस्रा ह यत्रेक्ण औचथ्यो वां प्र यत्सस्राथे अकवाभिरूती ॥ १ ॥

वसू इति रुद्रा पुरुमंतू इति वृधंता दशस्यतं नः ः वृषणौ अभिष्टौ ॥

दस्रा ह यत् रेक्णः औचथ्यः वां प्र यत् सस्राथे इति अकवाभिः ऊती ॥ १ ॥

हे अश्विदेवांनो, तुम्ही दैवी संपत्तीचे निधि आहांत. रुद्र स्वरूप, बलाढ्य व अत्यंत प्रज्ञावानही तुम्हींच आहांत. आम्ही तुमची विनवणी करीत आहोंत. तर हे वीरांनो, हे अद्भुत कर्मकारी अश्वीहो, उचथ्याचा पुत्र जो अमोल ठेवा हात जोडून तुम्हांपाशी मागत आहे तो कृपा करून द्या. तुम्ही आपला कृपाप्रसाद सढळ हाताने देत असता. ॥ १ ॥

को वां दाशत्सुमतये चिदस्यै वसू यद्धेथे नमसा पदे गोः ।

जिगृतमस्मे रेवतीः पुरंधीः कामप्रेणेव मनसा चरन्ता ॥ २ ॥

कः वां दाशत् सुऽमतये चित् अस्यै वसू इति यत् धेथे इति नमसा पदे गोः ॥

जिगृतं अस्मे इति रेवतीः पुरंऽधीः कामप्रेणऽइव मनसा चरंता ॥ २ ॥

हे दिव्य निधि अश्वीदेवहो, यज्ञवेदीच्या पुढे तुम्हांस अंतःपूर्वक प्रणिपात केला असतां जो अनुग्रह तुम्ही भक्तांवर करता, तशा अनुग्रहास योग्य अशी तुमची सेवा कोणाच्या तरी हातून होईल काय ? आमची उज्ज्वल प्रतिभा जागृत करा, कारण भक्तांच्या कामना पूर्ण करण्याच्या हेतूनेंच तुम्ही सर्वत्र संचार करीत असतां. ॥ २ ॥

युक्तो ह यद्वां तौग्र्याय पेरुर्वि मध्ये अर्णसो धायि पज्रः ।

उप वामवः शरणं गमेयं शूरो नाज्म पतयद्भिरेवैः ॥ ३ ॥

युक्तः ह यत् वां तौग्र्याय पेरुः वि मध्ये अर्णसः धायि पज्रः ॥

उप वां अवः शरणं गमेयं शूरः न अज्म पतयत्ऽभिः एवैः ॥ ३ ॥

हा तुमचा रथ संकट निवारणार्थ नेहमी तयारच आहे. हा प्रबल रथ पूर्वी तुग्र पुत्राच्या साहाय्यासाठी तुम्ही भर समुद्रांत लोटला होता. एखादा शुर सैनिक आश्रयाकरितां इकडे तिकडे न जाता आपल्या चलाख घोड्यानिशी आपल्या सैन्याकडे जातो, त्याप्रमाणे मीही तुम्हांलाच शरण यावे, हेंच माझे कर्तव्य आहे. ॥ ३ ॥

उप॑स्तुतिरौच॒थ्यमु॑रुष्ये॒न्मा मामि॒मे प॑त॒त्रिणी॒ वि दु॑ग्धाम् ।

मा मामेधो॒ दश॑तयश्चि॒तो धा॒क् प्र यद्वां॑ ब॒द्धस्त्मनि॒ खाद॑ति॒ क्षाम् ॥ ४ ॥

उपऽस्तुतिः औचथ्यं उरुष्येत् मा मां इमे इति पतत्रिणी इति वि दुग्धाम् ॥

मा मां एधः दशऽतयः चितः धाक् प्र यत् वां बद्धः त्मनि खादति क्षाम् ॥ ४ ॥

हे स्तवन मला उचस्थ पुत्राला मुक्त करो, पंख असलेल्या ह्या दोघीजणी मला पिळून टाकून शुष्क न करोत. ही लाकडांच्या ओंडक्यांची दसपट मोठी होळी मला जाळून भस्म न करो. पहा ज्याने ह्या तुमच्या भक्ताला बांधून टाकले होते, तोच आतां स्वतः धूळ खात पडला आहे. ॥ ४ ॥

न मा॑ गरन्न॒द्यो मा॒तृत॑मा दा॒सा यदीं॒ सुस॑मुब्धम॒वाधुः॑ ।

शिरो॒ यद॑स्य त्रैत॒नो वि॒तक्ष॑त्स्व॒यं दा॒स उरो॒ अंसा॒वपि॑ ग्ध ॥ ५ ॥

न मा गरन् नद्यः मातृऽतमा दासाः यत् ईं सुऽसमुब्धं अवऽअधुः ॥

शिरः यत् अस्य त्रैतनः विऽतक्षत् स्वयं दासः उरः अंसौ अपि ग्धेति ग्ध ॥ ५ ॥

त्या गुलामांनी मला बांधून नदींत टाकले तरी आई प्रमाणे प्रेम करणाऱ्या नद्यांनी मला बुडविले नाही; व जरी त्रैतनानें आतां माझ्या डोक्यावर वार केलेला आहे, तरी थोडक्यांच वेळानें त्याचे स्वतःचे उर व खांदे ह्यांचा चुराडा उडून जाणार आहे. ॥ ५ ॥

दी॒र्घत॑मा मामत॒येयो जु॑जु॒र्वान्द॑श॒मे यु॒गे ।

अ॒पामर्थं॑ य॒तीनां॑ ब्र॒ह्मा भ॑वति॒ सार॑थिः ॥ ६ ॥

दीर्घऽतमा मामतेयः जुजुर्वान् दशमे युगे ॥

अपां अर्थं यतीनां ब्रह्मा भवति सारथिः ॥ ६ ॥

ममतेचा पुत्र दीर्घतमा ह्याला दहाव्या युगांत वार्धक्य प्राप्त होऊन ब्रह्मपद मिळाले. अर्थात् ज्या ज्या कर्मांनी मनुष्यास कृतार्थत्व येते, अशा कर्म परंपरेचा तो आतां प्रवर्तक झाला आहे. ॥ ६ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १५९ (द्‍यावापृथिव्यौ सूक्त)

ऋषि : दीर्घतमाः - देवता : द्‍यावापृथिव्यौ - छंद - जगती

प्र द्‍यावा॑ य॒ज्ञैः पृ॑थि॒वी ऋ॑ता॒वृधा॑ म॒ही स्तु॑षे वि॒दथे॑षु प्रचे॑तसा ।

दे॒वेभि॒र्ये दे॒वपु॑त्रे सु॒दंस॑से॒त्था धि॒या वार्या॑णि प्र॒भूष॑तः ॥ १॥

प्र द्‍यावा यज्ञैः पृथिवी इति ऋतऽवृधा मही इति स्तुषे विदथेषु प्रऽचेतसा ॥

देवेभिः ये इति देवपुत्रे इति देवऽपुत्रे सुऽदंससा एत्था धिया वार्याणि प्रऽभूषतः ॥ १ ॥

विद्वत्सभेमध्ये यज्ञ प्रसंगी द्यावापृथिवीचेही मी स्तवन करतो; ह्या परम थोर, सद्धर्माचा उत्कर्ष करणाऱ्या व महा ज्ञानवान् अशा आहेत. ही दिव्य जनांची माता पितरे देवांच्या सहाय्याने अद्भुत कर्मे करून आपल्या खऱ्या प्रेमळपणाने देवांच्या स्पृहणीय कृपाप्रसादांना जास्तच शोभा आणतात. ॥ १ ॥

उ॒त मं॑न्ये पि॒तु॒र॒द्रुहः॒ मनो॑ मा॒तु॒र्महि॒ स्वत॑व॒स्तद्धवी॑मभिः ।

सु॒रेत॑सा पि॒त॒रा॒ भूम॑ चक्रतु॒रु॒रु प्र॒जाया॑ अ॒मृत॒ं वरी॑मभिः ॥ २॥

उत मन्ये पितुः अद्रुहः मनः मातुः महि स्वऽतवः तत् हवीमऽभिः ॥

सुऽरेतसा पितरा भूम चक्रतुः उरु प्रऽजाया अमृतं वरीमऽभिः ॥ २ ॥

ईश्वराचा धांवा करीत असतांनाच त्या जगत् पित्याचें प्रेमळ अंतःकरण आणि जगत् मातेचे स्वतः सिद्ध सामर्थ्य ह्यांचे मी अखंड चिंतन करीत असतो. खरोखर जगद्उत्पत्तिकुशल अशा आईबापांनी ही विस्तीर्ण भूमि आपल्या बालकांकरितां आपल्या बहुमोल समृद्धींनी अमृतमय करून टाकली आहे. ॥ २ ॥

ते सूनवः स्वपसः सुदंससो मही जज्ञुर्मातरा पूर्वचित्तये ।

स्थातुश्च सत्यं जगतश्च धर्मणि पुत्रस्य पाथः पदमद्वयाविनः ॥ ३॥

ते सूनवः सुऽअपसः सुऽदंससः मही इति जज्ञुः मातरा पूर्वऽचित्तये ॥

स्थातुः च सत्यं जगतः च धर्मणि पुत्रस्य पाथः पदं अद्वयाविनः ॥ ३ ॥

महोदर, सत्कर्मरत, चमत्कारकुशल अशा त्या देवांनी ह्या परम थोर आईबापांना त्यांचे स्मरण प्रातःकाळी आम्ही प्रथम करावे म्हणून प्रकट केले आहे. हे माता पितरांनो, ह्या जगांतील स्थावर जंगमाचा व्यापार ज्या नियमांनी चालतो, त्या नियमांचे अस्तित्व तुम्हांमुळेच आहे आंत एक बाहेर एक हा प्रकार ज्याच्या स्वप्नीही नाही असा जो तुमचा पुत्र त्याच्या स्थानाचें रक्षणही तुम्हींच करीत असतां. ॥ ३ ॥

ते मायिनो ममिरे सुप्रचेतसो जामी सयोनी मिथुना समोकसा ।

नव्यंनव्यं तन्तुमा तन्वते दिवि समुद्रे अन्तः कवयः सुदीतयः ॥ ४॥

ते मायिनः ममिरे सुऽप्रचेतसः जामी इति सयोनी इति सऽयोनी मिथुना संऽओकसा ॥

नव्यंऽनव्यं तंतुं आ तन्वते दिवि समुद्रे अंतरिति कवयः सुऽदीतयः ॥ ४ ॥

त्यांची (देवांची) शक्ति अलौकिक व शहाणपणाही अपूर्व आहे. त्यांनी ही जोडी अशी निर्माण केली आहे कीं, त्या परस्पर जणुं नातलगच, कारण त्यांचा जन्म एका ठिकाणापासून आणि राहणें ही एकत्रच. ह्या प्रमाणे वर आकाशांत आणि खाली समुद्राच्या पोटांत, ज्ञानी आणि परम् दीप्तिमान अशा देवांनी आपल्या कृतींची अद्भुत परंपराच लावून दिलेली आहे. ॥ ४ ॥

तद्राघधो॑ अ॒द्य स॑वि॒तुर्वरे॑ण्यं व॒यं दे॒वस्य॑ प्रस॒वे म॑नामहे ।

अ॒स्मभ्यं॑ द्यावापृथिवी सुचे॒तुना॑ र॒यिं ध॑त्त॒ं वसु॑मन्तं शत॒ग्विन॑म् ॥ ५॥

तत् राधः अद्य सवितुःन् वरेण्यं वयं देवस्य प्रऽसवे मनामहे ॥

अस्मभ्यं द्यावापृथिवी इति सुऽचेतुना रयिं धत्तं वसुऽमंतं शतऽग्विनम् ॥ ५ ॥

सर्व प्रेरक देवांची जी अत्यंत स्पृहणीय आणि अपूर्व देणगी तिचें चिंतन आम्ही सूर्योदयीं करीत असतों, तर ह्या द्यावापृथिवी उदार अंतःकरणानें, ज्याचा सांठा शतपट होऊं शकतो असे ऐश्वर्य आमच्या करितां आणोत. ॥ ५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १६० (द्यावापृथिव्यौ सूक्त)

ऋषि : दीर्घतमाः - देवता : द्यावापृथिव्यौ - छंद - जगती

ते हि द्यावा॑पृथि॒वी वि॒श्वश॑म्भुव ऋ॒तावा॑री॒ रज॑सो धार॒यत्क॑वी ।

सु॒जन्म॑नी धि॒षणे॑ अ॒न्तरी॑यते दे॒वो दे॒वी धर्म॑णा॒ सूर्यः॒ शुचिः॑ ॥ १ ॥

ते इति हि द्यावापृथिवी इति विश्वऽशंभुव ऋतवरी इत्यृतवरी रजसः धारयत्कवी इति धारयत्ऽकवी ॥

सुजन्मनी इति सुऽजन्मनी धिषणे इति अंतः ईयते देवः देवी इति धर्मणा सूर्यः शुचिः ॥ १ ॥

ह्या पहा द्यावापृथिवी; ह्या धर्मप्रिय व विश्वाला सुखकारक असून अंतरिक्षांतील ज्ञानप्रवर्तक शक्तींना धारण करीत असतात ; आणि ह्यांच्या पोटीं अनेक महात्मे जन्म घेतात. ईश्वराचे चातुर्य ह्यांचे ठिकाणी प्रकट होत असते व ह्याच दिव्य शक्तीच्या अंतर्भागीं सूर्य आपल्या नियमानुसार फिरत असतो. ॥ १ ॥

उ॒रु॒व्यच॑सा म॒हिनी॑ अस॒श्चता॑ पि॒ता मा॒ता च॒ भुव॑नानि रक्षतः ।

सु॒धृष्ट॑मे वपु॒ष्ये३॑न रोद॑सी पि॒ता यत्सी॑म॒भि रू॒पैरवा॑सयत् ॥ २ ॥

उरुऽव्यचसा महिनी इति असश्चता पिता माता च भुवनानि रक्षतः ॥

सुधृष्टमे इति सुधृष्टमे वपुष्ये इति न रोदसी इति पिता यत् सीं अभि रूपैः अवासयत् ॥ २ ॥

अति विस्तीर्ण, थोर आणि पवित्र अशी ही मातापितरें सर्व भुवनांचे रक्षण करीत असतात. ह्यांच्या अंतराळ प्रदेशांतील नक्षत्रेंही अत्यंत रमणीय रत्नाप्रमाणे असून चांगली स्थिर आहेत, कारण जगत्पित्यानें सर्वांसच मनोहर रूपाने मंडित केलें आहे. ॥ २ ॥

सः वह्निः॑ पु॒त्रः पि॒त्रोः प॒वित्र॑वान्पु॒नाति॒ धीरो॒ भुव॑नानि मा॒यया॑ ।

धेनुं च पृश्निं वृषभं सुरेतसं विश्वाहा शुक्रं पयः अस्य दुक्षत ॥ ३ ॥

सः वह्निः पुत्रः पित्रोः पवित्रऽवान् पुनाति धीरः भुवनानि मायया ॥

धेनुं च पृश्निं वृषभं सुऽरेतसं विश्वाहा शुक्रं पयः अस्य धुक्षत ॥ ३ ॥

अत्यंत पवित्र, अत्यंत ज्ञानवान, व उपासना प्रवर्तक असा ईश्वर ह्या आईबापांचा पुत्र होऊन आपल्या अलौकिक सामर्थ्याने सर्व भुवनांना पवित्र करतो. आणि चित्रविचित्र धेनू आणि वीर्यसंपन्न वृषभ ह्यांचे नित्य दोहन करून शुद्ध सत्वरूप दुग्ध भक्तांकरितां काढून देतो. ॥ ३ ॥

अयं देवानामपसामपस्तमो यो जजान रोदसी विश्वशम्भुवा ।

वि यो ममे रजसी सुक्रतूययाजरेभिः स्कम्भनेभिः समानृचे ॥ ४ ॥

अयं देवानां अपसां अपःऽतमः यः जजान रोदसी इति विश्वऽशंभुवा ॥

वि यः ममे रजसी इति सुक्रतूऽयया अजरेभिः स्कंभनेभिः सं आनृचे ॥ ४ ॥

सर्व कुशल देवांमध्ये हा ईश्वरच एक अत्यंत कर्तृत्ववान व म्हणूनच त्याला सर्व लोकांना सुखप्रद अशी आकाश आणि पृथ्वी ही उत्पन्न करतां आली. ह्यानें आपल्या अपूर्व कर्तबगारीनें अंतराळांतील सर्व गोल निर्माण करून अशा आधारावर ते सांवरून धरिले आहेत कीं ते आधार कधींही जीर्ण होणार नाहींत. ॥ ४ ॥

ते नो॑ गृणा॒ने म॑हिनी॒ महि॒ श्रवः॑ क्ष॒त्रं द्या॑वापृथिवी धासथो बृ॒हत् ।

येना॒भि कृ॒ष्टीस्त॒तना॑म वि॒श्वहा॑ प॒नाय्य॒मोजो॑ अ॒स्मे समि॑न्वतम् ॥ ५ ॥

ते इति नः गृणाने इति महिनी इति महि श्रवः क्षत्रं द्यावापृथिवी इति धासथः बृहत् ॥

येन अभि कृष्टीः ततनाम विश्वहा पनाय्यं ओजः अस्मे इति सं इन्वतम् ॥ ५ ॥

थोर द्यावापृथीवींनो, तुमचें आम्ही यथामति स्तवन करीत असतों. म्हणून तुम्ही आम्हाला श्रेष्ठ सुकीर्ति आणि थोर अधिकाराचें पद अर्पण करीतच आहां ; पण आतां जेणेंकरून आम्हां देवभक्त जनांचा चोहोंकडे निरंतर प्रसार होईल, व ज्याची चोहोंकडे वाखाणणीच होईल असा जोम आमच्या अंगी नेहमीं वसेल असें करा. ॥ ५ ॥

ॐ तत् सत्

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १६१ (ऋभू सूक्त)

ऋषि : दीर्घतमाः - देवता : ऋभवः - छंद - जगती

किमु॒ श्रेष्ठः॒ किं यवि॑ष्ठो न॒ आज॑ग॒न्किमी॑यते दू॒त्यङ्१॑कद्यदू॑चि॒म ।

न निं॑न्दिम चम॒सं यो म॑हाकु॒लोऽ॑ग्ने भ्रात॒र्द्रुण॒ इद्भू॒तिमू॑दिम ॥ १ ॥

किं ऊं इति श्रेष्ठः किं यविष्ठः नः आ अजगन् किं ईयते दूत्यं कत् यत् ऊचिम ॥

न निंदिम चमसं यः महाऽकुलः अग्ने भ्रातः द्रुणः इत् भूतिं ऊदिम ॥ १ ॥

काय ? हा जो आमच्याकडे आला आहे तो सर्वात वडील, कीं धाकटा ? हा कशा करितां आला असावा बरें ?आम्ही तरी असे काय बोललो ? एका थोर विभूतीनें बनविलेल्या ह्या यज्ञपात्राची आम्ही कांही निंदा केली नाही. तर हे अग्निदेवा, हे बंधो, आम्ही त्या काष्ठपात्राची महतीच वर्णन केलेली आहे ॥ १ ॥

एकं चमसं चतुरस्कृणोतन तद्वो देवा अब्रुवन्तद्व आगमम् ।

सौधन्वना यद्येवा करिष्यथ साकं देवैर्यज्ञियासो भविष्यथ ॥ २ ॥

एकं चमसं चतुरः कृणोतन तत् वः देवाः अब्रुवन् तत् वः आ अगमम् ॥

सोधन्वना यदि एव करिष्यथ साकं देवैः र्यज्ञियासः भविष्यथ ॥ २ ॥

देवांनी तुम्हाला सांगितले ना कीं, एका चमसाचे चार चमस करा म्हणून ? तर मग त्या करितांच मी आलो आहे. हे सुधन्वाच्या पुत्रांनो, तुम्ही जर असे कराल तर देवांबरोबर तुम्ही यज्ञार्ह व्हाल. ॥ २ ॥

अग्निं दूतं प्रति यदब्रवीतनाश्वः कर्त्वो रथ उतेह कर्त्वः ।

धेनुः कर्त्वा युवशा कर्त्वा द्वा तानि भ्रातरनु वः कृत्व्येमसि ॥ ३ ॥

अग्निं दूतं प्रति यत् अब्रवीतन अश्वः कर्त्वः रथः उत इह कर्त्वः ॥

धेनुः कर्त्वा युवशा कर्त्वा द्वा तानि भ्रातः अनु वः कृत्वि आ इमसि ॥ ३ ॥

देवांचा प्रतिनिधि जो अग्नि त्याच्या जवळ तर तुम्ही बोललांच कीं हे बंधो, एक अश्व निर्माण करावयाचा आहे, तसाच एक रथ करावयाचा आहे, गाय करावयाची व दोघांजणांना तरुण करावयाचे आहे; आणि हे सर्व करून मग तुमच्याकडे येतो. ॥ ३ ॥

चकृवांस ऋभवस्तदपृच्छत क्वेदभूद्य स्य दूतो न आजगन् ।

यदावाख्यच्चमसाञ्चतुरः कृतानादित्त्वष्टा ग्नास्वन्तर्न्यानजे ॥ ४ ॥

चकृवांसः ऋभवस्तत् अपृच्छत क्वेत् अभूत् यः स्य दूतः नः आजगन् ॥

यदावाख्यच् चमसाञ् चतुरः कृतान् आत् इत् त्वष्टा ग्नासु अंतर्नि आनजे ॥ ४ ॥

तेव्हां ते सर्व कार्य उरकल्यावर तुम्ही विचारलें कीं, " आम्हांकडे निरोप घेऊन आला होता तो कोठें आहे ? " इतक्यात त्वष्ट्याने चार चमस तयार केलेले पाहिले मात्र, तात्काळ तो देवपत्न्यांकडे जाऊन लपून राहिला. ॥ ४ ॥

हनामैनाँ इति त्वष्टा यदब्रवीच्चमसं ये देवपानमनिन्दिषुः ।

अन्या नामानि कृण्वते सुते सचाँ अन्यैरेनान्कन्या३ नामभिः स्परत् ॥ ५ ॥

हनामैनान् इति त्वष्टा यत् अब्रवीच् चमसं ये देवपानं अनिंदिषुः ॥

अन्या नामानि कृण्वते सुते सचान् अन्यैरेनान् कन्या नामभि स्परत् ॥ ५ ॥

ह्यांनी देवांच्या सोम पिण्याच्या चमसाला नावें ठेविली आहेत, तर ह्यांना आपण मारून टाकूं या असे हे ऋभूंनो ज्या वेळेस तो त्वष्टा बोलला, त्या वेळेपासूनच सोमरस अर्पण होत असतांना तुमचे स्वरूप पालटलें, तुम्ही देवरूप झालांत आणि मग स्वर्गीय युवतीजन त्या नवीन स्वरूपामुळें तुम्हांवर मोहित होऊन प्रेम करूं लगला. ॥ ५ ॥

इंद्रो हरी युयुजे अश्विना रथं बृहस्पतिर्विश्वरूपामुपाजत ।

ऋ॒भुर्वि॒भ्वा॒ वाजो॑ दे॒वाँ अ॑गच्छ॒त स्वप॑सो य॒ज्ञिय॑ भा॒गमै॑तन ॥ ६ ॥

इंद्रः हरी युयुजे अश्विना रथं बृहस्पतिर्विश्वरूपां उपाजत ॥

ऋभुर्विभ्वा वाजः देवान् अगच्छत स्वपसः यज्ञियं भागं ऐतन ॥ ६ ॥

तुम्ही निर्माण केलेले घोडे इंद्राने आपल्या रथास जोडूनहि टाकले, अश्वीदेवांनी आपला रथ सज्ज केला, आणि इच्छेस येईल ते रूप घेणारी अशी ही धेनू बृहस्पति आपल्या बरोबर घेऊन गेला. त्या वेळेसच ऋभु, विभ्वा आणि वाज असे तुम्ही तिघे बंधु देवत्व पावलां, आणि सत्क्रियावान् जे तुम्ही त्या तुम्हांला यज्ञांमध्ये हविर्भाग प्राप्त झाला. ॥ ६ ॥

निश्चर्म॑णो॒ गाम॑रिणीत धी॒तिभि॒र्या जर॑न्ता यु॒व॒शा ता॑कृणोतन ।

सौध॑न्वना॒ अश्वा॒दश्व॑मतक्षत यु॒क्त्वा रथ॒मुप॑ दे॒वाँ अ॑यातन ॥ ७ ॥

निश्चर्मणः गां अरिणीत धीतिभिर्या जरंता युवशा ताकृणोतन ॥

सौधन्वना अश्वात् अश्वं अतक्षत युक्त्वा रथं उप देवान् अयातन ॥ ७ ॥

तुम्ही आपल्या अतुल बुद्धिमत्तेनें नुसते चामडे घेऊन त्यांतून जिवंत गाय उत्पन्न केली. आणि वृद्धत्व आलेल्या जोडप्यास पुन्हां तरुण केले. सुधन्वाच्या पुत्रांनो, तुम्ही एका सामान्य अश्वापासून एक नवीन अपूर्व अश्व निर्माण केलात; आणि हे सर्व करून रथ जोडून देवांकडे निघून गेलांत. ॥ ७ ॥

इ॒दमु॑द॒कं पि॑ब॒तेत्य॑ब्रवीतने॒दं वा॑ घा पिबता मु॒ञ्ज॒नेज॑नम् ।

सौध॑न्वना॒ यदि॒ तन्नेव॒ हर्य॑थ तृ॒तीये॑ घा॒ सव॑ने मादयाध्वै ॥ ८ ॥

इदं उदकं पिबतेति अब्रवीतनेदं वा घा पिबता मुञ्जनेजनम् ॥

सौधन्वना यदि तन् नेव हर्यथ तृतीये घा सवने मादयाध्वै ॥ ८ ॥

त्या ऋभूंना अशी विनंती करा कीं, "तुम्ही हें उदक प्या किंवा मुंज तृणानें गाळून शुद्ध केलेलें ते दुसरें प्या; आणि हे सुधन्वाचे पुत्र हो, तुम्हांस दोन्हीही आवडत नसतील, तर मग तिसऱ्या वेळेस सोमरसानें तरी हर्ष पावा ". ॥ ८ ॥

आपो भूयिष्ठा इत्येको अब्रवीदग्निर्भूयिष्ठ इत्यन्यो अब्रवीत् ।

वधर्यन्तीं बहुभ्यः प्रैको अब्रवीदृता वदन्तश्चमसाँ अपिंशत ॥ ९ ॥

आपः भूयिष्ठा इति एकः अब्रवीत् अग्निर्भूयिष्ठ इति अन्यः अब्रवीत् ॥

वधर्यंतीं बहुभ्यः प्रैकः अब्रवीत् ऋता वदंतश्चमसान् अपिंशत ॥ ९ ॥

एक म्हणला " उदकें सर्वांत जास्त उपयोगी, दुसरा म्हणला अग्नि सर्वांत श्रेष्ठ, तिसरा म्हणाला कीं सर्वांकरितां आपणास जाळून घेणारी अशी भूमि हीच अत्यंत उपयोगी ". ह्या प्रमाणे निरनिराळ्या तत्त्वांचा अनुवाद करतां करतां तुम्ही सहज चाऱ्ही चमस तयार केलेत. ॥ ९ ॥

श्रोणामेक उदकं गामवाजति मांसमेकः पिंशति सूनयाभृतम् ।

आ निम्रुचः शकृदेको अपाभरत्किं स्वित्पुत्रेभ्यः पितरा उपावतुः ॥ १० ॥

श्रोणां एक उदकं गां अवाजति मांसं एकः पिंशति सूनयाभृतम् ॥

आ निम्रुचः शकृत् एकः अपाभरत् किं स्वित् पुत्रेभ्यः पितरा उपावतुः ॥ १० ॥

बांधेसूद गाईला एक जण पाणी दाखविण्यास दूर घेऊन जातो, दुसरा इकडे यज्ञांत सुरीनें कापलेलें मेध्य मांस व्यवस्थित ठेवून देतो. आणि तिसरा सायंकाळ पूर्वींच आलब्ध पशूचा अमेध्य भाग दूर नेऊन टाकतो. ह्या पेक्षां यज्ञप्रसंगी पुत्रापासून आईबापांना आणखी तें काय पाहिजे ? ॥ १० ॥

उद्वत्स्वस्मा अकृणोतना तृणं निवत्स्वपः स्वपस्यया नरः ।

अगोह्यस्य यदसस्तना गृहे तदद्येदमृभवो नानु गच्छथ ॥ ११ ॥

उद्वत्सु अस्मा अकृणोतना तृणं निवत्सु अपः स्वपस्यया नः रः ॥

अगोह्यस्य यत् असस्तना गृहे तत् अद्येदं ऋभवः नानु गच्छथ ॥ ११ ॥

हे वीरांनो तुम्ही आपल्या विलक्षण कर्तबगारीनें पशूं करितां उंचवट्यावर व डोंगरांच्या खोल कपारींत स्वच्छ पाणी निर्माण केलेंत. आणि हें करून जो अगोह्य म्हणजे कधींही लपविला जाणरा नव्हे, त्या अगोह्याच्या म्हणजे सूर्याच्या घरीं जाऊन स्वस्थ निजलां आहांत, तर तो क्रम अजून तुम्ही कां सुरू करीत नाही. ॥ ११ ॥

सुम्मील्यु यद्भुकव॑ना पुर्यस॑र्पतु क्व स्वित्तात्या पितरा॑ व आसतुः ।

अश॑पतु यः कुरस्नं॑ व आदुदे यः प्राब्र॑वीत्प्रो तस्मा॑ अब्रवीतन ॥ १२ ॥

सम्मील्य यत् भुवना पर्यसर्पत क्व स्वित् तात्या पितरा व आसतुः ॥

अशपत यः करस्नं व आददे यः प्राब्रवीत् प्रः तस्मा अब्रवीतन ॥ १२ ॥

सर्व भुवनांना झांकून टाकून जेव्हां तुम्ही चोहोंकडे पसरलांत, तेव्हां तुमचे प्रेमळ आईबाप कोठें बसले होते ? ज्याने तुमचे मनगट धरले, त्याला तुम्ही शाप दिलात; परंतु ज्यानें तुमचें स्तवन केलें त्याला आशिर्वाद दिलात. ॥ १२ ॥

सुषुप्वांस॑ ऋभवुस्तद॑पृच्छुतागो॑ह्यु क इुदं नौ अबूबुधत् ।

श्वान॑ बुस्तो बो॑धयितार॑मब्रवीत्संवत्सुर इुदमुद्या व्यख्यत ॥ १३ ॥

सुषुप्वांसः ऋभवस्तत् अपृच्छतागोह्य क इदं नः अबूबुधत् ॥

श्वानं बस्तः बोधयितारं अब्रवीत् संवत्सर इदं अद्या वि अख्यत ॥ १३ ॥

झोंप झाल्यावर जागें होऊन जेव्हां तुम्ही सूर्याला विचारलेंत कीं हे अगोपनीय सूर्या, आम्हाला कोणी जागें केले, तेहां बकरा म्हणाला की तुम्हांला जागे करणारा हा श्वान पहा, बाकी आज सबंध वर्षांत त्यानें तुम्हास आजच पाहिलें. ॥ १३ ॥

दि॒वा या॑न्ति म॒रुतो॒ भूम्या॒ग्निर॒यं वातो॑ अ॒न्तरि॑क्षेण याति ।

अ॒द्भिर्या॑ति॒ वरु॑णः समु॒द्रैर्यु॒ष्माँ इ॒च्छन्त॑ः शवसो नपातः ॥ १४ ॥

दिवा यांति मरुतः भूम्याग्निरयं वातः अंतरिक्षेण याति ॥

अद्भिर्याति वरुणः समुद्रैर्युष्मान् इच्छंतः शवसः नः पातः ॥ १४ ॥

मरुत् उंच आकाशांत संचार करतात, अग्नि पृथ्वीवर प्रदीप्त होत असतो. वायु अंतराळांत वहात असतो व वरुण समुद्रांच्या उदकामधून संचार करतो. परंतु हे सामर्थ्यशाली ऋभूंनो हे सर्व तुमच्या सहवासाची इच्छा करतात. ॥ १४ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १६२

ऋषि : दीर्घतमाः - देवता : अवस्तुतिः - छंद - त्रिष्टुप्

मा नो मित्रो वरुणो अर्यमायुरिंद्र ऋभुक्षा मरुतः परि ख्यन् ।

यद्वाजिनो देवजातस्य सप्तेः प्रवक्ष्यामो विदथे वीर्याणि ॥ १ ॥

मा नः मित्रः वरुणः अर्यमा आयुरिंद्रः ऋभुक्षाः मरुतः परि ख्यन् ॥

यत् वाजिनः देवऽजातस्य सप्तेः प्रऽवक्ष्यामः विदथे वीर्याणि ॥ १ ॥

साक्षात देवांपासून निर्माण झालेला जो यज्ञांतील मोठा चपल आणि पाणिदार अश्व त्याच्या गुणांचे वर्णन ह्या विद्वत्सभेमध्यें आतां आम्हांस करावयाचे आहे, तर ह्या प्रसंगी मित्र, वरुण, अर्यमा, मरुत् व विश्वाचा प्राण आणि प्रभु असा इंद्र, हे आम्हांस दूर लोटून न देवोत. ॥ १ ॥

यन्नि॒र्णिजा॒ रेक्ण॑सा॒ प्रावृ॑तस्य रा॒तिं गृ॑भी॒तां मु॑ख॒तो नय॑न्ति ।

सुप्रा॑ङ्॒जो मेम्य॑द्वि॒श्वरू॑प इंद्रापू॒ष्णोः प्रि॒यमप्ये॑ति॒ पाथः॑ ॥ २ ॥

यत् निःऽनिजा रेक्णसा प्रावृतस्य रातिं गृभीतां मुखतः नयंति ॥

सुऽप्राङ् अजः मेम्यत् विश्वऽरूप इंद्रापूष्णोः प्रियं अपि एति पाथः ॥ २ ॥

उंची साज व झूल अंगावर घालून चाललेल्या त्या घोड्यापुढें, हातांमध्ये बली घेऊन लोक चालत असतात, वे बें बें करीत ओरडत ऐटीने चालणारा चित्र विचित्र रंगाचा एक बकराही, इंद्र आणि पूषा ह्यांच्या प्रिय निवासस्थलीं जाण्याकरितां पुढें जात असतो. ॥ २ ॥

ए॒ष छागः॑ पु॒रो अश्वे॑न वा॒जिना॑ पू॒ष्णो भा॒गो नीय॑ते वि॒श्वदे॑व्यः ।

अ॒भि॒प्रि॒यं॒ यत्पु॑रो॒ळाश॒मर्व॑ता॒ त्वष्टेदे॑नं सौश्र॒वसाय॑ जिन्वति ॥ ३ ॥

एष छागः पुरः अश्वेन वाजिना पूष्णः भागः नीयते विश्वऽदेव्यः ॥

अभिऽप्रियं यत् पुरोळाशं अर्वता त्वष्टा इत् एनं सौश्रवसाय जिन्वति ॥ ३ ॥

ह्या पाणिदार घोड्यापुढें हा बकरा नेत आहेत तो तर सर्व देवांना प्रिय आहेच, परंतु ह्या प्रसंगी पूषा देवांकरितां तो बळी द्यावयाचा आहे. हा देवांचा फार आवडीचा पुरोडाश नैवेद्य अशी ह्याची चोहोंकडे ख्याती व्हावी म्हणून खुद्द त्वष्टाच ह्या बकऱ्याला त्या अश्वाबरोबरच तिकडे नेत आहे असे वाटतें. ॥ ३ ॥

यद्धवि॒ष्यमृतु॒शो दे॑व॒यानं॒ त्रिर्मानु॑षा॒ः पर्यश्वं॒ नय॑न्ति ।

अत्रा॑ पू॒ष्णः प्र॑थ॒मः भा॒ग ए॑ति य॒ज्ञं दे॒वेभ्य॑ः प्रतिवे॒दय॑न्न॒जः ॥ ४ ॥

यत् हविष्यं ऋतुऽशः देवऽयानं त्रिः मानुषाः परि अश्वं नयंति ॥

अत्र पूष्णः प्रथमः भागः एति यज्ञं देवेभ्यः प्रतिऽवेदयन् अजः ॥ ४ ॥

देवलोकीं जाण्यास निघालेल्या व त्याचा हविर्भाग म्हणून त्यांना अर्पण केलेल्या त्या अश्वास ऋत्विज् बलिदानावेळीं तिनदां अग्नि भोंवती फिरवीत असतात, तोंच तिकडे पूषादेवाचा प्रथम भाग असा तो बकरा यज्ञास आरंभ झाला म्हणून कळविण्याकरितां स्वतः बळी जाऊन देवांकडे जातो. ॥ ४ ॥

होताध्वर्युरावया अग्निमिन्धो ग्रावग्राभ उत शंस्ता सुविप्रः ।

तेन यज्ञेन स्वरङ्कृ तेन स्विष्टेन वक्षणा आ पृणध्वम् ॥ ५ ॥

होता अध्वर्युः आऽवयाः अग्निंऽइंधः ग्रावऽग्राभः उत शंस्ता सुऽविप्रः ॥

तेन यज्ञेन सुऽअरंकृतेन सुऽइष्टेन वक्षणाः आ पृणध्वम् ॥ ५ ॥

होता, अध्वर्यु, आवया, अग्निमिन्ध, ग्रावस्तुत्, प्रस्तोता आणि विद्वान ब्रह्मा इ. ऋत्विजांनो, घृताचे प्रवाहच्या प्रवाह वाहतील अशा रीतीनें हा यज्ञ थाटाने यथागत पूर्ण करा. ॥ ५ ॥

यूपव्रस्का उत ये यूपवाहाश्चषालं ये अश्वयूपाय तक्षति ।

ये चार्वते पचनं सम्भरन्त्युतो तेषामभिगूर्तिर्न इन्वतु ॥ ६ ॥

यूपऽव्रस्काः उत ये यूपऽवाहाः चषालं ये अश्वऽयूपाय तक्षति ॥

ये च अर्वते पचनं संऽभरंति उतो इति तेषां अभिऽगूर्तिः नः इन्वतु ॥ ६ ॥

यज्ञाकरितां यूप तयार करणारे, तो वाहून आणणारे, त्याच्या शेंड्यावर बसविण्याकरितां कळस करणारे व अश्व शिजविण्याकरितां भांडे तयार करणारे अशा सर्वांच्या संतोषाने हा आमचा यज्ञ समारंभ सिद्धिस जावो. ॥ ६ ॥

उप प्रागात्सुमन्मेऽधायि मन्म देवानामाशा उप वीतपृष्ठः ।

अन्वेनं विप्रा ऋषयो मदन्ति देवानां पुष्टे चकृमा सुबन्धुम् ॥ ७ ॥

उप प्र अगात् सुऽमत् मे अधायि मन्म देवानां आशाः उप वीतऽपृष्ठः ॥

अनु एनं विप्राः ऋषयः मदंति देवानां पुष्टे चकृमा सुऽबंधुम् ॥ ७ ॥

मी स्तोत्र गायन उत्तम रीतीने केलें न केलें तोंच पहा हा अश्व - हा परिपुष्ट अश्व - देवांच्या लोकीं जाण्याकरितां पुढें चालता झाला; स्तोतेजन आणि ऋषि मोठ्या हर्षाने त्यास पोहोंचविण्यास गेले. ह्या अश्वानें देवांचा संतोष संपादन केला. त्यामुळें त्याला आम्ही बंधुप्रमाणें मानले आहे. ॥ ७ ॥

यद्वाजिनो दाम संदानमर्वतो या शीर्षण्या रशना रज्जुरस्य ।

यद्वा॑ घास्य॒ प्रभृं॑तमा॒स्ये३॑तृणं॒ सर्वा॒ ता ते॒ अपि॑ दे॒वेष्व॑स्तु ॥ ८ ॥

यत् वाजिनः दाम संऽदानं अर्वतः या शीर्षण्या रशना रज्जुः अस्य ॥

यत् वा घ अस्य प्रऽभृतं आस्ये तृणं सर्वा ता ते अपि देवेषु अस्तु ॥ ८ ॥

ह्या चलाख घोड्याची रशी, पायबंद व डोक्याच्या पट्या, काढणी इत्यादि जें जें काही आहे, किंवा खातांना त्याने जे गवत तोंडांत धरले असेल, तें तें सर्व देव लोकांत त्याच्या बरोबरच जावो. ॥ ८ ॥

यदश्व॑स्य क्र॒विषो॒ मक्षि॒काश॒ यद्वा॒ स्वरौ॒ स्वधि॑तौ रि॒प्तमस्ति॑ ।

यद्धस्त॑योः शमि॒तुर्यन्न॒खेषु॒ सर्वा॒ ता ते॒ अपि॑ दे॒वेष्व॑स्तु ॥ ९ ॥

यत् अश्वस्य क्रविषः मक्षिका आश यत् वा स्वरौ स्वऽधितौ रिप्तं अस्ति ॥

यत् हस्तयोः शमितुः यत् नखेषु सर्वा ता ते अपि देवेषु अस्तु ॥ ९ ॥

ह्या घोड्याच्या मांसाचा जो कांही अंश माशीनें खाल्ला असेल, किंवा लांकडी ठोकळ्याला व सुरीला चिकटून राहिला असेल, अगर मारणाराच्या हाताला व नखांना राहिला असेल, तोही सर्व देवांना जाऊन पोहोंचो. ॥ ९ ॥

यदूवध्यमुदरस्यापवाति य आमस्य क्रविषो गन्धो अस्ति ।

सुकृता तच्छमितारः कृण्वन्तूत मेधं शृतपाकं पचन्तु ॥ १० ॥

यत् ऊवध्यं उदरस्य अपऽवातिः यः आमस्य क्रविषः गंधः अस्ति ॥

सुऽकृता तत् शमितारः कृण्वंतु उत मेधं शृतऽपाकं पचंतु ॥ १० ॥

कोठ्यांत गवताचा जो अपक्व भाग राहून त्याचा वाईट वास येत असतो व कच्च्या मांसाचाही जो एक प्रकारचा वास चालतो, म्हणून तो सर्व भाग हे मांस कापणारे लोक धुवून स्वच्छ करोत व मेध्य मांस उत्तम रीतीनें शिजवून तयार करोत. ॥ १० ॥

यत्ते गात्रादग्निना पच्यमानादभि शूलं निहतस्यावधावति ।

मा तद्भूम्यामा श्रिषन्मा तृणेषु देवेभ्यस्तदुशद्भ्यौ रातमस्तु ॥ ११ ॥

यत् ते गात्रात् अग्निना पच्यमानात् अभि शूलं निऽहतस्य अवऽधावति ॥

मा तत् भूम्यां आ श्रिषत् मा तृणेषु देवेभ्यः तत् उशत्ऽभ्यः रातं अस्तु ॥ ११ ॥

तुझे मांस शिजत असतांना त्यांतील जो जो अंश ओतू जाईल किंवा लोहशूलावर तुझ्या मांसाचे तुकडे रोवून भाजत असतांना जो अंश त्या शूलावर पाघळेल, तो जमीनींत जिरून किंवा गवतांत सांडून वाया न जावो, तर तोही उत्सुक देवांनांच अर्पण केला असे होवो. ॥ ११ ॥

ये वाजिनं परिपश्यन्ति पक्वं य ईमाहुः सुरभिर्निर्हरेति ।

ये चार्वतो मांसभिक्षामुपासत उतो तेषामभिगूर्तिर्न इन्वतु ॥ १२ ॥

ये वाजिनं परिऽपश्यंति पक्वं ये ईं आहुः सुरभिः निः हर इति ॥

ये च अर्वतः मांसऽभिक्षां उपऽआसत उतो इति तेषां अभिऽगूर्तिः न इन्वतु ॥ १२ ॥

हा जवान घोडा शिजून तयार झाला कीं नाहीं हें पाहण्याचे काम ज्यांचे असतें तें म्हणतात कीं, " पहा हा याचा सुवास येऊं लागला तर आतां भांडे खाली उतरा." व तसेच जे लोक अश्वमांसाचा प्रसाद मिळण्याची उत्सुक्तेनें प्रतीक्षा करीत असतात - अशा ह्या सर्व मंडळींच्या संतोषाने आमच्या कार्यभागास सहाय्य होवो. ॥ १२ ॥

यन्नीक्ष॑णं माँ॒स्पच॑न्या उ॒खाया॒ या पात्रा॑णि यू॒ष्ण आ॒सेच॑नानि ।

ऊ॒ष्म॒ण्यापि॒धाना॑ चरू॒णाम॒ङ्काः॑ सू॒नाः परि॑ भूष॒न्त्यश्व॑म् ॥ १३ ॥

यत् निऽईक्षणं मांस्पचन्याः उखायाः या पात्राणि यूष्णः आऽसेचनानि ॥

ऊष्मण्या अपिऽधाना चरूणां अंकाः सूनाः परि भूषंति अश्वम् ॥ १३ ॥

मांस शिजले कीं नाहीं हें पाहण्याकरितां भांड्यात घालवयाची लांब पळी, सुरवा ओतून ठेवावयाची पात्रें, हविरन्नाची वाफ जाऊं नये म्हणून पातेल्यावर ठेवावयाची झांकणे, आंकडे आणि सुय्या हीं सर्व उपकरणीं अश्वाचें मांस शिजवून तयार करण्याकरितां लागत असतात. ॥ १३ ॥

नि॒क्रम॑णं नि॒षद॑नं वि॒वर्त॑नं॒ यच्च॒ पड्बी॑श॒मर्व॑तः ।

यच्च॑ प॒पौ यच्च॑ घा॒सिं ज॒घास॒ सर्वा॒ ता ते॒ अपि॑ दे॒वेष्व॑स्तु ॥ १४ ॥

निऽक्रमणं निऽसदनं विऽवर्तनं यच् च पड्बीशं अर्वतः ॥

यच् च पपौ यच् च घासिं जघासः सर्वा ता ते अपि देवेषु अस्तु ॥ १४ ॥

ज्या ठिकाणाहून तो अश्व निघाला, जेथें बसून त्याने विश्रांती घेतली, जेथें लोळून त्यानें आपलें अंग मोकळें केले ती सर्व ठिकाणें, तसेंच त्याचा पायबंद, त्यानें प्यालेले पाणी व खाल्लेलें गवत ही सर्व त्याला देवलोकीं प्राप्त होवोत. ॥ १४ ॥

मा त्वा॒ग्निर्ध्व॑नयीद्धू॒मग॑न्धि॒र्मोखा भ्राज॑न्त्य॒भि वि॑क्त॒ जघ्रिः॑ ।

इ॒ष्टं वी॒तम॒भिगू॑र्तं॒ वष॑ट्कृतं॒ तं दे॒वासः॒ प्रति॑ गृभ्ण॒न्त्यश्व॑म् ॥ १५ ॥

मा त्वा अग्निः ध्वनयीत् धूमऽगंधिः मा उखा भ्राजंति अभि विक्त जघ्रिः ॥

इष्टं वीतं अभिऽगूर्तं वषट्ऽकृतं तं देवासः प्रति गृभ्णंति अश्वम् ॥ १५ ॥

विस्तवांत तुझें मांस करपून चालल्याचा आवाज न होवो, व भांडे तापून ओतू जावून उपडें न होवो, कारण जेव्हां मांसाचे योग्य हवन होतें व ते स्वादिष्ट बनून देवांस पसंत पडून जेव्हां वषट् शब्दानें त्याला पवित्रपणा येतो, तेव्हांच त्या अश्वाचा देव स्वीकार करतात. ॥ १५ ॥

यदश्वा॑य॒ वास॑ उपस्तृ॒णन्त्य॑धीवा॒सं या हिर॑ण्यान्यस्मै ।

सं॒दान॒मर्व॑न्तं॒ पड्बी॑शं प्रि॒या दे॒वेष्वा या॑मयन्ति ॥ १६ ॥

यत् अश्वाय वासः उपऽस्तृणंति अधीवासं या हिरण्यानि अस्मै ॥

संऽदानं अर्वंतं पड्बीशं प्रिया देवेषु आ यमयंति ॥ १६ ॥

घोड्याच्या पाठीवर झूल घालतात ती, त्याचें खोगीर, त्याचा सोन्याचा साज, लगाम आणि पायबंद ह्या सर्व प्रिय वस्तू त्याच्या बरोबर देवलोकीं पाठविण्याची वहिवाट आहे. ॥ १६ ॥

यत्ते॑ सा॒दे मह॑सा॒ शूकृ॑तस्य॒ पाष्ण्या॑ वा॒ कश॑या वा तु॒तोद॑ ।

स्रुचेव ता हविषो अध्वरेषु सर्वा ता ते ब्रह्मणा सूदयामि ॥ १७ ॥

यत् ते सादे महसा शूकृतस्य पार्ष्ण्या वा कशया वा तुतोद ॥

स्रुचाऽइव ता हविषः अध्वरेषु सर्वा ता ते ब्रह्मणा सूदयामि ॥ १७ ॥

तूं थकून जाऊन मोठमोठ्यानें धापा टाकीत असतांही तुझ्यावर स्वार होऊन कोणी तुला परांच्यानी किंवा चाबकानें मारून दुःख दिलें असेल तें तुझे सर्व दुःख यज्ञांत होमाच्या पळीनें व ह्या माझ्या स्तवनानें पार नाहिसें करतो. ॥ १७ ॥

चतुस्त्रिंशद्वाजिनो देवबन्धोर्वङ्क्रीरश्वस्य स्वधितिः समेति ।

अच्छिद्रा गात्रा वयुना कृणोत परुष्परुरनुघुष्या वि शस्त ॥ १८ ॥

चतुःत्रिंशत् वाजिनः देवऽबंधोः वङ्क्रीः अश्वस्य स्वऽधितिः सं एति ॥

अच्छिद्रा गात्रा वयुना कृणोत परुःपरुः अनुऽघुष्या वि शस्त ॥ १८ ॥

बलि जाण्यामुळें देवतांना बंधू प्रमाणें प्रिय झालेल्या ह्या अश्वाच्या चौतीस बरगड्यांत आतां ही सुरी घुसत आहे. कापणाऱ्या लोकांनो ह्याची सर्व गात्रें चातुर्यानें सबंधच्या सबंध सोडवा. प्रत्येक सांधान सांधा , हा अमुक, हा तमूक असें मोठ्यानें सांगून कापून काढा. ॥ १८ ॥

एकुस्त्वष्टुरश्वस्या विशुस्ता द्वा युन्तारा भवतुस्तथ ऋतुः ।

या ते गात्राणामृतुथा कृणोमि ताता पिण्डानां प्र जुहोम्युग्नौ ॥ १९ ॥

एकः त्वष्टुः अश्वस्य विऽशस्ता द्वा यंतारा भवतः तथा ऋतुः ॥

या ते गात्राणां ऋतुऽथा कृणोमि ताऽता पिण्डानां प्र जुहोमि अग्नौ ॥ १९ ॥

साक्षात त्वष्ट्यानें निर्माण केलेल्या ह्या घोड्याला विशसिता म्हणजे कापणारा एकच असतो पण त्याला धरणारे दोन असावे लागतात, कारण असा प्रघातच आहे. हे अश्वा तुझे जे जे अवयव मी क्रमाक्रमानें कापून काढले आहेत त्यांचे पिंड करून ते मी यज्ञाग्नींत अर्पण करतो. ॥ १९ ॥

मा त्वा तपत्प्रिय आत्मापियन्तं मा स्वधितिस्तुन्व१आ तिष्ठिपत्ते ।

मा ते गृध्नुरविशस्तातिहाय छिद्रा गात्राण्यसिना मिथू कः ॥ २० ॥

मा त्वा तपत् प्रियः आत्मा अपिऽयंतं मा स्वऽधितिः तन्वः आ तिस्थिपत् ते ॥

मा ते गृध्नुः अविऽशस्ता अतिऽहाय छिद्रा गात्राणि असिना मिथु करिति कः ॥ २० ॥

तूं इहलोक सोडून जाते वेळी तुझ्या प्राणाला यातना न होवोत, व कापणाराची सुरी तुझ्या मानेंत कुचंबून न राहो. कापणारा अडाणीपणानें एखाद्या गिधाडाप्रमाणें तुझी गात्रें आपल्या सुरीनें भलत्याच ठिकाणी तोडतोडून खराब न करोत. ॥ २० ॥

न वा उं एतन्म्रियसे न रिष्यसि देवाँ इदेषि पथिभिः सुगेभिः ।

हरी ते युञ्जा पृषती अभूतामुपास्थाद्वाजी धुरि रासभस्य ॥ २१ ॥

न वै ऊं इति एतन् म्रियसे नः रिष्यसि देवान् इत् एषि पथिऽभिः सुऽगेभिः ॥

हरी इति ते युञ्जा पृषती इति अभूतां उप अस्थात् वाजी धुरि रासभस्य ॥ २१ ॥

हे पहा तूं कांही मरत नाहींस व नाहिंसा होतोस असेही नाही तर सुलभ मार्गांनी देवांकडेसच जात आहेस. साक्षात् इंद्राचे हरिद्वर्ण अश्व किंवा मरुतांच्या हरिणी हया तुझ्या जोडीस येतील किंवा अश्वी देवाच्या मोठ्यानें खिंकाळणाऱ्या मजबूत घोड्याच्या धूरेला जवान असा तूंच जोडला जाशील. ॥ २१ ॥

सु॒गव्यं॑ नो वा॒जी स्वश्व्यं॑ पुं॒सः पु॒त्राँ उ॒त वि॑श्वा॒पुषं॑ र॒यिम् ।

अ॒ना॒गा॒स्त्वं नो॒ अदि॑तिः कृणोतु क्ष॒त्रं नो॒ अश्वो॑ वनतां ह॒विष्मा॑न् ॥ २२ ॥

सुऽगव्यं नः वाजी सुऽअश्व्यं पुंसः पुत्रान् उत विश्वऽपुषं रयिम् ॥

अनागाःऽत्वं नः अदितिः कृणोतु क्षत्रं नः ः अश्वः वनतां हविष्मान् ॥ २२ ॥

हा यज्ञार्पित पाणिदार घोडा आम्हांस उत्तम गोधन, उत्कृष्ट अश्वसंपदा, वीर्यशाली पुत्र व सर्व बाजूंनी आमची अभिवृद्धि करणारी अशी दिव्य संपत्ति देवो. अनाद्यनंत अदिति आम्हांस पाप निर्मुक्त करो, आणि हा अश्वमेध आम्हांला अधिकार प्राप्त करून देवो. ॥ २२ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १६३ (अश्वमेध सूक्त)

ऋषि : दीर्घतमस औचथ्य - देवता : अश्व - छंद - त्रिष्टुभ्

यदक्रन्दः प्रथमं जायमान उद्यन्त्समुद्रादुत वा पुरीषात् ॥

श्येनस्य पक्षा हरिणस्य बाहू उपस्तुत्यं महि जातं ते अर्वन् ॥ १ ॥

यत् अक्रंदः प्रथमं जायमानः उत्ऽयन् समुद्रात् उत वा पुरीषात् ॥

श्येनस्य पक्षा हरिणस्य बाहू इति उपऽस्तुत्यं महि जातं ते अर्वन् ॥ १ ॥

समुद्रपासून म्हणा किंवा मेघोदका पासून म्हणा, वर उडून प्रकट होतांच जेव्हां पहिल्याने तू खिंकाळलास, तेव्हांचे तुझे स्वरूप तुला ससाण्याचे पंख व हरिणाचे पाय अशा प्रकारचे होते. हे अश्वा ह्याप्रमाणे उत्तम जन्म येणें हे तुझे भाग्यच आहे. ॥ १ ॥

यमेन॑ दत्तं त्रित ए॑नमायुनगिंद्र॑ एणं प्रथमो अध्य॑तिष्ठत् ॥

गन्धर्वो अ॑स्य रशनाम॑गृभ्णात्सूरादश्वं॑ वसवो निर॑तष्ट ॥ २ ॥

यमेन दत्तं त्रितः एनं आयुनक् इंद्र एनं प्रथमः अधि अतिष्ठत् ॥

गंधर्वः अस्य रशनां अगृभ्णात् सूरात् अश्वं वसवः निः अतष्ट ॥ २ ॥

यमाने दिलेल्या ह्या घोड्यावर त्रितानें साज घालून त्याला तयार केला, आणि खुद्द इंद्रानेंच त्याच्यावर प्रथम आरोहण केलें, व गंधर्व त्याचा लगाम धरून उभा राहिला. वसूंनो असा हा दिव्य वारू तुम्ही सूर्यापासून निर्माण केलात. ॥ २ ॥

असि॑ यमो अस्या॑दित्यो अ॑र्वन्नसि॑ त्रितो गुह्ये॑न व्रतेन॑ ॥

असि सोमे॑न समया विपृ॑क्त आहुस्ते त्रीणि॑ दिवि बन्ध॑नानि ॥ ३ ॥

असि यमः असि आदित्यः अर्वन् असि त्रितः गुह्येन व्रतेन ॥

असि सोमेन समया विऽपृक्तः आहुः ते त्रीणि दिवि बंधनानि ॥ ३ ॥

ईश्वराच्या अद्‌भूत लीलेच्या दृष्टीनें पहातां हे अश्वा तूंच यम आहेस, आदित्य आहेस आणि त्रितही तूंच आहेस, सोमरसाशीही तुझें तादात्म्यच आहे. आणि असें सांगतात कीं, तुझीं तीन बंधने स्वर्गलोकी आहेत. ॥ ३ ॥

त्रीणि त आहुर्दिवि बन्धनानि त्रीण्यप्सु त्रीण्यन्तः समुद्रे ॥

उतेव मे वरुणश्छन्त्स्यर्वन्यत्रा त आहुः परमं जनित्रम् ॥ ४ ॥

त्रीणि ते आहुः दिवि बंधनानि त्रीणि अप्ऽसु त्रीणि अंतरिति समुद्रे ॥

उतऽइव मे वरुणः छंत्सि अर्वन् यत्र ते आहुः परमं जनित्रम् ॥ ४ ॥

तुझे स्वर्गलोकीं तीन संबंध आहेत, असें सांगतात, मेघोदकांत तीन आणि समुद्रामध्यैंही तीनच; तेव्हां हे अश्वा, वरुणाप्रमाणे तुझेंही अति श्रेष्ठ जन्मस्थान आहे म्हणून म्हणतात, ते कोठें ते मला सांग. ॥ ४ ॥

इमा ते वाजिन्नवमार्जनानीमा शफानां सनितुर्निधाना ॥

अत्रा॑ ते भ॒द्रा र॑श॒ना अ॑पश्यमृ॒तस्य॒ या अ॑भि॒रक्ष॑न्ति गो॒पाः ॥ ५ ॥

इमा ते वाजिन् अवऽमार्जनानि इमा शफानां सनितुः निऽधाना ॥

अत्र ते भद्राः रशनाः अपश्यं ऋतस्य या अभिऽरक्षंति गोपाः ॥ ५ ॥

हे बलवान अश्वा, जेथें तुझे अंग रगडीत असत तीं हीं स्थले, तसेंच तून् विजयी होऊन आनंदानें फुरफुरून आपल्या खुरांनी जमीन उकरीत असलेली ती ठिकाणें, येथें तुझे मंगलदायक रज्जू पडलेले मी पाहिले. सत्यधर्माचे जे रक्षक तेच ह्या रज्जूंचेंही रक्षण करीत असतात. ॥ ५ ॥

आ॒त्मानं॑ ते॒ मन॑सा॒राद॑जाना॒मवो॑ दि॒वा प॒तय॑न्तं प॒तं॒गम् ॥

शिरो॑ अपश्यं प॒थिभिः॑ सु॒गेभि॑ररे॒णुभि॒र्जेह॑मानं प॒त॒त्रि ॥ ६ ॥

आत्मानं ते मनसा आरात् अजानां अवः दिवा पतयंतं पतंगम् ॥

शिरः अपश्यं पथिऽभिः सुऽगेभिः अरेणुऽभिः जेहमानं पतत्रि ॥ ६ ॥

तुझा आत्मा खालून वर आकाशांत उंच उडणाऱ्या पक्ष्याप्रमाणें मी दुरून आपल्या मनानेंच अवलोकन केला; व पंख असलेलें तुझे मस्तकसुद्धां, पापरूप रजःकणांनी मलीन न होणाऱ्या अशा सुगम्य मार्गांनी फडफडत वर जात असतांना मी पाहिलें आहे. ॥ ६ ॥

अत्रा ते रूपमुत्तममपश्यं जिगीषमाणमिष आ पदे गोः ॥

यदा ते मर्तो अनु भोगमानळादिद्ग्रसिष्ठ ओषधीरजीगः ॥ ७ ॥

अत्र ते रूपं उत्ऽतमं अपश्यं जिगीषमाणं इषः आ पदे गोः ॥

यदा ते मर्तः अनु भोगं आनट् आत् इत् ग्रसिष्ठः ओषधीः अजीगरिति ॥ ७ ॥

येथें यज्ञमंडपांतही तुझी मनोहर आकृति वेदीजवळ हविरन्नाचा आस्वाद घेण्याकरितां उत्सुकतेनें तोंड पुढें करीत असलेली माझ्या दृष्टीस पडली; ती अशी कीं भक्तजनानें तुझ्या तोंडापुढें खाद्य आणतांच क्षुधार्त होऊन तो तृणाहार तूं पार खाऊन टाकलास. ॥ ७ ॥

अनु त्वा रथो अनु मर्यो अर्वन्ननु गावोऽनु भगः कनीनाम् ॥

अनु व्रातासस्तव सख्यमीयुरनु देवा ममिरे वीर्यं ते ॥ ८ ॥

अनु त्वा रथः अनु मर्यः अर्वन्न् अनु गावः अनु भगः कनीनाम् ॥

अनु व्रातासः तव सख्यं ईयुः अनु देवाः ममिरे वीर्यं ते ॥ ८ ॥

हे अश्वा, रथ, शूर योद्धा, स्वधेनूंचा समूह, मुग्ध बालिकांचे प्रेम (कटाक्ष) आणि मरुतांचा संघ हे सर्व तुझ्या सहवासाची कामना धरून तुझ्या पाठोपाठ गेले, व देवांस सुद्धां तुझ्या शौर्याचें कौतुकच वाटले. ॥ ८ ॥

हिरण्यशृङ्गोवऽ॑यो अस्य पादा मनोजवा अवर इंद्र आसीत् ॥

देवा इदस्य हविरद्यमायन्यो अर्वन्तं प्रथमो अध्यतिष्ठत् ॥ ९ ॥

हिरण्यऽशृङ्गः॑ अयः अस्य पादाः मनःऽजवाः अवरः इंद्र आसीत् ॥

देवाः इत् अस्य हविःऽअद्यं आयन् यः अर्वंतं प्रथमः अधिऽअतिष्ठत् ॥ ९ ॥

ह्या दिव्य अश्वाचे आयाळ सोन्याचें व पाय (जणुंकाय) पोलादाचे बनले आहेत. मनापेक्षांही जो वेगवान व ज्याच्यापुढे कोणाचेंही कांहीएक चालत नाही तो इंद्र ह्याचा धनी अशा ह्या अश्वाचा काय, पण जो ह्या अश्वावर प्रथम आरूढ झाला तो इंद्र सुद्धां आला होता. ॥ ९ ॥

ई॒र्मान्ता॑सः॒ सिलि॑कमध्यमासः॒ सं शूर॑णासो दि॒व्यासो॒ अत्याः॑ ॥

हं॒सा इ॑व श्रेणि॒शो य॑तन्ते॒ यदाक्षि॑षुर्दि॒व्यमज्म॒मश्वाः॑ ॥ १० ॥

ईर्मऽअंतासः सिलिकऽमध्यमासः सं शूरणासः दिव्यासः अत्याः ॥

हंसाःऽइव श्रेणिऽशः यतंते यत् आक्षिषुः दिव्यं अज्मं अश्वाः ॥ १० ॥

ज्यांचे पुठ्ठे भरदार व बांधा रेखीव आहे, असे हे देवलोकींचे चलाख आणि तेज घोडे एका रांगे मागून दुसरी ह्या प्रमाणें हंसांच्या मालिके प्रमाणे हारीनें धांवत असतात, व स्वर्ग मार्गांत एकच गर्दी करून तो व्याप्त करून टाकतात. ॥ १० ॥

तव॒ शरी॑रं पतयि॒ष्ण्वर्व॒न्तव॑ चि॒त्तं वात॑ इव॒ ध्रजी॑मान् ॥

तव॒ शृङ्गा॑तणि॒ विष्ठि॑ता पुरु॒त्रार॑ण्येषु॒ जर्भु॑राणा चरन्ति ॥ ११ ॥

तव शरीरं पतयिष्णु अर्वन् तव चित्तं वातःऽइव ध्रजीमान् ॥

तव शृङ्गा॒णि विऽस्थिता पुरुऽत्रा अरण्येषु जर्भुराणा चरंति ॥ ११ ॥

हे अश्वा, तुझा देह पक्ष्याप्रमाणे उड्डाण करूं शकतो. तुझें मनही वायू प्रमाणे वेगवान व तुझें आयाळ तर इतकें विस्तीर्ण असतें कीं, तें जिकडे तिकडे विखरून पसरतें व अरण्यांतूनही त्याचा सर सर असा ध्वनी ऐकूं येतो. ॥ ११ ॥

उप॒ प्रागा॒च्छस॑नं वा॒ज्यर्वा॑ देव॒द्रीचा॒ मन॑सा॒ दीध्या॑नः ॥

अ॒जः पु॒रो नी॑यते॒ नाभि॑र॒स्यानु॑ प॒श्चात्क॒वयो॑ यन्ति रे॒भाः ॥ १२ ॥

उप प्र अगात् शसनं वाजि अर्वा देवद्रीचा मनसा दीध्यानः ॥

अजः पुरः नीयते नाभिः अस्य अनु पश्चात् कवयः यंति रेभाः ॥ १२ ॥

बलि प्रदान करावयाचें त्या स्थलाजवळ पहा हा जवान घोडा येऊन पोहोंचला देखील; ह्या वेळीं त्याचें अंतःकरण देवाच्या एकाग्र ध्यानांत कसें गढून गेलेलें आहे. ह्या घोड्याचा बांधव जो बोकड त्यालाही घोड्याच्या पुढेंच चालविले आहे व दोघांच्या मागें प्रतिभा संपन्न स्तोतेजन चालले आहेत. ॥ १२ ॥

उप प्रागा॑त्पर॒मं यत्स॒धस्थ॒मर्वाँ॒ अच्छा॑ पि॒तरं॑ मा॒तरं॑ च ॥

अ॒द्या दे॒वाञ्जुष्ट॑तमो॒ हि ग॒म्या अथा शा॑स्ते दा॒शुषे॒ वार्या॑णि ॥ १३ ॥

उप प्र अगात् परमं यत् सधऽस्थं अर्वान् अच्छ पितरं मातरं च ॥

अद्य देवान् जुष्टऽतमः हि गम्या अथ आ शास्ते दाशुषे वार्याणि ॥ १३ ॥

हा घोडा अत्युच्च अशा स्वर्गलोकांत जाऊन पोहोंचला व त्याला जगत्पिता आणि जगन्माता ह्यांचे दर्शनही झाले. हे अश्वा अत्यंत प्रसन्नांतःकरणानें देवांना भेट, कारण इकडेही स्तोतृजन यजमानास उत्कृष्ट वर प्रसादांचा लाभ व्हावा म्हणून प्रार्थना करीत आहेत. ॥ १३ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १६४ (अस्य वामीय तत्त्वज्ञान सूक्त)

ऋषि : दीर्घतमस औचथ्य - देवता : विश्वेदेव, सोम, अग्नि, सूर्य, वायु, काल, सरस्वती

- छंद - जगती, त्रिष्टुभ्, अनुष्टुभ्, प्रस्तारपंक्ति

अ॒स्य वा॒मस्य॑ पलि॒तस्य॒ होतु॒स्तस्य॒ भ्राता॑ मध्य॒मो अ॒स्त्यश्नः॑ ॥

तृ॒तीयो॒ भ्राता॑ घृ॒तपृ॑ष्ठो अ॒स्यात्रा॑पश्यं वि॒श्पतिं॑ स॒प्तपु॑त्रम् ॥ १ ॥

अस्य वामस्य पलितस्य होतुः तस्य भ्राता मध्यमः अस्ति अश्नः ॥

तृतीयः भ्राता घृतऽपृष्ठः अस्य अत्र अपश्यं विश्पतिं सप्तऽपुत्रम् ॥ १ ॥

हा पहा शुभ्र किरणरूप जटामंडित पुरातन आचार्य. त्याचा मधला भाऊ सर्व-भोक्ता असून तिसऱ्या भावाचा देह घृतकांतीने दीप्तिमान् आहे. सर्व लोकांच्या ह्या प्रभूचें दर्शन त्याच्या सात पुत्रांनिशी मला येथेंच झालें. ॥ १ ॥

स॒प्त यु॑ञ्जन्ति॒ रथ॒मेक॑चक्र॒मेको॒ अश्वो॑ वहति स॒प्तना॑मा ॥

त्रि॒नाभि॑ च॒क्रम॒जर॑मन॒र्वं यत्रे॒मा विश्वा॒ भु॒व॒नाधि॑ त॒स्थुः ॥ २ ॥

सप्त युञ्जंति रथं एकऽचक्रं एकः अश्वः वहति सप्तऽनामा ॥

त्रिऽनाभि चक्रं अजरं अनर्वं यत्र इमा विश्वा भुवना अधि तस्थुः ॥ २ ॥

एक चाकी रथ सात जण जोडून तयार करतात, त्या रथाला एकच घोडा असतो, परंतु त्यांची स्वरूपें सात आहेत. रथाच्या चाकाला तीन तुंवे असून ते कधींही झिजत नाहींत वा मोडतही नाहीत. ह्या एकाच चाकाच्या आधारावर सर्व भुवनें व्यवस्थित चाललेली आहेत. ॥ २ ॥

इ॒मं रथ॒मधि॒ ये स॒प्त त॒स्थुः स॒प्तच॑क्रं स॒प्त व॑ह॒न्त्यश्वाः॑ ॥

स॒प्त स्वसा॑रो अ॒भि सं न॑वन्ते॒ यत्र॒ गवा॒ं निहि॑ता स॒प्त नाम॑ ॥ ३ ॥

इमं रथं अधि ये सप्त तस्थुः सप्तऽचक्रं सप्त वहंति अश्वाः ॥

सप्त स्वसारः अभि सं नवंते यत्र गवां निऽहिता सप्त नाम ॥ ३ ॥

दुसरा एक रथ सात चाकी आहे. त्यांत सात जण बसतात, व रथाला सात घोडे जुंपलेले असतात. सात बहिणी ह्या रथाचें महत्त्व वर्णन करतात, कारण ह्या रथाच्या जागेंत दिव्य धेनूंचीं सात स्वरूपें गुप्तपणें राहिलेली आहेत. ॥ ३ ॥

को द॑दर्श प्र॒थमं जाय॑मानमस्थ॒न्वन्त॒ं यद॑न॒स्था बिभ॑र्ति ॥

भूम्या॒ असु॒रसृ॑ग॒ात्मा क्व स्वि॒त्को वि॒द्वांस॒मुप॑ गा॒त्प्रष्टु॑मे॒तत् ॥ ४ ॥

कः ददर्श प्रथमं जायमानं अस्थन्ऽवंतं यत् अनस्था बिभर्ति ॥

भूम्या असुः असृक् आत्मा क्व स्वित् कः विद्वांसं उप गात् प्रष्टुं एतत् ॥ ४ ॥

स्वतः अस्थि रहित (म्हणजे अजड) असून ह्या अस्थियुक्त प्राण्यांचा म्हणजे जड विश्वाचा जो सांभाळ करीत असतो, त्या ईश्वरालाच उत्पन्न होतांना कोणी तरी पाहिलें आहे काय ? ह्या पृथ्वीचें जीव तत्त्व व तिचें रक्त

(म्हणजे घटक द्रव्य) आणि आत्मतत्त्व हीं त्या वेळीं कोठें होती ? आणि ज्याला ह्या सर्व गोष्टी माहित आहेत त्याला त्या विचारण्याकरितां तरी कोण गेला होता ? ॥ ४ ॥

पाक॑ः पृच्छामि॒ मन॒साऽवि॑जानन्दे॒वाना॑मे॒ना निहि॑ता प॒दानि॑ ॥

व॒त्से ब॒ष्कयेऽ॑धि स॒प्त तन्तू॒न्वि त॑त्निसरे क॒वय॒ ओत॒वा उ॑ ॥ ५ ॥

पाकः पृच्छामि मनसा अविऽजानन् देवानां एना निऽहिता पदानि ॥

वत्से बष्कये अधि सप्त तंतून् वि तत्नि्रे कवयः ओतवै ऊं इति ॥ ५ ॥

मी मनाचा निष्कपट परंतु अज्ञानी; तेव्हां देवांची ही जी स्वरूपें गूढ आहेत, ती कशी आहेत ते विचारतो. पहा ह्या एक वर्षाच्या वत्साच्या अंगावर ज्ञानी जनांनी उपासनारूप वस्त्र विणण्याकरितां सात धागे पसरून दिले आहेत. ॥ ५ ॥

अचि॑कित्वाञ्चिकि॒तुष॑श्चि॒दत्र॑ क॒वीन्पृ॑च्छामि वि॒द्मने॒ न वि॒द्वान् ॥

वि यस्तुस्तम्भु षळिमा रजांस्युजस्यं रूपे किमपिं स्विुदेकंम् ॥ ६ ॥

अचिकित्वान् चिकितुषः चित् अत्र कवीन् पृच्छामि विद्मने न विद्वान् ॥

वि यः तस्तंभ षट् इमा रजांसि अजस्य रूपे किं अपि स्वित् एकम् ॥ ६ ॥

ह्या संबंधांत आपल्याला कांहीच कळत नाही, अज्ञानी पडलो, तेव्हां, हे सर्व ज्यांना कळत आहे अशा ज्ञानी जनांपासून सर्व समजून घावे म्हणून त्यांना विचारतो कीं ज्याने हे सहाही लोक धारण केले आहेत त्या जन्मरहित ईश्वराच्या स्वरूपांत कांही एकात्मक आहे हें खरे ना ? ॥ ६ ॥

इुह ब्रंवीतु य ईमुङ्गी वेदास्य वामस्यु निहिंतं पुदं वेः ॥

शीुर्ष्णः क्षीुरं दुंह्रते गावौ अस्य वुव्रिं वसांना उदुकं पुदापुः ॥ ७ ॥

इह ब्रवीतु यः ईं अंग वेद अस्य वामस्य निऽहितं पदं वेरिति वेः ॥

शीर्ष्णः क्षीरं दुह्रते गावः अस्य वव्रिं वसाना उदकं पदा अपुः ॥ ७ ॥

ज्या कोणाला हे खरोखर माहीत असेल त्यानें आतां विलंब न लावता सांगून टाकावे. ह्या मनोहर दिव्य पक्ष्यांचे निवास स्थान फार गूढ आहे. ह्याच्या धेनू अशा चमत्कारिक आहेत कीं त्यांच्या मस्तकांतूनच दुधाचा प्रवाह चालतो. त्या तेजोमय वस्त्रें पांघरतात व पायानेंच पाणी पीत असतात. ॥ ७ ॥

मा॒ता पि॒तर॑मृ॒त आ ब॑भाज धी॒त्यग्रे॒ मन॑सा॒ सं हि ज॒ग्मे ॥

सा बी॑भ॒त्सुर्गर्भ॑रसा॒ निवि॑द्धा॒ नम॑स्वन्त॒ इदु॑पवा॒कमी॑युः ॥ ८ ॥

माता पितरं ऋते आ बभाज धीती अग्रे मनसा सं हि जग्मे ॥

सा बीभत्सुः गर्भऽरसा निऽविद्धा नमस्वंतः इत् उपऽवाकं ईयुः ॥ ८ ॥

भूमातेनें पित्याची यज्ञांमध्ये सेवा केली तेव्हां ध्यानानें आणि मनाने त्याचा तिच्याशी प्रथम समागम होऊन त्या पतिसेवोत्सु पत्नीवर वृष्ट्युदकाचा वर्षाव झाला, तेव्हां भक्तजन दोघांच्याही जवळ जाऊन स्तवन करूं लागले. ॥ ८ ॥

यु॒क्ता मा॒तासी॑द्धु॒रि दक्षि॑णाया॒ अति॑ष्ठ॒द्गर्भो॑ वृज॒नीष्व॒न्तः ॥

अमीमेद्वत्सो अनु गामपश्यद्विश्वरूप्यं त्रिषु योजनेषु ॥ ९ ॥

युक्ता माता आसीत् धुरि दक्षिणायाः अतिष्ठत् गर्भः वृजनीषु अंतरिति ॥

अमीमेत् वत्सः अनु गां अपश्यत् विश्वऽरूप्यं त्रिषु योजनेषु ॥ ९ ॥

दक्षिणेच्या म्हणजे यज्ञ धेनूच्या कामाकडे भूमातेची योजना झाली, आर्द्र अशा मेघ धेनूच्या पोटीं गर्भ राहिला. वासरू ओरडून आपल्या आईकडे पाहूं लागले. ती गाय आहे कीं, ह्या भुवनांत तिला वाटेल तें रूप घेता येते. ॥ ९ ॥

तिस्रो मातृस्त्रीन्पितृन्बिभ्रदेक ऊर्ध्वस्तस्थौ नेमव ग्लापयन्ति ॥

मन्त्रयन्ते दिवो अमुष्य पृष्ठे विश्वविदं वाचमविश्वमिन्वाम् ॥ १० ॥

तिस्रः मातृः त्रीन् पितृन् बिभ्रत् एकः ऊर्ध्वः तस्थौ न ईं अव ग्लपयंति ॥

मंत्रयंते दिवः अमुष्य पृष्ठे विश्वऽविदं वाचं अविश्वऽमिन्वाम् ॥ १० ॥

मातृरूपी तीन व पितृरूपी तीन अशा सहा भुवनांस हा एकटा सांवरून धरून उभा आहे तरी ह्या ओझ्यामुळें तो यत्किंचित ही थकत नाहीं. ह्या स्वर्लोकाच्या पाठीवर राहणारे देव अशी एक भाषा बोलत असतात कीं, तिच्या योगानें सर्व कांही समजतें, पण ती मात्र सर्वांनाच कळते असें नाही. ॥ १० ॥

द्वाद॑शारं न॒हि तज्जरा॑य॒ वर्व॑र्ति च॒क्रं परि॒ द्यामृ॒तस्य॑ ॥

आ पु॒त्रा अ॑ग्ने मिथु॒नासो॒ अत्र॑ स॒प्त श॒तानि॑ विंश॒तिश्च॑ तस्थुः ॥ ११ ॥

द्वादशऽअरं नहि तत् जराय वर्वर्ति चक्रं परि द्यां ऋतस्य ॥

आ पुत्राऽ अग्ने मिथुनासः अत्र सप्त शतानि विंशतिः च तस्थुः ॥ ११ ॥

ह्या सृष्टिक्रमाच्या चक्राला बारा अरे आहेत. तें कधींही न झिजतां आकाश मंडलांत निरंतर भ्रमण करीत असतें. हे अग्निदेवा, ह्याच चक्रावर सर्वजण जोडप्यांनी बसलेले आहेत त्या व्यक्तींची एकंदर संख्या सातशें वीस आहे. ॥ ११ ॥

पञ्च॑पादं पि॒तरं॒ द्वाद॑शाकृतिं दि॒व आ॑हुः॒ परे॒ अर्धे॑ पुरी॒षिण॑म् ॥

अथेमे अन्य उपरे विचक्षणं सप्तचक्रे षळर आहुरर्पितम् ॥ १२ ॥

पंचऽपादं पितरं द्वादशऽआकृतिं दिव आहुः परे अर्धे पुरीषिणम् ॥

अथ इमे अन्ये उपरे विऽचक्षणं सप्तऽचक्रे षट्ऽअरे आहुः अर्पितम् ॥ १२ ॥

पित्याला पांच चरण व स्वरूपें बारा प्रकारची आहेत. तो जल वर्षक असून आकाशाच्या अत्युच्च प्रदेशांत राहतो असे म्हणतात, व दुसरे असें म्हणतात कीं तो जवळच्या भागांत असून सहा अरे असलेल्या सात चाकी रथावर बसून सर्व पहात असतो. ॥ १२ ॥

पञ्चारे चक्रे परिवर्तमाने तस्मिन्ना तस्थुर्भुवनानि विश्वा ॥

तस्य नाक्षस्तप्यते भूरिभारः सनादेव न शीर्यते सनाभिः ॥ १३ ॥

पंचऽअरे चक्रे परिऽवर्तमाने तस्मिन् आ तस्थुः भुवनानि विश्वा ॥

तस्य न अक्षः तप्यते भूरिऽभारः सनात् एव न शीर्यते सऽनाभिः ॥ १३ ॥

चाकाला पांच अरे असून ते एक सारखे फिरतच असतें, आणि त्याच्यावर ही सर्व भुवनें राहिलेली आहेत. त्या चाकाच्या कण्यावर जबरदस्त ओझें पडते, तरी तो कधीं तापत नाहीं व अनंत कालापासून ह्या चाकाला एकच पावटा आहे व तोही कधीं मोडत नाहीं. ॥ १३ ॥

सनेमि चक्रमजरं वि वावृत उत्तानायां दश युक्ता वहन्ति ॥

सूर्यस्य चक्षू रजसैत्यावृतं तस्मिन्नार्पिता भुवनानि विश्वा ॥ १४ ॥

सऽनेमि चक्रं अजरं वि ववृते उत्तानायां दश युक्ताः वहंति ॥

सूर्यस्य चक्षूः रजसा एति आऽवृतं तस्मिन्न् आर्पिता भुवनानि विश्वा ॥ १४ ॥

एकच अखंड पावटा असलेले असें जें एक अविनाशी चक्र फिरत राहिलें आहे, त्याच्या धुरेचें लाकूड उताणे असून त्याला जोडलेले दहा घोडे तें चाक ओढीत असतात. तऱ्हेतऱ्हेच्या रंगांच्या वलयांनी वेष्टिलेला असा सूर्याचा नेत्र आपला मार्ग आक्रमण करीतच असतो आणि त्याच्यावरच सर्व भुवनें अवलंबून आहेत. ॥ १४ ॥

साकंजानां सप्तथमाहुरेकजं षळिद्यमा ऋषयो देवजा इति ॥

तेषामिष्टानि विहितानि धामशः स्थात्रे रेजन्ते विकृतानि रूपशः ॥ १५ ॥

साकंऽजानां सप्तथं आहुः एकऽजं षट् इत् यमाः ऋषयः देवऽजाः इति ॥

तेषां इष्टानि विऽहितानि धामऽशः स्थात्रे रेजंते विऽकृतानि रूपऽशः ॥ १५ ॥

सात जण एकदमच जन्मले खरे पण त्यापैकीं सातवा मात्र एकटाच निराळा जन्मला असें समजतात आणि बाकीचे सहा जुळे असून तेच देवांपासून झालेले ऋषि होत असें म्हणतात. त्यांच्या पासून मिळणारी इच्छित फळें त्यांच्या क्रमाप्रमाणे येतात; आणि त्यांची रूपें विविध आहेत तरी ते सर्व आपल्या मालकाच्या धोरणानेंच राहतात. ॥ १५ ॥

स्त्रियः सतीस्ताँ उ मे पुंस आहुः पश्यदक्षण्वान्न वि चेतदन्धः ॥

कविर्यः पुत्रः स ईमा चिकेत यस्ता विजानात्स पितुष्पितासत् ॥ १६ ॥

स्त्रियः सतीः तान् ऊं इति मे पुंसः आहुः पश्यत् अक्षण्ऽवान् न वि चेतत् अंधः ॥

कविः यः पुत्रः सः ईं आ चिकेत यः ता विऽजानात् सः पितुः पिता असत् ॥ १६ ॥

त्या वास्तविक स्त्रिया असतांना ते पुरुषच आहेत असे त्यांनी मला सांगितलें; ही गोष्ट ज्याला डोळे असतील त्याला दिसेल, आंधळ्याला काय दिसणार ? जो सुपुत्र खरा ज्ञानी असेल त्यालाच हें समजेल व हें ज्याला समजत असेल तो आपल्या पित्याचाही पिता होईल. ॥ १६ ॥

अ॒वः परे॑ण प॒र ए॒नाव॑रेण प॒दा व॒त्सं बिभ्र॑ती॒ गौरुद॑स्थात् ॥

सा क॒द्रीची॒ कं स्वि॒दर्धं॒ परा॑गा॒त्क्व स्वित्सूते न॒हि यू॒थे अ॒न्तः ॥ १७ ॥

अवः परेण परः एना अवरेण पदा वत्सं बिभ्रती गौः उत् अस्थात् ॥

सा कद्रीची कं स्वित् अर्धं परा अगात् क्व स्वित् सूते नहि यूथे अंतरिति ॥ १७ ॥

अत्युच्च स्थानांच्या खाली पण ह्या भूगोलाच्यावर आपलें वासरूं आपल्या पायानें उचलून धरणारी अशी गाय वर दिसूं लागली आहे. ती कोणीकडे कोणत्या बाजूला निघून जाते ? ती कोठें वीत असावी बरें ? कळपांत तर वीत नाहींच. ॥ १७ ॥

अवः परेण पितरं यो अस्यानुवेद पर एनावरेण ॥

कवीयमानः क इह प्र वोचद्देवं मनः कुतो अधि प्रजातम् ॥ १८ ॥

अवः परेण पितरं यः अस्य अनुऽवेद परः एना अवरेण ॥

कवीऽयमानः कः इह प्र वोचत् देवं मनः कुतः अधि प्रऽजातम् ॥ १८ ॥

अत्युच्च स्थानाच्या खाली परंतु अगदी खालच्या वर (म्हणजे मध्यें) जें हें विश्व आहे, त्याचा पिता जो ईश्वर त्याची ओळख ज्याला झालेली आहे, असा कोणता ज्ञानी पुरुष ह्या जगांत उपदेश करून गेला ? दिव्य मन कोठून निर्माण झाले ? ॥ १८ ॥

ये अर्वाञ्चस्ताँ उ पराच आहुर्ये पराञ्चस्ताँ उ अर्वाच आहुः ॥

इंद्रश्च या चक्रथुः सोम तानि धुरा न युक्ता रजसो वहन्ति ॥ १९ ॥

ये अर्वाचः तान् ऊं इति पराचः आहुः ये परांचः तान् ऊं इति अर्वाचः आहुः ॥

इंद्रः च या चक्रथुः सोम तानि धुरा न युक्ता रजसः वहंति ॥ १९ ॥

वास्तविक जे आपल्याकडे खाली येत असतात, त्यांना म्हणतात कीं हे वर चालले आहेत, आणि जे खरोखर वर जात असतात त्यांना म्हणतात कीं हे आपल्या कडेच येत आहेत; तर हे सोमा, इंद्र आणि तूं अशा तुम्हीं दोघांनी जे असे चमत्कार केले आहेत, ते रजोगुणमुळे जोखडाला जुंपलेल्या घोड्या प्रमाणे व्यवस्थित चालले आहेत. ॥ १९ ॥

द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परि षस्वजाते ॥

तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्नन्यो अभि चाकशीति ॥ २० ॥

द्वा सुपर्णा सऽयुजा सखाया समानं वृक्षं परि सस्वजाते इति ॥

तयोः अन्यः पिप्पलं स्वादु अत्ति अनश्नन् अन्यः अभि चाकशीति ॥ २० ॥

सुंदर पंखांचे, एकात्मक व परस्पर जिवलग मित्र असे दोन पक्षी एकाच वृक्षावर बसलेले आहेत, त्यांतला एक त्या झाडाच्या मधुर फळाचा उपभोग घेतो, परंतु दुसरा मात्र स्वतः कांही एक न खातां फक्त पहात बसतो. ॥ २० ॥

यत्रा॑ सुप॒र्णा अ॒मृत॑स्य भा॒गमनि॑मेषं वि॒दथा॑भि॒स्वर॑न्ति ॥

इ॒नो विश्व॑स्य॒ भुव॑नस्य गो॒पाः स मा॒ धीरः॒ पाक॒मत्रा वि॑वेश ॥ २१ ॥

यत्रा सुऽपर्णा अमृतस्य भागं अनिऽमेषं विदथा अभिऽस्वरंति ॥

इनः विश्वस्य भुवनस्य गोपाः सः मा धीरः पाकं अत्र आ विवेश ॥ २१ ॥

सुंदर पंखांचे पक्षी ज्ञान सामर्थ्याने अमरत्वाचा अंश जेथें निरंतर पोहोंचवीत असतात तेथें, म्हणजे मज मूढाच्या अंगी, खुद्द विश्वाचा पालक जो ज्ञानस्वरूप परमात्मा, त्यानें वास केलेला आहे. ॥ २१ ॥

यस्मि॑न्वृ॒क्षे म॒ध्वदः॑ सुप॒र्णा नि॑वि॒शन्ते॒ सुव॑ते॒ चाधि॒ विश्वे॑ ॥

तस्येदा॑हुः॒ पिप्प॑लं स्वा॒द्वग्रे॒ तन्नोन्न॑श॒द्यः पि॒तरं॒ न वेद॑ ॥ २२ ॥

यस्मिन् वृक्षे मधुऽअदः सुऽपर्णाः निऽविशंते सुवते च अधि विश्वे ॥

तस्य इत् आहुः पिप्पलं स्वादु अग्रे तत् न उत् नशत् यः पितरं नः वेद ॥ २२ ॥

सुंदर पिसाऱ्याचे सर्व पक्षी मधुर फळें खाऊन ज्या वृक्षावर विश्रांती घेतात आणि पिलेंही घालतात, त्याच वृक्षाच्या शेंड्यावर जें फळ असतें तें फारच स्वादिष्ट असतें, परंतु जगत्पिता जो ईश्वर त्याचें ज्ञान ज्याला नाहीं त्याला तें फळ मिळत नाहीं. ॥ २२ ॥

यद्गा॑य॒त्रे अधि॑ गाय॒त्रमाहि॑तं॒ त्रैष्टु॑भाद्वा॒ त्रैष्टु॑भं नि॒रत॑क्षत ॥

यद्वा॒ जग॒ज्जग॒त्याहि॑तं प॒दं य इत्तद्वि॒दुस्ते अ॑मृत॒त्वमा॑नशुः ॥ २३ ॥

यत् गायत्रे अधि गायत्रं आऽहितं त्रैस्तुभात् वा त्रैस्तुभं निःअतक्षत ॥

यत् वा जगज् जगति आऽहितं पदं ये इत् तत् विदुः ते अमृतऽत्वं आनशुः ॥ २३ ॥

गायत्रावर गायत्राची स्थापना कशी झालेली आहे किंवा त्रैष्टुभापासून त्रैष्टुभ कसें निर्माण झालें अथवा जगतावर जें जगत् पद स्थापिलें आहे ते कसें हें ज्यांना समजले ते अमरत्व पावले. ॥ २३ ॥

गा॒य॒त्रेण॒ प्रति॑ मिमीते अ॒र्कम॒र्केण॒ साम॒ त्रैष्टु॑भेन वा॒कम् ॥

वा॒केन॑ वा॒कं द्वि॒पदा॒ चतु॑ष्पदा॒क्षरे॑ण मिमते स॒प्त वाणीः॑ ॥ २४ ॥

गायत्रेण प्रति मिमीते अर्कं अर्केण साम त्रैस्तुभेन वाकम् ॥

वाकेन वाकं द्विऽपदा चतुःपदा अक्षरेण मिमते सप्त वाणीः ॥ २४ ॥

गायत्र छंदामध्यें अर्क म्हणावयाचें असते, अर्कावरून सामगायनाची रचना झाली. अनेक त्रैष्टुभ मिळून एक वाक होतो, दोन चरणी किंवा चार चरणी वाकांच्या योगानें अनुवाक होतो आणि अक्षरांच्या संख्येवरून सात मुख्य वृत्तें बनतात. ॥ २४ ॥

जग॑ता॒ सिंधुं॑ दि॒व्यस्तभायद्रथंत॒रे सूर्यं॒ पर्य॑पश्यत् ॥

गा॒य॒त्रस्य॑ स॒मिधं॑स्ति॒स्र आ॑हु॒स्ततो॑ म॒हना प्र रि॑रिचे महि॒त्वा ॥ २५ ॥

जगता सिंधुं दिवि अस्तभायत् रथंऽतरे सूर्यं परि अपश्यत् ॥

गायत्रस्य संऽइधः तिस्रः आहुः ततः महना प्र रिरिचे महित्वा ॥ २५ ॥

जागत सामाच्या योगानें, आकाशामध्यें आकाशगंगेला सांवरून धरलेले आहे व रथंतर सामामुळें आकाशांत सूर्याचें दर्शन होतें. गायत्रीच्या ज्वाला तीन आहेत असे सांगतात व म्हणूनच तेज आणि थोरवी ह्या गोष्टीमध्यें तीच वरचढ आहे. ॥ २५ ॥

उप॑ ह्वये सु॒दुघां॑ धे॒नुमे॒तां सु॒हस्तो॑ गो॒धुगु॒त दो॑हदेनाम् ॥

श्रेष्ठं॑ स॒वं स॑वि॒ता सा॑विषन्नोऽ॒भीद्धो घ॒र्मस्तदु॒ षु प्र वो॑चम् ॥ २६ ॥

उप ह्वये सुऽदुघां धेनुं एतां सुऽहस्तः गोऽधुक् उत दोहत् एनाम् ॥

श्रेष्ठं सवं सविता साविषत् नः ः अभिऽइद्धः घर्मः तत् ऊं इति सु प्र वोचम् ॥ २६ ॥

ह्या बहुदुधी धेनूला मी आतां हांक मारतो. हिची धार जो कुशल असेल तोच काढूं शकेल. सर्व-प्रेरक सविता आम्हास अत्युत्कृष्ट जीवनाचा लाभ करून देवो. ह्या सूर्याचा प्रताप पहा कसा जाज्ज्वल्य आहे; तेव्हां ह्या सूर्याचेंही गुण वर्णन मला केलें पाहिजे. ॥ २६ ॥

हि॒ङ्कृ॒ण्व॒ती व॑सु॒पत्नी॒ वसू॑नां व॒त्सम॒िच्छन्ती॒ मन॑सा॒भ्यागा॑त् ॥

दुहामश्विभ्यां पयौ अघ्न्येयं सा वर्धतां महते सौभगाय ॥ २७ ॥

हिङ्ऽकृण्वती वसुऽपत्नी वसूनां वत्सं इच्छंती मनसा अभि आ अगात् ॥

दुहां अश्विऽभ्यां पयः अघ्न्या इयं सा वर्धतां महते सौभगाय ॥ २७ ॥

ही सकल निधींची स्वामिनी आपल्या पाडसाला जवळ घेण्याकरितां हंबरडा फोडीत उत्कंठेनें धांवतच आली. ही अवध्य धेनू अश्विदेवा करितां दुधाचा पान्हा सोडो आणि थोर सौभाग्य प्राप्त व्हावें म्हणून ती वृद्धिंगत होवो. ॥ २७ ॥

गौरमीमेदनु वत्सं मिषन्तं मूर्धानं हिङ्ङीकृणोन्मातवा उं ॥

सृक्वाणं घर्ममभि वावशाना मिमाति मायुं पयते पयौभिः ॥ २८ ॥

गौः अमीमेत् अनु वत्सं मिषंतं मूर्धानं हिङ् अकृणोत् मातवै ऊं इति ॥

सृक्वाणं घर्मं अभि वावशाना मिमाति मायुं पयते पयःऽभिः ॥ २८ ॥

डोळे मिटून पडलेल्या आपल्या पाडसाकडे ही धेनू वळते आणि त्याचें डोकें चाटण्याकरितां हंबारत असते, नंतर मोठ्या उत्सुक्तेनें वासराचें तोंड आपल्या धारोष्ण दुग्धाकडे नेऊन ती हलकेच ओरडते इतक्यांत तिची कास दुधानें भरून जाते. ॥ २८ ॥

अ॒यं स शि॑ङ्क्ते॒ येन॒ गौर॒भीवृ॑ता॒ मिमा॑ति मा॒युं ध्व॒सना॒वधि॑ श्रि॒ता ॥

सा चि॒त्तिभि॒र्नि हि च॒कार॒ मर्त्यं॑ वि॒द्युद्भव॑न्ती॒ प्रति॑ व॒व्रिमौ॑हत ॥ २९ ॥

अयं सः शिंक्ते येन गौः अभिऽवृता मिमाति मायुं ध्वसनौ अधि श्रिता ॥

सा चित्तिऽभिः नि हि चकार मर्त्यं विऽद्युत् भवंती प्रति वव्रिं औहत ॥ २९ ॥

हा वत्स सुद्धा पहा कसा ओरडत आहे. ह्याच्याकडे त्या धेनूचें चित्त अगदीं वेधून गेलेलें आहे व त्यामुळें वृष्टि करणाऱ्या मेघावर आग टाकून ती ही ओरडत आहे. अशा रीतीनें एकनिष्ठेमध्यें मनुष्याला सुद्धां तिने लाजविलें आहे, परंतु जेव्हां ती विजेचें रूप घेतें तेव्हां मात्र ती आपलें खरें रूप प्रकट करते. ॥ २९ ॥

अ॒नच्छ॑ये तु॒रगा॑तु जी॒वमेज॑द्ध्रु॒वं मध्य॒ आ प॒स्त्याना॑म् ॥

जी॒वो मृ॒तस्य॑ चरति स्व॒धाभि॒रम॑र्त्यो॒ मर्त्ये॑ना॒ सयो॑निः ॥ ३० ॥

अनत् शये तुरऽगातु जीवं एजत् ध्रुवं मध्ये आ पस्त्यानाम् ॥

जीवः मृतस्य चरति स्वधाभिः अमर्त्यः मर्त्येन सऽयोनिः ॥ ३० ॥

श्वासोच्छ्वास करणारी, चंचल व जिवंतपणानें हालचाल करणारी अशी जी वस्तु आहे ती ह्या देहरूपी डोल्हाऱ्यांत पक्की रोवून राहिली आहे. जीवात्मा हा मृत (म्हणजे जड) पदार्थाच्या नियमानुरोधानेंच चालतो व मृत देह आणि अमर आत्मा हे एकाच ठिकाणीं असतात. ॥ ३० ॥

अप॑श्यं गो॒पामनि॑पद्यमा॒नमा च॒ परा॑ च प॒थिभि॒श्चर॑न्तम् ॥

स स॒ध्रीचीः॒ स विषू॑ची॒र्वसा॑न॒ आ व॑रीवर्ति॒ भुव॑नेष्व॒न्तः ॥ ३१ ॥

अपश्यं गोपां अनिऽपद्यमानं आ च परा च पथिऽभिः चरंतम् ॥

सः सध्रीचीः सः विषूचीः वसानः आ वरीवर्ति भुवनेषु अंतरिति ॥ ३१ ॥

देह धारक आत्मा कधींही न थकतां आपल्या नेहमींच्या पद्धतीनें येथें येतो व परत जातो हें मी पाहिलें आहे. संयोगाच्या व वियोगाच्या अशा दोन्ही सामर्थ्यांनी युक्त होऊन तो पुनः पुनः जगामध्यें परत येत असतो. ॥ ३१ ॥

य ई॑ च॒कार॒ न सो अ॒स्य वे॑द॒ य ई॑ द॒दर्श॒ हिरु॒गिन्नु तस्मा॑त् ॥

स मा॒तुर्योना॒ परि॑वीतो अ॒न्तर्ब॑हुप्र॒जा निर्ऋ॑ति॒मा वि॑वेश ॥ ३२ ॥

यः ईं चकार न सः अस्य वेद यः ईं ददर्श हिरुक् इत् नु तस्मात् ॥

सः मातुः योना परिऽवीतः अंतः बहुप्रजाः निःऽऋतिं आ विवेश ॥ ३२ ॥

ज्यानें ह्याला निर्माण केलें त्याला हा जाणत नाहीं, कारण जो ह्याला एक सारखा पहात असतो तो ह्याच्यापासून गुप्त राहिला आहे व म्हणूनच हा मनुष्य प्राणी मातेच्या उदरांत गुंडाळून टाकला जाऊन आणि अनेक जन्म घेऊन दुःखसागरांत बुडून गेला आहे. ॥ ३२ ॥

द्यौर्मे॑ पि॒ता ज॑नि॒ता नाभि॒रत्र॒ बन्धु॑र्मे मा॒ता पृ॑थि॒वी म॒हीयम् ॥

उत्तानयोश्चम्वो३र्योनिरन्तरत्रा पिता दुहितुर्गर्भमाधात् ॥ ३३ ॥

द्यौः मे पिता जनिता नाभिः अत्र बंधुः मे माता पृथिवी मही इयम् ॥

उत्तानयोः चम्वोः योनिः अंतः अत्र पिता दुहितुः गर्भं आ अधात् ॥ ३३ ॥

द्यौ हा माझा पिता, उत्पन्न कर्ता आणि जीवनाचें आदिकरण होय. तसेंच ही थोर पृथिवी माझी जननी; माझे आप्त इष्ट सुद्धां हीच. उताण्या असलेल्या दोन डेरेदार शकलांच्या मधला पोकळींत सर्वांचे जन्म स्थान आहे. व तेथें पित्यानें आपल्या कन्येचा गर्भ ठेवून दिला आहे. ॥ ३३ ॥

पृच्छामि त्वा परमन्तं पृथिव्याः पृच्छामि यत्र भुवनस्य नाभिः ॥

पृच्छामि त्वा वृष्णो अश्वस्य रेतः पृच्छामि वाचः परमं व्योम ॥ ३४ ॥

पृच्छामि त्वा परं अंतं पृथिव्याः पृच्छामि यत्र भुवनस्य नाभिः ॥

पृच्छामि त्वा वृष्णः अश्वस्य रेतः पृच्छामि वाचः परमं विऽओम ॥ ३४ ॥

आतां तुला विचारतो कीं, पृथ्वीची अखेरची मर्यादा कोणती ? आणखी असें विचारतों कीं जगाचा मध्य कोणत्या ठिकाणीं ? वळू घोड्याचें रेत कोणते तें तुला विचारतो, आणि वाचेचें अत्यंत श्रेष्ठ असे स्थान कोणतें तेंही पुसतो. ॥ ३४ ॥

इ॒यं वेदि॑ः परो॒ अन्त॑ः पृथि॒व्या अ॒यं य॒ज्ञो भुव॑नस्य॒ नाभि॑ः ॥

अ॒यं सोमो॒ वृष्णो॒ अश्व॑स्य॒ रेतो॑ ब्र॒ह्मायं वा॒चः प॑र॒मं व्योम ॥ ३५ ॥

इयं वेदिः परः अंतः पृथिव्याः अयं यज्ञः भुवनस्य नाभिः ॥

अयं सोमः वृष्णः अश्वस्य रेतः ब्रह्मा अयं वाचः परमं विऽओम ॥ ३५ ॥

ही वेदी हीच पृथ्वीची शेवटची सीमा, हा यज्ञ हाच सर्व जगाचा मध्य, हा सोम रस हेंच वळू घोड्याचें रेत आणि हा जो ब्रह्मा तोच वाचेचें अतिशय श्रेष्ट स्थान होय. ॥ ३५ ॥

स॒प्तार्ध॑ग॒र्भा भुव॑नस्य॒ रेतो॒ विष्णो॑स्तिष्ठन्ति प्र॒दिशा॒ विध॑र्मणि ॥

ते धी॒तिभि॒र्मन॑सा॒ ते वि॑प॒श्चितः॑ परि॒भुव॒ः परि॑ भवन्ति वि॒श्वतः॑ ॥ ३६ ॥

सप्त अर्धऽगर्भाः भुवनस्य रेतः विष्णोः तिष्ठंति प्रऽदिशा विऽधर्मणि ॥

ते धीतिऽभिः मनसा ते विपःऽचितः परिऽभुवः परि भवंति विश्वतः ॥ ३६ ॥

जे अपुरे सात गर्भ ह्या जगाचें बीज म्हणून आहेत ते विष्णुच्या आज्ञेनें आपआपल्या नियमाप्रमाणें राहतात. ते बुद्धिमान व व्यापक असल्यामुळें विवेकानें व सावचित्तानें यच्चावत् वस्तूंचे आकलन करीत असतात. ॥ ३६ ॥

न वि जा॑नामि॒ यदि॑वे॒दमस्मि॑ नि॒ण्यः संन॑द्धो॒ मन॑सा चरामि ॥

य॒दा मा॑गन्प्रथम॒जा ऋ॒तस्यादिद्वा॒चो अ॑श्नुवे भा॒गम॒स्याः ॥ ३७ ॥

न वि जानामि यत्ऽइव इदं अस्मि निण्यः संऽनद्धः मनसा चरामि ॥

यदा मा आ अगन् प्रथमऽजाः ऋतस्य आत् इत् वाचः अश्नुवे भागं अस्याः ॥ ३७ ॥

हे सर्व मीच आहे असें मी जाणत नाहीं आणि मनानें बांधला जाऊन माझी विलक्षण तऱ्हा होऊन मी भ्रमण करीत आहे, परंतु परम तत्त्वापासून पहिल्यानें उत्पन्न झालेलें चैतन्य जेव्हां माझ्यांत आले, तेव्हां पासून ह्या ईश्वरी वाचेचा अंश मला प्राप्त झाला. ॥ ३७ ॥

अपा॒ङ् प्राङ्एं॑नति स्व॒धया॑ गृभी॒तोऽ॑मर्त्यो॒ मर्त्ये॑ना॒ सयो॑निः ॥

ता शश्व॑न्ता विषू॒चीना॑ वि॒यन्ता॒ न्य१॑न्यं चि॒क्युर्न नि चि॑क्यु॒रन्यम् ॥ ३८ ॥

अपाङ् प्राङ् एति स्वधया गृभीतः अमर्त्यः मर्त्येन सऽयोनिः ॥

ता शश्वंता विषूचीना विऽयंता नि अन्यं चिक्युः न नि चिक्युः अन्यम् ॥ ३८ ॥

ह्या आत्म्याचे अस्तित्व त्याच्या व्यापारामुळेंच कळतें. तो कधी मागें राहतो व कधीं पुढेंही सरसावतो. तो अमर असूनही ह्या मर्त्य देहाबरोबरच जन्मास येतो. ते दोन्ही नित्य संलग्न असून सर्व ठिकाणीं नाना प्रकारांनी जात असतात; परंतु लोकांना शरीर मात्र दिसते, आत्मा दिसत नाहीं. ॥ ३८ ॥

ऋ॒चो अ॒क्षरे॑ पर॒मे व्यो॑म॒न्यस्मि॑न्दे॒वा अधि॒ विश्वे॑ निषे॒दुः ॥

यस्तन्न वेद॒ किमृ॒चा क॑रिष्यति॒ य इत्तद्वि॒दुस्त इ॒मे सम् आ॑सते ॥ ३९ ॥

ऋचः अक्षरे परमे विऽओमन् यस्मिन् देवा अधि विश्वे निऽसेदुः ॥

यः तत् न वेद किं ऋचा करिष्यति ये इत् तत् विदुः ते इमे सं आसते ॥ ३९ ॥

अत्युच्च अशा स्वर्लोकीं राहिल्याप्रमाणेंच वेदांतील ऋचांच्या अक्षरांत सर्व देवांनी वास केला आहे. तर असें जें ऋचेचें अक्षर तें ज्याला येत नाही त्याला वेद घेऊन तरी काय करावयाचें आहे ? आणि तें अक्षर ज्यांना समजलें ते सर्व आनंदानें एकत्र रहतात. ॥ ३९ ॥

सू॒य॒व॒साद्भग॑वती॒ हि भू॒या अथौ॑ व॒यम् भग॑वन्तः स्याम ॥

अ॒द्धि तृण॑मघ्न्ये विश्व॒दानी॒ पिब॑ शु॒द्धमु॑द॒कमा॒चर॑न्ती ॥ ४० ॥

सुयवसऽअत् भगऽवती हि भूयाः अथो इति वयं भगऽवंतः स्याम ॥

अद्धि तृणं अघ्न्ये विश्वऽदानीं पिब शुद्धं उदकं आऽचरंती ॥ ४० ॥

तुला खाण्याला उत्तम गवत मिळून तूं भाग्य संपन्न हो म्हणजे त्यामुळें आम्हींही भाग्यवान होऊं. हे अवध्य धेनु तूं आमच्याकडे येऊन नित्य चारा खाऊन स्वच्छ पाणी पीत जा. ॥ ४० ॥

गौरीर्मिमाय सलिलानि तक्षत्येकपदी द्विपदी सा चतुष्पदी ॥

अष्टापदी नवपदी बभूवुषी सहस्राक्षरा परमे व्योमन् ॥ ४१ ॥

गौरीः मिमाय सलिलानि तक्षति एकऽपदी द्विऽपदी सा चतुःऽपदी ॥

अष्टाऽपदी नवऽपदी बभूवुषी सहस्रऽअक्षरा परमे विऽओमन् ॥ ४१ ॥

ही शुभ्र तेजस्वी धेनु उदक निर्माण करीत असतांना हंबरत असतें. तिला एकच पाय किंवा दोन किंवा चार पाय असतात, अथवा आठ किंवा नऊ सुद्धां असतात. ही हजार अक्षरांची असून अति उच्च अशा स्वर्लोकीं राहते. ॥ ४१ ॥

तस्याः समुद्रा अधि वि क्षरन्ति तेन जीवन्ति प्रदिशश्चतस्रः ॥

ततः॑ क्षरत्य॒क्षर॒ं तद्विश्व॒मुप॑ जीवति ॥ ४२ ॥

तस्याः समु॒द्राः अधि वि क्षरंति तेन जीवंति प्रऽदिशः चतस्रः ॥

ततः क्षरति अक्षरं तत् विश्वं उप जीवति ॥ ४२ ॥

तिच्यामुळें समुद्र तुडुंब भरून गेले आहेत. आणि त्यांच्या मुळेंच ह्या पृथ्वीवरील चाऱ्ही दिशांकडील प्रदेश जिवंत राहिले आहेत. तेथूनच अक्षय्य अशा अमृताचा वर्षाव होऊन सर्व विश्वाचा निर्वाह चालतो. ॥ ४२ ॥

श॒क॒मयं॑ धू॒मम॒राद॑पश्यं विषू॒वता॑ प॒र ए॒नाव॑रेण ॥

उ॒क्षाण॒ं पृश्नि॑मपचन्त वी॒रास्तानि॒ धर्मा॑णि प्रथ॒मान्या॑सन् ॥ ४३ ॥

शकऽमयं धूमं आरात् अपश्यं विषूऽवता परः एना अवरेण ॥

उक्षाणं पृश्निं अपचंत वीराः तानि धर्माणि प्रथमानि आसन् ॥ ४३ ॥

दूर अंतरावर गोंवऱ्यांचा धूर माझ्या दृष्टीस पडला. त्याचे एकामागून एक असे वर जाणारे धुराचे लोट जिकडे तिकडे पसरले होते. तेथें चित्रविचित्र रंगाचा वृषभ शूर पुरुष शिजवीत होते कारण तोच पुरातन धर्म होय. ॥ ४३ ॥

त्रयः केशिन ऋतुथा वि चक्षते संवत्सरे वपत एक एषाम् ॥

विश्वमेको अभि चष्टे शचीभिर्ध्राजिरेकस्य ददृशे न रूपम् ॥ ४४ ॥

त्रयः केशिन ऋतुऽथा वि चक्षते संवत्सरे वपते एकः एषाम् ॥

विश्वं एकः अभि चष्टे शचीभिः ध्राजिः एकस्य ददृशे नः रूपम् ॥ ४४ ॥

लांब लांब जटा वाढलेले तिघेजण आपआपल्या ठरलेल्या वेळेप्रमाणें पृथ्वीवर येतात, त्यांच्यापैकीं एक दरवर्षी सर्वत्र साफसूफ करून टाकतो, दुसरा आपल्या सामर्थ्यानें सर्व विश्वावर नजर ठेवतो आणि तिसरा जो आहे त्याची हालचाल मात्र आपणांस समजते पण मूर्ति दृष्टीस पडत नाही. ॥ ४४ ॥

चत्वारि वाक्परिमिता पदानि तानि विदुर्ब्राह्मणा ये मनीषिणः ॥

गुहा त्रीणि निहिता नेङ्गंयन्ति तुरीयं वाचो मनुष्या वदन्ति ॥ ४५ ॥

चत्वारि वाक् परिमिता पदानि तानि विदुः ब्राह्मणा ये मनीषिणः ॥

गुहा त्रीणि निऽहिता न इंगयंति तुरीयं वाचः मनुष्याः वदंति ॥ ४५ ॥

वाचेचे चार प्रकार गणले आहेत, ते सर्व प्रकार जे ज्ञानसंपन्न ब्राह्मण आहेत त्यांना ठाऊक असतात. कारण पहिले तीन प्रकार गुप्त आहेत, ते समजण्यांत येत नाहींत, व मनुष्यें बोलतात तो चौथा प्रकार होय. ॥ ४५ ॥

इंद्रं मित्रं वरुणमग्निमाहुरथो दिव्यः स सुपर्णो गरुत्मान् ॥

एकं सद्विप्रा बहुधा वदन्त्यग्निं यमं मातरिश्वानमाहुः ॥ ४६ ॥

इंद्रं मित्रं वरुणं अग्निं आहुः अथो इति दिव्यः सः सुऽपर्णः गरुत्मान् ॥

एकं सत् विप्राः बहुधा वदंति अग्निं यमं मातरिश्वानं आहुः ॥ ४६ ॥

त्या ईश्वरालाच इंद्र, मित्र, वरुण आणि अग्नि असें म्हणतात. देवलोकीं राहणारा सुंदर पंखांचा पक्षीही तोच. तो वस्तुतः एकच आहे तरी ज्ञानी जन त्याला पुष्कळ प्रकारचीं नांवे देतात. त्याला अग्नि, यम अथवा मातरिश्वा असेंही म्हणतात. ॥ ४६ ॥

कृष्णं नियानं हरयः सुपर्णा अपो वसाना दिवमुत्पतन्ति ॥

त आववृत्रन्सदनादृतस्यादिद्घृतेन पृथिवी व्युद्यते ॥ ४७ ॥

कृष्णं निऽयानं हरयः सुऽपर्णा अपः वसाना दिवं उत् पतंति ॥

त आ अववृत्रन् सदनात् ऋतस्य आत् इत् घृतेन पृथिवी वि उद्यते ॥ ४७ ॥

सुवर्ण वर्णाचे सुंदर पक्षी जलरूप वस्त्र पांघरून, आकाशांत जाण्याचा जो एक कृष्णवर्ण मार्ग आहे त्या मार्गानें आकाशांत उड्डाण करतात. आणि नंतर सत्य धर्माच्या वसतिस्थानाहून ते परत आले कीं लागलीच पृथ्वी घृतवृष्टीनें चिंब भिजून जाते. ॥ ४७ ॥

द्वादश प्रधयश्चक्रमेकं त्रीणि नभ्यानि क उ तच्चिकेत ॥

तस्मिन्त्साकं त्रिंशता न शङ्कवोऽर्पिताः षष्टिर्न चलाचलासः ॥ ४८ ॥

द्वादश प्रऽधयः चक्रं एकं त्रीणि नभ्यानि कः ऊं इति तत् चिकेत ॥

तस्मिन् साकं त्रिऽशता न शंकवः अर्पिताः षष्टिः न चलाचलासः ॥ ४८ ॥

चाक एकच परंतु त्याला बारा धांवा आणि तीन तुंबे आहेत, हें कसें व तें कोण ओळखतो ? त्या चाकाला तीनशें साठ अरे आहेत. आणि ते शंकू प्रमाणें गरगर फिरत असतात. ॥ ४८ ॥

यस्ते स्तनः शशयो यो मयोभूर्येन विश्वा पुष्यसि वार्याणि ॥

यो रत्नधा वसुविद्यः सुदत्रः सरस्वति तमिह धातवे कः ॥ ४९ ॥

यः ते स्तनः शशयः यः मयःऽभूः येन विश्वा पुष्यसि वार्याणि ॥

यः रत्नऽधाः वसुऽवित् यः सुऽदत्रः सरस्वति तं इह धातवे करिति कः ॥ ४९ ॥

हे सरस्वती अक्षय्य, कल्याणप्रद, असा जो तुझा स्तन आहे व ज्याच्या योगानें सर्व रमणीय वस्तूंचे सौंदर्य तूं वृद्धिंगत करतेस, जो रत्नांचा निधि, व मनोरथ पुरविणारा उदार दाता आहे, तो तुझा स्तन तूं आम्हांस पिण्याकरितां दे. ॥ ४९ ॥

य॒ज्ञेन॑ य॒ज्ञम॑यजन्त दे॒वास्तानि॒ धर्मा॑णि प्रथ॒मान्या॑सन् ॥

ते ह॒ नाकं॑ महि॒मानः॑ सचन्त॒ यत्र॒ पूर्वे॑ सा॒ध्याः सन्ति॑ दे॒वाः ॥ ५० ॥

यज्ञेन यज्ञं अयजंत देवाः तानि धर्माणि प्रथमानि आसन् ॥

ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः संति देवाः ॥ ५० ॥

यज्ञ पुरुषाच्या योगानें देवांनी यज्ञ केला व अगदी प्रथम (सनातन) धर्म पाहूं गेले तर तो हाच होय. नंतर श्रेष्ठ विभूतींनी, पुरातन साध्य देव जेथें रहात असतात अशा अत्युच्च स्वर्ग लोकांमध्यें जाऊन वास केला. ॥ ५० ॥

स॒मा॒नमे॒तदु॑द॒कमु॒च्चैत्यव॒ चाह॑भिः ॥

भूमिं पर्जन्या जिन्वन्ति दिवं जिन्वन्त्यग्नयः ॥ ५१ ॥

समानं एतत् उदकं उत् च एति अव च अहऽभिः ॥

भूमिं पर्जन्याः जिन्वंति दिवं जिन्वंति अग्नयः ॥ ५१ ॥

उदक येथून तेथून सारखेंच. ते बाष्परूपानें वर जाते आणि कांही दिवसांनी वृष्टि रूपानें खाली येते, या प्रमाणें पर्जन्य हा पृथ्वीला टवटवीत करतो आणि यज्ञाग्निही आकाशाला तेजःपुंज करतात. ॥ ५१ ॥

दिव्यं सुपर्णं वायसं बृहन्तमपां गर्भं दर्शतमोषधीनाम् ॥

अभीपतो वृष्टिभिस्तर्पयन्तं सरस्वन्तमवसे जोहवीमि ॥ ५२ ॥

दिव्यं सुऽपर्णं वायसं बृहंतं अपां गर्भं दर्शतं ओषधीनाम् ॥

अभीपतः वृष्टिऽभिः तर्पयंतं सरस्वंतं अवसे जोहवीमि ॥ ५२ ॥

द्यु लोकींचा अति वेगवान प्रबळ पक्षी, उदकाचें आणि वनस्पतीचें सुंदर तान्हे बालक; आणि जलवृष्टी करून सर्वांची मनें लीलेनें प्रसन्न करणारा असा जो सरस्वान् त्यानें कृपा करावी म्हणून त्याची आम्हीं वारंवार प्रार्थना करीत असतों. ॥ ५२ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १६५ (इंद्र सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : इंद्रः - छंद - त्रिष्टुभ्

कया॑ शु॒भा सव॑यसः॒ सनी॑ळाः समा॒न्या म॒रुतः॒ सं मि॑मिक्षुः ॥

कया॑ म॒ती कुत॒ एता॑स ए॒तेऽ॑र्चन्ति॒ शुष्मं॒ वृष॑णो वसू॒या ॥ १ ॥

कया शुभा सऽवयसः सऽनीळाः समान्या मरुतः सं मिमिक्षुः ॥

कया मती कुतः आऽइतासः एते अर्चंति शुष्मं वृषणः वसुऽया ॥ १ ॥

एक सारख्या जोमाचे व एकत्रच राहणारे असे हे मरुद्देव पहा कशा एक सारख्या मंगल अंगकांतिने सुशोभित दिसत आहेत बरे ? ते काय हेतूनें व कोठून आले असावेत ! कांही असो, हे आमचे शूर मित्र (ऋत्विज) अभीष्ट प्राप्तीच्या लालसेनें, त्यांच्या सामर्थ्यास अनुलक्षून मोठ्यानें गायन करीत आहेत. ॥ १ ॥

कस्य॒ ब्रह्मा॑णि जुजुषु॒र्युवा॑नः॒ को अ॑ध्व॒रे म॒रुत॒ आ व॑वर्त ॥

श्ये॒नाँ इ॑व॒ ध्रज॑तो अ॒न्तरि॑क्षे॒ केन॑ म॒हा मन॑सा रीरमाम ॥ २ ॥

कस्य ब्रह्माणि जुजुषुः युवानः कः अध्वरे मरुतः आ ववर्त ॥

श्येनान्ऽइव ध्रजतः अंतरिक्षे केन महा मनसा रीरमाम ॥ २ ॥

हे यौवनाढ्य मरुत् ह्या वेळी कोणत्या भक्ताच्या स्तोत्ररसाचें सेवन करीत बसले आहेत. आपल्या यज्ञामध्यें ह्या मरुतांना कोण भक्त घेऊन गेला असावा. असा श्रेष्ठ भक्तीचा प्रकार तरी कोणता कीं ज्याच्या योगानें ससाण्याप्रमाणें वेगानें आकाशांत उडणाऱ्या ह्या मरुतांना आम्हांस प्रसन्न करून घेतां येईल ? ॥ २ ॥

कुत॒स्त्वमिं॑द्र॒ माहि॑नः॒ सन्नेको॑ यासि सत्पते॒ किं त॑ इ॒त्था ॥

सं पृ॑च्छसे समरा॒णः शु॑भा॒नैर्वो॒चेस्तन्नो॑ हरिवो॒ यत्ते॑ अ॒स्मे ॥ ३ ॥

कुतः त्वं इंद्र माहिनः सन् एकः यासि सत्ऽपते किं ते इत्था ॥

सं पृच्छसे संऽअराणः शुभानैः वोचेः तत् नः हरिऽवः यत् ते अस्मे इति ॥ ३ ॥

हे इंद्रा, तूं एव्हढा परम श्रेष्ठ, साधुजनांचा प्रतिपालक असून एकटांच कां चालला आहेस ? खरोखर हें असें तुझ्या मनांत काय आहे ? आपल्या यशस्वी मंडळला बरोबर घेऊन जातांना तूं आमचें कुशल विचारित असतोस, तर आतां हे हरिदश्व-पालक इंद्रा, तुझ्या मनांत आमच्या विषयीं असें काय आलें आहे तें सांग बरें. ॥ ३ ॥

ब्रह्मा॑णि मे म॒तयः॒ शं सु॒तासः॒ शुष्म॑ इयर्ति॒ प्रभृ॑तो मे॒ अद्रिः॑ ॥

आ शा॑सते॒ प्रति॑ हर्यन्त्यु॒क्थेमा हरी॑ वहत॒स्ता नो॒ अच्छ॑ ॥ ४ ॥

ब्रह्माणि मे मतयः शं सुतासः शुष्मः इयर्ति प्रऽभृतः मे अद्रिः ॥

आ शासते प्रति हर्यंति उक्था इमा हरी इति वहतः ता नः अच्छ ॥ ४ ॥

सर्व स्तोत्र, गायनें व भक्ति पुरःसर केलेल्या प्रार्थना ह्या मलाच उद्देशून असतात. सोमरस ही मलाच हर्षप्रद होतो, व माझें प्रतापी वज्र फेंकल्या बरोबर शत्रूला जाऊन भिडते. भक्तजन विनवणी करतात ती माझीच आणि साम गायकांचे प्रेमही माझ्या ठिकाणीं व म्हणूनच माझे अश्व मला त्यांच्याकडे घेऊन जातात. ॥ ४ ॥

अतो॑ व॒यम॑न्त॒मेभि॑र्युजा॒नाः स्वक्ष॑त्रेभिस्त॒न्व१ः॒॑ शुम्भ॑मानाः ॥

महो॑भि॒रेताँ॒ उप॑ युज्महे॒ न्विंद्र॑ स्व॒धामनु॒ हि नो॑ ब॒भूथ॑ ॥ ५ ॥

अतः वयं अंतमेभिः युजानाः स्वऽक्षत्रेभिः तन्वः शुम्भमानाः ॥

महःऽभिः एतान् उप युज्महे नु इंद्र स्वधां अनु हि नः बभूथ ॥ ५ ॥

ह्याकरितांच आम्हीं तरी अगदीं खास स्वतःच्या पराक्रमानें युक्त होऊन त्यानेंच स्वतःस शोभा आणतो, व आपल्या प्रभावानें हे अश्व जोडून सज्ज होत असतो. ह्या आमच्या प्रघाताची, हे इंद्रा, तुला स्वतःला इत्थंभूत माहिती आहेच. ॥ ५ ॥

क्व१॑ स्या वो॑ मरुतः स्व॒धासी॒द्यन्मामेकं॑ स॒मधं॑त्ताहि॒हत्ये॑ ॥

अ॒हं ह्यू१॑ग्रस्त॑वि॒षस्तु॒वि॑ष्मा॒न्विश्व॑स्य॒ शत्रो॒रन॑मं व॒धस्नैः ॥ ६ ॥

क्व स्या वः मरुतः स्वधा आसीत् यन् मां एकं संऽअधत्त अहिऽहत्ये ॥

अहं हि उग्रः तविषः तुविष्मान् विश्वस्य शत्रोः अनमं वधऽस्नैः ॥ ६ ॥

हे मरुतांनो, अहीचा वध मी एकट्यानेंच करावा म्हणून तुम्हा मला विनंति केलीत, तव्हां तुमचा तो प्रघात कोठें गेला होता ? मी खरोखरच भयंकर धैर्यशाली व प्रतापी म्हणूनच सर्व जगताच्या शत्रूचा नक्षा मी आपल्या मारक शस्त्रांनी उतरला. ॥ ६ ॥

भूरि॑ चकर्थ॒ युज्ये॑भिर॒स्मे सं॑मा॒नेभि॑र्वृषभ॒ पौंस्ये॑भिः ॥

भूरी॑णि॒ हि कृ॒णवा॑मा शवि॒ष्ठेन्द्र॒ क्रत्वा॑ मरुतो॒ यद्वशा॑म ॥ ७ ॥

भूरि चकर्थ युज्येभिः अस्मे इति समानेभिः वृषभ पौंस्येभिः ॥

भूरीणि हि कृणवाम शविष्ठ इंद्र क्रत्वा मरुतः यत् वशाम ॥ ७ ॥

हे शूरा, तूं तर आपल्या पुरुषार्थानें आमच्यासाठीं पुष्कळच कृत्यें केलीं आहेस. हे तुझे पुरुषार्थ म्हणजे समान वीर्य असे तुझे मित्रच होत. तर हे महा प्रतापी इंद्रा, आम्हां मरुतांनाही आपल्या कर्तबगारीनें आम्हांस इष्ट वाटतील तीं तीं कृत्यें आतां करूं दे. ॥ ७ ॥

वधीं वृत्रं मरुत इंद्रियेण स्वेन भामेन तविषो बभूवान् ॥

अहमेता मनवे विश्वश्चन्द्राः सुगा अपश्चकर वज्रबाहुः ॥ ८ ॥

वधीं वृत्रं मरुतः इंद्रियेण स्वेन भामेन तविषः बभूवान् ॥

अहं एताः मनवे विश्वऽचंद्राः सुऽगा अपः चकर वज्रऽबाहुः ॥ ८ ॥

हे मरुतांनो, मी क्रोधानें अतिशय उग्र होऊन स्वतःच्या पराक्रमानें वृत्रास ठार मारून टाकलें, आणि सर्व विश्वाला आल्हाददायक अशी मेघोदकें, वज्र हातीं घेऊन मनू करितां मी सुगम करून दिलीं. ॥ ८ ॥

अनुत्तमा ते मघवन्नकिर्नु न त्वावाँ अस्ति देवता विदानः ॥

न जायमानो नशते न जातो यानि करिष्या कृणुहि प्रवृद्ध ॥ ९ ॥

अनुत्तं आ ते मघऽवन् नकिः नु न त्वाऽवान् अस्ति देवता विदानः ॥

न जायमानः नशते न जातः यानि करिष्या कृणुहि प्रऽवृद्ध ॥ ९ ॥

हे औदार्यशील इंद्रा, तुझ्यापुढें कोणाचाही निभाव लागत नाहीं. देवांमध्यें तुझ्या प्रमाणें ज्ञानी असा दुसरा कोणींही नाहीं. तुझी बरोबरी करील असा कोणी जन्मास येणार नाहीं व आलेलाही नाही. तर हे महा बलिष्ठा, तूं करीन म्हणून म्हटलेंस तीं कृत्यें आतां कर. ॥ ९ ॥

एकस्य चिन्मे विभ्व१ स्त्वोजो या नु दधृष्वान्कृणवै मनीषा ॥

अहं ह्यू१ ग्रो मरुतो विदानो यानि च्यवमिंद्र इदीश एषाम् ॥ १० ॥

एकस्य चित् मे विऽभु अस्तु ओजः या नु दधृष्वान् कृणवै मनीषा ॥

अहं हि उग्रः मरुतः विदानः यानि च्यवं इंद्र इत् ईशे एषाम् ॥ १० ॥

विश्वालाही व्यापून उरणारे असें तुझे सामर्थ्य माझ्या एकट्याच्या आंगी आहे असेंच म्हटलें पाहिजे - कारण जें जें करावें म्हणून मीं मनानें निर्धार करतो तें मी करून दाखवितोच. हे मरुतांनो, मी अति भयंकर आहे, तसाच ज्ञानीही आहे. म्हणूनच मी (इंद्रानें) जें जें म्हणून निर्माण केलें आहे त्या सर्वांचा मालक मीच आहे. ॥ १० ॥

अम॑न्दन्मा मरुत॒ स्तोमो॒ अत्र॒ यन्मे॑ नर॒ः श्रुत्यं॒ ब्रह्म॑ च॒क्र ॥

इंद्रा॑य॒ वृष्णे॒ सुम॑खाय॒ मह्यं॒ सख्ये॒ सखा॑यस्त॒न्वे त॒नूभि॑ः ॥ ११ ॥

अमंदत् मा मरुतः स्तोमः अत्र यत् मे नरः श्रुत्यं ब्रह्म चक्र ॥

इंद्राय वृष्णे सुऽमखाय मह्यं सख्ये सखायः तन्वे तनूभिः ॥ ११ ॥

आणखी हे मरुतांनो, तुम्ही जें आतां स्तवन केलेंत, हे शूरांनो जें कर्णमधुर स्तोत्र तुम्हीं गाइलेंत त्यानें मला फार आनंद वाटला. कारण अत्यंत पूज्य आणि वीर्यशाली इंद्राकरितां तुम्ही, म्हणजे माझ्या मित्रांनी, हे स्तोत्र अंतःकरणपूर्वक केलेलें आहे. ॥ ११ ॥

एवेदेते प्रति मा रोचमाना अनेद्यः श्रव एषो दधानाः ॥

सञ्चक्ष्या मरुतश्चन्द्रवर्णा अच्छान्त मे छदयाथा च नूनम् ॥ १२ ॥

एव इत् एते प्रति मा रोचमानाः अनेद्यः श्रवः आ इषः दधानाः ॥

संऽचक्ष्य मरुतः चंद्रऽवर्णाः अच्छांत मे छदयाथ च नूनम् ॥ १२ ॥

निष्कलंक व कीर्ति आणि सामर्थ्य ह्यांना वरणारे तुम्ही तर माझ्यापुढें घवघवीत उभे आहांत, तर हे मनोहरकांति मरुतांनो, तुम्हीं पूर्ण विचारांनी मला पूर्वी प्रसन्न केलेंत, तसें आतांही प्रसन्न करून घ्या. ॥ १२ ॥

को न्वत्र मरुतो मामहे वः प्र यातन सखीँरच्छा सखायः ॥

मन्मानि चित्रा अपिवातयन्त एषां भूत नवेदा म ऋतानाम् ॥ १३ ॥

कः नु अत्र मरुतः मामहे वः प्र यातन सखीन् अच्छ सखायः ॥

मन्मानि चित्राः अपिऽवातयंतः एषां भूत नवेदाः म ऋतानाम् ॥ १३ ॥

हे मरुतांनो, ह्या लोकीं तुमची महती खरोखर कोणीं वर्णन केली आहें बरें ? तर हे मित्रांनो, तुमचे मित्र जे आम्हीं त्या आमच्याकडे या. तुमची कांति अद्‌भुत आहे, तर हे मरुतांनो, माननीय स्तोत्रांची स्फूर्ति आम्हांस देऊन सत्यधर्मास अनुसरून केलेल्या ह्या आमच्या उपासनेकडे लक्ष असूं द्या. ॥ १३ ॥

आ यद्दु॑व॒स्याद्दु॒वसे॒ न का॒रुर॒स्माञ्च॒क्रे मा॒न्यस्य॑ मे॒धा ॥

ओ षु व॑र्त्त मरुतो॒ विप्र॒मच्छे॒मा ब्रह्मा॑णि जरि॒ता वो॑ अर्चत् ॥ १४ ॥

आ यत् दुवस्यात् दुवसे न कारुः अस्मान् चक्रे मान्यस्य मेधा ॥

ओ इति सु वर्त मरुतः विप्रं अच्छ इमा ब्रह्माणि जरिता वः अर्चत् ॥ १४ ॥

एखादा विद्‌वान कवि एका भक्ताकडून दुसऱ्या भक्ताकडे जातो, त्याप्रमाणें सज्जनांना मान्य अशा मान्यांच्या बुद्धि-प्रभावानें तुम्हांला आमच्या बाजूला आणलेले आहे, तर हे मरुतांनो, ह्या ज्ञानसंपन्न विप्राकडे लवकर वळां. स्तोत्र गायकानें हीं स्तोत्रें तुम्हाला उद्देशूनच गायीलीं आहेत. ॥ १४ ॥

ए॒ष व॒ स्तोमो॑ मरुत इ॒यं गीर्मा॑न्दा॒र्यस्य॑ मा॒न्यस्य॑ का॒रोः ॥

एषा या॑सीष्ट त॒न्वे व॒यां वि॒द्याम॒षं वृ॒जनं॑ जी॒रदा॑नुम् ॥ १५ ॥

एषः वः स्तोमः मरुतः इयं गीः मादार्यस्य मान्यस्य कारोः ॥

आ इषा यासीष्ट तन्वे वयां विद्याम इषं वृजनं जीरऽदानुम् ॥ १५ ॥

हे मरुतांनो, हे स्तोत्र व ही प्रार्थना सन्मान्य अशा मांदार्यानें तुमच्या प्रित्यर्थ केलेली आहे, तर आमच्या स्वतःकरितां उत्साहप्रद शक्ति तुम्हीं घेऊन या म्हणजे त्या सामर्थ्य शाखेच्या आश्रयानें त्या तात्काळ फलद्रूप होणाऱ्या आश्रयानें आम्हीं राहूं. ॥ १५ ॥

ॐ तत् सत्

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १६६ (इंद्र सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : मरुतः - छंद - त्रिष्टुभ्, जगती

तन्नु वो॑चाम रभ॒साय॒ जन्म॑ने॒ पूर्वं॑ महि॒त्वं वृ॑ष॒भस्य॑ के॒तवे॑ ॥

ऐ॒धेव॒ याम॑न्मरुतस्तुविष्वणो यु॒धेव॑ शक्रास्तवि॒षाणि॑ कर्तन ॥ १ ॥

तत् नु वोचाम रभसाय जन्मने पूर्वं महिऽत्वं वृषभस्य केतवे ।

ऐधाऽइव यामम् नरुतः तुविऽस्वनः युधाऽइव शक्राः तविषाणि कर्तन ॥ १ ॥

आतां सकल कामनापूरक वीर अशा इंद्राचा जो जणुं ध्वजच शोभतो आणि मोठ्या धडाक्याने एकदम प्रकट होतो असा जो मरुतांचा समुदाय त्याच्या प्रित्यर्थ, त्यां मरुतांनींच पूर्वी जी जी महत्कृत्यें केलेलीं आहेत त्यांचे वर्णन

करणे हे आमचे कर्तव्य होय; तर हे मरुतांनो, भयंकर सिंहनाद करणाऱ्या पराक्रमी वीरांनो, एका हातांत पेटलेला हिलाल आणि दुसऱ्या हातांत तरवार घेऊन चाल करावी त्याप्रमाणें ह्या लोकीं येतांना मार्गानें आपले पराक्रम गाजवा. ॥ १ ॥

नित्यं॒ न सू॒नुं मधु॒ बिभ्र॑त॒ उप॒ क्रीळ॑न्ति क्री॒ळा वि॒दथे॑षु॒ घृष्व॑यः ॥

नक्ष॑न्ति रु॒द्रा अव॑सा नम॒स्विनं॒ न म॑र्धन्ति॒ स्वत॑वसो हवि॒ष्कृत॑म् ॥ २ ॥

नित्यं न सूनुं मधु बिभ्रतः उप क्रीळन्ति क्रीळाः विदथेषु घृष्वयः ।

नक्षन्ति रुद्रा अवसा नमस्विनं न मर्धन्ति स्वऽतवसः हविःकृतम् ॥ २ ॥

अति देदीप्यमान, अनेक लीला करणारे व बाप आपल्या स्वतःच्या मुलास खाऊ देतो त्या प्रमाणें भक्तांना मधुर प्रेमाची देणगी देणारे असे हे मरुत् येथें यज्ञ मंडपांत मौजेनें क्रीडा करीत असतात. हे रुद्ररूप मरुत्, त्यांच्यापुढें अंतःकरणपूर्वक मस्तक लवविणाऱ्या भक्तांकडे आपले कृपाप्रसाद घेऊन येतात, स्वतःच्याच सामर्थ्यावर ज्यांची भिस्त आहे, असे मरुत् हविर्भाग देणाऱ्या भक्तांचे कधींही अहित होऊं देत नाहींत. ॥ २ ॥

यस्मा ऊमासो अमृता अरासत रायस्पोषं च हविषा ददाशुषे ॥

उक्षन्त्यस्मै मरुतो हिता इव पुरू रजांसि पयसा मयोभुवः ॥ ३ ॥

यस्मै ऊमासः अमृताः अरासत रायः पोषं च हविषा ददाशुषे ।

उक्षन्ति अस्मै मरुतः हिताःऽइव पुरु रजांसि पयसा मयःऽभुवः ॥ ३ ॥

भक्तरक्षक आणि अमर मरुतांनी, हविर्भाग अर्पण करणाऱ्या भक्तास, वृद्धिंगत होणारे दिव्य ऐश्वर्य दिलेले असते, अशा भक्तांकरितांच, मंगलप्रद व आप्ताप्रमाणे भक्तांची चिंता वाहणारे मरुत् हा विस्तीर्ण अंतरिक्ष प्रदेश वृष्टिभरानें आर्द्र करून टाकतात. ॥ ३ ॥

आ ये रजांसि तविषीभिरव्यत प्र व एवासः स्वयतासो अध्रजन् ॥

भयन्ते विश्वा भुवनानि हर्म्या चित्रो वो यामः प्रयतास्वृष्टिषु ॥ ४ ॥

आ ये रजांसि तविषीभिः अव्यत प्र वः एवासः स्वऽयतासः अध्रजन् ।

भयन्ते विश्वा भुवनानि हर्म्या चित्रः वः यामः प्रऽयतासु ऋष्टिषु ॥ ४ ॥

हे मरुतांनो, हे तुमचे अश्व आपण होऊनच व्यवस्थितपणानें राहणारे खरे, परंतु जेव्हां ते दौडत गेलेले आहेत, तेव्हां आपल्या धौशानें एवढा रजोलोक पण तो सुद्धा त्यांनी हालवून सोडलेला आहे. तुम्हीं बाहेर निघालां म्हणजे सर्व सृष्टी आणि मनुष्यांची वस्तीदेखील भयानें गांगरून जाते, परंतु तुम्ही आपले भाले रोखुन चालता तेव्हां तुमच्या स्वारीचा थाट मात्र अपूर्व दिसतो. ॥ ४ ॥

यत्त्वे॒षया॑मा न॒दय॑न्त॒ पर्व॑तान्दि॒वो वा॑ पृ॒ष्ठं नर्या॒ अचु॑च्यवुः ॥

विश्वो॑ वो॒ अज्म॑न्भयते॒ व॒नस्पती॑ रथी॒यन्ती॑व॒ प्र जि॑हीत॒ ओष॑धिः ॥ ५ ॥

यत् त्वेषऽयामाः नदयन्त पर्वतान् दिवः वा पृष्ठं नर्या अचुच्यवुः ।

विश्वः वः अज्मन् भयते वनस्पतिः रथीयन्तीऽइव प्र जिहीत ओषधिः ॥ ५ ॥

जेव्हां हे विक्रांत आणि त्वेषानें चालून जाणारे मरुत् आपल्या गडगडाटाच्या प्रतिध्वनीनें गिरिकंदरे दुमदुमून टाकतात, किंवा आकाशाचा प्रचंड गोल सुद्धां हादरून सोडतात, तेव्हां हे मरुतांनो, तुमच्या मार्गांतील सर्व मोठमोठे

वृक्ष भयानें उन्मळून पडतात; आणि बारीक सारीक झुडपें तर रथाच्या चाकाप्रमाणें वेगानें गिरक्या घेत घेत दूर उडून जाऊन आपटतात. ॥ ५ ॥

यूयं न॑ उग्रा मरुतः सुचेतुनारि॑ष्टग्रामाः सुमतिम् पि॑पर्तन ॥

यत्रा॑ वो दिद्युद्रद॑ति क्रिवि॑र्दती रिणाति॑ पश्वः सुधि॑तेव बर्हणा॑ ॥ ६ ॥

यूयं नः उग्राः मरुतः सुऽचेतुना अरिष्टऽग्रामाः सुऽमतिं पिपर्तन ।

यत्रा वः दिद्युद् रदति क्रिविःऽदती रिणाति पश्वः सुधिताऽइव बर्हणा ॥ ६ ॥

भयानक मरुतांनो, ज्या तुमच्या सेनासमूहास यत्किंचित् ही इजा कधीं होत नाहीं ते तुम्हीं दयार्द्र अंतःकरणानें आमचे सन्मनोरथ पूर्ण करा. पहा ही तुमची कराल-दंष्ट्रा विद्युत्, बरोबर नेम धरून मारलेल्या अस्त्रानें स्वापदें लोळवावी, त्याप्रमाणें पातक्यांचा दुराडा उडवून टाकते. ॥ ६ ॥

प्र स्कुम्भदे॑ष्णा अनवभ्ररा॑धसोऽलातृणासो॑ विदथे॑षु सुष्टु॑ताः ॥

अर्चन्त्य॒र्कं म॑दि॒रस्य॑ पी॒तये॑ वि॒दुर्वी॒रस्य॑ प्रथ॒मानि॒ पौंस्या॑ ॥ ७ ॥

प्र स्कम्भऽदेष्णाः अनवभ्रऽराधसः अलातृणासः विदथेषु सुऽस्तुताः ।

अर्चन्ति अर्कं मदिरस्य पीतये विदुः वीरस्य प्रथमानि पौंस्या ॥ ७ ॥

मरुतांनी दिलेले वरप्रदान चिरकाल लाभतें, ज्यांच्या कृपेचा ओघ अक्षय्य, परंतु ज्याचें विद्युदस्त्र फार जलाल आहे. अशा मरुतांचे स्तवन यज्ञमंदिरांतून अतिशय चाललेलें असतें, व आल्हाददायक सोमरसानें प्राशन करण्याकरितां मोठ्यानें घोष करीत ते येत असतात. कारण त्या महावीरानें (इंद्रानें) प्राचीन काळीं केलेले सर्व पराक्रम त्यांनाच माहीत अहेत. ॥ ७ ॥

श॒तभु॑जिभि॒स्तम॒भिह्रु॑तेर॒घात्पू॒र्भी र॑क्षता मरुतो॒ यमाव॑त ॥

जन॒ं यमु॑ग्रास्तवसो विरप्शिनः पा॒थना॒ शंसा॒त्तन॑यस्य पु॒ष्टिषु॑ ॥ ८ ॥

शतभुजिऽभिः तं अभिह्रुते अघा पूःऽभिः रक्षत मरुतः यं आवत ।

जनं यं उग्राः तवसः विऽरप्शिनः पाथन शंसात् तनयस्य पुष्टिषु ॥ ८ ॥

हे मरुतांनो, पातकापासून व दुष्टांच्या मर्मभेदक भाषणांपासून, तटबंदीचे ज्यांना शंभर वेढे आहेत अशा शहरांच्या योगाने राज्याचें संरक्षण करावे, त्याप्रमाणे ज्या भक्तावर तुम्हीं प्रसन्न झालेले असतां त्यांचे संरक्षण करता. हे महाप्रतापी व महाघोर मरुतांनो, ज्या मनुष्यावर तुम्हीं कृपादृष्टि ठेवतां त्याचाही तुम्ही कुटुंब पोषणाच्या उद्योगामुळें उत्पन्न होणाऱ्या जननिंदे पासून बचाव करतां. ॥ ८ ॥

विश्वा॑नि भ॒द्रा म॑रुतो॒ रथे॑षु वो मिथ॒स्पृध्ये॑व तवि॒षाण्याहि॑ता ॥

अंसे॒ष्वा व॒ः प्रप॑थेषु खा॒दयोऽ॑क्षो वश्च॒क्रा स॒मया॒ वि वा॑वृते ॥ ९ ॥

विश्वानि भद्रा मरुतः रथेषु वः मिथस्पृध्याऽइव तविषाणि आऽहिता ।

अंसेषु आ वः प्रऽपथेषु खादयः अक्षः वः चक्रा समया वि ववृते ॥ ९ ॥

हे मरुतांनो, तुमच्या रथांत यच्चावत् मंगल लाभ आणि सामर्थ्यें अशा रीतीनें खेंचून भरली आहेत कीं, तेथें जागा मिळविण्याकरितां जणुं काय त्यांची एकमेकांशी चढा-ओढच चालली आहे असें वाटते. तुम्ही कूच करूं लागलांत

म्हणजे शत्रूवर फेंकण्याची चक्रें तुमच्या खांद्यावरून एखाद्या अलंकाराप्रमाणें लटकत असतात, व तुमच्या रथाचा आंस असा असतो कीं त्याच्यामुळें त्याची सर्व चाकें एकदम जोरानें फिरतात. ॥ ९ ॥

भूरी॑णि भ॒द्रा नर्ये॑षु बा॒हुषु॒ वक्षः॑सु रु॒क्मा र॑भ॒सासो॑ अ॒ञ्जयः॑ ॥

अंसे॒ष्वेताः॑ प॒विषु॑ क्षु॒रा अधि॒ वयो॒ न प॒क्षान्व्यनु॒ श्रियो॑ धिरे ॥ १० ॥

भूरीणि भद्रा नर्येषु बाहुषु वक्षःऽसु रुक्माः रभसासः अञ्जयः ।

अंसेषु एताः पविषु क्षुराः अधि वयः न पक्षान् वि अनु श्रियः धिरे ॥ १० ॥

प्रतापी भुजदंडांत भरपूर यश, वक्षस्थलावर लकलकीत ठळक अलंकार, गळ्यांत शुभ माळा, आणि हत्यांरांना तीक्ष्ण धार, अशा वैभवानें जात असतां पक्षी ज्या प्रमाणे आपले पंख पसरतात, त्याप्रमाणें मरुत् हे आपली दिव्य कांति दूरवर पसरीत असतात. ॥ १० ॥

म॒हान्तो॑ म॒ह्ना वि॒भ्वो विभू॑तयो दू॒रे॒दृशो॒ ये दि॒व्या इ॑व॒ स्तृभिः॑ ॥

म॒न्द्राः सु॒जि॒ह्वाः स्वरि॑तार आ॒सभि॑ः संमि॑श्ला॒ इंद्रे॑ म॒रुतः॑ परि॒ष्टुभः॑ ॥ ११ ॥

महान्तः मह्ना विऽभ्वः विऽभूतयः दूरेऽदृशः ये दिव्याःऽइव स्तृभिः ।

मन्द्राः सुऽजिह्वाः स्वरितारः आसऽभिः संऽमिश्लाः इंद्रे मरुतः परिऽस्तुभः ॥ ११ ॥

आपल्या प्रभावामुळें महा थोर व्यापक आणि ऐश्वर्यसंपन्न असे हे मरुत् नक्षत्रांच्या योगानें द्युलोक जसा दूरवर प्रकाशतो, तसे फार दूर पर्यंत प्रकाशतात. ते उल्हासी मधुर भाषणी आणि तोंडानें सुस्वर गायन करणारे आहेत. तेव्हां अर्थात् ते इंद्राशी अगदीं मिळून असतात आणि त्याला स्तुतींनी चोहोकडून जणों वेष्टून टाकतात. ॥ ११ ॥

तद्वः॑ सुजाता मरुतो महित्व॒नं दी॒र्घं वो॑ दा॒त्रमदि॑तेरिव व्र॒तम् ॥

इंद्र॑श्च॒न त्यज॑सा॒ वि ह्रु॑णाति॒ तज्जना॑य॒ यस्मै॑ सु॒कृ॒ते॒ अरा॑ध्वम् ॥ १२ ॥

तत् वः सुऽजाताः मरुतः महिऽत्वनं दीर्घं वः दात्रं अदितेःऽइव व्रतम् ।

इंद्रः चन त्यजसा वि ह्रुणाति तत् जनाय यस्मै सुऽकृते अराध्वम् ॥ १२ ॥

हे मरुतांनो, अति पवित्र ठिकाणींच तुम्हीं प्रकट होतां, आणि तुमचा महिमा एवढा थोर कीं अदितीचा अधिकार जसा अमर्याद तशी तुमची देणगीही अपरिमित असते. ज्या पुण्य पुरुषावर तुम्हीं कृपा करतां त्याला इंद्र सुद्धां दूर ढकलून देऊन तुमच्या लौकिकाला कमीपणा आणीत नाही. ॥ १२ ॥

तद्वौ जामित्वं मरुतः परे युगे पुरू यच्छंसममृतास आवत ॥

अया धिया मनवे श्रुष्टिमाव्या साकं नरौ दंसनैरा चिकित्रिरे ॥ १३ ॥

तत् वः जामिऽत्वं मरुतः परे युगे पुरु यत् शंसं अमृतासः आवत ।

अया धिया मनवे श्रुष्टिं आव्य साकं नरः दंसनैः आ चिकित्रिरे ॥ १३ ॥

अमर मरुतांनो, तुमचें प्रेम इतकें कळकळीचे असतें कीं स्तोतृजनांवर तुमची कृपा पुढील युगांतही निरंतर राहील. अशाच सुबुद्धिमुळें मनुष्याच्या कल्याणार्थ, त्याची प्रार्थना ऐकून घेऊन हे शूर मरुत् आपल्या अद्भुत पराक्रमांनी विख्यात झाले आहेत. ॥ १३ ॥

येन दीर्घं मरुतः शूशवाम युष्माकेन परीणसा तुरासः ॥

आ यत्ततनन्वृजने जनास एभिर्यज्ञेभिस्तदभीष्टिमश्याम् ॥ १४ ॥

येन दीर्घं मरुतः शूशवाम युष्माकेन परीणसा तुरासः ।

आ यत् ततनन् वृजने जनासः एभिः यज्ञेभिः तत् अभि इष्टिं अश्याम् ॥ १४ ॥

वेगवान् मरुतांनो, तुमच्या अपार दिव्य समृद्धीच्या योगानें आमचा निरंतर उत्कर्ष होवो. ज्या ज्या ठिकाणीं आमचे लोक राहतील त्या त्या ठिकाणीं त्यांची संतति वाढावी म्हणून जे हे आम्हीं यज्ञ करतो, त्यांच्या योगानें आमचा अभिष्ट हेतु पूर्ण होवो. ॥ १४ ॥

एष वः स्तोमो मरुत इयं गीर्मान्दार्यस्य मान्यस्य कारोः ॥

एषा यासीष्ट तन्वे वयां विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥ १५ ॥

एषः वः स्तोमः मरुतः इयं गीः मान्दार्यस्य मान्यस्य कारोः ।

आ इषा यासीष्ट तन्वे वयां विद्याम इषं वृजनं जीरऽदानुम् ॥ १५ ॥

हे मरुतांनो, हे स्तोत्र व ही प्रार्थना सन्मान्य अशा मांदार्यानें तुमच्या प्रित्यर्थ केलेली आहे, तर आमच्या स्वतःकरितां उत्साहप्रद शक्ति तुम्हीं घेऊन या म्हणजे त्या सामर्थ्य शाखेच्या आश्रयानें त्या तात्काळ फलद्रूप होणाऱ्या आश्रयानें आम्हीं राहूं. ॥ १५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १६७ (इंद्र सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : इंद्रः, मरुतः - छंद - त्रिष्टुभ्

स॒हस्रं॑ त इंद्रो॒तयो॑ नः स॒हस्र॒मिषो॑ हरिवो गू॒र्तत॑माः ॥

स॒हस्रं॒ रायो॑ माद॒यध्यै॑ सह॒स्रिण॒ उप॑ नो यन्तु॒ वाजाः॑ ॥ १ ॥

सहस्रं त इंद्रः ऊतयः नः सहस्रं इषः हरिऽवः गूर्तऽतमाः ।

सहस्रं रायः मादयध्यै सहस्रिणः उप नः यन्तु वाजाः ॥ १ ॥

हे हरिदश्व इंद्रा, तुझे ते हजारों प्रसाद, ते उत्साहप्रद व अत्यंत स्तुत्य अशा हजारों प्रेरणा,, सहस्रावधि दिव्य संपत्ति आणि त्या अगणित पवित्र शक्ति आम्हांला आनंदांत निमग्न करण्याकरितां आमच्याकडे येवोत. ॥ १ ॥

आ नोऽ॑वोभिर्म॒रुतौ या॒न्त्वच्छा॒ ज्येष्ठे॑भिर्वा बृ॒हद्दि॑वैः सु॒मा॒यायाः ॥

अध॒ यदे॑षां नि॒युतः॑ पर॒माः स॑मु॒द्रस्य॑ चिद्धु॒नय॑न्त पा॒रे ॥ २ ॥

आ नः अवऽभिः मरुतः यान्तु अच्छ ज्येष्ठेभिः वा बृहत्ऽदिवैः सुऽमायाः ।

अध यत् एषां निऽयुतः परमाः समुद्रस्य चित् धनयन्त पारे ॥ २ ॥

चमत्कार कुशल मरुत् आपल्या उत्कृष्ट व अत्यंत दीप्तिमान अशा प्रसादांसहित आमच्याकडे येवोत. असें करणें त्यांस कांहींच कठीण नाही. कारण त्यांचे नियुत् नांवाचे उत्तम घोडे दौडत दौडत समुद्राच्या सुद्धां पार जाऊं शकतात. ॥ २ ॥

मि॒म्यक्ष॒ येषु॒ सुधि॑ता घृ॒ताची॒ हिर॑ण्यनिर्णि॒गुप॑रा॒ न ऋ॒ष्टिः ॥

गुहा॒ चर॑न्ती॒ मनु॑षो॒ न योषा॑ स॒भाव॑ती विद॒थ्येव॒ सं वाक् ॥ ३ ॥

मिम्यक्ष येषु सुऽधिता घृताची हिरण्यऽनिर्णिक् उपरा न ऋष्टिः ।

गुहा चरन्ती मनुषः न योषा सभाऽवती विदथ्याऽइव सं वाक् ॥ ३ ॥

जिचें अंग नवनीताप्रमाणे कोमल, जिची कांति सुवर्णाप्रमाणे तेजःपुंज आणि जिचा बांधा अगदी रेखीव अशी एक सुंदरी मरुतांबरोबर एक सारखी असते. त्यांच्या हातांतील बरची जशी कधीं वेगळी होत नाही, त्याप्रमाणेच ही युवती सुद्धां त्यांच्या पासून कधींही वेगळी होत नाहीं. परंतु अंतःपुरांतच वावरणाऱ्या स्त्रीप्रमाणें केव्हां केव्हां ती गुप्त असते. आणि केव्हां केव्हां भरसभेत येणाऱ्या एखाद्या स्त्रीप्रमाणे किंवा यज्ञकाळीं होणाऱ्या मेघ गर्जनारूप देवस्तुतीप्रमाणें सर्वांना गोचर होते. ॥ ३ ॥

परा॑ शु॒भ्रा अ॒यासो॑ य॒व्या सा॑धार॒ण्येव॑ म॒रुतो॑ मिमिक्षुः ॥

न रो॑द॒सी अप॑ नुदन्त घो॒रा जु॒षन्त॒ वृधं॑ स॒ख्याय॑ दे॒वाः ॥ ४ ॥

परा शुभ्राः अयासः यव्या साधारण्याऽइव मरुतः मिमिक्षुः ।

न रोदसी इति अप नुदन्त घोराः जुषन्त वृधं सख्याय देवाः ॥ ४ ॥

शुभ्र कांतिमान आणि कितीही श्रम झाले तरी न थकणाऱ्या अशा त्या मरुतांनी त्या तरुणीला आपल्या अगदीं जवळ घेतलें व तें अशा प्रेमानें कीं जणुं काय तीच एकटी सर्वांची अत्यंत आवडती. मरुत् हे उग्र खरे परंतु त्यांनी रोदसीचा त्याग केला नाहीं. पण उलट तिच्यावर प्रेम करावें म्हणून त्यांनी त्या आनंद वर्धिकेचा अंगिकार केला. ॥ ४ ॥

जोषद्यदीमसुर्या सचध्यै विषितस्तुका रोदसी नृमणाः ॥

आ सूर्येव विधतो रथं गात्त्वेषप्रतीका नभसो नेत्या ॥ ५ ॥

जोषत् यत् ईं असुर्या सचध्यै विसितऽस्तुका रोदसी नृऽमनाः ।

आ सूर्याऽइव विधतः रथं गात् त्वेषऽप्रतीका नभसः न इत्या ॥ ५ ॥

दिव्यरूप, लुलितकुंतल परंतु त्या धिरोदात्त मनाच्या रोदसीनें मरुतांचा अखंड सहवास व्हावा म्हणून जेव्हां त्यांना वरलें, तेव्हां सूर्याची अंगकांति जशी चंचलगतीनें आकाशांतून त्याच्या रथाजवळ येते, त्याप्रमाणें ती तेजोरूप रोदसी प्रेमानें सर्वस्वी आधीन झालेल्या त्या मरुतांच्या रथाजवळ गेली. ॥ ५ ॥

आस्थापयन्त युवतिं युवानः शुभे निमिश्लां विदथेषु पज्राम् ॥

अर्को यद्वो मरुतो हविष्मान्गायद्गाथं सुतसोमो दुवस्यन् ॥ ६ ॥

आ अस्थापयन्त युवतिं युवानः शुभे निऽमिश्लां विदथेषु पज्राम् ।

अर्कः यत् वः मरुतः हविष्मान् गायत् गाथं सुतऽसोमः दुवस्यन् ॥ ६ ॥

तरुण मरुतांनी त्या तरुणीला, आनंदाशीं एकरूप झालेल्या व यज्ञ सभांमध्यें भारदस्तपणानें वावरणाऱ्या त्या रोदसीला आपल्या रथांत बसवून घेतली, त्या वेळेस हे मरुतांनो, तुमच्या स्तोतृजनानें तुमची सेवा करून तुम्हांस हवि आणि सोम अर्पण करून तुमच्या प्रित्यर्थ स्तोत्र केलें. ॥ ६ ॥

प्र तं विवक्मि वक्म्यो य एषां मरुतां महिमा सत्यो अस्ति ॥

सचा यदीं वृषमणा अहंयु स्थिरा चिज्जनीर्वहते सुभागाः ॥ ७ ॥

प्र तं विवक्मि वक्म्यः यः एषां मरुतां महिमा सत्यः अस्ति ।

सचा यत् ईं वृषऽमनाः अहंऽयुः स्थिरा चित् जनीः वहते सुऽभागाः ॥ ७ ॥

हा मरुतांचा जो एक वर्णनीय महिमा आहे तो अगदी खरा आहे. व त्याचें वर्णन मी कितीतरी करीत असतो. तो महिमा हा कीं ,ही मानी परंतु इमानी वीरपत्नी जी रोदसी ती जलवृष्टिरूप भाग्यशाली स्त्रियांनांसुद्धां आपल्या बरोबरच घेऊन येत असते. ॥ ७ ॥

पान्ति॑ मि॒त्रावरु॑णावव॒द्याच्चय॑त ईमर्य॒मो अप्र॑शस्तान् ॥

उ॒त च्य॑वन्ते॒ अच्यु॑ता ध्रु॒वाणि॑ वावृ॒ध ईं मरुतो॒ दाति॑वारः ॥ ८ ॥

पान्ति मित्रावरुणौ अवद्यात् चयते ईं अर्यमो इति अप्रऽशस्तान् ।

उत च्यवन्ते अच्युता ध्रुवाणि ववृधे ईं मरुतः दातिऽवारः ॥ ८ ॥

हाही तुमचाच महिमा कीं मित्र, वरुण आणि अर्यमा हेही तुमच्या भक्तांचे पातकापासून रक्षण करतात, आणि दुष्टांस हुस्कून काढून त्यांस शिक्षा करतात. त्याचप्रमाणे जे पदार्थ पूर्णपणें अढळ आणि अचल, तेही एकवेळ जागचे ढळतील परंतु दानशाली भक्ताचा उत्कर्ष हा होणारच. ॥ ८ ॥

नही नु वौ मरुतो अन्त्यस्मे आरात्ताच्चिच्छवसो अन्तमापुः ॥

ते धृष्णुना शवसा शूशुवांसोऽर्णो न द्वेषो धृषता परि ष्ठुः ॥ ९ ॥

नहि नु वः मरुतः अन्ति अस्मे इति आरात्तात् चित् शवसः अन्तं आपुः ।

ते धृष्णुना शवसा शूशुऽवांसः अर्णः न द्वेषः धृषता परि स्थुः ॥ ९ ॥

हे मरुतांनो, आम्हां मानवापैकीं - मग तो सध्याच्या काळचा असो किंवा पुरातन काळचा असो - कोणासही तुमचा अंत लागला नाहीं. मरुत् हे आपल्या आवेशानें व प्रतापानें एकदां खवळून गेले म्हणजे दुर्जनांना झपाट्यासरशीं समुद्राप्रमाणें चोहोंकडून घेरून बुडवून टाकतात. ॥ ९ ॥

वयमद्येन्द्रस्य प्रेष्ठा वयं श्वो वोचेमहि समर्ये ॥

वयं पुरा महि च नो अनु द्यून्तन्न ऋभुक्षा नरामनु ष्यात् ॥ १० ॥

वयं अद्य इंन्द्रस्य प्रेष्ठाः वयं श्वः वोचेमहि सऽमर्ये ।

वयं पुरा महि च नः अनु द्यून् तत् नः ऋभुक्षाः नरां अनु स्यात् ॥ १० ॥

युद्धांत काय आणि यज्ञांत काय, आम्ही इंद्राचे लाडके भक्त, त्याचे स्तवन आज उद्यांच नव्हे तर निरंतर करीत राहूं. ह्या पूर्वीही आम्हीं त्यांचे स्तवन प्रेमानें केलें आहे, तसेंच पुढेंही दिवसानुदिवस करूं. तरी मरुतांचा स्वामी जो इंद्र तो इतर मनुष्यांच्या आधीं आम्हांलाच प्रसन्न होवो. ॥ १० ॥

एष वः स्तोमो मरुत इयं गीर्मान्दार्यस्य मान्यस्य कारोः ॥

एषा यासीष्ट तन्वे वयां विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥ ११ ॥

एषः वः स्तोमः मरुतः इयं गीः मान्दार्यस्य मान्यस्य कारोः ।

आ इषा यासीष्ट तन्वे वयां विद्याम इषं वृजनं जीरऽदानुम् ॥ ११ ॥

हे मरुतांनो, हे स्तोत्र व ही प्रार्थना सन्मान्य अशा मांदार्यानें तुमच्या प्रित्यर्थ केलेली आहे, तर आमच्या स्वतःकरितां उत्साहप्रद शक्ति तुम्हीं घेऊन या म्हणजे त्या सामर्थ्य शाखेच्या आश्रयानें त्या तात्काळ फलद्रूप होणाऱ्या आश्रयानें आम्हीं राहूं. ॥ ११ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १६८ (मरुतः सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : मरुतः - छंद - त्रिष्टुभ्

य॒ज्ञाय॑ज्ञा वः सम॒ना तु॑तु॒र्वणि॒र्धियं॑धियं वो देव॒या उ॑ दधिध्वे ॥

आ वो॑ऽ॒र्वाचः॑ सुवि॒ताय॒ रोद॑स्योर्म॒हे व॑वृत्या॒मव॑से सुवृ॒क्तिभिः॑ ॥ १ ॥

यज्ञाऽयज्ञा वः समना तुतुर्वणिः धियंऽधियं वः देवऽयाः ऊं इति दधिध्वे ।

आ वः अर्वाचः सुविताय रोदस्योः महे ववृत्यां अवसे सुवृक्तिऽभिः ॥ १ ॥

हे मरुतांनो प्रत्येक यज्ञांत तुम्हा सर्वांची उपासना एकदम करण्याविषयी अतिशय आतुर झालेला जो जो भक्त आहे, तो तो तुमचा. आणि तुम्हींही आपला म्हटलेल्या देव सेवक भक्ताची प्रत्येक प्रार्थना अंतःकरणांत सांठवून

ठेवतां, तर सर्व जगाचे उत्तम प्रकारचें कल्याण व्हावे व मजवर अनुग्रह व्हावा म्हणून पवित्र अशा स्तुतींनी मीं तुम्हास इकडे वळवीन असें करा. ॥ १ ॥

व॒व्रासो॒ न ये स्व॒जाः स्वत॑वस॒ इषं॒ स्वरभि॒जाय॑न्त॒ धूत॑यः ॥

स॒ह॒स्रिया॑सो अ॒पां नोर्मय॑ आ॒सा गावो॒ वन्द्या॑सो॒ नोक्षणः॑ ॥ २ ॥

वव्रासः न ये स्वऽजाः स्वऽतवसः इषं स्वः अभिजायन्त धूतयः ।

सहस्रियासः अपां न ऊर्मयः आसा गावः वन्द्यासः न उक्षणः ॥ २ ॥

आपल्या आपण जन्म पावणारे व सर्व जगास हालवून सोडणारे हे मरुत् पर्वतांप्रमाणें आपल्या स्वतःच्याच बळावर अवलंबून असतात, व मनोत्साह आणि प्रकाश ह्याची अभिवृद्धि करण्याकरतांच प्रकट होतात. महा पराक्रमी मरुत् हे महा सागराच्या प्रचंड लाटांप्रमाणें असंख्य आणि दिव्य धेनूप्रमाणे सर्वतोपरी पूज्य होत. ॥ २ ॥

सोमा॑सो॒ न ये सु॒तास्तृ॒प्तांश॑वो हृ॒त्सु पी॒तासो॑ दु॒वसो॒ नास॑ते ॥

ऐषा॒मंसे॑षु र॒म्भिणी॑व रारभे॒ हस्ते॑षु खा॒दिश्च॑ कृ॒तिश्च॒ सं द॑धे ॥ ३ ॥

सोमासः न ये सुताः तृप्तऽअंशवः हृत्ऽसु पीतासः दुवसः न आसते ।

ऐषां अंसेषु रम्भिणीऽइव ररभे हस्तेषु खादिः च कृतिः च सं दधे ॥ ३ ॥

सरस आणि पुष्ट अशा सोमवल्लीचा रस काढून प्राशन केला असतां तो जसा हृदयांत आनंदरूपानें राहतो त्याप्रमाणेंच मरुत् हे भक्ताच्या अंतःकरणांत वास करतात. सुंदर तरुणीच्या भुजलते प्रमाणें त्यांच्या खांद्यावरून फुलांच्या माळेचा विळखा असतो आणि त्यांनी एका हातांत ढाल व दुसऱ्या हातांत तरवार घेतलेली असते. ॥ ३ ॥

अव॒ स्वयु॑क्ता दि॒व आ वृथा॑ ययु॒रम॑र्त्याः॒ कश॑या चोदत॒ त्मना॑ ॥

अ॒रे॒णव॑स्तुविजा॒ता अ॑चुच्यवुर्दृ॒ळ्हानि॑ चिन्म॒रुतो॒ भ्राज॑दृष्टयः ॥ ४ ॥

अव स्वऽयुक्ताः दिवः आ वृथा ययुः अमर्त्याः कशया चोदत त्मना ।

अरेणवः तुविऽजाताः अचुच्यवुः दृळ्हानि चित् मरुतः भ्राजत्ऽऋष्टयः ॥ ४ ॥

ज्यांच्या रथास घोडे आपल्या आपण जुंपले जातात, असे हे मरुत् आपल्या रथांत बसून आकाशांतून सहज लीलेनें खाली भूलोकीं आलेले आहेत. अमर मरुतांनो, तुम्ही आतां स्वतःच तुमच्या घोड्यांना चाबकानें जरा इषारा द्या. मरुत् हे निष्कलंक, उपजतच बलशाली, व त्यांच्या हातांतील भाले पाहिले तर अगदी झगझगीत; तेव्हां कसलेंही न हालणारे धूड असो त्यास त्यांनी उलथून पाडलेंच म्हणून समजावे. ॥ ४ ॥

को व॑ऽ॒न्तर्म॑रुत ऋष्टिविद्युतो॒ रेज॑ति॒ त्मना॒ हन्वे॑व जि॒ह्वया॑ ॥

ध॒न्व॒च्युत॑ इ॒षां न याम॑नि पुरु॒प्रैषा॑ अह॒न्यो३॑नैत॑शः ॥ ५ ॥

कः वः अन्तः मरुतः ऋष्टिऽविद्युतः रेजति त्मना हन्वाऽइव जिह्वया ।

धन्वऽच्युतः इषां न यामनि पुरुऽप्रैषाः अहन्यः न एतशः ॥ ५ ॥

लकलकीत वीज हाच तुमचा भाला, तर हे मरुतांनो, बोलतांना ओठ जसे जिभेच्या सामर्थ्यानें हालतात, त्याप्रमाणें तुम्हाला अंतर्यामी प्रेरणा कोणामुळें होतें बरें ? सर्वांस ताजे तवानें करणारीं जीं सामर्थ्यें, तीं आम्हांस मिळवून

देण्याच्या मार्गांत तुम्ही असलांत म्हणजे अंतरिक्षांतून झपाट्यानें बाहेर पडून, सूर्याच्या तऱ्हेतऱ्हेच्या किरणांप्रमाणें सर्वत्र संचार करतां. ॥ ५ ॥

क्व स्विदुस्य रजसो महस्परं क्वावरं मरुतो यस्मिन्नायय ॥

यच्च्यावयथ विथुरेव संहितं व्यद्रिणा पतथ त्वेषमर्णवम् ॥ ६ ॥

क्व स्वित् अस्य रजसः महः परं क्व अवरं मरुतः यस्मिन् आऽयय ।

यत् च्यवयथ विथुराऽइव संऽहितं वि अद्रिणा पतथ त्वेषं अर्णवम् ॥ ६ ॥

हे मरुतांनो, जेथून तुम्ही भूलोकीं आलांत त्या ह्या महान् रजो-लोकाला शेवट कसचा आणि आरंभ कसचा ? असें आहे तरी एकवट झालेल्या मेघरूप शत्रूंच्या समूहास अशनीच्या तडाख्यासरशी तुम्हीं भुस्कटाप्रमाणें उडवून देतां, तेव्हां देदीप्यमान अशा अंतरिक्ष समुद्राच्याही पार जोरानें उडून जातां. ॥ ६ ॥

सातिर्न वोऽमवती स्वर्वती त्वेषा विपाका मरुतः पिपिष्वती ॥

भ॒द्रा वो॑ रा॒तिः पृ॑ण॒तो न दक्षि॑णा पृथु॒ज्रयी॑ असु॒र्ये॑व॒ जञ्ज॑ती ॥ ७ ॥

सातिः नः वः अमऽवती स्वःऽवती त्वेषा विऽपाका मरुतः पिपिष्वती ।

भद्रा वः रातिः पृणतः न दक्षिणा पृथुऽज्रयी असुर्याऽइव जञ्जती ॥ ७ ॥

तुमच्यामुळें प्राप्त झालेली विजयश्री जशी बलवर्धक, स्वर्गदात्री, उज्ज्वल आणि आनंद परिणामी असते, तशीच हे मरुतांनो, तुमची देणगीही एखाद्या दानशूराच्या दक्षिणेप्रमाणें मंगलकारक असून आकाशांतील विद्युल्लतेप्रमाणें अतिशय वेगानें खालीं येणारी व सर्वांस थक्क करून टाकणारी अशी असते. ॥ ७ ॥

प्रति॑ ष्टोभन्ति॒ सिंध॑वः प॒विभ्यो॒ यद॒भ्रियां॒ वाच॑मु॒दी॒रय॑न्ति ॥

अव॑ स्मयन्त वि॒द्युतः॑ पृथि॒व्यां यदी॑ घृ॒तं म॒रुतः॑ प्रुष्णु॒वन्ति॑ ॥ ८ ॥

प्रति स्तोभन्ति सिंधवः पविऽभ्यः यत् अभ्रियां वाचं उत्ऽईरयन्ति ।

अव स्मयन्त विऽद्युतः पृथिव्यां यदी घृतं मरुतः प्रुष्णुवन्ति ॥ ८ ॥

मरुत् हे घनगर्जनेच्या शब्दांनी जयघोष करीत असतात त्यावेळीं त्यांच्या रथचक्राच्या पावट्यांच्या रगड्यामुळें मेघसमुद्रहि खवळून जाऊन गर्जना करतो. आणि पृथ्वितलावर अमृत वृष्टि करतात, त्यावेळी विद्युल्लता ही चमकत चमकत स्मित हास्य करीत असतात. ॥ ८ ॥

असूत पृश्निर्महते रणाय त्वेषमयासां मरुतामनीकम् ॥

ते सप्सरासोऽजनयन्ताभ्वमादित्स्वधामिषिरां पर्यपश्यन् ॥ ९ ॥

असूत पृश्निः महते रणाय त्वेषं अयासां मरुतां अनीकम् ।

ते सप्सरासः अजनयन्त अभ्वं आत् इत् स्वधां इषिरां परि अपश्यन् ॥ ९ ॥

घोर संग्राम करण्याकरितांच पृश्नी मातेनें वेगवान मरुतांच्या जाज्वल्य समूहाला जन्म दिला. ते मोठे लढवय्ये असल्यामुळें त्यांनी आपलें शौर्य प्रकट केलें आणि त्यामुळेंच प्राणिमात्राच्या हालचालींत व्यवस्था दृष्टीस पडूं लागली. ॥ ९ ॥

एष वः स्तोमो मरुत इयं गीर्मान्दार्यस्य मान्यस्य कारोः ॥

एषा यासीष्ट तन्वे वयां विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥ १० ॥

एष वः स्तोमः मरुतः इयं गीः मान्दार्यस्य मान्यस्य कारोः ।

आ इषा यासीष्ट तन्वे वयां विद्याम इषं वृजनं जीरऽदानुम् ॥ १० ॥

हे मरुतांनो, हे स्तोत्र व ही प्रार्थना सन्मान्य अशा मांदार्यानें तुमच्या प्रित्यर्थ केलेली आहे, तर आमच्या स्वतःकरितां उत्साहप्रद शक्ति तुम्हीं घेऊन या म्हणजे त्या सामर्थ्य शाखेच्या आश्रयानें त्या तात्काळ फलद्रूप होणाऱ्या आश्रयानें आम्हीं राहूं. ॥ १० ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १६९ (मरुतः सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : मरुतः - छंद - त्रिष्टुभ्

म॒हश्चि॒त्त्वमिं॑द्र य॒त ए॒तान्म॒हश्चिं॑दसि॒ त्यजं॑सो व॒रू॒ता ॥

स नों वेधो म॒रुतां॑ चिकि॒त्वान्त्सु॒म्ना वं॑नुष्व॒ तव॒ हि प्रेष्ठा॑ ॥ १ ॥

महः चित् त्वं इंद्र यतः एतान् महः चित् असि त्यजसः वरूता ।

सः नः वेधः मरुतां चिकित्वान् सुम्ना वनुष्व तव हि प्रेष्ठा ॥ १ ॥

हे इंद्रा, कोणी कितीही मोठा, कसाही बलाढ्य असो, त्याच्या हल्ल्यापासून आमचा बचाव करणारा तूं आहेस. हे सकल देव प्रभो महाज्ञानी असाही तूंच आहेस. तर मनुष्य मात्राला अत्यंत प्रिय असे जे जे आनंद तुजपाशीं आहेत ते ते आम्हांस प्राप्त करून दे. ॥ १ ॥

अयुं॑ज्रन्त इंद्र वि॒श्वकृं॑ष्टीर्विदा॒नासो॑ नि॒ष्षिधो॑ मर्त्य॒त्रा ॥

म॒रुतां॑ पृत्सु॒तिर्हास॑माना॒ स्वर्मीळ्हस्य प्र॒धनं॑स्य सा॒तौ ॥ २ ॥

अयुज्रन् ते इंद्र विश्वऽकृष्टीः विदानासः निःसिधः मर्त्यऽत्रा ।

मरुतां पृत्सुतिः हासमाना स्वःऽमीळ्हस्य प्रधनस्य सातौ ॥ २ ॥

हे इंद्रा, ह्या मनुष्य लोकांतील शत्रुनाशक, सकलजनाचे मार्ग दर्शक आणि ज्ञानी अशा देवांना तुझे हुकुम सुटले आहेत. असें वाटतें कारण ही मरुतांची सेनाच पहा स्वर्लोकींचा प्रकाश जिंकून आणण्याकरितां होणाऱ्या युद्धांत जय मिळविण्याकरितां कशी मोठ्या ईर्षेनें निघाली आहे. ॥ २ ॥

अम्य॒क्सा त॑ इंद्र ऋ॒ष्टिर॒स्मे सने॒म्यभ्वं॑ म॒रुतौ॑ जुनन्ति ॥

अ॒ग्निश्चि॒द्धि ष्मा॑त॒से शु॑शु॒क्वानापो॒ न द्वी॒पं दध॑ति॒ प्रयां॑सि ॥ ३ ॥

अम्यक् सा ते इंद्र ऋष्टिः अस्मे इति सनेमि अभ्वं मरुतः जुनन्ति ।

अग्निः चित् हि स्म अत्से शुशुक्वान् आपः न द्वीपं दधति प्रयांसि ॥ ३ ॥

हे इंद्रा, तें तुझें प्रसिद्ध हत्यार आम्हांकरितां नेहमी पुढें सरसावलेलेंच आहे. व मरुतांनीही आपलें सामर्थ्य बाहेर निदर्शनास आणलें आहे. प्रज्वलित अग्नि ज्या प्रमाणें शुष्क काष्ठांना चोहोंकडून घेरतो किंवा पाण्याचा प्रवाह

एखाद्या बेटाला वेढून टाकतो त्याप्रमाणें इंद्र व मरुत् ह्यांनी सर्व सुखें आम्हांकरितां आपल्या हातांत घेऊन ठेवलेली आहेत. ॥ ३ ॥

त्वं तू न॑ इंद्र॒ तं र॒यिं दा॒ ओजि॑ष्ठया॒ दक्षि॑णयेव रा॒तिम् ॥

स्तु॒त॑श्च॒ यास्ते॑ च॒कन॑न्त वा॒यो स्तन॒ं न मध्व॑ः पीपयन्त॒ वाजैः॑ ॥ ४ ॥

त्वं तू नः इंद्र तं रयिं दाः ओजिष्ठया दक्षिणयाऽइव रातिम् ।

स्तुतः च याः ते चकनन्त वायोः स्तनं न मध्वः पीपयन्त वाजैः ॥ ४ ॥

हे इंद्रा, ऐहिक देणगी तूं ज्याप्रमाणें प्रभावशाली अशा गोधनांच्या रूपानें दिलेली आहेस, त्याप्रमाणें तें अनिर्वण्य दिव्य ऐश्वर्यही तूं आम्हांस अनमान न करतां दे. तुझें स्तवन आम्हीं यथामति केलें तेव्हां ज्या स्तुतींनी तूं प्रसन्न झालास त्याच स्तुतींनी, वायूचें अंतरंग मधुर सुगंधानें भरून जावें त्याप्रमाणें आमचें अंतःकरण भक्तिच्या उमाळ्यानें उचंबळून गेलें. ॥ ४ ॥

त्वे राय॑ इंद्र तो॒शत॑माः प्रणे॒तार॒ः कस्य॑ चिदृता॒योः ॥

ते षु णो मुरुतो मृळयन्तु ये स्मा पुरा गातूयन्तीव देवाः ॥ ५ ॥

त्वे इति रायः इंद्र तोशऽतमाः प्रऽनेतारः कस्य चित् ऋतऽयोः ।

ते सु नः मरुतः मृळयन्तु ये स्म पुरा गातुयन्तिऽइव देवाः ॥ ५ ॥

प्रत्येक सच्छील भक्ताचा योगक्षेम चालविणारे आणि अत्यंत समृद्ध असें जें दिव्य ऐश्वर्य आहे तें, हे इंद्रा, तुझ्याच हातीं असतें. तर तुझ्या भक्तांस सामोरे जाण्याची जणुं जे इच्छा करीत असतात, असे ते तुझे देदीप्यमान मरुत् आम्हांवर अतिशय कृपालोभ करोत. ॥ ५ ॥

प्रति प्र याहीन्द्र मीळ्हुषो नृन्महः पार्थिवे सदने यतस्व ॥

अध यदेषां पृथुबुध्नास एतास्तीर्थे नार्यः पौंस्यानि तस्थुः ॥ ६ ॥

प्रति प्र याहि इंन्द्र मीळ्हुषः नॄन् महः पार्थिवे सदने यतस्व ।

अध यत् एषां पृथुऽबुध्नासः एताः तीर्थे न अर्यः पौंस्यानि तस्थुः ॥ ६ ॥

हे इंद्रा, मरुत् हे कृपाप्रसादांचा वर्षाव करणारे, थोर आणि वीर्यवान आहेत, त्यांच्या सहाय्याकरितां ये आणि पृथ्वितलावर आपला पराक्रम गाजव. हा पहा ह्या मरुतांचा, भरगच्च पुठ्यांच्या हरिणांचा किरणरूप तांडा राजांची सैन्यें रणमैदानावर येऊन उभी रहावी, त्याप्रमाणे येथें उभा राहिला आहे. ॥ ६ ॥

प्रति घोराणामेतानामयासां मरुतां शृण्व आयतामुपब्दिः ॥

ये मर्त्यं पृतनायन्तमूमैरृणावानं न पतयन्त सर्गैः ॥ ७ ॥

प्रति घोराणां एतानां अयासां मरुतां शृण्वे आऽयतां उपब्दिः ।

ये मर्त्यं पृतनाऽयन्तं ऊमैः ऋणऽवानं न पतयन्त सर्गैः ॥ ७ ॥

भयंकर आणि अतिशय तडफदार असे हे मरुत् मोठ्या धुधाट्यानें येत आहेत. हा पहा त्यांचा आवाज मोठ्यानें ऐकूं येऊं लागला. आपल्यावर प्रेम करणाऱ्याशींही जो शत्रुत्व करतो अशा दुष्ट अधमाला, एखाद्या पातकी ऋणकऱ्याला हाणून पाडावा त्याप्रमाणें आपल्या धडाक्यानें हे मरुत् जमीनदोस्त करून टाकतात. ॥ ७ ॥

त्वं मानेभ्य इंद्र विश्वजन्या रदा मरुद्भिः शुरुधो गोअग्राः ॥

स्तवा॑नेभि स्तवसे देव दे॒वैर्वि॒द्यामे॒षं वृ॒जनं॑ जी॒रदा॑नुम् ॥ ८ ॥

त्वं मानेभ्यः इंद्र विश्वऽजन्या रद मरुत्भिः शुरुधः गोऽअग्राः ।

स्तवाऽनेभि स्तवसे देव देवैः विद्याम एषं वृजनं जीरदानुम् ॥ ८ ॥

हे इंद्रा, तूं मरुतांसह इकडे ये आणि जिच्यापासून सर्व जगाचें हित होईल व जिच्यामध्यें ज्ञानरूप प्रकाशाचेंच प्राधान्य असेल अशी एक दुःखनिवारक देणगी आम्हां मान्यकुळांतील पुरुषांना दे. हे देवाधिदेवा इंद्रा, आम्हांस पूज्य असे इतर देव हे सुद्धां तुझें स्तवन करतात तर तात्काळ फलद्रुप होणारा आणि उत्साहकारक असा तुझा आसरा आम्हांस लाभेल असें कर. ॥ ८ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १७० (इंद्र सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : इंद्रः - छंद - बृहती, अनुष्टुप्, त्रिष्टुभ्

न नूनमस्ति नो श्वः कस्तद्वेद यदद्भुततम् ॥

अन्यस्य चित्तमभि सञ्चरेण्यमुताधीतं वि नश्यति ॥ १ ॥

न नूनं अस्ति नो इति श्वः कः तत् वेद यत् अद्भुतम् ।

अन्यस्य चित्तं अभि संऽचरेण्यं उत आऽधीतं वि नश्यति ॥ १ ॥

आज नाही आणि उद्या नाही; मग त्याच्यापुढें काय होणार हें कोणाला माहित ? दुसऱ्याचें मन सुप्रसन्न करून घ्यावयास जावे मात्र, कीं आपल्या मनांतील फिसकटलेच म्हणून समजावें. ॥ १ ॥

किं न इंद्र जिघांससि भ्रातरो मरुतस्तव ॥

तेभिः कल्पस्व साधुया मा नः समरणे वधीः ॥ २ ॥

किं नः इंद्र जिघांससि भ्रातरः मरुतः तव ।

तेभिः कल्पस्व साधुऽया मा नः संऽअरणे वधीः ॥ २ ॥

हे इंद्रा, आम्हांस मारून टाकण्याचें कां बरें मनांत आणतोस ? मरुत् हे तुझे बंधूच आहेत. तर त्यांच्याविषयीं मनांत प्रेम धर, आणि युद्धांत आमचा नाश करूं नकोस. ॥ २ ॥

किं नो॑ भ्रातरगस्त्य॒ सखा॒ सन्नति॑ मन्यसे ॥

वि॒द्मा हि ते॒ यथा॒ मनो॑ऽ॒स्मभ्य॒मिन्न दि॑त्ससि ॥ ३ ॥

किं नः भ्रातः अगस्त्य सखा सन् अति मन्यसे ।

विद्म हि ते यथा मनोः अस्मभ्यं इत् न दित्ससि ॥ ३ ॥

हे बंधो अगस्त्या, तूं आमचा जिवलग म्हणवितोस आणि आम्हांलाच वगळतोस ? समजले आम्हांला तुझें मन. तुझ्या मनांत आम्हांलाच मात्र कांही एक द्यावयाचें नाहीं. ॥ ३ ॥

अरं॑ कृण्वन्तु॒ वेदिं॑ स॒मग्निमि॑न्धतां पु॒रः ॥

तत्रा॒मृत॑स्य॒ चेत॑नं य॒ज्ञं ते॑ तनवावहै ॥ ४ ॥

अरं कृण्वन्तु वेदिं सं अग्निं इंधतां पुरः ।

तत्र अमृतस्य चेतनं यज्ञं ते तनवावहै ॥ ४ ॥

असे रागावूं नका. हें पहा, वेदी तयार करू द्या, अग्निला समोर प्रज्वलित होऊं द्या कीं प्रत्यक्ष अमरत्वासच चैतन्य आणणारा असा जो हा यज्ञ आम्ही तुझ्या प्रित्यर्थ उभयतां यथासांग करूं. ॥ ४ ॥

त्वमीशिषे वसुपते वसूनां त्वं मित्राणां मित्रपते धेष्ठः ॥

इंद्र त्वं मरुद्भिः सं वदस्वाध प्राशान ऋतुथा हवींषि ॥ ५ ॥

त्वं ईशिषे वसुऽपते वसूनां त्वं मित्राणां मित्रऽपते धेष्ठः ।

इंद्र त्वं मरुत्ऽभिः सं वदस्व अध प्र अशान ऋतुऽथा हवींषि ॥ ५ ॥

हे सकल सिद्धिंच्या प्रभो इंद्रा, सर्व स्पृहणीय लाभांचा स्वामी तूंच आहेस. हे सर्व मित्रांमध्यें वरिष्ठ अशा इंद्रा, अत्यंत उदार असाहि एक तूंच; तर आतां मरुतांशी तूं प्रेमानें भाषण कर, आणि आम्ही अर्पण केलेले हविर्भाग योग्यवेळीं येऊन ग्रहण कर. ॥ ५ ॥

ॐ तत् सत्

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १७१ (मरुतः सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : मरुतः - छंद - त्रिष्टुभ्

प्रति॑ व ए॒ना नम॑सा॒हमे॑मि सू॒क्तेन॑ भिक्षे सु॒म॒तिं तु॒राणा॑म् ॥

र॒रा॒णता॑ मरुतो वे॒द्याभि॒र्नि हेळो॑ ध॒त्त वि मु॑च॒ध्व॒मश्वा॑न् ॥ १ ॥

प्रति वः एना नमसा अहं एमि सुऽउक्तेन भिक्षेए सुऽमतिं तुराणाम् ।

रराणता मरुतः वेद्याभिः नि हेळः धत्त वि मुचध्वं अश्वान् ॥ १ ॥

तुम्हाला अनेक प्रणिपात करून मी तुमच्याकडे आलो आहे. भक्तांकरितां तुम्ही तातडीने धांव घेतां, तेव्हां तुमचे गुणानुवाद गाऊन तुमच्या कृपेची भिक्षा मी मागत आहे. मरुतांनो, हे सर्व ध्यानीं आणून तुम्हीं मजवर प्रसन्न झालां आहांत तर राग सोडा आणि आपल्या रथाचे घोडे मोकळे करा. ॥ १ ॥

एष वः स्तोमो मरुतो नमस्वान्हृदा तष्टो मनसा धायि देवाः ॥

उपेमा यात मनसा जुषाणा यूयं हि ष्ठा नमस इद्वृधासः ॥ २ ॥

एषः वः स्तोमः मरुतः नमस्वान् हृदा तष्टः मनसा धायि देवाः ।

उप ईं आ यात मनसा जुषाणाः यूयं हि स्थ नमसः इत् वृधासः ॥ २ ॥

मरुतांनो, हें नमस्कृति पुरःसर म्हटलेलें स्तोत्र तुमचेंच आहे. आणि तें मी अंतःकरणपूर्वक व्यवस्थेनें जुळून म्हटलें आहे. तर त्याचा तुम्हीही मनःपूर्वक स्वीकार करा. खऱ्या कळवळ्यानें त्याचा आस्वाद घेण्याकरितां इकडे या कारण तुमच्या सेवकाची तुम्ही नेहमी अभिवृद्धिच करीत असतां. ॥ २ ॥

स्तुतासो नो मरुतो मृळयन्तूत स्तुतो मघवा शम्भविष्ठः ॥

ऊर्ध्वा नः सन्तु कोम्या वनान्यहानि विश्वा मरुतो जिगीषा ॥ ३ ॥

स्तुतासः नः मरुतः मृळयन्तु उत स्तुतः मघऽवा शंऽभविष्ठः ।

ऊर्ध्वा नः सन्तु कोम्या वनानि अहानि विश्वा मरुतः जिगीषा ॥ ३ ॥

मरुतांचे स्तवन आम्हीं यथामति केलेलें आहे. तर ते आम्हांवर कृपा करोत. सर्वांचे अत्यंत कल्याण करणारा इंद्रही, त्याची स्तुति केल्यामुळें आम्हांवर प्रसन्न होवो. आम्हांला विजयश्रीची लालसा आहे, म्हणून हे मरुतांनो, तुमच्या भाल्यांची रमणीय वृक्षराजी आमच्या करितां सदैव सज्ज असो. ॥ ३ ॥

अस्मादहं तविषादीषमाण इंद्राद्भिया मरुतो रेजमानः ॥

युष्मभ्यं हव्या निशितान्यासन्तान्यारे चकृमा मृळता नः ॥ ४ ॥

अस्मात् अहं तविषात् ईषमाणः इंद्रात् भिभिया मरुतः रेजमानः ।

युष्मभ्यं हव्या निऽशितानि आसन् तानि आरे चकृम मृळत नः ॥ ४ ॥

मरुतांनो ह्या महा जाज्वल्य इंद्रापासून मी भयानें थरथर कांपतच दूर निघून गेलों. तुमच्या करितां हविरन्नाची अगदीं तयारी केली होती, परंतु तीं हविरन्ने आम्हांला दूर सारावी लागली ह्या बद्दल आम्हांला क्षमा करा. ॥ ४ ॥

येन॒ माना॑सश्चि॒तय॑न्त उ॒स्रा व्यु॑ष्टिषु॒ शव॑सा॒ शश्व॑तीनाम् ॥

स नो॑ म॒रुद्भि॑र्वृषभ॒ श्रवो॑ धा उ॒ग्र उ॒ग्रेभि॒ः स्थवि॑रः सहो॒दाः ॥ ५ ॥

येन मानासः चितयन्ते उस्राः विऽउष्टिषु शवसा शश्वतीनाम् ।

स नो मरुत् ऽभिः वृषभ श्रवः धाः उग्रः उग्रेभिः स्थविरः सहऽदाः ॥ ५ ॥

हे इंद्रा, सनातन उषा आपल्या सामर्थ्याने प्रकाशल्या असतां तुझ्या कृपेनेंच त्या देदीप्यमान देवींचे दर्शन मानपुत्रांना घडलें, तर हे मनोरथ पूरका, हे पराक्रमी इंद्रा, तूं पुराण पुरुष आहेस, धैर्यबल देणाराही तूंच आहेस, तर भयंकर असा तूं भयंकर अशाच मरुतांना बरोबर घेऊन येऊन आम्हांला सुयश दे. ॥ ५ ॥

त्वं पा॑हीन्द्र॒ सही॑यसो॒ नॄन्भवा॑ म॒रुद्भि॒रव॑यातहेळाः ॥

सुप्रकेतेभिः सासहिर्दधानो विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥ ६ ॥

त्वं पाहि इन्द्र सहीयसः नॄन् भव मरुत्भिः अवयातऽहेळाः ।

सुऽप्रकेतेभिः ससहिः दधानो विद्याम एषं वृजनं जीरदानुम् ॥ ६ ॥

हे इंद्रा, आपल्या बलशाली वीरांचे (मरुतांचे) रक्षण कर आणि मरुतांच्या वरचा राग अगदीं सोडून दे. त्या अत्यंत बुद्धिमान मरुतांचा तूं विजयशाली प्रभु आहेस असे सर्व जग समजतें, तर तात्काळ फलद्रूप होणारा मरुतांचा तुझा आसरा आम्हांस लाभेल असें कर. ॥ ६ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १७२ (इंद्र सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : इंद्रः - छंद - गायत्री

चि॒त्रो वो॑ऽस्तु॒ याम॑श्चि॒त्र ऊ॒ती सु॒दानवः । म॒रु॑तो॒ अहि॑भानवः ॥ १ ॥

चित्रः वोः अस्तु यामः चित्रः ऊती सुऽदानवः ।

मरुतः अहिऽभानवः ॥ १ ॥

हे दानशूर मरुतांनो, तुमचें आगमन आश्चर्यकारक होवो. हे नागांप्रमाणें चंचल किरणांच्या मरुतांनो तें आगमन तुमच्या सामर्थ्याच्या योगानें आश्चर्यप्रद होवो. ॥ १ ॥

आ॒रे सा वः॑ सुदानवो॒ म॑रुत ऋञ्ज॒ती शरुः॑ । आ॒रे अश्मा॒ यमस्य॑थ ॥ २ ॥

आरे सा वः सुऽदानवः मरुतः ऋञ्जती शरुः ।

आरे अश्मा यं अस्यथ ॥ २ ॥

हे दानशूर मरुतांनो, शत्रूच्या शरीरांत नीट घुसणारें तें तुमचें घातक शस्त्र आम्हांपासून दूर असो. तुम्हीं फेंकून मारतां तो तुमचा अशनी पाषाणही दूर असो. ॥ २ ॥

तृणस्कन्दस्य नु विशः परि वृङ्क्तज सुदानवः । ऊर्ध्वान्नः कर्त जीवसे ॥ ३ ॥

तृणऽस्कन्दस्य नु विशः परि वृङ्क्त सुऽदानवः ।

ऊर्ध्वान् नः कर्त जीवसे ॥ ३ ॥

हे दानशूर मरुतांनो, तृणस्कंदाच्या लोकांना चोहोंकडून घेरून कापून काढा. आम्हीं यश मिळवून जगावें म्हणून आमची उन्नति करा. ॥ ३ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १७३ (इंद्र सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : इंद्रः - छंद - त्रिष्टुभ्

गायत्साम नभन्यं१ यथा वेरर्चाम तद्वावृधानं स्वर्वत् ॥

गावौ धेनवौ बर्हिष्यदब्धा आ यत्सद्मानं दिव्यं विवासान् ॥ १ ॥

गायत् साम नभन्यं यथा वेः अर्चाम तत् ववृधानं स्वःऽवत् ।

गावः धेनवः बर्हिषि अदब्धा आ यत् सद्मानं दिव्यं विवासान् ॥ १ ॥

हे इंद्रा, जेणेंकरून तूं संतोष पावशील अशा प्रकारचे, आकाश दुमदुमून टाकणारे सामगायन (उद्धाता) गाईल, आणि स्वर्गीय प्रकाशाप्रमाणें लोकोत्तर व जिकडे तिकडे भरून जाणारे असें स्तोत्र आम्हींही मोठ्यानें म्हणूं. तूं आपल्या अमूर्त स्वरूपानें येऊन येथें दर्भासनावर बसतोस त्यावेळीं, ज्यांना कोणीही उपद्रव देऊं शकत नाहीं अशा तेजोरूप धेनु तुझ्या सेवेस तत्पर असतात. ॥ १ ॥

अर्चद्वृषा वृषभिः स्वेदुहव्यैर्मृगो नाश्नो अति यज्जुगुर्यात् ॥

प्र मन्दुयुर्मनां गूर्त होता भरते मर्यो मिथुना यजत्रः ॥ २ ॥

अर्चद् वृषा वृषऽभिः स्वऽइदुहव्यैः मृगः न अश्नः अति यत् जुगुर्यात् ।

प्र मन्दयुः मनां गूर्त होता भरते मर्यः मिथुना यजत्रः ॥ २ ॥

वीर्यशाली पुरोहित वीर्यशाली अशाच आचार्यांसह ताजी ऊन ऊन हविरन्नें तूं एखाद्या क्षुधित सिंहा प्रमाणें एकदम ग्रहण करावींस म्हणून तुला समर्पण करून तुझी उपासना करीत असतो. सर्व श्रेष्ठ देवा, यज्ञ-होता उल्लसित मनानें, आणि सन्मानीय यजमान पत्निसहित तुजला स्तवनानें संतुष्ट करतो. ॥ २ ॥

नक्ष॒द्धोता॒ परि॒ सद्म॑ मि॒ता यन्भर॒द्गर्भ॒मा श॒रदः॑ पृथि॒व्याः ॥

क्रन्द॒दश्वो॒ नय॑मानो रु॒वद्गौर॒न्तर्दू॒तो न रोद॑सी चर॒द्वाक् ॥ ३ ॥

नक्षत् होता परि सद्म मिता यत् भरत् गर्भं आ शरदः पृथिव्याः ।

क्रन्दत् अश्वः नयमानः रुवत् गौः अन्तः दूतः न रोदसी इति चरत् वाक् ॥ ३ ॥

इंद्रा, तुझ्य यज्ञासाठीं हा जो आचार्य अग्निच्या तीन प्रदक्षिणा करून परत येतो, तो पृथ्वीवर शरद ऋतूंत उत्पन्न होणाऱ्या फलसंपत्तिला घेऊनच येतो. ह्या शरद ऋतूंतच घोडे वाटेनें जातां जातां खिंकाळत असतात. बैल डुरकत असतात आणि दिव्य वाचा ही एखाद्या दूती प्रमाणें पृथ्वी व आकाश ह्यांच्या दरम्यान घोंटाळत असते. ॥ ३ ॥

ता कु॒र्माष॑तरास्मै॒ प्र च्यौ॒त्नानि॑ देव॒यन्तो॑ भरन्ते ॥

जुजो॑ष॒दिंद्रो॑ द॒स्मव॑र्चा॒ नास॑त्येव॒ सुग्म्यो॑ रथे॒ष्ठाः ॥ ४ ॥

ता कर्म अषऽतरा अस्मै प्र च्यौत्नानि देवऽयन्तः भरन्ते ।

जुजोषत् इंद्रः दस्मऽवर्चा नासत्याऽइव सुग्म्यः रथेऽस्थाः ॥ ४ ॥

ह्या इंद्राला अत्यंत प्रिय असे जे जे पदार्थ आहेत तेच आपण त्याला अर्पण करूं, भाविक जनहि प्रतिभा संपन्न स्तोत्रें त्याच्या प्रित्यर्थ म्हणत आहेतच, तर हा अद्भुत, तेजस्वी इंद्र, त्या पदार्थांचा आणि स्तोत्रांचा प्रीतीनें स्वीकार करो. तो नासत्या प्रमाणेंच भक्ताधीन असून त्यांच्या करितां रथावर अगदीं तयार होऊन बसलेला आहे. ॥ ४ ॥

तमु॑ ष्टु॒हीन्द्रं॒ यो ह॒ सत्वा॒ यः शूरो॑ म॒घवा॒ यो र॑थे॒ष्ठाः ॥

प्र॒ती॒चश्चि॒द्योधी॑या॒न्वृष॑ण्वान्वव॒व्रुष॑श्चि॒त्तम॑सो विह॒न्ता ॥ ५ ॥

तं ऊं इति स्तुहि इंद्रं यः सत्वा यः शूरः मघऽवा यः रथेऽस्थाः ।

प्रतीचः चित् योधीयान् वृषण्ऽवान् ववव्रुषः चित् तमसः विऽहंता ॥ ५ ॥

ह्या इंद्राचेंच स्तवन कर. हा महा सत्ववान, हा शूर, हा अत्यंत उदार व भक्तांकरितां रथारूढ होऊन बसला आहे. सकल कामनापूरक हाच असून कसाही शत्रू ह्याच्या पुढें येवो, त्याच्यापेक्षां हा वरचढ पृथ्वीला चोहोंकडून ग्रासून टाकणाऱ्या अंधःकाराचा नाश करणाराहि हाच आहे. ॥ ५ ॥

प्र यदि॒त्था म॑हि॒ना नृभ्यो॒ अस्त्यरं॒ रोद॑सी क॒क्ष्ये३॑ नास्मै॑ ॥

सं वि॑व्य॒ इंद्रो॑ वृ॒जनं॒ न भूमा॒ भर्ति॑ स्व॒धावाँ॑ ओप॒शमि॑व॒ द्याम् ॥ ६ ॥

प्र यत् इत्था महिना नृऽभ्यः अस्ति अरं रोदसी इति कक्ष्ये३इति न अस्मै ।

सं विव्ये इंद्रः वृजनं न भूम भर्ति स्वधाऽवान् ओपशंऽइव द्याम् ॥ ६ ॥

इंद्र, हा विश्वांतील यच्चावत् शूरांपेक्षां पराक्रमानें खरोखर अतिशयच श्रेष्ठ आहे. हें एवढें विस्तीर्ण क्षितीज, पण तें त्याच्या कंबरबंदालाही पुरणार नाहीं. ह्या स्वप्रतापी इंद्रानें आकाश रूपानें पृथ्वीला कवटाळून धरून नक्षत्रांना आपल्या मस्तकावर शिर्पेंचाप्रमाणें ठेवून दिलेलें आहे. ॥ ६ ॥

सु॒मत्सु॑ त्वा शूर सु॒ताम्मु॑रा॒णं प्र॑प॒थिन्त॑मं परितंस॒यध्यै॑ ॥

स॒जोष॑स॒ इंद्रं॒ मदे॑ क्षो॒णीः सू॒रिं चि॒द्‌ये अ॑नु॒मद॑न्ति॒ वाजैः॑ ॥ ७ ॥

समत्ऽसु त्वा शूर सतां उराणं प्रपथिन्ऽतमं परिऽतंसयध्यै ।

सऽजोषसः इंद्रं मदे क्षोणीः सूरिं चित् ये अनुऽमदन्ति वाजैः ॥ ७ ॥

हे वीरा, तूं सर्व सज्जनांचा पाठिराखा आणि सर्वोत्कृष्ट धुरीण आहेस, तेव्हां संग्रामामध्यें तुला मोठ्या आर्जवानें सहाय्या करितां घेऊन येण्यासाठीं, अत्यंत प्रेमानें एकत्र झालेलें भक्तजन तुज प्रज्ञावंत इंद्राला, यज्ञामध्यें हवि अर्पण करून प्रसन्न करून घेतात. ॥ ७ ॥

ए॒वा हि ते॒ शं सव॑ना समु॒द्र आपो॒ यत्त॑ आ॒सु मद॑न्ति दे॒वीः ॥

विश्वा॑ ते॒ अनु॒ जोष्या॑ भू॒द्‌गौः सू॒रीँश्चि॒द्‌यदि॑ धि॒षा वेषि॒ जना॑न् ॥ ८ ॥

एवा हि ते शं सवना समुद्रे आपः यत् ते आसु मदन्ति देवीः ।

विश्वा ते अनु जोष्या भूत् गौः सूरीन् चित् यदि धिषा वेषि जनान् ॥ ८ ॥

तूं वर्षण केलेल्या दिव्य उदकाच्या धारा ज्याप्रमाणें ह्या भूलोकीं येऊन समुद्रास मोठ्या हर्षानें जाऊन मिळतात, त्याप्रमाणें आम्हीं अर्पण केलेल्या सोमरसाच्या धारा सुद्धां तशाच मोठ्या आनंदानें तुझ्याकडे जातात. ज्ञानी जन काय, किंवा सामान्य जनसमूह काय, सर्वांनाच जर तूं दयार्द्र बुद्धिनें आपलेंसे म्हणतोस तर सर्व जगाची स्तवन वाणी तुझ्याकडेच जावी ह्यांत नवल तें काय ? ॥ ८ ॥

असा॑म॒ यथा॑ सु॒ष॒खाय॑ एन स्वभि॒ष्टयो॑ न॒रां न शंसैः॑ ॥

अस॒द्यथा॑ न॒ इंद्रो॑ वन्दने॒ष्ठास्तु॒रो न कर्म॒ नय॑मान उ॒क्था ॥ ९ ॥

असाम यथा सुऽसखायः एन सुऽअभिष्टयः नरां न शंसैः ।

असत् यथा नः इंद्रः वन्दनेऽस्थाः तुरः नः कर्म नयमानः उक्था ॥ ९ ॥

शूरांच्या अभय वचनांनी उत्तम मित्रच मिळाल्या सारखें होतें. तर अशा प्रकारचे उत्तम मित्र व उत्कृष्ट सहाय्य आम्हांस ह्याच्या कृपेनें मिळालें असें होवो, आणि हा इंद्र त्या चंचल मनाप्रमाणें सर्वगामी खरा परंतु तो आमचें सत्कर्म व स्तोत्र गायन सिद्धीस नेऊन आमच्या उपासनेंतच स्थिर राहील असें घडो. ॥ ९ ॥

विष्प॑र्धसो न॒रां न शंसै॑र॒स्माका॑स॒दिंद्रो॒ वज्र॑हस्तः ॥

मि॒त्रा॒यु॒वो॒ न पू॒र्प॑तिं॒ सुशि॑ष्टौ मध्या॒यु॒व॒ उप॑ शिक्षन्ति य॒ज्ञैः ॥ १० ॥

विऽस्पर्धसः नरां न शंसैः अस्माक असत् इंद्रः वज्रऽहस्तः ।

मित्रऽयुवः न पूःऽपतिं सुऽशिष्टौ मध्यऽयुव उप शिक्षन्ति यज्ञैः ॥ १० ॥

थोर थोर पुरुषांच्या आणि स्पर्धारहित साधुजनांच्या विनंतीस मान देऊन कां होईना, हा वज्रधर इंद्र सर्वथैव आमचा होवो. एखाद्या नगराधिपतीचा राज्यकारभार उत्तम व्यवस्थित चालला आहे, असें पाहून त्याचें प्रेम संपादन करण्याविषयीं उत्सुक असे लोक जसा त्या नगराधिपतीचा गौरव करतात, त्या प्रमाणें ह्या इंद्राच्या अंतःकरण प्रेमाची इच्छा करणारे भक्त त्याला यज्ञ यागानें प्रसन्न करीत असतात. ॥ १० ॥

यज्ञो हि ष्मेन्द्रं कश्चिदृन्धञ्जुहुराणश्चिन्मनसा परियन् ॥

तीर्थे नाच्छा तातृषाणमोको दीर्घो न सिध्रमा कृणोत्यध्वा ॥ ११ ॥

यज्ञः हि स्म इंद्रं कः चित् ऋंध्न् जुहुराणः चित् मनसा परिऽयन् ।

तीर्थे न अच्छ ततृषाणं ओकः दीर्घः न सिध्रं आ कृणोति अध्वा ॥ ११ ॥

कोठें कोठें इंद्राला संतुष्ट करणारा असा यज्ञयाग चालू आहे, तर कोठें कोठें मनाचा चंचल असा भ्रष्ट मनुष्य विनाकारण भटकत फिरतांना दृष्टिस पडत आहे. पहिले कर्म एखाद्या पवित्र प्रवाहाजवळ तान्हेलेल्या वाटसराकरितां बांधलेल्या घराप्रमाणें होय, आणि दुसरे आतुर मनुष्याला लांबचा रस्ता मेटाकुटीस आणतो त्या प्रमाणें निरर्थक होय. ॥ ११ ॥

मो षू णं इन्द्रात्र पृत्सु देवैरस्ति हि ष्मा ते शुष्मिन्नवयाः ॥

महश्चिद्यस्य मीळ्हुषो यव्या हविष्मतो मरुतो वन्दते गीः ॥ १२ ॥

मो इति सु नः इन्द्र अत्र पृत्ऽसु देवैः अस्ति हि स्म ते शुष्मिन् अवऽयाः ।

महः चित् यस्य मीळ्हुषः यव्या हविष्मतः मरुतः वन्दते गीः ॥ १२ ॥

हे इंद्रा आज ह्या युद्ध प्रसंगी तूं आमचा अव्हेर करूं नको. हे देव-परिवेष्टित महा पराक्रमी इंद्रा, हा पहा तुझा हविर्भाग येथें तयार आहे. तूं परम थोर आणि सकल कामना पूरक असा देव, तेव्हां माझे - हवि अर्पणोत्सुक भक्ताचे - वेडे वांकडे बोल, तुझे आणि मरुतांचे गुण संकीर्तन करीत आहेत. ते मान्य करून घे. ॥ १२ ॥

ए॒ष स्तोम॑ इं॒द्र तु॒भ्यं॑म॒स्मे ए॒तेन॑ गा॒तुं ह॑रिवो विदो नः ॥

आ नो॑ ववृत्याः सुवि॒ताय॑ देव वि॒द्यामे॒षं वृ॒जनं॑ जी॒रदा॑नुम् ॥ १३ ॥

एषः स्तोमः इंद्र तुभ्यं अस्मे इति एतेन गातुं हरिऽवः विदः नः ।

आ नः ववृत्याः सुविताय देव विद्याम एषं वृजनं जीरऽदानुम् ॥ १३ ॥

हे इंद्रा, हें आमचे स्तोत्र तुला अर्पण असो, हे हरिदश्व इंद्रा, त्या स्तवनानें प्रसन्न होऊन आम्हांला सन्मार्ग दाखव. देवा ज्यांत आमचें खरें कल्याण आहे, त्याच मार्गाकडे आम्हांला घेऊन जा, म्हणजे तात्काळ फलद्रुप होणारा उत्साह वर्धक असा तुझा आश्रय आम्हाला प्राप्त होईल. ॥ १३ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १७४ (इंद्र सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : इंद्रः - छंद - त्रिष्टुभ्

त्वं राजेन्द्र ये च देवा रक्षा नॄन्पाह्यसुर त्वमस्मान् ॥

त्वं सत्पतिर्मघवा नस्तरुत्रस्त्वं सत्यो वसवानः सहोदाः ॥ १ ॥

त्वं राजा इंद्र ये च देवाः रक्षआ नॄन् पाहि असुर त्वं अस्मान् ।

त्वं सत्ऽपतिः मघऽवा नः तरुत्रः त्वं सत्यः वसवानः सहःऽदाः ॥ १ ॥

इंद्रा, जे देव आहेत त्यांचाही तूं राजा आहेस. आमच्या शूर सैनिकांचें रक्षण कर. तूं सर्व साधुजनांत श्रेष्ठ, औदार्यशाली आणि आमचा तारक आहेस, तूं सत्यस्वरूप, संपत्तिदाता आणि धैर्यदाता आहेस. ॥ १ ॥

दनो॒ विश॑ इंद्र मृ॒ध्रवा॑चः स॒प्त यत्पुरः॒ शर्म॒ शार॑दी॒र्दर्त् ॥

ऋ॒णोर॒पो अ॑नव॒द्यार्णा॒ यूने॑ वृ॒त्रं पु॑रु॒कुत्सा॑य रन्धीः ॥ २ ॥

दनः विशः इंद्र मृध्रऽवाचः सप्त यत् पुरः शर्म शारदीः दर्त् ।

ऋणोः अपः अनवद्य अर्णाः यूने वृत्रं पुरुऽकुत्साय रन्धीः ॥ २ ॥

हे इंद्रा अभद्र भाषणानें आपली जिव्हा विटाळणाऱ्या दुष्ट अधमांचा तूं धुव्वा उडविलास, त्याच वेळेस त्यांच्या निवाऱ्याची जागा जे सात शारद दुर्ग (होते) त्याचाही तूं पार विध्वंस करून टाकलास. हे निष्कलंका, लाटांनी उचंबळणाऱ्या उदकांचे प्रचंड प्रवाह तूं चालू केलेस आणि तुझा भक्त जो तरुण पुरुकुत्स, त्याच्या स्वाधीन त्याच्या शत्रूस करून दिलेंस. ॥ २ ॥

अजा वृतं इंद्र शूरंपत्नीर्वद्यां च येभिः पुरुहूत नूनम् ॥

रक्षो अग्निमशुषं तूर्वयाणं सिंहो न दमे अपांसि वस्तोः ॥ ३ ॥

अज वृतः इंद्र शूरऽपत्नीः द्यां च येभिः पुरुऽहूत नूनम् ।

रक्षो इति अग्निं अशुषं तूर्वयाणं सिंहः न दमे अपांसि वस्तोः ॥ ३ ॥

हे इंद्रा, जगताच्या शत्रूंच्या सैन्याचे धुरीण शूर असून त्यांनी सर्व आकाशगोल व्यापून टाकला आहे. तेव्हां त्यांना तेथून हाकून लाव आणि ज्या अग्निहोत्राचा उच्छेद होऊं नये आणि जें त्वरित फलदायी आहे, त्या आमच्या घरांतील अग्नि होत्राचें व तसेंच इतर उपासनांचे सिंहाप्रमाणे जागरूक राहून रक्षण कर. ॥ ३ ॥

शेषन्नु त इंद्र सस्मिन्योनौ प्रशस्तये पवीरवस्य महना ॥

सृजदर्णांस्यव यद्युधा गास्तिष्ठद्धरी धृषता मृष्ट वाजान् ॥ ४ ॥

शेषन् नु ते इंद्र सस्मिन् योनौ प्रऽशस्तये पवीरवस्य महना ।

सृजत् अर्णांसि अव यत् युधा गाः तिष्ठत् हरी इति धृषता मृष्ट वाजान् ॥ ४ ॥

हे इंद्रा, तुझ्या वज्राच्या नुसत्या कडकडाटानें व त्याच्या झळाळीनेंच ते सर्व जगाचे शत्रू, तुझा महिमा वृद्धिंगत व्हावा म्हणूनच किं काय जागच्या जागींच गतप्राण होऊन पडले. पहा ह्या इंद्रानें युद्ध करून दिव्योदकाचे कल्लोळ मोकळे करून दिले, प्रकाश धेनूहि मुक्त केल्या, आणि आपल्या अश्वांवर आरूढ होऊन तडाक्यासरशीं दिव्य सामर्थ्यें भक्तास प्राप्त करून दिलीं. ॥ ४ ॥

वह॒ कुत्स॑मिंद्र॒ यस्मिं॑ञ्चा॒कन्त्स्यू॑म॒न्यू ऋ॒ज्रा वात॒स्याश्वा॑ ॥

प्र सूर॑श्च॒क्रं वृ॑हताद॒भीके॑ऽ॒भि स्पृधो॑ यासिष॒द्वज्र॑बाहुः ॥ ५ ॥

वह कुत्सं इंद्र यस्मिन् चाकन् स्यूमन्यू इति ऋज्रा वातस्य अश्वा ।

प्र सूरः चक्रं वृहतात् अभीके अभि स्पृधः यासिषत् वज्रबाहुः ॥ ५ ॥

हे इंद्रा, कुत्स नांवाच्या ज्या भक्तावर तूं अत्यंत प्रेम करतोस त्याच्याकडे वायूचे सरळमार्गी व एकसारखे भरधांव धांवणारे घोडे घेऊन ये. उषःकालीं सूर्य आपला एक चाकी रथ आमचेकडे आणो. आणि वज्रधर इंद्र आपला मोर्चा पातकी शत्रूकडे फिरवो. ॥ ५ ॥

ज॒घ॒न्वाँ इं॑द्र मि॒त्रेरू॑ञ्चो॒दप्र॑वृद्धो हरिवो॒ अदा॑शून् ॥

प्र ये पश्य॑न्नर्य॒मणं॒ सचा॒योस्त्वया॑ शू॒र्ता वह॑माना॒ अप॑त्यम् ॥ ६ ॥

जघन्वान् इंद्र मित्रेरून् चोदऽप्रवृद्धः हरिऽवः अदाशून् ।

प्र ये पश्यन् अर्यमणं सचा आयोः त्वया शूर्ताः वहमानाः अपत्यम् ॥ ६ ॥

हे हरिदश्व इंद्रा, सज्जनांना प्रेरणा करणारा तूं, अशी तुझी प्रख्याती आहे, म्हणून तुझ्या भक्तांना पीडा करणारे व दानधर्म पराङ्मुख असे जे जे दुष्ट होते, त्यांचा तूं संहार करून टाकलास. हे देवा, कोणाचेंच प्रभुत्व मान्य न करणाऱ्या त्या दुष्टांना जेव्हां तूं प्रथम बाजूस फेंकून देऊन आपटलेंस त्याच वेळेस प्राणिमात्राचा पाठिराखा तूं आहेस, ही गोष्ट त्यांच्या ताबडतोब प्रत्ययास आली. ॥ ६ ॥

रपत्कविरिंद्रार्कसातौ क्षां दासायोपबर्हणीं कः ॥

करत्तिस्रो मघवा दानुचित्रा नि दुर्योणे कुयवाचं मृधि श्रेत् ॥ ७ ॥

रपत् कविः इंद्र अर्कऽसातौ क्षां दासाय उपऽबर्हणीं करिति कः ।

करत् तिस्रः मघऽवा दानुऽचित्राः नि दुर्योणे कुयवाचं मृधि श्रेत् ॥ ७ ॥

हे इंद्रा, काव्यस्फूर्तीच्या प्राप्तिसाठीं ज्ञानी कवींनी तुझे यथार्थ वर्णन केलें कीं, अधार्मिक दुष्टांना तूं भूमी हेंच आंथरूण पांघरूण करून दिलेंस त्या परम कारुणिक प्रभूनें तिन्ही लोक आपल्या औदार्यानें अद्भुत रीतीनें मंडित केले आणि रणांगणावर युद्ध करून कुयवाच् ह्याला जमीनदोस्त करून टाकलेंस. ॥ ७ ॥

सना ता तं इंद्र नव्या आगुः सहो नभोऽविरणाय पूर्वीः ॥

भिनत्पुरो न भिदो अदेवीर्ननमो वधरदेवस्य पीयोः ॥ ८ ॥

सना ता ते इंद्र नव्याः आ अगुः सहः नभः अविऽरणाय पूर्वीः ।

भिनत् पुरः न भिदः अदेवीः ननमः वधः अदेवस्य पीयोः ॥ ८ ॥

इंद्रा, तुझे ते पुरातन काळचे पराक्रम नवीन कवींनीही गाइले आहेत. युद्धें मुळींच होऊं देऊं नयेत, म्हणून तूं सर्व पातकी क्रूरांचा कायमचा निःपात करून टाकलास. ईश्वर-भक्तिहीन दुष्टांची सबंध जात व त्यांचे दुर्ग ह्या सर्वांचा उच्छेद केलास आणि ईश्वरनिंदक द्वेष्ट्यांच्या मारक शस्त्रांचे तुकडे करून टाकलेस. ॥ ८ ॥

त्वं धुनिरिंद्र धुनिमतीरृणोरपः सीरा न स्रवन्तीः ॥

प्र यत्समुद्रमति शूर पर्षि पारया तुर्वशं यदुं स्वस्ति ॥ ९ ॥

त्वं धुनिः इंद्र धुनिमतीः ऋणोः अपः सीराः न स्रवन्तीः ।

प्र यत् समुद्रं अति शूर पर्षि पारय तुर्वशं यदुं स्वस्ति ॥ ९ ॥

इंद्रा, तुझ्या गर्जनेबरोबर सर्व जग थरथर कांपतें. धुनि नामक राक्षसानें अडवून धरलेल्या दिव्य उदक धारा तूं अशा रीतीनें मोकळ्या करून टाकल्यास कीं जणों काय नद्यांचे प्रचंड प्रवाहचे प्रवाहच कोसळत आहेत. हे शूरा

आकाशरूप समुद्राच्याही पलिकडे तूं सहज निघून जातोस; तर आपल्या बरोबर तुर्वश आणि यदु ह्या तुझ्या भक्तांनाही पार ने. ॥ ९ ॥

त्वमस्माकमिंद्र विश्वध स्या अवृकतमो नरां नृपाता ॥

स नो विश्वासां स्पृधां सहोदा विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥ १० ॥

त्वं अस्माकं इंद्र विश्वध स्याः अवृकऽतमः नरां नृऽपाता ।

सः नः विश्वासां स्पृधां सहःऽदाः विद्याम एषं वृजनं जीरदानुम् ॥ १० ॥

हे इंद्रा, तूं सर्वतोपरी आमचा हो. कोणाही निरपराध्याला यत्किंचित्हि न दुखवितां तूं प्रेमानें सर्व मनुष्यांचे पालन करतोस तर आमच्या एकूण एक शत्रूंस तूं आमच्या हांतून पादाक्रांत कर म्हणजे तात्काळ फलद्रूप होणाऱ्या तुझ्या उत्साह वर्धक आश्रयानें आम्हीं राहूं. ॥ १० ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १७५ (इंद्र सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : इंद्रः - छंद - अनुष्टुप्, त्रिष्टुभ्

मत्स्यपायि ते महः पात्रस्येव हरिवो मत्सरो मदः ॥

वृषा ते वृष्ण इंदुर्वाजी सहस्रसातमः ॥ १ ॥

मत्सि अपायि ते महः पात्रस्यऽइव हरिऽवः मत्सरः मदः ।

वृषा ते वृष्णे इंदुः वाजी सहस्रऽसातमः ॥ १ ॥

हे इंद्रा तूं उल्लसित हो. हा हर्षकर आणि हर्षरूप सोमरस, तुझें तेजच असा हा सोमरस तूं यज्ञ पात्रांतून प्राशन केला आहेस, प्रमोद-दायक ओजस्वी आणि असंख्य जय मिळवून देणारा हा वीर्यवान् सोमरस तुज वीर्यवंतालाच ग्रहण करण्यास अगदीं योग्य आहे. ॥ १ ॥

आ नस्ते गन्तु मत्सरो वृषा मदो वरेण्यः ॥

स॒हावाँ॑ इंद्र सान॒सिः पृ॑तना॒षाळम॑र्त्यः ॥ २ ॥

आ नः ते गन्तु मत्सरः वृषा मदः वरेण्यः ।

सहऽवान् इंद्र सानसिः पृतनाषाट् अमर्त्यः ॥ २ ॥

हर्षवर्धक, वीर्यवान्, अत्युत्कृष्ट आणि तीव्र असा सोमरस, हे इंद्रा, आमचा हा अभीष्टदायक शत्रुजित् आणि अमर सोमरस तुला जाऊन पोहोंचो. ॥ २ ॥

त्वं हि शूरः॒ सनि॑ता चो॒दयो॒ मनु॑षो॒ रथ॑म् ॥

स॒हावा॒न् दस्यु॑मव्र॒तमोषः॒ पात्रं॒ न शो॒चिषा॑ ॥ ३ ॥

त्वं हि शूरः सनिता चोदयः मनुषः रथम् ।

सहऽवान् दस्युं अव्रतं ओषः पात्रं न शोचिषा ॥ ३ ॥

तूं खरोखर दानशूर वीर आहेस तर मज दीन मानवाचा मनोरथ तूं पूर्ण कर. तूं शत्रूंना जिंकणारा, तेव्हां अधार्मिक दस्यूंना मातीच्या भांड्याप्रमाणें आपल्या तेजानें भाजून काढ. ॥ ३ ॥

मुषाय सूर्यं कवे चक्रमीशान ओजसा ।

वह शुष्णाय वधं कुत्सं वातस्याश्वैः ॥ ४ ॥

मुषाय सूर्यं कवे चक्रं ईशानः ओजसा ।

वह शुष्णाय वधं कुत्सं वातस्य अश्वैः ॥ ४ ॥

हे सर्वज्ञा, तूं जगाचा शास्ता आहेस. आपल्या ईश्वरी सामर्थ्यानें सूर्याच्या रथाचें एक चाक काढून घेऊन वायुरूप अश्वांच्या योगानें कुत्साला आणि शुष्णाच्या मृत्यूला अशा दोघांनाही एकदमच शुष्णाकडे घेऊन जा. ॥ ४ ॥

शुष्मिन्तमो हि ते मदो द्युम्निन्तम उत क्रतुः ।

वृत्रघ्ना वरिवोविदा मंसीष्ठा अश्वसातमः ॥ ५ ॥

शुष्मिन्ऽतमः हि ते मदः द्युम्निन्ऽतमः उत क्रतुः ।

वृत्रऽघ्ना वरिवःऽविदा मंसीष्ठाः अश्वऽसातमः ॥ ५ ॥

खरोखर तुझा आनंद पराकाष्ठेचा ओजस्वी, आणि तुझें कर्तृत्व अत्यंत लोकोत्तर असतें, म्हणूनच आपल्या शत्रुविनाशक आणि परमसुखदायक पराक्रमाच्या योगानें व्यापक असें सामर्थ्य प्राप्त करून येणारा तूं अशी वाखाणणी सर्वतोमुखी झालेली आहे. ॥ ५ ॥

यथा̱ पूर्वे॑भ्यो जरि̱तृभ्य॑ इंद्र̱ मय॑ इ̱वापो̱ न तृष्य॑ते ब̱भूथ॑ ॥

ताम॑नु त्वा नि̱विदं॑ जोहवीमि वि̱द्यामे̱षं वृ̱जनं॑ जी̱रदा॑नुम् ॥ ६ ॥

यथा पूर्वेभ्यः जरितृऽभ्यः इंद्र मयःऽइव आपः न तृष्यते बभूथ ।

तां अनु त्वा निऽविदं जोहवीमि विद्याम एषं वृजनं जीरदानुम् ॥ ६ ॥

हे इंद्रा, तान्हेने व्याकूळ झालेल्यास जसें पाणी, त्याप्रमाणेंच प्राचीन काळच्या सद्‍भक्तास तूं आनंदप्रदच झालास, तर अशाच प्रकारच्या पुरातन "निविद्" स्तोत्रानें मी ही तुझा धांवा करीत आहे, तर तात्काळ फलद्रूप होणारा व उत्साहप्रद असा तुझा आश्रय आम्हांला प्राप्त होईल असें कर. ॥ ६ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १७६ (इंद्र सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : इंद्रः - छंद - अनुष्टुप्, त्रिष्टुभ्

मत्सि॑ नो॒ वस्य॑ऽइष्टय॒ इंद्र॑मिंदो॒ वृषा वि॑श ॥

ऋ॒घा॒यमा॑ण इन्वसि॒ शत्रु॒मन्ति॒ न विं॑दसि ॥ १ ॥

मत्सि नः वस्यःऽइष्टये इंद्रं इंदो इति वृषा आ विश ।

ऋघायमाणः इन्वसि शत्रुं अंन्ति न विंदसि ॥ १ ॥

हे आल्हादकारक सोमरसा, परम सुखाची प्राप्ति आम्हांला व्हावी म्हणून तूं इंद्रास हर्ष उत्पन्न कर. तूंही वीरच आहेस तर त्या वीराच्याच आंगी प्रविष्ट हो. इंद्रा तूं क्रोध भरानें थरारून चाल करून जातोस तोंच एकही शत्रू तुझ्या आसपास ठरेल असा तुला सांपडत नाहीं. ॥ १ ॥

तस्मि॒न्ना वे॑शया॒ गिरो॒ य एक॑श्चर्षणी॒नाम् ॥

अनु॑ स्व॒धा यमु॒प्यते॒ यवं॒ न चर्कृ॑ष॒द्वृ॒दषा॑ ॥ २ ॥

तस्मिन् आ वेशय गिरः यः एकः चर्षणीनाम् ।

अनु स्वधा यं उप्यते यवं न चर्कृषत् वृषा ॥ २ ॥

जो इंद्र सर्व प्राणिमात्रांचा एकच प्रभु होय, त्याच्याच ठिकाणी हे मना, माझ्या स्तवनवाणी रंगून जातील असें कर. बैलांच्या नांगरणीच्या अनुरोधानें जसें धान्य पेरतात, त्याप्रमाणें त्याच्या इच्छेस अनुसरून जीवांचे कर्म बीज पेरलें जात असतें. ॥ २ ॥

यस्य॒ विश्वा॑नि॒ हस्त॑योः॒ पञ्च॑ क्षिती॒नां वसु॑ ॥

स्पा॒शय॑स्व॒ यो अ॑स्म॒ध्रुग्दि॒व्येवा॒शनि॑र्जहि ॥ ३ ॥

यस्य विश्वानि हस्तयोः पञ्च क्षितीनां वसु ।

स्पाशयस्व यः अस्मऽध्रुक् दिव्याऽइव अशनिः जहि ॥ ३ ॥

पांचही लोकांचे प्राप्तव्य सर्वस्व तुझ्याच हातांत आहे, तर आमच्या द्वेष्ट्याला हुडकून काढ आणि विद्युल्लतेच्या धक्यानें मारल्याप्रमाणें त्यास मारून टाक. ॥ ३ ॥

असु॑न्वन्तं समं जहि दू॒णाशं॒ यो न ते॒ मयः॑ ॥

अ॒स्मभ्य॑मस्य॒ वेद॑नं द॒द्धि सू॒रिश्चि॑दोहते ॥ ४ ॥

असुन्वन्तं समं जहि दुःनशं यः न ते मयः ।

अस्मभ्यं अस्य वेदनं दद्धि सूरिः चित् ओहते ॥ ४ ॥

जो तुला सोम अर्पण करून तुझी भक्ति करीत नाहीं, जो तुला तुझी भक्ति करून आनंद देत नाहीं व ज्याचा सुगावा सुद्धां कोणास लागत नाहीं अशा प्रत्येक अभक्ताचा एकदम संव्हार करून, त्यांच्या ज्या कांही युक्त्या असतील त्या आम्हांस कळूं दे, आणि असें तूं करशील असा मला - तुझ्या भक्ताला पूर्ण भरंवसा आहे. ॥ ४ ॥

आवो यस्यं द्विबर्हसोऽर्केषुं सानुषगसंत् ॥

आजाविंद्रंस्येन्दो प्रावो वाजेषु वाजिनंम् ॥ ५ ॥

आवः यस्य द्विऽबर्हसः अर्केषु सानुषक् असत् ।

आजौ इंद्रस्य इन्दो इति प्र आवः वाजेषु वाजिनम् ॥ ५ ॥

ज्या एका लोकद्वय-विख्यात पुरुषाचा महिमा स्तोत्रद्वारें एकसारखा विस्तार पावत आहे, त्याला तूं सहाय्य केलेंस, इंद्राला अर्पण केलेल्या हे मनोहरकांति सोमरसा संग्रामांत व सामर्थ्य कसोटीस लावणाऱ्या युद्धांतही तूं ओजस्वी योद्ध्यांचे संरक्षण कर. ॥ ५ ॥

यथा पूर्वेभ्यो जरितृभ्यं इंद्र मयं इवापो न तृष्यंते बभूथं ॥

तामनु त्वा निविदं जोहवीमि विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥ ६ ॥

यथा पूर्वेभ्यः जरितृऽभ्यः इंद्र मयःऽइव आपः न तृष्यते बभूथ ।

तां अनु त्वा निऽविदं जोहवीमि विद्याम एषं वृजनं जीरदानुम् ॥ ६ ॥

हे इंद्रा, तान्हेने व्याकूळ झालेल्यास जसें पाणी, त्याप्रमाणेंच प्राचीन काळच्या सद्भक्तास तूं आनंदप्रदच झालास, तर अशाच प्रकारच्या पुरातन "निविद्" स्तोत्रानें मी ही तुझा धांवा करीत आहे, तर तात्काळ फलद्रूप होणारा व उत्साहप्रद असा तुझा आश्रय आम्हांला प्राप्त होईल असें कर. ॥ ६ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १७७ (इंद्र सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : इंद्रः - छंद - त्रिष्टुभ्

आ च॑र्षणि॒प्रा वृ॑ष॒भो जना॑नां॒ राजा॑ कृष्टी॒नां पु॑रुहू॒त इंद्रः॑ ॥

स्तु॒तः श्र॑व॒स्यन्नव॒सोप॑ म॒द्रिग्यु॒क्त्वा हरी॒ वृष॒णा या॑ह्य॒र्वाङ् ॥ १ ॥

आ चर्षणिऽप्रा वृषभः जनानां राजा कृष्टीनां पुरुऽहूतः इंद्रः ।

स्तुतः श्रवस्यन् अवसा उप मद्रिक् युक्त्वा हरी इति वृषणा आ याहि अर्वाङ् ॥ १ ॥

तूं इंद्र जगद्व्यापक, जन मनोरथपूरक, सर्व लोकांचा प्रभू आणि असंख्य लोक ज्याचा धांवा करतात असा आहेस. तुझें स्तवन आम्ही यथामति केलें आहे तर आपले उमदे घोडे रथाला जोडून आपल्या उत्तमोत्तम प्रसादानिशीं माझी विनवणी ऐकण्याकरितां इकडे भूलोकीं मजजवळ ये. ॥ १ ॥

ये ते॒ वृष॑णो वृष॒भास॑ इंद्र ब्रह्म॒युजो॒ वृष॑रथासो॒ अत्याः॑ ॥

ताँ आ ति॑ष्ठ॒ तेभि॒रा या॑ह्य॒र्वाङ् हवा॑महे त्वा सु॒त इं॑द्र॒ सोमे॑ ॥ २ ॥

ये ते वृषणः वृषभासः इंद्र ब्रह्मऽयुजः वृषऽरथासः अत्याः ।

तान् आ तिष्ठ तेभिः आ याहि अर्वाङ् हवामहे त्वा सुते इंद्र सोमे ॥ २ ॥

इंद्रा, तुझे वेगवान अश्व, वीर्यवान्, नामांकित आणि तुजसारख्या वीर श्रेष्ठाच्या रथास जोडण्याला योग्य असेच आहेत; तर भक्तांची प्रार्थना ऐकण्याबरोबर ते रथास आपोआप जोडले जातात. तर हे इंद्रा, त्या रथावर आरोहण करून आमच्याकडे भूलोकीं ये. सोमरस सिद्ध करून आम्हीं तुला आदरानें बोलावीत आहोंत. ॥ २ ॥

आ तिष्ठ रथं वृषणं वृषा ते सुतः सोमः परिषिक्ता मधूनि ॥

युक्त्वा वृषभ्यां वृषभ क्षितीनां हरिभ्यां याहि प्रवतोप मद्रिक् ॥ ३ ॥

आ तिष्ठ रथं वृषणं वृषा ते सुतः सोमः परिऽसिक्ता मधूनि ।

युक्त्वा वृषऽभ्यां वृषभ क्षितीनां हरिऽभ्यां याहि प्रऽवता उप मद्रिक् ॥ ३ ॥

तूं इष्ट सिद्धींची जणों वृष्टीच करणारा आहेस, तेव्हां तूं भक्तमनोरथपूरक अशाच रथावर आरूढ हो. हा तुजकरितां सोमरस तयार करून त्यांत अनेक स्वादिष्ट पदार्थ घातले आहेत तर हे सकल लोक श्रेष्ठा, तूं आपले उमदे घोडे जोडून खाली (या भूलोकीं) मजकडे ये. ॥ ३ ॥

अ॒यं य॒ज्ञो दे॑व॒या अ॒यं मि॒येध॑ इ॒मा ब्रह्मा॑ण्य॒यमिं॑द्र॒ सोमः॑ ॥

स्ती॒र्णं ब॒र्हिरा तु शं॑क्र॒ प्र या॑हि॒ पिबा॑ नि॒षद्य॒ वि मुं॑चा॒ हरी॑ इ॒ह ॥ ४ ॥

अयं यज्ञः देवऽयाः अयं मियेधः इमा ब्रह्माणि अयण् इंद्र सोमः ।

स्तीर्णं बर्हिः आ तु शक्र प्र याहि पिब निऽसद्य वि मुच हरी इति इह ॥ ४ ॥

हा येथें देवमान्य असा यज्ञ सुरू आहे, इंद्रा, हा येथें मेध्य पशु, हीं तुज प्रित्यर्थ प्रार्थना स्तोत्रें, हा सोमरस आणि हे येथें तुजकरितां दर्भासन आंथरलें आहे. तर हे सर्व समर्था, इकडे अगत्य ये, सोमरस ग्रहण करून जरा आराम कर, आणि येथें घोडे सोडून त्यांना विश्रांति दे. ॥ ४ ॥

ओ सुष्टु॑त इंद्र याह्य् अ॒र्वाङ्उप॒ ब्रह्मा॑णि मा॒न्यस्य॑ का॒रोः ॥

वि॒द्याम॒ वस्तो॒रव॑सा गृ॒णन्तो॑ वि॒द्याम॒षं वृ॒जनं॑ जी॒रदा॑नुम् ॥ ५ ॥

ओ इति सुऽस्तुतः इंद्र याहि अर्वाङ् उप ब्रह्माणि मान्यस्य कारोः ।

विद्याम वस्तोः अवसा गृणन्तः विद्याम एषं वृजनं जीरदानुम् ॥ ५ ॥

हे इंद्रा, तुझें स्तवन यथामति उत्तम रीतीनें झालेले आहे. तर ह्या सन्मान्य कवीच्या प्रार्थना-स्तोत्रांकडे खालीं भूलोकीं ये. सुप्रभाती तुझें स्तवन करणाऱ्या आम्हां भक्तांस तुझ्या कृपेनें इच्छित लाभ होवो. आम्हांस तात्काळ फलद्रुप होणारा व उत्साहप्रद असा तुझा आश्रय प्राप्त होवो. ॥ ५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १७८ (इंद्र सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : इंद्रः - छंद - त्रिष्टुभ्

यद्ध स्या त इंद्र श्रुष्टिरस्ति यया बभूथ जरितृभ्य ऊती ॥

मा नः कामं महयन्तमा धग्विश्वा ते अश्यां पर्याप आयोः ॥ १ ॥

यत् ह स्या ते इंद्र श्रुष्टिः अस्ति यया बभूथ जरितृऽभ्यः ऊती ।

मा नः कामं महयन्तं आ धक् विश्वा ते अश्यां परि आपः आयोः ॥ १ ॥

हे इंद्रा, आपल्या सज्जनांचे संरक्षण करण्यास ज्याच्यामुळें तूं प्रवृत्त होतोस, अशा प्रकारच्या भक्तांची विनवणी ऐकून घेण्याचा कळवळा तुझ्या मध्यें वसत आहे, म्हणून आम्हीं विनवितो किं आमच्या उच्च मनोवृत्ति तूं जाळून टाकूं नकोस. आणि उपासनानिष्ठ मनुष्यानें करावयाचीं सर्व कर्तव्यें माझ्या हातून तुझ्या प्रित्यर्थ घडतील असें कर. ॥ १ ॥

न घा॒ राजेन्द्र॒ आ द॑भन्नो॒ या नु स्वसा॑रा कृ॒णव॑न्त॒ योनौ॑ ॥

आप॑श्चिदस्मै सु॒तुका॑ अवे॒षन्गम॑न्न॒ इंद्रः॑ स॒ख्या वय॑श्च ॥ २ ॥

न घ राजा इन्द्रः आ दभत् नः या नु स्वसारा कृणवन्त योनौ ।

आपः चित् अस्मै सुऽतुकाः अवेषन् गमत् नः इंद्रः सख्या वयः च ॥ २ ॥

दोघी बहिणींनी आमच्याकरितां आपआपल्या मर्यादेंत जें जें कांही केलें असेल, त्या विषयीं जगन्नायक इंद्र आमची निराशा न करो. पवित्र वासना उत्पन्न करणारी दिव्य उदकें ज्या ह्या इंद्राला जाऊन मिळाली आहेत, तो हा देव आम्हांला मित्र प्रेम आणि उत्साह पूर्ण असें वय प्राप्त करून देवो. ॥ २ ॥

जेता॒ नृभि॒रिंद्रः॑ पृ॒त्सु शूरः॒ श्रोता॒ हवं॒ नाध॑मानस्य का॒रोः ॥

प्रभ॑र्ता॒ रथं॑ दा॒शुष॑ उपा॒क उद्य॑न्ता॒ गिरो॒ यदि॑ च॒ त्मना॒ भूत् ॥ ३ ॥

जेता नृऽभिः इद्रः पृत्ऽसु शूरः श्रोता हवं नाधमानस्य कारोः ।

प्रऽभर्ता रथं दाशुषः उपाके उत्ऽयंता गिरः यदि च त्मना भूत् ॥ ३ ॥

हा महावीर इंद्र युद्धांत आपल्या शूर सैनिकांसह सदैव विजयी, आणि करुणा भाकणाऱ्या प्रत्येक भक्ताची हांक ऐकणारा आहे. तो हवि अर्पण करणाऱ्या भक्ताजवळ आपला रथ घेऊन येतो, आणि त्याच्या मनांत आलें म्हणजे (पाहिजे त्याच्या कडून) दिव्य वाणीचा उच्चार करवितो. ॥ ३ ॥

ए॒वा नृभि॒रिंद्रः॑ सुश्र॒वस्या प्र॑खा॒दः पृ॒क्षो अ॒भि मि॒त्रिणो॑ भूत् ॥

सुमर्य इषः स्तवते विवाचि सत्राकरो यजमानस्य शंसः ॥ ४ ॥

एव नृऽभिः इद्रः सुऽश्रवस्या प्रऽखादः पृक्षः अभि मित्रिणः भूत् ।

सऽमर्ये इषः स्तवते विऽवाचि सत्राऽकरः यजमानस्य शंसः ॥ ४ ॥

सामर्थ्याचा अलंकार हा इंद्र होय. तो भक्तांचे स्तवन ऐकण्याकरितां आपल्या वीरांसहवर्तमान, आपल्या प्रिय भक्तांच्या जवळ येतो. भर युद्धांत नाना प्रकारच्या आवाजांचा एकच कल्लोळ चालला असतांना सुद्धां यजमानाची सत्यार्थपूर्ण स्तोत्र वाणी (ह्या इंद्राच्या) अवर्णनीय उत्साह शक्तीची प्रशंसाच करीत असते. ॥ ४ ॥

त्वया वयं मघवन्निंद्र शत्रूनभि ष्याम महतो मन्यमानान् ॥

त्वं त्राता त्वमु नो वृधे भूर्विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥ ५ ॥

त्वया वयं मघऽवन् इंद्र शत्रून् अभि स्याम महतः मन्यमानान् ।

त्वं त्राता त्वं ऊं इति नः वृधे भूः विद्याम एषं वृजनं जीरदानुम् ॥ ५ ॥

हे महैश्वरसंपन्न इंद्रा, आपल्याच मोठेपणाच्या घमेंडीत असणाऱ्या पातकी शत्रूंस आम्ही तुझ्या बळावर सहज जिंकून टाकूं. तूं आमचा तारक; तूं आमची उन्नति करणारा हो म्हणजे तात्काळ फलद्रूप होणारा व उत्साहप्रद असा तुझा आश्रय प्राप्त होईल. ॥ ५ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १७९ (इंद्र सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : रतिः - छंद - त्रिष्टुभ्, बृहती

पू॒र्वीर॒हं श॒रदः॑ शश्रमा॒णा दो॒षा वस्तो॑रु॒षसो॑ ज॒रय॑न्तीः ॥

मि॒नाति॒ श्रियं॑ जरि॒मा त॒नूना॒मप्यू॒ नु पत्नी॒र्वृष॑णो जगम्युः ॥ १ ॥

पूर्वीः अहं शरदः शश्रमाणा दोषाः वस्तोः उषसः जरयन्तीः ।

मिनाति श्रियं जरिमा तनूनां अपि ऊं इति नु पत्नीः वृषणः जगम्युः ॥ १ ॥

मी आज पुष्कळ वर्षें रात्रंदिवस एकसारखे कष्ट सोसलेले आहेत. जो जो दिवस उगवतो तो तो वार्धक्य मात्र जवळ आणतो. आणि वृद्धदशा ही तर शरीराचा मोहकपणा पार नाहींसा करीत असते, अशी गोष्ट आहे तरी सुद्धां पुरुषांनी स्वस्त्री समागम सुख अनुभवूं नये काय ? ॥ १ ॥

ये चि॒द्धि पूर्व॑ ऋत॒साप॒ आस॑न्त्सा॒कं दे॒वेभि॒रव॑दन्नृ॒तानि॑ ॥

ते चि॒दवा॑सु॒र्न॒ह्यन्त॑मा॒पुः सम॒ू नु पत्नी॒र्वृष॑भिर्जगम्युः ॥ २ ॥

ये चित् हि पूर्वे ऋतऽसापः आसन् साकं देवेभिः अवदन् ऋतानि ।

ते चित् अव असुः नहि अंतः आपुः सं ऊं इति नु पत्नीः वृषऽभिः जगम्युः ॥ २ ॥

पहा प्राचीनकाळीं जे जे म्हणून सत्यपरायण महात्मे होऊन गेले आणि जे जे प्रत्यक्ष देवांची सत्यच भाषण बोलत असत एवढी ज्यांची योग्यता त्यांनासुद्धां हार खावी लागली. पण ब्रह्मचर्यव्रताची अखेर त्यांना साधतां आली नाहीं, तेव्हां सामान्यतः स्त्रियांनीही स्वपति समागमसुख अनुभवावें हेंच योग्य. ॥ २ ॥

न मृषा श्रान्तं यदवन्ति देवा विश्वा इत्स्पृधौ अभ्यश्नवाव ॥

जयावेदत्र शतनीथमाजिं यत्सम्यञ्चा मिथुनावभ्यजाव ॥ ३ ॥

न मृषा श्रान्तं यत् अवन्ति देवाः विश्वाः इत् स्पृधः अभि अश्नश्नवाव ।

जयाव इत् अत्र शतनीऽथं आजिं यत् सम्यंचा मिथुनौ अभि अजाव ॥ ३ ॥

आपण श्रम व्यर्थ केले असें म्हणूं नको. खुद्द देवच आपलें रक्षण करतात आणि आपण सर्व प्रतिस्पर्ध्यांवर जयही मिळविला आहे, मग आणखी काय पाहिजे ? तुम्हीं आम्हीं दोघेजण जर अगदीं एकमतानें वागत आलों आहोंत तर इहलोकीं ज्यापासून शेंकडो लाभ होतात अशा संसाराचा पणही आपण खास जिंकलाच असें समजा. ॥ ३ ॥

नदस्य मा रुधतः काम आगन्नित आजातो अमुतः कुतश्चित् ॥

लोपामुद्रा वृषणं नी रिणाति धीरमधीरा धयति श्वसन्तम् ॥ ४ ॥

नदस्य मा रुधतः कामः आ अगन् इतः आऽजातः अमुतः कुतः चित्त् ।

लोपामुद्रा वृषणं निः रिणाति धीरं अधीरा धयति श्वसन्तम् ॥ ४ ॥

एखाद्‌या महानदाला अडविलें असतां तो जसा अनावर होतो, त्याप्रमाणें मला अनावर उत्कंठा झाली आहे. येथून तेथून सर्व तऱ्हेनें मी उत्कंठित झालो आहे. मी वीर्यवान, मोठा बुद्धिमान, व धैर्यबलशाली आणि ही लोपामुद्रा तर जातीची अबलाच परंतु हिनें मला सर्वस्वी विव्हल करून शुष्क करून टाकलें आहे. ॥ ४ ॥

इ॒मं नु सोम॒मन्ति॑तो हृ॒त्सु पी॒तमुप॑ ब्रुवे ॥

यत्सी॒माग॑श्चकृ॒मा तत्सु मृ॑ळतु पुलु॒कामो॒ हि मर्त्यः॑ ॥ ५ ॥

इमं नु सोमं अन्तितः हृत्ऽसु पीतं उप ब्रुवे ।

यत् सीं आगः चकृम तत् सु मृळतु पुलुऽकामः हि मर्त्यः ॥ ५ ॥

ज्या हया सोम रसाच्या तत्त्वाला आम्हीं आमच्या अंतःकरणांत सांठवून ठेविलेलें आहे, त्याच्या पुढें उभा राहून मी प्रार्थना करतों कीं, आम्ही जें कांही पातक केलें असेल, त्याची देव आम्हांस सर्वस्वी क्षमा करो; कारण हा मनुष्यप्राणी असा आहे कीं, त्याला बऱ्या वाईट शेंकडो वासना असणारच. ॥ ५ ॥

अगस्त्यः खनमानः खनित्रैः प्रजामपत्यं बलमिच्छमानः ॥

उभौ वर्णावृषिरुग्रः पुपोष सत्या देवेष्वाशिषो जगाम ॥ ६ ॥

अगस्त्यः खनमानः खनित्रैः प्रऽजां अपत्यं बलं इच्छमानः ।

उभौ वर्णौ ऋषिः उग्रः पुपोष सत्याः देवेषु आऽशिषः जगाम ॥ ६ ॥

अगस्त्य ऋषिंनी स्वतः हातांत कुदळ घेऊन खणल्याप्रमाणें तपश्चर्येचे फार मोठे कष्ट सोसले, त्यांनाही संतति स्वाधिनता आणि अविनाशी बल ह्यांची इच्छा होती व त्यांनी सामर्थ्यवान होऊन दोन्ही वर्णांचा उत्कर्षच केला, तेव्हां ईश्वराच्या सत्य अशा आशिर्वादाचें फल त्यांस देवलोकीं मिळालें. ॥ ६ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १८० (अश्विनौ सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : अश्विनौ - छंद - त्रिष्टुभ्

यु॒वो रजां॑सि सु॒यमा॑सो॒ अश्वा॒ रथो॒ यद्वां॒ पर्यर्णां॑सि॒ दीय॑त् ॥

हि॒र॒ण्यया॑ वां प॒वयः॑ प्रुषाय॒न्मध्वः॒ पिब॑न्ता उ॒षसः॑ सचेथे ॥ १ ॥

युवोः रजांसि सुऽयमासः अश्वाः रथः यत् वां परि अर्णांसि दीयत् ।

हिरण्ययाः वां पवयः प्रुषायन् मध्वः पिबतौ उषसः सचेथे इति ॥ १ ॥

हे अश्वी देव हो, तुमचा रथ अंतरिक्षरूपी रजोमय समुद्राच्या भोंवताली भ्रमण करीत असतांना सुद्धां तुमचे घोडे अगदीं सुयंत्र चाललेले असतात, तुमच्या सुवर्णमय चाकांच्या धावांपासून अमृत तुषार उडत असतात, आणि तुम्हीही मधुर रस प्राशन करून उषांबरोबर इकडे येत असतां. ॥ १ ॥

युवमत्य॒स्याव॑ नक्षथो॒ यद्विप॑त्मनो॒ नर्य॑स्य॒ प्रय॑ज्योः ॥

स्वसा॒ यद्वां॑ विश्वगूर्ती॒ भरा॑ति॒ वाजा॒येट्टे॑ मधुपावि॒षे च॑ ॥ २ ॥

युवं अत्यस्य अव नक्षथः यत् विऽपत्मनः नर्यस्य प्रऽयज्योः ।

स्वसा यत् वां विश्वगूर्ती इति विश्वगूर्ती भराति वाजाय ईट्टे मधुऽपौ इषे च ॥ २ ॥

तुम्ही जेव्हां विशेष गतीनें धांवणारा, लोक हितकर, अति पवित्र व वेगवान अशा सूर्यापूर्वी येऊन पोहोंचतां, तेव्हां भक्तांचे स्तवन अशा अर्थाचें चाललेलें असतें कीं " हे मधुर रसाभिलाषी आणि सर्व लोकप्रिय अश्वी हो, भगिनी उषा हिनें तुम्हांस घेऊन यावें, आणि आम्हांस दिव्य सामर्थ्य आणि उत्साह ह्याचा लाभ व्हावा". ॥ २ ॥

युवं पय॑ उस्रिया॑यामधत्तं पक्वमामायामव पूर्व्यं गोः ॥

अन्तर्यद्वनिनौ वामृतप्सू ह्वारो न शुचिर्यज॑ते हविष्मा॑न् ॥ ३ ॥

युवं पयः उस्रियायां अधत्तं पक्वं आमायां अव पूर्व्यं गोः ।

अन्तः यत् वनिनः वां ऋतप्सू इति ऋतऽप्सू ह्वारः न शुचिः यजते हविष्मान् ॥ ३ ॥

तुम्हीं दिव्य धेनूच्या अपरिपक्व परंतु प्रकाशमय कांसे मध्यें परिपक्व व उत्कृष्ट असें अमृत तत्त्व ठेविलेलें आहे म्हणून हे सत्य स्वरूप अश्वीहो, अरण्यांत अंतर्भागी वेड्या वांकड्या गतीनें वाहणरा वाराही जसा पवित्र, त्या प्रमाणे पवित्रांतःकरणानें हा तुमचा भक्त तुमची सेवा करीत असतो. ॥ ३ ॥

यु॒वं ह॑ घ॒र्मं मधु॑मन्त॒मत्र॑येऽ॒पो न क्षोदो॑ऽवृणीतमे॒षे ॥

तद्वां᳚ नरावश्विना॒ पश्वऽइ॑ष्टी॒ रथ्ये॑व च॒क्रा प्रति॑ यन्ति॒ मध्वः॑ ॥ ४ ॥

युवं ह घर्मं मधुऽमन्तं अत्रये अपः न क्षोदः अवृणीतं एषे ।

तत् वां नरौ अश्विना पश्वऽइष्टिः रथ्याऽइव चक्रा प्रति यन्ति मध्वः ॥ ४ ॥

तुम्ही अत्रि ऋषीकरितां त्यांच्या प्रार्थनेवरून प्रखर उष्णतेला पाण्याच्या प्रवाहाप्रमाणें शीतल व मधुर रसयुक्त करून टाकलेंत, म्हणून हे शूर अश्वी देवहो, तुमच्या प्रित्यर्थ पशु यज्ञ होत असतो आणि मधुर रस आम्हांकडे रथाच्या चक्रा प्रमाणें झर झर धांवत येत असतात. ॥ ४ ॥

आ वां᳚ दा॒नाय॑ ववृतीय दस्रा॒ गोरोहे॑ण तौ॒ग्र्यो न जिव्रिः॑ ॥

अपः क्षोणी सचते माहिना वां जूर्णो वामक्षुरंहसो यजत्रा ॥ ५ ॥

आ वां दानाय ववृतीय दस्रा गोः ओहेन तौग्र्यः न जिव्रिः ।

अपः क्षोणी इति सचते माहिना वां जूर्णः वां अक्षुः अंहसः यजत्रा ॥ ५ ॥

हे अद्‍भुत कर्मकारी अश्वीहो, वृद्ध झालेल्या तुग्र पुत्रानें तुम्हांस आपणांकडे वळविले त्या प्रमाणें तुम्हीं वरदान द्यावें म्हणून घृताहुतीनें तुम्हाला मी आपल्याकडे वळवीन असें करा. तुमच्या महिम्यानें आकाश आणि पृथ्वी हीं दोन्ही व्यापून टाकली आहेत. हे पूज्य देवांनों, पातकांचे जाल तुमच्यापुढें पार फाटून त्याच्या चिंधड्या होऊन जातात. ॥ ५ ॥

नि यद्युवेथे नियुतः सुदानू उप स्वधाभिः सृजथः पुरंधिम् ॥

प्रेषद्वेषद्वातो न सूरिरा महे ददे सुव्रतो न वाजम् ॥ ६ ॥

नि यत् युवेथे इति निऽयुतः सुदानू इति सुऽदानू उप स्वधाभिः सृजथः पुरंऽधिम् ।

प्रेषत् वेषत् वातः न सूरिः आ महे ददे सुऽव्रतः न वाजम् ॥ ६ ॥

हे अत्युदार अश्वीहो, तुम्हीं भक्तांकडे येण्याकरितां घोडे जोडतां तेव्हांच तुम्हीं आपल्या प्रभावानें भक्तामध्यें बुद्धिमत्ता उत्पन्न करतां. मग त्या बुद्धिमंत भक्तानें तुम्हाला प्रसन्न करून घेऊन वाऱ्याप्रमाणें पहिजे तिकडे संचार करावा. पण तो भक्त असतो सत्कर्मरत; तेव्हां त्याचें महत्त्व वाढावें, म्हणून त्याला पवित्र सामर्थ्याचाही लाभ होतो. ॥ ६ ॥

व॒यं चि॒द्धि वां॑ जरि॒तारः॑ स॒त्या वि॑प॒न्याम॑हे॒ वि प॒णिर्हि॒ताव॑ान् ॥

अधा॑ चि॒द्धि ष्मा॑श्विनावनिंद्या पा॒थो हि ष्मा॑ वृषणा॒वन्ति॑देवम् ॥ ७ ॥

वयं चित् हि वां जरितारः सत्याः विपन्यामहे वि पणिः हितऽवान् ।

अध चित् हि स्म अश्विनौ अनिंद्या पाथः हि स्म वृषणौ अंन्तिऽदेवम् ॥ ७ ॥

आम्हीं स्तोतेजन हेच तुमचे इमानी सेवक. तुमचे नाना प्रकारें गुण संकिर्तन करतों, परंतु धनाढ्य व धर्म विमुख कंजुष मनुष्य तसाच एकीकडे पडलेला आहे त्याची आम्हीं पर्वाही करीत नाहीं. म्हणूनच हे निष्कलंक व वीर्यवान अश्वीहो, देवाला निरंतर हृदयांत वागविणाऱ्या आम्हां भक्तांचे रक्षण करीत असतां. ॥ ७ ॥

युवां चिद् धि ष्माश्विनाव् अनु द्यून् विरुद्रस्य प्रस्रवणस्य सातौ ॥

अगस्त्यौ नरां नृषु प्रशस्तः काराधुनीव चितयत्सहस्रैः ॥ ८ ॥

युवां चित् हि स्म अश्विनौ अनु द्यून् विऽरुद्रस्य प्रऽस्रवणस्य सातौ ।

अगस्त्यः नरां नृषु प्रऽशस्तः काराधुनीऽइव चितयत् सहस्रैः ॥ ८ ॥

हे अश्वीदेवहो. ज्ञान जलाचा प्रचंड ओघ आपलासा व्हावा म्हणून थोर पुरुषांमध्यें श्रेष्ठ असा अगस्त्य ऋषि दररोज प्रातःकाळीं तुम्हांस जागृत करतो, त्यावेळीं काराधुनी नामक मंजुल वाद्याच्या ध्वनी प्रमाणें मनोहर अशा हजारों स्तवनांनी तो तुम्हांला आळवीत असतो. ॥ ८ ॥

प्र यद्वहेथे महिना रथस्य प्र स्यन्द्रा याथो मनुषो न होता ॥

धत्तं सूरिभ्य उत वा स्वश्व्यं नासत्या रयिषाचः स्याम ॥ ९ ॥

प्र यत् वहेथे इति महिना रथस्य प्र स्यन्द्रा याथः मनुषः न होता ।

धत्तं सूरिऽभ्यः उत वा सुऽअश्व्यं नासत्या रयिऽसाचः स्याम ॥ ९ ॥

सर्व संचारी देवहो, तुम्हीं आपल्या स्वर्गगामी रथाच्या जोरावर पाहिजे तिकडे जातां, पण आमचेकडे येतां ते मात्र कोणातरी एखाद्या मनुष्याच्या होत्या प्रमाणे (रूप घेऊन) येत असतां. तर आमच्या यजमानांना बुद्धिचापल्यरूप उत्तम अश्व द्या, म्हणजे हे नासत्यहो, आम्हींही त्यांच्या ऐश्वर्याचे विभागी होऊं. ॥ ९ ॥

तं वां रथं वयमद्या हुवेम स्तोमैरश्विना सुविताय नव्यम् ॥

अरिष्टनेमिं परि द्यामियानं विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥ १० ॥

तं वां रथं वयं अद्य हुवेम स्तोमैः अश्विना सुविताय नव्यम् ।

अरिष्टऽनेमिं परि द्यां इयानं विद्याम एषं वृजनं जीरदानुम् ॥ १० ॥

अश्वीदेवहो, ज्याच्या धांवा कधींही मोडत नाहींत व जो नक्षत्र लोकाभोंवती भ्रमण करीत असतो असा तुमचा नामांकित रथ, त्याला स्तोत्राच्या योगानें आम्हीं कल्याणाकरितां आज इकडे प्रार्थना करून आणवितो, म्हणजे तात्काळ फलद्रुप होणारा व उत्साहप्रद असा तुमचा आश्रय आम्हांस प्राप्त होईल. ॥ १० ॥

ॐ तत् सत्

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १८१ (अश्विनौ सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : अश्विनौ - छंद - त्रिष्टुभ्

कदु प्रेष्टाविषां रयीणामध्वर्यन्ता यदुन्निनीथो अपाम् ॥

अयं वां यज्ञो अकृत प्रशस्तिं वसुधिती अवितारा जनानाम् ॥ १ ॥

कत् ऊं इति प्रेष्ठौ इषां रयीणां अध्वर्यन्ता यत् उत्ऽनिनीथः अपाम् ।

अयं वां यज्ञो अकृत प्रऽशस्तिं वसुधिती इति वसुऽधिती अवितारा जनानाम् ॥ १ ॥

हे अश्वीहो, तुम्ही अत्यंत प्रेमळ, व सात्विक आवेश आणि संपत्ति ह्यांची प्राप्ति देण्यांत अग्रगण्य आहांत, तर स्वर्गीय उदकांचा अंश म्हणून तुम्ही जें कांही घेऊन येणार आहांत तें केव्हां ? हे दिव्य संपत्तीच्या निधींनो, हे लोकपालांनो, पहा ह्या यज्ञाच्या द्वारानें तुमचें गुण संकीर्तन आम्हीं यथामति केलेलें आहे. ॥ १ ॥

आ वा॒मश्वा॑स॒: शुच॑यः पय॒स्पा वात॑रंहसो दि॒व्यासो॒ अत्या॑: ॥

म॒नो॒जुवो॒ वृष॑णो वी॒तपृ॑ष्ठा॒ एह स्व॒राजो॑ अ॒श्विना॑ वहन्तु ॥ २ ॥

आ वां अश्वासः शुचयः पयःऽपाः वातऽरंहसः दिव्यासः अत्याः ।

मनःऽजुवः वृषणः वीतऽपृष्ठाः आ इह स्वऽराजः अश्विना वहन्तु ॥ २ ॥

तुमच्या रथाचे पवित्र व दिव्य अश्व, आवेशी अमृत प्राशन करणारे, वाऱ्याप्रमाणें प्रबल, मनाप्रमाणें वेगवान्, वीर्यवान, पुष्ट आणि आपल्याच तेजानें प्रकाशणारे असे आहेत; ते तुम्हांस त्वरित इकडे घेऊन येवोत. ॥ २ ॥

आ वां॒ रथो॑ऽव॒नि॒र्न प्र॒वत्वा॑न्त्सृ॒प्रव॑न्धुरः सुवि॒ताय॑ गम्याः ॥

वृष्ण॑ स्थाता॒रा॒ मन॑सो॒ जवी॑यानहम्पू॒र्वो य॑ज॒तो धि॑ष्ण्या॒ यः ॥ ३ ॥

आ वां रथः अवनिः न प्रवत्वान् सृप्रऽवन्धुरः सुविताय गम्याः ।

वृष्णः स्थातारा मनसः जवीयान् अहंऽपूर्वः यजतः धिष्ण्या यः ॥ ३ ॥

उतार जमीनीवरून वाहणाऱ्या प्रचंड जलाच्या लोंढ्याप्रमणे तुमचा रथ भरधांव जात असतो. त्याच्या वरील सारथ्याकरितां केलेली बसण्याची जागाही प्रशस्त असते. तो रथ आमचे कल्याणांकरितां इकडे वळो. ध्यानयोग्य व चिरंतन अश्वीहो, मन हें एवढें जबरदस्त चपल, पण त्यापेक्षांही तो तुमचा पवित्र रथ वेगवान् असून सर्वांच्या पूर्वी अहमहमिकेनें पुढें जात असतो. ॥ ३ ॥

इ॒हेह॑ जा॒ता सम॑वावशीताम॒रे॒पसा॑ त॒न्वा३॒॑नाम॑भि॒ः स्वैः ॥

जि॒ष्णुर्वा॑म॒न्यः सुम॑खस्य सू॒रिर्दि॒वो अ॒न्यः सु॒भग॑ः पु॒त्र ऊ॑हे ॥ ४ ॥

इहऽइह जाता सं अवावशीतां अरेपसा तन्वा नामऽभिः स्वैः ।

जिष्णुः वा अन्यः सुऽमखस्य सूरिः दिवः अन्यः सुऽभगः पुत्र ऊहे ॥ ४ ॥

येथें (यज्ञांत) प्रकट होणाऱ्या अश्वीदेवांचे गुणानुवाद वारंवार गात असतात ते त्यांची मूर्ति निष्कलंक व कीर्ति पवित्र म्हणूनच गात असतात. अश्वीहो तुम्हांपैकी एकजण आमच्या ह्या उत्तम यज्ञाचा यशस्वी असा पुरस्कर्ता व दुसरा द्युलोकाचा दैवशाली पुत्रच कीं काय असें वाटतें. ॥ ४ ॥

प्र वां निचेरुः ककुहो वशाँ अनु पिशङ्गरूपः सदनानि गम्याः ॥

हरी अन्यस्य पीपयन्त वाजैर्मथ्नार रजांस्यश्विना वि घोषैः ॥ ५ ॥

प्र वां निऽचेरुः ककुहः वशान् अनु पिशङ्गऽरूपः सदनानि गम्याः ।

हरी इति अन्यस्य पीपयन्त वाजैः मथ्नाः रजांसि अश्विना वि घोषैः ॥ ५ ॥

मोठ्या वेगानें खाली धांवणारा, उंच उंच शिरांचा सुवर्णमय असा तुमचा रथ तुमच्या इच्छेनेंच आम्हां भक्तांच्या घरांकडे येवो. अश्वीदेवहो, तुम्हांपैकीं कोणाचीही स्तुति केली तरी त्या स्तोत्र सामर्थ्यानें तुमच्या रथाचे घोडे तुंद होऊन जातात व आपल्या खिंकाळण्यानें सर्व अंतरिक्ष दणाणून टाकतात. ॥ ५ ॥

प्र वाँ शरद्वान्वृषभो न निष्षाट् पूर्वीरिषश्चरति मध्व इष्णन् ॥

एवैरन्यस्य पीपयन्त वाजैर्वेषन्तीरूर्ध्वा नद्यो न आगुः ॥ ६ ॥

प्र वां शरत्ऽवान् वृषभः न निष्षाट् पूर्वीः इषः चरति मध्वः इष्णन् ।

एवैः अन्यस्य पीपयन्त वाजैः वेषन्तीः ऊर्ध्वाः नद्यः नः आ अगुः ॥ ६ ॥

शरद ऋतूंतील धान्य संपत्तिप्रमाणें समृद्ध व प्रतापी असा तुमचा हा रथ अमृताचे असंख्य उत्साह-प्रद प्रवाह सोडीत सोडीत सर्वत्र संचार करीत असतो. तुम्हांपैकी कोणाचीही स्तुति केली तरी त्या सद्यः फलदायी स्तोत्र सामर्थ्यानी सर्वत्र पसरणाऱ्या विशाल नद्या तुडुंब भरून वहात आमच्याकडे येतात. ॥ ६ ॥

असर्जि वां स्थविरा वेधसा गीर्बाळ्हे अश्विना त्रेधा क्षरन्ती ॥

उपस्तुताववतं नाधमानं यामन्नयामञ्छृणुतं हवं मे ॥ ७ ॥

असर्जि वां स्थविरा वेधसा गीः बाळ्हे अश्विना त्रेधा क्षन्ती ।

उपऽस्तुतौ अवतं नाधमानं यामन् अया मन् श्रृणुतं हवं मे ॥ ७ ॥

सर्व नियामक अश्वीहो, तीन प्रकारांनी उफाड्यानें वहाणारा तुमचा पुरातन व प्रसिद्ध अशा स्तुतीचा ओघच माझ्या मुखावाटे बाहेर पडत आहे, तर त्या स्तुतीनें प्रसन्न होऊन तुमच्या कृपेची याचना करणाऱ्या मज भक्तावर दया करा आणि संचार करीत असतांना किंवा स्वस्थ विश्रांति घेत असतांनाही माझ्या प्रार्थनेकडे कृपा करून लक्ष असूं द्या. ॥ ७ ॥

उ॒त स्या वां॒ रुश॑तो॒ वप्स॑सो॒ गीस्त्रि॑ब॒र्हिषि॒ सद॑सि पिन्वते॒ नॄन् ॥

वृषा॑ वां मे॒घो वृ॑षणा पीपाय॒ गोर्न सेके॒ मनु॑षो दश॒स्यन् ॥ ८ ॥

उत स्या वां रुशतः वप्ससः गीः त्रिऽबर्हिषि सदसि पिन्वते नॄन् ।

वृषा वां मेघः वृषणा पीपाय गोः न सेके मनुषः दशस्यन् ॥ ८ ॥

तसेंच, जेथें तीन ठिकाणीं दर्भासनें घातलेली असतात अशा यज्ञ गृहीं तुमच्या त्या अति उज्वल तेजःस्वरूपाचें स्तवन, भक्तांची अंतःकरणें उचंबळून टाकते. हे वीरांनो, मनोरथांची वृष्टि करणारा असा तुमचा कृपा मेघ ज्ञानरसाचीही वृष्टि करून मनुष्यांना अभीष्ट साधून देऊन समृद्ध करतो. ॥ ८ ॥

यु॒वां पू॒षेवा॑श्विना॒ पुरं॑धिर॒ग्निमु॒षां न ज॑रते ह॒विष्मा॑न् ॥

हु॒वे यद्वां॑ वरि॒वस्या गृ॒णा॒नो वि॒द्यामे॒षं वृ॒जनं॑ जी॒रदा॑नुम् ॥ ९ ॥

युवां पूषाऽइव अश्विना पुरंऽधिः अग्निं उषां न जरते हविष्मान् ।

हुवे यत् वां वरिवस्या गृणानः विद्याम एषं वृजनं जीरऽदानुम् ॥ ९ ॥

अश्वी देव हो, पूषा देवा प्रमाणेंच तुम्हीं आहांत. ज्ञानी भक्त अर्पण करून, अश्वि व उषा ह्यांच्या प्रमाणें तुमचेंही स्तवन करीत असतो. व खऱ्या निष्ठेनें तुमची स्तुती करून जर मी तुमचा धांवा करीत आहें तर तात्काळ फलद्रुप होणारा व उत्साहप्रद असा तुमचा आश्रय आम्हांस लाभेल असें करा. ॥ ९ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १८२ (अश्विनौ सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : अश्विनौ - छंद - जगती, त्रिष्टुभ्

अभूदिदं वयुनमो षु भूषता रथो वृषण्वान्मदता मनीषिणः ॥

धियंजिन्वा धिष्ण्या विश्पलावसू दिवो नपाता सुकृते शुचिव्रता ॥ १ ॥

अभूत् इदं वयुनं ओ इति सु भूषत रथः वृषण्ऽवान् मदत मनीषिणः ।

धियंऽजिन्वा धिष्ण्या विश्पलावसू इति दिवः नपाता सुऽकृते शुचिऽव्रता ॥ १ ॥

पहा ही अश्वीदेवांच्या आगमनाची खूण पटत चालली. चला, पुढें सरसावा, हा पहा त्या वीरांचा रथ. ज्ञानी भक्तांनो, त्यांना प्रसन्न करा. ते सद्बुद्धीला प्रेरणा करणारे आणि ध्यानगम्य असून मनुष्य मात्रांविषयींच्या दयेची संपत्ति त्यांच्यापाशीं मुबलक आहे. ते द्युलोकांतून प्रकट होतात व पुण्यवंतांना त्यांच्या सत्तेच्या पवित्रपणाची प्रचीति येते. ॥ १ ॥

इं॒द्रत॑मा॒ हि धिष्ण्या॑ म॒रुत्त॑मा द॒स्रा दंसि॑ष्ठा र॒थ्या र॒थीत॑मा ॥

पू॒र्णं रथं॑ वहेथे॒ मध्व॒ आचि॑तं॒ तेन॑ दा॒श्वांस॒मुप॑ याथो अश्विना ॥ २ ॥

इंद्रऽतमा हि धिष्ण्या मरुत्ऽतमा दस्रा दंसिष्ठा रथ्या रथीऽतमा ।

पूर्णं रथं वहेथे इति मध्वः आऽचितं तेन दाश्वांसं उप याथः अश्विना ॥ २ ॥

खरोखर तुम्हीं इंद्राशी एकरूप असून निदिध्यास योग्य आहांत. तुम्हीं अगदीं मरुतांप्रमाणेंच शत्रुनाशक, व अद्‌भुत कर्मकारी, अतिरथी असून रथावर आरूढ झालां आहांत, तेव्हां हे अश्वी हो, अमृतरसानें ओतप्रोत भरलेल्या आपल्या रथांत बसून तुम्हींही हविर्दान अर्पण करणाऱ्या भक्तांकडे जात असतां. ॥ २ ॥

किमत्र॑ दस्रा कृणुथः॒ किमा॑साथे॒ जनो॒ यः कश्चि॒दह॑विर्मही॒यते॑ ॥

अति॑ क्रमिष्टं जु॒रतं॑ प॒णेरसुं॒ ज्योति॒र्विप्रा॑य कृणुतं वच॒स्यवे॑ ॥ ३ ॥

किं अत्र दस्रा कृणुथः किं आसाथे इति जनः यः कः चित् अहविः महीयते ।

अति क्रमिष्टं जुरतं पणेः असुं ज्योतिः विप्राय कृणुतं वचस्यवे ॥ ३ ॥

समर्थ देवांनो, येथें हें काय करतां व काय म्हणून थांबलां आहांत ? येथील मंडळी पहावी तों, ती देवाला हवि अर्पण न करतां आपल्याच तोऱ्यांत गर्क आहेत. तर ह्यांना द्या सोडून, आणि अधार्मिक दुष्टांच्या आयुष्याची मर्यादा कमी करून, देवांचे गुणकीर्तन करणाऱ्या भक्तजनांना ज्ञानजोतीचा प्रकाश प्राप्त करून द्या. ॥ ३ ॥

ज॒म्भय॑तम॒भितो॒ राय॑तः॒ शुनो॑ ह॒तं मृधो॑ वि॒दथु॒स्तान्य॑श्विना ॥

वा॒च॑वाचं जरि॒तू र॒त्निनी॑ कृतमु॒भा शंस॑ नासत्यावतं॒ मम॑ ॥ ४ ॥

जम्भयतं अभितः रायतः शुनः हतं मृधः विदथुः तानि अश्विना ।

वाचंऽवाचं जरितुः रत्निनीं कृतं उभा शंसं नासत्या अवतं मम ॥ ४ ॥

सज्जनांवर दोहोंकडून तोंड टाकणाऱ्या कुत्र्यांना आपल्या दाढेखाली चिरडून टाका व सज्जनांच्या शत्रूंचा नाश करा. अश्वीदेवहो, हें सर्व तुम्हाला कळतच आहे, आम्ही विनंति केली पाहिजेच असें नाही. स्तवन कर्त्याचा प्रत्येक शब्द रत्नमय करा आणि हे सत्यस्वरूप देवांनो, आपण उभयतां माझेंही स्तोत्र असेंच सफल करा. ॥ ४ ॥

यु॒वमे॒तं च॑क्रथु॒ः सिन्धु॑षु प्ल॒वमा॑त्म॒न्वन्तं॑ प॒क्षिणं॑ तौ॒ग्र्याय॒ कम् ॥

येन॑ देव॒त्रा मन॑सा निरू॒हथु॑ः सुपप्त॒नी पे॑तथु॒ः क्षोद॑सो म॒हः ॥ ५ ॥

युवं एतं चक्रथुः सिंधुषु प्लवं आत्मन्ऽवन्तं पक्षिणं तौग्र्याय कम् ।

येन देवऽत्रा मनसा निःऽऊहथुः सुऽपप्तनि पेतथुः क्षोदसः महः ॥ ५ ॥

तुम्हीं तुग्रपुत्रांकरितां महासमुद्रांत सचेतन व पंख असलेली आणि सुखकर अशी एक नौका तयार केलीत. तुम्हीं उड्डाण कुशल, तेव्हां त्या नावेच्या योगानें उदक कल्लोळांतून वर उडून ईश्वराकडे लक्ष ठेवणाऱ्या त्या भक्तासह तुम्हीं निघून गेलांत. ॥ ५ ॥

अव॑विद्धं तौ॒ग्र्यम॒प्स्व१॒॑न्तर॑नारम्भ॒णे तम॑सि॒ प्रवि॑द्धम् ॥

चत॑स्रो॒ नावो॒ जठ॑लस्य॒ जुष्टा॒ उद॒श्विभ्या॑मिषि॒ताः पा॑रयन्ति ॥ ६ ॥

अवऽविद्धं तौग्र्यं अप्ऽसु अंन्तः अनारम्भणे तमसि प्रऽविद्धम् ।

चतस्रः नावः जठलस्य जुष्टाः उत् अश्विऽभ्यां इषिताः पारयन्ति ॥ ६ ॥

तुग्रपुत्राला महा सागरांत फेंकून दिलें होते तेथें "आरंभ ना शेवट" अशा दाट काळोखांत तो गटांगळ्या खात असतांना, अश्वीदेवहो, स्वप्रेरणेनें चालविलेल्या व समुद्रांत ज्यांचा आश्रय फारच प्रिय वाटतो, अशा त्या पहा चार नावा त्याला सागराच्या अगदीं पार नेत आहेत. ॥ ६ ॥

कः स्विद्वृ॒क्षो निष्ठि॑तो॒ मध्ये॒ अर्ण॑सो॒ यं तौ॒ग्र्यो ना॑धि॒तः प॒र्यष॑स्वजत् ॥

प॒र्णा मृ॒गस्य॑ प॒तरो॑रिवा॒रभ॒ उद॑श्विना ऊहथुः॒ श्रोम॑ताय॒ कम् ॥ ७ ॥

कः स्वित् वृक्षः निःऽस्थितः मध्ये अर्णसः यं तौग्र्यः नाधितः परिऽअसस्वजत् ।

पर्णा मृगस्य पतरोःऽइव आऽरभे उत् अश्विनौ ऊहथुः श्रोमताय कम् ॥ ७ ॥

आतुर झालेल्या तुग्रपुत्रानें वृक्षाप्रमाणे निश्चल अशा समुद्रातील व्यक्तीला कवटाळले, परंतु त्याचा काही उपयोग झाला नाहीं. शेवटी अचानकपणें पंख फुटलेल्या आसन्नमरण मृगाप्रमाणे तुम्ही तुग्रपुत्राच्या साहाय्यार्थ धांवलात आणि त्याची मुक्तता केलीत. ॥ ७ ॥

तद् वां नरा नासत्यावनु ष्याद्यद्वां मानास उचथमवोचन् ॥

अस्मादद्य सदसः सोम्यादा विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥ ८ ॥

तत् वां नरा नासत्यौ अनु स्यात् यत् वां मानासः उचथं अवोचन् ।

अस्मात् अद्य सदसः सोम्यात् आ विद्याम एषं वृजनं जीरदाऽनुम् ॥ ८ ॥

वीर्यशाली सत्यस्वरूप अश्वीहो, आम्हीं मान-पुत्रांनी जें स्तवन केलें आहे तें तुम्हाला प्रिय होवो. जेथें सोम अर्पण होत असतो अशाच ठिकाणीं, तात्काळ फलद्रुप होणारा तुमचा उत्साह-प्रद आसरा आम्हांस लाभो. ॥ ८ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १८३ (अश्विनौ सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : अश्विनौ - छंद - त्रिष्टुभ्

तं युञ्जाथां मनसो यो जवीयान् त्रिवन्धुरो वृषणा यस्त्रिचक्रः ॥

येनोपयाथः सुकृतो दुरोणं त्रिधातुना पतथो विर्न पर्णैः ॥ १ ॥

तं युञ्जाथां मनसः यः जवीयान् त्रिःवन्धुरः वृषणा यः त्रिऽचक्रः ।

येनऽउपयाथः सुऽकृतः दुरोणं त्रिऽधातुना पतथः विः न पर्णैः ॥ १ ॥

वीर्यसंपन्न अश्वीदेवहो, मनापेक्षांही ज्याचा वेग जास्त, ज्याला बैठकी तीन व चाकेंही तीनच आहेत असा तो तुमचा रथ जोडून सिद्ध करा. पक्षी आपल्या पंखांनी भराऱ्या मारतो, त्याप्रमाणें तीन तत्त्वांनी युक्त अशा त्या रथावर बसून सदाचाररत भक्ताच्या घरीं तुम्हीं वेगानें जात असतां. ॥ १ ॥

सुवृद्र थो वर्तते यन्नभि क्षां यत्तिष्ठथः क्रतुमन्तानु पृक्षे ॥

वपुर्वपुष्या सचतामियं गीर्दिवो दुहित्रोषसा सचेथे ॥ २ ॥

सुऽवृत् रथः वर्तते यन् अभि क्षां यत् तिष्ठथः क्रतुऽमन्ता अनु पृक्षे ।

वपुः वपुष्या सचतां इयं गीः दिवः दुहित्रा उषसा सचेथे इति ॥ २ ॥

आपल्या दयेचें सामर्थ्य दाखविण्याची मनीषा धरून जेव्हां तुम्हीं आपल्या रथांत बसतां, तोही पृथ्वीकडे फारच जलदीनें परंतु सुरळीतपणें येतो. तर ज्याप्रमाणें तुम्हीं आकाश-कन्या उषा हिच्याबरोबर जातां त्याप्रमाणें आम्हीं गाइलेली ही तुमची मनोहर स्तुतीही तुमच्या स्वतःबरोबर जावो. ॥ २ ॥

आ ति॑ष्ठतं सु॒वृतं॒ यो रथो॑ वा॒मनु॑ व्र॒तानि॒ वर्त॑ते ह॒विष्मा॑न् ॥

येन॑ नरा नासत्येष॒यध्यै॑ व॒र्तिर्या॒थस्तन॑याय॒ त्मने॑ च ॥ ३ ॥

आ तिष्ठतं सुऽवृतं यः रथः वां अनु व्रतानि वर्तते हविष्मान् ।

येन नरा नासत्या इषयध्यै वर्तिः याथः तनयाय त्मने च ॥ ३ ॥

हे शूर नासत्यांनो, हविर्द्रव्यांनी परिपूर्ण अशा तुमच्या नियत मार्गस्थ रथावर तुम्ही आरूढ व्हा, आणि हविर्दात्या भक्ताचे, आणि त्याच्या पुत्रपौत्रांचे कल्याण करण्यासाठी तुम्हीं आमच्या निवासस्थानी या. ॥ ३ ॥

मा वां वृको मा वृकीरा दंधर्षीन्मा परिं वर्क्तमुत मातिं धक्तम् ॥

अयं वां भागो निहिंत इयं गीर्दस्राविमे वां निधयो मधूनाम् ॥ ४ ॥

मा वां वृकः मा वृकीः आ दधर्षीत् मा परि वर्क्तं उत मा अति धक्तम् ।

अयं वां भागः निऽहितः इयं गीः दस्रौ इमे वां निऽधयः मधूनाम् ॥ ४ ॥

हे पराक्रमी अश्वी देवहो, माझी ही स्तोत्रें, हविर्द्रव्ये आणि मधुरसाचे कुंभ मी तुमच्यासाठीं सिद्ध केलें आहेत. तुम्ही आम्हांस त्यजू नका अथवा वगळू नका. क्रोधरूपी लांडगा व अवकृपारूपी लांडगीचे रूप धारण केलेले तुमचे रथवाहक गर्दभ आम्हांस पीडा न देवोत. ॥ ४ ॥

युवां गोतंमः पुरुमीळ्हो अत्रिर्दस्रा हवतेऽवसे हविष्मांन् ॥

दिशं न दिष्टामृजूयेव यन्ता मे हवं नासत्योपं यातम् ॥ ५ ॥

युवां गोतमः पुरुऽमीळ्हः अत्रिः दस्रा हवते अवसे हविष्मान् ।

दिशं न दिष्टां ऋजुयाऽइव यन्ता मे हवं नासत्या उप यातम् ॥ ५ ॥

अद्‌भुत पराक्रमी अश्वीदेवहो, गोतमऋषि, पुरुमिळ्ह आणि अत्रिऋषि हेही तुमचा प्रसाद व्हावा म्हणून हवि अर्पण करून तुमचा धावा करीत असतात तर हे नासत्यहो, नेमिष्ठ मनुष्य अगदी सरळ धोरणानेंच उद्दिष्ट प्राप्तिच्या मार्गास लागतो, त्याप्रमाणें माझ्या हांकेसरशी तुम्ही नीट मजकडे या. ॥ ५ ॥

अता॑रिष्म॒ तम॑सस्पा॒रम॒स्य प्रति॑ वां॒ स्तोमो॑ अश्विनावधायि ॥

एह या॑तं प॒थिभि॑र्दे॒वया॑नै॒र्वि॒द्याम॒षं वृ॒जनं॑ जी॒रदा॑नुम् ॥ ६ ॥

अतारिष्म तमसः पारं अस्य प्रति वां स्तोमः अश्विनौ अधायि ।

आ इह यातं पथिऽभिः देवऽयानैः विद्याम एषं वृजनं जीरऽदानुम् ॥ ६ ॥

आम्हीं आतां अज्ञान अंधःकाराच्या पलिकडे जाऊन पोहोंचलो. तेव्हां हे अश्वीदेवांनो, यथामति केलेलें हें तुमचे गुणवर्णन तुम्हांलाच अर्पण असो. दिव्य जनांना प्रिय अशा मार्गांनी इकडे आमच्याकडे या म्हणजे तात्काळ फलद्रुप होणारा असा तुमचा आश्रय आम्हांस लाभो. ॥ ६ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १८४ (अश्विनौ सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : अश्विनौ - छंद - त्रिष्टुभ्

ता वा॑म॒द्य ताव॑प॒रं हु॑वेमो॒च्छन्त्या॑मु॒षसि॒ वह्नि॑रु॒क्थैः ॥

नास॑त्या॒ कुह॑ चि॒त्सन्ता॑व॒र्यो दि॒वो नपा॑ता सु॒दास्त॑राय ॥ १ ॥

ता वां अद्य तौ अपरं हुवेम उच्छन्त्यां उषसि वह्निः उक्थैः ।

नासत्या कुह चित् सन्तौ अर्यः दिवः नपाता सुदाःऽतराय ॥ १ ॥

सत्य स्वरूप अश्वीदेव हो, हा येथें हवि अर्पण करणारा ऋत्विज् उभा आहे. तुम्हीं परम विख्यात, तेव्हां आम्हीं भक्तजन उषःकाल होतांच तुमचे स्वागत स्तोत्रांनीं, आज काय आणि उद्यां काय, नेहमींच करूं. हे आकाशांत

प्रकट होणाऱ्या देवांनो, तुम्हीं कोठेंहि असलात तरी आम्हीं उपासनानिष्ठ होऊन दानशील यजमानासाठीं तुम्हांस हवि अर्पण करतों. ॥ १ ॥

अ॒स्मे ऊ॒ षु वृ॑षणा मादयेथा॒मुत्प॒णीँर्ह॑तमू॒र्म्या मद॑न्ता ॥

श्रु॒तं मे॒ अच्छो॑क्तिभिर्मती॒नामेष्टा॑ नरा॒ निचे॑तारा च॒ कर्णैः॑ ॥ २ ॥

अस्मे इति ऊं इति सु वृषणा मादयेथां उत् पणीन् हतं ऊर्म्या मदन्ता ।

श्रुतं मे अच्छोक्तिऽभिः मतीनां एष्टा नरा निऽचेतारा च कर्णैः ॥ २ ॥

वीर्यशाली अश्वी देवांनों, तुम्हीं आमच्या यज्ञांत आनंद-भरीत व्हा आणि भक्त प्रेमाच्या उमाळ्यानें हर्ष निर्भर होऊन दानधर्म न करणाऱ्या कवडी चुंबक दुष्टाचा निःपात करा. हे शूरांनों, उत्कृष्ट स्तवनांनीं युक्त अशा उपासनेचा स्वीकार करणारे आणि त्यांचा भाव उत्तम तऱ्हेने जाणणारे असे तुम्हीं आपल्या कानांनीं माझा धांवा ऐकून घ्या. ॥ २ ॥

श्रि॒ये पू॑षन्निषु॒कृते॑व दे॒वा नास॑त्या वह॒तुं सू॒र्यायाः॑ ॥

व॒च्यन्ते॑ वां ककु॒हा अ॒प्सु जा॒ता यु॒गा जू॒र्णेव॒ वरु॑णस्य॒ भूरे॑ः ॥ ३ ॥

श्रिये पूषन् इषुकृताऽइव देवा नासत्या वहतुं सूर्यायाः ।

वच्यन्ते वां ककुहाः अप्ऽसु जाताः युगा जूर्णाऽइव वरुणस्य भूरेः ॥ ३ ॥

हे सर्व पोषक देवा, बाणा प्रमाणें वेगानें जाणाऱ्या अश्वी देवांनां सूर्यादेवीच्या विवाहाला घेऊन जाण्यासाठीं त्यांचे स्तवन भक्तजन गात आहेत. हे अश्विदेवांनों अंतरिक्षांत प्रकट झालेले हे तुमचे नामांकित विशाल अश्व त्या सर्व समर्थ वरुणाच्या अश्वांच्या पुरातन जोडी प्रमाणेंच अगदीं वाखाणण्या योग्य आहेत. ॥ ३ ॥

अ॒स्मे सा वां॑ माध्वी रा॒तिर॑स्तु॒ स्तोमं॑ हिनोतं मा॒न्यस्य॑ का॒रोः ॥

अनु॒ यद् वां॑ श्र॒व॒स्या सुदानू सु॒वीर्या॑य चर्॒षणयो॒ मद॑न्ति ॥ ४ ॥

अस्मे इति सा वां माध्वी इति रातिः अस्तु स्तोमं हिनोतं मान्यस्य कारोः ।

अनुं यत् वां श्रवस्या सुदानू इति सुऽदानू सुऽवीर्याय चर्षणयः मदन्ति ॥ ४ ॥

मधुर रस-प्रिय देवांनों, तो तुमचा अवर्णनीय प्रसाद आम्हांवर होवो; सन्मान्य अशा ह्या तुमच्या कवीच्या स्तोत्रांचा प्रभाव गाजवा. हे अत्युदार देवांनों, उत्कृष्ट प्रतीचें शौर्य बल लाभावें म्हणून सर्व उपासक जन तुमच्याच कीर्तन श्रवणांत तल्लीन होत असतात. ॥ ४ ॥

एष वां स्तोमौ अश्विनावकारि मानेभिर्मघवाना सुवृक्ति ॥

यातं वर्तिस्तनयाय त्मने चागस्त्ये नासत्या मदन्ता ॥ ५ ॥

एषः वां स्तोमः अश्विनौ अकारि मानेभिः मघऽवाना सुऽवृक्ति ।

यातं वर्तिः तनयाय त्मने च अगस्त्ये नासत्या मदन्ता ॥ ५ ॥

औदार्यशाली अश्वी देवहो, मानपुत्रांनीं तुमचें हें स्तुतीगान तुमच्या प्रीत्यर्थ शुद्धान्तःकरणानें गायिलेले आहे. नासत्यहो, आमच्या आणि आमच्या पुत्रपौत्रांच्या कल्याणार्थ घरीं या आणि ह्या अगस्त्य ऋषीवर आपली मर्जी सुप्रसन्न ठेवा. ॥ ५ ॥

अतारिष्म तमसस्पारमस्य प्रति वां स्तोमौ अश्विनावधायि ॥

एह या॑तम् प॒थिभि॑र्देव॒यानै॑र्वि॒द्याम॒षं वृ॒जनं॑ जी॒रदा॑नुम् ॥ ६ ॥

अतारिष्म तमसः पारं अस्य प्रति वां स्तोमः अश्विनौ अधायि ।

आ इह यातं पथिऽभिः देवऽयानैः विद्याम एषं वृजनं जीरऽदानुम् ॥ ६ ॥

आम्हीं आतां ह्या अज्ञान अंधःकाराच्या तर पार पडलोंच. कारण, हे अश्विदेवांनो आमच्या मुखानें तुमच्या प्रीत्यर्थ स्तोत्रगायन केलेलें आहे. तुम्हां देवांना जे उचित दिसतात, त्या मार्गानें आमच्याकडे या, म्हणजे तात्काळ फलद्रूप होणारा असा तुमचा उत्साहवर्धक आश्रय आम्हांस प्राप्त होईल. ॥ ६ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १८५ (द्यावापृथिवी सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : द्यावापृथिव्यौ - छंद - त्रिष्टुभ्

कतरा पूर्वा कतरापरायोः कथा जाते कवयः को वि वेद ॥

विश्वं त्मना बिभृतो यद्ध नाम वि वर्तेते अहनी चक्रियेव ॥ १ ॥

कतरा पूर्वा कतरा अपरा अयोः कथा जाते इति कवयः कः वि वेद ।

विश्वं त्मना बिभृतः यत् ह नाम वि वर्तेते इति अहनी चक्रियाऽइव ॥ १ ॥

ज्ञानीजन हो ! ह्या दोघीजणींतून आधींची कोण आणि नंतरची कोण, व ह्या कशा उत्पन्न झाल्या हें कोणालातरी माहीत असेल काय ? ह्यांनीं स्वतः सर्व विश्वाला धारण केलें असून, दिवस व रात्र ही जोडी चक्राप्रमाणें फिरत असते. ॥ १ ॥

भूरिं द्वे अचरन्ती चरन्तं पद्वन्तं गर्भमपदी दधाते ॥

नित्यं न सूनुं पित्रोरुपस्थे द्यावा रक्षतं पृथिवी नो अभ्वात् ॥ २ ॥

भूरिं द्वे इति अचरन्ती इति चरन्तं पत्ऽवंतं गर्भं अपदी इति दधाते इति ।

नित्यं न सूनुं पित्रोः उपऽस्थे द्यावा रक्षतं पृथिवी नः अभ्वात् ॥ २ ॥

जरी ह्या आपणा मनुष्यांप्रमाणें पायांनीं चालत नाहींत, कारण ह्यांस पाय नाहींत, तरी पायांनी चालणारे हजारों प्राणी ह्या दोघीजणी धारण करीत आहेत. तर औरस पुत्र जसा आई बापांच्या मांडीवर लडिवाळ पणानें लोळतो, त्याप्रमाणें हे द्यावापृथिवी हो, आम्हांस मांडीवर घेऊन भयंकर संकटापासून आमचें रक्षण करा. ॥ २ ॥

अ॒ने॒हो दा॒त्रमदि॑तेरन॒र्वं हु॒वे स्व॑र्वदव॒धं नम॑स्वत् ॥

तद्रो॑दसी जनयतं जरि॒त्रे द्यावा॒ रक्ष॑तं पृथिवी नो॒ अभ्वा॑त् ॥ ३ ॥

अनेहः दात्रं अदितेः अनर्वं हुवे स्वःवत् अवधं नमस्वत् ।

तत् रोदसी इति जनयतं जरित्रे द्यावा रक्षतं पृथिवी इति नः अभ्वात् ॥ ३ ॥

अदितीचें, म्हणजे ईश्वराच्या अनंत शक्तिचें, दातृत्व त्याच्या आयुधाप्रमाणेंच निष्कलंक अप्रतिहत, अक्षय्य आणि दिव्य-तेजोमय आहे. त्याच्या प्राप्ती करितां नम्रपणानें हवि अर्पण करून प्रार्थना करीत आहे. तर हे अंतरालस्थ

देवतांनों, हे द्‍यावापृथिवीनों, मज भक्ताला तें ईश्वराचें कृपाछत्र प्राप्त करून द्‍या आणि भयंकर संकटापासून रक्षण करा. ॥ ३ ॥

अतप्यमाने अवसावन्ती अनु ष्याम रोदसी देवपुत्रे ॥

उभे देवानामुभयेभिरह्नां द्यावा रक्षतं पृथिवी नो अभ्वात् ॥ ४ ॥

अतप्यमाने इति अवसा अवन्ती इति अनु स्याम रोदसी इति देवपुत्रे इति देवऽपुत्रे ।

उभे इति देवानां उभयेभिः अह्नां द्यावा रक्षतं पृथिवी इति नः अभ्वात् ॥ ४ ॥

ह्यांना कोणतीहि पिडा होऊं शकत नाहीं, ह्या सर्व देवतांच्या जननी व आपल्या कृपेनें भक्तांचे पालन करीत असतात. तर अशा देवींच्या अनुरोधानें आम्हीं चालावें हेंच योग्य आहे. तुम्हीं दोघीही आलटून पालटून रात्रंदिवस देवामध्येंच असतां तर हे द्‍यावापृथिवीहो, भयंकर संकटापासून आमचें रक्षण करा. ॥ ४ ॥

सङ्गच्छमाने युवती समन्ते स्वसारा जामी पित्रोरुपस्थे ॥

अ॒भि॒जिघ्र॑न्ती॒ भुव॑नस्य॒ नाभि॒ं द्यावा॒ रक्ष॑तं पृथिवी नो॒ अभ्वा॑त् ॥ ५ ॥

सङ्गच्छमाने इति सऽगच्छमाने युवती समन्ते इति संऽअंते स्वसारा जामी इति पित्रोः उपऽस्थे ।

अभिजिघ्रन्ती इत्यभिऽजिघ्रंती भुवनस्य नाभिं द्यावा रक्षतं पृथिवी इति नः अभ्वात् ॥ ५ ॥

तुम्हीं एकमेकी नेहमीं अगदी बरोबर असता. तुम्ही तरुण असून दोघींच्या सीमा इतक्या एकत्र आहेत, कीं तुम्हीं जणों परस्पर बहिणी किंवा आप्त आहात. त्यामुळें आईबापांच्या मांडीवर खेळणारा असा जो सर्व भुवनांचा मध्यवर्ती धुरीण आहे त्याचें प्रेमानें चुंबन घेतां तर हे द्यावापृथिवीहो, भयंकर संकटापासून आमचें रक्षण करा. ॥ ५ ॥

उ॒र्वी सद्म॑नी बृह॒ती ऋ॒तेन॑ हु॒वे दे॒वाना॒मव॑सा॒ जनि॑त्री ॥

द॒धाते॒ ये अ॒मृत॑ं सु॒प्रती॑के॒ द्यावा॒ रक्ष॑तं पृथिवी नो॒ अभ्वा॑त् ॥ ६ ॥

उर्वी इति सद्मनी इति बृहती इति ऋतेन हुवे देवानां अवसा जनित्री इति ।

दधाते इति ये इति अमृतं सुप्रतीके इति सुऽप्रतीके द्यावा रक्षतं पृथिवी इति नः अभ्वात् ॥ ६ ॥

ज्या अत्यंत विस्तीर्ण, सर्वांचे अधिष्ठान अवाढव्य आणि देवांवरील प्रेमामुळें ज्या देवांच्या जननी म्हणून प्रख्यात आहेत, त्या द्यावापृथिवींची ह्या यज्ञरूपी सत्यमार्गानें मी प्रार्थना करतों. त्या अत्यंत मोहक असून भक्तांकरितां, आपल्या जवळ अमृत ठेवतात. तर द्यावापृथिवीहो, भयंकर संकटापासून आमचें रक्षण करा. ॥ ६ ॥

उर्वी पृथ्वी बहुले दूरेअन्ते उप ब्रुवे नमसा यज्ञे अस्मिन् ॥

दधाते ये सुभगे सुप्रतूर्ती द्यावा रक्षतं पृथिवी नो अभ्वात् ॥ ७ ॥

उर्वी इति पृथ्वी इति बहुले इति दूरेअन्ते इति दूरेऽअंते उप ब्रुवे नमसा यज्ञे अस्मिन् ।

दधाते इति ये इति सुभगे इति सुऽभगे सुप्रतूर्ती इति सुऽप्रतूर्ती द्यावा रक्षतं पृथिवी इति नः अभ्वात् ॥ ७ ॥

ज्या अति विस्तीर्ण, अत्यंत विशाल आणि अमर्याद आहेत, त्या ह्या देवतांनां ह्या यज्ञांत मी अतिशय नम्रपणानें प्रार्थना करतों; कीं तुम्ही भाग्यदायक आणि सहजगत्या यश मिळवून देणाऱ्या अशा हे द्यावापृथिवीहो, भयंकर संकटापासून आमचें रक्षण करा. ॥ ७ ॥

देवान्वा यच्चकृमा कच्चिदागः सखायं वा सदमिज्जास्पतिं वा ॥

इयं धीर्भूया अवयानमेषां द्यावा रक्षतं पृथिवी नो अभ्वात् ॥ ८ ॥

देवान् वा यत् चकृम कत् चित् आगः सखायं वा सदं इत् जाःऽपतिं वा ।

इयं धीः भूयाः अवऽयानं एषां द्यावा रक्षतं पृथिवी इति नः अभ्वात् ॥ ८ ॥

आम्ही देवांचे जे जे कांहीं अपराध केले असतील, अथवा मित्रद्रोह अगर स्वामीद्रोह केला असेल तर आम्हीं एकाग्रतेनें म्हटलेलें हें स्तोत्र त्या सर्व पातकांची निष्कृति करो आणि हे द्यावापृथिवीहो, तुम्हींही भयंकर संकटापासून आमचें रक्षण करा. ॥ ८ ॥

उभा शंसा नर्या मामविष्टामुभे मामूती अवसा सचेताम् ॥

भूरि चिद् अर्यः सुदास्तरायेषा मदन्त इषयेम देवाः ॥ ९ ॥

उभा शंसा नर्या मां अविष्टां उभे इति मां ऊती इति अवसा सचेताम् ।

भूरि चित् अर्यः सुदाःतराय इषा मदन्त इषयेम देवाः ॥ ९ ॥

परम स्तुत्य आणि मनुष्यहितकर अशा ह्या दोघीही माझें रक्षण करोत, आपल्या सहाय्य तत्परतेनें व कृपाळूपणानें माझ्या पाठीशी निरंतर राहोत, आणि हे देवांनों आम्हीं भक्तजन तत्वाढ्यतेनें हर्षभरीत होऊन आमच्या दानशूर यजमानंकरितां आमच्या प्रार्थनेनें तुमचीं मनें आकर्षण करूं शकूं असें करा. ॥ ९ ॥

ऋतं दिवे तदवोचम् पृथिव्या अभिश्रावाय प्रथमं सुमेधाः ॥

पातामवद्याद्दुरिताद् अभीके पिता माता च रक्षताम् अवोभिः ॥ १० ॥

ऋतं दिवे तत् अवोचं पृथिव्यै अभिऽश्रावाय प्रथमं सुऽमेधाः ।

पातां अवद्यात् दुःइतात् अभीके पिता माता च रक्षतांम् अवःऽभिः ॥ १० ॥

त्यांच्याच कृपेनें मी अत्यंत बुद्धिमान होऊन हें सत्यार्थपूर्ण स्तोत्र द्यावापृथिवीनीं सर्वांच्या अगोदर स्वस्थपणें ऐकून घ्यावें म्हणूनच म्हटलें. तरी सर्व पातका पासून आणि दुःखापासून त्या आमचें रक्षण करोत व ते आईबापाप्रमाणे आपल्या कृपाकटाक्षानें आमचा सांभाळ करोत. ॥ १० ॥

इ॒दं द्या॑वापृथिवी स॒त्यम॑स्तु॒ पित॒र्मात॒र्यदि॒होप॑ब्रु॒वे वा॑म् ॥

भू॒तं दे॒वाना॑मव॒मे अवो॑भिर्वि॒द्यामे॒षं वृ॒जनं॑ जी॒रदा॑नुम् ॥ ११ ॥

इदं द्यावापृथिवी इति सत्यं अस्तु पितः मातः यत् इह उपऽब्रुवे वाम् ।

भूतं देवानां अवमे इति अवःऽभिः विद्याम एषं वृजनं जीरऽदानुम् ॥ ११ ॥

हे द्यावापृथिवीहो, ही जी तुमची मी प्रार्थना केली आहे त्या प्रमाणें, हे माझ्या आई बापांनों, खरोखर घडून येवो. देवांपेक्षांहि आम्हांलाच प्रेमानें अगदी जवळ घ्या म्हणजे तात्काळ फलद्रूप होणारा असा तुमचा तो उत्साहप्रद आश्रय आम्हांला प्राप्त होईल. ॥ ११ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १८६ (विश्वेदेव सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : विश्वेदेवाः - छंद - त्रिष्टुभ्

आ न इळाभिर्विदथे सुशस्ति विश्वानरः सविता देव एतु ॥

अपि यथा युवानो मत्सथा नो विश्वं जगदभिपित्वे मनीषा ॥ १ ॥

आ न इळाभिः विदथे सुऽशस्ति विश्वानरः सविता देव एतु ।

अपि यथा युवानः मत्सथ नः विश्वं जगत् अभिऽपित्वे मनीषा ॥ १ ॥

सकल लोक प्रभु आणि दैदिप्यमान असा सर्व प्रेरक सविता हा त्याच्या प्रीत्यर्थ केलेल्या उत्कृष्ट स्तवनानें व यशोवर्धक आहुतींनी संतुष्ट होऊन ह्या आमच्या यज्ञमंडपांत येवो म्हणजे मग हे नित्यतरुण देवांनो, तुम्ही येतांच ज्ञानदानानें आम्हांला आणि सर्व जगताला आनंदितच कराल. ॥ १ ॥

आ नो विश्व आस्क्रा गमन्तु देवा मित्रो अर्यमा वरुणः सजोषाः ॥

भुवन्यथा नो विश्वे वृधासः करन्त्सुषाहा विथुरं न शवः ॥ २ ॥

आ नः विश्वे आस्क्राः गमन्तु देवाः मित्रः अर्यमा वरुणः सऽजोषाः ।

भुवन् यथा नः विश्वे वृधासः करन् सुऽसहा विथुरं न शवः ॥ २ ॥

एकरूप झलेले सर्व देव आणि मित्र अर्यमारूप व दयाघन असा वरुण हे आमच्याकडे येवोत; म्हणजे हे आमचा सर्व प्रकारे उत्कर्ष होईल असें करतील, आणि आपल्या प्रभावानें आमचे सामर्थ्य लटपटीत होऊं देणार नाहींत. ॥ २ ॥

प्रेष्ठं॑ वो॒ अति॑थिं गृणीषेऽ॒ग्निं श॒स्तिभि॑स्तु॒र्वणिः॑ स॒जोषाः॑ ॥

अस॒द्यथा॑ नो॒ वरु॑णः सुकी॒र्तिरिष॑श्च पर्षदरिगू॒र्तः सू॒रिः ॥ ३ ॥

प्रेष्ठं वः अतिथिं गृणीषे अग्निं शस्तिऽभिः तुर्वणिः सऽजोषाः ।

असत् यथा नः वरुणः सुऽकीर्तिः इषः च पर्षत् अरिऽगूर्तः सूरिः ॥ ३ ॥

तुमचा पाहुणा आणि आम्हांस अत्यंत प्रिय अशा अग्निचें यशोवर्णन करून मी स्तवन करतों. तो भक्त संकट निवारणार्थ त्वरेनें धांव घेणारा व दयाघन आहे. त्याचें स्तवन केलें असतां पुण्यलोक देवाधिदेव वरुणरूप ईश्वर हा आपलासा होईल आणि तो भक्तजन-स्तुत देव आम्हांला उत्साह व सामर्थ्य प्राप्त करून देईल. ॥ ३ ॥

उप॑ व ए॒षे नम॑सा जिगी॒षोषासा॒नक्ता॑ सु॒दुघे॑व धे॒नुः ॥

स॒मा॒ने अह॑न्वि॒मिमा॑नो अ॒र्कं विषु॑रूपे॒ पय॑सि॒ सस्मि॒न्नूध॑न् ॥ ४ ॥

उप वः आ ईषे नमसा जिगीषा उषसानक्ता सुदुघाऽइव धेनुः ।

समाने अहन् विऽमिमानः अर्कं विषुऽरूपे पयसि सस्मिन् ऊधन् ॥ ४ ॥

रात्र व उषा देवीनों, भक्तांना अभीष्ट अशा भरपूर दुग्ध देणाऱ्या तुम्ही धेनूंच आहांत, तर आमचा इष्ट हेतु पराक्रमानें साध्य करून घेण्याच्या इच्छेनें मी तुमच्या चरणीं वंदन करीत तुम्हांकडे आलों आहे. तुम्हीं आपल्या पयोधरांत एकाच वेळीं निरनिराळ्या प्रकारचें इच्छित लाभरूप दुग्ध उत्पन्न करूं शकतां, परंतु मला मात्र एकाच वेळीं एकाच प्रकारचें स्तोत्र करतां येतें. ॥ ४ ॥

उत नोऽ॑हिर्बु॒ध्न्यो३॑मय॑स्कः॒ शिशुं॒ न पि॒प्युषी॑व वेति॒ सिन्धुः॑ ॥

येन॒ नपा॑तम॒पां जु॒नाम॑ मनो॒जुवो॒ वृष॑णो॒ यं वह॑न्ति ॥ ५ ॥

उत नोः अहिः बुध्न्यः मयः करिति कः शिशुं न पिप्युषीऽइव वेति सिन्धुः ।

येन नपातं अपां जुनाम मनःऽजुवः वृषणः यं वहन्ति ॥ ५ ॥

तसेंच अहिर्बुध्न्य हें महदाकाश आमचें कल्याण करो म्हणजे वासरास स्तन पान करविण्याकरितां गाय धांव घेते त्याप्रमाणें ही आकाश गंगा आमच्याकडे येईल म्हणजे मग आकाशोदकांत प्रादुर्भूत होणाऱ्या अग्निचे आम्हीं स्तवन करूं. उमदे आणि मनाप्रमाणें वेगवान असे घोडे ह्या अग्नीचा रथ ओढीत असतात. ॥ ५ ॥

उ॒त न॑ ईं॒ त्वष्टा ग॒न्त्वच्छा॒ स्मत्सू॒रिभि॑रभिपि॒त्वे स॒जोषाः॑ ॥

आ वृ॑त्र॒हेन्द्र॑श्चर्षणि॒प्रास्तु॒विष्ट॑मो न॒रां न॑ इ॒ह ग॑म्याः ॥ ६ ॥

उत नः ईं त्वष्टा गन्तु अच्छ स्मत् सूरिऽभिः अभिऽपित्वे सऽजोषाः ।

आ वृत्रऽहा इन्द्रः चर्षणिऽप्राः तुविःऽतमः नरां नः इह गम्याः ॥ ६ ॥

तसेंच आपल्या बरोबर ज्ञानी विभूतींस घेऊन हा दयाळु त्वष्टा आमच्याकडे येवो, आणि वृत्रहंता, जगद्व्यापक, आणि वीरांमध्यें अत्यंत पराक्रमी असा वीर इंद्रही आम्हांकडे येवो. ॥ ६ ॥

उत नं ईम् मतयोऽश्वयोगाः शिशुं न गावस्तरुणं रिहन्ति ॥

तमीं गिरो जनयो न पत्नीः सुरभिष्टमं नरां नसन्त ॥ ७ ॥

उत नः ईं मतयः अश्वऽयोगाः शिशुं न गावः तरुणं रिहन्ति ।

तं ईं गिरः जनयः न पत्नीः सुरभिःऽतमं नरां नसन्त ॥ ७ ॥

मनोरूप अश्वाला लगामीं लावणाऱ्या ह्या इंद्राची दयार्द्रबुद्धि, गाई जशा आपल्या लहान बालकास चाटतात, त्याप्रमाणें आम्हांला प्रमुदित करोत. कारण नववधू प्रमाणें आमची वाणीहि सर्व वीरांत जो अत्यंत प्रशंसनीय आहे अशा त्या इंद्रालाच आलिंगन देणार ह्यांत संशय नाहीं. ॥ ७ ॥

उ॒त न॑ ईम् म॒रुतो॑ वृ॒द्धसे॑ना॒ः स्मद्रोद॑सी॒ सम॑नसः सदन्तु ॥

पृष॑दश्वासोऽ॒वन॑यो॒ न रथा॑ रि॒शाद॑सो मित्र॒युजो॒ न दे॒वाः ॥ ८ ॥

उत नः ईं मरुतः वृद्धऽसेनाः स्मत् रोदसी इति सऽमनसः सदन्तु ।

पृषत्ऽअश्वासः अवनयः न रथाः रिशादसः मित्रऽयुजः न देवाः ॥ ८ ॥

तसेंच ज्यांची सेना मोठी प्रचंड आहे आणि जे आपल्या रोदसी स्त्रीसह अगदी एक विचारानें चालतात असे मरुत् आमच्या जवळ येऊन बसोत. ह्याच्या रथाला पाण्याच्या झोताप्रमाणें (वेगानें धांवणारे) ठिपक्या ठिपक्यांचे घोडे जोडले आहेत. हे देव शत्रुनाशक आणि त्या मित्ररूप इंद्राशीं जणूं एकरूप झालेले आहेत. ॥ ८ ॥

प्र नु यदे॑षाम् महि॒ना चि॑कि॒त्रे प्र यु॑ञ्जते प्र॒युज॒स्ते सु॑वृ॒क्ति ॥

अध॒ यदे॑षां सु॒दिने॒ न शरु॒र्विश्व॒मेरि॑णं प्रु॒षा॒यन्त॒ सेना॑ः ॥ ९ ॥

प्र नु यत् एषां महिना चिकित्रे प्र युञ्जते प्रऽयुजः ते सुऽवृक्ति ।

अध यत् एषां सुऽदिने न शरुः विश्वं आ इरिणं प्रुषायन्त सेनाः ॥ ९ ॥

पवित्र अंतःकरणांनी केलेल्या प्रार्थनांस मान देऊन त्यांनी आपले अश्व जोडल्याबरोबर ते आपल्या सामर्थ्याने विभूषित होतात आणि सूर्याचा उज्ज्वल प्रकाश पडला असेल अशा दिवशीं त्यांची सेना विद्युल्लते सहवर्तमान झपाट्यानें खालीं येऊन जमीन व ओढे ह्यांना पाण्यानें भरून टाकतात. ॥ ९ ॥

प्रो अ॒श्विना॒वव॑से कृणु॒ध्वं॒ प्र पू॒षणं॒ स्वत॑वसो॒ हि सन्ति॑ ॥

अ॒द्वे॒षो विष्णु॒र्वात॑ ऋभु॒क्षा अच्छा॑ सु॒म्नाय॑ ववृतीय दे॒वान् ॥ १० ॥

प्रो इति अश्विनौ अवसे कृणुध्वं प्र पूषणं स्वऽतवसः हि सन्ति ।

अद्वेषः विष्णुः वातः ऋभुक्षाः अच्छ सुम्नाय ववृतीय देवान् ॥ १० ॥

ऋत्विजांनो, देवांची कृपा व्हावी म्हणून अश्वी देवांस प्रसन्न करा. पूषादेव ह्यालाहि प्रसन्न करा. कारण हे सर्व स्वतःच्याच बलानें मंडित आहेत. तसेंच विष्णु, वायुदेव आणि ऋभूंचा नायक इंद्र हे ही अजात शत्रु होत. तेव्हां आमच्या आत्यंतिक हितासाठीं सर्व देवांना इकडे घेऊन येईल असें घडो. ॥ १० ॥

इयं सा वो अस्मे दीधितिर्यजत्रा अपिप्राणी च सदनी च भूयाः ॥

नि या देवेषु यतते वसूयुर्विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥ ११ ॥

इयं सा वः अस्मे इति दीधितिः यजत्राः अपिऽप्राणी च सदनी च भूयाः ।

नि या देवेषु यतते वसुऽयुः विद्याम एषं वृजनं जीरऽदानुम् ॥ ११ ॥

हे सर्ववंद्य देवांनो, ही तुमची आम्हीं एकाग्रतेनें प्रार्थना केली आहे तींत तुमच्या कृपेने खरे चैतन्य उत्पन्न होऊन ती तुमचे अधिष्ठान होवो. कारण ही प्रार्थना परम वस्तूची लालसा धरून तुम्हां देवांकडे जाण्याचाच प्रयत्न करीत असते. तर आम्हांला तात्काळ फलद्रूप होणारा असा तुमचा उत्साहप्रद आश्रय प्राप्त होवो. ॥ ११ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १८७ (अन्नस्तुति सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : अन्न - छंद - अनुष्टुप्, गायत्री

पि॒तुं नु स्तो॑षं म॒हो ध॒र्माणं॒ तवि॑षीम् । यस्य॑ त्रि॒तो व्योज॑सा वृ॒त्रं विप॑र्वम॒र्दय॑त् ॥ १ ॥

पितुं नु स्तोषं महः धर्माणं तविषीम् ।

यस्य त्रितः वि ओजसा वृत्रं विऽपर्वं अर्दयत् ॥ १ ॥

सोमाच्या पोषक तत्त्वाचें मी आतां स्तवन केलें पाहिजे. सामर्थ्यवान् पुरुषांच्या शक्तीससुद्धां हें पुष्ट करतें, आणि त्याच्या प्रबल शक्तीच्या योगानें त्रितास आपल्या शत्रूचें ताडन व वध करतां आला. ॥ १ ॥

स्वादो॑ पितो॒ मधो॑ पितो व॒यं त्वा॑ ववृमहे । अ॒स्माक॑मवि॒ता भ॑व ॥ २ ॥

स्वादो इति पितो इति मधो इति पितो इति वयं त्वा ववृमहे ।

अस्माकं अविता भव ॥ २ ॥

हे सुखदायक पेया, हे मधुर रसा, आम्हीं तुझीच इच्छा करीत आहोंत, तर तूं आमचा दयाळू रक्षणकर्ता हो. ॥ २ ॥

उप नः पितवा चर शिवः शिवाभिरूतिभिः । मयोभुरद्विषेण्यः सखा सुशेवो अद्वयाः ॥ ३ ॥

उप नः पितो इति आ चर शिवः शिवभिः ऊतिऽभिः ।

मयःऽभुः अद्विषेण्यः सखा सुऽशेवः अद्वयाः ॥ ३ ॥

हे उत्कृष्ट रसा, तूं आपल्या उत्कृष्ट चमसांसह आमचे समीप ये. तूं हितकारकर, मित्रत्वास योग्य आणि मत्सररहित आहेस. तुला दुटप्पी वर्तन माहित नाहीं. ॥ ३ ॥

तव त्ये पितो रसा रजांस्यनु विष्ठिताः । दिवि वाता इव श्रिताः ॥ ४ ॥

तव त्ये पितो इति रसा रजांसि अनु विऽस्थिताः ।

दिवि वाताःऽइव श्रिताः ॥ ४ ॥

हे पेया, आकाशांत संचार करणाऱ्या वायूप्रमाणें तुझा अर्क रजोलोकांत सर्वत्र व्याप्त झालेला आहे. ॥ ४ ॥

तव त्ये पितो ददतस्तव स्वादिष्ठ ते पितो । प्र स्वाद्मानो रसानां तुविग्रीवा इवेरते ॥ ५ ॥

तव त्ये पितो इति ददतः तव स्वादिष्ठ ते पितो इति ।

प्र स्वाद्मानः रसानां तुविग्रीवाःऽइव ईरते ॥ ५ ॥

हे उदार पेया, हे अतिमधुर रसा, तुझ्या रुचकर अर्कांचें जे प्राशन करतात ते, चालत असतांना ज्यांची गर्दन भरलेली आहे अशा, मल्लांप्रमाणें दिसतात. ॥ ५ ॥

त्वे पि॑तो म॒हानां॑ दे॒वाना॒म् मनो॑ हि॒तम् । अका॑रि॒ चारु॑ के॒तुना॒ तवाहि॒मव॑सावधीत् ॥ ६ ॥

त्वे इति पितो इति महानां देवानां मनः हितम् ।

अकारि चारु केतुना तव अहिं अवसा अवधीत् ॥ ६ ॥

हे रसा, त्या श्रेष्ठ देवाचें मन तुझ्यावर बसलेले आहे. तुझ्या सहाय्यानें त्यानें अहिचा जो वध केला त्यासारखें सत्कृत्य तुझ्या स्फुरणामुळें घडून येत असतें. ॥ ६ ॥

यद॒दो पि॑तो॒ अज॑गन्वि॒वस्व॒ पर्व॑तानाम् । अत्रा॑ चिन्नो मधो पि॒तोऽ॑रम् भ॒क्षाय॑ गम्याः ॥ ७ ॥

यत् अदः पितो इति अजगत् विवस्व पर्वतानाम् ।

अत्र चित् नः मधो इति पितो इति अरं भक्षाय गम्याः ॥ ७ ॥

हे रसा, जरी मेघांच्या चकाकणाऱ्या पाण्याशीं तुझें एकीकरण केलें तथापि, हे मधुर पेया तेथूनही आम्हांकडे भरपूर वहात ये. ॥ ७ ॥

यदपामोषधीनां परिंशमारिशामहे । वातापे पीव इद्भव ॥ ८ ॥

यत् अपा ओषधीनां परिंशं आऽरिशामहे ।

वातापे पीवः इत् भव ॥ ८ ॥

हे सर्वव्यापी पेया, आम्ही उदकें अथवा वनस्पती यांचे कितीही सेवन केलें तथापि त्यांतील पोषक तत्त्व तूंच हो. ॥ ८ ॥

यत्ते सोम गवाशिरो यवाशिरो भजामहे । वातापे पीव इद्भव ॥ ९ ॥

यत् ते सोम गोऽआशिरः यवऽआशिरः भजामहे ।

वातापे पीवः इत् भव ॥ ९ ॥

हे सोमा, दहिदूध अगर धान्य ह्यांचे जे जे कांही पदार्थ आम्हीं खातों त्याचें हि पोषक-सार हे रसा, तूंच हो ॥ ९ ॥

क॒र॒म्भ ओष॑धे भव॒ पीवो॑ वृ॒क्क उ॑दार॒थिः । वाता॑पे॒ पीव॒ इद्भ॑व ॥ १० ॥

करम्भः ओषधे भव पीवः वृक्कः उदारथिः ।

वातापे पीवः इत् भव ॥ १० ॥

करंभ (लाडु इत्यादि पक्वान्नें हीं) सुद्धां, हे ओषधिरूप रसा, तूंच हो. आमच्या हृदयांतील जीवनरस तूंच आणि बुद्धिला उज्ज्वलता आणणाराही तूंच, तर हे सोमा, आमचें पोषक-सार तूंच हो. ॥ १० ॥

तं त्वा॑ व॒यं पि॑तो॒ वचो॑भि॒र्गावो॒ न ह॒व्या सु॑षूदिम । दे॒वेभ्य॑स्त्वा सध॒माद॑म॒स्मभ्यं॑ त्वा सध॒माद॑म् ॥ ११ ॥

तं त्वा वयं पितो इति वचःऽभिः गावः न हव्या सुसूदिम ।

देवेभ्यः त्वास्त्वा सधऽमादं अस्मभ्यं त्वा सधऽमादम् ॥ ११ ॥

ह्याप्रमणें हे पोषक रसा, गाईं पासून दूध मिळवावे त्याप्रमाणें आम्हीं स्तुति-स्तोत्रांनीं तुझ्यापासून सर्व प्रकारचीं होमद्रव्यें संपादन केलीं आहेत. तूं असा आहेस कीं, हवि ग्रहण करून तूं हर्षभरीत होतोस. त्याचप्रमाणे आम्हां भक्तांकरितांही आम्हांमध्यें मिळून मिसळून हर्षभरीत होत असतोस. ॥ ११ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १८८ (अग्निः सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : आप्रियः - छंद - गायत्री

समिद्धो अद्य राजसि देवो देवैः सहस्रजित् । दूतो हव्या कविर्वह ॥ १ ॥

संऽइद्धः अद्य राजसि देवः देवैः सहस्रऽजित् ।

दूतः हव्या कविः वह ॥ १ ॥

हे हजारों वीरांना पादाक्रांत करणाऱ्या अग्ने, देदिप्यमान असा तूं प्रज्वलित होऊन देवांसह राजाप्रमाणें शोभत आहेस, तर महाज्ञानी असा तूं आमचा प्रतिनिधी होऊन हा हविर्भाग देवांना पोंचव. ॥ १ ॥

तनूनपादृतं यते मध्वा यज्ञः समंज्यते । दधंत्सहस्रिणीरिषः ॥ २ ॥

तनूऽनपात् ऋतं यते मध्वा यज्ञः सं अज्यते ।

दधत् सहस्रिणीः इषः ॥ २ ॥

स्वयंभु अग्ने, सत्याचेंच आचरण करणाऱ्या आमच्या यजमानांसाठीं, ज्यापासून हजारों उत्साहप्रद लाभ प्राप्त होतात असा हा यज्ञ मधुर आहुतींनी यथासांग होत असतो. ॥ २ ॥

आजुह्वानो न ईड्यो देवाँ आ वंक्षि यज्ञियान् । अग्ने सहस्रसा असि ॥ ३ ॥

आऽजुह्वानः नः ईड्यः देवान् आ वक्षि यज्ञियान् ।

अग्ने सहस्रऽसाः असि ॥ ३ ॥

तुझ्यामध्यें हवन केलें आहें. परम स्तुत्य असा तूं पूज्य देवांना अमच्याकडे घेऊन येतोस हें योग्यच आहे, कारण हे अग्ने, हजारों वरदानें देणारा तूंच आहेस. ॥ ३ ॥

प्राचीनं बर्हिरोजसा सहस्रवीरमस्तृणन् । यत्रादित्या विराजथ ॥ ४ ॥

प्राचीनं बर्हिः ओजसा सहस्रऽवीरं अस्तृणन् ।

यत्र आदित्या विऽराजथ ॥ ४ ॥

हजारों शूरांत जो शूर आहे, त्यालाच बसण्यायोग्य असें हें कुशासन पूर्वेकडे दशाकरून आंथरलें आहे आणि तशाच आसनावर हे आदित्यानों, तुम्हीं आपल्या तेजानें शोभत आहां. ॥ ४ ॥

विराट् सम्राड्विभ्वीः प्रभ्वीर्बह्वीश्च भूयसीश्च याः । दुरो घृतान्यक्षरन् ॥ ५ ॥

विऽराट् संऽराट् विऽभ्वीः प्रऽभ्वीः बह्वीः च भूयसीः च याः ।

दुरः घृतानि अक्षरन् ॥ ५ ॥

महाराज्ञी चक्रवर्तिनी, विभाव युक्ता, प्रभाव शालिनी, बहु-संख्यांका, असंख्यांका अशा प्रकारच्या नांवाची यज्ञमंडपांचीं द्वारें घृताप्रमाणें स्निग्ध रसाचा वर्षाव करीत असतात. ॥ ५ ॥

सुरुक्मे हि सुपेशसाधि श्रिया विराजतः । उषासावेह सीदताम् ॥ ६ ॥

सुरुक्मे इति सूऽरुक्मे हि सुऽपेशसा अधि श्रिया विऽराजतः ।

उषसौ आ इह सीदताम् ॥ ६ ॥

सुंदर अलंकार घातलेल्या रूपवती उषा आपल्या लावण्यानें फारच सुशोभित दिसत आहेत, त्या येथें येऊन आसनावर बसोत. ॥ ६ ॥

प्रथमा हि सुवाचसा होतारा दैव्या कवी । यज्ञं नो यक्षतामिमम् ॥ ७ ॥

प्रथमा हि सुऽवाचसा होतारा दैव्या कवी इति ।

यज्ञं नः यक्षतां इमम् ॥ ७ ॥

ज्यांची वाणी उत्कृष्ट आहे, ते प्रज्ञावान् आणि सर्वांत पुरातन असे ते दोन दिव्य होते हा आमचा यज्ञ सांग करोत. ॥ ७ ॥

भारतीळे सरस्वति या वः सर्वा उपब्रुवे । ता नश्चोदयत श्रिये ॥ ८ ॥

भारती इळे सरस्वति याः वः सर्वाः उपऽब्रुवे ।

ताः नः चोदयत श्रिये ॥ ८ ॥

हे भारती इळे, सरस्वती तुम्हां सर्वांचीच प्रार्थना मी करीत आहें तर ऐश्वर्याकडे आमची प्रेरणा करा. ॥ ८ ॥

त्वष्टा रूपाणि हि प्रभुः पशून्विश्वान् समानजे । तेषां न स्फातिमा यज ॥ ९ ॥

त्वष्टा रूपाणि हि प्रऽभुः पशून् विश्वान् संऽआनजे ।

तेषां नः स्फातिं आ यज ॥ ९ ॥

प्राणिमात्राचा आकार घडविणारा त्वष्टा प्रभु हा पशुंनाही उत्पन्न करतो. त्यांची अभिवृद्धि व्हावी म्हणून त्या त्वष्टा प्रीत्यर्थ यजन करा. ॥ ९ ॥

उप त्मन्या वनस्पते पाथो देवेभ्यः सृज । अग्निर्हव्यानि सिष्वदत् ॥ १० ॥

उप त्मन्या वनस्पते पाथः देवेभ्यः सृज ।

अग्निः हव्यानि सिस्वदत् ॥ १० ॥

हे वृक्षराजा, तूं आपण स्वतः देवांकरितां हविरन्न उत्पन्न कर म्हणजे अग्नि त्या हविरन्नांत माधुर्य उत्पन्न करील. ॥ १० ॥

पुरोगा अग्निर्देवानां गायत्रेण समज्यते । स्वाहाकृतीषु रोचते ॥ ११ ॥

पुरःऽगाः अग्निः देवानां गायत्रेण सं अज्यते ।

स्वाहाऽकृतीषु रोचते ॥ ११ ॥

देवांमध्यें अग्रेसर असा हा अग्नि गायत्र गायनानें सत्कार पावत आहे. स्वाहा शब्दानें आहुति होतांच त्याचा प्रकाश अतिशयच उज्ज्वल होतो. ॥ ११ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १८९ (अग्निः सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : अग्निः - छंद - त्रिष्टुभ्

अग्ने॒ नय॑ सु॒पथा॑ रा॒ये अ॒स्मान् विश्वा॑नि देव व॒युना॑नि वि॒द्वान् ॥

यु॒यो॒ध्य१॑स्मज्जु॑हुरा॒णमेनो॒ भूयि॑ष्ठां ते॒ नम॑उक्तिं विधेम ॥ १ ॥

अग्ने नय सुऽपथा राये अस्मान् विश्वानि देव वयुनानि विद्वान् ।

युयोधि अस्मत् जुहुराणं एनः भूयिष्ठां ते नमःऽउक्तिं विधेम ॥ १ ॥

हे अग्निदेवा, सर्व प्रकारचे धर्म तूं जाणतोस, तर आम्हांस सन्मार्गानें श्रेष्ठ संपत्तिकडे ने. पातक हें मनुष्यास सन्मार्गापासून भ्रष्ट करतें; म्हणून तें आमच्यापासून दूर कर. आम्हीं नम्रपणानें तुझें अत्यंत उत्तम स्तवन करूं. ॥ १ ॥

अग्ने॒ त्वम् पा॑रया॒ नव्यो॑ अ॒स्मान्स्व॒स्तिभि॒रति॑ दु॒र्गाणि॒ विश्वा॑ ॥

पूश्च॑ पृ॒थ्वी ब॑हु॒ला न॑ उ॒र्वी भवा॑ तो॒काय॒ तन॑याय॒ शं योः ॥ २ ॥

अग्ने त्वं पारय नव्यः अस्मान् स्वस्तिऽभिः अति दुःऽगानि विश्वा ।

पूः च पृथ्वी बहुला नः उर्वी भव तोकाय तनयाय शं योः ॥ २ ॥

हे अग्नि, स्तवन करण्याला योग्य असा तूंच आहेस. मंगलकारक साधनांनीं आम्हांस सर्व संकटांच्या पार पाड आणि आमच्या पुत्रपौत्रादिकांचें दैव उघडून कल्याण व्हावें म्हणून तूं आम्हांस एखाद्या प्रचंड, अवाढव्य आणि अफाट प्राकाराप्रमाणें संरक्षक हो. ॥ २ ॥

अग्ने॒ त्वम॒स्मद्यु॑यो॒ध्यमी॑वा॒ अन॑ग्नित्रा अ॒भ्यम॑न्त कृ॒ष्टीः ॥

पुनर्स्मभ्यं सुवितायं देव क्षां विश्वेभिरमृतेभिर्यजत्र ॥ ३ ॥

अग्ने त्वं अस्मत् युयोधि अमीवाः अनग्निऽत्राः अभिऽअमन्त कृष्टीः ।

पुनः अस्मभ्यं सुविताय देव क्षां विश्वेभिः अमृतेभिः यजत्र ॥ ३ ॥

तसेंच हेअग्निदेवा सर्व व्याधि आमच्यापासून पार दूर पळवून लाव. हे अग्ने, तूं ज्यांचें रक्षण करीत नाहींस अशा मनुष्यांस त्या (व्याधि) बाधा करणार हे ठरलेलेंच आहे. परंतु हे परम पूज्य देवा, आमचें खरेंखरें कल्याण व्हावें म्हणून यच्चयावत् अमरविभूतींसह ह्या भूलोकीं ये ॥ ३ ॥

पाहि नौ अग्ने पायुभिरजंस्रैरुत प्रिये सदंन आ शुंशुक्वान् ॥

मा ते भयं जरितारं यविष्ठ नूनं विदुन्मापरं संहस्वः ॥ ४ ॥

पाहि नः अग्ने पायुऽभिः अजस्रैः उत प्रिये सदने आ शुशुक्वान् ।

मा ते भयं जरितारं यविष्ठ नूनं विदत् मा अपरं सहस्वः ॥ ४ ॥

हे अग्निदेवा, आपल्या प्रिय यज्ञ वेदीवर विराजमान होऊन अविछिन्न संरक्षणांनीं आमचा सांभाळ कर. इतकेंच नाहीं तर हे महापराक्रमी अग्निदेवा, ज्या तुझें तारुण्य कालत्रयीही नाहिसें होत नाहीं असा तूं, असें कर कीं, आपल्या भक्ताला आतां आणि पुढें केव्हांहि भय प्राप्त होऊं नये. ॥ ४ ॥

मा नो॑ अ॒ग्नेऽ॑व सृजो अ॒घाया॑वि॒ष्यवे॑ रि॒पवे॑ दु॒च्छुना॑यै ॥

मा द॒त्वते॒ दश॑ते॒ माद॑ते नो॒ मा रीष॑ते सहसाव॒न्परा॑ दाः ॥ ५ ॥

मा नः अग्ने अव सृजः अघाय अविष्यवे रिपवे दुच्छुनायै ।

मा दत्वते दशते मा अदते नः मा रीषते सहसाऽवन् परा दाः ॥ ५ ॥

हे अग्निदेवा, आम्हांला पातक्यांच्या, शत्रूंच्या किंवा घोर आपत्तिंच्या हातीं देऊं मको. तसेंच हे बलिष्ठा, आम्हांला क्रूरपशूच्या दंश करणाऱ्या सर्पादिकांच्या, अगर दांत नसूनही हिंस्र आहे अशांच्या सपाट्यांत सांपडूं देऊं नको. ॥ ५ ॥

वि घ॒ त्वावाँ॑ ऋतजात यंसद्गृणा॒नो अ॑ग्ने त॒न्वे३॑ वरू॑थम् ॥

विश्वा॑द्रि॒रि॒क्षोरु॒त वा॑ निनि॒त्सोर॑भि॒ह्रु॒ता॒मसि॒ हि दे॑व वि॒ष्पट् ॥ ६ ॥

वि घ त्वाऽवान् ऋतऽजात यंसत् गृणानः अग्ने तन्वे वरूथम् ।

विश्वात् रिरिक्षोः उत वा निनित्सोः अभिऽह्रुतां असि हि देव विष्पट् ॥ ६ ॥

हे समर्थपालका अग्ने, तुझे स्तवन केल्यामुळें तुझ्या भक्ताला आपल्या स्वतःच्या बचावासाठीं एक कवचच जणों मिळावें, म्हणजे त्याच्या योगानें दुष्ट आणि निंदक ह्यांच्या पासून त्याचा बचाव होईल. कारण हे देवा, सर्व कुटील अधमांना बांधून टाकून त्यांचा निःपात करणारा तूंच आहेस. ॥ ६ ॥

त्वं ताँ अ॑ग्न उ॒भया॒न्वि वि॒द्वान्वेषि॑ प्रपि॒त्वे मनु॑षो यजत्र ॥

अ॒भि॒पि॒त्वे मन॑वे॒ शास्यो॑ भूर्म॒र्मृजेन्य॑ उ॒शिग्भि॒र्नाक्रः ॥ ७ ॥

त्वं तान् अग्ने उभयान् वि विद्वान् वेषि प्रऽपित्वे मनुषः यजत्र ।

अभिऽपित्वे मनवे शास्यः भूः मर्मृजेन्यः उशिक्ऽभिः न अक्रः ॥ ७ ॥

हे परमपूज्य अग्निदेवा, देवलोक आणि मृत्युलोक अशा दोन्हीं लोकांचें यथातथ्य ज्ञान तुला आहें तुझी थोरवी येवढी असतांहि तूं प्रातःकाळीं मनुष्यलोकांतील आपल्या भक्तांकडे प्रेमानें येतोस, सायंकाळींहि मानवी भक्तांच्याच आधीन होऊन राहतोस. आणि तूं एवढा जलाल, परंतु कविजनांनीं तुला वाटेल तसा सजवावा इतका तूं भक्तांना वश असतोस. ॥ ७ ॥

अवो॑चाम नि॒वच॑नान्यस्मि॒न्मान॑स्य सू॒नुः स॑हसा॒ने अ॒ग्नौ ॥

व॒यं स॒हस्र॒मृषि॑भिः सनेम वि॒द्याम॒ेषं वृ॒जनं॑ जी॒रदा॑नुम् ॥ ८ ॥

अवोचाम निऽवचनानि अस्मिन् मानस्य सूनुः सहसाने अग्नौ ।

वयं सहस्रं ऋषिऽभिः सनेम विद्याम एषं वृजनं जीरऽदानुम् ॥ ८ ॥

आम्हीं आपलीं स्तुतिस्तोत्रें त्याच्या प्रीत्यर्थच केलीं आहेत. मी मानपुत्रानेंही ह्या महाबलाढ्य अग्निच्याच ठिकाणिं निष्ठा ठेविली आहे. ह्या ऋषिमंडळींच्या योगानें आम्हांला हजारों लाभ होवोत; म्हणजे त्यांतच तात्काळ फलद्रूप होणारा उत्साहप्रद असा आश्रय आम्हांस प्राप्त होईल. ॥ ८ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १९० (बृहस्पतिः सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : बृहस्पतिः - छंद - त्रिष्टुभ्

अ॒न॒र्वाणं॑ वृष॒भं म॒न्द्रजि॑ह्व॒ं बृह॒स्पतिं॑ वर्धया॒ नव्य॑म॒र्कैः ॥

गा॒था॒न्यः सु॒रुचो॒ यस्य॑ दे॒वा आ॑शृ॒ण्वन्ति॒ नव॑मानस्य॒ मर्ताः॑ ॥ १ ॥

अनर्वाणं वृषभं मन्द्रऽजिह्वं बृहस्पतिं वर्धया नव्यं अर्कैः ।

गाथान्यः सुऽरुचः यस्य देवाः आऽशृण्वन्ति नवमानस्य मर्ताः ॥ १ ॥

सर्व विद्यांचा स्वामी बृहस्पति हा अजिंक्य आहे. तो वीर्यशाली मधुर भाषणी व अत्यंत स्तुत्य आहे. त्याला अर्क-स्तोत्रांनी तूं प्रसन्न कर. सकल स्तुतींचा प्रभु आणि परम देदिप्यमान अशा ह्या बृहस्पतीचें स्तवन चालू झालें म्हणजे सर्व देव आणि मनुष्यें ते एकाग्र मनानें ऐकत असतात. ॥ १ ॥

तम् ऋ॒त्विया॒ उप॒ वाचः᳚ सचन्ते॒ सर्गो॒ न यो दे᳚वय॒तामस॑र्जि ॥

बृह॒स्पतिः॒ स ह्यञ्जो॒ वरां᳚सि॒ विभ्वाभ॑व॒त्समृ॒ते मा॑त॒रिश्वा॑ ॥ २ ॥

तं ऋत्वियाः उप वाचः सचन्ते सर्गः न यः देवऽयतां असर्जि ।

बृहस्पतिः स हि अञ्जः वरांसि विऽभ्वा अभवत् सं ऋते मातरिश्वा ॥ २ ॥

वेळोवेळीं म्हटल्या जाणाऱ्या स्तुति त्याचीच सेवा करतात. कारण भक्तजनाच्या प्रेमजीवनाचा हा जणोकाय झराच म्हणून प्रकट झाला आहे. ज्यानें ह्या विश्वांतील सर्व स्पृहणीय वस्तू निदर्शनास आणल्या तो बृहस्पति हाच. अंतरिक्षांतील प्राणतत्त्व जो मातरिश्वा त्याच्या रूपानें प्रत्येक धर्मकृत्याच्या वेळीं प्रकट होतो. ॥ २ ॥

उप॑स्तुतिं॒ नम॑स॒ उद्य॑तिं॒ च॒ श्लोकं᳚ यंसत्सवि॒तेव॒ प्र बा॒हू ॥

अस्य क्रत्वाहन्योऽ यो अस्ति मृगो न भीमो अरक्षसस्तुविष्मान् ॥ ३ ॥

उपऽस्तुतिं नमसः उत्ऽयतिं च श्लोकं यंसत् सविताऽइव प्र बाहू इति ।

अस्य क्रत्वा अहन्यः यः अस्ति मृगः न भीमः अरक्षसः तुविष्मान् ॥ ३ ॥

सूर्य आपल्या बाहूरूप रश्मींचा प्रत्येक पदार्थांत शिरकाव करतो त्याप्रमाणें बृहस्पति हा भक्तांच्या अंतःकरणांत स्तवनेच्छा, उपासना बुद्धि, उद्यमप्रवृत्ति आणि सुयश लालसा ह्यांची प्रेरणा करतो. हेंच काय पण खुद्द दिनमणी सूर्य देखील ह्याच परम सात्त्विक बृहस्पतीच्या प्रतापानेंच सिंहाप्रमाणें भयंकर आणि पराक्रमी झालेला आहे. ॥ ३ ॥

अस्य श्लोको दिवीयते पृथिव्यामत्यो न यंसद्यक्षभृद्विचेताः ॥

मृगाणां न हेतयो यन्ति चेमा बृहस्पतेरहिमायाँ अभि द्यून् ॥ ४ ॥

अस्य श्लोकः दिवि ईयते पृथिव्यां अत्यः न यंसत् यक्षऽभृत् विऽचेताः ।

मृगाणां न हेतयः यन्ति च इमाः बृहस्पतेः अहिऽमायान् अभि द्यून् ॥ ४ ॥

हा बृहस्पति महाप्राज्ञ आणि सर्व माननीय वस्तूंचे भांडार आहे, अशी ह्याची कीर्ति एखाद्या वेगवान् शक्तिप्रमाणें आकाशांत आणि पृथ्वीवर सर्वत्र पसरली आहे. व्याधाचे बाण हरिणावर पडतात, त्याप्रमाणें हीं बृहस्पतीची अस्त्रेंही द्युलोक व्यापून टाकतात. ॥ ४ ॥

ये त्वा॑ देवोस्रिकं मन्य॑माना॒ः पा॒पा भ॒द्रमु॑प॒जीव॑न्ति प॒ज्राः ॥

न दू॒ढ्ये३॑ अनु॑ ददासि वा॒मम् बृह॑स्पते॒ चय॑स॒ इत्पिया॑रुम् ॥ ५ ॥

ये त्वा देव उस्रिकं मन्यमानाः पापाः भद्रं उपऽजीवन्ति पज्राः ।

न दूःध्ये अनु ददासि वामं बृहस्पते चयसे इत् पियारुम् ॥ ५ ॥

हे भगवंता, जे प्रबल परंतु पातकी लोक तुला निःसत्व मानून, पुनः तुज मंगल मूर्तिच्याच आश्रयानें आपला निर्वाह करतात, अशा अधमांना हे बृहस्पते अत्यंत श्रेष्ठ जी वस्तू आहे ती तूं कधीं देत नाहीसच, परंतु अशा दुर्जनांना तूं शासन मात्र खचित करतोस. ॥ ५ ॥

सुप्रैतुः सूयवसो न पन्था दुर्नियन्तुः परिप्रीतो न मित्रः ॥

अनर्वाणो अभि ये चक्षते नोऽपीवृता अपोर्णुवन्तो अस्थुः ॥ ६ ॥

सुऽप्रैतुः सुऽयवसः नः पन्थाः दुःऽनियन्तुः परिऽप्रीतः नः मित्रः ।

अनर्वाणः अभि ये चक्षते नः अपिऽवृताः अपऽऊर्णुवन्तः अस्थुः ॥ ६ ॥

तृणाच्छादित मार्गाप्रमाणें हा सुगम आणि अनिवार्य परंतु खऱ्या मित्राप्रमाणें प्रसनांतःकरण होय. ह्याच्या कृपेनें अजिंक्य झालेले जे जे लोक आम्हांकडे आज कृपा दृष्टीनें पहात आहेत ते जरी पहिल्यानें गर्क होऊन गेले होते तरी मागाहून आपणास मोकळे करते झाले. ॥ ६ ॥

सं यं स्तुभोऽवनयो न यन्ति समुद्रं न स्रवतो रोधचक्राः ॥

स विद्वाँ उभयं चष्टे अन्तर्बृहस्पतिस्तर आपश्च गृध्रः ॥ ७ ॥

सं यं स्तुभः अवनयः न यन्ति समुद्रं न स्रवतः रोधऽचक्राः ।

सः विद्वान् उभयं चष्टे अन्तः बृहस्पतिः तरः आपः च गृध्रः ॥ ७ ॥

आमच्या प्रार्थना, ज्याप्रमाणें वारा झपाट्यानें वहातो किंवा नदीच्या पाण्याचे लोंढेच्या लोंढे समुद्राला जाऊन मिळतात, त्यप्रमाणें जावोत. तो सर्वसाक्षी बृहस्पती आपल्या दिव्य दृष्टीनें, तारूं व पाणि , (म्हणजेच श्रद्धा आणि विधि), या दोहोंकडे लक्ष्यपूर्वक पहात असतो. ॥ ७ ॥

एवा महस्तुविजातस्तुविष्मान्बृहस्पतिर्वृषभो धायि देवः ॥

स नः स्तुतो वीरवद्धातु गोमद्विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥ ८ ॥

एव महः तुविऽजातः तुविष्मान् बृहस्पतिः वृषभः धायि देवः ।

सः नः स्तुतः वीरऽवत् धातु गोऽमत् विद्याम एषं वृजनं जीरऽदानुम् ॥ ८ ॥

भक्तांस सुगम, बलाढ्य आणि उदार अशा हा थोर देव बृहस्पती आमच्या हृदयीं वास करून आहे. तो देव आमच्या प्रार्थनांनीं आनंदीत होऊन आमच्यावर शौर्याचा आणि ज्ञानाचा वर्षाव करो, म्हणजे आम्ही त्वरीत फलदायक अशी उत्साहवर्धक शक्ति भोगूं ॥ ८ ॥

ऋग्वेद - मण्डल १ सूक्त १९१ (सुर्यः सूक्त)

ऋषि : अगस्त्य मैत्रावरुणिः - देवता : सुर्यः - छंद - अनुष्टुप्

कङ्कंरतो न कङ्कतोऽथो सतीनकंङ्क तः ॥

द्वाविति प्लुषी इति न्यं१दृष्टा अलिप्सत ॥ १ ॥

कङ्कतः न कंकतः अथो इति सतीनऽकङ्कतः ।

द्वौ इति प्लुषी इति इति नि अदृष्टाः अलिप्सत ॥ १ ॥

जमीनीवरचे साधारण विषारी किंवा महाविषारी प्राणि आणि पाण्यांत राहणारे विखार व जलाल किंवा अदृश्य विषार ह्यापैकीं कोणाचें तरी विष माझ्या आंगांत पुरें भिनलें आहें हे खास. ॥ १ ॥

अ॒दृष्टा॑न्हन्त्याय॒त्यथो॑ हन्ति परा॒यती ॥

अथो॑ अवघ्न॒ती ह॒न्त्यथो॑ पिनष्टि पिंष॒ती ॥ २ ॥

अदृष्टान् हन्ति आऽयति अथो इति हन्ति पराऽयती ।

अथो इति अवऽघ्नती हन्ति अथो इति पिनष्टि पिंषती ॥ २ ॥

ही औषधी अदृश्य विषारांच्या जवळ आपल्या बरोबर त्यांना मारून टाकते, ही दुसरी एकदां उतरून दूर नेल्याबरोबर त्यांचा नाश करतें. ही औषधी अशी आहे कीं, विष बाधलेल्या जागेवर आपटतां क्षणींच विषार नाहींसा करते, आणि ही तर अशी आहे कीं ती ठेंचल्याबरोबर विषारही ठेंचला जातो. ॥ २ ॥

श॒रास॒ः कुश॑रासो द॒र्भास॑ः सै॒र्या उ॒त ॥

मौ॒ञ्जा अ॒दृष्टा॑ वैरि॒णाः सर्वे॑ सा॒कं न्यलिप्सत ॥ ३ ॥

शरासः कुशरासः दर्भासः सैर्याः उत ।

मौञ्जाः अदृष्टाः वैरिणाः सर्वे साकं नि अलिप्सत ॥ ३ ॥

शर (बारीक कळक) कुशर (बोरू), दर्भ, सैर्य, मुंज, बैरीण इत्यदि जातीच्या गवतांत राहणाऱ्या प्राण्यांचे सर्व अदृश्य विखार माझ्या आंगांत एकदम भिनले आहेत असें वाटतें. ॥ ३ ॥

नि गावो॑ गो॒ष्ठे अ॑सद॒न्नि मृ॒गासो॑ अविक्षत ॥

नि के॒तवो॒ जना॑नां॒ न्य॑१दृष्टा॑ अलिप्सत ॥ ४ ॥

नि गावः गोऽस्थे असदन् नि मृगासः अविक्षत ।

नि केतवः जनानां नि अदृष्टाः अलिप्सत ॥ ४ ॥

गाई आपल्या गोठ्यांत स्वस्थ पडून होत्या, हरिणें आपापल्या निवाऱ्याच्या जागीं शिरून निजलीं, आणि मानवी प्राण्याच्या चैतन्याची पताका निश्चल झाली अशा वेळीं अदृश्य विखार माझ्या आंगांत भिनला. ॥ ४ ॥

ए॒त उ॒ त्ये प्रत्य॑दृश्रन्प्रदो॒षं तस्क॑रा इव ॥

अदृ॑ष्टा॒ विश्व॑दृष्टा॒: प्रति॑बुद्धा अभूतन ॥ ५ ॥

एत ऊं इति त्ये प्रति अदृश्रन् प्रऽदोषं तस्कराःऽइव ।

अदृष्टा विश्वऽदृष्टाः प्रतिऽबुद्धा अभूतन ॥ ५ ॥

हे विखारी प्राणी, चोराप्रमाणें रात्रीच्या वेळीं छपून फिरतांना दृष्टीस पडतात. स्वतः लपून राहून सर्वांस पहाणाऱ्या विषारांनो, आतां मात्र हुशार राहा. ॥ ५ ॥

द्यौर्व॑: पि॒ता पृ॑थि॒वी मा॒ता सोमो॒ भ्रातादि॑ति॒: स्वसा॑ ॥

अदृ॑ष्टा॒ विश्व॑दृष्टा॒स्तिष्ठ॑ते॒लय॑ता॒ सु॒ क॑म् ॥ ६ ॥

द्यौः वः पिता पृथिवी माता सोमः भ्राता अदितिः स्वसा ।

अदृष्टाः विश्वऽदृष्टाः तिष्ठत इळयत सु कम् ॥ ६ ॥

आमच्याप्रमाणेंच तुमचाही द्यू हा पिता आणि पृथिवी ही माता व सोम बंधु आणि अदिती ही बहीण होय. तर स्वतः लपून राहून सर्वांस पहाणाऱ्या विषारांनो, एकदम थांबा आणि मुकाट्यानें येथून पळ काढा. ॥ ६ ॥

ये अंस्या॒ ये अङ्ग्याः᳚ सू॒चीका॒ ये प्र॑कङ्क॒rताः ॥

अदृ॑ष्टा॒ः किं च॒नेह व॒ः सर्वे॑ सा॒कं नि ज॑स्यत ॥ ७ ॥

ये अंस्याः ये अङ्ग्याः सूचीकाः ये प्रकङ्कर्ताः ।

अदृष्टाः किं चन इह वः सर्वे साकं नि जस्यत ॥ ७ ॥

जे पालीप्रमाणें चालणारे व जे सर्पा प्रमाणे नुसत्या आंगानें सरपटणारे आहेत, जे नांगी मारून दंश करणारे किंवा त्याहूनही जलाल विखार आहेत ते आणि जे इतर कोणत्याहि प्रकारचे अदृश्य विषारी जंतु असतील, अशा सर्व विषारांनो तुम्हां सर्वांची एकदम गठडी वळो. ॥ ७ ॥

उत्पु॒रस्ता॒त्सूर्य॑ एति वि॒श्वदृ॑ष्टो अदृष्ट॒हा ॥

अ॒दृष्टा॒न्सर्वा॑ञ्ज॒म्भय॒न् सर्वा॑श्च यातु॒धा॒न्यः ॥ ८ ॥

उत् पुरस्तात् सूर्य एति विश्वऽदृष्टः अदृष्टऽहा ।

अदृष्टान् सर्वान् जम्भयन् सर्वाः च यातुऽधान्यः ॥ ८ ॥

पहा, सर्व विश्वाला पहाणारा आणि सर्व अदृश्य विषारांचा नाश करणारा सूर्य पूर्व दिशेकडे उदय पावत आहे. तो अदृश्य विखार आणि दुष्ट चेटक्या ह्या सर्वांचा पार फडशा पाडून टाकतो. ॥ ८ ॥

उद॑पप्तद॒सौ सूर्यः॑ पु॒रु विश्वा॑नि॒ जूर्व॑न् ॥

आ॒दि॒त्यः पर्व॑तेभ्यो वि॒श्वदृ॑ष्टो अदृष्ट॒हा ॥ ९ ॥

उत् अपप्तत् असौ सूर्यः पुरु विश्वानि जूर्वन् ।

आदित्यः पर्वतेभ्यः विश्वऽदृष्टः अदृष्टऽहा ॥ ९ ॥

सर्व विश्वाला पाहणारा, सर्व दुष्टांस सडकून भाजून काढणारा, आणि अदृश्य विषारांचा नाश करणारा हा आदित्य सूर्य ह्या उदयापासून वर चढत चालला. ॥ ९ ॥

सूर्ये वि॒षमा स॑जामि॒ दृति॒ं सुरा॑वतो गृ॒हे ॥

सो चि॒न्नु न म॑राति॒ नो व॒यं म॑रामा॒रे अ॑स्य

योज॑नं हरि॒ष्ठा मधु॑ त्वा मधु॒ला च॑कार ॥ १० ॥

सूर्ये विषं आ सजामि दृतिं सुराऽवतः गृहे ।

सः चित् नु न मराति नो इति वयं मराम आरे अस्य योजनं हरिऽस्थाः मधु त्वा मधुला चकार ॥ १० ॥

मद्याची बाधा न होणाऱ्या मनुष्याच्या घरीं ज्याप्रमाणें मद्यरूप विषाचा बुधला नेऊन टाकावा, त्याप्रमाणे मीं सूर्यमंडलाच्या ठिकाणीं हें विष दांबून ठेवितों, म्हणजे सूर्य जसा कधीं मरत नाहीं, तसे आम्हींही मरणार नाहीं. सुवर्ण रश्मिरूप अश्वावर आरूढ झालेल्या सूर्यानें त्या विषाला दूर नेऊन मधुविद्येच्या योगानें त्याचें अमृत करून सोडिलें. ॥ १० ॥

इ॒य॒त्ति॒का श॑कु॒न्ति॒का स॒का ज॑घास ते वि॒षम् ॥

सो चि॒न्नु न म॑राति॒ नो व॒यं म॑रामा॒रे अ॑स्य

योज॑नं हरि॒ष्ठा मधु॑ त्वा मधु॒ला च॑कार ॥ ११ ॥

इयत्तिका शकुन्तिका सका जघास ते विषम् ।

सो इति चित् नु न मराति नो इति वयं मराम आरे अस्य योजनं हरिऽस्थाः मधु त्वा मधुला चकार ॥ ११ ॥

कपिंजली हें पांखरू येवढेंसे असते खरें पण तिनें तुझ्या आंगांत भिनलेलें विष पार खाऊन टाकलें तरी ती जशी कधीं मरत नाहीं, तसे आम्हीही मरणार नाहीं. कारण सुवर्ण रश्मिरूप अश्वावर आरूढ झालेल्या सूर्यानें त्या विषाला दूर नेऊन मधुविद्येच्या योगानें त्याचें मधुर अमृत बनवून सोडलें. ॥ ११ ॥

त्रिः स॒प्त वि॑ष्पुलिङ्ग॒िका वि॒षस्य॒ पुष्य॑मक्षन् ॥

ताश्चि॒न्नु न म॑रन्ति॒ नो व॒यं म॑रामा॒रे अ॑स्य

योजनं हरिष्ठा मधु त्वा मधुला चकार ॥ १२ ॥

त्रिः सप्त विष्पुलिङ्गकाः विषस्य पुष्यं अक्षन् ।

ताः चित् नु न मरन्ति नो इति वयं मराम आरे अस्य योजनं हरिऽस्थाः मधु त्वा मधुला चकार ॥ १२ ॥

एकविस विष्पुलिंग (एक जात) चिमण्यांनी विषाच्या वाढत्या लहरींना पार शोषून घेतलें तरी त्या जशा कधीं मरत नाहींत तसे आम्ही ही मरणार नाहीं, कारण सुवर्ण रश्मिरूप अश्वावर आरूढ झालेल्या सूर्यानें त्या विषाला दूर नेऊन मधुविद्येच्या योगानें मधुर अमृत करून टाकलें. ॥ १२ ॥

नवानां नवतीनां विषस्य रोपुषीणाम् ॥

सर्वासामग्रभं नामारे अस्य

योजनं हरिष्ठा मधु त्वा मधुला चकार ॥ १३ ॥

नवानां नवतीनां विषस्य रोपुषीणाम् ।

सर्वासां अग्रभं नाम आरे अस्य योजनं हरिऽस्थाः मधु त्वा मधुला चकार ॥ १३ ॥

विषाचा परिहार करणाऱ्या ज्या नव्याण्णव नद्या आहेत, त्या सर्वांचे नांव मी घेतलें, त्यामुळें सुवर्ण रश्मिरूप अश्वावर आरूढ झालेल्या सूर्यानें त्या विषाला दूर नेऊन मधुविद्येच्या योगानें त्याचें मधुर अमृत करून टाकलें. ॥ १३ ॥

त्रिः स॒प्त म॑यू॒र्यः स॒प्त स्वसा॑रो अ॒ग्रुवः॑ ॥

तास्ते॑ वि॒षं वि ज॑भ्रिर उद॒कं कु॒म्भिनी॑रिव ॥ १४ ॥

त्रिः सप्त मयूर्यः सप्त स्वसारह् अग्रुवः ।

ताः ते विषं वि जभ्रिर उदकं कुम्भिनीःऽइव ॥ १४ ॥

एकवीस मयूरी आणि लग्न न झालेल्या सात बहिणी, ह्या सर्वांनी तुझ्या आंगांतील विषार घागरींनी पाणी भरून नेल्याप्रमाणें तुझ्या आंगांतून काढून टाकला आहे. ॥ १४ ॥

इयत्तकः कुषुम्भकस्तकं भिनद्म्यश्मना ॥

ततो विषम् प्र वावृते पराचीरनु संवतः ॥ १५ ॥

इयत्तकः कुषुम्भकः तकं भिनद्मि अश्मना ।

ततः विषंम् प्र ववृते पराचीः अनु संऽवतः ॥ १५ ॥

हा एव्हढासा मुंगूस आहे, पण माझें विष न उतरेल तर त्या बेट्याला मीं दगडाखालीं ठेंचून टाकीन, हें पहा तेथून विष उतरत चाललें, गेलें, कोणीकडच्या कोणीकडे निघून गेलें. ॥ १५ ॥

कुषुम्भकस्तदब्रवीद् गिरेः प्रवर्तमानकः ॥

वृश्चिकस्यारसं विषमरसं वृश्चिक ते विषम् ॥ १६ ॥

कुषुम्भकः तत् अब्रवीत् गिरेः प्रवर्तमानकः ।

वृश्चिकस्य अरसं विषं अरसं वृश्चिक ते विषम् ॥ १६ ॥

मग पर्वतांच्या कपारींतून मुंगूस बाहेर येऊन बोलला कीं अरे हें विष विंचवाचें त्यांत कसचा जीव आहे. विंचवा चल जा, तुझें विष तर अगदींच नरम. ॥ १६ ॥

॥ प्रथमं मण्डलं समाप्तं ॥

ॐ तत् सत्

ऋग्वेद मंडल रचना :

ऋग्वेद मंडळ (१) : सूक्त - १९१

ऋग्वेद मंडळ (२) : सूक्त -४३

ऋग्वेद मंडळ (३) : सूक्त - ६२

ऋग्वेद मंडळ (४): सूक्त - ५८

ऋग्वेद मंडळ (५): सूक्त - ८७

ऋग्वेद मंडळ (६): सूक्त - ७५

ऋग्वेद मंडळ (७) : सूक्त - १०४

ऋग्वेद मंडळ (८): सूक्त - १०३

ऋग्वेद मंडळ (९): सूक्त - ११४

ऋग्वेद मंडळ (१०) : सूक्त - १९१

ऋग्वेदाची इतर मंडले लवकरच प्रकाशित होतील.

www.esahity.com